सं. मा
१५
७

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक १.

# नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

## A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.*

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

लटपटचा पद्या ( प्रहसन ) ... ... ... ... ... ... ...३७ पासून ८२
कुवलयपूरची राणी कुमुद्वती. ... ... ... ... ... ... ...११७ ,, १३२

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत
हरि नारायण गोखले यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क
मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.

[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ४॥ शिवाय ट. हं. ६ आणे.

जानेवारी १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें.

# केसरींतील निवडक निबंध.

## भाग पहिला.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र ( ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत ) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

### विषयानुक्रमणिका.


उपोद्घात—वाचन.
आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण ?
हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे.
आह्मी आमच्या दारिद्र्यांतून कशानें सुटूं ?
गुरुगोविंद.
स्वत्वाची अवश्यकता.
व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं.
आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा.
हिंदुस्थानावर रशिया स्वारी करणार काय ?
इंग्लंडाशिवाय आह्मांस गति नाहीं.
दागिन्यांचा सोस.
एकत्र राहणें चांगलें का ?
अनुकरण.
अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार.
भोजनगृह.
युरोपियन आणि नेटिव यांचें अन्योन्य संघट्टन.
मराठमोळा.
मराठमोळ्याची पुरवणी.
सासुरवास.
दारुबाजी.
इंग्रजी विद्या व आमची सामाजिक स्थिति.
हिंदुस्थानदेश बुडाला, हो, ठार बुडाला.
स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द.
माधवबागेंतील सभेवरील आक्षेप.
आतां कसें ?
सारस्वांस नोटीस.
वर्तमानपत्रें.
शेक्सपिअर, भवभूति, कालिदास.
नाटकें करावीं कीं करूं नये ?
कवि, काव्य, काव्यरति.
बडोद्याचे सयाजीराव महाराज यांस दोन उपदेशपर शब्द.
आपलें वैद्यक.
रसायनक्रिया.
मुद्रणस्वातंत्र्य.
कै० विष्णु कृष्ण चिपळोणकर.
मन आणि मेंदू.
सृष्टयवलोकन.


म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.

सं.भा.१६/७



जरा इकडे करा—मी सारें सांगतें आपल्याला. [ त्याच्या कानांत सांगते.

**कुंवर०**—खरें का हें? एकूण विजयाबाई त्या या. बरें तर; आतां आंबाजीरावाचा निरोप ऐका. त्यांनीं सांगितलें आहे कीं "आपण कांहीं काळजी करूं नका. मी जवळच आहे. आपला छळ चाललेला मला कळला आहे. लवकरच मी आपल्याला यांतून सोडवून आपल्या भावाची व आपली भेट करवितों." आपलें लग्न होणार हें ऐकल्यापासून त्याच्या जिवाला चैन नव्हतें. आतां ही हकीकत ऐकून त्याला किती पण आनंद होईल.

**लक्ष्मी**—बरें तें असो. आपण कोण आणि दादा कोठें आहे?

**कुंवर०**—तें सारें योग्य वेळीं तुम्हांला कळेल. तूर्त इतकेंच सांगतों कीं, निर्धास्त रहा. आणखी हें पहा, कांहीं कमीजास्त झालें तर पत्राबरोबर मला ह्मणजे आंबाजीरावाला निरोप पाठवा. येतों मी आतां. [ जातो.

**विजया**—हें काय असेल बरें?

**लक्ष्मी**—कांहीं का असेना. आतां आपल्या या सुकलेल्या फुलाला टवटवी येऊं द्या. पण ती पहा अक्काबाई आपल्याला शोधीत इकडे येत आहे. चल लवकर न्हाणीघरांत जाऊन अंग धुवून घेऊं. [ जातात.

---

## प्रवेश ४—वाड्यांतील दिवाणखाना.

फरजंदोजी येतो.

**फरजं०**—हा म्हातारा अगदीं भकून गेला आहे. त्या सोळा सतरा वर्षांच्या पोरीच्या नादानें प्रत्यक्ष आपल्या पोरीचा देखील गळा कापायला तो तयार झालाना! एकून बायकांच्या नादानें शहाणपण, अनुभव वगैरे जे जे गुण मनुष्यपणाला सन्माननीय व पूज्य करतात त्या सर्वांवर पाणी पडतें. या म्हाताऱ्याच्या डोळ्यांत चांगलें तीव्र अंजन घातल्याशिवाय तो शुद्धीवर यायचा नाहीं. आणि त्या नकटीचेंही पण नाक चिरून त्यांत मीठ भरलें पाहिजे. या दोन्ही गोष्टी पिऱ्याचें त्या पोरटीशीं लग्न लावून दिलें कीं आपोआप होतील, तेव्हां पिऱ्याच्या संबंधानें आणि माझ्या संबंधानें जी त्यांची समजूत झाली आहे ती कायम ठेवावी. एर्वी तेवीं मीं सोंग आणलें आहे असें ते समजताहेतच. तेव्हां खरोखरींच सोंग घेऊन यांचे दात पाडूं या. हे पहा म्हातारबोवा आले. यांच्यावरच पाहूं या आपल्या मात्रेचा प्रयोग करून.

संताजीराव येतो.

( संताजीरावाला ऐकूं जाईल अशा रीतीनें ) —चिमन. आपनासनी या मोटपणाचा अक्षी कटाळा येऊन गेला. कवां माझा हुजऱ्याचा पोषाक चढवीन असं झालंया.

**संताजी०**—( आपल्याशीं ) हुजऱ्याचा पोषाख चढवीन!

**फरजं०**—या स्वांगामुळें योक फायदा मातुर झाला. ह्ये कपड मिळाल. आतां धनीसाब फिरून ह्ये घालायच न्हाईत.

**संताजी०**—( आपल्याशीं ) धनीसाहेब! असं, अस्सं!

फरजं०—आन् धनीसावबी आतां स्वांग टाकून देत्याल तर बरें. संताजीरावासनी माझा अंदेशा आलाया खचित.

संताजी०—( पुढें येऊन ) अंदेशा ! अरे माझी खात्री झाली आहे. तूं आतां मुकाट्यानें आपला हुजऱ्याचा पेहराव चढवावास हें बरें.

फरजं०—कोण आपली स्वारी का ? मामासाहेब ! मी आतां—

संताजी०—मामासाहेब ! अरे चोरा. पुनः असा फाजीलपणा करशील तर तुझे कान उपटून देईन हातावर. हरामखोरा, खबरदार माझ्याशीं सलगी करशील तर. गुलामाला नाटकी ऐट पण कशी साधली आहे. हें पहा, तूं जर गरीबीनें वागशील तरच तुझा येथें निभाव लागेल.

फरजं०—आं, बाबासाव ! आपुन मला कसं वळाकलंजी ?

संताजी०—तुझ्याच सोबत्यानें तें मला सांगितलें. ( आपल्याशीं ) अरे, पण ही गोष्ट फोडतां उपयोगीं नाहीं—( उघड ) कोणीं का सांगेना, मला तें कळलें आहे इतकें बस्स. हे पहा तुझे धनी आले.

फरजं०—( आपल्याशीं ) हा पिऱ्या सारें बस्तान बिघडवील. त्याला अगोदर पढवून ठेवायला पाहिजे होतें.

संताजी०—मला वाटतें आतां तुझ्या धन्यानें हें वेडें सोंग टाकावें.

फरजं०—मलाबी तसंच वाटतंया. पन् बाबासाब, माझं धनी हायती लई हट्टी; त्ये अजूनबी आपुन फरजंदोजीराव थि कबूल करायचं न्हाईत. व्हो ! तर आतांच बगा नमुना.

संताजी०—इतके हट्टी आहेत का हे ? तर मग त्यांच्या बापाला यांचे हे ढंग कळविलेच पाहिजेत.

पिऱ्या येतो.

पिऱ्या—सरकार, चाकराकडून कायबी नोकरी घ्यायची हाय का ?

संताजी०—( हंसत ) चाकराकडून नोकरी! वाः ! अहो राव, आतां हें सोंग टाकून द्या.

पिऱ्या—( आश्चर्यानें ) स्वांग ! कोन् स्वांग जी ? मी का तुमी ? स्वांग अन स्वांग !

संताजी०—होय सोंग ! आम्हांला सारें कळलें आहे.

पिऱ्या—कळलं असल तर बसा गप्प एक बाजुला. चिभन ! हाय तरी काय ह्यो ख्योळ !

संताजी०—राव, मी म्हणतों थट्टा झाली तरी ती किती वेळ करायची ! त्यांतून सोंग उघडकीला आल्यावर मग तें पुढें तसेंच चालविण्यांत कांहीं मजा नाहीं. मुकाट्यानें सारें कबूल करावें आणि मोकळें व्हावें हें बरें.

पिऱ्या—आं ! म्हसोबाच्यान्, कबूल काय करायचं जी ? आपुन काय बोलता व ?

संताजी०—होय का ? हें पहा राव, मी या तुमच्या ढोंगाची सारी हकीकत तुमच्या वडिलांना लिहितों. म्हणजे तेच डोक्यांतलें हें वेड घालवितील.

पिऱ्या—येड ! कुणाला लागलया ? आपनासनी व्हय ? तर मंग माझा बा देईल

त्यावर दवा. त्याला झाडपाल्याचीं औषदं आयंदाळ ठाऊक हायती.

**संताजी०**--मला वेड !

**फरजं०**--( आपल्याशीं ) हा सारी घाण करणार. त्याच्या कानांत मंत्र सांगितला पाहिजे. ( पिऱ्याच्या कानाशीं ) अरे गाढवा, संताजीरावांना तूंच धनी आहेस असें सांग.

**पिऱ्या**--( त्याला एकीकडे ) व्हयजी. संताजीराव, आपुनच धनी हांन् काय.

**संताजी०**--काय ! मी धनी ?

**फरजं०**-- ( पिऱ्याला एकीकडे ) मूर्खा, तूं फरजंदोजीराव आणि मी पिऱ्या असें सांगायचें. आलें का लक्षांत ?

**पिऱ्या**--( त्याला एकीकडे ) बरं तर. माझ्या बाच काय जातं ! संताजीराव, आपुन फरजंदोजीराव माझ धनी आन् मी पिऱ्या आपला चाकुर, आलं का ध्येनांत ?

**फरजं०**--( आपल्याशीं ) हा निव्वळ फत्तर आहे ! ( संताजीरावास एकीकडे ) म्यां सांगितलं न्हाई मगाशीं आपनासनी त्ये लई हट्टी हायत म्हून, जीव गेला तरीबी कबूल करायच न्हाईत.

**संताजी०**--तसें दिसतें खरें. फरजंदोजीराव, मी म्हणतों--( लक्ष्मी बाहेर गाणें ह्मणते. ) माझी मुलगी येते आहे--फरजंदोजीराव, तिच्यापुढें हा हलकट पोषाख घालून या उप्पर जाऊं नका. कांहीं चर्येंत आणि वागण्यासवरण्यांत मोठेपणा दाखवा. तुमच्या हुजऱ्यानें मोठेपणाची ऐट कशी शानदार आणली होती.

**फरजं०**--अः त्येबद्दल माझी शिफारस नग कराया. ह्यो समदा खयोळ पोषाकाचा हाय. झकपक पोषाक क्येला कीं झाला राव. तीं त्येचीं वस्तारं काढलीं म्हंजी बगा कस अलबेले गडी दिसत्याल ते. माझ्यापुनबी चढ ऐटबाज दिसत्याल.

**संताजी०**--आग लावा तुमच्या त्या वस्त्रांना !

**पिऱ्या**--तसं कशापायीं जी ? हीं वापरून वापरून वंगाळ दिसत्यातीं. धुतलीं ह्मंजी बगा कशी चमकत्यात तीं. धनीसाबांचं लगीन झालं ह्मंजी घेत्याल कीं नवीं वस्तारं घेऊनशान.

**फरजं०**--( आपल्याशीं ) याच्या या मूर्खपणापुढें हातच टेकले पाहिजेत.

लक्ष्मी येते.

**लक्ष्मी**--बाबा, आई बोलावते आहे तुम्हांला.

[ संताजीराव जाते.

( फरजंदोजीरावाला ) तुह्मी फरजंदोजीराव नव्हेत ह्मगे.

**फरजं०**--व्हय बाईसाब. मी पिऱ्या.

**पिऱ्या**--ह्यो पिऱ्या आन् मंग मी कोन ?

**फरजं०**--( पिऱ्याच्या कानांत ) पिऱ्या, अजून तरी शुद्धीवर ये आणि मी काय सांगतों तें नीट ध्यानांत घे. तुला चांगलें बक्षीस देईन. मी फरजंदोजीराव आहे असें सांग तिला.

**पिऱ्या**--आं, थोऽ तुमचा--आन् आतां संमदं उमगलों न्हव का. व्हय, बया. ह्ये म्हंत्यात तसंच.

**लक्ष्मी**--आणि ही का स्वारी आमचे प्राणपति होणार ! हाः हाः हाः !

**पिऱ्या**--व्हय तर काय ? तूं मोर मी मो-

रीन–तसं नव्हं, मी मोर तूं मोरीन–हाः हाः हाः !

**लक्ष्मी**–काय मेल्याचें बोलणें तरी ! अगदींच हलकट आहे. पण असेना. दागदागिने तरी पुष्कळ घालील. माझी मी धनीण होईन. मग कोणाचा तोरा माझ्यावर चालूं देणार नाहीं.

**पिऱ्या**–अग कारभारनी, घरांत जा, परपुरसाच्या समोर उभं व्हाऊं नये. मला न्हाई ह्ये खपायचं बग.

**लक्ष्मी**–इतक्यांतच नको कांहीं अंमल गाजवायला. फार काच कराल तर आपल्या हुजऱ्याबरोबर तुमच्या हातावर तुरी देऊन पळून जाईन. त्याचाही चेहरामोहरा चांगला आहे.

[ फरजंदोजीरावाला डोळा घालून चालती होते.

**फरजं०**–बरें झालें ही घोरपड माझ्या गळ्यांत अडकली नाहीं. अगदींच बेशरम. पिऱ्या, चल.

[ जातात.

---

**प्रवेश ५**––वाड्यांतील खजिन्याच्या खोलीपुढील दिवाणखाना.

**संग्या** इकडे तिकडे फिरत आहे.

**संग्या**–काय करावें या पिऱ्याला ! शिवाय पहिल्या प्रतीचा थापाड्या आणि हरामखोर आहे. मुनपाकखान्यांत जाऊन एकटा लाडवावर आणि जिलिबीवर ताव मारीत असेल. बरें आहे ह्मणावें. येऊं दे तर त्याला–अरे पण हा आलाच वाटतें

**पद्या**–या ब्यादी एकदां बाहेर काढून दिल्या पाहिजेत. कोण त्रास आहे बोवा ! हे येथें आहेत तोंपर्यंत माझ्या जिवांत जीव राहणार नाहीं. ( संग्याला पाहून ) तुह्मीं बाहेर आलां काय ? आणि कोणी आलें आणि पाहिलें तर काय होईल ? किती अविचार हा !

**संग्या**–पद्या, इकडे ये. आज सकाळीं न्याहारीला काय काय खाल्लें होतेंस ?

**पद्या**–कोणीं ? मीं होय ? हें पहा कांहीं फारसें खाल्लें नाहीं. चार पांच खव्याच्या करंज्या, दोन तीन मोतीचुराचे लाडू, थोडासा शिरा, शेवयांची खीर.

**संग्या**–बस्स, बस्स फार उत्तम आहे. आण तें तुझें पोट इकडे. या जंब्यानें तें चिरतों आणि त्यांतलें तें सगळें काढून खातों. [ त्याला ओढून जंब्या उगारतो

**पद्या**–( आपल्याशीं ) ही स्वारी खरोखर तापल्या सारखी दिसते. ( उघड ) संगाप्पा अण्णा, काय सांगूं तुह्मांला ? तुमच्यासाठीं फराळाचें सामान आणावें ह्मणून मीं कित्ती खटपट केली ? पण शिर्चीं हजार विघ्नें आलीं. तो मुनपाक्या कांहीं केल्या बाहेर जाईना. एकदां गेला ह्मणून फडताळांत हात घातला तों इतक्यांत आला कीं परत आणि माझ्याकडे असा अंदेशानें पाहूं लागला कीं मला भीति वाटली मीं कसा तरी त्याच्या हातून निसटलों. आणि इकडे येऊं लागलों तों–नाईकसाब आले.

कुंवरजी येतो.

**कुंवर०**–पद्या, बरा सांपडलास. इकडे ये. आणि मी विचारतों त्याचें सरळ

संभा १५८



उत्तर दे. माझा स्वभाव तुला ठाऊक आहे. मला खून करण्याचा अतिशय तिटकारा आहे. पण तूं जर उत्तर देतांना लटपट करूं लागलास, तर आपला विचार पहा. दुसरें तिसरें कांहीं सांगत नाहीं.

**पद्या**–( आपल्याशीं ) नाईकसाहेब रागावले आहेत. आतां यांच्याशीं लटपट करून उपयोग नाहीं. यांच्या मनाचा एकदां निश्चय झाला ह्मणजे मग त्यापासून ते मागें परतायचे नाहींत. मनाचा धडा करून खरें सांगावें.मग जें व्हावयाचें तें होईल.

**कुंवर०**–पद्या, विचार कसला करतो आहेस ? कांहीं खोटेंनाटें रचून सांगणार आहेस वाटतें ? पण पुनः सांगतों, संभाळ, माझ्याशीं गांठ आहे.

**पद्या**–होय, नाईकसाहेब सगळें खरें खरें सांगतों. या वाड्यांत जो मी आलों तो कांहीं लाग साधावा या हेतूनें. त्याप्रमाणें थोडा बहुत साधलाच. आपल्या कानांत सांगतों एक गम्मत. ( संग्याकडे बघत बघत कांहीं कुजबुजतो. )

**कुंवर०**–हें खरें आहेना ? नाहीं तर–

**पद्या**-नाईकसाहेब, गाईच्या रक्ता शपथ खरें आहे.

**कुंवर०**–बरें आहे. तर आतां पुढें मी सांगतों असें कर. या घरांत साऱ्या माणसांवर नजर ठेव. मी येथेंच आसपास दडून असतों. कांहीं विशेष प्रकार होतो असें दिसलें कीं सज्जावरच्या पहिल्या खांबाला एक तांबडें फडकें बांध. किंवा रात्र असली तर त्या ठिकाणीं तीनदां कंदील उजवीकडून डावीकडे फिरीव, कीं अर्ध्या घटकेच्या आंत मी येथें येऊन हजर होतों. ताईला–ह्मणजे समजलासना कोण ती–खरी विजया, तिला ही अंगठी दे आणि ह्मणावें धीर धर.

**पद्या**–नाईकसाहेब, आपण सांगतां त्याप्रमाणें मी करतों; पण माझा चेष्टेखोर स्वभाव आपल्याला माहीतच आहे त्याप्रमाणें येथें मीं जी हल्लीं गम्मत उडवून दिली आहे ती शेवटास पोंचविण्याची मला परवानगी असावी. आणि मला याउप्पर हा दरवडेखोराचा धंदा करायचा नाहीं, तेव्हां गरीबाची आठवण असावी.

**कुंवर०**–बरें आहे. नीट नजर ठेव. येथें जास्तकमी न होऊं देण्यांत माझें हित आहे, हें ध्यानांत धरून वाग.

**पद्या**–जी नाईकसाहेब. ( कुंवरजी संग्याला घेऊन जातो. ) गेले बोवा एकदांचे. पण आतां काय उपयोग ? आतां प्रामाणिकपणानें वागलेंच पाहिजे. नाहींतर नाईकसाहेबांशीं गांठ आहे. पण येथें जराशी अधिक मौज उडविल्याशिवाय मात्र रहायचें नाहीं. अरे पण हे ब्रातारबोवा आले. स्वारी रंगांत दिसते आहे. येथें या वळकटीच्या आड लपून ऐकूं या स्वारी काय बडबडते आहे ती.

संताजीराव येतो.

**संताजी०**–मांवईबोवा एकदाचे शुद्धीवर आले. पण त्यांचें बोलणें काय, चालणें काय, कोणी ह्मणेल कीं यांनीं आतांच हातचा नांगर सोडला. पण तो कसा का

असेना. त्या सुंदरीला तो आवडला आहे आणि हलकट असला तरी घरीं पैसा खूप आहे. पोरीला चांगली सजवील. हें एकदां लग्न झालें कीं सुटलों. मग आपण या सुंदरीशीं लग्न लावणार. काय सटवी लबाड आहे. तिच्याजवळ गेलें कीं, माझें मन माझ्या ताब्यांत रहात नाहीं. त्याची अगदीं चलबिचल उडून जाते. तिनें आजवर नानाप्रकारच्या सबबी सांगून मला हाताच्या अंतरावर ठेवलें आहे. अजून सुंदरा कां येईना ?

[ इकडे तिकडे फिरतो.

**पद्मा**–( लपल्या जागीं ) या थेरड्याला कांहीं लाज शरम आहे का ? हें वय का याचें उल्लू बनायचें ? अरे राम राम ! माणसाच्या मूर्खपणाला मर्यादा ह्मणून नाहीं. पण मी ह्मणतों, आहे हेंच बरें. शहाणे शहाणे ह्मणविणारे असलें हें दांतपडकें बोळकें एखाद्या दहा बारा वर्षांच्या पोरीच्या तोंडापुढें तिच्या त्या कोंवळ्या आणि लुसलुशीत मानेला आपल्या सुरकुतलेल्या हाताचा विळखा घालून लुबूलुबू हलवीत बसतात त्यापेक्षां हें बरें नाहीं का ? अरे पण हो, या पहा आल्या मदनमंजरीबाई-साहेब ठुमकत मुरडत. जसें कांहीं कोणी ह्मणेल ही पंधरा वर्षांची पोरच आहे !

सुंदराबाई येते.

**सुंदरा०**–( दूर उभी राहून खालीं मान घालून वांकड्या नजरेनें पहात ) काय आज्ञा आहे ?

**संताजी०**–अग अशी दूर कां ? आतां कांहीं फार दिवस दूर उभें रहायला मिळायचें नाहीं. येवढें लग्न होऊं द्या कीं करारामप्रमाणें तुला अशरफी ओढून या मांडीवर घेऊन असा.

[तिला जवळ ओढतो. ती मान बाजूला करते पद्मा, खाकरतो.

**सुंदरा०**–( दचकून दूर होऊन ) हें काय बाई, अगदींच कसा ताळ सोडायचा तो. कोणी येथें आहे वाटतें.

**संताजी०**–अग, कोणी नाहीं. भित्री कोठची. एक देतेसना ?

**सुंदरा०**–जरा दोन दिवस दम धरा. मग मी तुमचीच आहे. मग एकच का ?

[ मुरका मारते.

**संताजी०**–हाय हायरे मुरका ! ( जवळ जाऊन ) सुंदरे, मी सांगूं तुला. आतां आपल्याच्यानें कांहीं धीर निघत नाहीं. मी आतां घेणारच.

[तिचे हात धरून मुका घ्यायला लागतो. पद्मा पुनः खाकरतो.

**सुंदरा०**–(एकदम हात हिसकून घेऊन दूर सरून) मी नाहीं आतां. येथें खचित कोणीतरी आहे. मीं जातें आंत. [ जाते.

**संताजी०**–या बायका पुरुषांचे हाल करण्याकरितांच का देवानें उत्पन्न केल्या आहेत. हिचें हें आपलें असें आज कित्येक दिवस चाललें आहे. पण थांब ह्मणावें. थोड्यावर आलें आहे. मग अशी खोड मोडीन. रात्रंदिवस माझ्यापाशीं, दूर ह्मणून होऊं देणार नाहीं !

[ जातो.

**पद्मा**–( फडताळांतून बाहेर येऊन ) हाः हाः हाः ! ही मौज मात्र सान्यावर चढ ! काय या थेरड्याची अक्कल पहा. ठीक

आहे. हाही बाण आपल्या भात्यांत भरून ठेवूं या. प्रसंगीं उपयोगाला येईल.

[ जातो.

# अंक तिसरा.

## प्रवेश १.–संताजीरावाच्या वाड्यांतील फरजंदोजीरावाची खोली.

संताजीराव येतो.

**संताजी**०–अजून जांवईबुवांचा पोषाख झाला आहे कीं नाहीं कोण जाणे! हुजरेबोवा तर पोषाख करून तयार आहेत.

फरजंदोजीराव हुजऱ्याच्या पोषाखांत येतो.

का हुजरेबोवा, आतां आपण शोभतां खरे.

**फरजं**०–मलाबी त्या पोषाखांत कसं अडाकल्यावाणी वाट. आतां कसं साफ मोकळं. (आपल्याशीं) एकून आमची किंमत हुजऱ्याइनकीच झाली.

**संताजी**०–पण कायरे पिऱ्या, तुझ्या यजमानांचा पोषाख झाला का? खरेंच, त्यांना एकदां त्यांच्या खऱ्या रूपांत केव्हां पाहीन असें मला झालें आहे

**फरजं**०–त्यें खरं. पन् आमच झकपक कपड संमद कुठ गेल्याती. अजी गंटुळच ऱ्हाईसं झालं बगा.

**संताजी**०–गांठोडें नाहीसें झालें? छेः त्याची नको तुह्मांला काळजी. तें तुझ्या सोबत्यानें नीट ठेवलें आहे. मोठा प्रामाणिक बेटा.

**फरजं**०–माझा सोबती!

**संताजी**०–तो अगोदर येथें शिरून बारीक चौकशी करण्यासाठीं पाठविला होता तो. हा पहा तोच आला.

पद्या येतो.

अहो छोटे गडी! नवीं कांहीं स्वर्मेबिमें नाहींतना? हा पाहिलात पिऱ्या, आपला खरा पोषाख करून उभा आहे. तें ढोंग आटपलें.

**पद्या**–(आश्चर्यानें एकीकडे) हा पिऱ्या! आणि मग फरजंदोजी कोण? का हा खरोखरीच हुजऱ्या आहे? मी आपल्याकडून मोठ्या अकलेची कोटी ह्मणून जी खोटी गोष्ट सांगितली तीच शेवटीं खरी होते कीं काय? पण उपयोग काय विचार करून? आल्या प्रसंगाला तोंड दिलेंच पाहिजे. (फरजंदोजीला) का पिराजीबोवा? अरे, जुन्या दोस्ताची ओळख विसरलास? आतां ओळख द्यायला काय हरकत? तूं आपलें ढोंग टाकलेंसच.

**फरजं**०–अर बिट्या, ओळख नसाया काय झालं! (आपल्याशीं) हे आमचे जुने दोस्त याक्षणींच मी पहिल्यानें पाहत आहें. पण ओळख नाहीं असें दाखवितां उपयोगीं नाहीं कारण न जाणो पिऱ्याची आणि याची ओळख असेल.

**संताजी**०–पिऱ्याला सांग तें गांठोडें कोठें ठेविलें आहेस तें. तोंपर्यंत मी फरजंदोजीरावांना थाटाचा पोषाख देतों.

[ जातो.

**फरजं**०–अव आमच नवजुन दोस्त, राखवा की त्यें गंटुळ कुठ हाय त्यें.

**पद्या**–( संताजीरावामागें एकसारखें पहात मान हलवीत ) गेलें, अज्जी गेलें.

**फरजं०**–काय ? गंटुळ गेलं म्हंता ?

**पद्या**–गाठोड्याचें काय घेऊन बसलांहो ? यांचें डोकें गेलें–साफ बिघडलें.

**फरजं०**–पण त्ये म्हणाल कीं तुमापास गंटुळ हाय. कुट हाय त्यें.

**पद्या**–गाठोडें होय ? हो, तें तुह्मांला दाखवितों.–पण कोणाजवळ बोलूं नका हो. त्यांनींच तें उचलून ठेवलें होतें. त्यांचें डोकें अगदीं भकून गेलें आहे. स्वतःच जिन्नस कोठें तरी ठेवतात आणि दुसऱ्याजवळ दिला असा त्यांना भ्रम होतो. गरीब बिचारे !

**फरजं०**–असेल, तसेंच असेल. माझ्याशीं त्यांची वागणूक गेले दोन दिवस अगदीं विक्षिप्तासारखी चालू आहे. आतां तुमच्या जवळ साफ बोलायला कांहीं हरकत नाहीं.

**पद्या**–हा सारा दुःखाचा परिणाम.

**फरजं०**–ते वेडे असावेत यांत शंका नाहीं. कारण त्यांनीं असें डोक्यांत घेतलें आहे कीं मी पिऱ्या हुजऱ्या आणि पिऱ्या हा खरा फरजंद आणि त्यांच्याच त्रासानें मघाशीं मी तें हेंगाडें वेंगाडें बोलून पिऱ्या आहे असें दाखवीत होतों. पण घरांतल्या साऱ्या मंडळींची देखील अशी समजूत कशी व्हावी ? यांचें डोकें फिरलें आहे, हें मीं आजच प्रथम ऐकलें.

**पद्या**–ही गोष्ट आपल्या नजरेला आली असतां आपण हें लग्न मोडून चालते व्हाल ह्मणून आह्मीं कोणी त्यांच्या उलट बोललों नाहीं.

**फरजं०**–आपण कोण आहां येथें ?

**पद्या**–मी आज दहा बारा वर्षें त्यांच्यापाशींच आहे. मला लहानाचा मोठा त्यांनींच केला. मघाशीं मीं आपल्याला जुने दोस्त ह्मटलें तेव्हां तुह्मीं थक्क झाल्यासारखें दिसलां. पण वेड्या माणसांच्यासंबंधानें एका गोष्टीला फार जपावें लागतें. ती ही कीं त्यांच्या मर्जीविरुद्ध बोलायचें नाहीं कीं करायचें नाहीं, त्यांच्या लहरीप्रमाणें वागायचें, फार काय सांगूं ? त्यांनीं त्यावेळीं आपल्याला स्वतःची बायको ह्मटलें असतें तरी मीं लगेच आपल्याला आईसाहेब ह्मणून हाक मारली असती. हो, करतां काय ?

**फरजं०**–( आपल्याशीं ) तरीच त्याच्यावर सुंदराबाईचा इतका पगडा बसला आहे तो !

**पद्या**–हल्लीं आणखी एक त्यांच्या डोक्यांत कल्पना शिरली आहे कीं, आपण आपली शिक्क्याची अंगठी प्रत्येकाला दिली आहे, जो भेटेल त्याला ते माझी तेवढी अंगठी दे ह्मणतात.

**फरजं०**–खरेंच; मजजवळही त्यांनीं तसेंच मागणें केलें होतें.

संताजीराव येतो.

**संताजी०**–पिऱ्या, तेवढी माझी अंगठी दे. आतां तुझीं कांहीं सोंगें राहिलीं नाहींत. देऊन टाकीनास मग ; तेवढी अंगठी

**पद्या**—( फरजंदोजीरावाला एकीकडे ) पाहि-लेंत. अंगठीची लहर आली पुनः.

**संताजी**०—बाबा, तुला ती काय करायची? मला तिची किंमत आहे, माझी बायको जिवंत होती तेव्हां तिच्याजवळ ही अंगठी नेहमीं असे. ती मेल्यानंतर तिचें स्मरण करून देणारी म्हणून मी ती नेहमीं जवळ बाळगतों. ती गेल्यापासून माझ्या चित्ताला स्वस्थता म्हणून नाहीं.

**पद्या**—( फरजंदोजीरावास एकीकडे ) त्यांची बायको मेली ती—येथेंच वेडाचें मूळ आहे, समजलां.

**फरजं**०—( एकीकडे ) अरेरे, काय बिचाऱ्याचें दुःख !

**संताजी**०—देच ती अंगठी मला. तिची बाजारांत किंमत अगदीं थोडी होईल. पण या पहा तिच्याबद्दल मी तुला दहा मोहरा देतों.

**पद्या**—( फरजंदोजीरावास एकीकडे ) त्यांच्या लहरीप्रमाणें घ्या. ही अंगठी द्या त्यांना आणि घ्या त्या मोहरा.

[ अंगठी देतो.

**फरजं**०—ही घ्या अंगठी.

**संताजी**०—या घे मोहरा. ( आपल्याशीं ) किती लोभी आहे हा ! पण हे हलकट जातीचे लोक असेच असायचे. बरें झालें अखेरीस हा हुजऱ्याच ठरला.

**पद्या**—( फरजंदोजीरावास एकीकडे ) द्या त्या मोहरा. मला त्यांच्या साऱ्या पैशाचा हिशोब ठेवला पाहिजे.

**पिऱ्या**—( बाहेरून ) पिऱ्या, पिऱ्या, अर ए गद्ध्या !

**संताजी**०—अरे गधड्यांनो, धांवा, तुमचा धनी तुह्मांला बोलावतो आहे; ऐकूं येत नाहीं का? पळा. [ पद्या जातो.

पिऱ्या झोकाचा पोषाख केलेला येतो.

पहा, काय फरक पडला तो ! आतां मात्र तुह्मी आमचे जावईबोवा शोभतां खरे.

**पिऱ्या**—( ऐटीनें व अधिकारानें ) व्हय तर. मी हायच तसान्. येंच्यावानी का मी मेंग्या हाय व्हय ? पिऱ्या, चोरा ! माजलास वाटत, हत् गप्पा मारीत उभा व्हतास, माझा पोषाक चडवायला तुझा बाप यायचा व्हय ?

**फरजं**०—धनीसाब, गुन्हा माफ——

**पिऱ्या**—तुला हजारदां सांगितलं तरी तुझी खवाड जात न्हाई ! मला राग यायचा न्हाई अस तुला वाटतं व्हय ? हरामखोरा, मारे चाबकाखालीं झो-झोडपीन, खंडोबाच्यान् !

**संताजी**०—( एकीकडे ) बापासारखाच हा रागीट आहे. पण या हेंगाडी भाषेचा कोण हा नाद यांना !

**फरजं**०—( एकीकडे ) उसनें आणलेलें वैभव पूर्णपणें भोगून घ्यायचा चोराचा बेत आहे. घेऊं दे तूर्त.

**पिऱ्या**—अव बुड्डेबुवा, आतां ह्यो चेहरा कसा खुललाया. बोला आतां मला बगुनशान गावच्या कामिना व्हतील का न्हाई बिमार ? ( ऐटींत चालतो. ) हीं पावलं टाकायला येका तमाशांतल्या पो-

ऱ्यापाशीं शिकलों न्हवं का. पोऱ्या पन् काय माझ्यावर अक्षी फिदा व्हता फिदा. आलं का ध्येनांत? हम्मेश गळ्यांत तंगडचा. 'तुमी सहान, मिरे चंदन, सहानरे पायीं चंदन ग्येला इघरून.' अक्षी सारा दिन अस्सं चालायच बगा. बुद्दबुवा, येते का तुमासनी ही लावणी?

**संताजी०**–आपली स्वारी आज खूप रंगांत दिसते आहे! (एकीकडे) अगदींच हलकट आहे हा! याच्या बापानें याच्यावर नजर चांगलीच ठेवली होती म्हणायची.

**पिऱ्या**–बुद्दबुवा, तुमी आमच मामाजी व्हनार न्हव का? मंग आना बगू वायकू कुट हायती. आन् दोगी असल्या तर दोगींनाबी आना. हत काय त्येची दिकत् हाय? द्यो पञ्चया हायच बगा तैयार. डबुल मातुर मायदाळ व्हीव. पिऱ्या!

**फरजं०**–जी धनीसाब!

**पिऱ्या**–(एकीकडे) आमच्या धनीसाबांचा मुखडा तरी बगा कसा शेण खाल्ल्यावानी झालाया तो. कुनाला सरदारी थाट बगायचा असला तर त्येंन आमच्या चेहऱ्याकड बगावं (उघड) पिऱ्या!

**फरजं०**–जी धनीसाब!

**पिऱ्या**–(एकीकडे) धनीसाबासनी आज लई नामी वाकवतों. हम्मेशा मला कर्स करत्यात. त्येचं आज सारं उट्टं काडतों. (उघड) पिऱ्या!

**फरजं०**–जी धनीसाब,

**पिऱ्या**–ल्येका, मुजरा कराया येत न्हाई काय? वाक, जरा वाक.

**फरजं०**–(लवून) जी धनीसाब.

**पिऱ्या**–ही घे डबी. आन् उत्ताम अक्षी उत्ताम बग तपकीर घालून आन. गुलाबाच्या आन् कस्तुरीच्या आन् केवड्याच्या वासाची होवी बरं का.

**फरजं०**–जी हुकूम. [जाऊं लागतो.

**पिऱ्या**–पिऱ्या!

**फरजं०**–जी सरकार.

**पिऱ्या**–हा दस्तरुमाल घे. आन् यावर गुलाबपानी घालून आन.

**फरजं०**–जी धनीसाब. [जाऊं लागतो.

**पिऱ्या**–पिऱ्या!

**फरजं०**–जी सरकार.

**पिऱ्या**–माझे दांत कोर.

**फरजं०**–व्हय सरकार. [जाऊं लागतो.

**पिऱ्या**–पिऱ्या.

**फरजं०**–जी.

**पिऱ्या**–सरकार ह्मनाया त्वांड दुखतं व्हय?

**फरजं०**–जी सरकार, काय हुकूम हाय? (एकीकडे) किती पाजी आहे!

**पिऱ्या**–कुचकाम न्हई. तुम भागु जाव.

**फरजं०**–(एकीकडे) हा माझीच का नक्कल करतो आहे? असें असेल तर आमच्या ऐटीची किंमत कळली.

**पिऱ्या**–(फरजंदोजीरावास एकीकडे) धनीसाब, अक्षी तुमची ऐट उतरायला येक कमी हाय.

**फरजं०**–(त्याला एकीकडे) काय तें?

**पिऱ्या**–(त्याला एकीकडे) आपनासनी येक लात मारूं द्या.

**फरजं**०–( एकीकडे त्याला ) काय म्हणतोस गध्द्या ?

**पिऱ्या**–(एकीकडे त्याला) मर्जी आपली. पन बगा येकच लात. अक्षी नरम मारतों.

**फरजं**०–( एकीकडे त्याला ) फाजील नाहीं तर. हाडें हाडें नरम करीन.

**पिऱ्या**–हं ! चला जाऊंग आंबबनामंदी चला जाऊं, चला जाऊं.

**संताजी**०–पिऱ्या !

**पिऱ्या**–( चुकून ) जी सरकार !

**फरजं**०–( त्याला एकीकडे ) गाढवा, शुद्धीवर आहेस का ?

**पिऱ्या**–गाढवा, सुदीवर हायस का ?

**फरजं**०–जातो, जी जातो. [ जातो.

**पिऱ्या**–( एकीकडे ) आमच धनीसाब मोकळ्या दिलाच न्हाइती. काय झाल असत त्येनीं मला येक लात मारू दिली असती तर ? त्येनीं मला हजारदा लाता दिल्या न्हाइती का.

**संताजी**०–फरजंदोजीराव, तुमची वागणूक मला फारच पसंत पडते.

**पिऱ्या**–अलबत. अव, या चाकरांसनीं असच लाताखालीं तुडवल पाहिजे. न्हाई तर तवाच मगरूर व्हत्यात. ( एकीकडे ) आन् आतां जर मला कोणी बगितलं तर ह्यो मरद हुजऱ्या व्हता अस म्हनल काय ? ( मोठ्यानें ) एकून मोटपन फकत कपड्यालत्यांवर अन् पोषाकावर हाय न्हव.

**संताजी**०–जावईबोवा, खरेंच तुमचा नोक झोंक कोणाला साधायचा नाहीं. आणि तुमचा स्वभाव तरी किती गमत्या आहे.

**पिऱ्या**–हायच मी तसा. ह्यें बगा, मी जवां गाडी हांकाया--तस न्हवं–गाडीवर–तसंबी न्हव–गाडींत बसतों, तवां बगा रस्त्यांतल लोक माझ्याकड टकमक बगूं लागल्यात. तरन्या तरन्या फटाकड्या बायका–पोरी–मला बगूनशान हाशहुश करीत पटापट परान सोडल्यात. तवां या पिऱ्या–( जीभ चावून ) फरजंदोजीरावाला काय व्हतं म्हून सांगूं ! ' आमी राव मुषाफर गडी '–

**संताजी**०–( हंसून ) अजून तें तुमचें सोंग तुमच्या डोक्यांतून गेलें नाहीं. आतां तो पिऱ्याचा संबंध विसरा. आतां तुम्ही फरजंदोजीराव, आमचे जावईबोवा.

**पिऱ्या**–व्हय, व्हय, आतां तुमी फरजंदोजीरावाचे जावाईबुवा व्हनार. मी न्हाई त्यें इसरायचा. पन् राव अदुगर मला ह्यें सांगा, तुमी मुलीसंग मला काय द्येनार. अदुगर कडू मागून ग्वाड. आन् असं बगा. तुमी झालां आहां अक्षी पिकलेल पान. कवां गळून पडाल याचा न्येम हाय ?–तवां–

**संताजी**०–( रागानें ) मी कांहीं मरायला टेंकलों नाहीं, समजलां. अजून माझ्या अंगांत जी धमक आहे–

**पिऱ्या**–धमकी कोनाला देतां, बुढ्ढेबुवा ?

**संताजी**०–( एकीकडे ) अगदीं मूर्खच आहे हा. पण असेना. माझ्या मुलीशीं याचें थोडेंच लग्न लागायचें आहे !

पिऱ्या—तवां ह्यें बगा, तुमच्या उरावर शेणी रचून आग लावून दिली—

संताजी०—उरावर शेणी ! आग ! काय बोलतां आहां तरी काय हें ?

पिऱ्या—अव दुसरं काय ? तुमचं अक्षी लाकूड बनल—तुमी म्येलां—म्हंजी तुमच्या पोरीला कोन पोसनार ? आपुन तर कवडी खरच करनार न्हाई. आन् आपल्यापास कवडी न्हाईबी.

संताजी०—( एकीकडे ) चोर लोभी आहे.

पिऱ्या—मी लई उदार दिलाचा हाय खरा. तरी पन् अदुगर बोलन्यांत सपस्ट असावं ह्यें बरं. व्हय की न्हाई ?

संताजी०—( एकीकडे ) उदारना ? थेट मारवाडी.

पिऱ्या—अव, बोलत का न्हाई ? दातखिळ बसली व्हय ? मी हाय चैनी उधळ्या. 'अरे माझ्या सख्या, तूं कुठं जाशी.' ( गातो व नाचतो. ) ह्मातारबुवा, मेजवानी लई थाटाची करा बरं का !

संताजी०—( एकीकडे ) पाजी, मूर्ख, उर्मट नाहीं तर. याच्याशीं वेळ घालविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. [ जातो.

पिऱ्या—आमच मामाजी रागावल जनू. ऊंः ! रागावनात. त्येंनी होऊनशान मला जावाई करायचं कबूल क्येलं. आमच धनीसाब अक्षी खुळ. त्या भिकारड्या पोरीच्या नादाला लागल्याती. काय नशीब हाय बगा. माझ धनीसाब मोठ्या कुळांत जनमल, मी आलो भिकारड्याच्या पोटीं; पन् खरं जर पुसाल तर ह्ये उफराट होया पाहिज व्हत. मी मोठ्या कुळांत आन् त्ये भिकारड्या कुळांत जनमल असत म्हंजी कस अक्षी ठाकठीक सोभल असत. आमच धनीसाब बिलकुल यजमान सोभत न्हाईत. माझ्यावानी त्येंच्या अंगांत हिंमत हाय का ? मी बगा चाकूपासून तो थ्येट कुराडीपोतुर व्हीव त्ये हत्यार चालवाया तयार हाय. येऊं द्या व्हीवं तर आतां कोनी. दाखिवतो त्येला हिसका.

[ हवेंत हातवारे करतो.

एक पोऱ्या येतो.

पोऱ्या—फरजंदोजीराव आपुनच का ?

पिऱ्या—तुला कशापायीं व्हीवं ? मुकाट्या जातोस, का लगावूं ठोस. थांब माझी तरवार घ्येतो आन् होऊं द्यात तुझ माझ दो हाताच चार हात. अर, तुला लढतां येत का ?

पोऱ्या—न्हाई जी.

पिऱ्या—न्हाई व्हय ? चल तर मग, लढ माझ्याशीं. तुला बग डोसक्यापासून पायापोतूर उभा चिरून काढतो.

पोऱ्या—तुमासनी लढायची लई खुमखुम हाय जनू ?

पिऱ्या—का बरं, पोऱ्या ?

पोऱ्या—पन् काय व ? तुमीच का फरजंदोजीराव ?

पिऱ्या—तुला काय त्याचं, त्येका ? व्हय, मीच मीच फरजंदोजीराव.

पोऱ्या—तर मग आंबाजीरावांचा तुमासनी असा निरोप हाय कीं तुमी त्येंच्या इजयाबाईसंग लगीन लावायचा इचार टाकून द्या, न्हाई तर त्येंच्याशीं आज सांजच

त्या वढचाच्या वरच्या अंगास राई हाय न्हव का, थत लढायला या. जर का चुकाल तर त्ये इत येऊनशान तुमामनी चाबकाखाली झोडपत्याल आन् तुमाला लुगड नेसवून तुमच्या हातांत बांगड्या घालत्याल, आन् तुमची संसद्या गावांतुन धिंड काढत्याल.

**पिऱ्या**–( एकीकडे ) ह्ये काय लिचांड! चिभन धनीसाबांनीं ह्यें लढायचं काम अदुगर उरकून घ्येतलं असतं तर बरं व्हतं. ( उघड ) अर पोऱ्या, जा तुझ्या यजमानाला सांग फरजंदोजीरावाला त्येंचा निरोप कळल.

**पोऱ्या**–आन् तूं न्हवस का फरजंदोजीराव? मला वाटलंच तसं.

**पिऱ्या**–बर बर, चल चालता हो. न्हाई तर बग मला रागबिग येईल.

**पोऱ्या**–आन् आला तर काय व्हईल? [ हसत पळून जातो.

**पिऱ्या**–धनीसाबासनी जाऊन सांगावं कीं ह्यें सोंग मला नग. कोनीबा लढावं! आन् ...नबित तुटला तर? नग, नग, नग. आपुन आपलं पुना हुजर व्हनार. [ जातो.

---

## प्रवेश २.—वाड्याच्या बाहेर.

यादवराव प्रवासाचा पोषाख केलेला येतो.

**यादव०**–मी असा अकस्मात् आलेला पाहून फरजूला किती आनंद वाटेल! मला यायला दोन दिवस जास्त लागले ह्मणून तो मोठ्या काळजींत असेल. संताजीरावांची देखील जरा तारांबळ उडेल. (पद्या येतो त्यास) कोण आहेरे तो? संताजीरावांचा गडी वाटतें. जा, धाव मार, संताजीरावांना कळीव, मी आलों आहे म्हणून.

**पद्या**–पण 'मी' ह्मणजे कोण?

**यादव०**–मी कोण? हरामखोरा, फाजील बोलतोस? जा, यादवराव आले आहेत म्हणून सांग. गेलास कीं नाहीं? का उपटून टाकूं तुझे ते लांब कान.

**पद्या**–रावसाहेब, मी अजून लहान आहे तेव्हां माझे कान इतक्यांत लांब कसे होतील? पण आपली तब्येत ठीक आहेना?

**यादव०**–चोरा, माझ्या तब्येतीशीं तुला काय करायचें आहे?

**पद्या**–नाहीं, ह्मटलें आमच्या बाबासाहेबांप्रमाणें आपल्याला कांहीं झालें आहे कीं काय? ह्मातारपणीं व्हायचेंच तसें.

**यादव०**–संताजीरावांना काय झालें आहे?

**पद्या**–त्यांना आतांशीं कानांनीं कमी ऐकूं येतें, आणि त्यांचें डोकेंही पण ठिकाणावर नाहीं.

**यादव०**–काय ह्मणतोस? अरेरे, फार वाईट दिवस आले बिचाऱ्याला ह्मणायचे. पण बरें झालें अगोदर सांगून ठेविलेंस तें. जा आतां त्यांना कळीव मी आलों आहे म्हणून. बरें, पण त्यांना आणखी कांहीं झालें नाहींना?

**पद्या**–अजून झालें नाहीं; पण होण्याच्या बेतांत आहे.

**यादव०**–काय तें बोला?

**पद्या**–ते लग्न करणार आहेत.

**यादव**०—त्यांना ह्मातारचळ नाहींना लाग-
ला ! या वयांत लग्न !

**पद्या**---ह्मणूनच मीं आपल्याला आतांच क-
,ळविलें कीं त्यांचें डोकें आतांशीं जरा ठिकाणावर नसतें. पण आपण आंत चलावें. आपले चिरंजीव आज दोन दिवस आपली काळजी करताहेत. त्यांना अगोदर भेटावें.

**यादव**०—होय. अगोदर मला त्यांच्याचकडे घेऊन चल.

[ आंत जातात.

**संताजीराव** येतो.

**संताजी**०—यादवराव आले आहेत ह्मणून ऐकलें. पण येथें तर कोणी दिसत नाहीं. हे गडी सारे गेले कोणीकडे? यादवराव माझे स्नेही. आज त्यांची माझी समक्ष भेट फार दिवसांनीं होणार. आणि पूर्वीचा स्नेहसंबंध या सोयरीकीनें दृढ होणार.

**पद्या** येतो.

पद्या, यादवराव आलेले तूं पाहिलेस ?

**पद्या**—होय, मीं त्यांना आतांच आंत नेऊन त्यांच्या चिरंजिवांना भेटविलें. दोघे बोलत बसले आहेत त्या सज्जाच्या माडींत. आणि मी आतां आपल्याला कळविण्याकरितांच चाललों होतों.

**संताजी**०—तर मग चला. तिकडेच जाऊं या. ऊन पाणी, रुमाल व फराळाचें सामान व प्यायचें पाणी आणायला सांग.

**पद्या**—पण माझें जरा ऐकतां का ?

**संताजी**०---काय ?

**पद्या**--त्यांना ऐकूं कमी येतें. तेव्हां त्यांच्याशीं बोलतांना मोठ्यानें बोलावें लागतें. कारण मघांशीं त्यांच्याशीं बोलतांना माझे फार हाल झाले: घसा दुखायची पाळी आली. शिवाय त्यांना ऐकूं गेलें नाहीं म्हणजे ते अतिशयच संतापतात. अलिकडे हें जास्तच वाढलें आहे. [ जातो.

**संताजी**०--यादवराव बहिरे झाले? म्हातारपण आलें म्हणजे असें व्हावयाचेंच. देवानें मला अजून शाबूत ठेविलें आहे ही त्याची माझ्यावर कृपाच. नाहीं तर त्या सुंदरीनें मला झिट्कारलेंच असतें. पण अगोदर आंत जाऊन सुंदरीला सारी तयारी ठेव म्हणून सांगूं या. यादवराव आपल्या लेकाशीं कांहीं खासगी गोष्टी बोलत असतील इतक्यांत त्यांच्याकडे जाऊं नये. पाणीबिणी वरतीं पाठवून द्यावें म्हणजे झालें. [ जातो.

---

## प्रवेश ३.—वाड्याच्या मागच्या भागांतील पडवी

**पद्या** धांवत येतो.

**पद्या**–( इकडे तिकडे पहात ) आतां ताईसाहेबांना कोठें गांठाव्या ? त्या पहा त्या कोपऱ्यांत ताईसाहेब आणि त्यांची मैत्रीण अशा दोघीजणी कांहीं बोलत बसल्या आहेत. ( पुढें होऊन ) ताईसाहेब !

**विजया** व **कृष्णी** कांहीं बोलत बसल्या आहेत.

**विजया**–(एकदम दचकून,) कोण बाई आलें ! ( पद्याला पाहून ) तूंच का ? काय पण घाबरविलेंस आम्हांला. काय पाहिजे तुला ?

**पद्या**--मी आपल्याला एक बातमी कळवायला आलों आहें.

**कृष्णी**–कसलीरे बातमी सांगतोस मेल्या? खोटा नाहीं तर. थांब तुला बाबासाहेबांकडे घेऊन जातें. यादवरावांचा गडी म्हणून या घरांत घुसून यजमान आणि गडी यांनीं आपले वेष बदलले आहेत असें सांगून सारा घोटाळा केलास तो तूंच नव्हे का? ताई मीं कीनई याचा शोध करीतच होतें. काल सहज बाबा आणि ती बया यांच्या बोलण्यांत याचें नांव निघालें होतें व यानेंच ती कंडी पिकविली असें ती बया बोलली तें माझ्या कानीं पडलें. हा मेला कोणी भामटा असावा.

**पद्या**–( घाबरून ) भामटा ! कोण भामटा ? मी–मी–खचित–नाहीं तसा.

**कृष्णी**–पहा मेला कसा घाबरला तो. माझी खात्री झाली कीं, तूं चोरटा आहेस. ताई जा ग जा; बाबांना जाऊन सांग हा सारा प्रकार.

**पद्या**–ताईसाहेब, थांबा, जरा जाऊं नका. ( आपल्याशीं ) आतां कसें करावें? ही पोरगी फार चाणाक्ष आहे. ( विचार करून ) असेंच करावें. ( उघड ) ताईसाहेब, ही अंगठी आपल्या ओळखीची आहे का? [ अंगठी दाखवितो.

**विजया**–( अंगठी नीट न्याहाळून पाहून ) अग कृष्णी, खचित खचित ही दादाचीच अंगठी. याच्याजवळ कशी आली ही?

**कृष्णी**-अग त्यानें चोरली असेल आणि दुसरें काय? बरें झालें; आयता पुरावा सांपडला. जाच तूं बाबांकडे.

**पद्या**–ताईसाहेब, तुम्ही यांचें काय ऐकतां? माझी हकीकत ऐका आणि मग काय करायचें तें करा

**विजया**–हा म्हणतो तसें करावें हें रास्त दिसतें. काय म्हणतोस तूं?

**पद्या**–काल मला कोणी गृहस्थ भेटला आणि माझ्या हातांत अंगठी देऊन म्हणाला, " ताईला ही दे. आणि तिला सांग कीं, तूं कांहीं काळजी करूं नकोस. "

**कृष्णी**–( विजयेकडे पाहून ) ताई, काल आलेला दादाच तर मग !

**विजया**–हो, मलाही आतां असेंच वाटूं लागलें आहे. पण काल त्याला आपण ओळखला कसा नाहीं?

**पद्या**–काय म्हणतां? आपण त्यांना ओळखलें नाहीं ! हाः हाः हाः ! बरीच मौज झणायची. पण खरें झटलें तर आपण त्यांना ओळखलें नाहीं यांत नवल नाहीं. त्यांच्या त्या दाढीमिशा, तो काळवंडलेला वर्ण, तो पालटलेला स्वर, यामुळें त्यांची ओळख पटणें कठिणच.

**विजया**--आणि शिवाय तो येथें येईल हें ध्यानींमनींही नाहीं. संशय तरी मेला यावा कसा?

**पद्या**--कां लक्ष्मीबाई, आतां सांगतां का जाऊन बाबांना?

**कृष्णी**--बरें बरें, असे टोमणे नकोत कांहीं

**यादव०**-त्यांना म्हातारचळ नाहींना लागला ! या वयांत लग्न !

**पद्मा**---म्हणूनच मीं आपल्याला आतांच कळविलें कीं त्यांचें डोकें आतांशीं जरा ठिकाणावर नसतें. पण आपण शांत चलावें. आपले चिरंजीव आज दोन दिवस आपली काळजी करताहेत. त्यांना अगोदर भेटावें.

**यादव०**--होय. अगोदर मला त्यांच्याचकडे घेऊन चल.

[ आंत जातात.

**संताजीराव** येतो.

**संताजी०**--यादवराव आले आहेत म्हणून ऐकलें. पण येथें तर कोणी दिसत नाहीं. हे गडी सारे गेले कोणीकडे? यादवराव माझे स्नेही. आज त्यांची माझी समक्ष भेट फार दिवसांनीं होणार. आणि पूर्वीचा स्नेहसंबंध या सोयरीकीनें दृढ होणार.

**पद्मा** येतो.

पद्मा, यादवराव आलेले तूं पाहिलेस ?

**पद्मा**--होय, मीं त्यांना आतांच आंत नेऊन त्यांच्या चिरंजिवांना भेटविलें. दोघे बोलत बसले आहेत त्या सज्जाच्या माडींत. आणि मी आतां आपल्याला कळविण्याकरितांच चाललों होतों.

**संताजी०**--तर मग चला. तिकडेच जाऊं या. ऊन पाणी, रुमाल व फराळाचें सामान व प्यायचें पाणी आणायला सांग.

**पद्मा**--पण माझें जरा ऐकतां का ?

**संताजी०**---काय ?

**पद्मा**--त्यांना ऐकूं कमी येतें. तेव्हां त्यांच्याशीं बोलतांना मोठ्यानें बोलावें लागतें. कारण मघांशीं त्यांच्याशीं बोलतांना माझे फार हाल झाले; घसा दुखायची पाळी आली. शिवाय त्यांना ऐकूं गेलें नाहीं म्हणजे ते अतिशयच संतापतात. अलिकडे हें जास्तच वाढलें आहे. [ जातो.

**संताजी०**--यादवराव बहिरे झाले? म्हातारपण आलें म्हणजे असें व्हावयाचेंच. देवानें मला अजून शाबूत ठेविलें आहे ही त्याची माझ्यावर कृपाच. नाहीं तर त्या सुंदरीनें मला झिट्कारलेंच असतें. पण अगोदर आंत जाऊन सुंदरीला सारी तयारी ठेव म्हणून सांगूं या. यादवराव आपल्या लेकाशीं कांहीं खासगी गोष्टी बोलत असतील इतक्यांत त्यांच्याकडे जाऊं नये. पाणीबिणी वरतीं पाठवून द्यावें म्हणजे झालें. [ जातो.

---

## प्रवेश ३.--वाड्याच्या मागच्या भागांतील पडवी

**पद्मा** धांवत येतो.

**पद्मा**--( इकडे तिकडे पहात ) आतां ताईसाहेबांना कोठें गांठाव्या ? त्या पहा त्या कोपऱ्यांत ताईसाहेब आणि त्यांची मैत्रीण अशा दोघीजणी कांहीं बोलत बसल्या आहेत. ( पुढें होऊन ) ताईसाहेब !

**विजया व कृष्णी** कांहीं बोलत बसल्या आहेत.

**विजया**--(एकदम दचकून,) कोण बाई आलें ! ( पद्माला पाहून ) तूंच का ? काय पण घाबरविलेंस आम्हांला. काय पाहिजे तुला ?

**पद्या**--मी आपल्याला एक बातमी कळवायला आलों आहें.

**कृष्णी**--कसलीरे बातमी सांगतोस मेल्या? खोटा नाहीं तर. थांब तुला बाबासाहेबांकडे घेऊन जातें. यादवरावांचा गडी म्हणून या घरांत घुसून यजमान आणि गडी यांनीं आपले वेष बदलले आहेत असें सांगून सारा घोटाळा केलास तो तूंच नव्हे का? ताई मीं कीनई याचा शोध करीतच होतें. काल सहज बाबा आणि ती बया यांच्या बोलण्यांत याचें नांव निघालें होतें व यानेंच ती कंडी पिकविली असें ती बया बोलली तें माझ्या कानीं पडलें. हा मेला कोणी भामटा असावा.

**पद्या**--( घाबरून ) भामटा! कोण भामटा? मी--मी--खचित--नाहीं तसा.

**कृष्णी**--पहा मेला कसा घाबरला तो. माझी खात्री झाली कीं, तूं चोरटा आहेस. ताई जा ग जा; बाबांना जाऊन सांग हा सारा प्रकार.

**पद्या**--ताईसाहेब, थांबा, जरा जाऊं नका. ( आपल्याशीं ) आतां कसें करावें? ही पोरगी फार चाणाक्ष आहे. ( विचार करून ) असेंच करावें. ( उघड ) ताईसाहेब, ही अंगठी आपल्या ओळखीची आहे का? [ अंगठी दाखवितो.

**विजया**--( अंगठी नीट न्याहाळून पाहून ) अग कृष्णी, खचित खचित ही दादाचीच अंगठी. याच्याजवळ कशी आली ही?

**कृष्णी**--अग त्यानें चोरली असेल आणि दुसरें काय? बरें झालें; आयता पुरावा सांपडला. जाच तूं बाबांकडे.

**पद्या**--ताईसाहेब, तुम्हीं यांचें काय ऐकतां? माझी हकीकत ऐका आणि मग काय करायचें तें करा

**विजया**--हा म्हणतो तसें करावें हें रास्त दिसतें. काय म्हणतोस तूं?

**पद्या**--काल मला कोणी गृहस्थ भेटला आणि माझ्या हातांत अंगठी देऊन म्हणाला, " ताईला ही दे. आणि तिला सांग कीं, तूं कांहीं काळजी करूं नकोस. "

**कृष्णी**--( विजयेकडे पाहून ) ताई, काल आलेला दादाच तर मग!

**विजया**--हो, मलाही आतां असेंच वाटूं लागलें आहे. पण काल त्याला आपण ओळखला कसा नाहीं?

**पद्या**--काय म्हणतां? आपण त्यांना ओळखलें नाहीं! हाः हाः हाः! बरीच मौज म्हणायची. पण खरें म्हटलें तर आपण त्यांना ओळखलें नाहीं यांत नवल नाहीं. त्यांच्या त्या दाढीमिशा, तो काळवंडलेला वर्ण, तो पालटलेला स्वर, यामुळें त्यांची ओळख पटणें कठिणच.

**विजया**--आणि शिवाय तो येथें येईल हें ध्यानींमनींही नाहीं. संशय तरी मेला यावा कसा?

**पद्या**--कां लक्ष्मीबाई, आतां सांगतां का जाऊन बाबांना?

**कृष्णी**--बरें बरें, असे टोमणे नकोत कांहीं

मारायला. पण ती तुझी बातमी सांग पाहूं.

पद्मा--बातमी ? कोणती बातमी बरें ?

विजया--असें रे काय करतोस. सांग लवकर कशी ती.

पद्मा--मी अगदींच विसरलों, ताईसाहेब.

कृष्णी--पुरें कर आतां चावटपणा हा. माझी चूक आहे हो.

पद्मा--( आपल्याशीं ) अस्सें. आतां कशी नरम आली ! थांब, आणखी तुला नरम आणतों. ( उघड ) हो, आठवलें. फरजंदोजीरावांचे वडील येथें आले आहेत.

कृष्णी--खरें कीं काय ? तर मग ताई, आतांच माझ्या नशिबाची परीक्षा होणार. माझ्या छातींत बाई धडधडूं लागलें आहे. तिकडून आतां त्यांना सांगणें होईल. ते काय म्हणतील कोण जाणें.

विजया---अग, तूं भिऊं नको. तुझें सारें नीट होईल हो. बरें पण आणखी काय सांगायसारखें आहे ?

पद्मा--दुसरें कांहीं नाहीं. त्यांना त्यांच्या चिरंजिवांनीं सारी हकीकत सांगितली आणि ते अतिशय संतापले आहेत आणि " माझ्या मुलाचें लग्नच करायचें नाहीं, आतांच्या आतां निघून जायचें " असें ह्मणताहेत.

कृष्णी---ऐकलेंस ताई ! आतां मी काय करूं ?

विजया---अग, तूं वेडी का आहेस ? फरजंदराव आपल्या वडिलांची समजूत घातल्याशिवाय राहणार नाहींत. अरे, त्या फरजंदोजीरावांना इकडे पाठवून देतोस का ?

पद्मा--नको, नको, नको, आपल्याला आतां येथल्या कोणत्याही भानगडींत पडायचें नाहीं. आपण आतां आपला येथून गाशा गुंडाळणार.

कृष्णी---आमच्याकरितां असें नका करूं. माझा निरोप जाऊन त्यांना कळवाच.

पद्मा---बरें तर मग. इतक्या काकूळतीला नका येऊं. ( हंसून ) मीं मागून सांगितलेलें सारें खोटें. यादवराव आले आहेत व फरजंदोजीरावांचें आणि त्यांचें बोलणें चाललें आहे.

कृष्णी--तर मग आतांपर्यंत माझ्या नशिबाची परीक्षा झालीच असेल.

पद्मा--आपण भितां कां ? आपल्याला पाहिल्यावर यादवराव तेव्हांच कबूल होतील. खरोखर फरजंदोजीरावांनीं आघाडी मारली ह्मणून; नाहीं तर माझ्या ओळखीचा दुसरा एक गृहस्थ आपल्याशीं लग्न लावायला चार पायावर तयार होता.

कृष्णी-- कोणरे तो ?

पद्मा--( आपल्या छातीला हात लावतो. )

कृष्णी--मग चार पायावर ह्मटलेंस तें रास्तच. चावट कोठचा !

विजया--अग तुझें सारें ठीक जुळेल. पण अंबाजीरावाशीं माझें लग्न लावून द्यायला बाबा कसे तयार होतील कोण जाणें.

कृष्णी--अग न व्हायला काय झालें. अंबाजीरावांना नांव ठेवायला जागा कोठें आहे. ते आमच्या इकडच्यापेक्षां देखील

शत्रुपक्षाकडील मुख्यानें एकवार मागें वळून राणींच्या कुमकेस येणाऱ्या टोळीकडे पाहिलें आणि त्यांतील स्वारांची संख्या आपल्याहून अधिक आहे येवढें ताडिलें. अशा प्रसंगीं लढाई देणें अगदीं निष्फळ असें जाणून आपल्या सैनिकांस त्यानें हातानें खूण केली, व तत्क्षणीं त्याच्या टोळीचे लोक एकदम बाजूच्या अरण्याकडे वळून घोड्यांच्या जिवाकडेही न पाहतां त्यांस दवडीत निघाले. एका क्षणांत सर्व स्थिति पालटली ! रक्ताचा एक थेंबही शस्त्रास न लागतां राणीवर आलेलें संकट दूर झालें !

राजमंडलास शत्रूंनीं वेढिलेलें पाहून "राणीच्या रक्षणार्थ धांवा" ह्मणून जो दुरून येणाऱ्या टोळीचा नायक ओरडत होता तो आतां एकदम "शत्रूचा पाठलाग" ह्मणून हुकूम करून ज्या जंगलांत शत्रूचे स्वार घुसले, तिकडे एकदम वळला.

शत्रुपक्षाकडील स्वार एकदम अरण्यांत शिरले ते एक बरीचशी मळलेली वाट होती त्या वाटेनें विलक्षण त्वरेनें घोडे पळवीत चालले होते. कुमुदबंधुबरोबर आलेले राणीच्या पक्षाचे स्वार बरीच मजल मारून आले असल्यामुळें त्यांचे घोडे थकलेले होते व दौडीच्या पाठलागांत त्यांच्यानें टिकाव धरवेलसें वाटलें नाहीं. दोन्ही टोळ्यांच्या दरम्यानचें अंतर अधिकाधिक वाढूं लागलें. वीरवृत्ताचा घोडा जातिवंत असल्यामुळें कुमुदबंधु मात्र मागें राहिला नाहीं. तो शत्रूच्या टोळीला हळू हळू गांठीत चालला होता. पण तो जितका पुढें पुढें चालला तितकें तितकें त्याच्यामध्यें आणि त्याच्या टोळीमध्यें अंतर वाढत चाललें. शत्रूच्या टोळीस गांठण्याच्या उत्कंठेमुळें आपले लोक आपल्या मागोमाग येत आहेत कीं नाहीं हें पाहण्याचें त्याच्या ध्यानींही आलें नाहीं. आणि कदाचित् आलें असलें, तरी मागें वळून पाहण्याचा त्याला अवकाश नव्हता आणि स्वसंरक्षणाचा विचार अशा वेळीं अशा वीराच्या मनांत यावा तरी कसा ? त्यानें आपला घोडा एकसारखा पुढें चालविला होता व तो तोंडानें फिरून फिरून ह्मणत होताः "बद्रिकेशा ! त्या टोळीचा तो नायक कोण आहे हें पाहिल्यावांचून मी कधींही परत फिरावयाचा नाहीं. मग परिणाम कांहीं होवो !"

थोड्याच कालांत शत्रूची टोळी मळलेली वाट सोडून बाजूस दाट झाडींत वळली आणि एका लहानशा टेंकाडाआड झाली. आतां ही टोळी आपल्या दृष्टीआड होणार असें कुमुदबंधूला वाटूं लागलें. इतक्यांत त्याच्या दृष्टीस पडलें कीं, त्या टोळीचा अग्रणी टोळीच्या बराच मागें राहिला आहे. त्याचा घोडा तरी थकला असावा किंवा पाठलाग करणाऱ्या टोळीवर डोळा ठेवण्याकरितां तो मुद्दाम मागें राहिला असावा. कसेंही असो; तो टोळीच्या मागें पडलेला पाहतांच कुमुदबंधूला अधिक जोर आला. घोड्याला एकसारखी टांच लावून तो त्याला असाधारण वेगानें दवडीत होता. दोघांमधील अंतर भराभर कमी होत चाललें. शेवटीं तो त्याच्या अगदीं जवळ येऊन ठेपला. शत्रुपक्षाकडील नायकानें हें पाहतांच झटदिशीं घोड्याचें तोंड

फिरविलें आणि या अकस्मात् अंगावर आलेल्या द्वंद्वयुद्धास तो सज्ज झाला. दोघांनींही भाले सरसावले. आणि दोन्ही टोळ्यांच्या या अग्रणींचें युद्ध सुरू झालें. कुमुदबंधूच्या प्रतिस्पर्ध्याचा घोडा अगदींच थकून गेला असल्यामुळें हा उभय वीरांचा संग्राम फार वेळ चालला नाहीं. कुमुदबंधूनें लगट करून आपला घोडा शत्रूच्या घोड्यावर घातला, त्याबरोबर घोडा आणि स्वार एकदम जमिनीवर पडले. कुमुदबंधूनें लागलींच घोड्यावरून खालीं उडी टाकली आणि प्रतिस्पर्धी जमिनीवर आहे तोंच त्याच्या छातीवर गुडघा देऊन आपल्या कमरेची कट्यार बाहेर काढिली आणि त्याच्या छातीवर धरली.

कांहीं वेळ दोघांच्याही तोंडांतून शब्द निघाला नाहीं. पराभूत वीर कांहीं बोलला नाहीं; याचें कारण, प्राणयाचना करण्याचा त्याला तिरस्कार वाटला असावा. कुमुदबंधूनें प्रतिस्पर्ध्याचा चेहरा पाहण्याच्या हेतूनें त्याचें शिरस्त्राण बाजूला केलें.

"वीरा, तूं कोणीही ऐस. आतां त्वरा कर." पराभूत वीर कुमुदबंधूच्या झांकलेल्या चेहऱ्याकडे दृष्टि वळवून दीन स्वरानें ह्मणाला. "ती कट्यार आतां कर खालीं आणि आपल्या विजयाची घे पूर्तता करून. आतां माझे प्राण घेणें हीच मजवर दया आहे."

अशा रीतीनें प्राण घेणें आपल्या उदार स्वभावास पसंत नाहीं असें दाखविण्याकरितां कुमुदबंधूनें मान हालविली, पण तोंडांतुन एक शब्दही काढला नाहीं.

"तर मग मला कैद करून नेऊन राणीच्या स्वाधीन करण्याची जर आपली इच्छा असेल तर तेवढें मात्र कधींही घडणार नाहीं! त्या अपमानापेक्षां मी आत्मघात करीन." तो जितवीर ह्मणाला.

कुमुदबंधूनें तसें करण्याचीही आपली इच्छा नाहीं असें पुनरपि मानेनेंच दाखविलें.

"तर मग काय? आपला हेतु तरी काय आहे?" शत्रूंचा नायक ह्मणाला. "प्राण आणि स्वातंत्र्य या दोहोंचीही देणगी आपण मला देणार? तर मग असे उदार गृहस्थ आपण आहां तरी कोण? मला येवढें कृपा करून सांगा आणि आपला चेहरा मला एकवार पाहूं द्या. ह्मणजे कधीं आपल्यावर कांहीं प्रसंग आला आणि माझ्या हातून या उपकारांची फेड होण्याची वेळ आली तर मीही आपलें औदार्य, निदान कृतज्ञता दाखवीन. मेहरबानीनें आपलें तेवढें मुखत्राण बाजूला कराच. काय? तुह्मीं मान हालवितां? तुम्हांला हेंही नापसंत आहे? बरें, निदान ही एक माझ्या कृतज्ञतेची खूण तरी जवळ बाळगा. ही खूण जो मला केव्हांही दाखवील त्याचा मी ऋणी आहें असें जाणून त्याच्याशीं वागेन."

असें ह्मणून त्यानें आपल्या मणगटावरील कवच काढून आपल्या बोटांतील अंगठी काढून पुढें केली. कुमुदबंधूनें क्षणमात्र विचार केला आणि एकदम मनांत कांहीं कल्पना येऊन त्यानें ती अंगठी घेतली. लागलींच आपल्या शत्रूच्या छातीवरचा पाय त्यानें मागें घेतला आणि एकदम आपल्या घोड्यावर उडी मारून आपल्या प्रतिपक्ष्या-

कडे मागें नुसती दृष्टिही न फेंकतां घोड्याला त्यानें टांच मारली आणि भरधांव घोडा काढून परत चालता झाला.

---

## भाग ८ वा.

( युक्ति व शक्ति यांचा सामना. )

आपल्या प्रतिपक्ष्यापासून मिळविलेलें जयचिन्ह घेऊन कुमुदबंधु थोडासा परत आला तों त्याच्या टोळीपैकीं सर्वांत पुढें असलेले लोक त्याला भेटले. त्यापैकीं एक विचारतो, " सरदारसाहेब, शत्रू कितीसे दूर गेले आहेत ! "

" पाठलागाच्या बाहेर पार गेले. " कुमुदबंधु उत्तर करितो. " चला, आपण आतां राजमंडळास जाऊन मिळूं. "

थोडक्याच वेळांत टोळींतील सर्व लोकांची व त्याची गांठ पडली. शत्रू आपल्या पल्ल्याबाहेर गेले ह्मणून त्यानें सर्वांस सांगितलें.

" मला आपल्याबरोबर राहवलें नाहीं हा माझा दोष नव्हे. माझ्या घोड्यालाच येवढी दवड निभावेना. " कुमुदबंधूच्या विनंतीवरून राजमंडळाच्या रक्षणास आलेल्या राजनिष्ठ सरदारांपैकीं पृथ्वीराय नांवाचा सरदार ह्मणाला.

" आणि यांत घोड्याची तरी काय चूक ? " कुमुदबंधु उत्तर करितो. " पहाटेस साखरझोंपेच्यावेळीं आपल्या सुखासनावरून मीं आपल्याला अत्यंत घाईनें उठविलें त्या वेळेपासून आपल्या जनावराला कांहीं लहानसहान ताण बसलेला नाहीं ! "

" माझ्या संबंधानें ह्मणाल तर—" राजनिष्ठ रणधीरराय जयकोटकर ह्मणतो—" मीं आपल्याबरोबर राहण्याविषयीं होती तेवढी खटपट केली, पण आपल्या या भयंकर घोड्याच्या वेगाबरोबर कसचा टिकाव धरतो ? पण खरेंच आपल्या धाडसीपणाची सीमाच झाली. आपण आह्मां सर्वांस मागें टाकून जेव्हां एकटेच पुढें निसटलांत तेव्हां मला तर फारच भीति वाटली. शत्रूच्या टोळीचा नायक जर मागें परतता तर त्याच्या शक्तीपुढें आपलें कांहीं एक न चालून आपण सहज त्याच्या हातांत सांपडला असता. "

" पण सुदैवानें त्यानें मागें पाहिलेंच नाहीं. " कुमुदबंधु चटदिशीं उत्तर करितो.

" आणि आपण तरी कोठें पाहिलेंत ! " राजपक्षाच्या संरक्षणार्थ आलेल्या सरदारांपैकीं चंद्रसेन लोहगडकर ह्मणतो, " तुह्मी बेधडक,—अविचारानें ह्मटलें तरी चालेल !—आपला घोडा पुढेंच फेंकीत गेलांत; एकवार नुसती नजर तरी मागें फिरवायची होती ! पण अशा प्रसंगीं एकदां अंगांतलें रक्त तापलें ह्मणजे मन बिथरून जाऊन हातून हवा तो धाडसीपणा घडणें हें खऱ्या शिपायाच्या ठिकाणीं सहज संभवतें. "

" मलाही पण आपल्या मनांतील विचार उघडपणें व स्पष्टपणें बोलून टाकूं द्या," भीमसेनराय संग्रामगडकर नांवाचा एक राणीपक्षाकडील छोटासा शूर सरदार ह्मणतो. " सरदारसाहेब, युद्धप्रसंग जरी बिलकुल झाला नाहीं आणि रक्ताचा एक थेंबही जरी शस्त्रास शिवला नाहीं तथापि

प्रसंग पडला असता तर आपण किती धैर्यानें, नेटानें आणि हिमतीनें आपलें कर्तव्य बजावलें असतें याबद्दल माझी तरी निदान या घडलेल्या प्रकारावरून खात्री झाली. पाहिजे त्याचें उगीच शौर्याबद्दल वर्णन करीत सुटण्याची या जिव्हेला तरी सवय नाहीं; आणि त्यांतून एखाद्या परदेशी गृहस्थाबद्दलची स्तुति या तोंडानें होणें फारच कठीण. पण आपल्याबद्दल मी साफ सांगतों कीं, शत्रूचा पाठलाग करतांना आपण जें धैर्य व जी हिम्मत दाखविली, ती पाहून मला तर फारच आश्चर्य वाटलें. महाराज, राणीसाहेबांच्या संरक्षणार्थ जोंपर्यंत या राजनिष्ठ टोळीची जरूर असेल तोंपर्यंत हिचें सेनापत्य आपल्याकडेच असावें हें अगदीं योग्य आहे. निदान ही एक तलवार तरी आपल्या शब्दाबरोबर हव्या त्या प्रसंगीं म्यानाबाहेर निघण्यास कांकूं करणार नाहीं."

"मी एक अनोळखी परका गृहस्थ असतां माझ्या विनंतीवरून आपण सर्वजण बिलकुल शंका न धरितां आपापल्या अनुचरांसह घराबाहेर निघालांत आणि आपल्या ह्या विक्रमशाली छोट्या सैन्याचें आधिपत्य दिलेंत ह्यायोगानें माझा तर फारच मोठा मान झाला यांत संशय नाहीं; पण यानें आपला सर्वांचाही मोठेपणा दिसून आला. खरोखर आपले सर्वांचे मजवर हे उपकार आहेत." कुमुदबंधु ह्मणाला.

"आणि आमच्यापैकीं एकाच्यानेंही आपल्या पाठीशीं राहवलें नाहीं याबद्दल खरोखर आह्मांला लाजच वाटावी" भीमसेनराय ह्मणतो. "पण खरेंच, शिरस्त्राणावर रेशमी गोंडा असलेला तो शत्रुटोळीचा नायक कोण असावा व त्या टोळींतले लोक तरी कोण असावेत याचें मला कांहींच अनुमान होत नाहीं."

"ते कोणीही असोत!" पृथ्वीराय ह्मणतो; "पण हातांतील उभे भाले एकवारही आडवे झाल्यावांचून त्यांना तसेंच्या तसेंच कुच करावें लागलें यामुळें ज्यांच्या मनाचा संताप झाला नसेल असे शिपाई त्या टोळींत फारच थोडे असतील."

"अगदीं बरोबर." रणधीरराय जयकोटकर उत्तर करितो. "त्यांचे हेतु कितीही दुष्ट असोत, पण पंचगांवीय डोंगरी शिपायांच्या ठिकाणीं असणारी स्वाभाविक मर्दुमकी त्यांच्यामध्यें इतरांपेक्षां लवमात्रही कमी असेल असें नाहीं. आमच्या कडेकोट तयारीकडे पाहून ते तसेच्या तसेच परत गेले ते भीतीनें नसावे. त्यांत कांहीं तरी दूर विचार असावा."

"याबद्दल मुळींच शंका नाहीं!" कुमुदबंधु ह्मणतो. "त्यांच्या धैर्याबद्दल शंका घेण्यास बिलकुल कारण नाहीं येवढेंच नव्हे तर त्यांनीं जो विचारीपणा दाखविला तोही वर्णनीय आहे. आमच्या संख्येकडे पाहतांच त्यांची अशी खात्री झाली असावी कीं, आतां आपला हेतु तर साध्य होत नाहीं, मग व्यर्थ रक्तपात करण्यांत तरी काय अर्थ."

हें भाषण चाललें असतां ही राजनिष्ठ शिपायांची टोळी एका टेंकडीवर येऊन पोंचली. तेथें येतांच कुमुदबंधु आपल्या बरोबर असलेल्या सरदारमंडळीस ह्मणतोः— "सरदारलोकहो! आपण सर्वांनीं मला

आपल्या विजयी टोळीचा नायक केला आहे, तर आपणा सर्वांस माझी एक विनंती आहे. आपण सर्वांनीं सत्वर जाऊन राजमंडळाला मिळावें. मला क्षणभर मागें राहिलें पाहिजे. आणखी कोठें दगा फटका होण्याचा संभव आहे कीं काय याचा शोध करून मी येतों."

"आणि या कृत्यास आपण एकटेच जाणार कीं काय ?" ते सर्व सरदार एकदमच म्हणाले.

"होय, मला एकट्यालाच गेलें पाहिजे." कुमुदबंधूनें उत्तर केलें. "तसें करण्यांत हेतु आहे–"

"पुरे, पुरे," **रणधीरराय जयकोटकर** म्हणतो; "सेनाध्यक्षाचा हुकूम मानणें हेंच आमचें काम त्याच्या हुकुमाचीं कारणें विचारण्याचा अधिकार हाताखालच्या शिपायांस नाहीं."

"तथापि मीच होऊन तीं आपल्याला सांगतों." कुमुदबंधु उत्तर करितो. "आणखी कोठें तरी जवळपास शत्रूंची टोळी छपून बसण्याचा संभव आहे. आपण दहा पांच असामी मिळून गेलों तर शत्रूंस बातमी कळण्याचा संभव अधिक. तोच एकटा मनुष्य गेला असतां तो त्यांना नकळत त्यांचा सर्व सुगावा घेऊन येईल."

"अगदीं रास्त !" **संग्रामगडकर** म्हणतो. "सरदारसाहेब तुम्हीं चला, आणि परमेश्वर तुमचे हेतू पूर्ण करो."

याप्रमाणें कशा तरी रीतीनें या शिपाई सरदारमंडळीस कुमुदबंधूनें वाटेस लाविलें, आणि आपण जवळच्या दाट झाडींत शिरला. थोड्याच वेळांत दुसऱ्या भागांत सांगितलेलें शिवालय त्याच्या दृष्टीस पडलें. त्यानें आपला घोडा तिकडे वळविला व त्या शिवालयाच्या जवळ येतांच त्यानें आपलें शिरस्त्राण काढून हातांत घेतलें. त्याला वाटलें 'कदाचित् सुदैवानें नलिनी स्वतःच देवालयाजवळ आलेली असली आणि तिनें माझ्या शिरस्त्राणामुळें मला ओळखलें नाहीं तर घोटाळा होईल. कोणी परका मनुष्य आलेला आहे असें वाटून ती कदाचित् तेथून निघूनही जाईल.' पण लागलीच त्याच्या मनांत असाही विचार आला कीं, ही आपली कल्पना व्यर्थ आहे. अद्याप चार घटकाही दिवस आला नाहीं तों एवढ्यांत ती तेथें कशाची येते व आपली आणि तिची गांठ तरी कशाची पडते.

मनांत हे विचार घोळत आहेत तों तो त्या शिवालयाशीं येऊन पोंचला. लागलीच घोड्यावरून खालीं उडी टाकून इकडे तिकडे पहात त्यानें त्या देवालयाच्या पायरीचा निखळलेला लहानसा चिरा हलविला. चिऱ्याखालीं चिठ्ठी वगैरे कांहींच नाहीं. पण एवढ्यांत जवळच्याच एका झुडपांतून प्रत्यक्ष नलिनीच झटदिशीं बाहेर आली. प्रथम भेटीच्या वेळचाच पोषाख याही वेळीं होता. मात्र प्रथम भेटीच्या वेळच्या आणि यावेळच्या मुद्रेंत फरक होता. यावेळीं आश्चर्य, आनंद आणि किंचित् लज्जा या विकारांनीं अंतःकरण भरून गेलें असावें असें चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. आणि पहिल्या वेळची ती भीति किंवा तो क्रोध यांचा लेशही यावेळीं नव्हता.

"काय आपण फिरून येथें?" इतकेच शब्द नलिनीच्या तोंडावाटे निघाले. लागलीच प्रथम भेटीची आठवण होऊन लज्जेनें तिचें मुख खालीं झालें. पण तिच्या लाडक्या राज्ञीभगिनीसंबंधानें तिला जी काळजी लागली होती आणि तिच्या सुरक्षितपणाबद्दल प्रश्न विचारण्याची जी उत्सुकता उत्पन्न झाली होती त्यांनीं या लज्जेस तेव्हांच पळवून लावलें. ती कुमुदबंधुस याविषयीं प्रश्न करणार, तों कुमुदबंधु आपण होऊनच ह्मणालाः—"तुमच्या राणीसाहेब पूर्णपणें सुरक्षित आहेत."

"आई, जगदंबे, तुझीच कृपा!" नलिनी ह्मणाली.

ज्या उत्साहानें व आनंदानें तिनें हे शब्द उच्चारले, त्यांवरून तिच्या मनावरील केवढें चिंतेचें ओझें एकदम कमी झालें असेल हें सहज दिसण्यासारखें होतें. पण फिरून नवीन विचार मनांत येऊन ती ह्मणतेः—"पण त्या कशा व कोठें आहेत? महाराज, राणीसाहेबांची स्वारी यावेळीं कोठें आहे तें सांगा अगोदर मला."

"या अरण्याच्या पलिकडच्याच बाजूस यावेळीं त्या असतील. कृष्णग्रामाच्या अलिकडे सुमारें कोशभर." कुमुदबंधु उत्तर करतो.

"काय, राणीसाहेब गिरिद्वार सोडून निघाल्याचना शेवटीं! देवा, तर मग खचित् सर्व घात झाला!" नलिनी दुःखानें व चिंतेनें वेडावल्यासारखी होऊन ह्मणाली.

"तुह्मीं बिलकुल भिऊं नका. कांहीं एक घात झाला नाहीं. त्यांच्यावर हल्ला करण्याकरितां त्या पलिकडच्या अरण्यांत लपून बसलेल्या दगेखोरांच्या हातून सुटून त्या सुरक्षितपणें पुढें चालू झाल्या व मगच मी इकडे वळलों." कुमुदबंधूनें उत्तर केलें.

"तर मग पहिल्या संकटांतून त्या पार पडल्या!" असें ह्मणतांना नलिनीचें मुख आनंदानें किंचित् उज्ज्वल झाल्यासारखें दिसलें. "पण आणखी दोन दग्याच्या जागा आहेत त्या! महासेन कालगडकर कृष्णग्रामच्या पलिकडील अरण्यांत छपून बसला आहे आणि शक्तिधर श्येनदुर्गाखालच्या झाडींत आहे,——"

"काय! हें सर्व खरें का? मलाही पण शंका आलीच होती! बरें पण प्रत्येकाबरोबर लोक तरी कितीसे आहेत?" कुमुदबंधूनें नलिनीस पुरतें बोलूं न देतांच प्रश्न केले.

"अगोदर मला सांगा, राणीसाहेबांबरोबर त्यांच्या रक्षणार्थ किती लोक आहेत?" नलिनी तितक्याच घाईनें उलट प्रश्न करते.

"सुमारें पन्नास त्यांच्याबरोबरची नोकरचाकर सुद्धां मंडळी आणि मी जमा करून आणलेल्या सुमारें दिडशें स्वारांची एक टोळी." कुमुदबंधूनें उत्तर केलें.

"सगळे मिळून दोनशेंच ना?" अत्यंत भीतीनें चेहेरा फिकट होऊन नलिनी ह्मणते. "महासेनाबरोबर निदान पांचशें तरी सैनिक असतील, आणि शक्तिधराच्या पाठीमागें तीनशें घोडा व शिवाय कांहीं तरी पायदळ असेल."

"तर मग प्रसंग जरा कठिण दिसतो.

बेहतर आहे!" कुमुद्बंधु निश्चयानें ह्मणतो; "दोहोंपैकीं एका तरी ठिकाणीं चांगला तुंबळ संग्राम झाल्याशिवाय आणि रक्ताचे पाट वाहिल्याशिवाय रहात नाहींत. ठीक आहे. राजनिष्ठ तरुणी, आतां मी येतों. अशा प्रसंगीं योग्य स्थानीं हजर राहून आपलें कर्तव्य बजावणें मला अवश्य आहे. मी तुला येवढें खचित् सांगून ठेवितों कीं, जोंपर्यंत या हातांत शस्त्र धारण करण्याचें सामर्थ्य आहे, तोंपर्यंत तुझ्या प्रिय राज्ञीच्या केशासही धक्का लागणार नाहीं. पण शत्रूंची संख्या फारच मोठी दिसते; तेव्हां या प्रसंगांतून खात्रीनेंच पार पडवेल असें सांगवत नाहीं. असो; तरुणी, फिरून तुझी माझी गांठ नच पडली तर जो तुझ्या आज्ञेवरून पाहिजे ती गोष्ट करण्यास सदां सिद्ध होता, अशा या प्राण्याचें केव्हां तरी स्मरण होऊं दे, येवढीच शेवटची विनंती."

दुःख, चिंता आणि कुमुद्बंधूची कूर्मदुर्गांत गांठ पडली त्यावेळीं उत्पन्न झालेला व यावेळच्या त्याच्या भाषणानें कांहीं अंशीं परिपक्व झालेला अनुराग या विलक्षण विकारमिश्रणानें नलिनी अगदीं भांबावून गेली.

वाचकहो, पूर्वकवींनीं तुह्मांला सांगितलें असेल कीं, काम हा पुष्पधन्वा आहे. त्याचे मित्र चंद्र, वसंत, आणि मधुकर, यासारखे शांत व सुकुमार आहेत; आणि ज्या ठिकाणीं कोकिलकूजितें चाललीं आहेत, ज्या ठिकाणीं अनेकविध पुष्पांचा सुखकर परिमल मंद वायूबरोबर हिंडत आहे, अशा वनोपवनांत याचें जनन व संवर्धन होतें. पण प्राचीन कवींचीं,—ते प्राचीन ह्मणून,—सर्व सुभाषितें खरीं असतातच असें समजून फसूं नका. संसारांतील अनुभव पहा. अत्यंत अंधकारमय उग्र कारागृहांत, ज्या ठिकाणीं अमित प्राणहानी चालली आहे अशा काळरूपी रणभूमिसंनिध, किंवा ज्या ठिकाणीं प्राणावसान होत आहे अशा शोकपूर्ण मरणागारांतही या विलक्षण विकारांचें जनन होतें; आणि भय, शोक, चिंता इत्यादि उष्ण जलेंही त्याला मातृदुग्धाप्रमाणें होऊन त्याचें वर्धन होऊं शकतें. याच ठिकाणीं पहाना! कुमुद्बंधु कूर्मदुर्गांत अत्यंत कष्टमय स्थितींत असतां आणि नलिनीही त्यावेळीं सर्वतोपरी चिंताग्रस्त असतां या विकारानें त्यांच्या मनांत नकळत प्रवेश केला; आणि यावेळीं या अरण्यांत कुमुद्बंधूला प्रत्यक्ष प्राणावर आलेला प्रसंग जवळ दिसत असतां आणि नलिनी राणीच्या स्थितीसंबंधानें अत्यंत भयग्रस्त व चिंताग्रस्त झाली असतांही या दोघांना कामासारख्या सुकुमार मानलेल्या मनोविकारानें क्षणभर तरी आपल्या आधीन करून टाकिलें. इतिहासपुराणांतरींही अशीं उदाहरणें का कमी आहेत? येवढ्यावरूनच तुह्मीं म्हणणार नाहीं का, कीं कामाची वस्ती सर्वत्र असून तो आपल्या लक्ष्यांच्या स्थित्यनुसार निरनिराळ्या मित्रांचें साहाय्य घेऊन त्यांवर आपला अंमल चालवितो ह्मणून? असो.

नलिनी फिरून कांहींशी स्थितीवर येऊन ह्मणते, "नाहीं, नाहीं! हें फारच भयंकर! हा प्रसंग आणणें ह्मणजे शुद्ध वेड

आहे ! महाराज, आपण लवकर चला आणि राणीसाहेबांना त्यांच्यावर येणाऱ्या या संकटाची बातमी वेळेवर द्या; ह्मणजे हा प्रसंग टळण्याचा अद्याप संभव आहे."

"आणि त्या आतां मागें परततील याची मुळींच आशा करणें नको. एकाद्या लष्करप्याच्या अंगीं असावें तितकें साहस आणि वेड या विलक्षण स्त्रीच्या ठिकाणीं आहे, आणि अशा विक्रमशाली स्त्रीच्यापुढें जाऊन तिला मागें परतायला सांगणें हें मला देखील मोठें लाजिरवाणें वाटतें. शिवाय तिच्या रक्षणाकरितां ज्या राजनिष्ठ शूर सरदारांनीं मीं बोलावून आणिलें आहे व ज्यांनीं मला आपला नायक नेमिला आहे, त्यांनीं माझ्या ठिकाणीं ही शिपाइगिरी पाहिली ह्मणजे ते मला शाबासकीच देतील ! प्राण गेलेला याहून बेहतर आपल्या हातून तरी हें होणार नाहीं !" कुमुदबंधूनें उत्तर केलें.

"देवा, आतां करावें तरी काय !" नलिनी पुनः अगदीं बावरून जाऊन म्हणाली. पण एकाएकीं तिच्या मनांत एक उत्तम कल्पना येऊन तिचें मुख आनंदानें प्रफुल्लित दिसूं लागलें. ती म्हणाली, "सरदारसाहेब, ही कट्यार घ्या. ही काकासाहेबांची आहे. मुठीवर त्यांचें नांव आहे. ही घेऊन चला. कृष्णग्रामापलिकडील अरण्यांत महासेन आपल्या टोळीसह असेल तेथें जाऊन त्याला ही काकासाहेबांची खूण ह्मणून दाखवा; आणि त्याला काकासाहेबांचा निरोप ह्मणून सांगा कीं, आज बेत सफल होण्याची आशा नाहीं. तुह्मी असाल तसे परत कालगडास चालते व्हा."

असें ह्मणून नलिनीनें पदराच्या आंत लपवून ठेविलेली कट्यार काढिली आणि ती कुमुदबंधूच्या हातांत देत होती, पण थांबली. तिच्या मनांत फिरून शंका उत्पन्न झाली आणि चेहऱ्यावरील आनंदाची छाया एकदम नाहींशी झाली. ती म्हणते, "छी, छी ही खूण पुरेशी नाहीं. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं काकासाहेब असली क्षुद्र खूण देऊन जासूद पाठविणार नाहींत हें महासेनाला पुरतें ठाऊक आहे. मी अगदीं वेडी झालें आहें. ही खूण घेऊन जा म्हणणें म्हणजे तुमचे अमूल्य प्राण व्यर्थ त्या दुष्टांच्या हातीं देणें आहे. नकोग बाई हें धाडस ! देवा काय करूं आतां ! मी कशी चुकलें ! काकासाहेबांची अंगठी रात्रीं हातीं आली होती ती तशीच राहूं दिली असती तर—"

"आणि ती घेऊन जर मी गेलों तर मग तरी महासेन आणि शक्तिधर यांची खात्री होईल का?" कुमुदबंधु विचारतो.

"होईल. पण ती आतां आपल्याला कशी मिळणार! आतां कांहीं आशा नाहीं! सर्व घात झाला !" नलिनी अगदीं निराश होऊन दुःखाचा उसासा टाकून म्हणाली.

कुमुदबंधूनें हस्तत्राण काढून थोड्या वेळापूर्वी जितशत्रूपासून मिळविलेली मुद्रिका नलिनीस दाखविली. आणि तो म्हणाला, "ही पहा. ही जयद्रथरायाचीच का?"

नलिनीनें ती लागलीच ओळखिली. आणि आश्चर्यानें ती क्षणभर पाषाणाप्रमाणें स्तब्ध राहिली. पण लागलीच अगदीं चेहरा बदलून गेला आणि दुःखाकुल स्वरानें ती

ह्मणाली, " समजलें मी आतां! काकासाहेबांचा शेवट झाला! आणि आपणच त्यांचा घात केलाना ? "

" नाहीं, नाहीं. " कुमुदबंधु घाईनें ह्मणाला. " तरुणी, तूं दुःखी होऊं नको. जयद्रथराय जिवंत आहे. माझें त्याचें युद्ध झालें हें खरें; पण मी कोण हें त्याला कळलें नाहीं. त्यानें कृतज्ञताबुद्धीनें आपली अंगठी पुढें केली आणि तीही मी घेणार नव्हतों, पण कदाचित् पुढें मागें उपयोगीं पडेल, असा विचार– "

" समजलें, समजलें. " नलिनी मध्येंच किंचित् दुःख कमी होऊन म्हणाली. " तुमचें त्यांचें युद्ध झालें; तुम्हीं त्यांचा पराजय केला; पण त्यांना प्राणदान दिलें ? "

" होय, आणि तें तुझ्याकरितां. " असें म्हणून कुमुदबंधूनें सप्रेम दृष्टीनें तिजकडे पाहिलें.

नलिनीच्या चेहेऱ्यावर दुःखानें आलेला फिकटपणा जाऊन गालांवर फिरून लाली आली; पण ती केवळ आनंदाचीच होती असें नाहीं. त्यांत बराच भाग लज्जेचाही होताच. कुमुदबंधूच्या वरील शब्दांनीं नलिनीच्या देहांत कर्णद्वारां प्रवेश करून तिचें अंतःकरण कामपाशांनीं बरेंच बद्ध करून टाकिलें होतें. ती सलज्ज दृष्टीनें कुमुदबंधूकडे पाहत ह्मणते, " माझ्यावर आपले फार फार उपकार आहेत. माझा चुलता आपला शत्रु असूनही अशा स्थितींत आपल्या हातीं आला असतां आपण त्याला प्राणदान दिलें, यांत आपला मोठेपणाच दिसून आला. "

" जर मी राणीसाहेबांच्या प्रजाजनापैकीं असतों तर मला असें करितां आलें असतेंच असें नाहीं. " कुमुदबंधु ह्मणतो. " त्या स्थितींत राणीसाहेबांच्या शत्रूचा घात करणें, किंवा त्याला कैद करून त्यांच्या स्वाधीन करणें मला भाग पडलें असतें. प्रस्तुत स्थितींत मला तसें करण्याचें कारण नव्हतें. मी एक परदेशस्थ शिपाई आहें. तेव्हां राणीसाहेबांच्या संरक्षणार्थ होतील तेवढे प्रयत्न केले ह्मणजे माझें कर्तव्य आटपलें. "

" आणि यावेळीं आपल्याला तेंच करावयाचें आहे. " नलिनी म्हणाली. " चला तर आतां उशीर लावूं नका. "

" आणखी दोन शब्द. " कुमुदबंधु म्हणाला. " महासेन आणि शक्तिधर यांच्यापुढें मी गेलों म्हणजे ते या त्यांच्या कटासंबंधानें कांहीं प्रश्न करतील. आणि मला त्यांतली कांहीं एक माहिती नाहीं असें दिसून उपयोगीं नाहीं. तेव्हां या संबंधानें कांहीं गुह्य गोष्टी मला टाऊक असाव्या हें बरें. "

" होय. " नलिनी म्हणाली, " आपल्याला काय काय माहिती पाहिजे ती विचारा. "

कुमुद०:–" प्रथमतः मला येवढेंच सांगा कीं, मी रात्रीं कूर्मदुर्गांतून सुटून गेलों याबद्दल तुमच्यावर कांहीं संशय वगैरे आला कीं काय ? "

नलिनीः–( धूर्ततेनें कुमुदबंधूचा हेतु ओळखून किंचित् हंसत) " नाहीं. मी उजाडतांनाच तेथून निघालें. त्या वेळेपर्यंत आ-

पण सुटून गेल्याची बातमी त्यांना कळलीच नव्हती. मग त्यांना संशय तरी कोठून येणार? पण सरदारसाहेब, आपण माझ्याबद्दल यावेळीं विचार करीत बसूं नका. राणीसाहेबांच्या संरक्षणाच्या तजविजीस प्रथम लागलें पाहिजे."

कुमुद०:—"बरें, हे सर्व सरदार इतक्या लवकर आपापल्या जागीं येऊन कसे बसले?"

नलिनीः—"पहांटेस प्रहररात्रीच्या अगोदरच कूर्मदुर्गांत एक स्वार आला. तो कोठून व कोणाकडून आला तें मला बरोबर कळलें नाहीं. पण बहुतकरून तो गिरिद्वाराहून आला असावा. आणि राणीसाहेबांच्या अगदीं जवळच्या मंडळींत कोणी तरी काकासाहेबांचा हेर असावा."

कुमुद०:—"हें कशावरून?"

नलिनीः—"त्या स्वारानें एक लहानशी चिठ्ठी आणिली होती, आणि ती आंकड्याच्या भाषेंत होती. नंतर काकासाहेबांच्या खोलींत ती माझ्या दृष्टीस पडली. पण त्यांत काय लिहिलें होतें तें मला कळेना. कारण त्यांत नुसते आंकडेच होते. तो स्वार ती चिठ्ठी घेऊन आल्याबरोबर किल्ल्यांत जिकडे तिकडे गडबड सुरू झाली. काकासाहेबांनीं कालगडास महासेनरायाकडे एक, आणि श्येनदुर्गास शक्तिधररायाकडे एक असे दोन जासूद त्वरेनें रवाना केले. आणि त्यांनीं लागलीच आपापल्या जागीं जाऊन बसावें ह्मणून सूचना पाठविली."

कुमुद०:—"ह्या सूचना तोंडीच होत्या का?"

नलिनीः—"होय. पण जासुदांबरोबर सहज ओळखतां येण्यासारख्या खुणाही होत्या."

कुमुद०:—"हें एक उत्तम झालें. आतां ह्या आंगठीनें सहज कार्य होईल. आणखी काय?"

नलिनीः—"आणखी काय! काकासाहेबांचा बेत मुळांत स्वतः जाण्याचा नव्हता. तरी शंभर स्वार बरोबर घेऊन ते ताबडतोब इकडे आले."

कुमुद०:—"ठिकच आहे. प्रसंग मोठा आणीबाणीचा आहे हें त्यांना दिसलें असावें; ह्मणून आपण उदासीन राहण्याचा मूळचा बेत त्यांनीं बदलला असावा. बरें, पण आणखी कांहीं?"

नलिनीः—"आणखी कांहीं नाहीं. काकासाहेब गेल्यानंतर ती चिठ्ठी मीं फिरून फिरून पाहिली पण मला कांहींच कळेना. कांहीं तरी घोटाळा आहे असें मात्र वाटलें व त्यामुळें मनाला चैन पडेना. शेवटीं इकडे यावें असा विचार मनांत आला. आणि आलें हें फार बरें झालें. पण खरेंच आपण येथें कां व कसे आलांत?"

कुमुद०:—"हें का तुह्माला सांगायला पाहिजे?"

नलिनीः—"तर मग मामासाहेबांनींच तुह्माला इकडे पाठविलें. मला वाटलेंच होतें कीं, मामासाहेब स्वतःच तरी इकडे येतील किंवा कोणा तरी विश्वासू गृहस्थास पाठवितील; आणि ह्मणूनच मी इकडे आलें."

कुमुद०:—"तर मग राणीसाहेबांचा सकाळीं लवकर निघण्याचा बेत झाला वगैरे कांहींच बातमी तुम्हाला कळली नव्हती म्हणतां ?"

नलिनीः—"कशी कळणार? तुम्ही आतां सांगेपर्यंत मला यांतलें कांहींच माहित नव्हतें. पहांटे जें पत्र आलें, तें यासंबंधाचेंच असावें; पण मला त्यावेळीं हें कसें कळणार ! माझ्या मनांत निरनिराळ्या शंका आल्या. एकदां वाटलें, राणीसाहेबांनीं पहिला बेत बदलून सकाळीं लवकर निघण्याचा बेत केला असेल; एकदां वाटलें, कदाचित् वाटेंत कांहीं तरी अडचण येऊन तुम्ही गिरिद्वाराला पोंचलाच नसाल. एकदां वाटलें, मीं घाईनें लिहिलेल्या चिठ्ठींत चुकून भलतेंच कांहीं तरी लिहिलें असेल; किंवा मामासाहेबांनीं माझी चिठ्ठी पोहोंचल्यावर कांहीं निराळ्याच तजविजी केल्या असतील; असे नाना प्रकारचे तर्क माझ्या मनांत येऊन गेले."

कुमुद०:—"त्या आंकड्याच्या पत्रासंबंधानें तुम्हाला एक विनंती करून ठेवितों. तुम्हीं सांगितलेल्या हकीगतीवरून असें स्पष्ट दिसतें कीं, राणीसाहेबांच्या जवळपास शत्रूचा कोणी तरी हेर असावा खचित. जर आज सर्व गोष्टी सुरळीत घडून आल्या आणि राणीसाहेब आजच्या प्रसंगांतून सुखरूप पार पडल्या तर त्या हेराचा पत्ता काढल्याशिवाय रहावयाचें नाहीं असा माझा निश्चय आहे. म्हणून जर तें पत्र तुमच्या हातीं येण्यासारखें असेल तर तेवढें मिळवून ठेवा. त्याचा या कामीं फार उपयोग होईल. असो. येतों मी आतां. ईश्वरकृपा असली तर फिरून गांठ लवकरच पडेल."

शेवटचे शब्द कुमुदबंधु अशा मुद्रेनें बोलला कीं, नलिनीची दृष्टि चटदिशीं खालीं वळली, आणि तिच्या गालांवर लज्जेचा गुलाबी छटाही लागलीच आला. पण क्षणांत गंभीरपणा स्वीकारून ती म्हणाली "जगदंबेच्या कृपेनें आपण यशस्वी होऊन या आणि आपली भेट होऊन आपलें अभिनंदन करण्याची वेळ लवकर येवो ! पण महाराज, आतां उशीर होत चालला. आपण लवकर चला. कृष्णग्रामापलीकडे गेलात म्हणजे सुमारें अर्ध कोशावर डावे बाजूस जें अरण्य लागेल त्यांत रस्त्याजवळच एक जुनाट पडका वाडा आहे तेथें महासेन आपल्या टोळीसह असेल."

"बरें, आणि त्याच्या हातून बद्रिकेशाच्या कृपेनें मी निसटलों तर पुढें शक्तिधराचें ठाणें कोठेंसें आहे ?" कुमुदबंधु म्हणाला.

"पुढें सुमारें तीन कोशांवर श्येनदुर्ग म्हणून एक डोंगरी किल्ला आहे, त्याच्या खालच्या बाजूस जें रान आहे तेथें शक्तिधराची टोळी छपून बसलेली असेल." नलिनीनें उत्तर केलें.

"येतों तर आतां मी." इतके शब्द बोलून कुमुदबंधु घोड्यावर बसला. क्षणमात्र दोघांच्याही दृष्टि परस्परांवर स्थिर झाल्या आणि लज्जेमुळें किंवा त्या घाईच्या प्रसंगामुळें ज्या कित्येक गोष्टी आतांपर्यंत दोघांनाही बोलून व्यक्त करणें झालें नव्हतें,

त्या सर्व या एका क्षणांत परस्परांस शब्दांच्या साहाय्यावांचून कळल्या !

त्या तरुणीशीं बोलण्यांत कुमुदबंधूनें कांहीं थोडासा अधिक वेळ खर्च केला खरा; पण यामुळें त्याच्या थकलेल्या घोडयास थोडी विश्रांति मिळाली. ता आल्या वाटेनें परत फिरला नाहीं. पलिकडून एक पायवाट होती त्या वाटेनें घोडा दवडवीत तो निघाला, आणि कृष्णग्रामाच्या बाजूनें पलिकडील रस्त्यास मिळाला राणीची स्वारी अद्याप पुष्कळ मागेंच होती. होतां होतां नलिनीनें सांगितलेल्या अरण्याशीं तो आला. अरण्यांत शिरून इकडे तिकडे थोडी नजर फिरवितो तों जवळच कांहीं पडकें बुरूज वगैरे त्याला दिसले. नलिनीनें सांगितलेली जागा हीच असावी असें अनुमान करून तो तिकडे वळला. आसपास सर्वत्र शांतता होती. येथें एकादें सैन्य छपून बसलें असेल, असें सांगितलें तरी इतरांस खरें वाटलें नसतें इतकी ती जागा शांत व उदास होती. पण या जाग्याच्या उदासीनपणामुळेंच कुमुदबंधूच्या सुसंस्कृत दृष्टीस तेथें शेंकडों हत्यारबंद शिपाई छपून बसलेले स्पष्ट दिसले. पण मनाला धैर्य देऊन व मुद्रा गंभीर करून त्यानें सरळ त्या पडक्या वाडयाकडेच घोडा चालविला. वाडयाच्या जवळ जातांच त्यानें आपलें शिरस्त्राण काढून हातांत घेतलें आणि इकडे तिकडे पाहूं लागला. जणूं काय, तेथें कोणी तरी त्याला भेटण्याकरितां त्याची वाटच पहात बसलेले आहेत !

लागलीच एका पलिकडच्या भिंतीआडून एकदम एक गृहस्थ पुढें आला. हा शरिरानें उंच व सडसडीत होता. वयानें सुमारें तीस बत्तीस; केश किंचित् पिंगट वर्णावर, आणि डोळे मोठे असून सतेज. याच्या अंगावर प्रवासाचा पोषाख होता. चिलखतापैकीं फक्त वक्षस्त्राण मात्र छातीवर बांधिलें होतें. मुद्रेवरून हा गृहस्थ स्वभावानें थोडा अभिमानी व निग्रही असावा असें दिसत होतें. हा गृहस्थ कोण असावा याबद्दल कुमुदबंधूनें लागलीच तर्क बांधिला. आणि नुसत्या तर्कावरूनच तो छाती करून म्हणाला, " सरदारसाहेब, आपण महासेनराय कालगडकरच ना ? मी अशा रीतीनें विचारतों याबद्दल माफी असावी. "

त्या सरदारानें कुमुदबंधूचा चेहेरा एकवार निरखून पाहिला व हा कोणी तरी मोठा गृहस्थ असावा अशी त्याची ताबडतोब समजूत झाली. आणि त्यानें योग्य विनयानें त्याच्या प्रश्नास 'होय' म्हणून जबाब दिला.

" सरदारसाहेब, मी महामंडलेश्वर जयद्रथरायाकडून आलों आहें. " कुमुदबंधूनें बोलण्यास एकदम सुरुवात केली.

" आं ! होय का ? " महासेन म्हणतो, " बरें, जयद्रथरायाकडील वर्तमान काय ? "

" वर्तमान काय ! ठीक नाहीं. " कुमुदबंधु उत्तर करितो.

" काय, ठीक नाहीं ! " महासेनाचा चेहेरा अगदीं फिकट होऊन तो म्हणतो. " पण आपण कोण, मीं ओळखिलें नाहीं ? "

" मी या देशाचा नव्हें. कालयवन देशांतील मी एक छोटासा सरदार आहे.

मला कृष्णराव ह्मणतात." कुमुदबंधु उत्तर करितो. "पण जयद्रथरायापासून हें प्रत्ययचिन्ह मीं आणिलें आहे." असें ह्मणत बोटांतील अंगठी काढून त्यानें महासेनापुढें केली.

ती नीट पाहून व फिरून कुमुद्बंधुस परत देऊन महासेनराय ह्मणाला, "होय, ही जयद्रथरायांचीच मुद्रिका आहे. तर आपण काय बातमी आणिली असेल ती सांगा आतां सर्व."

"आज तर सर्व बेत बिघडला." कुमुदबंधु चट्दिशीं ह्मणाला. "महामंडलेश्वरांचा छाप्याचा बेत फसला; आणि आपण बिलकुल वेळ न घालवितां आपल्या टोळीस एकदम परत जावें असें आपल्यास कळविण्यासाठीं त्यांनीं मला पाठविलें आहे."

"काय, आपण हें सांगतां तरी काय?" महासेनराय वेडावल्यासारखा होऊन विचारतो. "आणि जयद्रथरायांचा बेत अशा रीतीनें फसण्याचें कारण तरी काय? राणीचा बेत फिरला कीं काय? आज ती गिरिद्वाराहून निघत नाहीं वाटतें?"

"भलतेंच; राणी तर कृष्णग्रामापर्यंत येऊन पोंचली असेल यावेळीं; पण महामंडलेश्वरांचा बेत असा आहे कीं, आजच्याहून अगदीं निराळ्या प्रकारची सर्व व्यवस्था करून फिरून हा प्रयत्न करावयाचा. आजच्या प्रयत्नांत यश येण्याची मुळींच आशा नाहीं." कुमुदबंधु ह्मणाला.

"होय का? ठीक आहे तर मग. जयद्रथरायास जर आह्मीं आपले नायक केले आहेत, तर त्यांची आज्ञा मान्य केलीच पाहिजे. पण कांहो, कृष्णराय, राणी गिरिद्वाराहून निघालीं ना? तिच्याबरोबर लोक तरी कितीसे आहेत?" महासेनानें प्रश्न केला.

"सुमारें दोनशें तरी स्वार आहेत." कुमुद्बंधूनें उत्तर दिलें.

"पण मजजवळ येथें तीनशेंहून अधिक लोक या येवढ्या शेंपन्नास हातांच्या राईत आहेत." महासेन अभिमानपूर्वक म्हणाला.

"पण सर्व हकीगत तुम्हीं अद्याप कोठें ऐकिली आहे?" कुमुदबंधु शांतपणें ह्मणतो. "राणीच्याबरोबर जरी दोनशें स्वार आहेत, तथापि आसपास कोस अर्ध कोसाच्या आंत दोन दोनशें स्वारांच्या दोन टोळ्या दोन्ही बाजूंनीं चालल्या आहेत. आज कांहीं तरी दगा आहे असें राणीसाहेबांस कळल्यामुळें त्यांनीं सर्व तयारी कडेकोट केली आहे. शिवाय आपापल्या सैनिकांसह राणीसाहेबांच्या स्वारीस ताबडतोब येऊन मिळावें ह्मणून आज्ञापत्रें घेऊन आसपासच्या सर्व सरदारमंडळीकडे जासूद दवडताहेत. तेव्हां अशा स्थितींत कोणत्याही प्रकारची हालचाल करणें व्यर्थ आहे, असें जयद्रथरायांस सहजच वाटलें."

"तर मग आमचे सर्व बेत बाहेर फुटले!" महासेन अत्यंत उद्विग्न व कांहींसा भयचकित होऊन ह्मणाला.

"महामंडलेश्वरांनीं मला असेंही आपणांस कळवायला सांगितलें आहे कीं, त्यांच्या सूचनेप्रमाणें आपण वागल्यास आपणास कोणत्याही प्रकारची भीति नाहीं; येवढेंच नव्हे, तर आपल्याला यशप्राप्तीचीही पूर्ण-

पणें खात्री आहे. फक्त समय आजचा उद्यांवर गेला इतकेंच."

लागलीच महासेन मागें वळला व त्यानें कांहीं खूण केली. त्याबरोबर त्या वाड्याच्या पडक्या भिंतीमागून चार पांच असामी पुढें आले. त्यांच्या मुद्रेवरून आणि विनयशील व सभ्यवर्तनावरून ते महासेनाच्या हाताखालचे, पण बऱ्याच उच्च पदवीचे लोक असावेत असें दिसत होतें. महासेनाचें आणि त्यांचें एका बाजूस कांहीं गुप्त भाषण झालें. तेवढ्यांत मधून मधून ते लोक कुमुदबंधूकडे संशयित मुद्रेनें पहात होते. आपण अशा तऱ्हेनें येथें येण्यांत भयंकर धाडस केलें आहे हें कुमुदबंधु जाणून होता. जर महासेनाबरोबरच्या टोळींत जयद्रथरायाकडील कोणी अनुचर असला आणि त्यानें आपल्यास काल पाहिलें असलें तर सर्वच घात व्हावयाचा हें त्यास ठाऊक होतें. पण त्याला जी भीति वाटत होती, ती स्वतःबद्दल नव्हती. ज्या हेतूनें तो आला होता तो विफल झाला तर राणीवर काय प्रसंग गुदरेल याची त्याला फार काळजी होती. स्वतःच्या जीविनापेक्षां राणीच्या संरक्षणाची विवंचनाच त्याला अधिक होती.

कुमुदबंधु बाह्यतः सहज वृत्तीनें पण आंतून मुद्दाम सूक्ष्म निरीक्षण करण्याकरितां आपल्या सभोंवार पाहत असतां त्याला असें दिसून आलें कीं, फक्त महासेनाशीं बोलत असलेल्या चारपांच मंडळींचीच त्याच्यावर दृष्टि होती असें नव्हे, तर त्या पडक्या वाड्याच्या भिंतीआडून, वरील बुरजांच्या जंग्यांतून, पलीकडच्या झाडांआडून किती तरी डोळे त्याच्यावर लागले होते! प्रातःकालचें सूर्यकिरण, सज्ज असलेल्या निरनिराळ्या शस्त्रास्त्रांवर आणि चकचकीत चिलखतांवर पडून तीं मधून मधून झळकत होतीं. कांहीं अंतरावर मधून मधून घोड्यांच्या टापांचे आवाजही ऐकूं येत होते. हें सर्व पाहून कुमुदबंधूची खात्री झाली कीं, महासेनानें 'या एवढ्याशा झाडींत तीनशांहून अधिक लोक आहेत.' म्हणून सांगितलें, तें केवळ पोकळ डौलानें नव्हे.

या सर्व गोष्टी अवलोकन करण्यास आणि हे सर्व विचार कुमुदबंधूच्या मनांत येऊन जाण्यास फारच थोडा अवकाश लागला. तेवढ्या अवकाशांत महासेनाचें हाताखालच्या अधिकाऱ्यांशीं चाललेलें भाषण आटपलें, आणि महासेन फिरून कुमुदबंधुजवळ आला.

"आम्ही जर ताबडतोब येथून निघालों तर राणीच्या सैन्याची आणि आमची कोठें गांठ पडण्याचा संभव आहे का?" महासेन विचारतो.

"महामंडलेश्वरांनीं मला जी आज्ञा केली ती अशी होती कीं, आपल्या टोळीसह येथून एकदम निघण्याविषयीं सांगावें." कुमुदबंधु उत्तर करितो.

"जयद्रथरायांच्या टोळीबरोबर तुम्ही समक्ष होतां काय?" महासेन विचारतो.

"होतों तर!" कुमुदबंधु न डचकतां उत्तर करितो. "हा मी तिकडूनच आलों. खरेंच, म्यानांतून हत्यारें नुसतीं बाहेर देखील काढल्याशिवाय असल्या शिपायांना पळ काढावा लागला, याबद्दल सर्वांना मृत-

प्राय दुःख झालें. पण अशा वेळीं दुसरा उपाय काय! "

" असो; आतां काय त्याचें ! " महासेन कष्टी होऊन म्हणतो. " आल्या प्रसंगास पाठ दिलीच पाहिजे ! अद्याप कांहीं दिवस परदेशाहून आलेल्या भाडेकरी मसलतगारांच्या आणि ओठांवर मिसरूडही आलें नाहीं असल्या बायकी पोराच्या तंत्रानें चालणाऱ्या एका लहरी पोरीच्या हातांत पंचगांगदेशाचीं राज्यसूत्रें रहावींत अशी परमेश्वराचीच इच्छा आहे म्हणावयाचें; दुसरें काय ! "

निरपेक्षबुद्धीनें पंचगांगच्या गादीचें हित चिंतणाऱ्या वृद्ध व सन्मान्य स्वदेशियांवर आणि त्या देशाच्या प्रत्यक्ष राज्ञीवरही झालेला हा कुशब्दप्रहार ऐकून कुमुदबंधुसारख्या शिपायाच्या अंगांतील रक्त तापून गेलें असेल यांत शंका काय? पण महासेनाचे हे उद्दामपणाचे शब्द निमूटपणें ऐकून घेणें यावेळीं त्याला भाग होतें ! असो.

जयद्रथरायांच्या आज्ञेप्रमाणें आपल्या टोळीला कुच करण्याचा हुकूम महासेन देणार तों एकदम दुरून घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकूं येऊं लागले. लागलीच महासेनानें टोळींतल्या लोकांस जागच्या जागीं शांत राहण्याविषयीं खूण केली; आणि तो व कुमुदबंधु दोघेही एका भिंतीआड झाले. महासेनाचे डोळे रस्त्याकडेच लागलेले होते.

" राणीचीच स्वारी ही ! " ते घोडेस्वार जवळ येतांच महासेन ह्मणाला. " हें पहा कृष्णराय, जर जयद्रथरायांची आज्ञा क्षणभर बाजूस ठेवण्याची मला परवानगी द्याल, तर माझ्या हातांतील ही लहानशी तुतारी मी एकवार ओंठाशीं नेतों ! तिचा एक तीव्र सूर निघण्याचा अवकाश, कीं हें सर्व अरण्य एकदम जिवंत होऊन माझ्या या डोंगरी शिपायांचा विक्रम थोडासा तरी तुमच्या दृष्टीस पडेल ! "

" मी परदेशस्थ असूनही माझ्या देखील बाहूंत यावेळीं काय स्फुरण येतें आहे ह्मणून सांगूं ! " असें म्हणून कुमुदबंधूनें आपली तलवार म्यानाबाहेर निम्मी ओढली आणि मनांत म्हणतो, " जर कदाचित् या चोरानें ती तुतारी एक बोटभर वर उचलली तर ती याच्या ओंठाला जाऊन पोंचायच्या आंत याचें डोकें दहा हातांवर नेऊन पाडतों ! मग काय होईल तें होवो ! " फिरून महासेनास उद्देशून तो म्हणतो, " पण सरदारसाहेब, अशा कामांत नुसती शिपाईगिरी उपयोगाची नाहीं. शौर्यापेक्षां विचारालाच यावेळीं महत्व दिलें पाहिजे. आणि म्हणूनच महामंडलेश्वरांनीं तरी अशी आज्ञा केली असावी. "

हें या उभयतांचें भाषण चाललें असतां राजमंडल व बरोबरचे स्वार जवळच्या रस्त्यानें सावकाश चालले होते. त्या बापड्यांना काय कल्पना कीं, त्यांच्यापासून पांच पंचवीस हातांच्या आंत अगदीं शांत व निर्मक्षिक दिसणाऱ्या अरण्याच्या भागांत प्रत्यक्ष यमदूत आपले पाश सरसावून आपणांला परलोकयात्रेस नेण्यास सिद्ध होते म्हणून !

" बद्रिकेशा, यांना जलदी चालण्याची तरी बुद्धि दे ! या नीचाचें मन केव्हां फिरेल याचा काय नेम ! " कुमुदबंधु मनांत तडफडत म्हणतो.

इकडे महासेन आपल्या हातांतील तुतारीशीं मौजेनें खेळत होता. त्या तुतारीच्या प्रत्येक हेलकाव्याबरोबर कुमुदबंधूच्या अंतःकरणास एकेक हेलकावा बसत होता. कुमुदबंधूस यावेळीं खचित् वाटलें असेल कीं महासेनाच्या हातांत ही तुतारी नसून आपले प्राणच आहेत. व त्यांच्याशीं तो निष्काळजीनें हवातसा खेळ करीत आहे !

राजमंडल त्या पडक्या वाड्याच्या अगदीं समोरच्या बाजूस येऊन पोंचलें. अद्याप घोडे अगदीं सावकाश चालले आहेत. राणीचें तोंड प्रातःकालच्या कोंवळ्या उन्हानें, प्रवासाच्या श्रमानें, आणि अंतःकरणांतील तापानें लाल दिसत आहे; तथापि सर्वांना हुरूप यावी म्हणून सर्वांशीं ती मोठ्या प्रेमानें बोलत आहे, मधून मधून हंसते आहे, हें सर्व चाललेंच आहे. प्रद्युम्नरायाचा चेहेरा पांढरा फटफटीत झाला आहे, व तो रस्त्याच्या दोहों बाजूस टक्टक् पहात आहे. विनयादित्यभामाही आसपास दृष्टि फेंकीत आहेत, पण ती भित्रेपणानें मात्र नव्हे; तर कोठें काय प्रसंग येण्याचा संभव आहे हें पाहण्यासाठीं. असो; याप्रमाणें राजमंडल हळूहळू पुढें चाललें. राणी आणि मुख्य मुख्य मंडळी बरीच पुढें सरकली. राणीच्या संरक्षणाकरितां आलेली सरदारमंडळी आणि स्वार हेहीं पुढें गेले. अश्वपालकादि नौकर आणि पादचारी सैनिक घरेंच पुढें सरले, आतां मात्र कुमुदबंधूच्या जिवांत जीव आला.

" खरेंच, कृष्णराय, " महासेन ह्मणतो, " ही तुतारी चट्दिशीं ओंठाला लावावी आणि सोक्षमोक्ष कायतो एकदम होऊं द्यावा असें किती वेळां तरी मनांत आलें ! मीं आपला हात मोठ्या कष्टानेंच आवरला. "

" आणि मींही कष्टानेंच आंवरला. नाहीं तर तुझें शीर आणि धड हीं दोन्हीही केव्हांच परस्परांपासून विभक्त झालीं असतीं. " कुमुदबंधु मनांत म्हणाले. फिरून लागलीच महासेनास उद्देशून ह्मणतो, ' सरदारसाहेब मला येथून आतां लौकर गेलें पाहिजे. कारण पुढें जाऊन शक्तिधररायांनाही महामंडलेश्वरांची आज्ञा तावडतोब कळविली पाहिजे. नाहीं तर ते कांहीं तरी भलताच प्रसंग आपल्यावर ओढवून आणतील "

" होय तें खरें. पण आतां हें तुमच्या हातून घडणार कसें ? तुम्हाला राणीच्या स्वारीच्या अगोदर तेथें जाऊन पोंचलें पाहिजे. सरळ रस्त्यानें तर जायची सोय नाहीं. " महासेन म्हणतो.

" या सर्व गोष्टींचा मीं पूर्ण विचार केला आहे. मात्र एक गोष्ट आपल्याकडे आहे. माझा घोडा जरी चांगला चपल आहे, तरी आतां तो अगदीं थकला आहे. तेव्हां चांगलेंसें एक जलद जनावर आपण यावेळीं दिलें पाहिजे. " कुमुदबंधु उत्तर करितो.

" दुसरा घोडा ? इतकेंचना ! कोणते

# केसरींतील निवडक निबंध.

## भाग दुसरा.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान्, उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत, अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

### विषयानुक्रमणिका.


ज्ञान.
अप्रतिबंधव्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
जूट.
मनुष्यांचें सामाजिक कर्तव्य.
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्णावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?
बालविवाहापेक्षां सतीच बरी !
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?
चैन.
स्त्रीदास्यविमोचन.
तंबाखू.
चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें ?
आह्मा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचे म० चऱ्हाट.
एक वृद्ध पोलिटिकल अत्याचारी.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे.
व्यायाम.
परभाषेतील शब्दांची योजना.
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची अवश्यकता.
उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बायबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला.
प्रसिद्धीकरण.
ब्रह्मदेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गनतीचे प्रश्न.
पाऊस.
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार.
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?
,, उत्तरार्ध.
ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज.
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति.


**म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.**

# खालील सर्व पुस्तकें आर्यभूषण छापखान्यांत विकत मिळतील.

सन १८८९।९०।९१ सालचीं

## मुंबई हेमंतव्याख्यानें.

**षड्दर्शनसारनिरुक्ति**—( षड्दर्शन आणि नास्तिक मतप्रदर्शन )—महामहोपाध्याय भीमाचार्य झळकीकर यांचें व्याख्यान; किंमत २॥ आणे, ट० ह० अर्धा आणा.

**आमची प्राचीन स्थिति, प्राचीन कायदे व त्यांचें बंधन**—रा० रा० महादेव वामन भट बी. ए. एल्. एल्. बी, हायकोर्ट वकील, मुंबई यांचें व्याख्यान; किं० दोन आणे. ट. ख. अर्धा आणा.

**हिंदुसमाजसुधारणा**—रा० रा० रामचंद्र गोविंद तळवलकर, हिंदु यूनियन क्लबाचे चिटणीस यांचें व्याख्यान; किं० ३। आणे. ट० ख० ०॥.

**शरीरसामर्थ्य**—डा० मोरेश्वर गोपाळ देशमुख, बि. एस्. सी. एम्. डी. असिस्टंट केमिकल अनालायझर मुंबई यांचें व्याख्यान; किं० १॥ आणा ट. ख. ०॥.

**इतिहासाची पुनरावृत्ति**—रा. रा. रामचंद्र गणेश मंहले बि. ए. एल् एल्. बी. हायकोर्ट वकील मुंबई यांनीं केलेलें. किंमत १॥। आणे. ट. ख. ०॥.

**जलधिजवर्णन.**—डा० कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, सरजन मेजर टार्णेकृत ०३ ०॥

**युरोपच्या इतिहासापासून आपल्या लोकांनीं काय शिकावें.**—रा०सा० वामन आबाजी मोडक प्रिन्सिपाल एल्फिन्स्टन् हायस्कूल मुंबई, कृत...०१॥ ०॥

**ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म किंवा वेद व वैदिक धर्म.**—प्रो० राजाराम रामकृष्ण भागवतकृत ..............०४ ०॥

**धर्मौदार्य.**—वे० शा० रा० बाळ यज्ञेश्वरशास्त्री गुरजरकृत ..............०१। ०॥

**सामाजिक विषयासंबंधीं तोडजोड.**—मामदार का० त्रिं० तेलंगकृत .. ...०२॥ ०॥

**आमचे कलाकौशल्यांत सुधारणा करण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत?**—मि० केशव वामन पेठेकृत०२॥ ०॥

**स्थावरजंगमात्मक सृष्टीविषयीं माहिती.** काशिनाथ वामन काणे एल. एम. ॲन्ड एस. कृत.............. .....०२ ०॥

रा० रा० शंकर मोरो रानडे बी. ए. कृतः—

| | किंमत. | ट०ख० |
|---|---|---|
| प्रेमगुटिका ... ... ... ... | ०४ | ०॥ |
| अधिकारदानविवेचना नाटक.... | ०५ | ०॥ |
| डाक्तर व वैद्य प्रहसन ... ... | ०२ | ०१ |
| चंडकौशिक... ... ... ... | ०६ | ०१ |
| अतिपीडचरित नाटक ... ... | १०४ | ०२ |
| धीरोत्तंस नाटक ... ... ... | ०१२ | ०१ |
| अनुतापशमन नाटक ... ... | ०१२ | ०१ |
| पतिशिक्षा प्रहसन ... ... ... | ०४ | ०॥ |
| लटपटाध्याय प्रहसन... ... ... | ०२ | ०॥ |
| प्रमादप्रमोद नाटक... ... ... | ०९ | ०२ |

## रिचर्ड कॉब्डेल यांचें चरित्र.

**चिंतामण गंगाधर भानू बी. ए. प्रोफेसर,** फर्ग्यूसन कालेज पुणें, यांनीं लिहिलें.

रिचर्ड कान्डेन, ब्राइट साहेबांचा साथीदार, यांनीं इंग्लंडच्या इतिहासांत लोककार्यदक्षतेविषयीं व परहिततत्परतेविषयीं अमर कीर्ति मिळविली आहे. इंग्लंडाच्या व्यापाराची वाढ अनेक प्रतिबंधक कायद्यांनीं खुंटविली होती, ती यांनीं जिवापाड मेहनत घेऊन लोकांचे व राजकर्त्यांचे भ्रम दूर करून मोकळी केली. राष्ट्रीयहिताची कळकळ बाळगणारांनीं स्वकार्यसिद्धीसाठीं देशसेवेला कसें तनमनधन अर्पण केलें पाहिजे, अर्थात देह झिजविला पाहिजे, ममत्व टाकलें पाहिजे हें या चरित्रवाचनापासून चांगलें कळेल.

किंमत १० आणे. ट० ह० एक आणा.

**आर्यभूषण छापखाना, पुणें.**

रा. रा. गोविंद बल्लाळ देवलकृत

किं० ०५ **दुर्गा नाटक** ट०ख०००६.

**आर्यभूषण छापखाना, पुणें.**

## चार्लस ब्राडला एम. पी.

यांचें मनोवेधक व बोधपर चरित्र.

किं. ०४ ट. ख. ००६.

आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक २.

# नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.*

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

वीरमणी आणि शृंगारसुंदरी ... ... ... ... ... ... ... १ पासून ८
लटपट्या पद्या ( प्रहसन ) ... ... ... ... ... ... ...५३ ,, समाप्त
कुवलयपूरची राणी कुमुद्वती. ... ... ... ... ... ... ...१३३ ,, १४४

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत
हरि नारायण गोखले यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.

[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ४॥. शिवाय ट. हं. ६ आणे.

फेब्रुवारी १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें.

# त्राटिका नाटक.

महाकवि शेक्सपिअरकृत टेमिंग आफ दी श्र्यू नाटकाच्या आधारें प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए., यांनीं लिहिलें.

**या नाटकांत हास्यरस पूर्ण भरला आहे.**

किंमत ०६ आणे ट० हं० ०१ आणा.

**आर्यभूषण छापखाना, पुणें.**

विक्रीस तयार.

देवलकृत

# संगीत मृच्छकटिक

किं० ०१२. **आवृत्ति तिसरी.** ट०ख़० ०१.

पुणें.—आर्यभूषण छापखान्यांस मिळेल.

---

# केसरींतील निवडक निबंध.

## भाग पहिला.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपत्रधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

### विषयानुक्रमणिका.

उपोद्घात—वाचन.
आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण?
हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे.
आम्ही आमच्या दारिद्र्यांतून कशानें सुटूं?
गुरुगोविंद.
रक्षकाची अवश्यकता.
व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं.
आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा.
हिंदुस्थानावर रशिया स्वारी करणार काय?
इंग्लंडाशिवाय आह्मांस गति नाहीं.
दागिन्यांचा सोस.
एकत्र राहणें चांगलें का?
अनुकरण.
अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार.
भोजनगृह.
युरोपियन आणि नेटिव यांचें अन्योन्य संघट्टन.
मराठमोळा.
मराठमोळ्याची पुरवणी.
सासुरवास.
दारुबाजी.
इंग्रजी विद्या व आमची सामाजिक स्थिति.
हिंदुस्थानदेश बुडाला, हो, ठार बुडाला.
स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द.
माधवबागेंतील सभेवरील आक्षेप.
आतां कसें?
सारस्वांस नोटीस.
वर्तमानपत्रें.
शेक्सपिअर, भवभूति, कालिदास.
नाटकें करावीं कीं करूं नये?
कवि, काव्य, काव्यरति.
बडोद्याचे सयाजीराव महाराज यांस दोन उपदेशपर शब्द.
आपलें वैद्यक.
रसायनक्रिया.
मुद्रणस्वातंत्र्य.
कै० विष्णु कृष्ण चिपळोणकर.
मन आणि मेंदू.
सृष्टचवलोकन.

**म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.**

# वीरमणी आणि शृंगारसुंदरी.

## अंक पहिला.

दमच वाहिल्या ? थूः तुमच्या शहाणपणांवर !

अधीर०—अहो. तुह्मीं थुंकणार कशावर ?

### सूचना.

नाट्यकथार्णवाची नवीन सालाची आगाऊ वर्गणी व ज्या वर्गणीदारांकडे मागील बाकी येणें राहिली असेल ती लवकर पाठवून द्यावी, अशी विनंति आहे.

म्यानेजर नाट्यकथार्णव.

अधीर०—ह्मणजे ?

दौलत०—एकूण तुह्मांला इकडे कांहींच हकिकत कळली नाहीं वाटतें ?

अधीर०—छेः हो ! तिकडच्या हकिकती ऐकायला फुरसत आहे कोणाला ? तुह्मांला वेळ असला तर आमच्या येथील मेजवान्यांच्या, जलशांच्या, नाचांच्या हकिकती ऐका.

दौलत०—ठीक, ठीक. तुह्मांला कोपरापासून दंडवत असो ! अरे, तुमच्या अकला गेल्या कोठें ? का, येथल्या बायकांना तुह्मीं आपलीं मनें आणि अकला एकदम आपले रागानें लाल झालेले डोळे उघडून या साऱ्या सिंधुदेशाला जाळून फस्त कां करून टाकीत नाहींस !

दौलत०—पुरे, पुरे. आतां आपली अक्कल फार वाहवायला लागली ! देवा, तूं एकदम आपले रागानें लाल झालेले डोळे उघडून या साऱ्या सिंधुदेशाला जाळून फस्त कां करून टाकीत नाहींस !

अधीर०—अहो, उगीच आपल्या जीवाचा संताप कां करून घेतां ? मीं कांहीं तुह्मांला खोटेंनाटें सांगितलें नाहीं. येथें जी स्थिति आहे तिचेंच मीं चित्र वठविलें; पण कायहो, यांत आह्मीं वाईट तें काय केलें ? हा सारा देहस्वभाव नाहीं का ?

**दौलत०**—बोडक्याचा देहस्वभाव! अधीरसिंग, आतां चावटपणा पुरे कर. हल्लीं प्रसंग कसा बिकट आला आहे याचा विचार कर. वीरमणी जर लवकर शुद्धीवर आले नाहींत आणि या कवटाळिणीच्या गोड मिठीला सोडून विजयगिरीला परत गेले नाहींत, तर पुढें यांना सारा जन्म पश्चात्तापांत काढावा लागेल.

**अधीर०**—काय, गोड मिठी सोडावयाची? छे:, तें कधीं होणें नाहीं. या गोड मिठीची मिठी कधीं बसत नाहीं. समजलां? बरें पण, असा बिकट प्रसंग तरी कोणता?

**दौलत०**—अहो, तुम्हांला माहीतच आहे, कीं आमच्या विजयगिरीचे राजे धनुर्धर महाराज आपल्या सर्व कुटुंबासुद्धां एकदां बद्रिकेश्वराच्या यात्रेला गेले असतां तिकडच्या तिकडे नाहींसे झाले. कोणी म्हणतात, ते तपश्चर्या करीत हिमालय पर्वतावर बसले आहेत. कोणी म्हणतात, त्यांच्या हातून एखाद्या महान्ऋषीचा अजाणतां मोठा अपराध झाल्यामुळें त्यानें आपल्या तपोबळानें त्यांस जाळून भस्म केलें. अशा नानाप्रकारच्या कल्पना व तर्क लोकांनीं बांधिले व अजूनही बांधीत आहेत. पण निश्चयात्मक माहिती कोणालाही नाहीं.

**अधीर०**—तुम्हीं तरी लांबलचक चऱ्हाट वळण्याच्या कामांत मोठे पटाईत दिसतां! या गोष्टी माहीत नाहींत असा विजयभवन देशांत एकही इसम असेल काय? मी सांगूं का याच्यापुढची हकिकत? महाराजांचा असा मागमूस नाहींसा झाल्यानंतर, त्यांच्याबरोबर त्यांचें सर्व कुटुंबही लुप्त झाल्यामुळें, गादीवर कोणाला बसवावें याची मोठी पंचाईत पडली. शेवटीं सर्व सरदारमंडळाच्या मतें व श्रीमच्छंकराचार्यांच्या अनुमतानें, असें ठरलें कीं, एक तपपर्यंत महाराजांची वाट पहावी व तोंपर्यंत ते किंवा त्यांच्या वंशांतील कोणी पुरुष आले नाहींत तर तो वंश सर्वस्वीं नष्ट झाला असें समजून येथील सरदारमंडळापैकीं जो पुरुष सर्वांच्या मतानें योग्य ठरेल, त्यास गादीवर बसवावें. एक तपाची मुदत टळली, धनुर्धर महाराज अगर त्यांच्या वंशापैकीं कोणी पुढें आला नाहीं. तेव्हां ठरावाप्रमाणें राजा निवडावयाचा; पण सरदारमंडळांत फाटाफूट झाली. जयेंद्रपाळांचे वडील सर्वजय हे महापराक्रमी, उदार, व थोर मनाचे सरदार राजाधिराज होण्याला सर्वथा योग्य. माजी महाराजांच्या हे पूर्ण कृपेंतले; त्यांच्याच कारकीर्दींत हे सेनाध्यक्ष झाले. यांनीं आपल्या अंगच्या शौर्यादि गुणांनीं आमच्या विजयभवनाचा दरारा भोंवतालच्या सर्व प्रांतांवर बसवून त्यांना पादाक्रांत करून टाकलें. शेवटीं दरबारांत त्यांचें वजन इतकें वाढलें, कीं त्यांच्याशिवाय पान हलावयाचें नाहीं. तेच साऱ्या सरदारमंडळाचे अधिपति व मुख्य प्रधान झाले. आणि अखेरीस राज्यपदही त्यांनाच मिळावयाचें; पण देवाच्या झपाट्यापुढें कोणाच्यानें जाववणार? त्यांच्याच पूर्वीच्या स्नेह्यांपैकीं बसंतसिंग,

किशोरसिंग वगैरेंस त्यांचा हा उत्कर्ष न साहून त्यांनीं त्यांचा आपल्या घातकी व कृतघ्न कट्यारींनीं खून केला. खरोखरच अजूनही त्या प्रसंगाचें स्मरण झालें, कीं अंगावर कांटा उभा राहतो.

दौलत०—कां नाहीं उभा राहणार? तो प्रसंगच तसा छाती फाडून टाकणारा! पण त्यावेळीं आमच्या वीरमणींनीं खरें राजकारणकौशल्य दाखविलें. हे वीरमणी सर्वजयांच्या पूर्ण मेहरबानींतले; त्यांच्या हाताखालीं आणि नजरेखालीं वाढलेले; त्यांच्याबरोबर कित्येक घोर रणांत यांनीं आपलें युद्धकौशल्य दाखविलेलें; सैन्याच्या गळ्यांतले ताईत. यांनीं लगेच त्या फितूरी मित्रांच्या कटांत शिरून त्यांच्याच कपटरूपी शस्त्रांनीं त्यांस चांगलें शासन दिलें. व आपल्या स्वतःच्या वजनानें व सैन्याच्या जोरावर आपल्या उपकारकर्त्या सर्वजय धन्याच्या मुलाला मुख्य प्रधान केलें व सैन्यावरचा अधिकार आपल्या हातीं कायम ठेवून या मधल्या धामधुमीनें सर्वजयांनीं जिंकलेल्या प्रांतांत गडबड व दंगे होऊं लागले होते, तिकडे बंदोबस्ताकरितां निघून गेले.

अधीर०—आणि मग त्या साऱ्याचा बंदोबस्त करून आपलाही बंदोबस्त त्यांनीं या सिंधुदेशच्या राणीकडून करून घेतला!

दौलत०—नका त्या सटवीचें नांव घेऊं. तीच शेंवटीं आमच्या महाराजांच्या नाशाला कारण होणार असें माझ्या मनानें घेतलें आहे. हे इकडे अशी चैन मारताहेत, पण तिकडे हरक्षणीं यांचें नुकसान होत चाललें आहे. यांचा हा वेडा नाद कधीं सुटेल तो सुदीन. काय या रांडेची मोहकशक्ति हो!

अधीर०—अहो, चूप; ते पहा वीरमणी येताहेत. ती शृंगारसुंदरी पहा कशी त्यांना चिकटली आहे ती. जगांतील सर्व वीर्याचें सार, या विजयभवन देशाच्या वैभवाचे आधारस्तंभ, सर्व सामंतराजांच्या मस्तकांवर ज्यांनीं आपला पाय ठेवला, असे हे आमचे वीरमणी महाराज, अनेकांनीं उपभोगली असूनही जिचा मकरंद जसाचा तसा भरलेला आहे, अशा या मदनमंजरीचे दासानुदास बनले आहेत! पहा आपल्याच डोळ्यांनीं.

[ दोघेही एका बाजूलाहोतात.

वीरमणी, शृंगारसुंदरी, चाकरमाणसें ( बाग घालीत आहेत. ) अशीं येतात.

शृंगार०—खरेंच का आपलें प्रेम माझ्यावर आहे? अगबाई, तर मग मला सांगायचें व्हावें, कीं असें तें प्रेम आहे तरी किती?

वीरमणी—अग वेडे, ज्या प्रेमाची गणना करतां येते, तें प्रेम क्षुद्रच. खरें प्रेम ह्मणजे अमर्याद, अगणित, अमूप असावयाचें.

शृंगार०—छे बाई, मला नाहीं हा अमर्यादपणा आवडत. अंदाजाबाहेरच्या गोष्टीचा काय नेम सांगावा?

वीर०—तुला अंदाजच करायचा असला, तर सांगतों कीं माझें प्रेम इतकें आहे कीं

तें सांठविण्यासाठीं असलेली सृष्टि कांहीं पुरणार नाहीं. नवा स्वर्ग आणि नवी पृथ्वीच बनविलीं पाहिजेत.

गुलाब येतो.

**गुलाब**—म्हाराज, भाईर येक जासूद आलाय. इजयगिरीस्न आलोया म्हंगतो.

**वीर०**—बस्स बस्स. कोण त्रास हा! त्याचें काय म्हणणें आहे तें थोडक्यांत सांग.

**शृंगार०**—असें काय करायचें तें? त्याचें काय म्हणणें तें सगळें नीटपणें ऐकून कां नाहीं घ्यायचें? आपल्या लाडक्या पत्नी आपल्यावर रुसल्या फुगल्या असतील; नाहीं तर तो मेला पोरटा जयेंद्रपाल, त्यानें रागारागानें आपल्यावर ताशेरा झाडून आज्ञापत्र खरडलें असेल: "हें असें करा; तें काम आटपा; तीं राज्यें जिंका; तें राज्य ज्याचें त्याला परत द्या; हें असें झालेंच पाहिजे, नाहीं तर पहा आपला विचार; माझ्याशीं गांठ आहे."

**वीर०**—हें काय हें, प्रिये!

**शृंगार०**—कदाचित्—छे कदाचित् कसचें? —खात्रीनेंच, आपल्याला आतां येथून देखतहुकूम निघालेंच पाहिजे अशी जयेंद्रपालाकडून सक्तीची ताकीद आली असेल; म्हणून म्हणतें ऐकावें त्या जासुदाचें म्हणणें.—कोठें आहेरे तो बाईसाहेबांचा हुकूम, तसें नव्हे, जयेंद्रपालांचा हुकूम? पण दोघांचाही नसेल कशावरून?—अगबाई, पण आपण कां असें आपलें तोंड गोरेंमोरें केलें? मी खचित् सांगतें आपण त्या जयेंद्रपालाचे बंदे गुलाम आहां म्हणूनच आपण लाजेनें ही मान खालीं घातली आहे;—नाहीं तर बाईसाहेब आपल्या कर्कश आवाजानें आपल्यावर यथेच्छ तोंडसुख घेत असतां आपण त्यांच्यापुढें असेच चोरासारखे उभे राहत असाल त्याची आपल्याला एकदम आठवण झाली असेल. मला तो तिकडचा निरोप ऐकलाच पाहिजे. कोठें आहेरे तो जासूद? आणा त्याला. आहाहा! काय पण हिरमुसलें तोंड शोभतें आहे हें? इतका का बाईसाहेबांचा दरारा आहे?—अरे अजून नाहीं आला तो जासूद!

**वीर०**—अरेरे, कोण ही कटकट! ती भोगावती नदी आपल्या पुरानें त्या विजयगिरीला गिळून टाको आणि त्या अवाढव्य राज्याची इमारतही एकदम जमीनदोस्त होवो! मला तीं घेऊन काय करायचें आहे! माझें सारें राज्य, माझें जग या येथें आहे. राज्यें मातीमोलाचीं; माणसें आणि जनावरें दोघांचेंही जीवन एकच,—दोघेंही उकीरडा फुंकणारीं. आयुष्यांतलें खरें ऐश्वर्य ह्यांतच आहे; ( तिला आलिंगन देऊन )—तुझा माझा केवळ अप्रतिम जोडा. या अशा जोड्यानें असाच सुखोपभोग घेत राहावें. या मौजेंत आमची बरोबरी करणारा कोणी आहे असें सांगण्याची या जगांत कोणाची प्राज्ञा नाहीं.

**शृंगार०**—अललल्! जसें कांहीं कोणी म्हणेल खरेंच! शर्थ झाली बाई थापा देण्याची!—असें जर आहे, तर मालतीबाईशीं त्या वीरमणींनीं लग्न लावून मग

त्यांच्यावर प्रीति कां केली नाहीं ? त्यांच्याशीं एकांतांत असतां हव्या त्या आणाशपथा घेऊन त्या मागून दृष्टीस नकोत असें ह्मणणारे वीरमणी कोणते ?—जाऊं दे कीं ! शृंगारसुंदरी, बायकांची जात भोळी. पुरुषांच्या थापांनीं भुलायचीच ! वीरमणी काय पुरुषच. त्यांचें भान त्यांच्या स्वाधीन—

**वीर०**—अग पण तें भान तूं त्याच्या स्वाधीन करशील तेव्हांना.—पण बस्स झाला हा पोकळ विनोद ! ही वेळ कोण ? आणि तूं करते आहेस काय ? याचा विचार कर. कामदेवाच्या आवडीच्या वेळीं असें भांडत बसणें ह्मणजे आपापल्या अंगांत संचार करणाऱ्या मदनाचा मोठा अपराध करणें होय: या बहारीच्या काळांत एक क्षणही व्यर्थ दवडतां कामा नये ! निरंतर रंग आणि मौज याशिवाय दुसरें कांहीं उपयोगी नाहीं;—आज रात्रीं काय मौज करायची ?

**शृंगार०**—तें कांहीं नाहीं. त्या जासुदाचें ह्मणणें ऐकून घ्यायचें होतें !

**वीर०**—छेः छेः. कोण हेकेखोरपणा हा ! पण या रत्नाच्या लावण्याची शोभा प्रत्येक गोष्टीनें अधिकच खुलते ! संताप, विनोद, शोक, सारांश प्रत्येक मनोवृत्ति तुझ्या ठिकाणीं मोहक अशीच दिसते; बस्स. मरूंदे तो जासूद. आह्मांला इतर जासुदांशीं काय करायचें आहे ? अग हा वीरमणी आहेना तुझा जासूद ! याच्यापासून घे हवी ती नौकरी. आज रात्रीं तूं आणि मी दोघेंच शहरांत फिरून निरनिराळे लोक काय काय करीत असतात तें पाहूं. काल रात्रीं तूंच नाहीं ह्मटलेंस असें करूं या ह्मणून ? मग आतां कां उशीर ? चल लाडके, त्याच तयारीला लागूं !—त्या जासुदाला ह्मणावें आज नाहीं आमची तब्येत लागत.

[ **वीरमणी, शृंगारसुंदरी,** चाकर जातात.

**अधीरसिंग** व **दौलतसिंग** पुढें येतात.

**अधीर०**—आला प्रत्यक्ष अनुभव ?

**दौलत०**—अरेरे, किती किमतीचा हा हिरा अगदीं कवडीमोल होऊन बसला आहे ! आपण कोणाच्या जासुदाची प्रतारणा करतों हें त्यांच्या कसें लक्षांत येत नाहीं ? त्या जयेंद्रपालाशीं गांठ आहे ह्मणावें !

**अधीर०**—अहो, त्यांना हें कळत नाहीं कीं काय ? पण त्यांचें मन शुद्धीवर कोठें आहे ! या अशा स्थितींत त्यांचे गुण असून नसून सारखेच. तुह्मी त्यांचे जुने दोस्त आहांत, त्यांच्या बचावासाठीं तुह्मीं हजारदां आपला प्राण रणांत धोक्यांत घातला आहे. तेव्हां पहा चार बोधाच्या गोष्टी सांगून.

**दौलत०**—हर हर ! काय ही स्थिति ! विजयगिरींत यांच्याबद्दल ज्या अफवा आहेत त्या सर्वस्वीं खऱ्या ठरल्या. वेळ आणीबाणीची; अट्टल चोराशीं गांठ; असल्या मोहक सटवीचा प्रेमपाश; आणि हे तर शुद्ध भोळे सांब ! देवा, तूं यावेळीं साहाय्य केलेंस तरच निभाव ला-

गेल. पाहतों यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करून; चला आतां.

[ जातात.

**प्रवेश २ रा**—शृंगारसुंदरीचा महाल.

**मोहना, मदीरा, गुलाब** प्रवेश करतात.

**मोहना**—अहो महाराज गुलाबराव, अहो गोड गुलाबसिंग, अहो लाडके गुलाबजी, अहो अप्रतिम मदनमूर्ति गुणिराज ! कोठें आहेत ते तुमचे सामुद्रिकबोवा ? राणीसाहेबांपाशीं ज्यांची आपण एवढी बढाई सांगितली ते ? त्यांच्या बायकोनें कांहीं जरी केलें, तरी त्यांत ते आपल्याला भूषण आणि समाधानच मानतात, अशा त्या नवरोबांची मुखचर्या केव्हां पाहीन असें मला झालें आहे.

**गुलाब**—पुरे, पुरे. लई चावणटपणा करतियास ? उं ! अव सामुंदिर्कबावा, हकड या की.

**सामुद्रिकबोवा** येतात.

**सा० बो०**—काय अभीष्ट आहे आपलें ?

**मोहना**—हीच का ती स्वारी ?—महाराज, आपण हात पाहून कांहीं सांगतां ह्मणे ?

**सा० बो०**—होय, या जगांतील अत्यंत गूढ आणि अज्ञेय वस्तूंचें अस्मादिकांस गुरुप्रसादानें थोडेंबहुत ज्ञान होतें.

**मदीरा**—अग मोहने, तूं दाखीव बघूं आपला हात त्यांना.

**अधीरसिंग** येतो.

**अधीर०**—गुलाबजी, सरकारचा असा हुकूम आहे, कीं आज रात्रीं ताटाचा बेत लवकरच ठेवा. आणखी ऐकलेंत का, बिनगोळ्याच्या दारूची जय्यत सामुग्री ठेवा. कारण खासा पंक्तीपैकीं एकही इसम शुद्धीवर राहूं नये अशी सरकारची सक्त ताकीद आहे. [ जाऊं लागतो.

**मदीरा**—चाललां कोठें ? जरा बसाल तर खरें.

[ त्याला आडवते.

**अधीर०**—अग जाऊं दे मला. पुनः महाराजांकडे जायचें आहे.

**मदीरा**—आहे ठाऊक ! तुमचा हात दाखवा या सामुद्रिकबोवांना. ह्मणजे आपण आणखी किती बायकांचे गळे कापणार आहां तें समजेल.

**अधीर०**—अग, पण अगोदर माझ्या गळ्याला एकीनें पाश घातला आहे, त्यांतून मी सुटेन कीं नाहीं हें मला ह्यांना विचारायचें आहे समजलीस. बरें, आतां जाऊं दे.

[ तिच्या हनवटीला हात लावून जातो.

**मोहना**—हें पहा शास्त्रीबोवा, मला किनई कांहीं गोडसेंच सांगा बरें.

**सा० बो०**—तें माझ्या हातीं थोडेंच आहे. तुमच्या हातीं असेल तसें सांगेन.

**मोहना**—माझ्या हातीं नसलें आणि तुमच्या हातीं नसलें तरी तुमच्या कपाळीं तरी असेल कीं नाहीं ?

**सा० बो०**—जों जों आपलें वय वाढत जाईल, तों तों आपला रंग खुलेल.

**मोहना**—ह्मणजे हा चेहरा अधिक माशुक होणार, असेंचना ? ऐक मदीरे. ह्मटलें अस्सें नशीब असावें.

**मदीरा**—अग तसें नव्हे. आपला आंतला रंग खुलेल. दिवसानुदिवस अधिकच मौज मारायची आपल्याला इच्छा होईल. बाहेरचा रंग खुलण्याचें का तुझें वय आहे ? अग हो, पण त्या गालांवरच्या

सुरकुत्या लपविण्याकरितां रंग लावून चेहरा खुलविलास तर कोण जाणे !

**मोहना**—बरें, बरें. आपलें वय आहे हो आतां मौज मारायचें. बोलूं का आतां ? तो अधीरसिंग आला होता तेव्हां-अबब रागावायला नको कांहीं इतकें ! मी नाहीं बोलत हो !—पण खरेंच सांगतें, या चेहऱ्याला जर सुरकत्या पडल्या तर मी रंग लावीत नाहीं बसायची. मी जाऊन आपला जीव देईन कशी एकदम !

**गुलाब**—वाइच त्वांड आवरूनशान धरा की. वटवट वटवट किती करता.

**सा० बो०**—आपण लोकांच्या नादीं लागाल; पण कोणीही पुरुष आपल्या प्रेमपाशांत अडकणार नाहीं.

**मोहना**—त्यापेक्षां दारू पी-पिऊन प्राण गेलेला काय वाईट !

**गुलाब**—अग, ऐक ह्मनतुना !

**मोहना**—हें पहा, इतका वेळ सांगितलेंत यांत कांहीं अर्थ नाहीं. याहून गोडसें भाकीत सांगा. एका दिवसांत तिघां राजांशीं माझीं लग्नें लागावींत. एकाशीं लग्न लागलें कीं तो मेला असें व्हावें. ह्मणजे मी तिप्पट राणी होईन. पन्नासाव्या वर्षी मला मुलगा व्हावा आणि त्याचें दास्य मोठमोठ्या राजांनीं करावें. नाहीं तर जयेंद्रपालाशींच माझें लग्न लागून मीं आमच्या राणीसाहेबांच्या बरोबरीच्या मानाची व्हावें,—असें का भाकीत सांगाना.

**सा० बो०**—राणीसाहेबांपेक्षां आपलें आयुष्य अधिक आहे.

**मोहना**—वा:; फारच उत्तम ! उदंड आयुक्ष ह्मणजे कडू कारल्यासारखेंच गोड !

**सा० बो०**—गेले हे दिवस चांगले. पुढचे कांहीं तसे जाणार नाहींत.

**मोहना**—समजलें. येऊन जाऊन निबापी कारट्यांची भर होणार झालें. बरें मला मुलें किती होतील सांगा पाहूं.

**सा० बो०**—इच्छेगणीक गर्भ असें जर धरिलें, तर लाखों होतील.

**मोहना**—चल मेल्या, चावट कोठचा ! जोशीपणाचा मोठा आव आणला आहे !

**गुलाब**—अररर्रा ! केवढा राग हा ! जस काय कोन ह्मनल पतिवरताच. अग, किती बी कांबरून घेतलं म्हून का पाप कळायच ऱ्हात व्हय ?

**मोहना**—बरें आहे, आतां या मदीरेचा हात बघा पाहूं. त्या हातावरच्या रेषाच नकोत कांहीं पाहायला. किती लुसलुशीत ऊबदार हात आहे हा ! अग समजलीस का ही ऊब कसली ती ?

**मदीरा**—अग कसली काय ? पातिव्रत्याची. चल, गप्प बस तूं. सामुद्रिकबोवा, पहा हो माझा हात.

**सा० बो०**—मी नाहीं आतां पहात.

[ जातो.

**मोहना**—अग त्यांनींच कशाला हात पाहायला पाहिजे. मीच पाहतें. ही पाहिलीस का या ठिकाणीं नवऱ्याची रेषा आहे ही. अग पण येथें किती तरी फाटे आहेत हे !

**मदीरा**—बरें, बरें. आहे ठाऊक आपली अक्कल ! अग, आपल्या नवऱ्याच्या

नाकाला चुना लावून लावून तुझा तो हात पांढरा झाला आहे, तसा तर माझा नाहीं.

**गुलाब**—कितीग चुरुचुरु चुरुचुरु बोलतां? सामुंदिर्कबावांचं डोकस फिरून ग्येल असल या तुमच्या गोंगाटानं.

**मदीरा**—अग मोहने, याचा हात दाखवूं त्या सामुद्रिकबोवाला.

**मोहना**—अग त्याचा हात नको कांहीं दाखवायला. त्याच्या तोंडावरच त्याचें नशीब दिसतें आहे. अग याच्या कीं नाहीं एकामागून एक अशा कांहीं नाहीं तरी पंचवीस बायका होतील; पण त्यांतील एकीपासून देखील या नकट्याला सुख ह्मणून कांहीं मिळायचें नाहीं. हा मेला भागूबाई, नांवाचा यजमान. ती प्रत्येक याच्या नाकाला असा कांहीं चुना फाशील कीं याचें तें नकटें नाक अगदीं बुजून जाईल. जय आई कालिमाते, या तुझ्या मुलीला आणखी मोठीशी कृपेची देणगी दिली नाहींस तरी येवढें करच.

**मदीरा**—खरेंच कालिमाते, मीही तुला हात जोडतें. करच असें. सुंदर पुरुषाची वायको छिनाल असली ह्मणजे जसें वाईट वाटतें, तसें याला जर साध्वी बायको मिळाली तर सारें जग हळहळेल. ह्मणून ह्मणतें, जगदंबे, करच याचें नाक खालीं. मेला भारी तें आपलें नकटें नाक उडवीत असतो.

**गुलाब**—अग तुमी ह्मनतां तस जर तुमांला होवं असलं तर त्यें अक्षी सल्प हाय. जगदंबेपाशी कशापायीं मागण मागतां? तुमीच माझ्याशीं लगीन लावा ह्मंजी बनलोच मी छिनाल बायकांचा नवरा.

**मदीरा** / **मोहना**—चल मेल्या, हलकट कोठचा? तूं का आमचा नवरा होणार? अहाहा! अग, पाहिलेस का हे आपले यजमान.

[ त्याला बिलगतात

**गुलाब**—अग सटव्यांनो, दूर व्हा. मला मारतां का काय?—आन् त्या बगा रानीसाब आल्या.

शृंगारसुंदरी येते.

**शृंगार०**—अग कोठें आहेत ग ते?

**मोहना**—इकडे नाहीं आले ते बाईसाहेब.

**शृंगार०**—आतां इतक्यांत किनई महालांत पत्रें वाचीत होते. माझ्याशीं गोड गोड बोलत होते. इतक्यांत त्या पत्रांत काय होतें कोण जाणें! त्यांची चर्या पालटली. चेहऱ्यांतला आनंद अगदीं नाहींसा झाला. आणि आपले एकदम उठून चालते झाले. गुलाब, जा तूं अगोदर त्यांना शोधून काढ. ताबडतोब मला येऊन सांगितलें नाहींस तर पहा मेल्या, तुला कुत्र्यांकडून भररस्त्यांत फाडवीन.

**गुलाब**—जी बाईसाब. ह्यो आलोच बगा.

[ जातो.

**शृंगार०**—चलाग माझ्याबरोबर. मला किनई अगदीं चैन पडत नाहीं.

[ जातात.

---

**प्रवेश ३ रा.**—त्याच वाड्यांतील एक महाल.

**वीरमणी** आणि **दौलतसिंग** येतात.

**वीर०**—अरे, असें होईल तरी कसें?

रूपानें, गुणानें आणि कुळानें चढ आहेत.

**विजया**–अन्न पण गरीबी आहेना ?

**पद्या**–बरें मग असली ह्मणून काय झालें ! नुसत्या श्रीमंतीला घेऊन काय चाटा-यचें आहे !

**विजया**–पण बाबांना कोठें तसें वाटतें आहे !

**पद्या**–ताईसाहेब, तुह्मी कांहीं काळजी करूं नका. मी सारें जुळवून आणतों. माझ्या हातीं एक अशी गुरुकिल्ली सांपडली आहे कीं तिनें बाबासाहेबांच्या मनांतलें कसलेंही कुलूप मी उघडीन आणि बाईसाहेबांचेंही तोंड बंद करण्याला मीं एक युक्ति योजून ठेविली आहे. बाबासाहेब इतक्यांत तिकडे जातील किंवा गेले असतील. तुम्हांला गम्मत पहायची असेल तर तिकडेच जा. मला कांहीं काम आहे. [ त्या जातात. आतां आमच्या नाईकसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें तांबड्या फडक्याची इशारत द्यावी. हीं दोन बुद्रुकें जमलीं आहेत, तेव्हां आतां ही भानगड कांहीं तरी निकालाला लागेल. [ जातो.

---

## प्रवेश ४.–सज्जाची माडी.

**यादवराव, फरजंदोजीराव** आणि **पिऱ्या** येतात.

**यादव**०–हा काय मूर्खपणा तूं आरंभला होतास ? आणि पिऱ्या, गध्द्या, हरामखोरा, धन्याचे कपडे चोरायला तुला लाज वाटली नाहीं ?

**पिऱ्या**–मी काय करूं जी? धनीसाब, आन् त्ये संताजीराव माझ्या सारख मागं लागल की पिऱ्या तूं धनी आन् फरजंदोजीराव तुझ हुजर. कायबी सांगितलं तरी ऐकनात. हट्टच घ्येतला त्येनीं. तवा मी ह्ये कपड चढावल. पण त्येसनीच इचारा. धन्याच काम पन् अस्सं केलंया. अक्षी त्येंच्यावर तान. येक मातुर व्हायलं. धनीसाब ह्मंगाल पिऱ्या माझ्यावानी तूंबी मासनी येक लाथ मार. पन् मी तसं कसं करूं जी ? त्येवढं मातुर म्या न्हाई कबूल केलं.

**फरजं**०–बाबा, मी सारं तुह्माला सांगतों. मला माफ करा. [त्याच्या कानाशीं लागतो; व दोघांचें बोलणें होतें.

**पिऱ्या**–( आपल्याशीं ) आतां थोरल धनीसाब आल्याती तवा पिऱ्याचा मातक्यान पिऱ्या झाला. दोन दिस कस सुखांत ग्येल. ह्यो ह्मातारा आणखी चार दिस आला नसता तर ? माझ त्या पोरीशीं लगीन झाल असत आन् मंग असल धा थेरड आल असत तरी फिकीर न्हवती. पन् हीं ह्मातारीं मानसं अश्शींच दोड. ज्यांत त्यांत पाय घालाया व्होवा.

**यादव**०–बरें बरें, जा, तिला घेऊन ये, माझ्या मर्जीला येईल त्याप्रमाणें मी करीन. [ **फरजंदोजी** जातो.

**पिऱ्या**–धनीसाब, माझा येक अरज हाय. संताजीरावांनीं मला ह्ये कपडे घालाया लावले, मला फरजंदोजीराव हो ह्मंगाले आपली पोरगीबी मला त्येनी देऊं केली होती नव्ह का ? आतां त्ये मागं घेत्याल तर आपुन त्येना तसं मागं घेऊं देऊं नका. आपुन मनावर घेतलं

तर तसं व्हईल. माझं गरिबाचं कल्यान व्हईल. दो हाताचे चार हात व्हतील. आन् बगा मी आन् ती आन् आमची पोरंबी आपली चाकरी करतील.

**यादव**०–काय म्हणतोस ? संताजीरावांच्या मुलीशीं तूं लग्न लावणार ! हाः हाः हाः हरामखोर. फाजील झाला आहे नाहीं तर–पण हाः हाः हाः ! माझ्या पोराचा संताजीरावानें उपमर्द केला त्याबद्दल त्याला हीच शिक्षा योग्य ! फार उत्तम ! पण हे पहा तेच आले इकडे.

संताजीराव सुंदराबाई, व लक्ष्मी फराळाचें वगैरे सामान घेऊन येतात.

( ओरडून ) संताजीराव, जुन्या दोस्ताचा तुम्हीं चांगला मान राखतां ! हाच का तुमचा पाहुणचार ! मला येऊन किती वेळ झाला ! हीच ना सभ्यपणाची रीत ? आणि तुमची आमची सोयरीक होणार ती अशाच का थाटानें ?

**संताजी**०–(ओरडून) हो मीं ऐकलें आणि इकडे येतच होतों. तुमचें आणि चिरंजिवांचें बोलणें चाललें होतें म्हणून ऐकलें तेव्हां थांबलों. नाहीं तर ताबडतोब यायला मी का चुकायचा. तें ऊन पाणी आणलें आहे. पाय धुवा.

**यादव**०–( आपल्याशीं ) बहिऱ्याला मोठ्यानें बोलायची संवय असते ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. ( उघड, ओरडून ) हें असें होऊन किती दिवस झाले ?

**संताजी**०–(ओरडून)कालच त्यांच्या सोंगाची खरी हकीकत मला कळली.

**यादव**०–( ओरडून ) त्याबद्दल नाहीं मीं आपल्याला विचारलें. आपण बहिरे होऊन किती दिवस झाले ?

**संताजी**०–( ओरडून ) हो, हो. तेंच मी आपल्याला विचारणार होतों. फार वाईट गोष्ट झाली.

**यादव**०–( ओरडून ) म्हातारपणीं व्हायचेंच हें. त्याला कांहीं इलाज नाहीं. पण म्हातारपणीं लग्न करणें मात्र शहाणपणाचें नाहीं.

**संताजी**०–( ओरडून ) काय ह्मणतां ? आपण लग्न करणार आहां !

**यादव**०–( ओरडून ) मी नव्हे; तुम्हीं.

**संताजी**०–( ओरडून ) मी लग्न करणार ! वाः ! आपली अक्कल फारच वहायला लागली. बाकी मला लग्न करायला काय हरकत आहे ? मी कांहीं म्हातारा नाहीं. माझे कान अजून शाबूद आहेत. पाहिजे तर हळू बोलून पहा. माझ्याच्यानें मात्र आतां मोठ्यानें ओरडवत नाहीं. घसा दुखूं लागला.

**यादव**०–आणि माझा नाहीं वाटतें दुखूं लागला. तुह्मीं बहिरे झालां हें मीं ऐकलें ह्मणून मोठ्यानें बोललों. पण तुम्हांला कोणी सांगितलें माझे कान फुटले ह्मणून ?

**संताजी**०–तुमच्या नोकरानें–पद्यानें.

**यादव**०–माझा नोकर ! तुह्मांला खूळ तर नाहीं लागलें ?

**संताजी**०–अहो, तुमच्या मुलाबरोबर नाहीं का आला तो ?

**यादव०**—माझ्या मुलाबरोबर आला तो हा पिऱ्या.

**संताजी०**—हा पिऱ्या! तुह्मीं माझी चेष्टा करतां! हे तर फरजंदोजीराव आपले चिरंजीव!

**यादव०**—खरोखरच मला वाटतें तुमचें डोकें फिरलें आहे. अहो, हा पिऱ्या आणि हा पहा माझा मुलगा फरजंदोजी येतो आहे.

फरजंदोजी आणि कृष्णी पुढें येतात.

कुंवरजी, आंबाजीराव, संग्या आणि पद्या हळूच दाराच्या बाजूला उभे राहतात.

**फरजं०**—( कृष्णीला ) लाडके, ते पहा बाबा. जा त्यांचे पाय धर.

**कृष्णी**—( त्याला ) पण जवळ असायचें होतें.

**फरजं०**—अग, मी आतां तुला कोठें सोडतों. मी नेहमींच तुझ्याजवळ आहें.

[ कृष्णी यादवरावांच्या पायांवर डोकें ठेवते. तो तिला उचलून वर घेतो, व नीट न्याहाळून पाहतो.

**यादव०**—मुली, तूं संताजीरावांची कोण?

**कृष्णी**—त्यांचें माझें कांहीं नातें नाहीं.

**यादव०**—तर मग तूं माझ्या या फरजंदाशीं खुशाल लग्न लाव. त्यांच्याशीं याउप्पर मला सोयरीक कर्तव्य नाहीं. ते खुळे झाले आहेत.

**संताजी०**—यादवराव, तुह्मी माझे जुने दोस्त. पण असे शब्द तुह्मीं उच्चारले तर ते मी सहन करणार नाहीं.

**यादव०**—नका करूं पाहिजे तर. मला कांहीं त्याचें वाटत नाहीं.

**संताजी०**—असें काय? ठीक आहे, तुह्मांला माझी मुलगी कर्तव्य नाहींना? लग्नाचा करार तुम्हीं मोडणार ना?

**यादव०**—मी नाहीं लग्नाचा करार मोडीत. त्या हुजऱ्याला माझ्या मुलाचें सोंग देऊन तुम्हींच नव्हतां का आपल्या मुलीशीं त्याचें लग्न लावणार? खुशाल लावा. माझी त्याला संमति आहे. माझ्या सुनेला नाहीं तरी नवी कुळंबीण पाहिजेच होती.

**सुंदरा०**—अगबाई! कोण तरी हा उर्मटपणा! ( संताजीला ) आपण असा माझा गळा कापणार होताना?

**संताजी०**—अग, तूंच नाहीं का मला तोच खरा फरजंदोजी ह्मणून सांगितलेंस?

**यादव०**—आणि या बाईची मुलगी आपलीच ह्मणून माझ्या पोराच्या गळ्यांत बांधणार होताना? कोण कोठली वेसवा आहे कोण जाणे! आपल्याला ह्मातारचळ लागला असें ह्मणायला कांहीं हरकत आहे का?

**सुंदरा०**—( संताजीला ) कां देत नाहीं उत्तर? मीच आपली झाल्यानंतर मुलगी आपली नाहीं का होत? यांचा उर्मटपणा मी नाहीं बाई सोसणार.

**यादव०**—अबबब! केवढा फणकारा हा! हें का आपलें कुटुंब होणार होतें? यंवरे नवरी! हाः हाः हाः! फारच नाजुक.

**सुंदरा०**—( संताजीला ) हें आपल्याला ऐकवतेंना? चल ग पोरी. येथें आपली रहायची आतां सोय नाहीं. अगबाई! मला यांनीं सर्वस्वीं तोंडघशीं पाडलें. गोड

गोड बोलून लळा लावला. आजपर्यंत मेलीं कोण माझीं आर्जवें चालत होतीं. पण आतां लोक मला नाहीं नाहीं तें बोलताहेत आणि इकडे पहा कसें निमूटपणें ऐकून घेणें होत आहे तें. ( संताजीरावाच्या तोंडापुढें हात नेऊन ) कांहीं लाज वाटते का आपल्याला? जिच्यावांचून एक क्षण आपल्याला करमत नसे, कोपऱ्यांत गाठून जिचा आपण चावटपणा करीत होतां, प्रत्यक्ष चाकरमाणसांदेखतही जिची थट्टा करायला आपण भ्यायला नाहीं तीचना ही आपली सुंदरी, आपली लाडकी? आतां का दांतखिळी बसली? बोला आतां मी काय करूं तें?

**संताजी०**—( आपल्याशीं ) देवा, केवढा मी मूर्ख बनलों होतों! या जखिणीलाच का मी भाळलों होतों! त्या वेळेला कशी सौम्य दिसत होती आणि आतां पहा. खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे.

**सुंदरा०**-झाला का आपला विचार? मला कायतो सोक्ष का मोक्ष एकदाचा कळूं द्या.

**संताजी०**—मला कांहीं सुचत नाहीं. मी काय तुला सांगूं? तुला योग्य वाटेल तसें तूं कर.

**सुंदरा०**—वाः बोलायलाही कांहीं वाटत नाहीं. 'मला कांहीं सुचत नाहीं.' 'तुला योग्य वाटेल तसें कर.'—असें जर होतें, तर मग अगोदर कशाला तो येवढा थाट दाखविलांत? कोण ती प्रेमाची उसळी! तरी मला वाटे कीं या असल्या वयांत इतका मदन जोरदार कोठला. तें सारें ढोंग नाहीं तर काय? पण अगोदर सांगा या पोरीची वाट काय करणार ती?

**संताजी०**—मीं झक् मारली, शेण खाल्लें, झालें. आतां गप्प रहा.

**सुंदरा०**—मी बरी आतां गप्प राहीन. माझा सफई नाश केलांत तुम्हीं. माझ्या तोंडाला काळोखी लावलीत.

**लक्ष्मी**—आई, मी किंनई आतां येथें बिलकुल रहायची नाहीं. माझें जर लग्न झालें नाहीं तर मी कोणाचा तरी हात धरून उठून जाईन. तो पिऱ्या का होईना. तो कांहीं वाईट नाहीं. बरा गमत्या गडी आहे.

**पिऱ्या**—नगग बया. तुला व्होवत दागदागिन. त्ये कोना ल्येकान घालाव. संताजीराव तुझ बा, म्हंजी तुझ्या आईच नवर, झाल असत तर न्यारं व्हतं.

**सुंदरा०**—कोणाचीरे पोरगी? ती मला आई म्हणते म्हणून तेवढ्यावर मला तिची आई समजतोस वाटतें. ( संताजीरावाकडे पाहून ) आपल्याला हें खपतेंचना? पण मी विचारतें काय वेड्यासारखी. आपण सारे सारखे. येथें आतां माझें ऐकतो कोण? ही माझी मुलगी म्हणतील. माझा एक नवरा जिवंत आहे असें देखील म्हणतील. न्याय करणारा येथें कोणी आहे का?

**पद्या**—( पुढें येऊन ) जी बाईसाहेब. न्याय करायला आणूं का एक इसम.

**सुंदरा०**–कोण आणणार रे मेल्या! चोंबडा, पाजी, खोटा नाहीं तर!

**पद्या**–( संग्याला पुढें घेऊन येतो. ) ही पाहिलीत का बाईसाहेब न्यायाधिशांची स्वारी! नीट डोळे भरून पहा.

**सुंदरा०**–( संग्याकडे बराच वेळ पाहून ) अरे देवा! तेच कीं हे!

[ असें ह्मणून एकदम किंचाळी फोडते व बेशुद्ध होऊन खालीं पडूं लागते. संग्या तिला सांवरून धरितो

**यादव०**–अरे हें काय आणखी लचांड आहे! ( पद्याकडे पाहून ) अरे पण तूंचनारे मला सांगितलेंस संताजीराव बहिरे झाले आहेत ह्मणून? [ त्याचा कान धरतो.

**संताजी०**–( त्याचा दुसरा कान धरून ) आणि यादवराव बहिरे झाले आहेत ह्मणून तूंच मला सांगितलेंस नव्हे?

**पद्या**–ओय् ओय् ओय् ओय्! मेलों बाबासाहेब, रावसाहेब. सोडा मला. छे छे, कान दुखूं लागला.

[ कुंवरजी संग्याला खूण करतो. तो सुंदराबाईला व लक्ष्मीला घेऊन बाहेर जातो.

**संताजी०**–( त्याचा कान सोडून ) अगोदर सांग अशी लबाडी कां केलीस ती.

**पद्या**–सारें सांगतों, पण मारणार नाहीं किंवा शिक्षा करणार नाहीं म्हणून वचन द्या.

**संताजी०**–दिलें वचन, बोल.

**पद्या**–( जरा दूर होऊन ) आपले पाहुणे रागीट आहेत ह्मणून ऐकलें होतें, तेव्हां ह्मटलें जरा गम्मत करून पाहूं. पण तसें कांहीं गमतीचें कांहीं झालें का?

**यादव०**–अरे चोरा, मघाशीं तुह्मीं माझ्या पद्या नांवाच्या गड्यानें तुम्हांला मी बहिरा झाल्याचें सांगितलें ह्मणून ह्मटलेंत तोच का हा पद्या?

**संताजी०**–होय तोच. तुमचे चिरंजीवांबरोबरच हा या वाड्यांत शिरला आणि माझ्या सुंदरीला–( जीभ चावतो. )

**यादव०**–अजून आहेच कां तें वेड! पण हो, त्या बाईचें काय झालें? ती येथें कोठें दिसत नाहीं.

**कुंवर०**–( पुढें येऊन ) बाबासाहेब, रावसाहेब. त्या दोघी मायलेकी व तो बोवा बाहेरच्या खोलींत आहेत.

**संताजी०**–ह्मणजे?

**कुंवर०**–म्हणजे इतकेंच कीं, ज्याचें माणूस त्यानें नेलें. बाबासाहेब, त्या गोष्टीचा आपण बारीक तलास करूं नये हें बरें. मी बोलतो याची क्षमा असावी.

**यादव०**–( हंसून ) हे म्हणतात तें खरें आहे. हा विषय–समजलां का संताजीराव–मी ह्मणतों हा विषय आपण विसरावा, लवकर विसरावा हेंच रास्त.

**संताजी०**–यादवराव, बस्स आतां. मला आणखी हिणावूं नका पण ( कुंवरजीकडे पाहून ) तुम्ही कोण?

**कुंवर०**–(एकदम संताजीरावाचे पाय धरतो.)

**संताजी०**–अहो हें काय? उठा अगोदर.

**पद्या**–बाबासाहेब, मी सांगतों आपल्याला हें काय गूढ आहे तें. पण अगोदर यांचे सारे अपराध माफ असें म्हणा.

**संताजी०**–म्हणजे? येथें गूढावर गूढ वाढूं लागलें आहे. पण माझा डोळा कां लवूं लागला आहे.

**यादव०**—संताजीराव, सुचिन्ह आहे. होय म्हणा.

**संताजी०**—बरें तर माझें अभिवचन आहे.

**कुंवर०**—(उठून नम्रपणानें) बाबा, मी कुंवर.

**संताजी०**—कोण, कुंवर? ये बेटा, ये. तुला कडकडून भेटूं दे. [भेटतो.

**पद्मा**—बाबासाहेब, आज आनंदाचा दिवस आहे. गरीबाची आठवण असूं द्या. आपण वचन दिलें त्याची आपल्याला आठवण असेलच. चोरांचा बंडावा मोडण्याच्या कामीं मीं जर मदत केली तर आपण मला इनाम देण्याचें वचन दिलें आहे.

**संताजी०**—हो, दिलें होतें खरें. पण त्याचें आतां या वेळीं काय?

**पद्मा**—इतकेंच कीं चोरांचें बंड मोडलें. त्यांचे नाईक आपल्या हातांत आहेत.

**संताजी०**—(रागानें) आजपर्यंतच्या थापा पुऱ्या झाल्या नाहींत वाटतें.

**कुंवर०**—बाबा, ही आतांची थाप नाहीं. चोरांचा नाईक खरोखरच आपल्या हातांत आहे. मीच तो.

**संताजी०**—काय? तूं चोरांचा नाईक! भलतेंच. तूं देखील माझी थट्टा करतोस वाटतें.

**कुंवर०**—नाहीं बाबा. खरोखरी मी चोरांचा नाईक होतो. आपण मला घरांतून बाहेर घालविलें तेव्हां मी निराश झालों. मला साऱ्या जगाचा वीट आला. पुढें या चोरांची गांठ पडली, तेव्हां मनाच्या त्या तशा स्थितींत त्यांच्यांत जाऊन मिसळावें हें बरें वाटलें. खरोखरच आपण जर मला घरांतून घालवून दिलें नसतें तर हा मार्ग पतकरण्याची बुद्धि सुचली नसती. घरच्या अन्यायामुळेंच मी हा अन्यायाचा मार्ग पतकरला.

**संताजी०**—कुंवरजी, आतां नको त्याची आठवण करूं. मी त्या वेळीं मूर्ख बनलों होतों. त्या सटवीनें मला मोहिनी घातली होती. तिच्या एका नेत्रकटाक्षापुढें मला सारें जग तुच्छ वाटूं लागलें होतें. मी अगदीं निःसत्व ठरलों.

**पद्मा**—बाबासाहेब, खरोखरच तसें झालें होतें. मी एकदां आपण अगदीं बेताल झालां असें पाहून आपल्याला ईशारा देण्यासाठीं खाकरलों. आहे का त्याची आपल्याला आठवण?

**संताजी०**—तूं होतास का तेथें? पण तें आतां सारें विसर. माझ्या वचनाप्रमाणें मी सारें करीन.

**पद्मा**—(हंसून) त्याबद्दल मला बिलकूल संशय नाहीं.

**संताजी०**—अरे, पण ती माझी विजया कोठें आहे? त्या बिचारीची मीं अप्रतिष्ठा केली. तिची अगोदर मला क्षमा मागितली पाहिजे.

**विजया**—(पुढें होऊन) बाबा, माझी कशाला क्षमा मागतां? तुम्हीं प्रेमाची नुसती दृष्टि माझ्याकडे फिरविली, कीं बस्स आहे. मला दुसरें तिसरें कांहीं नको.

**संताजी०**—(तिला पोटाशीं धरून) बेटा, तूं आहेसच तशी सद्गुणी. पण, यादवराव, तुम्हीं हिला आपली सून नाहींना करीत?

**यादव०**—आतां माझा नाइलाज आहे. वास्तविक आमच्या चिरंजिवांनीं या कामीं आमच्याकडे कांहींच ठेविलें नाहीं.

**कुंवर०**—बाबा, ताईला मीं एक नवरा पाहिला आहे. चांगला शहाणा, शूर, गुणी आहे. (आंबाजीरावाला खूण करतो. तो पुढें येतो.) हे पहा आपले जांवईबुवा. कां ताई, तुला पसंत आहेका हा नवरा ? [आंबाजीराव संताजीरावांच्या पायां पडतो.

**विजया**—हें रे काय दादा तुझें ? बाबांना आणि तुला पसंत असल्यावर——

**संताजी०**—मुलीला पसंत दिसतात, तुलाही पसंत आहेत. मी आणखी तें काय पाहणार ? आतां संसाराचा मालक तूंच आणि माझ्या जागीं येथला अधिकारीही तूंच. आंबाजीराव, ही घ्या माझी कन्या. [विजयेचा हात आंबाजीरावाच्या हातांत देतो.

**पद्या**—दोन नवीं जोडपीं तर झालीं. आतां तिसरें पाहिजेच.

**कुंवर०**—तिसरें कोठून आणणार ?

**पद्या**—नाईक, आपण मनावर घेतलें तर सहज होईल. संगाप्पा अण्णांची मुलगी लक्ष्मी रिकामी आहे. बिचारी निराश झाली आहे. तिची मला दया येते. ह्मणून ह्मणतों—

**कुंवर०**—समजलों. तुझ्या मनांतून तिच्याशीं लग्न लावायचें आहे. ठीक आहे. जा, संग्याला आणि त्यांना घेऊन ये. [पद्या जातो.

**संताजी०**—असो. एकंदरींत शेवट गोड झाला ह्मणायचा.

**यादव०**—संताजीराव, झाल्या गोष्टीवरून तुह्मीं काय तो बोध घेतलाच असेल. आपलें मन आपल्या स्वाधीन नसेल त्यानें कनक आणि कामिनी यांच्या वाऱ्यालाही उभें राहूं नये हें बरें.

पद्या, संग्या, सुंदराबाई, लक्ष्मी येतात.

**सुंदरा०**—पदोजीराव, मी नाहीं पुढें येत. मला बाई लाज वाटते.

**पद्या**—सुंदराबाई, तुम्हीं आहांतच तशा पतिव्रता, हें कांहीं आतां पुराव्यानें सिद्ध करून दाखवायला नको. मी म्हणतों या प्रसंगाला आपली ही नेहमींची—नेहमींची बरें का!—लाज घटकाभर बाजूला ठेवा. कारण ही सारी घरचीच मंडळी आहे. येथें कोणी खाकरणार नाहीं. (एकीकडे तिला) संगाप्पा अण्णा कांहीं रागावायचे नाहींत. तेव्हां आतां हा नखरा पुरे करा. मी कांहीं त्यांना संताजीरावांच्या घरांतले प्रकार आणि ठरलेले बेत सांगायचा नाहीं. (मोठ्यानें) बाबासाहेब, हें पहा आलें आमचें प्रीतिपात्र. (लक्ष्मीला पुढें ढकलतो. ती त्याच्या हाताला विचकुरे घेते.) या पहा इतक्यांतच शृंगारचेष्टा झाल्या सुरू. अग हो पण, इतकी उतावळी होऊं नको.

**कुंवर०**—संगाप्पा, आहे का हा संबंध तुह्मांला कबूल ?

**संग्या**—नाईक, आपल्याबाहेर मी नाहीं.

**कुंवर०**—पण आपल्या कुटुंबाचें काय ह्मणणें आहे ?

**सुंदरा०**—माझें कसलें म्हणणें? इकडची मर्जी असेल तशी.

**संग्या**—( तिच्याकडे प्रेमानें पाहत ) शाबास!

**पद्या**—( आपल्याशीं ) अहारे आमचे भोळ संगाप्पा. बेट्याला अक्कल कवडीची नाहीं. ही बया त्याला आपल्या हाताच्या बोटावर पाहिजे तसा नाचवील. ( उघड ) संगाप्पा अण्णा, कुटुंबाची न आपली फार दिवसांत गाठ नव्हती तरी पण एका अर्ध्या घटकेंत आपला अम्मल पूर्ण बसविलांत आं! धन्य आहे बोवा तुमची! पण जपाहो, फार कडक अम्मल चालवाल तर आमच्या सुंदराकाकूंना तो सोसणार नाहीं. त्या आहेत भोळ्या. पुनः मागच्याप्रमाणें हातावर तुरी देऊन—

**कुंवर०**—पद्या, तोंड आटप.

**पद्या**—राहिलें नाईकसाहेब.

**कुंवर०**—ठरलें तर मग पद्या, ही घे लक्ष्मी. ( पद्याच्या हातांत लक्ष्मीचा हात देतो. ) पण ही नुसती कोरडी लक्ष्मी मी तुला देत नाहीं. दरींतील सर्व संपत्तीपैकीं संगाप्पा तुह्मी व पद्या मिळून निम्मा भाग वाटून घ्या व राहिलेला निम्मा भाग इतरांना वाटून द्या. तें आयुष्य संपून आतां नव्या आ युष्याला सुरुवात झाली. याउप्पर जर कोणी चोरी अगर लुटारूपण अगर कोणतीही बदमाषगिरी करूं लागेल तर त्याला हा कुंवरजी कडक शासन करील.

**पद्या**—नाईकसाहेब,—

**कुंवर०**—मी आतां तुमचा नाईक नाहीं. खबरदार, मुला पुनः त्या नांवानें हाक मारशील तर!

**पद्या**—बरें तर. सरकार ह्मणतो. माझा एक अर्ज. बदमाषगिरींत खोटें बोलणें येत नाहींना? तसें असेल तर सरकारांनीं माझें आतांच डोकें उडवावें. कारण दिवसांतून एक दोनदां खोटें बोलल्याशिवाय मला अन्न गोड लागायचें नाहीं. तसेंच पडलेली वस्तु उचलली तर चोरी नसावी कारण बिनवारशी माल पाहिला कीं माझे हात तो बेलाशक उचलतात. माझ्या परवानगीची जरूर ठेवीत नाहीं.

**कुंवर०**—तुझे हात खोड्यांत अडकवूं, आणि तोंडाला तोबरा देऊं.

**पद्या**—होय सरकार, पण मग या बिजलीला माझें तोंडसुख आणि हातसुख कसें मिळेल?

**कुंवर०**—बरें, पाहूं त्याचा विचार.

**पिऱ्या**—समध्यांची लगनं झालीं, हा पिऱ्या तेवढा कोरडा ऱ्हायला. तरी पन् चार दिस धनीसाबांचं वैभाव तर भोगलं. आन् ह्ये कपड तर मारलं! बास्. तेवढीच लाट.

**समाप्त.**

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें

# लटपटच्या पद्मा.

---तीन अंकी प्रहसन.---

एका इंग्रजी नाटकाच्या आधारानें

वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए.,

फर्ग्यूसन कालेजांतील इंग्रजी भाषाविषयाचे अध्यापक,

यांनीं रचिलें

तें

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत

हरी नारायण गोखले यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.)

सन १८९३.

# प्रहसनांतील पात्रें.

संताजीराव........................एक श्रीमान गृहस्थ.

यादवराव........................दुसरा एक श्रीमान गृहस्थ.

फरजंदोजीराव...................यादवरावाचा मुलगा.

कुंवरजी........................संताजीरावाचा मुलगा व चोरांचा नाईक.

संग्या, रुप्या वगैरे...............रामोशी.

पद्या...........................रामोशांपैकीं एक व्रात्य पोरगा.

आंबाजीराव......................एक तरुण गृहस्थ.

विजया..........................संताजीरावाची मुलगी.

कृष्णी..........................तिची मैत्रीण.

सुंदराबाई........................संग्याची पळून गेलेली बायको.

लक्ष्मी..........................सुंदराबाईची मुलगी.

पिऱ्या..........................फरजंदोजीरावाचा गडी.

इतर गडी वगैरे.

आहे तिकडे? माझा करडा सामान घालून तयारच आहेना? आणा तो पुढें "—महासेन ह्मणाला.

लागलीच कुमुदबंधूनें महासेनास विचारिलें, "शक्तिधररायास आपला कांहीं निरोप कळवायाचा आहे का?"

"कसला निरोप कळवायचा?" महासेन उद्विग्न अंतःकरणानें ह्मणतो "त्याना सांगा कीं आजच्या या निराशेबद्दल तुह्मांला जितकें वाईट वाटेल तितकेंच मला वाटत आहे. तथापि आपण फक्त शिपाई गडी आहोंत. जयद्रथरायांच्या विचारास जी गोष्ट आली तीच बरोबर असली पाहिजे. आपण त्यांच्या वचनावरच विसंबून असावें हें योग्य. हा पहा तुमच्याकरितां घोडा आला."

इतकें बोलणें होतें तों घोडा धेऊन एक मोतद्दार पुढें आला. घोड्याकडे नुसती दृष्टि फेंकतांच कुमुदबंधूची मुद्रा संतुष्ट दिसूं लागली. कुमुदबंधु घोड्याच्याजवळ जातो तों समोरून एक स्वार अत्यंत त्वरेनें घोडा उडवीत या पडक्या वाड्याकडे येत आहेसें सर्वांस दिसलें.

"जयद्रथरायांकडून हा दुसरा जासूद आलासें वाटतें." महासेन ह्मणतो.

लागलीच कुमुदबंधूनें आपलें शिरस्त्राण डोक्यावर घातलें आणि घोड्याच्या रिकिबींत पाय ठेवायला तो गेला.

"अहो, कृष्णराय, एक क्षणभर दम धरा आणि जयद्रथरायांकडून आणखी काय निरोप आला आहे तो ऐकून चला." महासेन ओरडून ह्मणाला.

"कोण? कृष्णराय!" तो नवीन आलेला जासूद आश्चर्यानें ह्मणतो. कुमुदबंधूनें जरी मोठी त्वरा करून आपलें शिरस्त्राण डोक्यावर चढविलें, तरी तेवढ्यांत या स्वारानें त्याचें तोंड पाहिलें होतें.

"काय ह्मणतां, सरकार! काल ज्याला आह्मीं कैद केलें तो महेश्वरकर कुमुदबंधु हा. हा बहुतकरून कूर्मदुर्गांतून पळून इकडे आला आहे. हा येवढ्यांत कृष्णराय झाला काय!" तो स्वार आश्चर्यानें ह्मणाला.

इतकें बोलणें होईपर्यंत कुमुदबंधु निजून राहिला नव्हता! त्यानें चटदिशीं घोड्यावर उडी मारिली व त्याला एकदम टांच दिली व लगामास एकदम हिसका मारिला. त्याबरोबर मोतद्दारास एका बाजूस झुगारून देऊन घोडा त्या पडक्या भिंताडावरून अचानक पलीकडे उडाला; आणि तेव्हांच रस्त्याला जाऊन मिळाला.

हें सर्व एका निमिषांत घडून आलें. महासेनरायानें तुतारी फुंकली आणि त्याच्या हाताखालचे अधिकारी "दगा, दगा," ह्मणून ओरडले. त्याबरोबर कोणी नुसतेच कुमुदबंधूच्या पाठीमागें पळूं लागले, कोणी घोड्यावर चढले व कितीएक घोड्यावर होते ते तसेच पाठलागास निघाले. मिळून चहूंकडे एकदम गडबड उडाली. पण उपयोग काय! कुमुदबंधूनें भिंतीवरून घोडा उडविल्यामुळें त्याला एकदम पुष्कळ अंतर पाडतां आलें. शिवाय घोडाही अत्यंत तापट आणि त्यांतून यानें त्याला अतिशय चिडविलेलें. तेव्हां तो आतां इतर साधारण स्वारांच्या कसचा हातीं लागतो! राणीच्या लोकांस

चुकविण्याकरितां वांकड्या व लांबच्या रस्त्यानें गेले पाहिजे ह्मणून महासेनानें जरी सांगितलें होतें तरी कुमुदबंधूस तसें करण्याची मुळींच जरूरी नव्हती. उलट त्याला राणीच्या स्वारींत लौकर जाऊन मार्गे असलेल्या संकटाबद्दल बातमी देणें आणि अत्यंत त्वरेनें पुढें चालण्याविषयीं त्यांस सुचविणें हेंच यावेळीं अवश्य होतें, ह्मणून तो सरळ रस्त्यानेंच घोडा उडवीत चालला.

थोड्याच वेळांत तो राजमंडळास येऊन मिळाला. जवळ येतांच त्यानें डोक्यावरील शिरस्त्राण काढून हातांत घेतलें. व **पृथ्वीराज, रणधीरराय, भीमसेनराय,** वगैरे सरदार मंडळीकडे उत्साहानें व आनंदानें पहात तो थेट **विनयादित्यशर्मा**कडे गेला. "तुह्मीं सांगितलेलें काम केलें व त्यापासून उपयोगही झाला" इतके शब्द **विनयादित्यमामा**शीं तो बोलतो तों राणीनें आपल्याकडे येण्याविषयीं त्याला खूण केली. जातां जातां त्यानें कमलेकडे दृष्टि वळवून आनंदानें पाहिलें. व तिनेंही उत्साहयुक्त मुद्रेनें त्याचें अभिनंदन केलें. राणीजवळ तो जाऊन पोंचतांच कुमुद्वतीनें हास्ययुक्त मुद्रेनें त्याजकडे पाहिलें. हें कुमुद्वतीचें स्मित हास्य कुमुद्वतीलाच साधलें होतें.

"सरदारसाहेब," ती कृतज्ञतायुक्त मुद्रेनें व आनंदभरित स्वरानें ह्मणाली, "तुह्मीं आमच्यावर उपकारांचे केवढे तरी डोंगर करून ठेवणार! आणि आह्मी हे—"

"महाराज," कुमुदबंधु राणीला सादर प्रणाम करून तिला पुरतें न बोलूं देतां घाईनें ह्मणतो, "मी महाराजांच्या बोलण्याला मध्येंच अडथळा करितों या औद्धत्याबद्दल क्षमा असावी, पण ही वेळ तशीच आहे. महाराज, आतां स्वारी जितक्या त्वरेनें पुढें जाईल तितकें बरें, सावकाशपणा केल्यास मागाहून नवीन संकट येण्याचा संभव आहे. मला तर अत्यंत त्वरेनें स्वारीच्याही पुढें गेलें पाहिजे. सरकारांनीं याबद्दल क्षमा करावी."

असें ह्मणून कुमुदबंधु राणीला परत उत्तर देण्याची किंवा कांहीं प्रश्न करण्याचीही सवड न देतां प्रणाम करून घोडा उडवीतच पुढें चालता झाला. सुमारें एक घटकेनें तो **श्येनदुर्गा**जवळच्या अरण्याशीं जाऊन ठेपला. त्याच्या उजव्या हातास नलिनीनें सांगितलेली जागा होती. रस्ता सोडून त्यानें आपला घोडा तिकडे वळविला. थोडासा झाडीच्या आंत जातो तों "कोण आहे" म्हणून कोणीं पुकारलें व लागलीच पांच सहा स्वार घोडे उडवीत त्याच्याकडेसच आले. त्यांपैकीं एक सर्वांच्या पुढें होता. हा वयानें सुमारें पन्नास वर्षांचा होता. शरीरानें बराच स्थूल असून मुद्रा भव्य होती. हाच सरदार **शक्तिधर** असावा असें कुमुदबंधूनें ताडिलें. आणि त्याचें अनुमान अगदीं खरें होतें. कोणी स्वार घोडा दवडीत आलेला पाहून हा बहुधा **जयद्रथराया**कडील जासूद असावा असें **शक्तिधरा**स वाटलें. ह्मणून तो 'काय बातमी आहे?' असें विचारण्यासाठीं हाताखालच्या मुख्य अधिकाऱ्यांसह पुढें आला होता.

असो, या ठिकाणीं कुमुदबंधूचें आणि

शक्तिधराचें काय काय भाषण झालें हें सांगत बसण्याचें कारण नाहीं. जयद्रथरायाची मुद्रिका पाहतांच या कृष्णरायनामधारी कुमुदबंधूच्या खरेपणाबद्दल शक्तिधराची खात्री झाली. त्यानें महासेनाइतकी पूसतपासही केली नाहीं. त्यांतून महासेनाच्या ज्या घोड्यावर बसून कुमुदबंधु गेला होता तोही शक्तिधरानें ओळखिला, व हेंही दुसरें प्रत्ययचिन्हच झालें. लागलीच शक्तिधरानें आपल्या सैन्यास परत श्येनदुर्गाकडे कूच करण्याचा हुकूम केला.

शक्तिधरानें या सरदार जासूदास श्येनदुर्गास आपल्याबरोबर येऊन तेथील पाहुणचार घेण्याविषयीं विनंति केली. पण ' जयद्रथरायांनीं सांगितलेलें दुसरें एक कर्तव्य बजावण्याकरितां मला जरूर गेलें पाहिजे ' असें सांगून कुमुदबधूनें शक्तिधरास प्रणाम केला व तो रस्त्याकडे वळला. शक्तिधरही ताबडतोब आपल्या सैन्यासह श्येनदुर्गाकडे चालता झाला. एका परदेशस्थानें आपल्यास अशा रीतीनें फसविलें असेल ही कल्पना देखील बापड्याच्या मनांत आली नाहीं. साधारणतः शिपाईगिरीचा गुण आणि दोष एकाच गोष्टींत असतो आणि ती गोष्ट विचारहीनत्व हीच होय.

कुमुद्बंधु घोड्याला अगदीं सावकाश चालवीत सरळ रस्त्यानें पुढें चालला. थोड्याच वेळानें राणीचीही स्वारी मागाहून आली. सुमारें दहा घटका दिवस आला नाहीं तोंच राणीसाहेब सर्व लव्याजम्यासह रोहिणीचे वडील जे ध्रुवराय त्यांच्या घरीं गिरिद्वाराहून बारा कोशांवर शैलावली नांवाच्या गांवीं सुखरूप जाऊन पोंचल्या.

" आपल्यावर आज काय संकटें आलीं होतीं, आणि आपलें स्वातंत्र्य आणि बरोबरच्या लोकांचे प्राण फक्त एका केसावर कसे लोंबून राहिले होते ह्याची नुसती कल्पना तरी राणीच्या मनांत आली असेल काय ! " ध्रुवरायाच्या वाड्यांतील आपल्या नेमणुकीस असलेल्या खोलींत जाऊन अंगावरील चिलखत वगैरे उतरीत असतां कुमुदबंधु मनांत ह्मणाला.

अंगावरील तें चिलखताचें ओझें उतरून ठेवल्यावर सकाळपासून झालेल्या श्रमांचा परिहार करण्याकरितां वाड्याला लागून असणाऱ्या उपवनांत बसून क्षणभर गार वाऱ्यांत वेळ काढावा ह्मणून कुमुदबंधु तिकडे गेला. उपवनांत कांहीं वेळ इकडे तिकडे हिंडून अगदीं एका बाजूच्या शांत भागाकडे क्षणभर स्वस्थ पडावें ह्मणून तो वळला. तेथें सृष्टिदासीनें सुंदर हिरव्यागार रंगाची बिछाईत त्याच्याकरितां घालून ठेविलीच होती. तेथें पडून विश्रांति घेत असतां त्याच्या मनांत किती तरी विचार येऊन गेले; पण त्यांपैकीं बहुतेकांचा संबंध प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें नलिनीशीं होतांच हें वाचकांना आम्हीं सांगितलें का पाहिजे ?

कांहीं वेळ याप्रमाणें पडून राहिल्यानंतर कुमुदबंधु उठला आणि बागेंत इकडे तिकडे हिंडूं लागला. हिंडतां हिंडतां त्याचें लक्ष एका लताकुंजाकडे गेलें; तों त्याला जो देखावा दिसला तो सकाळपासून त्याच्यापुढें

असलेल्या देखाव्यांपेक्षां किती तरी निराळा! त्या लताकुंजांत एक तरुणी—आणि ती कोण ह्मणाल तर राणीची सखी **विशाखा**,—एका झोंकदार व सुंदर मध्यम वयाच्या पुरुषाशीं मोठ्या प्रेमानें कांहीं गुज गोष्टी बोलत आहे, इतकें त्यानें पाहिलें. त्या गृहस्थाचा पोषाख **पंचगांग**देशीय पोषाखाहून कांहींसा भिन्न होता येवढी गोष्ट त्याच्या तेव्हांच लक्षांत आली. ती दिशा सोडून **कुमुदबंधु** लागलाच दुसरीकडे वळला; तों तिकडे दुसरी एक तरुणी!—आणि तीही राणीची दुसरी **अनुराधा** नांवाची सखीच,—दुसऱ्या एका तरुण पुरुषाशीं गुज गोष्टी करीत आहे असें त्याला दिसलें. या तरुण गृहस्थाचा पोषाखही वरील गृहस्थाप्रमाणेंच होता. येवढी मौज पाहून **कुमुदबंधु** परत फिरला. आणि सरळ वाड्यांत आपल्या खोल्यांकडे आला.

---

## भाग ९ वा.

### (प्रसादचिन्ह.)

मागील भागाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें राणीची स्वारी **ध्रुवरायां**च्या वाड्याच्या दरवाज्याशीं येऊन पुरत्या दोन तीन घटकाही झाल्या नाहींत तोंच प्रवासाचे पोषाख बदलून **अनुराधा** आणि **विशाखा** बागेंत येऊन आपल्या प्रियकरांबरोबर गुज गोष्टी करीत बसलेल्या **कुमुदबंधू**च्या दृष्टीस पडल्या. हें मागील भागांत सांगितलेंच आहे. सकाळपासून झालेल्या प्रवासामुळें आणि त्रासामुळें राणीच्या स्वारींतील सर्व माणसें अगदीं थकून गेलीं होतीं. व जे ते विश्रांति घेण्याकरितां जागच्या जागीं क्षणभर पडले होते; **ध्रुवराया**च्या वाड्यांतील माणसें तर अकल्पित दोनप्रहरींच दत्त ह्मणून येऊन द्वाराशीं उभे राहिलेल्या राजकीय पाहुण्यांचें आतिथ्य योग्य रीतीनें व्हावें ह्मणून जिकडे तिकडे अगदीं गुंतून गेलीं होतीं. हा समय तरुण जोडप्यांस निवांतस्थानीं जाऊन गुज गोष्टी करीत बसण्यास सोईचा वाटणें स्वाभाविकच आहे; पण या ठिकाणीं आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट एवढीच कीं, इतक्या दूरचा प्रवास घोड्यावरून केलेला असतां क्षणभर विश्रांति घेण्याचीही आवश्यकता या दोघी तरुणींस वाटली नाहीं! पण मन्मथराजाचा अधिकारच तसा आहे! मन एकवार त्याचे स्वाधीन झालें ह्मणजे मग इतर विचारांचें किंवा विकारांचें मनावर व देहावर अगदींच प्राबल्य चालत नाहीं!

हीं दोन ठिकाणीं दोन जोडपीं प्रेमानें गोष्टी बोलत असलेलीं **कुमुदबंधू**च्या दृष्टीस पडतांच उपवन सोडून तो वाड्याकडे परत निघाला. याचें कारण इतकेंच कीं, कोणाचे गुप्त संवाद चाललें असतां आडून ते ऐकण्याची, किंवा कोणाच्या गुप्त व्यवहारांत विनाकारण आपलें नाक खुपसण्याची त्याला आवड नसे. तथापि जातां जातां त्या दोघां तरुणींच्या प्रियकरांचे चेहरे तो नीट न्याहाळून गेला. तेवढ्या अवलोकनावरून त्यानें इतकें ठरविलें कीं, राणीच्या या दोघी मैत्रिणी आपल्या सौंदर्यानें तरुण पुरुषांस मोहित करून टाकण्यास जशा समर्थ होत्या, त्याचप्रमाणें त्यांचे प्रियकरही आपल्या स्व-

रूपानें व शरीरकांतीनें, सहज विकारवश होणाऱ्या स्त्रियांस आपल्याकडे क्षणमात्र अपांगावलोकन करावयास लावण्यासारखे होते.

**कुमुदबंधु** बागेंतून निघून वाड्याकडे येत असतां वाटेंतच **विनयादित्यमामां**ची व त्याची गांठ पडली. तो त्यांना ह्मणतो, " गांठ पडली, ठीक झालें, मामासाहेब. मी आतां आपल्याकडेच येणार होतों. पण मला वाटलें स्वारींतल्या इतर मंडळीप्रमाणेंच,—निदान बहुतेक मंडळीप्रमाणेंच,— आपणही सकाळच्या श्रमांचा परिहार करण्याकरितां क्षणभर विश्रांति घेत स्वस्थ पडलां असाल. "

" तसें कांहीं नाहीं, सरदारसाहेब, " **मामा** ह्मणतात. " जरी आतां तरुणपणाची तरतरी माझ्या अंगीं राहिलेली नाहीं, तथापि प्रस्तुत स्थितींत आपलें कर्तव्य बजावण्याला जेवढा उत्साह पाहिजे तेवढा अद्याप परमेश्वरानें कायम ठेवला आहे असें ह्मणायाला कांहीं हरकत नाहीं. पण तें असो. तुह्मीं सकाळीं **कृष्णग्रामा**जवळच्या त्या अरण्यांत गेलांत तेथली कांहीं हकीकत सांगितली नाहींत. त्या घाईंत मीं सांगितल्याप्रमाणें तेथें गेल्याचें मात्र तुह्मीं मला बोललां. "

" होय, आणि माझी खेप फुकट गेली नाहीं, हेंही मीं आपल्याला कळविलें होतें. " **कुमुदबंधु** म्हणतो. " त्या शिवालयाजवळ माझी आणि **नलिनी**ची प्रत्यक्षच गांठ पडली. तिच्यापासून जी माहिती मिळाली तीही फार महत्वाची होती. पण प्रथम दुसरी एक गोष्ट आपल्याला सांगितली पाहिजे. खरें पाहतां, मामासाहेब, आपल्यापासून कोणतीही गोष्ट गुप्त ठेवण्याचें मला कारण नाहीं. निदान राणीसाहेबांच्या हितासंबंधानें आणि तुमच्या प्रिय शिष्येसंबंधानें तरी आपण परस्परांपासून कांहींएक लपवून ठेवण्याचें कारण नाहीं. तेव्हां पहिली गोष्ट तुम्हांला सांगण्यासारखी म्हणजे हीच कीं, राणीसाहेबांवर छापा घालण्यासाठीं जी टोळी आली होती, तिचा नायक कोण असेलसें तुह्मांला वाटतें बरें ? स्वतः **जयद्रथराय**च त्या टोळीचें अग्रेसरत्व पतकरून आला होता. मीं त्याचा पाठलाग केला, माझे त्याचे दोन हात झाले. खरोखरच त्याचें शौर्य आणि युद्धचातुर्य वर्णनीय आहेत. पण त्याचा घोडा अगदीं थकून गेला असल्यामुळें शेवटीं तो पडला—"

" **कुमुदबंधु**, तुह्मी जितके शूर आहांत तितकेच उदार व निरभिमानी आहांत ! " **विनयादित्यमामा** आनंदानें ह्मणतात. " तुमचा एक एक गुण पहावा तों मनाला अधिकाधिकच आनंद वाटतो. "

**विनयादित्यमामा**सारख्यांच्या तोंडून झालेला आपला गौरव पाहून **कुमुदबंधू**ची मुखश्री संतोषानें थोडीशी उज्ज्वल झाली. आणि तो ह्मणाला, " आणि नंतर मीं त्यांना जीवदान व स्वातंत्र्यदान केलें, ह्मणून कृतज्ञताबुद्धीनें ह्मणा, किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें म्हणा, **जयद्रथरायानें** आपली मुद्रिका मला दिली.

नंतर पुढें **नलिनी**ची व आपली शिवालयाजवळ गांठ पडून काय काय भाषण झालें, तिच्या प्रेरणेवरून **जयद्रथराया**च्या

मुद्रिकेचा प्रत्ययचिन्हासारिखा उपयोग करून आपण महासेनास आणि शक्तिधरास कसें फसविलें, वगैरे गोष्टी कुमुदबंधूनें अगदीं थोडक्यांत मामांस सांगितल्या.

ज्यावेळीं दक्षता ठेवणें भाग असे, तेव्हां दुसऱ्याशीं बोलतांना विनयादित्यमामा अगदीं शांत व गंभीर मुद्रा करून असत. पण तसें करण्याची कांहीं आवश्यकता नसेल त्या ठिकाणीं मात्र त्यांचे मनोविकार तेव्हांच बाहेर उचंबळत. यामुळें कुमुदबंधु ही वरील हकीकत सांगत असतां वारंवार मामांचा चेहरा आनंदानें प्रसन्न झालेला, धैर्यानें उद्दीप्त झालेला व विवंचनेनें उद्विग्न झालेला दिसे. मधून मधून त्यांच्या अंतःकरणाचे विकार दाखविणारे उद्गारही त्यांचे तोंडांतून निघत. कुमुदबंधूनें प्रातःकाळच्या त्या प्रसंगाचें वर्णन करतांना आत्मस्तुतीचा जेवढा ह्मणून भाग होता तेवढा गाळून बाकी सर्व गोष्टी समग्र वर्णन करण्याचा प्रयत्न केला. पण यानें कितीही टाळाटाळी केली तथापि या सर्व प्रसंगांत हाच नायक असल्यामुळें धाडसानें आपला जीव धोक्यांत घालून व योग्य काळीं विलक्षण चातुर्य खर्च करून राणी आणि तिच्या बरोबरचीं इतर स्त्रीपुरुषें यांना न कळत त्यांचें संरक्षण त्यानें एकट्यानें केलें, ही गोष्ट विनयादित्यमामासारख्या गृहस्थाच्या तेव्हांच लक्षांत आल्याशिवाय कशी राहणार! सर्व हकीकत ऐकून विनयादित्यमामास अगदीं गहिंवर आला आणि त्यांच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. त्यांनीं कुमुदबंधूस मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें आणि ते ह्मणालेः

"कुमुदबंधु, ज्यावेळीं तुम्हीं या पंचगांग देशाच्या किनाऱ्यावर आलां ती वेळ अत्यंत सुदैवाचीच मानिली पाहिजे. परमेश्वरानें तुह्मांला मुद्दाम या देशीं पाठविलें असें आतां ह्मणावें लागतें. देवानें परवां त्या तुफानांतून तुमचे प्राण वांचविले तेही मुद्दामच! कारण तुमचे एकाचे प्राण वांचले असतां कित्येक निरपराधी गरीब प्राणांचें तुमच्या हातून रक्षण होईल आणि किती एक दुष्टांची तुमच्या हातून खोड जिरेल, हें त्या सर्वनियंत्याला ठाऊकच होतें! तुह्मी माझे स्वदेशीय आहांत या गोष्टीबद्दल मला किती तरी आनंद वाटत आहे, ह्मणून तुह्मांस सांगूं! माझ्या कुमुद्वतीसारख्या सद्गुणी बालराज्ञीचा तिच्या आप्त इष्टांनीं छल करण्याचें मनांत आणलें असतां तिच्या पाठीशीं राहून तिचें निरपेक्ष बुद्धीनें संरक्षण करण्यास तुमच्यासारखा महेश्वर प्रांतांतील परका गृहस्थ तयार व्हावा हें त्या देशांतील सर्व लोकांस केवढें भूषण आहे! आणि तुह्मांलाही हा केवढा मोठेपणा आहे!"

"माझ्या हातून घडलेल्या राणीसाहेबांच्या क्षुद्र सेवेबद्दल आपण मला शाबासकी दिली, व अशा रीतीनें माझें अभिनंदन केलें, याचा मला मोठा अभिमान वाटतो." कुमुदबंधु ह्मणाला. "पण तें असो. प्रातःकालच्या सर्व प्रसंगासंबंधानें राणीसाहेब आतां मला प्रश्न करतील तेव्हां त्यांच्यापुढें यापैकीं कोणकोणती हकीकत सांगावयाची हें प्रथम ठरवून ठेविलें पाहिजे."

विनया०:—"आपल्याला जी हकीकत राणीसाहेबांपुढें सांगणें भाग आहे, त्यांतून होतां होईल तितकें करून जयद्रथरायाचें

नांव गाळावयाचें असा आपला प्रथमच बेत ठरला आहे. "

कुमुद०:-" होय. राणीसाहेबांच्या ठिकाणीं नलिनीची अत्यंत निष्ठा असल्यामुळें ती जरी आपल्या चुलत्याचे सर्व दुष्ट बेत आपल्यास कळविते, तथापि तिचें आपल्या चुलत्यावरही पराकाष्ठेचें प्रेम आहे, आणि त्याचे अपराध राणीसाहेबांपुढें येऊं देऊं नयेत अशी तिची इच्छा आहे हें आपल्यास ठाऊकच आहे; तरी पण कांहीं गोष्टी राणीसाहेबांना कळविणें आपल्याला भाग आहे. मी कृष्णग्रामाच्या अलिकडे स्वारीला येऊन मिळालों त्या वेळीं राणीसाहेबांना बोललों होतों कीं, 'सावकाश चालल्यास धोका आहे.' तर त्या आतां साहजिकच त्यासंबंधानें इत्थंभूत हकीकत विचारतील."

विनया०:—"शिवाय तुह्मी राणीसाहेबांचें संरक्षण करण्याकरितां आज कसे कसे श्रम केले व कसकसलीं जिवावरचीं धाडसें केलीं हेंही राणीसाहेबांस कळलेंच पाहिजे."

कुमुद०—" कसेंही असलें, तथापि जयद्रथरायाच्या मुद्रिकेबद्दल एक शब्दही बाहेर काढावयाचा नाहीं. शिवाय, हें पहा, त्या प्रसंगीं मीं जो त्याचा पराभव केला, त्यांत ऐट मारण्यासारखें कांहींच नाहीं."

विनया०—"कुमुद्बंधु, या बारिकसारिक गोष्टींबद्दलची तजवीज मजकडे सोंपवा. महासेन आणि शक्तिधर यांचे दुष्ट बेत तुम्हीं मोडून काढिले त्या संबंधानें ज्या गोष्टी राणीसाहेबांस कळणें अवश्य आहे तेवढ्याच त्यांना कळवायाच्या. जयद्रथरायांबद्दल एक अक्षरही काढावयाचें नाहीं. आणि तें कां तर नलिनीकरितां."

कुमुद०-( मामांचे शेवटचे शब्द ऐकून उत्साहानें ) " बस, माझी इच्छा येवढीच आहे. "

नलिनीसंबंधानें जेव्हां जेव्हां भाषण निघेल, तेव्हां तेव्हां कुमुद्बंधु मोठा सोत्साह दिसे ही गोष्ट मामांच्या लक्षांत येऊन गेली होती. यावेळीं तर हा उत्साह थोडा अधिक आहे असें वाटल्यामुळें कुमुद्बंधूच्या चेहऱ्याकडे मामा शोधक, पण सप्रेम दृष्टीनें कांहीं वेळ पहात उभे राहिले. ही गोष्ट कुमुद्बंधूच्याही ध्यानांत आली. आणि आपला चेहरा सौम्य व निर्विकार करण्याचा तो प्रयत्न करूं लागला; पण त्याची ही सर्व खटपट व्यर्थ झाली. उलट या योगानें त्याच्या गालांवर लज्जाजनित पाटल रागाची छाया मात्र किंचित् कालपर्यंत येऊन गेली.

तो फिरून मामास म्हणतो, " मामासाहेब ठरलें तर आतां. कृष्णग्रामाजवळ राजमंडळावर छापा घालण्याकरितां आलेल्या टोळीचा नायक जयद्रथराय होता ही गोष्ट तुमच्या आमच्याशिवाय तिसऱ्या कोणासही कळवायाची नाहीं. "

विनया०:—( कुमुद्बंधूच्या हाताकडे पहात ) " आणि आपल्या बोटांत त्याची ती मुद्रिका आहे ती ? "

कुमुद०:—" ती मी तूर्त बोटांत ठेवीत नाहीं. ती जयद्रथरायाला केव्हां व कशी परत द्यावयाची हेंही मीं अद्याप ठरविलें नाहीं. बरें पण तें असो. दुसरी एक गोष्ट आपणाला सांगायची अद्याप राहिली आहे."

विनया०:—" बोला काय ती. "

कुमुद०:—" सकाळच्या प्रसंगांतून राणीसाहिब सुरक्षित पार पडल्या ह्याबद्दल खरोखरी ज्या मनुष्याचा गौरव अवश्य झाला पाहिजे तें मनुष्य अगदींच बाजूस राहिलें आहे. त्या मनुष्याचें नांव आपल्यास आतांपर्यंत मीं कळविलें नाहीं याचें कारण त्याची तशी इच्छा होती; पण आतां तें नांव गुप्त ठेवण्याची कांहीं आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. हें पहा, मामासाहेब, आज पहांटेस मी स्वारीच्या अगोदर निघालों आणि नंतर राणीसाहेबांच्या संरक्षणार्थ कांहीं राजनिष्ठ लोकांची टोळी घेऊन आलों, तें माझ्या स्वतःच्या कल्पनेवरून नव्हे. राणीसाहेबांची जी कमलाबाई ह्मणून सखी आहे तिच्या सूचनेवरून मीं गेलों. या सर्व यशाचें भूषण खरें पाहतां तिला आहे."

विनया०—"ही गोष्ट मी कितीएक दिवस जाणून आहें कीं, कुमुद्वतीच्या चौघी मैत्रिणींत कमलेइतकी विश्वसनीय, प्रेमळ आणि बुद्धिमान दुसरी एक देखील नाहीं. एक रोहिणी बुद्धिमत्तेशिवाय इतर गोष्टींत तिच्या तोडीची आहे; पण ती आतां आपल्या पतिगृहीं जाणार, आणि त्यामुळेंच राणीसाहेबांची स्वारी आज येथें आली आहे. सुदैवानें रोहिणीला पतिही अगदीं योग्य मिळाला आहे. आजचा मेजवानीचा बेत फारच थाटाचा आहे. पंचगांगदेशांतले बहुतेक मोठमोठे गृहस्थ ध्रुवरायानें आज मुद्दाम येथें बोलावले आहेत. कुवलयपुराहूनही कांहीं मंडळी आली आहे. "

कुमुद०-" ही चांगलीच संधी आहे. या प्रसंगीं कदाचित् या देशांतील बड्या बड्या सरदार मंडळीचा परिचय तरी होईल पण कांहो, मामासाहेब, रोहिणी आतां पतिगृहीं गेली ह्मणजे राणीसाहेबांच्या चौघी मैत्रिणींपैकीं एक कमी झाली? आणि आह्मीं तर ऐकिलें आहे कीं कांहीं झालें तरी आपल्याजवळ कोणी तरी समवयस्क चवघी मैत्रिणी सतत ठेवावयाच्या असा राणीसाहेबांचा कृतसंकल्प आहे ह्मणून!"

विनया०:—" होय. तुह्मीं ऐकिलें तें अक्षरशः खरें आहे. कुमुद्वतीची ही एक लहर आहे असें समजा, किंवा तिची अशी समजूत होऊन बसली आहे म्हणा, पण आपल्या सभोंवतीं चवघी समवयस्क मैत्रिणी नेहमीं ठेवावयाच्या असा तिचा निश्चय आहे. पंचगांगदेशांतील बहुतेक लोक कुमुद्वतीसंबंधानें बोलावयाचें म्हणजे 'लक्ष्मीपंचायतन' म्हणून म्हणतात. ही गोष्ट कुमुद्वतीच्या कानापर्यंत देखील गेली आहे; आणि तिला त्याचा मोठा अभिमान वाटतो. तेव्हां तात्पर्य काय तर रोहिणीच्या गमनानें रिकामी होणारी जागा ताबडतोब भरल्यावांचून राणीला एक क्षणभर देखील चैन पडावयाचें नाहीं. बरें पण आतां येवढेंच पुरे. तिकडे भोजनाची आतां वेळ होईल आणि मला तर अद्याप थोडेंसें काम आहे. "

कुमुद०:—" बरें, मामासाहेब, आपल्याला थोडी तसदी देणें भाग आहे. मी जो काल रत्नगिरीच्या किनाऱ्यावर उतरलों तो कोणत्या स्थितींत उतरलों हें आपणास ठाऊकच आहे. तेव्हां आपल्या हाताखालच्या

कोणा अधिकाऱ्यास सांगून कांहीं कपडेलत्ते–"

विनया०:–(त्याला पुरतें न बोलूं देतां) " वाहवा, सरदारसाहेब, तुह्मीं असें का मानितां कीं, हा वृद्ध मामा इतके दिवस राजदरबारीं राहून याला साधारण गोष्टीही अद्याप ठाऊक नाहींत. आपण आपल्या खोल्यांकडे परत जातां तों आपली सर्व व्यवस्था अगोदरच झाली आहे असें आपल्याला आढळून येईल. आपल्याबरोबर नोकर चाकर कोणी नाहींत, ह्मणून तीनचार माणसें आपल्या तैनातीस नेमून दिलीं आहेत. आणि आपली सर्व तजवीज राखण्याकरितां मोहन ह्मणून आपल्यासारख्या जवळ राहण्यास योग्य आणि माझ्या पसंतीस आलेला, असा राणीच्या सेवकांपैकीं एक हुषार तरुण मुलगा आपल्या नेमणुकीस कायमचा दिला आहे. आपली सर्व व्यवस्था तो किती शहाणपणानें राखतो, तें तरी पहा."

कुमुद०:–"खरेंच, मामासाहेब! आपले मजवर फार फार उपकार आहेत. असल्या क्षुद्र गोष्टींतही आपण स्वतः इतकें लक्ष पुरवितां तेव्हां आपल्यापुढें काय बोलावयाचें?"

विनया०:–" कुमुदबंधु, आपण दोघेही एकाच देशाचे आहोंत. तेव्हां आपल्याशीं मीं कांहीं एखादी विनंति केली तर आपण अमान्य करणार नाहींच–– "

कुमुद०:––( आदरपूर्वक ) " मामासाहेब, आपल्यासारख्यांपासून मला विनंति नको,––आपण कोणतीही आज्ञा केली तरी ती मी वंद्य मानीन. "

विनया०:––" हें पहा, थोर सरदारसाहेब, तुह्मीं ज्या स्थितींत पंचगांगदेशांत उतरलांत, त्या स्थितीच्या मानानें पाहिलें असतां आपल्याजवळ पैशाच्या संबंधानें थोडी अडचण असावयाची. राणी स्वतः होऊन याबद्दल कांहीं तरी व्यवस्था करील; पण तोंपर्यंत, मी आपला देशबांधव आहें, हें मनांत आणून माझी ही थैली आपण आपल्या उपयोगास लावाल तर माझा मोठा आदर केल्यासारखें होईल. "

कुमुद०:––" मामासाहेब, जहाज फुटलें त्यावेळीं माझी थैली आणि कांहीं जवाहीर वगैरे माझ्या कमरेलाच होतें. यामुळें या संबंधानें तूर्त मला कोणतीही अडचण नाहीं. तशी कांहीं अडचण असती तर मीं आपल्या देणगीचा एकदम स्वीकार केला असता आणि यापुढेंही मला जरूर लागेल तेव्हां मी उघडपणें आपल्यास कळवीन. आपण माझे स्वदेशीय आहांत ह्मणून आपल्याजवळ कोणत्याही प्रकारची भीड न ठेवितां वागावयाचें व आपण माझे खरे हितचिंतक आहांत असें मानावयाचें, असा माझा तरी निश्चय झाला आहे. "

विनया०:––( कंठ सद्गदित होऊन व अश्रूंनीं डोळे भरून येऊन ) " कुमुदबंधु, या पंचगांगदेशांत मजवर खरें प्रेम करणारीं फारच थोडीं माणसें आहेत ! माझा स्वभाव कशा प्रकारचा आहे, किंवा माझ्या ठिकाणीं गुणावगुण काय आहेत, हें ज्याला ठाऊक आहे अशीं माणसें कुमुद्वतीच्या दरबारांत फारच थोडीं असतील. याचीं कारणें काय असतील हें आपल्यासारख्यांना सांगावयाला नको. माझ्या शरीराकडे पहा म्हणजे झालें, परमेश्वरानें आपल्याला जें

दिलें असेल त्यांत संतुष्ट रहावें हेंच योग्य. परंतु तुम्हींच सांगा, ज्याला देवानें हें स्वरूप दिलें आहे त्याच्याकडे पाहून नाक मुरडणार नाहीं आणि तिटकारा येऊन तोंड एका बाजूस वळविणार नाहीं, असा एकादा तरी मनुष्य सांपडेल काय ! अशी स्थिति असल्यामुळें मी प्रथमपासून साधारणतः सर्वांपासून अगदीं तुटून रहात आलों. यामुळें माझा स्वभाव किंवा माझें मन यांची कोणासच परीक्षा करावयास मिळाली नाहीं. म्हणून पंचगांगदेशाच्या सरदारांपैकीं कांहीं मला अत्यंत भितात, कांहीं मला अत्यंत तुच्छ मानितात, आणि बहुतेक माझा हेवा व तिटकारा करितात. माझ्या स्थित्यनुसार मला नेहमीं अज्ञातवासाचीच संवय आणि गोडी लागल्यामुळें इतर दरबारी लोकांप्रमाणें वारंवार पुढें होऊन कशी तरी लोकप्रीति संपादन करण्याची हौस मला कधींच वाटली नाहीं. यामुळें लोकांच्याही मजविषयींच्या कल्पना निरनिराळ्या प्रकारच्या आणि विलक्षण असणें साहजिक आहे. गृहसौख्य म्हणाल तर ज्याला गृहच नाहीं, त्याला तत्संबंधी सौख्य तरी कोठून असणार ? अशा स्थितींत माझें सर्व प्रेम, माझी सर्व निष्ठा, माझे प्रत्यक्ष पंचप्राणही मीं कुमुद्वतीला वाहिले आहेत, यांत आश्चर्य तें काय ? आणि खरोखर तीही मजवर बापाप्रमाणेंच प्रीति करिते म्हणून मला हा इहलोकचा वास कांहीं अंशीं तरी सह्य वाटत आहे ! कुमुदबंधु, माझ्या स्थितीबद्दल मी कोणाशींही बोलत नाहीं; फार तर काय, स्वतःच्या मनाला सुद्धां होतां होईलतों या विचारापासून दूर ठेवितों ! आपल्याला ही सर्व हकिकत मी सांगत बसलों याचें कारण आपण माझे स्वदेशीय असून उदार अंतःकरणाचे आणि प्रेमळ स्वभावाचे गृहस्थ आहांत अशी माझी येवढ्या थोड्या अवकाशांतही खात्री झाली आहे. शिवाय माझ्या लाडक्या कुमुद्वतीचे आपण खरे व निरपेक्ष हितैषी आहांत, यामुळें माझें प्रेम तुमच्याकडे वाहणें अगदीं स्वाभाविकच नाहीं काय? यापुढें आपल्याला योग्य वाटेल त्या रीतीनें आपण मजशीं वागा. माझ्या हातून याहून जास्त बोलणें होत नाहीं. मी आतां जातों, जरूरीचीं कांहीं कामें आहेत."

याप्रमाणें वृद्ध मामा आपल्या कष्टमय आयुष्याचें वृत्त सांगत असतां कुमुदबंधूचें सहृदय अंतःकरण सहजच विरघळून गेलें आणि त्याच्या डोळ्यांत अश्रू येऊन कंठही दाटून आला. तो एकसारखा मामांच्या तोंडाकडे पाहत होता. मामा एकदम उठून चालते झाले, त्यांना क्षणभर थांबविण्याचाही प्रयत्न त्यानें केला नाहीं. ते जात असतां त्यांच्याकडे तो एकसारखा पहात राहिला होता. नंतर कांहीं वेळानें मन थोडेंसें शांत झाल्यावर आपल्या खोल्यांकडे चालता झाला.

तो आपल्या खोलींत जातो तों त्याचे नेमणुकीस दिलेला तरुण सेवक मोहन खोलींतील सर्व व्यवस्था करण्यांत गुंतला होता. त्याला इकडे तिकडे कांहीं प्रश्न कुमुदबंधूनें विचारले, त्यास मिळालेल्या उत्तरांवरून, तसेंच त्या तरुणाच्या मुद्रेवरून

व एकंदर विनयशील वर्तनावरून कुमुद्बंधूस संतोष वाटला. आणि मामांनीं सांगितल्याप्रमाणें हा सेवक आहे अशी त्याची खात्री झाली.

ध्रुवरायानें राणीसाहेबांकरितां मुद्दाम केलेली मेजवानी, मग ती अत्यंत थाटाची असलीच पाहिजे हें सांगण्यांत विशेष तें काय? 'ताटांची तयारी आहे' ह्मणून सांगण्याकरितां सर्वत्र सेवक हिंडूं लागले. आतां त्या पंक्ति, त्या पाटांच्या हारी, ते गुलाल रांगोळ्यांचे थाट, तीं निरनिराळीं पक्कान्नें, त्या चटण्याकोशिंबिरी याचें वर्णन देत बसणें व्यर्थ आहे. वाचकांच्या तोंडाला पाणी मात्र सुटेल, आणि त्यांची जीभ चावळली म्हणजे ते आह्मांला शिव्या शाप देतील, ह्मणून त्या भानगडींत न पडलेलेंच बरें!

भोजनोत्तर मामांची व कुमुद्बंधूची फिरून गांठ पडली. मामा कुमुद्बंधूस म्हणतात: "भोजनाच्या अगोदर माझी व राणीसाहेबांची गांठ पडेल ह्मणून पहात होतों, पण तें कांहीं जुळलें नाहीं. राणीसाहेबांनीं येवढा मात्र निरोप मजकडे पाठविला कीं, तुमची भेट त्या आज सायंकाळीं घेणार आहेत."

कुमुद०:—"ठीक आहे. त्यांची आज्ञा होईल तेव्हां मी तयारच आहें. पण माझी भेट होण्यापूर्वी आपल्या तोंडून आजची सर्व हकिकत त्यांना एकवार कळलेली बरी."

विनया०:—"बहुधा, तसें होईलच."

कुमुद०—"बरें, मामासाहेब, येथें कोणी कालयवनदेशाचे सरदार आले आहेत काय? मघांशीं त्या देशचा पेहराव केलेले दोघे गृहस्थ मीं पाहिले."

विनया०:—"अगदीं बरोबर. पण ते कोण, हें तुम्हांला अद्याप कळलें नाहीं म्हणतां?"

कुमुद०:—"नाहीं. कसें कळणार?"

विनया०:—ते दोघे गूढसिंहाचे या दरबारीं असणारे वकील आहेत. त्या दोघांपैकीं जो वयानें थोडासा पोक्त आहे त्याचें नांव बसवप्रभु आणि दुसऱ्याचें नांव कालनीति. बसवप्रभूची मुद्रा पाहिल्याबरोबरच हा महाधोरणी आणि महाखटपटी गृहस्थ असावा, असें नाहींका दिसत? ते त्याचे डोळे पाहिलेतना? त्याची दृष्टी आपल्याकडे वळली ह्मणजे वाटतें कीं, हा आतां आपल्या छातीला भोंक पाडून आंत शिरून अंतःकरणांत काय आहे तें पाहिल्यावांचून रहाणारच नाहीं. पण ओंठावर हास्य किती तयार असतें ह्मणतां! तें क्षणोक्षणीं पुढें धावणारें हास्य आणि त्याच्या बरोबर असणारा तो उत्साह हीं पाहिलीं ह्मणजे वाटतें कीं, हा कोणी तरी आनंदी प्राणी असावा, आनंद व उत्सव याशिवाय दुसरे विचारच याला ठाऊक नसावेत. पण ते खोल डोळे आणि ती तीक्ष्ण दृष्टी पाहिली ह्मणजे लागलीच निराळी कल्पना होते!"

कुमुद०:—"या बसवप्रभूचें नांव मीं पूर्वी ऐकिलें आहे व हे अत्यंत नीतिनिपुण व महाधोरणी आहेत असेंही मीं ऐकिलेंले आहे."

इतकेंच बोलून एक क्षणभर कुमुद्बंधु

विचारांत मग्न झाला. राणीच्या सहचरींपैकीं दोघीजणी ज्या दोघां गृहस्थांबरोबर सकाळीं बागेंत प्रणयसंवाद करण्यांत गुंतल्या होत्या, ते गृहस्थ हेच होत. पंचगांगच्या गादीचा उघड शत्रु जो गुहसिंह त्याच्या दरबारांतल्या दोघां सरदारांशीं कुमुद्वतीच्या दोघी सख्यांचें प्रेम जुळावें हें फार चमत्कारिकसें आमच्या सरदारास वाटलें; पण यापैकीं कांहीं एक गोष्ट विनयादित्यमामास न विचारतां तो ह्मणाला, " कायहो, मामासाहेब, राणीसाहेबांच्या आणखी दोघी मैत्रिणी लौकरच विवाहित होऊन त्यांच्या जवळून दूर होणार असाव्यात असें वाटतें?"

" मी समजलों तुह्मीं काय ह्मणतां तें!" मामा किंचित् हंसून उत्तर करितात. " राणीसाहेबांच्या दोघी मैत्रिणी अनुराधा आणि विशाखा यांचें या दोघांशीं कांहीं भाषण वगैरे चाललेलें तुमच्या दृष्टोत्पत्तीस आलें असेल आणि तेवढ्यावरून ही शंका आपणास आली असेल? पण तसें कांहीं नाहीं. त्या दोघीही पोरींना गांभिर्य ह्मणून काय पदार्थ असतो हें ठाऊकच नाहीं. आणि हे दोघेही गृहस्थ त्यांच्या मातुलगृहाकडील असल्यामुळें लहानपणापासून त्यांच्या ओळखीचे आहेत, इतकेंच."

मामासाहेबांपेक्षां आपल्याला यासंबंधानें अधिक माहिती आहे अशी कुमुदबंधूच्या मनाची खात्री झाली. पण अशा कामांत आपलीं अनुमानें आपल्याच जवळ ठेवणें बरें, असें ठरवून तो मामासाहेबांच्या बोलण्यावर कांहीं एक उत्तर न देतां स्तब्ध राहिला.

हें भाषण आटपल्यानंतर मामासाहेब व कुमुदबंधु आपआपल्या खोल्यांकडे चालते झाले. कुमुदबंधु खोलींत जातो तों त्याच्या लोडासन्निध एक सुंदर चंदनी पेटी ठेवलेली त्याला दिसली. त्या पेटीवर एक लखोटा होता. हें काय आहे म्हणून तो पहातो तों लखोट्यावर " सरदार कुमुदबंधुराय महेश्वरकर " असें लिहिलेलें होतें. लखोटा फोडून पहातो तों त्यांत फक्त त्या पेटीची किल्ली होती. हें सर्व गूढ काय आहे तें पहावें म्हणून त्यानें पेटीचें कुलुप काढिलें. पेटींत एक शेल्याची घडी होती आणि त्या घडीवरच एक लहानशी चिठ्ठी होती. " अबलाजनांना संकटीं साहाय्य करणारे सरदार कुमुदबंधु यांच्या ठिकाणीं, त्यांच्या शौर्य, धैर्य, औदार्य, इत्यादि गुणांमुळें जिचें अंतःकरण निष्ठ झालें आहे अशा एका अबलेकडून केवळ एक अल्प आदरचिन्ह." इतकेच शब्द चिठ्ठीवर होते. खालीं सही वगैरे कांहीं नाहीं.

" प्रिये नलिनी, तुझाच हा प्रसाद!" असें म्हणून कुमुदबंधूनें त्या शेल्याच्या घडीचें चुंबन घेतलें. " पत्रावर नांव नसलें म्हणून ही अमूल्य वस्तु कोणत्या हातांतून आली असेल हें का मला समजणार नाहीं! प्रिये नलिनी, हा शेला तूं नुसतें आदराचिन्ह म्हणून म्हणतेस; पण मी तें प्रणयचिन्ह असें समजून त्याचा स्वीकार करतों." असें म्हणत त्यानें फिरून त्या शेल्याचें चुंबन घेतलें; आणि फिरून ह्मणतो, " पण तिनें ही पेटी पाठविली असेल कोणाबरोबर? आणि ही येथें केव्हां आणि कशी आणून ठेविली अ.

# केसरींतील निवडक निबंध.

## भाग दुसरा.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत, अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

## विषयानुक्रमणिका.


ज्ञान.
अप्रतिबंधव्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
जूट.
मनुष्यांचें सामाजिक कर्तव्य.
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्णावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?
बालविवाहापेक्षां संतति बरी !
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?
चैन
स्त्रीदास्यविमोचन.
तंबाखू
द्रिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें ?
आह्मा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० ह्यूम यांचे म० खऱ्हाड.
एक वृद्ध पोलिटिकल अत्याचारी.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे.
व्यायाम.
परभाषेंतील शब्दांची योजना.
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची अवश्यकता.
उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बायबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला.
प्रसिद्धिविरण.
महारेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गनतीचे प्रश्न.
पाऊस
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार.
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक !
,, उत्तरार्ध.
ज्याच्या त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज.
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति.


**म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.**

# विलायतचा प्रवास.

## भाग पहिला.

हल्लींच्या काळीं महाराष्ट्रभाषेंत जो ग्रंथसंग्रह होत आहे त्यांत प्रवासादिकांचीं वर्णनें फार कमी. अगोदर प्रवास करणारांची संख्या फार थोडी, त्यांत विलायतेपर्यंत मजल मारणारे फारच थोडे त्यांतूनही मार्मिकपणानें देशांचें, देशस्थितीचें, सृष्टचमत्कारांचें, सृष्टिसौंदर्याचें, आचारविचारांचें अवलोकन करणारांची संख्या अत्यल्प—हजारांत एखादा सांपडल्यास भाग्य. पण महाराष्ट्र भाषेच्या वाचकांच्या सुदैवानें अशा एका गृहस्थास विलायतची यात्रा करण्याचा योग आला व त्याचें फळ हें पुस्तक होय. यांत प्रवासांतील निरनिराळ्या प्रसंगांचें व अनुभवांचें मार्मिक वर्णन असून एडन, तांबडा समुद्र, केरो इजिप्तमधील मनोरे, आलेक्सांड्रिया, आथेन्स, स्मर्ना, कान्स्टांटिनोपल, व्हिएना, पारिस इत्यादि शहरांचें सविस्तर व मनोरम वर्णन असून प्रसंगोपात्त ठिकठिकाणच्या चालीरीतींचेंही दिग्दर्शन उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे. भाषा गंभीर व अलंकृत आहे.

### विषयानुक्रमणिका.

उपोद्घात.
पाठशाळेंतील मनोराज्य.
"टॉस्मेनिया" आगबोटीवर.
भोजनविधि.
भोजनोत्तरचा प्रकार.
शयनगृह.
प्रातर्विधि.
मजल्यावरील पुरुष मंडळी.
आगबोटीवरची व्यवस्था.
प्रातरुपहार.
स्नानाची सोय.
मुंबईपासून एडनपर्यंत.
एडन बंदर.
तांबडा समुद्र.
सुएझ.
सुएझहून केरो.
केरो शहर.
मनोरे.
रचनाप्रयोजनाविषयीं सिद्धांत.
मनोऱ्यांचा आकार व रचना.
मनोऱ्यांची हल्लींची स्थिति.
शिखरारोहण.
आभ्यंतर कक्ष.
संग्रहालय बाजार वगैरे.
बाजार.
काफीपानगृहें.
आरबी लोकांतील लग्न.
आलेक्सांड्रिया.
भूमध्य समुद्र.
आथेन्स शहर.
अक्रापोलीस.
आगबोटींत स्नानाचे हाल.
स्मर्ना बंदर.
स्मर्ना शहर.
स्मर्ना येथील युद्धविद्यालयांतील मुलें.
एका मडमेशीं संवाद.
डार्डेनेलीसची सामुद्रधुनी.
तुर्क लोकांच्या स्त्रिया.
कान्स्टांटिनोपलचें बंदर.
कान्स्टांटिनोपल शहर.
ब्रिटिश प्रतिनिधीच्या हस्तमेजी.
पेरा शहर.
लांकडी घरें. आगीच्या उपशमनार्थ तजवीजी.
गुयारांनली गाडी
इस्तंबोलचा रस्ता.
व्हार्लदिशीं मशीद—जोड्याविषयीं विलक्षण समजूत.
स्मशानचा सण आणि तंबाखूचें व्यसन.
प्राचीन अंतःपुर.
सब्लाईम पोर्ट.
सान्टासोफियाची मशीद.
मशिदीचें वर्णन.
हिपोड्रोम
एका पंतोजीची शाळा.
प्राचीन वेषांचें संग्रहालय.
भाषेची अडचण.
स्मभूमी पंचाईत.
इस्तंबोलचा बाजार.
कारंजीं.
एक विलक्षण प्रसंग.
टास्मेनिया आगबोटीचा—जलसमाधि.
ग्यालटा शहरांतील मनोरा.
स्कुटारी शहरांतील ओरडणाऱ्या दरवेशांचा मठ.
चित्रदर्शनाचा प्रयोग.
टर्कींचे सुलतान.
हम्माम अगर स्नानगृहें.
साधारण माहिती.
राजघराण्यांतील विचित्र चाली.
इतर लोकांच्या कांहीं चाली.
बासफोरस सामुद्रधुनी.
काळा समुद्र व व्हार्ना.
स्टीमराचा लाभ.
शकटरथ.
धाड्याल.
व्हिएना.
पथिकाश्रमांतील स्नानगृह.
नाटकगृह.
फौजेची परेड.
शहरांतील प्रेक्षणीय वस्तु
डा० लुम्हर.
व्हिएना शहराची रचना.
युनिव्हर्सिटीचें मंदिर.
पारिस शहरीं आगमन.
सरकस.
लुव्हर प्रासादांतील चित्रशाळा.
नाटकगृहें.
ऑपरा नाटकगृह.
पारिस—अतिरमणीय भाग.
श्यांज एलीज उद्यानभूमिका.
पारिस शहर.

किंमत १२ आणे ट० हं० २ आणे.

म्यानेजर, आर्यभूषण छापखाना, पुणें.

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक ३.

# नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

## A MONTHLY MAGAZINE.

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.*

विषय. अनुक्रमणिका.

वीरमणी आणि शृंगारसुंदरी ... ... ... ... ... ... ... ९ पासून
कुवलयपूरची राणी कुमुद्वती. ... ... ... ... ... ... ...१४५ „ १

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत
हरि नारायण गोखले यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.
[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ३॥. शिवाय ट. हं. ६ आणे.
मार्च १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें.

# विलायतचा प्रवास.

## भाग पहिला.

हल्लींच्या काळीं महाराष्ट्रभाषेंत जो ग्रंथसमूह होत आहे त्यांत प्रवासादिकांचीं वर्णनें फार कमी. अगोदर प्रवास करणारांची संख्या फार थोडी, त्यांत विलायतेपर्यंत मजल मारणारे फारच थोडे त्यांतूनही मार्मिकपणानें देशांचें, देशस्थितीचें, सृष्टचमत्कारांचें, सृष्टिसौंदर्याचें, आचारविचारांचें अवलोकन करणारांची संख्या अत्यल्प-हजारांत एखादा सांपडल्यास भाग्य. पण महाराष्ट्र भाषेच्या वाचकांच्या सुदैवानें अशा एका गृहस्थास विलायतची यात्रा करण्याचा योग आला व त्याचें फल हें पुस्तक होय. यांत प्रवासांतील निरनिराळ्या प्रसंगांचें व अनुभवाचें मार्मिक वर्णन असून, एडन, तांबडा समुद्र, कैरो, इजिप्तमधील मनोरे, आलेक्झांड्रिया, आथेन्स, स्मर्ना, कान्स्टांटिनोपल, व्हियेना, पारिस इत्यादि शहरांचें सविस्तर व मनोरम वर्णन असून प्रसंगोपात्त ठिकठिकाणच्या चालीरीतींचेंही दिग्दर्शन उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे. भाषा गंभीर व अलंकृत आहे.

### विषयानुक्रमणिका.

उपोद्घात.
गाउशाळेंतील मनोराज्य.
"टॉस्मेनिया" आगबोटीवर.
भोजनविधि.
भोजनोत्तरचा प्रकार.
शयनगृह.
प्रातर्विधि.
[illegible]वरील पुरुष मंडळी.
[illegible]बोटीवरची व्यवस्था.
[illegible]
[illegible]िय.
[illegible]डनपर्यंत.
[illegible]
[illegible]री.
[illegible]
[illegible]
रचनाप्रयोजनाविषयीं सिद्धांत.
मनोऱ्यांचा आकार व रचना.
मनोऱ्यांची हल्लींची स्थिति.
शिखरारोहण.
आभ्यंतर कक्ष.
संग्रहालय बाजार वगैरे.
बाजार.
काफीपानगृहें.
आरबी लोकांतील लग्न.
आलेक्झांड्रिया.
भूमध्य समुद्र.
आथेन्स शहर.
अकरा पोलीस.
आगबोटींत स्नानाचे हाल.

स्मर्ना बंदर.
स्मर्ना शहर.
स्मर्ना येथील युद्धविद्यालयांतील मुलें.
एका मडमेशीं संवाद
डार्डनेलीसचीं सामुद्रधुनी.
तुर्क लोकांच्या स्त्रिया.
कान्स्टांटिनोपलचें बंदर.
कान्स्टांटिनोपल शहर.
ब्रिटिश प्रतिनिधींचा हस्तस्पर्श.
पेरा शहर.
लांकडी घरें. आगीच्या उपशमनार्थ तजविजी.
भुयारांतली गाडी.
इस्तंबोलचा रस्ता.
व्हालींदींची मशीद-जोड्याविषयीं विलक्षण समजूत.
रमझानचा सण आणि तंबाखूचें व्यसन.
प्राचीन अंतःपुर.
सब्लाईम पोर्ट.
सान्टासोफियाची मशीद.
मशिदीचें वर्णन.
हिपोड्रोम
एका पंतोजीची शाळा.
प्राचीन वेषांचें संग्रहालय.
भाषेची अडचण.
सभ्यांची पंचाईत.
इस्तंबोलचा बाजार.
कारंजीं.
एक विलक्षण प्रसंग.

टास्मेनिया आगबोटीचा—जलसमाधि.
ग्यालेटा शहरांतील मनोरा.
स्कुटारी शहरांतील ओरडणाऱ्या दरवेशांचा मठ.
चित्रदर्शनाचा प्रयोग.
टर्कीचे सुलतान.
हम्माम अगर स्नानगृहें.
साधारण माहिती.
राजघराण्यांतील विचित्र चाली.
इतर लोकांच्या कांहीं चाली.
बास्फोरस सामुद्रधुनी.
काळा समुद्र व व्हार्ना.
स्त्रीत्वाची लाज.
शयनरथ.
बोटचाल.
व्हियेना.
पथिकाश्रमांतील स्नानगृह.
नाटकगृह.
फौजेची परेड.
शहरांतील प्रेक्षणीय वस्तु.
डा० बुल्हर.
व्हियेना शहराची रचना.
युनिव्हर्सिटीचें मंदिर.
पारिस शहरीं आगमन.
सरकस.
लूव्हर प्रासादांतील चित्रशाळा.
नाटकगृहें.
ऑपरा नाटकगृह.
पारिस-अतिरमणीय भाग.
ब्वा-द-बलोन उद्यानभूमिका.
पारिस शहर.

किंमत १२ आणे ट० हं० १ आणा.

**म्यानेजर, आर्यभूषण छापखाना, पुणें.**

या मांडीवरनारे त्याला खेळवला; अगदीं बच्चा होता त्यावेळीं या खांद्यावर त्याला नाचविला—छेः, माझा नाहीं यावर भरंवसा बसत.

**दौलत०**—महाराज, मी आपल्यापुढें काय बोलूं ? आपलें ज्ञान, आपली बुद्धि ठिकाणावर नाहीं. आपल्याला या राणीनें अगदीं भारून टाकलें आहे; आपली अक्कल अगदीं गुंग करून टाकली आहे. तो लहान होता तेव्हांचे ते दिवस विसरा. त्याचें डोकें आतां पुऱ्या विषारी विचारांनीं भरलें आहे; त्याच्या बापाची योग्यता, त्याचें शौर्य, त्याचें औदार्य याच्या अंगीं नाहीं; पण त्याची महत्वाकांक्षा मात्र याच्या डोक्यांत पुरी भिनली आहे. हा राज्यपद मिळविणार. त्याच्या मनाला कशाची ह्मणून खंत नाहीं. आपल्या या नादाबद्दल त्यानें साऱ्या सरदारमंडळांत आपली नाचक्की करून सोडली आहे व त्यांना आपल्या गुणांविषयीं संशयांत पाडलें आहे.

**वीर०**—हो, या पत्रावरून असें दिसतें खरें. माझ्या मित्रांनीं असेंच लिहिलें आहे.

**दौलत०**—महाराज, आपले आहेत हे मित्र तरी कायम राहोत ह्मणजे झालें.

**वीर०**—काय, ते देखील मला सोडतील ह्मणतोस ?

**दौलत०**—कां नाहीं सोडणार ? आपल्या स्थितीकडे कांहीं डोळे उघडून पहा. तिकडे आपले सावत्रबंधु संग्रामसिंह आणि आपली साध्वी, महापतिव्रता, तशीच महापराक्रमी पत्नी आपल्याशीं जयेंद्रपालानें चालविलेलें कपट पाहून आपल्या बचावासाठीं कांहीं तरी कुरापत काढून लढत आहेत.

**वीर०**—खरोखरच माझ्या जयेंद्रपालाशीं त्यांनीं लढायला उभे रहावें हें रास्त नाहीं. मला याचा फारच राग आला आहे. त्यांची गाठ तर पडूं द्या ह्मणजे याबद्दल मी त्यांची चांगलीच कानउघाडणी करणार आहे.

एका अंगानें **शृंगारसुंदरी** व **गुलाब** येतात.

**गुलाब**—बाईसाब, त्ये बगा सरकार कोणाबरुबरस बोलताहेती.

**शृंगार०**—अरे, हा कोणी नवा मनुष्य दिसतो आहे. यांचें काय खलबत चाललें आहे तें आपण ऐकूं या. आणि मग त्यांची चांगली फजिती करूं या. मला वाटतें हा त्या मालतीबाईकडून कांहीं निरोप घेऊन आला असावा म्हणून हा एकांत चालला आहे. बरें आहे ह्मणावें.

[ एका अंगाला उभीं राहतात.

**दौलत०**—अहाहा ! आतां आपल्यापुढें शर्थ झाली. आपल्या भार्येच्या अंगीं जें वीर्य आणि जें शौर्य आहे त्याचा शतांशही आपल्यांत नाहीं. ज्यांनीं आपल्या भुजबळानें या साऱ्या भरतखंडाला जमीनदोस्त करून टाकलें, ज्यांच्या समरगर्जनेसरशीं शत्रूंचीं सैन्यें शस्त्रास्त्रें टाकून गर्भगळित होऊन जात, ज्यांच्या नेत्रांचें प्रखर तेज पाहतांच मी

मी म्हणणारे वीर देखील मान खालीं घालीत,—तेच वीरमणी का हे! महाराज, जागे व्हा. आपल्या पत्नीनें, एका स्त्रीनें, तिकडे एवढा पराक्रम गाजवावा, आणि आपण इकडे असे एखाद्या नेभळ्या बेहिंमत इष्कबाजाप्रमाणें रंगबाजींत व विलासांत दंग होऊन बसावें—पण सरकार, नको आतां. अधिक बोललों असतां आपल्याला रुचणार नाहीं.

**वीर०**—अरे नाहीं, चालूं दे. अगदीं खुल्या दिलानें बोल. तुझें बोलणें माझ्या वर्मी लागलें तरी हरकत नाहीं. क्षुद्र लोकांनीं माझ्या पाठीमागें माझ्याविषयीं पाहिजे तसें बोलावें त्यापेक्षां तुझ्यासारख्या इमानी मित्राच्या तोंडून ते ऐकलेलें हजारपटीनें बरें. माझ्या अंतःकरणाला घरे पडले तरी बेहेत्तर; पण जगांत माझ्या संबंधानें जें कांहीं कोणी बोलत असेल तें स्पष्टपणें मला सांग. आपल्या अंतश्चक्षूंत वरचेवर जर असें तीव्र अंजन घातलें नाहीं तर आम्हांला पशूसारखे मठ्ठ बनायला मुळींच वेळ लागत नाहीं. म्हणून ह्मणतों अगदीं भीड धरूं नको.

**दौलत०**—हं, आतां मात्र माझे वीरमणी बोलले खरे! महाराज, अजून तरी शुद्धीवर या. मालतीबाई किती झाल्या तरी स्त्री. त्यांच्या हातून कितीसा निभाव लागणार ? त्यांचा पराभव होऊन त्यांची आणि आपल्या बंधूची तातातूट झाली. त्या निराशेनें अगदीं विव्हल होऊन गेलेल्या, शिवाय लढाईच्या दगदगीनें व काळजीनें क्षीण झालेल्या, हल्लीं माहिषपुरास जाऊन अगदीं मरणोन्मुख होऊन पडल्या आहेत.

**वीर०**—अरेरे, काय बिचारीची दशा! आणि हें सारें दुःख मीं तिला दिलेंना? धिक्कार, धिक्कार असो मला! या नादानें मला अगदीं वेडें करून सोडलें आहे खचित! इचा हा दारुण मोहपाश मला साफ तोडला पाहिजे, नाहीं तर बिनजोड नादान बनलें पाहिजे.

**दौलत०**—महाराज, अजून कांहीं फारसें वांकडें झालें नाहीं. जयेंद्रपालाकडून आलेल्या जासुदाची गांठ घ्या, त्याच्याशीं गोड बोला, त्याला मिठा मिठा उत्तरें देऊन त्याची रवानगी करून द्या. इतक्यांत जरी आपण विजयगिरीला परत गेलां तरी सर्व कांहीं पुनः ठिकाणावर येईल. आपलें वजन जरी कमी झालें आहे तरी अजी नाहींसें झालें नाहीं. आपण समक्ष तेथें आल्यावर तें पुनः स्थापित करायला कांहीं वेळ लागणार नाहीं. अद्यापि सारें सैन्य आपल्या ताब्यांत आहे. शिपाईलोकांच्या दृष्टीस आपण कितीएक दिवसांत पडला नाहीं. आपलें खरें स्थान त्यांच्यांत!—पण या छिनाल, या कपटी, या बेशरम, बदफैली राणीचा—

**वीर०**—दौलतसिंग, मला पाहिजे तो तूं दोष दे, पण तिला—

**शृंगार०**—( पुढें येऊन ) अरे चोरा, मांगा, चहाडचुचक्या, मला शिव्या देतोस? ( त्याला मारते.) आणि आपण त्या निमूटपणें ऐकून घेतांना? माझी ह्मणे

तुझ्यावर अगणित प्रीति आहे ! हीच का ती प्रीति ? हिच्याच साठीं का निराळी पृथ्वी आणि निराळा स्वर्ग उत्पन्न करायचीं तीं ? आपली प्रीति आपल्यालाच लखलाभ असो ! अग वेडे शृंगारसुंदरी, तुझें मन तुला सांगत असतां त्याचें ऐकलें नाहींस; घे हीं आतां फळें ! सारे मेले पुरुष कसे एकसारखे गळेकापू. आह्मां भाबड्या बायकांना फसवायूकरितांच जसा कांहीं त्यांचा जन्म असतो !—चल निघ मेल्या येथून. कर आपलें तोंड काळें ! जातोस कीं नाहीं ?

[ ती त्याला मारायला धांवते. **वीरमणी** त्याला 'जा' ह्मणून खूण करतो. तो जातो.

**वीर०**—( तिच्याजवळ जाऊन ) प्रिये, तूं उगीच त्याच्यावर रागावलीस ! त्याच्याकडे कांहीं दोष नाहीं. मीं त्याला सांगितलें ह्मणूनच तो असें बोलत होता. तें त्याचें स्वतःचें कां बोलणें तूं समजतेस ? अग तो माझा विश्वासू सरदार—माझ्या या प्राणाच्या विरुद्ध एक शब्द तरी काढण्याची त्याची प्राज्ञा आहे ? जयेंद्रपालानें विजयगिरीस लोकांतलें माझें वजन कमी करण्यासाठीं ज्या ज्या मसलती आणि लुच्चेगिऱ्या चालविल्या आहेत त्या तो मला सांगत होता.—हं, काढ त्या कपाळाच्या आंठ्या. तूं जर माझ्यावर रुसलीस तर या वीरमणीला चैन तें कसें पडावें ? अग त्या हरामखोर जयेंद्राच्या कृतघ्नतेच्या गोष्टी ऐकल्यापासून माझें माथें फिरून गेलें आहे. आणि तूं माझ्यावर रागावून नको माझ्या जिवाला जास्त त्रास देऊं. ऐक, माझें ऐक. हात जोडतों तुला.अग आजपर्यंत ज्या वीरमणीनें कोणाला एकही आर्जेवाचा शब्द आपल्या तोंडचा मिळूं दिला नाहीं तो वीरमणी तुझ्या पायां पडायला तयार आहे—बघ याच्याकडे एकदां हास्यमुखानें आणि ह्मण 'तुला क्षमा केली' ह्मणून.

**शृंगार०**—( त्याला आलिंगून ) इतकीं कशाला आर्जवें तीं ? गेला माझा राग. माझ्या रागाबद्दल आपणच मला क्षमा करावी. मग आतां आंत चलायचेंना ? मघांशीं आपण मला एकटी टाकून कांहीं न बोलतां निघून आलां, तेव्हां मला बाई कसेंसेंच झालें, कांहीं केल्या करमेना. मग आपला शोध करीत येथें आलें तों—

**वीर०**—( तिच्या तोंडावर हात ठेवून ) बस्स. त्याचें आतां नांव नको.

**शृंगार०**—बरें तर, मी नाहीं बोलत. पण आपण त्याचें तें तसलें बोलणें स्वस्थपणें ऐकून घेत होतां याबद्दल मी आपल्याला शिक्षा केल्याशिवाय मात्र राहणार नाहीं.

**वीर०**—अग चल. हा मी तयार आहे. तुझ्या हातची शिक्षा घ्यायला देव देखील खालीं उतरून येतील; पण त्यांचें कोठें आहे तितकें नशीब ?

**शृंगार०**—एखाद्याला हरभऱ्याच्या झाडावर कसें चढवावें हें जसें कांहीं इकडे शिकावायलाच नको. मी नाहीं आतां

हें ऐकायला उभी राहत. नाहींतर मग या गोड गोड थापांनीं भुलून जाऊन माझें मन ठिकाणावर राहणार नाहीं. चल-रे, गुलाब. [ जाते, **गुलाब** जातो.

**वीर०**–अग, एकटी कोठें चाललीस? हा एक दास येऊं दे तुझ्याबरोबर. [ जातो.

**दौलत०**–(पुढें येऊन) अरेरे! हेच का आमचे वीरमणी ? रणमैदानांत सर्व शिपाई-लोकांच्या शिरोभागीं ज्यावेळीं हे उभे राहत त्यावेळीं त्यांचे ते डोळे वीरश्रीनें चढून जाऊन रोहिणीच्या ताऱ्याप्रमाणें चमकत असत. पण तेच डोळे आतां सर्वस्वी या शृंगारसुंदरीचा माषुक चेहरा पाहण्यांतच आपलें कर्तव्यसर्वस्व आहे, असें समजून तिच्या मागून मागून फिरत असतात. त्यांची ती रुंद छाती लढाईच्या वेळीं शौर्याच्या स्फुरणानें इतकी फुगून जाई कीं तिच्यावरील चिलखताच्या कड्या तटातट तुटून जाव्या. तीच छाती आतां माझी मिया रागावेल कीं काय या धास्तीनें आणि तिची कामेच्छा कोणत्या तऱ्हेनें तृप्त करावी या काळजीनें धगधगत असते. काय करावें यांच्या या वेडाला ? तरी पण मागचा तो वीरमणी अगदीं नाहींसा झाला नाहीं. मघांशींच ते अगदीं रडायच्या घाईला आले होते. आपल्या या मूर्खपणाचा त्यांना पश्चात्ताप झाला होता, पण या चांडाळणीनें येऊन सारा घात केला. तरी पण पुनः प्रयत्न करून पाहिल्याशिवाय सोडायचें नाहीं. हरहुन्नर लढवून मी माझ्या वीरमणींना परत घेऊन जाईन, कध्धीं सोडणार नाहीं. [ जातो.

---

**प्रवेश ४ था.–वीरमणीचा महाल.**

**वीरमणी** पत्र वाचीत प्रवेश करतो.

**वीर०**–खरें असेल का हें? पण शंकाच नको. ती या वीरमणीला सोडून परलोकाला गेली असल्यास त्यांत नवल नाहीं. खरोखरीच तिचा तो थोर आत्मा या वाणेरड्या वस्तूंनीं व दुष्ट माणसांनीं भरलेल्या जगाला कंटाळून वरतीं निरंतर सुखोपभोग घेण्यासाठीं गेला असावा. वास्तविकपणें पाहतां तिला मीं मारली. सर्वस्वीं तिला सुख देण्याकरितां तिच्याशीं मीं लग्न लावलें आणि अखेरीस तिला सोडून देऊन या इकडे चैन भोगीत येऊन राहिलोंना. तिच्या त्या थोर आणि मजवर निष्कृत्रिम प्रेम ठेवणाऱ्या मनाला कसें हें सहन व्हावें ! मालती, तूं खरी पतिव्रता. मी केवढा अभागी ! असलें रत्न हातीं मिळालें असून त्याची किंमत न ओळखतां उकिरड्यावर तें फेकून दिलेंना ! देवा, ती जर आतां मला परत मिळेल तर तिच्यासाठीं काय पाहिजे तें मी देईन. ज्या हातांनीं तिला दूर ढकलून दिली तेच हात ती परत यावी ह्मणन कसे आतुरतेनें पुढें सरताहेत. पण ती परत मिळावी इतकें कोठें आहे माझें नशीब ! ईश्वरा, तुझा न्याय सर्वथा मला मान्य आहे ! माणसांवर तूं कृपा करून त्यांना मौल्यवान देणग्या देतोस; पण आह्मी बेअकली त्यांना जर झुगा-

रून देतों तर आह्मांला शुद्धीवर आणण्याला याहून अधिक योग्य मार्गच नाहीं. त्या नाहींशा झाल्या ह्मणजे मग तूं आमचे डोळे उघडून व्यर्थ हळहळ करीत बसण्याची शिक्षा देतोस हेंच रास्त. असो; माझ्या बायकोचा मृत्यु हा माझ्यावर धावून येणाऱ्या हजारों संकटांचा पायाच. या मोहिनीच्या तावडींतून जर मी निसटलों नाहीं तर पुढें कसले प्रसंग गुदरतील याचा अंदाज देखील करतां येत नाहीं. अधीरसिंग!

अधीरसिंग येतो.

**अधीर०**—जी सरकार!

**वीर०**—दौलतसिंग कोठें आहे?

**अधीर०**—महाराज, तो महिषपुराहून आलेल्या जासुदाबरोबर बोलत बोलत कोठेंसा गेला.

**वीर०**—बरें आहे. तूं जा आणि त्याला शोधून काढून येथून कूच करण्याची ताबडतोब तयारी करा. बरोबर नेमकीं पन्नास साठ माणसें घ्या. प्रवास फार जरुरीनें करायचा आहे.

**अधीर०**—सरकार, इतक्या जरुरीनें कोठें जायचें? येथला संसार आपल्याच्यानें तर सोडवणार नाहीं. आणि सोडायचा झालाच तर निदान वर्ष दोन वर्षें तरी निरवानिरव करायला लागतील.

**वीर०**—अरे माझी पत्नी मालती वारली!

**अधीर०**—खरें कीं काय? तर मग म्हणतों या जगावर देखरेख करणारा व मनुष्याचें हित चिंतणारा कोणी तरी देव आहे खरा. सरकार, फार उत्तम झालें. एक पीडा गेली. या बातमीबद्दल साखरच वांटली पाहिजे. केवढे त्याचे आपल्यावर उपकार हे! अहो, फाटका चोळणा गेला आणि झगझगीत भरजरीची सुरवार मिळाली! वाः खरेंच फारच जबर दुःखाचा प्रसंग हा? आपण हा कसा सहन करणार! महाराज, आपल्या दुःखाच्या अश्रूंचे पाट अजून नाहीं वाहायला लागले ते. कांदा तरी आणून देऊं का?

**वीर०**—अरे, पुरे कर हा चावटपणा! मला येथून गेलेंच पाहिजे.

**अधीर०**—सरकार, गेलेंच पाहिजे असें काम असलें तर मरूं देत या बायका. जरूरीच्या कामापुढें यांची किंमत नाहीं. पण इतकें खरें कीं, आपण जर गेलों तर येथल्या साऱ्या बायकांनीं आपापले प्राण टाकलेच समजा;—केवढी ही स्त्रीहत्या!—जिकडे तिकडे त्यांचीं प्रेतेंच प्रेतें पडून राहतील! त्या बिचाऱ्या यमदूतांवर तरी कांहीं दया करा.

**वीर०**—नको आतां जास्त बोलूं. या बायकांच्या नादानेंच आह्मीं अगदीं स्त्रैण झालों.

**अधीर०**—पण सरकार, शृंगारसुंदरीबाईसाहेबांची आपल्याला परवानगी मिळेल का? पण परवानगीची गोष्ट काय घेऊन बसलां? त्यांना या बातमीचा नुसता गंध लागूं द्या कीं त्यांच्या त्या लाडक्या प्राणानें मारलीच भरारी! याहींपेक्षां क्षुल्लक कारणासाठीं त्यांचा तो

प्राण दिवसांतून दहा वीस वेळ भुर्रकन् उडून जातांना मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. मला खचित असें वाटतें कीं, त्यांच्यावर यमराजाची स्वारी फिदा आहे ह्मणूनच तो यांना वरचेवर आपलेकडे नेतो आणि परत पाठवितांना यांचें सौंदर्य वाढविणारी एखादी देणगी यांना देतो. हो, असें जर नसतें तर या तरी त्याच्याकडे वरचेवर कशाला धांव मारत्या ?

**वीर०**—अरे, ती महाकपटी आहे. तिच्या कपटाचा थांग तुझ्या माझ्यासारख्या भोळ्या लोकांना लागायचा नाहीं.

**अधीर०**—तोबा तोबा, महाराज. काय हें? त्यांनीं ज्या प्रेमाच्या जाळ्यांत आपल्याला घेरून टाकलें आहे त्या जाळ्याचा प्रत्येक धागा निष्कपट प्रेमरूप भावनेचा केलेला आहे. त्या ज्या अश्रूंचा पाऊस आणि सुस्कार्‍यांचें वादळ करून सोडतात हीं जर कपटाचीं ह्मणावीं तर मग इंद्राप्रमाणें त्यांच्याही अंगीं पाऊस पाडण्याची आणि वादळें उत्पन्न करण्याची शक्ति आहे. मात्र पावसाचें भविष्य ज्योतिषी करतात तसें यांच्या या नेत्रांतील पावसाचें भविष्य अंतःकरणाचीं क्षणांत पालटणारीं स्थित्यंतरें जाणणार्‍या वस्ताद इंगितज्ञालाही वर्तवतां येणार नाहीं.

**वीर०**—ती माझ्या दृष्टीस पडली नसती तर बरें झालें असतें.

**अधीर०**—वाः मग जगांतली एक अप्रतिम वस्तु आपण पाहिल्याशिवाय ठेविली असती. आणि मग आपल्या येवढ्या मोठ्या प्रवासाचें काय चीज झालें असतें ?

**वीर०**—पुरे, पुरे, जास्त बोलूं नको. मीं सांगितल्याप्रमाणें तजवीज कर जा.

**अधीर०**—जी हुकूम. [ जातो.

**वीर०**—आतां जाऊन शृंगारसुंदरीचा निरोप घेतला पाहिजे. ती काय आकांत करील कोण जाणे ! पण तें कांहीं होवो. हिच्यापासून आपली सुटका करून घेतलीच पाहिजे.

## प्रवेश ५ वा.—शृंगारसुंदरीचा महाल.

शृंगारसुंदरी, मोहना, मदीरा.

**शृंगार०**—आजही ते पुनः कोठेंसे गेले आहेत. काय बाई करूं ? मला किनई कांहीं सुचत नाहीं.

**मोहना**—सतार आणूं का बाईसाहेब ? जरा घटकाभर वाजवीत बसलां तर चैन तरी पडेल.

**मदीरा**—नाहीं तर वीणकामाची ती करंडी आणूं का ? आपण महाराजांच्या शेल्यावर जरीची वेलबुट्टी काढतां आहां ती तशीच पुरी व्हायची राहिली आहे.

**शृंगार०**—छेग. तें कांहीं नको. माझ्याच्यानें तें कांहीं व्हायचें नाहीं. छेः बाई, यांनीं माझें मन अगदींच वेडें करून सोडलें आहे.—पण अजून तो मेला गुलाब कां येईना ?

**मदीरा**—तो पहा बाईसाहेब आला. अगदीं मेल्याला शंभर वर्षें आयुक्ष आहे !

गुलाब येतो.

**शृंगार०**—कायरे, सांपडले का तुला ते ?

कोठें होते ? काय करीत होते ? दुःखांत होते का आनंदांत होते ? दुःखांत खचित नसतील, कारण त्यांना दुःख झाल्याबरोबर माझ्या जिवाला दुःख झाल्याशिवाय कसें राहील? पण आनंदांत तर ते खास नसावेत. कारण माझ्याजवळ नसतां त्यांना आनंद तरी कसा होणार ?—मेल्या, बोल लवकर. चांडाळा, तुझी बत्तिशी बसली कीं काय ? थांब ती उघडतें पहा.

**गुलाब**—नग, नग, बाईसाब. आपला दरारा अक्षी इक्ता हाय कीं मी मरून लाकडावानी ताटलो असलो तरी बाईसाब आपला हुकूम व्हताच मी ताटकन् उभा न्हाईन. काळालाबी आपला हुकूम मानावा लागल.

**मोहना**—मला वाटतें कीं आमच्या बाईसाहेबांना केव्हां आपल्या पुरीला घेऊन जाईन असें त्या मेल्या यमाला झालें असेल. पण बाईसाहेबांचें नशीब असें जोरावर आहे कीं त्या त्याच्या तावडींत कधींच सांपडायच्या नाहींत.

**मदीरा**—मी तर ह्मणतें कीं, बाईसाहेबांच्या मर्जीला आल्याशिवाय त्यांना येथून नेण्याची कोणाची छाती आहे ! आणि त्यांना जगाचा व येथील ऐश्वर्याचा कंटाळा आला कीं त्यांना श्रीकृष्ण अशाच्या अशाच वरती घेऊन जाईल. त्या यमाच्या घाणेरड्या पुरींत का या जाणार ?

**शृंगार०**—किती वटवट करतांग ? गुलाब, बोल बोल लवकर. तूं माझा निरोप त्यांना कळवलास का ?

**गुलाब**—आईसाब, मी समद्या वाड्यांत हकडतकड त्यांना धुंडल. घोडदौड, कवायती मैदान, तोपखाना, शिपाईवाडा, स्वारचौक, मोदीखाना, हत्यारकोठी, तालीमखाना, कसरत आखाडा, पीलखाना, गानसाळा, नाटकसाळा, संमर्दीं पालथीं घातलीं बगा.

**शृंगार०**—पण ते कोठें सांपडले कीं नाहीं?

**गुलाब**—थत कुठ सांपडल न्हाईत, पण ह्यो गुलाब गेल्यावर त्येंना सोधून काढल्या बिगार न्हानार व्हय ?

**शृंगार०**—मग ते कोठें आहेत ?

**गुलाब**—आन् त्येंच सांगतुया न्हव का ? अखिर ते बसंत चौकांत आपल्या मालतीम्हालांत बसल्याल म्यां बगितल आन् तसाच धुम ठोकीत आलो.

**शृंगार०**—माझ्या सवतीच्या नांवच्या महालांत ? मोहने, हें चिन्ह कांहीं चांगलें दिसत नाहीं.

**मोहना**—होय, बाईसाहेब. आपण त्यांना एखादे वेळ चिडविलें ह्मणजे ते रागारागानें त्याच महालांत जाऊन बसतात.

**शृंगार०**—कायरे, ते काय करिताहेत तेथें?

**गुलाब**—कायबी न्हाई बाईसाब. डाव्या हातावर डोसक ठेवूनशान् कायबी आपल्याशींच इचार करीत बसल हायती. आन् बाईसाब, त्येंचा तो इजयगिरीचा दौलतसिंग आन् अधीरसिंग बी थतच कांहीं बांधाबांध करीत व्हत. मला वाटत ते निघून जाण्याच्या बेतांत

हायत. म्हुनं मी आपला निरोप त्येंना न कळवितां तसाच निघून आलो बगा.

**शृंगार०**—मोहने, माझ्या छातींत बाई धस्स होऊं लागलें आहे. अग हा मोहरा हातचा जाणार अशी बाई मला धास्ती वाटते.

**मोहना**—बाईसाहेब, आपण त्यांच्याकडे जावें आणि त्यांना जी मिठी मारावी ती कांहीं केल्या सोडूंच नये.

**मदीरा**—खरेंच बाईसाहेब. असेंच करावें. मग आपली मिठी त्यांच्यानें कांहीं सोडवणार नाहीं.

**शृंगार०**—नाहीं, अग, तसें नाहीं. त्यांना जाऊं दे. माझा वियोग कांहीं दिवस त्यांना झाल्याशिवाय या शृंगारसुंदरीची त्यांना किंमत कळणार नाहीं. फार दिवस सहवास झाला कीं मग तें माणूस नकोसें वाटूं लागतें. माझ्यापासून ते जसजसे दूर जातील तसतसें त्यांचें मन माझ्याकडे अधिक ओढ घेऊं लागेल.

**गुलाब**—व्हय सरकार. सरकारचं बोलनं अक्षी खरं, लाख रुपयाचं. आन् त्ये तडक गेलं म्हंजी सरकारांनीं दुसराच येक फक्कड बगावा आन् तेच्यावर आपलं मन लई जडलंया असं दावावं म्हंजी ह्ये ईरमणी कस कुत्र्यावाणी धावत येत्यात ते बगा तर सई.

**शृंगार०**—चूप. फाजील नाहीं तर. अरे, त्या चंद्राशीं या रोहिणीचा संबंध झाला तिनें एखाद्या काजव्यावर, लटकी का होईना, मेहेरबानी करायची ? मूर्ख कोठचा.

**गुलाब**—ऱ्हायलं बाईसाब. माझ्या अकलेपरमान मी आपल्यासनी सुचावलं. व्होवं तर घ्या न्हाई तर द्या टाकून. माझं काय जातं ?

**शृंगार०**—गुलाब, तूं जा त्यांच्याकडे आणि त्यांना सांग कीं शृंगारसुंदरीची तब्येत एकाएकीं फार बिघडली आहे—आणि कसेंही करून त्यांना घेऊन ये.

**गुलाब**—जी बाईसाब. [ जातो.

**शृंगार०**—मदीरे, तूं सामुद्रिकबोवांकडे जा आणि त्यांना अर्ध्या घटकेनें माझ्याकडे घेऊन ये. महाराज येऊन गेल्यावर मग हो. [ **मदीरा** जाते.

**मोहना**—बाईसाहेब, मला वाटतें महाराज आपल्यावर रागावून जाताहेत. आपण नेहमीं त्यांना चिडवितां हें कांहीं ठीक नाहीं. त्यांच्या मर्जीचा कल पाहून वागावें तें सोडून आपली तऱ्हा कांहीं विलक्षणच.

**शृंगार०**—अग, तूं वेडी आहेस. तूं ह्मणतेस तशी मी वागलें असतें तर त्यांना केव्हांच माझा वीट येऊन ते निघून गेले असते. मर्जीप्रमाणें वागणें ह्मणजे आधीन होणें. जी एकदा आधीन झाली तिला मग कोण विचारतो ? अग ते जातात कोठें ? मी सांगतें तुला. कांहीं तरी राजकारण असेल. पण गुलाब आलाच वाटतें.

गुलाब येतो.

**गुलाब**—बाईसाब, सरकारस्वारी आलीच.

**शृंगार०**—मोहने, माझें कपाळ चेपीत बैस. गुलाब, त्या पंख्यानें वारा घाल.

**वीरमणी** येतो.

**वीर०**—अग, सिंधुदेशचे नागिणी, काय झालें तुला ? अग वर बघ. हा तुझा वीरमणी आला आहे. आं! ही कांहींच बोलत नाहीं. मला वाटतें हिला फारच त्रास होतो आहे.

**मोहना**—महाराज, मघां काय झालें कोण जाणें! बाईसाहेब एकदम डोळे फिरवून ओरडल्या, “ अग ते पहा माझे वीरमणी चालले ” आणि त्यांनीं किंचाळी फोडली आणि लगेच या अशा पडल्या.

**वीर०**—बरें आहे, तुम्ही व्हा बाजूला. मी आणतो तिला शुद्धीवर. ( तिच्याजवळ बसून तिचें डोकें आपल्या दंडावर घेऊन ) लाडके, ऊठ, डोळे उघड. छेः मी जाणार हें तिच्या जिवानें अगोदरच जाणलें. ह्मणतात तें खरें कीं एकमेकावर अत्यंत प्रीति असली ह्मणजे एकाच्या जिवाला कांहीं कमीजास्त झालें कीं तो कितीही दूर असला तरी दुसऱ्याला तें आपोआप कळतें. खरोखरच हिचा सारा जीव माझ्यावर लटकून राहिलेला. हिला सोडून गेलों तर मागें हिचें कसें होईल ? पण नको तो विचार; नाहीं तर मी पुनः वेडा बनेन. शृंगारसुंदरी, अग शुद्धीवर ये. काय हें?

**शृंगार०**—( डोळे न उघडतां ) अग मोहने, माझें डोकें खालीं ठेव. गेलेना ते मला टाकून ?

**वीर०**—अग, मी गेलों नाहीं. हा तुझ्या सेवेला तत्पर आहे पहा.

**शृंगार०**—कोण तें ? ( डोळे उघडून ) आपण कीं काय ? अगबाई ! तर मग मीं तें सारें स्वप्नांत पाहिलें ह्मणायचें.

**वीर०**—हो, अजून तरी निदान तें स्वप्नच आहे.

**शृंगार०**-ह्मणजे ?—पण नका, नका बोलूं आपण. मी समजलें. आपण माझा निरोप घ्यायला आला आहांना ? फार उत्तम. मी कोण आपल्याला अडवणार? माझी का आपल्यावर सत्ता आहे? सारी सत्ता मालतीबाईची. त्यांनीं आपल्याला बोलावलें असेल. जावें बरें का, खुशाल जावें. खरेंच सांगतें आपण येथें आलां नसतां तर बरें झालें असतें. ह्मणजे एका भोळ्या मनाच्या अनाथ अबलेचा घात केल्याचें पातक आपल्याला लागलें नसतें. कोणग बाई हें कृत्रिम !

**वीर०**—शृंगारसुंदरी, देवाशपथ !—

**शृंगार०**—नका, त्याला कशाला उगीच पापांत घालतां ? मालतीबाई तुमच्यापासून मीं यांना चोरलें आणि तुमच्या सुखावर घाला घातला त्याचें बक्षीस मला चांगलें मिळालें बरें !

**वीर०**—लाडके, माझें ह्मणणें तरी ऐक—

**शृंगार०**—काय ऐकायचें आहे ? ज्या शब्दांच्या योगांनीं आपण जगविख्यात योद्धे शुद्ध कपटी गळेकापू आणि विश्वासघातकी बनणार ते शब्दच नकोत मला ऐकायला. जेव्हां मनांतून येथें रहायचें होतें तेव्हां शृंगारसुंदरी, तुझ्यासारखी भाग्यवान् तूंच. त्यावेळीं तुझ्या डोळ्यांत आणि चेहऱ्यांत काय तें सर्व विश्व भरलें होतें. इकडचा सर्व

हायत. म्हुनं मी आपला निरोप त्येंना न कळवितां तसाच निघून आलों बगा.

**शृंगार०**—मोहने, माझ्या छातींत बाई धस्स होऊं लागलें आहे. अग हा मोहरा हातचा जाणार अशी बाई मला धास्ती वाटते.

**मोहना**—बाईसाहेब, आपण त्यांच्याकडे जावें आणि त्यांना जी मिठी मारावी ती कांहीं केल्या सोडूंच नये.

**मदीरा**—खरेंच बाईसाहेब. असेंच करावें. मग आपली मिठी त्यांच्यानें कांहीं सोडवणार नाहीं.

**शृंगार०**—नाहीं, अग, तसें नाहीं. त्यांना जाऊं दे. माझा वियोग कांहीं दिवस त्यांना झाल्याशिवाय या शृंगारसुंदरीची त्यांना किंमत कळणार नाहीं. फार दिवस सहवास झाला कीं मग तें माणूस नकोसें वाटूं लागतें. माझ्यापासून ते जसजसे दूर जातील तसतसें त्यांचें मन माझ्याकडे अधिक ओढ घेऊं लागेल.

**गुलाब**—व्हय सरकार. सरकारचं बोलनं अक्षी खरं, लाख रुपयाचं. आन् त्ये तडक गेल म्हंजी सरकारांनीं दुसराच येक फक्कड बगावा आन् तेच्यावर आपलं मन लई जडलंया असं दावावं म्हंजी स्ये ईरमणी कस कुत्र्यावाणी धावत येत्यात ते बगा तर सई.

**शृंगार०**—चूप. फाजील नाहीं तर. अरे, त्या चंद्राशीं या रोहिणीचा संबंध झाला तिनें एखाद्या काजव्यावर, लटकी का होईना, मेहेरबानी करायची ? मूर्ख कोठचा.

**गुलाब**—व्हायलं बाईसाब. माझ्या अकलेपरमान मी आपल्यासनी सुचावलं. व्होवं तर घ्या न्हाई तर द्या टाकून. माझं काय जातं ?

**शृंगार०**—गुलाब, तूं जा त्यांच्याकडे आणि त्यांना सांग कीं शृंगारसुंदरीची तब्येत एकाएकीं फार बिघडली आहे—आणि कसेंही करून त्यांना घेऊन ये.

**गुलाब**—जी बाईसाब. [ जातो.

**शृंगार०**—मदीरे, तूं सामुद्रिकबोवांकडे जा आणि त्यांना अर्ध्या घटकेनें माझ्याकडे घेऊन ये. महाराज येऊन गेल्यावर मग हो. [ मदीरा जाते.

**मोहना**—बाईसाहेब, मला वाटतें महाराज आपल्यावर रागावून जाताहेत. आपण नेहमीं त्यांना चिडवितां हें कांहीं ठीक नाहीं. त्यांच्या मर्जीचा कल पाहून वागावें तें सोडून आपली तऱ्हा कांहीं विलक्षणच.

**शृंगार०**—अग, तूं वेडी आहेस. तूं ह्मणतेस तशी मी वागलें असतें तर त्यांना केव्हांच माझा वीट येऊन ते निघून गेले असते. मर्जीप्रमाणें वागणें ह्मणजे आधीन होणें. जी एकदा आधीन झाली तिला मग कोण विचारतो ? अग ते जातात कोठें ? मी सांगतें तुला. कांहीं तरी राजकारण असेल. पण गुलाब आलाच वाटतें.

गुलाब येतो.

**गुलाब**—बाईसाब, सरकारस्वारी आलीच.

**शृंगार०**—मोहने, माझें कपाळ चेपीत बैस. गुलाब, त्या पंख्यानें वारा घाल.

**वीरमणी** येतो.

**वीर०**—अग, सिंधुदेशचे नागिणी, काय झालें तुला ? अग वर बघ. हा तुझा वीरमणी आला आहे. आं! ही कांहींच बोलत नाहीं. मला वाटतें हिला फारच त्रास होतो आहे.

**मोहना**—महाराज, मघां काय झालें कोण जाणें! बाईसाहेब एकदम डोळे फिरवून ओरडल्या, " अग ते पहा माझे वीरमणी चालले " आणि त्यांनीं किंचाळी फोडली आणि लगेच या अशा पडल्या.

**वीर०**—बरें आहे, तुम्ही व्हा बाजूला. मी आणतो तिला शुद्धीवर. ( तिच्याजवळ बसून तिचें डोकें आपल्या दंडावर घेऊन ) लाडके, ऊठ, डोळे उघड. छेः मी जाणार हें तिच्या जिवानें अगोदरच जाणलें. ह्मणतात तें खरें कीं एकमेकावर अत्यंत प्रीति असली ह्मणजे एकाच्या जिवाला कांहीं कमीजास्त झालें कीं तो कितीही दूर असला तरी दुसऱ्याला तें आपोआप कळतें. खरोखरच हिचा सारा जीव माझ्यावर लटकून राहिलेला. हिला सोडून गेलों तर मागें हिचें कसें होईल ? पण नको तो विचार; नाहीं तर मी पुनः वेडा बनेन. शृंगारसुंदरी, अग शुद्धीवर ये. काय हें?

**शृंगार०**—( डोळे न उघडतां ) अग मोहने, माझें डोकें खालीं ठेव. गेलेना ते मला टाकून ?

**वीर०**—अग, मी गेलों नाहीं. हा तुझ्या सेवेला तत्पर आहे पहा.

**शृंगार०**—कोण तें ? ( डोळे उघडून ) आपण कीं काय ? अगबाई ! तर मग मीं तें सारें स्वप्नांत पाहिलें ह्मणायचें.

**वीर०**—हो, अजून तरी निदान तें स्वप्नच आहे.

**शृंगार०**-ह्मणजे ?—पण नका, नका बोलूं आपण. मी समजलें. आपण माझा निरोप घ्यायला आला आहांना ? फार उत्तम. मी कोण आपल्याला अडवणार? माझी का आपल्यावर सत्ता आहे? सारी सत्ता मालतीबाईची. त्यांनीं आपल्याला बोलावलें असेल. जावें बरें का, खुशाल जावें. खरेंच सांगतें आपण येथें आलां नसतां तर बरें झालें असतें. ह्मणजे एका भोळ्या मनाच्या अनाथ अबलेचा घात केल्याचें पातक आपल्याला लागलें नसतें. कोणग बाई हें कृत्रिम !

**वीर०**—शृंगारसुंदरी, देवाशपथ !—

**शृंगार०**—नका, त्याला कशाला उगीच पापांत घालतां ? मालतीबाई तुमच्यापासून मीं यांना चोरलें आणि तुमच्या सुखावर घाला घातला त्याचें बक्षीस मला चांगलें मिळालें बरें !

**वीर०**—लाडके, माझें ह्मणणें तरी ऐक—

**शृंगार०**—काय ऐकायचें आहे ? ज्या शब्दांच्या योगांनीं आपण जगविख्यात योद्धे शुद्ध कपटी गळेकापू आणि विश्वासघातकी बनणार ते शब्दच नकोत मला ऐकायला. जेव्हां मनांतून येथें रहायचें होतें तेव्हां शृंगारसुंदरी, तुझ्यासारखी भाग्यवान् तूंच. त्यावेळीं तुझ्या डोळ्यांत आणि चेहऱ्यांत काय तें सर्व विश्व भरलें होतें. इकडचा सर्व

कामधंदा, सर्व कारभार काय तो येथेंच ! तुझ्या शरीरांत नखशिखांत आनंद भरलेला ! कितीही घुटके घेतले तरी इकडची तृप्ति व्हायची नाहीं. तुझ्या लावण्यापैकीं अगदीं क्षुद्र भाग देखील अप्सरांनीं हेवा करण्यासारखा !—

**वीर०**—शृंगारसुंदरी; हें नीट नाहीं !

**शृंगार०**—काय सांगूं हो ? मला आपलें पौरुष पाहिजे होतें ह्मणजे पाहिलें असतें आपण येथून कसे निघत होतां तें.

**वीर०**—माझें ह्मणणें नीटपणीं ऐकून घे. विजयगिरीहून पत्रें आलीं आहेत त्यांत माझे जिवलग मित्र असें लिहितातः जयेंद्रपालानें तिकडे फार हरामखोरी चालविली आहे. माझी तो नालस्ती करून माझा सर्वस्वीं घात करूं पाहत आहे. माझ्या चुलत भावानें त्याच्याशीं लढाई सुरू केली आहे व त्या कामीं त्याला माझें साहाय्य पाहिजे आहे. मी दूर असल्यामुळें लोकांचीं मनें माझ्यावरून उडून त्या जयेंद्रपालावर बसत आहेत व तो याचा पूर्ण फायदा करून घेत आहे. लोकांनीं याच्याहून शंभरपटीनें अधिक किमतीचा याचा बाप जिवंत असतां त्याचे हेतु पूर्ण होऊं दिले नाहींत, तेच लोक आतां याच्या बापाचे गुण आठवून, याच्या अवगुणांकडे न पाहतां बापाला न मिळूं दिलेला मान याला देऊं पाहत आहेत. वगैरे पुष्कळ मजकूर त्या पत्रांत आहे. हा सर्व घोटाळा मी तिकडे गेल्याशिवाय मिटणार नाहीं. आणखी दुसरें एक असें मोठें कारण आहे कीं तें ऐकल्यावर तूं मला जाऊं नका असें मुळींच ह्मणणार नाहींस.

**शृंगार०**—कोणतें बरें तें असें मोठें कारण ?

**वीर०**—अग, माझी स्त्री मालती वारली.

**शृंगार०**—अबबब, कोणी ह्मणेल खरेंच ! हें पहा मी वेडी तर खरीच—हो, तशी नसते तर अशी यांच्या आधीन होऊन कां राहिलें असतें ?—तरी पण मी अगदीं बोल्यानें दूध पीत नाहीं, समजलां ? मालतीबाई आणि वारल्या—छेः कोणाचा भरंवसा बसेल यावर ?

**वीर०**—अग, हें अगदीं खरें आहे ? नको आतां हा कोरडा विनोद !

**शृंगार०**—खरेंच का त्या मेल्या ? अरे देवा, आणि हें आपण मला कोरडच्या डोळ्यांनीं सांगतांना ? अश्रूंचे पाटच्या पाट वाहायला पाहिजे होते पण निदान एक टिपूस तरी आहे का इकडच्या डोळ्यांत ? शृंगारसुंदरी, पाहिलेंस हें. तुझ्या मागें तुझ्याबद्दल किती दुःख होईल हें यावरूनच समजून घे.

**वीर०**—अग, पुरे ह्मणतोना आतां हा विनोद. मी जो आतां येथून जाणार तो तुझा बंदा गुलाम, तुझा सरदार ह्मणून. लढाई करणें, तह करणें हें सारें तुझ्या मर्जीवर अवलंबून आहे. तूं सांगशील त्याप्रमाणें मी वागणार. आतां मागें मला कसला पाश राहिला नाहीं. माझें सर्वस्व कांहीं तूंच आहेस.

**शृंगार०**—अग मोहने, मला पंख्यानें थोडा वारा तरी घाल. मला वाटतें आतां कि-

नई मला हर्षवायू होईल.—अग पण नको. मला पांघरूण घाल. महाराजांच्या लहरीप्रमाणें माझी तब्येतही लहरी बनली आहे.

**वीर०**—काय हें शृंगारसुंदरी ? माझ्या प्रीतीबद्दल संशय ? अग, हें अंतःकरण अगदीं निष्कपट आहे बरें.

**शृंगार०**—वाः यांत काय संशय ! राज्यकारस्थानी पुरुषांना कपट कोठून येणार ? मालतीबाई नव्हत्या का आपल्या लग्नाच्या पत्नी ? आणि त्या मरून—

**वीर०**—बस्स, बस्स आतां हें.

**शृंगार०**—शाबास, काय पण रागाची बतावणी चालली आहे. अशीच दुःखाचीही बतावणी कराना ? आणि मालतीबाईच्या मरणानें आपल्याला दुःख झालें आहे असें लोकांना सांगा आणि मला ह्मणा कीं तुझ्या वियोगाकरितांच हे अश्रू आहेत.

**वीर०**—नाहीं ऐकत तूं माझें ?

**शृंगार०**—आतांची ही बतावणी मघांपेक्षांही चांगली ! कायग मोहने ?

**वीर०**—बस्स ! हें फार झालें. मला नाहीं सहन व्हावयाचें हें. तुला माझ्याशीं नीट बोलायचें नसेल तर—

**शृंगार०**—महाराज, माफ करा. माझा हा विनोद आपल्याला आवडत नाहीं का? देतें टाकून तर तो. कारण माझा जो जो गुण आपल्याला आवडत नाहीं तो तो गुण मग मला तरी घेऊन काय करायचें आहे ? केवळ आपल्या जिवाकरितां हा जीव बाळगला आहे. आपल्याला जें आवडेल तेंचं मला करायचें. हा विनोद मी करीत होतें खरी; पण आपण जाणार हें ऐकल्यापासून या अंतःकरणांत जी कांहीं कालवाकालव झाली आहे ती सांगतां पुरवत नाहीं. ती असो मेली. आतां काय त्याचें ?—आपण जाणार—देवा, ही मूर्ति डोळ्यांसमोरून दूर होणारना ? मग या शृंगारसुंदरीचा जीव कसा राहवा!—खरेंच आपलें एकमेकांचें प्रेम—छेः बाई, मी कांहीं हें बोलणार नव्हतें—काय ह्मणणार होतें कोण जाणे !—यावेळीं आपला माझा वियोग होणार—देवा !

[ त्याच्या अंगावर मान टाकते.

**वीर०**—काय प्रेम हें !—खरोखरच असलें रत्न मोठ्या पुण्याईवांचून कोणाला मिळायचें नाहीं.

**शृंगार०**—मी ह्मणतें, आपण जाणारच तर बरोबर आमच्या सामुद्रिकबोवांना घेऊन जा. जयेंद्रपाळ आहे मोठा कपटी. तेथें आपले सगळे शत्रू. सामुद्रिकबोवा जवळ असले ह्मणजे ते आपल्याला वरचेवर कोणापासून भय आहे हें सुचवितील.

**वीर०**—ठीक आहे. पण प्रिये, आतां एकदां—

[ पडदा पडतो.

पहिला अंक समाप्त.

---

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला—विजयगिरी—जयेंद्रपाळाचा वाडा.

जयेंद्रपाळ इकडे तिकडे फिरतो आहे.

**जयेंद्रपाल**—काय करावें, अजून बेत रं-

कामधंदा, सर्व कारभार काय तो येथेंच! तुझ्या शरीरांत नखशिखांत आनंद भरलेला! कितीही घुटके घेतले तरी इकडची तृप्ति व्हायची नाहीं. तुझ्या लावण्यापैकीं अगदीं क्षुद्र भाग देखील अप्सरांनीं हेवा करण्यासारखा!—

वीर०—शृंगारसुंदरी; हें नीट नाहीं!

शृंगार०—काय सांगूं हो? मला आपलें पौरुष पाहिजे होतें ह्मणजे पाहिलें असतें आपण येथून कसे निघत होतां तें.

वीर०—माझें ह्मणणें नीटपणीं ऐकून घे. विजयगिरीहून पत्रें आलीं आहेत त्यांत माझे जिवलग मित्र असें लिहितात: जयेंद्रपालानें तिकडे फार हरामखोरी चालविली आहे. माझी तो नालस्ती करून माझा सर्वस्वीं घात करूं पाहत आहे. माझ्या चुलत भावानें त्याच्याशीं लढाई सुरू केली आहे व त्या कामीं त्याला माझें साहाय्य पाहिजे आहे. मी दूर असल्यामुळें लोकांचीं मनें माझ्यावरून उडून त्या जयेंद्रपालावर बसत आहेत व तो याचा पूर्ण फायदा करून घेत आहे. लोकांनीं याच्याहून शंभरपटीनें अधिक किमतीचा याचा बाप जिवंत असतां त्याचे हेतु पूर्ण होऊं दिले नाहींत, तेच लोक आतां याच्या बापाचे गुण आठवून, याच्या अवगुणांकडे न पाहतां बापाला न मिळूं दिलेला मान याला देऊं पाहत आहेत. वगैरे पुष्कळ मजकूर त्या पत्रांत आहे. हा सर्व घोटाळा मी तिकडे गेल्याशिवाय मिटणार नाहीं. आणखी दुसरें एक असें मोठें कारण आहे कीं तें ऐकल्यावर तूं मला जाऊं नका असें मुळींच ह्मणणार नाहींस.

शृंगार०—कोणतें बरें तें असें मोठें कारण?

वीर०—अग, माझी स्त्री मालती वारली.

शृंगार०—अबबब, कोणी ह्मणेल खरेंच! हें पहा मी वेडी तर खरीच—हो, तशी नसते तर अशी यांच्या आधीन होऊन कां राहिलें असतें?—तरी पण मी अगदीं बोळ्यानें दूध पीत नाहीं, समजलां? मालतीबाई आणि वारल्या—छेः कोणाचा भरंवसा बसेल यावर?

वीर०—अग, हें अगदीं खरें आहे? नको आतां हा कोरडा विनोद!

शृंगार०—खरेंच का त्या मेल्या? अरे देवा, आणि हें आपण मला कोरड्या डोळ्यांनीं सांगतांना? अश्रूंचे पाटच्या पाट वाहायला पाहिजे होते पण निदान एक टिपूस तरी आहे का इकडच्या डोळ्यांत? शृंगारसुंदरी, पाहिलेंस हें. तुझ्या मागें तुझ्याबद्दल किती दुःख होईल हें यावरूनच समजून घे.

वीर०—अग, पुरे ह्मणतोना आतां हा विनोद. मी जो आतां येथून जाणार तो तुझा बंदा गुलाम, तुझा सरदार ह्मणून. लढाई करणें, तह करणें हें सारें तुझ्या मर्जीवर अवलंबून आहे. तूं सांगशील त्याप्रमाणें मी वागणार. आतां मागें मला कसला पाश राहिला नाहीं. माझें सर्वस्व कांहीं तूंच आहेस.

शृंगार०—अग मोहने, मला पंख्यानें थोडा वारा तरी घाल. मला वाटतें आतां कि-

नई मला हर्षवायू होईल.—अग पण नको. मला पांघरूण घाल. महाराजांच्या लहरीप्रमाणें माझी तब्येतही लहरी बनली आहे.

**वीर०**—काय हें शृंगारसुंदरी? माझ्या प्रीतीबद्दल संशय? अग, हें अंतःकरण अगदीं निष्कपट आहे बरें.

**शृंगार०**—वाः यांत काय संशय! राज्यकारस्थानी पुरुषांना कपट कोठून येणार? मालतीबाई नव्हत्या का आपल्या लग्नाच्या पत्नी? आणि त्या मरून—

**वीर०**—बस्स, बस्स आतां हें.

**शृंगार०**—शाबास, काय पण रागाची बतावणी चालली आहे. अशीच दुःखाचीही बतावणी कराना? आणि मालतीबाईंच्या मरणानें आपल्याला दुःख झालें आहे असें लोकांना सांगा आणि मला ह्मणा कीं तुझ्या वियोगाकरितांच हे अश्रू आहेत.

**वीर०**—नाहीं ऐकत तूं माझें?

**शृंगार०**—आतांची ही बतावणी मघांपेक्षांही चांगली! कायग मोहने?

**वीर०**—बस्स! हें फार झालें. मला नाहीं सहन व्हावयाचें हें. तुला माझ्याशीं नीट बोलायचें नसेल तर—

**शृंगार०**—महाराज, माफ करा. माझा हा विनोद आपल्याला आवडत नाहीं का? देतें टाकून तर तो. कारण माझा जो जो गुण आपल्याला आवडत नाहीं तो तो गुण मग मला तरी घेऊन काय करायचें आहे? केवळ आपल्या जिवाकरितां हा जीव बाळगला आहे. आपल्याला जें आवडेल तेंच मला करायचें. हा विनोद मी करीत होतें खरी; पण आपण जाणार हें ऐकल्यापासून या अंतःकरणांत जी कांहीं कालवाकालव झाली आहे ती सांगतां पुरवत नाहीं. ती असो मेली. आतां काय त्याचें?—आपण जाणार—देवा, ही मूर्ति डोळ्यांसमोरून दूर होणारना? मग या शृंगारसुंदरीचा जीव कसा राहवा!—खरेंच आपलें एकमेकांचें प्रेम—छेः बाई, मी कांहीं हें बोलणार नव्हतें—काय ह्मणणार होतें कोण जाणे!—यावेळीं आपला माझा वियोग होणार—देवा!

[त्याच्या अंगावर मान टाकते.

**वीर०**—काय प्रेम हें!—खरोखरच असलें रत्न मोठ्या पुण्याईवांचून कोणाला मिळायचें नाहीं.

**शृंगार०**—मी ह्मणतें, आपण जाणारच तर बरोबर आमच्या सामुद्रिकबोवांना घेऊन जा. जयेंद्रपाल आहे मोठा कपटी. तेथें आपले सगळे शत्रू. सामुद्रिकबोवा जवळ असले ह्मणजे ते आपल्याला वरचेवर कोणापासून भय आहे हें सुचवितील.

**वीर०**—ठीक आहे. पण प्रिये, आतां एकदां—

[पडदा पडतो.

पहिला अंक समाप्त.

---

# अंक दुसरा.

**प्रवेश १ ला**—विजयगिरी—जयेंद्रपालाचा वाडा.

जयेंद्रपाल इकडे तिकडे फिरतो आहे.

**जयेंद्रपाल**—काय करावें, अजून बेत रं-

गाला येत नाहीं. माझ्या बाबांचा हेत राहून गेला, तो मला पुरा पाडला पाहिजे; त्याशिवाय त्यांच्या आत्म्याला शांति किंवा मुक्ति मिळणें नाहीं. या विजयभुवन देशाची प्रजाही आतां या स्थितीला कंटाळून गेली आहे. राजाशिवाय तिनें आतां किती दिवस काढावे? पतीवांचून स्त्रियांचें जीवित जसें विफल, तसेंच प्रजेला राजावांचून सुख नाहीं. तरी पण त्यांना या सरदारांच्या मूर्ख समजुतींमुळें आणखी किती दिवस या अशा दुःस्थितींत घालवावे लागतील याचा कांहीं नेम नाहीं. येथील सरदारमंडळ ह्मणजे शुद्ध बावळ्यांचा बाजार आहे. त्यांना राजाच्या अंगीं कोणते गुण पाहिजेत हेंच मुळीं कळतें आहे कोठें? ऐश्वर्योपभोग ह्मणजे चैन करणें हीच त्यांची कल्पना. राजकारस्थान, प्रजापालन, अनेक राजकारणी बिकट कोड्यांचा आपल्या अकलेनें उलगडा करणें, होतां होई तों लढाई न करतां प्रसंग पार पाडणें, सामदानादि चार उपायांपैकीं पहिल्या तिहींची योजना शिताफीनें करून चवथ्याचा उपयोग करण्याचा प्रसंगच न येऊं देणें,—इत्यादि कल्पना यांच्या डोक्यांत आजन्मांत यायच्या नाहींत.—नुसता लढाईंत रक्तपात करणारा, आपल्या जिवाकडे न पाहणारा तोच खरा योद्धा हीच यांची समजूत. शौर्याचें मुख्य अंग शहाणपण, तें नसलें तर तें शौर्य काय कामाचें? पण हें या मूर्खांना कळेल तेव्हांना. नाहींतर त्यांनीं आमच्या बाबांना कां मरूं दिलें असतें? अरेरे, काय करूं? त्या घोर कृत्याची आठवण झाली कीं अंगाची कशी लाही होऊन जाते. ज्यांनीं ज्यांनीं त्या थोर सत्पुरुषाचा खून करूं दिला आणि जे त्यावेळीं आनंदानें नाचले त्यांच्या घरांवर जेव्हां नांगर फिरवीन आणि या विजयगिरीच्या उल्लू, उच्छृंखल आणि आडदांड लोकांच्या मानेवर जेव्हां माझ्या करड्या सत्तेचें जड जूं ठेवीन तेव्हांच राहीन!—पण या गोष्टी बोलणें ह्मणजे फुकट तोंडाची वाफ दवडणें होय. कोणतीही गोष्ट करून दाखवावी यांतच खरें पौरुष आहे.

शिपाई येतो.

का, कायरे आहे?

जासूद—सरकार, यादवराव आले आहेत.

जयेंद्र०—ठीक आहे, येऊं दे त्यांना आंत. ( शिपाई जातो. ) हा एक आला महामूर्ख, वीरमणीच्या भक्तांपैकीं. आज किती दिवस याच्या कानांत वीरमणीच्या अवगुणांविषयीं तुतारी वाजवीत आहें. पण याच्या मनावर त्याचा कांहीं परिणाम होईल तर शपथ. हा येथील साऱ्या सरदारांत थेरडा, याचें घराणें जुनाट आणि राजनिष्ठ. याचें दरबारांत वजन विशेष. हा एक जर वळला तर बहुतेक काम झालेंच. पण वीरमणीच्या उलट कांहीं करायचें नांव काढलें कीं हा हटलाच मागें.—पण आज जी युक्ति काढली आहे तिनें याला

चांगला गोत्यांत आणतो. आतां त्या युक्तीपासून माझ्या लाडक्या ताईच्या–

यादवराव येतो.

यावें यादवराव, बसा. का खुशाल ?

**यादव**०–आपल्या तब्येती तर ठीक आहेतना ? आपल्या डोक्यावर राज्यकारभाराचा जबरदस्त भार. तेव्हां आपल्यासारख्यांना ईश्वरानें सुखांत, आनंदांत आणि हिमायतींत राखावें हीच आह्मां लाताऱ्यांची नेहमीं प्रार्थना आहे. आह्मीं काय सुकलेलें पान, झाडाची शोभा मात्र घालविणार. पण आज आपला चेहरा आजुर्दा दिसतो ?

**जयेंद्र**०–काय सांगूं आपल्याला माझ्या खेदाचें कारण ? आपल्याला उगीच वाईट मात्र वाटेल.

**यादव**०–तर मग तें मला कळलेंच पाहिजे.

**जयेंद्र**०–अहो, काकासाहेबांचें कुटुंब वारलें !

**यादव**०–काय ह्मणतां ? त्या वारल्या ! अरेरे, तर मग वीरमणींना फारच दुःख होईल.

**जयेंद्र**०–तसा संभव असता तर कांहीं समाधान मानण्याला जागा होती. पण काकासाहेबांची हल्लींची स्थिति तशी नाहीं. त्यांना कोठें हवी होती ही बायको. त्यांना घेरलें आहेना त्या सटवीनें ! मालतीबाईनीं इकडे केवढा उपव्याप आरंभला होता, आह्मांला तिनें किती त्रास दिला, याबद्दल मी त्यांच्याकडे शेंकडों पत्रें पाठविलीं असतील, पण त्यांची दाद घेतो कोण ? नुसती जासुदाची भेट देखील होणें मुष्कील.

**यादव**०–इतके का ते नादीं लागले आहेत ?

**जयेंद्र**०–तें कांहीं विचारूं नका. नेहमीं नानाप्रकारचे हलकट खेळ खेळण्यांत ते गुंग असतात. कवडीमोल तमासगिरांची आणि त्यांची निरंतर गांठ, दारू पिण्याचा तर आतां ताळच राहिला नाहीं–छचोरपणाची त्यांनीं केवळ दीक्षाच घेतली आहे. दिवसाढवळ्या हुजऱ्यांच्या व ज़नानखान्यांतील खोज्यांच्या गळ्यांत हात घालून दारूच्या कैफांत झुकांड्या खात, तोंडानें नाहीं नाहीं ते बडबडत ते हिंडतात • याला काय ह्मणावें ?

**यादव**०–अरेरे, अशी त्यांची स्थिति झाली ह्मणतां ? तर मग फारच वाईट. तरी आपण त्यांना सोडून देऊन उपयोग नाहीं. मी ह्मणतों कीं, हे दुर्गुण त्यांच्या रक्तापिंडाबरोबरच आलेले, त्यांच्या गुणाबरोबरच वाढलेले असल्यामुळें, त्यांना ते दिसत असूनही त्यांच्या विवेकशक्तीच्या आवाक्याबाहेर ते असावेत. आरंभीं सर्वजयांच्या धाकानें आणि मागून लढाईच्या वगैरे धामधुमीनें ते दडपले गेले होते. तो व्याप संपतांच त्यांनीं उसळ खाली. त्यांतून गांठ शृंगारसुंदरीसारख्या मोहिनीची ! सर्वजयांना, आपल्या शूर व शहाण्या वडिलांना देखील, नव्हतें का तिनें पछाडलें ! त्यांना या नादापासून सोडविलेंच पाहिजे आणि हें काम आपणच

गाला येत नाहीं. माझ्या बाबांचा हेत राहून गेला, तो मला पुरा पाडला पाहिजे; त्याशिवाय त्यांच्या आत्म्याला शांति किंवा मुक्ति मिळणें नाहीं. या विजयभुवन देशाची प्रजाही आतां या स्थितीला कंटाळून गेली आहे. राजाशिवाय तिनें आतां किती दिवस काढावे ? पतीवांचून स्त्रियांचें जीवित जसें विफल, तसेंच प्रजेला राजावांचून सुख नाहीं. तरी पण त्यांना या सरदारांच्या मूर्ख समजुतींमुळें आणखी किती दिवस या अशा दुःस्थितींत घालवावे लागतील याचा कांहीं नेम नाहीं. येथील सरदारमंडळ ह्मणजे शुद्ध बावळ्यांचा बाजार आहे. त्यांना राजाच्या अंगीं कोणते गुण पाहिजेत हेंच मुळीं कळतें आहे कोठें ? ऐश्वर्योपभोग ह्मणजे चैन करणें हीच त्यांची कल्पना. राजकारस्थान, प्रजापालन, अनेक राजकारणी बिकट कोड्यांचा आपल्या अकलेनें उलगडा करणें, होतां होई तों लढाई न करतां प्रसंग पार पाडणें, सामदानादि चार उपायांपैकीं पहिल्या तिहींची योजना शिताफीनें करून चवथ्याचा उपयोग करण्याचा प्रसंगच न येऊं देणें,—इत्यादि कल्पना यांच्या डोक्यांत आजन्मांत यायच्या नाहींत.—नुसता लढाईंत रक्तपात करणारा, आपल्या जिवाकडे न पाहणारा तोच खरा योद्धा हीच यांची समजूत. शौर्याचें मुख्य अंग शहाणपण, तें नसलें तर तें शौर्य काय कामाचें ? पण हें या मूर्खांना कळेल तेव्हांना. नाहींतर त्यांनीं आमच्या बाबांना कां मरूं दिलें असतें ? अरेरे, काय करूं ? त्या घोर कृत्याची आठवण झाली कीं अंगाची कशी लाही होऊन जाते. ज्यांनीं ज्यांनीं त्या थोर सत्पुरुषाचा खून करूं दिला आणि जे त्यावेळीं आनंदानें नाचले त्यांच्या घरांवर जेव्हां नांगर फिरवीन आणि या विजयगिरीच्या उद्धट, उच्छृंखल आणि आडदांड लोकांच्या मानेवर जेव्हां माझ्या करड्या सत्तेचें जड जूं ठेवीन तेव्हांच राहीन !—पण या गोष्टी बोलणें ह्मणजे फुकट तोंडाची वाफ दवडणें होय. कोणतीही गोष्ट करून दाखवावी यांतच खरें पौरुष आहे.

**शिपाई** येतो.

का, कायरे आहे ?

जासूद—सरकार, यादवराव आले आहेत.

जयेंद्र॰—ठीक आहे, येऊं दे त्यांना आंत. ( शिपाई जातो. ) हा एक आला महामूर्ख, वीरमणीच्या भक्तांपैकीं. आज किती दिवस याच्या कानांत वीरमणीच्या अवगुणांविषयीं तुतारी वाजवीत आहें. पण याच्या मनावर त्याचा कांहीं परिणाम होईल तर शपथ. हा येथील साऱ्या सरदारांत थेरडा, याचें घराणें जुनाट आणि राजनिष्ठ. याचें दरबारांत वजन विशेष. हा एक जर वळला तर बहुतेक काम झालेंच. पण वीरमणीच्या उलट कांहीं करायचें नांव काढलें कीं हा हटलाच मागें.—पण आज जी युक्ति काढली आहे तिनें याला

चांगला गोत्यांत आणतो. आतां त्या युक्तीपासून माझ्या लाडक्या ताईच्या–

यादवराव येतो.

यावें यादवराव, बसा. का खुशाल ?

**यादव०**—आपल्या तब्येती तर ठीक आहेतना ? आपल्या डोक्यावर राज्यकारभाराचा जबरदस्त भार. तेव्हां आपल्यासारख्यांना ईश्वरानें सुखांत, आनंदांत आणि हिमायतींत राखावें हीच आह्मां ह्मातान्यांची नेहमीं प्रार्थना आहे. आह्मीं काय सुकलेलें पान, झाडाची शोभा मात्र घालविणार. पण आज आपला चेहरा आजुर्दा दिसतो ?

**जयेंद्र०**—काय सांगूं आपल्याला माझ्या खेदाचें कारण ? आपल्याला उगीच वाईट मात्र वाटेल.

**यादव०**—तर मग तें मला कळलेंच पाहिजे.

**जयेंद्र०**—अहो, काकासाहेबांचें कुटुंब वारलें !

**यादव०**—काय ह्मणतां ? त्या वारल्या ! अरेरे, तर मग वीरमणींना फारच दुःख होईल.

**जयेंद्र०**—तसा संभव असता तर कांहीं समाधान मानण्याला जागा होती. पण काकासाहेबांची हल्लींची स्थिति तशी नाहीं. त्यांना कोठें हवी होती ही बायको. त्यांना घेरलें आहेना त्या सटवीनें ! मालतीबाईनीं इकडे केवढा उपव्याप आरंभला होता, आह्मांला तिनें किती त्रास दिला, याबद्दल मी त्यांच्याकडे शेंकडों पत्रें पाठविलीं असतील, पण त्यांची दाद घेतो कोण ? नुसती जासुदाची भेट देखील होणें मुष्कील.

**यादव०**—इतके का ते नादीं लागले आहेत ?

**जयेंद्र०**—तें कांहीं विचारूं नका. नेहमीं नानाप्रकारचे हलकट खेळ खेळण्यांत ते गुंग असतात. कवडीमोल तमासगिरांची आणि त्यांची निरंतर गांठ, दारू पिण्याचा तर आतां ताळच राहिला नाहीं-छचोरपणाची त्यांनीं केवळ दीक्षाच घेतली आहे. दिवसाढवळ्या हुजऱ्यांच्या व ज़नानखान्यांतील खोज्यांच्या गळ्यांत हात घालून दारूच्या कैफांत झुकांड्या खात, तोंडानें नाहीं नाहीं ते बडबडत ते हिंडतात. याला काय ह्मणावें ?

**यादव०**—अरेरे, अशी त्यांची स्थिति झाली ह्मणतां ? तर मग फारच वाईट. तरी आपण त्यांना सोडून देऊन उपयोग नाहीं. मी ह्मणतों कीं, हे दुर्गुण त्यांच्या रक्तापिंडाबरोबरच आलेले, त्यांच्या गुणाबरोबरच वाढलेले असल्यामुळें, त्यांना ते दिसत असूनही त्यांच्या विवेकशक्तीच्या आवाक्याबाहेर ते असावेत. आरंभीं सर्वजयांच्या धाकानें आणि मागून लढाईच्या वगैरे धामधुमीनें ते दडपले गेले होते. तो व्याप संपतांच त्यांनीं उसळ खाल्ली. त्यांतून गांठ शृंगारसुंदरीसारख्या मोहिनीची ! सर्वजयांना, आपल्या शूर व शहाण्या वडिलांना देखील, नव्हतें का तिनें पछाडलें ! त्यांना या नादापासून सोडविलेंच पाहिजे आणि हें काम आपणच

अंगावर घ्यावें. असले कितीही दुर्गुण असले ह्मणून काय झालें? त्यांच्या गुणांचें तेज त्यांच्यानें लोपवेल काय? वीरमणी म्हणजे एक हिरा आहे.

**जयेंद्र०**—अलबत्. काकासाहिब आहेतच तसे. आणि म्हणूनच असला हिरा यःकश्चित् ठेकणाच्या संगानें भंगणार हें पाहून वाईट वाटतें. यांना या फेऱ्यांतून कसे सोडवावेत याच विचारांत मी आहे; पण कांहीं तोड सुचत नाहीं. उलट आतां हा मागचा पाश तुटल्यामुळें ते अगदींच भकून जाण्याचा संभव आहे.

**यादव०**—हो, असा संभव दिसतो. ( विचार करून ) बरें, आपण काय ह्मणालां? त्यांचें कुटुंब वारलें, नाहीं?

**जयेंद्र०**—होय, मालतीबाई वारल्या. ती स्त्री महासाध्वी, खरी पतिव्रता. तिनें आम्हांला फार उपद्रव दिला खरा पण त्यांतील हेतु लक्षांत आणला ह्मणजे आपला राग तेव्हांच नाहींसा होतो. त्यांचा काकासाहिबांवर कांहींतरी वचक होता.

**यादव०**—आपण ह्मणतां तशाच त्या होत्या. आणि वीरमणींनीं त्यांची अवहेलना केली हें कांहीं चांगलें केलें नाहीं. मला वाटतें त्यांचें हें वेड घालवायला एक उपाय आहे.

**जयेंद्र०**—कोणता, कोणता तो?

**यादव०**—त्यांनीं दुसरें लग्न करावें. त्यांना जर चांगली सुस्वरूप, सद्गुणी, सुशील असून आपल्या चातुर्यानें नवऱ्याचें मन अगदीं मोहून टाकणारी, अशी बायको मिळेल तर ती त्यांना ताळ्यावर आणील.

**जयेंद्र०**—आपण ह्मणतां त्याप्रमाणें होण्याचा पुष्कळ संभव आहे. पण तशी कुमारी मिळावी कोठें?

**यादव०**—आपल्याला राग येणार नाहीं तर मी दाखवितो अशी सर्वगुणसंपन्न मुलगी.

**जयेंद्र०**—अहो, अशी दाखवा तर खरी, मग ती कोणाची का असेना, मी आपली सारी भीड खर्च करून तिचा व वीरमणींचा संबंध जुळवून आणण्याची खटपट करीन.

**यादव०**—आपली बहिण सुमती आपण त्यांना द्यावी. वयानें, गुणानें ती त्यांच्या योग्य आहे. या जगांत त्यांना ताळ्यावर आणण्याला समर्थ जर कोणी असेल तर ती आहे. तिच्या त्या दिव्य तेजापुढें शृंगारसुंदरीचे कपटी व मोहक तेज खात्रीनें फिकें पडेल.

**जयेंद्र०**—आपण मला मोठ्या अडचणींत घातलें. काकासाहिब शुद्धीवर यावे अशी माझी उत्कट इच्छा आहे—त्यासाठीं मी पाहिजे तें करायला तयार आहे. तरी पण ताईला त्यांना द्यावी असें माझें मन मला सांगत नाहीं. काकासाहेब तर बोलूनचालून बनले आहेत—जाऊं द्या त्याचें स्मरण नको. ताईचें त्यांच्याशीं लग्न लागल्यापासून ताईला सुख होईल कीं नाहीं याची शंका आहे. जर का कांहीं बरेंवाईट झालें तर लोक मला काय ह्मणतील? याबद्दल

फार दूरवर विचार केला पाहिजे. शिवाय ताईचेंही मन पाहिलें पाहिजे.

**यादव०**—वीरमणींच्याबद्दल मी राहतों जामीन. तुह्मीं नाहीं ह्मणूं नका. याचा पोक्त विचार करा. बरें, मी घेतों आतां रजा. वीरमणींचें जें कल्याण तेंच आपलें कल्याण हें लक्षांत ठेवा.

**जयेंद्र०**—यावें. मी याचा नीट विचार केल्यावांचून रुकार देत नाहीं.

[ यादवराव जातो.

असल्या मूर्खांची मला कींव येते. यांना स्वतःला अक्कल नाहीं आणि दुसऱ्यापासून हे अक्कल शिकायचे नाहींत. यामुळें प्रसंगीं यांच्या मानेला फांस घालावा लागतो याला नाइलाज आहे. वास्तविक पाहतां हल्लींच्या प्रसंगीं मला राज्यपद दिल्यानें या देशाचें केवढें हित होईल हें यानें विचार केला तर याला समजणार नाहीं कीं काय? पण त्या वीरमणीच्या हा नादीं लागला आहे, त्याच्याशिवाय दुसरें तिसरें याला कांहीं दिसत नाहीं. ठीक आहे, रहा ह्मणावें असाच नादीं. आतां जो गळ टाकला त्याला तो कसा पटकन बिलगला! आतांच्या या तोडीनें तुला आणि त्या तुझ्या वीरमणीला जर मी रसातळाला पोंचवीना—

बलदेव येतो.

कां बलदेव, काय खबर आहे?

**बल०**—सरकार, खबर फार वाईट आहे!

**जयेंद्र०**—अरे, असें वाईट तोंड कां करतोस? काय खबर आहे ती सांग तर खरी. मग पाहूं वाईट आहे का चांगली आहे ती.

**बल०**—वीरमणी आले.

**जयेंद्र०**—बरें मग, त्यांत वाईट तें काय? काकासाहेब आले फार उत्तम झालें. त्यांची आह्मांला फार जरूर होती. आज किती दिवस तरी त्यांची आह्मीं वाट पहात होतों.

**बल०**—पण सरकार, त्यांचे भाऊ आपल्यावर उठले आहेत त्यांना यांची मदत—

**जयेंद्र०**—चूप बस. मूर्ख आहेस तूं. माझ्याशीं आपला भाऊ लढतो आहे त्याबद्दल त्याचे चांगले कान उपटण्यासाठीं ते येथें आले आहेत: समजलास. बरें आतां असें कर कीं, यादवराव चंदनवाडकरांकडे जा आणि त्यांना वीरमणी आल्याची खबर सांग, आणि ह्मणावें मघां आपलें बोलणें झालें त्यासंबंधाचा जबाब संध्याकाळीं मिळेल. [बलदेव जातो.

वीरमणी परत आला हा मोठाच चमत्कार! इतका नादी, बदफैली आणि कैफी असूनही त्यानें जेव्हां तिची मिठ्ठा मगरमिठी सोडली तेव्हां माझ्या अंतःस्थ खटपटीसंबंधानें त्याचे कोणीं तरी कान फुंकले असावेत. असूं दे कीं, माझ्या निष्कपटपणाविषयीं त्या भोळ्याची खात्री करून द्यायला कितीसा वेळ लागणार! एक प्रकारें तो लवकर आला हेंच बरें झालें. तो या यादवरावाच्या वेडसरपणामुळें माझ्या चांगलाच तावडींत सांपडणार आहे. माझ्या बहिणीशीं त्याचें एकदां लग्न लागलें कीं

अंगावर घ्यावें. असले कितीही दुर्गुण असले ह्मणून काय झालें? त्यांच्या गुणांचें तेज त्यांच्यानें लोपवेल काय? वीरमणी म्हणजे एक हिरा आहे.

**जयेंद्र०**—अलबत्. काकासाहिब आहेतच तसे. आणि म्हणूनच असला हिरा यःकश्चित् ढेकणाच्या संगानें भंगणार हें पाहून वाईट वाटतें. यांना या फेऱ्यांतून कसे सोडवावेत याच विचारांत मी आहे; पण कांहीं तोड सुचत नाहीं. उलट आतां हा मागचा पाश तुटल्यामुळें ते अगदींच भकून जाण्याचा संभव आहे.

**यादव०**—हो, असा संभव दिसतो. (विचार करून) बरें, आपण काय ह्मणालां? त्यांचें कुटुंब वारलें, नाहीं?

**जयेंद्र०**—होय, मालतीबाई वारल्या. ती स्त्री महासाध्वी, खरी पतिव्रता. तिनें आम्हांला फार उपद्रव दिला खरा पण त्यांतील हेतु लक्षांत आणला ह्मणजे आपला राग तेव्हांच नाहींसा होतो. त्यांचा काकासाहिबांवर कांहींतरी वचक होता.

**यादव०**—आपण ह्मणतां तशाच त्या होत्या. आणि वीरमणींनीं त्यांची अवहेलना केली हें कांहीं चांगलें केलें नाहीं. मला वाटतें त्यांचें हें वेड घालवायला एक उपाय आहे.

**जयेंद्र०**—कोणता, कोणता तो?

**यादव०**—त्यांनीं दुसरें लग्न करावें. त्यांना जर चांगली सुस्वरूप, सद्गुणी, सुशील असून आपल्या चातुर्यानें नवऱ्याचें मन अगदीं मोहून टाकणारी, अशी बायको मिळेल तर ती त्यांना ताळ्यावर आणील.

**जयेंद्र०**—आपण ह्मणतां त्याप्रमाणें होण्याचा पुष्कळ संभव आहे. पण तशी कुमारी मिळावी कोठें?

**यादव०**—आपल्याला राग येणार नाहीं तर मी दाखवितो अशी सर्वगुणसंपन्न मुलगी.

**जयेंद्र०**—अहो, अशी दाखवा तर खरी, मग ती कोणाची का असेना, मी आपली सारी भीड खर्च करून तिचा व वीरमणींचा संबंध जुळवून आणण्याची खटपट करीन.

**यादव०**—आपली बहिण सुमती आपण त्यांना द्यावी. वयानें, गुणानें ती त्यांच्या योग्य आहे. या जगांत त्यांना ताळ्यावर आणण्याला समर्थ जर कोणी असेल तर ती आहे. तिच्या त्या दिव्य तेजापुढें शृंगारसुंदरीचे कपटी व मोहक तेज खात्रीनें फिक्कें पडेल.

**जयेंद्र०**—आपण मला मोठ्या अडचणींत घातलें. काकासाहेब शुद्धीवर यावे अशी माझी उत्कट इच्छा आहे—त्यासाठीं मी पाहिजे तें करायला तयार आहे. तरी पण ताईला त्यांना द्यावी असें माझें मन मला सांगत नाहीं. काकासाहेब तर बोलूनचालून बनले आहेत—जाऊं द्या त्याचें स्मरण नको. ताईचें त्यांच्याशीं लग्न लागल्यापासून ताईला सुख होईल कीं नाहीं याची शंका आहे. जर का कांहीं बरेंवाईट झालें तर लोक मला काय ह्मणतील? याबद्दल

फार दूरवर विचार केला पाहिजे. शिवाय ताईचेंही मन पाहिलें पाहिजे.

**यादव**०—वीरमणींच्याबद्दल मी राहतों जामीन. तुह्मीं नाहीं ह्मणूं नका. याचा पोक्त विचार करा. बरें, मी घेतों आतां रजा. वीरमणींचें जें कल्याण तेंच आपलें कल्याण हें लक्षांत ठेवा.

**जयेंद्र**०—यावें. मी याचा नीट विचार केल्यावांचून रुकार देत नाहीं.

[ **यादवराव** जातो.

असल्या मूर्खांची मला कींव येते. यांना स्वतःला अक्कल नाहीं आणि दुसऱ्यापासून हे अक्कल शिकायचे नाहींत. यामुळें प्रसंगीं यांच्या मानेला फांस घालावा लागतो याला नाइलाज आहे. वास्तविक पाहतां हल्लींच्या प्रसंगीं मला राज्यपद दिल्यानें या देशाचें केवढें हित होईल हें यानें विचार केला तर याला समजणार नाहीं कीं काय ? पण त्या वीरमणीच्या हा नादीं लागला आहे, त्याच्याशिवाय दुसरें तिसरें याला कांहीं दिसत नाहीं. ठीक आहे, रहा ह्मणावें असाच नादीं. आतां जो गळ टाकला त्याला तो कसा पटकन बिलगला ! आतांच्या या तोडीनें तुला आणि त्या तुझ्या वीरमणीला जर मी रसातळाला पोंचवीना—

बलदेव येतो.

कां बलदेव, काय खबर आहे ?

**बल**०—सरकार, खबर फार वाईट आहे !

**जयेंद्र**०—अरे, असें वाईट तोंड कां करतोस ? काय खबर आहे ती सांग तर खरी. मग पाहूं वाईट आहे का चांगली आहे ती.

**बल**०—वीरमणी आले.

**जयेंद्र**०—बरें मग, त्यांत वाईट तें काय ? काकासाहेब आले फार उत्तम झालें. त्यांची आह्मांला फार जरूर होती. आज किती दिवस तरी त्यांची आह्मीं वाट पहात होतों.

**बल**०—पण सरकार, त्यांचे भाऊ आपल्यावर उठले आहेत त्यांना यांची मदत—

**जयेंद्र**०—चूप बस. मूर्ख आहेस तूं. माझ्याशीं आपला भाऊ लढतो आहे त्याबद्दल त्याचे चांगले कान उपटण्यासाठीं ते येथें आले आहेत; समजलास. बरें आतां असें कर कीं, यादवराव चंदनवाडकरांकडे जा आणि त्यांना वीरमणी आल्याची खबर सांग, आणि ह्मणावें मघां आपलें बोलणें झालें त्यासंबंधाचा जबाब संध्याकाळीं मिळेल. [**बलदेव** जातो.

वीरमणी परत आला हा मोठाच चमत्कार ! इतका नादी, बदफैली आणि कैफी असूनही त्यानें जेव्हां तिची मिठा मगरमिठी सोडली तेव्हां माझ्या अंतःस्थ खटपटीसंबंधानें त्याचे कोणीं तरी कान फुंकले असावेत. असूं दे कीं, माझ्या निष्कपटपणाविषयीं त्या भोळ्याची खात्री करून द्यायला कितीसा वेळ लागणार ! एक प्रकारें तो लवकर आला हेंच बरें झालें. तो या यादवरावाच्या वेडसरपणामुळें माझ्या चांगलाच तावडींत सांपडणार आहे. माझ्या बहिणीशीं त्याचें एकदां लग्न लागलें कीं

त्याच्या प्राणाभोंवतीं फांस पडलाच. अरे, पण यांत मी माझ्या ताईचा घात नाहीं का करीत ?—उं:; राजकारण साधण्याकरितां तसें केलेंच पाहिजे. आणि तिला वैधव्य आलें ह्मणून काय झालें? मी माझ्या प्रीतीनें तिला तिच्या साऱ्या दुःखाचा पुरा विसर पाडीन. [ जातो.

## प्रवेश २ रा.

**वीरमणी** आणि **संग्रामसिंह** बोलत आहेत.

**वीर०**—खरेंच, तिच्या मृत्यूची वार्ता ऐकतांच माझें अंतःकरण चर्र झालें. तिच्या मरणाला मीच कारण झालों.

**संग्राम०**—दादासाहेब, त्याचें आतां इतकें दुःख नको. जें व्हायचें होतें तें झालें. आतां तरी आपण तो तिकडचा नाद सोडा. मीं असें ऐकलें आहे कीं ती शृंगारसुंदरी अतिशय मोहक आणि अतिशय कपटी आहे.

**वीर०**—अरे, माझा तुझ्यावर लोभ रहावा असें जर तुला वाटत असेल तर तिच्याविषयीं एक चकारशब्द सुद्धां काढू नको. ती कशीही असो. तिच्या सहवासांत जो माझ्या आयुष्याचा भाग गेला तो अत्यंत सुखाचा. त्याचा मला कधींही विसर पडणार नाहीं. तिला नांवें ठेविलेलीं मला कधींही खपणार नाहींत. त्या बापडीकडे काय दोष ? सारा मूर्खपणा माझाच. खरोखर मी तिला सोडून एकदम इकडे निघून आलों यामुळें त्या बिचारीला किती दुःख झालें असेल ! नको, नको त्याची आठवण, नाहीं तर माझें मन पुनः वेडें बनेल.

**संग्राम०**—दादासाहेब, काय हें वेड ! तिनें जयेंद्रपालाचे वडील सर्वजय यांची काय अवस्था केली, कांहीं लक्षांत आणा. त्यांच्या त्या महापराक्रमी आणि यशस्वी तरवारीला तिनेंच नाहीं का गंज चढायला लावला, आणि तिला आपल्याबरोबर बिछान्यांत लोळायला लावलें ?

**वीर०**—बस्स, बस्स झालें हें. तुला एकदां सांगितलेंना कीं एक वांकडा शब्द बोलायचा नाहीं म्हणून. ती कशीही असली तरी ती एक देवादिकांनीं उपभोगण्यासारखें रत्न आहे. मी नाहीं तिच्याविरुद्ध एक शब्दही ऐकायचा.

**संग्राम०**—राहिलें. पण आतां आपण येथें आलां आहां तेव्हां पुढें काय करायचें ? जयेंद्रपालाच्या मनांत येथील गादी बळकावायची आहे. त्यांत त्याला आपली आडकाठी दिसते आहे, आणि ती दूर करायच्या तो विचारांत आहे. आह्मीं तरी लढाई केली ती याचसाठीं.

**वीर०**—तुह्मीं त्या कामीं फार मूर्खपणा केला. मला नुसतें अगोदर कळवायचें तरी होतें. जयेंद्रपाल माझ्या सर्वजयाचा मुलगाचना ? मग त्याला गादी हवी असेल तर त्या कामीं या वीरमणीवांचून त्याचा खरा साहाय्यकर्ता दुसरा कोण असणार ! त्याचाच या गादीवर हक्क आहे. सर्वजयांना गादी मिळाली असती तर त्यांच्यामागें यालाच गादी

सेल ? " ह्या गोष्टींचा विचार करण्यांत तो गुंतला आहे इतक्यांत त्याच्या खोलीच्या दारावर कोणी ठोठावलें. चटदिशीं तो शेला आणि ती चिठ्ठी पेटींत होती तशी ठेवून कुमुद्बंधूनें पेटीस कुलूप लाविलें आणि नंतर जाऊन दार उघडलें तों विनयादित्यमामाच आंत आले.

" आपल्याला घेऊन येण्याविषयीं राणीसाहेबांची आज्ञा झाली आहे. " मामा ह्मणाले.

" ठीक आहे, हा मी तयारच आहें. " कुमुदबंधूनें उत्तर केलें, आणि दोघेजण खोलीबाहेर पडून राणीसाहेबांच्या दिवाणखान्याकडे चालले.

" सकाळीं ठरल्याप्रमाणेंच कांहीं गोष्टी गुप्त ठेवावयाच्या आणि बाकीची हकिकत राणीसाहेबांस सांगावयाची हाच ना निश्चय ? " कुमुदबंधु मामासाहेबास विचारतो.

" त्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं. " मामा किंचित् सखेद स्वरानें उत्तर करितात. " आतां जयद्रथरायासंबंधाची हकिकत लपवून ठेवून कांहीं एक उपयोग नाहीं. आपण त्याचें आतां काय संरक्षण करणार?"

"आपल्या भाषणाचा अर्थ तरी काय?" कुमुदबंधु विचारतो.

" अर्थ कसला ! जयद्रथरायाच्या बेतांचा आज मोड झाल्यामुळें त्याचें मस्तक भडकून गेलें आहे. तो कूर्मदुर्गाहून निघून पुण्यालयदुर्गाकडे चालता झाला. आणि त्यानें उघडपणें बंडाचें निशाण रोवून बुद्धानुयायी सर्व सरदारांस आणि इतर राजद्रोही लोकांस, आपल्याला येऊन मिळण्याविषयीं विनंतिपत्रेंही त्यानें पाठविलीं आहेत. आतां आपण त्याच्या कृत्यावर झांकण कसें घालणार ? " विनयादित्यमामा ह्मणाले,

" काय ही बातमी खरी ! जयद्रथराय प्रसिद्धपणें बंड करण्यास तयार झाला ? " कुमुदबंधु आश्चर्यानें विचारतो.

" जें काय मला समजलें तें मीं तुह्मांस सांगितलें. आतां आणखी पुढें काय काय होतें तें पाहूं." मामांनीं उत्तर दिलें.

" पण अगोदर मला तुह्मीं सांगा, एवढ्यांत ही बातमी आणली कोणीं ? " कुमुदबंधु विचारतो.

" तूर्त राहूं द्या तें; आपण राणीसाहेबांच्या दिवाणखान्याजवळ येऊन ठेपलों. आतां हें भाषण नको. " मामा ह्मणाले.

विनयादित्यमामा आणि कुमुदबंधु, मामांनीं ह्मटल्याप्रमाणेंच, दिवाणखान्याच्या अगदीं दरवाज्याशीं येऊन ठेपले होते. कुमुदबंधु तेथेंच उभा राहिला, व मामा झट्दिशीं आंत जाऊन परत आले. आणि फिरून कुमुदबंधु कुमुद्वती राणीच्या समोर जाऊन प्रणाम करून उभा राहिला.

कुमुद्वती त्याचा प्रणाम घेऊन ह्मणते, " कुमुदबंधुराय, आज प्रवासाच्या श्रमानें, वाटेंतील भयंकर प्रसंगांच्या त्रासानें, आणि येथें आल्यानंतरच्या भेटींनीं वगैरे आह्मीं जरी अत्यंत थकून गेलों आहोंत; तथापि आपली एकवार भेट घेऊन आपल्या आजच्या औदार्यशील वर्तनाबद्दल व आपल्या शौर्याबद्दल आपलें अभिनंदन केल्यावांचून आणि आपण आम्हांवर केलेल्या महदुपकारांबद्दल

आमची कृतज्ञता व्यक्त केल्यावांचून आमच्यानें राहवेना, म्हणून वेळांत वेळ काढून आतां आपल्यास बोलाविलें. आपण आम्हांकारितां आज काय काय आणि केवढीं धाडसाचीं कृत्यें केलीं हें आह्मांस समजलें आहे. मला हेंही पण कळलें कीं, आमची ही लाडकी भगिनी,"—असें ह्मणून राणीनें जवळच असलेल्या कमळेच्या पाठीवर प्रेमानें हात टाकिला,—"हिनेंही आमच्याकारितां काय प्रयत्न केले तेंही आमच्या कानीं आलें आहे. तुमच्या श्रमाबद्दल तुह्मांला मोबदला किंवा बक्षिस देण्याविषयीं यावेळीं नुसतें बोललें असतांही तुह्मांला अत्यंत वाईट वाटेल, येवढेंच नव्हे तर निरपेक्षबुद्धीनें आणि उदार अंतःकरणानें स्त्रीजनांच्या रक्षणाविषयीं तत्पर असणाऱ्या खऱ्या आपल्यासारख्या योद्ध्याचा त्यांत अपमान केल्यासारखें होईल. पण, कुमुदबंधुराय, आपल्याला मी येवढेंच सांगतें कीं, या पंचगांगदेशच्या राणीला आपण अक्षय्य ऋणी करून ठेविलें येवढें खरें."

"सरकार," कुमुदबंधु आदरपूर्वक लवून ह्मणतो, "मजकडून घडलेल्या क्षुद्र सेवेस आपण फारच महत्व दिलें. या चरणांचें दर्शन आणि आपल्या मुखांतून निघालेल्या अमृततुल्य कृपार्द्र शब्दांनीं झालेलें अभिनंदन, येवढ्यानेंच हा गरीब शिपाई कृतकृत्य झाला. आज शत्रूंच्या दुष्ट हेतूंचा मोड करण्याचें सर्व यश या आपल्या प्रिय भगिनी कमलाबाईंसच आहे. आणि सरकारांमीं त्यांचें अभिनंदन केलें हें अगदीं उचित झालें. सरकारच्या सन्निधानीं असणाऱ्या सर्वांनीं जर यांच्याप्रमाणें वर्तन केलें, तर या पंचगांगदेशच्या गादीकडे वर डोळा करून पाहण्याची कोणत्या शत्रूची छाती आहे!"

"आपली सदिच्छा जगदंबा पूर्ण करो असें मीही ह्मणतें." राणी उत्तर करिते. "पण, बरें, यावरून मला आठवण झाली. आमच्या पंचायतनांतलें रिकामें झालेलें स्थान जितकें लौकर सुशोभित होईल तितकें चांगलें. तर मग, काय, मामासाहेब?"

तत्क्षणींच मामासाहेबांनीं प्रणाम केला, आणि पाठीमागच्या एका दरवाज्यानें ते आंत गेले.

"आपल्याला हें ठाऊक असेलच, सरदारसाहेब," राणी ह्मणाली, "कीं, आमच्या अत्यंत प्रियसखिचतुष्टयांतील एक आमची फार दिवसांची सहचरी आज आह्मांपासून दूर झाली. तिची जागा तर भरलीच पाहिजे. पण चांगल्या कुलांतली, खरी, विश्वसनीय, आणि मनानें व गुणानें मोहक अशी तरुणी, जेव्हां सांपडेल तेव्हां ही जागा भरणार. अशी तरुणी सांपडणें किती कठिण आहे हें आपण जाणतच आहां. पण परमेश्वरानें आह्मांला फार वेळ अडचणींत ठेवलें नाहीं. आणखी थोड्याच वेळांत आमचें पंचायतन पहिल्यासारखें सुशोभित दिसेल."—आपल्या मैत्रिणींकडे वळून—"सख्यांनो, तुमची नवीन येणारी मैत्रीण कोण, हें तुह्मांला तर कळलेंच आहे. पण ही पहा ती आली! उठा, आणि तिचें स्वागत करा."

याचवेळीं विनयादित्यमामा एका सुंदर तरुणीचा हात धरून दारांतून आंत घेऊन आले. कुमुद्बंधूची दृष्टि सहजच जिज्ञासेनें या नवीन येणाऱ्या तरुणीकडे वळली. आणि आपल्या अंतःकरणाची प्रत्यक्ष देवताच बनलेली जी नलिनी तीच ही, असें पाहतांच त्याच्या मनाला काय वाटलें असेल याची, वाचकहो, क्षणभर तुह्मींच कल्पना करून पहा बरें !

---

## भाग १० वा.

### (प्रणयकोप.)

याप्रमाणें नलिनीची मूर्ति अकस्मात् नेत्रासमोर उभी राहतांच कुमुद्बंधूचें अंतःकरण आनंदाश्चर्यानें चकित झालें. नलिनी येथें ! आणि या स्थितींत ! या गोष्टीची त्याला कल्पना सुद्धां नव्हती. त्याला वाटलें, नुसता हा भास असावा. आदल्या दिवशीं सकाळीं कृष्णग्रामाजवळच्या अरण्यांत एका उंच कडयावरून सभोंवतालच्या दृग्विषयाचें तो अवलोकन करीत असतां ज्याप्रमाणें एकाएकीं तिची मूर्ति एखाद्या देवतेप्रमाणें त्याच्या दृष्टिपथांत आली, तद्वत्च यावेळींही झालें. जी मनमोहिनी यावेळीं आपल्यापासून दहा पांच कोश अंतरावर आहे अशी त्याची खात्री होती ती अकस्मात् या शैलावलीग्रामांत, प्रत्यक्ष ध्रुवरायाच्या वाड्यांत, फार तर काय, कुमुद्बंधु ज्या ठिकाणीं उभा होता त्याच दिवाणखान्यांत अशी अकल्पित येईल ही कल्पना तरी व्हावी कशी ! कुमुद्वतीराणीच्या इच्छेविरुद्ध आणि स्वतःच्याही अगदीं मनाविरुद्ध जिला आपल्या चुलत्याच्या हट्टामुळें कूर्मदुर्गांत राहून दुःसह सखिवियोग आजपर्यंत सोसणें भाग पडलें होतें तिला एकाएकीं व विशेषेंकरून अशा प्रसंगीं हें स्वातंत्र्य मिळावें आणि राणीच्या सखिचतुष्टयापैकीं आजच रिकामें झालेलें स्थान लागलींच येऊन हिनें सुशोभित करावें हा विलक्षण चमत्कार नव्हे काय ? का कुमुद्बंधूचें मन नुसतें स्वप्नपरंपरेचें क्रीडास्थानच बनलें आहे ह्मणून त्याला असें वाटलें ! तो मनांत ह्मणतो, "आपल्या नेत्रांना हा नुसता भास तर झाला नाहींना ! जिला विनयादित्यमामा आदरानें दिवाणखान्यांत घेऊन आले, आणि जिचें राणीनें प्रेमानें स्वागत केलें ती तरुणी नलिनीच का ! होय, खचित तीच ! ती पहा राणीला प्रेमालिंगन देऊन आपल्या स्थानीं विराजमान झाली ! अहाहा ! हें रत्न या कोंदणांत येऊन बसतांच त्याचें नैसर्गिक तेज कसें चमकूं लागलें पहा !" कुमुद्बंधूचें अंतःकरण आनंदातिशयानें उचंबळून गेलें; आणि या आकस्मिक प्रसंगामुळेंच कीं काय कोण जाणे, त्याचें हृदय पूर्वीपेक्षांही दृढतर रज्जूंनीं नलिनीच्या ठिकाणीं बद्ध झालें.

मन अशा चमत्कारिक विचारांनीं उद्दीप्त झालें असतां मुद्रेंतही तदनुसार बदल होणें साहजिकच आहे. पण आपण राणीसमोर उभे आहोंत ही गोष्ट ध्यानांत येऊन कुमुद्बंधूनें त्या क्षणापुरतें तरी आपल्या विचारांचें संयमन केलें असावेंसें दिसलें. त्याच्या मुद्रेंत जें निरनिराळ्या विकारांचें

नृत्य चाललें होतें तें आतां एकदम बंद होऊन चेहरा बराच शांत व गंभीर झाला.

नलिनी स्वस्थानीं जातांच, राणी मामास उद्देशून ह्मणते, "मामासाहेब, ही माझी प्रियभगिनी आणि मी आजपर्यंत परस्परांपासून दूर राहिलों, आणि यावेळीं तरी अशा रीतीनें आह्मीं दोघी फिरून एकत्र होऊं अशी मला आशा नव्हतीच. पण त्या जगदंबेच्या कृपेनें या तुमच्या दोघीही शिष्या आज एकत्र झाल्या."—नलिनीकडे वळून—"सखे नलिनी, काकासाहेबांच्या दुराग्रहामुळें जरी तूं मजपासून आजपर्यंत दूर राहिली होतीस, तथापि तुझें मन मला एक घटकाभरही विसंबलें नसेल, हें मी पक्कें जाणून होतें. तूं मजपासून दूर असतां आपल्या मनाला आणि देहाला विलक्षण दुःख देऊन माझ्या हिताकरितां रात्रंदिवस झटत होतीस, हें आतां मला समजलें आहे. आणि मघां आपण परस्परांस प्रेमानें कडकडून भेटलों हेंच तुझ्या सर्व श्रमाबद्दल आणि दुःखाबद्दल तुला बक्षिस! मी जरी पंचगांगदेशाची राणी आहें तथापि याहून निराळें बक्षिस तुला देण्यासारखें मजजवळ कांहीं नाहीं!" लागलींच कुमुदबंधूकडे वळून, "सरदारसाहेब, आपण आज आह्मांवर जे अगणित उपकार केले आहेत, त्यांचा फिरून फिरून कितीही जरी उच्चार केला तथापि ते फिटणारे नव्हेत. आज तुह्मीं या पंचगांगदेशच्या राणीचे धनिक झालांत आणि ती तुमची निरंतरची ऋणको होऊन बसली. •चला, आतां आपण सर्वच क्षणभर विसावा घेऊं."

असें ह्मणून राणी आपल्या आसनावरून उठली आणि आपल्या मैत्रिणींसह दिवाणखान्यामागील आरामगृहाकडे वळली. जातां जातां नलिनीनें एकवार मागें दृष्टि वळवून कुमुदबंधूकडे पाहिलें, पण तेवढ्यानें कुमुदबंधूला केवढी कृतकृत्यता वाटली असेल, आणि काय काय विचार त्याच्या मनांत आले असतील त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. दिवाणखान्यांत फक्त आतां मामासाहेब आणि कुमुदबंधु दोघेच राहिले.

कुमुदबंधु मामासाहेबांस लागलींच विचारतोः—"मामासाहेब, यांतलें एक अक्षर तरी मला कळवावयाचें होतें अगोदर. बरें, पण ही अकस्मात् येथें आली कशी? राणीसाहेबांच्या भाषणावरून मला तरी असा भास झाला कीं, ज्या गोष्टी त्यांना कळूं नयेत अशी नलिनीची इच्छा होती, त्या सर्व त्यांना कळल्या असाव्या?"

"होय, राणीसाहेबांस त्या सर्व गोष्टी कळल्या. त्या गुप्त ठेवणें अशक्यच झालें, आणि ठेवून तरी उपयोग काय? नलिनी येथें आल्याची हकिकत मीं तुह्मांला मुद्दाम कळविली नाहीं. सर्व हकिकत तिच्या स्वतःच्या तोंडून तुह्मीं ऐकल्यानें तुह्मांला अधिक आनंद होईलसें मला वाटलें. बरें, आपण येथें क्षणभर उभे रहा, मीं थोडा आंत जाऊन येतों."

असें ह्मणून राणी आपल्या मैत्रिणींसह ज्या खोलींत गेली होती तिकडे मामा गेले.

मामा बाहेर जातांच कुमुदबंधु स्वतःशीं ह्मणतोः—"नलिनीविषयीं माझी वृत्ति

उदासीन नसावी अशी मामासाहेबांना शंका आली आहे खचित ! पण कदाचित् ती शेला घातलेली पेटी त्यांच्याच मार्फत माझ्या खोलींत आली नसेल कशावरून ? बहुत-करून तेंच ! दुसऱ्या कोणाला नलिनी असली गुप्त गोष्ट कळविणार ? अरेरे, मी जर राणीसाहेबांच्या दर्शनाला येतांना तो शेला अंगावर घेऊन आलों असतों तर ? नलिनीला नसतें का कळलें तिनें दिलेल्या बक्षिसाचा मी किती आदर करितों तें ! "

कुमुद्बंधूचे हे विचार फार वेळ चालले नाहींत. कारण विनयादित्यमामा थोड्याच वेळांत परत आले. ते कुमुद्बंधूजवळ येऊन म्हणतातः—" कुमुद्बंधुराय नलिनीच्या मनांतून क्षणभर आपली गांठ पडावी असें आहे. तुमची व तिची प्रातःकाळीं भेट झाली त्या वेळेपासून ज्या नवीन गोष्टी घडून आल्या त्या एकवार तिच्या तोंडून ऐकाव्या अशी तुम्हांलाही उत्कंठा असेल, आणि तुम्हीं राणीसाहेबांकरितां आज जीं जिवापाड धाडसें केलीं त्याबद्दल तुमचें एकवार समक्ष अभिनंदन करावें अशी तिचीही इच्छा आहे, व ती मला वाटतें अगदीं योग्य आहे. तर आणखी सुमारें दोन घटकांनीं ती राणीसाहेबांजवळून मोकळी झाली म्हणजे बागेंत तुम्हांला भेटेल."

" ठीक आहे. " कुमुद्बंधु अत्यंत उत्साहपूर्वक म्हणाला. " मी त्यावेळेस बागेंत त्यांची वाट पहात बसतों. पण मामासाहेब, मला अगोदर एवढें सांगा कीं प्रातःकालपासून ज्या नवीन गोष्टी घडून आल्या आहेत ह्मणून आपण ह्मणतां त्या स्वतः नलिनीच्या संबंधानें आहेत काय ? तिला दुःख होण्यासारखें तर कांहीं घडलें नाहींना ? जयद्रथरायाकडील बातमी तिच्याकडून आपल्याला कळली, असें तर जयद्रथरायाला समजलें नाहींना ? "

" होय. जयद्रथरायास हें समजलें व ह्मणूनच तिला त्याचें घर सोडून राणीसाहेबांपाशीं आश्रयास यावें लागलें. " मामांनीं उत्तर केलें. " पण राणीसाहेबांजवळ तिला नुसता आश्रय मिळाला इतकेंच नव्हे तर जें स्थान आपल्यास मिळावें अशी तिची कित्येक दिवसांची इच्छा होती तेंच तिला प्राप्त झालें; आणि अनिवार्य कारणांनीं या दोघी प्रेमळ बहिणींचा आजपर्यंत वियोग झाला होता त्याचा आज अंत होऊन दोघींचा पुनरपि पूर्ववत् संगम झाला. पण तें असो तूर्त. कुमुद्बंधु, कांहीं जरूरीचे खलिते वगैरे लिहावयाचे आहेत म्हणून राणीसाहेबांनीं मला ताबडतोब बोलाविलें आहे. तर मला आतां रजा द्या. "

" अवश्य." कुमुद्बंधु ह्मणाला. " मला कोणीं पृथ्वीचें राज्य देतों ह्मटलें तरी आपल्यासारख्यांच्या कर्तव्यांत अडथळा करण्यास मी तयार होणार नाहीं. "

इतकें बोलणें होऊन ते दोघेही दिवाणखान्यांतून बाहेर पडले. कुमुद्बंधु एकटाच आपल्या खोलीकडे चालता झाला. खोलींत जातांच त्यानें आपल्या अंगावरील शेला फेंकून दिला. दोन प्रहरीं गुप्तपणें त्याच्या खोलींत आलेली चंदनाची पेटी लागलीच त्यानें उघडली आणि त्यांतील जरीच्या क-

खुद्याचा शेला—जो आपल्या प्रियेकडून प्रेमचिन्ह ह्मणून आला आहे अशी त्याची खात्री होती तो—त्यानें अंगावर घेतला. अशा रीतीनें सज्ज होऊन एकाद्या सुंदर तरुणीची संकेतस्थलीं भेट घेण्याकरितां जाणाऱ्या तरुण पुरुषाच्या सोत्साहवृत्तीनें—-एवढेंच नव्हे तर आपल्या दयितेच्या प्रेमालिंगनाची आशा करणाऱ्या उत्कंठित कामुकाच्या वृत्तीनें—-तो आपल्या खोलींतून बाहेर पडला आणि वाड्याबाहेरील बागेकडे वळला. सायंकाळचा समय असल्यामुळें उपवनावरून येणाऱ्या गार वाऱ्याचा व पुष्पसुगंधाचा आस्वाद घेण्याकरितां बरींच पाहुणेमंडळी उपवनाच्या आसपास इकडे तिकडे हिंडत होती. पण त्यां सर्वांस चुकवून कुमुदबंधु बागेंत शिरला आणि ज्या बाजूनें त्याची हृदयदेवता येण्याचा संभव होता त्या बाजूकडे डोळे लावून बसला. थोडक्याच अवकाशांत वाड्याच्या पाठीमागील बाजूकडून बागेंत येण्यास जी वाट होती त्या वाटेनें नलिनी आंत येतांना त्याच्या दृष्टीस पडली.

नलिनीनें बागेंत पाय टाकला आणि कुमुदबंधु आपली वाट पहात आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. लागलींच तिची मुद्रा आनंद, उत्साह आणि निष्कपट प्रेमळपणा या विकारांनीं एकदम व्याप्त झाली. पण किंचित् पुढें येऊन एकवार जवळून कुमुदबंधुला अवलोकन करतांच तिचा चेहरा एकाएकीं बदलला. एका क्षणांत सर्व उत्साह आणि आनंद नाहींसा होऊन त्यांच्या जागीं निःस्नेहता आणि उदासीनता यांचें ठाणें बसलें. उच्चकुलांतील एखादी तरुणी साधारण परिचयाच्या परकीय पुरुषाशीं ज्याप्रमाणें उत्साहरहित पण संप्रदायास उचित अशा आदरानें वागते त्या आचरणाचें अवलंबन नलिनीनें केलें. अकस्मात् झालेला हा फरक पाहून कुमुदबंधूला अत्यंत आचंबा वाटला. तो मनांत ह्मणतो, " आज प्रातःकाळीं जेव्हां हिची व माझी गांठ पडली. त्यावेळीं ही माझ्याशीं किती तरी मोकळ्या मनानें, आणि प्रेमबुद्धीनें वागली ! आतां एका क्षणापूर्वींच हिची मुद्रा किती प्रसन्न दिसत होती, पण हें एवढ्यांत अभ्रपटल कोठून आलें ? राणीजवळील त्या दुसऱ्या दोघी अल्लड पोरींच्या स्वभावाप्रमाणें हिचा स्वभाव चंचलही नाहीं; मग असा फरक एकाएकीं व्हावा यांचें कारण तरी काय असावें ? "

" तरुणी, " तो नलिनीस उद्देशून मोठ्यानें म्हणतो, " जर माझ्या वागणुकींत कोणच्याही प्रकारची कांहीं चूक होऊन त्यामुळें तुझी कांहीं मानखंडना गैरसमजुतीनें झाली असेल तर—-"

त्याला पुरतें बोलूं न देतांच नलिनी उत्तर करितेः—-" सरदारसाहेब, मानखंडना करून घेण्यांत किंवा मानण्यांत मी फारशी तीव्र नाहीं. माझें कूल बरेंच उच्च असल्यामुळें मला स्वतःचा थोडासा तरी अभिमान आहे. यामुळें एखाद्या क्षुद्र कारणावरूनही सहज कोपास चढणें किंवा जातां जातां आपला मानभंग झाला असें मानणें या गोष्टी आम्हांसारख्यांस अनुचित आहेत, असें मी समजतें."

कुमुदबंधूस हें भाषण फारच चमत्कारिक वाटलें. या भाषणाचा रोंख काय असावा हें त्याला मुळींच कळलें नाहीं. भाषणावरून कांहीं समजलें नाहीं तथापि निदान मुद्रेवरून तरी कांहीं अनुमान करतां येईल म्हणून तो लक्षपूर्वक तिच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला; पण लज्जेनें उत्पन्न होणारा तो गालावरील गुलाबी रंगाचा छटा, आनंदानें डोळ्यांत येणारें तें अनुपम तेज, यांचें कोठें अस्तित्वच नाहीं. एकंदर मुद्रा एखाद्या दगडाच्या मूर्तीप्रमाणें निर्विकार झालेली, चलनवलनादि पूर्णपणें आदरयुक्त व शिष्टाचारास अनुसरून पण अगदीं निरुत्साह!

चटदिशीं कुमुदबंधूच्या मनांत एक विचार आला. जो शेला त्यानें नलिनीस आनंद व्हावा म्हणून अंगावर घेतला होता त्या शेल्याकडे पाहत तो म्हणाला;—"तरुणी, कदाचित माझ्याकडून ही अविचाराची गोष्ट घडली असें तुला वाटत असेल. प्रस्तुत स्थितींत अशा प्रसिद्धपणानें ही मौल्यवान देणगी—"

फिरून त्याला पुरतें बोलूं न देतांच नलिनी म्हणते,—"सरदारसाहेब, या भलत्या गोष्टीबद्दल बोलण्यांत वेळ न घालवतां ज्या गोष्टीकरितां आपली भेट झाली पाहिजे म्हणून मीं मामासाहेबांबरोबर निरोप पाठविला होता त्या गोष्टीविषयीं बोलूं या. राणीसाहेबांचें हित करण्याविषयीं आपण विडा उचलला आहे आणि त्या कामांत आपल्या उपयोगीं पडण्यासारखें कांहीं साधन माझे हातीं आलें आहे तें आपल्या स्वाधीन करावें एवढ्याचकरितां ही तसदी मीं आपल्यास दिली. नाहींतर मजसारख्या कुमारिकेस न साजणारें हें धारिष्ट मीं कधींच केलें नसतें. आंकड्याच्या भाषेंत लिहिलेल्या एका चिठ्ठीविषयीं मी आपल्याला आज सकाळीं बोललें होतें, आणि साधल्यास ती आपल्या हातीं पडेल असें करावें, असें आपण मला सांगितलें होतें. ती चिठ्ठी माझे हातीं आली आहे, ही घ्या ती."

नलिनीनें ती चिठ्ठी पुढें केली. ती तिच्या हातांतून घेतांना तिच्या हातास स्पर्श करण्याचा प्रयत्न कुमुदबंधूनें केला. त्याबरोबर अत्यंत रागानें तिनें त्याच्याकडे पाहिलें आणि आपला हात झट्दिशीं मागें घेतला. जणूं काय तिच्या हातास कुमुदबंधूनें स्पर्श करणें हें तिला अग्निस्पर्शाप्रमाणें असह्य वाटलें असावें.

फिरून मुद्रा पूर्वीप्रमाणें निरुत्साह व गंभीर करून ती त्याजकडे पहात म्हणते:—"सरदारसाहेब, आपण ह्मणाल कीं ही चिठ्ठी दुसऱ्या कोणाबरोबर पाठवून द्यावयाची होती; तसें न करितां ती मीं स्वतःच तुमचे हातीं आणून देण्याचें कारण काय? तर—तर—तुह्मांला सांगतेंच आतां स्पष्टपणें!" —असें ह्मणतांना तिचा स्वर बराच कंपित झाला होता—"ज्या चुलत्याचा विश्वासघात करून त्याच्या नाशाच्या मार्गाला त्याला मीं लाविलें त्याच्या खोलींतून ही चिठ्ठी चोरून आणण्यापर्यंत माझी मजल येऊन पोंचली, हें मामासाहेबांना देखील कळूं नये अशी माझी अत्यंत इच्छा आहे, म्हणून मीं असें केलें."

सूर्याचा शेला—जो आपल्या प्रियेकडून प्रेमचिन्ह ह्मणून आला आहे अशी त्याची खात्री होती तो—त्यानें अंगावर घेतला. अशा रीतीनें सज्ज होऊन एकाद्या सुंदर तरुणीची संकेतस्थलीं भेट घेण्याकरितां जाणाऱ्या तरुण पुरुषाच्या सोत्साहवृत्तीनें——एवढेंच नव्हे तर आपल्या दयितेच्या प्रेमालिंगनाची आशा करणाऱ्या उत्कंठित कामुकाच्या वृत्तीनें——तो आपल्या खोलींतून बाहेर पडला आणि वाड्याबाहेरील बागेकडे वळला. सायंकाळचा समय असल्यामुळें उपवनावरून येणाऱ्या गार वाऱ्याचा व पुष्पसुगंधाचा आस्वाद घेण्याकरितां बरीच पाहुणेमंडळी उपवनाच्या आसपास इकडे तिकडे हिंडत होती. पण त्यां सर्वांस चुकवून कुमुदबंधु बागेंत शिरला आणि ज्या बाजूनें त्याची हृदयदेवता येण्याचा संभव होता त्या बाजूकडे डोळे लावून बसला. थोडक्याच अवकाशांत वाड्याच्या पाठीमागील बाजूकडून बागेंत येण्यास जी वाट होती त्या वाटेनें नलिनी आंत येतांना त्याच्या दृष्टीस पडली.

नलिनीनें बागेंत पाय टाकला आणि कुमुदबंधु आपली वाट पहात आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. लागलींच तिची मुद्रा आनंद, उत्साह आणि निष्कपट प्रेमळपणा या विकारांनीं एकदम व्याप्त झाली. पण किंचित् पुढें येऊन एकवार जवळून कुमुदबंधूला अवलोकन करतांच तिचा चेहरा एकाएकीं बदलला. एका क्षणांत सर्व उत्साह आणि आनंद नाहींसा होऊन त्यांच्या जागीं निःस्नेहता आणि उदासीनता यांचें ठाणें बसलें. उच्चकुलांतील एखादी तरुणी साधारण परिचयाच्या परकीय पुरुषाशीं ज्याप्रमाणें उत्साहरहित पण संप्रदायास उचित अशा आदरानें वागते त्या आचरणाचें अवलंबन नलिनीनें केलें. अकस्मात् झालेला हा फरक पाहून कुमुदबंधूला अत्यंत आचंबा वाटला. तो मनांत ह्मणतो, " आज प्रातःकाळीं जेव्हां हिची व माझी गांठ पडली. त्यावेळीं ही माझ्याशीं किती तरी मोकळ्या मनानें, आणि प्रेमबुद्धीनें वागली ! आतां एका क्षणापूर्वींच हिची मुद्रा किती प्रसन्न दिसत होती, पण हें एवढ्यांत अभ्रपटल कोठून आलें ? राणीजवळील त्या दुसऱ्या दोघी अल्लड पोरींच्या स्वभावाप्रमाणें हिचा स्वभाव चंचलही नाहीं; मग असा फरक एकाएकीं व्हावा याचें कारण तरी काय असावें ? "

" तरुणी, " तो नलिनीस उद्देशून मोठ्यानें म्हणतो, " जर माझ्या वागणुकींत कोणच्याही प्रकारची कांहीं चूक होऊन त्यामुळें तुझी कांहीं मानखंडना गैरसमजुतीनें झाली असेल तर——"

त्याला पुरतें बोलूं न देतांच नलिनी उत्तर करितेः——" सरदारसाहेब, मानखंडना करून घेण्यांत किंवा मानण्यांत मी फारशी तीव्र नाहीं. माझें कूल बरेंच उच्च असल्यामुळें मला स्वतःचा थोडासा तरी अभिमान आहे. यामुळें एखाद्या क्षुद्र कारणावरूनही सहज कोपास चढणें किंवा जातां जातां आपला मानभंग झाला असें मानणें या गोष्टी आम्हांसारख्यांस अनुचित आहेत, असें मी समजतें."

कुमुदबंधूस हें भाषण फारच चमत्कारिक वाटलें. या भाषणाचा रोंख काय असावा हें त्याला मुळींच कळलें नाहीं. भाषणावरून कांहीं समजलें नाहीं तथापि निदान मुद्रेवरून तरी कांहीं अनुमान करतां येईल म्हणून तो लक्षपूर्वक तिच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला; पण लज्जेनें उत्पन्न होणारा तो गालावरील गुलाबी रंगाचा छटा, आनंदानें डोळ्यांत येणारें तें अनुपम तेज, यांचें कोठें अस्तित्वच नाहीं. एकंदर मुद्रा एखाद्या दगडाच्या मूर्तीप्रमाणें निर्विकार झालेली, चलनवलनादि पूर्णपणें आदरयुक्त व शिष्टाचारास अनुसरून पण अगदीं निरुत्साह!

चटदिशीं कुमुदबंधूच्या मनांत एक विचार आला. जो शेला त्यानें नलिनीस आनंद व्हावा ह्मणून अंगावर घेतला होता त्या शेल्याकडे पाहत तो ह्मणाला;—"तरुणी, कदाचित माझ्याकडून ही अविचाराची गोष्ट घडली असें तुला वाटत असेल. प्रस्तुत स्थितींत अशा प्रसिद्धपणानें ही मौल्यवान देणगी——"

फिरून त्याला पुरतें बोलूं न देतांच नलिनी ह्मणते,——"सरदारसाहेब, या भलत्या गोष्टीबद्दल बोलण्यांत वेळ न घालवतां ज्या गोष्टीकरितां आपली भेट झाली पाहिजे ह्मणून मीं मामासाहेबांबरोबर निरोप पाठविला होता त्या गोष्टीविषयीं बोलूं या. राणीसाहेबांचें हित करण्याविषयीं आपण विडा उचलला आहे आणि त्या कामांत आपल्या उपयोगीं पडण्यासारखें कांहीं साधन माझे हातीं आलें आहे तें आपल्या स्वाधीन करावें एवढ्याचकरितां ही तसदी मीं आपल्यास दिली. नाहींतर मजसारख्या कुमारिकेस न साजणारें हें धारिष्ट मीं कधींच केलें नसतें. आंकड्याच्या भाषेंत लिहिलेल्या एका चिठ्ठीविषयीं मी आपल्याला आज सकाळीं बोललें होतें, आणि साधल्यास ती आपल्या हातीं पडेल असें करावें, असें आपण मला सांगितलें होतें. ती चिठ्ठी माझे हातीं आली आहे, ही घ्या ती."

नलिनीनें ती चिठ्ठी पुढें केली. ती तिच्या हातांतून घेतांना तिच्या हातास स्पर्श करण्याचा प्रयत्न कुमुदबंधूनें केला. त्याबरोबर अत्यंत रागानें तिनें त्याच्याकडे पाहिलें आणि आपला हात झट्दिशीं मागें घेतला. जणूं काय तिच्या हातास कुमुदबंधूनें स्पर्श करणें हें तिला अग्निस्पर्शाप्रमाणें असह्य वाटलें असावें.

फिरून मुद्रा पूर्वीप्रमाणें निरुत्साह व गंभीर करून ती त्याजकडे पहात म्हणतेः——"सरदारसाहेब, आपण ह्मणाल कीं ही चिठ्ठी दुसऱ्या कोणाबरोबर पाठवून द्यावयाची होती; तसें न करितां ती मीं स्वतःच तुमचे हातीं आणून देण्याचें कारण काय? तर——तर——तुह्मांला सांगतेंच आतां स्पष्टपणें!" —असें ह्मणतांना तिचा स्वर बराच कंपित झाला होता—"ज्या चुलत्याचा विश्वासघात करून त्याच्या नाशाच्या मार्गाला त्याला मीं लाविलें त्याच्या खोलींतून ही चिठ्ठी चोरून आणण्यापर्यंत माझी मजल येऊन पोंचली, हें मामासाहेबांना देखील कळूं नये अशी माझी अत्यंत इच्छा आहे, म्हणून मीं असें केलें."

" तरुणी, मजवर पूर्ण विश्वास टाकण्यास कांहीं हरकत नाहीं असें तुला वाटलें, " कुमुदबंधु उत्साहपूर्वक म्हणाला, "ह्यांत तूं बिलकुल फसली नाहींस. नाहीं! नाहीं! तुला कोणत्याही गोष्टींत फसवावें अशी मला कधींही बुद्धि व्हावयाची नाहीं."

कुमुदबंधूचे हे शब्द ऐकून नलिनीच्या मुद्रेत एकदम कांहीं विलक्षण व अवर्णनीय फरक पडला. पण लागलींच पहिल्याप्रमाणें उदासीनता व गंभीरपणा स्वीकारून ती ह्मणाली, " सरदारसाहेब, राणीसाहेबांच्या हितासंबंधाच्या जेवढ्या म्हणून गोष्टी आहेत त्यांत आपण अत्यंत विश्वसनीय आहांत याबद्दल माझी पक्की खातरी आहे, आणि ह्मणूनच ती चिठ्ठी आपल्या हातीं दिली."

कुमुद०:–" आणि याप्रमाणें मजवर इतका विश्वास टाकून तूं माझा गौरव केलास हे मजवर तुझे मोठे उपकार आहेत. पण हा असा एकाएकीं तुझ्या स्थितींत फरक—"

नलिनी:–(घाईनें मध्येंच) "हां, हां, मी समजलें आपण काय म्हणतां तें. होय. ह्या दोन तीन प्रहरांच्या अवकाशांत माझ्या स्थितींत फारच फरक पडला आहे, हें खरें. ज्याअर्थी आपणाला पहिली सर्व हकिकत कळविली आहे, त्याअर्थी पुढील सर्व गोष्टी आपल्यास कळणें योग्यच आहे. आपली माझी सकाळीं त्या अरण्यांत गांठ पडली होती, तेथून आपण निघाल्यानंतर लागलींच मीही कूर्मदुर्गाकडे चालतीं झालें. तेथें जाऊन पोंचतें तों जिकडे तिकडे सर्व गोंधळ व गडबड उडून गेली होती. काकासाहेब किल्ल्यांत परत आले होते आणि तुम्हीं किल्यांतून सुटून गेल्याची खबर त्यांस कळली होती. आचार्यांच्या आज्ञापत्राचा शोध करतां तेंही नाहींसें झालें असें ठरलें. नंतर यासंबंधानें किल्ल्यांत सर्वत्र तपास सुरू झाला. 'आणि स्वाभाविकपणें शंका मजवर आली. ज्यास्त माहिती मिळतां मिळतां मीच या कामांत सामील होतें अशी सर्वांची खात्री झाली. आणि मी कूर्मदुर्गांत पाऊल टाकतें तों माझी आई आणि माझा भाऊ आणि इतर सर्व मंडळी मजवर तुटून पडलीं. त्या सर्वांनीं मला अतिशय शिव्याशाप दिले. पण मीं हें सर्व राणीसाहेबांसाठीं निमूटपणें सोसलें. शेवटीं माझ्या चुलत्याची व माझी गांठ पडली. तो मजवर अतिशय रागावला, त्यानें मला अति कडक शब्दांनीं ताडन केलें, फार तर काय, त्यानें मला निष्ठुरपणें मारिलें देखील!"

कुमुद०:—( अतिसंतापानें अंगाला कंप सुटून ) " काय? त्यानें तुला मारिलें! हें खरोखर त्याचें फारच मोठें पौरुष!"

नलिनी०:–" होय, सरदारसाहेब. त्यांनीं जर तसें केलें नसतें व सर्व चाकरमाणसां देखत माझी अशी अवहेलना झाली नसती तर मीं जें हें शेवटचें विश्वासघाताचें कृत्य केलें, हें तरी खचित माझे हातून झालें नसतें. काकासाहेबांची प्रतापदुर्गाकडे निघण्याची तयारी फार गडबडीनें चालली होती, ही संधि साधून तेथून निघावें असा मीं मनांत निश्चय केला. मला काकासाहे-

बांच्या संतापामुळें इतकी देखील भीति पडली होती कीं, मला तें कारागृहांतही कोंडून ठेवतील, व मजमुळें कदाचित् माझ्या आईचा व भावाचाही त्यांस संशय येऊन त्यांनाही कदाचित् त्रास होईल; म्हणून तेथून निघून राणीसाहेबांच्या पायांशीं यावें, त्यांना सर्व हकिकत कळवावी, आणि त्यांजपाशीं आश्रय मागावा असा मीं बेत केला. किल्ल्यांत जी धांदल उडाली होती त्यांत संधी साधून काकासाहेबांच्या खोलींतून तेवढी चिठ्ठी काढून घेतली आणि कशी तरी किल्ल्यांतुन सुटलें. नंतर होईल तितक्या त्वरेनें येथें आलें. पुढील सर्व हकिकत आपल्याला ठाऊकच आहे."

कुमुद०:—" जयद्रथराय प्रतापदुर्गाकडे पळाला ह्मणून जी बातमी मामासाहेबांस इतक्या लौकर कळली ता तुमचेच मार्फत तर मग ! "

नलिनीः—" होय मजकडूनच."

कुमुद०:—" बरें, आतां फक्त एकच प्रश्न विचारतों. ह्या अमूल्य देणगी संबंधानें फक्त एकच शब्द बोलायचा आहे ! ह्या देणगीच्या योगानें माझे अंत:करणांत अत्यंत आशा उत्पन्न झाली आहे ! हा शेला मीं –"

नलिनीः—( अभिमानानें व कोपानें ) " सरदारसाहेब, मीं ह्या ठिकाणीं असल्या क्षुद्र गोष्टीबद्दल आपल्याशीं बोलावें ह्मणून आलें नाहीं. आपल्या हातीं आतां मीं हें पत्र दिलें आहे तर राणीसाहेबांच्या जवळ त्यांच्या शत्रुकडील कोण हेर आहे हें शोधून काढण्याच्या कृत्यास आपण जितक्या लौकर लागाल तितकें बरें. "

कुमुद्बंधूनें त्या आंकड्याच्या भाषेंत लिहिलेल्या चिठ्ठीवरून एकवार नजर फिरविली. आणि तो ह्मणाला, " चिठ्ठींतील मजकूर अतिशय संक्षिप्त रीतीनें लिहिलेला आहे. तथापि बहुधा यावरून कांहीं तरी सुगावा काढतां येईल असें वाटतें. कालयवन देशाच्या दरबारांतील राजकार्यकुशल लोकांत या प्रकारच्या आंकड्याच्या भाषेचा विशेष उपयोग करितात. मला पूर्वी एकवार त्या दरबारीं कांहीं राजकीय कामासाठीं वकील ह्मणून यावें लागलें होतें व त्यावेळीं माझें राहणें तेथें बरेंच दिवस झाल्यामुळें मी कांहीं दरबारी लोकांपासून ही भाषा तेथें शिकलों."

नलिनीः—"तर मग गूढसिंहाच्या दरबारांत आपण कांहीं दिवस राहिलेले आहांत. बरें पण सरदारसाहेब आज येथें कालयवनदेशचे दोघे वकील बसवप्रभु आणि कालनीति हे आलेले आहेत असें ऐकलें, हें खरें काय ? आपली व त्यांची ओळख असेलच. "

कुमुद०:—"नाहीं, माझा व त्यांचा परिचय होण्याचा योग आला नाहीं. मी ज्यावेळीं गूढसिंहाच्या दरबारीं गेलों होतों त्यावेळीं हे दुसऱ्या कोणच्याशा देशाला कांहीं राजकीय कामाला गेलेले होते. पण गूढसिंहाच्या या वकीलांसंबंधानें विशेषेंकरून हा प्रश्न करण्याचा हेतु काय ?"

नलिनीः—"हेतु विशेष आहे असें नाहीं. पण काकासाहेबांचीं जीं गुप्त खलबतें चाल-

" तरुणी, मजवर पूर्ण विश्वास टाकण्यास कांहीं हरकत नाहीं असें तुला वाटलें, " कुमुदबंधु उत्साहपूर्वक म्हणाला, "ह्यांत तूं बिलकुल फसली नाहींस. नाहीं ! नाहीं ! तुला कोणत्याही गोष्टींत फसवावें अशी मला कधींही बुद्धि व्हावयाची नाहीं."

कुमुदबंधूचे हे शब्द ऐकून नलिनीच्या मुद्रेत एकदम कांहीं विलक्षण व अवर्णनीय फरक पडला. पण लागलींच पहिल्याप्रमाणें उदासीनता व गंभीरपणा स्वीकारून ती ह्मणाली, " सरदारसाहेब, राणीसाहेबांच्या हितासंबंधाच्या जेवढ्या म्हणून गोष्टी आहेत त्यांत आपण अत्यंत विश्वसनीय आहांत याबद्दल माझी पक्की खातरी आहे, आणि ह्मणूनच ती चिठ्ठी आपल्या हातीं दिली. "

कुमुद०:—" आणि याप्रमाणें मजवर इतका विश्वास टाकून तूं माझा गौरव केलास हे मजवर तुझे मोठे उपकार आहेत. पण हा असा एकाएकीं तुझ्या स्थितींत फरक—"

नलिनीः—(घाईनें मध्येंच) "हां, हां, मी समजलें आपण काय म्हणतां तें. होय. ह्या दोन तीन प्रहरांच्या अवकाशांत माझ्या स्थितींत फारच फरक पडला आहे, हें खरें. ज्याअर्थी आपणाला पहिली सर्व हकिकत कळविली आहे, त्याअर्थी पुढील सर्व गोष्टी आपल्यास कळणें योग्यच आहे. आपली माझी सकाळीं त्या अरण्यांत गांठ पडली होती, तेथून आपण निघाल्यानंतर लागलींच मीही कूर्मदुर्गाकडे चालतीं झालें. तेथें जाऊन पोंचतें तों जिकडे तिकडे सर्व गोंधळ व गडबड उडून गेली होती. काकासाहेब किल्ल्यांत परत आले होते आणि तुम्हीं किल्यांतून सुटून गेल्याची खबर त्यांस कळली होती. आचार्यांच्या आज्ञापत्राचा शोध करतां तेंही नाहींसें झालें असें ठरलें. नंतर यासंबंधानें किल्ल्यांत सर्वत्र तपास सुरू झाला. आणि स्वाभाविकपणें शंका मजवर आली. ज्यास्त माहिती मिळतां मिळतां मीच या कामांत सामील होतें अशी सर्वांची खात्री झाली. आणि मी कूर्मदुर्गांत पाऊल टाकतें तों माझी आई आणि माझा भाऊ आणि इतर सर्व मंडळी मजवर तुटून पडलीं. त्या सर्वांनीं मला अतिशय शिव्याशाप दिले. पण मीं हें सर्व राणीसाहेबांसाठीं निमूटपणें सोसलें. शेवटीं माझ्या चुलत्याची व माझी गांठ पडली. तो मजवर अतिशय रागावला, त्यानें मला अति कडक शब्दांनीं ताडन केलें, फार तर काय, त्यानें मला निष्ठुरपणें मारिलें देखील ! "

कुमुद०:—( अतिसंतापानें अंगाला कंप सुटून ) " काय ? त्यानें तुला मारिलें ! हें खरोखर त्याचें फारच मोठें पौरुष ! "

नलिनी०:—" होय, सरदारसाहेब. त्यांनीं जर तसें केलें नसतें व सर्व चाकरमाणसां देखत माझी अशी अवहेलना झाली नसती तर मीं जें हें शेवटचें विश्वासघातार्चे कृत्य केलें, हें तरी खचित माझे हातून झालें नसतें. काकासाहेबांची प्रतापदुर्गाकडे निघण्याची तयारी फार गडबडीनें चालली होती, ही संधि साधून तेथून निघावें असा मीं मनांत निश्चय केला. मला काकासाहे-

बांच्या संतापामुळें इतकी देखील भीति पडली होती कीं, मला ते कारागृहांतही कोंडून ठेवतील, व मजमुळें कदाचित् माझ्या आईचा व भावाचाही त्यांस संशय येऊन त्यांनाही कदाचित् त्रास होईल; म्हणून तेथून निघून राणीसाहेबांच्या पायांशीं यावें, त्यांना सर्व हकिकत कळवावी, आणि त्यांजपाशीं आश्रय मागावा असा मीं बेत केला. किल्ल्यांत जी धांदल उडाली होती त्यांत संधी साधून काकासाहेबांच्या खोलींतून तेवढी चिट्ठी काढून घेतली आणि कशी तरी किल्ल्यांतून सुटलें. नंतर होईल तितक्या त्वरेनें येथें आलें. पुढील सर्व हकिकत आपल्याला ठाऊकच आहे."

कुमुद०:—" जयद्रथराय प्रतापदुर्गाकडे पळाला ह्मणून जी बातमी मामासाहेबांस इतक्या लौकर कळली ती तुमचेच मार्फत तर मग ! "

नलिनी:—" होय मजकडूनच."

कुमुद०:—" बरें, आतां फक्त एकच प्रश्न विचारतों. ह्या अमूल्य देणगी संबंधानें फक्त एकच शब्द बोलायचा आहे ! ह्या देणगीच्या योगानें माझे अंत:करणांत अत्यंत आशा उत्पन्न झाली आहे! हा शेला मीं—"

नलिनी:—( अभिमानानें व कोपानें ) " सरदारसाहेब, मीं ह्या ठिकाणीं असल्या क्षुद्र गोष्टीबद्दल आपल्याशीं बोलावें ह्मणून आलें नाहीं. आपल्या हातीं आतां मीं हें पत्र दिलें आहे तर राणीसाहेबांच्या जवळ त्यांच्या शत्रूकडील कोण हेर आहे हें शोधून काढण्याच्या कृत्यास आपण जितक्या लौकर लागाल तितकें बरें. "

कुमुदबंधूनें त्या आंकड्याच्या भाषेंत लिहिलेल्या चिट्ठीवरून एकवार नजर फिरविली. आणि तो ह्मणाला, " चिट्ठींतील मजकूर अतिशय संक्षिप्त रीतीनें लिहिलेला आहे. तथापि बहुधा यावरून कांहीं तरी सुगावा काढतां येईल असें वाटतें. कालयवन देशाच्या दरबारांतील राजकार्यकुशल लोकांत या प्रकारच्या आंकड्याच्या भाषेचा विशेष उपयोग करितात. मला पूर्वी एकवार त्या दरबारीं कांहीं राजकीय कामासाठीं वकील ह्मणून यावें लागलें होतें व त्यावेळीं माझें राहणें तेथें बरेंच दिवस झाल्यामुळें मी कांहीं दरबारी लोकांपासून ही भाषा तेथें शिकलों."

नलिनी:—"तर मग गूहसिंहाच्या दरबारांत आपण कांहीं दिवस राहिलेले आहांत. बरें पण सरदारसाहेब आज येथें कालयवनदेशचे दोघे वकील बसवप्रभु आणि कालनीति हे आलेले आहेत असें ऐकलें, हें खरें काय ? आपली व त्यांची ओळख असेलच. "

कुमुद०:—"नाहीं, माझा व त्यांचा परिचय होण्याचा योग आला नाहीं. मी ज्यावेळीं गूहसिंहाच्या दरबारीं गेलों होतों त्यावेळीं हे दुसऱ्या कोणच्याशा देशाला कांहीं राजकीय कामाला गेलेले होते. पण गूहसिंहाच्या या वकीलांसंबंधानें विशेषेंकरून हा प्रश्न करण्याचा हेतु काय ?"

नलिनी:—"हेतु विशेष आहे असें नाहीं. पण काकासाहेबांचीं जीं गुप्त खलबतें चाल-

त त्यांत बसवप्रभु आणि कालनीति यांचीं नांवें वारंवार निघालेलीं मीं उडत उडत ऐकलीं आहेत. ते कसेही असले तथापि ते गुहसिंहाच्या दरबारचे वकील आहेत आणि गुहसिंह हा आमच्या राणीसाहेबांचा मनांतून अत्यंत द्वेष करितो. तेव्हां त्याच्या वकिलांच्या वर्तनावर बारीक नजर ठेवल्यानें कदाचित् आपल्यास उपयोग होण्याचा संभव आहे, ह्मणून सुचवून ठेविलें आहे."

कुमुद०:—"ठीक आहे. मी या दोघांवर पूर्ण लक्ष ठेवितों. असो. आतां तरी दुसऱ्या गोष्टीसंबंधानें मला एक शब्द बोलण्याची परवानगी द्या."

नलिनी:—"सरदारसाहेब ज्या महत्त्वाच्या गोष्टीसंबंधानें आपल्यास मजकडून माहिती मिळणें अवश्य होतें त्यासंबंधानें काय सांगावयाचें होतें तें मीं सांगितलें. आतां आपल्याकडून मात्र कांहीं गोष्टी मला कळावयाच्या आहेत. सकाळीं महासेन आणि शक्तिधर यांच्याकडे आपण गेलांत त्या वेळची सर्व हकिकत मला कळली नाहीं. मामासाहेबांनीं जी माहिती दिली ती अगदीं त्रोटक होती. ह्मणून आपली मर्जी असल्यास त्यासंबंधानें कांहीं हकिकत सांगा.

नलिनीची मुद्रा, तिची बोलण्याची पद्धत आणि तिचें एकंदर वर्तन हीं पाहून कुमुदबंधूस फिरून फिरून अतिशय आश्चर्य वाटे, आणि खेदही वाटे. पण अशा स्थितींत देखील तिच्याशीं आणखी एक क्षणभर बोलत उभें रहावें अशी त्याला इच्छा झाली. आणि यामुळें त्याची आणि महासेन व शक्तिधर यांची गांठ पडल्यावेळीं जें जें काय घडलें त्याचें सविस्तर वर्णन त्यानें नलिनीस दिलें. ती सर्व हकिकत शांतपणें व लक्षपूर्वक ऐकत होती. पण तिची मुद्रा पहिल्यासारखीच गंभीर व निरुत्साह होती. तिच्या वागणुकींत झालेला हा फरक पाहून कुमुदबंधूच्या मनांत काय काय विचार उत्पन्न झाले असतील हें सांगावयास का पाहिजे? त्याच दिवशीं सकाळीं त्याच्याशीं ती किती मोकळेपणानें व प्रेमानें वागत होती. आणि पुरते चार प्रहरही उलटले नाहींत तोंच हा फरक! बरें, हिच्या मनांत परकेपणानेंच वागावयाचें होतें तर मग हा शेला तिनें कां पाठविला असावा?

"मला ही सर्व हकिकत सांगण्याची आपण तसदी घेतली, हे आपले मजवर मोठे उपकार आहेत." कुमुदबंधूचें भाषण आटपल्यावर नलिनी ह्मणाली. "एका स्त्रीवर आलेल्या संकटांतून तिची मुक्तता करण्याकरितां आपण अश्रांत श्रम आणि विलक्षण धाडसें केलीं हें आपल्या शिपाईगिरीस फारच भूषणावह आहे. असो; ज्या कामाकरितां आपली भेट या ठिकाणीं व्हावयाची होती तें आटपलें. येतें तर आतां मी." असें ह्मणून नलिनी वाड्यांत जाण्याकरितां परत फिरली.

इतक्यांत कुमुदबंधु अत्यंत घाईनें ह्मणतो, "नलिनी, माझे येवढे दोन शब्द ऐकून घे! फक्त दोनच शब्द माझी येवढी एक विनंति ऐकून मग जा. हा शेला मजकडे येतांना फक्त 'मित्रत्वाचें दर्शक' ह्मणून जरी आला आहे, तथापि तो परस्पर-

प्रीतींचेंच चिन्ह आहे असें मानून मीं अंगावर घेतला आहे ? या गोष्टीस तुझी अनुमति आहेना ? "

" सरदारसाहेब हे शब्द आणि मजपुढें ! " नलिनी एखाद्या क्रुद्ध नागिणीप्रमाणें एकदम मागें वळून ह्मणाली. येवढा वेळ कसा तरी दाबून ठेवलेला तिचा कोप या भाषणामुळें अकस्मात् बाहेर पडला. तिच्या लाल नेत्रांतून प्रत्यक्ष अग्नीच्याच ठिणग्या बाहेर पडत होत्या. एकंदर मुद्रा अत्यंत संतप्त आणि भयप्रद झाली होती. ती पुनः कुमुद्बंधूकडे पहात ह्मणाली: " तुह्मीं अशा रीतीनें माझा अपमान करावयास तयार व्हाल, असें मला नव्हतें वाटलें. यापुढें आपली मूर्ति दृष्टीसमोर न येईल तर फार उपकार होतील. "

कुमुद्बंधु या भाषणानें इतका आश्चर्यचकित झाला कीं, तो असल्या जाग्यापासून भ्यालासारखा होऊन चार पावलें मागेंच सरला. इतक्यांत नलिनी बागेच्या फाटकांतून बाहेर पडून वाड्याकडे चालती झाली. कुमुद्बंधु पूर्वस्थितीवर येतांच तिच्या पाठीमागून जावें असा विचार त्याच्या मनांत आला. पण लागलींच त्याचा स्वाभिमान जागृत होऊन तो असल्या जागींच उभा राहिला. तो मनांत ह्मणतो. " ही किती मूर्खपणाची लहर तरी ! एक प्रहरापूर्वीं आपला मित्रभाव दाखविण्याकरितां मोठ्या थाटानें मजकडे ही देणगी पाठवून देते काय, आणि लागलींच एखाद्या अनोळखी परस्थाप्रमाणें मजशीं वागते काय ? या दोहोंत कांहीं तरी मेळ ! का, मी एक साधारण क्षुद्र शिपाई असून तिच्यासारख्या अत्यंत कुलीन स्त्रीच्या पाणिग्रहणाची इच्छा उघडपणें प्रदर्शित केली ह्मणून तिला राग आला असावा ? पण मी कोण हें—"

कुमुद्बंधूचें आत्मगत भाषण येथेंच थांबलें. कारण समोरून राणीची मैत्रिण कमला येत असलेली त्याच्या दृष्टीस पडली. ती हास्यवदन करून त्याच्याचकडे पहात पुढें येत होती. लागलींच आपली मुद्रा पूर्ववत शांत व आनंदी करण्याचा प्रयत्न करून तोही कांहीं पावलें पुढें सरला. कांहींशी जवळ येतांच कमला हंसत हंसत ह्मणाली;—" सरदारसाहेब, आपल्यापुढें शर्थ झाली ! राणीसाहेबांच्या संरक्षणाकरितां जें सैन्य आपण गोळा करून आणलेंत तें माझ्या सूचनेवरून असें शेवटीं राणीसाहेबांना सांगितलेंतच ! यांत आपण आपलें औदार्य दाखविलें खरें; पण माझी त्यांत थोडी फजिती झाली. "

"आणि असा अविचार तरी माझ्या हातून यांत काय झाला." कुमुद्बंधु विचारतो. " त्या कृत्याच्या यशाचा सबंध वांटा मीं एकट्यानेंच उचलावा, हें मनाला बरें वाटेना. शिवाय राणीसाहेबांची जी आज एका महत्संकटांतून मुक्तता झाली ती मुख्यत्वेंकरून कोणामुळें, हें त्यांना कळणेंही आवश्यच होतें. "

कमला उत्तर करिते " पण, मीं आपल्यास सूचना केली होती ती राणीसाहेबांच्या अनुमोदनावांचून होती एवढेंच नव्हे तर त्यांच्या इच्छेच्या व आज्ञेच्या अगदीं उलट होती. ह्मणून जरी या कृत्याचा परि-

त त्यांत बसवप्रभु आणि कालनीति यांचीं नांवें वारंवार निघालेलीं मीं उडत उडत ऐ-कलीं आहेत. ते कसेही असले तथापि ते गुहसिंहाच्या दरबारचे वकील आहेत आणि गुहसिंह हा आमच्या राणीसाहेबांचा मनां-तून अत्यंत द्वेष करितो. तेव्हां त्याच्या वकि-लांच्या वर्तनावर बारीक नजर ठेवल्यानें कदाचित् आपल्यास उपयोग होण्याचा संभव आहे, म्हणून सुचवून ठेविलें आहे."

कुमुद०:—"ठीक आहे. मी या दोघांवर पूर्ण लक्ष ठेवितों. असो. आतां तरी दुसऱ्या गोष्टीसंबंधानें मला एक शब्द बोलण्याची परवानगी द्या."

नलिनी:—"सरदारसाहेब ज्या महत्वा-च्या गोष्टीसंबंधानें आपल्यास मजकडून मा-हिती मिळणें अवश्य होतें त्यासंबंधानें काय सांगावयाचें होतें तें मीं सांगितलें. आतां आपल्याकडून मात्र कांहीं गोष्टी मला क-ळावयाच्या आहेत. सकाळीं महासेन आ-णि शक्तिधर यांच्याकडे आपण गेलांत त्या वेळची सर्व हकिकत मला कळली नाहीं. मामासाहेबांनीं जी माहिती दिली ती अग-दीं त्रोटक होती. म्हणून आपली मर्जी अ-सल्यास त्यासंबंधानें कांहीं हकिकत सांगा.

नलिनीची मुद्रा, तिची बोलण्याची प-द्धत आणि तिचें एकंदर वर्तन हीं पाहून कुमुदबंधूस फिरून फिरून अतिशय आ-श्चर्य वाटे, आणि खेदही वाटे. पण अशा स्थितींत देखील तिच्याशीं आणखी एक क्षणभर बोलत उभें रहावें अशी त्याला इच्छा झाली. आणि यामुळें त्याची आणि महासेन व शक्तिधर यांची गांठ पडल्या-वेळीं जें जें काय घडलें त्याचें सविस्तर वर्णन त्यानें नलिनीस दिलें. ती सर्व हकि-कत शांतपणें व लक्षपूर्वक ऐकत होती. पण तिची मुद्रा पहिल्यासारखीच गंभीर व नि-रुत्साह होती. तिच्या वागणुकींत झालेला हा फरक पाहून कुमुदबंधूच्या मनांत काय काय विचार उत्पन्न झाले असतील हें सां-गावयास का पाहिजे? त्याच दिवशीं स-काळीं त्याच्याशीं ती किती मोकळेपणानें व प्रेमानें वागत होती. आणि पुरते चार प्रहरही उलटले नाहींत तोंच हा फरक! बरें, हिच्या मनांत परकेपणानेंच वागावयाचें होतें तर मग हा शेला तिनें कां पाठविला असावा?

"मला ही सर्व हकिकत सांगण्याची आपण तसदी घेतली, हे आपले मजवर मोठे उपकार आहेत." कुमुदबंधूचें भाषण आटपल्यावर नलिनी म्हणाली. "एका स्त्रीवर आलेल्या संकटांतून तिची मुक्तता करण्याकरितां आपण अश्रांत श्रम आणि विलक्षण धाडसें केलीं हें आपल्या शिपाई-गिरीस फारच भूषणावह आहे. असो; ज्या कामाकरितां आपली भेट या ठिकाणीं व्हा-वयाची होती तें आटपलें. येतें तर आतां मी." असें म्हणून नलिनी वाड्यांत जा-ण्याकरितां परत फिरली.

इतक्यांत कुमुदबंधु अत्यंत घाईनें म्ह-णतो, "नलिनी, माझे येवढे दोन शब्द ऐकून घे! फक्त दोनच शब्द माझी येवढी एक विनंति ऐकून मग जा. हा शेला मज-कडे येतांना फक्त 'मित्रत्वाचें दर्शक' म्ह-णून जरी आला आहे, तथापि तो परस्पर-

प्रीतीचेंच चिन्ह आहे असें मानून मीं अंगावर घेतला आहे? या गोष्टीस तुझी अनुमति आहेना?"

"सरदारसाहेब हे शब्द आणि मजपुढें!" नलिनी एखाद्या क्रुद्ध नागिणीप्रमाणें एकदम मागें वळून ह्मणाली. येवढा वेळ कसा तरी दाबून ठेवलेला तिचा कोप या भाषणामुळें अकस्मात् बाहेर पडला. तिच्या लाल नेत्रांतून प्रत्यक्ष अग्नीच्याच ठिणग्या बाहेर पडत होत्या. एकंदर मुद्रा अत्यंत संतप्त आणि भयप्रद झाली होती. ती पुनः कुमुदबंधूकडे पहात ह्मणालीः "तुह्मीं अशा रीतीनें माझा अपमान करावयास तयार व्हाल, असें मला नव्हतें वाटलें. यापुढें आपली मूर्ति दृष्टीसमोर न येईल तर फार उपकार होतील."

कुमुदबंधु या भाषणानें इतका आश्चर्यचकित झाला कीं, तो असल्या जाग्यापासून भ्यालासारखा होऊन चार पावलें मागेंच सरला. इतक्यांत नलिनी बागेच्या फाटकांतून बाहेर पडून वाड्याकडे चालती झाली. कुमुदबंधु पूर्वस्थितीवर येतांच तिच्या पाठीमागून जावें असा विचार त्याच्या मनांत आला. पण लागलींच त्याचा स्वाभिमान जागृत होऊन तो असल्या जागींच उभा राहिला. तो मनांत ह्मणतो. "ही किती मूर्खपणाची लहर तरी! एक प्रहरापूर्वी आपला मित्रभाव दाखविण्याकरितां मोठ्या थाटानें मजकडे ही देणगी पाठवून देते काय, आणि लागलींच एखाद्या अनोळखी परस्थाप्रमाणें मजशीं वागते काय? या दोहोंत कांहीं तरी मेळ! का, मी एक साधारण क्षुद्र शिपाई असून तिच्यासारख्या अत्यंत कुलीन स्त्रीच्या पाणिग्रहणाची इच्छा उघडपणें प्रदर्शित केली ह्मणून तिला राग आला असावा? पण मी कोण हें—"

कुमुदबंधूचें आत्मगत भाषण येथेंच थांबलें. कारण समोरून राणीची मैत्रिण कमला येत असलेली त्याच्या दृष्टीस पडली. ती हास्यवदन करून त्याच्याचकडे पहात पुढें येत होती. लागलींच आपली मुद्रा पूर्ववत शांत व आनंदी करण्याचा प्रयत्न करून तोही कांहीं पावलें पुढें सरला. कांहींशी जवळ येतांच कमला हंसत हंसत ह्मणाली;—"सरदारसाहेब, आपल्यापुढें शर्थ झाली! राणीसाहेबांच्या संरक्षणाकरितां जें सैन्य आपण गोळा करून आणलेंत तें माझ्या सूचनेवरून असें शेवटीं राणीसाहेबांना सांगितलेंतच! यांत आपण आपलें औदार्य दाखविलें खरें; पण माझी त्यांत थोडी फजिती झाली."

"आणि असा अविचार तरी माझ्या हातून यांत काय झाला." कुमुदबंधु विचारतो. "त्या कृत्याच्या यशाचा संबंध वांटा मीं एकट्यानेंच उचलावा, हें मनाला बरें वाटेना. शिवाय राणीसाहेबांची जी आज एका महत्संकटांतून मुक्तता झाली ती मुख्यत्वेंकरून कोणामुळें, हें त्यांना कळणेंही आवश्यच होतें."

कमला उत्तर करिते "पण, मीं आपल्यास सूचना केली होती ती राणीसाहेबांच्या अनुमोदनावांचून होती एवढेंच नव्हे तर त्यांच्या इच्छेच्या व आज्ञेच्या अगदीं उलट होती. ह्मणून जरी या कृत्याचा परि-

णाम इतका चांगला झाला तरी कोणत्याही कारणाकरितां राणीसाहेबांच्या आज्ञेचा भंग करण्यास मी तयार झालें हें राणीसाहेबांस कळणें बरें नव्हे. पण तें असो आतां. आज तरी राणीसाहेब मजवर रागावणार नाहींत ! मीं कोणत्या हेतूनें आज त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन केलें हें त्यांस ठाऊक आहे. आपल्या संबंधानें म्हणाल, तर सरदारसाहेब, आपण आज जी **पंचगांग**च्या राणीची सेवा केली आहे ती सर्व **महाराष्ट्रास** कळली पाहिजे ! आणि आपल्या शौर्य, धैर्य, औदार्यादि गुणांबद्दल सर्व **पंचगांगीय** प्रजेनें या गरीब अबलेप्रमाणेंच आपलें अभिनंदन व आपला आदर केला पाहिजे."

हें शेवटचें वाक्य ऐकून कुमुदबंधु एकदम दचकला. आणि मनांत कांहीं कल्पना येऊन त्याची दृष्टि चट्दिशीं अंगावरील शेल्याकडे वळली.

त्याची दृष्टि तशी वळलेली पाहून कमला ह्मणते, "या एका अज्ञान कुमारिकेनें आदरबुद्धीनें आपल्याकडे पाठविलेल्या क्षुद्र देणगीचा आपण धिःकार केला नाहीं हें पाहून तिला अत्यंत हर्ष वाटत आहे. सरदारसाहेब, आपल्या देशांतील चालीरीती मला माहीत नाहींत; पण आमच्या देशांत तरी अशी चाल आहे कीं, आपल्यासारख्या शूर सरदारांनीं एखाद्या अबलाजनांस अशा प्रकारें साहाय्य केलें असतां कोणत्याही कुलस्त्रीनें अशा रीतीनें आपली आदरबुद्धि व्यक्त करण्यास हरकत नाहीं."

ह्या भाषणानें कुमुदबंधूच्या मनाचा अधिकच घोंटाळा उडून गेला, आणि त्यावर काय उत्तर द्यावें हें त्याला सुचेना.

कमला नेहमींच्या विनयशील आणि निष्कपटी मुद्रेनें आणखी ह्मणते, "आणि ह्मणून मीं जें केलें तें रीतीच्या किंवा योग्य मर्यादेच्या बाहेर होतें असें कोणालाही वाटण्याचें कारण नाहीं. आज आपण ज्या कृत्यांत इतकें धैर्य, इतकी धूर्तता, आणि इतका मोठेपणा दाखविला, त्या कृत्यास प्रथमतः मीं तुह्मांस प्रवृत्त केलें म्हणून याबद्दल माझी आदरबुद्धि प्रदर्शित करण्याकरितां व योग्य रीतीनें आपलें अभिनंदन करण्याकरितां असली कांहीं तरी देणगी आपल्याकडे पाठविणें मला अगदीं अवश्यसें वाटलें."

या बोलण्यानें कुमुदबंधूचें मन पहिल्यापेक्षांही अधिकच गोंधळून गेलें, आणि कमलेच्या भाषणावर कांहीं तरी उत्तर देणें आतां अगदीं भाग होतें. तो तसाच गोंधळांत असतां म्हणतो, "तर मग ही अप्रतीम देणगी आपल्या उदार व प्रेमळ हातांतून आली—"

"छी, छी, सरदारसाहेब" कमला त्याला पुरतें न बोलूं देतां किंचित् स्मित वदन करून ह्मणते, "असल्या क्षुद्र देणगीला आपण इतकें नको कांहीं महत्व द्यायला !"

"पण मी—मी," कुमुदबंधु तसाच आडखळत ह्मणाला, "माझी समजूत कांहीं निराळीच झाली होती. मला अशी आशा उत्पन्न झाली होती कीं,—"

"सरदारसाहेब" फिरून कमला म-

ध्येंच म्हणाली, " जी गोष्ट मीं इतक्या शुद्ध अंतःकरणानें, आणि स्वाभाविक सरल बुद्धीनें केली, तिचा अर्थ जर कांहीं भलताच झाला असेल, तर मीं केलें याबद्दल मला फारच वाईट वाटतें. म्हणून आपल्याला मी फिरून एकवार सांगतें कीं, ही देणगी पाठविण्यांत आपल्याविषयींची आदरबुद्धि व्यक्त करण्यापलीकडे माझा कांहींएक हेतु नव्हता. आपला जो थोडासा परिचय मला झाला आहे, त्यावरून माझी तर अशी खात्री झाली आहे कीं, आपलें अंतःकरण अत्यंत शुद्ध आणि निष्कपटी असावें. " हें भाषण करतांना कमलेचा नेहमींचा गंभीरपणा, आणि शांतपणा तिच्या ठिकाणीं पूर्णपणें वास करीत होता.

कमलेचें हें भाषण ऐकून कुमुद्बंधु झट्दिशीं पूर्वस्थितीवर आला. तो ह्मणतो, " माझ्या अंतःकरणाच्या शुद्धतेसंबंधानें आणि माझ्या निष्कपट सरळ स्वभावासंबंधानें जी तुमची कल्पना आहे ती किंचितूही बदलली असतां त्याबद्दल मला फारच दुःख होईल. कांहीं वेळपर्यंत आपल्या भाषणामुळें जो माझ्या मनाचा गोंधळ झाला, त्याचें कारण मी तुम्हांस उघडपणेंच सांगतों. ही देणगी कोणाकडून आली हें मला कळलें नव्हतें, त्यामुळें याचा अर्थ काय करावयाचा तें मला समजेना. "

" हां हां समजलें. " कमला किंचित् लाजल्यासारखी होऊन म्हणाली. " आपल्याला कदाचित् वाटलें असावें कीं, ही देणगी पाठविण्यांत पाठविणाराचा कांहीं तरी गुप्त हेतु असावा. खरेंच. बरोबर जी चिठ्ठी मीं पाठविली होती, त्यावर माझें नांव मीं घातलें नाहीं. ही माझी चूकच झाली खरी. विश्वासराव पांडचे यांच्या मुलीचें नांव चिठ्ठीवर दिसलें असतें, ह्मणजे कोणत्याही गुप्त किंवा अयोग्य हेतूनें ती देणगी पाठविलेली नाहीं असें आपल्यास तेव्हांच वाटलें असतें. " शेवटचें वाक्य कमला किंचित् अभिमानयुक्त स्वरानें बोलली.

" कमलाताई, मी शपथपुरःसर तुम्हांला सांगतों, " कुमुद्बंधु म्हणाला, " तुमच्या ठिकाणीं माझी अत्यंत आदरबुद्धि आहे. मी राणीसाहेबांच्या दरबारांत आल्यास एकच दिवस झाला, पण तेवढ्या अवकाशांत तुमच्या सद्गुणीपणाबद्दल आणि गंभीर वर्तनाबद्दल माझी पूर्ण खात्री झाली आहे, आणि ही आपली देणगी आपल्या निष्कपट व शुद्धस्नेहाचें दर्शक आहे असें समजून मी तिचा अत्यंत आदरपूर्वक स्वीकार करितों. "

हें भाषण आटपतें आहे तोंच पलीकडच्या लताकुंजांत कोणाचीं पावलें वाजल्याचा भास झाला. कुमुद्बंधूनें चट्दिशीं त्या बाजूस वळून इकडे तिकडे पाहिलें, पण कोणीही आसपास असलेलें त्याच्या दृष्टीस पडलें नाहीं. तो फिरून कमलेकडे वळून ह्मणालाः " आपलें बोलणें कोणीतरी गुप्तपणें ऐकत होतें ! "

" आणि खुशाल ऐकेना. " कमला पूर्वीप्रमाणेंच शांत मुद्रेनें ह्मणाली. " जे ह्मणून या कमलेस ओळखतात त्या सर्वांस ही गोष्ट पक्की ठाऊक आहे कीं, हिच्या हातून आ-

णाम इतका चांगला झाला तरी कोणत्याही कारणाकरितां राणीसाहेबांच्या आज्ञेचा भंग करण्यास मी तयार झालें हें राणीसाहेबांस कळणें बरें नव्हे. पण तें असो आतां. आज तरी राणीसाहेब मजवर रागावणार नाहींत ! मीं कोणत्या हेतूनें आज त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन केलें हें त्यांस ठाऊक आहे. आपल्या संबंधानें म्हणाल, तर सरदारसाहेब, आपण आज जी पंचगांगच्या राणीची सेवा केली आहे ती सर्व महाराष्ट्रास कळली पाहिजे ! आणि आपल्या शौर्य, धैर्य, औदार्यादि गुणांबद्दल सर्व पंचगांगीय प्रजेनें या गरीब अबलेप्रमाणेंच आपलें अभिनंदन व आपला आदर केला पाहिजे."

हें शेवटचें वाक्य ऐकून कुमुदबंधु एकदम दचकला. आणि मनांत कांहीं कल्पना येऊन त्याची दृष्टि चट्दिशी अंगावरील शेल्याकडे वळली.

त्याची दृष्टि तशी वळलेली पाहून कमला ह्मणते, "या एका अज्ञान कुमारिकेनें आदरबुद्धीनें आपल्याकडे पाठविलेल्या क्षुद्र देणगीचा आपण धिःकार केला नाहीं हें पाहून तिला अत्यंत हर्ष वाटत आहे. सरदारसाहेब, आपल्या देशांतील चालीरीती मला माहीत नाहींत; पण आमच्या देशांत तरी अशी चाल आहे कीं, आपल्यासारख्या शूर सरदारांनीं एखाद्या अबलाजनांस अशा प्रकारें साहाय्य केलें असतां कोणत्याही कुलस्त्रीनें अशा रीतीनें आपली आदरबुद्धि व्यक्त करण्यास हरकत नाहीं."

ह्या भाषणानें कुमुदबंधूच्या मनाचा अधिकच घोंटाळा उडून गेला, आणि त्यावर काय उत्तर द्यावें हें त्याला सुचेना.

कमला नेहमींच्या विनयशील आणि निष्कपटी मुद्रेनें आणखी ह्मणते, "आणि ह्मणून मीं जें केलें तें रीतीच्या किंवा योग्य मर्यादेच्या बाहेर होतें असें कोणालाही वाटण्याचें कारण नाहीं. आज आपण ज्या कृत्यांत इतकें धैर्य, इतकी धूर्तता, आणि इतका मोठेपणा दाखविला, त्या कृत्यास प्रथमतः मीं तुह्मांस प्रवृत्त केलें म्हणून याबद्दल माझी आदरबुद्धि प्रदर्शित करण्याकरितां व योग्य रीतीनें आपलें अभिनंदन करण्याकरितां असली कांहीं तरी देणगी आपल्याकडे पाठविणें मला अगदीं अवश्यसें वाटलें."

या बोलण्यानें कुमुदबंधूचें मन पहिल्यापेक्षांही अधिकच गोंधळून गेलें, आणि कमलेच्या भाषणावर कांहीं तरी उत्तर देणें आतां अगदीं भाग होतें. तो तसाच गोंधळांत असतां म्हणतो, "तर मग ही अप्रतीम देणगी आपल्या उदार व प्रेमळ हातांतून आली—"

"छी, छी, सरदारसाहेब" कमला त्याला पुरतें न बोलूं देतां किंचित् स्मित वदन करून ह्मणते, "असल्या क्षुद्र देणगीला आपण इतकें नको कांहीं महत्व द्यायला !"

"पण मी—मी," कुमुदबंधु तसाच आडखळत ह्मणाला, "माझी समजूत कांहीं निराळीच झाली होती. मला अशी आशा उत्पन्न झाली होती कीं,—"

"सरदारसाहेब" फिरून कमला म-

ध्येंच म्हणाली, " जी गोष्ट मीं इतक्या शुद्ध अंतःकरणानें, आणि स्वाभाविक सरल बुद्धीनें केली, तिचा अर्थ जर कांहीं भलताच झाला असेल, तर मीं केलें याबद्दल मला फारच वाईट वाटतें. म्हणून आपल्याला मी फिरून एकवार सांगतें कीं, ही देणगी पाठविण्यांत आपल्याविषयींची आदरबुद्धि व्यक्त करण्यापलीकडे माझा कांहींएक हेतु नव्हता. आपला जो थोडासा परिचय मला झाला आहे, त्यावरून माझी तर अशी खात्री झाली आहे कीं, आपलें अंतःकरण अत्यंत शुद्ध आणि निष्कपटी असावें. " हें भाषण करतांना कमलेचा नेहमींचा गंभीरपणा, आणि शांतपणा तिच्या ठिकाणीं पूर्णपणें वास करीत होता.

कमलेचें हें भाषण ऐकून कुमुद्बंधु झट्दिशीं पूर्वस्थितीवर आला. तो ह्मणतो, " माझ्या अंतःकरणाच्या शुद्धतेसंबंधानें आणि माझ्या निष्कपट सरळ स्वभावासंबंधानें जी तुमची कल्पना आहे ती किंचितूही बदलली असतां त्याबद्दल मला फारच दुःख होईल. कांहीं वेळपर्यंत आपल्या भाषणामुळें जो माझ्या मनाचा गोंधळ झाला, त्याचें कारण मी तुम्हांस उघडपणेंच सांगतों. ही देणगी कोणाकडून आली हें मला कळलें नव्हतें, त्यामुळें याचा अर्थ काय करावयाचा तें मला समजेना. "

" हां हां समजलें. " कमला किंचित् लाजल्यासारखी होऊन म्हणाली. " आपल्याला कदाचित् वाटलें असावें कीं, ही देणगी पाठविण्यांत पाठविणाराचा कांहीं तरी गुप्त हेतु असावा. खरेंच. बरोबर जी चिठ्ठी मीं पाठविली होती, त्यावर माझें नांव मीं घातलें नाहीं. ही माझी चूकच झाली खरी. विश्वासराव पांडेय यांच्या मुलीचें नांव चिठ्ठीवर दिसलें असतें, ह्मणजे कोणत्याही गुप्त किंवा अयोग्य हेतूनें ती देणगी पाठविलेली नाहीं असें आपल्यास तेव्हांच वाटलें असतें. " शेवटचें वाक्य कमला किंचित् अभिमानयुक्त स्वरानें बोलली.

" कमलाताई, मी शपथपुरःसर तुम्हांला सांगतों, " कुमुद्बंधु म्हणाला, " तुमच्या ठिकाणीं माझी अत्यंत आदरबुद्धि आहे. मी राणीसाहेबांच्या दरबारांत आल्यास एकच दिवस झाला, पण तेवढ्या अवकाशांत तुमच्या सद्गुणीपणाबद्दल आणि गंभीर वर्तनाबद्दल माझी पूर्ण खात्री झाली आहे, आणि ही आपली देणगी आपल्या निष्कपट व शुद्धस्नेहाचें दर्शक आहे असें समजून मी तिचा अत्यंत आदरपूर्वक स्वीकार करितों. "

हें भाषण आटपतें आहे तोंच पलीकडच्या लताकुंजांत कोणाचीं पावलें वाजल्याचा भास झाला. कुमुद्बंधूनें चट्दिशीं त्या बाजूस वळून इकडे तिकडे पाहिलें, पण कोणीही आसपास असलेलें त्याच्या दृष्टीस पडलें नाहीं. तो फिरून कमलेकडे वळून ह्मणालाः " आपलें बोलणें कोणीतरी गुप्तपणें ऐकत होतें ! "

" आणि खुशाल ऐकेना. " कमला पूर्वीप्रमाणेंच शांत मुद्रेनें ह्मणाली. " जे ह्मणून या कमलेस ओळखतात त्या सर्वांस ही गोष्ट पक्की ठाऊक आहे कीं, हिच्या हातून आ-

पल्या स्वतःस किंवा आपल्या कुलास दोष लागण्यासारखें वर्तन किंवा भाषण अल्लडपणामुळें किंवा अव्यवस्थित चित्तामुळें कधींही व्हावयाचें नाहीं."

"होय, हें अगदीं खरें." कुमुदबंधु उत्तर करितो. "पण कोणीतरी आपलें भाषण आडून ऐकत होतें यांत शंका नाहीं. मग तें कोणत्या हेतूनें असेल तें असो!"

"असल्या क्षुद्र गोष्टीला आपण इतकें महत्व देतां याचें मला थोडें आश्चर्य वाटतें" कमला हांसत हांसत उत्तर करिते. "या सायंकाळच्या वेळीं निरनिराळीं स्त्रीपुरुषें बागेंतून हिंडत असतात, आणि कोणी तरी शुष्क जिज्ञासेमुळें आह्मीं कशाबद्दल बोलत आहोंत हें जातां जातां ऐकण्यासाठीं उभें राहिलें असेल, व कदाचित् आडून ऐकत असतां दृष्टीस पडलेलें वाईट ही भीति फिरून मनांत येऊन झट्दिशीं निघून गेलें असेल. त्यांत विशेष तें काय?"

याप्रमाणें भाषण झाल्यावर कमलेनें कुमुदबंधूचा निरोप घेतला. आणि ती जवळच्याच वाटेनें बागेच्या बाहेर पडून वाड्याकडे चालती झाली. भोजनाची वेळ जवळ आल्यामुळें कुमुदबंधुही दुसऱ्या वाटेनें वाड्याकडेच चालता झाला.

कमलेशीं एवढा वेळ चाललेलें भाषण आटपतांच कुमुदबंधूच्या मनांत काय काय विचार आले असतील! त्याच्या मनोविकारांत एकदम केवढा बदल झाला असेल! नलिनीचें थोड्या वेळापूर्वीचें वर्तन अनुमानरूपीं मंददर्शी भिंगाआडून पाहण्याचें आतां अगदींच कारण राहिलें नव्हतें, आणि ह्मणून, तें आतां विलक्षण वाटण्यास जागा राहिली नव्हती. त्या वर्तनाचें कारण व हेतु त्याला आतां स्पष्टपणें दिसूं लागले. नलिनीच्या कोपाचें कारण तो जरीचा कसूदा काढलेला शेलाच अशी त्याची खात्री झाली. नलिनीच्या भाषणांतील ज्या कितीएक गोष्टी त्याला थोड्या वेळापूर्वी अगदीं गूढ अशा वाटत होत्या, त्या आतां उघड झाल्या. तो मनांत ह्मणतो, "अगदीं बरोबर! प्रथमतः जेव्हां अंतरावरून तिनें मला पाहिलें तेव्हां तिचें मुख किती प्रसन्न आणि आनंदी दिसत होतें! तेंच ती जवळ येऊन तिनें एकवार मजकडे पाहतांच तिची मुद्रा आणि वर्तन एकदम किती बदललीं! असा फरक एकदम होण्याला दुसरें काय कारण असणार! तिची दृष्टि या शेल्याकडे वळली हेंच नव्हे का! तो कोणत्या तरी दुसऱ्या स्त्रीच्या हातून आलेला असावा असें त्या कसूद्यावरून तिनें तेव्हांच ओळखिलें असावें, आणि त्याबरोबर तिचें मन एकदम खवळून गेलें असावें. दुसऱ्या कोणा तरी तरुणीचा मजशीं लोभ जडला असावा आणि माझेंही मन तिजकडे वळलेलें असावें हीच कल्पना तिच्या मनांत आली खचित्. आणि अशी कल्पना मनांत आल्यावर मन क्षुब्ध झाल्यावांचून कसें राहणार?"

याप्रमाणें नलिनीच्या चमत्कारिक भाषणाचा व वर्तनाचा अर्थ त्यानें केला. आणि हे सर्व विचार मनांत येतांच त्याचें अंतःकरण आनंदातिशयानें नाचूं लागलें. तो फिरून मनांत ह्मणतो, "खचित खचित नलिनीचें अंतःकरण मजकडे वळलें आहे!

खचित ती माझ्या ठिकाणीं अनुरक्त आहे! याबद्दल आतां मुळींच शंका नको. ही झालेली चुकी तिला कळवून सर्व गोष्टींचा उलगडा तिजपुढें स्पष्टपणें करण्याचा प्रसंग आतां केव्हां बरें येईल!"

याप्रमाणें अनेक विचार त्याचे मनांत एकावर एक येत होते. तो वाड्यांत गेला, खोलींत जाऊन बसला, भोजनाची वेळ होतांच पंक्तीला बसला, तथापि हे विचार त्याला सोडीनात. शेवटीं भोजनोत्तर तो आपल्या खोलीकडे न जातां फिरून बागेकडेच वळला. आणि प्रथम ज्या जागीं नलिनीची व त्याची गांठ पडली होती तेथें जाऊन ती प्रत्यक्ष नाहीं तथापि तिची मूर्ति डोळ्यापुढें आणून त्यानें आपल्या मनाशीं भाषण सुरू केलें. तो आपल्या मनाशींच बोलत होता; परंतु त्याचें सर्व भाषण आसपास असणाऱ्या एकाद्या माणसास सहज ऐकूं येईल इतक्या मोठ्यानें त्याचे आत्मगत विचार चालले होते.

तो ह्मणतो, "देवा, ती जर या वेळीं येथें असती तर किती चांगलें झालें असतें! मीं तिला सर्व गोष्टी नीट समजावून दिल्या असत्या. आणि ही चूक कशी झाली हें तिला सहज कळलें असतें! परमेश्वरा, आतां फिरून तिची माझी गांठ केव्हां पडेल! आणि मी तिला केव्हां सांगेन कीं तुझा अपमान करावा ह्मणून मीं तो शेला अंगावर घेतला नव्हता तर तुझ्या प्रसादाचें चिन्ह तुझ्या हातून आलेलें असें समजून मीं त्याचा स्वीकार केला. नलिनी, खचित तुझ्याच ठिकाणीं हें अंतःकरण बद्ध झालें आहे. प्रिये, तूं जी रागावलीस तें अगदीं बरोबर. चार प्रहरांपूर्वीं तुझ्याशीं इतक्या प्रेमाच्या व अनुरागाच्या गोष्टी बोलून लागलींच सायंकाळीं दुसरीकडून आलेलें प्रीतिचिन्ह अंगावर घेऊन मी तुजपुढें आलों असें वाटल्यावर तुला कां बरें कोप येऊं नये! पण आपली दोघांचीही चुकी झाली. या प्रियजनाबद्दल तुझ्या मनांत आलेली ही कुकल्पना आतां केव्हां बरें निघेल? बद्रिकेशा, या वेळीं जर नलिनीला येथें आणशील तर—"

कुमुदबंधु—इतकें अर्धें वाक्य बोलतो तोंच निकट असलेल्या एका लताकुंजांतून झट्दिशीं एक वनदेवतेसारखी मूर्ति बाहेर आली. आणि कुमुदबंधूच्या स्कंधावर हात ठेवून आपल्या प्रेमपूर्णदृष्टीनें त्याच्या मुखावर अमृतवर्षाव करीत स्वभावतः अत्यंत मधुर व या वेळीं आनंदामुळें किंचित् सकम्प झालेल्या मृदु स्वरानें ह्मणाली, "सरदारसाहेब, ही पहा नलिनी येथेंच आहे."

"नलिनी, प्रिये," कुमुदबंधु साश्चर्य व सोत्साह मुद्रेनें तिजकडे पहात एकदम उठून ह्मणाला, "या वेळच्या माझ्या सुखास सीमाच नाहीं." इतकें ह्मणून त्यानें तिचा हात आपल्या हातांत घेतला. आणि फिरून तो म्हणतो, "पण आधीं मला सांग तुझी वृत्ती एवढ्यांत कशी बदलली? मजवरचा तो सर्व कोप एकदम कसा पळाला?"

नलिनीनें नम्रपणें आपला हात सोडवून घेतला आणि ती किंचित् मर्यादेनें थोडी अंतरावर उभी राहिली. नंतर लज्जेनें

साहजिकच मान थोडीशी खालीं घालून ती ह्मणते, "सरदारसाहेब, मी संध्याकाळीं आपल्यावर रागावून निघालें व कांहीं अंतरावर गेलें तो कमला बागेंत आलेली मीं पाहिली. त्याबरोबर माझ्या मनांत सहजच शंका उत्पन्न झाली ह्मणून मी दुसऱ्या दारानें आपली नजर चुकवून बागेंत परत आलें. तों ती आपल्याच बाजूस वळलेली दिसली. इतकें पाहिल्यावर मनांतील शंका दृढतर झाली. आणि आपल्या काय गुजगोष्टी चालतात त्या ऐकाव्या असें वाटलें. असें करणें हें वाईट खरें; पण अशा प्रसंगीं कोणत्या स्त्रीला आपलें मन आवरून धरतां येईल ?"

"हां, तरीच. मला वाटलेंच कीं जवळच्या कुंजांत कोणाचीं पावलें वाजलींसें." कुमुदबंधु ह्मणाला.

"होय." नलिनी ह्मणते. आणि त्या वेळचें आपणा दोघांचें भाषण ऐकल्यानंतर मीं आपल्याशीं केलेल्या वर्तनाबद्दल मला पश्चात्ताप वाटला. व जेवल्यानंतरही चैन पडेना. ह्मणून इकडे गार वाऱ्यांत क्षणभर एकटीच येऊन बसलें, व आपलें स्वतःशीं चाललेलें भाषण ऐकलें—"

"तर मग सर्व गोष्टी तुला आतां स्पष्टपणें कळल्याना ?" असें ह्मणून कुमुदबंधूनें तिचा हात फिरून आपल्या हातांत घेतला.

"होय, सर्व कळल्या ! पण," नलिनी आपला हात सोडवुन घेऊन ह्मणते, "इतकी घाई उपयोगी नाहीं. आजूबाजूची स्थिति थोडी मनांत आणून वागलें पाहिजे."

"होय. हें सर्व खरें. मी तुझें सर्व ह्मणणें कबूल करितों. पण मला आतां फिरून झुगारून देणार नाहींस असें एकवार आश्वासन दे." कुमुदबंधूच्या मनाला उमाळा येऊन तो म्हणाला. "संपत्ति किंवा अभिजनन यामुळें माझा स्वीकार करण्याची शंका—"

"पुरे, पुरे, या असल्या कुशंका." नलिनी उत्तर करिते. "मी ह्मणतें एक आणि आपण त्याचा अर्थ करितां भलताच! दुसऱ्या स्त्रीनें दिलेलें प्रीतिचिन्ह आपल्या अंगावर पाहतांच माझा अपमान झाला, दुःख वाटलें, माझ्या मनांत मत्सर उत्पन्न झाला आणि मी आपल्यावर रागावलेंही. तसेंच कमलेचें आपलें भाषण झालेलें ऐकून व आपल्या मनाशीं निघालेले उद्गार ऐकून मला अत्यंत आनंद झाला. हें आपल्याला ठाऊक आहे. असें असतां फिरून असले प्रश्न विचारावे असें आपल्याला वाटतें तरी कसें ? याहून जास्त स्पष्ट शब्दांनीं बोलणें माझ्यासारख्या तरुणस्त्रियांस योग्य नव्हे."

"प्रिये, नलिनी, तुझे हे शब्द मला अमृतवृष्टीप्रमाणें भासत आहेत." कुमुदबंधु संतुष्ट मुद्रेनें तिजकडे पहात म्हणाला. "आतां मी याहून अधिक बोलत नाहीं. आतां तूंच कर मला काय आज्ञा करावयाची असेल ती !"

"आज्ञा ? छी. छी. असें बोलणें आतां तरी शोभत नाहीं !" नलिनी लाजून किंचित् हंसत हलक्या स्वरानें ह्मणाली. "माझी थोडीशी विनंति मात्र आहे. पर-

# केसरींतील निवडक निबंध.

## भाग दुसरा.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथे घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत, अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

### विषयानुक्रमणिका.


स्नान.
अप्रतिबंधव्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
सरकारनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
फूट.
मनुष्याचें सामाजिक कर्तव्य.
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्णावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?
बालविवाहापेक्षां सतीच बरी !
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?
चैन
स्त्रीदास्यविमोचन.
तंबाखू
चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें ?
आह्मा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचे म० व्हराट.
एक वृद्ध पोलिटिकल अत्याबाई.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे.
व्यायाम.
परभाषेंतील शब्दांची योजना.
देशभाषेंतील ग्रंथसंग्रहाची अवश्यकता.
उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बायबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला.
प्रसिद्धीकरण.
ब्रह्मदेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गमतीचे प्रश्न.
पाऊस.
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार.
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?
,, उत्तरार्ध.
ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज.
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति.


**म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.**

साहजिकच मान थोडीशी खालीं घालून ती ह्मणते, " सरदारसाहेब, मी संध्याकाळीं आपल्यावर रागावून निघालें व कांहीं अंतरावर गेलें तो कमला बागेंत आलेली मीं पाहिली. त्याबरोबर माझ्या मनांत सहजच शंका उत्पन्न झाली ह्मणून मी दुसऱ्या दारानें आपली नजर चुकवून बागेंत परत आलें. तों ती आपल्याच बाजूस वळलेली दिसली. इतकें पाहिल्यावर मनांतील शंका दृढतर झाली. आणि आपल्या काय गुजगोष्टी चालतात त्या ऐकाव्या असें वाटलें. असें करणें हें वाईट खरें; पण अशा प्रसंगीं कोणत्या स्त्रीला आपलें मन आवरून धरतां येईल ? "

" हां, तरीच. मला वाटलेंच कीं जवळच्या कुंजांत कोणाचीं पावलें वाजलींसें. " कुमुदबंधु ह्मणाला.

" होय. " नलिनी ह्मणते. आणि त्या वेळचें आपणा दोघांचें भाषण ऐकल्यानंतर मीं आपल्याशीं केलेल्या वर्तनाबद्दल मला पश्चात्ताप वाटला. व जेवल्यानंतरही चैन पडेना. ह्मणून इकडे गार वाऱ्यांत क्षणभर एकटीच येऊन बसलें, व आपलें स्वतःशीं चाललेलें भाषण ऐकलें—— "

" तर मग सर्व गोष्टी तुला आतां स्पष्टपणें कळल्याना ? " असें ह्मणून कुमुदबंधूनें तिचा हात फिरून आपल्या हातांत घेतला.

" होय, सर्व कळल्या ! पण, " नलिनी आपला हात सोडवून घेऊन ह्मणते, " इतकी घाई उपयोगी नाहीं. आजूबाजूची स्थिति थोडी मनांत आणून वागलें पाहिजे. "

" होय. हें सर्व खरें. मी तुझें सर्व ह्मणणें कबूल करितों. पण मला आतां फिरून झुगारून देणार नाहींस असें एकवार आश्वासन दे. " कुमुदबंधूच्या मनाला उमाळा येऊन तो म्हणाला. " संपत्ति किंवा अभिजनन यामुळें माझा स्वीकार करण्याची शंका—"

" पुरे, पुरे, या असल्या कुशंका. " नलिनी उत्तर करिते. " मी ह्मणतें एक आणि आपण त्याचा अर्थ करितां भलताच! दुसऱ्या स्त्रीनें दिलेलें प्रीतिचिन्ह आपल्या अंगावर पाहतांच माझा अपमान झाला, दुःख वाटलें, माझ्या मनांत मत्सर उत्पन्न झाला आणि मी आपल्यावर रागावलेंही. तसेंच कमलेचें आपलें भाषण झालेलें ऐकून व आपल्या मनाशीं निघालेले उद्गार ऐकून मला अत्यंत आनंद झाला. हें आपल्याला ठाऊक आहे. असें असतां फिरून असले प्रश्न विचारावे असें आपल्याला वाटतें तरी कसें ? याहून जास्त स्पष्ट शब्दांनीं बोलणें माझ्यासारख्या तरुणस्त्रियांस योग्य नव्हे. "

" प्रिये, नलिनी, तुझे हे शब्द मला अमृतवृष्टीप्रमाणें भासत आहेत. " कुमुदबंधु संतुष्ट मुद्रेनें तिजकडे पहात म्हणाला. " आतां मी याहून अधिक बोलत नाहीं. आतां तूंच कर मला काय आज्ञा करावयाची असेल ती ! "

" आज्ञा ? छी. छी. असें बोलणें आतां तरी शोभत नाहीं ! " नलिनी लाजून किंचित् हंसत हलक्या स्वरानें ह्मणाली. " माझी थोडीशी विनंति मात्र आहे. पर-

# केसरींतील निवडक निबंध.

## भाग दुसरा.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत, अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमन जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० ह० ३ आणे.

### विषयानुक्रमणिका.

ज्ञान.
अप्रतिबंधव्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
सनाईकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
कूट.
मनुष्यांचें सामाजिक कर्तव्य.
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थिरतेशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्णावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?
बालविवाहापेक्षां सतीच बरी !
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?
चैन
स्त्रीदास्यविमोचन.
तंबाखू
त्रिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें !
आह्मा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचे म० चऱ्हाट.
एक वृद्ध पोलिटिकल अत्याबाई.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे.
व्यायाम.
परभाषेंतील शब्दांची योजना.
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची अवश्यकता.
उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बायबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला.
प्रसिद्धीकरण.
ब्रह्मदेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गमतीचे प्रश्न.
पाऊस.
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार.
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?
,, उत्तरार्ध.
ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज.
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति.

**म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.**

# विक्रीस तयार

## मुंबई व्याख्यानमाला.

अनेक विद्वान, बहुश्रुत, अनुभवी गृहस्थांनीं निरनिराळ्या विषयांवर दिलेलीं, माहितीनें भरलेलीं, उन्नत विचारांनीं व कल्पनांनीं परिप्लुत, मनोरंजनाचें व मनोविकासाचें उत्कृष्ट साधन अशीं

१८८९, १८९०, १८९१ सालचीं

# एकोणीस व्याख्यानें

एकदम घेणारांस किंमत २०२. ट. ख. ०४.

विषयः—१ जलधिजवर्णन, २ सामाजिक विषयासंबंधीं तोडजोड, ३ आमचे कलाकौशल्यांत सुधारणा करण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत, ४ ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म किंवा वेद व वैदिक धर्म, ५ मोगल व मोगली धर्म, ६ स्थावरजंगमात्मक सृष्टीविषयीं माहिती, ७ आमची धर्मादायपद्धति, ८ ॲन्टिकार्नलॉ लीग अथवा इंग्लंडांतील धान्यावरील करांचे कायदे रद्द करण्याविषयीं दीर्घ प्रयत्न, ९ युरोपच्या इतिहासापासून आपल्या लोकांनीं काय शिकावें, १० सोनें व रुपें यांचा हिंदुस्थानांत खप, ११ धर्मोदाय, १२ पारस व पारशी धर्म, १३ षड्दर्शनसारनिरुक्ती, १४ मध्यप्रदेशाची संक्षिप्त माहिती, १५ आमची प्राचीन स्थिति, प्राचीन कायदे व त्यांचें बंधन, १६ बाहिर्पिर्णे, १७ हिंदुसमाजसुधारणा. १८ शरीरसामर्थ्य. १९ इतिहासाची पुनरावृत्ति.

सन १८९२ सालचीं.

१. आमची देशीभाषा विद्यापीठीं शीघ्र व्यासारखी आहे कीं नाहीं ? प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत यांनीं दिलेलें. किं० ०२ ट. स. ०॥

१ ब्रिटिश राज्यव्यवस्थेची वाढ व तिचें सांप्रतचें स्वरूप. प्रो० दामोदर गणेश पाध्ये एम्. ए. यांनीं दिलेलें. किं० ०२ ट. स. ०॥

१ कै० वा० बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांचें चरित्र. रा० रा० बाळकृष्ण नारायण देव यांनीं दिलेलें. किं० ०२०६ ट. स. ०॥.

१. इंद्रियविज्ञानविचार. डा० कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, सर्जन मेजर, यांनीं दिलेलें. किं० ०१०६ ट० स० ०॥.

१ रोगबीजविध्वंस. डा० कृष्णराव विश्वनाथ धुरंधर, मेडिकल आफिसर बडोदे यांनीं दिलेलें. किं० ०१ ट० स० ०॥.

१. चारी वर्षांचीं व्याख्यानें एकदम घेणारास किं० २०१० ट० स० ०५०६.

---

| | किं० |
|---|---|
| संगीत सौभद्र किर्लोस्करकृत.... ... | ०१२ |
| संगीत शाकुंतल ,, ... | ०१२ |
| संगीत मृच्छकटिक देवलकृत. ... | ०१२ |
| संगीत विक्रमोर्वशीय ,, ... | ०१२ |
| एकच दिवसाची चुकामूक, दुर्गा नाटक. | ०५ |
| विरोत्तंसनाटक शं० मो० रानडे, बी. ए. कृत. ... ... ... ... ... | ०१२ |
| डाक्तर वैद्यप्रहसन. ,, ... ... | ०२ |
| चंडकौशिक नाटक. ,, ... ... | ०६ |
| प्रेमगुटिका नाटक. ,, ... ... | ०४ |
| अनुतापशमन नाटक ,, ... ... | ०१२ |
| पतिशिक्षा प्रहसन ,, ... ... | ०४ |
| लटपटाध्याय प्रहसन ,, ... ... | ०२ |
| रतिमन्मथ नाटक ,, ... .. | १ |
| आधिकारदानविवेचना नाटक. ,, ... | ०५ |
| प्रमादप्रमोद नाटक. ,, ... ... | ०९ |
| मोहविलसित नाटक वि. मो. महाजनी एम.ए. कृत. ... ... ... ... | ०१० |

आर्यभूषण छापखाना पुणें.

---

# त्राटिका नाटक.

महाकवि शेक्सपिअरकृत टेमिंग आफ दी श्र्यू नाटकाच्या आधारें प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए., यांनीं लिहिलें.

**ह्या नाटकांत हास्यरस पूर्ण भरला आहे.**

किंमत ०६ आणे ट० हं० ०१ आणा.

आर्यभूषण छापखाना, पुणें.

पुस्तक ७.   ॥ श्री ॥   अंक ४, ५.

# नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

## A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.*

अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| प्रच्छन्न सोपानचमत्कृति नाटक... ... ... ... ... ... | १ पासून ८ |
| वीरमणी आणि शृंगारसुंदरी... ... ... ... ... ... | २५ ,, ४८ |
| शिलादित्य ( भाग ३ रा. )... ... ... ... ... ... | १ ,, ८ |
| कुवलयपूरची राणी कुमुद्वती.... ... ... ... ... ... | १६१ ,, १८४ |


पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत
हरि नारायण गोखले यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क
मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.

[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ३॥. शिवाय ट.हं. ६ आणे.

एप्रिल व मे १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें.

# विलायतचा प्रवास.

## भाग पहिला.

हल्लींच्या काळीं महाराष्ट्रभाषेंत जो ग्रंथसमूह होत आहे त्यांत प्रवासादिकांचीं वर्णनें फार कमी. भरतखंडाबाहेर प्रवास करणारांची संख्या फार थोडी, त्यांत विलायतेपर्यंत मजल मारणारे फारच थोडे त्यांतूनही मार्मिकपणानें देशांचें, देशस्थितीचें, सृष्टचमत्कारांचें, सृष्टिसौंदर्याचें, आचारविचारांचें अवलोकन करणारांची संख्या अत्यल्प–हजारांत एखादा सांपडल्यास भाग्य. पण महाराष्ट्र भाषेच्या वाचकांच्या सुदैवानें अशा एका गृहस्थास विलायतची यात्रा करण्याचा योग आला व त्याचें फल हें पुस्तक होय. यांत प्रवासांतील निरनिराळ्या प्रसंगांचें व अनुभवाचें मार्मिक वर्णन असून, एडन, तांबडा समुद्र, केरो, इजिप्तमधील मनोरे, आलेक्झांड्रिया, आथेन्स, स्मर्ना, कान्स्टांटिनोपल, व्हियेना, पारिस इत्यादि शहरांचें सविस्तर व मनोरम वर्णन असून प्रसंगोपात्त ठिकठिकाणच्या चालीरीतींचेंही दिग्दर्शन उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे. भाषा गंभीर व अलंकृत आहे.

### विषयानुक्रमणिका.

उपोद्घात.
पाठशाळेंतील मनोराज्य.
"टॉस्मेनिया" आगबोटीवर.
भोजनविधि.
भोजनोत्तरचा प्रकार.
शयनगृह.
प्रातर्विधि.
*मजल्याखालील पुरुष मंडळी.*
आगबोटीवरची व्यवस्था.
प्रातरुपहार.
स्नानाची सोय.
मुंबईपासून एडनपर्यंत.
एडन बंदर.
तांबडा समुद्र.
सुएझ.
सुएझहून केरो.
केरो शहर.
मनोरे.
रचनाप्रयोजनाविषयीं सिद्धांत.
मनोऱ्यांचा आकार व रचना.
मनोऱ्यांची हल्लींची स्थिति.
शिखरारोहण.
आभ्यंतर कक्ष.
संग्रहालय बाजार वगैरे.
बाजार.
काफीपानगृहें.
आरबी लोकांतील लग्न.
आलेक्झांड्रिया.
भूमध्य समुद्र.
आथेन्स शहर.
भकरा पोलीस.
आगबोटींत स्नानाचे हाल.
स्मर्ना बंदर.
स्मर्ना शहर.
स्मर्ना येथील मुद्धविद्यालयांतील मुलें.
एका मडमेशीं संवाद.
डार्डेनेलीसची सामुद्रधुनी.
तुर्क लोकांच्या स्त्रिया.
कान्स्टांटिनोपलचें बंदर.
कान्स्टांटिनोपल शहर.
ब्रिटिश प्रतिनिधीचा हस्तस्पर्श.
पेरा शहर.
लांकडी घरें. आगीच्या उपशमनार्थ तजविजी.
भुयारांतली गाडी.
इस्तंबोलचा रस्ता.
व्हालीदीची मशीद–जोड्याविषयीं विलक्षण समजूत.
रमझानचा सण आणि तंबाखूचें व्यसन.
प्राचीन अंतःपुर.
सब्लाईम पोर्ट.
सान्टासोफियाची मशीद.
मशिदीचें वर्णन.
हिपोड्रोम
एका पंतोजीची शाळा.
प्राचीन वेषांचें संग्रहालय.
भाषेची अडचण.
स्मश्रूची पंचाईत.
इस्तंबोलचा बाजार.
कारंजीं.
एक विलक्षण प्रसंग.
टास्मेनिया आगबोटीचा—जलसमाधि.
ग्यालेटा शहरांतील मनोरा.
स्कुटारी शहरांतील ओरडणाऱ्या दरवेशांचा मठ.
चित्रदर्शनाचा प्रयोग.
टर्कीचे सुलतान.
हम्माम अगर स्नानगृहें.
साधारण माहिती.
राजघराण्यांतील विचित्र चाली.
इतर लोकांच्या कांहीं चाली.
बास्फोरस सामुद्रधुनी.
काळा समुद्र व व्हार्ना.
स्त्रीत्वाची लाज.
शयनरथ.
वाटचाल.
व्हियेना.
पथिकाश्रमांतील स्नानगृह.
नाटकगृह.
फौजेची परेड.
शहरांतील प्रेक्षणीय वस्तु.
डा० बुल्हर.
व्हियेना शहराची रचना.
युनिव्हर्सिटीचें मंदिर.
पारिस शहरीं आगमन.
सरकस.
लूव्हर प्रासादांतील चित्रशाळा.
नाटकगृहें.
ऑपरा नाटकगृह.
पारिस–अतिरमणीयभाग.
ब्वा-द-बलोन उद्यानभूमिका.
पारिस शहर.

किंमत १२ आणे ट० हं० १ आणा.

म्यानेजर, आर्यभूषण छापखाना, पुणें.

# प्रच्छन्न सोपानचमत्कृति नाटक.

## त्र्यंकी.

### अंक १.

**प्र० १.–महालक्ष्मीचे टेंकडीवरील एका बंगल्याचा वरमजला.**

( गुलाबबाई सचिंत बसली आहे, इतक्यांत रूपाळीबेन येते. )

**गुला०**–हाय हाय ! सर्वस्वीं फजिती झाली ! सत्यानास वळला ! सगळ्या आशेचें खोबरें झालें !

**रूपा०**–अली बेन ! कां, मला वाटत होतें त्याचा आला अनुभव ? **माधवदासा**-च्या तुह्मीं इतक्या नादीं लागतां, त्याला चिठ्यांवर चिठ्या पाठवितां, पण अखेर तुह्मीं फसणार हें मला वाटलेंच होतें !

**गुला०**–तर मग मेले ! तूं मला तसें स्पष्ट कां नाहीं कळविलेंस ? मला तर पक्कें आठवतें, ही तुझ्याच तोंडची युक्ति ऐकून मुळीं मी या नादांत पडलें !

**रूपा०**–अली बेन ! आतां त्याबद्दल उगीच वाद कशाला पाहिजे ? मला कळूं द्या, आज रात्रीं **माधवदास** इथें येतील असें वाटतेंका आपल्याला ?

**गुला०**–आतां बाई मी तरी काय सांगूं ते येतील कीं नाहीं तें ? ते काल रात्रींच यायचे होते, ती वेळ टळली; आतां त्यांच्याकडून निराळी चिठ्ठी येईपर्यंत त्यांची क्षणोक्षणीं वाट आहेच, असेंच मी समजतें !

**रूपा०**–बरें, पण समजा ते इथें आले, तर पुढें कसें करायचें याचा कांहीं केला आहेका विचार अगोदर ?

**गुला०**–अग हळू बोल ! हा पहा दादा इकडेच आला !

( वंद्रावनदास येतो, व एका आरामखुर्चीवर आवेशानें अंग टाकून बसतो. )

**रूपा०**–(मनाशीं) आ शुं थयुं हशे वारूं ? यांची मुद्रा अशी खिन्न कां बरें दिसते ?

**वंद्रा०**–रूपाळी ! तूं जा इथून ! मला गुलाबशीं कांहीं बोलायचें आहे !

**रूपा०**–( मनांत ) मला तेंच पाहिजे होतें !

[ जाते.

**वंद्रा०**–मारी वहाली बेन ! आपले पिताजी वैकुंठास गेले, तेव्हां मी जवळ नव्हतों, व दूरदेशीं नोकरीमुळें माझ्यानें त्या वेळीं येववलेंही नाहीं, तरी पण तूं इथें असल्यामुळें मला मागची काळजी मुळींच वाटली नाहीं, आणखी मी बाहेरच राहिलों, हें सगळें तुला आहेच माहित !

**गुला०**–होय, पण तूं इथें नसल्यामुळें मागें इस्टेटीची कांहीं अफरातफर झाली असें का तुला वाटतें दादा ?

**वंद्रा०**—छे छे, त्याबद्दलचें कांहीं नाहीं! पण माझ्या एका स्नेह्याकडून मला एक पत्र आलें, त्यांत त्यानें लिहिलें होतें कीं, तूं **छबिलदासा**च्या घरच्या माणसांबरोबर **निर्मळ**च्या यात्रेला गेली होतीस, आणखी तिथें तूं त्याच्याबरोबर दर्शनाला गेली असतां कोणसासा एक गृहस्थ तिथें आला न् त्यानें तिथल्या तिथें **छबिलदासाला** ठार केलें! फार कशाला, ही बातमी मला कळल्याबरोबर मी नोकरी सोडून मुद्दाम **मुंबईस** आलों आहें!

( रूपाळी येते. )

**रूपा०**—खालीं **जगमोहनदास** आले आहेत आपल्याकडे.

**वंद्रा०**—कोण? **जगमोहनदास**! येऊं दे.

**रूपा०**—( जिन्याच्या दाराशीं जाऊन ) **मगन**! खालीं गृहस्थ आले आहेत, त्यांना वर दे पाठवून!

**वंद्रा०**—**गुलाबबेन**! तूं थोडा वेळ पलीकडल्या खोलींत जा, आणखी हें बघ, मी आतां तुला बोललों त्याबद्दलचें एक अक्षरही कुणापाशीं बोलूं नको.

**रूपा०**—( गुलाबबाईस एकीकडे ) कां तुझा दादा तुला काय सांगत होता?

**गुला०**—( रूपाळीस एकीकडे ) नशीब माझें न् दुसरें काय? त्याला सर्व हकीकत कळली आहे!

**रूपा०**—( तिच्याशीं एकीकडे ) काय? त्याला ती चोरभुयाराची हकीकत कळली आहे ह्मणतेस?

**गुला०**—( परत तिच्याशीं एकीकडे ) देवाच्या दयेनें तेवढेंच काय तें कळलें नाहीं? बाकीचें एकूण एक त्याला समजलें आहे!

( जगमोहनदास येतो. )

**जग०**—गड्या **वंद्रावन**! तुझी माझी गांठ मोठ्या नशिबानेंच पडली ह्मणायची!

**वंद्रा०**—कां बरें?—पण तुझी मुद्रा अशी बावरल्यासारखी कां दिसते? कांहीं कमी जास्ती झालें आहे कीं काय?

**जग०**—होय; **माधवदास** या घटकेला **मुंबईस** आला आहे!

**वंद्रा०**—नीट आठवण करून पहा, नाहीं तर भलत्यालाच तूं **माधवदास** ह्मणून समजला असशील!

**जग०**—छत्, अशी गोष्ट कधीं व्हायची नाहीं! या वेळीं तूं माझ्यासमोर आहेस ही गोष्ट जितकी खरी आहे, तितकीच मीं **माधवदासाला** पाहिलें हीही पण खरी आहे! हें बघ गड्या! तुला एक गोष्ट सांगायची आहे! माझें लगीन **लछमीदासशेटजीं**च्या कन्येशीं व्हायचें ठरलें आहे, तेव्हां त्या ह्मातार्‍याच्या मुलाला ज्यानें ठार मारिलें त्याला पकडून पोलिसांत द्यायची खटपट करून ह्मातार्‍याला न् त्याबरोबर माझी भावी वधू **नानकुंवर** हिला अशा दोघांनाही खुष करायचा आहे माझा हेतु! आतांची ही आयती संधि आली आहे व अशा वेळीं तूं मला मदत करशील या आशेनें मी मुद्दाम येथें आलों आहें! चल माझ्याबरोबर! माझा नोकर आहे, त्यानें **माधवदासा**-

चें ठिकाण पाहिलें आहे, व तो तुला न् मला नेमका॰ त्याच्या ठिकाणाकडे घेऊन जाईल !

**चंद्रा॰**—तूं चल ह्मणण्याचा अवकाश, मी तुझें काम करायला एका पायावर तयार आहें! ओ—अल्या **मगन** ! माझी गुत्री मला आणून दे, आणखी मी आतां इतक्यांत परत येतों ह्मणून **गुलाबबाई**ला सांग !

(दोघे घाईघाईनें खालीं उतरून जातात.)

(गुलाबबाई आणि रूपाळीबेन परत येतात.)

**गुला॰**—अग बाई ! माझा उजवा डोळा लवायला लागला आहे, तेव्हां **माधवदास** इथें आले आहेत हेंच खचित ! देवा! दादा न् **जगमोहनदास** हे दोघे त्यांचाच घात करायला निघून गेले अं ?

**रूपा॰**—(घांट वाजल्याचा आवाज ऐकत) हळू बोला ! कोणी आलेंसें वाटतें !

**गुला॰**—अग, आलें असेल कोणी तरी, ह्मणून तेवढ्याकरितां का घाबरायचें मेले?

**रूपा॰**—थांबा अं मला नीट फिरून ऐकूं द्या !

**गुला॰**—(घंटा फिरून वाजते.) अग बाई! मला हें असें काय होऊं लागलें आहे ?

**रूपा॰**—बाईसाहेब ! ही बागेंतली घांट वाजली ! हिचा आवाज मीं पक्का ओळखला ! मी खचित सांगतें, बागेच्या मागच्या दरवाज्यापाशीं **माधवदास**च आले आहेत !

(पुढें माधवदास आणि मागून कांहीं अंतरावर मकुंद असे दोघे येतात.)

**माध॰**—ओ मारी प्रियतमा **गुलाब** !

**गुला॰**—मारा मुरब्बी जीवनहार! आपलें येणें या क्षणीं इथें झालें त्यायोगानें मला किती आनंद झाला आहे, तो तोंडानें सांगतां सुद्धां येणें कठिण ! पण **कच्छ मांडवीस** मीं आपल्याला पत्र पाठविलें त्यांत आपलें आगतस्वागत जितकें मजेदार होईल ह्मणून लिहिलें होतें, त्याचा शंभरावा हिस्सा पण आतां तें होईल कीं नाहीं याचीच मारामार झाली आहे, कारण माझा दादा **चंद्रावन** कालच **रंगुनाहून** परत आला!

**माध॰**—काय ह्मणतेस ?

**गुला॰**—तो इतक्यांत येणार ही गोष्ट माझ्या ध्यानीं मनीं दिखील नव्हती ! ती मला अगोदर कळती, तर आपण इतक्यांत यायचें करूं नये ह्मणून मी आपल्याला सूचना करायला चुकलें नसतें !

**माध॰**—एकूण मला या घरीं रहातां येण्याची सवडच नाहीं ह्मणायची ?

**गुला॰**—असेंच कांहीं नको ह्मणायला ! मीं आपल्याला रहातां येईल अशी एक एकांताची जागा तयार केलेली आहे, व माझ्या दादानें आपल्याकडून कितीही बुद्धि खर्च केली तरी त्याला कधींच सांपडायची नाहीं, अशी ती जागा आहे !

**मकुं॰**—त्याला एक न सांपडो, पण **पोलिस**वाळा लोको आवे तो ?

**रूपा॰**—पोलिस नाहीं पोलिसाचा देव आला तरी त्याला देखील सांपडायची नाहीं ! समजलास ? आतां मधें चोंबडपणानें तोंड घालूं नको. **गुलाबबाईला** एकटीला बोलूं दे !

**गुला॰**—हा बंगला आसपासच्या बंगल्यांच्या

# विलायतचा प्रवास.

## भाग पहिला.

हल्लींच्या काळीं महाराष्ट्रभाषेंत जो ग्रंथसमूह होत आहे त्यांत प्रवासविकांचीं वर्णनें फार कमी. अगो-दर प्रवास करणारांची संख्या फार थोडी, त्यांत विलायतेपर्यंत मजल मारणारे फारच थोडे त्यांतूनही मार्मि-कपणानें देशांचें, देशस्थितीचें, सृष्टचमत्कारांचें, सृष्टिसौंदर्याचें, आचारविचारांचें अवलोकन करणारांची संख्या अत्यल्प–हजारांत एखादा सांपडल्यास भाग्य. पण महाराष्ट्र भाषेच्या वाचकांच्या सुदैवानें अशा एका गृहस्थास विलायतची यात्रा करण्याचा योग आला व त्याचें फल हें पुस्तक होय. यांत प्रवासांतील निर-निराळया प्रसंगांचें व अनुभवाचें मार्मिक वर्णन असून, एडन, तांबडा समुद्र, केरो, इजिप्तमधील मनोरे, आले-क्झांड्रिया, आर्थेन्स, स्मर्ना, कान्स्टांटिनोपल, व्हियेना, पारिस इत्यादि शहरांचें सविस्तर व मनोरम वर्णन असून प्रसंगोपात्त ठिकठिकाणच्या चालीरीतींचेंही दिग्दर्शन उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे. भाषा गंभीर व अलंकृत आहे.

### विषयानुक्रमणिका.


उपोद्घात.
शाळेंतील मनोराज्य.
"टॉस्मेनिया" आगबोटीवर.
भोजनविधि.
भोजनोत्तरचा प्रकार.
शयनगृह.
प्रातर्विधि.
मजल्यावरील पुरुष मंडळी.
आगबोटीवरची व्यवस्था.
प्रातरुपहार.
स्नानाची सोय.
मुंबईपासून एडनपर्यंत.
एडन बंदर.
तांबडा समुद्र.
सुएझ.
सुएझहून केरो.
केरो शहर.
मनोरे.
रचनाप्रयोजनाविषयीं सिद्धांत.
मनोऱ्यांचा आकार व रचना.
मनोऱ्यांची हल्लींची स्थिति.
शिखरारोहण.
आभ्यंतर कक्ष.
संग्रहालय बाजार वगैरे.
बाजार.
काफीपानगृहें.
आरबी लोकांतील लग्न.
आलेक्झांड्रिया.
भूमध्य समुद्र.
आथेन्स शहर.
अकरा पोलीस.
आगबोटींत स्नानाचे हाल.
स्मर्ना बंदर.
स्मर्ना शहर.
स्मर्ना येथील गुद्धविद्याल-यांतील मुलें.
एका मडमेशीं संवाद.
डार्डनेलीसची सामुद्रधुनी.
तुर्क लोकांच्या स्त्रिया.
कान्स्टांटिनोपलचें बंदर.
कान्स्टांटिनोपल शहर.
ब्रिटिश प्रतिनिधीचा हस्तस्पर्श.
पेरा शहर.
लांकडी घरें. आगीच्या उपशमनार्थ तजविजी.
भुयारांतली गाडी.
इस्तंबोलचा रस्ता.
व्हालीदीची मशीद–जोडया-विषयीं विलक्षण समजूत.
रमझानचा सण आणि तंबाखूचें व्यसन.
प्राचीन अंतःपुर.
सब्लाईम पोर्ट.
सान्टासोफियाची मशीद.
मशिदीचें वर्णन.
हिपोड्रोम
एका पंतोजीची शाळा.
प्राचीन वेषांचें संग्रहालय.
भाषेची अडचण.
स्मश्रूची पंचाईत.
इस्तंबोलचा बाजार.
कारंजीं.
एक विलक्षण प्रसंग.
टास्मेनिया आगबोटीचा—जलसमाधि.
ग्यालेटा शहरांतील मनोरा.
स्कुटारी शहरांतील ओरडणाऱ्या दरवेशांचा मठ.
चित्रदर्शनाचा प्रयोग.
टर्कीचे सुलतान.
हम्माम अगर स्नानगृहें.
साधारण माहिती.
राजघराण्यांतील विचित्र चाली.
इतर लोकांच्या कांहीं चाली.
बास्फोरस सामुद्रधुनी.
काळा समुद्र व व्हार्ना.
स्त्रीत्वाची लाज.
शयनरथ.
वाटचाल.
व्हियेना.
पथिकाश्रमांतील स्नानगृह.
नाटकगृह.
फौजेची परेड.
शहरांतील प्रेक्षणीय वस्तु.
डा० बुल्हर.
व्हियेना शहराची रचना.
युनिव्हर्सिटीचें मंदिर.
पारिस शहरीं आगमन.
सरकस.
लूव्हर प्रासादांतील चित्रशाळा.
नाटकगृहें.
ऑपरा नाटकगृह.
पारिस–अतिरमणविभाग.
ब्वा-द-बलोन उद्यानभूमिका.
पारिस शहर.


किंमत १२ आणे ट० हं० १ आणा.

म्यानेजर, आर्यभूषण छापखाना, पुणें.

# प्रच्छन्न सोपानचमत्कृति नाटक.

## त्र्यंकी.

### अंक १.

**प्र० १.–महालक्ष्मीचे टेंकडीवरील एका बंगल्याचा वरमजला.**

( गुलाबबाई सचिंत बसली आहे, इतक्यांत रूपाळीबेन येते. )

**गुला०**–हाय हाय ! सर्वस्वीं फजिती झाली ! सत्यानास वळला ! सगळ्या आशेचें खोबरें झालें !

**रूपा०**–अली बेन ! कां, मला वाटत होतें त्याचा आला अनुभव ? **माधवदासा**च्या तुह्मीं इतक्या नादीं लागतां, त्याला चिठ्यांवर चिठ्या पाठवितां, पण अखेर तुह्मीं फसणार हें मला वाटलेंच होतें !

**गुला०**–तर मग मेले ! तूं मला तसें स्पष्ट कां नाहीं कळविलेंस ? मला तर पक्कें आठवतें, ही तुझ्याच तोंडची युक्ति ऐकून मुळीं मी या नादांत पडलें !

**रूपा०**–अली बेन ! आतां त्याबद्दल उगीच वाद कशाला पाहिजे ? मला कळूं द्या, आज रात्रीं **माधवदास** इथें येतील असें वाटतेंका आपल्याला ?

**गुला०**–आतां बाई मी तरी काय सांगूं ते येतील कीं नाहीं तें ? ते काल रात्रींच यायचे होते, ती वेळ टळली; आतां त्यांच्याकडून निराळी चिठ्ठी येईपर्यंत त्यांची क्षणोक्षणीं वाट आहेच, असेंच मी समजतें !

**रूपा०**–बरें, पण समजा ते इथें आले, तर पुढें कसें करायचें याचा कांहीं केला आहेका विचार अगोदर ?

**गुला०**–अग हळू बोल ! हा पहा दादा इकडेच आला !

( वृंदावनदास येतो, व एका आरामखुर्चीवर आवेशानें अंग टाकून बसतो. )

**रूपा०**–(मनाशीं) आ शुं थयुं हशे वारूं ? यांची मुद्रा अशी खिन्न कां बरें दिसते ?

**वृंद्रा०**–रूपाळी ! तूं जा इथून ! मला **गुलाब**शीं कांहीं बोलायचें आहे !

**रूपा०**–( मनांत ) मला तेंच पाहिजे होतें ! [ जाते.

**वृंद्रा०**–मारी वहाली बेन ! आपले पिताजी **वैकुंठदास** गेले, तेव्हां मी जवळ नव्हतों, व दूरदेशीं नोकरीमुळें माझ्यानें त्या वेळीं येववलेंही नाहीं, तरी पण तूं इथें असल्यामुळें मला मागची काळजी मुळींच वाटली नाहीं, आणखी मी बाहेरच राहिलों, हें सगळें तुला आहेच माहित !

**गुला०**–होय, पण तूं इथें नसल्यामुळें मागें इस्टेटीची कांहीं अफरातफर झाली असें का तुला वाटतें दादा ?

**चंद्रा**०—छे छे, त्याबद्दलचें कांहीं नाहीं! पण माझ्या एका स्नेह्याकडून मला एक पत्र आलें, त्यांत त्यानें लिहिलें होतें कीं, तूं **छबिलदासाच्या** घरच्या माणसांबरोबर **निर्मळच्या** यात्रेला गेली होतीस, आणखी तिथें तूं त्याच्याबरोबर दर्शनाला गेली असतां कोणसासा एक गृहस्थ तिथें आला न् त्यानें तिथल्या तिथें **छबिलदासाला** ठार केलें! फार कशाला, ही बातमी मला कळल्याबरोबर मी नोकरी सोडून मुद्दाम **मुंबईस** आलों आहें!

(रूपाळी येते.)

**रूपा**०—खालीं **जगमोहनदास** आले आहेत आपल्याकडे.

**चंद्रा**०—कोण? **जगमोहनदास**! येऊं दे.

**रूपा**०—(जिन्याच्या दाराशीं जाऊन) **मगन**! खालीं गृहस्थ आले आहेत, त्यांना वर दे पाठवून!

**चंद्रा**०—**गुलाबबेन**! तूं थोडा वेळ पलीकडल्या खोलींत जा, आणखी हें बघ, मी आतां तुला बोललों त्याबद्दलचें एक अक्षरही कुणापाशीं बोलूं नको.

**रूपा**०—(गुलाबबाईस एकीकडे) कां तुझा दादा तुला काय सांगत होता?

**गुला**०—(रूपाळीस एकीकडे) नशीब माझें न् दुसरें काय? त्याला सर्व हकीकत कळली आहे!

**रूपा**०—(तिच्याशीं एकीकडे) काय? त्याला ती चोरभुयाराची हकीकत कळली आहे ह्मणतेस?

**गुला**०—(परत तिच्याशीं एकीकडे) देवाच्या दयेनें तेवढेंच काय तें कळलें नाहीं? बाकीचें एकूण एक त्याला समजलें आहे!

(जगमोहनदास येतो.)

**जग**०—गड्या **चंद्रावन**! तुझी माझी गांठ मोठ्या नशिबानेंच पडली ह्मणायची!

**चंद्रा**०—कां बरें?—पण तुझी मुद्रा अशी बावरल्यासारखी कां दिसते? कांहीं कमी जास्ती झालें आहे कीं काय?

**जग**०—होय; **माधवदास** या घटकेला **मुंबईस** आला आहे!

**चंद्रा**०—नीट आठवण करून पहा, नाहीं तर भलत्यालाच तूं **माधवदास** ह्मणून समजला असशील!

**जग**०—छत्, अशी गोष्ट कधीं व्हायची नाहीं! या वेळीं तूं माझ्यासमोर आहेस ही गोष्ट जितकी खरी आहे, तितकीच मीं **माधवदासाला** पाहिलें हीही पण खरी आहे! हें बघ गड्या! तुला एक गोष्ट सांगायची आहे! माझें लगीन **लछमीदासशेटजींच्या** कन्येशीं व्हायचें ठरलें आहे, तेव्हां त्या ह्मातार्‍याच्या मुलाला ज्यानें ठार मारिलें त्याला पकडून पोलिसांत द्यायची खटपट करून ह्मातार्‍याला न् त्याबरोबर माझी भावी वधू **नानकुंवर** हिला अशा दोघांनाही खुष करायचा आहे माझा हेतु! आतांची ही आयती संधि आली आहे व अशा वेळीं तूं मला मदत करशील या आशेनें मी मुद्दाम येथें आलों आहें! चल माझ्याबरोबर! माझा नोकर आहे, त्यानें **माधवदासा**-

चें ठिकाण पाहिलें आहे, व तो तुला नू मला नेमका त्याच्या ठिकाणाकडे घेऊन जाईल !

**वृंद्रा**०—तूं चल ह्मणण्याचा अवकाश, मी तुझें काम करायला एका पायावर तयार आहें! ओ—अल्या **मगन** ! माझी गुप्ती मला आणून दे, आणखी मी आतां इतक्यांत परत येतों ह्मणून **गुलाबबाई**ला सांग !

(दोघे घाईघाईनें खालीं उतरून जातात.)

(गुलाबबाई आणि रूपाळीचेन परत येतात.)

**गुला**०—अग बाई ! माझा उजवा डोळा लवायला लागला आहे, तेव्हां **माधवदास** इथें आले आहेत हेंच खचित ! देवा! दादा नू **जगमोहनदास** हे दोघे त्यांचाच घात करायला निघून गेले अं ?

**रूपा**०—(घांट वाजल्याचा आवाज ऐकत) हळू बोला ! कोणी आलेंसें वाटतें !

**गुला**०—अग, आलें असेल कोणी तरी, ह्मणून तेवढ्याकरितां का घाबरायचें मेले?

**रूपा**०—थांबा अं मला नीट फिरून ऐकू द्या !

**गुला**०—(घंटा फिरून वाजते.) अग बाई! मला हें असें काय होऊं लागलें आहे ?

**रूपा**०—बाईसाहेब ! ही बागेंतली घांट वाजली ! हिचा आवाज मीं पक्का ओळखला ! मी खचित सांगतें, बागेच्या मागच्या दरवाज्यापाशीं **माधवदास**च आले आहेत !

(पुढें माधवदास आणि मागून कांहीं अंतरावर मकुंद असे दोघे येतात.)

**माध**०—ओ मारी प्रियतमा **गुलाब** !

**गुला**०—मारा मुरब्बी जीवनहार! आपलें येणें या क्षणीं इथें झालें त्यायोगानें मला किती आनंद झाला आहे, तो तोंडानें सांगतां सुद्धां येणें कठिण ! पण **कच्छ मांडवीस** मीं आपल्याला पत्र पाठविलें त्यांत आपलें आगतस्वागत जितकें मजेदार होईल ह्मणून लिहिलें होतें, त्याचा शंभरावा हिस्सा पण आतां तें होईल कीं नाहीं याचीच मारामार झाली आहे, कारण माझा दादा **वृंद्रावन** कालच **रंगुनाहून** परत आला!

**माध**०—काय ह्मणतेस ?

**गुला**०—तो इतक्यांत येणार ही गोष्ट माझ्या ध्यानीं मनीं दिखील नव्हती ! ती मला अगोदर कळती, तर आपण इतक्यांत यायचें करूं नये ह्मणून मी आपल्याला सूचना करायला चुकलें नसतें !

**माध**०—एकूण मला या घरीं रहातां येण्याची सवडच नाहीं ह्मणायची ?

**गुला**०—असेंच कांहीं नको ह्मणायला ! मीं आपल्याला रहातां येईल अशी एक एकांताची जागा तयार केलेली आहे, व माझ्या दादानें आपल्याकडून कितीही बुद्धि खर्च केली तरी त्याला कधींच सांपडायची नाहीं, अशी ती जागा आहे !

**मकुं**०—त्याला एक न सांपडो, पण **पोलिस**वाळा लोको आवे तो ?

**रूपा**०—पोलिस नाहीं पोलिसाचा देव आला तरी त्याला देखील सांपडायची नाहीं ! समजलास ? आतां मधें चोंबडपणानें तोंड घालूं नको. **गुलाबबाईला** एकटीला बोलूं दे !

**गुला**०—हा बंगला आसपासच्या बंगल्यांच्या

धर्तीवर दिसायला दुमजलीच आहे. वरच्या मजल्यावर आह्मी स्वतः रहातों, व बाबांच्या पश्चात् आह्मांला एवढ्या थोरल्या जागेची जरूर नाहीं म्हणून तळचा मजला मीं एका **तेजपाळ** नांवाच्या भल्या व्यापाऱ्याला वखारीसाठीं भाड्यानें दिला आहे ! घराच्या मागल्या बाजूस वरच्या मजल्यावरून खालच्या मजल्यावर जाण्याचा एक जिना आहे, व त्याच्याच खालीं एक लहानशी चिंचोळी अंधेरी खोली आहे. या खोलीचा आह्मांला न् **तेजपाळाला** दोघांनाही कांहीं उपयोग नाहींसें पाहून त्याच्या संमतीनें मीं त्या खोलीचा दरवाजा लांकडाच्या फळ्यांनीं चिणून टाकिला, व जिन्याच्या तोंडावरूनही फळ्या घालून खालीं उतरण्याची वाट बंद करून घेतली ! पुढें जेव्हां आपल्याला **मुंबईस** परत बोलावण्याचा माझा विचार ठरला, तेव्हां सहज एक दिवशीं माझ्या मनांत एक युक्ति अशी आली कीं, जिन्याचें वरचें झांकण असें बसवून घ्यावें कीं, तें कुणाला न कळतां आपल्याला वाटेल तेव्हां उघडतां झांकतां यावें, व कदाचित् न जाणों कोणत्याही कारणानें लपून रहाण्याचा प्रसंग आला, व कोणीं संशयानें घराचा झाडा घेऊं लागलें, तर या ठिकाणीं एकादी चोरखोली आहे असा संशयसुद्धां येऊं नये ! फार कशाला, मी सांगतें ही व्यवस्था प्रत्यक्षच पहा कसे ! (खोलीच्या शेवटच्या भागीं जाऊन जिन्यावरचें झांकण एकीकडे करून दाखविते.) या जिन्याच्या खालच्या खोलींत आपण उतरून आंतून लोखंडी गज नीट बसवून घेतला ह्मणजे झालें ! हाच गज परत काढून घेतला ह्मणजे आपल्याला पाहिजे तेव्हां वर यायला कोणत्याही प्रकारची अडचण नाहीं !

**माध०**—मारी प्रियतमा **गुलाब** ! तूं सांगतेस या तजविजीबद्दल मी तुझा अतिशय आभारी आहें; परंतु यायोगानें एकादे वेळीं कोणाच्या मनांत भलताच संशय येण्याची भीति आहे, एवढ्याकरितां या जागेचा उपयोग करून घेणें मला प्रशस्त वाटत नाहीं ! यापेक्षां मी आलों तसाच परत निघून जाणें हें विशेष सोईचें होईल !—

**मकुं०**—ठीक ठीक ! आ वातने हुं पण टेको आपुं छुं ! धनीसाहेब ! माझें तरी हेंच ह्मणणें ! चला. हाटेलांतलें सामान घेऊन आतांच चंबू गवाळें उचलून चालते होऊं कसे ! बाईओ ! माफ करजो हो, अमे घणी नम्रताथी आपणी रजा मांगीए छिअे !

**गुला०**—माझें बोलणें आपण सगळें ऐकून घेतलें नाहीं ! आपण इथें मोठ्या सावधगिरीनें आलां खरें; पण कसें काय झालें असेल तें असो, **जगमोहनदासानें** आपल्याला पक्कें ओळखलें आहे, व आपल्या पाठोपाठ त्यानें स्वतःचा नोकर दिखील आपल्या उताऱ्याचे जागेपर्यंत पाठविला होता ! फार कशाला; आपण स्वतः इथें आलां त्याच्यापूर्वी

पांच चार मिनिटेंच तो न् माझा दादा असे दोघेही आपल्याला पकडून पोलिसांत द्यायकरितांच गेले आहेत !

**माध०**—झक मारतात ते न् ते पोलिसचे लोक ! माझ्यापाशीं बंदुकीचे आणि पिस्तुलांचे पास आहेत, तेव्हां स्वतःच्या संरक्षणाबद्दलची मला बिलकुल धास्ती नाहीं !

**मकुं०**—( स्वतः भिऊन माधवदासाच्या मागें उभा राहतो.) पिस्तुल ! आं.—आं.—बाईओ ! तमे डरशोना ! घबराशोना ! अमे पिस्तुलथी म-म-मरी जईशुं !

**गुला०**—कृपा करून स्वतःच्या संरक्षणाची गोष्ट आपण बोलूं नये ! आपण मजकडे पहा, व स्वतःचा जीव विनाकारण धोक्यांत घालूं नका, हेंच माझें आपणास पदर पसरून मागणें आहे ! मीं जागा दाखविली, त्या ठिकाणीं आजची रात्र कशी तरी काढाच ! उद्यां सकाळीं दादा लौकरच बाहेर जाईल, व तो एकदांचा गेला ह्मणजे पुढें आपण कुठें जायचें किंवा काय करायचें याजबद्दलचा विचार आपण सावकाश ठरवूं !

**मकुं०**—धनीसाहेब ! आपण बाईनुं केहेवुं ठीक छे ! पोक्त विचारांतीं माझें ह्मणणें तेंच आहे ! ने ते आपणे मानवुं पण जोइए. कदाच न मानशो, तो हुं पोते पोलिसनी ताबे थई सरकारतरफनो शायदी थईश !

**माध०**—चूप रेहेजे गांडा माणस ! ( गुलाबबाईकडे वळून ) प्रिये ! तुजवर संकट न येतां जर कोणतीही गोष्ट होत असली, तर ती करायला माझी हरकत नाहीं !

**गुला०**—मी सांगतें यांत संकट येण्याचा मुळींच संभव नाहीं !

**रूपा०**—तर मग आतां उशीर नको उगीच ! आंत मुकाट्यानें शिरा कसे ! खोलींत एक गादी न् सत्रंजी आहे, त्यांवर पडून रात्र कशी तरी काढा ! सकाळीं आह्मीं लौकरच तुह्मांला बाहेर काढूं, मात्र तोंपर्यंत तुह्मीं कोणत्याही निमित्तानें बाहेर पडतां उपयोगीं नाहीं !

**मग०**—वाह् जी वाह् मारी **रूपाळी बेन !**

( गाणें. )

**खावा पिवानि वात् शि हमारी ?**
**भुखे मरवुं के केम् ?**
**भुखे मरवुं के केम् ?**
**आ वात नथीज् ते सारी ! ( १ )**
**तमे अमारा पेट्नें मापो !**
**अम्ने खावाने लड्वा,**
**बे पाणीना चड्वा,**
**मोक्ळि दई राते हुंग आपो ! (२)**

**रूपा०**—(हंसून) तीही तजवीज लागेल ! कांहीं कांहीं काळजी नको बरें ?

( माधवदास व मगन जिन्याच्या वाटेनें आंत उतरतात. पडदा पडतो. )

---

## प्र० २.—स्थळ तेंच. बंगल्यापुढील बगिचा.

( वंद्रावनदास गुर्मीचें पातें काठींत सारीत येतो, व त्याच्या मागून जगमोहनदास येतो. )

**वंद्रा०**—या फजितीसारखी दुसरी फजिती नाहीं ! धांवतां धांवतां कोण पण

ही त्रेधा ! असो, एकदांचें घर गांठलें, आतां कांहींसें स्वस्थ वाटतें ! अंमळशानें काय होणार असेल तें होवो ! पण कायरे गड्या ! आपण केलेला वार लागला तरी कुणाला ?

**जग०**—तें कांहीं खात्रीनें सांगवत नाहीं, पण **मोहनलाल** **जव्हेऱ्याच्या** घरचें कुणी तरी होतें असें धांवण्याच्या गर्दींत कोणसें बोललेलें मीं ऐकिलें !

(-दोघे घराच्या पुढच्या जिन्यापाशीं येतात. )
( तेजपाळ व्यापारी येतो. )

**तेज०**—जयगोपाळ जयगोपाळ ! **वंद्रावनजी** ! रस्त्यांत आपण **मोहनलाल जव्हेऱ्याशीं** मारामारी करून त्याला वार केला असें मीं आत्तांच ऐकिलें !

**वंद्रा०**—काय ? **मोहनलाल जव्हेऱ्याला** का मीं वार केला ? एकून हा अपघात फारच विलक्षण ह्मणायचा !

**जग०**—गड्या ! तूं असा घोंटाळल्यासारखा काय होऊन बसतोस ? हे गृहस्थ सांगतात ही बातमी तूं ऐकिलीसका नीट ? नीट शुद्धीवर ये, आणि आपल्या घरच्या माणसांनिशीं इथून एकदम निघून जा कसा ! तूं इथें राहिलास तर विनाकारण जीव धोक्यांत घालून घेशील, समजलास ? तूं मागची कांहीं काळजी करूं नकोस ! मी इथें पाठीमागें राहून तुझ्या सामानसुमानाची बनेल तितकी लौकर नीट व्यवस्था करितों !

**तेज०**—विशेष जोखमीचे जिन्नस असतील, ते तूर्त खालीं माझ्या वखारींत आणून ठेवायला मजकडून कांहीं हरकत नाहीं, आणखी **वंद्रावनजी** जर आपल्या वरच्या जागेची किल्ली माझ्या हवालीं करतील, तर त्यांच्यामागें त्यांची चौकशी करायला कोणी आलें, सवरलें, तरी त्याची समजूत पाडून त्याला वाटेनिराळें करण्याची जिम्मा मी घेतों.

**वंद्रा०**—तुह्मीं आहां न् जगमोहन आहां, वाटेल तशी व्यवस्था लावा; पण अगोदर दारापुढें एक भाड्याची गाडी आणवा कसे ! मला इस्टेटीची बिलकुल काळजी नाहीं, पण **गुलाबबाई** आणि **रूपाळी** यांना इथून काढून कुठें तरी निर्भय ठिकाणीं न्यायचें काम मला अगोदर केलें पाहिजे ! ( जगमोहनदास व तेजपाळ जातात, व वंद्रावनदास पुढच्या जिन्यानें माडीवर जातो. )

---

## प्र० ३.—स्थळ तेंच. पहिल्या प्रवेशांतील दिवाणखाना.

( गुलाबबाई व रूपाळीचेन बसल्या आहेत. )

**गुला०**—आतां खालीं मोठ्यानें कोण दादाच का बोलत होता ?

**रूपा०**—दुसरे कोण लोक होते तें अंधारांत कांहीं नीटसें समजलें नाहीं, पण त्यांच्याशिवाय आणखी कोणी तरी दोघें तिघे तिथें असावेत असा माझा अजमास आहे.

( वंद्रावनदास घाईघाईनें आंत येतो. त्याची मुद्रा घाबरल्यासारखी दिसत आहे. )

**गुला०**—दादा ! तूं असा घाबरल्यासारखा काय दिसतोस ?

**वंद्रा०**—मला आतां बोलत बसायला बिलकुल अवकाश नाहीं ! एका गृहस्थाचा खरपूस समाचार घेण्याकरितां ह्मणून

जगमोहनदासाबरोबर मी गेलों होतों, पण अंधेरांत त्याची गांठ न पडतां भलत्याच मनुष्याशीं माझी मारामारी झाली, व माझ्या हातून मोहनलाल जव्हेऱ्याला वार लागला !

**गुला०**—बरें मग ?

**वंद्रा०**—दुसरें काय ? मला आतांच्या आतां कोठें तरी तोंड काळें करून लपून बसण्याची पाळी आली आहे, व एवढ्यासाठीं तुह्मांला दोघींनाही इथून कोणीकडे तरी दूर नेऊन ठेवायचें ठरलें असून तुह्मांला आत्तांच्या आत्तांच माझ्याबरोबर इथून निघालें पाहिजे !

**गुला०**—छे बाई ! मी तर आपलें घर सोडून कुठें जायची नाहीं ! काय ग रूपाळी ! तूं—

**वंद्रा०**—बायकांच्या समजुती प्राण गेल्यानें लौकर पडायच्या नाहींत ! ( बाहेर गाडीचा आवाज ऐकूं येतो. ) हां ही पहा तुह्मांला न्यायकरितां गाडी आली आहे ! चला; बऱ्या बोलानें एकदम खालीं उतरा, नाहीं तर दोघींनाही हात धरून फरफरां बाहेर ओढून नेईन ! खबरदार ! धिंगाणा किंवा ओढाताण कांहीं कराल तर ! तें माझ्या कांहीं कामास यायचें नाहीं.

( दोघींचे हात धरून त्यांस बाहेर खेंचून नेतो. )

---

### प्र० ४.—स्थळ तेंच. बंगल्यापुढील बागिचा.

( बंगल्याचा दरवाजा दांडगाईनें ढकलून पोलिस इन्स्पेक्टर व कांहीं शिपाई आंत घुसतात. )

**इन्स्पे०**—( खिशांतील नोटबूक उघडून ) बराबर ! खुनीका येही बंगला ? अच्छा ! जमादार ! पिछली बाजू दो अदमी खडे करो, और दो अदमी ये दरोजेपर रखो !

**जमा०**—जो हुकूम ! लंबर बन् लंबर छ जाव् तुम् पीछली बाजूका बंदोबस्त रखो ! ( दोघे शिपाई जातात. ) इसा ! हुसेन ! तुम् इदर दरोजेपास रेहेना !

**दोघे०**—अच्छा !

( इतक्यांत तेजपाळ आंतून घाईघाईनें पुढें येतो. )

**तेज०**—गुड् मार्निंग् जेंटल्मेन !

**इन्स्पे०**—गुड् मार्निंग् !

**तेज०**—इथें कां ? चलावें आंत ! दरवाजा जोरानें उघडायचें कांहीं कारण नव्हतें. मी इथेंच रहात असतों ! आपल्याला कुणाचा तपास करायचा असेल तर बंगल्याच्या किल्ल्या माझ्यापाशीं आहेत ! सरकारला कोणती मदत पाहिजे असेल ती करायला मी तयार आहें !

**इन्स्पे०**—एक्स्क्यूज मी ! बहोत अच्छा ! वंद्रावनदास किदर है ? वो अदमी अमकू होना ! ये बंगला इस्काही है ?

**तेज०**—कोण ? वंद्रावनदास ?

**इन्स्पे०**—यस् यस् ! वंद्रावनदास !—क्या, तुम् इसकु पिछानूते नहीं ?

**तेज०**—त्याला फक्त मी नांवानें ओळखतों ! मी येथली जागा त्याच्या बहिणीपासून भाड्यानें घेतली आहे ! सध्यां बंगला खुला आहे, आपल्याला पाहिजे तर उघडून दाखवितों ! ती बाई आठ एक दिवस झाले बाहेरगांवीं गेली आहे !

इन्स्पे०—(आपल्या लोकांस) ये कंपौंडके चारी बाजू तुम् तपास करके वरदी लाना!

(शिपाई जातात.)

तेज०—ए कप् ऑफ टी ऑर कॉफी सर?

इन्स्पे०—नो, थँक् यू!

तेज०—हें घर अब्रूवाल्या गृहस्थाचें आहे, आपल्याला त्याच्याशीं कसलें काम आहे?

इन्स्पे०—इन्ने एक अदमीकू घायाळ किया है, वास्ते हम लोक तपास करते है?

तेज०—साब् व्हिस्की सोडा मंगते है?

इन्स्पे०—(तेजपाळाकडे बराच वेळ टक लावून पाहून) अच्छा!

तेज०—(वखारींत जाऊन व्हिस्कीची कागदांत गुंडाळलेली बाटली व सोडावाटर घेऊन येतो.)

इन्स्पे०—गलास होना!

तेज०—अच्छा! (जाऊं लागतो.)

इन्स्पे०—(बाटलीभोंवतालचा कागद उलगडून पाहून आश्चर्यानें) आय् से! आय् से! ये क्या है? सो रुपीयाकी नोट!

तेज०—साब्के वास्ते— गलास ले आताहूं!

इन्स्पे०—(नोट खिशांत घालून) अच्छा कुच फिकर नही! हम् सोडावाटर पिते है! ये व्हिस्की ले जाव्!

तेज०—नो नो सर! साब्के वास्ते—

इन्स्पे०—अच्छा अच्छा! तो हम् ये बॉटल् साथ ले जाते! (व्हिस्कीची बाटली खिशांत घालून सोडावाटर पितो.) (इतक्यांत कांहीं शिपाई परत येतात त्यांस पाहून) क्यौं कोई मिला अदमी?

शिपा०—नहीं मिला साब्!

तेज०—मी तरी साहेबांना तेंच सांगतों! साहेब विचारतात तो वृंद्रावनदास इथें नाहीं!

इन्स्पे०—अच्छा! तुमारा कॅहेना बराबर है! हम् जंटल्मेन्का केहेना बराबर मानते!—शिपाई! जमादारकु और सब शिपाईओंकु बोलना गिरफ्तदार ह्यां नहीं है, वास्ते चालो सब् लोग् पोलिस स्टेशनपर!

(इन्स्पेक्टर व शिपाई जातात.)

तेज०—(आपणाशीं) गेली एकदांची ब्याद टळली! असो; पण थोडक्यांत समाधान झालें इतकीच गोष्ट यांत घ्यायची! आतां वरचा मजला बंद करायला कांहीं हरकत नाहीं. (माडीवर जातो.)

---

## प्र० ५.— स्थळ पूर्ववत्—माडी.

(तेजपाळ खिडक्यांचीं दारें बंद करीत आहे.)

तेज०—(आपणाशीं) माझी आणि वृंद्रावनदासाची ह्मणण्यासारखी ओळख नसतांही त्याच्यावर अकल्पित संकट आलेलें पाहून माझें हृदय कळकळलें, व ह्मणूनच मी त्याला साह्य करण्यास तयार झालों! वस्तुतः तो माझ्या नात्यागोत्याचा कोणी नव्हे, फक्त मी त्याच्या जागेंतला एक भाडूत इतकाच कायतो संबंध! तरी पण केवळ जागेच्या सहवासानेंच या घरचीं माणसें मला कुटुंबांतल्या माणसांसारखींच वाटतात, व यासाठीं वृंद्रावनदासानें विश्वासानें हें घर माझ्या हवालीं केलें त्याच्याशीं मी दगा कदापि करणार नाहीं! जगाच्या दृष्टीनें मी या वेळीं खचित मर्ख ठरेन; पण

मिळायची. ती त्याला मिळवून द्यावी हाच माझा पहिल्यापासून हेतु आहे.

**संग्राम**०—आपण फार भोळे आहां. कसा त्याचा गादीवर हक्क ? त्याचा बाप कितीही चांगला होता असें कबूल केलें ह्मणून हा तसा आहे हें कशावरून ? यानें कधीं तलवार गाजविली आहे ?

**वीर**०—अरे, मी जिवंत असतां त्याला कशाला पाहिजे तलवार गाजवायला ? हा आहेना त्याचा सेनापति त्याच्या शत्रूंना रणांत धूळ चारायला तयार. सर्वजय हे माझे गुरु. त्यांनींच मला लहानाचें मोठें केलें. माझ्या अंगांत जर कांहीं करामत असली तर ती सर्वस्वीं त्यांच्याच प्रसादानें. मी हे उपकार आजन्म विसरणार नाहीं. जोंपर्यंत या बाहूंत जोर आहे तोंपर्यंत त्यांच्या बीजाचें कार्य साधण्यासाठीं झटेन. असें करायला चुकेन तर देवानें हा हात तत्क्षणीं आपल्या विद्युच्छस्त्रानें जाळून टाकावा.

**संग्राम**०—आपण कांहीं ह्मणा; पण मला तर वाटतें कीं या विजयगिरीच्या गादीवर बसण्याला आपणच सर्वस्वीं लायख आहां.

**वीर**०—शिव शिव ! काय बोलतोस हें ! देवा, असला दुष्ट विचार माझ्या मनांत शिरूं देऊं नकोस. ज्या हातांवर जयेंद्रपालाला खेळविलें, ज्या हातांतील सर्व पराक्रम त्याच्या बापापासून मिळालेला, त्याच हातांनीं त्याची हक्काची गादी पटकवावी आणि त्याच्या तोंडाला पानें पुसावीं याहून घोर कृतघ्नपणा आणि हरामखोरी दुसरी कोणती असेल ? या उप्पर तूं मजजवळ एक अक्षर देखील बोलूं नकोस. अरे, मला राज्यच पाहिजे असेल तर हे हात आणि ही समशेर असल्यावर मी पाहिजे तेथचें राज्य मिळवीन, चल आतां आपण केदारेश्वराच्या देवळांत जाऊं. आणि हें पहा, पुनः असली गोष्ट मजजवळ काढूं नको. जयेंद्रपाल आणि मी कांहीं दोन नाहीं. तो मला पोटच्या मुलाप्रमाणें आहे. त्याच्या केसालाही या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी धक्का पोचूं देणार नाहीं. [ जातो.

**संग्राम**०—काय करावें आतां या आमच्या महाराजांच्या भोळेपणाला ! मनुष्याचा थोरपणा जेव्हां त्याच्याच नाशाला कारण होऊं लागतो तेव्हां त्यानें तो थोरपणा ठेवणें ह्मणजे आपल्याच हातांनीं आपल्याच पायांवर धोंडा पाडून घेण्यासारखें आहे. आज जर यांनीं मनांत आणलें तर या विजयभवनदेशाचें राज्यपद यांना सहज मिळणार आहे. सर्वजयमहाराज थोर होते, त्यांचे यांच्यावर अमर्याद उपकार आहेत खरे,—पण ते स्मरून चालून येत असलेल्या राज्यलक्ष्मीला लाथेनें झुगारून देणें ह्मणजे मूर्खपणाची कमाल झाली. यांना असें कसें समजत नाहीं कीं जयेंद्रपालाला गादी मिळाली कीं त्यानें यांची गठडी वळलीच. यांच्यासारख्या तेजस्वी पुरुषाला आपल्या गादीजवळ राखून आपला कमीपणा साऱ्या जगाला

दाखवीत बसण्याइतका तो बेअक्कल नाहीं.—पण मनांतल्या मनांत चडफडून काय उपयोग ? यांच्या डोक्यांत जेव्हां हें शिरेल तेव्हांना ! चिन्हें कांहीं ठीक दिसत नाहींत. या वेळीं मालतीवाहिनी असत्या तर कांहीं साधलें असतें. कारण ती बाईच अशी कांहीं तेजस्वी होती कीं तिच्यासमक्ष यांचें हें वेडें बोलणें खुंटलें असतें. पण आमच्या दुर्दैवानें त्याही गेल्या. देवाच्या मनांत काय आहे कोण जाणे !

[ जातो.

## प्रवेश ३ रा.

**वीरमणी** आणि **सामुद्रिकबोवा** पुढें येतात. **अधीरसिंग** आणि **दौलतसिंग** मागें उभे आहेत.

**सा० बो०**—सरकार, आपण इतक्यांतच दरबाराला जाऊं नये. आणि आज दरबाराला गेला नाहीं तर फारच उत्तम.

**वीर०**—कां, कां बरें ?

**सा० बो०**—आतांचा योग फार वाईट आहे. आतां या वेळेला आपल्या ग्रहांचा असा कांहीं खडतर संयोग जमून आला आहे कीं आपला तेथें अपमान तरी होईल किंवा एखाद्या पेंचांत आपण सांपडाल किंवा भलतेंच बंधन आपल्या गळ्याभोंवतीं पडेल.

**वीर०**—छुट् ! या वीरमणीला ग्रह भेवडावतात काय ? तर मग मी मुद्दाम याच वेळेला जाणार ! त्यांनाही पण या वीराची छाती दिसूं दे.

**सा० बो०**—सरकार, आपण पराक्रमी आहां खरे; पण तो सारा पराक्रम पृथ्वीवर. आकाशांतील दिव्य तेजांपुढें त्याचा काय पाड ? असा आडदांडपणा करण्यांत काय अर्थ आहे ? आपल्या जिवाला किंवा यशाला अर्थात् प्राणालाच जर कांहीं अपाय झाला तर तिकडे शृंगारसुंदरीबाईसाहेबांना काय वाटेल ! आधींच आपल्या वियोगानें त्यांच्या जिवाला स्वस्थता कशी ती राहिली नाहीं. आजच रोजच्याप्रमाणें जासूद आला आहे तो सांगत होता कीं त्यांनीं अन्न वर्ज्य केलें आहे, नेहमीं डोळे आपल्या वाटेकडे लावून बसल्या आहेत,—

**वीर०**—काय ? अशी तिची अवस्था झाली आहे ? त्या जासुदाला एकदम माझ्याकडे कां नाहीं घेऊन आलां ?

**सा० बो०**—सरकार, आपलें संग्रामसिंहजींशीं बोलणें चाललें होतें व त्यावेळीं कोणाला आंत सोडूं नये अशी सक्त ताकीद होती, ह्मणून—

**वीर०**—बरें आहे, मी दरबाराहून परत आल्याबरोबर त्याला माझ्याकडे घेऊन या. अधीरसिंग, दौलतसिंग, चला लौकर. दरबारचा वक्त झाला. [ जातो.

**अधीरसिंग** आणि **दौलतसिंग** त्याच्या मागोमाग जातात.

**सा० बो०**—बाईसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें यांचें मन वळविण्याचा मी पुष्कळ प्रयत्न करून पाहतों आहे खरा. यांची त्यांच्यावरची प्रीति कायम आहे; पण हे राजकारणाच्या नादीं भरल्यामुळें व

आप्तइष्टांच्या सहवासांत दंग असल्यामुळें इतक्यांत तिकडे वळतील असें दिसत नाहीं. येथलें राजकारण जर यांच्यावर उलटलें तरच हे तिकडे फिरतील. आतांपर्यंत बारीक तपासांत जी बातमी लागली आहे त्यावरून यांच्याशीं जयेंद्रपाल सीध्या मार्गानें वागेल असें दिसत नाहीं. हा लग्नाचा पेंच घालण्याचा त्याचा बेत शिताफीचा खरा. या पेंचानें तो वीरमणीला खालीं आणणार. एक तर याला त्याचें अंकित होऊन राहिलें पाहिजे; नाहीं तर बायकोचा अपमान करुन त्याचें कायमचें वैर आणि साऱ्या लोकांचा राग हीं पतकरलीं पाहिजेत. बहुशः दुसऱ्याचाच संभव अधिक. तसें घडवून आणण्याविषयीं माझीही खटपट आहेच. एकदां तसें झालें कीं, यांनीं घेतलीच शृंगारसुंदरीबाईसाहेबांकडे धांव. आपल्यावर बोल येऊं नये ह्मणून आपण त्यांना मोघम शब्दांनीं आजच्या दरबारांत काय होणार हें सुचविलेंच आहे. यांच्या तंगड्या जयेंद्रपाल आज मोठ्या युक्तीनें जखडणार खचित. [ जातो.

---

## प्रवेश ४ था.

**वीरमणी, जयेंद्रपाल, यादवराव, प्रतापसिंह, संग्रामसिंह, अधीरसिंग, दौलतसिंग, बलदेव, भालदार** वगैरे.

**यादव०**—वीरमणी, जयेंद्रपाल, आजचा दरबार भरविण्यास कारण मुख्यतः आपण दोघे आहां. दोघांतही विशेषतः आमचे वीरमणीच कारण आहेत. त्यांच्या भार्येनें आपसांत बखेडे कोणते उपस्थित केले याबद्दल बोलणें ह्मणजे मेलेल्याला दोष देणें; असें करणें उचित नाहीं ह्मणून त्याबद्दल मी कांहींच बोलत नाहीं. पण त्यांच्या सावत्रबंधूंनीं लढाई केली याजबद्दल त्यांनीं आह्मां सर्वांना जाब द्यावा हें रास्त आहे. माझी स्वतःची खात्री आहे, कीं त्यांच्या खुलाशावरून त्यांचा कांहीं दोष नाहीं असें स्पष्ट दिसून येईल.

**जयेंद्र०**—काकासाहेबांचें या कामीं विशेषसें अंग असेल असें मलाही वाटत नाहीं. तथापि येथील लोकांची विपरीत समजूत झाली आहे; त्यांच्या समाधानासाठीं काकासाहेबांनीं खुलासा केला असतां कांहीं वावगें होणार नाहीं. का, प्रतापसिंह, असेंचना ?

**प्रताप०**—हें काय विचारावें ? आपले शब्द ह्मणजे अगदीं बृहस्पतीची वाणी. आपण कधीं गैरवाजवी बोललां आहां का?

**अधीर०**—काय हो, आपल्याला तरी तोंडपुजेपणा कसला असतो तो माहीत आहे का ?

**वीर०**—अधीरसिंग, चूप रहा. यादवराव, तुह्मी माझे जुने दोस्त, तेव्हां तुह्मांला माझा दोष दिसूं नये, तुमचा माझ्यावर पूर्ण भरंवसा असावा, हें रास्तच; पण बाळासाहेबाच्या बोलण्याचा मात्र मला अचंबा वाटतो. त्यानें इतका बेभरंवसा दाखववावा हें पाहून मला फार वाईट वाटतें. पण तो पोरबुद्धि आहे तेव्हां त्याचे शब्द मनावर घेऊं नये हें बरें.

दाखवीत बसण्याइतका तो बेअक्कल नाहीं.—पण मनांतल्या मनांत चडफडून काय उपयोग ? यांच्या डोक्यांत जेव्हां हें शिरेल तेव्हांना ! चिन्हें कांहीं ठीक दिसत नाहींत. या वेळीं मालतीवहिनी असत्या तर कांहीं साधलें असतें. कारण ती बाईच अशी कांहीं तेजस्वी होती कीं तिच्यासमक्ष यांचें हें वेडें बोलणें खुंटलें असतें. पण आमच्या दुर्दैवानें त्याही गेल्या. देवाच्या मनांत काय आहे कोण जाणे !

[ जातो.

---

## प्रवेश ३ रा.

**वीरमणी** आणि **सामुद्रिकबोवा** पुढें येतात. **अधीरसिंग** आणि **दौलतसिंग** मागें उभे आहेत.

**सा० बो०**—सरकार, आपण इतक्यांतच दरबाराला जाऊं नये. आणि आज दरबाराला गेला नाहीं तर फारच उत्तम.

**वीर०**—कां, कां बरें ?

**सा० बो०**—आतांचा योग फार वाईट आहे. आतां या वेळेला आपल्या ग्रहांचा असा कांहीं खडतर संयोग जमून आला आहे कीं आपला तेथें अपमान तरी होईल किंवा एखाद्या पेंचांत आपण सांपडाल किंवा भलतेंच बंधन आपल्या गळ्याभोंवतीं पडेल.

**वीर०**—छुट् ! या वीरमणीला ग्रह भेवडावतात काय ? तर मग मी मुद्दाम याच वेळेला जाणार ! त्यांनाही पण या वीराची छाती दिसूं दे.

**सा० बो०**—सरकार, आपण पराक्रमी आहां खरे; पण तो सारा पराक्रम पृथ्वीवर. आकाशांतील दिव्य तेजांपुढें त्याचा काय पाड ? असा आडदांडपणा करण्यांत काय अर्थ आहे ? आपल्या जिवाला किंवा यशाला अर्थात् प्राणालाच जर कांहीं अपाय झाला तर तिकडे शृंगारसुंदरीबाईसाहेबांना काय वाटेल ! आधींच आपल्या वियोगानें त्यांच्या जिवाला स्वस्थता कशी ती राहिली नाहीं. आजच रोजच्याप्रमाणें जासूद आला आहे तो सांगत होता कीं त्यानीं अन्न वर्ज्य केलें आहे, नेहमीं डोळे आपल्या वाटेकडे लावून बसल्या आहेत,—

**वीर०**—काय ? अशी तिची अवस्था झाली आहे ? त्या जासुदाला एकदम माझ्याकडे कां नाहीं घेऊन आलां ?

**सा० बो०**—सरकार, आपलें संग्रामसिंहजींशीं बोलणें चाललें होतें व त्यावेळीं कोणाला आंत सोडूं नये अशी सक्त ताकीद होती, ह्मणून—

**वीर०**—बरें आहे, मी दरबाराहून परत आल्याबरोबर त्याला माझ्याकडे घेऊन या. अधीरसिंग, दौलतसिंग, चला लौकर. दरबारचा वख्त झाला. [ जातो.

**अधीरसिंग** आणि **दौलतसिंग** त्याच्या मागोमाग जातात.

**सा० बो०**—बाईसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें यांचें मन वळविण्याचा मी पुष्कळ प्रयत्न करून पाहतों आहे खरा. यांची त्यांच्यावरची प्रीति कायम आहे; पण हे राजकारणाच्या नादीं भरल्यामुळें व

आप्तइष्टांच्या सहवासांत दंग असल्यामुळें इलक्ष्यांत तिकडे वळतील असें दिसत नाहीं. येथलें राजकारण जर यांच्यावर उलटलें तरच हे तिकडे फिरतील. आतांपर्यंत बारीक तपासांत जी बातमी लागली आहे त्यावरून यांच्याशीं जयेंद्रपाल सीध्या मार्गानें वागेल असें दिसत नाहीं. हा लग्नाचा पेंच घालण्याचा त्याचा बेत शिताफीचा खरा. या पेंचानें तो वीरमणीला खालीं आणणार. एक तर याला त्याचें अंकित होऊन राहिलें पाहिजे; नाहीं तर बायकोचा अपमान करुन त्याचें कायमचें वैर आणि साऱ्या लोकांचा राग हीं पतकरलीं पाहिजेत. बहुशः दुसऱ्याचाच संभव अधिक. तसें घडवून आणण्याविषयीं माझीही खटपट आहेच. एकदां तसें झालें कीं, यांनीं घेतलीच शृंगारसुंदरीबाईसाहेबांकडे धांव. आपल्यावर बोल येऊं नये ह्मणून आपण त्यांना मोघम शब्दांनीं आजच्या दरबारांत काय होणार हें सुचविलेंच आहे. यांच्या तंगड्या जयेंद्रपाल आज मोठ्या युक्तीनें जखडणार खचित. [ जातो.

---

## प्रवेश ४ था.

**वीरमणी, जयेंद्रपाल, यादवराव, प्रतापसिंह, संग्रामसिंह, अधीरसिंग, दौलतसिंग, बलदेव, भालदार वगैरे.**

**यादव०**—वीरमणी, जयेंद्रपाल, आजचा दरबार भरविण्यास कारण मुख्यतः आपण दोघे आहां. दोघांतही विशेषतः आमचे वीरमणीच कारण आहेत. त्यांच्या भार्येनें आपसांत बखेडे कोणते उपस्थित केले याबद्दल बोलणें ह्मणजे मेलेल्याला दोष देणें; असें करणें उचित नाहीं ह्मणून त्याबद्दल मी कांहींच बोलत नाहीं. पण त्यांच्या सावत्रबंधूंनीं लढाई केली याजबद्दल त्यांनीं आह्मां सर्वांना जाब द्यावा हें रास्त आहे. माझी स्वतःची खात्री आहे, कीं त्यांच्या खुलाशावरून त्यांचा कांहीं दोष नाहीं असें स्पष्ट दिसून येईल.

**जयेंद्र०**—काकासाहेबांचें या कामीं विशेषसें अंग असेल असें मलाही वाटत नाहीं. तथापि येथील लोकांची विपरीत समजूत झाली आहे; त्यांच्या समाधानासाठीं काकासाहेबांनीं खुलासा केला असतां कांहीं वावगें होणार नाहीं. का, प्रतापसिंह, असेंचना ?

**प्रताप०**—हें काय विचारावें ? आपले शब्द ह्मणजे अगदीं बृहस्पतीची वाणी. आपण कधीं गैरवाजवी बोललां आहां का?

**अधीर०**—काय हो, आपल्याला तरी तोंडपुजेपणा कसला असतो तो माहीत आहे का ?

**वीर०**—अधीरसिंग, चूप रहा. यादवराव, तुह्मी माझे जुने दोस्त, तेव्हां तुह्मांला माझा दोष दिसूं नये, तुमचा माझ्यावर पूर्ण भरंवसा असावा, हें रास्तच; पण बाळासाहेबाच्या बोलण्याचा मात्र मला अचंबा वाटतो. त्यानें इतका बेभरंवसा दाखवावा हें पाहून मला फार वाईट वाटतें. पण तो पोरबुद्धि आहे तेव्हां त्याचे शब्द मनावर घेऊं नये हें बरें.

**जयेंद्र०**—काकासाहेब, माझ्या हातून चुकी झाली असली तर त्याबद्दल आपण जी कांहीं मला शिक्षा कराल ती मी निमूटपणें सोशीन. माझा स्वभाव पडला थोडासा निर्भीड ह्मणून मला वाटलें तें मी बोललों. आणि हा निर्भीडपणा तरी आपल्यापासूनच मी शिकलों.

**वीर०**—अरे बाळासाहेब! तूं इतक्या लीनतेनें क्षमा मागितलीस हें तुझ्या शालीनतेला फार शोभतें. माझा राग किती क्षणिक आहे हें तूं जाणतोसच.

**अधीर०**—होय. आणि एवढेंच का, हेंही तो पूर्णपणें जाणतो कीं ज्याचा राग क्षणिक, त्याचें ऐश्वर्यही क्षणिक. एका शब्दानें विरघळणारा मनुष्य या आपमतलबी आणि भोंदू लोकांनीं भरलेल्या जगांत राहण्यास अगदीं नालायख होत.

**वीर०**—अधीरसिंग, यापुढें जर एक शब्द बेमुरवतपणाचा तोंडांतून काढशील तर तुझा इमानीपणा विसरून या भर दरबारांत तुझी गर्दन छाटून टाकीन.

**अधीर०**—सरकार, आपण माझा इतका मान केल्यावर मला अधिक तें काय पाहिजे? बाकी इमानाचा शेवट असाच व्हावयाचा.

**जयेंद्र०**—काकासाहेब, अधीरसिंग केवळ शिपाईगडी आहे. त्याला मुरवत बेमुरवत कसची कळणार? आडदांड, स्पष्टवक्ता आहे. त्याला माफी करावी. अधीरसिंग, तूं काकासाहेबांच्या पदरीं आहेस ह्मणून; नाहींतर तुला मीं आमच्या सैन्यांत मोठ्या हुद्यावर नेमिलें असतें.

**अधीर०**—सरकार, गरीबावर लोभ करतां इतका बस्स आहे. बलाढ्य मूर्खाची नौकरी करण्यापेक्षां शहाण्या फकीराची चाकरी उत्तम, हें मी जाणतों. कदाचित् पुढेंमागें आपला लोभ कसाला लावून पाहण्याची पाळी येईल.

**यादव०**—बरें, तें असो. काकासाहेब काय-सेसें ह्मणत होते.

**वीर०**—हो, मी असें ह्मणतों कीं, तुमचे जे माझ्यावर आरोप असतील ते स्पष्टपणें मला कळूं द्या.

**प्रताप०**—आमचेंही तेंच ह्मणणें. एकदां खुलाशानें बोलणीं झालीं कीं एकमेकांचीं दिलें एक झालींच. हाच आमच्या दृष्टीला शहाणपणाचा मार्ग दिसतो.

**यादव०**—बाळासाहेब, मी काकासाहेबांना जबाब देतों. काकासाहेब, आपण या राज्याचे आधारस्तंभ, आपण सिंधु देशांत जाऊन तिकडच्या मोहपाशांत अडकून गुंग होऊन राहिलां, तिकडच्या राज्याचा बंदोबस्त करावयाचा टाकून आपलाच बंदोबस्त तिकडून करून घेतलांत. इकडे आपल्या पत्नीनें व आपल्या भावानें आपल्या नांवानें बंड उभारून आमच्याशीं मोठ्या निकराचा झगडा मांडला. आह्मीं आपल्याकडे पत्रांवर पत्रें पाठविलीं तर त्यांचा जाब नाहीं, खुद्द जासुदांची गांठ देखील पडावयाची मुष्कील, आपण रात्रंदिवस ऐष आरामांत गुल्ल, ती विषवल्ली आपल्या अंगाला सदां गुरफटलेली, झालेल्या करारमदारांची आपल्याला विस्मति—

**जयेंद्र०**–हं! हं! यादवराव हें काय? आपण आपल्या जिभेला फाजील जाऊं देत आहां! कांहीं विचार करा. काकासाहेब, माझा आपल्यावर कांहीं आरोप नाहीं. या दरबारी मंडळाच्या आरोपांना आपल्याला जाब द्यावयाचा असेल तर द्या. मला स्वतःला कांहीं जाब नको.

**प्रताप०**–आमचेंही ह्मणणें तेंच आहे. बाळासाहेबांचें शहाणपण ह्मणजे मोठमोठ्या पंडितांच्या अंगीं मिळायचें नाहीं.

**वीर०**–बाळासाहेब, तूं आहेसच तसा मोकळ्या मनाचा; पण मला यांना जाब दिलाच पाहिजे. कारण यांनीं माझ्या सत्वाबद्दल–माझ्या प्रामाणिकपणाबद्दल शंका काढली आहे. यादवराव, कोणत्या कराररमदाराची विस्मृति? कराररमदार अगर शपथ मोडल्याचें या वीरमणीला आजन्मात् माहीत नाहीं.

**यादव०**–प्रसंगीं आह्मांस कुमक पाठवून मदत करण्याचा कराररमदार शपथेवर व लेखी झालेला आपल्या भावाच्या व पत्नीच्या बंडाचा मोड करण्याचे कामीं आपल्याकडून आह्मीं मागितलें असतांही साहाय्य झालें नाहीं, यांत मोडला किंवा नाहीं?

**प्रताप०**–बस्स! तोच प्रश्न! याचा जाब मिळाला पाहिजे.

**वीर०**–ठीक आहे. ऐका. माझ्याकडून मदत झाली नाहीं ही गोष्ट खरी; तथापि त्याला योग्य कारण होतें. तो प्रांत मीं नवीन काबीज केलेला. तेथें आपलें बस्तान नीट बसविण्याकरितां–कां, हंसतां कां?–दुसरें कोणतेंही बस्तान मीं जरी बसविलें असलें तरी आपल्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं, समजलां?–मला सैन्याची जरूर होती. त्यांतून येथें असलेल्या सैन्याच्या हातून मोडवणार नाहीं असें कांहीं बंड भारी नव्हतें आणि माझ्या मदतीवांचूनही तें मोडलें यावरूनच हें उघड आहे. माझ्या भावानें माझ्या नांवानें बंड केलें असें जें आपण ह्मणतां तें निव्वळ खोटें आहे. तो येथें हजर आहे. त्यालाच समक्ष विचारांना? तो खरें सांगेल अशी माझी खात्री आहे.

**संग्राम०**–होय, दादासाहेब ह्मणतात तें अक्षरशः खरें आहे. त्यांचा तिकडचा नाद सुटावा यासाठीं वहिनीसाहेबांनीं व मीं मिळून धामधूम केली, व या अपराधाबद्दल मीं क्षमा मागावी ह्मणूनच मला दादासाहेबांनीं दरबाराला आणलें आहे.

**अधीर०**–आणखी असा विचार करा कीं, जर खरोखरीच आमच्या महाराजांची या बंडाला अनुकूलता असती तर हा प्रश्न विचारावयाला आपण राहिलां असतां का?

**प्रताप०**–होय, तेंही खरेंच.

**वीर०**–आणि माझ्या पत्नीविषयीं जर आपण विचाराल तर–ती आतां मेली आहे व ह्मणून तिच्यामागें तिला दूषणें देणें ठीक नाहीं तरी–मी आपल्याला

इतकेंच सांगतों कीं, तशा बायकोचा आपल्याला अनुभव यावा. तिच्यासारखी खटपटी, जहांबाज, करारी बायको क्वचित्.

**अधीर०**—अशा बायका आमच्या सर्वांच्या नशिवीं नाहींत हें मोठेंच दुर्दैव! तसें असतें तर आह्मीं असे नेभळे राहिलों नसतों खचित.

**वीर०**—बरें बरें, आटप आतां तोंड. तूं कोठें आहेस याचा कांहीं विचार कर.

**अधीर०**—जी सरकार! हें झालें तोंड बंद! खरें बोलणें आणि तें दरबारांत—शांतं पापं! घेतली जीभ चाऊन.

**जयेंद्र०**—सरदारहो, झालें आपलें समाधान! मी तुह्मांला अगोदरच सांगणार होतों कीं, काकासाहेबांच्या प्रामाणिकपणाविषयीं संशय घेणें ह्मणजे प्रत्यक्ष सत्याला डाग लावूं पाहण्यासारखें आहे.

**यादव०**—मागच्याबद्दल आतां आमचें कांहीं ह्मणणें राहिलें नाहीं; पण कायहो काकासाहेब, तिकडची हवा आपल्याला कशी काय मानवते? तिकडे शाक्तमार्ग फार आहे ह्मणे. मोहिनीमंत्र, वशीकरणादि प्रकारांचें प्राबल्य विशेष आहे असें सांगतात.

**अधीर०**—अहो, आमचे महाराज तुह्मांला कांहीं सांगणार नाहींत. मी सांगतों तुह्मांला सारें. तुह्मीं ह्मणतां तो प्रकार तेथें आहे खरा. मुख्य शाक्ति शृंगारसुंदरीच्या रूपानेंच तेथें राहिली आहे. आपल्याला माहीत नाहीं का, कीं मागें सर्वंजय जेव्हां जगद्विजय करीत तेथें गेले, तेव्हां रात्रीं त्यांच्या तंबूत साक्षात्कार झाला. ह्मणतात कीं, देवी शृंगारसुंदरीनें एका बिछान्यांत आपलें शरीर झांकून एका स्वाराच्या पाठीवर स्वार होऊन त्यांच्या तंबूंत प्रवेश केला. इतकें खरें कीं, सर्वंजयांनीं इतर प्रांतांप्रमाणें तो प्रांत पादाक्रांत न करतां राणीशीं सलोख्याचा व सलगीचा तह करून ते परत आले.

**यादव०**—हो, असेंच कांहीं आह्मीं ऐकलें आहे खरें, व ह्मणूनच आह्मांला पुढची भीति वाटते ती. सर्वंजयांची जर ही कथा, तर आमच्या उच्छृंखल वासनाधीन वीरमणींची काय अवस्था होईल? हे जर पुनः असेच तिकडे गेले तर आह्मीं त्यांना अंतरलोंच ह्मणावयाचें. यासाठीं यांच्या पायांत एक जबरदस्त शृंखला अडकवून द्यावी——

**प्रताप०**—हो हो. आह्मांलाही तसेंच वाटतें. त्यांना सक्त पाहऱ्यांत अटकेंत ठेवावें. शृंखला नाहीं घातली तरी चालेल.

**अधीर०**—कोण, आपणच का आमच्या महाराजांना अटकेंत ठेवणार! अहाहा! खूप अक्कल.

**यादव०**—प्रतापराव, आपल्याला माझ्या बोलण्याचा अर्थ कळला नाहीं. मी ह्मणतो ती शृंखला निराळ्या प्रकारची. उभयतां थोर सरकारांनीं माझ्या बोलण्याकडे लक्ष द्यावें अशी विनंति आहे. वीरमणींचें कुटुंब नुकतेंच निवर्तलें आहे. आमच्या बाळासाहेबांच्या भगिनी अहल्याताईसाहेब लग्नाच्या असून उपवर

आहेत. त्यांच्यासारखी धूर्त, सद्गुणी व शांत स्त्री मिळावयाची नाहीं. वीरमणीसारखा जगविख्यात योद्धाच त्यांचा पति होण्यास योग्य.

**प्रताप०**—आपण लाख रुपयांची गोष्ट बोललां, यादवराव. आपण ह्मणतां तसेंच आमचेंही मत आहे.

**जयेंद्र०**—यादवराव, संभाळून बोला. शृंगारसुंदरीनें जर हें भाषण ऐकिलें, तर तिच्या सुडाला तुमचें हें शरीर पुरणार नाहीं.

**वीर०**—बाळासाहेब, शृंगारसुंदरीचा मी कांहीं बांधलेला नाहीं. यादवरावाच्या सूचनेंत जोर कितपत आहे हें जर मला कळेल तर याबद्दल माझें ह्मणणें कळवावयाला ठीक पडेल.

**जयेंद्र०**—सर्वंजयमहाराजांची कन्या वीराला टाकून अन्याला देणें कधीं तरी रास्त होईल काय ?

**अधीर०** } (वीरमणीच्या कानांत) महाराज,
**संग्राम०** } इतक्यांत रुकार देऊं नका. यांत कांहीं कपट आहे.

**वीर०**—(त्याच्या कानांत) तुह्मीं दोघेही मूर्ख आहांत. सर्वंजयमहाराजांच्या मुलीशीं लग्न करण्याचें नाकारणें याहून अधमतर कृतघ्नपणा कोणताही असेल असें मला वाटत नाहीं. चूप रहा. (उघड) ठीक आहे. हा विचार मला पसंत आहे. पण आतां दरबार बरखास्त करून याबद्दल एकांतीं खुलासे करावे हें उत्तम.

**जयेंद्र०**—हो, तेंच रास्त.

**भालदार**—दरबार बरखास्त.

[अधीरसिंग व संग्रामसिंह यांच्याशिवाय सर्व जातात.

संग्रामसिंह व अधीरसिंग पुढें येतात.

**अधीर०**—का राव, दरबारचा थाट कसा काय उडाला? शेवटतर अगदीं गोड नाहीं?

**संग्राम०**—कोणाला ठाऊक गोड का कडू होतो तो.

**अधीर०**—मी सांगतों तुह्मांला. शेवट कडू होणार. आमचे भोळे महाराज फशीं पडले. अहल्याबाई कितीही चांगली असली तरी तिच्या कह्यांत आमचे महाराज कधींही राहावयाचे नाहींत. ती थंड बाहुली या प्रखर कामवासनेच्या उल्लू राजबिंड्याला काय आवडणार ? लग्न होऊंद्या तर खरें कीं यानें त्या चटकचांदणीकडे धांव मारलीच समजा. हिचा अवमान करून हा हिला आपल्या भावाकडे रडत पाठवून देणार. ती लोकांच्या अत्यंत प्रीतींतली आहे, तेव्हां तिच्या अवमानाबद्दल लोकांचा त्यांच्यावर रोष होईल. मग त्यांचा नाश करावयाला जयेंद्रपालाला का उशीर लागेल ? असो; प्रारब्ध झालें. जें जें होईल तें तें निमूटपणें पहावें. [जातात.

---

## प्रवेश ५ वा.—वीरमणीचा वाडा.

**वीरमणी, जयेंद्रपाल, प्रतापसिंह, यादवराव,** वगैरे मंडळी बोलत बसली आहेत. **संग्रामसिंह, अधीरसिंग व सामुद्रिकबोवा** एका अंगास बोलत उभे आहेत.

गाणें चाललें आहे.

**सा० बो०**—मनुष्यप्राणि किती मूर्ख असतो पहा. ज्यापासून आपलें मरण

इतकेंच सांगतों कीं, तशा बायकोचा आपल्याला अनुभव यावा. तिच्यासारखी खटपटी, जहांबाज, करारी बायको क्वचित्.

**अधीर०**—अशा बायका आमच्या सर्वांच्या नशिबीं नाहींत हें मोठेंच दुर्दैव! तसें असतें तर आह्मीं असे नेभळे राहिलों नसतों खचित.

**वीर०**—बरें बरें, आटप आतां तोंड. तूं कोठें आहेस याचा कांहीं विचार कर.

**अधीर०**—जी सरकार! हें झालें तोंड बंद! खरें बोलणें आणि तें दरबारांत—शांतं पापं! घेतली जीभ चाऊन.

**जयेंद्र०**—सरदारहो, झालें आपलें समाधान! मी तुह्मांला अगोदरच सांगणार होतों कीं, काकासाहेबांच्या प्रामाणिकपणाविषयीं संशय घेणें ह्मणजे प्रत्यक्ष सत्याला डाग लावूं पाहण्यासारखें आहे.

**यादव०**—मागच्याबद्दल आतां आमचें कांहीं ह्मणणें राहिलें नाहीं; पण कायहो काकासाहेब, तिकडची हवा आपल्याला कशी काय मानवते? तिकडे शाक्तमार्ग फार आहे ह्मणे. मोहिनीमंत्र, वशीकरणादि प्रकारांचें प्राबल्य विशेष आहे असें सांगतात.

**अधीर०**—अहो, आमचे महाराज तुह्मांला कांहीं सांगणार नाहींत. मी सांगतों तुह्मांला सारें. तुह्मीं ह्मणतां तो प्रकार तेथें आहे खरा. मुख्य शाक्ति शृंगारसुंदरीच्या रूपानेंच तेथें राहिली आहे. आपल्याला माहीत नाहीं का, कीं मागें सर्वजय जेव्हां जगद्विजय करीत तेथें गेले, तेव्हां रात्रीं त्यांच्या तंबूंत साक्षात्कार झाला. ह्मणतात कीं, देवी शृंगारसुंदरीनें एका बिछान्यांत आपलें शरीर झांकून एका स्वाराच्या पाठीवर स्वार होऊन त्यांच्या तंबूंत प्रवेश केला. इतकें खरें कीं, सर्वजयांनीं इतर प्रांतांप्रमाणें तो प्रांत पादाक्रांत न करतां राणीशीं सलोख्याचा व सलगीचा तह करून ते परत आले.

**यादव०**—हो, असेंच कांहीं आह्मीं ऐकलें आहे खरें, व ह्मणूनच आह्मांला पुढची भीति वाटते ती. सर्वजयांची जर ही कथा, तर आमच्या उच्छृंखल वासनाधीन वीरमणींची काय अवस्था होईल? हे जर पुन: असेच तिकडे गेले तर आह्मीं त्यांना अंतरलोंच ह्मणावयाचें. यासाठीं यांच्या पायांत एक जबरदस्त शृंखला अडकवून द्यावी—

**प्रताप०**—हो हो. आह्मांलाही तसेंच वाटतें. त्यांना सक्त पाहऱ्यांत अटकेंत ठेवावें. शृंखला नाहीं घातली तरी चालेल.

**अधीर०**—कोण, आपणच का आमच्या महाराजांना अटकेंत ठेवणार! अहाहा! खूप अक्कल.

**यादव०**—प्रतापराव, आपल्याला माझ्या बोलण्याचा अर्थ कळला नाहीं. मी ह्मणतो ती शृंखला निराळ्या प्रकारची. उभयतां थोर सरकारांनीं माझ्या बोलण्याकडे लक्ष द्यावें अशी विनंति आहे. वीरमणींचें कुटुंब नुकतेंच निवर्तलें आहे. आमच्या बाळासाहेबांच्या भगिनी अहल्याताईसाहेब लग्नाच्या असून उपवर

आहेत. त्यांच्यासारखी धूर्त, सद्गुणी व शांत स्त्री मिळावयाची नाहीं. वीरमणीसारखा जगविख्यात योद्धाच त्यांचा पति होण्यास योग्य.

**प्रताप०**—आपण लाख रुपयांची गोष्ट बोललां, यादवराव. आपण ह्मणतां तसेंच आमचेंही मत आहे.

**जयेंद्र०**—यादवराव, संभाळून बोला. शृंगारसुंदरीनें जर हें भाषण ऐकिलें, तर तिच्या सुडाला तुमचें हें शरीर पुरणार नाहीं.

**वीर०**—बाळासाहेब, शृंगारसुंदरीचा मी कांहीं बांधलेला नाहीं. यादवरावाच्या सूचनेंत जोर कितपत आहे हें जर मला कळेल तर याबद्दल माझें ह्मणणें कळवावयाला ठीक पडेल.

**जयेंद्र०**—सर्वजयमहाराजांची कन्या वीराला टाकून अन्याला देणें कधीं तरी रास्त होईल काय ?

**अधीर०** } (वीरमणीच्या कानांत) महाराज,
**संग्राम०** } इतक्यांत रुकार देऊं नका. यांत कांहीं कपट आहे.

**वीर०**—(त्याच्या कानांत) तुह्मीं दोघेही मूर्ख आहांत. सर्वजयमहाराजांच्या मुलीशीं लग्न करण्याचें नाकारणें याहून अधमतर कृतघ्नपणा कोणताही असेल असें मला वाटत नाहीं. चूप रहा. (उघड) ठीक आहे. हा विचार मला पसंत आहे. पण आतां दरबार बरखास्त करून याबद्दल एकांतीं खुलासे करावे हें उत्तम.

**जयेंद्र०**—हो, तेंच रास्त.

**भालदार**—दरबार बरखास्त.

[अधीरसिंग व संग्रामसिंह यांच्याशिवाय सर्व जातात.

संग्रामसिंह व अधीरसिंग पुढें येतात.

**अधीर०**—का राव, दरबारचा थाट कसा काय उडाला ? शेवटतर अगदीं गोड नाहीं ?

**संग्राम०**—कोणाला ठाऊक गोड का कडू होतो तो.

**अधीर०**—मी सांगतों तुह्मांला. शेवट कडू होणार. आमचे भोळे महाराज फशीं पडले. अहल्याबाई कितीही चांगली असली तरी तिच्या कह्यांत आमचे महाराज कधींही राहावयाचे नाहींत. ती थंड बाहुली या प्रखर कामवासनेच्या उल्लू राजबिंडयाला काय आवडणार ? लग्न होऊंद्या तर खरें कीं यानें त्या चटकचांदणीकडे धांव मारलीच समजा. हिचा अवमान करून हा हिला आपल्या भावाकडे रडत पाठवून देणार. ती लोकांच्या अत्यंत प्रीतींतली आहे, तेव्हां तिच्या अवमानाबद्दल लोकांचा त्यांच्यावर रोष होईल. मग त्यांचा नाश करावयाला जयेंद्रपालाला का उशीर लागेल ? असो; प्रारब्ध झालें. जें जें होईल तें तें निमूटपणें पहावें. [जातात.

---

## प्रवेश ५ वा.—वीरमणीचा वाडा.

**वीरमणी, जयेंद्रपाल, प्रतापसिंह, यादवराव,** वगैरे मंडळी बोलत बसली आहेत. **संग्रामसिंह, अधीरसिंग व सामुद्रिकबोवा** एका अंगास बोलत उभे आहेत. गाणें चाललें आहे.

**सा० बो०**—मनुष्यप्राणि किती मूर्ख असतो पहा. ज्यापासून आपलें मरण

त्यालाच तो प्रेमानें कवटाळीत असतो. हा लग्नसंबंध महाराजांनीं केला खरा, पण त्यांना तो पक्का भोंवणार.

**संग्राम०**—आमच्या महाराजांना आनंदाचें काय भरतें आलें आहे पहा.

**अधीर०**—पण याच आनंदांत ते आपलें वैभव आणि जीवित गमावीत आहेत.

**सा० बो०**—आणि हाच आनंद थोड्याच दिवसांत त्यांच्या डोळ्यांतून पाण्याचे पाट वहावयाला लावील. हें टाळण्याची संधि अजून आहे. पण आमचे महाराज ऐकतील तेव्हांना.

**संग्राम०**—कोणची संधि? कशी? सांगा लवकर सांगा; दादासाहेबांबद्दल माझा जीव तीळ तीळ तुटतो.

**सा० बो०**—विरुद्धपक्ष कसा हातांत सांपडला आहे. येथल्या येथें—( हातानें छाटण्याची खूण करून दाखवितो )

**अधीर०**—छेः छेः छेः! महाराजांजवळ ही गोष्ट काढावयाचा अवकाश कीं ( आपल्या माना जातील असें हातानें दाखवितो. )

**संग्राम०**—मला वाटतें मारण्याचें नांव काढूं नये. अटकेंत ठेवण्यापुरती सूचना करावी. बरें तर पहातों गोष्ट काढून.

[ **वीरमणीं**च्या कानाशीं लागतो

**वीर०**—(एका अंगास घेऊन ) काय म्हणतोस तूं? तिकडे काय मजा चालली आहे. अशा या आनंदाच्या व रंगाच्या वेळीं तुझें हें असें दुर्मुख कां?

**संग्राम०**—दादासाहेब, आतां या विस्तृत राज्याचे मालक होण्याची व आपल्या शत्रूंचा नायनाट करण्याची अत्युत्तम संधि आपल्या हातीं आली आहे.

**वीर०**—कशी ती?

**संग्राम०**—( त्याच्या कानांत सांगतो. )

**वीर०**—( संतापानें ) अरेरे, किती दुष्ट, कपटी, अधम आहेस तूं! विश्वासानें आपल्या येथें आलेल्या पाहुण्यांशीं मी असा बेइमान होऊं काय? आणि तें कशाकरितां? हें क्षुद्र राज्य मिळविण्याकरितां! आग लाव त्या राज्याला! असल्या कवडीमोल फायद्यासाठीं मी आपलें थोर शील सोडूं? या वीरमणीच्या अंगांत असलीं शेंकडों राज्यें सरळ मार्गानें तलवारीच्या जोरावर कमावण्याची धमक आहे, समजलास? जा तें आपलें काळें तोंड नेऊन कोठें तरी लपीव. मला पुनः तें दाखवूं नको. ( उघड ) अधीरसिंग, ती मंडळी उठावयाला लागली पहा. त्यांना पानसुपारी द्या.

[ पानसुपारी होऊन **जयेंद्रपाला**शिवाय सर्व मंडळी बाहेर जातात.

**वीर०**—अधीरसिंग, जा, तिला इकडे बोलाव.

[ **अधीरसिंग** जातो व **अहल्याबाई**ला घेऊन येतो.

**जयेंद्र०**—मी हा आपल्या हातीं माझा कलिजा दिला आहे बरें. याला नीट जपा. याला इजा ती मला इजा.

**वीर०**—त्याची नको तुम्हांला काळजी. हा तुमचा कलिजा नव्हे, माझाच आहे. सर्वजयमहाराजांचा हा अंश—याची हेळसांड माझ्या हातून कशी होईल?

**जयेंद्र०**—तें मी जाणून आहे. तरी हें वेडें

मन नानाप्रकारच्या कुकल्पना केल्याशिवाय राहत नाहीं. ताई, ये बरें आतां. मीं मनांत योजिलें होतें त्याहीपेक्षां थोर ठिकाणीं तूं पडली आहेस. आपल्या कुलशिलाला शोभेल अशी वाग.

**अहल्या**—दादा, तूं मागें राहणारना ? वरचेवर समाचार घेत जा.

[ डोळ्याला पदर लावते.

**वीर०**—तिच्यानें आतां बोलवत नाहीं. तें पहा तिचें प्रेम तिच्या डोळ्यांत आणि कंठांत कसें भरून आलें आहे ! द्या तिला निरोप. येऊं तर? लोभ असूं द्या. संग्रामसिंहावर चांगली कृपादृष्टि असूं द्या. चल आतां आंत प्रिये. देवांचा आशीर्वाद घेऊन पुढें निघूं. [ आंत जातात.

**जयेंद्र०**—जा, खुशाल जा बरें. सांपडलास माझ्या जाळ्यांत. कसा सुटतोस पाहतों. हा बार मोठ्या अकल्पित रीतीनें पार पडला. आतां अगोदर संग्रामसिंहाचा समाचार घेतला पाहिजे. ह्मणजे याचा साहाय्यकर्ता इकडे कोणी राहिला नाहीं आणि मग पुढें सरावयाला हरकत नाहीं.

# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला—शृंगारसुंदरीचा महाल.

शृंगारसुंदरी, मोहना, मदीरा आणि गुलाब.

**शृंगार०**—मोहने, आतां नाहीं बाई माझ्याच्यानें धीर निघत. किती तरी मेले दिवस झाले त्या वीराच्या शरीराचें स्पर्शसुख न मिळाल्याला ? अग एखादें चांगलें गाणें तरी ह्मण—गाणें ह्मणजे कामीजनांच्या खिन्न अंतःकरणाचें जीवनच.

**गुलाब**—कोण हाय भाईर ! जा, गवईबुवांना म्होर घालून घेऊनशान बिगिद्यान् या.

**मोहना**—बाईसाहेब, परवांचे नवे गवईबोवा फार छानदार आहेत. गातांना नखरा पण काय करतात आणि डोळे मुरडून मुरडून तर पाहणाराचा जीव बेजार करून टाकतात.

**मदीरा**—खरेंच बाईसाहेब. तो गवई फार चांगलें गातो. मेला लावण्या तर अशा ह्मणतो कीं जिवाला चुटपुट लागून राहते.

**मोहना**—मदीरे, संभाळहो. एखाद वेळ भान विसरून भलतेंच कांहीं होईल आणि मग त्या अधीरसिंग—

**मदीरा**—( तिच्या तोंडावर हात ठेवून ) हं पुरे आतां आपलें शहाणपण !

**गुलाब**—बघा कशा सटव्या हायता. बाईसाबांसनी होवं गानं आन् यांसनी होवा गवईबावा.

**मोहना**—पुरेपुरे. तूं नको कांहीं मेल्या चावटपणा करायला. तुझीच नजर मेल्या वाईट असेल. पण तो गवईबोवा त्यांतला नाहींहो.

**शृंगार०**—अग नको मला आतां तें गाणें. आपण किनई चौसार खेळूं या. मदीरे आणग तो पट.

**मोहना**—बाईसाहेब, पण मी या गुलबाला

आपला गडी करणार नाहीं. बायकांत पुरुष कशाला?

**मदीरा**—त्यांतग काय आहे? जनानखान्यांतलाच पुरुष तो. त्याचें काय?

**गुलाब**—बर हाय मदीरे. ह्माराजांबरोबर कोनी तरी येत्याल त्यांना सांगिन मी काय तरी.

**शृंगार०**—खरेंच, आतां ते कधीं तरी येणार? मला आतां तें खेळणें नको. छे: बाई. कांहीं केल्या मनाला कांहीं करमत नाहीं. असें बाई वेड मला पूर्वी कधीं कोणींच लावलें नव्हतें. कायग मोहने, त्या सर्वजयमहाराजांवर माझी इतकी प्रीति होती का ग?

**मोहना**—कोणावर ह्मटलेंत? सर्वजयमहाराजांवर का? अगबाई! कसला वीरपुरुष तो. त्याची बरोबरी करणारा या जगांत तरी कोणी सांपडेल असें मला वाटत नाहीं.

**शृंगार०**—तूं अगदीं मूर्ख आहेस. तो शूर खरा पण माझा वीरमणी काय कमी आहे? सारी पृथ्वी त्याच्या दराऱ्यानें हलून राहिली आहे. आणि गडे, शृंगारशास्त्रांत वीरमणी केवळ पटाईत आहे. या कामीं त्याच्या नखाची देखील सर त्या सर्वजयाला यावयाची नाहीं.

**गुलाब**—पण बाईसाब, मींच त्या सर्वजय ह्माराजांना आपनाकड वंटच्या घंट सारख टक लावून बगत उभ ऱ्हाइलेल बगितल हायेत. खरंच आपना दोघांकड बगितलं कीं असं वाट कीं आपुन एकमेकांचें काळीज डोळ्यांनींच गटागटा पिता की काय. काय तो परेमरस!

**शृंगार०**—नको त्याची आठवण करूं. तो सारा पोरपणचा खेळ. त्यावेळीं मला कांहीं कळत का होतें? अग पण माझा लाल मला केव्हां भेटेल? जातांना किनई कित्ती सांगणें झालें होतें कीं "राजकारण आटपलें कीं मी परत आलोंच. माझा प्राण येथें टाकून मला तेथें राहवेल तरी कसें?" आणि आज जवळ जवळ पंधरा दिवस झाले, पंधराच का ग? मला वाटतें कीं वर्षेंची वर्षे झालीं असावींत. नुसत्या पत्रावर जिवाचें मेलें समाधान व्हावें तरी कसें? आणि आज दोन दिवसांत मेलें पत्र देखील नाहीं. तिकडे काय झालें आहे आणि काय नाहीं, कोण जाणे! जिवाला बाई हुरहुर लागून राहिली आहे. मदीरे, जाग देवडीवर आणि तिकडून कोणी जासूद आला आहे का चवकशी कर. [ मदीरा जाते.

**मोहना**—बाईसाहेब, क्रीडासरोवराकडे येतां का? तेथें त्या रंगारंगाच्या माशांची जलक्रीडा पाहून आपल्या जिवाला जरा मौज वाटेल. एकदां वीरमणींची आपण तेथें मौज केली ती आपल्याला आठवते का?

**शृंगार०**—अग आठवतेंका ह्मणून काय विचारतेस? त्या दिवशीं फारच बहार उडाली अधिक मासे कोण धरतो ह्मणून लागली आमची दोघांची पैज. त्यांच्या गळाला एकही मासा लागेना

आणि माझ्या गळाला झुंडीच्या झुंडी. तेव्हां किनई तिकडे कितीपण खिजणें झालें; मग आपण त्यांच्या गळाला एक मोठा मेलेला मासा लावला आणि तो जेव्हां त्यांनीं वर काढला तेव्हां त्यांना कितीपण आनंद झाला. "अग नागिणी, बघ ही माझी शिकार ! तुझे ते सारे मासे याच्या पासंगाला तरी पुरतील ?" असें केवढ्या मोठ्यानें पण ओरडले. पण तो पूर्वींच मारलेला आहे हें दाखवून मीं जी त्यांची टर उडविली त्यामुळें स्वारी खूप चिडली. पण रात्रीं महालांत गांठ पडल्यावर पुनः हंसून हंसून मर्जी सुप्रसन्न करून घेतली. आणि मग झाला दारू पिण्याचा सपाटा सुरू. किती सुरया पालथ्या पाडल्या याची गणतीच नाहीं. शेवटीं पहाटें स्वारी लुडु झाली आणि डोळा लागला. मग मीं माझा हा शेला घातला तिकडे अंगावर, आणि ही रत्नमाला घातली त्यांच्या गळ्यांत आणि तिकडची तलवार माझ्या कमरेला लटकावून तिकडचा तो झगा चढविला अंगांत. कितीग जड होता तो ! आणि मग सकाळीं जेव्हां उठणें झालें——

मदीरा आणि जासूद येतात.

हा तिकडून आला वाटतें. कसा आनंदाच्या गोष्टीच्या वेळीं आला. मला वाटतें यानें गोड बातमी आणली असावी ! पण किती चेंगट आहेस तूं ! बोल बोल लवकर, माझे कान कसे भुकेले झाले आहेत. त्यांत तुझ्या मधुर बातमीचा रस ओतून त्यांना तृप्त कर.

**जासूद**—बाईसाहेब, राणीसाहेब !——

**शृंगार०**—कां ? कां ? कचरतोससा ? "वीरमणी मला टाकून गेले ?" मेल्या असें बोल कीं झालीच ठार ही शृंगारसुंदरी ; पण "ते सुखरूप, खुशाल व यथास्थित चैनींत आहेत" असें सांग कीं तूं दारिद्र्यांतून मोकळा झालास आणि या पायाला हात लावायची व त्यावर डोकें ठेवायची तुला मोकळिक देईन. केवढें तुझें भाग्य ! या पायाच्या लाथा मिळाव्या ह्मणून मोठमोठ्या राजांनीं देवाला नवस फिरे करायचे !—— पण तूं असा मुखस्तंभ कसा ? बोलतोस कीं नाहीं लवकर ?

**जासूद**—बाईसाहेब, ते खुशाल आणि सुखरूप आहेत——

**शृंगार०**—हें घे तुला बक्षीस. अरे पण होमेल्यावर नेहमींच खुशाली ! तशांतलाच नाहींना प्रकार ? तसें सांग तर खरें कीं हेंच सोनें वितळवून त्याचा ऊन ऊन रस तुझ्या नरड्यांत ओतीन.

**जासूद**—बाईसाहेब, ऐकून तर घ्या.

**शृंगार०**—बोल काय तें. पण तुझ्या तोंडावर कांहीं आनंद दिसत नाहीं. ते जर सुखरूप आहेत तर तुझें तोंड असें रडवें कां ? आणि ते जर आनंदांत नसतील तर मेल्या तूं नुसतें रडवें तोंड करूनच कां राहिलास ? एखाद्या पिसाळलेल्या राक्षशिणीप्रमाणें रडत ओरडत यावयाला पाहिजे होतेंस.

**मोहना**—बाईसाहेब; आपण असें करूं लागलां तर त्याची बातमी आपल्याला कशी कळावी ? तो पहा कसा गांगरून गेला आहे.

**शृंगार०**—काय करूंग ? याचें हें तोंड पाहूनच माझी छाती धडधडूं लागली आहे. याला लाथाबुक्क्याखालीं तुडवावा असें माझ्या मनांत येतें. कायरे ? ते खुशाल आहेतना ? जयेंद्रपालाच्या कह्यांत सांपडले नाहींतना ? हो ह्मण, आणि घे आपल्यावर हिरेमोत्यांचा पाऊस पाडून.

**जासूद**—ते सुखरूप आहेत हें मीं मघांशींच सांगितलें.

**शृंगार०**—तें मी विसरलें होतें. आणखी—

**जासूद**—जयेंद्रपालांचें व त्यांचें सख्य जुळलें.

**शृंगार०**—तुझ्या तोंडांत साखर पडो.

**जासूद**—आपला स्नेह तुटूं नये यासाठीं जयेंद्रपालांनीं एका प्रेमग्रंथीनें त्यांना बांधून टाकिलें आहे.

**शृंगार०**—तर मग ते आतां निर्धास्तच झाले ह्मणावयाचे. या सुवार्तेबद्दल ही राणी तुझी ऋणी आहे बरें. पण ते आतां इकडे कधीं येणार ? खरें ह्मटलें ह्मणजे ते तुझ्या अगोदरच येऊन पोंचायला पाहिजे होते. मोहने, अग मोहने, सज्जावर जा आणि लांबवर नजर पोचवून बघग विजयगिरीकडून कोणी येतें आहे का. पण नको, माझ्या अगोदर तूं त्यांचें दर्शन काय ह्मणून घेणार ? मीच जातें. [ जाऊं लागते.

**जासूद**—पण बाईसाहेब !—

**शृंगार०**—( एकदम मागें येऊन.) अरेरेरे—त्या पणानें तुझ्या मागच्या साऱ्या साखरेंत विष कालविलें. 'पण'—हीं दोनच अक्षरें पण ती ऐकतांच मोठमोठ्या धीर पुरुषांचें काळीज देखील थरथर कांपूं लागतें. बाबा, आतां लांबण लावूं नको. काय अरिष्ट असेल तें एकदम सांगून हो मोकळा कसा.

**जासूद**—बाईसाहेब, माफ करा. वाईट बातमी सांगणारा ती ऐकणाराला त्या बातमीप्रमाणेंच दुःसह होतो.

**शृंगार०**—सांग, सांग अगोदर पटकन्. मी तुला कांहीं करणार नाहीं.

**जासूद**—राणीसाहेब, वीरमणी महाराजांचें जयेंद्रपालांच्या बहिणीशीं लग्न लागलें.

**शृंगार०**—अरेरे घुबडा ! हे शब्द तोंडांतून काढतांना तुझी जीभ कशी नाहीं झडली ! मेल्या, काळतोंड्या, चल निघ येथून.—पण कायरे, खरेंच का त्यांचें लग्न झालें ? "नाहीं" ह्मण कीं तुला मागशील तें बक्षीस देईन. माझे वीरमणी अजून माझेच आहेत असें सांग कीं तुला सोन्यारुप्यांनीं मढवून काढते, सर्व जासुदांचा तुला नाईक करते,—हुं, ह्मण, ह्मण एकदां "नाहीं" ह्मणून.

**जासूद**—तसें कसें करूं बाईसाहेब ? खोटें कसें बोलूं ?

**शृंगार०**—आग लागो त्या तुझ्या खापरतोंडाला ! मेल्या, राणीच्या सुखाकरितां खोटें बोलून नरकांत गेला असतास तर काय झालें असतें ? या तुझ्या पा-

पामुळें या साऱ्या सिंधु देशांत जिकडे-तिकडे ईश्वरी क्षोभ होऊन विखारी नागांनीं व रोगांनीं हा देश उध्वस्त पाडला असता तरी बेहेत्तर होतें. नीघ, नीघ माझ्या समोरून. नाहींतर तीं तुझ्या डोळ्यांतील बुबुळें या नखांनीं फाडून काढीन बघ. (त्याला मारते तों पळून जातो.) काय, त्यांनीं लग्न करावें अं! पुरुष मेले तेवढे सारे बेइमानी, गायकसाई. मीच मूर्ख. त्यांच्यावर विश्वास कां ठेवला बरें. सर्वजयापेक्षां देखील मला ते अधिक आवडूं लागले होते. सर्वजयमहाराजांना मोहिनी घालण्यासाठीं मला कांहीं करावें लागलें नाहीं, नुसत्या दृष्टीनें सारें काम झालें. ते माझा मायापाश तोडून गेले तेव्हां मला फारसें वाईट वाटलें नाहीं. सहज मिळालेल्या वस्तूची किंमत तितपतच वाटते. पण या वीरमणींचें मन वश करून घेण्यासाठीं, देवा, मीं कितीरे खटपट केली. वार्धक्यामुळें चेहेऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्या लपवून तोंडावर तारुण्याची टवटवी दाखविण्यासाठीं रंगावर रंग चढवायचे, अंगाचा लवचिकपणा गेला नाहीं हें दाखविण्यासाठीं मुरडून आणि मुरकून आणि थैथै नाचून शरीराचे हाल हाल करून घ्यावयाचे, डोळ्यांतलें सुकलेलें तेज पुनः ताजें करण्यासाठीं निरंतर निशेच्या धुंदींत असावयाचें, वेळीं अवेळीं कामेच्छा मनांत नसतांही, त्यांचा काम जागृत ठेवण्यासाठीं नानाप्रकारच्या शृंगारचेष्टा करावयाच्या,—अशा एक कीं दोन हजारों तऱ्हांनीं मीं आपली विटंबना करून घेतली. मोहने, देवानें माझ्यावर चांगला सूड उगवला. सर्वजय महाराज स्वर्गांतून जर हें पाहत असतील तर त्यांच्याशीं केलेल्या बेइमानीपणाबद्दल मला झालेली ही शिक्षा पाहून त्यांना किती तरी आनंद होत असेल. छेः, पण माझें दुःख पाहून त्यांना कधींही आनंद होणार नाहीं. ते फारच कोंवळ्या, उदार व कनवाळू अंतःकरणाचे होते. मोहने, मदीरे, नाहींग नाहीं आतां हें माझ्यानें सोसवत.

**मोहना**—बाईसाहेब, हें काय वेड्यासारखें करतां! मी खचित सांगतें वीरमणी कांहीं आपल्याला टाकून देणार नाहींत. असलें हें रत्न एकदां हातीं आलेलें कोण टाकील?

**मदीरा**—आणि टाकलें तर त्यांत टाकणाराचेंच नुकसान—तोच फुटक्या नशिबाचा. आपल्याला काय कमी आहे? हें रूप जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत त्याच्यासाठीं शेंकडों सवाई वीरमणी आपल्या पायांवर आपलें शौर्य, वैभव आणि जीवित आणून घालतील. जाऊं द्या कीं हे गेले तर.

**गुलाब**—व्हय, बाईसाब. मदीरा अक्षी खरं बोलली. आपनावानी रतन मिळतय कुट! कोन बी ईरमणीपून बी उमदा सरदार, न्हाइतर राजा आपलं परेम मिळावं म्हुन नाक घाशीत येईल. जाऊं द्यात की ईरमणी ग्येल तर!

**शृंगार०**—नाहींग नाहीं, तसें नाहीं. वीर-

**मोहना**—बाईसाहेब, आपण असें करूं लागलां तर त्याची बातमी आपल्याला कशी कळावी? तो पहा कसा गांगरून गेला आहे.

**शृंगार०**—काय करूंग? याचें हें तोंड पाहूनच माझी छाती धडधडूं लागली आहे. याला लाथाबुक्क्याखालीं तुडवावा असें माझ्या मनांत येतें. कायरे? ते खुशाल आहेतना? जयेंद्रपालाच्या कह्यांत सांपडले नाहींतना? हो ह्मण, आणि घे आपल्यावर हिरेमोत्यांचा पाऊस पाडून.

**जासूद**—ते सुखरूप आहेत हें मीं मघांशींच सांगितलें.

**शृंगार०**—तें मी विसरलें होतें. आणखी—

**जासूद**—जयेंद्रपालांचें व त्यांचें सख्य जुळलें.

**शृंगार०**—तुझ्या तोंडांत साखर पडो.

**जासूद**—आपला स्नेह तुटूं नये यासाठीं जयेंद्रपालांनीं एका प्रेमग्रंथीनें त्यांना बांधून टाकिलें आहे.

**शृंगार०**—तर मग ते आतां निर्धास्तच झाले ह्मणावयाचे. या सुवार्तेबद्दल ही राणी तुझी ऋणी आहे बरें. पण ते आतां इकडे कधीं येणार? खरें ह्मटलें ह्मणजे ते तुझ्या अगोदरच येऊन पोंचायला पाहिजे होते. मोहने, अग मोहने, सज्जावर जा आणि लांबवर नजर पोचवून बघ विजयगिरीकडून कोणी येतें आहे का. पण नको, माझ्या अगोदर तूं त्यांचें दर्शन काय ह्मणून घेणार? मीच जातें. [जाऊं लागते.

**जासूद**—पण बाईसाहेब!—

**शृंगार०**—(एकदम मागें येऊन.) अरेरेरे—त्या पणानें तुझ्या मागच्या साऱ्या साखरेंत विष कालविलें. 'पण'—हीं दोनच अक्षरें पण ती ऐकतांच मोठमोठ्या धीर पुरुषांचें काळीज देखील थरथर कांपूं लागतें. बाबा, आतां लांबण लावूं नको. काय अरिष्ट असेल तें एकदम सांगून हो मोकळा कसा.

**जासूद**—बाईसाहेब, माफ करा. वाईट बातमी सांगणारा ती ऐकणाराला त्या बातमीप्रमाणेंच दुःसह होतो.

**शृंगार०**—सांग, सांग अगोदर पटकन्. मी तुला कांहीं करणार नाहीं.

**जासूद**—राणीसाहेब, वीरमणी महाराजांचें जयेंद्रपालांच्या बहिणीशीं लग्न लागलें.

**शृंगार०**—अरेरे घुबडा! हे शब्द तोंडांतून काढतांना तुझी जीभ कशी नाहीं झडली! मेल्या, काळतोंड्या, चल निघ येथून.—पण कायरे, खरेंच का त्यांचें लग्न झालें? "नाहीं" ह्मण कीं तुला मागशील तें बक्षीस देईन. माझे वीरमणी अजून माझेच आहेत असें सांग कीं तुला सोन्यारुप्यांनीं मढवून काढते, सर्व जासुदांचा तुला नाईक करते,—हुं, ह्मण, ह्मण एकदां "नाहीं" ह्मणून.

**जासूद**—तसें कसें करूं बाईसाहेब? खोटें कसें बोलूं?

**शृंगार०**—आग लागो त्या तुझ्या खापरतोंडाला! मेल्या, राणीच्या सुखाकरितां खोटें बोलून नरकांत गेला असतास तर काय झालें असतें? या तुझ्या पा-

पामुळें या साऱ्या सिंधु देशांत जिकडेतिकडे ईश्वरी क्षोभ होऊन विखारी नागांनीं व रोगांनीं हा देश उध्वस्त पाडला असता तरी बेहेत्तर होतें. नीघ, नीघ माझ्या समोरून. नाहींतर तीं तुझ्या डोळ्यांतील बुबुळें या नखांनीं फाडून काढीन बघ. (त्याला मारते तो पळून जातो.) काय, त्यांनीं लग्न करावें अं ! पुरुष मेले तेवढे सारे बेइमानी, गायकसाई. मीच मूर्ख. त्यांच्यावर विश्वास कां ठेवला बरें. सर्वजयापेक्षां देखील मला ते अधिक आवडूं लागले होते. सर्वजयमहाराजांना मोहिनी घालण्यासाठीं मला कांहीं करावें लागलें नाहीं, नुसत्या दृष्टीनें सारें काम झालें. ते माझा मायापाश तोडून गेले तेव्हां मला फारसें वाईट वाटलें नाहीं. सहज मिळालेल्या वस्तूची किंमत तितपतच वाटते. पण या वीरमणींचें मन वश करून घेण्यासाठीं, देवा, मीं कितीरे खटपट केली. वार्धक्यामुळें चेहेऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्या लपवून तोंडावर तारुण्याची टवटवी दाखविण्यासाठीं रंगावर रंग चढवायचे, अंगाचा लवचिकपणा गेला नाहीं हें दाखविण्यासाठीं मुरडून आणि मुरकून आणि थैथै नाचून शरीराचे हाल हाल करून घ्यावयाचे, डोळ्यांतलें सुकलेलें तेज पुनः ताजें करण्यासाठीं निरंतर निशेच्या धुंदींत असावयाचें, वेळीं अवेळीं कामेच्छा मनांत नसतांही, त्यांचा काम जागृत ठेवण्यासाठीं नानाप्रकारच्या शृंगारचेष्टा करावयाच्या,—अशा एक कीं दोन हजारों तऱ्हांनीं मीं आपली विटंबना करून घेतली. मोहने, देवानें माझ्यावर चांगला सूड उगवला. सर्वजय महाराज स्वर्गांतून जर हें पाहत असतील तर त्यांच्याशीं केलेल्या बेइमानीपणाबद्दल मला झालेली ही शिक्षा पाहून त्यांना किती तरी आनंद होत असेल. छेः, पण माझें दुःख पाहून त्यांना कधींही आनंद होणार नाहीं. ते फारच कोंवळ्या, उदार व कनवाळू अंतःकरणाचे होते. मोहने, मदीरे, नाहींग नाहीं आतां हें माझ्यानें सोसवत.

**मोहना**—बाईसाहेब, हें काय वेड्यासारखें करतां ! मी खचित सांगतें वीरमणी कांहीं आपल्याला टाकून देणार नाहींत. असलें हें रत्न एकदां हातीं आलेलें कोण टाकील ?

**मदीरा**—आणि टाकलें तर त्यांत टाकणाराचेंच नुकसान—तोच फुटक्या नशिबाचा. आपल्याला काय कमी आहे ? हें रूप जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत त्याच्यासाठीं शेंकडों सवाई वीरमणी आपल्या पायांवर आपलें शौर्य, वैभव आणि जीवित आणून घालतील. जाऊं द्या कीं हे गेले तर.

**गुलाब**—व्हय, बाईसाब. मदीरा अक्षी खरं बोलली. आपनावानी रतन मिळतय कुट ! कोन बी ईरमणीपून बी उमदा सरदार, न्हाइतर राजा आपलं परेम मिळावं म्हुन नाक घाशीत येईल. जाऊं द्यात की ईरमणी ग्येल तर !

**शृंगार०**—नाहींग नाहीं, तसें नाहीं. वीर-

मणी नाहींत तर ही शृंगारसुंदरीही नाहीं. ते किती बेइमानी झाले तरी त्यामुळें त्यांच्या अंगच्या गुणांची किंमत कमी होत नाहीं. वीरमणीसारखा दुसरा पुरुष मिळणार नाहीं. या शृंगारसुंदरीच्या जिवाचे धनी होण्याला व तिच्या रूपाचें आणि गुणांचें चीज करण्याला लायख असा पुरुष तोच. छे:, ते मला कधींही टाकणार नाहींत असें माझी मनोविदता मला सांगतें आहे. गुलाब, जा त्या जासुदाकडे. आणि जयेंद्रपालाची बहीण रूपानें, गुणांनीं व आचरणानें कशी काय आहे हें नीट विचारून घेऊन ये. चला ग पोरींनो, आपल्या त्या बसंतमंदिराकडे जाऊं. इतक्यांतच निराश होण्याचें कारण नाहीं. माझ्या पाशांत मीं त्यांना चांगलें जखडलें आहे. त्यांनीं कोणाशींही लग्न लावलें तरी त्यांचें मन खचितच या शृंगारसुंदरीपाशीं आहे. असल्या तीव्र मनोवृत्तींच्या पुरुषांचें शरीर त्यांच्या मनामागें धांव थोडयाबहुत कालानें घ्यावयाचेंच.

[ जातात.

---

**प्रवेश २ रा.**—वाटेंतील छावणी.

**वीरमणी** पत्र वाचीत येतो.

**वीरमणी**—शेवटीं इतक्या पल्ल्याला गोष्ट येऊन पोंचलीना? सापाच्या पोराला थंडीच्या कडाक्यांतून उचलून आपल्या उराशीं उबेंत ठेवून दूध पाजून पोसल्याचा हा परिणाम गैरवाजवी झाला असें कोण ह्मणेल? खरोखरच या जगांत भरंवसा धरणें आणि सरळपणानें व इमानानें वागणें ह्मणजे परमेश्वराचे अपराधी होणें होयें. कारण अशाच मनुष्यावर त्याची नजर विशेषतः करडी दिसून येते. देवा, मी एक पापी झालों ह्मणून त्या बिचाऱ्या संग्रामसिंहानें तुझा कोणता अपराध केला होता! मी इकडे येतांना जयेंद्रपालाला सांगितलें कीं, संग्रामसिंह उच्छृंखल आहे त्याला संभाळ. फारच उत्तम संभाळ केला त्यानें! ( पत्र वाचीत. ) "आपण गेल्याबरोबर चार पांच दिवसांनीं संग्रामसिंहाला वाड्यांतलें बोलावणें आलें. त्याप्रमाणें तो गेला व पुनः घरीं परत आला नाहीं. आह्मीं पुष्कळ चवकशी केली, कांहीं थांग लागेना. शेवटीं आपल्या पत्नीची लहानपणची दाई चिमाइला गांठून तिला वश करून घेऊन बारीक चवकशी करावयाला सांगितलें. तिनें वाड्यांतील माणसांकडून पत्ता काढला त्यांत संग्रामसिंह यास "महानिद्रा" नांवाच्या तुरुंगांत अंधारकोठडींत ठेवल्याचें कळलें. तेव्हांच आमचें काळीज चरचरलें. पुढें हरप्रयत्न करून लबाडीनें त्या भयंकर तुरुंगांत प्रवेश केला. संग्रामसिंहजींची गांठ घेतली. त्यांनीं असें सांगितलें कीं, वाड्यांत गेल्याबरोबर जयेंद्रपालानें 'तुह्मीं आमच्या जिवाविरुद्ध कांहीं खटपट करतां आहां, तेव्हां चवकशी होईपर्यंत तुह्मांला अटकेंत राहिलें पाहिजे' असें त्यांस

सांगून आपल्या शिपायांकडून एकदम या तुरुंगांत आणून टाकलें. त्यांची त्यांच्या संबंधाच्या माणसांशीं गांठ देखील पडूं दिली नाहीं. तेथें त्यांना इतकें वाईट अन्न देऊं लागले कीं, त्यांच्यानें एक घासही खाववला नाहीं. पांच सहा दिवसांत अन्न किंवा पाण्याचा लेशही पोटांत गेलेला नव्हता. शक्ति क्षीण झाल्या होत्या. आणखी एक दोन दिवस तरी निघतील कीं नाहीं याची धास्ती होती. 'आह्मीं तुह्मांला येथून सोडविण्याची खटपट करतों; कसेंही करून तोंवर जीव धरून रहा' असें सांगून मी तुरुंगांतून बाहेर आलों. सुटकेची जय्यत तयारी केली व पुनः आंत प्रवेश करून चवकशी करतों तों ते आदले रात्रींच इहलोक सोडून परलोकीं गेल्याचें कळलें–" हरहर! कोण अधमाधम, कपटी, राक्षस हा! सर्वजयमहाराजांचा तो उदार, उल्हासी, स्नेहाळु स्वभाव कोणीकडे आणि याचा हा निर्दय राज्यलोभ कोणीकडे! (पुनः पत्र वाचूं लागतो.)

अहल्या मागें येते.

**अहल्या**–(आपल्याशीं) अगबाई, पुनः आज कांहीं तरी संतापण्यासारखी बातमी आली आहे वाटतें. सारें चित्त त्या पत्राकडे लागलें आहे. आतां बाई केवढ्यानें ओरडले. मला वाटलें काय झालें कोण जाणें. दररोज माझें पाऊल दाराबाहेर वाजण्याचा अवकाश कीं स्वारीची नजर गेलीच तिकडे. आज अगदीं जवळ येऊन उभी राहिलें आहें तरी दाद नाहीं. आपण तर मग आतां येथेंच उभे राहूं या. इकडे लक्ष येतें किंवा नाहीं हें तरी पाहूं. [त्याच्यामागें उभी राहते.

**वीर०**–छेः काय करूं? माझें डोकें कसें अगदीं भणभणून गेलें आहे. कांहीं विचार सुचत नाहीं. एकदां वाटतें कीं, माझ्या बिचाऱ्या संग्रामसिंहाच्या खुनाबद्दल सूड घ्यावा, पण लगेंच सर्वजयमहाराजांची मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते. त्यांच्या प्रत्यक्ष पुत्रावर हा हात चालवावा तरी कसा? अरेरे!–

**अहल्या**–(पुढें येऊन त्याच्या गळ्यांत हात घालून) काय? माझ्या दादावर हात चालवायचा? बोलतां तरी काय आपण हें?

**वीर०**–प्रिये, तूं आलीस का? अग, काय सांगूं तुला? काळ मोठा खडतर आला आहे. खरोखर, देवानें यापूर्वी माझे डोळे मिटले नाहींत यांत त्यानें माझा मोठा घात केला. असें कोणतें घोर पातक मीं केलें होतें कोण जाणे, कीं त्याच्या शिक्षेसाठीं त्यानें मला हे दिवस दाखविले.

**अहल्या**–पण असें झालें तरी काय?

**वीर०**–वाच हें ह्मणजे समजेल. (तिच्या हातीं पत्र देतो. ती वाचूं लागते.) याच हातांनीं ज्याला खेळविलें तेच हात आतां त्याच्यावर उगारण्याचा प्रसंग यावा ना! मी सिंधुदेश सोडून इकडे आलों नसतों तर फार बरें झालें असतें. माझा भाऊ संग्रामसिंह आपल्या नांवाप्रमाणें करणी

मणी नाहींत तर ही शृंगारसुंदरीही नाहीं. ते किती बेइमानी झाले तरी त्यामुळें त्यांच्या अंगच्या गुणांची किंमत कमी होत नाहीं. वीरमणीसारखा दुसरा पुरुष मिळणार नाहीं. या शृंगारसुंदरीच्या जिवाचे धनी होण्याला व तिच्या रूपाचें आणि गुणांचें चीज करण्याला लायख असा पुरुष तोच. छे:, ते मला कधींही टाकणार नाहींत असें माझी मनोवेदता मला सांगते आहे. गुलाब, जा त्या जासुदाकडे. आणि जयेंद्रपालाची बहीण रूपानें, गुणांनीं व आचरणानें कशी काय आहे हें नीट विचारून घेऊन ये. चला ग पोरींनो, आपल्या त्या बसंतमंदिराकडे जाऊं. इतक्यांतच निराश होण्याचें कारण नाहीं. माझ्या पाशांत मीं त्यांना चांगलें जखडलें आहे. त्यांनीं कोणाशींही लग्न लावलें तरी त्यांचें मन खचितच या शृंगारसुंदरीपाशीं आहे. असल्या तीव्र मनोवृत्तींच्या पुरुषांचें शरीर त्यांच्या मनामागें धांव थोड्याबहुत कालानें घ्यावयाचेंच.

[ जातात.

---

**प्रवेश २ रा.**—वाटेंतील छावणी.

**वीरमणी** पत्र वाचीत येतो.

**वीरमणी**—शेवटीं इतक्या पल्ल्याला गोष्ट येऊन पोंचलीना? सापाच्या पोराला थंडीच्या कडाक्यांतून उचलून आपल्या उराशीं उबेंत ठेवून दूध पाजून पोसल्याचा हा परिणाम गैरवाजवी झाला असें कोण ह्मणेल? खरोखरच या जगांत भरंवसा धरणें आणि सरळपणानें व इमानानें वागणें ह्मणजे परमेश्वराचे अपराधी होणें होयें. कारण अशाच मनुष्यावर त्याची नजर विशेषत: करडी दिसून येते. देवा, मी एक पापी झालों ह्मणून त्या बिचाऱ्या संग्रामसिंहानें तुझा कोणता अपराध केला होता! मी इकडे येतांना जयेंद्रपालाला सांगितलें कीं, संग्रामसिंह उच्छृंखल आहे त्याला संभाळ. फारच उत्तम संभाळ केला त्यानें! ( पत्र वाचीत. ) "आपण गेल्याबरोबर चार पांच दिवसांनीं संग्रामसिंहाला वाड्यांतलें बोलावणें आलें. त्याप्रमाणें तो गेला व पुन: घरीं परत आला नाहीं. आह्मीं पुष्कळ चवकशी केली, कांहीं थांग लागेना. शेवटीं आपल्या पत्नीची लहानपणची दाई चिमा इला गांठून तिला वश करून घेऊन बारीक चवकशी करावयाला सांगितलें. तिनें वाड्यांतील माणसांकडून पत्ता काढला त्यांत संग्रामसिंह यास "महानिद्रा" नांवाच्या तुरुंगांत अंधारकोठडींत ठेवल्याचें कळलें. तेव्हांच आमचें काळीज चरचरलें. पुढें हरप्रयत्न करून लबाडीनें त्या भयंकर तुरुंगांत प्रवेश केला. संग्रामसिंहजींची गांठ घेतली. त्यांनीं असें सांगितलें कीं, वाड्यांत गेल्याबरोबर जयेंद्रपालानें 'तुह्मीं आमच्या जिवाविरुद्ध कांहीं खटपट करतां आहां, तेव्हां चवकशी होईपर्यंत तुह्मांला अटकेंत राहिलें पाहिजे' असें त्यांस

सांगून आपल्या शिपायांकडून एकदम या तुरुंगांत आणून टाकलें. त्यांची त्यांच्या संबंधाच्या माणसांशीं गांठ देखील पडूं दिली नाहीं. तेथें त्यांना इतकें वाईट अन्न देऊं लागले कीं, त्यांच्यानें एक घासही खाववला नाहीं. पांच सहा दिवसांत अन्न किंवा पाण्याचा लेशही पोटांत गेलेला नव्हता. शक्ति क्षीण झाल्या होत्या. आणखी एक दोन दिवस तरी निघतील कीं नाहीं याची धास्ती होती. 'आह्मीं तुह्मांला येथून सोडविण्याची खटपट करतों; कसेंही करून तोंवर जीव धरून रहा' असें सांगून मी तुरुंगांतून बाहेर आलों. सुटकेची जय्यत तयारी केली व पुनः आंत प्रवेश करून चवकशी करतों तों ते आदले रात्रींच इहलोक सोडून परलोकीं गेल्याचें कळलें—" हरहर! कोण अधमाधम, कपटी, राक्षस हा! सर्वंजयमहाराजांचा तो उदार, उल्हासी, स्नेहालु स्वभाव कोणीकडे आणि याचा हा निर्दय राज्यलोभ कोणीकडे! ( पुनः पत्र वाचूं लागतो.)

अहल्या मागें येते.

**अहल्या**—(आपल्याशीं) अगबाई, पुनः आज कांहीं तरी संतापण्यासारखी बातमी आली आहे वाटतें. सारें चित्त त्या पत्राकडे लागलें आहे. आतां बाई केवढ्यानें ओरडले. मला वाटलें काय झालें कोण जाणें. दररोज माझें पाऊल दाराबाहेर वाजण्याचा अवकाश कीं स्वारीची नजर गेलीच तिकडे. आज अगदीं जवळ येऊन उभी राहिलें आहें तरी दाद नाहीं. आपण तर मग आतां येथेंच उभे राहूं या. इकडे लक्ष येतें किंवा नाहीं हें तरी पाहूं. [ त्याच्यामागें उभी राहते.

**वीर०**—छेः काय करूं? माझें डोकें कसें अगदीं भणभणून गेलें आहे. कांहीं विचार सुचत नाहीं. एकदां वाटतें कीं, माझ्या बिचाऱ्या संग्रामसिंहाच्या खुनाबद्दल सूड घ्यावा, पण लगेंच सर्वंजयमहाराजांची मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते. त्यांच्या प्रत्यक्ष पुत्रावर हा हात चालवावा तरी कसा? अरेरे!—

**अहल्या**—(पुढें येऊन त्याच्या गळ्यांत हात घालून) काय? माझ्या दादावर हात चालवायचा? बोलतां तरी काय आपण हें?

**वीर०**—प्रिये, तूं आलीस का? अग, काय सांगूं तुला? काळ मोठा खडतर आला आहे. खरोखर, देवानें यापूर्वीं माझे डोळे मिटले नाहींत यांत त्यानें माझा मोठा घात केला. असें कोणतें घोर पातक मीं केलें होतें कोण जाणे, कीं त्याच्या शिक्षेसाठीं त्यानें मला हे दिवस दाखविले.

**अहल्या**—पण असें झालें तरी काय?

**वीर०**—वाच हें ह्मणजे समजेल. ( तिच्या हातीं पत्र देतो. ती वाचूं लागते. ) याच हातांनीं ज्याला खेळविलें तेच हात आतां त्याच्यावर उगारण्याचा प्रसंग यावाना! मी सिंधुदेश सोडून इकडे आलों नसतों तर फार बरें झालें असतें. माझा भाऊ संग्रामसिंह आपल्या नांवाप्रमाणें करणी

करून रणांत प्रत्यक्ष जयेंद्रपालाच्या हातानें मेला असता तरी मला इतकें वाईट वाटलें नसतें. पण अशा क्रूरपणानें, निष्ठुरपणानें, कावेबाज दगलबाजीनें त्याचा जीव घ्यायची कल्पना. तरी याला कशी सुचली !

**अहल्या**—मला बाई हें खरें वाटत नाहीं.

**वीर०**—सर्वजयमहाराजांच्या मुलीनें असेंच ह्मणावें हें उचित. पण तूं भोळी आहेस. त्या तुझ्या भावाचें अंतःकरण किती काळें आहे, त्यांत किती भयंकर विचार भरले आहेत तें तुला काय समजणार ? आणि नाहीं समजले हेंच चांगलें. मी सांगतों हें नीट लक्ष देऊन ऐक. तुझ्या भावाला एका प्रचंड समंधानें घेरलें आहे. तो समंध हाच कीं अनियंत्रित राज्योपभोग घेण्याची हाव. त्याला आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाचें प्राबल्य मुळींच खपत नाहीं. माझा लौकिक व लोकांची माझ्यावरील भक्ति हीं तर त्याला विषाप्रमाणें दुःसह वाटतात. तेव्हां ज्यायोगें माझें पारडें खालीं बसेल अशा तऱ्हेचे त्याचे प्रयत्न कित्येक दिवस चालू आहेत. मी सिंधु देशांत असतां माझ्या मित्रांकडून मला वारंवार इषारे येत असत; पण मला वाटे माझा बाळासाहेब माझ्या उलट कधीं जावयाचा नाहीं. पण मी विजयगिरीला आल्यानंतर प्रत्यक्ष पुराव्यानिशीं माझ्या मित्रांनीं माझी खात्री करून दिली.

**अहल्या**—अगबाई, काय मी ऐकतें आहे हें ?

**वीर०**—अग एवढ्यानेंच काय झालें आहे. त्यानें आज कित्येक दिवस आडून आडून माझी निंदा चालविली आहे. उघडपणें माझी स्तुति केल्यासारखें दाखवून मध्येंच एखादा निंदेचा शब्द चुकून तोंडांत आल्यासारखें दाखवावयाचें; जीभ चावावयाची; मग ह्मणावयाचें "मी हें बोललों नाहीं, तुम्हीं हें ऐकलें नाहीं असें माना." दरबारांतील सरदारांची व मानकऱ्यांची मनें त्यानें माझ्याविरुद्ध वळविलीं आहेत.

**अहल्या**—छेः बाई, जें जें ऐकावें तें तें अघटितच. असें होईल तरी कसें ?

**वीर०**—तरी पण मीं विचार केला कीं, किती झालें तरी आपण वाढविलेला हा वृक्ष आपल्याच हातानें तोडणें रास्त नाहीं. त्या दिवशीं दरबारांत बोलणें निघालें तेव्हां तुझ्याशीं लग्न लावण्याचें वचन देऊन चुकलों पण त्यांतही त्याचा डाव होता असें मागून माझ्या नजरेस आलें. माझे स्नेही त्याच वेळीं मला सांगत होते कीं, तुह्मी एकदम वचन देऊं नका, दूरवर विचार करून मग काय करावयाचें तें करा. पण त्यावेळीं मला सुबुद्धि सुचली नाहीं. विनाश काळ आला ह्मणजे असेंच व्हावयाचें. मला या सर्व भानगडींत तुझ्याबद्दल काय तें वाईट वाटतें. कारण हा तंटा विकोपाला गेला तर त्यांत आह्मां दोघांपैकीं एक जमीनदोस्त होणारच. कोणीही झाला तरी त्यांत तुझ्या जिवाला दुःख आहेच.

**अहल्या**–माझें मेलें जळो! आम्हां बायकांना दुःखाचें, बाळकडूंच दिलेलें असतें. पण आपणा उभयतांपैकीं एकाच्याही जिवाला अपाय झालेला या डोळ्यांनीं पाहण्याचें नशिबीं यावेंना? आई जगदंबे, तुझ्यापुढें पदर पसरतें. हा तंटा विकोपाला जाऊं देऊं नको. या अबलेला यांचा हा तंटा मिटविण्याचें बल दे. इकडून माझें ह्मणणें इतकें तरी ऐकणें व्हावें. हा तंटा निदान इकडून तरी विकोपाला जाऊं देऊं नये. या पायांजवळ एवढें मागण्याचा माझा हक्क आहे. मी जातें दादाकडे आणि पाहतें त्याचें मन वळवून.

**वीर०**–अग, तूं मागितल्यावर मी काय देणार नाहीं? तूं खुशाल जा त्याच्याकडे. पहा प्रयत्न करून. हा तंटा सलोख्यानें मिटून, सर्वजयमहाराजांच्या बीजावर ही तलवार उपसण्याचा प्रसंग देवानें जर येऊं दिला नाहीं तर त्याची माझ्यावर केवढी कृपा होईल. मी आपलें मन आवरून धरीन. बाकी माझी मनोदेवता मला सांगते आहे कीं हा तंटा असा सामोपचारानें मिटावयाचा नाहीं.

**अहल्या**–इडापिडा झडो आणि अमंगळ टळो. असें अशुभ बोलणें कांहीं नीट नाहीं. इकडल्या लेखांनीं कांहीं लिहिलें असलें तरी दादा इतका नीच आणि दुष्ट असेल असें मला नाहीं वाटत. प्रत्यक्ष खात्री झाल्यावांचून मी तें खरें मानणार नाहीं; आणि इकडूनही मानणें होऊं नये असें माझें या चरणांपाशीं पदर पसरून मागणें आहे. माझा प्रयत्न थकलाच--पण नको बाई, तो विचारच नको मनांत आणायला. माते कुलस्वामिनी, या दोघांपैकीं एकाला यश दे असें मागण्याचा दुःसह प्रसंग माझ्यावर येऊं देऊं नको.–मग वचन आहेना?

**वीर०**–अग, मघांशींच तुला सांगितलेंना? हा तंटा वाढविण्याची मला मुळींच हौस नाहीं. हा जर गोडीगुलाबीनें मिटला तर त्यांत मला आनंदच आहे. पण मी अपमान मात्र सहन करून घेणार नाहीं. मी मानहीन झाल्यावर तुझा पति ह्मणवून घेण्यांत आज मला जितका अभिमान वाटतो आहे त्याच्या दसपट लाज वाटूं लागेल. यासाठीं जयेंद्रपालाला झालेला गर्व हरण होईल अशा बेताची मला आपल्या सैन्याची जय्यत तयारी करून ठेवणें जरूर आहे. पण हा वीरमणी जयेंद्रपालाचा–सर्वजयमहाराजांच्या वंशाचा–कधींही आपल्या खुषीनें द्वेषी होणार नाहीं याविषयीं आपल्या भावाची खात्री कर. जा आतां. कालभैरव वाटेंत तुझें रक्षण करून या कामीं तुला यश देवो.

**अहल्या**–( डोळ्यांत आंसवें आणून ) मी आतांच्या आतां निघतें. लग्न होऊन इतक्यांतच इकडच्या सुखसहवासाला मीं अंतरावें असें माझ्या नशिबीं देवानें लिहिलें होतेंना? एकनिष्ठपणें या पायांची निरंतर सेवा करावी या माझ्या निश्चयांत आतां व्यत्यय येणार. आ-

करून रणांत प्रत्यक्ष जयेंद्रपालाच्या हातानें मेला असता तरी मला इतकें वाईट वाटलें नसतें. पण अशा क्रूरपणानें, निष्ठुरपणानें, कावेबाज दगलबाजीनें त्याचा जीव घ्यायची कल्पना. तरी याला कशी सुचली !

**अहल्या**–मला बाई हें खरें वाटत नाहीं.

**वीर०**–सर्वजयमहाराजांच्या मुलीनें असेंच ह्मणावें हें उचित. पण तूं भोळी आहेस. त्या तुझ्या भावाचें अंतःकरण किती काळें आहे, त्यांत किती भयंकर विचार भरले आहेत तें तुला काय समजणार ? आणि नाहीं समजले हेंच चांगलें. मी सांगतों हें नीट लक्ष देऊन ऐक. तुझ्या भावाला एका प्रचंड समंधानें घेरलें आहे. तो समंध हाच कीं अनियंत्रित राज्योपभोग घेण्याची हाव. त्याला आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाचें प्राबल्य मुळींच खपत नाहीं. माझा लौकिक व लोकांची माझ्यावरील भक्ति हीं तर त्याला विषाप्रमाणें दुःसह वाटतात. तेव्हां ज्यायोगें माझें पारडें खालीं बसेल अशा तऱ्हेचे त्याचे प्रयत्न कित्येक दिवस चालू आहेत. मी सिंधु देशांत असतां माझ्या मित्रांकडून मला वारंवार इषारे येत असत; पण मला वाटे माझा बाळासाहेब माझ्या उलट कधीं जावयाचा नाहीं. पण मी विजयगिरीला आल्यानंतर प्रत्यक्ष पुराव्यानिशीं माझ्या मित्रांनीं माझी खात्री करून दिली.

**अहल्या**–अगबाई, काय मी ऐकतें आहे हें ?

**वीर०**–अग एवढ्यानेंच काय झालें आहे. त्यानें आज कित्येक दिवस आडून आडून माझी निंदा चालविली आहे. उघडपणें माझी स्तुति केल्यासारखें दाखवून मध्येंच एखादा निंदेचा शब्द चुकून तोंडांत आल्यासारखें दाखवावयाचें; जीभ चावावयाची; मग ह्मणावयाचें "मी हें बोललों नाहीं, तुम्हीं हें ऐकलें नाहीं असें माना." दरबारांतील सरदारांची व मानकऱ्यांची मनें त्यानें माझ्याविरुद्ध वळविलीं आहेत.

**अहल्या**–छेः बाई, जें जें ऐकावें तें तें अघटितच. असें होईल तरी कसें ?

**वीर०**–तरी पण मीं विचार केला कीं, किती झालें तरी आपण वाढविलेला हा वृक्ष आपल्याच हातानें तोडणें रास्त नाहीं. त्या दिवशीं दरबारांत बोलणें निघालें तेव्हां तुझ्याशीं लग्न लावण्याचें वचन देऊन चुकलों पण त्यांतही त्याचा डाव होता असें मागून माझ्या नजरेस आलें. माझे स्नेही त्याच वेळीं मला सांगत होते कीं, तुह्मी एकदम वचन देऊं नका, दूरवर विचार करून मग काय करावयाचें तें करा. पण त्यावेळीं मला सुबुद्धि सुचली नाहीं. विनाश काळ आला ह्मणजे असेंच व्हावयाचें. मला या सर्व भानगडींत तुझ्याबद्दल काय तें वाईट वाटतें. कारण हा तंटा विकोपाला गेला तर त्यांत आह्मां दोघांपैकीं एक जमीनदोस्त होणारच. कोणीही झाला तरी त्यांत तुझ्या जिवाला दुःख आहेच.

**अहल्या**–माझें मेलें जळो! आह्मां बायकांना दुःखाचें, बाळकडूंच दिलेलें असतें. पण आपणा उभयतांपैकीं एकाच्याही जिवाला अपाय झालेला या डोळ्यांनीं पाहण्याचें नशिबीं यावेंना ? आई जगदंबे, तुझ्यापुढें पदर पसरतें. हा तंटा विकोपाला जाऊं देऊं नको. या अबलेला यांचा हा तंटा मिटविण्याचें बळ दे. इकडून माझें ह्मणणें इतकें तरी ऐकणें व्हावें. हा तंटा निदान इकडून तरी विकोपाला जाऊं देऊं नये. या पायांजवळ एवढें मागण्याचा माझा हक्क आहे. मी जातें दादाकडे आणि पाहतें त्याचें मन वळवून.

**वीर०**–अग, तूं मागितल्यावर मी काय देणार नाहीं ? तूं खुशाल जा त्याच्याकडे. पहा प्रयत्न करून. हा तंटा सलोख्यानें मिटून, सर्वजयमहाराजांच्या बीजावर ही तलवार उपसण्याचा प्रसंग देवानें जर येऊं दिला नाहीं तर त्याची माझ्यावर केवढी कृपा होईल. मी आपलें मन आवरून धरीन. बाकी माझी मनोदेवता मला सांगते आहे कीं हा तंटा असा सामोपचारानें मिटावयाचा नाहीं.

**अहल्या**–इडापिडा झडो आणि अमंगळ टळो. असें अशुभ बोलणें कांहीं नीट नाहीं. इकडल्या लेखांनीं कांहीं लिहिलें असलें तरी दादा इतका नीच आणि दुष्ट असेल असें मला नाहीं वाटत. प्रत्यक्ष खात्री झाल्यावांचून मी तें खरें मानणार नाहीं; आणि इकडूनही मानणें होऊं नये असें माझें या चरणांपाशीं पदर पसरून मागणें आहे. माझा प्रयत्न थकलाच--पण नको बाई, तो विचारच नको मनांत आणायला. माते कुलस्वामिनी, या दोघांपैकीं एकाला यश दे असें मागण्याचा दुःसह प्रसंग माझ्यावर येऊं देऊं नको.–मग वचन आहेना ?

**वीर०**–अग, मघांशींच तुला सांगितलेंना ? हा तंटा वाढविण्याची मला मुळींच हौस नाहीं. हा जर गोडीगुलाबीनें मिटला तर त्यांत मला आनंदच आहे. पण मी अपमान मात्र सहन करून घेणार नाहीं. मी मानहीन झाल्यावर तुझा पति ह्मणवून घेण्यांत आज मला जितका अभिमान वाटतो आहे त्याच्या दसपट लाज वाटूं लागेल. यासाठीं जयेंद्रपालाला झालेला गर्व हरण होईल अशा बेताची मला आपल्या सैन्याची जय्यत तयारी करून ठेवणें जरूर आहे. पण हा वीरमणी जयेंद्रपालाचा–सर्वजयमहाराजांच्या वंशाचा–कधींही आपल्या खुषीनें द्वेषी होणार नाहीं याविषयीं आपल्या भावाची खात्री कर. जा आतां. कालभैरव वाटेंत तुझें रक्षण करून या कामीं तुला यश देवो.

**अहल्या**–( डोळ्यांत आंसवें आणून ) मी आतांच्या आतां निघतें. लग्न होऊन इतक्यांतच इकडच्या सुखसहवासाला मीं अंतरावें असें माझ्या नशिबीं देवानें लिहिलें होतेंना ? एकनिष्ठपणें या पायांची निरंतर सेवा करावी या माझ्या निश्चयांत आतां व्यत्यय येणार. आ-

जपासून पुनः हे पाय दृष्टीस पडत तोंपर्यंत अन्नाला शिवणार नाहीं. सारखी जगदंबेची प्रार्थना करीत राहीन. काय अघटित प्रसंग हा! इकडे जिवाला अगर कीर्तीला अपाय होऊं नये ह्मणून देवाची प्रार्थना करावी, तर त्यांतच माझ्या भावाच्या जिवाला आणि कीर्तीला धोका दे असें मागितल्याप्रमाणें होणार. नको, नको, मातोश्री, दोघांनाही सुखी ठेव. त्याबद्दल पाहिजे असल्यास माझ्या या जिवाचा बळी घे. येतें आतां मी.

[ त्याच्या पायावर डोकें ठेवते.

**वीर०**—( तिला उचलून पोटाशीं धरून ) छेः छेः! हें काय? तुझी जागा या येथें आहे. तूं काळजी करूं नको. तुझ्यासारख्या पतिव्रतेचें गाऱ्हाणें देव खचित ऐकेल. कांहीं झालें तरी आपलें धैर्य सोडूं नको. दोघांवर तुझें प्रेम आहे खरें; पण त्यांत चूक कोणाकडे आहे हें पूर्ण विचारानें ठरीव, आणि मग अपराध्यावरच्या आपल्या प्रेमाला हृदयांतून हुसकून दे. आणि हें पहा, माझें नांव अगोदरच कानफाट्या पडलें आहे. त्यांत तूं माझ्या शत्रूंच्या गोटांत अडकून पडणार. तेव्हां इतकेंच सांगतों कीं माझ्यासंबंधानें नाना प्रकारच्या कंड्या दर वाऱ्याच्या झुळुकेबरोबर तुझ्या कानीं येतील. येतील का पाडतील. त्या साऱ्यावरच भरंवसा ठेवूं नको. नको, नको, डोळ्यांत पाणी आणूं. तुला दुःख देण्याइतकी या वीरमणीची योग्यता नाहीं. जा आतां संभाळून. वरचेवर तिकडचा समाचार मला जासूद पाठवून कळवीत जा. या वीरमणीची तूं धर्मपत्नी आहेस हें ध्यानांत धरून त्याप्रमाणें त्या जयेंद्रपालाजवळ वाग. ये आतां. कोण आहेरे बाहेर?

**अधीरसिंग** येतो.

अधीरसिंग, यांना आतांच्याआतां निघावयाचें आहे. बरोबर दोनशें खासपागेंतील स्वार, शिवाय वाजवी चाकरमाणसें व दोन मानकरी अशी मंडळी द्या. चला. ताबडतोब तयारी करा.

**अहल्या**—इतकी मंडळी बरोबर नको. कारण विजयगिरी झपाट्यानें गाठली पाहिजे.

**वीर०**—बरें तर, जशी तुझी मर्जी. अधीरसिंग, पन्नास स्वार आणि बाकीची मंडळी आतां सांगितली त्याप्रमाणें जा लवकर. तयारी करून मेणा तयार असल्याची वर्दी द्यायला किती लवकर येतां बघूं.

[ **अधीरसिंग** जातो.

हें काय हें, वेडे? पुस ते अश्रु. देवांच्या पायां पड आणि नीघ.

[ **अहल्या** जाते.

हिला यश येईल काय? छेः; नांव कशाला! पण हा एक उपाय करायचा राहिला अशी रुखरुख नको. हा जयेंद्रपाल इतका राक्षसी स्वभावाचा निघावाना? अरे, पण या पत्रांत 'ताजाकलम' आहे. ( वाचतो. ) काय? "'माझा ज्यानें असा घात

केला. त्या सापाचा कधींही विश्वास धरूं नका. आपलें भोळें मन या प्रसंगीं निष्ठुर करा. आणि माझ्या खुनाबद्दल सूड घ्या. ' असे आपल्या भावाचे शेवटचे शब्द होते हें मला तुरुंगांतील एका वश करून घेतलेल्या शिपायाकडून कळलें. त्यानेंच मला सांगितलें कीं, संग्रामसिंहानें मरतांना सारखा आपल्या नांवाचा जप चालविला होता." हरहर ! केवढें हें संग्रामसिंहाचें माझ्यावर प्रेम ! या प्रेमासाठींच त्याच्या जिवावर धाड आली. ठीक आहे. या वीरमणीला यापुढें आपला स्वभाव विसरला पाहिजे. सर्वजयमहाराज, माझ्या कृत्याबद्दल मला क्षमा करोत. जयेंद्रपाला, संभाळ आतां. हा सिंह वृद्ध झाला असला तरी आपलें शील विसरला नाहीं. तूं याला बुद्धिपुरःसर दुष्ट हेतूनें डिंवचलें आहेस. यासाठीं रागाच्या आवेशांत याच्या हातून जें कांहीं होईल त्याचें पाप तुझ्या डोक्यावर. बस्स. यापुढें सारा सुडाचा विचार ! पण अगोदर त्या सामुद्रिकबोवांची गांठ घेऊन माझे ग्रह कसे काय आहेत हें विचारून घेऊं.

[ जातो.

### प्रवेश ३ रा.–शृंगारसुंदरीचा महाल.

शृंगारसुंदरी, मोहना, मदीरा, गुलाब.

**शृंगार०**–खरेंच का गुलाब ? तिचें वय सतरा अठरा वर्षांचें आहे !

**गुलाब**–व्हय बाईसाब. त्या जासुदानं यांबद्दल अक्षी खात्रीनं सांगितलं.

**मोहना**–तर मग बाईसाहेब, मी सांगूं का आपल्याला एक भविष्य ?

**शृंगार०**–कायग तें ?

**मोहना**–वीरमणीमहाराज थोडक्याच दिवसांत येऊन या लाडक्या पायावर लोटांगण घालून आपली क्षमा मागणार.

**शृंगार०**–तूं हें कशावरून ह्मणतेस ?

**मोहना**–त्यांत काय आहे ! आपल्या या मोहक रूपाकडे आणि आपल्या हजारों मदनमहाराजांच्या सेवेंत दक्ष असणाऱ्या गुणांकडे पाहिल्यावर कोणीही असेंच भविष्य करील.

**शृंगार०**–चल, चावट कोठली ? कांहीं तोंडदेखलें बोलते आहेस झालें. अग, आतां मी ह्मणजे सुकलेलें पान. ती आहे ताजी मदनमंजरी.

**गुलाब**–पन बाईसाब, पिकलेल्या आन्‌-जून पानांत जी गोडी असते ती नवतीच्या पानांत न्हाई. पहिल्यांतल्या मुरलेल्या रसापुढं नवतींतल्या अपक्व रसाची काय चव !

**मदीरा**–जुना मुरंबा जितका मधुर आणि गुणकारी असतो तितका ताजा नसतो.

**शृंगार०**–तुह्मीं सगळीं खुशामती आहां !

**मोहना**–बाईसाहेब, गरीब दासीला माफी असावी. पण आपल्या मनांत आमचें ह्मणणें ठसलें. ते पहा आपले गालच साक्ष देत आहेत.

**शृंगार०**–पुरे पुरे आतां ! पण गुलाब, आणखी तो जासूद काय सांगत होता ?

**गुलाब**–त्यो ह्मंगाला: "म्हाराजांचं नवं कुटुंब दिसन्यांत जरी खुबसुरत हाय,

जपासून पुनः हे पाय दृष्टीस पडत तोंपर्यंत अन्नाला शिवणार नाहीं. सारखी जगदंबेची प्रार्थना करीत राहीन. काय अघटित प्रसंग हा! इकडे जिवाला अगर कीर्तीला अपाय होऊं नये ह्मणून देवाची प्रार्थना करावी, तर त्यांतच माझ्या भावाच्या जिवाला आणि कीर्तीला धोका दे असें मागितल्याप्रमाणें होणार. नको, नको, मातोश्री, दोघांनाही सुखी ठेव. त्याबद्दल पाहिजे असल्यास माझ्या या जिवाचा बळी घे. येतें आतां मी.

[ त्याच्या पायावर डोकें ठेवते.

**वीर०**—( तिला उचलून पोटाशीं धरून ) छेः छेः! हें काय? तुझी जागा या येथें आहे. तूं काळजी करूं नको. तुझ्यासारख्या पतिव्रतेचें गाऱ्हाणें देव खचित ऐकेल. कांहीं झालें तरी आपलें धैर्य सोडूं नको. दोघांवर तुझें प्रेम आहे खरें; पण त्यांत चूक कोणाकडे आहे हें पूर्ण विचारानें ठरीव, आणि मग अपराध्यावरच्या आपल्या प्रेमाला हृदयांतून हुसकून दे. आणि हें पहा, माझें नांव अगोदरच कानफाट्या पडलें आहे. त्यांत तूं माझ्या शत्रूंच्या गोटांत अडकून पडणार. तेव्हां इतकेंच सांगतों कीं माझ्यासंबंधानें नाना प्रकारच्या कंड्या दर वाऱ्याच्या झुळुकेबरोबर तुझ्या कानीं येतील. येतील का पाडतील. त्या साऱ्यावरच भरंवसा ठेवूं नको. नको, नको, डोळ्यांत पाणी आणूं. तुला दुःख देण्याइतकी या वीरमणीची योग्यता नाहीं. जा आतां संभाळून. वरचेवर तिकडचा समाचार मला जासूद पाठवून कळवीत जा. या वीरमणीची तूं धर्मपत्नी आहेस हें ध्यानांत धरून त्याप्रमाणें त्या जयेंद्रपाळाजवळ वाग. ये आतां. कोण आहेरे बाहेर?

**अधीरसिंग** येतो.

अधीरसिंग, यांना आतांच्याआतां निघावयाचें आहे. बरोबर दोनशें खासपागेंतील स्वार, शिवाय वाजवी चाकरमाणसें व दोन मानकरी अशी मंडळी द्या. चला. ताबडतोब तयारी करा.

**अहल्या**—इतकी मंडळी बरोबर नको. कारण विजयगिरी झपाट्यानें गाठली पाहिजे.

**वीर०**—बरें तर, जशी तुझी मर्जी. अधीरसिंग, पन्नास स्वार आणि बाकीची मंडळी आतां सांगितली त्याप्रमाणें जा लवकर. तयारी करून मेणा तयार असल्याची वर्दी द्यायला किती लवकर येतां बघूं.

[ **अधीरसिंग** जातो.

हें काय हें, वेडे? पुस ते अश्रु. देवांच्या पायां पड आणि नीघ.

[ **अहल्या** जाते.

हिला यश येईल काय? छेः; नांव कशाला! पण हा एक उपाय करायचा राहिला अशी रुखरुख नको. हा जयेंद्रपाळ इतका राक्षसी स्वभावाचा निघावाना? अरे, पण या पत्रांत 'ताजाकलम' आहे. ( वाचतो. ) काय? "'माझा ज्यानें असा घात

केला. त्या सापाचा कधींही विश्वास धरूं नका. आपलें भोळें मन या प्रसंगीं निष्ठुर करा. आणि माझ्या खुनाबद्दल सूड घ्या.' असे आपल्या भावाचे शेवटचे शब्द होते हें मला तुरुंगांतील एका वश करून घेतलेल्या शिपायाकडून कळलें. त्यानेंच मला सांगितलें कीं, संग्रामसिंहानें मरतांना सारखा आपल्या नांवाचा जप चालविला होता." हरहर! केवढें हें संग्रामसिंहाचें माझ्यावर प्रेम! या प्रेमासाठींच त्याच्या जिवावर धाड आली. ठीक आहे. या वीरमणीला यापुढें आपला स्वभाव विसरला पाहिजे. सर्वजयमहाराज, माझ्या कृत्याबद्दल मला क्षमा करोत. जयेंद्रपाला, संभाळ आतां. हा सिंह वृद्ध झाला असला तरी आपलें शील विसरला नाहीं. तूं याला बुद्धिपुरःसर दुष्ट हेतूनें डिंवचलें आहेस. यासाठीं रागाच्या आवेशांत याच्या हातून जें कांहीं होईल त्याचें पाप तुझ्या डोक्यावर. बस्स. यापुढें सारा सुडाचा विचार! पण अगोदर त्या सामुद्रिकबोवांची गांठ घेऊन माझे ग्रह कसे काय आहेत हें विचारून घेऊं.

[जातो.

---

**प्रवेश ३ रा.—शृंगारसुंदरीचा** महाल.

शृंगारसुंदरी, मोहना, मदीरा, गुलाब.

**शृंगार०**—खरेंच का गुलाब? तिचें वय सतरा अठरा वर्षांचें आहे!

**गुलाब**—व्हय बाईसाब. त्या जासुदानं यांबद्दल अक्षी खात्रीनं सांगितलं.

**मोहना**—तर मग बाईसाहेब, मी सांगूं का आपल्याला एक भविष्य?

**शृंगार०**—कायग तें?

**मोहना**—वीरमणीमहाराज थोडक्याच दिवसांत येऊन या लाडक्या पायावर लोटांगण घालून आपली क्षमा मागणार.

**शृंगार०**—तूं हें कशावरून ह्मणतेस?

**मोहना**—त्यांत काय आहे! आपल्या या मोहक रूपाकडे आणि आपल्या हजारों मदनमहाराजांच्या सेवेंत दक्ष असणाऱ्या गुणांकडे पाहिल्यावर कोणीही असेंच भविष्य करील.

**शृंगार०**—चल, चावट कोठली? कांहीं तोंडदेखलें बोलते आहेस झालें. अग, आतां मी ह्मणजे सुकलेलें पान. ती आहे ताजी मदनमंजरी.

**गुलाब**—पन बाईसाब, पिकलेल्या आन् जून पानांत जी गोडी असते ती नवतीच्या पानांत न्हाई. पहिल्यांतल्या मुरलेल्या रसापुढं नवतींतल्या अपक्क रसाची काय चव!

**मदीरा**—जुना मुरंबा जितका मधुर आणि गुणकारी असतो तितका ताजा नसतो.

**शृंगार०**—तुह्मीं सगळीं खुशामती आहां!

**मोहना**—बाईसाहेब, गरीब दासीला माफी असावी. पण आपल्या मनांत आमचें ह्मणणें ठसलें. ते पहा आपले गालच साक्ष देत आहेत.

**शृंगार०**—पुरे पुरे आतां! पण गुलाब, आणखी तो जासूद काय सांगत होता?

**गुलाब**—त्यो ह्मंगाला: "म्हाराजांचं नवं कुटुंब दिसन्यांत जरी खुबसुरत हाय,

तरी ह्मारजांचं मन काय त्येंच्यावर बसायचं न्हाई. त्येंच्यांत पोक्तपना लई भरला हाय. ह्माराजांना हम्मेशा चटकदारपना व्होवा. ती बया लई थंड आन् तिच्या कपाळाला हम्मेशा आठ्याच असतात. ह्माराजांना तर अक्षी आनंद आणि गम्मत व्होवी."

**शृंगार०**–खेरंच का तो असें सांगत होता? पण हे जासूद ह्मणजे अडाणी गडी; त्यांना काय इतकें बारीक पाहतां येणार?

**मोहना**–असें नका ह्मणूं बाईसाहेब. किती झालें तरी तो आपल्या पदरचा आहे. आपल्या सेवेंत ज्यानें एक दिवस काढला, त्याच्यांत अडाणीपणा कोठून येणार?

**मदीरा**–आणि तो तर जासूद साऱ्या जासुदांत हुशार. सामुद्रिकबोवांनीं जातांना त्याला मुद्दाम निवडून बरोबर नेलें होतें. त्याच्या तोडीचा चाणाक्ष इसम या सिंधुदेशांत एक तरी सांपडेल का?

**शृंगार०**–खेरंच, ही हकिकत ऐकल्यापासून माझें मन आनंदसागरांत पोहूं लागलें आहे. मनांत आशा उत्पन्न होऊन तें अगदीं अस्वस्थ झालें आहे.

**मदीरा**–बाईसाहेब, मला एक सुचवायचें आहे.

**शृंगार०**–काय तें?

**मदीरा**–मला वाटतें, आपली व महाराजांची गांठ पडली तर ते खचित आपल्याबरोबर सिंधुदेशाला परत येतील.

**शृंगार०**–कशावरून ह्मणतेस तूं हें?

**मदीरा**–ते आपली वरचेवर आठवण काढीत असतात. आपल्या जवळच्या माणसांजवळ बोलतांना "सिंधुदेशांत आपले दिवस किती सुखांत गेले. पुनः तें सिंधुनगर पहावयाला सांपडेल काय?" असें ह्मणून सुस्कारे टाकतात.

**शृंगार०**–तुला ग हें कसें कळलें?

**मदीरा**–मला पत्र–(जीभ चावून) नाहीं, मला होय–हो मला–मला–त्या जासुदाकडून कळलें.

**मोहना**–अहाग चोरटे, सांगेनास आतां काय खरें आहे तें.

**मदीरा**–मोहने, पहा हं. बाईसाहेबांसमोर भलती चेष्टा करूं नकोस. कांहीं तरी मेला आपला चावटपणा करायचा.

**मोहना**–नाहींग तुला आलें त्या अधीरसिंगाचें पत्र?

**गुलाब**–अन् मी त्या जासुदाला इचारायला ग्येलों तवा न्हवतं का तुझ्या हातांत पतर. आन् त्येला 'चूप' ह्मणून कशी बिजलीवानी पळालीस!

**शृंगार०**–मदीरे, बरीच कींग आहेस तूं!

**मदीरा**–(मान खालीं घालून) बाईसाहेब, माफ करा.

**शृंगार०**–अग, त्यांत काय आहे? जशी धनीण तशी दासी; पण त्या पत्रांत आणखी काय होतें?

**मदीरा**–आणखी कांहीं नाहीं बाईसाहेब. मीं सांगितलें इतकेंच.

**शृंगार०**–कसें करावें बरें? सारा मेला मान एका बाजूला ठेवून त्या सवतीचा तो थाट बघायला तेथें जावें? छेः; नको तो अपमान.

**मोहना**—बाईसाहेब, दूर राहून मान संभाळणें बरें, कीं मानापमान बाजूला ठेवून आपल्या प्रियाचा समागम साधणें बरें?

**शृंगार०**—हें काय विचारतेस? अग नुसत्या मानाला घेऊन काय करायचें आहे. त्यानें का ही अंगाची आग विझणार?

**गुलाब**—तर मग बाईसाब, आमी म्हंतो जावं हें लई बेस.

**मदीरा**—ऐका गुलामाचें बोलणें. 'आमी म्हंतो' ह्मणे! पण खरेंच बाईसाहेब, मलाही तसेंच वाटतें.

**मोहना**—हो, तुला वाटेल तर काय झालें? आपलें कामांत काम.

**शृंगार०**—बरें तर, तयारी करा. सामुद्रिकबोवांचें इतक्यांत कांहीं पत्र येईलच. कालीमाते, माझा प्रियकर मला लवकर भेटून तो जर पुनः पूर्वीप्रमाणें माझा होईल तर तुझ्या देवळावर सोन्याचा कळस बसवीन. [ जातात.

---

## प्रवेश ४ था

विजयगिरी-**जयेंद्रपाला**चा वाडा.

**जयेंद्रपाल, यादवराव, प्रतापसिंह.**

**जयेंद्रपाल**—का, झाली तुमची खात्री? यावर तुमचें काय ह्मणणें?

**यादव०**—सरकार, माफ करा. लोकांत बोलवा होती ती मीं आपल्या कानावर घातली. एकूण हा संग्रामसिंह इतका खटपटी होताना? बरें झालें. गुलामाला चांगलें प्रायश्चित्त मिळालें. काय चोराचा कावा? डांगांत जाऊन भिल्लोकांचें साहाय्य घेऊन आपल्यावर स्वारी करावयाची आं! पण कसा लेक आपल्याच सापळ्यांत सांपडला! सरकार, मला वाटतें या गोष्टी लोकांत प्रसिद्ध कराव्या.

**प्रताप०**—हो, आमचेंही मत असेंच आहे. या गोष्टी लोकांत प्रसिद्ध केल्या ह्मणजे बोभाटा होईल.

**जयेंद्र०**-एवढें मात्र मला सांगूं नका. कारण सर्व खऱ्या गोष्टी लोकांत प्रसिद्ध करावयाच्या ह्मणजे त्यांत काकासाहेबांचें अंग किती होतें हें सांगितलें पाहिजे, आणि तें आपल्या हातून कधींच व्हावयाचें नाहीं.

**यादव०**—खरेंच, वीरमणींच्या हातून हा मोठाच अपराध झाला आहे. त्यांचें पारिपत्य करावें तर आपल्या ताईसाहेबांच्या जिवाला दुःख होणार.

**जयेंद्र०**—अहो, तेंच तर माझ्या जिवाला रात्रंदिवस डाचतें आहे.

**प्रताप०**—आणि विचार करून करून आह्मांलाही पण झोंप येत नाहीं, सरकार.

**यादव०**—वीरमणींचें अंतःकरण इतकें वाईट झालें असेल असें आपल्या ध्यानीं-मनींही नव्हतें.

**जयेंद्र०**—अहो, हा त्यांचा दोष नव्हे. त्या कवटाळणीनें वीरमणींचें सारें सत्व हरण केलें आहे. तिच्या नादानें यांनीं त्या सिंधुनगरांत काय काय थेर केले ते तुह्मीं ऐकले तर तुह्मांला फार वाईट वाटेल. आजपर्यंत मीं याबद्दल तुमच्याजवळ एक अवाक्षर काढलें नाहीं. का-

रण आपलेच दांत आणि आपलेच ओंठ.

**प्रताप०**–सरकारांना असें वाटतें हें रास्तच. सरकारांचें अंतःकरण तसेंच चिवचिवीत आहे.

**यादव०**–काय ह्मणतां ? त्या सिंधुदेशच्या नागिणीचा दंश इतका का त्यांना बाधला?

**जयेंद्र०**–मीं मागें आपल्याला कांहीं कांहीं हलकट वर्तनाचे प्रकार सांगितलेच होते. पण त्यांचे थेर त्याहून फाजील होते. दिवसाढवळ्या राजवाड्यापुढें मैदानांत एक रत्नजडित सिंहासन मांडून त्यावर त्या शृंगारसुंदरीला आपल्या मांडीवर घेऊन बसले. सर्व सरदार मानकऱ्यांना बोलावून त्यांचे मुजरे घेतले. इकडे भालदार चोपदार पुकारीत आहेत, इकडे हुजरे दारूचे पेल्यावर पेले भरून देत आहेत, अशा थाटांत त्यांनीं आपल्याला "राजाधिराज" ही पदवी घेतली; तिला आपली पट्टराणी करून ठेविली; भोंवतालचीं जिंकलेलीं राज्यें सर्व तिच्या ताब्यांत दिलीं. गांवांतून मिरवणुकी काय काढल्या ! एखादे दिवशीं तिला इंद्राणीच्या थाटानें सजवून आपण इंद्र बनून हत्तीवरून झुलत जावयाचें, एखादे वेळीं तिला अष्टभुजा देवी करून आपण तिचे पुजारी बनून गांवांतून मिरवावयाचें; घरोघरच्या बायकांनीं तिला आरती ओंवाळावयाची, व यांनीं प्रसाद वाटावयाचे; असे एक का दोन–अनेक प्रकार त्यांनीं केले,

**यादव०**–अगदींच बहकल्यांतला हा प्रकार. मग सरकार आपण आपली बहीण त्यांना दिली कशी ?

**जयेंद्र०**–काय करूं ? त्यावेळीं तुमचा आग्रह फार पडला. तुह्मींच नाहीं ह्मणालां कीं, यायोगें त्यांची प्रकृति ताळ्यावर येईल ह्मणून. मला तें सयुक्तिक वाटलें. माझ्यासारख्या पोरानें आपल्यासारख्या पोक्त मसलतगारांची सल्ला ऐकूं नये तर काय करावें ? देवा, ताईला तरी सुखी राख, नाहीं तर तिचा गळा मीं कापला असें होईल !

**प्रताप०**–छे, सरकार. हें काय भलतेंच बोलणें ? आपल्याकडे कसला दोष ?

**जयेंद्र०**–अरे, पण ही बाहेर गडबड कसली ? कोण आहे तेथें, बलदेव ?

*अहल्या प्रवासाच्या पोषाखानें गडबडीनें आंत येते व एकदम जयेंद्रपालाच्या पायावर डोकें ठेवते.*

कोण ताई ? अग, तूं केव्हां आलीस ? आणि कशी आलीस ? वीरमणी कोठें आहेत ? आणि तूं अशी गहिंवरलेली कां ? हे तुझे डोळे पाण्यानें भरून आले आहेत. अग, तुला झालें काय सांग तर खरें. काकासाहेबांनीं कांहीं तुझा अपमान केला कीं काय ? मला वाटतें त्यांनीं कांहीं खुसपट काढून तुला हाकून दिली असावी. सांग, सांग बाळ, लवकर काय आहे तें. उगी, रडूं नको.

**अहल्या**–दादा, कायरे हा प्रसंग आणलास मजवर ? [ पुनः रडूं लागते.

**जयेंद्र०**–ताई, असा कोणता प्रसंग तुझ्यावर आला ? कोणीं आणला ? मीं ? असें

कसें होईल ? बोल, बोल जलदी. तुझ्या बोलण्यावरून तुला कोणीं तरी चांगलें फसविलें आहे असें दिसतें. तुझ्या भोळेपणाचा कोण्या तरी दगलबाज मनुष्यानें चांगलाच फायदा घेतला आहे. ठीक आहे. पहातों त्या चोराचा समाचार बरें.

**अहल्या**—दादा, हें तुझें बोलणेंच सांगतें आहे तूं कसा माझ्या दुःखाला कारण झाला आहेस तो. मघांशीं त्यांनीं मला हाकलून दिलें असावें असें ह्मटलेंस. आतां त्यांना कपटी आणि दगलबाज हीं निंद्य नावें दिलींस. दादा, असा तिकडून तुझा कोणता अपराध झाला आहे ? कां त्यांच्यावर तुझा इतका राग ?

**जयेंद्र०**—अग, माझ्या रागाचें कारण विचारतेस ? खरोखरच तूं भाबडी भोळी आहेस. हेंच पहाना त्यानें तुला कसें पाठविलें तें. या राज्याचे ते व मी दोघे आधारस्तंभ. त्यांपैकीं एकाची तूं पत्नी व दुसऱ्याची आवडती व एकुलती एक बहीण. तेव्हां तुझें येणें मोठ्या थाटानें व्हावयाला पाहिजे होतें, तुझा परिवार ह्मणजे एक सैन्य पाहिजे होतें, तुझ्या बरोबरच्या घोड्यांचा खिंकाळा दहा वीस कोस पुढें ऐकूं यावयाला पाहिजे होता, त्याच्या दौडीच्या योगें उडालेल्या धुळीनें आकाश सारें व्यापून जाऊन सूर्याचें खग्रास ग्रहण व्हावयाला पाहिजे होतें, रस्त्यानें तुझा थाट पहाण्यास उत्सुक झालेल्या लोकांची कित्येक तास पूर्वीं गर्दी होऊन राहिली पाहिजे होती.—पण पहावें तों तूं एकाद्या कुणबटाच्या बायकोप्रमाणें सडी, बरोबर इतमाम वगैरे कांहीं न घेतां आलीस याला काय ह्मणावें ? वीरमणीनें माझा दुसरा कोणताही अपराध केला नसला तरी हा अपमान मी कधींही सहन करणार नाहीं.

**प्रताप०**—सरकार ह्मणतात तें अगदीं यथायोग्य आहे. हा अपमान अगदीं दुःसह आहे व तो त्यांनीं कधींही सहन करूं नये. वीरमणी ह्मणजे असा कोणता पदार्थ आहे !

**अहल्या**—मी सांगतें ते कोण आहेत ते! सर्वजयमहाराजांच्या पूर्ण प्रीतींतले सरदार, त्यांच्याचप्रमाणें शौर्यानें व गुणांनीं शोभणारे, ज्यांच्या कपाळाच्या एका आठीनें सारें जग थरथर कापतें, ज्यांनीं नुसतें फूः केलें कीं आपल्यासारख्या हजारों मुरकुटांची चांदी उडते—असे ते आहेत. आणि ते माझे—ह्मणजे जयेंद्रपालाच्या बहिणीचे पती आहेत समजलां ! दादा, हेच का तुझे मसलतगार ?

**जयेंद्र०**—ताई, माफ कर त्यांना. त्यांची माझ्यावर भक्ति आहे व तुझ्यावरही त्यांचें प्रेम आहे, त्यामुळें त्यांना हा अपमान न सोसून त्यांच्या तोंडून अधिकउणा शब्द गेला. प्रतापराव, तुह्मी असें बोललां हें रास्त नाहीं.

**प्रताप०**—जी, सरकार. ता–ताईसाहेब, मा-माफ करा. वीरमणी श्रे-श्रेष्ठ आहेत.

रण आपलेच दांत आणि आपलेच ओंठ.

**प्रताप०**–सरकारांना असें वाटतें हें रास्तच. सरकारांचें अंतःकरण तसेंच चिवचिवीत आहे.

**यादव०**–काय ह्मणतां ? त्या सिंधुदेशच्या नागिणीचा दंश इतका का त्यांना बाधला?

**जयेंद्र०**–मीं मागें आपल्याला कांहीं कांहीं हलकट वर्तनाचे प्रकार सांगितलेच होते. पण त्यांचे थेर त्याहून फाजील होते. दिवसाढवळ्या राजवाड्यापुढें मैदानांत एक रत्नजडित सिंहासन मांडून त्यावर त्या शृंगारसुंदरीला आपल्या मांडीवर घेऊन बसले. सर्व सरदार मानकऱ्यांना बोलावून त्यांचे मुजरे घेतले. इकडे भालदार चोपदार पुकारीत आहेत, इकडे हुजरे दारूचे पेल्यावर पेले भरून देत आहेत, अशा थाटांत त्यांनीं आपल्याला "राजाधिराज" ही पदवी घेतली; तिला आपली पट्टराणी करून ठेविली; भोंवतालचीं जिंकलेलीं राज्यें सर्व तिच्या ताब्यांत दिलीं. गांवांतून मिरवणुकी काय काढल्या ! एखादे दिवशीं तिला इंद्राणीच्या थाटानें सजवून आपण इंद्र बनून हत्तीवरून झुलत जावयाचें, एखादे वेळीं तिला अष्टभुजा देवी करून आपण तिचे पुजारी बनून गांवांतून मिरवावयाचें; घरोघरच्या बायकांनीं तिला आरती ओंवाळावयाची, व यांनीं प्रसाद वाटावयाचे; असे एक का दोन–अनेक प्रकार त्यांनीं केले.

**यादव०**–अगदींच बहकल्यांतला हा प्रकार. मग सरकार आपण आपली बहीण त्यांना दिली कशी ?

**जयेंद्र०**–काय करूं ? त्यावेळीं तुमचा आग्रह फार पडला. तुह्मींच नाहीं ह्मणालां कीं, यायोगें त्यांची प्रकृति ताळ्यावर येईल ह्मणून. मला तें सयुक्तिक वाटलें. माझ्यासारख्या पोरानें आपल्यासारख्या पोक्त मसलतगारांची सल्ला ऐकूं नये तर काय करावें ? देवा, ताईला तरी सुखी राख, नाहीं तर तिचा गळा मीं कापला असें होईल !

**प्रताप०**–छे, सरकार. हें काय भलतेंच बोलणें ? आपल्याकडे कसला दोष ?

**जयेंद्र०**–अरे, पण ही बाहेर गडबड कसली ? कोण आहे तेथें, बलदेव ?

अहल्या प्रवासाच्या पोषाखानें गडबडीनें आंत येते व एकदम जयेंद्रपालाच्या पायावर डोकें ठेवते.

कोण ताई ? अग, तूं केव्हां आलीस ? आणि कशी आलीस ? वीरमणी कोठें आहेत ? आणि तूं अशी गहिंवरलेली कां ? हे तुझे डोळे पाण्यानें भरून आले आहेत. अग, तुला झालें काय सांग तर खरें. काकासाहेबांनीं कांहीं तुझा अपमान केला कीं काय ? मला वाटतें त्यांनीं कांहीं खुसपट काढून तुला हाकून दिली असावी. सांग, सांग बाळ, लवकर काय आहे तें. उगी, रडूं नको.

**अहल्या**–दादा, कायरे हा प्रसंग आणलास मजवर ? [ पुनः रडूं लागते.

**जयेंद्र०**–ताई, असा कोणता प्रसंग तुझ्यावर आला ? कोणीं आणला ? मीं ? असें

कसें होईल ? बोल, बोल जलदी. तुझ्या बोलण्यावरून तुला कोणीं तरी चांगलें फसविलें आहे असें दिसतें. तुझ्या भोळेपणाचा कोण्या तरी दगलबाज मनुष्यानें चांगलाच फायदा घेतला आहे. ठीक आहे. पहातों त्या चोराचा समाचार बरें.

**अहल्या**—दादा, हें तुझें बोलणेंच सांगतें आहे तूं कसा माझ्या दुःखाला कारण झाला आहेस तो. मघाशीं त्यांनीं मला हाकलून दिलें असावें असें ह्मटलेंस. आतां त्यांना कपटी आणि दगलबाज हीं निंद्य नावें दिलींस. दादा, असा तिकडून तुझा कोणता अपराध झाला आहे ? कां त्यांच्यावर तुझा इतका राग ?

**जयेंद्र०**—अग, माझ्या रागाचें कारण विचारतेस ? खरोखरच तूं भावडी भोळी आहेस. हेंच पहाना त्यानें तुला कसें पाठविलें तें. या राज्याचे ते व मी दोघे आधारस्तंभ. त्यांपैकीं एकाची तूं पत्नी व दुसऱ्याची आवडती व एकुलती एक बहीण. तेव्हां तुझें येणें मोठ्या थाटानें व्हावयाला पाहिजे होतें, तुझा परिवार ह्मणजे एक सैन्य पाहिजे होतें, तुझ्या बरोबरच्या घोड्यांचा खिंकाळा दहा वीस कोस पुढें ऐकूं यावयाला पाहिजे होता, त्याच्या दौडीच्या योगें उडालेल्या धुळीनें आकाश सारें व्यापून जाऊन सूर्याचें खग्रास ग्रहण व्हावयाला पाहिजे होतें, रस्त्यानें तुझा थाट पहाण्यास उत्सुक झालेल्या लोकांची कित्येक तास पूर्वीं गर्दी होऊन राहिली पाहिजे होती.—पण पहावें तों तूं एकाद्या कुणबटाच्या बायकोप्रमाणें सडी, बरोबर इतमाम वगैरे कांहीं न घेतां आलीस याला काय ह्मणावें ? वीरमणीनें माझा दुसरा कोणताही अपराध केला नसला तरी हा अपमान मी कधींही सहन करणार नाहीं.

**प्रताप०**—सरकार ह्मणतात तें अगदीं यथायोग्य आहे. हा अपमान अगदीं दुःसह आहे व तो त्यांनीं कधींही सहन करूं नये. वीरमणी ह्मणजे असा कोणता पदार्थ आहे !

**अहल्या**—मी सांगतें ते कोण आहेत ते! सर्वजयमहाराजांच्या पूर्ण प्रीतींतले सरदार, त्यांच्याचप्रमाणें शौर्यानें व गुणांनीं शोभणारे, ज्यांच्या कपाळाच्या एका आठीनें सारें जग थरथर कापतें, ज्यांनीं नुसतें फूः केलें कीं आपल्यासारख्या हजारों मुरकुटांची चांदी उडते—असे ते आहेत. आणि ते माझे—ह्मणजे जयेंद्रपालाच्या बहिणीचे पती आहेत समजलां ! दादा, हेच का तुझे मसलतगार?

**जयेंद्र०**—ताई, माफ कर त्यांना. त्यांची माझ्यावर भक्ति आहे व तुझ्यावरही त्यांचें प्रेम आहे, त्यामुळें त्यांना हा अपमान न सोसून त्यांच्या तोंडून अधिकउणा शब्द गेला. प्रतापराव, तुह्मी असें बोललां हें रास्त नाहीं.

**प्रताप०**—जी, सरकार. ता-ताईसाहेब, मा-माफ करा. वीरमणी श्रे-श्रेष्ठ आहेत.

आ-आह्मीं मु-मुरकूट आहों. गु-गुन्हा झाला. पु-पुनः असें हो-होणार नाहीं.

**अहल्या**—जाऊंद्या. असल्या क्षुल्लक बोलण्यांत अर्थ नाहीं. दादा, मी कां आलें तें ऐक. त्यांनीं मला अशी पाठविली नाहीं, मीच होऊन आलें. दादा, तूं आतांशीं हें काय मांडलें आहेस ? त्यांच्याशीं वैर कां करूं पाहतोस ? त्यांच्याबद्दल लोकांचीं मनें तूं बिघडवितो आहेस तें कां ? आणि संग्रामसिंह भाऊजींचें तूं असें काय केलेंस ? (**जयेंद्रपाल** व **यादवराव** हे एकमेकांकडे सार्थदृष्टीनें पाहतात.) नाहींरे हें तुझ्या शीलाला शोभत ? बाबांच्या लौकिकाची आठवण कर. (डोळ्यांत पाणी आणून) अरे, आपल्या कुलाचें नांव किती थोर ! त्याला डाग लावूं नको. असलें घाणेरडें आणि अधमपणाचें कृत्य तुझ्या हातून व्हावेंना ?—

**जयेंद्र०**—हं—ताई, काय हें ? पण जाऊंद्या. तुझ्याकडे काय त्याचें ! ज्या दुष्टानें तुझे कान या दुष्ट विषारी कंडीनें फुंकले आहेत त्याच्या असंख्य अपराधांत ही एक भर पडली झालें.—पण कोणतें भयंकर कृत्य केल्याचा मजवर आरोप आहे तें अगोदर सांग पाहूं.

**अहल्या**—माझ्या तोंडांतून त्या अमंगळ कृत्याचा उच्चार करवूं नकोस. नको, नको बाई त्याची आठवण. आई, जगदंबे, कशीग आमच्या घराण्यावर अशी कोपलीस तूं ?

**जयेंद्र०**—आः ! काय करूं ताई ? तुझ्यावरच्या माझ्या प्रेमानें मी मूढ बनलों आहे. सूड घेण्यासाठीं हा हात कसा शिवशिवतो आहे. पण तुझ्याकरितां—इतकीं कारणें झालीं असूनही, लोक मला काय ह्मणतील याची परवा न बाळगतां—मी त्याला आवरून धरतों आहे. असो; आतां थोडक्याच दिवसांत याचा काय तो सोक्ष कीं मोक्ष होईल. भवितव्यतेपुढें माणसांचा कांहीं इलाज चालत नाहीं. अहिंसा परमोधर्मः मानून पायाखालीं मुंगी देखील चिरडून मरूं नये ह्मणून रस्ता झाडीत जाणाऱ्या भिक्षूच्या हातानेंच, ईश्वरीसूत्र अढळ राहावें यासाठीं, मनुष्य बळी पडतो. वेळ आली कीं ठरलेल्या गोष्टी ब्रह्मलिखिताप्रमाणें घडावयाच्याच. ताई, तुला सांगतों ऐक—

एक **हुजऱ्या** येतो.

**हुजऱ्या**—सरकार, बाहेर एक जासूद आला आहे व आपली गांठ पाहिजे ह्मणतो. कांहीं महत्वाची खबर आणली आहे त्यानें.

**जयेंद्र०**—आण त्याला लवकर इकडे.

[ **हुजऱ्या** जातो.

**यादव०**—ताईसाहेब, आपण सरकारचें ह्मणणें शांतपणें ऐका. संग्रामसिंह वारले खरे; पण त्यासंबंधानें सरकारांकडे यत्किंचित् दोष नाहीं इतकेंच नाहीं, तर उलट सरकारालाच संतापावयाला योग्य कारण झालें आहे. त्याची सारी हकिकत मी आपल्याला फुरसतीअंतीं कळवीन.

# शिलादित्य.

## भाग ३ रा.

शिलादित्यास कैद केल्याची खबर तुरुंगांतील अधिकाऱ्याकडे अगाऊच लिहून गेली होती, यामुळें त्या ठिकाणचे लहानमोठ्या अधिकारांचे नोकर तो येऊन पोंचण्याच्या मुख्य दरवाज्यावर त्यास पहाण्याच्या उत्कंठेनें तावडतोब जमले. तुरुंगांत येणारे किरकोळ अपराधाचे कैदी तुरुंगांत घेण्याचा दरवाजा निराळा असून, राजद्रोहाचे कैदी येण्याचा दरवाजा हा असल्यानें, व प्रस्तुतचा राजद्रोहाचा प्रकारही अश्रुतपूर्व असल्यानें, जो तो शिलादित्य आपल्या दृष्टीस पहिल्यानें पडावा या हेतूनें तशी सोयीची जागा पटकाविण्याच्या तजविजींत होता. शहरांतल्या थोरल्या दगडी पुलाखालून शिलादित्यास घेऊन येणारी नाव दिसूं लागतांच त्या गर्दीतल्या एका मनुष्यानें त्वरेनें तुरुंगांत जाऊन मुख्य अधिकारी विलयवाद यास वर्दी दिली. तो अधिकारीही दरवाज्यावरील माडीवर एका खिडकीशीं, मधून मधून नदीकडे दृष्टि फेंकीत व मधून मधून कांहीं कागदपत्र चाळीत, काम करीत बसला होता. वर्दी पोंचतांच तो तसाच गडबडीनें खालीं येण्यास निघाला, खालीं येऊन पोंचतो इतक्यांत नावही तुरुंगाच्या धक्क्याशीं येऊन लागली. शिलादित्यास कैद करून आणणारा कामदार पहिल्यानें जमिनीवर उडी मारून उतरला. त्याच्यामागून शिलादित्य शांतपणें खालीं उतरला; व जरी वर चढण्याच्या पायऱ्यांवर शेंवाळ वाढून निसरडें झालें होतें, तरी तो यत्किंचित्‌ही न डगतां सावकाश वर चढला. अगदीं वरच्या पायरीवर तो पोंचला असतां त्याचें तोंड नीटपणें न्याहाळून पहाण्याच्या उत्कंठेनें तुरुंगांतील नोकर एकदम पुढें सरसावले; परंतु विलयवादानें त्यांस दरडावून मागें सारल्यामुळें ते एकदम थबकले, व स्वतः अधिकारी मात्र पुढें येऊन शिलादित्याकडे बारीक नजरेनें पाहूं लागला.

"या पायऱ्यांवरून आजपर्यंत अनेक प्रकारचे दुष्ट राजद्रोही कैदी चढून आले, परंतु तुझ्यासारखा उलट्या काळजाचा बेरड, मांग, असा आज पहिल्यानेंच मी पहातों." विलयवाद शिलादित्यास उद्देशून ह्मणाला.

शिलादित्य उत्तर करितोः—"दुर्जनांच्या काळजाच्या उलट सज्जनांचें काळीज असावयाचेंच! तें कसेंही असलें, तरी पूर्वींचे कैदी या पायऱ्या चढतांना कांहीं तरी घाबरले असतील, व त्यांचें पातकी मन त्यांस खातही राहिलें असेल; परंतु तो

आ-आह्मीं मु-मुरकूट आहों. गु-गुन्हा झाला. पु-पुनः असें हो-होणार नाहीं.

**अहल्या**—जाऊंद्या. असल्या क्षुल्लक बोलण्यांत अर्थ नाहीं. दादा, मी कां आलें तें ऐक. त्यांनीं मला अशी पाठविली नाहीं, मीच होऊन आलें. दादा, तूं आतांशीं हें काय मांडलें आहेस ? त्यांच्याशीं वैर कां करूं पाहतोस ? त्यांच्याबद्दल लोकांचीं मनें तूं बिघडवितो आहेस तें कां ? आणि संग्रामसिंह भाऊजींचें तूं असें काय केलेंस ? (**जयेंद्रपाल** व **यादवराव** हे एकमेकांकडे सार्थदृष्टीनें पाहतात.) नाहींरे हें तुझ्या शीलाला शोभत ? बाबांच्या लौकिकाची आठवण कर. (डोळ्यांत पाणी आणून) अरे, आपल्या कुलाचें नांव किती थोर ! त्याला डाग लावूं नको. असलें घाणेरडें आणि अधमपणाचें कृत्य तुझ्या हातून व्हावेंना ?—

**जयेंद्र**०—हं—ताई, काय हें ? पण जाऊंद्या. तुझ्याकडे काय त्याचें ! ज्या दुष्टानें तुझे कान या दुष्ट विषारी कंडीनें फुंकले आहेत त्याच्या असंख्य अपराधांत ही एक भर पडली झालें.—पण कोणतें भयंकर कृत्य केल्याचा मजवर आरोप आहे तें अगोदर सांग पाहूं.

**अहल्या**—माझ्या तोंडांतून त्या अमंगळ कृत्याचा उच्चार करवूं नकोस. नको, नको बाई त्याची आठवण. आई, जगदंबे, कशीग आमच्या घराण्यावर अशी कोपलीस तूं ?

**जयेंद्र**०—आः ! काय करूं ताई ? तुझ्यावरच्या माझ्या प्रेमानें मी मूढ बनलों आहे. सूड घेण्यासाठीं हा हात कसा शिवशिवतो आहे. पण तुझ्याकरितां—इतकीं कारणें झालीं असूनही, लोक मला काय ह्मणतील याची परवा न बाळगतां—मी त्याला आवरून धरतों आहे. असो; आतां थोडक्याच दिवसांत याचा काय तो सोक्ष कीं मोक्ष होईल. भवितव्यतेपुढें माणसांचा कांहीं इलाज चालत नाहीं. अहिंसा परमोधर्मः मानून पायाखालीं मुंगी देखील चिरडून मरूं नये ह्मणून रस्ता झाडीत जाणाऱ्या भिक्षूच्या हातानेंच, ईश्वरीसूत्र अढळ राहावें यासाठीं, मनुष्य बळी पडतो. वेळ आली कीं ठरलेल्या गोष्टी ब्रह्मलिखिताप्रमाणें घडावयाच्याच. ताई, तुला सांगतों ऐक—

एक **हुजऱ्या** येतो.

**हुजऱ्या**—सरकार, बाहेर एक जासूद आला आहे व आपली गांठ पाहिजे ह्मणतो. कांहीं महत्वाची खबर आणली आहे त्यानें.

**जयेंद्र**०—आण त्याला लवकर इकडे.

[ **हुजऱ्या** जातो.

**यादव**०—ताईसाहेब, आपण सरकारचें ह्मणणें शांतपणें ऐका. संग्रामसिंह वारले खरें; पण त्यासंबंधानें सरकारांकडे यत्किंचित् दोष नाहीं इतकेंच नाहीं, तर उलट सरकारालाच संतापावयाला योग्य कारण झालें आहे. त्याची सारी हकिकत मी आपल्याला फुरसतीअंतीं कळवीन.

# शिलादित्य.

## भाग ३ रा.

शिलादित्यास कैद केल्याची खबर तुरुंगांतील अधिकाऱ्याकडे अगाऊच लिहून गेली होती, यामुळें त्या ठिकाणचे लहानमोठ्या अधिकारांचे नोकर तो येऊन पोंचण्याच्या मुख्य दरवाज्यावर त्यास पहाण्याच्या उत्कंठेनें तावडतोब जमले. तुरुंगांत येणारे किरकोळ अपराधाचे कैदी तुरुंगांत घेण्याचा दरवाजा निराळा असून, राजद्रोहाचे कैदी येण्याचा दरवाजा हा असल्यानें, व प्रस्तुतचा राजद्रोहाचा प्रकारही अश्रुतपूर्व असल्यानें, जो तो शिलादित्य आपल्या दृष्टीस पहिल्यानें पडावा या हेतूनें तशी सोयीची जागा पटकाविण्याच्या तजविजींत होता. शहरांतल्या थोरल्या दगडी पुलाखालून शिलादित्यास घेऊन येणारी नाव दिसूं लागतांच त्या गर्दीतल्या एका मनुष्यानें त्वरेनें तुरुंगांत जाऊन मुख्य अधिकारी विलयवाद यास वर्दी दिली. तो अधिकारीही दरवाज्यावरील माडीवर एका खिडकीशीं, मधून मधून नदीकडे दृष्टि फेंकीत व मधून मधून कांहीं कागदपत्र चाळीत, काम करीत बसला होता. वर्दी पोंचतांच तो तसाच गडबडीनें खालीं येण्यास निघाला, खालीं येऊन पोंचतो इतक्यांत नावही तुरुंगाच्या धक्क्याशीं येऊन लागली. शिलादित्यास कैद करून आणणारा कामदार पहिल्यानें जमिनीवर उडी मारून उतरला. त्याच्यामागून शिलादित्य शांतपणें खालीं उतरला; व जरी वर चढण्याच्या पायऱ्यांवर शेंवाळ वाढून निसरडें झालें होतें, तरी तो यत्किंचित्‌ही न डगतां सावकाश वर चढला. अगदीं वरच्या पायरीवर तो पोंचला असतां त्याचें तोंड नीटपणें न्याहाळून पहाण्याच्या उत्कंठेनें तुरुंगांतील नोकर एकदम पुढें सरसावले; परंतु विलयवादानें त्यांस दरडावून मागें सारल्यामुळें ते एकदम थबकले, व स्वतः अधिकारी मात्र पुढें येऊन शिलादित्याकडे बारीक नजरेनें पाहूं लागला.

"या पायऱ्यांवरून आजपर्यंत अनेक प्रकारचे दुष्ट राजद्रोही कैदी चढून आले, परंतु तुझ्यासारखा उलट्या काळजाचा बेरड, मांग, असा आज पहिल्यानेंच मी पहातों." विलयवाद शिलादित्यास उद्देशून ह्मणाला.

शिलादित्य उत्तर करितोः—"दुर्जनांच्या काळजाच्या उलट सज्जनांचें काळीज असावयाचेंच! तें कसेंही असलें, तरी पूर्वीचे कैदी या पायऱ्या चढतांना कांहीं तरी घाबरले असतील, व त्यांचें पातकी मन त्यांस खातही राहिलें असेल; परंतु तो

प्रकार मात्र माझ्या ठिकाणीं बिलकुल नाहीं !"

"दुष्टा हतभाग्या !" अधिकारी त्यास ह्मणतो. "एकूण आपल्या दुष्ट वर्तनाबद्दलचा पश्चात्ताप होण्याचें एकीकडेच राहिलें, उलट त्याबद्दल तुला अभिमानच वाटतो अं ? दुरात्म्या ! तुझ्या असद्धर्माविषयीं तिटकारा वाटायचें जर कांहीं एकादें साधन कमी असेल, तर तें त्या असद्धर्माचे परिणाम तुझ्यासारख्या बेरडांच्या मनावर कसे होतात, हें पाहिलें असतां एकदम पुढें उभें राहील यांत संशय नाहीं ! नीचा ! ज्या धर्माच्या आचरणानें मनुष्य भयंकर राजद्रोहाचीं अनन्वित कृत्यें करितो, व तीं करीत असतांही त्यास आपण सद्धर्मानेंच वागत आहों असें वाटतें, त्या धर्माला 'धर्म' ह्मणण्याची देखील मला शरम वाटते."

"वाटत असेल, परंतु अनेक प्रकारच्या दुःखांनीं डागिलेल्या अंतःकरणास समाधान वाटविण्याचें काम तरी त्या धर्माकडून होतें, इतकें बस्स आहे !" **शिलादित्य** उत्तर करितो.

हे शब्द ऐकून **विलयवाद** रागानें लाल होऊन जाऊन त्यास ह्मणालाः—"चूप रहा! पाजी माणूस नाहीं तर ! जास्त गडबड करशील तर तुझी जीभच मुळापासून उपटून काढवीन !"

इतकें बोलणें झाल्यावर त्यानें **शिलादित्या**बरोबर आलेल्या कामदाराकडून त्यास कैदेंत ठेवण्याविषयींचा हुकूम मागून घेऊन एक वेळ त्याकडे तिरस्करती नजर फेंकिली, व लागलीच तुरुंगांतील रखवालदारांस कांहीं ताकीद करून नंतर त्यानें पुनरपि **शिलादित्या**कडे निरखून पाहण्यास आरंभ केला. **शिलादित्य** त्याच्या निरखून पाहण्यानें यत्किंचित्ही न डगमगतां उलट त्याच्याकडे शांतपणानें पाहतच राहिला.

हा प्रकार चालत असतां बाजूस उभे राहिलेल्या प्रेक्षकांपैकीं कित्येकांस आपली स्वामिभक्ति दाखविण्याची आणि **शिलादित्या**च्या व्यूहाविषयीं आपली तिरस्कारबुद्धि प्रकट करण्याची हीच वेळ आहे असें वाटून ते मोठ्या आवेशानें त्यास शिव्या देऊं लागले; व याचाही कांहीं उपयोग होत नाहीं असें त्यांस वाटलें, तेव्हां तर कित्येकजण **शिलादित्या**च्या अंगसरपटीस येण्याच्याही बेतांत आले. त्याच्या तोंडावर व अंगावरील कपड्यांवर कित्येकजण थुंकले; कित्येकांनीं शेंवाळलेल्या पायऱ्यांवरील शेंवाळ आणि आजूबाजूची माती गोळा करून त्याच्या अंगावर फेंकली; व कित्येकांनीं तर आपले जंबिये बाहेर काढून त्यांच्या टोंकांनीं त्याच्या अंगाचे ओरखाडेही काढिले. फार कशाला, तुरुंगावरील अधिकारी या वेळीं त्यांना न आवरता, तर त्या लोकांनीं **शिलादित्या**ची याहूनही अधिक अपेष्टा करण्यास कमी केलें नसतें. असलेल्या घोळक्यांत आमच्या वाचकांच्या परिचयाची **राधम्मा** आपल्या आईबापांबरोबर आलेली त्या ठिकाणीं उभी होती, तिनें एकटीनें मात्र **शिलादित्या**विषयीं आपली अनुकंपाबुद्धि दर्शविली. इतरांस त्या-

विषयीं काडीइतकी देखील दया वाटली नाहीं.

या लोकांनीं आपले इतके हाल केले, तरी त्यांबद्दल **शिलादित्या**च्या मनास यत्किंचित्‌ही विकार झाला नाहीं, परंतु **राधम्मे**च्या तोंडून निघालेले चार कळवळ्याचे शब्द ऐकून मात्र त्याच्या अंतःकरणाची खळबळ झाली. त्यानें तोंडावाटें एक शब्दही काढिला नाहीं, परंतु त्याचे ओंठ मात्र किंचित् स्फुरण पावल्यासारखे हालले, तेवढ्यावरून त्याच्या अंतःकरणांत काय चाललें होतें तें स्पष्टपणें समजण्याजोगें होतें. **राधम्मे**चें हें वर्तन पाहून तिचा बाप अतिशय रागावला, व पोरीच्या वर्तनानें आपल्याबद्दल तुरुंगावरील अधिकाऱ्याच्या मनाचा विपरीत ग्रह होण्याचीही भीति त्यास वाटली.

"चल निघ कारटे! इथून." तो **राधम्मे**स म्हणतो. "खबरदार आज आपल्या खोलींतून बाहेर पडलीस तर! मीं तुला माझ्याबरोबर येऊं दिलें ही गोष्ट फार वाईट झाली!"

"**जरद्रुत**!" **विलयवाद** त्यास दरडावून बोलतो. "या पोरीबद्दल तुह्मीं नीट खबरदारी घ्या! **जैनां**ची किंवा **बौद्ध**धर्म्यांची यत्किंचित्‌ही कींव करणारा एकही मनुष्य मी या ठिकाणीं कामावर राहूं द्यायचा नाहीं! जर तुह्मीं खरे बीजाचे **हिंदु** आणि स्वामिभक्त असतां, तर तुमच्या पोरीच्या तोंडून आतां ही बोलली हीं अक्षरें निघालींच नसतीं! कसेंही असो, तुम्हांला फिरून बजावून सांगतों, हिचा नीट बंदोबस्त करा, नाहीं तर तुमची स्वतःचीं शंभर वर्षें भरलीं असेंच समजण्याची पाळी तुह्मीं आणाल!"

आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या तोंडचें हें भाषण ऐकून **जरद्रुत** गोंधळून जाऊन भीत भीत उत्तर करितोः—"त—तसें नाहीं सरकार! मी करितों—करितों याचा बंदोबस्त!" इतकें बोलून तो आपल्याजवळ उभी असलेल्या आपल्या बायकोस हळूच सांगतोः—"या कारटीला नेऊन खोलींत कोंडून ठेव! वाटेल तर तिला डाग द्यायलाही कमी करूं नकोस! मला वाटतें ही कारटी तुझ्यान् माझ्या मुळावर येणार!"

नवऱ्याचें भाषण ऐकून **उग्राम्मे**नें **राधम्मे**चा दंड धरून तिला ओढीतच आंत तुरुंगांत नेलें. जातां जातां **राधम्मे**नें एक वेळ **शिलादित्या**कडे वळून पाहिलें, त्यावेळीं त्याचीही नजर आपलेकडेच लागली असून त्याच्या एकंदर मुद्रेवरून आपल्याविषयीं त्याची कृतज्ञताबुद्धि असल्याचें तिनें जाणिलें. परंतु बिचारी दुसऱ्यांच्या ताब्यांत पडली, त्यामुळें निरुपाय होऊन तिला आईबरोबर जाणें भाग पडलें. आपल्या कन्येचें वर्तन आपल्याला आवडलें नाहीं हें आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यास वाटविणें **जरद्रुता**स अगत्याचें वाटून, तो मुलगी आंत गेल्याबरोबर **शिलादित्या**कडे वळला, व त्याची हालअपेष्टा करण्यांत जे अग्रणी त्यास दिसले त्यांच्याशीं मिळून तो **शिलादित्यास** धक्काबुक्की करण्याच्याही बेतांत आला. अशा प्रकारें अप्रतिष्ठा व हालअपेष्टा झाल्यानें **शिलादित्या**चा मनोनिग्रह शिथिल होईल अशी **विलयवादा**स पहिल्यानें आशा वा-

प्रकार मात्र माझ्या ठिकाणीं बिलकुल नाहीं !"

"दुष्टा हतभाग्या !" अधिकारी त्यास ह्मणतो. "एकूण आपल्या दुष्ट वर्तनाबद्दलचा पश्चात्ताप होण्याचें एकीकडेच राहिलें, उलट त्याबद्दल तुला अभिमानच वाटतो अं ? दुरात्म्या ! तुझ्या असद्धर्माविषयीं तिटकारा वाटायचें जर कांहीं एकादें साधन कमी असेल, तर तें त्या असद्धर्माचे परिणाम तुझ्यासारख्या बेरडांच्या मनावर कसे होतात, हें पाहिलें असतां एकदम पुढें उभें राहील यांत संशय नाहीं ! नीचा ! ज्या धर्माच्या आचरणानें मनुष्य भयंकर राजद्रोहाचीं अनन्वित कृत्यें करितो, व तीं करीत असतांही त्यास आपण सद्धर्मानेंच वागत आहों असें वाटतें, त्या धर्माला 'धर्म' ह्मणण्याची देखील मला शरम वाटते."

"वाटत असेल, परंतु अनेक प्रकारच्या दुःखांनीं डागिलेल्या अंतःकरणास समाधान वाटविण्याचें काम तरी त्या धर्माकडून होतें, इतकें बस्स आहे !" **शिलादित्य** उत्तर करितो.

हे शब्द ऐकून **विलयवाद** रागानें लाल होऊन जाऊन त्यास ह्मणालाः—"चूप रहा! पाजी माणूस नाहीं तर ! जास्त गडबड करशील तर तुझी जीभच मुळापासून उपटून काढवीन !"

इतकें बोलणें झाल्यावर त्यानें **शिलादित्या**बरोबर आलेल्या कामदाराकडून त्यास कैदेंत ठेवण्याविषयींचा हुकूम मागून घेऊन एक वेळ त्याकडे निष्ठुरती नजर फेंकिली, व लागलीच तुरुंगांतील रखवालदारांस कांहीं ताकीद करून नंतर त्यानें पुनरपि **शिलादित्या**कडे निरखून पाहण्यास आरंभ केला. **शिलादित्य** त्याच्या निरखून पाहण्यानें यत्किंचितूही न डगमगतां उलट त्याच्याकडे शांतपणानें पाहतच राहिला.

हा प्रकार चालत असतां बाजूस उभे राहिलेल्या प्रेक्षकांपैकीं कित्येकांस आपली स्वामिभक्ति दाखविण्याची आणि **शिलादित्या**च्या व्यूहाविषयीं आपली तिरस्कारबुद्धि प्रकट करण्याची हीच वेळ आहे असें वाटून ते मोठ्या आवेशानें त्यास शिव्या देऊं लागले; व याचाही कांहीं उपयोग होत नाहीं असें त्यांस वाटलें, तेव्हां तर कित्येकजण **शिलादित्या**च्या अंगसरपटीस येण्याच्याही बेतांत आले. त्याच्या तोंडावर व अंगावरील कपड्यांवर कित्येकजण थुंकले; कित्येकांनीं शेंवाळलेल्या पायऱ्यांवरील शेंवाळ आणि आजूबाजूची माती गोळा करून त्याच्या अंगावर फेंकली; व कित्येकांनीं तर आपले जंबिये बाहेर काढून त्यांच्या टोंकांनीं त्याच्या अंगाचे ओरखाडेही काढिले. फार कशाला, तुरुंगावरील अधिकारी या वेळीं त्यांना न आवरता, तर त्या लोकांनीं **शिलादित्या**ची याहूनही अधिक अपेष्टा करण्यास कमी केलें नसतें. अमलेल्या घोळक्यांत आमच्या वाचकांच्या परिचयाची **राधम्मा** आपल्या आईबापांबरोबर आलेली त्या ठिकाणीं उभी होती, तिनें एकटीनें मात्र **शिलादित्या**विषयीं आपली अनुकंपाबुद्धि दर्शविली. इतरांस त्या-

विषयीं काडीइतकी देखील दया वाटली नाहीं.

या लोकांनीं आपले इतके हाल केले, तरी त्यांबद्दल **शिलादित्या**च्या मनास यत्किंचितूही विकार झाला नाहीं, परंतु **राधम्मे**च्या तोंडून निघालेले चार कळवळ्याचे शब्द ऐकून मात्र त्याच्या अंतःकरणाची खळबळ झाली. त्यानें तोंडावाटें एक शब्दही काढिला नाहीं, परंतु त्याचे ओंठ मात्र किंचित् स्फुरण पावल्यासारखे हालले, तेवढ्यावरून त्याच्या अंतःकरणांत काय चाललें होतें तें स्पष्टपणें समजण्याजोगें होतें. **राधम्मे**चें हें वर्तन पाहून तिचा बाप अतिशय रागावला, व पोरीच्या वर्तनानें आपल्याबद्दल तुरुंगावरील अधिकाऱ्याच्या मनाचा विपरीत ग्रह होण्याचीही भीति त्यास वाटली.

"चल निघ कारटे! इथून." तो **राधम्मे**स ह्मणतो. "खबरदार आज आपल्या खोलींतून बाहेर पडलीस तर! मीं तुला माझ्याबरोबर येऊं दिलें ही गोष्ट फार वाईट झाली!"

"**जरदूर्त!**" **विलयवाद** त्यास दरडावून बोलतो. "या पोरीबद्दल तुह्मीं नीट खबरदारी घ्या! **जैनां**ची किंवा **बौद्ध**धर्मीची यत्किंचितूही कींव करणारा एकही मनुष्य मी या ठिकाणीं कामावर राहूं द्यायचा नाहीं! जर तुह्मीं खरे बीजाचे **हिंदु** आणि स्वामिभक्त असतां, तर तुमच्या पोरीच्या तोंडून आतां ही बोलली हीं अक्षरें निघालींच नसतीं! कसेंही असो, तुम्हांला फिरून बजावून सांगतों, हिचा नीट बंदोबस्त करा, नाहीं तर तुमची स्वतःचीं शंभर वर्षें भरलीं असेंच समजण्याची पाळी तुह्मीं आणाल!"

आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या तोंडचें हें भाषण ऐकून **जरदूर्त** गोंधळून जाऊन भीत भीत उत्तर करितोः—"त—तसें नाहीं सरकार! मी करितों—करितों याचा बंदोबस्त!" इतकें बोलून तो आपल्याजवळ उभी असलेल्या आपल्या बायकोस हळूच सांगतोः—"या कारटीला नेऊन खोलींत कोंडून ठेव! वाटेल तर तिला डाग द्यायलाही कमी करूं नकोस! मला वाटतें ही कारटी तुझ्यान् माझ्या मुळावर येणार!"

नवऱ्याचें भाषण ऐकून **उग्राम्मे**नें **राधम्मे**चा दंड धरून तिला ओढीतच आंत तुरुंगांत नेलें. जातां जातां **राधम्मे**नें एक वेळ **शिलादित्या**कडे वळून पाहिलें, त्यावेळीं त्याचीही नजर आपलेकडेच लागली असून त्याच्या एकंदर मुद्रेवरून आपल्याविषयीं त्याची कृतज्ञताबुद्धि असल्याचें तिनें जाणिलें. परंतु बिचारी दुसऱ्यांच्या ताब्यांत पडली, त्यामुळें निरुपाय होऊन तिला आईबरोबर जाणें भाग पडलें. आपल्या कन्येचें वर्तन आपल्याला आवडलें नाहीं हें आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यास वाटविणें **जरदूर्ता**स अगत्याचें वाटून, तो मुलगी आंत गेल्याबरोबर **शिलादित्या**कडे वळला, व त्याची हालअपेष्टा करण्यांत जे अग्रणी त्यास दिसले त्यांच्याशीं मिळून तो **शिलादित्यास** धक्काबुक्की करण्याच्याही बेतांत आला. अशा प्रकारें अप्रतिष्ठा व हालअपेष्टा झाल्यानें **शिलादित्या**चा मनोनिग्रह शिथिल होईल अशी **विलयवादा**स पहिल्यानें आशा वा-

टत होती; यामुळें इतका वेळ तो तुरुंगांतील कनिष्ठ प्रतीच्या नोकरांस साधारणपणें त्यांच्या कलाप्रमाणेंच वागूं देत होता; परंतु **शिलादित्या**चा मनोनिग्रह पूर्वीप्रमाणेंच दृढ असून लोकांचें त्याच्याशीं क्रूर वर्तनही अनावर होत चाललें आहे, व त्यापासून तादृश उपयोग होण्याची आशा नाहीं, असें जेव्हां त्याला वाटलें, तेव्हां त्यानें **शिलादित्यास** एकदम कोठडीकडे घेऊन जाण्याविषयीं सेवकांस हुकूम केला. त्याबरोबर नागव्या तरवारी हातांत घेतलेले चार असामी **शिलादित्या**च्या चारी बाजूंस जमले, व अशा प्रकारें **शिलादित्या**ची तुरुंगाच्या अंतर्भागीं रवानगी झाली. त्याच्या पाठोपाठ **विलयवाद**ही आंत शिरला, व हें सर्व मंडळ निरनिराळ्या वाटांनीं जातां जातां शेवटीं तुरुंगाच्या मुख्य इमारतीच्या तळमजल्यांत एक विस्तीर्ण खोली होती त्या ठिकाणीं जाऊन पोंचलें. खोलींत बसावयास एक गादी टाकिली होती, तिजवर **विलयवाद** बसल्यावर एक वेळ आपणाकडे आलेल्या हुकुमाकडे पाहिल्यासें करून तो **शिलादित्यास** ह्मणालाः–

"या हुकुमांत तुझें नांव '**वीरसेन**' ह्मणून लिहिलें आहे! तर बोल, हेंच तुझें नांव कीं दुसरें कांहीं आहे?"

"हुकुमांत जर नांव लिहिलें आहे, तर याबद्दल जास्ती प्रश्न मला विचारीत बसण्याचें तुह्मांला कारण नाहीं!" **शिलादित्य** उत्तर करितो. "हुकुमांत ज्याच्याबद्दल लिहिलें आहे, तोच इसम मी! तुह्मांला एवढी माहिती बस्स आहे!"

**विलयवाद** शांतपणाचा आव घालून त्यास म्हणतोः–"एवढी माहिती मला पुरेशी नाहीं. यासाठीं नीटपणें विचार करून काय बोलणें असेल तें बोल! बऱ्या बोलानें तूं सुधे जबाब देशील तर ठीक, नाहीं तर आह्मांला विनाकारण कठिण व भयंकर उपाय योजावे लागतील! तुला वेदनागारांतील वेदना टाळावयाच्या असतील, तर झालेली सर्व हकीकत मोकळ्या मनानें सांगावी यांतच शहाणपण आहे!"

यावर **शिलादित्य** उत्तर करितोः–"वेदना टाळण्याचा माझा मुळींच हेतु नाहीं, व कितीही वेदना दिल्या तरी माझ्यापासून तुह्मांला एक अक्षरही कळायचें नाहीं!"

"बाबारे!" **विलयवाद** अजूनही शांतपणानेंच बोलतो. "जोंपर्यंत वेदनांचा अनुभव आला नाहीं, तोंपर्यंतच कायत्या या बडेजावीच्या गोष्टी! आजपर्यंत तुझ्यासारख्या अरेरावीच्या गोष्टी पुष्कळांनीं सांगितल्या, परंतु वेदनायंत्राच्या सपाट्यांत सांपडल्यावर त्यांचीं डौलाचीं भाषणें जागच्या जागींच राहून त्यांना सगळ्या गोष्टी कबूल कराव्याच लागल्या! समजलास?-मग कसें काय? तूं बऱ्या बोलानें विचारिलेल्या प्रश्नांचे जबाब देणार किंवा कसें?"

या शेवटल्या प्रश्नाचा जबाब न देतां **शिलादित्य** अधिकाऱ्याकडे धिक्कारयुक्त मुद्रेनें पाहून हंसला.

"ठीक आहे!" इतकें बोलून **विलयवादानें शिलादित्यास** शेजारच्या अंधारकोठडींत ठेवून त्याच्याजवळ दोन

रक्षकांनीं सर्वकाळ रहावें, व तो आपल्या प्राणास किंवा शरीरास कांहीं अपाय करून घेईल तर त्यास तसें करूं देऊं नये, अशा आशयाचा हुकूम जवळ उभे असलेल्या सशस्त्र रक्षकांस फर्माविला.

"तुम्हांला भीति बाळगायचें कारण नाहीं," **शिलादित्य विलयवादा**स बोलतो. "आत्महत्या करून घेऊन धर्मसंरक्षणार्थ मेल्याबद्दलचें सुयश मिळविण्याची आयती येत असलेली ही संधि मी कदापि दवडणार नाहीं !"

हें इतकें बोलणें होत आहे तोंच **शल्यभानू**कडील जरूरीचा मोहोरबंद लखोटा घेऊन एक जासूद आला, व त्यानें तो अधिकाऱ्याच्या हातांत दिला. अधिकाऱ्यानें लखोटा उघडून घाईघाईनें वाचून पाहून स्वतःची तलवार म्यानांतून बाहेर काढली, व जासूद व रक्षक यांस दाराबाहेर जाण्यास सांगून तो स्वतः गादीवरून उठून **शिलादित्या**जवळ आला.

**विलयवाद शिलादित्यास** बोलतोः—"तूं महान् अपराध केला आहेस, तथापि तुझ्या या व्यूहांतील एकूण एक साथीदारांचीं नांवें सांगशील, व तुझ्या एकंदर व्यूहाची कच्ची हकीकत कबूल करशील, तर तुला प्राणदान द्यावें अशी परम दयावंत सरकारची मनीषा आहे !"

हें भाषण ऐकून **शिलादित्य** विचारांत मग्न झाल्यासारखा झाला, व तेवढ्यावरून आपल्या भाषणाचा त्याच्या मनावर परिणाम झाला असें वाटून **विलयवाद** पुनः पहिल्याप्रमाणेंच बोलला.

"तुम्हीं ह्मणतां याच्या सत्यतेविषयीं माझ्या मनाची पूर्ण खात्री झाली पाहिजे, ती तुम्हीं कशी करणार ?" **शिलादित्य** त्याला विचारतो.

"या बाबतींत माझें वचन हेंच प्रमाण घेऊन तुला चाललें पाहिजे !" **विलयवाद** उत्तर देतो.

"तुमचें वचन मी प्रमाण मानणार नाहीं !" **शिलादित्य** परतून बोलतो. "मला या कामीं महाराजांचें स्वदस्तुरचें क्षमापत्र मिळालें पाहिजे."

"तेंही मिळेल, पण त्याला एक अट आहे ती तूं कबूल करशील तर !" **विलयवाद** त्यास उत्तर देतो. "तुझें मन खरें सांगूं कीं नको, सांगूं कीं नको, या गोंधळांत पडलें आहे हें उघड आहे ! **शल्यभानु** दिवाणांची खातरी आहे कीं, **जैन** मंडळींतील पुष्कळ प्रमुख मंडळी या व्यूहांत सामील आहेत ! यासाठीं ही गोष्ट खरी ह्मणून सिद्ध होईल—अथवा तसें कशाला, मी स्पष्टपणें बोलतों, मीं ज्यांचीं नांवें घेईन ते लोक या व्यूहांत आहेत असें जर तूं कबूल करशील, तर तुझ्या मागण्याप्रमाणें क्षमापत्र तुला मिळेल !"

"तुम्हीं सांगतां आहां हाच आशय **शल्यभानू**च्या पत्रांत लिहिला आहे ?" **शिलादित्य** त्यास विचारितो.

यावर नुसती मान हलवून **विलयवादा**नें 'होय' असा आशय सुचविला.

"एवढ्या सांगण्यावरून नाहीं माझी खातरी होत !" **शिलादित्य** पुढें बोलतो. "**शल्यभानू**चें पत्र पाहूं द्या मला ! क-

दाचित् तुम्हीं मला कांहीं तरी सांगून फसवूं पहात असाल!"

यावर अधिकारी उत्तर करितो—"जे स्वतः विश्वासघाताचीं कामें करितात, त्यांना सगळें जग आपल्यासारखेंच विश्वासघातकी आहे असें वाटत असतें! घे हें पत्र! प्रत्यक्ष वाचून पहा! आतां तर होतेना खातरी?"

इतकें बोलून त्यानें तें पत्र **शिलादित्या**पुढें धरिलें, व **शिलादित्यानें** तें तत्काळ त्याच्या हातांतून हिसकावून घेतलें.

"कोण आहेहो बाहेर?" **शिलादित्य** मोठ्यानें ओरडून बोलला, व त्याबरोबर बाहेर उभे असलेले रक्षक एकदम आंत धांवून आले.

**शिलादित्य** पुढें बोलतो—"तुह्मांला या अधिकाऱ्यांनीं बाहेर जाण्यास सांगितलें याचें कारण ऐका! हे तुमचे **विलयवादजी** यांनीं **शल्यभानू**तर्फे एका अटीवर मला प्राणदान करण्याचें वचन दिलें आहे! ती अट एवढीच आहे कीं, जे स्वतः खरोखरी निरपराध आहेत, परंतु ते स्वतः **जैन**कुळांत जन्मले हाच ज्यांचा अपराध, असे लोक माझ्या व्यूहांत सामील आहेत असें मीं खोटेंच कबूल करावें! पहा, हें पत्रच प्रत्यक्ष वाचून पहा, आणखी मी ह्मणतों हें खरें का खोटें याबद्दलची घ्या आपल्या जिवाची खातरी करून!"

इतकें बोलून त्यानें तें पत्र रक्षकांच्या अंगावर फेंकून दिलें. तें पत्र उचलून वाचण्याची अर्थात् एकाचीही छाती झाली नाहीं. मात्र एका रक्षकानें तें उचलून **विलयवादा**च्या हवालीं केलें.

**शिलादित्य** पुढें बोलतो—"कां **विलयवादजी**! तुम्हांला इतका वेळ वाटलें असेल, कीं ही स्वारी लिचीपिची असेलन् आपल्या गोडगोड बोलण्याला भाळेल, पण मी असा भाळणारा नव्हें, समजलां?"

"हो हो! यांत काय संशय!" **विलयवाद** उत्तर करितो. "पण तुला एक गोष्ट सांगतों, खूप ध्यानांत ठेव. ती ही कीं, या खोलीच्या दगडी भिंती जितक्या कठिण आहेत, तितकें किंवा त्याहूनही कठिण जरी तुझें अंतःकरण असलें, तरी त्यालाही मऊ करून सोडल्याशिवाय हा **विलयवाद** कधीं रहायचा नाहीं!"

"वाः! फार चांगलें! मग या ह्मणण्याचा अनुभव घ्यायला उशीर तरी कां करावा? घ्या एकदांचा अनुभव आणि व्हा मोकळे!" **शिलादित्य** बोलतो.

"जरा दमानें घेतलें पाहिजे!" अधिकारी उत्तर देतो. "मरणासन्न झालेल्या कैदींची इच्छा एक वेळ तरी पूर्ण करावी असा आमचा नियमच आहे, त्याप्रमाणें ही तुझी इच्छा लौकरच पूर्ण करीन! काळजी नको!"

इतकें बोलून तो तेथून निघून आपल्या घरीं गेला, व लागलेंच एक कच्चा हकीकतीचें पत्र त्यानें **शल्यभानु** दिवाणाकडे पाठविलें. या पत्रांत त्यानें **शिलादित्यास** वेदनागारांतील वेदना देण्याविषयींही शिफारस केली होती. वस्तुतः ही शिफारस करण्याची नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मोठीशी

जरूर होती असें नाहीं; परंतु **शिलादित्या**च्या तोंडून, हकीकत काढून घेणें फारच अवघड असल्यामुळें त्यास अत्यंत भयंकर वेदना देणें त्यास जरूरीचें वाटत होतें; व यासाठीं न जाणों वेदनायंत्रांतील वेदना देतांना कदाचित् कैद्याचे प्राणही निघून जाण्याची भीति होती, व एवढ्यासाठींच अशा प्रसंगीं दिवाणसाहेबांकडची मंजुरी आणवून ठेवणें हेंच त्यास विशेष अगत्याचें वाटलें. असो; हें जें पत्र त्यानें पाठविलें, त्याचा जबाब येण्याला जवळ जवळ चार पांच घटिकांचा अवकाश लागला. आलेला जबाब स्वतः राजेसाहेबांच्या हातचा असून, त्यांत कैदीस कोणकोणते प्रश्न विचारावयाचे याजबद्दल लिहिलें होतें, व शिवाय शेंवटीं '**प्रथमालीढमधुराः पिबंति कटुभेषजं**' ह्मणजे पहिल्यानें गोड गोड औषध खावयास दिलें असतां मागाहून कडू औषधही मनुष्यें घेतात, त्याप्रमाणें प्रथमतः गोड ह्मणजे कमी क्लेशाच्या वेदना, व मागाहून त्यांचा कांहीं उपयोग न झाल्यास अधिक क्लेशदायक वेदना, याप्रमाणें वेदना देण्याचा क्रम राखावा, असेंही लिहिलें होतें.

हा जबाब हातीं पडल्यावर, आतां कैदी मेला तरी चिंता नाहीं असा निश्चय करून, **विलयवादा**नें ताबडतोब **जरद्दूता**स बोलावणें पाठविलें, व त्याप्रमाणें तो आल्यावर **विलयवाद** त्यास म्हणालाः—"आजचा कैदी फारच हट्टी दिसतो! तो बऱ्या बोलानें सर्व हकीकत कबूल न करील, तर त्यास सर्व प्रकारच्या वेदना देण्यास कमी करूं नये, असा खुद्द राजेसाहेबांचा आतांच लेखी हुकूम आला आहे, तर वेदनांचा क्रम कसा काय ठेवावासें तुह्मांला वाटतें?"

**जरद्दूत** उत्तर करितोः—" वेदना देण्याचे प्रकार पुष्कळच आहेत, तथापि अल्पसमजुतीप्रमाणें पहिल्याप्रथम **नयनांजनी** व **सुखासनी**, या वेदना देऊन पहाव्या! तितक्यांनीं बहुशः काम होईल, परंतु यदाकदाचित् नच झालें, तर **मुष्टिपेषिणी** आणि **पूर्णोद्धारिणी** यांचे प्रयोग करून पाहून, नंतर जरूरच पडली, तर शेंवटीं **विनायकप्रिया** आणि **हिमस्थली** या वेदना द्याव्यात! इतक्याउपर जसा हुकूम होईल तसें!"

हें भाषण ऐकून **विलयवादा**स आनंद झाला, व तो किंचित् स्मित वदनानें त्यास ह्मणालाः—" क्रम तर फार सुरेख आहे! हा मी चाललोंच वेदनागाराकडे, त्या ठिकाणीं आतांच्या आतां कैदीला घेऊन या! त्याला **भूकंप** बुरुजांत ठेविलें आहे!"

"ठीक आहे! हा चाललोंच मी तिकडे!" इतकें बोलून **जरद्दूत** चालता झाला. लगेच **विलयवादा**नें एका सेवकास मशाल पेटवून आणण्यास सांगितलें, व त्याप्रमाणें मशाल आल्यावर तो तेथून निघून एका अरुंद व अंधाऱ्या वाटेनें जाऊं लागला. जातां जातां एके ठिकाणीं एक चोरदार लागलें तें त्यानें उघडलें, व तेथून एक लांबलचक दगडी जिना होता त्यावरून उतरून जाऊन पुढें अनेक वांकड्या तिकड्या वाटांनीं जातां जातां तो एका भक्कम दरवाज्यापाशीं येऊन पोंचला. हा दरवाजा आडवा भिंतींत लोटून तो एका

दाचित् तुम्हीं मला कांहीं तरी सांगून फसवूं पहात असाल!"

यावर अधिकारी उत्तर करितो—"जे स्वतः विश्वासघाताचीं कामें करितात, त्यांना सगळें जग आपल्यासारखेंच विश्वासघातकी आहे असें वाटत असतें! घे हें पत्र! प्रत्यक्ष वाचून पहा! आतां तर होतेना खातरी?"

इतकें बोलून त्यानें तें पत्र **शिलादित्या**पुढें धरिलें, व **शिलादित्यानें** तें तत्काळ त्याच्या हातांतून हिसकावून घेतलें.

"कोण आहेहो बाहेर?" **शिलादित्य** मोठ्यानें ओरडून बोलला, व त्याबरोबर बाहेर उभे असलेले रक्षक एकदम आंत धांवून आले.

**शिलादित्य** पुढें बोलतो—"तुह्मांला या अधिकाऱ्यांनीं बाहेर जाण्यास सांगितलें याचें कारण ऐका! हे तुमचे **विलयवादजी** यांनीं **शल्यभानू**तर्फे एका अटीवर मला प्राणदान करण्याचें वचन दिलें आहे! ती अट एवढीच आहे कीं, जे स्वतः खरोखरी निरपराध आहेत, परंतु ते स्वतः **जैनकु**ळांत जन्मले हाच ज्यांचा अपराध, असे लोक माझ्या व्यूहांत सामील आहेत असें मीं खोटेंच कबूल करावें! पहा, हें पत्रच प्रत्यक्ष वाचून पहा, आणखी मी ह्मणतों हें खरें का खोटें याबद्दलची घ्या आपल्या जिवाची खातरी करून!"

इतकें बोलून त्यानें तें पत्र रक्षकांच्या अंगावर फेंकून दिलें. तें पत्र उचलून वाचण्याची अर्थात एकाचीही छाती झाली नाहीं. मात्र एका रक्षकानें तें उचलून **विलयवादा**च्या हवालीं केलें.

**शिलादित्य** पुढें बोलतो—"कां **विलयवादजी**! तुम्हांला इतका वेळ वाटलें असेल, कीं ही स्वारी लिचीपिची असेलन् आपल्या गोडगोड बोलण्याला भाळेल, पण मी असा भाळणारा नव्हें, समजलां?"

"हो हो! यांत काय संशय!" **विलयवाद** उत्तर करितो. "पण तुला एक गोष्ट सांगतों, खूप ध्यानांत ठेव. ती ही कीं, या खोलीच्या दगडी भिंती जितक्या कठिण आहेत, तितकें किंवा त्याहूनही कठिण जरी तुझें अंतःकरण असलें, तरी त्यालाही मऊ करून सोडल्याशिवाय हा **विलयवाद** कधीं रहायचा नाहीं!"

"वाः! फार चांगलें! मग या ह्मणण्याचा अनुभव घ्यायला उशीर तरी कां करावा? घ्या एकदांचा अनुभव आणि व्हा मोकळे!" **शिलादित्य** बोलतो.

"जरा दमानें घेतलें पाहिजे!" अधिकारी उत्तर देतो. "मरणासन्न झालेल्या कैदींची इच्छा एक वेळ तरी पूर्ण करावी असा आमचा नियमच आहे, त्याप्रमाणें ही तुझी इच्छा लौकरच पूर्ण करीन! काळजी नको!"

इतकें बोलून तो तेथून निघून आपल्या घरीं गेला, व लागलेंच एक कच्चा हकीकतीचें पत्र त्यानें **शल्यभानु** दिवाणाकडे पाठविलें. या पत्रांत त्यानें **शिलादित्यास** वेदनागारांतील वेदना देण्याविषयींही शिफारस केली होती. वस्तुतः ही शिफारस करण्याची नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मोठीशी

जरूर होती असें नाहीं; परंतु **शिलादित्या**च्या तोंडून, हकीकत काढून घेणें फारच अवघड असल्यामुळें त्यास अत्यंत भयंकर वेदना देणें त्यास जरूरीचें वाटत होतें; व यासाठीं न जाणों वेदनायंत्रांतील वेदना देतांना कदाचित् कैद्याचे प्राणही निघून जाण्याची भीति होती, व एवढ्यासाठींच अशा प्रसंगीं दिवाणसाहेबांकडची मंजुरी आणवून ठेवणें हेंच त्यास विशेष अगत्याचें वाटलें. असो; हें जें पत्र त्यानें पाठविलें, त्याचा जबाब येण्याला जवळ जवळ चार पांच घटिकांचा अवकाश लागला. आलेला जबाब स्वतः राजेसाहेबांच्या हातचा असून, त्यांत कैदीस कोणकोणते प्रश्न विचारावयाचे याजबद्दल लिहिलें होतें, व शिवाय शेंवटीं '**प्रथमालीढमधुराः पिबंति कटुभेषजं**' ह्मणजे पहिल्यानें गोड गोड औषध खावयास दिलें असतां मागाहून कडू औषधही मनुष्यें घेतात, त्याप्रमाणें प्रथमतः गोड ह्मणजे कमी क्लेशाच्या वेदना, व मागाहून त्यांचा कांहीं उपयोग न झाल्यास अधिक क्लेशदायक वेदना, याप्रमाणें वेदना देण्याचा क्रम राखावा, असेंही लिहिलें होतें.

हा जबाब हातीं पडल्यावर, आतां कैदी मेला तरी चिंता नाहीं असा निश्चय करून, **विलयवादा**नें ताबडतोब **जरद्दूता**स बोलावणें पाठविलें, व त्याप्रमाणें तो आल्यावर **विलयवाद** त्यास म्हणालाः—"आजचा कैदी फारच हट्टी दिसतो! तो बऱ्या बोलानें सर्व हकीकत कबूल न करील, तर त्यास सर्व प्रकारच्या वेदना देण्यास कमी करूं नये, असा खुद्द राजेसाहेबांचा आतांच लेखी हुकूम आला आहे, तर वेदनांचा क्रम कसा काय ठेवावासें तुह्मांला वाटतें?"

**जरद्दूत** उत्तर करितोः—"वेदना देण्याचे प्रकार पुष्कळच आहेत, तथापि अल्पसमजुतीप्रमाणें पहिल्याप्रथम **नयनांजनी** व **सुखासनी**, या वेदना देऊन पहाव्या! तितक्यांनीं बहुशः काम होईल, परंतु यदाकदाचित् नच झालें, तर **मुष्टिपेषिणी** आणि **पूर्णोद्धारिणी** यांचे प्रयोग करून पाहून, नंतर जरूरच पडली, तर शेंवटीं **विनायकप्रिया** आणि **हिमस्थली** या वेदना द्याव्यात! इतक्याउपर जसा हुकूम होईल तसें!"

हें भाषण ऐकून **विलयवादा**स आनंद झाला, व तो किंचित् स्मित वदनानें त्यास ह्मणालाः—"क्रम तर फार सुरेख आहे! हा मी चाललोंच वेदनागाराकडे, त्या ठिकाणीं आतांच्या आतां कैदीला घेऊन या! त्याला **भूकंप** बुरुजांत ठेविलें आहे!"

"ठीक आहे! हा चाललोंच मी तिकडे!" इतकें बोलून **जरद्दूत** चालता झाला. लगेच **विलयवादा**नें एका सेवकास मशाल पेटवून आणण्यास सांगितलें, व त्याप्रमाणें मशाल आल्यावर तो तेथून निघून एका अरुंद व अंधाऱ्या वाटेनें जाऊं लागला. जातां जातां एके ठिकाणीं एक चोरदार लागलें तें त्यानें उघडलें, व तेथून एक लांबलचक दगडी जिना होता त्यावरून उतरून जाऊन पुढें अनेक वांकड्या तिकड्या वाटांनीं जातां जातां तो एका भक्कम दरवाज्यापाशीं येऊन पोंचला. हा दरवाजा आडवा भिंतींत लोटून तो एका

अंधाऱ्या खोलींत आला. ही खोली वाचकांच्या परिचयाचीच आहे, कारण त्रिवेणीस वेदनायंत्रांत चढविलें होतें तें या ठिकाणींच. विलयवाद पूर्वी आंत शिरला त्यावेळीं दोन जाडे, उंच व काळेकभिन्न नोकर वेदनायंत्रांस तेलानें माखून तीं साफ करीत होते. एका कोपऱ्याशीं एक उंच समई ठेविली असून तिच्याजवळ बसावयास घातलें होतें, व त्याजवर तुरुंगांतील वैद्यराजांची स्वारी जांभया देत, व मधून मधून अंगाभोंवतीं घोंघावणाऱ्या डासांचा आणि चिलटांचा समाचार घेत, बसली होती. विलयवाद आंत आल्याबरोबर वैद्यराज उठून उभे राहिले, आणि आतां सांगितलेल्या दोघां काळपुरुषांसमवेत कैदी आणण्यासंबंधाच्या तजविजीस लागले. अंगावरून शेंदराचे पट्टे ओढणें, व तोंडावर अक्राळविक्राळ मुखवटे बसविणें, इत्यादि प्रकारची ही तयारी असून, ती शिलादित्याच्या कठोर मनांत भीति उत्पन्न करण्याकरितां मुद्दाम केली होती. सर्व सिद्धता झाल्यावर खोलीच्या मध्यभागीं असलेल्या दोन लोहशृंखला खालीं सोडून त्यांचे आंकडे त्या दोघां काळपुरुषांनीं हातीं धरिले. इतक्यांत बाहेरल्या अंगास दगडी फरशीवरून दणदण वाजणारीं पावलें ऐकूं आलीं. हीं पावलें अर्थातूच शिलादित्य व त्यास घेऊन येणारे रक्षक यांचीं होतीं. या सर्व मंडळीबरोबर जरदूतही होता. व त्यानें सर्वांचा आंत प्रवेश झाल्यावर दरवाजा बंद करून घेतला. यानंतर जो प्रकार झाला तो अगदीं शांतपणानें व सावकाश असा झाला, व त्याचा हेतु शिलादित्याच्या मनावर विशेष भयंकर परिणाम व्हावा हा होता. अगदीं जरूर पडल्याशिवाय त्या जागचें एक चिटपांखरूं सुद्धां हलत नव्हतें असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. सर्व कामदार व नोकरमंडळीही कशी अगदीं स्तब्ध होती. कोणास कांहीं बोलणें झालें तरी तें अगदीं या कानाचें त्या कानास ऐकूं जाऊं नये, अशा प्रकारचें होतें; व त्यावरून ही सर्व मंडळी जिवंत माणसें होतीं, अथवा वेताळाच्या राज्यांतील पिशाचें होतीं, याचा निर्णय होणें बऱ्याच अंशीं कठिण होतें. या सर्व मंडळीची हालचाल शिलादित्य पहात होता; परंतु त्याच्या मुद्रेवर भ्याल्याचें यत्किंचितूही चिन्ह दिसत नव्हतें. सर्व तयारी झाल्यावर जरदूतानें विलयवादास सूचना केली.

विलयवाद कैदीस म्हणतोः—"तुझ्या धैर्याची कसोटी दाखविण्याची तुला संधि पाहिजे होती, ती ही पहा येऊन पोंचली आहे!"

"कबूल!" शिलादित्य उत्तर करितो. "पण मीं करावयाचें काय हें मला कळलें पाहिजे!"

"विशेषसें कांहीं नाहीं! आपल्या अंगांतील कपडे काढून या ठिकाणीं दंडवत् आडवा पड!"

शिलादित्यानें त्याप्रमाणें केलें, व तो मोठ्यानें 'अलिहंता'ची प्रार्थना करूं लागला.

विलयवाद त्यास दरडावून बोलतोः—

स्परांविषयीं आपलीं मनें कशीं आहेत हें आतां परस्परांस कळलें आहे. याबद्दल आतां कांहींएक बोलायचें नाहीं. राणीसाहेबांच्या शत्रूंचा पाडाव होऊन त्यांच्या सर्व चिंता जोंपर्यंत दूर झाल्या नाहींत तोंपर्यंत मी 'आपली **नलिनी**' नव्हे, तर राणीसाहेबांच्या इतर तिघी मैत्रिणींसारखीच त्यांच्या हिताविषयीं झटणारी एक चवथी. ह्मणून आपण दोघांनींही या एका गोष्टीकरितां होईल तितकें झटलें पाहिजे. आणि मग—— "

" आणि मग तरी हा प्रिय हस्त सर्वांदेखत माझ्या स्वाधीन करशीलना खचित?" **कुमुद्बंधूनें** कांहींसें हांसत विनोदानें विचारिलें, आणि या निमित्तानें फिरून तिचा हात आपल्या हातांत घेतला.

" नुसता हातच काय? त्या हाताबरोबर सबंध देह आणि पंचप्राण सुद्धां घेतल्याशिवाय का राहणार मग आपण ? " **नलिनीनें**ही विनोदानें पण सलज्ज होऊन उत्तर दिलें; आणि कांहीं क्षणपर्यंत तशीच मान खालीं करून उभी राहिली, व तिनें आपला हात आपल्या प्रियकराच्या हातांत क्षणभर तसाच राहूं दिला.

थोड्याच वेळानें आपला हात सोडवून घेऊन ती **कुमुद्बंधू**पासून चट्दिशीं दूर झाली, आणि त्याचा निरोप घेऊन राणीच्या दिवाणखान्याकडे परत चालती झाली.

" ज्याप्रमाणें अंधकारमय रात्र येऊन गेली म्हणजे तेजःपुंज सूर्याचा उदय होतो, त्याप्रमाणें दुःखापाठीमागून आनंद येणें हें स्वाभाविकच आहे. " **कुमुद्बंधू** संतोषयुक्त अंतःकरणानें आपल्या खोल्यांकडे जात असतां म्हणतो.

असो. दुसऱ्या दिवशीं **कुमुद्वती** राणी आपल्या सर्व परिवारासह **शैलावलीहून** **कुवलयपुरा**कडे चालती झाली, व आपल्या राजधानीच्या शहरीं सुखरूप जाऊन पोंचली. तेथें पोंचल्यानंतर लागलींच या राजकीय विवाहाच्या मंगलविधीची तयारी मोठ्या कडाक्यानें सुरू झाली. जिकडे तिकडे आज्ञापत्रें विवाहपत्रिका भराभर सुटूं लागल्या. **गूहसिंहा**कडेही पत्रिका रवाना झाली. **प्रद्युम्नरायास** ज्या ज्या देणग्या व जे जे मानाचे हुद्दे देण्याचें राणीनें कबूल केलें होतें ते सर्व देऊन त्याची महत्वाकांक्षा बहुतेक अंशीं तृप्त करण्यांत आली. पुढें नेमल्या दिवशीं वैशाख वद्य अष्टमीस विवाहसोहाळा मोठ्या थाटानें झाला. आतां या विवाहाकरितां कोठें कोठें मंडप घातले होते, किती द्रव्य खर्च केलें, काय काय थाट करण्यांत आला होता, दोहों बाजूंचे पाहुणे कोण कोण होते, विवाहसंबंधीं मेजवान्या किती दिवस चालल्या होत्या वगैरे गोष्टींचें वर्णन करीत बसलें तर किती अवकाश लागेल याचा नेम नाहीं. आणि इतकेंही करून नुसत्या वर्णनानें वाचकांच्या मनाची तृप्ति होईलच अशी खात्री नाहीं, म्हणून हा या राजकीय जोडप्याचा विवाहविधि सुरळीत रीतीनें व मोठ्या आनंदानें पार पडला एवढेंच वाचकांस सांगून ठेवितों म्हणजे पुरे.

## भाग ११ वा.

( खरें स्वरूप. )

वाचकहो, चला, आज तुह्मांला **कुवलयपुरांत** नेऊन सोडतों. घ्या तर मग या **गंगा**मातेचें दर्शन. **सह्याद्री**सारख्याच्या उच्च कुलांत जन्म पावल्यामुळें ही पहा कशी शांत व गंभीर वृत्तीनें पतिगृहाचा मार्ग क्रमीत आहे ! हिच्या आश्रयानें असणारे दोन्ही बाजूंचे हे भूभाग पहा, या ऊष्ण कालाच्या दिवसांतही कसे समृद्ध व किती रमणीय दिसत आहेत. औदार्यशील खऱ्या महात्म्यांच्या सान्निध्याचें फळ अशा रीतीनें मिळावें हें स्वाभाविकच आहे. पलीकडच्या कांठावर असणाऱ्या वट, पिप्पल, आम्र, अशोक इत्यादि वृक्षांच्या वाटिका नेत्रांना किती तरी तोष देत आहेत! त्या वाटिकांमध्यें ज्या लहान लहान पर्णकुटिका दिसत आहेत, त्यांत कित्येक यति, महंत सुखानें आश्रय करून तपोनुष्ठानांत गुंग आहेत! ते जलप्रवाहासन्निध असणारे घांट स्त्रीपुरुषांच्या समूहानीं भरून गेल्यामुळ किती तरी सुशोभित झालेले दिसत आहेत. त्या पहा, जलप्रवाहांत निरनिराळ्या स्थळीं अधिष्ठित असलेल्या नानाप्रकारच्या रंगांनीं चित्रविचित्र केलेल्या लहानमोठ्या नौका दिसत आहेत. पलीकडचीं तीं देवालयें आपल्यास दिसलीं का? स्नानादि विधि आटपून त्या पहा पुरुषयुवतींच्या रांगा कशा देवदर्शनार्थ तिकडे लगबगीनें चालल्या आहेत. अहाहा! हा रम्य दृग्विषय पाहून येथेंच बसून काळ घालवावा असें तुम्हांला नाहीं का वाटत? पण उठा, पुढें सरा, दोनप्रहरचा समय होत आला. या रस्त्याच्या दोहों बाजूंनीं हीं उपवनें पहा, कशीं एकाला एक लागून राहिलीं आहेत! **कुवलयपुरां**तील श्रीमान् गृहस्थांच्या ह्या विहारभूमिका होत. या पहा, येथून सुंदर गृहांच्या हारी सुरू झाल्या. हा शहराच्या कोटाबाहेरील भाग. हा कोट किती भव्य व किती बळकट दिसत आहे पहा. या बुरुजाकडे पाहून वाटतें कीं, आपल्या आश्रयानें राहणाऱ्या **कुवलयपुरी**च्या रक्षणाविषयीं सदां दक्ष असणारे हे कोणी महापुरुष आपलीं मस्तकें वर करून आसमंतात् भागाच्या प्रदेशाचें निरीक्षण करीत आहेत! आंत या चतुष्कोनी लहानमोठ्या घरांच्या पंक्ति पाहिल्यात का? हीं गृहें किती निर्मळ आणि किती नीटनेटकीं दिसत आहेत! या दरवाज्यावरील अलिंदभूमिका, हीं स्वच्छ भिंतींवरील ऐतिहासिक व पौराणिक पुरुषांचीं व समयांचीं चित्रें,—हीं पाहून तुह्मांला सकौतुक संतोष नाहीं का होत? हे रस्ते पहा, किती विस्तीर्ण, किती स्वच्छ आणि मनुष्यांच्या गर्दीनें किती गजबजून गेलेले दिसत आहेत! हे मधून मधून मोठमोठे वाडे दिसतात, हीं **कुवलयपुर**च्या गादीच्या आश्रयानें असणाऱ्या निरनिराळ्या सरदारांचीं निवासस्थानें. चला आतां पुढें. हा डावे हाताकडे वळलेला मोठा रस्ता कोणीकडे जातो हें तुम्हीं विचारणारच नाहीं. ही शहरची मुख्य पेठ आहे व येथें सर्व दिवसभर एकसारखी मालाची व पैशाची देवघेव चालत असेल, असें या गर्दीवरून तुह्मांला

सहज नाहीं का अनुमान होत? नका या गर्दीत शिरूं; समोर पुढें चला. तें पहा, जगदंबेचें विस्तीर्ण मंदीर! अहाहा! सहस्ररश्मीच्या अत्यंत उज्ज्वल करांनीं तेजोमय दिसणारीं हीं अनेक शिखरें, मुख्य मंदिरांतून, व आसमंतात् भागांतील उपदेवतांच्या मंदिरांतून उत्पन्न होणारा हा घंटानाद, मनोहर वाद्यांचे हे ध्वनि, हे गायनालाप, वेदपठनरत ब्राह्मणांचे हे गंभीर व उदात्त स्वर हे किती कर्णमनोहर होताहेत! शिरा या महाद्वारानें आंत. पहा या प्रांगणभूमिकेंतील जलयंत्रांतून कसे फवारे उडत आहेत! हीं आजूबाजूंस तीर्थें दिसत आहेत, यांचें दर्शन घेऊन मार्जन करा, आणि आतां अंबामंदिरांत जाऊन जगदंबेच्या दर्शनाचा लाभ करून घ्या. ही या अंबामंदिरांतील स्तंभरचना, या निरनिराळ्या देवतांच्या मूर्ति, हें एकंदर मंदिराचें खोदीव व कोरींव काम पाहून मूळरचना करणाऱ्या कारागिराच्या विशाल व दैविक बुद्धीचें तुम्हांला अत्यंत आश्चर्य नाहीं का वाटत? आणि ही मनुष्यकृति नसून दैविककृति असावी असा विचार तुमचे मनांत क्षणमात्र येत नाहीं का?

चला उठा आतां येथून. सायंकाळ होत आला. या पूर्वाभिमुख द्वारानें बाहेर पडा आणि लागलींच या पलीकडच्या कमानींतून राजवाड्याच्या प्राकारांत प्रवेश करा. कुमुद्वतीच्या पूर्वजांनीं फार प्राचीन काळापूर्वी हा राजवाडा प्रथम बांधिला. प्रस्तुतच्या इमारतींत व प्रथमतः बांधिलेल्या इमारतींत फारच फरक पडला आहे. निरनिराळ्या राज्याधिकारी व्यक्तींनीं रुचिवैचित्र्यानुसार अनेक प्रसंगीं या इमारतीच्या निरनिराळ्या भागांत कांहीं कांहीं फेरफार केले; पण या वाड्याला आलेल्या प्रस्तुत सौंदर्याचें श्रेय मुख्यत्वेंकरून कुमुद्वतीराणीकडेच आहे. निरनिराळ्या दूरदूरच्या देशांहून कुशल कारागीर आणवून त्यांच्या कल्पनेनें वाड्याचे पृथक् पृथक् भाग एकत्र जोडून ते सर्व मिळून पाहिले असतां एकमेकाशीं शोभून दिसावे, आणि त्यांत सर्वत्र कौशल्याची सीमा झालेली दृष्टीस पडावी, म्हणून या तरुण राज्ञीनें अगणित द्रव्य खर्ची घातलें आहे. ह्या इमारतीची बाह्य शोभा व रचना पहात क्षणभर उभें राहिलें असतां प्रेक्षकाचें मन नानाविकारांनीं व्याप्त होऊन सानंदाश्चर्यचकित होऊन जाणें स्वाभाविकच नाहीं काय? काष्ठपाषाणादिकांच्या रचनेनें केलेलें हें राजकीय भवन नसून भिन्न भिन्न देशांतील मोठमोठ्या कारागिरांच्या प्रचंड बुद्धिसामर्थ्याचा, अद्वितीय योजनाचातुर्याचा, अतर्क्य रचनाकौशल्याचा, आणि विलक्षण शिल्पज्ञानाचा हा कुवलयपुरांत एक पुंजच करून ठेविला आहे असें नाहींका भासत? पण वाचकहो, येथेंच रमून जाऊं नका. ही पहा, या राजभवनापलीकडे विस्तीर्ण उद्यानभूमिका दिसत आहे, तींत प्रवेश करा. या उद्यानभूमीची ही रचना पहातांच तुम्हांला वाटेल कीं इंद्रभुवन ह्मणतात तें हेंच! सुंदर हिरव्या गार दूर्वांकुरांनीं मंडित केलेल्या वर्तुलादि आकृतींच्या निरनिराळ्या भूभागांत नानाविध रंगांच्या पुष्पांनीं व तुऱ्यांनीं भरून गेलेल्या या लहान लहान

मंडपांची ही रचना किती मनोहर दिसते! मंद वायूनें किंचित् हलणाऱ्या या लता व हे वृक्षांचे ताम्र पल्लव पहा कसे तुह्मांला आपल्याकडे बोलावीत आहेत? हे पहा, लहान लहान तरु कातरून तयार केल्यामुळें हस्तिमयुरादि पशुपक्ष्यांचे आकार धारण करून उद्यानपालकांचें कौशल्य दाखवीत आहेत. उद्यानभूमिकेच्या मध्यभागीं असलेलें हें कृत्रिम सरोवर कमलकलिकांनीं व प्रफुल्लित पुष्पांनीं कसें भरून गेलें आहे पहा! या सरोवरांत हे निरनिराळ्या रंगांचे मत्स्य कसे निर्भयपणें क्रीडा करीत आहेत! या नानाविध पुष्पतरूंच्या वाटिका किती रमणीय दिसत आहेत? हे आम्रवृक्ष पहा, फलभारानें आपल्या माना लववून पक्षिसमुदायास आपल्या फलांचें रसास्वादन करण्याकरितां आदरानें पाचारण करीत आहेत! पलीकडेच त्या मंडपांवर त्या द्राक्षवल्ली दिसताहेत त्या पाहिल्यात का? ज्या भूमिमातेपासून आपल्यास पोषण मिळालें तिच्या संतोषार्थ आपल्या सरस व मधुर अशा फलांचे गुच्छ तिजपुढें सादर करून आपली कृतकृत्यता दाखवीत आहेत! इकडे पहा हीं जलयंत्रें, जलबिंदुरूप मौक्तिकांचा कसा सभोंवार वर्षाव करीत आहेत! हीं संगमरवरी पाषाणाचीं आसनें तुम्हीं त्यांचा स्वीकार करावा म्हणून सर्वत्र उत्सुक झालेली दिसत आहेत! हे लहानमोठे पदपथ त्यांवर पसरलेल्या निरनिराळ्या रंगांच्या वालुकांनीं आणि दोहों बाजूंस असलेल्या वृक्षराजींनीं किती प्रेक्षणीय दिसत आहेत! हे वृक्षकुंज व लतामंडप शांतिसुखाचीं मंदिरें बनून या उद्यानभूमींत संचार करणारास क्षणमात्र आमचा उपभोग घेऊन पहा म्हणून सांगत आहेत! हें सर्व सौंदर्य पाहून तुमचें मन तल्लीन झालें असेल खरें पण हा इकडे मोठ्या श्रमानें व मेहनतीनें संग्रहित केलेला पशुपक्षिसमूह आहे याकडेही तुमचें लक्ष वळलेंच पाहिजे. सिंहव्याघ्रादि क्रूर प्राण्यांपासून ते तहत् हरिणशशकादि अत्यंत निरुपद्रवी प्राण्यापर्यंत सर्व प्रकारचे पशु आणि हंसगरुडापासून काकचटकापर्यंत सर्व प्रकारचे पक्षी निरनिराळ्या देशांतून व निरनिराळ्या अरण्यांतून महत्प्रयासानें संपादन करून त्यांचा येथें संग्रह केलेला आहे. या एका संग्रहालयानें या उद्यानाचा केवढा भाग व्यापून टाकला आहे हें पाहून तुम्हीं थक्क होऊन जाल.

पण हें सर्व राहूं द्या. हे **विनयादित्य** मामा कपाळास आंठ्या घालून खिन्न मुद्रेनें या सायंकाळच्या रम्य वेळीं त्या पदपथावरून आपल्याच मनाशीं कांहीं विचार करीत अगदीं मंद मंद पावलें टाकीत फिरत आहेत, त्यांच्याकडे प्रथम लक्ष द्या.

"हें खरेंच असेल काय?" मामा आपल्या मनास विचारतात; "त्याचा स्वभाव आणि त्याचें वर्तन ह्यांबद्दल माझें अनुमान इतकें चुकलें असेल? मी इतका फसलों असेन का? कदाचित् त्याच्या मनाला हा तत्कालीन उन्माद तर झाला नसेल? वैभवाच्या अत्युच्च शिखरावर अकस्मात् जाऊन पोंचल्यामुळें त्याच्या दृष्टीस मोह तर झाला नसेलना? असेंच असेल तर देवा, किती चांगलें होईल! पण दम धरा—कोणाचीं तरी पावलें ऐकूं येताहेत!"

असें ह्मणून त्या ह्मातार्‍यानें खेदजनक विचारांनीं कष्टी झालेली आपली मुद्रा नेहमींप्रमाणें शांत व गंभीर केली आणि पलिकडच्या लताकुंजाकडे तो पाहतो तों, ज्याच्या संबंधानें तो आपल्या मनाशीं बोलत होता तेच गृहस्थ समोरून येत असतांना त्याला दिसले. हे गृहस्थ कोण ह्मणाल तर, आपले पूर्वीचे **प्रद्युम्नराय मौर्य. कुमुद्वतीराणीशीं** यांचा विवाह झाल्यामुळें हे हल्लीं **पंचगांग**चे राजे बनले होते. स्वारींच्या अंगावर अत्यंत मौल्यवान् पोषाख होता. गर्वानें नखशिखांत फुगून गेलेले दिसत होते. व्यसनासक्ति आणि विषयोपभोगेच्छा चेहेर्‍यावर व्यक्त झालेलीं दिसत होतीं. पाऊल किंचित् अस्थिरपणें पडत होतें. अलीकडे मदिरादेवीची भक्ति मनःपूर्वक चालली असल्यामुळें डोळ्यांत एक चमत्कारिक प्रकारचा रक्तिमा आला होता. स्वारींच्या चलनवलनावरून असें सहज अनुमान होत होतें कीं, महाकाली मधुरूपी मधुर प्रसाद सेवन करून फारसा अवकाश गेला नसावा. बरोबर अनुचर वगैरे कोणी एक नव्हते. ही स्थिति पाहून त्यास चुकवून बाजूनें निघून जावें असा विचार मामांच्या मनांत आला. पण तसें करण्याची सोयच नाहींशी झाली. कारण स्वारी एवढ्या अवकाशांत **विनयादित्य** मामांच्या बरीच जवळ येऊन ठेपली आणि मामांस हांक मारून जवळ बोलाविलें.

"ओहो, मामा, तुह्मीं का ते !" राजे **प्रद्युम्नराय** ओरडून ह्मणाले. त्यांच्या ह्या हांक मारण्याच्या प्रकारांत देखील त्यांचा अहंकार आणि कुत्सितपणा सहज व्यक्त होत होता. "तुह्मींच का ते ! असो; हरकत नाहीं. या बागेंत फक्त राजघराण्यांतील माणसांना किंवा अत्युच्च स्थितींतील श्रीमान् सरदारमंडळींना हिंडण्याफिरण्याची परवानगी आहे हें खरें; तथापि तुमच्यासारख्या एकाद्या गृहस्थास या जाग्याचा क्षणभर उपभोग घेण्याची आह्मीं मोकळिक देतों."

वरील भाषणानें आपली प्रत्यक्ष अवहेलना झाली, तथापि आपलें मन तसेंच आंवरून मामा ह्मणतात, "मी या ठिकाणीं येणें हें अयोग्य असें जर महाराजांस वाटत असेल तर यापुढें असला अतिक्रम न घडण्याविषयीं मी खबरदारी ठेवीन."

"तुह्मीं केव्हां केव्हां क्षणभर या बागेंत आलां तथापि हरकत नाहीं," **प्रद्युम्नराय** ह्मणतो; "तुह्मांस आह्मीं परवानगी देऊन ठेवितों. पण ह्यामुळें आपण कोण व आपली स्थिति काय, हें मात्र तुह्मी विसरूं नका. कदाचित् तुह्मी **कुमुद्वतीं**चे मामा ह्मणून व्यर्थ अभिमानानें फुगून जाल आणि यापूर्वी जें तुमचें सर्वत्र वर्चस्व होतें तेंच आतां गाजवूं पहाल तर तें मात्र चालणार नाहीं. हें तुह्मांला कळावें ह्मणून मी तुह्मांस अशा रीतीनें एकेक गोष्ट सुचवून ठेवितों."

या भाषणानें तर मामांस फारच संताप आला आणि दुःखही वाटलें; तथापि तें सर्व गिळून टाकून ते कांहींशा उदासीन स्वरानें ह्मणाले, "या देहांत अभिमानाचा शिरकाव कधींही होऊं नये व इतरांवर वर्चस्व मिळविण्याची बुद्धिही कधीं मनांत

उत्पन्न होऊं नये, अशी व्यवस्था परमेश्वरानें मी उपजतांच करून ठेविली आहे. शिवाय माझ्या स्थितीची मला आठवण व्हावी व मी सावध रहावें ह्मणून कधीं कधीं दोन शब्दांचा उपयोग करणारीं माणसेंही मला भेटतात!"

**प्रद्युम्नराया**चा स्वभाव जात्याच चिडखोर होता, त्यातून **कुमुद्वती**च्या प्रेमाचें चिलखत अंगावर चढल्यामुळें त्या चिडखोरपणाला बराच जोरही आला होता. शिवाय मदिरादेवीच्या प्रसादानें असल्या गुणाचें संवर्धन होऊं नये तर मग तिची भक्ति करून उपयोग तरी कोणता? मामांच्या वरील सौम्य भाषणानें सुद्धां स्वारी अगदीं बिथरून जाऊन ह्मणाली, "कायहो मामा, क्षणमात्र मी आपलें उच्चपद विसरून जाऊनही तुमच्या हितासाठीं ह्मणून सदुपदेशाचे दोन शब्द सांगूं लागलों, तर त्यामुळें तुमची अगदीं मानखंडना झालीसें तुह्मांला वाटलें काय? कदाचित् तुह्मांला असें वाटत असेल कीं, मजवर तुमचे उपकार आहेत आणि त्यांची फेड मजकडून झालेली नाहीं. होयना? बोला आतां स्पष्ट, सर्व गोष्टी एकवार स्पष्ट झालेल्या बऱ्या."

"कोणत्या गोष्टी आतां स्पष्ट व्हावयाच्या उरल्या आहेत? आपण आतां राजाधिराज झालां आहांत आणि मी अगदीं हलकट व अत्यंत क्षुद्र असा एक प्राणी आहें. असें आपण आतांच मला सांगितलें." मामांनीं उत्तर केलें.

"पहा फिरून आणखी तेंच!" **प्रद्युम्नराय** तिरसटपणानेंच ह्मणतो. "तुमच्या खऱ्या नीच स्थितीची आठवण करून देऊन तुह्मांला शुद्धीवर आणणाऱ्याचे उपकार स्मरावे तें सोडून उलट त्याबद्दल तुह्मीं नाराज झाल्यासारखे दाखवितां; पण मी कोण आहें हें तुमच्या ध्यानांत आहे ना? माझें जन्म राजकुळांत आहे आणि आतां तर मी **पंचगांग**चा प्रत्यक्ष राजा झालों आहें, हें तुह्मी विसरलां नसालच! तसेंच तुह्मी नुस्ते **महेश्वर**प्रांतांतल्या चार बिघे वाळवंटाचे इनामदार असून **कुमुद्वती**च्या लोभामुळेंच येथें पोट भरीत आहां हेंही पण तुमच्या लक्षांत असेलच!"

"होय, महाराज," मामा तसेच शांतपणें उत्तर करतात; "मी सर्व जाणून आहें, पण राणीसाहेबांचा जो मजवर लोभ आहे त्याचा मीं कधीं दुरुपयोगही केलेला नाहीं किंवा त्यांच्याशीं मी कधीं कृतघ्नही झालों नाहीं."

"अलबत झालां आहांत. मी तुह्माला हें सिद्ध करून देतों." **प्रद्युम्नराय** अधिक चिडून ह्मणतो. "लक्ष देऊन ऐका मी काय ह्मणतों तें. तुमची व माझी अशा रीतीनें येथें गांठ पडली हें फार चांगलें झालें. तुह्मांला एकवार स्पष्टपणें माझे विचार कळावे हेंही कांहीं वाईट नाहीं. अलीकडे कांहीं दिवस झाले, तुह्मी मजकडे कांहीं विलक्षण दृष्टीनें पहात असतां. नाहीं ह्मणण्याची छाती नाहीं तुमची! मी इतका फसणारा नाहीं! ह्यातारबोवा शहाणपणाच्या घमेंडीत तुह्मीं असल्यामुळें तुह्मांला वाटतें कीं, **प्रद्युम्नराय** हा बुद्धीनें, ज्ञानानें व गुणांनीं राजपदास योग्य नाहीं. खरें

कीं नाहीं बोला. तुमच्या या वरवरच्या दांभिकतेनें मी फसणारा मनुष्य नव्हे."

"काय ह्मणतां, महाराज? दांभिकता?" वृद्ध मामांच्या शांतवृत्तींत थोडीशी चलबिचल होऊन ते ह्मणतात. "काय मजवर दांभिकतेचा आरोप! महाराज, कृपा करा. मी या आरोपास पात्र नाहीं."

"बोला तर, तुमची दृष्टी मजकडे आतांशा अशी चमत्कारिक कां असते, बोला." **प्रद्युम्नराय** ह्मणतो.

वृद्ध मामांची नेहेमीं निर्विकार दिसणारी मुद्रा इतक्या अवकाशांत बरीच पालटत चालली होती. आतां तर तिच्यांत फारच फरक पडला. आदरानें खालीं लवलेली मान एकदम वर झाली, आणि त्या मोठ्या डोळ्यांत एक प्रकारचें तेज चमकूं लागलें. ते नेहमींपेक्षां थोड्या उच्च व सकंप स्वरानें ह्मणाले, "मीं स्पष्टपणानें बोलावेंच अशी महाराजांची इच्छा आहे काय?"

"होय, होय, मी तुह्मांला आज्ञा करतों, तुम्हीं स्पष्ट बोला." **प्रद्युम्नराय** मामांच्या बदललेल्या मुद्रेकडे पहात ह्मणाला, आणि ह्माताऱ्याला अधिक चिडविण्याकरितांच कीं काय कोण जाणे शेवटीं एकवार हा, हा, हा करून तिरस्कारदर्शक स्वरानें स्वारी हंसली.

"महाराजांची आज्ञाच होत आहे तर मला बोललेंच पाहिजे." मामा त्या हंसण्याकडे लक्ष न देतां ह्मणाले. "महाराज, मी कदाचित् अगदीं क्षुद्र माणूस असेन; पण कांहीं कालपर्यंत महाराजांच्या अत्यंत प्रेमाला आणि विश्वासाला मी पात्र झालों होतों असें मला तरी पक्कें स्मरतें. **कुमुद्वती**राणीवर आपलें प्रेम बसलें ही अत्यंत गुह्य गोष्ट प्रथमतः आपण मजपाशींच काढली होती, आणि तिचें अंतःकरण आपल्याविषयीं कसें आहे याचा अंदाज काढण्याचें काम आपण अतिविश्वासानें मजवरच सोंपविलें होतें. मीही तें काम फार संतोषानें पतकरलें, आणि माझ्या हातून होणारे सर्व उपाय करून आपणा दोघांमधली प्रेमरज्जु सुदृढ व्हावी ह्मणून फार झटलों. आणि हें कशाकरितां तर मला वाटलें कीं **पंचगंगा**च्या राणीचें पाणिग्रहण करण्याविषयीं जेवढे लोक उत्सुक होते, त्या सर्वांत आपणच अधिक योग्य होतां अशी माझ्या मनाची खात्री झाली होती ह्मणून. शिवाय आपण प्रथमपासून मजवर जें प्रेम दाखवीत होतां त्यामुळें माझें अंतःकरण आपल्या ठिकाणीं बद्ध झालें होतें; आणि ह्या गोष्टीचाही कांहीं अंशीं माझ्या मनावर परिणाम होऊन आपल्या आणि राणीसाहेबांच्या पूर्ण सुखास कारणीभूत होणारी ही गोष्ट घडवून आणण्याकरितां मीं हे प्रयत्न केले."

**प्रद्युम्नराया**चा चेहेरा संतापानें अगदीं तांबडानिळा होऊन गेला होता, आणि एकाद्या हिंस्रकपशुप्रमाणें त्याची दंतपंक्ती त्याच्या फिकट झालेल्या अति लहान ओष्ठांच्यामधून दिसत होती. तो ह्मणतो, "हं, बोला, पुढें बोला."

"मी आपल्याला असेंही पण स्पष्टपणें सांगतों," मामा ह्मणतात, "कीं आपल्या दोघांच्या संबंधानें माझ्या **कुमुद्वती**चें सौख्य

सर्वांशीं साध्य होईल ही कल्पना जर माझ्या मनांत भरून गेली नसती, तर मी ह्या कृत्यास कधींही सहाय झालों नसतों, एवढेंच काय पण हा संबंध घडूं देण्यापेक्षां मीं आपल्या प्राणावरही पाणी सोडलें असतें! आणि महाराज आपण ह्मणतां कीं, मी आतांशी आपल्याकडे चमत्कारिक दृष्टीनें पाहण्याचें धाष्टर्य करतों. होय, ही गोष्ट अगदीं खरी आहे. आपली आज्ञाच झाली आहे तर मग आतां स्पष्टपणें बोलण्याचेंही मी धाष्टर्य करतों. महाराज, आपल्या विवाहाचा सोहाळा आटपून अद्याप एक महिनाही झाला नाहीं! जिच्या सुखाकरतां आपला प्राणही खर्च करीन, जिचा संतोष राखण्याकरतां सदा तत्पर राहीन, ह्मणून आपण मजजवळ सहस्र वेळां शपथा वाहिल्या आहेत, त्या तुमच्या गृहिणीविषयीं—त्या तुमच्या राज्ञीविषयीं—तुमची बेपर्वाई इतक्यांतच दिसूं लागावीना? महाराज, मी हें रागामुळें बोलतों असें समजूं नका. आपल्यास दोष लावावा ह्मणून मी असें बोलतों असें मानूं नका. मी आपली अति नम्रपणें विनवणी करतों, आपल्यापाशीं ही भिक्षा मागतों, असें कृपा करून समजा. माझें अंतःकरण विव्हल होऊन मी बोलत आहें! महाराज, आपल्या स्वतःच्या सुखाविषयीं तरी कांहीं विचार करा! प्रस्तुत स्वीकारलेला क्रम आणखी कांहीं दिवस चालविल्यास व्यसनडोहाच्या तळाशीं आपण जाऊन पोंचाल! ज्या तरुण मित्रांच्या झुंडी तूर्त आपल्या सभोंवतीं इतक्या अल्प अवकाशांत गोळा झाल्या आहेत, त्या आपल्या हिताकरितां नव्हेत! आपल्याला शत्रु किती आहेत व ते कसे टपून बसले आहेत हें लक्षांत घ्या. ज्या राज्यपदाचे आपण वांटेकरी आहांत त्याचा मान राखा. हा ह्मातारा कसाही असला तथापि प्रस्तुत पद आपल्याला मिळण्याच्या अगोदरही जो आपल्या हिताविषयीं चिंता वहात होता तोच हा, हें जाणून त्याच्या शब्दांचा विचार करा!"

"संपलें का तुमचें पुराण!" प्रद्युम्नराय तिरस्कार व संतापयुक्त मुद्रेनें ह्मणाला. लागलीच उत्तर येण्याची वाट न पाहतां मामासमोर चेहरा वळवून बोलतो, "अरे ह्माताऱ्या, तूं मला गोष्टी सांगतोस होय! मी या देशाचा राजा आहे आणि तूं केवळ एक क्षुद्र जंतु आहेस हें विसरलास वाटतें? मला तुझ्याबद्दल बरेच दिवस संशय होता. पण आतां तुझें अंतरंग मला स्पष्ट दिसूं लागलें! तूं आजपर्यंत कातडें पांघरलें होतेंस तें गळलें आतां! तुला पूर्वीं वाटलें होतें कीं राणीशीं लग्न करण्याच्या कामीं तूं मला साहाय्य केलेंस, ह्मणजे मी चांगला तुझ्या हातांत सांपडेन आणि मग मी राजा झाल्यावर मला हवे तसें बाहुल्याप्रमाणें नाचवितां येईल! तुला आजपर्यंत खचित वाटत होतें कीं मी ह्मणजे काय एक कोंवळें पोर! पण थेरड्या आतां दिसलें का तुला मी काय आहे तो? उंटोबा, तुझ्या मनांतून मला तुझी एक खेळायची वस्तु करायचें होतें, नाहीं? पण मी तुझा धनी आहें व तुझ्याहून अधिक शहाणा आहें हें आतां तरी नीट उमज.

नीचा, तुझें तें खरबुजी तोंड वर करून मला उपदेश करण्याचा आव घालतोस होय? वांकीव ती वांकडी झालेली मान खालीं आणि माग आपल्या राजापाशीं जीवदान! आणि त्यानें तुला अद्याप लाथेनें उडवून चुरडून टाकिलें नाहीं याबद्दल त्याचे उपकार मान!"

वृद्ध मामांनीं हे सर्व हलकट शब्द व मिथ्यारोप शांतपणें सहन केले. **पंचगांग**देशाचा राजा बनलेला हा **प्रद्युम्नराय** आपला अपमान करण्याकरितां आपल्यावर हा अपशब्दांचा मार करीत आहे असें त्यांनीं मानलें नाहीं, तर आपली प्रिय कन्या जी **कुमुद्वती** तिचा हा प्रियकर सुरेच्या उन्मादांत अविचारानें कांहीं तरी बरळत आहे, असें समजून ते स्वस्थ राहिले. मामांना राग कमी होता, किंवा तो म्हातारा अभिमानी नव्हता असें नाहीं, तसेंच राजदरबारांतील कित्येक तोंडपुजे लोकांसारखी यजमानाच्या पादधूलीची त्यांना खरी माधुरी समजून तिच्याकडे त्यांची जिव्हा धांव घेत असे असेंही मुळींच नव्हतें! पण एक **कुमुद्वती**च्या ठिकाणीं अतिप्रेम व अतिनिष्ठा असल्यामुळें **प्रद्युम्नराया**सारख्या ओंठावरचा जारही न वाळलेल्या पोरानें गर्वाच्या आणि दारूच्या धुंदींत यांना हवें तसें कुशब्दांनीं ताडन केलें असतां, त्यांनीं तें निमूटपणें सहन केलें. दुष्ट व हलकट जामातांच्या मान्यस्थ व अनुभविक श्वशुरांस मामांनीं असें कां केलें याची अंशतः तरी कल्पना करतां येईल!

असो, इतकें झालें तरी मामा उदासीन मुद्रेनें व गंभीर स्वरानें या उन्मत्त पोराला आळविण्याच्या इच्छेनें म्हणतात, "महाराज, माझें हृदय फाडून त्यांत काय आहे हें जर आपण उघडून पहाल, तर आपल्याला कळेल कीं आपण केलेल्या आरोपांस मी मुळींच पात्र नाहीं. अंतःकरणाला उमाळा आल्यामुळें मी आपल्याशीं अशा रीतीनें बोललों. आपण थोडा विचार केला तर आपण जे अपशब्द उच्चारले त्यांबद्दल आपल्यासही वाईट वाटेल.--पण देवा! आतां तूंच त्राता!"

एकाएकीं **विनयादित्य** मामांचा चेहेरा पराकाष्ठेचा भयचकित झाला, आणि तोंडांतून शब्दही अतिशय घाबरल्यासारखे व भीतिदर्शक निघाले. पण प्रसंगही तसाच दारुण होता. मामा आणि **प्रद्युम्नराय** बोलत बोलत पशुसंग्रहालयापैकीं ज्या भागांत व्याघ्रसिंहादि हिंस्र पशू ठेविले असत त्याच भागांत येऊन पोंचले होते. पशु ठेवण्याकरतां जे पिंजरे केलेले होते त्या प्रत्येकांत दोन दोन खोल्या असून मध्यें एक लोखंडी गजांची चौकट असे. मधली चौकट पाडून एका खोलींत त्या भयंकर पशूस कोंडून ठेविलें म्हणजे निर्भयपणें दुसरी बाजू स्वच्छ करतां येत असे. पिंजऱ्याच्या दोन्ही खोल्यांस पुढून उघडतां येण्यासारखीं मोठीं लोखंडी गजांचीं दारें होतीं. जो प्रसंग आम्हीं येथें वर्णन करणार तो कसा गुजरला हें कळण्याकरतां येवढी माहिती वाचकांस मध्येंच देणें भाग पडलें.

मामा आपलें शेवटचें भाषण बोलत असतां त्यांची दृष्टि सहज या पिंजऱ्याकडे गेली. तों ज्या एका पिंजऱ्यांत एक भयंकर सिंह कोंडून ठेविला होता त्याचें एक दार

उघडें असून तो भयंकर पशु बाहेर पडण्याच्या बेतांत आहे असें त्यांना एकाएकीं दिसलें. फक्त एक उडीचेंच काम, कीं तो क्रूर पशु यांच्यापर्यंत येऊन पोंचला असता. हा भयंकर प्रकार दृष्टीस पडल्यामुळेंच मामांच्या तोंडून 'देवा, आतां तूंच त्राता!' हे उद्गार बाहेर पडले.

मामांच्या तोंडून निघालेले हे भयप्रदर्शक उद्गार ऐकून आणि त्यांचा शब्द व चेहरा असा अकस्मात् पालटलेला पाहून **प्रद्युम्नराया**ची दृष्टि त्या उघड्या पिंजऱ्याकडे वळली. त्याबरोबर त्याची फारच गाळण झाली. भीतीनें त्याचे पाय लुले पडले! भयाच्या पहिल्या झटक्यासरशीं तो खालींही पडला असता, पण एकादें पोर जसें आईच्या गळीं जाऊन पडावें किंवा नदींत बुडणाऱ्या माणसानें ज्याप्रमाणें शत्रुमित्र न पहातां प्राणरक्षणाकरितां सन्निध असणाऱ्या कोणाच्याही गळ्यास मिठी घालावी, त्याप्रमाणें **प्रद्युम्नराया**नें झट्दिशीं मामांच्या गळ्यास मिठी घातली! इकडे तो सिंहही उडी मारून बाहेर पडण्याकरतां उठूं लागला!

"महाराज, यावेळीं थोडें धैर्य कराल तर बचाल! त्वरा करा! त्या पिंजऱ्याच दुसऱ्या खोलींत धांवा! मधली चौकट पाडलेली आहे!" स्वतःच्या रक्षणाचे विचार विसरून मामा **प्रद्युम्नरायास** ह्मणतात.

ह्या शब्दांबरोबर **प्रद्युम्नराया**च्या लुल्या झालेल्या पायांत एकदम चेतना आली. जीवितरक्षणाची आशा दिसतांच त्याच्या अंगांत विद्युल्लतेची चपलता आली---त्यानें पिंजऱ्याच्या रिकाम्या खोलीकडे धांव मारली; आंत शिरला; दार एकदम पाडलें आणि आपला जिव बचावला! ह्या सर्व क्रिया एका निमिषार्धांत झाल्या! पण तितक्याच जलदीनें इकडे आणखी एक गोष्ट घडली: धाडकन् दार वाजतांच लागून असलेल्या उघड्या खोलींतून सिंहानें बाहेर उडी मारली; आणि लागलीच बापडा वृद्ध मामा त्या यमदूताच्या तीक्ष्ण पंजाखालीं जमीनदोस्त झाला!

पण त्याचक्षणीं, त्याच भयंकर दारुण प्रसंगीं, एकदम पावलांचा आवाज ऐकूं आला, आणि अंगावर चिलखत धारण केलेला, व हातांत नागवी तलवार घेतलेला, एक योद्धा, प्रत्यक्ष परमेश्वरानें पाठविल्याप्रमाणें या ऐन बाणीच्या वेळीं पुढें धांवून आला! सिंहाची दृष्टि त्याच्याकडे साहजिकच वळली. त्यानें एकदम मोठी गर्जना करून त्या वीरावर उडी घालण्याकरतां किरण साधलें! वाचकहो, हा योद्धा कोण हें तुह्मी ओळखलेंच असेल. तुमचा **कुमुदबंधु**च तो!

अस्ताचलासंनिध जाऊन पोंचलेल्या सूर्याचे पीतवर्णकर **कुमुदबंधू**च्या अंगावरील लखलखित चिलखतावर पडून तें अत्यंत चकाकत होतें. हातांतील नग्न तलवार विद्युल्लेखेप्रमाणें देदीप्यमान दिसत होती. **कुमुदबंधू**ची मुद्राही ह्या दारुण समयास उचित अशा त्वेषानें व धैर्यानें उद्दीप्त होऊन फारच उग्र बनली होती. या योद्ध्याचें भयंकर स्वरूप आणि त्याच्या हातांतील शस्त्राचें तेज यांणीं दिपून जाऊन त्या क्रूर पशूनें

**कुमुदबंधू**च्या अंगावर उडी घालण्याचा बेत सोडून देऊन तो दोनचार पावलें मागें सरला. यामुळें **विनयादित्य**मामाच्या अंगावरील भार नाहींसा झाला, आणि त्याच्या पंजांच्या तडाक्यांतून ते क्षणमात्र सुटले; पण साहजिक आपल्या भक्ष्यस्थानीं पडणारा हा मानवी बली टाकून दूर जाण्याची इच्छा त्या क्रूर पशूस होईना. तो कांहींसा भ्याला होता यामुळें त्याची दृष्टि एकदां **कुमुदबंधू**कडे वळे आणि आशेनें बद्ध झाल्यामुळें जवळ निचेष्ट होऊन पडलेल्या त्याच्या भक्ष्याकडे एकवार वळे. त्याच्या पहिल्या गर्जना बंद होऊन आतां नुसती गुरगुर चालली होती. पण वादळाच्या दिवशीं ढगांनीं व्यापून टाकिलेल्या आकाशांतून घातक असा विजेचा लोळ जमिनीवर येऊन आदळण्याच्या अगोदर जसा प्रथम नुसता गडगड आवाज होतो, पण तो पुढील भयंकर कडकडाटाचा सूचक असतो, त्याचप्रमाणें हें गुरगुरणें होतें!

आमच्या योद्ध्यानें सर्व स्थिति ध्यानांत आणून विचार केला कीं, आतां एक पळही गमावून उपयोगीं नाहीं. त्यानें आपली तलवार झट्कन् उलटी करून हातांत घेतली आणि त्या सिंहाच्या अंगावर चाल करून जाऊन त्या तलवारीच्या मुठीनें भला सडकून एक रट्टा त्याच्या मस्तकावर हाणला. त्याबरोबर त्या सिंहाचें मस्तक बधिरच झालें असावें. कारण, त्या तडाक्याबरोबर त्यानें मान खालीं टेंकिली, व एखाद्या कुत्र्याप्रमाणें दीन होऊन तो पडला. **कुमुदबंधूनें** आणखी एक तडाका पाठीवर दिला, व एखाद्या कोंकराप्रमाणें त्याला हांकीत त्याच्या पिंजऱ्याकडे नेलें. पिंजऱ्यांत जाऊन तो पशु आपलें डोकें पुढील दोन पायांच्या मध्यें टेंकून स्वस्थ बसला. त्याबरोबर पिंजऱ्याचें पुढील दार **कुमुदबंधूनें** धाड्कन् पाडिलें आणि त्या स्वतंत्र झालेल्या घातक प्राण्यास पूर्ववत् बंदिवान करून टाकिलें.

**कुमुदबंधु** सिंहाच्या पिंजऱ्यापासून परत मामा जेथें पडले होते तेथें आला. मामाही इतक्या अवकाशांत शुद्धीवर आले होते, पण डोळे उघडून पाहण्याची त्यांची छाती होईना. अंगावरचा बोजा हलका झाला होता खरा, पण आपला भयंकर शत्रु कदाचित् आपल्याजवळच बसलेला असेल असें वाटून मामांनीं आपले डोळे गच्च मिटून धरिले होते. जवळ येऊन **कुमुदबंधू**नें हांक मारतांच मामा एकदम उठून उभे राहिले, व भयभीत मुद्रेनें इकडे तिकडे पाहूं लागले. **कुमुदबंधु** त्यांची दृष्टी ओळखून लागलीच ह्मणाला, "मामासाहेब, त्या क्रूर पशूला मी फिरून पिंजऱ्यांत [illegible]डून टाकिलें."

मामांनीं **कुमुदबंधू**च्या गळ्यास एकदम मिठी मारली आणि कृतज्ञतेनें डोळ्यांत अश्रू येऊन व गळा दाटून येऊन ते ह्मणाले, "**कुमुदबंधुराय गजेंद्र**मोक्षाकरितां जसा **श्रीविष्णु** धांवून आला, तसे या अभाग्याचे प्राण रक्षण करण्यास आपण इतक्या तयारीनें केव्हां व कसे आलांत?"

"तें कांहीं असो," **कुमुदबंधु** ह्मणतो, "आधीं सांगा आपल्याला कांहीं इजा तर झाली नाहींना?"

"नाहीं," मामा ह्मणाले, "देवदयेनें त्या दुष्ट पशूच्या पंजांच्या व दातांच्या सपाटयांतून एखादी देखील जखम झाल्यावांचून मी सुटलों आहेंसें दिसतें."

"बरें," **कुमुदबंधु** ह्मणतो, "**प्रद्युम्नराय महाराज** इकडे बागेंतच आले होते ते सुरक्षित आहेतना?"

"होय, हा पहा मी येथें पूर्णपणें सुरक्षित आहें." राजेसाहेब त्या पिंजऱ्याच्या कोठडींतूनच उत्तर करितात.

लागलीच मामा धांवत गेले, आणि त्या कोठडीचें गजाचें दार वर सारून त्यांनीं **प्रद्युम्नरायांस** मोकळें केलें.

राजेसाहेब बाहेर येऊन ह्मणतात, "सरदारसाहेब, आपण आलांत ही गोष्ट फार चांगली झाली. पण मामा, खरेंच तुह्मीं माझ्या पाठीमागून त्या पिंजऱ्याच्या कोठडींत येण्याच्या अगोदरच एकदम दरवाजा कसा बंद पडला! काय असेल तें असो, मी तर कांहीं त्या चौकटीला हात लाविला नाहीं! मग आपोआप कांहीं धक्क्यानें दरवाजा खालीं सरला असेल तर कोण जाणे! माझ्या हातानें तरी हें झालें नाहीं खचित!"

"महाराज," **विनयादित्य**मामा ह्मणतात, "मला जरी त्या दुष्ट पशूच्या हातून एकादी असाध्य जखम होऊन मी येथें रक्तबंबाळ होऊन पडलों असतों, आणि आपण सुरक्षित आहांत येवढी गोष्ट माझे प्राण जात असतां मला कळली असती, तथापि मी मोठ्या सुखानें मेलों असतों."

राजा **प्रद्युम्नराय** भयचकित झाल्यामुळें व त्याच्या मनाचा अत्यंत गोंधळ उडून गेला असल्यामुळें अद्यापिही थरथर कांपत होता. आधींच अर्धमेला झालेला आणि त्यांत आपला भागुबाईपणा दुसऱ्यास दिसला याबद्दलची लाज! कदाचित् कांहींतरी अचावचा बोलून किंवा संतापून रागावून त्यानें कशीतरी वेळ मारून नेली असती, पण आमच्या **महेश्वरकर** सरदाराची तीक्ष्ण दृष्टि त्याच्याकडे वळलेली त्याला दिसली, व तिच्या खालीं तो अगदीं वांकून गेला. भयंकर प्रसंगीं राजेसाहेबांनीं भागुबाईप्रमाणें आपल्या संरक्षणापुरतीच तजवीज काढून बापड्या वृद्ध मामाला त्या क्रूर पशूस बळी दिला होता एवढी गोष्ट झालेल्या हकीगतीवरून **कुमुदबंधूच्या** लक्षांत येऊन गेली होती.

"मला वाटतें आतां या बाबतींत अधिक बोलण्याचें कारणच नाहीं," **कुमुदबंधु** राजेसाहेबांकडे कांहींसा तिरस्कारयुक्त मुद्रेनें पहात म्हणाला.

"नाहींच, आतां कांहींच बोलावयाचें नाहीं याबद्दल!" मामा ह्मणतात. "फक्त आपण केलेल्या या महदुपकाराबद्दल एकवार अंतःकरणपूर्वक आपले आभार—"

"मामासाहेब, माझ्या हातून घडलेल्या या अल्पसेवेसंबंधानें आपल्या तोंडांतून एकवार उद्गार निघाले तेवढे पुरे आहेत. आतां त्याबद्दल पुनरुच्चार नको." **कुमुदबंधूनें** मामांचा हात प्रेमानें आपल्या हातांत धरून ह्मटलें.

"पण, अहो **महेश्वरकर**, मीही तुमचे आभार मानलेच पाहिजेत." राजा **प्रद्युम्नराय** झट्दिशीं ह्मणाला. "बाकी आतां या गोष्टीसंबंधानें सर्व भाषण अगदीं बंद करावें

असें तुमच्याप्रमाणें मलाही पण वाटतें. माझ्या म्हणण्याचा अर्थ तुम्हांला कळलाच असेल. घडलेला हा प्रसंग उघडकीस न आलेला चांगला. कारण, आज मजवर आणि **कुमुद्वती**च्या या वृद्ध मातुलावर असला एक भयंकर प्रसंग येऊन कोसळला होता हें तिला कळलें तर ती अगदीं घाबरी होऊन जाईल."

"निदान या ओंठांतून तरी," **कुमुदबंधु** तसाच तिरस्कारानें पण बाह्योपचारास योग्य अशा शुष्क आदरानें राजास ह्मणतो, "माझ्या तोंडांतून तरी यांपैकीं एक अक्षर देखील बाहेर पडणार नाहीं."

"तर मग आजपासून तुह्मीं मला आपला जिवलग मित्र असें समजा," **प्रद्युम्नराय** म्हणाला.

हे शब्द स्वारीनें इतक्या कृतज्ञतापूर्ण स्वरानें व उत्साहानें उच्चारिले कीं एकाद्या साधारण मनुष्यास ते अगदीं खरेच भासावे. पण ते तोंडांतून बाहेर पडतांना अंतःकरणांत भरलेलें काळकूट विष एक रतिमात्रही कमी झालें नव्हतें. येवढेंच नव्हे तर त्याला जास्त भरतेंच आलें होतें. आपल्या अंगचा भेकडपणा या शूर योद्ध्याच्या दृष्टीस पडला हा विचार मनांत येऊन **कुमुदबंधू**विषयीं राजेसाहेबांच्या मनांत द्वेषबुद्धि उत्पन्न झाली. राजेसाहेबांच्या भाषणांतील मानभावीपणा कदाचित् **कुमुदबंधू**च्या लक्षांत पूर्णपणें आला नसेल; तथापि त्याचा उदात्त स्वभाव केवळ सद्गुणांवरच लुब्ध होणारा असल्यामुळें राजेसाहेबांच्या या शब्दांनीं त्याच्या मनावर मुळींच इष्ट परिणाम झाला नाहीं. त्यानें एकवार हंसत हंसत मान लववून राजेसाहेबांच्या शब्दांचा आदर केला असें दाखविलें, आणि लागलीच **विनयादित्य**मामाकडे वळून म्हणाला, "मामासाहेब, आपल्याला अत्यंत त्रास झाला आहे, तर आपण आतां परत वाड्यांत जाऊन कांहीं वेळ विश्रांति घ्याल तर बरें."

"चला, मामा आमच्याच दिवाणखान्याकडे जाऊं या." राजेसाहेब फार उदार होऊन म्हणाले, "आणि पाहिजे तर आमच्या राजवैद्यास बोलावणें पाठवितों म्हणजे जरूर वाटल्यास ते एखादी श्रमपरिहारक गुटिका देतील. आपण देखील सरदारसाहेब सवड असल्यास चलाना आमच्याबरोबर?"

"माफ करा, महाराज," **कुमुदबंधु** उत्तर करितो. "मी थोडा मागें रहातों आणि ह्या पशूचा पालक कोण आहे त्याचा शोध करून त्याला खरमरीतशी ताकीद देऊन येतों. त्यानें जर निष्काळजीपणानें हें पिंजऱ्याचें दार उघडें टाकिलें नसतें तर हा अनर्थ ओढवण्याचा मुळींच संभव नव्हता."

"पण झालेल्या प्रकारापैकीं एक शब्द देखील त्याच्याजवळ बोलावयाचा नाहीं!" **प्रद्युम्नराय** आर्जवानें म्हणाला. "जर कदाचित् आपण त्याला विशेष कडक शब्दांनीं बोलाल तर तेवढ्यावरून देखील कांहींतरी भयंकर प्रकार घडला असावा असें अनुमान तो सहज काढील, आणि त्यायोगानें व्यर्थ कांहींतरी बोभाटा होईल. मी काय म्हणतों हें आलेंच असेल आपल्या ध्यानांत."

हें भाषण ऐकून **कुमुदबंधू**ला तिरस्का-

रानें हसूं आलें. आणि तें दाबण्याचाही त्यानें प्रयत्न केला नाहीं. तो तसाच हंसत हंसत म्हणाला, "महाराज, आपण अगदीं स्वस्थ असा! जिच्या योगानें आतांच्या या प्रसंगाचा बोभाटा होईल अशी कोणतीही गोष्ट माझे हातून घडणार नाहीं, असें मी आपणास खात्रीनें सांगतों."

या दोन तरुणांचा हा संवाद चालला असतां वृद्ध **विनयादित्य**मामा एका बाजूस उभे होते आणि या दोघांच्या स्वभावाविषयीं व वर्तनाविषयीं विचार मनांत येऊन ते आपल्याशींच म्हणतात, "हे पहा दोघे तरुण जवळ जवळ उभे आहेत; एक **पंचगांग**देशासारख्या जुनाट व अतिविख्यात गादीचा नुकताच झालेला मालक, आणि दुसरा एक सामान्य सरदार; राजपदाला अयोग्य असे जेवढे म्हणून दोष, तेवढे एकांत पूर्णपणें भरले आहेत, आणि खऱ्या शिपाईगिरीस आणि सरदारीस शोभणारे जेवढे म्हणून गुण तेवढे सर्व दुसऱ्याच्या अंगीं वास करीत आहेत; एकाच्या अंगीं भेकडपणा आणि नेभळेपणा पुरता भरला आहे, आणि दुसऱ्यामध्यें मर्दुमकी आणि हिम्मत यांचा अक्षय्य वास आहे; एक दुरभिमानी, आत्मश्लाघाप्रिय, आणि डौली; दुसरा प्रतिष्ठेची पर्वा न करणारा, स्तुतीस लाथेनें झुगारणारा, आणि वर्तनानें अतिसरल; एकाला आपला भागुबाईपणा झांकण्यासाठीं अतिनीच युक्त्या शोधण्याची हौस, आणि दुसऱ्यास आपले मोठमोठे पराक्रमही लोकांस कळविण्याचा कंटाळा! दोघेही तरुण, दोघेही सुंदर, पण दोघांच्याही स्वभावांत आणि वृत्तींत केवढा फरक! आणि सूक्ष्म अवलोकन करणाऱ्या प्रेक्षकाच्या मनावर दोघांच्याही वर्तनानें उत्पन्न होणारे ठसे परस्परांपासून किती तरी भिन्न!"

हे विचार मनांत घोळत आहेतच, अशा स्थितींत **प्रद्युम्नराया**च्या बरोबर मामा वाड्याकडे जाण्यास निघाले. थोड्या वेळापूर्वीं घडून आलेल्या प्रसंगांत मामांनीं स्वतःच्या प्राणांची आहुति देण्यास तयार होऊन **प्रद्युम्नराया**च्या जिवाचें रक्षण केलें होतें, ही गोष्ट **प्रद्युम्नराया**च्या लक्षांत आली नसेल असें नाहीं. पण त्याचा स्वभावच इतका दुष्ट होता कीं, मामांच्या या परम औदार्यशील वर्तनाबद्दल त्याच्या मनांत कृतज्ञताबुद्धि उत्पन्न होणें अशक्य होतें. मामांनीं त्याच्यावर हे उपकार केले याचा परिणाम इतकाच झाला कीं त्यांच्याविषयीं त्याच्या मनांतील द्वेष मात्र अधिक वाढला. आणि तो वाढण्याचें कारण हेंच कीं या प्रसंगामुळें त्याची स्वहितपरता, अपौरुषता, आणि नीचपणा हीं त्या ज्ञात्याला व्यक्तपणें दिसलीं.

**कुमुदबंधू**पासून कांहीं अंतरावर जातांच कपटी **प्रद्युम्नराय** मामांशीं पराकाष्ठेचा स्नेहभाव दाखवून मोठ्या प्रेमानें म्हणतात, "मामा, थोड्या वेळापूर्वीं मी तुम्हांला वाईट शब्द बोललों याबद्दल मला आतां पश्चात्ताप झाला आहे. पण तुम्हाला आतां खरेंच सांगूं का, आज मंडळींच्या आग्रहामुळें मीं एक पेला अधिक घेतला होता आणि म्हणूनच किंचित् वाऱ्यांत हिंडून डोकें शांत करावें म्हणून मी इकडे बागेंत आलों.

काय असेल तें असो, आज मंडळींनीं मला इतका आग्रह केला होता कीं, तेवढ्यानें मी अगोदरपासून अगदीं चिडून व तिरसटून गेलों होतों. यामुळेंच मी तुह्मांला असले शब्द बोललों. पण माझी खात्री आहे कीं तुह्मी याबद्दल––"

"पुरे पुरे, महाराज," मामा त्याला थांबवून मध्येंच ह्मणाले; "महाराजांच्या हिताविषयीं मी किती चिंता वहातों आणि त्यांच्याकरितां मी आपले प्राणही अर्पण करण्यास नेहमीं कसा सिद्ध असतों, येवढी गोष्ट महाराजांच्या लक्षांत असली ह्मणजे याहून माझें दुसरें कांहीं मागणें नाहीं."

**विनयादित्य**मामांनीं थोड्या वेळापूर्वी केलेल्या सदुपदेशाची, राजेसाहेबांच्या रक्षणाकरितां उदारपणें प्राणदान करण्यासही आपण सज्ज झालों या गोष्टीची व राजेसाहेबांच्या निंद्य क्लीबत्वाची अप्रत्यक्षपणें त्यास आठवण करून दिली असें या दुर्बुद्धि राजेसाहेबांस वाटून ते आंतल्या आंत दांतओंठ खाऊं लागले. पण यावेळीं प्रसंगच असा होता कीं, बाहेरून शुद्ध स्नेहाचें पांघरूण घालणें त्यास भाग होतें. ते गोड व प्रेमळ स्वरानें ह्मणतात, "मामा, आतां आह्मांला एकमेकांचीं मनें कळलीं. आतां मी नेहमीं तुमच्यावर प्रेम करीन. पण हें पहा,–तुह्मी या झालेल्या प्रसंगासंबंधानें एक अक्षर देखील **कुमुद्वती**ला कळवावयाचें नाहीं हं! काय, बोला–वचन––"

"महाराज, यांतलें एक अक्षर माझ्या तोंडून बाहेर पडण्याचा प्रसंग आला तर मी मरेन अगोदर." मामा ह्मणाले. "माझा शब्द एकवार गुंतला ह्मणजे–"

"होय, होय, मला ठाऊक आहे कीं तो केवळ ब्रह्मवाक्याप्रमाणें असतो." **प्रद्युम्नराय** खोटा उत्साह दाखवून ह्मणतो, "तुमचा नुसता शब्द इतरांच्या शपथेपेक्षांही अधिक निश्चयाचा असतो हें मी जाणून आहें. खरेंच, मामासाहेब, आपण खचित् खऱ्या स्नेहाला पात्र आहांत! आपल्यासारखा विश्वसनीय स्नेही फार दुर्मिळ. पण कांहो मामासाहेब, तुमचा तो **महेश्वरकर कुमुदबंधु** आपल्या वचनाप्रमाणें वागेल काय?"

"मला स्वतःबद्दल जितकी खात्री आहे तितकीच त्याच्याबद्दलही आहे. त्याच्यासंबंधानें हवी तशी जिम्मा भरण्यास मी तयार आहें." मामांनीं उत्तर केलें.

"बस, बस, मामासाहेब, याहून आणखी काय खात्री पाहिजे!" **प्रद्युम्नराय** ह्मणतात. "पण त्या **कुमुदबंधू**ला हा सर्व प्रकार जरा चमत्कारिक वाटला असेल, नाहीं बरें? मी काय ह्मणतों, समजलांत का मामासाहेब? त्याला वाटलें असेल कीं तुमच्यासारख्या वृद्ध गृहस्थाला त्या क्रूर सिंहाच्या स्वाधीन करून फक्त स्वतःचें मात्र मीं रक्षण केलें. तेव्हां हें पहा, तुह्मी जर संधि साधून यासंबंधानें त्याच्याजवळ एक शब्द बोलाल तर ठीक होईल नाहीं? त्याला काय सांगावयाचें, तसल्या माणसाजवळ कसें बोलावयाचें, हें तुमच्या सारख्या शहाण्या, धूर्त व अनुभवी गृहस्थाला मी सुचविलें पाहिजे असें मुळींच नाहीं. माझी खात्री आहे कीं तुमच्या सारख्या स्नेह्याच्या

हातांत असली कोणतीही गोष्ट सोंपवून आपण खुशाल स्वस्थ रहावें."

"महाराज, आपण आतां यासंबंधानें एक शब्द देखील अधिक बोलावयाला नको." मामा उत्तर करितात. "**कुमुदबंधू**चा कांहीं भलताच ग्रह झाला असल्यास संधि साधून मी त्याजपाशीं होईल तितकें लवकरच बोलेन."

"मी तुमचा जन्माचा ऋणी आहें, मामासाहेब. खरोखर तुमचे मजवर फारच उपकार आहेत." राजेसाहेब विनयानें व आर्जवयुक्त स्वरानें ह्मणाले.

ज्या **प्रद्युम्नराया**नें दोन तीन घटकांपूर्वी पराकाष्ठेच्या उन्मत्तपणानें, आणि गर्विष्ठपणानें बापड्या वृद्ध मामांवर हवातसा अपशब्दांचा प्रहार करून तोंडसुख घेतलें होतें तेच **प्रद्युम्नराय** यावेळीं त्याच वृद्ध मामाची पादधूलीही मोठ्या प्रेमानें व आदरानें आपल्या शिरीं वाहण्यास तयार झाले होते! याचें नांव फरक! अशा रीतीनें आपल्या सोयीप्रमाणें व अवश्यकतेप्रमाणें इष्ट कार्याच्या सिद्धीकरितां निर्लज्जपणें हवातसा परस्परविरोधी वर्तनक्रम पत्करण्यास तयार होणारे, तेच खरे कार्यसाधु! आणि अस्सल अमंगळ नीचिही तेच!

**प्रद्युम्नराय** स्नेहातिशय दाखविण्याकरितां मामांच्या खांद्यावर प्रेमानें हात टाकून पुनः ह्मणतात, "मामा, आपल्या स्नेहाची आठवण आणि आमच्यावरील तुमच्या उपकारांची अंशतः तरी फेड ह्मणून मी तुह्मांला कांहीं तरी बक्षीस देणार—"

"छी, छी महाराज, मला आणि आपल्याकडून बक्षीस!" मामा घाईनेंच ह्मणाले.

दोन घटकांपूर्वीच्या अपशब्दप्रहारानें मामांस राजेसाहेबांचा जितका तिटकारा आला होता तितकाच त्यांच्या यावेळच्या ह्या चाटुवचनांचाही कंटाळा आला.

आपल्यावरून लोक जगाची परीक्षा करितात, निदान **प्रद्युम्नराया**सारखे क्षुद्रबुद्धी नीच तरी खचित करितात! त्यांना वाटतें जसे आपण तसेच सर्व! आपल्या ठिकाणीं स्वहितपरायणतेशिवाय दुसरा विचार नाहीं, मग दुसऱ्याचे ठिकाणीं तरी हाच विचार कां नसावा! आपण जर केवळ निरपेक्षबुद्धीनें कोणावर काडीइतकाही उपकार करण्यास सिद्ध होत नाहीं, तर दुसरेही सर्व तसेच असतील असें ह्यांस वाटतें; आणि मग दुसऱ्याकडून काम करवून घ्यावयाचें ह्मणजे त्यास लांच द्यावा किंवा निदान लांचाचीं वचनें तरी भरपूर द्यावीं हाच योग्य मार्ग असें त्यांच्या मनांत येणें अगदीं स्वाभाविक आहे. **प्रद्युम्नरायां**ना यावेळीं मामांकडून आपलें काम करून घ्यावयाचें होतें, ह्मणून त्यांनीं ह्या प्रशस्त राजमार्गाचा अवलंब केला.

ते आग्रहपूर्वक मामांस ह्मणतात, "तुह्मी ह्मणतां तें खरें. पण तुह्मांला आजच्या दिवसाची आठवण ह्मणून कांहीं तरी मी दिल्याशिवाय राहणारच नाहीं. हें पहा, मामासाहेब, ह्या माझ्या हातांत ही एक मौल्यवान अंगठी आहे," असें ह्मणत त्यांनीं डौलानें एकवार रत्नांच्या तेजानें सुशोभित झालेल्या आपल्या सुकुमार हाताकडे नजर

फिरविली,—" हीच मीं तुम्हांस आतां-च्या आतां दिली असती, पण ही माझ्या **कुमुद्वती**नें प्रेमाची भेट म्हणून मला दिली आहे. तेव्हां ती दुसऱ्यास देणें म्हणजे माझ्या प्रियेचा अपमान केल्यासारखें होईल."

" आणि आपण दिली तरी ती मी घेणारही नाहीं. त्या आंगठीबरोबर सर्व **भरतखंडा**चें राज्य जरी आपण मला देतों ह्मटलें तरी तीं मी घेणार नाहीं. महाराज, मला आपल्यापासून——"

" दम धरा हो पण, मामासाहेब, " **प्रद्युम्नराय** म्हणतात. " माझें थोडें तरी ऐकाल कीं नाहीं ? हें पहा, मी लग्नापूर्वी एक पोंची हातांत घालीत होतों, ती कोठें आहे ती उद्यां शोधून काढितों.—नाहीं तर माझी रत्नखचित मुठीची ती कट्यार ! हां आतां मला आठवलें. तुम्ही पूर्वी एकवार त्या मुठीवर केलेल्या कुसरीचें फार वर्णन करीत होतांत, व ती आपल्याला फार आवडते असें तुम्हीं ह्मटलें होतें—"

" महाराज, हें बक्षिसाचें भाषण नको आतां ! " मामा मध्येंच म्हणाले; " मी आपल्यापासून कोणतेंही बक्षिस घेऊं इच्छित नाहीं. "

" मीं दिल्याशिवाय कधींही रहावयाचा नाहीं ! " **प्रद्युम्नराय** प्रेमानें हंसत हंसत ह्मणाले. " ठीक आहे, उद्यां किंवा परवांच मी ती कट्यार शोधून काढतों. पण खरेंच, बरी आठवण झाली. मला आतां राणीकडे जावयाचें आहे ! बरें तर मामासाहेब, तुम्हांला फिरून सांगावयाला नकोच. तुम्ही जाऊन त्या तुमच्या **कुमुद्बंधूस** गांठा आणि त्याच्याजवळ दोन शब्द बोलून आह्मांला कमीपणा आणणारी अशी त्याची समजूत झाली असावी ती घालवा किंवा त्याचें तोंड तरी बंद करा. आलें कीं नाहीं आपल्या लक्षांत, मामासाहेब ? "

डोळे मिचकावीत आणि पोकळ हास्यमुख करून व मामांना मोठ्या प्रेमानें व आदरानें प्रणाम करून **प्रद्युम्नराय** घाईघाईनें राणीच्या दिवाणखान्याकडे चालते झाले. मामांनीं एक सुस्कारा टाकिला आणि ते त्याच्याकडे पहात तसेच उभे राहिले.

राजेसाहेबांची मूर्ति दृष्टीआड होतांच मामा आणखी एकवार दीर्घ सुस्कारा टाकून उद्वेगदर्शक स्वरानें आपल्याशींच ह्मणतात, " अरेरे, हा नुसता भेकड आहे येवढेंच नव्हे, तर असत्यवादीही आहे ! "

मामांना ठाऊक होतें कीं जी पोंची व जी कट्यार राजेसाहेब दुसरे दिवशीं आपल्याला बक्षिस देणार होते ती पोंची व ती कट्यार स्वारीनें आदल्याच दिवशीं **कालयवन** देशचे दोघे द्यूतपटु वकील **कालनीती** व **बसवप्रभू** यांच्याशीं खेळत असतां पणाला लावून गमावली होतीं.

## भाग १२ वा.

(नमक्याच दहा हजार मोहरा!)

**विनयादित्य** मामा आणि राजे **प्रद्युम्नराय** उपवनांतून बाहेर पडून राजवाड्यांत जाऊन पोंचले. वाचकहो, चला तर मग आपण फिरून परत उपवनांत जाऊं, आणि कुमुद्बंधूस गांठूं.

**कुमुदबंधु** मागें एकटा रहातांच त्यानें एकवार इकडे तिकडे नजर फेंकली, आणि आसपास कोणी नाहीं असें दिसतांच कांहीं-सा निराश होऊन तो आल्या वाटेनें परत फिरणार तों जवळच्या एका निबिड अशा लतागृहांतून कांहीं खस्‌पस्‌ असा आवाज झाला. त्याबरोबर फिरून आशा उत्पन्न होऊन **कुमुदबंधू**नें मागें वळून पाहिलें, तों अशा उदार मनाच्या परोपकारी वीराची निराशा होऊं देणें अयोग्य असें त्या लता-समुदायास वाटलें कीं काय कोण जाणे, त्यांनीं **नलिनी**स एकदम पुढें ढकलली! ती पुढें आली त्या वेळीं तिचा चेहरा अगदीं फिकट होऊन गेलेला होता, अंग थर-थर कांपत होतें, आणि हातपाय अगदीं शिथिल झाल्यासारखे दिसत होते; पण कांहींशी पुढें येतांच आणि आपल्या प्रियकराचें संतोषयुक्त मोहक मुख दृष्टीस पडतांच, गालावरील लाली परत आली, डोळ्यांतलें पाणी फिरून चमकूं लागलें, अंगाचा कंप थांबला, आणि एकंदर मुद्रेवर टवटवी येऊन ती आनंद व विस्मययुक्त दिसूं लागली. हा असा मुद्रेंत फरक झाला याला कांहीं तरी तसेंच कारण असलें पाहिजे; आणि तें काय असावें हें **कुमुदबंधू**नें बरोबर ताडलें.

"प्रिये नलिनी, !" **कुमुदबंधु** तिचा हात प्रेमानें आपल्या हातांत घेऊन ह्मणाला, "संकेत ठरल्याप्रमाणें तूं इतक्यांत आलीस ह्मणून मला किती तरी आनंद झाला आहे! नाहीं तर मी निराश होऊन जात होतों."

**नलिनी**च्या अंतःकरणांत जे विचार उचंबळत होते त्यांचे उमाळे बाहेर फुटल्यावांचून कसे रहाणार! ती सप्रेम व सकौतुक दृष्टीनें आपल्या प्रियकराच्या मुखाकडे टक लावून पहात ह्मणते, "महापराक्रमी, महाउदार अंतःकरणाच्या माझ्या प्रियकरा, आतांच घडून आलेला सर्व प्रसंग मीं स्वतः या नेत्रांनीं पाहिला आणि नंतर झालेलीं सर्व भाषणेंही ह्या कानांनीं ऐकिलीं. आपण असल्या उग्रस्वरूपी क्रूर पशूला आपल्या विक्रमानें कसें दिपवून टाकिलें, त्याला एखाद्या कोंकराप्रमाणें हांकीत नेऊन पिंजऱ्यांत कसें कोंडून टाकिलेंत, आणि नंतर आपलें हें धैर्याचें कृत्य लोकांपासून झांकून ठेवण्यास तयार होऊन सर्व प्रकार गुप्त ठेवण्याविषयीं कसें वचन दिलेंत, हें सर्व मीं पाहिलें व ऐकिलें."

आपण केलेलें अनुमान अगदीं बरोबर जुळलें असें पाहून **कुमुदबंधु** ह्मणतो, "हां, हां, आपली स्वारी येथेंच कोठें तरी जवळपास होती? तर मग मघां झालेला प्रसंग थोडासा तूं पाहिलास असें दिसतें. पण त्यांत इतकें विशेष मानण्यासारखें काय होतें?"

"विशेष काय होतें?" **नलिनी** उत्साहानें ह्मणते; "धन्याच्या काठीला भिऊन एखादें कुत्रें जसें मागें सरतें त्याप्रमाणें तो उग्र राक्षस तुमच्या शस्त्राला भिऊन पिंजऱ्यांत परत चालला होता त्याचवेळीं मी येथें आलें. मी तर भीतीनें अगदीं इतकी गांगरून गेलें कीं, किंकाळी फोडायला देखील माझ्या गळ्यांतून स्वर निघेना! शेवटीं तें गजाचें दार खालीं पडलें आणि

आपण सुरक्षित आहांत असें जेव्हां दिसलें तेव्हां थोडासा जिवांत जीव आला! देवा, त्यावेळीं मीं कसा आनंदाचा सुस्कारा टाकिला! नंतर मामासाहेबांचें आणि राजेसाहेबांचें आपल्याशीं जें भाषण झालें तें मीं साद्यंत ऐकिलें! आणि ह्मणूनच जर एखाद्या कुमारिकेला एखाद्या ऐश्वर्यशील तरुण योद्ध्याच्या मोहक मुखाकडे निर्भीडपणें टक लावून पाहण्याचें धार्ष्ट्य करण्याचा केव्हां अधिकार असेल तर तो यावेळीं मला आहे!" असें ह्मणून तिनें आपला हात **कुमुदबंधू**च्या डाव्या खांद्यावर टाकिला आणि त्याच्या चेहेऱ्याकडे प्रेमार्द्र व सानुराग दृष्टीनें तशीच पहात उभी राहिली.

"लाडके," **कुमुदबंधु** ह्मणतो, "तुझे हे शब्द ऐकून मला जो आनंद होत आहे त्याला सीमाच नाहीं. मीं अत्यंत सप्रेम अंतःकरणानें तुझ्या ठिकाणीं निष्ठा ठेविली हें अगदीं योग्य केलें असें आतांच्या तुझ्या भाषणावरून व वर्तनावरून तूं मला सिद्ध करून दाखविलेंस! सुमारें दोन महिन्यांपूर्वीं **शैलावलीं**त **ध्रुवराया**च्या बागेंत तूं जें काय बोलली होतीस तें कमी होतें असें नाहीं; पण त्यावेळीं तूं कांहीं अटी सांगितल्या होत्यास त्यावरून मला वाटलें कीं, तुझ्या मनाचा विचार पक्का ठरला नसावा आणि आपलें मन बदलल्यास नकारा करण्याची सवड रहावी, ह्मणून तूं तशा प्रकारें बोलली असावीस! ह्मणून आज दोन महिने तुझी व माझी इतक्या वेळां गांठ पडत असून मी त्या वेळच्या तुझ्या भाषणाची तुला नुसती आठवणही केली नाहीं. आतां परमेश्वरानेंच सुयोग आणिला! तुला सूचना पाठविल्याप्रमाणें तूं येथें आलीस, आपण होऊनच हा विषय काढिलास, आतां मी स्पष्टपणें आणि शुद्ध अंतःकरणानें तुला एक प्रश्न विचारितों त्याचें तितक्याच स्पष्टपणें उत्तर दे, ह्मणजे मी धन्य झालों; आणि माझी सर्व चिंता पळाली. सांग तर, माझें हें मन आणि माझा हा देह मीं तुझ्या आधीन केलीं आहेत त्यांचा तूं स्वीकार केलासना?"

**कुमुदबंधू**च्या तोंडांतून हे प्रेमोद्गार निघत असतां **नलिनी**ची मान खालीं लवलेली होती आणि तिच्या गालांचा रंग वरचेवर एकसारखा बदलत होता. परंतु त्याचें भाषण आटपतांच तिनें एकवार मान वर करून त्याजकडे निष्कपट व सप्रेम मुद्रेनें पाहिलें आणि म्हणाली, "होय, महाराज, आपण उदार होऊन आपल्या अंतःकरणासारखी अमूल्य वस्तु मला देत असतां माझ्या हातून ती परत कशी टाकवेल? त्याचा मी अत्यादरपूर्वक स्वीकार करितें. आतां या आपल्या औदार्याची अंशतः तरी परत फेड व्हावी म्हणून मीं आपलें मन व शरीर आपल्या चरणीं अर्पण करावें. पण त्यावर आतां माझा अधिकारच नाहीं! आपण तीं दोन्हींही मजपासून जिंकून केव्हांच आपलीं शीं करून टाकिलीं आहेत! पण खरेंच, एकाद्या अबलेपासून तिचें सर्वस्व हरण करून तिला आपलें ऋण फेडण्यासही असमर्थ करणें हाच का शूर म्हणविणाऱ्या पुरुषांचा पराक्रम?"

या भाषणानें **कुमुदबंधू**चें अंतःकरण संतोषानें भरून जाऊन त्यानें **नलिनी**स

आनंदानें व प्रेमानें दृढालिंगन दिलें. आणि परस्पर प्रीतीचीं हीं वचनें कपोलरूपी सुवर्ण पत्रावर दंतशलाकांनीं अनुरागरसांत पंच महाभूतांच्या साक्षीनें लिहून चिरस्थायी करण्यांत आलीं !

लागलीच **नलिनीनें** आपल्यास **कुमुदबंधूच्या** हातून सोडवून घेतलें, आणि मर्यादेनें किंचित् दूर उभी राहून ती फिरून ह्मणते, " पण महाराज, पूर्वीचा करार अद्याप पुरा झालेला नाहीं हें आपल्या ध्यानांतून जाऊं देऊं नका. आणि पूर्वी ठरलेली गोष्टच मी फिरून एकवार आपल्याला सांगतें, राणीसाहेबांच्या राज्यांतील सर्व घोटाळा मोडून टाकून त्यांच्या सौख्यभवनाचा पाया शांतिरूपी स्थिर भूमीवर रचिल्याशिवाय आपण उभयतांनींही आपल्या सुखाचा विचार करावयाचा नाहीं. "

" **नलिनी,** " **कुमुदबंधु** ह्मणतो, " मी एकवार राणीसाहेबांचा पक्ष स्वीकारिला आहे तो आतां सोडीन हें संभवतें तरी का? आतां **पंचगांग**देशांतील त्या नीच बंडखोरांची चांगली खोड मोडण्याकरितां राणीसाहेबांस लवकरच लढाई सुरू करणें भाग आहे यांत काडीमात्र संशय नाहीं. आणि **नलिनी,** तुला हेंही पण सांगून ठेवितों कीं, संग्राम माजल्यास राज्ञीसैन्याच्या पृष्ठभागीं हा शिपाई उभा राहिलेला कोणालाही आढळणार नाहीं ! "

" प्रियक---महाराज, ह्याबद्दल माझ्या अंतःकरणाची पूर्वीपासूनच पूर्ण खात्री झालेली आहे. " **नलिनी कुमुदबंधूच्या** मुखाकडे प्रेमानें व संतोषानें पहात ह्मणते. " पण खरेंच, मी असें ऐकितें कीं, काकासाहेबांनीं बंडाचें निशाण रोंविलें आहे, आणि त्यांस **बुद्धा**नुयायी सर्व सरदारांचें मागून पाठबळ असल्यामुळें त्यांना अतिशय लोक जाऊन मिळत आहेत आणि त्यांचें सैन्य दररोज वाढत आहे. "

**कुमुद०:**—" पण एकवार राणीसाहेबांनीं आपला बाव्हटा ह्या **कुवलयपूर**च्या वेशीबाहेर काढून मैदानांत रोंविला ह्मणजे **जयद्रथराया**च्या क्षुद्र फडक्याला आश्रय देण्याकरितां आज जितके असंतुष्ट लोक जमत आहेत त्यांच्या शतपट किंवा सहस्रपट खरे शिपाई व इमानी प्रजाजन आपली राजनिष्ठा दाखविण्याकरितां आणि **पंचगांग**देशच्या कमलचिन्हधारी प्रख्यात झेंड्याचा मान कायम राखण्याकरितां सर्व दिशांनीं धांवून येतील. पण खरेंच मला या गोष्टीचें आश्चर्य वाटतें कीं, राणीसाहेब लढाईचें निशाण रोंवून सैन्य जमा करण्याच्या व युद्धसामुग्री सिद्ध करण्याच्या व्यवस्थेस अद्यापिही लागत नाहींत हें काय ? अद्यापि कोठें कांहीं जाहिरनामे लागत नाहींत, कोठें आज्ञापत्रें सुटत नाहींत, लढाऊ लोकांची अद्यापि भरती चाललली दिसत नाहीं, या सगळ्याचा अर्थ तरी काय ? कदाचित् असें तर नसेलना, कीं त्यांच्या विवाहाचा मंगलविधि होऊन फार दिवस झाले नाहींत, म्हणून एवढ्यांतच रक्तस्राव करण्यास सिद्ध व्हावें ही गोष्ट राणीसाहेबांस नापसंत वाटत असेल ? कसेंही असो, ही अशी दिरंगाई आतां फार दिवस चालून उपयोग नाहीं. "

**नलिनी:**—" मी खरेंच सांगूं का आपल्याला ? राणीसाहेब ज्या आज इतके दिवस स्वस्थ राहिल्या आहेत त्या केवळ आपल्या संतोषानें नव्हत, तर स्वस्थ बसणें हें त्यांना प्रस्तुत प्रसंगीं भागच पडलें आहे. मोठें प्रचंड सैन्य जमा करावें, आपण स्वतः त्या सैन्याचें आधिपत्य स्वीकारावें, आणि रणभूमीवर जाऊन त्या बंडखोरांची पुरती खोड मोडावी असे विचार त्यांचे मनांत एकसारखे उचंबळत आहेत ! पण उपयोग काय ! सर्व गोष्टी द्रव्यावांचून अडल्या आहेत. या वर्षी खर्च सर्व प्रकारें अतोनात झाल्यामुळें खजिना अगदीं रिकामा झाला आहे; प्रस्तुतच्या वादळाच्या स्थितींत कोणत्याही रीतीनें प्रजेपासून पैसे जमा करण्याचा प्रयत्न करणें फारच धोक्याचें आहे; एकंदरींत सर्व बाजूंनीं अडचणच आली आहे. मी आपल्याला सांगितलें तर खरें तरी वाटेल का ? "

**कुमुद०:**—" खरी न वाटण्यासारखी अशी गोष्ट तरी कोणती ? "

**नलिनी:**—" दुसरी कोणतीही नाहीं. आठ किंवा दहा हजार मोहोरा युद्धाच्या सामुग्रीकरितां पाहिजेत असें सेनापतींचें ह्मणणें आहे; आजरोजीं केवळ तेवढी रकम देखील खजिन्यांत शिल्लक नाहीं, आणि तेवढ्यामुळें **पंचगांग**देशच्या गादीच्या संरक्षणाकरितां सर्व सैन्य एकत्र जमवून युद्ध सुरू केलें पाहिजे हें आज जरूर असूनही तसें करण्याचें धैर्य राणीसाहेबांस होत नाहीं. मी ह्मणतें ही गोष्ट आपल्याला खरी वाटेल का आतां ? "

**कुमुद०:**—" बद्रिकेशाची शपथ ! हें मोठें विलक्षण दिसतें. तूं काय ह्मटलेंस ? आज केवळ आठ किंवा दहा हजार मोहोरांचीच जरूर आहे ? "

**नलिनी:**—" होय, दहा हजार मोहोराच. राणीच्या एकंदर वैभवाच्या मानानें पाहतां ही रकम अगदीं क्षुल्लक दिसण्यासारखी आहे खरी; पण रिकामा झालेला खजिना आणि आज आलेला प्रसंग यांचा विचार केला असतां ह्या येवढ्याशा रकमेस तिच्या शतपट किंवा सहस्रपट रकमेचें महत्व आलें आहे. "

**कुमुद०:**—(विचार करीत) "अगदीं बरोबर दहा हजार मोहोराच ? नेमकी तेवढीच रकम ? हा योग फारच चमत्कारिक दिसतो ! "

**नलिनी:**—" आपल्या बोलण्याचा अर्थ काय तो मला समजला नाहीं आपल्या मनांत कांहीं तरी गूढ विचार घोळत असावेत असें दिसतें ? "

**कुमुद०:**—" प्रिये, तूं ह्मणतेस कीं ह्या बंडखोरांची खोड मोडण्याकरितां सैन्य एकत्र जमविण्याचें धैर्य राणीसाहेबांस होत नाहीं; आणि याचें कारण केवळ दहा हजार मोहोरांची वाण येवढेंच, होय ना ? "

**नलिनी:**—" होय, मी ह्मणतें हें अगदीं खरें आहे. राणीसाहेबांना आलेली ही अडचण त्या कोणापाशीं बोलत नाहींत आणि आपल्या खजिन्याला आलेलें दारिद्र्य कोणालाही दाखवीत नाहींत. असें करण्याचीं कारणें दोन आहेत. एक त्यांचा स्वभाव पराकाष्ठेचा अभिमानी असल्यामुळें

आपलें दारिद्र्य लोकांस दाखविण्याची त्यांना लाज वाटते. आणि दुसरें असें कीं, ही गोष्ट बाहेर पडून शत्रुपक्षास कळली तर त्यांना त्यामुळें अधिकच जोर येईल, व राणीपक्षाच्या लोकांची हिम्मत खचेल."

**कुमुद०**:–" अशी कांहीं तरी अडचण असेल अशी मला शंका आलीच होती. पण राणीसाहेबांवर असला प्रसंग आला असेल आणि त्यांच्या खजिन्यास इतकी हीनावस्था आली असेल ही कल्पना माझ्या मनांत मुळींच आली नाहीं."

**नलिनी**:–" मी आपल्याला सांगतें हें नुसतें अनुमान नव्हे. आज सकाळीं राणीसाहेबांच्या जवळ मी असतांना **चंद्ररायाला** राणीसाहेबांनीं यासंबंधानेंच कांहीं गोष्टी विचारण्यासाठीं मुद्दाम बोलाविलें होतें. त्यावेळीं त्यांनीं सांगितलें कीं, बंडखोरांचा पराभव करण्यास सुमारें दहा हजार फौज तरी जमविली पाहिजे. येवढी फौज जमविणें फारसें कठिण आहे असें नाहीं. पण लढाईच्या सामुग्रीस आणि मोहिमेच्या खर्चास मिळून सुमारें दहा हजार मोहोरा तरी पाहिजेत. आणि खजिन्याची स्थिति तर तूर्त येवढाही खर्च सोसण्यासारखी नाहीं."

**कुमुद०**:–(पुनः आपल्याशीं विचार करीतच) " ही गोष्ट फारच आश्चर्यकारक ! हा नुसता आकस्मिक योग आहे असेंही म्हणवत नाहीं ! हा ईश्वरीसंकेत आहे असेंच म्हटलें पाहिजे ! दुष्टांना शासन करण्याचे जे परमेश्वराचे सहस्रावधि मार्ग आहेत त्यांपैकीं हा एक विलक्षण मार्ग परमेश्वर आम्हांला दाखवीत आहे असेंच मानिलें पाहिजे."

**नलिनी**:–(विस्मयानें व कुतूहलपूर्वक **कुमुदबंधू**च्या मुखाकडे पहात) " आपण काय बोलत आहांत याचा मला कांहींच अर्थ कळत नाहीं."

**कुमुद०**:–" प्रिये नलिनी, खरेंच सांग, जर शत्रूंच्याच हत्यारांनीं शत्रूशीं लढाई करून त्यांचा पाडाव करण्याचें साधन राणीसाहेबांच्या हातीं आलें तर फार मौज होणार नाहीं का? आणि त्यामुळें राज्ञीपक्षाच्या लोकांस दुप्पट उमेद येऊन त्या दुष्ट शत्रुपक्षीय लोकांचीं चांगलीं नाकें कापल्याप्रमाणें होणार नाहीं का?"

**नलिनी**:–(अत्यंत आनंदानें) होईल, खचित होईल. पण हें साधणार कसें?"

**कुमुद०**:–" तुझ्याकडून ही हकीकत कळण्याच्या अगोदरपासूनच मी आज सायंकाळीं एक लाग साधला तर पाहण्यासाठीं जाण्याचें ठरविलें होतें. आतां तर त्या कामीं मला दुप्पट हिम्मत आली आहे. कारण डाव साधला तर त्यांत हा दुहेरी फायदा आहे."

**नलिनी**:–" आणि हा असा डाव तरी काय आहे? आपण हें चिलखत वगैरे घालून सज्ज होऊन लढाईच्या तयारीनें निघालां आहांत तें याच कामाकरितां का?"

**कुमुद०**:–" होय, त्याचकरितां. आतां तुला सर्वच हकीकत सांगतों. तूं मला सुमारें दोन महिन्यांच्या पूर्वीं आंकडा त्याभार्पेन लिहिलेली एक चिट्टी दिली होती!–"

**नलिनी**:–" होय, आणि थोड्या दिवसांपूर्वी मीं आपणास विचारलें तेव्हां

आपण ह्मटलें होतें कीं, त्यासंबंधानें कांहींएक सुगावा लागला नाहीं व त्या चिठ्ठींतील सर्व मजकूरही अद्याप बरोबर कळला नाहीं."

**कुमुद्०**:–"आणि तुला मीं सांगितलें तें अक्षरशः खरें होतें. आज दीड महिना याचा कांहीं तरी सुगावा लागावा आणि चिठ्ठींतील मजकूर बरोबर रीतीनें कळावा म्हणून मी एकसारखे प्रयत्न करीत होतों. पण ते सर्व व्यर्थ झाले. काल संध्याकाळीं आकस्मिक रीतीनें मला ती चिठ्ठी सबंध वाचतां आली आणि त्यावरून मग कांहीं कल्पना मनांत आल्या."

**नलिनी**:–"तर मग चिठ्ठींतील सगळा मजकूर बरोबर कळला असेलच ?"

**कुमुद्०**:–"होय, तींत इतकेच शब्द आहेत–'निघण्याची वेळ बदलली, पहांटेस दोन घटका रात्रींच स्वारी निघणार. स्वारशिबंदी वगैरे मुळींच अधिक नाहीं.' चिठ्ठीवर सही वगैरे कोणाची नाहीं हें तुझ्यासारख्या हुशार माणसाला सांगावयास नकोच."

**नलिनी**:–(संतोषानें) "बरोबरच आहे, राणीसाहेबांच्या आश्रयाला राहून त्यांचाच विश्वासघात करणारा जो कोणी नीच टेहळ्या असेल, तो मुद्दाम सही करून आपल्या अंगावर ही नसती जबाबदारी कशाला घेईल ?"

**कुमुद्०**:–"पण तुला हें आश्चर्य वाटत असेल कीं आज ज्या कामाकरितां मी इतकी जय्यत तयारी करून निघालों आहें त्या कामाचा आणि ह्या चिठ्ठीचा संबंध काय ? प्रथम सर्व हकीकत तुला सांगितली पाहिजे. तुला हें कळलेंच असेल कीं काल राजेसाहेबांनीं या बगीच्यांतील त्या पलीकडच्या आरामगृहांत आपल्या कांहीं मित्रमंडळीला आणि कांहीं पाहुण्यांना मेजवानी दिली."

**नलिनी**:–"होय, आणि दारू वगैरे पिऊन मंडळी पुष्कळ वेळपर्यंत बागेंत गोंधळ घालीत बसली होती, असेंही पण मीं ऐकिलें. जेवल्यानंतर पहांट होईपर्यंत तेथें गंजिफांचे व फांशाचे वगैरे कांहीं खेळही चालले होते असें सुद्धां समजलें. राणीसाहेब रात्रीं अतिशय संतापल्या होत्या. पण त्यांनीं आपला सगळा राग आंतच्या आंत गिळून टाकिला."

**कुमुद्०**:–"तुला समजली ती बातमी सर्व खरी. पाहुणे मंडळी सुमारें पंचवीस तीस होती. त्यांत राजनिष्ठ ह्मणविणारे कांहीं सरदार व दुसरे बरेच दरबारी लोक होते. खरें पहातां, आपल्या तरुण राजाला असल्या वाईट व्यसनांच्या आधीन करण्यास हे लोक सहाय्य होतात याची त्यांना लाज वाटावी ! रात्रींच्या मंडळींत **भृगुराज, विजयसिंह, दशरथराय,** यांच्यासारखी या दरबारांतली मंडळी, तसेंच **कालयवन**चे वकील **बसवप्रभू** आणि **कालनीती** अशी बरीच वडीवडी व शहाणी मंडळी होती. मला त्यांतच्या त्यांत आनंद येवढाच वाटला कीं, तुझी मैत्रीण **कमला** हिचे दोघे भाऊ इतके तरुण असूनही या मंडळींत नव्हते, येवढेंच नव्हे, पण **विश्वासरायां**चा दुसराही कोणी संबंधी यांत नव्हता. तुला आणखी कांहीं बड्या बड्या मंडळींचीं नांवें सांगूं का ?"

**नलिनीः**–(तिटकाऱ्यानें) " नको, नको, पुरे झालीं ऐकिलीं तेवढीं. ही नामावळी ऐकून कांहीं पुण्य का लागायचें आहे? पण आपल्याला ही सर्व हकीकत कशी कळली? प्रत्यक्ष महाराजांनींही आपल्याला जरी हवा तितका आग्रह केला असला तथापि आपण कांहीं असल्या मंडळींबरोबर हे प्रकार करायला गेला नसाल."

**कुमुद०**:–" तूं ह्मणतेस तें अगदीं बरोबर. राजेसाहेबांनीं नव्हे पण त्याहूनही वरचढ अशानें जरी मला आग्रह केला तरी असल्या मंडळींत मिसळण्यास मी सिद्ध व्हावयाचा नाहीं. मला ही इत्थंभूत हकीकत कशी कळली हें तुला सांगतों. मामांनीं माझ्या दिमतीला **मोहन** म्हणून एक तरुण नोकर दिला आहे. पोरगा फारच हुशार आहे. राजेसाहेबांच्या नोकरमंडळींत तो नेहमीं मिसळून असतो. तो कालची ही सर्व मौज पाहून आला होता, आणि आज सकाळींच त्यानें ती मला सांगितली. त्यानें असेंही सांगितलें कीं राजेसाहेब व इतर मंडळी यथेच्छ सुरापान करून अगदीं बेताल झाले होते. नंतर खेळ झाला, त्यांत राजेसाहेब हे **बसवप्रभू** आणि **कालनीती** यांजबरोबर खेळले. खेळांत राजेसाहेबांनीं हातांतील एक हिऱ्याची पोंची, आणि कमरेची एक मौल्यवान कट्यार ह्या दोन फार मौल्यवान जिनसा घालविल्या. पण ती हकीकत असो. मी आज पहांटेसच **मोहन**ला बरोबर घेऊन बागेंत आलों तो मुद्दाम त्याच बंगल्याकडे सहज गेलों.–जवळच तेथें आल्यावर रात्रींची हकीकत कितपत खरी असेल हें तेथील अवशिष्ट वस्तूंच्या व एकंदर स्थितीच्या देखाव्यावरून कांहीं तरी लक्षांत येईल असें वाटल्यावरून इमारतींत शिरलों. मुख्य दिवाणखान्यांत जिकडेतिकडे बैठका वगैरे अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. पानपात्रें, फांसे, गंजिफा वगैरे जशाच्या तशाच लोळत होत्या. लागून असणाऱ्या खोल्यांतील मंचकादि सामान उलथें पालथें होऊन पडलें होतें. एकंदर देखावा फारच विलक्षण दिसत होता. आणि त्यावरून रात्रीच्या स्थितीची कल्पना सहज करितां येण्यासारखी होती. दिवाणखान्यांतील चित्रें, तसबिरा वगैरे पहात मी इकडे तिकडे हिंडत होतों, इतक्यांत माझ्या पायाला बैठकीवर पडलेली एक लहानशी रेशमी कापडाची थैली लागली. ती मीं वर उचलून हातांत घेतली. आणि ही कोणाची आहे हें कळण्यास कांहीं मार्ग असेल तर पहावा व ज्याची त्यास पोंचती होईल असें करावें ह्मणून मीं तिची गांठ सोडली. आंत पहातों तों थोडेंसें नाणें व कांहीं कागदपत्र होते. कागद उघडून पाहतांच, ज्या आंकड्यांच्या भाषेंत तूं मला दिलेली चिठ्ठी लिहिली होती त्याच भाषेंत लिहिलेले दोन तीन कागद मला सांपडले. हें पाहून मला केवढें आश्चर्य वाटलें असेल, तूंच पहा."

**नलिनीः**–"केवढा तरी हा चमत्कार! मला तर वाटतें, हा त्या **जगदंबे**चाच प्रसाद. आपल्या हातून मोठमोठीं पराक्रमाचीं व चातुर्याचीं कामें व्हावींत, आणि त्यांच्या योगानें **कुमुद्वती** राणीसाहेबांचें हित व्हावें

# केसरींतील निवडक निबंध

## भाग दुसरा.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत, अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

### विषयानुक्रमणिका.

ज्ञान.
अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
समाईकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
जूट.
मनुष्यांचें सामाजिक कर्तव्य.
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्णावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?
बालविवाहापेक्षां सतीच बरी !
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?
चैन.
स्त्रीदास्यविमोचन.
तंबाखू.
चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें ?
आह्मा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचे म० चऱ्हाट.
एक वृद्ध पोलिटिकल अत्याबाई.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे.
व्यायाम.
परभाषेंतील शब्दांची योजना.
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची अवश्यकता.
उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बाहुबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला.
प्रसिद्धीकरण.
ब्रह्मदेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गमतीचे प्रश्न.
पाऊस.
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार.
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?
,, उत्तरार्ध.
ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति.

**म्यानेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें.**

# विक्रीस तयार.

## मुंबई हेमंतव्याख्यानमाला.

अनेक विद्वान, बहुश्रुत, अनुभवी गृहस्थांनीं निरनिराळ्या विषयांवर दिलेलीं, माहितीनें भरलेलीं, उन्नत विचारांनीं व कल्पनांनीं परिप्लुत, मनोरंजनाचें व मनोविकासाचें उत्कृष्ट साधन अशीं

१८८९, १८९०, १८९१ सालचीं

# एकोणीस व्याख्यानें

एकदम घेणारांस किंमत २८२. ट. ख. ०४.

विषयः—१ जलधिजवर्णन, २ सामाजिक दिषयासंबंधीं तोडजोड, ३ आमचे कलाकौशल्यांत सुधारणा करण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत, ४ ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म किंवा वेद व वैदिक धर्म, ५ मोगल व मोगली धर्म, ६ स्थावरजंगमात्मक सृष्टीविषयीं माहिती, ७ आमची धर्मोदायपद्धति, ८ ॲन्टिकार्नलॉ लीग अथवा इंग्लंडांतील धान्यावरील कराचे कायदे रद्द करण्याविषयीं दीर्घ प्रयत्न, ९ युरोपच्या इतिहासापासून आपल्या लोकांनीं काय शिकावें, १० सोनें व रुपें यांचा हिंदुस्थानांत खप, ११ धर्मौदार्य, १२ पार्स व पार्सी धर्म, १३ षड्दर्शनसारनिरुक्ती, १४ मध्यप्रदेशाची संक्षिप्त माहिती, १५ आमची प्राचीन स्थिति, प्राचीन कायदे व त्यांचें बंधन, १६ दारूपिणें, १७ हिंदुसमाजसुधारणा, १८ शरीरसामर्थ्य, १९ इतिहासाची पुनरावृत्ति.

सन १८९२ सालचीं.

१ आमची देशीभाषा विद्यापीठीं शीभण्यासारखी आहे कीं नाहीं ? प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत यांनीं दिलेलें. किं० ०२ ट. ख. ०॥

१ ब्रिटिश राज्यव्यवस्थेची वाढ व तिचें सांप्रतचें स्वरूप. प्रो० दामोदर गणेश पाध्ये एम्. ए. यांनीं दिलेलें. किं० ०२ ट. ख. ०॥.

१ के० वा० बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांचें चरित्र. रा० रा० बाळकृष्ण नारायण देव यांनीं दिलेलें. किं० ०२०६ ट. ख. ०॥

१ [illegible]द्रियविज्ञानविचार. डा० कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, सर्जन मेजर, यांनीं दिलेलें. किं० १०५ ट० ख० ०॥.

१ [illegible]बीजाविध्वंस. डा० कृष्णराव विश्वनाथ [illegible]रंधर, मेडिकल आफिसर बडोदें यांनीं दिलेलें. किं० १ ट० ख० ०॥.

१. चारी वर्षांचीं व्याख्यानें एकदम घेणारास किं० २०१० ट० ख० ०५०६.

| | किं० |
|---|---|
| संगीत सौभद्र किर्लोसकरकृत.... ... | ०१२ |
| संगीत शाकुंतल ,, ... | ०१२ |
| संगीत मृच्छकटिक देवलकृत. ... | ०१२ |
| संगीत विक्रमोर्वशीय ,, ... | ०१२ |
| एकच दिवसाची चुकामूक, (दुर्गा नाटक). | ०५ |
| वेरोत्संसनाटक शं० मो० रानडे, बी. ए. कृत. ... ... ... ... ... | ०१२ |
| डाक्तर वैद्यप्रहसन. ,, ... ... | ०२ |
| चंडकौशिक नाटक. ,, ... ... | ०६ |
| रमगुटिका नाटक. ,, ... ... | ०४ |
| अनुतापशमन नाटक ,, ... ... | ०१२ |
| पतिशिक्षा प्रहसन ,, ... ... | ०४ |
| लटपटाध्याय प्रहसन ,, ... ... | ०२ |
| रतिमन्मथ नाटक ,, ... .. | १ |
| अधिकारदानविवेचना नाटक. ,, ... | ०५ |
| प्रमादप्रमोद नाटक. ,, ... ... | ०९ |
| मोहविलसित नाटक वि. मो. महाजनी एम.ए. कृत. ... ... ... ... | ०१० |

आर्यभूषण छापखाना, पुणें.

# चाटिका नाटक.

म[illegible] [illegible]क्सपिअरकृत टेमिंग आफ दी श्र्यू नाटकाच्या आधारें प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए., यांनीं लिहिलें.

त्या नाटकांत हास्यरस पूर्ण भरला आहे.

किंमत ०६ आणि ट० हं० ०१ आणा.

आर्यभूषण छापखाना, पुणें.

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक ६.

# नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

## A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas Novels &c. &c.*

| विषय. | अनुक्रमणिका. | पृष्ठें. |
|---|---|---|

वीरमणी आणि शृंगारसुंदरी ... ... ... ... ... ... ४९ ,, ६४
कुवलयपूरची राणी कुमुद्वती.... ... ... ... ... ...१८५ ,, २००

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत
हरि नारायण गोखले यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क
मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.
[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ४॥. शिवाय ~ हं. ६ आणे
जून १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें.

# विक्रीस तयार.

हीं सर्व पुस्तकें पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत विकत मिळतील.

**सार्थवाग्भट**—अष्टांगहृदय ( संस्कृत मूळ व मराठी भाषांतर यांसह ). डा० गणेश कृष्ण गर्दे यांनीं केलेलें. भाग दोन. पृष्ठें १६००. बांधणी मजबूत. जाड पुठ्ठा कपड्याचा. नांव सोनेरी अक्षरांनीं कोरलेलें. टाईप स्वच्छ व सुवाच्य. कागद जाडा. पहिल्यानें मूळ श्लोक ( वाक्यार्थ पुरा होईपर्यंत ). त्याचे खालीं सुबोध मराठी अर्थ, ठिकठिकाणीं स्पष्टीकरणार्थ भरपूर टिपा. अखेरीस परिशिष्टाखालीं अवशिष्ट टिपा व स्पष्टीकरणें, ( रोगांचीं नांवें वगैरे ) दुर्बोध शब्दांचा अर्थ समजण्याकरितां एकंदर पारिभाषिक शब्दांचा एक वर्णानुक्रम कोश, वैद्य नसणारांनाही ग्रंथाचा क्रियेमध्यें उपयोग व्हावा म्हणून सर्व ग्रंथाचें एक वर्णानुक्रम सूचिपत्र,—इत्यादींच्या योगें ग्रंथ अत्यंत मूल्यवान् व उपयुक्त झाला आहे. शिवाय यंत्रादिकांचीं चित्रेंही जोडलीं आहेत. प्रस्तावना ( ८५ पानें ) फारच महत्वाची आहे. तींत आर्यवैद्यकाचा अगदीं पुरातन कालापासून तों आजपर्यंतचा इतिहास, ग्रंथकर्त्याचा इतिहास, प्रस्तुत ग्रंथाचें पृथक्करण ( म्हणजे त्याचा अंगप्रत्यंग विचार व आपल्या वैद्यकांतील मूलतत्वें यांविषयीं साधारण व सरळ पद्धतीनें विवेचन केलें आहे. ही प्रस्तावना वाचून एका विद्वान् डाक्टरांनीं आम्हांस असें लिहिलें कीं, तिचीच किंमत ग्रंथाच्या हल्लींच्या किमती इतकी आहे.

आजपर्यंत संस्कृत वैद्यकाच्या कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं आहेत; पण त्यांत अनेक दोष असून कांहीं ग्रंथ अर्वाचीन व एकदेशीय आहेत व कांहींत नव्या जुन्याचें मिश्रण आहे. वाग्भटानें आपल्या अष्टांगहृदयग्रंथांत चरक आणि सुश्रुत यांतील उपयुक्त भाग तेवढा घेतला असल्यानें व वैद्यकाच्या अंगप्रत्यंगांची संगतवार व पद्धतवार जुळणी केली असल्यानें हाच एक ग्रंथ वाचल्यानें सर्व विषयांची माहिती पूर्णपणें व चांगल्या प्रकारें होऊन अनेक ग्रंथ वाच-[illegible] " [illegible] " [illegible] अष्टांगहृदयांतील [illegible] [illegible] शोभेल. किंमत १२ रुपये, ट. ६. १ रु०.

**चार्लस ब्राडला एम्. पी.**—यांचें चरित्र 'विलायतचा प्रवास' या पुस्तकाच्या विद्वान् कर्त्यांनीं लिहिलें. पूर्णस्वातंत्र्यभक्त, दुर्बलांचा कैवारी, सत्पक्षाचा अभिमानी, धीरोदात्त पुरुषांत अग्रणी, या दुर्दैवी आर्यभूचा परम उपकारी मित्र अशा या अलौकिक पुरुषाचें बोधपर चरित्र वाचल्यापासून मनावर सुसंस्कार झाल्याशिवाय राहणार नाहीं. किंमत ४ आणे टपालहांशील ६ पै.

**निबंधमाला**—भाग १।२ कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं सतत सात वर्षे जिच्यावर अत्यंत परिश्रम घेतले त्या निबंधमालेंतील सर्व निबंध एकत्र छापले आहेत. त्याचप्रमाणें शास्त्रीबोवांच्या लेखांवर टीकात्मक पत्रें जीं निबंधमालेंत प्रसिद्ध झालीं तींही यांत सामील केलीं आहेत. सुरस, सालंकार, सुबोध मराठी भाषा, पोक्त, उदात्त व उन्नत विचार, चमत्कृतिजनक व तर्कशास्त्रानुयायी कोटिक्रम, नर्मपरिहास तसाच कडक शब्द-प्रहार, दंभस्फोट, सत्यनिरीक्षण, नानाग्रंथावलोकनाच्यायोगें परिप्लुत विविध माहिती,—इत्यादींच्या गुणांच्या योगें शास्त्रीबोवांची ही प्रियकन्या अज्ञानध्वंसास, ज्ञानवृद्धीस व महाराष्ट्र भाषेच्या परिपोषास किती कारणीभूत झाली हें येथें

हुजऱ्या जासुदाला घेऊन येतो.

**जासूद**—( लवून मुजरा करून ) सरकार, मी वीरमणीमहाराजांच्या छावणींतून आलों आहे. ते सिंधुनगराकडे निघून गेले. सिंधुनगरच्या राणीसाहेबांकडून एक जासूद आला होता व त्याच्याशीं यांचा एकांत होऊन दोन घटकेच्या आंतच त्यांनीं कूच केला, व मी लगेच ही खबर आपल्याला देण्यासाठीं सांडणीवर स्वार होऊन दम न टाकतां आलों.

**अहल्या**—हायरे देवा ! ( एकदम अंग टाकते. **जयेंद्रपाल** तिला सावरून धरतो. )

**जयेंद्र०**—ताई, सावध हो. हें काय हें वेड्यासारखें ! ( **जासुदाला** ) तूं जा, बाहेर बैस. आह्मांला तुला आणखी कांहीं विचारावयाचें आहे तें मग विचारूं.

[ **जासूद** जातो.

( **हुजऱ्याला** ) बलदेवाला इकडे लावून दे. ताई, सावध हो. दे हा शोक टाकून. तुझ्या सौख्यावर दुर्दैवानें हा घाला घातला आहे खरा; पण रडल्यानें कां हा नाश भरून येणार आहे ? अरेरे, काय हा तुझा अपमान ! देवा, या अपमानाचें परिमार्जन करण्यासाठीं तूंच माझें हें कोंवळें मन दगडाप्रमाणें कठोर कर. ताई शोक आवर. सावध हो.

**अहल्या**—दादा, आतां कशाला सावध व्हावयाचें. देवानें आतां असेच डोळे मिटावे हें उत्तम. पुढचें भयंकर भविष्य मला सारें दिसतें आहे. हा सारा देश या आपसांतील कलहामुळें उध्वस्त होणार. आई जगदंब, हे पापी डोळे लवकर मिटून ने मला आपल्या पायापाशीं.

( **जयेंद्रपालाच्या** खांद्यावर मान टाकते. )

**बलदेव** येतो.

**जयेंद्र०**—बलदेव, हिला आंत घेऊन जा. नीट जपा ह्मणावें हिला. ती दुःखानें अगदीं वेडी झाली आहे. तिच्यावर चांगली नजर ठेवा. नाहीं तर कांहीं तरी आतत्यायीपणा करील. आपल्या शास्त्रीबोवांना ह्मणावें पुराणांतल्या साध्वींच्या गोष्टी सांगून तिच्या मनांत विवेक उत्पन्न होईल असें करा.

[ **बलदेव अहल्येला** आंत नेतो.

**जयेंद्र०**—वीरमणी, भरला तुझा पापाचा घडा. माझे हजारों अपराध केले असतेस तरी ते मीं पोटांत घातले असते, आणि आजपर्यंत घातले नाहींत कीं काय?—पण माझ्या ताईचा—आवडत्या प्राणाचा—असा बेइमानानें घात केलास काय ? ठीक आहे. पाहतों तुझा समाचार. या जयेंद्रपालाशीं गांठ आहे. तुला आपल्या शौर्याची मोठी घमेंड आहे. पण शौर्याचा उजवा हात जी अक्कल ती तुझ्यापाशीं कोठें राहिली आहे ? तुला अशा पेंचांत धरतों कीं तेथें तुझ्या शौर्याची कांहीं मात्रा चालूं नये. हा फांसा टाकलाच पहा. या जयेंद्रपालानें टाकलेला फांसा भलतें दान कधीं द्यावयाचा नाहीं. हा तुझ्या गळ्याला फांस घालणार, आतां यामुळें माझ्या भगिनीला वैधव्य येईल. पण असा करंटा बदफैली नवरा असण्यापेक्षां वैधव्य काय वाईट ? शिवाय मी आपल्या बंधु-

प्रेमांत तिला अशी गुरफटून टाकीन कीं तिच्या हृदयापर्यंत कोणतेंच दुःख पोंचूं देणार नाहीं. सरदारहो, झालेला प्रकार हा तुह्मीं ऐकलांतच. हा साऱ्या लोकांना कळवा ह्मणजे आह्मीं लढाई कां करतों हें त्यांना कळेल, आणि लढाईच्या तयारीला लागा. मला आतां घटकाभर विश्रांति घेतली पाहिजे. काकासाहेब, काय हा माझ्यावर प्रसंग आणलांत ?

**यादव०—**
**प्रताप०—** } सरकार, आह्मीं घेतों रजा.

[ जातात. **जयेंद्रपाल** आंत जातो.

---

**प्रवेश ५ वा.** वीरमणीचा तंबू.

**वीरमणी** एकटा विचार करीत बसला आहे.

**वीरमणी**—काय करावें ! मी त्या माझ्या जिवाच्या चुंबकाकडे निघालों आहे खरा; पण मनाची हुरहूर कांहीं रहात नाहीं. माझें मन मला खातें आहे. मी त्या अहल्येशीं बेइमान नाहीं का झालों ? तिला काय काय गोड थापा दिल्या ! मीं इकडे धांव मारली हें जर तिला कळलें तर ती मला काय ह्मणेल ? खरोखर तिच्यासारखी साध्वी मिळावयाची नाहीं. जयेंद्रपालाचीं कृत्यें ऐकून तिच्या अंगावर कसा काटा उभा राहिला ! तिच्यांत आणि तिच्या भावांत किती अंतर ! ती महापतिव्रता, सद्गुणी, सच्छील, तर हा दुष्ट नराधम, याचें मन निरंतर राक्षसी, घातकी विचारांनीं भरलेलें. आः नको, त्याचें स्मरण नको. आजपासून विजयगिरीला रामराम ठोकलाच. सिंधुदेश आपलाच आहे. तेथेंच राज्यसुख आणि कुटुंबसुख घेत आनंदानें राहूं. शृंगारसुंदरीचा सहवास असल्यावर हें जग आहे कीं नाहीं याचें स्मरण कोणाला होणार आहे ! पण केव्हां त्या सुंदरीची गांठ पडेल ? रात्रंदिवस डोळ्यापुढें ती—आ—आ—आ ! झोंप येते आहे. मला वाटतें जरा लवंडावें [ निजतो.

**शृंगारसुंदरी** व **अधीरसिंग** येतात.

**शृंगार०**—कोठें आहे स्वारी ?

**अधीर०**—पण आपण आलां कशा ? आह्मीं निघाल्याचें आपल्याला कळलें कसें ?

**शृंगार०**—तें सारें कळेल मग ? अगोदर स्वारी कोठें आहे तें दाखवा.

**अधीर०**—स्वारी होय ? स्वारी गेली आहे शिकारीला. पण मी ह्मणतों आपण सड्या कशा आल्या ? दासी वगैरे कोठें आहेत ? गुलाबाला का नाहीं आणलें बरोबर ?

**शृंगार०**—साऱ्या दासी मेल्या. ही का वेळ शिकारीला जाण्याची ? खरें सांगतां कीं नाहीं ?

**अधीर०**—साऱ्या दासी मेल्या ! आणि ती मदीरा देखील ? हरहर फारच वाईट !

**शृंगार०**—मेल्या, सांगतोस कीं नाहीं लवकर कोठें आहे स्वारी ती ?

[ हात उगारते.

**अधीर०**—(खुणेनें **वीरमणी** निजलेला दाखवतो.)

**वीर०**—(झोंपेंत) शृंगारसुंदरी, लाडके,

ये. नको आतां अंत पाहूं. मीं चूक केली खरी. पण राजकारण ह्मणजे भवितव्यतेप्रमाणेंच अनतिक्रम्य. तेथें प्रिय अप्रिय, आप्तइष्ट, दयामाया सर्व कांहीं विसरावें लागतें. हा पहा मी तुझ्या पायां पडतों. ये, ये आतां.

शृंगार०—( जवळ जाऊन ) ही स्वारी झोंपेंतच आहेसें दिसतें. ( अधीरसिंगाला 'जा, ह्मणून खूण करते. तो जातो. ) आतां थोडी गम्मत करूं या. ( त्याचा हात हळूच उचलून आपल्या गळ्यांत घालते ) अहाहा! किती सुखकर आलिंगन हें. प्रिया, खरेंच इतके दिवस मी या सुखाला अंतरलें होतेंना ? जळो तें राजकारण. हा विरह आपल्याला देखील किती त्रासदायक झाला असेल ! ( पदरानें त्याच्या कपाळावरचा घाम पुसते. ) पण नसेलही. तिकडून स्वारी निघाली ती कांहीं सडी नव्हती. त्या नवीन समागमसुखाच्या भरांत या सिंधुदेशच्या नागिणीची आठवण तरी झाली असेल का ? ( त्याचा हात खालीं ठेवते. ) छे: पण वेडे, तसें जर असतें तर ती जातांच स्वारींनीं इकडे धाव का मारिली. ( पुनः हात गळ्यांत घालते. )

वीर०—( झोंपेंत ) नको, नको इतका राग. अग ही शृंगारसुंदरी दुसरी का कोणी आहे ? जशी तूं तशीच ती. काय पण तिचें मन माझ्यावर आहे ! नको त्या भिवया मोडूं. अहल्ये, असा हा हट्टीपणा कांहीं नीट नाहीं. तुझ्यासारख्या शहाण्या बायकोला तो शोभत नाहीं. तुझी मी क्षमा मागतों. नाहींना ऐकत तूं ? हीच का अशी पतिव्रता तूं ? पतिव्रतेनें पतीच्या मर्जीप्रमाणें वागलें पाहिजेना? तुझ्या जागीं जर शृंगारसुंदरी असती तर तिनें खचित असें केलें नसतें.

शृंगार०—ह्मणूनच हा देह इकडे वाहिला.

वीर०—अजूनही राग जात नाहींना ? बरें तर वेडे, देतों टाकून तुझ्यासाठीं तिला.

शृंगार०—( एकदम हात फेंकून देऊन दूर जाते. )

वीर०—( दचकून जागा होतो, तिला पाहून आनंदानें ) अरे वा:, हा आमच्या आनंदसिंधूला भरती आणणारा सिंधुदेशचा चंद्र इकडे आला ! वा:, ये प्रिये, आतांच मला तूं स्वप्नांत दिसली होतीस !

[ जवळ जातो.

शृंगार०—होय. आणि आतांच त्या सवतीसाठीं आपण मला टाकून द्यायला तयार झाला होतां. हं, दूर उभे रहा. ( जंबिया काढून ) माझा नवस होता तो आतां फेडला पाहिजे. आपलें एकवार दर्शन व्हावें ह्मणजे मी आपला प्राण देवीला वाहीन असा नवस केला होता. सवतीकरतां मला टाकून देणार होतांना?

[ जंबिया मारून घेण्याकरितां उगारते.

वीर०—( तिला घट्ट आंवळून धरून जंबिया काढून घेऊन ) हा जीव माझा आहे, तुझा नाहीं समजलीस. वेडी कोठली? स्वप्नांतलें ऐकून लागली जीव द्यावयाला. अगोदर हा जीव घे, मग तो दे. अग, तुझी माझी गांठ पडली, माझी शक्ति मला मिळाली. आतां जीव देण्याच्या

प्रेमांत तिला अशी गुरफटून टाकीन कीं तिच्या हृदयापर्यंत कोणतेंच दुःख पोंचूं देणार नाहीं. सरदारहो, झालेला प्रकार हा तुह्मीं ऐकलांतच. हा साऱ्या लोकांना कळवा ह्मणजे आह्मीं लढाई कां करतों हें त्यांना कळेल, आणि लढाईच्या तयारीला लागा. मला आतां घटकाभर विश्रांति घेतली पाहिजे. काकासाहेब, काय हा माझ्यावर प्रसंग आणलांत ?

**यादव०—**
**प्रताप०—** } सरकार, आह्मीं घेतों रजा.

[ जातात. **जयेंद्रपाल** आंत जातो.

---

**प्रवेश ५ वा.** वीरमणीचा तंबू.

**वीरमणी** एकटा विचार करीत बसला आहे.

**वीरमणी**—काय करावें ! मी त्या माझ्या जिवाच्या चुंबकाकडे निघालों आहे खरा; पण मनाची हुरहूर कांहीं रहात नाहीं. माझें मन मला खातें आहे. मी त्या अहल्येशीं बेइमान नाहीं का झालों ? तिला काय काय गोड थापा दिल्या ! मीं इकडे धांव मारली हें जर तिला कळलें तर ती मला काय ह्मणेल ? खरोखर तिच्यासारखी साध्वी मिळावयाची नाहीं. जयेंद्रपालाचीं कृत्यें ऐकून तिच्या अंगावर कसा काटा उभा राहिला ! तिच्यांत आणि तिच्या भावांत किती अंतर ! ती महापतिव्रता, सद्गुणी, सच्छील, तर हा दुष्ट नराधम, याचें मन निरंतर राक्षसी, घातकी विचारांनीं भरलेलें. आः नको, त्याचें स्मरण नको. आजपासून विजयगिरीला रामराम ठोकलाच. सिंधुदेश आपलाच आहे. तेथेंच राज्यसुख आणि कुटुंबसुख घेत आनंदानें राहूं. शृंगारसुंदरीचा सहवास असल्यावर हें जग आहे कीं नाहीं याचें स्मरण कोणाला होणार आहे ! पण केव्हां त्या सुंदरीची गांठ पडेल ? रात्रंदिवस डोळ्यापुढें ती—आ—आ—आ ! झोंप येते आहे. मला वाटतें जरा लवंडावें [ निजतो.

**शृंगारसुंदरी** व **अधीरसिंग** येतात.

**शृंगार०**—कोठें आहे स्वारी ?

**अधीर०**—पण आपण आलां कशा ? आह्मीं निघाल्याचें आपल्याला कळलें कसें ?

**शृंगार०**—तें सारें कळेल मग ? अगोदर स्वारी कोठें आहे तें दाखवा.

**अधीर०**—स्वारी होय ? स्वारी गेली आहे शिकारीला. पण मी ह्मणतों आपण सड्या कशा आल्या ? दासी वगैरे कोठें आहेत ? गुलाबाला का नाहीं आणलें बरोबर ?

**शृंगार०**—साऱ्या दासी मेल्या. ही का वेळ शिकारीला जाण्याची ? खरें सांगतां कीं नाहीं ?

**अधीर०**—साऱ्या दासी मेल्या ? आणि ती मदीरा देखील ? हरहर फारच वाईट !

**शृंगार०**—मेल्या, सांगतोस कीं नाहीं लवकर कोठें आहे स्वारी ती ?

[ हात उगारते.

**अधीर०**—(खुणेनें **वीरमणी** निजलेला दाखवतो.)

**वीर०**—(झोंपेंत) शृंगारसुंदरी, लाडके,

ये. नको आतां अंत पाहूं. मीं चूक केली खरी. पण राजकारण ह्मणजे भवितव्यतेप्रमाणेंच अनतिक्रम्य. तेथें प्रिय अप्रिय, आप्तइष्ट, दयामाया सर्व कांहीं विसरावें लागतें. हा पहा मी तुझ्या पायां पडतों. ये. ये आतां.

**शृंगार०**—( जवळ जाऊन ) हीं स्वारी झोंपेंतच आहेसें दिसतें. ( अधीरसिंगाला 'जा, ह्मणून खूण करते. तो जातो. ) आतां थोडी गम्मत करूं या. ( त्याचा हात हळूच उचलून आपल्या गळ्यांत घालते ) अहाहा! किती सुखकर आलिंगन हें. प्रिया, खरेंच इतके दिवस मी या सुखाला अंतरलें होतेंना ? जळो तें राजकारण. हा विरह आपल्याला देखील किती त्रासदायक झाला असेल ! ( पदरानें त्याच्या कपाळावरचा घाम पुसते. ) पण नसेलही. तिकडून स्वारी निघाली ती कांहीं सडी नव्हती. त्या नवीन समागमसुखाच्या भरांत या सिंधुदेशच्या नागिणीची आठवण तरी झाली असेल का ? ( त्याचा हात खालीं ठेवते. ) छे: पण वेडे, तसें जर असतें तर ती जातांच स्वारींनीं इकडे धाव का मारिली. ( पुनः हात गळ्यांत घालते. )

**वीर०**—( झोंपेंत ) नको, नको इतका राग. अग ही शृंगारसुंदरी दुसरी का कोणी आहे ? जशी तूं तशीच ती. काय पण तिचें मन माझ्यावर आहे ! नको त्या भिवया मोडूं. अहल्ये, असा हा हट्टीपणा कांहीं नीट नाहीं. तुझ्यासारख्या शहाण्या बायकोला तो शोभत नाहीं. तुझी मी क्षमा मागतों. नाहींना ऐकत तूं ? हीच का अशी पतिव्रता तूं ? पतिव्रतेनें पतीच्या मर्जीप्रमाणें वागलें पाहिजेना ? तुझ्या जागीं जर शृंगारसुंदरी असती तर तिनें खचित असें केलें नसतें.

**शृंगार०**—ह्मणूनच हा देह इकडे वाहिला.

**वीर०**—अजूनही राग जात नाहींना ? बरें तर वेडे, देतों टाकून तुझ्यासाठीं तिला.

**शृंगार०**—( एकदम हात फेंकून देऊन दूर जाते. )

**वीर०**—( दचकून जागा होतो, तिला पाहून आनंदानें ) अरे वा:, हा आमच्या आनंदसिंधूला भरती आणणारा सिंधुदेशचा चंद्र इकडे आला ! वा:, ये प्रिये, आतांच मला तूं स्वप्नांत दिसली होतीस !

[ जवळ जातो.

**शृंगार०**—होय. आणि आतांच त्या सवतीसाठीं आपण मला टाकून द्यायला तयार झाला होतां. हं, दूर उभे रहा. ( जंबिया काढून ) माझा नवस होता तो आतां फेडला पाहिजे. आपलें एकवार दर्शन व्हावें ह्मणजे मी आपला प्राण देवीला वाहीन असा नवस केला होता. सवतीकरतां मला टाकून देणार होतांना ?

[ जंबिया मारून घेण्याकरितां उगारते.

**वीर०**—( तिला घट्ट आंवळून धरून जंबिया काढून घेऊन ) हा जीव माझा आहे, तुझा नाहीं समजलीस. वेडी कोठली ? स्वप्नांतलें ऐकून लागली जीव द्यावयाला. अगोदर हा जीव घे, मग तो दे. अग, तुझी माझी गांठ पडली, माझी शक्ति मला मिळाली, आतां जीव देण्याच्या

गोष्टी कशाला ? अजून या हाताला हजारों बळी रणदेवतेला द्यावयाचे आहेत. आतां गाढ आलिंगन दे पाहूं.

**शृंगार०**—( मिठी मारून ) काय मेला फसवा राग आहे तरी. क्षणभर देखील टिकला नाहीं.

---

## अंक चवथा.

### प्रवेश १ ला. सिंधुनगर, शृंगारसुंदरीचा वाडा.

**शृंगारसुंदरी** आणि **अधीरसिंग** येतात.

**शृंगार०**—याबद्दल तुमचें नाक चांगलें ठेंचल्याखेरीज मी राहणार नाहीं. खूप समजून रहा.

**अधीर०**—पण कां, कां, कां ? एवढा गहजब गरीबावर कां ?

**शृंगार०**—आणि कां ह्मणून पुनः चोमडेपणानें विचारतां ? मी लढाईंत बरोबर नसावें ह्मणून कोणीं सल्ला दिली ? कां बरें मीं नसावें ?

**अधीर०**—कां बरें आपण असावें ? आपलें काय काम तेथें बाईसाहेब ?

**शृंगार०**—काय काम ह्मणजे ? जेथें माझे वीरमणी तेथें मी असायचीच. त्यांना सोडून मी कधीं राहणार नाहीं. मी नसलें तर त्यांच्या हातून पराक्रम तो कसा होणार ? मला ते आपली शक्ति नाहीं का ह्मणत ? आणि शक्तीला येथें ठेवून ते लढाईला गेले आणि झाला तरी त्याचें चीज काय ?

**अधीर०**—( एकीकडे ) मला यावर खासें उत्तर देतां येईल. घोडे आणि मादवान्या एकत्र झाल्यावर—

**शृंगार०**—काय पुटपुटतां आहां आपल्याशीं ?

**अधीर०**—कांहीं नाहीं बाईसाहेब. हें पहा, आपण तेथें असलां ह्मणजे वीरमणींचें चित्त ठिकाणावर कसें रहावें ?—त्यांचें हृदय, त्यांची अक्कल, त्यांचें प्रसंगावधान यांपैकीं यत्किंचित् भाग देखील अशा वेळीं त्यांच्या ताब्यांतून बाहेर जातां उपयोगीं नाहीं; पण तुम्हांला पाहिलें कीं या साऱ्यांनीं तुमच्याकडे धांव घेतलीच. मग सेनानायकाचें काम त्यांच्या हातून कसचें होणार ! हल्लींच लोक ह्मणूं लागले आहेत कीं वीरमणींचें लक्ष राज्यकारभारांत नसून आपला जनानखान्यांतील गुलाब आणि आपल्या दासी या लढाईची सारी व्यवस्था ठेवीत आहेत.

**शृंगार०**—आग लागो या लोकांच्या तोंडाला ! या लोकांच्या जिभेला किडे कां नाहीं पडत ! बस्स, तें कांहीं नाहीं. मी या राज्याची अर्धी-अर्धी कां ? सर्वस्वीं-मालकीण, माझ्या तिजोरींतूनच लढाईचा खर्च व्हावयाचा. तेव्हां मी आपलीं जहाजें घेऊन बरोबर येणारच. परमेश्वरानें शौर्याचा पट्टा फक्त पुरुषांनाच का करून दिला आहे ? मलाही पण पुरुषांचें शौर्य शौर्य म्हणतात तें कसें असतें तें पहावयाचें आहे. बस्स, तुह्मी आतां एक अवाक्षर पुढें बोलूं नका.

अधीर०—राहिलें. आपण या बाबतींत एक शब्दही काढणार नाहीं. हे पहा आले सरकार.

वीरमणी आणि दौलतसिंग येतात.

वीर०—कायहो दौलतसिंग ? यानें एवढा प्रांत इतका लवकर व्यापला तरी कसा? लाडके, ऐकलेंस हें ? जयेंद्रपालानें द्वारका घेतली !

शृंगार०—स्वतः आळशी त्याला इतर लोकांची सावकाशी देखील त्वराच वाटते.

वीर०—नामी टोला दिलात बोवा. लढाईच्या वेळेस ढिलाई दाखविल्याबद्दल एखाद्या शिपायाला शेंकडों लढाया मारलेल्या त्याच्या शूर सरदारानें चमकाविल्याप्रमाणेंच आपण आमची शोभा केलीत. बरें, तें असो; दौलतसिंग, उद्यां समुद्रावर लढाई द्यावयाची.

दौलत०—महाराज, विचारतों याची माफी असावी. समुद्रावर कां ?

वीर०—कां ह्मणजे ? तुह्मांला माहीत नाहीं का त्या पोरट्यानें आह्मांला गर्वानें आव्हान केलें आहे तें ? " उद्यां समुद्रावर लढाई करून काय तुमचा पराक्रम असेल तो दाखवा. " किती उर्मटपणाचा हा निरोप ! त्याला वाटतें कीं समुद्रावर लढायला हा वीर कचरेल !

शृंगार०—इतकी कशाला त्याची ऐट पाहिजे ती. माझीं जहाजें घेऊन मी देखील त्याच्याशीं लढेन.

वीर०—यांत काय संशय ! अग या वीरमणीच्या वीर्याचा अर्धा वांटा तुझाच आहे. अग, तूं मला देखील खालीं आणलेंस, मग त्याचा काय पाड ?

शृंगार०—पुरे पुरे आतां. मेलें कांहीं तरीच बोलावयाचें.

अधीर०—सरकार, बोलतो याची माफी असावी. आपल्या शौर्याबद्दल त्याच्या मनाची पक्की खात्री आहे. तो चांगलें जाणतो कीं, जमिनीवरच्या लढाईंत आपण केवळ वीरभद्राचे अवतार आहां. तेव्हां जमिनीवर तोंड देण्याचें सोडून तो समुद्राकडे वळला आहे. कारण समुद्रावरचा आपला पराक्रम आजपर्यंत फारसा दिसून आलेला नाहीं, आणि आपल्यापाशीं आपल्या खात्रीचें समुद्रावर लढणारें सैन्यही नाहीं.

दौलत०—आणखी सरकार माझीही पण एक विनंति आहे. त्याला " जमिनीवर लढायला उभा रहा " असा आपण निरोप पाठविला होता तो त्यानें मानला नाहीं; त्यांतला तरी हेतु हाच कीं, आपले रणशूर शिपाई ज्यांनीं आजपर्यंत आपल्या यशस्वी झेंड्याच्या छायेखालीं शेंकडों रणें जिंकून राज्येंच्या राज्यें पादाक्रांत केलीं, त्यांच्यापुढें आपल्या कमकुवत, कमअनुभवी शिपायांचा काय टिकाव लागणार हें तो चांगलें ओळखून आहे. संग्रामकौशल्याविषयीं जिनें अजरामर कीर्ति मिळविली अशा आपल्या समशेरीला क्रीडा करावयाला अवकाशच ठेवूं नये ह्मणून त्यानें मुद्दाम हा असा लबाडीचा निरोप पाठविला आहे. त्याचें हें आव्हान कबूल करण्यांत आपण होऊन प्रतिकू-

ल देवाला आणि पक्षाला मदत केल्यासारखें होतें, इकडे सरकारचें लक्ष जावें.

**अधीर०**—आणि सरकार, आमचें आरमार तरी काय? गलबतें फार दिवस निगा ठेविली नसल्यानें कुजून गेलीं. सामानसुमान अपुरें, नावाडी कम तरी वेठीला धरून आणलेले नांगरे, धनगर आणि गाढवहांक्ये. आणि त्यांचें आरमार जय्यत तयारींत आहे. गलबतें मजबूत आणि पाण्यावर भिंगरीसारखीं पोहणारीं, सामानसुमान ठाकठीक जेथल्या तेथें, नावाडी अस्सल दर्यावर्दी, कसलेले, अनुभविक लढवय्ये. सरकार, समुद्रावर लढणें ह्मणजे खात्रीचा यशाचा मार्ग सोडून सर्वस्वीं आपलें जीवित त्या फसव्या नशीबाच्या हवालीं करण्यासारखें आहे. कांहीं विचार करा.

**वीर०**—झालें तुमचें बोलणें. माझा अखेरचा शब्द ऐका. समुद्रावरच लढाई द्यावयाची मग त्यांत काय होईल तें होवो.

**शृंगार०**—हे इतके कां भीतात कोण जाणें! आमच्याजवळ कांहीं नाहीं तरी साठ जहाजें आहेत. आणि तीं कशीं शृंगारलीं आहेत पण. पाण्यावरतीं तीं आपापलीं शिडें उभारून चालूं लागलीं ह्मणजे वाटतें कीं हे कोणी देवलोकींचे पक्षी जलक्रीडा करताहेत कीं काय?

**वीर०**—यांत काय संशय! प्रिये, आपण त्याला कुंभावतीच्या आखातांतूनच पिटाळून लावूं.

**शृंगार०**—प्राणप्रिया, मला बरोबर न्यावयाचीना पण?

**वीर०**—अलबत. अग माझी शक्ति, माझा प्राण येथें टाकून गेल्यावर माझ्या हातून पराक्रम तो काय होणार?

**शृंगार०**—(अधीरसिंगाकडे सगर्वानंदानें पहाते.)

जासूद येतो.

**जासूद**—सरकार, त्यांचीं आरमारें दिसूं लागलीं. येथून सुमारें पांच कोसांवर असतील.

**वीर०**—ठीक आहे. (जासूद जातो.) दौलतसिंग, उद्यां सकाळीं लढाई द्यावयाची. आमचें पायदळ आणि घोडेस्वार यांची बक्षीगिरी तुमच्याकडे. पूर्वीं हुकूम सुटल्याप्रमाणें कुंभावती आखातानजिकच्या रक्तांगमैदानांत तुमचें ठाणें असूं द्या. तेथून शत्रूच्या जमिनीवरील फौजेवर आणि समुद्रांतील लढाईवर नजर ठेवा. प्रसंग पाहून वागा हें सांगावयाला नकोच. मी या माझ्या प्राणाबरोबर समुद्रावर जाऊन रात्रीं कोणत्या व्यवस्थेनें गलबतांनीं आपल्या जागा रोखून रहावें याचा बंदोबस्त करून येतों. चलग छबकडे.

सज्जनसिंग शिपाई धाईधाईनें येतो.

कायरे बोवा, कां आलास?

**शिपाई**—शिपायांचे सरदार, गरीबाचें ह्मणणें ऐका. समुद्रावर लढूं नका. त्या कुचक्या निर्जीव लांकडांवर भरंवसा टाकूं नका. ही तलवार, या जखमा यांचा आपल्याला अंदेशा येतो कीं काय? हे सिंधुदेशांतले नटवे शाळूसोबती, यां-

ना जाऊं द्या पाहिजे तर समुद्रांत जीव द्यावयाला. आपल्या आशीर्वादानें आजपर्यंत कित्येक रणांत शत्रूच्या छातीशीं छाती भिडवून या तलवारीला आकंठ रक्त पाजलें आहे. आपण पुनः आमचें सेनाधिपत्य करा कीं लावतों या पोराच्या पोरकट सैन्याला धूळ खावयाला ! सरकार, माझे वेडेवांकडे शब्द ध्यानांत घ्या; लहाना तोंडीं मोठा घांस घेतल्याची माफी करा.

**वीर०**—तूं शिपाईगडी आहेस. तुला यांतलें कांहीं कळत नाहीं. जा आपल्या कामाला.

[ **वीरमणी, शृंगारसुंदरी** आणि **अधीरसिंग** जातात.

**शिपाई**—बलभीम साक्ष, समुद्रावर लढाई देण्यांत आमचे सरदार मोठी चूक करीत आहेत.

**दौलत०**—अरे गडचा, आमचे सरदार वीरमणी नव्हत. शृंगारसुंदरीराणी आमचे सरदार. वीरमणी त्यांचे बंदे गुलाम झाले आहेत. बोलण्यांत काय हंशील आहे? आपण आपलें कर्तव्य इमानानें बजावावें; मग जें व्हावयाचें असेल तें होईल.

---

## प्रवेश २ रा.—कुंभावतीच्या आखातानजीकचें रणमैदान.

**जयेंद्रपाल, यादवराव, बलदेव, प्रतापसिंग** व इतर सरदार.

**जयेंद्र०**—यादवराव !

**यादव०**—जी सरकार,—

**जयेंद्र०**—जमिनीवर लढाई देऊं नका; सगळें सैन्य एकत्र ठेवा; समुद्रांतलें युद्ध संपल्याखेरीज येथें लढाई अंगावर घेऊं नका. या कागदांत जें जें लिहिलें आहे त्याबरहुकूम व्यवस्था ठेवा. त्यांत काडीमात्र फरक करूं नका. आजच्या या फाशावर आपलें सारें नशीब अवलंबून आहे.

**यादव०**—सरकार, हुकुमाबाहेर काडीमात्र जाणार नाहीं. मी जातों सरकार आपल्या ठाणावर.

**सरदार**—सरकार, आह्मांलाही रजा असावी. आह्मीं आपापलीं पथकें धरून रहातों.

**जयेंद्र०**—ठीक आहे. तुमच्यावर माझी सारी भिस्त आहे. माझें स्वतःचें कितीही नुकसान झालें, प्रत्यक्ष माझ्या बहिणीचा झालेला अपमान निमूटपणें गिळावा लागला, तरी त्याचें मला वाईट वाटत नाहीं. पण आजपर्यंत जो आपला देश एखाद्या पवित्र आणि निग्रही कुमारिकेप्रमाणें कोणाच्याही कह्यांत गेला नाहीं, त्याच्यावर एकदम परवशतेचें जड जोखड बसावें, ही वेश्या आणि हा तिच्याशीं लंपट झालेला जार यांनीं आपल्या पवित्र स्त्रियांवर आपलें वर्चस्व मिरवावें हें मला पसंत नाहीं. असें होण्यापूर्वीं मीं आपला प्राण टाकीन. चला, जा आतां. यशस्वी व्हा.

[ सरदार जातात.

बलदेव, तूं यादवरावाजवळ रहा. मला अजून त्याचा भरंवसा येत नाहीं. त्याचें वीरमणीचें फार दिवसांचें सख्य

आहे. बेइमानपणाचा इतकासा जरी तुला संशय आला तरी मीं सांगितल्याप्रमाणें कर. जा आतां. माझ्याच्यानें हा रक्तस्राव पाहवत नाहीं हें तुला माहीतच आहे. तुला सांगितलें त्या ठिकाणीं मी आहे. निशाणें उभारून मला लढाईची खबर कळवीत जा. लढाईचा शेवट होईल तो सर्वांच्या आधीं मला समजला पाहिजे.

[ बलदेव एकीकडे, जयेंद्रपाल दुसरीकडे असे जातात.

---

## प्रवेश ३ रा.—रणमैदान.

दोन्हीं सैन्यांचीं दोन बाजूला ठाणीं आहेत. समुद्रांतील लढाईचे आवाज ऐकूं येतात. अधीरसिंग धांवत येतो.

**अधीर०**—बस्स, झालें, संपलें, बुडालें सारें. आटपला कारभार. या सिंधुआरमारांतील मुख्य गलबतानें, आपल्या बरोबरच्या साठ गलबतांसह माघार घेतला. आतां काय तिकडे पहावयाचें आहे? हे डोळे फुटतील तर बरें.

सज्जनसिंग येतो.

**सज्जन०**—देवा, काय हा बिनजोड लाजेचा प्रसंग !

**अधीर०**—अरे बाबा, तूं रे कां इतका हळहळतोस ?

**सज्जन०**—अहो काय सांगूं ? केवळ गाढवपणानें आज जगांतील हिऱ्यासारखें राज्य गमावलें गेलें. प्रांतचे प्रांत आणि सुभ्याचे सुभे नुसत्या चुंबनावारीं घालविले.

**अधीर०**—पण लढाईचा रंग कसा काय आहे ?

**सज्जन०**—तें कांहीं विचारूं नका. आमचें सारें आरमार पटकीनें पूर्ण ग्रासल्याप्रमाणें केवळ मरणाची वाट पाहतें आहे असें दिसतें. ही सिंधुदेशची छिनाल कवटाळीण— झडून झडून मरो ती—लढाई अगदीं भरांत असतां, ज्यावेळीं जयश्री दोन्ही पक्षाकडे सारख्या दृष्टीनें पहात होती, किंबहुना कांहीं अंशीं आमच्यावरच तिचा विशेष प्रेमाचा डोळा दिसला, अशा त्या ऐन बाणीच्या वेळीं.—गांधील माशीच्या चाव्यानें पिसाळलेल्या वनगाईप्रमाणें—हिनें आपलीं शिडें उभारून माघारीं धूम ठोकली !

**अधीर०**—हें मींही पाहिलें आणि त्या लज्जास्पद देखाव्याकडे ही नजर मग फिरेना.

**सज्जन०**—तिनें पळ काढतांच तिच्या मागून तिच्या मोहिनी मंत्राच्या पूर्ण कह्यांत सांपडून स्वतःला विसरलेले व इष्काच्या धुंदींत लुल झालेले आमचे वीरमणी—यांनीं पळ काढला. लढाई ऐन रंगांत असतां अशा प्रकारें मुख्य सेनानायकानें पळ काढणें—याहून शरमेची निंद्य गोष्ट असेल काय ? अनुभव, पौरुष, आणि अभिमान यांचा असा लोप आपल्या हातानें कधीं कोणीं करून घेतला नसेल !

दौलतसिंग येतो.

**दौलत०**—समुद्रावरील लढाईचा परिणाम तर

समजला. वीरमणीच्या यशस्वी नशिबाला आज खोट लागली. आजच कां? ज्या दिवशीं शृंगारसुंदरीची आणि त्यांची पहिली नेत्रभेट झाली त्या दिवशीं आणि त्यावेळींच वीरमणींचें बढतें नशीब मागें हटलें. आमच्या महाराजांना स्वत्वाची यत्किंचित् जरी स्मृति असती तरी सारें ठीक जमलें असतें. पण त्यांनींच धडधडीतपणें पळून जाण्याचा ठळक कित्ता घालून द्यावाना! चिन्ह कांहीं ठीक नाहीं.

**अधीर०**—हं हं! आपलें देखील मन लागलें का कचर खायला! तर मग नशिबा, हाच तुला शेवटचा रामराम!

**सज्जन०**—सरकारस्वारी कोणीकडे गेली?

**दौलत०**—त्यांनीं सिंधुनगराचा रस्ता सुधारला.

**सज्जन०**—तर मग तिकडेच आपण जाऊं. काय होईल तें होवो. जेथें सरकार तेथें आपण. [ जातो.

**दौलत०**—आतां अगोदर आपल्या सैन्याच्या सुरक्षितपणाच्या तजविजीला लागूं. सिंधुनगराच्या संरक्षणाची आधीं व्यवस्था केली पाहिजे. यांच्या मागें धांऊन जाऊन यांचे हे मूर्खपणाचे घातकी खेळ पहात रहाण्यांत काय शहाणपण! पुढचा परिणाम स्पष्ट दिसतो आहे. त्या इमानी सज्जनसिंगानें ह्मटल्याप्रमाणें या वेळीं माझी जागा सरकारच्या पाठीशीं. पण त्या कुलटेचें पुनः दर्शन नको. ती जवळ नाहीं अशी संधि पाहून पुनः एकदां वीरमणींचें मन डिवचून पाहूं. [ जातो.

**अधीर०**—माझें शहाणपण मला सांगतें आहे कीं, आतां या वीरमणींच्या खालावलेल्या नशिबावर अवलंबून रहाण्यांत कांहीं हंशील नाहीं. तरी पण हें मन अजूनही त्याच्यावरची भक्ति टाकीत नाहीं. अशा निकृष्ट स्थितींत इमानाला जागणें यांतच माझ्या भोळ्या मनाला थोरपणा वाटतो आहे. [ जातो.

---

**प्रवेश ४ था.**—सिंधुनगर, राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

**वीरमणी** आणि **सज्जनसिंग** व चाकर येतात.

**वीर०**—हरहर! ही पहा, भूमिमाता आपल्या पायाच्या स्पर्शानें मला विटाळूं नको ह्मणून मला सांगते आहे,—तिला देखील माझा भार वाहण्याची लाज वाटूं लागली,—मित्रहो, जरा असे जवळ या. माझा या जगांतला मार्ग खुंटला. माझें खळग्यांत गेलेलें पाऊल वर येणें नाहीं, तें अधिकाधिक खोल जाणार.—बंदरांत माझें एक सोन्यामोत्यानें भरलेलें गलबत आहे–तें घ्या, त्यांतील माल आपसांत वांटून घ्या, आणि जयेंद्रपालाला मिळून सुरक्षित व्हा.

**सज्जन०**—महाराज, आमच्या हातुन असलें अधमपणाचें कृत्य व्हावयाचें नाहीं.

**वीर०**—अरे कां? असें कां? मी स्वतः नाहीं का पळून आलों? आणि भिव्या भागूबाईंना शत्रूंना पाठ दाखवून

रणांतून पाय कसा काढावा याचा उत्कृष्ट कित्ता घालून दिला ? वीरमणीनें स्वतः जी गोष्ट केली ती करावयाला तुह्मीं बिलकुल लाजूं नका. आणि शिवाय यापुढें मीं जें करण्याचा निश्चय केला आहे त्या कामीं मला तुमची गरज नाहीं.—गड्यांनो, चालते व्हा; बंदरावरचा माझा खजिना घेऊन आपला रस्ता सुधारा. शिव शिव, जिचें आतां तोंड पहाण्याची सुद्धां मला लाज वाटते तिच्याच मागें कुत्र्याप्रमाणें मी आलोंना ! हें पहा प्रत्यक्ष माझ्या केंसाकेंसांत भांडण सुरू झालें आहे; पांढरे काळ्यांना ह्मणतात, "तुह्मीं अविचारी" व काळे पांढऱ्यांना ह्मणतात "तुह्मीं भेकड व नादी."—मित्रहो, जा म्हणतोंना ? माझ्या कांहीं मित्रांच्या नांवचीं तुमच्याजवळ पत्रें देतों, त्यांच्यायोगें जयेंद्रपालाची क्षमा मिळण्याचा मार्ग सोपा होईल. हें पहा, असें खिन्न होऊं नका आणि "नाहीं" ह्मणूं नका. माझ्या स्थितींत आशेला आतां कांहीं तरी जागा आहे का ? मग विचार कसचा करतां ? ज्यानें आपल्या स्वतःला सोडलें त्याला तुह्मीं चिकटून राहून तुह्मी आपल्या जिवाचें कां मातेरें करून घेतां ? ताबडतोब बंदरावर जा; तें गलबत व तो खजिना मी तुमच्या स्वाधीन करतों. आतां जा तुम्ही, मला अंमळ एकटा राहूं द्या;—माझी ही विनंति ऐकाच. हो, विनंतिच तर काय ? हुकूम करण्याचा आतां मला अधिकार नाहीं. ह्मणून ह्मणतों माझी एवढी प्रार्थना ऐकाच.—अंमळशानें मला येऊन भेटा.

[ खालीं बसतो.

**शृंगारसुंदरी, मोहना** व **मदीरा** यांच्या खांद्यावर हात टाकलेली, व **अधीरसिंग** येतात.

**शृंगार०**—कोठें ग आहेत ते ?

**मोहना**—बाई साहेब, ते पहा तेथें बसले आहेत.

**शृंगार०**—अगबाई, होय कीं, पण चेहरा किती निस्तेज दिसतो. आणि हातपाय मोडल्याप्रमाणें कसे बसले आहेत. आतां मी नाहीं बाई पुढें जात. त्यांना हें तोंड दाखवूं तरी कसें ?

**अधीर०**—असें आपण ह्मणूं लागला तर कसें चालेल? बाईसाहेब, त्यांच्याजवळ जा,—त्यांचें कांहीं सांत्वन करा.

**मदीरा**—खरेंच बाईसाहेब, तसें करा.

**शृंगार०**—नको ग बाई. मला खालीं बसूं द्याग.

**वीर०**—छेः छेः छेः !

**अधीर०**—सरकार, इकडे पाहिलेंत का !

**वीर०**—धिक् धिक् धिक् !

**मोहना**—राणीसाहेब, हें काय हें ? असा काय धीर सोडावा तो ?

**अधीर०**—सरकार, महाराज !-

**वीर०**—होय तसेंच, महाराज, सरकार, तसेंच बरें;—आजपर्यंत मोठमोठ्या रणांत तलवार गाजविली मींच. त्या बंडखोर किशोरसिंगाचें राजद्रोही व मित्रद्रोही रक्त मींच या तलवारीला पाजविलें. बसंतसिंगाला ठार करणारा हा वीरमणीच

आणि हा त्या वेळीं एकाद्या नाच्या पोऱ्याप्रमाणें तलवार लटकावून इकडून तिकडे मिरवायाचा. लढाईंतील काम सारें याच्या हाताखालच्या अंमलदारांनीं करावयाचें. रण माजविण्यापूर्वीं वीरश्रीनें थरारून दोन्हीं सैन्यें एकमेकांकडे तारवठलेल्या व निखाऱ्याप्रमाणें लाल अशा दृष्टीनें पहात उभीं राहिलीं आहेत अशा भेसूर रणभूमीवर याची मूर्ति कधीं दृष्टीस पडावयाची नाहीं. आणि आतां—असो; कांहीं हरकत नाहीं.

**शृंगार०**—कालिमाते, कसाग प्रसंग आणलास?

**मोहना**—बाईसाहेब, जरा त्यांच्या जवळ जा. त्यांच्याशीं कांहीं गोड बोला. लाजेनें त्यांचें मन अगदीं खट्टू होऊन गेलें आहे.

**अधीर०**—सरकार, बाईसाहेबांची अवस्था फार कठिण आहे. आपला झालेला अपमान सहन न होऊन त्या अगदीं बेहोष झाल्या आहेत. त्यांच्यावर यमानें आपले पाश टाकले आहेत. आपल्यावांचून त्यांना त्याच्या तावडींतून कोण सोडविणार?

**वीर०**—अरेरे, मींच माझ्या अब्रूचा केवढा घात केला! अशा रीतीनें आपलें शील विसरणाऱ्या अधमाला रौरव नरकावांचून जागा नाहीं.

**अधीर०**—सरकार, राणीसाहेबांकडे एकदां नजर तरी द्या.

**वीर०**—आली का ती! माझ्या लज्जास्पद स्थितीला पूर्णता आणावयाला एवढेंच कमी होतें. अग सिंधुदेशचे राणी, कोणत्या स्थितीला तूं मला आणून पोंचविलेंस? तुझ्या त्या डोळ्यांकडे पाहिलें कीं, तेथें मला माझें पूर्वीचें स्वरूप मीं माझ्याच कृतीनें विद्रूप करून टाकलेलें कसें स्पष्ट दिसतें आणि माझें मन लाजेनें खजिल होतें. अग असा कोणता मीं तुझा अपराध केला होता म्हणून तूं हा दावा साधलास?

**शृंगार०**—महाराज, भीतीनें मीं गलबतें माघारीं हाकारलीं याबद्दल मला क्षमा करावी. मला काय ठाऊक आपण लगेंच माझ्यामागें याल म्हणून?

**वीर०**—अग, तुला पूर्णपणें ठाऊक होतें कीं, माझें अंतःकरण प्रेमरज्जूंनीं तुझ्या गलबताच्या सुकाणूला बांधलें होतें म्हणून तुझ्या मागोमाग मी यावयाचाच. अग, या वीरमणीच्या मनावर सारी सत्ता तुझी. तुझ्याकडून खूण होण्याचा अवकाश कीं मग मी देवांच्या जरी कार्यांत गुंतलों असलों तरी तें टाकून तुझ्याकडे धांव घेणारच.

**अधीर०**—(एकीकडे) ज्यामुळें आमच्या महाराजांना ही अशी स्थिति आली, त्यांतच ते आनंद मानीत आहेत. खचित यांना विपत्काळानें ग्रासलें खरें.

**शृंगार०**—महाराज, क्षमा करा. आपल्या शुभ्र यशाला या चांडाळणीमुळें डाग लागला खरा. त्याबद्दल आपण जी शिक्षा कराल ती भोगावयाला मी तयार

आहें. पण एकदां प्रेमाची दृष्टि या दासीवर टाका.

**वीर०**—आजपर्यंत अर्ध्या जगाला माझ्या एका बोटावर नाचवीत होतों; राजाचा रंक आणि रंकाचा राजा करावयाला नुसतें डोळ्याचें पातें हाललें कीं बस्स,—त्याच मला आतां त्या पोरट्याचीं दातीं तृण धरून, मोठ्या नम्रप्रमाणें, आर्जवें केलीं पाहिजेत, आणि हलकट लोकांच्या नीच व क्षुद्र लटपटी व युक्त्या लढविल्या पाहिजेत. अग, तुला ठाऊक नव्हतें कीं हा वीरमणी साऱ्या जगाला जिंकणारा खरा; पण त्यालाही तूं जिंकलें होतेंस! माझ्या प्रेमानें माझ्या शौर्यावर कधींच आपला पगडा बसवून त्याची तलवार हिसकून घेतली होती.

**शृंगार०**—( डोळ्यांस पाणी आणून ) क्षमा करावी ह्मणून ह्मणतेंना? पदर पसरतें. आपण मला टाकली तर—

**वीर०**—अग बस्स बस्स. एक थेंब देखील डोळ्यांतून काढूं नको. आजपर्यंत जें मिळविलें आणि घालविलें तें सर्व तुझ्या एका अश्रूबरोबर आहे.—चल ये इकडे. या ओठांनीं तें पाणी शोषून घेतों.—झालें; यांत सर्व भरून आलें. बस्स, आतांपर्यंत झालें तें सारें स्वप्न. तें सारें विसरलों. बरें, आपल्याकडून सामुद्रिकबोवा जयेंद्रपालाकडे तहाचें बोलणें करावयाला गेले होते ते परत आले का?—प्रिये, या दुःखानें या अंतःकरणांतला सारा होष घालवून दिला आहे. तर आंत चल, मदीरेचे पेल्यावर पेले झोंकून या दुःखाला बाहेर हुसकून देऊं या. या नशिबाला असेंच लाथेखालीं तुडविलें पाहिजे. त्यालाही पण कळूं दे कीं तें जों जों आह्मांला गोते देईल तों तों आम्हीं त्याची कमीच पर्वा करणार.

## प्रवेश ५ वा.—जयेंद्रपालाची छावणी.

जयेंद्रपाल आणि बलदेव.

**जयेंद्र०**—गेले का ते वीरमणीकडून आलेले शास्त्रीबोवा! तहाचें बोलणें करावयाला काय पण खासा इसम त्याला मिळाला! तो तरी काय करतो? त्याजवळ सरदारच उरला नाहीं. हो, बरी आठवण झाली. यादवरावांना ह्मणावें कीं आणखी एका घटकेनें वीरमणीचे फितूर होऊन आलेल्या सरदारांना माझ्याकडे घेऊन या. आणखी, तुम्हांला एक नाजूक कामगिरी सांगणार आहे.

**बल०**—सरकारच्या सेवेला हा दास नेहेमीं तत्पर आहे.

**जयेंद्र०**—तुह्मीं तसें आहां ह्मणूनच तुह्मांला तशी कामगिरी सांगावयाची. वीरमणी आणि शृंगारसुंदरी यांना आह्मीं काय उलट जबाब पाठविले ते तुह्मीं ऐकलेच आहेत. आतां तुम्हीं स्वतः शृंगारसुंदरीकडे जा. तुमच्या अंगीं वाक्चातुर्य काय आहे तें दाखवा; शृंगारसुंदरीला वीरमणीपासून तोडा; आणि आमच्या पक्षाला जोडा. ती मागेल तें आमच्या नांवानें देऊं करा. शिवाय तिनें न मागितलें तरी ज्यायोगें तिचा दिल आमच्याकडे वळेल असें तुह्मांला

सुचेल तें तिला आमच्याकडून मिळेल असें सांगा. स्त्रिया नशिबाच्या शिखरावर असतांनाही निश्चयाच्या धड नसतात; आणि नशिबाच्या गोत्यांत सांपडल्यावर अति पवित्र कुमारिकेला देखील शिलापासून ढळावयाला लावावयाला वेळ लागत नाहीं. तुमच्यांत काय करामत असेल ती दाखवा आणि मग चाहील तें इनाम मागा. तें तुमचें आहे.

**बल०**—सरकार, इनाम कशाला ? आपली नाजूक चाकरी बजावण्याची संधि मिळाली यांतच मला फार मान वाटतो.

**जयेंद्र०**—हा नशिबानें अकस्मात् दिलेला दगा वीरमणी कसा काय सहन करीत आहे हें नीट पहा. त्याच्या मनाची स्थिति कशी झाली आहे, त्याच्या मनोवृत्तींत चलबिचल झाली आहे कीं नाहीं हें सारें नीट पाहून या. त्या शृंगारसुंदरीची मला फार कींव येते. कसेंही करून तिला त्याच्या पाशांतून सोडविलीच पाहिजे. नाहींतर याच्या पायीं तिचा मात्र फुकट नाश होणार.

**बल०**—जी सरकार.

[ जातात.

---

## प्रवेश ६ वा.-शृंगारसुंदरीचा वाडा.

**शृंगारसुंदरी, अधीरसिंग, मोहना,** आणि **मदीरा** येतात.

**शृंगार०**—अधीरसिंग, आतां पुढें कसें करावयाचें ?

**अधीर०**—करावयाचें काय ? आपल्या मूर्खपणाचा दोष नशिबावर लादून हाय हाय करीत प्राण सोडावयाचे.

**शृंगार०**—मूर्खपणा कोणाचा ? माझा कीं तिकडचा ?

**अधीर०**—बाईसाहेब, आपल्याला राग येऊं देऊं नका. मी आहे तोंडाचा फटकळ. तुह्मीं होऊन विचारतां तेव्हां स्पष्टपणें बोलतों. काय विचारलें ? मूर्खपणा कोणाचा असेंचना ? अलबत वीरमणींचा. त्यांनीं आपल्या मनोविकारांना आपल्या शहाणपणाच्या कक्षाबाहेर जाऊं द्यावयाचें नव्हतें. तुह्मीं त्यांना प्रेमपाशाच्या दोरीनें ओढल्याबरोबर त्यांनीं आपलें सेनापत्य कां टाकून दिलें ? हजारों वीरांना फक्त एकट्या स्त्रीकरितां तोंडवशीं पाडणाऱ्याला जग काय ह्मणेल ? मी आपल्याला पळून आल्याबद्दल दोष देत नाहीं. आपली चूक—मी स्पष्ट बोलतों याची माफी असावी—इतकीच कीं, संग्रामज्वर कामज्वराप्रमाणेंच असेल असें मानून आपण त्या ठिकाणीं आलां आणि वीरमणींना रणभूमी रंगमहालच आहे असें भासविलें. जेथें लढवय्या वीरांची छाती धडधडूं लागली होती अशा त्या युद्धांतून तुह्मीं मागें परतलां हें स्वाभाविक होतें; पण त्यांनीं कांहीं विचार करावयाचा होता कीं नाहीं. काय तो प्रसंग ! या एकट्या वीराकरितां जणूं काय सारें जग अर्धें एका पक्षाला आणि अर्धें दुसऱ्या पक्षाला होऊन मोठ्या निकरानें लढत होतें. अशा बाणीच्या प्रसंगीं

तुमचा मार्ग स्वीकारून आपल्या पक्षाला अनाथ करावयाचें ह्मणजे आपलाच सर्वस्वीं घात करून घेऊन आजपर्यंत कमाविलेल्या अब्रूवर पाणी सोडावयाचें व तोंडाला काळोखी आणावयाची.

**शृंगार०**—पुरे कर बाबा, त्यांची ही नालस्ती माझ्याच्यानें नाहीं आतां ऐकवत.

**वीरमणी** आणि **सामुद्रिकबोवा** येतात.

**वीर०**—काय ? हाच त्याचा जबाब ?

**सा०बो०**—होय, महाराज.

**वीर०**—तर मग कळवा तिला कीं हें पिकलेलें डोकें त्या पोरट्या जयेंद्रपालाकडे पाठीव कीं झालें तुझें काम. मग तुला काय कमी ?

**शृंगार०**—( पुढें येऊन ) हें कां डोकें, महाराज ?

**वीर०**—पुनः त्याच्याकडे जा. त्याला सांगा कीं, तुझ्या अंगांत ज्वानी मुसमुसते आहे. तेव्हां त्या ज्वानीला शोभेल अशी कांहीं करामत करून दाखीव. पैसा, गलबतें, शिपाईप्यादे—यांतच का तुझें शौर्य ? हीं तुझीं काय आणि षंढाचीं काय; त्यांचा धनी कोणीही असला तरी तीं आपला पराक्रम दाखवितीलच. तुझ्या अंगांत धमक असेल तर ह्मणावें एकटा माझ्याशीं लढ. चला, हें तुह्मांला मी लिहून देतों.

[ **वीरमणी** आणि **सा० बो०** जातात.

**अधीर०**—( एकीकडे ) होय ! असेंच बरें. आपलें एवढें सैन्य एका बाजूला ठेवून तुझ्याशीं एखाद्या क्षुद्र शिपायाप्रमाणें पट्टा खेळावयाला सारें जग आज ज्यानें पायाखालीं दडपलें आहे असा जयेंद्रपाल तयार होईल खरा. त्याला आपलें सौख्य आणि वैभव नकोसेंच झालें असेल आणि जगापुढें आपला तमाशा करून घ्यावयाचा असेल ! नशीब फिरलें कीं मनुष्याच्या अकलेनेंही त्याला रामराम ठोकलाच. बाह्य वैभवाबरोबर अंगचा थोरपणाही कसा निघून जातो आणि सर्वप्रकारें सारखा नाश होतो याचें हें चांगलें उदाहरण आहे. आपली दोघांची स्थिति काय आहे हें जाणत असून जयेंद्रपाल आपल्या पोकळ घमेंडीच्या निरोपाला अनुकूल जबाब देईल हें याला संभवनीय वाटतेंना ? जयेंद्रपाला, खरोखर तूं याला पक्कें पादाक्रांत केलेंस. कारण याचें तें तीव्र शहाणपण देखील याला सोडून गेलें.

एक **चाकर** येतो,

**चाकर**—( शृंगारसुंदरीस ) जयेंद्रपालाकडून कोणी आले आहेत.

**शृंगार०**—काय, तुला आदबविदब कांहीं कळत नाहीं ?—पाहिलेंतना ग. गुलाबाच्या कळीवर लुटपुटून जाणारे हे भ्रमर ती फुलून तिच्या पाकळ्या गळूं लागतांच कसे नाक मुरडूं लागले तें ! रावसाहेब येऊं द्या त्यांना आंत.

[ चाकर जातो.

**अधीर०**—( एकीकडे ) माझें शहाणपण आणि माझें इमान यांच्यांत भांडण सुरू झालें आहे. मूर्खांशीं इमान राखणें

ह्मणजे इमानाची किंमत करून घेणें—होय; पण धन्याच्या विपत्कालीं जो चाकर त्याची एकनिष्ठपणें सेवा करतो, तो आपल्या धन्याला जिंकणारावरही मोठेपणांत तान करतो व अशाचेंच नांव अजरामर होतें. मग आतां करावें कसें ?

बलदेव येतो.

**शृंगार०**—जयेंद्रपालांची काय आज्ञा आहे?

**बल०**—मी आपल्याला एकीकडे सांगेन ती.

**शृंगार०**—येथें कोणी परकी नाहीं. खुशाल सांगा.

**बल०**—पण वीरमणीचे कोणी स्नेही असतील ?

**अधीर०**—हें पहा, आतां असें वीरमणींना हिणविण्यांत काय फायदा ? जयेंद्रपालांचे जितके स्नेही तितकेच वीरमणींचे पाहिजे होते, ह्मणजे—पण त्या बोलण्यांत अर्थ नाहीं. वीरमणी आतां शुष्क झाले आहेत. आमच्यासारखे स्नेही असले काय आणि नसले काय ? जयेंद्रपालांची मर्जी असली तर आमचे महाराज मोठ्या आनंदानें त्यांच्याशीं सख्य करतील. आमचें काय ? ज्यांचे ते त्यांचे आह्मी; ह्मणजे जयेंद्रपालांचे. समजलां ?

**बल०**—वाः ठीक बोललां आपण.—जगविख्यात राणीसाहेब, जयेंद्रपालांची आपल्याला अशी विनंति आहे कीं, आपण आपल्या हल्लींच्या स्थितीकडे नजर न देतां जयेंद्रपालांच्या उदारचरितावर नजर द्यावी.

**शृंगार०**—थोरच आहेत ते !

**बल०**—वीरमणीशीं आपला झालेला संबंध प्रीतीचा नसून केवळ त्याच्या सामर्थ्याला भिऊन घडलेला आहे अशी त्यांची खात्री आहे.

**शृंगार०**—अस्सें ? हें देखील का त्यांनीं ओळखलें ? खरेंच बाई, शहाण्यांना कळत नाहीं असें कांहीं तरी आहे का ?

**बल०**—आपल्या लौकिकाला लागलेला डाग वाजवी नसून केवळ जुलुमानें तो लागला आहे याबद्दल त्यांना आपली फार कींव येते.

**शृंगार०**—शर्थ झाली बाई ! ते प्रत्यक्ष ईश्वरच आहेत. खरेंच सांगूं ? हा देह माझ्या ताब्यांत ठेवण्याची माझ्यांत जर ताकद असती तर तो त्यांना मीं वाहिला असता का ? पण माझें मन माझ्या कोठें स्वाधीन होतें !

**अधीर०**—( एकीकडे ) अस्सें, अस्सें ! याचा निर्णय वीरमणींकडून करून घेतों.—महाराज, आपलें गलबत आतां मात्र फुटलें खरें ! आतां आपल्याला धरून राहून कांहीं उपयोग नाहीं. आमचे प्राण वांचविण्याकरितां आतां आह्मांला आपल्याला सोडून दिलें पाहिजे. आपला केवळ कलिजा अशा या हिनें आपल्याला टाकल्यावर आमच्यासारख्यांकडे काय दोष ? [ जातो.

**बल०**—आपण कांहीं जयेंद्रपालांजवळ मागावें आणि तें देऊन आपल्याला धन्य मानून घेण्याची त्यांना संधि द्यावी अशी जयेंद्रपालांची आपल्याला विनंति

आहे. आपण आतां त्यांच्या साहाय्यावर सर्वस्वीं भार टाकावा. आपण वीरमणींना सोडून, या साऱ्या जगाचें छत्र जे जयेंद्रपाल त्यांच्या आश्रयाखालीं जर रहावयाला कबूल व्हाल तर त्यांच्या सुखाला पार राहणार नाहीं. मग मी सांगूं का त्यांना तसें ?

**शृंगार**०—आपलें नांव काय ?

**बल**०—या देहाला बलदेव ह्मणतात.

**शृंगार**०—किती योग्य नांव आहे आपलें ! आपल्यासारखे वकील मिळणें यांतच जयेंद्रपालांचें भाग्य दिसून येतें.—त्यांना आपण असें कळवा कीं आपलें स्वामित्व मान्य करावयाला ही शृंगारसुंदरी तयार आहे, या मंदभागिनीचें पुढें काय करावयाचें हें सर्वस्वीं त्यांच्या सर्वमान्य इच्छेवर अवलंबून आहे.

**बल**०—हेंच उचित. नशिबानें कसाही गोता दिला तरी त्यावर अकलेच्या अस्त्राची योजना केली कीं नशीब झालेंच हतवीर्य. शहाणपणा गमावला नाहीं कीं वैभवही आपल्याला सोडून जावयाचें नाहीं. बरें तर, आपण जयेंद्रपालांच्या आधीन झाल्याबद्दल मला वचन ?

[ हात पुढें करतो.

**शृंगार**०—सर्वजयमहाराजांच्या हातांत हा हात दिला त्यावेळीं ते आपला रागबीग सारें विसरून नुसतें त्या हाताचें चुंबन घेत राहिले;—असो; त्याचें काय आतां ? गेले ते दिवस. हें घ्या वचन.

[ त्याच्या हातावर हात देते.

**वीरमणी** आणि **अधीरसिंग** येतात.

**वीर**०—हातांत हात ! कोण फाजीलपणा हा ! कोण आहेसरे तूं गद्ध्या ?

**बल**०—या सर्व जगतांत ज्यांच्या योग्यतेचा कोणी नाहीं, जे आज वैभवाच्या शिखरावर आहेत आणि ज्यांचा हुकूम न मानण्याची साऱ्या दुनियेंत कोणाची माझा नाहीं त्यांच्या पदरचा मी आहे.

**अधीर**०—( एकीकडे ) भरला तुझा पापाचा घडा.

**वीर**०—कोण आहेरे तिकडे ? कां—अजून नाहीं आलां ?—माजलां होय ?—अरे घुबडा !—सारे हरामखोर झाले आहेत.—माझें आतां कोणी ऐकत नाहीं.—पण चार दिवसांपूर्वी "अरे" ह्मणण्याबरोबर "जी, सरकार, काय हुकूम आहे ?" असें ह्मणत दहा पांच राजे धडपडत यावयाचे. अरे चोरांनो, थांबा, दाखवितों तुम्हांला—

**चाकर** येतात.

आहे; अजून या वीरमणींत सत्व आहे तर मग. या कुत्र्याला येथून न्या आणि चोराला चांगला मऊ आणा.

**अधीर**०-( एकीकडे ) तरण्या सिंहापेक्षां ह्याताऱ्या सिंहाला डिंवचणें अधिक धोक्याचें.

**वीर**०—हे चंद्रतारकांनो ! काय ? काय ?—चाबकाखालीं झोडपा हरामखोराला—हा जयेंद्रपालाचा सर्वांत श्रेष्ठ सरदार जरी असता तरी या हिच्याशीं अशी सलगी—ही—ही कोण ? शृंगारसुंदरी ह्मणत तीच का ही ?—याला असा ठेचा

अशी त्या जगन्मातेची इच्छाच असली पाहिजे. ह्मणून ती आपल्याला अशा प्रकारानें योग्य वेळीं व नेमक्या जागीं नेऊन उभी करिते. बरें, ती थैली शेवटीं कोणाची अशी ठरली? आणि आपण ती कोणापाशीं परत दिली?"

**कुमुद्०**:—" ती थैली अद्याप तशीच माझ्या ताब्यांत आहे. तीं कोणाची असावी ह्याबद्दल अद्याप निश्चित शोध लागलेला नाहीं. आणि त्या थैलींत सांपडलेल्या पत्रांवरून मला कांहीं चमत्कारिक कृष्णकारस्थानाबद्दल संशय आलेला आहे. पण स्पष्ट व खात्रीलायक असा पुरावा मिळेपर्यंत यासंबंधानें कांहीं एक करावयाचें नाहीं व बोलावयाचें नाहीं, असा मीं निश्चय केला आहे."

**नलिनी**:—" आपल्याला योग्य वाटत असेल तसेंच आपण करा. ज्या गोष्टी तूर्त बोलण्यासारख्या नसतील त्या आपण मला देखील न सांगितल्या तरी हरकत नाहीं. आपण सर्व गोष्टींचें धोरण जाणणारे आहांत आणि आपल्यास कांहीं नवीन गोष्टी सुचविण्याइतकें शहाणपण माझ्या ठिकाणीं नाहीं. तेव्हां हीं सर्व गुह्यें मला तरी आजच कळून काय करावयाचें आहे?"

**कुमुद्०**:—" प्रिये नलिनी, तुला सांगू नये अशी एकही गुप्त गोष्ट मजजवळ नाहीं. ज्या अंतःकरणरूपी पेटींत सर्व गुप्त गोष्टी लपवून ठेवावयाच्या तीच मी तुझ्या स्वाधीन केली आहे, तर आतां तुला न कळविण्यासारखीं गुह्यें मजजवळ राहतील कशीं? पण मी असा संदिग्ध शब्दांनीं बोलतों याचें कारण इतकेंच कीं, आपलीं अनुमानें खरीं ठरून तीं सिद्ध करून दाखवितां येतील असा भक्कम पुरावा मिळेपर्यंत यांतील कांहीं एक हकीकत बाहेर पडूं नये अशी तूंही खबरदारी घ्यावीस, व प्रसंग पडल्यास माझ्याप्रमाणेंच तूंही संदिग्ध बोलून वेळ मारून नेण्यास शिकावेंस. आतां तुला सांगूं प्रिये, तुला जीव कीं प्राण वाटणाऱ्या तुझ्या सुस्वभावी व उदार राणीविरुद्ध एक भयंकर नीचपणाचा कट चाललेला आहे—"

**नलिनी**:—( मध्येंच ) "देवा, त्या बापडीनें असें केलें तरी आहे काय कोणाचें! सुख व विश्रांति ह्मणून कशी ती बिचारीला क्षणाची देखील नसेल! नेहमीं नवीं नवीं संकटें, रोज नवे नवे कट, रोज कारस्थानें, पण त्या **अंबा**मातेचीच कृपा कीं हे सर्व दुष्ट कट आणि हीं सर्व कारस्थानें उघडकीस आणून त्यांचें निरसन करण्याचें सामर्थ्य व बुद्धि तिनें आपल्या ठिकाणीं ठेविली आहे. ह्या नवीन कटांचा देखील आपण मोड करालना? मला सांगा अगोदर!"

**कुमुद्०**:—" लाडके, हें का तुला मीं फिरून सांगितलें पाहिजे? ह्या नीचांच्या सर्व बेतांचा मोड करण्याच्या कामीं मला यश येण्याकरितां जे जे ह्मणून प्रयत्न करावे लागतील, जीं जीं धाडसें करावीं लागतील, आणि जीं जीं संकटें सोसावीं लागतील तीं सर्व फार संतोषानें पत्करण्यास मी एक काडीइतकाही मागें सरणार नाहीं. मी ह्मणतों या गोष्टीचा प्रत्यय पाहण्यास तुला दूर जायला नको. तुझ्या राणीसाहेबांच्या हिताविषयीं मी किती चिंता

वाहतों हें आतांच ज्या कामाकरितां मी निघालों आहें त्यावरूनही व्यक्त होण्यासारखें आहे. आतां जो डाव साधण्याचा संभव आहे, त्याची बातमी तरी मला त्या रेशमी थैलींत सांपडलेल्या पत्रावरूनच मिळाली आहे. तुला आतां सर्व हकीकत एकदां झट्दिशीं सांगून टाकतों, कारण उशीर होत चालला आहे आणि दोन घटका रात्रीलाच घोडे तयार करून अश्वशालेच्या द्वाराशीं माझी वाट पहात रहा, ह्मणून मीं **मोहन**ला हुकूम केला आहे. खरें ह्मटलें ह्मणजे तिसऱ्या प्रहरींच तुला सर्व हकीकत सांगून टाकायला पाहिजे होती. पण मुळीं अवकाशच झाला नाहीं. आणि म्हणून मुद्दाम संध्याकाळीं बागेंत येऊन भेटण्याविषयीं मीं तुला निरोप पाठविला."

**कुमुदबंधू** हें बोलत आहे तोंच रात्रीच्या दोन घटका वाजलेल्या ऐकूं आल्या. घटका वाजलेल्या ऐकून, तो म्हणतो, " अरेरे, दोन घटका तर वाजून गेल्या आणि अद्याप बोलायचें तर किती तरी राहिलें आहे! प्रियकर माणसांच्या समागमांत वेळ किती लवकर जातो याला सुमारच नाहीं."

**नलिनीः**–" महाराज, मलाही आतां येथून ताबडतोब गेलें पाहिजे. राणीसाहेब माझी अगदीं वाट पहात असतील. मी लवकरच येतें असें सांगून आलें आहें."

**कुमुद०ः**–" पण अद्यापि तुला किती तरी गोष्टी सांगावयाच्या आहेत."

**नलिनीः**–" महाराज, मी जर तशी स्वतंत्र असतें तर येथून हलण्याची मला इच्छा तरी झाली असती का ? येथून अशा रीतीनें जातांना माझ्या मनाला काय वाटत असेल याची आपल्याला कल्पना देखील व्हावयाची नाहीं."

**कुमुद०ः**–" मला हें सर्व दिसतें आहे, आणि प्रियजनाच्या विरहांत जाणारा काळ कसा कंठावा लागतो ह्याची कल्पना अनुभवामुळें तुजपेक्षां मलाच अधिक चांगली करितां येईल ! पण तें असो. आज राणीसाहेब केव्हांशा ताटाला बसणार आहेत तुला ठाऊक आहे का ?"

**नलिनीः**–" नेहमींप्रमाणेंच; ह्मणजे सुमारें सात आठ घटका रात्र व्हावयाचीच. पण आपण हें मुद्दामसें विचारतां ?"

**कुमुद०ः**–" दुसरें कांहीं विशेष कारण नाहीं. कदाचित् तुमचीं जेवणें आटपतात व तुह्मी दिवाणखान्यांत येतां तों मी फिरून तेथें तुझ्या दृष्टीस पडेन ! माझें काम फत्ते झालें तर राणीसाहेबांना इतक्या रात्रींही येऊन भेटण्याचें धाष्टर्य मला करावें लागणारच. कां, अशी आश्चर्यानेंशी मजकडे पाहतेस ? तूं कांहीं भिऊं नकोस. तूंच हुशार ह्मणून ठरविलेल्या या तुझ्या प्रियकराच्या हातून कांहीं अप्रासंगिकपणा किंवा भलती चुकी होईल अशी शंका तुला आली कीं काय ? बरें, जाऊं या आतां, मलाही उशीर होत चालला. मात्र आतांचें भाषण कांहीं काळपर्यंत मनच्या मनांत ठेवून द्यावयाचें. तुला कांहीं हें मीं शिकविलें पाहिजे असें नाहीं."

**नलिनीः**–(प्रियकराच्या स्कंधावर हात टाकून डोळ्यांत अश्रुबिंदु आलेला पदरानें पुशीत पुशीत ) "प्रियकरा, आपण कोणत्याही कामाकरितां जात असा, त्या **अंबाबाईनें**

आपलें रक्षण करावें आणि आपल्याला यशस्वी करून लवकर परत आणावें येवढीच तिच्या चरणीं माझी विनंती आहे."

इतकें भाषण होऊन या प्रणयीजनांनीं परस्परांस आलिंगन दिलें आणि दोघेंही आपापल्या वाटेनें चालूं लागलीं. **नलिनी** राणीच्या आरामगृहाकडे जाण्यासाठीं निघाली, आणि **कुमुद्बंधू** पलीकडच्या एका वाटेनें राजवाड्याच्या बाहेरच्या बाजूस अश्वशाला होती तिकडे वळला. तो अश्वशाळेंत जाऊन पोंचतो तों त्याचा सेवक **मोहन** दोन उत्तम घोडे सज्ज करून दाराशीं तयार होता. लागलींच **कुमुद्बंधू** आणि **मोहन** त्या दोन घोड्यांवर बसले आणि जवळच्याच वेशीनें शहराबाहेर पडले.

**मोहन** चेहऱ्यानें मोठा सुबक होता. शरीरानें सुदृढ असून चपलही तसाच होता. स्वभावानें धाडसी असल्यामुळें साहसाची आवड फार. बुद्धीनेंही चांगला तीव्र असल्यामुळें अंगीं महत्वाकांक्षा असणें साहजिकच आहे. अशा ह्या नोकरास **कुमुद्बंधू**सारखा यजमान मिळाला असतां त्याला अत्यानंद कां होऊं नये, आणि त्यास्याविषयीं मनांत आदर व पूज्यभाव कां उत्पन्न होऊं नयेत ? **मोहन**च्या अंगीं असलेल्या गुणांकडे **कुमुद्बंधू**चें लक्ष गेल्याशिवाय राहिलें नव्हतें. त्यानें त्याचें एकंदर वर्तन बारिक दृष्टीनें अवलोकन करून ठेविलें असल्यामुळें त्याच्या अंगीं काय काय गुण आहेत, आणि त्यांचा कशा रीतीनें उपयोग होण्यासारखा आहे हें त्याला पूर्णपणें समजलें होतें. म्हणूनच त्याच्यावर त्याचा पूर्ण विश्वास बसला होता व प्रेमही होतें. असो. यजमान चिलखत वगैरे घालून युद्धाची तयारी करून बाहेर पडले आणि आपणास घोडे तयार करून ठेवण्याविषयीं त्यांनीं आज्ञा केली येवढ्यावरून **मोहन**च्या तेव्हांच लक्षांत आलें कीं आज कांहीं तरी साहसाचा प्रसंग येणार आहे. **मोहन**नें आपलेंही चिलखत अंगावर चढविलें होतें व कमरेस हत्यारें वगैरे लावून कांहीं तसाच प्रसंग पडल्यास आपल्या यजमानास साहाय्य करण्यास तो सर्वप्रकारें सज्ज झाला होता.

शहराच्या बाहेर बऱ्याच अंतरावर जाऊन पोहोंचेपर्यंत **कुमुद्बंधू** पुढें आणि **मोहन** मागें असे दोघेही अगदीं मुकाट्यानें चालले होते. शहराबाहेर पडून बरेच दूर गेल्यानंतर **कालयवन** देशाच्या सरहद्दीकडे जाणाऱ्या रस्त्यास **कुमुद्बंधू** लागला. **मोहन**नें अदबीनेंच यजमानाच्या पाठीमागें कांहीं अंतरावरून आपला घोडा चालविला होता. बराच वेळ गेल्यानंतर **कुमुद्बंधू**नें घोड्याचा लगाम आंखडून त्याला उभा केला आणि **मोहन**ला जवळ येण्याविषयीं खूण केली.

"**मोहन**," **कुमुद्बंधु** म्हणतो, "आतां तुझ्या मनगटांत काय शक्ति आहे ती दाखविण्याची वेळ जवळच येऊन ठेपली आहे, समजलासना ?"

हे शब्द ऐकून **मोहन**चा चेहरा उत्साहानें आणि वीरश्रीनें अत्यंत उज्ज्वल होऊन तो उत्तर करितो, "महाराज, आपल्या तोंडचे हे शब्द ऐकून मला फारच हर्ष

वाटत आहे. आपल्यासारख्या शूर यजमानाचा नौकर शोभण्यास हा सेवक योग्य आहे कीं नाहीं हें ठरण्याची वेळ एकदां केव्हां येईल असें मला आज किती एक दिवस झालें आहे."

"बहुधा एक घटका गेली नाहीं तोंच तुझी तलवार तुला म्यानाच्या बाहेर काढावी लागेल," **कुमुदबंधू** म्हणाला. "पण **मोहन**, तुला आणखी एक गोष्ट विचारिली पाहिजे. आपण तर दोघेच आहोंत आणि ज्यांच्याशीं आपल्याला सामना करावयाचा आहे त्यांची संख्या आपल्याहून अधिक असण्याचा संभव आहे; तर असें झाल्यास आपली तलवार परसावून त्यांच्या अंगावर तुटून जाण्यास तूं कचरणार नाहींसना?"

"महाराज," **मोहन** विनयानें व धूर्तपणानें उत्तर करितो, "प्रसंग येऊन ठेपण्याच्या अगोदर व्यर्थ ऐट मारणें हें या आपल्या नौकराला शोभत नाहीं; पण आपण विचारितां ह्मणून सांगतोंच. कशीही वेळ आली, तथापि आपल्याबरोबर कोणत्याही साहसाच्या कृत्यांत उडी घालून जिवांत जीव आहे तोंपर्यंत या बाहूंतील सर्व शक्तीचा उपयोग करण्यास हा **मोहन** मागेंपुढें पाहणार नाहीं."

"**मोहन**, उत्तर फार खुबीदार आणि शहाणपणाचें दिलेंस" **कुमुदबंधू** ह्मणतो; "तर मग ऐक आतां. थोड्याच वेळांत या वाटेनें **कालयवन**देशचे तीन स्वार येतील त्यांपैकीं एक त्या दरबारांतील अधिकारी आहे आणि दोन त्याच्याबरोबर रक्षणार्थ दिलेले शिपाई आहेत. कांहीं विशेष कारणाकरितां त्यांना या ठिकाणीं अडवावयाचें आहे. सांग तर, या कामीं तूं मला साहाय्य करशील ना?"

"देहांत प्राण आहेत तोंपर्यंत तरी खचित करीन." **मोहन**नें उत्तर केलें.

"**मोहन**," **कुमुदबंधू** ह्मणतो, "तुझ्या प्राणाला कांहीं अपाय झाला असतां मला अत्यंत दुःख होईल. पण असलें हें अभद्र भाषण पाहिजे कशाला? तुला कदाचित् असें वाटेल कीं किती लोकांशीं आपल्यास सामना करणें आहे हें जर मला अगोदर कळलें होतें तर बरोबर जास्त अनुचर घेऊन मी कां आलों नाहीं? त्या योगानें यशप्राप्तिही सुगम झाली असती आणि स्वतःचे प्राणही विशेष धोक्यांत घातल्यासारखें झालें नसतें. पण मीं असें केलें नाहीं याचीं कारणें दोन. एक ज्या कृत्याकरितां आपण येथें आलों आहों त्याबद्दलची माहिती कोणालाही लागूं देऊन उपयोगीं नाहीं असें मला वाटलें, आणि दुसरें तूं व मी मिळून खचित आपला हेतु सफल करून परत जाऊं अशीही माझ्या मनाची खात्री होती."

जास्त अनुचर बरोबर न घेऊन येण्याचीं जीं दोन कारणें **कुमुदबंधू**नें **मोहन**ला सांगितलीं त्याशिवाय असें करण्याचें आणखीही एक तिसरें कारण होतें. आणि खरें पाहतां मुख्य तेंच होतें. आमच्या दक्षिणदेशीय सरदारास प्रथमपासूनच साहसीपणाची आवड अतिशय. यामुळें शिपाईगिरीचें कृत्य आलें कीं दूरदृष्टि व विचार यांना एकदम फांटा देऊन नसतीं संकटें व

नसत्या अडचणी मुद्दाम अंगावर ओढवून आणावयाची व आपला जीव धोक्यांत घालावयाची हौस स्वारीला आलीच! बरें, नोकर मिळाला होता तोही यजमानाइतकाच अविचारी आणि धाडसी! तेव्हां ही विलक्षण जोडी लवकरच येणाऱ्या प्रसंगाकरितां सज्ज होऊन वाट पहात बसली.

यांना फार वेळ वाट पहात बसावें लागलें नाहीं. कांहीं निमिषें जातात तोंच घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकूं येऊं लागले. "**मोहन**, सज्ज होऊन माझ्या या डाव्या बाजूस उभा रहा," **कुमुद्बंधू** आपल्या सेवकास ह्मणाला. असें ह्मणतांना त्यानें एकवार **मोहन**च्या मुखाकडे पाहिलें व त्या बरोबर त्याला फारच संतोष वाटला. कारण **मोहन**च्या मुद्रेंत भीतीचा संपर्कही नव्हता येवढेंच नव्हे, तर निश्चय, धैर्य, उत्साह आणि आतुरता या विकारांनीं त्या तरुण शिपायाचा आधींच सुंदर असलेला चेहरा फारच खुलून दिसत होता.

रात्रींच्या मंद प्रकाशांतून तीन स्वार समोरून येत असलेले दिसूं लागले. त्यांपैकीं एकाचा घोडा पुढें चालला होता आणि दोघांचे त्याच्या मागें होते. तिघेही नखशिखांत सशस्त्र होते. कमरेस तलवार, कट्यार, तिमंच्या वगैरे हत्यारें, पाठीस ढाल आणि हातांत भाला. या तिघांपैकीं जो अग्रेसर होता तो वयानें सुमारें पसतीस चाळीस वर्षांचा होता, आणि त्याचे दोन अनुचर सुदृढ, चलाख आणि सशक्त असे असून वयानें सुमारें पंचवीस तीसच्या दरम्यान होते.

ज्या ठिकाणीं या परदेशीय शिपायांस अडविण्यासाठीं **कुमुद्बंधू मोहन**सह उभा होता, त्याठिकाणीं रस्ता बराच रुंद होता परदेशीय शिपाई बरेच झपाट्यानें घोडे उडवीत येत होते. लागलीच **कुमुद्बंधू** आणि **मोहन** हे रस्त्याच्यामध्यें येऊन आपले घोडे हळू हळू चालवीत त्यांच्या समोरच निघाले.

समोरचे लोक जवळ येतांच, "कोण आहांत ते तेथेंच उभे रहा" ह्मणून **कुमुद्बंधू** एकदम मोठ्यानें ओरडला.

"काय, भररस्त्यावरही हे दरवडेखोर!" **कालयवन**देशीय गृहस्थ ह्मणाला. आणि त्यानें आपली तलवार झट्कन म्यानाबाहेर काढली.

"तुह्मांला आवडेल तें नांव आह्मांला द्या! मात्र शस्त्रें खालीं करून शरण या." **कुमुद्बंधू** म्हणाला, आणि असें ह्मणत असतांच त्यानें आपली तलवार म्यानाबाहेर काढली.

**कालयवन**देशीय गृहस्थ **कुमुद्बंधू**च्या अंगावर चाल करून आला. लागलीच **मोहन** पुढें सरला. त्यासरशीं **कालयवन**देशीय गृहस्थाच्या दोघां अनुचरांपैकीं एक **मोहन**च्या अंगावर धांवून गेला आणि दुसरा आपल्या धन्याला मदत करण्याकरितां **कुमुद्बंधू**च्याच अंगावर चढून आला.

वाचकहो, चला आतां, उठा येथून, या अंधारांत या शिपायांच्या चाललेल्या तलवारीच्या फेंका पहात बसणें बरें नव्हे. त्यांना होणाऱ्या जखमांतून वाहणाऱ्या रक्ताचे शिंतोडे अंगावर उडवून घेत बसण्यापेक्षां **कुवलयपुरां**तील वाड्यांत परत जाऊं. ह्या पहा राणीसाहेब आपल्या सखिचतुष्टया-

वाटत आहे. आपल्यासारख्या शूर यजमानाचा नौकर शोभण्यास हा सेवक योग्य आहे कीं नाहीं हें ठरण्याची वेळ एकदां केव्हां येईल असें मला आज किती एक दिवस झालें आहे."

"बहुधा एक घटका गेली नाहीं तोंच तुझी तलवार तुला म्यानाच्या बाहेर काढावी लागेल," **कुमुदबंधू** म्हणाला. "पण **मोहन**, तुला आणखी एक गोष्ट विचारिली पाहिजे. आपण तर दोघेच आहोंत आणि ज्यांच्याशीं आपल्याला सामना करावयाचा आहे त्यांची संख्या आपल्याहून अधिक असण्याचा संभव आहे; तर असें झाल्यास आपली तलवार सरसावून त्यांच्या अंगावर तुटून जाण्यास तूं कचरणार नाहींसना ?"

"महाराज," **मोहन** विनयानें व धूर्तपणानें उत्तर करितो, "प्रसंग येऊन ठेपण्याच्या अगोदर व्यर्थ ऐट मारणें हें या आपल्या नौकराला शोभत नाहीं; पण आपण विचारितां ह्मणून सांगतोंच. कशीही वेळ आली, तथापि आपल्याबरोबर कोणत्याही साहसाच्या कृत्यांत उडी घालून जिवांत जीव आहे तोंपर्यंत या बाहूंतील सर्व शक्तीचा उपयोग करण्यास हा **मोहन** मागेंपुढें पाहणार नाहीं."

"**मोहन**, उत्तर फार खुबीदार आणि शहाणपणाचें दिलेंस" **कुमुदबंधू** ह्मणतो; "तर मग ऐक आतां. थोड्याच वेळांत या वाटेनें **कालयवन**देशचे तीन स्वार येतील त्यांपैकीं एक त्या दरबारांतील अधिकारी आहे आणि दोन त्याच्याबरोबर रक्षणार्थ दिलेले शिपाई आहेत. कांहीं विशेष कारणाकरितां त्यांना या ठिकाणीं अडवावयाचें आहे. सांग तर, या कामीं तूं मला साहाय्य करशील ना ?"

"देहांत प्राण आहेत तोंपर्यंत तरी खचित करीन." **मोहन**नें उत्तर केलें.

"**मोहन**," **कुमुदबंधू** ह्मणतो, "तुझ्या प्राणाला कांहीं अपाय झाला असतां मला अत्यंत दुःख होईल. पण असलें हें अभद्र भाषण पाहिजे कशाला ? तुला कदाचित् असें वाटेल कीं किती लोकांशीं आपल्यास सामना करणें आहे हें जर मला अगोदर कळलें होतें तर बरोबर जास्त अनुचर घेऊन मी कां आलों नाहीं ? त्या योगानें यशप्राप्तिही सुगम झाली असती आणि स्वतःचे प्राणही विशेष धोक्यांत घातल्यासारखें झालें नसतें. पण मीं असें केलें नाहीं याचीं कारणें दोन. एक ज्या कृत्याकरितां आपण येथें आलों आहों त्याबद्दलची माहिती कोणालाही लागूं देऊन उपयोगीं नाहीं असें मला वाटलें, आणि दुसरें तूं व मी मिळून खचित आपला हेतु सफल करून परत जाऊं अशीही माझ्या मनाची खात्री होती."

जास्त अनुचर बरोबर न घेऊन येण्याचीं जीं दोन कारणें **कुमुदबंधूनें** **मोहन**ला सांगितलीं त्याशिवाय असें करण्याचें आणखीही एक तिसरें कारण होतें. आणि खरें पाहतां मुख्य तेंच होतें. आमच्या दक्षिणदेशीय सरदारास प्रथमपासूनच साहसीपणाची आवड अतिशय. यामुळें शिपाईगिरीचें कृत्य आलें कीं दूरदृष्टि व विचार यांना एकदम फांटा देऊन नसतीं संकटें व

नसल्या अडचणी मुद्दाम अंगावर ओढवून आणावयाची व आपला जीव धोक्यांत घालावयाची हौस स्वारीला आलीच ! बरें, नौकर मिळाला होता तोही यजमानाइतकाच अविचारी आणि धाडसी ! तेव्हां ही विलक्षण जोडी लवकरच येणाऱ्या प्रसंगाकरितां सज्ज होऊन वाट पहात बसली.

यांना फार वेळ वाट पहात बसावें लागलें नाहीं. कांहीं निमिषें जातात तोंच घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकूं येऊं लागले. "**मोहन**, सज्ज होऊन माझ्या या डाव्या बाजूस उभा रहा," **कुमुद्बंधू** आपल्या सेवकास ह्मणाला. असें ह्मणतांना त्यानें एकवार **मोहन**च्या मुखाकडे पाहिलें व त्याबरोबर त्याला फारच संतोष वाटला. कारण **मोहन**च्या मुद्रेंत भीतीचा संपर्कही नव्हता येवढेंच नव्हे, तर निश्चय, धैर्य, उत्साह आणि आतुरता या विकारांनीं त्या तरुण शिपायाचा आधींच सुंदर असलेला चेहरा फारच खुलून दिसत होता.

रात्रींच्या मंद प्रकाशांतून तीन स्वार समोरून येत असलेले दिसूं लागले. त्यांपैकीं एकाचा घोडा पुढें चालला होता आणि दोघांचे त्याच्या मागें होते. तिघेही नखशिखांत सशस्त्र होते. कमरेस तलवार, कट्यार, तिमंच्या वगैरे हत्यारें, पाठीस ढाल आणि हातांत भाला. या तिघांपैकीं जो अग्रेसर होता तो वयानें सुमारें पसतीस चाळीस वर्षांचा होता, आणि त्याचे दोन अनुचर सुदृढ, चलाख आणि सशक्त असे असून वयानें सुमारें पंचवीस तीसच्या दरम्यान होते.

ज्या ठिकाणीं या परदेशीय शिपायांस अडविण्यासाठीं **कुमुद्बंधू मोहन**सह उभा होता, त्याठिकाणीं रस्ता बराच रुंद होता परदेशीय शिपाई बरेच झपाट्यानें घोडे उडवीत येत होते. लागलीच **कुमुद्बंधू** आणि **मोहन** हे रस्त्याच्यामध्यें येऊन आपले घोडे हळू हळू चालवीत त्यांच्या समोरच निघाले.

समोरचे लोक जवळ येतांच, "कोण आहांत ते तेथेंच उभे रहा" ह्मणून **कुमुद्बंधू** एकदम मोठ्यानें ओरडला.

"काय, भररस्त्यावरही हे दरवडेखोर !" **कालयवन**देशीय गृहस्थ ह्मणाला. आणि त्यानें आपली तलवार झट्कन म्यानाबाहेर काढली.

"तुह्मांला आवडेल तें नांव आह्मांला द्या ! मात्र शस्त्रें खालीं करून शरण या." **कुमुद्बंधू** म्हणाला; आणि असें ह्मणत असतांच त्यानें आपली तलवार म्यानाबाहेर काढली.

**कालयवन**देशीय गृहस्थ **कुमुद्बंधू**च्या अंगावर चाल करून आला. लागलीच **मोहन** पुढें सरला. त्यासरशीं **कालयवन**देशीय गृहस्थाच्या दोघां अनुचरांपैकीं एक **मोहन**च्या अंगावर धांवून गेला आणि दुसरा आपल्या धन्याला मदत करण्याकरितां **कुमुद्बंधू**च्याच अंगावर चढून आला.

वाचकहो, चला आतां, उठा येथून, या अंधारांत या शिपायांच्या चाललेल्या तलवारीच्या फेंका पहात बसणें बरें नव्हे. त्यांना होणाऱ्या जखमांतून वाहणाऱ्या रक्ताचे शिंतोडे अंगावर उडवून घेत बसण्यापेक्षां **कुवलयपुरां**तील वाड्यांत परत जाऊं. ह्या पहा राणीसाहेब आपल्या सखिचतुष्टया-

सह भोजन वगैरे आटपून दिवाणखान्यांत कांहीं महत्वाच्या राजकीय प्रकरणाबद्दल विचार करीत बसल्या आहेत. समोरच्या बाजूस **दशरथराय** प्रधान बसले आहेत, तसेच **विजयसिंह, विश्वासराय** वगैरे दरबारांतील मसलतगार मंडळीही दोहों बाजूस बसली आहे. राणीच्या चवघी मैत्रिणी तिच्या पाठीमागें बसल्या आहेत. राजेसाहेब मात्र कोठें दिसत नाहींत. राणीचा चेहरा किंचित् उदासीन झालेला दिसत आहे; तथापि नेहमींची उत्साहवृत्ति धारण करण्याविषयीं तिचे प्रयत्न चालले आहेत. **विशाखा** व **अनुराधा** यांना प्रसंग जाणण्याचें ज्ञान नसल्यामुळें त्यांचा पोरकटपणा व उच्छृंखळपणा चाललाच आहे. **कमला** व **नलिनी** यांच्या मुद्रा चिंताक्रांत झाल्या आहेत, दोघीही वरचेवर **कुमुद्वती**राणीच्या तोंडाकडे पहात आहेत. पण **नलिनी**चे कान व नेत्र मात्र वरचेवर दिवाणखान्याच्या दरवाज्याकडे धांवत आहेत. पाहूं या तर येथें काय खलबतें चाललीं आहेत तीं.

**दशरथराय** कायसें बोलले त्यावर उत्तर देतांना राणी ह्मणते, "महाराजांनीं लवकरच दिवाणखान्यांत येतों ह्मणून माझ्या निरोपावर उत्तर पाठविलें; पण स्वारी अद्याप कां येत नाहीं न कळे. यासंबंधानें त्यांचा विचार कसा पडतो हें पाहिलेंच पाहिजे."

राणी जात्या सुस्वभावी आणि विनयसंपन्न असल्यामुळें व **प्रद्युम्नराया**च्या ठिकाणीं तिची पराकाष्ठेची निष्ठा असल्यामुळें त्याचा मान राखण्यासाठीं प्रत्येक महत्वाच्या राजकीय प्रकरणांत ती त्याचा विचार घेत असे. तो तिच्याशीं अलीकडे अगदीं बेपर्वाईनें व कांहींसा उद्दामपणानेंही वागूं लागला होता, हें तिच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. तथापि आपल्या मनांतलें दुःख मनांतच दाबून टाकून बाह्यतः तरी ती आपण अत्यंत संतुष्ट आहों असें दाखवी; आणि त्याच्या संबंधानें बोलतांना नेहमीं सुशील स्त्रीस योग्य अशा आदरानें व प्रेमानें बोलत असे. असो.

"महाराज, आपण ह्मणतां तें खरें." **दशरथराय** ह्मणतो. "प्रसंग तर बराच बाणीचा आला आहे. महाराजांचें यशस्वी निशाण उभें होतांच त्याच्या आश्रयानें संग्राम करण्यास उत्सुक असलेले हजारों शिपाई ताबडतोब पुढें होण्यास तयार आहेत खरे—"

"आहेत खरे," राणी कांहिंशा कष्टी स्वरानें मध्येंच ह्मणते; "पण आपलें निशाण बाहेर फडकावण्याची छाती आहे का तुम्हांला आज? जे राजनिष्ठ लोक आपल्याकरितां प्राण अर्पण करण्यास तयार आहेत, त्यांच्या अन्नपाण्याची तरतूद करण्यास आणि त्यांना शस्त्रास्त्रें पुरविण्यास लागणारें द्रव्य जर आपल्या खजिन्यांत नाहीं तर आपलें निशाण **कुवलयपुरी**च्याबाहेर काढणार कशाच्या जोरावर? खरेंच ह्मणाल तर माझ्या मनांत एक कल्पना आली आहे. माझ्या अंगावरचें हें जवाहीर या प्रसंगीं उपयोगीं पडूं नये तर तें पाहिजे कशाला!"

"अरे देवा!" **अनुराधा** ह्मणते, "काय, महाराज, आपल्या अंगावरचे हे सुंदर अलंकार आपण विकायला का काढणार?"

"कां ते त्या दुष्ट सावकारांच्या हातीं देणार ?" **विशाखा** प्रश्न करिते.

राणीचे शब्द ऐकून व राणीच्या मुखाकडे पाहून **कमले**ची मुद्रा अधिकच दुःखी झाली. **नलिनी** खिन्न वदन करून बागेंत **कुमुदबंधू** जें काय बोलला होता त्याविषयींच विचार करीत बसली.

इतक्यांत राजेसाहेबांची स्वारी दिवाणखान्यांत आली. सर्व मंडळी एकदम उभी राहिली. राजेसाहेब बरेच तर्र होऊन आले होते. डोळे लाल झाले होते आणि पायही थोडेसे लटपटत होते. स्वारी कशी तरी एकदां येऊन राणीच्या उजव्या अंगास आसनावर बसली. "काय, इतक्यांत तुमचीं ताटें वगैरे आटपून तुह्मी इकडे येऊन बसलांतच देखील का? मला वाटलें होतें अद्याप तुह्मांला बराच अवकाश असेल, ह्मणून मी तिकडे तसाच मंडळींत बसलों होतों."

"महाराज, रात्र दहा घटका होऊन गेली," राणी म्हणाली; "आपली आह्मीं बराच वेळ वाट पहात आहों."

"या वाड्यांतलीं सगळीं घटियंत्रें तरी बिघडलीं आहेत किंवा हे पहारेकरी तरी गांजा ओढायला लागले आहेत ! उद्यां मला याचा बंदोबस्त केलाच पाहिजे." राजेसाहेब संतापून ह्मणतात.

"महाराज," राणी सौम्यपणें, विनयानें, पण निश्चयानें ह्मणाली, "घटियंत्रें बिघडलीं नाहींत येवढें मी खात्रीनें सांगतें! बाकी केव्हां केव्हां वेळ फार जलद जातो आणि उशीर झालेला लक्षांतच येत नाहीं. पण तें असो. आपण अगदीं महत्वाच्याच वेळीं आलांत. प्रस्तुत प्रसंगीं काय करावयाचें ह्मणून हे **दशरथराय** विचारीत आहेत."

राजेसाहेबांनीं थोडी छाती पुढें केली आणि मुद्रेंत थोडासा अभिमान आणून ह्मणतात, "ॐ; त्यांत काय आहे ! बंड करण्यास प्रवृत्त झालेले लोक राजद्रोही आहेत आणि त्यांस जे मदत करितील तेही राजद्रोही असें समजून त्यांस शिक्षा केली जाईल ह्मणून द्वाही फिरवा म्हणजे झालें."

"अशा प्रकारची द्वाही अगोदरच फिरविण्यांत आली आहे. पण येवढ्यानें काय होणार ?" **दशरथराय** विचारतात.

"तर मग सैन्य तयार करून, या बंडखोरांची खोड मोडून टाकूं या एकदाची, ह्मणजे झालें. सैन्य जमा करण्यास कांहीं फार अवकाश लागायचा नाहीं. सर्व सरदारांस व जहागीरदारांस आज्ञापत्रें रवाना करा लवकर." राजे **प्रद्युम्नराय** उत्तर करितात.

"होय; महाराज ह्मणतात त्याप्रमाणें आज्ञापत्रें पाठविलीं असतां सैन्य तयार होण्यास उशीर लागेल असें नाहीं." **दशरथराय** ह्मणतात, "पण——"

"मग आणखी **पण** कसलें राहिलें डोक्याचें ? आज्ञापत्रें धाडण्यास कांहीं हरकत आली आहे कीं काय ?" राजेसाहेब तिरसटून विचारतात.

"महाराज," **दशरथराय** म्हणतात, "मुख्य अडचण द्रव्याची आहे."

"द्रव्य, द्रव्य !" **राजेसाहेब अधिकच**

सह भोजन वगैरे आटपून दिवाणखान्यांत कांहीं महत्वाच्या राजकीय प्रकरणाबद्दल विचार करीत बसल्या आहेत. समोरच्या बाजूस **दशरथराय** प्रधान बसले आहेत, तसेंच **विजयसिंह, विश्वासराय** वगैरे दरबारांतील मसलतगार मंडळीही दोहों बाजूस बसली आहे. राणीच्या चवघी मैत्रिणी तिच्या पाठीमागें बसल्या आहेत. राजेसाहेब मात्र कोठें दिसत नाहींत. राणीचा चेहरा किंचित् उदासीन झालेला दिसत आहे; तथापि नेहमींची उत्साहवृत्ति धारण करण्याविषयीं तिचे प्रयत्न चालले आहेत. **विशाखा** व **अनुराधा** यांना प्रसंग जाणण्याचें ज्ञान नसल्यामुळें त्यांचा पोरकटपणा व उच्छृंखळपणा चाललाच आहे. **कमला** व **नलिनी** यांच्या मुद्रा चिंताक्रांत झाल्या आहेत, दोघीही वरचेवर **कुमुद्वती**राणीच्या तोंडाकडे पहात आहेत. पण **नलिनी**चे कान व नेत्र मात्र वरचेवर दिवाणखान्याच्या दरवाज्याकडे धांवत आहेत. पाहूं या तर येथें काय खलबतें चाललीं आहेत तीं.

**दशरथराय** कायसें बोलले त्यावर उत्तर देतांना राणी ह्मणते, " महाराजांनीं लवकरच दिवाणखान्यांत येतों ह्मणून माझ्या निरोपावर उत्तर पाठविलें; पण स्वारी अद्याप कां येत नाहीं न कळे. यासंबंधानें त्यांचा विचार कसा पडतो हें पाहिलेंच पाहिजे."

राणी जात्या सुस्वभावी आणि विनयसंपन्न असल्यामुळें व **प्रद्युम्नराया**च्या ठिकाणीं तिची पराकाष्ठेची निष्ठा असल्यामुळें त्याचा मान राखण्यासाठीं प्रत्येक महत्वाच्या राजकीय प्रकरणांत ती त्याचा विचार घेत असे. तो तिच्याशीं अलीकडे अगदीं बेपर्वाईनें व कांहींसा उद्दामपणानेंही वागूं लागला होता, हें तिच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. तथापि आपल्या मनांतलें दुःख मनांतच दाबून टाकून बाह्यतः तरी ती आपण अत्यंत संतुष्ट आहों असें दाखवी; आणि त्याच्या संबंधानें बोलतांना नेहमीं सुशील स्त्रीस योग्य अशा आदरानें व प्रेमानें बोलत असे. असो.

" महाराज, आपण ह्मणतां तें खरें." **दशरथराय** ह्मणतो. " प्रसंग तर बराच बाणीचा आला आहे. महाराजांचें यशस्वी निशाण उभें होतांच त्याच्या आश्रयानें संग्राम करण्यास उत्सुक असलेले हजारों शिपाई ताबडतोब पुढें होण्यास तयार आहेत खरे—"

" आहेत खरे," राणी कांहींशा कष्टी स्वरानें मध्येंच ह्मणते; " पण आपलें निशाण बाहेर फडकावण्याची छाती आहे का तुम्हांला आज? जे राजनिष्ठ लोक आपल्याकरितां प्राण अर्पण करण्यास तयार आहेत, त्यांच्या अन्नपाण्याची तरतूद करण्यास आणि त्यांना शस्त्रास्त्रें पुरविण्यास लागणारें द्रव्य जर आपल्या खजिन्यांत नाहीं तर आपलें निशाण **कुवलयपुरी**च्याबाहेर काढणार कशाच्या जोरावर? खरेंच ह्मणाल तर माझ्या मनांत एक कल्पना आली आहे. माझ्या अंगावरचें हें जवाहीर या प्रसंगीं उपयोगीं पडूं नये तर तें पाहिजे कशाला!"

" अरे देवा!" **अनुराधा** ह्मणते, " काय, महाराज, आपल्या अंगावरचे हे सुंदर अलंकार आपण विकायला का काढणार?"

" कां ते त्या दुष्ट सावकारांच्या हातीं देणार ? " **विशाखा** प्रश्न करिते.

राणीचे शब्द ऐकून व राणीच्या मुखाकडे पाहून **कमलेची** मुद्रा अधिकच दुःखी झाली. **नलिनी** खिन्न वदन करून बागेंत **कुमुद्बंधू** जें काय बोलला होता त्याविषयींच विचार करीत बसली.

इतक्यांत राजेसाहेबांची स्वारी दिवाणखान्यांत आली. सर्व मंडळी एकदम उभी राहिली. राजेसाहेब बरेच तर्र होऊन आले होते. डोळे लाल झाले होते आणि पायही थोडेसे लटपटत होते. स्वारी कशी तरी एकदां येऊन राणीच्या उजव्या अंगास आसनावर बसली. " काय, इतक्यांत तुमचीं ताटें वगैरे आटपून तुह्मी इकडे येऊन बसलांतच देखील का ? मला वाटलें होतें अद्याप तुह्मांला बराच अवकाश असेल, ह्मणून मी तिकडे तसाच मंडळींत बसलों होतों. "

" महाराज, रात्र दहा घटका होऊन गेली, " राणी म्हणाली; " आपली आह्मीं बराच वेळ वाट पहात आहों. "

" या वाड्यांतलीं सगळीं घटियंत्रें तरी बिघडलीं आहेत किंवा हे पहारेकरी तरी गांजा ओढायला लागले आहेत ! उद्यां मला याचा बंदोबस्त केलाच पाहिजे. " राजेसाहेब संतापून ह्मणतात.

" महाराज, " राणी सौम्यपणें, विनयानें, पण निश्चयानें ह्मणाली, " घटियंत्रें बिघडलीं नाहींत येवढें मी खात्रीनें सांगतें; बाकी केव्हां केव्हां वेळ फार जलद जातो आणि उशीर झालेला लक्षांतच येत नाहीं. पण तें असो. आपण अगदीं महत्वाच्याच वेळीं आलांत. प्रस्तुत प्रसंगीं काय करावयाचें ह्मणून हे **दशरथराय** विचारीत आहेत. "

राजेसाहेबांनीं थोडी छाती पुढें केली आणि मुद्रेंत थोडासा अभिमान आणून ह्मणतात, " ॐ; त्यांत काय आहे ! बंड करण्यास प्रवृत्त झालेले लोक राजद्रोही आहेत आणि त्यांस जे मदत करितील तेही राजद्रोही असें समजून त्यांस शिक्षा केली जाईल ह्मणून द्वाही फिरवा म्हणजे झालें. "

" अशा प्रकारची द्वाही अगोदरच फिरविण्यांत आली आहे. पण येवढ्यानें काय होणार ? " **दशरथराय** विचारतात.

" तर मग सैन्य तयार करून, या बंडखोरांची खोड मोडून टाकूं या एकदाची, ह्मणजे झालें. सैन्य जमा करण्यास कांहीं फार अवकाश लागायचा नाहीं. सर्व सरदारांस व जहागीरदारांस आज्ञापत्रें रवाना करा लवकर. " राजे **प्रद्युम्नराय** उत्तर करितात.

" होय; महाराज ह्मणतात त्याप्रमाणें आज्ञापत्रें पाठविलीं असतां सैन्य तयार होण्यास उशीर लागेल असें नाहीं. " **दशरथराय** ह्मणतात, " पण—— "

" मग आणखी **पण** कसलें राहिलें डोक्याचें ? आज्ञापत्रें धाडण्यास कांहीं हरकत आली आहे कीं काय ? " राजेसाहेब तिरसटून विचारतात.

" महाराज, " **दशरथराय** म्हणतात, " मुख्य अडचण द्रव्याची आहे. "

" द्रव्य, द्रव्य ! " राजेसाहेब अधिकच

चिडून म्हणतात, " ज्या त्या कामांत ही पैशाची अडचण ऐकून ऐकून माझे कान किटले आतां ! आमच्या मृत्यूपर्यंत ही द्रव्याची अडचण आमच्या पाठीस लागणार कीं काय कोण जाणे ! मला स्वतःला खर्चाला पैसा पाहिजे, त्याशिवाय मला अगदीं सोय नाहीं, आणि कसें का होईना खजिन्यांत शिल्लक असेल ती तरी आपण घेणारच ! पण तुह्मी एकादा नवीन कर कां बसवीत नाहीं ? नाहीं तर चारदोन चांगले भक्कमसे सावकार गांठून त्यांच्या जवळचा सर्व पैसा कां हिसकून घेत नाहीं ? "

" असें केलें असतां अन्याय होईल, " **दशरथराय** ह्मणतात.

" काय म्हणतां, अन्याय ? " राजेसाहेब **दशरथराया**वर संतापून ह्मणतात, " जी गोष्ट माझ्या आणि **कुमुद्वती**राणीच्या हुकुमानें होते ती अन्यायाची कशी होईल ? "

" महाराज, आपण थोडे शांत व्हा. " त्याला स्वस्थ करण्याकरितां **कुमुद्वती** प्रेमानें आणि सौम्यपणें म्हणाली. " अगोदरच बंडखोरांच्या निरनिराळ्या युक्त्यांनीं प्रजेचा कांहीं भाग क्षुब्ध झाला असतां आपण जर अशा प्रकारें वागलों तर परिणाम किती भयंकर होईल याचा कांहीं नेम आहे का ? आजचा प्रसंग फार बिकट आहे. मुख्य आज पंचाईत ही आहे कीं, लढाईच्या खर्चास निदान दहा हजार मोहोरा पाहिजेत त्या कोठून आणावयाच्या?"

" आणि या दहा हजार मोहोरांवांचून सैन्य जमा करण्याची सोय नाहीं. " **दशरथराय** ह्मणाले.

" आणि या बंडाचीं मुळें जर लवकर खणून काढलीं नाहींत तर हा वणवा किती पसरेल याचा नेम नाहीं. " राणी ह्मणते. " कदाचित् शेवटीं तो प्रत्यक्ष आपल्या सिंहासनापर्यंत देखील येऊन थडकेल. "

आजपर्यंत नानाप्रकारच्या नीचपणाच्या युक्त्या करून इतक्या प्रयासानें ज्या सिंहासनावर चढण्याचा अधिकार नुकताच कोठें आपल्यास प्राप्त झाला आहे त्या सिंहासनावरून, कदाचित् हे बंडखोर प्रबळ झाल्यास, आपल्यास ओढून काढतील हा विचार राजेसाहेबांच्या पुढें उभा राहतांच त्यांचें मस्तक एकदम ताळ्यावर आलें. ते ह्मणतात, " काय, तर मग प्रसंग इतका आणीबाणीचा आहे म्हणतां ? "

इतक्यांत **विनयादित्य**मामा दिवाणखान्यांत आले. ते आंत येतात तोंच राणी ह्मणते, " हे पहा आमचे आणखी एक मसलतगार आले. आज सैन्य उभें करून बंडवाल्यांचा ताबडतोब मोड केला नाहीं तर पुढें काय प्रसंग येऊन गुजरेल याचा नेम नाहीं. सैन्य तयार करावयाचें ह्मणजे आज आधीं द्रव्य पाहिजे आणि तें कोठून व कसें आणावयाचें हीच मुख्य पंचाईत पडली आहे. मामासाहेब आपण सांगा ही सर्व स्थिति महाराजांस समजावून. "

" महाराज, सरकार ह्मणतात ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. " वृद्ध मामा म्हणतात, " आणि शिवाय आतां जी बातमी मी घेऊन आलों आहे ती तर फारच भयं-

कर आहे; आणि म्हणूनच इतक्या त्वरेनें मी एकदम महाराजांच्या समोर आलों."

"अशी बातमी तरी काय आहे, मामासाहेब?" राणीनें प्रश्न केला. आणि सर्व मंडळी संशयग्रस्त व चिंतातुर मुद्रेनें मामाकडे पाहूं लागली.

"बंडखोरांचें ठाणें आज **विषवल्ली** गांवासंनिध आहे. तेथें लोकही त्यांना भराभर येऊन मिळत आहेत. त्यांचें सैन्य एकंदरींत बरेंच मोठें झालें आहे. महाराज, लवकरच **कुवलयपुरा**वर चाल करून यावें असा बेत त्यांच्यांत घाटत आहे." मामांनीं उत्तर केलें.

**विनयादित्य**मामांचें हें भाषण ऐकून सर्व मंडळी म्लानवदन होऊन गेली; **नलिनी**चे कान व डोळे एकसारखे दिवाणखान्याच्या दरवाज्याकडे लागून राहिले व ती फारच सचिंत झालेली दिसूं लागली; राजेसाहेबांचा चेहरा भीतीनें अगदीं पांढरा फटफटीत झाला; राणीची मुद्रा मात्र त्वेषानें व वीरश्रीनें लाल होऊन गेली.

राणी संतापून ह्मणते, "काय, तर मग आमच्या प्रत्यक्ष राजधानीला येऊन हे वेढा देणार, आणि प्रत्यक्ष मुळालाच येऊन प्रथम गांठणार काय? ठीक आहे! आतां आमचा निश्चय झाला! कायमचा विचार ठरला! मामासाहेब, कोणी श्रीमान् सावकार किंवा रत्नवणिक बोलावून आणवा तावडतोब. गांवांतल्या सर्व श्रीमंत लोकांना पुकारा करा कीं दहा हजार मोहराकरितां **कुवलयपुर**ची राणी आपलें अमूल्य जवाहीर विकण्यास तयार आहे! मामासाहेब, उठा, त्वरा करा आतां!"

हें राणीचें भाषण होतांच **कमले**नें आपले वडील **विश्वासराय** समोरच बसले होते त्यांजकडे पाहिलें. लागलीच **विश्वासराय** उठून राणीसाहेबांपुढें हात जोडून ह्मणतात, "सरकार मी स्वतः दरिद्रीच आहे. तथापि गांवांतील कांहीं श्रीमान् व सावकारमंडळींत या गादीच्या कृपेनें माझें थोडेंसें वजन आहे. तेव्हां दोन दिवसांची अवधि महाराजांनीं मला दिली तर माझ्या हातून काय होईल तें करून मी पहातों. लढाईच्या खर्चाकरितां प्रत्यक्ष सरकारच्या अंगावरील जवाहिरापर्यंत मजल येऊन ठेपली ह्मणजे **कुवलयपुरीं**तील लोकांच्या राजनिष्ठेची आणि स्वामिभक्तीची परिक्षाच झाली! तर सरकार,—"

"**विश्वासराय,**" राणी त्याला पुरतें बोलूं न देतांच ह्मणते, "या गादीच्या संरक्षणासाठीं प्रत्यक्ष प्राणही गहाण ठेवण्यास तयार होणारे आपल्यासारखे उदार गृहस्थ या आमच्या राज्यांत आहेत आणि सर्वच माणसें आमच्या **काकासाहेबां**सारखीं कृतघ्न नाहींत म्हणूनच आम्ही येथें राज्य करीत आहों. तथापि जो खजिना आमच्या अस्ताव्यस्त व अविचाराच्या खर्चामुळें रिकामा झाला तो जरूरीच्या प्रसंगीं फिरून भरण्यासाठीं आपल्यासारख्या उदार गृहस्थांस किंवा माझ्या प्रजेपैकीं इतर कोणासही तसदी पोंचावी ही माझी बिलकुल इच्छा नाहीं. ह्मणून मीं जो एकवार निश्चय केला तो केला. शिवाय माझ्या प्रजेस असेंही

चिडून म्हणतात, "ज्या त्या कामांत ही पैशाची अडचण ऐकून ऐकून माझे कान किटले आतां! आमच्या मृत्यूपर्यंत ही द्रव्याची अडचण आमच्या पाठीस लागणार कीं काय कोण जाणे! मला स्वतःला खर्चाला पैसा पाहिजे, त्याशिवाय मला अगदीं सोय नाहीं, आणि कसें का होईना खजिन्यांत शिल्लक असेल ती तरी आपण घेणारच! पण तुह्मी एकादा नवीन कर कां बसवीत नाहीं? नाहीं तर चारदोन चांगले भक्कमसे सावकार गांठून त्यांच्या जवळचा सर्व पैसा कां हिसकून घेत नाहीं?"

"असें केलें असतां अन्याय होईल," **दशरथराय** ह्मणतात.

"काय म्हणतां, अन्याय?" राजेसाहेब **दशरथराया**वर संतापून ह्मणतात, "जी गोष्ट माझ्या आणि **कुमुद्वती**राणीच्या हुकुमानें होते ती अन्यायाची कशी होईल?"

"महाराज, आपण थोडे शांत व्हा." त्याला स्वस्थ करण्याकरितां **कुमुद्वती** प्रेमानें आणि सौम्यपणें म्हणाली. "अगोदरच बंडखोरांच्या निरनिराळ्या युक्त्यांनीं प्रजेचा कांहीं भाग क्षुब्ध झाला असतां आपण जर अशा प्रकारें वागलों तर परिणाम किती भयंकर होईल याचा कांहीं नेम आहे का? आजचा प्रसंग फार बिकट आहे मुख्य आज पंचाईत ही आहे कीं, लढाईच्या खर्चास निदान दहा हजार मोहोरा पाहिजेत त्या कोठून आणावयाच्या?"

"आणि या दहा हजार मोहोरांवांचून सैन्य जमा करण्याची सोय नाहीं." **दशरथराय** ह्मणाले.

"आणि या बंडाचीं मुळें जर लवकर खुणून काढलीं नाहींत तर हा वणवा किती पसरेल याचा नेम नाहीं." राणी ह्मणते. "कदाचित् शेवटीं तो प्रत्यक्ष आपल्या सिंहासनापर्यंत देखील येऊन थडकेल."

आजपर्यंत नानाप्रकारच्या नीचपणाच्या युक्त्या करून इतक्या प्रयासानें ज्या सिंहासनावर चढण्याचा अधिकार नुकताच कोठें आपल्यास प्राप्त झाला आहे त्या सिंहासनावरून, कदाचित् हे बंडखोर प्रबळ झाल्यास, आपल्यास ओढून काढतील हा विचार राजेसाहेबांच्या पुढें उभा राहतांच त्यांचें मस्तक एकदम ताळ्यावर आलें. ते ह्मणतात, "काय, तर मग प्रसंग इतका आणीबाणीचा आहे म्हणतां?"

इतक्यांत **विनयादित्य** मामा दिवाणखान्यांत आले. ते आंत येतात तोंच राणी ह्मणते, "हे पहा आमचे आणखी एक मसलतगार आले. आज सैन्य उभें करून बंडवाल्यांचा ताबडतोब मोड केला नाहीं तर पुढें काय प्रसंग येऊन गुजरेल याचा नेम नाहीं. सैन्य तयार करावयाचें ह्मणजे आज आधीं द्रव्य पाहिजे आणि तें कोठून व कसें आणावयाचें हीच मुख्य पंचाईत पडली आहे. मामासाहेब आपण सांगा ही सर्व स्थिति महाराजांस समजावून."

"महाराज, सरकार ह्मणतात ही गोष्ट अक्षरशः खरी आहे." वृद्ध मामा म्हणतात, "आणि शिवाय आतां जी बातमी मी घेऊन आलों आहे ती तर फारच भयं-

कर आहे; आणि म्हणूनच इतक्या त्वरेनें मी एकदम महाराजांच्या समोर आलों."

"अशी बातमी तरी काय आहे, मामासाहेब?" राणीनें प्रश्न केला. आणि सर्व मंडळी संशयग्रस्त व चिंतातुर मुद्रेनें मामाकडे पाहूं लागली.

"बंडखोरांचें ठाणें आज **विषवल्ली** गांवासंनिध आहे. तेथें लोकही त्यांना भराभर येऊन मिळत आहेत. त्यांचें सैन्य एकंदरींत बरेंच मोठें झालें आहे. महाराज, लवकरच **कुवलयपुरा**वर चाल करून यावें असा बेत त्यांच्यांत घाटत आहे." मामांनीं उत्तर केलें.

**विनयादित्य**मामांचें हें भाषण ऐकून सर्व मंडळी म्लानवदन होऊन गेली; **नलिनी**चे कान व डोळे एकसारखे दिवाणखान्याच्या दरवाज्याकडे लागून राहिले व ती फारच सचिंत झालेली दिसूं लागली; राजेसाहेबांचा चेहरा भीतीनें अगदीं पांढरा फटफटीत झाला; राणीची मुद्रा मात्र त्वेषानें व वीरश्रीनें लाल होऊन गेली.

राणी संतापून ह्मणते, "काय, तर मग आमच्या प्रत्यक्ष राजधानीला येऊन हे वेढा देणार, आणि प्रत्यक्ष मुळालाच येऊन प्रथम गांठणार काय? ठीक आहे! आतां आमचा निश्चय झाला! कायमचा विचार ठरला! मामासाहेब, कोणी श्रीमान् सावकार किंवा रत्नवणिक बोलावून आणवा ताबडतोब. गांवांतल्या सर्व श्रीमंत लोकांत पुकारा करा कीं दहा हजार मोहराकरितां **कुवलयपुर**ची राणी आपलें अमूल्य जवाहीर विकण्यास तयार आहे! मामासाहेब, उठा, त्वरा करा आतां!"

हें राणीचें भाषण होतांच **कमले**नें आपले वडील **विश्वासराय** समोरच बसले होते त्यांजकडे पाहिलें. लागलीच **विश्वासराय** उठून राणीसाहेबांपुढें हात जोडून ह्मणतात, "सरकार मी स्वतः दरिद्रीच आहे. तथापि गांवांतील कांहीं श्रीमान् व सावकारमंडळींत या गादीच्या कृपेनें माझें थोडेंसें वजन आहे. तेव्हां दोन दिवसांची अवधि महाराजांनीं मला दिली तर माझ्या हातून काय होईल तें करून मी पहातों. लढाईच्या खर्चाकरितां प्रत्यक्ष सरकारच्या अंगावरील जवाहिरापर्यंत मजल येऊन ठेपली ह्मणजे **कुवलयपुरीं**तील लोकांच्या राजनिष्ठेची आणि स्वामिभक्तीची परिक्षाच झाली! तर सरकार,—"

"**विश्वासराय,**" राणी त्याला पुरतें बोलूं न देतांच ह्मणते, "या गादीच्या संरक्षणासाठीं प्रत्यक्ष प्राणही गहाण ठेवण्यास तयार होणारे आपल्यासारखे उदार गृहस्थ या आमच्या राज्यांत आहेत आणि सर्वच माणसें आमच्या **काकासाहेबां**सारखीं कृतघ्न नाहींत म्हणूनच आम्ही येथें राज्य करीत आहों. तथापि जो खजिना आमच्या अस्ताव्यस्त व अविचाराच्या खर्चामुळें रिकामा झाला तो जरूरीच्या प्रसंगीं फिरून भरण्यासाठीं आपल्यासारख्या उदार गृहस्थांस किंवा माझ्या प्रजेपैकीं इतर कोणासही तसदी पोंचावी ही माझी बिलकुल इच्छा नाहीं. ह्मणून मीं जो एकवार निश्चय केला तो केला. शिवाय माझ्या प्रजेस असेंही

पण कळलें पाहिजे कीं, प्रजेच्या हितापेक्षां या राणीला तिचें जवाहीर अधिक प्रिय नाहीं. उठा तर मग मामासाहेब ! "

राणीचें हें बोलणें आटपतें आहे तों रात्रीच्या अकरा घटका वाजल्या. पहारेकरी घटका वाटवीत असतां नलिनीचें अंतःकरण आंतच्या आंत कढूं लागलें आणि ती अत्यंत उद्विग्न व सचिंत होऊन एकसारखी दिवाणखान्याच्या दरवाज्याबाहेर डोळे लावून बसली.

इतक्यांत दिवाणखान्याच्या दरवाज्यापाशीं दोन गृहस्थ एकाएकीं येऊन उभे राहिले. त्यांपैकीं एकाचे कपडे धुळींत मळून अत्यंत घाण व अव्यवस्थित झाले होते, आणि त्याचे हात त्याच्या पाठिमागें शेल्यानें बांधिले होते; त्याची मुद्रा भय व लज्जा यांनीं व्याकुल झाली होती. दुसरा गृहस्थ आमचा दक्षिणदेशीय सरदार कुमुदबंधु होता.

नलिनीचें अंतःकरण आंतच्याआंत आनंदानें नाचूं लागलें. " सरकार, ज्या दहा हजार मोहोरांची आपल्यास आज आवश्यकता आहे, त्या आतांच महाराजांच्या चरणाशीं येऊन पडतील. " कुमुदबंधु राणीस लवून प्रणाम करून ह्मणाला.

हें ऐकून सर्वांचें मुखांतून एकदम आनंदाश्चर्याचे उद्गार निघाले.

" आणि यांत विशेष तें हेंच कीं, " कुमुदबंधु फिरून ह्मणतो, " महाराजांस राजद्रोही बंडखोरांबरोबरचा संग्राम कालयवनदेशच्या खजिन्यांतील द्रव्यानें चालविण्याचा हा प्रसंग साहजिकपणेंच आला आहे. जें द्रव्य महाराजांचे मित्र व शेजारी राजे गूहसिंह यांनीं नीचपणानें व चोरून पंचगंगादेशांतील राजद्रोही बंडखोर लोकांस मदत करण्याकरितां पाठविलें होतें तेंच हें द्रव्य ! कारण हे पहा तें द्रव्य घेऊन आलेले गूहसिंहाच्या दरबारांतील श्वेतपाद्नांवाचे गृहस्थ महाराजांच्या समोरच उभे आहेत ! श्वेतपादराय, लोळा, लोळा आधीं सरकारच्या पायाशीं आणि सरकारापाशीं क्षमा भाका ! "

असें ह्मणून कुमुदबंधूनें त्या कैदीस पुढें ढकलला; आणि तो राणीपुढें साष्टांग नमस्कार घालून पडला.

## भाग १३ वा.

(ही राज्यनीति का कौटिल्यसीमा ? )

मागील भागाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें कुमुदबंधु एकाएकीं, राणी आपल्या मुख्य मुख्य मुत्सद्यांसह ज्या दिवाणखान्यांत खलबतें करीत बसली होती तेथें येऊन दाखल झाला. तोही नुसता नव्हे तर ज्या दहा हजार मोहोरांची अत्यंत आवश्यकता होती, आणि ज्यांच्याकरितां राणी आपल्या अंगावरील मौल्यवान् अलंकारही काढून देण्यास सिद्ध झाली होती, त्या दहा हजार मोहोरांनीं भरलेल्या थैल्या बरोबर घेऊन ! बरें, या थैल्या तरी कोठून आलेल्या ? तर राणीचा द्वेष्टा जो गूहसिंह त्यानें राणीविरुद्ध उठलेल्या राजद्रोही बंडखोरांस मदत करण्याकरितां ह्मणून पाठविलेल्या ! आणि ह्या सर्व गोष्टीची कोणासही—प्रत्यक्ष विनया-

दित्यमामासारख्या महा पाताळयंत्री मुत्सद्यासही—काडीमात्र कल्पना नाहीं ! तेव्हां हा अकस्मात् घडून आलेला चमत्कार दैविक प्रसादाचाच परिणाम असें सर्वांस वाटलें, आणि एकंदर मंडळी आश्चर्यचकित होऊन **कुमुद्बंधू**च्या तोंडाकडे पहात स्वस्थ राहिली. तत्वतः विचार केला तथापि आजपर्यंत **कुमुद्बंधू**नें राणीच्या हिताकरितां जीं जीं साहसें केलीं, त्या सर्वांहून हें अधिक महत्वाचें होतें यांत संशय नाहीं. कारण **गूहसिंहा**नें पाठविलेलें हें द्रव्य राणीच्या हातीं पडलें यामुळें तिचें फारच मोठें कार्य साधलें, येवढेंच नव्हे तर तें बंडखोरांच्या हातीं जाऊन पडलें नाहीं यामुळें त्यांचेही हातपाय मोडल्यासारखे झाले. ही रक्कम बंडखोरांच्या हातीं पडली असती तर राणीला उडवून देण्यासाठीं त्यांनीं उठविलेल्या वावटळास अधिक जोर येण्यास व तें जास्त दिवस टिकण्यास ती खचित् कारणीभूत झाली असती.

आपणास प्राणांहूनही प्रिय असलेल्या सद्गुणी आणि सर्वतोपरी संकटांनीं पीडिलेल्या राणीचें हित साधण्याकरितां आपल्या प्रियकरानें केलेल्या या साहसाचें महत्व केवढें होतें हें **नलिनी**सारख्या तीव्रबुद्धी तरुणीच्या तेव्हांच लक्षांत आल्याशिवाय का राहणार ? आजपर्यंत **नलिनी**स जो **कुमुद्बंधु** नुसता मोठा साहसी व विजयशाली असा योद्धाच भासत होता तो आतां प्रत्यक्ष कोणी तरी देवगंधर्वच आहे व त्याला परमेश्वरानें राणीच्या संरक्षणार्थ पृथ्वीतलावर पाठविलें आहे असें तिला वाटूं लागलें. असो.

**श्वेतपादा**स **कुमुद्बंधू**नें पुढें ढकलून राणीला शरण जाऊन तिच्यापाशीं प्राणदान मागावयास सांगितलें. त्यावरून त्यानें राणीस साष्टांग प्रणिपात घालून तो जो एकदां जमिनीवर पडला होता तो अद्यापि उठला नव्हता. तो तसाच पडला असतां ह्मणतोः— " महाराज, हा दीन अनाथ सर्वप्रकारें अपराधी आहे, याजवर दया करावी आणि याला प्राणदान द्यावें. "

हें बोलणें ऐकतांच राजेसाहेब एकदम संतापानें आसनावरून उठले आणि ह्मणतात, " नीचा, तुजवर आणि दया ! ही गोष्ट कदापि होणार नाहीं ! माझें राज्य हिसकावून घेऊं पाहणाऱ्या दुष्ट बंडखोरांस साहाय्य करणारा जो तूं अधम, त्याचे एकदम प्राणच घेतले पाहिजेत ! " असें ह्मणून राजेसाहेबांनीं कांहीं संताप, कांहीं जातीचा क्रूरपणा आणि कांहीं सुरामातेच्या प्रसादानें आलेला उन्माद या सर्वांच्या भरांत आपली तलवार एकदम म्यानाबाहेर काढली आणि आपली योग्यता काय, आपण आहों कोठें व करीत आहों काय, याचा कांहींच विचार न करितां ती एकदम भूमीवर पडलेल्या **श्वेतपादा**च्या कुशींत खुपसण्याकरितां स्वारी पुढें सरसावली.

**विनयादित्य**मामा राजेसाहेबांच्या जवळच होते त्यांनीं " छी, छी, महाराज, हें काय ! " असें ह्मणत झट्कन पुढें सरून राजेसाहेबांच्या तलवारीस हात घातला, व **श्वेतपादा**च्या जिवाचें रक्षण केलें.

" नीचा थेरड्या, मला आडविणार तूं

पण कळलें पाहिजे कीं, प्रजेच्या हितापेक्षां या राणीला तिचें जवाहीर अधिक प्रिय नाहीं. उठा तर मग मामासाहेब ! "

राणीचें हें बोलणें आटपतें आहे तों रात्रीच्या अकरा घटका वाजल्या. पहारेकरी घटका वाटवीत असतां नलिनीचें अंतःकरण आंतच्या आंत कढूं लागलें आणि ती अत्यंत उद्विग्न व सचिंत होऊन एकसारखी दिवाणखान्याच्या दरवाज्याबाहेर डोळे लावून बसली.

इतक्यांत दिवाणखान्याच्या दरवाज्यापाशीं दोन गृहस्थ एकाएकीं येऊन उभे राहिले. त्यांपैकीं एकाचे कपडे धुळींत मळून अत्यंत घाण व अव्यवस्थित झाले होते, आणि त्याचे हात त्याच्या पाठिमागें शेल्यानें बांधिले होते; त्याची मुद्रा भय व लज्जा यांनीं व्याकुल झाली होती. दुसरा गृहस्थ आमचा दक्षिणदेशीय सरदार **कुमुदबंधु** होता.

**नलिनीचें** अंतःकरण आंतच्याआंत आनंदानें नाचूं लागलें. " सरकार, ज्या दहा हजार मोहोरांची आपल्यास आज आवश्यकता आहे, त्या आतांच महाराजांच्या चरणाशीं येऊन पडतील. " **कुमुदबंधु** राणीस लवून प्रणाम करून ह्मणाला.

हें ऐकून सर्वांचें मुखांतून एकदम आनंदाश्चर्याचे उद्गार निघाले.

" आणि यांत विशेष तें हेंच कीं, " **कुमुदबंधु** फिरून ह्मणतो, " महाराजांस राजद्रोही बंडखोराबरोबरचा संग्राम **कालयवन**देशाच्या खजिन्यांतील द्रव्यानें चालविण्याचा हा प्रसंग साहजिकपणेंच आला आहे. जें द्रव्य महाराजांचे मित्र व शेजारी राजे **गूहसिंह** यांनीं नीचपणानें व चोरून **पंचगंगा**देशांतील राजद्रोही बंडखोर लोकांस मदत करण्याकरितां पाठविलें होतें तेंच हें द्रव्य ! कारण हे पहा तें द्रव्य घेऊन आलेले **गूहसिंहा**च्या दरबारांतील **श्वेतपाद**नांवाचे गृहस्थ महाराजांच्या समोरच उभे आहेत ! **श्वेतपादराय**, लोळा, लोळा आधीं सरकारच्या पायाशीं आणि सरकारापाशीं क्षमा भाका ! "

असें ह्मणून **कुमुदबंधूनें** त्या कैदीस पुढें ढकलला; आणि तो राणीपुढें साष्टांग नमस्कार घालून पडला.

## भाग १३ वा.

( ही राज्यनीति का कौटिल्यसीमा ? )

मागील भागाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें **कुमुदबंधु** एकाएकीं, राणी आपल्या मुख्य मुख्य मुत्सद्यांसह ज्या दिवाणखान्यांत खलबतें करीत बसली होती तेथें येऊन दाखल झाला. तोही नुसता नव्हे तर ज्या दहा हजार मोहोरांची अत्यंत आवश्यकता होती, आणि ज्यांच्याकरितां राणी आपल्या अंगावरील मौल्यवान् अलंकारही काढून देण्यास सिद्ध झाली होती, त्या दहा हजार मोहोरांनीं भरलेल्या थैल्या बरोबर घेऊन ! बरें, या थैल्या तरी कोठून आलेल्या ? तर राणीचा द्वेष्टा जो **गूहसिंह** त्यानें राणीविरुद्ध उठलेल्या राजद्रोही बंडखोरांस मदत करण्याकरितां ह्मणून पाठविलेल्या ! आणि ह्या सर्व गोष्टीची कोणासही—प्रत्यक्ष **विनया**-

दित्यमामासारख्यां महा पाताळयंत्री मुत्सद्यासही—कांहींमात्र कल्पना नाहीं! तेव्हां हा अकस्मात् घडून आलेला चमत्कार दैविक प्रसादाचाच परिणाम असें सर्वांस वाटलें, आणि एकंदर मंडळी आश्चर्यचकित होऊन कुमुदबंधूच्या तोंडाकडे पहात स्वस्थ राहिली. तत्वतः विचार केला तथापि आजपर्यंत कुमुदबंधूनें राणीच्या हिताकरितां जीं जीं साहसें केलीं, त्या सर्वांहून हें अधिक महत्वाचें होतें यांत संशय नाहीं. कारण गूहसिंहानें पाठविलेलें हें द्रव्य राणीच्या हातीं पडलें यामुळें तिचें फारच मोठें कार्य साधलें, येवढेंच नव्हे तर तें बंडखोरांच्या हातीं जाऊन पडलें नाहीं यामुळें त्यांचेही हातपाय मोडल्यासारखे झाले. ही रक्कम बंडखोरांच्या हातीं पडली असती तर राणीला उडवून देण्यासाठीं त्यांनीं उठविलेल्या वावटळास अधिक जोर येण्यास व तें जास्त दिवस टिकण्यास ती खचित् कारणीभूत झाली असती.

आपणास प्राणांहूनही प्रिय असलेल्या सद्गुणी आणि सर्वतोपरी संकटांनीं पीडिलेल्या राणीचें हित साधण्याकरितां आपल्या प्रियकरानें केलेल्या या साहसाचें महत्व केवढें होतें हें नलिनीसारख्या तीव्रबुद्धी तरुणीच्या तेव्हांच लक्षांत आल्याशिवाय का राहणार? आजपर्यंत नलिनीस जो कुमुदबंधु नुसता मोठा साहसी व विजयशाली असा योद्धाच भासत होता तो आतां प्रत्यक्ष कोणी तरी देवगंधर्वच आहे व त्याला परमेश्वरानें राणीच्या संरक्षणार्थ पृथ्वीतलावर पाठविलें आहे असें तिला वाटूं लागलें. असो.

श्वेतपादास कुमुदबंधूनें पुढें ढकलून राणीला शरण जाऊन तिच्यापाशीं प्राणदान मागावयास सांगितलें. त्यावरून त्यानें राणीस साष्टांग प्रणिपात घालून तो जो एकदां जमिनीवर पडला होता तो अद्यापि उठला नव्हता. तो तसाच पडला असतां ह्मणतोः— "महाराज, हा दीन अनाथ सर्वप्रकारें अपराधी आहे, याजवर दया करावी आणि याला प्राणदान द्यावें."

हें बोलणें ऐकतांच राजेसाहेब एकदम संतापानें आसनावरून उठले आणि ह्मणतात, "नीचा, तुजवर आणि दया! ही गोष्ट कदापि होणार नाहीं! माझें राज्य हिसकावून घेऊं पाहणाऱ्या दुष्ट बंडखोरांस साहाय्य करणारा जो तूं अधम, त्याचे एकदम प्राणच घेतले पाहिजेत!" असें ह्मणून राजेसाहेबांनीं कांहीं संताप, कांहीं जातीचा क्रूरपणा आणि कांहीं सुरामातेच्या प्रसादानें आलेला उन्माद या सर्वांच्या भरांत आपली तलवार एकदम म्यानाबाहेर काढली आणि आपली योग्यता काय, आपण आहों कोठें व करीत आहों काय, याचा कांहींच विचार न करितां ती एकदम भूमीवर पडलेल्या श्वेतपादाच्या कुशींत खुपसण्याकरितां स्वारी पुढें सरसावली.

विनयादित्यमामा राजेसाहेबांच्या जवळच होते त्यांनीं "छी, छी, महाराज, हें काय!" असें ह्मणत झट्कन पुढें सरून राजेसाहेबांच्या तलवारीस हात घातला, व श्वेतपादाच्या जिवाचें रक्षण केलें.

"नीचा थेरड्या, मला आडविणार तूं

कोण? " राजे प्रद्युम्नराय त्वेषानें एकदम वृद्ध मामावर उलटून ह्मणाले.

आपल्या जावयानें हे शब्द प्रत्यक्ष आपल्या बरोबरीच्या दरबारी मंडळीसमक्ष उच्चारिलेले ऐकून मामांस अत्यंत दुःख झालें; पण उलट कोणत्याही प्रकारें राग वगैरे न दाखवितां ते शांतपणें व विनयानें ह्मणाले, " महाराज, रागाच्या झपाट्यांत हें कृत्य होऊन जाईल आणि नंतर आपल्यास पश्चात्ताप होईल असें मला वाटलें. शिवाय या ठिकाणीं प्रत्यक्ष राणीसाहेब व इतर स्त्रिया आहेत यांच्यादेखत असलें कृत्य घडणें अनुचित असें आपणासही वाटेल ! "

" महाराज, प्रद्युम्नराय, हें काय? कृपा करून थोडे शांत व्हा ! " राणी राजेसाहेबांचे हात धरून व त्यास मागें ओढून म्हणाली. " मामासाहेब, आपण केलें तें योग्य केलें. महाराजांचा राग थोडा कमी झाला ह्मणजे त्यांना देखील असेंच वाटेल ! आणि तुह्मांला त्वेषाच्या भरांत वाईट शब्द बोलल्याबद्दल त्यांना खचित् पश्चात्ताप झाल्यावांचून राहणार नाहीं. खरेंच, वेळींच पुढें सरून आपण यांचा हात धरला यायोगानें या सिंहासनाची आज केवढी अब्रू वांचली ! पण महाराजांना जो संताप आला तोही साहजिकच आहे. त्यांत त्यांच्याकडे मुळींच दोष नाहीं. पण ज्या अपराध्यास केवळ न्यायासनापुढें ओढून हत्तीच्या पायाला बांधणें किंवा अंत्यजाच्या हातीं देऊन सुळावर चढविणें हेंच योग्य त्याच्या रक्तानें महाराजांची तलवार विटाळली नाहीं हेंही फार चांगलें झालें. "

कुमुद्वतीच्या अंगीं जें शहाणपण होतें तें हेंच ! तिनें आपल्या या भाषणानें नवऱ्याच्या मूर्खपणावर होईल तितकें करून पांघरूण घातलें, त्याला शांत करण्याचीही तजवीज केली, मामासाहेबांस त्याच्या हलकट भाषणानें राग आला असेल तर तोही नाहींसा करण्याचा प्रयत्न केला, आणि शिवाय या अपराध्याची चौकशी करून त्याला योग्य शिक्षा करणें हा आपलाच अधिकार आहे हेंही त्यांतल्या त्यांत प्रद्युम्नरायास दर्शविलें. राजेसाहेब जेव्हां तलवार काढून श्वेतपादास ठार करण्यास धांवले त्यावेळीं कुमुदबंधु पुढें सरून त्यांचा हात धरणारच होता; पण मामासाहेबांनीं तें काम त्यांच्या अगोदर केलें, ह्मणून तो तेथेंच थांबला, आणि मामासाहेबांच्या या कृत्याबद्दल त्यानें त्यांजकडे एकवार संतोषयुक्त मुद्रेनें पाहिलें. सुलभकोपनशील राजेसाहेबांचा राग राणीच्या भाषणानें बराच उतरला आणि आपण ही फार भयंकर चुकी केली असें त्यांना दिसून आलें. पण यावेळीं अगदीं मुठींत नाक धरून गप्प बसण्यावांचून त्यांना दुसरा इलाजच नव्हता. नुसतें कांहीं तरी बडबडून किंवा व्यर्थ कोणावर तरी तिरसटून वेळ मारून नेण्याची ही संधि नव्हती. यामुळें स्वारी वाईट तोंड करून व कपाळाला आंठ्या घालून तोंडानें कांहीं तरी पुटपुटत स्वस्थ परत आसनावर बसली.

" सरदार कुमुदबंधु ! " राणी ह्मणते, " आपण फिरून केलेल्या या महदुपकाराबद्दल आम्हीं कितीही कृतज्ञता प्रदर्शित केली तथापि ती कमीच आहे. पण तुह्मीं जो या

प्रसंगाची अल्प हकीकत सांगितली ती इतकी विलक्षण आहे कीं आमच्या सर्वांच्या मनाचा अगदीं गोंधळ उडून गेला आहे. तेव्हां आपण बजावलेल्या या महत्कृत्याची प्रथमपासून सर्व हकीकत संगतवार सांगून आह्मां सर्वांची जिज्ञासा तृप्त करा अगोदर."

"महाराज," **कुमुदबंधु** लवून ह्मणतो, "सर्व हकीकत थोडक्यांत महाराजांच्या चरणीं निवेदन करितों. मला कांहीं आकस्मिक गोष्टीवरून असें कळलें कीं, **कालयवन**देशाहून **गूहसिंहा**नें आपल्या दरबारांतील एक गृहस्थ मुद्दाम इकडे पाठविला आहे; तो आज सायंकाळीं नेमक्या वेळीं **कुवलयपुरां**त येऊन पोंचेल. त्याच्याबरोबर **पंचगांग**देशांतील बंडखोरांस साहाय्य करण्याकरितां म्हणून दहा हजार मोहोरा **गूहसिंहा**नें पाठविल्या आहेत; आणि रक्षणास बरोबर फक्त दोन शूर जवान दिले आहेत. या मंडळीस **कुवलयपूर**च्या वेशीबाहेरच अडविण्याचा मीं निश्चय केला. माझा निश्चय ईशकृपेनें शेवटासही गेला. एकंदर तीन असामींपैकीं हे **श्वेतपादराय** तर आपल्या चरणधूलींत लोळून प्राणदान मागत आहेत. यांचे दुसरे दोन साथीदार जखमी झाल्यामुळें त्यांना गांवाबाहेर एका शेतकऱ्याच्या खोपींत ठेवून दिले आहेत; आणि ज्याकरितां हें सर्व केलें त्या मोहोरांच्या थैल्या इतक्यांतच आपल्या समोर येऊन पडतील."

असें ह्मणून **कुमुदबंधु** दिवाणखान्याच्या दरवाज्याबाहेर गेला आणि आ[illegible]ल्या तरुण व शूर **मोहन** नांवाच्या नौकरास बरोबर घेऊन परत आला. एकेक ठिकाणीं दोन दोन अशा एकंदर सहा थैल्या आंत आणून **मोहन**नें राणीसाहेबांच्या समोर मांडून ठेविल्या.

थैल्या खालीं ठेवीत असतां त्यांतून सुवर्णाच्या नाण्यांचा मधुरध्वनी साहजिकच उत्पन्न झाला! त्याबरोबर राजेसाहेबांचे कान चतुर्दिशीं किंचित् उभारले व त्यांच्या डोळ्यांतही आनंदाची झांक आली! आतां या थैल्यांपैकीं एकादी थैली तरी आपल्याला खचित् पटकावायला सांपडेल हा विचार मनांत येऊन स्वारीची उदासीनता पार पळाली आणि चेहऱ्यावर तेवढ्या वेळेपुरती तरी टवटवी आली!

"अरे तरुण शिपाया," राणी **मोहन**ला उद्देशून ममतेनें ह्मणते, "तुझ्या औदार्यशील व विक्रमशाली धन्यानें आज जी शिपाईगिरी गाजविली त्यांत तूं साहाय्य केलें आहेस याबद्दल शंकाच नाहीं. पण अरे, तुझ्या या डाव्या हाताच्या अस्तनीवर ताजें रक्त दिसतें आहे. तुला जखम झाली आहे असें दिसतें!"

"नाहीं सरकार!" **मोहन** उत्तर करितो. "तलवारीनें एक नुसता ओरखडा निघाला आहे दुसरें कांहीं नाहीं. आणि सरकार अशा प्रकारची सेवा हातून घडत असतां कितीही जरी भयंकर जखम झाली असती तथापि मीं पर्वा केली नसती."

"तर मग तुझें नांव काय तें सांग आम्हांला." राणी ह्मणते. "आणि तुझ्याबरोबर या सरदारसाहेबांना साहाय्य करण्याकरितां कोण कोण गेले होते त्यांचींही

नांवें सांग, ह्मणजे ती लक्षांत ठेऊन तुम्हां सर्वांस या नोकरीबद्दल योग्य तें बक्षिस देतां येईल. "

" महाराज, आपली परवानगी असेल तर मी थोडीशी हकीकत सांगतों, " **श्वेतपाद** तसाच जमिनीवर पडला आहे व हात पाठीमागें बांधले आहेत अशा स्थितींत बोलतो. " या सरदाराबरोबर फक्त हा एकच नोकर होता. खरें पाहतां यांची मीं शिफारस करावी असे कोणतेही उपकार जरी यांनीं मजवर केलेले नाहींत तथापि आपल्या वैऱ्याच्या अंगींही असा अलौकिक पराक्रम व असें असाधारण बल असलेलें अनुभवास आलें असतां त्याबद्दल त्याचें वर्णन करावें असें कोणाही शिपायास वाटणें साहजिकच आहे. ह्मणूनच सरकारच्या चरणाजवळ ही गोष्ट मी प्रांजलपणें कबूल करितों कीं, हा छोटा शिपाईबच्चा आणि त्याचे हे यजमान असे दोघेजण केवळ अद्भुत धैर्यानें व हिमतीनें लढले नसते तर या वेळीं या ठिकाणीं अशा रीतीनें धुळींत लोळून जीवदान मागण्याचा प्रसंग मजवर खचित् आला नसता ! "

**श्वेतपादा**च्या या स्पष्टोक्तीनें **कुमुदबंधू**च्या कृतीचें महत्व अधिकच दिसून आलें. स्वतः राणीसाहेब, **दशरथराय**, **विश्वासराय**, **विजयसिंह**, **विनयादित्य**मामा आणि **कमला** व **नलिनी** ही सर्व मंडळी मोठ्या आश्चर्यानें व कौतुकानें **कुमुदबंधू**च्या मुखाकडे एक क्षणभरपर्यंत पहात राहिली. मात्र राजेसाहेबांचें सर्व लक्ष त्या द्रव्याच्या थैल्यांनीं आकर्षून टाकिलें होतें; आणि **विशाखा** व **अनुराधा** तेवढा वेळपर्यंत आपापसांत हळूहळू कुजबुजत होत्या !

" जर अशा स्थितींत तुह्मांला कैद करण्यांत आलें आहे, " राणी **श्वेतपादास** उद्देशून ह्मणते, " तर ज्यांच्या बलाचा हा पराक्रम आहे त्यांनींच तुह्मांला योग्य वाटेल ती शिक्षा करावी हें उचित आहे. आह्मीं आपला अधिकार या ठिकाणीं चालविणें हें अन्यायाचें होईल; तर मग सरदार **कुमुदबंधु**, या गृहस्थाची तुह्मास वाटेल ती व्यवस्था तुह्मी करा. "

राणीसाहेबांनीं कृतज्ञताबुद्धीनें दिलेल्या या मानाचा स्वीकार **कुमुदबंधूनें** आदरपूर्वक मान लववून केला. आणि लागलीच तो **मोहना**ला ह्मणाला, " **मोहन**, सोड तर यांचे हात. ज्याअर्थी यांना काय वाटेल ती शिक्षा करण्याचा अधिकार सरकारांनीं मला दिला आहे त्याअर्थी मी यांना जीवदान देतों. **श्वेतपादराय**, उठा. तुह्मांस **कुवलयपुरां**तून पाहिजे तेव्हां निघून जाण्याची पूर्ण मोकळीक आहे. परत **कालयवन**देशास जाऊन झालेली फजिती **गूहसिंहा**ला वाईट तोंड करून निवेदन करण्याचा प्रसंग यावा येवढीच शिक्षा तुह्मांला पुरे आहे. "

**श्वेतपाद** जमिनीवरून उठला आणि **मोहन**नें त्याच्या दंडास बांधलेला शेला सोडून त्याला मोकळें केलें. **श्वेतपाद** लागलींच राणीपुढें हात जोडून ह्मणतो, " सरकार, ज्यांच्या दैवीं राजदरबारीं राहून नोकरी करावयाची असते त्यांस नेहमीं आपल्या सदसद्विवेक बुद्धीस अनुसरून चालतां

येतेंच असें नाहीं. माझीही गोष्ट तशीच आहे, महाराज. आपण कृपा करून मला जीवदान दिलें आहे, तर आतां माझ्या मनांतील विचार स्पष्टपणें बोलण्यास हरकत नाहीं. आजच्या या प्रसंगांत मला अपजय आला आणि माझ्यावर सोंपविलेलें कार्य फसलें याबद्दल मला बिलकुल वाईट वाटत नाहीं. (**कुमुदबंधू**कडे वळून) सरदार **कुमुदबंधु**, आपल्याला मी दुसरें काय बोलूं? या जगतांत कोणाही मनुष्याला देतां येण्यासारख्या ज्या अति मौल्यवान् वस्तु, त्या सर्वांत श्रेष्ठ जे प्राण ते आपण मला आज दिले. तेव्हां याबद्दलची माझी कृतज्ञता कोणत्याही शब्दांनीं किंवा कृतींनीं व्यक्त करून दाखविण्यास मी असमर्थ आहे."

**श्वेतपाद** हा जरी **कालयवन**देशच्या दरबारांतील अति विश्वासाच्या व गुप्त कामीं उपयोगीं पडणारा **गूहासिंहा**चा एक हस्तक होता; तथापि तो स्वतः चांगला संभावीत व कुलाचारसंपन्न गृहस्थ होता. यामुळें कोणत्याही नीच कामीं त्याची योजना झाली असतां तें करण्याचें त्याच्या जिवावर येत असे, पण उपयोग काय? कवींनीं ह्मटल्याप्रमाणें योगीजनांनाही अगम्य वाटणारा असा हा परमगहन सेवाधर्म—आणि त्यांतच्या त्यांत राजदरबारीं व विशेषेंकरून **गूहासिंहा**सारख्याच्या दरबारीं—एकवार पतकरल्यानंतर सदसद्विवेकास फांटा देऊन टाकणें व येईल त्या प्रसंगास पाठ देणें भाग पडावें यांत विशेष तें काय! असो; **कुमुदबंधू**चे आणखी एकवार आभार प्रदर्शित करून आणि राणीस व राजेसाहेबांस फिरून आदरपूर्वक प्रणाम करून **श्वेतपाद** जावयास निघाला.

इतक्यांत राजेसाहेबांची कुबुद्धी फिरून जागृत झाली आणि द्रव्याच्या थैल्यावर बसलेली त्यांची दृष्टी **श्वेतपादा**कडे वळली. "अरे चोरा, दम धर! निघालास कोठें इतक्यांत? अद्याप आह्मांला किती तरी गोष्टी विचारावयाच्या आहेत तुला."

राजेसाहेब **कुमुदबंधू**च्या अंगीं असलेल्या सद्गुणांबद्दल मनांतून त्याचा द्वेष व हेवा करीत; पण त्याचें त्यांना भयही वाटत असे. यामुळें उघडपणें कोणत्याही कामांत त्याचा अपमान करण्याची त्यांची छाती नव्हती. **कुमुदबंधू**स त्याच्या इच्छेप्रमाणें या कैद्यास जीवदान व स्वातंत्र्यदान करण्याचा अधिकार मिळाला व त्याचा उपयोग करून त्यानें आपली सुजनता दाखविली, आणि त्यायोगानें आपल्यावर वरचष्मा मिळविला असें राजेसाहेबांस वाटून त्यांना त्याचा राग आला होता. ह्मणून त्यांनीं अशा अप्रत्यक्ष रीतीनें त्याला एक निसटता टोला देण्याची युक्ति काढिली.

आपल्या हुकुमाप्रमाणें **श्वेतपाद** परत फिरून उभा राहिला असें पाहून राजेसाहेब ह्मणतात, "चल असा पुढें ये, आणि दे आह्मी विचारितों त्या प्रश्नाचे जबाब अगोदर. सांग, हें द्रव्य कोणाकडे नेऊन पोंचवावयाचा तुला हुकूम होता? **कुवलयपुरां**त आणून तें कोणाच्या स्वाधीन तूं करणार होतास? कोणाच्या मार्फतीनें तें बंडखोरांच्या हातीं पोंचावयाचें होतें? तुला सोडून

देण्याच्या अगोदर या सर्व गोष्टी आम्हांस कळल्या पाहिजेत !"

"जरूर त्या सर्व गोष्टींची माहिती मी पूर्वींच त्याचेजवळून घेऊन ठेविली आहे." **कुमुदबंधूनें** सभ्यपणें व सौम्य शब्दांनी राजेसाहेबांस उत्तर दिलें.

"बरें तर, तें सर्व आह्मांला कळलें पाहिजे लवकर !" राजेसाहेबांचा याही खेपेस हिरमोड झाल्यामुळें ते कातावून ह्मणाले.

राणीनें **श्वेतपादास** जाण्याविषयीं खूण केली, आणि तो फिरून एकवार राणीस व **कुमुदबंधूस** प्रणाम करून दिवाणखान्याबाहेर पडला. **मोहन**ही आतां आपलें येथें काम नाहीं असें जाणून बाहेर गेला.

लागलीच **कुमुदबंधूनें** राणीकडे पाहून बोलण्यास सुरुवात केली. "महाराज, बंडखोरांस मदत करण्याकरितां बरोबर भरपूर द्रव्य देऊन **गूहसिंहानें** आपला हस्तक पाठविला होता, ही बातमी मला कशी लागली हें आतां सविस्तरपणें आपले चरणीं निवेदन करणें माझें कर्तव्य आहे."

**कुमुदबंधु** इतकें बोलला त्याबरोबर सर्वांचे डोळे व कान त्याच्याकडे लागले;—आम्हीं सर्वांचे ह्मटलें यांत **नलिनी** व राजेसाहेबही आले. **नलिनी**ची व **कुमुदबंधू**ची जरी संध्याकाळीं गांठ पडली होती, तथापि तिला सविस्तर हकीकत कळली नव्हती. तेव्हां ती कळण्याविषयींची उत्सुकता इतरांबरोबर तिच्या ठिकाणींही उत्पन्न होणें साहजिकच होतें. राजेसाहेबांचें लक्ष इकडे वळलें, याचें कारण असें कीं, इतका वेळ एकसारखे त्या मोहोरांच्या थैल्याकडे पाहून पाहून त्यांचे डोळे बरेच संतुष्ट झाले होते शिवाय कोणीही मनुष्य कितीही निरस असला तथापि अशा विलक्षण गोष्टींनीं त्याची जिज्ञासा अंशतः तरी जागृत होणें अगदीं स्वाभाविक आहे.

"आज प्रातःकाळीं लवकर उठून मी बाहेर पडलों तों एका ठिकाणीं ही रेशमी थैली मला पडलेली सांपडली." असें ह्मणून **कुमुदबंधूनें** ती थैली राणीपुढें ठेविली.

ती थैली पाहतांच **विशाखे**ची थोडीशी चलबिचल होऊन ती **अनुराधे**च्या कानाशीं लागली.

"ह्या थैलींत," **कुमुदबंधु** बोलतो, "आंकड्यांच्या भाषेंत लिहिलेलीं कांहीं पत्रें सांपडलीं. प्रयत्नांतीं त्यांतील मजकूर मीं लाविला. त्यांपैकीं एका पत्रांत आजच्या या गोष्टीसंबंधानें मजकूर होता. तें पत्र मीं सबंध साध्या भाषेंत लिहून तयार केलें आहे. तें **गूहसिंहा**चे कृष्णनीतिपटु प्रधान **शीतशील** यांनीं लिहिलेलें आहे."

"तर मग तें फार महत्वाचें असलें पाहिजे." राणी ह्मणते. "पण खरेंच **गूहसिंहा**चा आमच्याविषयींचा द्वेष या थराला येऊन पोंचेल, आणि त्यांच्या राजनीतींची सीमा इतकी वाढेल असें मला तरी वाटलें नव्हतें. आमच्याशीं उघडपणें युद्ध सुरू करण्यास योग्य कारण नाहीं किंवा तसें करण्याची छाती नाहीं ह्मणून **गूहसिंहा**सारख्या येवढ्या योग्यतेच्या राजानें **पंचगांग** देशांतील हलकट बुद्धीच्या क्षुद्र राजद्रोही लोकांस फुसलावून द्यावें आणि

सांगण्याची जरूर नाहीं. हा ग्रंथ प्रत्येक देशहितेच्छूनें व स्वभाषेच्या उत्कर्षाविषयीं उत्कट इच्छा बाळगणारानें अवश्य संग्रहीं ठेविला पाहिजे. पुस्तकाच्या आरंभीं शास्त्रीबोवांची तसबीर घातली आहे. किं० ३ रु० ट० हं० ८ आणे.

**सरदार परशुराम भाऊ पटवर्धन यांचे पराक्रम अथवा पेशवाईतील धामधुमीचा देखावा.**—रचणार धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे. हा ग्रंथ दक्षिणाप्राईज कमिटीनें पसंत करून त्याबद्दल बक्षिस दिलें आहे. पटवर्धन् हे ब्राह्मण सरदार असून प्रसिद्ध वृद्ध पुरुष निझामअल्ली ह्यानें ज्याप्रमाणें पेशवाईची अव्वल अखेर झाडून सारी पाहिली, त्याप्रमाणेंच परशुरामभाऊ पटवर्धन यांचे हयातींत पेशव्यांचे गादीवर चारपांच पेशवे होऊन गेले. तितक्या अवधींत पेशव्याच्या दरबारांत राज्यकारस्थानांची जी विलक्षण दंगल उडाली होती व नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्या मसलतीचा जो बहारीचा सामना चालला होता, त्यांविषयींचें चित्तवेधक वर्णन या ग्रंथांत विस्तारानें देण्याचा यत्न केला असून हरिपंत फडके, त्रिंबकराव मामा, इंग्लिश, निझाम, हैदर इत्यादिकांविषयीं विस्तृत माहिती योग्य स्थळीं दिली आहे.

मिळमिळीत व बखरी भाषेला नाकें मुरडून इतिहासवाचनाचा जे कंटाळा करीत असतील, किंवा कादंबऱ्यांतील काल्पनिक वीरवर्णनानेंच जे आपली तहान भागवून घेत असतील व ब्राह्मण म्हणजे मूळचे नेभळे अशी ज्यांची भ्रामक समजूत असेल, अशा लोकांस पुढील चरित्र अत्यंत उपयुक्त व मनोरंजक वाटेल अशी उमेद आहे; कारण ऐतिहासिक कादंबरीच्या धर्तीवर रचलेल्या ह्या पुढील ग्रंथाच्या जोरदार व हृदयद्रावक भाषेखेरीज प्रत्येक ऐतिहासिक स्थलाची व प्रसंगाची सत्यता सिद्ध करण्याकरितां ग्रंथकर्त्यानें टीपेंत जागोजाग आधार दिले आहेत.

सारांश रा० मोडक, काव्येतिहासकार, व ग्रांट डफ यांनीं सांठवून ठेविलेल्या सामुग्रीची ही पुढील वीररसप्रचुर पाकनिष्पत्ति आबालवृद्धांस रुचकर, खमंग व चटकदार अशीच लागेल, अशी आशा आहे. किंमत १२ आणे; ट० हं० २ आणे.

**विलायतचा प्रवास**—हल्लींच्या काळीं महाराष्ट्र भाषेंत जो ग्रंथसंग्रह होत आहे त्यांत प्रवासादिकांचीं वर्णनें फार कमी. अगोदर प्रवास करणारांची संख्या फार थोडी. त्यांत विलायतेपर्यंत मजल मारणारे फारच थोडे. त्यांतूनही मार्मिकपणानें देशांचें, देशस्थितीचें, सृष्टचमत्कारांचें, सृष्टिसौंदर्याचें, आचारविचारांचें अवलोकन करणारांची संख्या अत्यल्प—हजारांत एखादा सांपडल्यास भाग्य. पण महाराष्ट्र भाषेच्या व वाचकांच्या सुदैवानें अशा एका गृहस्थास विलायतची यात्रा करण्याचा योग आला व त्याचें फळ हें पुस्तक होय. यांत प्रवासांतील निरनिराळ्या प्रसंगांचें व अनुभवांचें मार्मिक वर्णन असून, एडन, तांबडा समुद्र, केरो, इजिप्तमधील मनोरे, आलेक्झांड्रिया, आथेन्स, स्मर्ना, कान्स्टांटिनोपल, व्हियेना, पारिस इत्यादि शहरांचें सविस्तर व मनोरम वर्णन असून प्रसंगोपात्त ठिकठिकाणच्या चालीरीतींचेंही दिग्दर्शन उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे. भाषा गंभीर व अलंकृत आहे. भाग १ ला. किं. ८।१२ ट. हं. ८१. भाग २ रा. किं. १ रु. ट. ८१.

**सुंदरी अथवा गर्वनिरसन**—**गोविंद विठ्ठल काळे बी. ए. कृत.** हें नाटक आंग्ल ग्रंथकर्ती लिटनसाहेब याच्या लेडी आफ लियन्स या नाटकाच्या आधारें लिहिलें आहे. यांतील कथानक रम्य आहे. सुंदरी नांवाच्या एका श्रीमान् गृहस्थाच्या मुलीवर नायक शिवाजी ( बागवानाचा मुलगा ) याचें प्रेम जडून तो तिला मागणी घालतो. ती व तिची आई दोघीही त्याच्या मागणीची अवहेलना करतात. त्याचप्रमाणें एक सावकाराच्या मागणीचें

तोंच मति होते. सावकार व त्याचा एक स्नेही सूड घेण्याचा विचार करतात व आपल्या मागण्यांच्या अवहेलनेनें संतापलेला शिवाजी त्यांच्या हातीं सांपडतो. सुंदरीच्या आईच्या मनांत आपली मुलगी राजघराण्यांत पडावी असें होतें; तेव्हां या तिच्या इच्छेच्या द्वारेंच सूड उगवायची मसलत ठरून ते शिवाजीला राजा बनण्याविषयीं सांगतात. रागाच्या भरांत हें आपण अन्यायी व कपटी कृत्य करीत आहों ही गोष्ट त्याच्या ध्यानीं न येऊन तो त्यांच्या बेतांत सामील होतो. खोट्या वेषानें त्याचें सुंदरीशीं लग्न होतें. तिला हें कळल्यावर ती त्याची निर्भर्त्सना करते. तो पश्चात्ताप पावून निघून जातो. त्याच्या पश्चात् कपटी सावकार सुंदरीच्या बापाला कर्जाच्या पेंचांत आणून पहिलें लग्न खोटें ठरवून तिचा पुनः आपल्याशीं विवाह व्हावा याविषयीं त्याचा रुकार घेतो. इतक्यांत लढाईंत व शिपाईगिरींत शिवाजी कीर्ति व संपत्ति मिळवून परत येतो व आपल्या सासऱ्याला ऋणमुक्त करतो. सावकाराची फजिती होते. शिवाजी व सुंदरी आनंद पावतात. असें या नाटकांतील कथानक आहे. किं० ९ आणे. ट. हं. १॥ आणा..

---

**केसरींतील निवडक निबंध**—भाग १ व २. केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आम्हांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत, अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यास चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

---

**डिमास्थेनीस यांचें चरित्र**—हें लहानसें चरित्र प्रो० चिंतामण गंगाधर भानू बी. ए. "रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र" व "नीतिमीमांसा" या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें आहे. डिमास्थेनीस हा अथेन्स शहरच्या आणि ग्रीस देशाच्या इतिहासांत वर्णनीय पुरुष होऊन गेला. याच्या अंगीं मुख्य गुण वक्तृत्व. मुत्सद्दीपणांतही तो कमी होता असें नाहीं. यानें आपल्या हातून आपल्या देशाचें वैभव वाढविण्याविषयीं निदान राखण्याविषयीं काय काय केलें, देशाभिमान त्याच्या अंगीं कसा जाज्वल रीतीनें वास करीत होता, स्वातंत्र्य राखण्याविषयी त्याचें मन कसें स्फुरत होतें,इत्यादि गोष्टी आमच्या महाराष्ट्रवाचकांनीं या चरित्रापासून घेण्यासारख्या आहेत. पुस्तक बारीक पण रुंद व जाड्या अक्षरांनीं छापलें आहे. किंमत ४॥ आणे. ट० हं० ८॥. आणा.

---

**रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र**—चिंतामण गंगाधर भानू, बी. ए., प्रोफेसर, फर्ग्यूसन कालेज, पुणें, यांनीं लिहिलें. रिचर्ड काब्डेन, ब्राइटसाहेबांचा साथीदार, यांनीं इंग्लंडच्या इतिहासांत लोककार्यदक्षतेविषयीं व परहिततत्परते-विषयीं अमर कीर्ति मिळविली आहे. इंग्लंडच्या व्यापाराची वाढ अनेक प्रतिबंधक कायद्यांनीं खुंटविली होती, ती यांनीं भिवापाड मेहनत घेऊन लोकांचे व राजकर्त्यांचे भ्रम दूर करून मोकळी केली. राष्ट्रीयहिताची कळकळ बाळगणारांनीं स्वकार्यसिद्धीसाठीं देशसेवेला कसें तनमनधन अर्पण केलें पाहिजे, अभ्रांत देह झिजविला पाहिजे, ममत्व टाकलें पाहिजे हें या चरित्रवाचनापासून चांगलें कळेल. किंमत १० आणे. ट० हं० एक आणा.

---

तः
ह्मती.
ता इतर।
होणें साहा
क्ष इकडे वळ०

**त्राटिका नाटक**—महाकवि शेक्सपिअरकृत टेमिंग आफ दी श्रयू नाटकाच्या आधारें प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए., यांनीं लिहिलें. या नाटकांत हास्यरस पूर्ण भरला आहे. किंमत ०६ आणे ट० हं० ०१ आणा.

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक ७.

# नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.*

अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठं. |
|---|---|
| वीरमणी आणि शृंगारसुंदरी ... ... ... ... ... ... | ६५ ,, ८० |
| कुवलयपूरची राणी कुमुद्वती... ... ... ... ... ... | २०१ ,, २१६ |


पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत

हरि नारायण गोखले यांनीं छापिलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.

[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ४॥. शिवाय ट.हं. ६ आणे.

जुलै १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें

# त्राटिका नाटक.

महाकवि शेक्सपिअरकृत टेमिंग आफ दी श्र्यू नाटकाच्या आधारें प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए., यांनीं लिहिलें.

**या नाटकांत हास्यरस पूर्ण भरला आहे.**

किंमत ८६ आणे ट० हं० ८१ आणा.

**आर्यभूषण छापखाना, पुणें.**

नाट्यकथार्णव मासिकपुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें

# लटपटच्या पद्या

## प्रहसन.

**प्रो. वा० बा० केळकर, बी. ए., कृत**

किं० ८४, ट० ख० ८१.

पुणें.—आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

---

# केसरींतील निवडक निबंध.

### भाग पहिला.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपक्षधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यास चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

### विषयानुक्रमणिका.

उपोद्घात—वाचन.
आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण?
हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे.
आह्मी आमच्या दारिद्र्यांतून कशानें सुटूं?
गुरुगोविंद.
हस्तकार्याची अवश्यकता.
व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं.
आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा.
हिंदुस्थानावर रशिया स्वारी करणार काय?
इंग्लंडाशिवाय आह्मांस गति नाहीं.
भगिन्यांचा सोस.
एकत्र राहणें चांगलें का?
अनुकरण.
अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार.
भोजनगृह.
युरोपियन आणि नेटिव यांचें अन्योन्य संघट्टन.
मराठमोळा.
मराठमोळ्याची पुरवणी.
सामुरवास.
दारुबाजी.
इंग्रजी विद्या व आमची सामाजिक स्थिति.
हिंदुस्थानदेश बुडाला, हो, ठार बुडाला.
स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द.
माधवबागेंतील सभेवरील आक्षेप.
आतां कसें?
सारवांस नोटीस.
वर्तमानपत्रें.
शेक्सपिअर, भवभूति, कालिदास.
नाटकें करावीं कीं करूं नये?
कवि, काव्य, काव्यरति.
बडोद्याचे सयाजीराव महाराज यांस दोन उपदेशपर शब्द.
आपलें वैद्यक.
रसायनक्रिया.
मुद्रणस्वातंत्र्य.
कै० विष्णु कृष्ण चिपळोणकर.
मन आणि मेंदू.
सृष्टयवलोकन

**म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.**

कीं त्याचें ओरडणें मला येथें ऐकूं येईल. ओढा हरामखोराला.

[ **चाकर** त्याला नेतात.

अग, तुझा माझा संबंध होण्यापूर्वींच तूं कामाच्या होळींत भाजून जाऊन तुझा कोळसा बनला होता. देवा, मीं आपल्या रत्नासारख्या पत्नीचा अनादर करून, पवित्र औरस संतती—जी ईश्वरी कृपेची केवळ परमावधि—ती संपादण्याचें टाकून, माझें सदाचरण मलिन करून घेतलें तें हिच्याचसाठीं का, कीं जी पाहिजे त्या हलकट हुजऱ्यालासुद्धां डोळा घालावयाला तयार ?—

**शृंगार**०—प्रियकरा, माझें थोडें ऐकाल का ?

**वीर**०—तूं जन्माची कपटी;—हरहर, व्यसनाच्या आधीन होणें ह्मणजे आपण होऊन आपले ज्ञानचक्षू फोडून टाकणें! परमेश्वर अशा मनुष्याचें चांगले दात पाडतो. आमच्या त्या मधुर व्यसनांचेच कोरडे बनवून त्यांनीं आमची चामडी लोळवितो; आमच्या सदसद्विचाराला आमच्या पापी वासनांनीं दडपून टाकतो; आमचें ओंगळ आचरणच आह्मांला पवित्र वाटावयाला लावतो; आणि आह्मीं मग मोठ्या ताठ्यानें व आनंदानें अक्काबाईच्या स्वाधीन होऊन गेलों कीं सर्व शहाण्यांना आमचा तमाशा करून दाखवितो.

**शृंगार**०—देवा, येथपर्यंत मजल आलीना ?

**वीर**०—सर्वजयमहाराजांनीं सारा तुझा बहार लुटून तुला नीरस करून सोडली होती. त्याशिवाय आणखी किती हलकट लोकांनीं लाट मारला असेल तें तुझें तुलाच ठाऊक. कारण तुझ्या अंगांत कामज्वर मुसमुसूं लागला ह्मणजे तुला कशाची चाड राहते. भलाबुरा, राजाहुजऱ्या, ह्मातारातरणा,—जो कोणी वेळीं मिळेल, त्याला तूं राजी. तुला इंद्रियदमनाची कल्पना असली तरी तें तुझ्या हातून खचितच करवलें नसेल.

**शृंगार**०—महाराज, कां हा माझ्यावर एवढा गहजब ?

**वीर**०—कां अं ? अग, दीडदमडीकरितां "देव तुमचें भलें करो" असें म्हणणाऱ्या कुत्र्याला—माझा खेळगडी, राजेलोकांना देखील ज्याचा स्पर्श दुर्मीळ, जो तूं आपल्या प्रीतीची साक्ष ह्मणून माझ्या हातांत दिलास—त्या हाताशीं सलगी करूं दिलीस ? शंकरा, या वेळीं मी तुझा नंदी जर असतों तर मोठ्यानें हंबरडा फोडून या माझ्या अंतःकरणांत जो कल्होळ उडाला आहे त्याला साजेल असा आक्रोश केला असता. हें मन अगदीं फाटून गेलें आहे. यांतलें दुःख मऊ मऊ शब्दांनीं सांगणें ह्मणजे गळ्याला फास घालणाराचीं "बाबा, लवकर आटप" अशीं आर्जवें करण्याप्रमाणेंच आहे. इतका नरमपणा नाहीं माझ्या अंगीं.

चाकर बलदेवाला घेऊन येतात.

कायरे ? दिलात का चांगला खरपूस मार ?

**चाकर**—होय; सरकार ? तो मोठ्या मोठ्या-

नें रडूं आरडूं लागला, आमच्या पायां पडला. शेवटीं त्याच्या तोंडांतून आवाज निघेना तेव्हां त्याला इकडे आणला.

**वीर०**—शाबास, तुह्मीं इमानी आहां. अरे माकडा, जयेंद्रपालाची स्तुति करणारा तूंच ना ? जा आतां त्याच्याकडे बोंबलत. त्याचें तें मोठें वैभव कितीसें तुझ्या उपयोगीं पडलें ? आजपासून स्त्रियांचा गोंडस हात पाहिला कीं तुझ्या अंगांत कांपरें भरूं दे, तुझ्या त्या जयेंद्रपालाला सांग कीं नशीबानें मला दगा दिल्यावर माझ्या निकृष्ट व हतवीर्य स्थितीचा फायदा घेऊन माझा अपमान करणें यांत पुरुषार्थ नाहीं. माझ्या चांगल्या ग्रहांनीं आकाशकंद्रांत आपलीं तोंडें लपविलीं आहेत ह्मणूनच मी या स्थितीला येऊन पोंचलों आहे ह्मणावें. नाहीं तर त्याची काय माय व्यायली होती माझ्या वाटेला जाण्याची ! तथापि अजून हा वीरमणी धुळीला मिळाला नाहीं हें त्याला दाखविण्याकरितां ने त्याच्याकडे आपलें सुजलेलें अंग.

[ चाकर बलदेवाला नेता.

**शृंगार०**—महाराज, अजून नाहीं का आपला राग शांत झाला ?

**वीर०**—अग, हा माझा राग आतां शांत व्हावयाचा नाहीं. माझ्या जीवितचंद्राला ग्रहण लागलें. हें ग्रहण इतर कोणाला बाधावयाचें नाहीं; तें या वीरमणीलाच अनिष्टसूचक आहे. इतक्यांतच मी इतका हतवीर्य झालों आं कीं हिनें जयेंद्रपालाची मर्जी सुप्रसन्न करून घेण्याकरितां त्याच्या गुलामाशीं देखील लाडीगोडी लावावी ! हायरे नशीबा ! काय करूं रे ! माझ्याशीं बेइमान ! देवा, पहा, पहा हें. माझ्या जिवाची कशी आग आग होऊन गेली आहे; पण हिचें अंतःकरण पहा कसें थंडगार ! हिला काय त्याचें !

**शृंगार०**—प्राणप्रिया, असें जर असेल तर माझें अंतःकरण तसेंच एकदम थंडगार होवो ! या रक्तांत विष उत्पन्न होऊन तें साऱ्या अंगभर पसरून माझें रक्त जेथल्या तेथें गोठून जावो ! माझा श्वासोच्छ्वास बंद होऊन माझा प्राण गुदमरो व तो जातांना मला अनंत वेदना होवोत ! माझ्या मागून माझ्या पोरांबाळांवर व शेवटीं माझ्या सर्व राज्यावर ईश्वरी क्षोभ होऊन सर्व जळून खाक होवो ! कालीमाते, कर या तुझ्या पोरीकडे तुझे ते जाळणारे नेत्र आणि जर तुला हिच्यांत कांहीं पाप दिसेल तर येथल्या येथें ताबडतोब हिला जाळून टाक.

**वीर०**—बस्स, बस्स. झालें माझें समाधान. प्रिये, ये अशी जवळ. कोठें होतीस इतका वेळ ? या वीरमणीपासून तुझ्यानें दूर राहवलें तरी कसें ? आणि हें काय ? तुझ्या डोळ्यांत पाणी ? थांब; मी तें या ओंठांनीं शोषून घेतों. अग, हा एक एक थेंब ह्मणजे शत्रूच्या रक्ताच्या लाखो थेंबांबरोबर आहे. ज्यां

वध तर खरी. या माझ्या तलवारीला फार दिवसांत खूपसें रक्त प्यायला मिळालें नाहीं, ती तिची तहान रक्ताचे पाटचे पाट वाहावयाला लावून भागवितों. अग हा गाजी उद्यां आजपर्यंत दाखविला नाहीं असा पराक्रम दाखवून नांव गाजविणार. याच्यांत अजून दम आहे. आमचें सारें आरमार पुनः एकत्र झालें आहे. सैन्य तर जयेंद्रपाळाच्या छातीवर उभें आहे. पण तूं एकदां हास पाहूं, त्याशिवाय मला उल्हास यावयाचा नाहीं.

**शृंगार०**—आतां मला हसावयाला काय उशीर आहे, आपण मघांशीं रागावलां होतां तेव्हां मला कोणी हसावयाला सांगून पहावयाचें होतें. वीरमणी पूर्वींचे झाले कीं शृंगारसुंदरी पूर्वींची झालीच. पण सख्या, आतां पुनः नाहींना असे रागावणार ?

**वीर०**—अग वेडे, आतां तुझ्यावर रागावयाचें नांवच नको. आतां माझा सगळा राग माझ्या शत्रूवर. या वीरमणीच्या अंतःकरणांतली दया माया सर्व कांहीं काढून टाकली पहा. आतां दुसरें तिसरें कांहीं नाहीं. जो ह्मणून आडवा येईल त्याला काप. मीं चालविलेली कत्तल पाहून यमधर्माला मोठा आनंद होईल. इतका पाप्यांचा भार हलका झालेला पाहून या भूमातेला देखील हर्ष होईल. माझा घोर संग्राम पाहून आकाशांत यक्ष, किन्नर, गंधर्व आपापले व्यापार सोडून नुसते खालीं पहात राहतील.

**शृंगार०**—प्राणनाथांनीं मनावर घेतल्यावर ते काय नाहीं करणार ? पण कांहीं झालें तरी या शृंगारसुंदरीकरितां प्राणनाथांनीं आपल्या शरिराला जपावें. नाहीं तर न जाणो—

**वीर०**—अग चूप चूप, असलें अभद्र बोलूं नको. आज माझ्या साऱ्या सरदारांना वाड्यांत मेजवानी देऊं या. दारूचे हंडेच्या हंडे पालथे घालूं. एक रात्र चैन करून घेऊं. आनंदाच्या आणि मजेच्या रंगांत आज सारें आकाश दणाणून देऊं या.

[ **वीरमणी, शृंगारसुंदरी** वगैरे जातात.

**अधीर०**—आतां कळस झाला. याचा राग आतां विजेहून अधिक जोरानें कडाडणार. पण अत्यंत कोपाविष्ट होणें ठीक नाहीं. मनाला कांहीं तरी दिक्कत् पाहिजे. नाहीं तर एखादा उंदीर देखील आपलें बलाबल न पाहतां रागाच्या आवेशांत मांजरावर चाल करून जाईल तर त्यांत काय फायदा ? धनीसाहेबांचा धीर बळावत चालला आहे खरा; पण त्याबरोबरच त्यांचा अकलेनें त्यांना सोडावयाला सुरुवात केली आहे. अकलेची आणि शौर्याची फारकत झाली कीं शौर्याचा पाय मोडल्याप्रमाणेंच. त्याच्या तलवारीवर गंज चढल्यासारखीच ती निरुपयोगी. बस्स, झाला निश्चय. आतां येथून ताबडतोब पाय काढावा हें ठीक.

[ जातो.

नें रडूं आरडूं लागला, आमच्या पायां पडला. शेवटीं त्याच्या तोंडांतून आवाज निघेना तेव्हां त्याला इकडे आणला.

**वीर॰**—शाबास, तुह्मी इमानी आहां. अरे माकडा, जयेंद्रपालाची स्तुति करणारा तूंच ना ? जा आतां त्याच्याकडे बोंबलत. त्याचें तें मोठें वैभव कितीसें तुझ्या उपयोगीं पडलें ? आजपासून स्त्रियांचा गोंडस हात पाहिला कीं तुझ्या अंगांत कांपरें भरूं दे, तुझ्या त्या जयेंद्रपालाला सांग कीं नशीबानें मला दगा दिल्यावर माझ्या निकृष्ट व हतवीर्य स्थितीचा फायदा घेऊन माझा अपमान करणें यांत पुरुषार्थ नाहीं. माझ्या चांगल्या ग्रहांनीं आकाशकंदरांत आपलीं तोंडें लपविलीं आहेत ह्मणूनच मी या स्थितीला येऊन पोंचलों आहे ह्मणावें. नाहीं तर त्याची काय माय व्यायली होती माझ्या वाटेला जाण्याची ! तथापि अजून हा वीरमणी धुळीला मिळाला नाहीं हें त्याला दाखविण्याकरितां ने त्याच्याकडे आपलें सुजलेलें अंग.

[ चाकर बलदेवाला नेता

**शृंगार॰**—महाराज, अजून नाहीं का आपला राग शांत झाला ?

**वीर॰**—अग, हा माझा राग आतां शांत व्हावयाचा नाहीं. माझ्या जीवितचंद्राला ग्रहण लागलें. हें ग्रहण इतर कोणाला बाधावयाचें नाहीं; तें या वीरमणीलाच अनिष्टसूचक आहे. इतक्यांतच मी इतका हतवीर्य झालों कीं हिनें जयेंद्रपालाची मर्जी सुप्रसन्न करून घेण्याकरितां त्याच्या गुलामाशीं देखील लाडीगोडी लावावी ! हायरे नशीबा ! काय करूं रे ! माझ्याशीं बेइमान ! देवा, पहा, पहा हें. माझ्या जिवाची कशी आग आग होऊन गेली आहे; पण हिचें अंतःकरण पहा कसें थंडगार ! हिला काय त्याचें !

**शृंगार॰**—प्राणप्रिया, असें जर असेल तर माझें अंतःकरण तसेंच एकदम थंडगार होवो ! या रक्तांत विष उत्पन्न होऊन तें साऱ्या अंगभर पसरून माझें रक्त जेथल्या तेथें गोठून जावो ! माझा श्वासोच्छ्वास बंद होऊन माझा प्राण गुदमरो व तो जातांना मला अनंत वेदना होवोत ! माझ्या मागून माझ्या पोरांबाळांवर व शेवटीं माझ्या सर्व राज्यावर ईश्वरी क्षोभ होऊन सर्व जळून खाक होवो ! कालीमाते, कर या तुझ्या पोरीकडे तुझे ते जाळणारे नेत्र आणि जर तुला हिच्यांत कांहीं पाप दिसेल तर येथल्या येथें ताबडतोब हिला जाळून टाक.

**वीर॰**—बस्स, बस्स. झालें माझें समाधान. प्रिये, ये अशी जवळ. कोठें होतीस इतका वेळ ? या वीरमणीपासून तुझ्यानें दूर राहवलें तरी कसें ? आणि हें काय ? तुझ्या डोळ्यांत पाणी ? थांब; मी तें या ओंठांनीं शोषून घेतों. अग, हा एक एक थेंब ह्मणजे शत्रूच्या रक्ताच्या लाखों थेंबांबरोबर आहे. उद्यां

बघ तर खरी. या माझ्या तलवारीला फार दिवसांत खूपसें रक्त प्यायला मिळालें नाहीं, ती तिची तहान रक्ताचे पाटचे पाट वाहावयाला लावून भागवितों. अग हा गाजी उद्यां आजपर्यंत दाखविला नाहीं असा पराक्रम दाखवून नांव गाजविणार. याच्यांत अजून दम आहे. आमचें सारें आरमार पुनः एकत्र झालें आहे. सैन्य तर जयेंद्रपालाच्या छातीवर उभें आहे. पण तूं एकदां हास पाहूं, त्याशिवाय मला उल्हास यावयाचा नाहीं.

**शृंगार०**—आतां मला हसावयाला काय उशीर आहे. आपण मघांशीं रागावलां होतां तेव्हां मला कोणी हसावयाला सांगून पहावयाचें होतें. वीरमणी पूर्वींचे झाले कीं शृंगारसुंदरी पूर्वींची झालीच. पण सख्या, आतां पुनः नाहींना असे रागावणार ?

**वीर०**—अग वेडे, आतां तुझ्यावर रागावयाचें नांवच नको. आतां माझा सगळा राग माझ्या शत्रूवर. या वीरमणीच्या अंतःकरणांतली दया माया सर्व कांहीं काढून टाकली पहा. आतां दुसरें तिसरें कांहीं नाहीं. जो ह्मणून आडवा येईल त्याला काप. मीं चालविलेली कत्तल पाहून यमधर्माला मोठा आनंद होईल. इतका पाप्यांचा भार हलका झालेला पाहून या भूमातेला देखील हर्ष होईल. माझा घोर संग्राम पाहून आकाशांत यक्ष, किन्नर, गंधर्व आपापले व्यापार सोडून नुसते खालीं पहात राहतील.

**शृंगार०**—प्राणनाथांनीं मनावर घेतल्यावर ते काय नाहीं करणार ? पण कांहीं झालें तरी या शृंगारसुंदरीकरितां प्राणनाथांनीं आपल्या शरिराला जपावें. नाहीं तर न जाणो—

**वीर०**—अग चूप चूप, असलें अभद्र बोलूं नको. आज माझ्या साऱ्या सरदारांना वाड्यांत मेजवानी देऊं या. दारूचे हंडेच्या हंडे पालथे घालूं. एक रात्र चैन करून घेऊं. आनंदाच्या आणि मजेच्या रंगांत आज सारें आकाश दणाणून देऊं या.

[ **वीरमणी, शृंगारसुंदरी** वगैरे जातात.

**अधीर०**—आतां कळस झाला. याचा राग आतां विजेहून अधिक जोरानें कडाडणार. पण अत्यंत कोपाविष्ट होणें ठीक नाहीं. मनाला कांहीं तरी दिक्कत् पाहिजे. नाहीं तर एखादा उंदीर देखील आपलें बलाबल न पाहतां रागाच्या आवेशांत मांजरावर चाल करून जाईल तर त्यांत काय फायदा ? धनीसाहेबांचा धीर बळावत चालला आहे खरा; पण त्याबरोबरच त्यांचा अक्कलेनें त्यांना सोडावयाला सुरुवात केली आहे. अक्कलेची आणि शौर्याची फारकत झाली कीं शौर्याचा पाय मोडल्याप्रमाणेंच. त्याच्या तलवारीवर गंज चढल्यासारखीच ती निरुपयोगी. बस्स, झाला निश्चय. आतां येथून ताबडतोब पाय काढावा हें ठीक.

[ जातो.

**प्रवेश ७ वा.–जयेंद्रपालाची छावणी.**

**जयेंद्रपाल** आणि **यादवराव.**

**जयेंद्र॰**–यादवराव, मला त्यांची कींव येते हो. त्यांनीं माझे अनंत अपराध केले आहेत खरे; पण मला त्यांची दया येते व हल्लींची त्यांची स्थिति पाहून मनाला वाईट वाटतें.

**यादव॰**–महाराज, अशा प्रकारच्या विचारांना मनांत थारा द्यावयाची ही वेळ नव्हे. एकदा आपल्यापेक्षां त्यांच्यावर माझी भक्ति होती हें आपल्याला माहीत आहेच. पण त्यांच्या अलीकडच्या वर्तनानें माझ्या मनांत फार पालट झाला आहे. त्यांच्या अंगचे ते शौर्यादि गुण दुर्गुणाहूनही अधिक बाधक झाले आहेत. आतां क्षमा करून उपयोग नाहीं. त्यांनीं कोणकोणत्या तऱ्हेनें आपल्याला छळलें आहे याचा विचार करा. ताईसाहेब-

**जयेंद्र॰**–( संतापानें ) नका, नका ती आठवण करूं. माझ्या स्वतःच्या संबंधानें त्यानें जें जें केलें तें मी विसरावयाला तयार आहे. पण ताईचा जो त्यानें गळा कापला त्याबद्दल त्याला शासन केल्याशिवाय कसा राहूं?

**बलदेव** येऊन **जयेंद्रपालाच्या** पायावर डोकें ठेऊन रडूं लागतो.

कोण बलदेव, काय झालें ? रडतां कां ? हं, उठा, नीट सांगा काय तें.

**बल॰**–काय सांगूं सरकार ? मला बोलावयाला त्राण नाहीं. मला वीरमणीमहाराजांनीं मरेमरेतों मारविलें. अययई सारी पाठ दुखती आहे सरकार.

**जयेंद्र॰**–असें काय ? ठीक आहे ह्मणावें. याउप्पर राग गिळून शांति धरणें ह्मणजे त्या न्यायी परमेश्वराचा अपराधी होणें होय.

**बल॰**–त्यानें आपल्याला नाहीं नाहीं त्या शिव्या दिल्या. त्या माझ्यानें उच्चारवत सुद्धां नाहींत. आणि हें पत्र दिलें आहे.

**जयेंद्र॰**–( वाचून ) यांत तो मला बच्चा ह्मणतो आणि “ छाती असेल तर एकटा रणमैदानांत माझ्याशीं लढ ” असें लिहितो यादवराव जाऊंद्या त्याच्याकडे ताबडतोब उत्तर. त्याला ल्याहा : “ मूर्खा, थेरड्या, मला जीव द्यावयाचा असेल तर तसें करावयाला दुसरे अनेक मार्ग खुले आहेत. ”

**यादव॰**–सरकार, त्याच्या लिहिण्यावरून त्याच्या बुद्धीला भ्रंश झाला खचित. त्याचा पक्ष कचरला याचा उत्कृष्ट पुरावा ह्मणजे त्याचें हें अद्वातद्वा लिहिणें. वादांत एखादा आरडूं ओरडूं लागला ह्मणजे समजावेंच स्वारीची बाजू घसरली ह्मणून. तो हल्लीं भांबावला आहे. या स्थितींतच त्याला जेरीला आणलें पाहिजे. वीरमणी, कोठें गेला तुझा थोरपणा ? वकिली करावयाला गेलेल्या मनुष्याशीं असें वर्तन ! सरकार, वीरमणी यावेळीं रागाच्या आधीन आहे. हीच संधि त्याला पाडावयाला उत्तम. कारण अशा स्थितींत मनुष्य असतां त्याला स्वरक्षणाचा खात्रीचा मार्ग बुद्धिभ्रंशामुळें कधींच दिसावयाचा नाहीं.

**जयेंद्र॰**–तुमची सल्ला उत्तम आहे. सर्व

सैन्याला कळवा कीं उद्यां अखेरची लढाई. कायतें शौर्य एकदम व एकदांच दाखवा. साऱ्यांना चमचमीत मेजवानी द्या. विशेषतः वीरमणिकडून फितूर होऊन आलेल्या लोकांची बरदास्त उत्तम ठेवा. उद्यां त्याच लोकांना पुढें ढकला. वीरमणीला तेच जिवंत पकडून आणतील. त्यांच्याबरोबर सारें अर्धेकच्चें सैन्य ठेवा. त्यांना यथेच्छ कुसुंबा पाजा. त्यांची कत्तल होईल, पण त्याला नाइलाज आहे. आपले शेलके पंधरा हजार शिपाई व पांच हजार स्वार मागें ठेवा. माझा हुकूम आल्याशिवाय त्यांनीं लढाईत घुसावयाचें नाहीं अशी सक्त ताकीद द्या. वीरमणीनें आपल्या फितूर शिपायांची कत्तल केल्यानंतर त्याचें सैन्य बरेंच थकलेलें झालें कीं हे वीसहजार वीर त्याच्यावर सोडून द्यावयाचे. प्रसंगीं दिवसा पड खाऊन रात्रीं छापा घालावयाचा. जा; सारा बंदोबस्त नीट करा.

[ **यादवराव** जातो.

( आपल्याशीं ) उद्यां वीरमणीचा अवतार संपणार ! या देशाला विश्रांति मिळण्याचा व या जयेंद्रपालाच्या आशापूरणाचा समय जवळ आला आहे. वीरमणी, वीरमणी, असे कोणते ग्रह तुझ्यावर इतके रागावले होते कीं त्यांनीं तुला माझ्या आड आणलें ?—बलदेवा, चल. तुझ्या पाठीला कांहीं इलाज कर. मी तुझी चाकरी विसणार नाहीं.

[ जातात.

---

## प्रवेश ८ वा.—राजवाडा.

**वीरमणी, सरदार, शृंगारसुंदरी, मोहना, मदीरा.**

**वीर०**—दोस्तहो, उद्यांची अखेरची निकराची लढाई. उद्यां एक तर या वीरमणींत अजून धमक आहे हें शत्रूंच्या अंगावरील जखमांनीं जगजाहीर करून जिवंत राहीन, किंवा मेलोंच तर अगोदर मेलेल्या कीर्तीला स्वतःचें रक्त पाजून अजरामर करीन.

**सरदार**—सरकार, आपण तर पराक्रमी आहांच; पण आमचाही निर्धार आहे कीं उद्यां या समसेरीनें सारखी रक्ताची नदी वाहावयाला लावावयाची.

**वीर०**—शाबास, तुह्मीं तसेच शूर आहां. अग लाडके, पुनः भर त्यांचे पेले. आजची रात्र आमची आहे. मित्रांनो, खरोखर तुमचें इमान पाहून माझें अंतःकरण अगदीं भरून येतें. परमेश्वराची ही माझ्यावर केवढी कृपा ! तुह्मीं माझी निःसीमभक्तीनें जी सेवा केली तिचा उतराई केव्हां आणि कसा होईन तो होवो.

**सरदार**—हें काय सरकार ? अशीच नेहेमीं आमच्याकडून सेवा घ्यावयाला परमेश्वरानें आपल्याला उदंड आयुष्य द्यावें.

**वीर०**—काय सांगूं तुह्मांला ? तुमच्या इमानीपणाची आठवण झाली कीं असें वाटतें, कीं देवानें तुमच्याइतके मला देह द्यावे व तुमचा सर्वांचा एक देह करावा ह्मणजे तुमची मी सेवा करीन.

**सरदार**—छेः छेः सरकार, हें काय हें ?

**शृंगार०**—खरेंच बाई, हें काय असें बोलावयाचें तें !

**वीर०**—अग, ते तसेच इमानी आणि शूर आहेत. गड्यांनो, खरोखरच माझ्या भर आमदानीच्या दिवसांत राजेलोकांनीं देखील जसा मान ठेवला नाहीं तसा तुह्मीं विपत्काळीं ठेवतां आहां; हें तुमचें वागणें देवांच्या घरीं रुजू होईल व तोच तुम्हांस याबद्दल बक्षीस देईल. कारण मी तर हीनभाग्य झालों आहे.

**शृंगार०**—नका बाई असें द्वाड बोलूं. तें पाहिलें का त्यांच्या डोळ्यांतून पाणी भरून आलें. शूराच्या डोळ्यांत लढाईच्या वेळीं पाणी येणें कांहीं चांगलें चिन्ह नाहीं.

**वीर०**—बहुशः हीच तुमची माझी अखेरची भेट. कदाचित् उद्यां माझी ही छिन्न विछिन्न झालेली प्राणरहित कुडी तुमच्या दृष्टीस पडेल. माझ्या मनांतून तुमचा माझा संबंध चिरकाल राहवा असें आहे; पण देवाच्या मनांत नसलें तर तसें कसें व्हावें ? कांहीं झालें तरी देव तुमचें कल्याण करो.

**शृंगार०**—( त्याच्या गळ्याला मिठी मारून त्याच्या तोंडावर हात ठेवून ) हें काय बाई आज भलतेंच आरंभलें आहे. असलीं दुष्ट स्वप्नें आपल्याला कां पडूं लागलीं आहेत ? महाराज, शुद्धीवर या. मनाला आवरा.

**वीर०**—अग काय झालें ? अरे, तुह्मीं रडतां का ? छेः छेः, आवरा ते आपले अश्रू. प्रियकर दोस्तांनो, लढाईत कांहीं झालें तरी तुह्मीं आपलें अवसान सोडूं नये येवढ्यासाठीं मी तसें बोललों. तुह्मीं असे घाबरलां कां ? उद्यांबद्दल मला खूप उमेद आहे. हा वीरमणी तुमचा सेनापती होऊन उद्यां जयश्रीला तुमच्या गळ्यांत माळ घालावयाला लावणार. वीरांनो, उद्यां कीर्ति तर मिळवूंच; पण हे मौल्यवान प्राणही शाबूत राखूं. चला आतां आपापल्या ठिकाणीं. थोडी विश्रांति घ्या. उद्यां पहाटेसच बाहेर पडावयाचें आहे.

[ सर्व जातात.

---

## प्रवेश ९ वा.—राजवाडा.

एक **सरदार** प्रवेश करतो. **रामसिंह** उभा आहे.

**सरदार**—रामसिंह, शुः ! इकडे ये. सरकारांना जागें कर. सैन्य सर्व तयार आहे. शुक्राची चांदणी उगवली ह्मणावें. [जातो

**वीरमणी, शृंगारसुंदरी** निजली आहेत.

**रामसिंह**—( दारावर टिचक्या देतो. )

**वीर०**—( एकदम उठून ) कोण, रामसिंह, वेळ झाली वाटतें. माझें चिलखत आण.

**शृंगार०**—( जागी होऊन त्याच्या गळ्याला मिठी मारून ) अजून किती तरी मेली रात्र आहे. जरा पडावयाचें होतें.

**वीर०**—नाहींग बाळे, आतां वेळ नाहीं. शिपाई सारे माझी वाट पाहत असतील.

**रामसिंह** चिलखत घेऊन येतो.

आण तें इकडे आणि घाल तें माझ्या अंगांत.

**शृंगार०** मीही पण घालावयाला लागतें.

**वीर०**—अग, तूं कशाला तसदी घेतेस ?

बरें बरें. कांहीं नको रागावयाला. तूंही घालीनास. अग, आज खचित मी यश मिळविणार. या हातांनीं चिलखत अंगावर चढविल्यावर नशीब माझ्यावर कितीही रुसलें असलें तरी त्याची काय बिशाद आहे या देहाला अपाय करण्याची. अग, हा तुकडा चुकला. राहीना, पण तोच का घालीना ? अग, तूंच प्रत्यक्ष माझ्या हृदयाचें चिलखत आहेस. रामसिंहा, जा तूं आपला पोषाख कर.

**राम०**—हा आलोंच सरकार.

**शृंगार०**—आतां कसें चिलखत नीट बसलें बरें ?

**वीर०**—अग, तें बसावयाचेंच. आपला कोमल हात त्याला लागल्यावर तें नाहींका आपोआप नीट बसणार ? तें गर्वानें कसें ताठलें आहे पहा. तुझ्या हातची जादू यांत भरली आहे. पाहूं तर खरें यावर वार करण्याची कोणाची छाती होते ती. अग, आज तूं मनोऱ्यांतून हा वीरमणि कसा लढतो तें पहा ह्मणजे तुला ह्या वयस्क शरीरांत अजून काय राजसत्व आहे तें कळेल. ( तुताऱ्यांचा व डंक्याचा आवाज होतो. **रामसिंह** येतो. ). चला, आतां निघालेंच पाहिजे. रामसिंह, पण अधीरसिंग कोठें आहे ?

**राम०**—सरकार, तो काल रात्रींच्या मेजवानीच्या गर्दींत नाहींसा झाला. तो शत्रूच्या छावणीकडे गेलेला लोकांनीं पाहिला. त्याचें सामानसुमान येथेंच आहे.

**वीर०**—बरें, असो; अगोदर त्याचें सारें सामानसुमान त्याच्याकडे बंदोबस्तानें पाठवून द्या. शिवाय वीरमणीची भेट ह्मणून एक उत्तम पोषाख, तलवार, ढाल, तमंचा वगैरे हत्यारांसुद्धां त्याच्याकडे पाठवा. त्याला एक पत्र धाडा. त्यांत ल्याहा “ धनी बदलण्याचें हल्लींच्यापेक्षां खडतर कारण तुला न पडो. तुझें कल्याण होवो. ” रामसिंह, तूं स्वतः हें कर. विसरूं नको. हा दैवा! काय माझी स्थिति करून टाकलीस ही, कीं माझे प्रामाणिक चाकर देखील मला सोडून जाऊं लागले. असो; येऊं द्यात काय प्रसंग येताहेत ते. प्रिये, चल. एकदां आलिंगन दे. अग लाजावयाची ही वेळ नव्हे. आह्मीं आतां शिपाई गडी बनलों. शृंगारचेष्टा करावयाला फुरसुत आहे कोणाला ! जाऊं आतां ?

[ जातात.

## प्रवेश १० वा.—जयेंद्रपालाची छावणी.

अधीरसिंग एकटा उभा आहे.

**अधीर०**—मीं या अधमपणानें काय मिळविलें? वीरमणीमहाराजांच्या तर्फेचे जे जे लोक फितूर होऊन आले त्यांची जयेंद्रपालानें काय वाट लाविली ? कोणाला फाशीं चढविलें, कोणाला अपमानास्पद भिकार कामें सांगितलीं आहेत, कोणाच्या तोंडाला नुसतें मधाचें बोट लावून त्यांना संशयकूपांत तसेच गटंगळ्या खात ठेवले आहेत. एकावरही

त्यानें विश्वास टाकला नाहीं. या स्वामिद्रोहानें कोणताच लाभ न होतां पदरांत पापाचें माप मात्र भरपूर पडतें. माझ्या कृत्याचा काळेपणा मला आतां पक्का दिसूं लागला. माझें मन मला सारखें टोचतें आहे. पण उपयोग काय? ना धड हिंदु ना धड मुसलमान अशी माझी स्थिति झाली आहे.

एक **कारकून** येतो.

**कार०**–अधीरसिंग आपलेंच नांव काय? तर मग वीरमणींकडून आपला सर्व अजबाब व शिवाय वीरमणींची एक आपल्याला अखेरची देणगी–एक थाटाचा पोषाख हत्यारांसह घेऊन एक इसम आला आहे. बक्षीसाहेबांच्या हुकुमानें आपल्या राहुटीपाशीं तो आतांच सामान उतरतो आहे. शिवाय हें एक आपल्या नांवचें पत्र आहे. ( पत्र देऊन ) खरेंच सांगतों, तुमचे महाराज अजूनही कर्णासारखे उदार आहेत, याचें मला फार आश्चर्य वाटतें.

**अधीर०**–( पत्र वाचून ) माझ्याइतका दुष्ट हरामखोर, नीच शिरोमणी कोणी असेल काय? अहाहा! वीरमणी महाराज, काय हा आपला थोरपणा! आपल्या त्या समुद्रासारख्या उदार अंतःकरणाचा आश्रय सोडून या जयेंद्रपालाच्या क्षुद्र व गलिच्छ अंतःकरणाच्या डबकण्यांत राहण्याकरितां मी आलों! केवढा हा मूर्खपणा! नीचपणाचें फळ हें असेंच मिळावयाचें. पश्चात्तापानें माझे प्राण पोळावयाला सुरुवात केलीच आहे. त्याच्यानें बहुशः भागेल. नाहीं तर या प्राणांना झटपट हांकून द्यावयाला दुसरें साधन पाहूं. बस्स, असेंच. आतां रणांगणाचें तोंड पहावयाचें नाहीं. आह्मांसारख्या पाप्यांना धारातीर्थीं मरण येऊन उपयोगीं नाहीं. असल्या किड्यांची शेवटची सुखशय्या एखाद्या अत्यंत घाणेरड्या नाल्यांत झाली तरच या जगांत देवाचा न्याय दिसून येतो. [ जातो.

---

## प्रवेश ११ वा.–रणमैदान.

**यादवराव, बलदेव** व **शिपाई** येतात.

**बलदेव**–चला हटा. आपण फार पुढें आलों. आपल्याला आपला गोट नजीक केला पाहिजे. आजचा प्रसंग वाटला होता त्यापेक्षां अधिक धास्तीचा व शिकस्तीचा आहे.

इतक्यांत एक **स्वार** घाईघांईनें येतो.

**स्वार**–चला, निघा. जयेंद्रपालमहाराजांची अशी आज्ञा आहे कीं, सर्व सुयंत्र चाललें आहे. आपल्या सैन्याला परत हटावयाचा हुकूम द्या. प्रत्येकानें वाट फुटेल त्या दिशेला जावें, पण सर्वांनीं नेमल्या वेळीं त्या जांभळीच्या वनांत हजर झालें पाहिजे अशी सरदारांना गुप्त पण सक्त ताकीद द्या.

**यादव०**–ठीक आहे. सरकारच्या हुकुमाप्रमाणें करतों.

[ सर्व जातात.

**वीरमणी**, एक **सरदार** व **रामसिंह** येतात.

**वीर०**–शाबास वीरांनो, शाबास! आज खूप पराक्रम गाजविलांत! पहिल्यानेंच

मीं जर माझ्या मित्रांचा सल्ला ऐकला असता तर या पोरट्याला केव्हांच माझ्यापुढें नाक घांसावयाला लाविलें असतें. कायरे, तूं हा असा गळल्यासारखा कां दिसतोस? अबबब, केवढी मोठी ही जखम तुला झाली आहे. थांब, ती मी या पदरानें बांधतों.

**सर॰**—कशाला इतकी तसदी घेतां महाराज? या एका जखमेचें काय! अशा शेंकडों जखमा जरी आपल्या छायेखालीं लढतांना झाल्या तरी त्यांचें मला कांहीं वाटावयाचें नाहीं. ही जखम एवढी मोठी दिसते याचें कारण आपण नाहीं समजलां महाराज. अगोदर एका तलवारीच्या झटक्यानें हा येथें अर्धचंद्र झाला होता त्याचाच हा आतां पूर्णचंद्र झाला आहे; झालें.

**वीर॰**—रामसिंह, दौलतसिंगबक्षीकडे जा. त्यांना ह्मणावें निम्मे लोक पळत्यांचा पाठलाग करावयाला धाडा. कत्तल बंद करा. सांपडतील तितके जिवंत पकडा. बाकीचें सैन्य गांवांतून मिरवीत घेऊन या व मला वाड्यांत येऊन भेटा ह्मणावें.

[ **रामसिंह** जातो.

चलरे माझ्याबरोबर. आज तुझ्या जखमा खुद्द त्या मनमोहिनीकडून धुववितो.

**सर॰**—चलावें सरकार. हा मी लंगडत लंगडत आपल्या मागें येतोच.

**वीर॰**—तसें कां, चल तुला माझ्या घोड्यावर घेतों.

[ जातात.

---

**प्रवेश १२ वा.—राजवाड्यांतील सज्जा.**

**शृंगारसुंदरी** व **मोहना** बसल्या आहेत.

**शृंगार॰**—मोहने, अग तो गुलाब त्या राजाकडे गेला तो अजून परत आला नाहीं. तो राजाही मेला कुमक घेऊन कोठें आला नाहीं. तो गुलाब येऊं दे तर खरा. त्याची अशी खोड मोडते. मेल्याची धिंडकाच काढते साऱ्या गांवांतून.

**मोहना**—होय बाईसाहेब, पण तो आपल्या हातीं सांपडेल तेव्हांना. तो जयेंद्रपालाला जाऊन मिळाला आणि त्यानें त्या राजालाही त्याच्याचकडे फितवून नेला.

**शृंगार॰**—मेला झडून झडून किडे पडून मरो. बरें पण त्या मदीरेचा कांहीं पत्ता लागला का?

**मोहना**—कांहीं नाहीं बाईसाहेब. तो अधीरसिंग निघून गेला त्या दिवसापासून ती अगदीं वेड्यासारखी झाली होती. तिच्या डोळ्यांत कांहीं विलक्षण निश्चय झाल्याचें तेज दिसत होतें.

**शृंगार॰**—खचित तिनें जीव दिला असावा. ती मोठी निग्रहाची पोरगी होती. ती नसल्यानें मला अगदीं चैन पडेनासें झालें आहे.

**मोहना**—होय बाईसाहेब, ती तशीच होती. माझ्या डोळ्यांतलें पाणी ती गेल्यापासून खळलें नाहीं. पण बाईसाहेब, नौबत, शिंगें, कर्णे ऐकूं येऊं लागले आहेत. आणि तें पाहिलें का उगवतीकडे काय दिसतें आहे तें.

**शृंगार०**—अग तो धुरळ्याचा लोट आहे. मला वाटतें सैन्य परत आलें. खचित महाराज यशस्वी होऊन आले. माझें मन मला असेंच सांगतें आहे.

**मोहना**—होय बाईसाहब. आणि ते सगळे दौड करीत येत आहेत. ते पहा आले वेशीपाशीं.

**शृंगार०**—होयग होय. तो पहा माझा प्राण. जयश्रीनें वरल्यामुळें किती शोभताहेत पण. खरोखर प्रत्यक्ष भीमाचा अवतारच कीं काय असें वाटतें, आणि तें पाहिलेंस का? त्यांनीं आपल्यापुढें रक्तानें भरलेल्या एका सरदाराला घेतलें आहे. कायग बाई तरी शिपायांवर हें प्रेम! पण चल गडे खालीं, आरती तयार कर. महाराजांवरून ओवाळूं या. चल लवकर. आतां येतील दिंडीदरवाजापाशीं.

**मोहना**—पण बाईसाहेब, आपण कशाला जावयाला पाहिजे? खालीं सगळी तयारी आहे. आपण गेलां तर तें नीट दिसावयाचें नाहीं.

**शृंगार०**—आग लाव त्या नीट दिसण्याला आणि न दिसण्याला! माझ्या प्राणाला मी केव्हां जाऊन कडकडून भेटेन असें मला झालें आहे. चल चल, धांव [ जातात

---

प्रवेश १३ वा.—राजवाड्याचा दिंडीदरवाजा.

**वीरमणी, सरदार, शृंगारसुंदरी, मोहना, चाकर वगैरे.**

**वीर०**—अग ये ये, लाडके. या माझ्या कवचांतून आंत उडी मार. ही पहा माझी छाती कशी धडधड करते आहे ती. तिला असें झालें आहे कीं, तूं केव्हां तिच्यावर स्वार होशील. अग, या ल्हातान्यानें त्या तरण्या पोराला आज चांगला हात दाखविला. पहातोस आतां पुनः माझी कशी निर्भर्त्सना करतो ती. या वीरमणीच्या डोक्यांत काळ्यांत पांढरें मिसळलें आहे तरी याच्या अंगची हिंमत आणि तरतरी तरण्या बांडाला हार जाणार नाहींत. पण अगोदर या शिपायाची जखम धुवून बांध. तुझ्या हाताचा स्पर्श होतांच ती बरी होईल. अग, आज यानें असा कांहीं पराक्रम केला आहे कीं मी जरी आपल्याला योद्धा समजतों तरी मला देखील त्यानें तोंडांत बोट घालावयाला लाविलें. हा असा लढला कीं, कोणाला वाटावें जगावर कोपून प्रलयकालच्या रुद्रानेंच याच्या अंगांत प्रवेश केला आहे कीं काय!

**शृंगार०**—मी आपल्याला एक रत्नजडित चिलखत आणि ढाल तलवार नजर देईन बरें.

**सर०**—राणीसाहेब, मला रत्नजडित चिलखताची काय जरूर? आपला आशीर्वाद मिळाला कीं बस्स.

**वीर०**—अग एकानें काय होणार? एक सहस्र दिलींस तरी त्याच्या कामगिरीची भरपाई होणार नाहीं. आज गांवांत जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन सरदारलोकांना व शिपायांना

वाजत गाजत गांवांतून मिरवा. हत्यारें पालखी मेण्यांत घालून थाटानें त्यांच्यापुढें चालवा. आज सारें सैन्य वाड्यांत आणतां आलें असतें, तर सारें मिळून मेजवानीला बसलों असतों. तरी काय झालें ? त्या सर्वांना त्या कवाईत पटांगणांत मेजवानी द्या. आजच्या श्रमाचा व उद्यांच्या धोक्याचा वचपा आजच्या रंगांत काढून घ्या ह्मणावें. तुताऱ्या, शिंगें, भेरी, नौबती यांच्या आवाजानें आकाशांतल्या ताऱ्यांच्या कानठाळ्या बसवून त्यांना गोंधळांत व भीतींत पाडा. गांवांत दौंडी फिरवा कीं, आजची रात्र साऱ्यांनीं आनंदांत व मौजेंत घालविली पाहिजे. आज तिकटी तिकटीवर दारूचे हंडे भरून ठेवून जो सांपडेल त्याला ओकारी येई तों पाजा. चल, माझ्या जिवाचे धनिणी.

[ जातात.

---

# अंक पांचवा.

## प्रवेश १ ला.—राजवाडा.

**वीरमणी** आणि **शृंगारसुंदरी** बसलीं आहेत.

**वीर**०—लाडके शृंगारसुंदरी, आज असें का होऊं लागलें आहे कोण जाणें ! मन कसें अगदीं उदास होऊन गेलें आहे. मंडळींत होतों तेव्हां घटकाभर बरें वाटलें. पण पुनः जिवाला हुरहुर लागली आहे. वाटतें कीं कांहीं हरवलें असून मला त्याची शुद्ध नाहीं.

**शृंगार**०—कांहीं तरी कल्पना काढावयाच्या झालें. सारा दिवस कोण ते श्रम ! त्यामुळें थकवा आला आहे. आणखी काय. झोंप लागली ह्मणजे बरें वाटेल. माझ्याच्यानें बाई आतां जागवत नाहीं.

**वीर**०—अग तुला झोंप येत असली तर तूं नीज जा. उगीच का तिष्ठत बसली आहेस वेड्यासारखी ?

**शृंगार**०—मला एकटें पडलें कीं भीतीनें झोंपच येत नाहीं. आपण येत नसला तर मी येथेंच निजते कशी. पण आंत जातांना मला घेऊन जाणें होईलना ?

**वीर**०—वाः, याची देखील शंका का ?

[ **शृंगारसुंदरी** निजते.

खरेंच, ही हुरहुर कशानें लागली असावी बरें. ( विचार करून ) आज मेजवानीच्या वेळीं दौलतसिंग कोठें दिसला नाहीं. तो शत्रूचा पाठलाग करीत गेला होता. अजून परत आला नसेल ? माझ्या मनाला धास्ती वाटूं लागली आहे. काय झालें आहे कोण जाणे ?

**रामसिंह** येतो.

कायरे, कां आलास ?

**राम**०—सरकार, दौलतसिंगजीकडून एक माणूस आला आहे. तो सांगतो कीं, दौलतसिंग अगदीं बेमार आहेत. त्यांना एक जबर वार लागून ते घायाळ होऊन पडले आहेत. पाठलाग पुरा करून परत येत असतां शत्रूपक्षापैकीं एकानें अंधारांत व गर्दींत जवळ सरून जोरानें भाल्याचा वार केला. त्याससरसे दौलतसिंग घोड्यावरून खालीं आले. त्यांना तसेंच उचलून वाड्यांत

आणून मालतीमहालांत ठेवलें आहे. भाल्याचें टोंक तसेंच आंत अडकून राहिलें आहे. रक्तस्राव कांहीं केल्या थांबत नाहीं. शक्ति क्षीण होत चालली आहे. आपलें नांव सारखें तोंडांत आहे.

वीर०-( सचिंत ) हा आणखी एक अवचित घाला! दैवाच्या मनांत काय आहे कोण जाणें. बरें, रामसिंह, तूं येथेंच ऐस. ही निजली आहे. मी जातो दौलतसिंगाकडे. [ जातो.

---

**प्रवेश २ रा.**-मालतीमहाल.

**दौलतसिंग** बिछान्यावर पडला आहे. चाकरमाणसें शुश्रूषा करीत आहेत. **वीरमणी** जवळ बसला आहे.

दौलत०-( कण्हत ) सरकार, या दौलतसिंगाची चाकरी संपली. विजयगिरीहून आपल्याकडे आलों कोणत्या हुरुपेनें आणि अखेर ही अशी! असो. दैवाशीं झगडण्यांत काय फायदा?

वीर०-अरे दौलत, कां इतका निराश होतोस? आपल्या पक्षाची सरशी आहे. आज कसा त्यांचा फडशा उडवला!

दौलत०-सरकार, त्यावर जाऊं नका. आजच्या लढाईत मला तर कपट दिसलें. जिकडे पहावें तिकडे आपल्याकडचेच फितूर होऊन गेलेले लोक. खुद्द जयेंद्रपालाचें सैन्य कोठें दिसलें नाहीं. तें त्याच्याबरोबर आलें आहे खचित.

वीर० अरे तुला ठाऊक नाहीं, तें त्यानें उद्यां आह्मीं जी कत्तल करणार आहों तिच्यासाठीं राखून ठेवलें आहे.

दौलत०-हा भरंवसा ठीक नाहीं, यांत घात आहे. सरकार मी एक अखेरची गोष्ट सांगतो तेवढी तरी ऐकावी. महाराज, मला सारें भविष्य दिसतें आहे. या युद्धांत आपल्याला हार येणार. त्या जयेंद्रपालाच्या हातीं हा देह आतां सांपडला तर -नको, नको, नको. देवा, जर तुझ्या घरीं यत्किंचित् न्याय असेल तर असें घडूं देऊं नकोस.

वीर०-दौलत, तूं गप्प बैस आतां शक्ती क्षीण झाल्यामुळें तुझें डोकें फिरूं लागलें आहे.

दौलत०-नाहीं. माझें डोकें फिरलें नाहीं आणि कांहीं नाहीं. मी आतां मृत्यूच्या दाराशीं जाऊन पोंचलों आहे. अशा वेळीं मनुष्याला या लोकींच्या गोष्टींचें खरें स्वरूप दिसूं लागतें व पुढें होणाऱ्या गोष्टींही त्याला कळतात. सरकार, माझ्या शब्दावर भरंवसा ठेवा-उद्या आपला पराभव होणार.

वीर०-बरें, मग तुझें ह्मणणें काय?

दौलत० -( सावकाश ) पराभूत होऊन अपमानांत येथें राहण्यापेक्षां-तसें देखील तो आपल्याला राहूं देईल कीं नाहीं याची शंकाच आहे-आपण तावडतोब हा देश सोडावा. जळो हा देश, आपल्याला हा पुरा भोंवला. सातपुड्याच्या पाहडांत भिल्लांचें मोठें ठाणें आहे. तेथील नाईक माझा दोस्त आहे. त्याला ही खुणेची अंगठी द्या कीं तो आपल्या पायांवर डोकें ठेऊन आपलें स्वामित्व कबूल करील. त्याच्याच साहय्यानें पुनः जयेंद्रपालावर-

वीर०—दौलतसिंग, बस्स हें. वीरमणी आणि शृंगारसुंदरी यांची ताटातूट आतां होणें नाहीं. मी तिला कधींही सोडून जाणार नाहीं. एकदां फासा टाकला तो टाकला. याचा अगोदर विचार व्हावयाला पाहिजे होता. आतां पराभवाच्या संबंधानें कांहीं सांगवत नाहीं, पण हा वीरमणी अपमान मात्र कधींही करून घेणार नाहीं, समजलास.

दौलत०—असो, सरकारची मर्जी. हा घ्यावा माझा शेवटचा रामराम. आतां जिवंत राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ( भाल्याचें टोंक बाहेर उपटून काढतो. ) राम-राम.

[ प्राण सोडतो.

वीर०—माझा उजवा हात तुटला. आतां माझें तरी या जगांत काय राहिलें आहे ? नाहीं पण एक जीव आहे अजून त्याच्यासाठीं हें सारें सोसलें पाहिजे.

---

### प्रवेश ३ रा.—जयेंद्रपालाची छावणी.

दोन शिपाई येतात. अधीरसिंग एका बाजूस उभा आहे

प० शि०—कायरे राम्या, ही कसली गर्दी चालली आहे ? आतां कोठें नुकतें साऱ्या दिवसाच्या श्रमानें थकलेलें अंग पथारीवर टाकतों तों पुनः हें शिंग कसलें वाजलें ? आणि जिकडे तिकडे गडबड उडाली आहे हें काय?

दु० शि०—अरे, तुला ठाऊक नाहीं का ? आज रात्रीं छापा आहे. दिवसा लढलेल्या सैन्यानें बंदरावर जाऊन शत्रूचें आरमार ताब्यांत घ्यावयाचें. जमिनीकडून आपल्यावर हल्ला होईल हें त्यांच्या ध्यानीमनींही नाहीं. तेव्हां तें काम चटृदिशीं होईल. आरमारावरच्या हल्ल्याला तोंड देण्याकरितां शत्रूचें सैन्य तिकडे धावलें कीं, इकडे आज दिवसभर स्वस्थ दडून बसलेल्या समशेरबहाद्दर नांवाच्या फौजेनें शहरावर हल्ला करावयाचा, कीं फत्ते.

प० शि०—असें काय ? तर मग आज वीरमणींचा फडशा पडलाच ह्मणावयाचा. काय बिचाऱ्याची दशा. वीर खरा. आज काय लढला तो. नाहीं तर आमचे—

दु० शि०—अरे चूप, कोणी ऐकेल. आपल्याला काय करावयाचें आहे त्याच्याशीं. चला आपण आपली तयारी करूं.

[ जातात.

अधीर०—किती कपटी कावा आहे हा. त्या उदारात्म्याला सोडून याच्याकडे धांव घेतली ती याचकरितां का ? हा कावा जर साधला तर माझ्या महाराजांचें—पण आतां त्यांना मी कोणत्या तोंडानें माझे ह्मणूं ? चला, जाऊं. कोणत्या तरी उपायानें ही बातमी वीरमणी महाराजांकडे ताबडतोब पोंचविली पाहिजे.

[ जातो.

---

### प्रवेश ४ था.—राजवाडा, महाल.

रामसिंह येतो

रामसिंह—बाहेर काय गडबड चालली आहे कोण जाणे ! बंदराकडच्या बाजूनें एकसारखा मोठा कलकला एक घटका झाली सारखा ऐकूं येतो आहे ! काय

प्रकार आहे कांहीं कळत नाहीं. महाराजांना कळवावें तर राणीसाहेबांनीं सक्त ताकीद दिली आहे कीं, शुक्रोदय झाल्याखेरीज त्यांना जागें करावयाचें नाहीं. खरेंच दिवसाचे महाराजांचे श्रम विलक्षणच. त्यांना विश्रांति तर पाहिजेच. या त्यांच्या विश्रांतीनें कांहीं घात न होवो ह्मणजे झालें.

एक शिपाई धावऱ्या धावऱ्या धांवत येतो.

**शिपाई**—महाराज, महाराज कोठें आहेत ?

**राम०**—कां बोवा ? ते निजले आहेत.

**शि०**—आतां कशाची झोंप घेतां ह्मणावें. उठा, उठा. शत्रूंनीं आरमार घेतलें.

**राम०**—काय ? आरमार घेतलें ? महाराज, महाराज, राणीसाहेब, मोहने, उठा, घात झाला.

**वीर०**-( गडबडीनें उठून बाहेर येऊन ) काय दंगा आहे ?

**शि०**—महाराज, दंगा काय विचारतां ! शत्रूंनीं चोरासारखें जाऊन आरमार आपल्या ताब्यांत घेतलें.

**वीर०**—काय ह्मणतोस ? आरमार घेतलें ? कसें ? केव्हां ? बक्षी कोठें आहेत ? नाखुदे काय करीत होते ? सगळी हरामखोरी आहे.

**शृंगारसुंदरी** जागी होऊन बाहेर येते.

अग चांडाळणी, ऐकलेंस ? तुझ्या त्या आरमारानें शेवटीं दगा दिला. भांचोद सगळे निमकहराम पाजी आहेत. खचित यांत फितुरी असावी. अग कुलटे, मला वाटतें तूं देखील माझ्याशीं दगलबाजी केलीस ?

**शृंगार०**—महाराज, राग जरा शांत करा.

**वीर०**—अग, आतां कसचा हा राग शांत होतो. बापाशीं व्यभिचार करून पोराशीं करण्याकरितां त्याला फितूर झालीस आणि मला खासें तोंडघशीं दिलेंस ! अग, तें पहा तुझें आरमार शत्रूच्या गळ्याला कशा मिठ्या मारतें आहे तें. काय करूं ग ? हा माझा आत्मा तुझ्या नरडीचा घोंट घेतल्याशिवाय तृप्त व्हावयाचा नाहीं. पण नको. तूं अशीच रहा, ह्मणजे जयेंद्रपाल तुला धरून नेऊन आपल्या नगरांत तुझी धिंड काढील. चल निघ चेटके माझ्या समोरून. वेसवा बेवफा घातकी रांड नाहीं तर—( तिला ढकलून देतो. ) रामसिंहा, चल माझें चिलखत चढीव. ( शिपायाला ) अरे, तूं जा सेनापतीला ह्मणावें सैन्य घेऊन बंदराकडे चला. मी आलोंच आतांच्या आतां. वेशी दरवाजे बंद करा ह्मणावें. तटावरून सारखी टेहळणी ठेवा.

[ शिपाई जातो.

अग सटवे, डाकिनी, कशी साऱ्या स्त्रीजातीच्या नांवाला काळोखी आणलीस. राक्षसी, तुझ्याकरितां कीं ग मी आपल्या त्या पतिव्रता अहल्येचा त्याग केला. छेः, नाहीं तुला जीवंत ठेऊन उपयोगी, कारण कीं, तूं आणखी कितीजणांचे गळे कापशील याचा नेम नाहीं. रात्रीं तुझा तो बाहुपाश माझ्या गळ्याभोंवतीं घातला होतास त्याच वेळीं कां नाहीं गळा दाबून माझा प्राण

घेतलास? या माझ्या सर्वांगाची कशी लाही होऊन गेली आहे. चल निघ माझ्या समोरून; अथवा नको, रहा तूं येथेंच या शय्येवर त्या जयेंद्रपाळाला घेऊन लोळण्याची वाट पहात.

[ पाय झाडटीत निघून जातो. रामसिंह मागून जातो.

**शृंगार०**—महाराज, माझा कांहीं अपराध नाहीं. उगीच कां या दासीवर आग पाखडतां?

**मोहना**—बाईसाहेब, महाराज रागानें तसेच निघून गेले.

**शृंगार०**—काय? माझ्याशीं एक देखील गोड शब्द न बोलतां निघून गेले? मोहने, मला आतां विष तरी आणून दे. पण नको बाई. महाराजांना सोडून मी एकटी वरतीं जाऊं तरी कशी?

**मोहना**—बाईसाहेब, चला आतां आपण त्या सिंधुरादेवीच्या देवळांत जाऊन बसूं. तेथें तट मजबूत आहेत. दरवाजे लावून घेऊं. महाराज खचित विजयी होऊन परत येतील.

**शृंगार०**—नाहींग बाई, आज कांहीं धडगत दिसत नाहीं. अग त्यांना परत आणावयाला कांहीं युक्ति केली पाहिजे. ते वाड्यांत आले कीं नाहीं ह्मणजे त्यांच्याकडे तूं जा. त्यांना सांग कीं, शृंगारसुंदरीनें आपला राग झालेला पाहून आपल्या नांवाचा घोष करीत प्राण सोडला. असें सांगशील कीं त्यांच्या अंतःकरणाला तेव्हांच पाझर फुटेल. चल आतां त्या देवळांत जाऊं.

[ जातात.

---

## प्रवेश ५ वा.—जयेंद्रपालाची छावणी.

अधीरसिंग येतो.

**अधीर०**—देवाच्या मनांतून या हरामखोराच्या हातून इतकीशी देखील महाराजांची नौकरी घडावी असें नाहींना? पापाचा घडा पूर्ण भरला पाहिजेना? असो; आहे तेंच बरें आहे. काय जिकडे तिकडे सामसूम झालें आहे. दोन तासांपूर्वींच येथें कोण गोंगाट माजून राहिला होता. आतां अशा या शांत वेळीं अशा निवांत जागीं ज्या मृत पुरुषांच्या आत्म्यांना विश्रांति मिळालेली नसते त्यांचे आत्मे भूमीवर संचार करीत असतात तर हे आत्म्यांनो, मी तुमच्यांत थोडक्याच काळांत येऊन मिळणार आहे तुह्मींच माझ्या या कृत्याची साक्ष द्या. मीं अघोर अत्यंत अधमपणाचें पातक केलें आहे हे चंद्रा, तूं खिन्नतेचा पोशिंदा. मला पश्चात्तापाच्या तीव्र डागण्या देण्याच्या कामीं साहाय्य कर, आणि शेवटीं चित्रगुप्तमहाराज जेव्हां माझ्या पापाची याद काढतील तेव्हां मरणाच्या पूर्वीं मला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला होता याची साक्ष भर. हे रात्री, कोठें आहे ती तुझी विषकारक हवा? टाक मला त्यांत गुरफटून आणि मला नकोसा झालेल्या या जिवाच्या त्रासांतून सोडीव. पश्चात्तापानें माझें हृदय करपून गेलें आहे. त्यावर माझ्या अपरा-

धाचें दगडासारखें ओझें पडलें आहे. तरी पण त्याचा चूर होत नाहीं कसा ? अहो वीरमणी, आपण जितके उदार आणि थोर, तितकाच माझा अपराध अधम आणि काळा आहे. तरी पण आपण मला क्षमा करा आणि मग माझें नांव स्वामिद्रोही आणि फितुरी यांच्या नीच पटांत घालून सर्व सज्जन माझी छीः थूः करीत राहोत. वीरमणी, माझें मन मला सांगत आहे कीं आपण लवकरच परलोकीं जाल. कारण पुढें आतां काय प्रसंग येईल तो मला दिसतो आहे. आपल्याबरोबर मला वरतीं न्यावयाला विसरूं नका. हा ! वीरमणी, वीरमणी !

[ खंजीर खुपसून घेऊन मरून पडतो.

---

## प्रवेश ६ वा.—राजवाड्यांतील दिवाणखाना.

**वीरमणी** पडला आहे **रामसिंह** त्याला वारा घालतो आहे.

**रामसिंह**—आतां काय करावें ? आमचे हे महाराज शुद्धीवर येतात केव्हां ? त्या रणांतच आज हे जीव द्यावयाला तयार झाले होते; पण असला मोहोरा व्यर्थ जावा हें आपल्याच्यानें पाहवेना. ह्मणून चौघां शिपायांकडून चोरवाटेनें यांना येथें आणलें; पण पुढें काय करावयाचें ? राणीसाहेबही येथें नाहींत. आमचे सारे सरदार शहराबाहेर. शत्रूचा गराडा शहराभोंवतीं. प्रसंग मोठा बिकट आहे. महाराज, महाराज, सावध व्हा.

[ त्याच्या डोक्याला पाणी लावून वारा घालतो.

**वीर०**—( डोळे उघडून ) मी कोठें आहे ?

**राम०**—महाराज, आपण वाड्यांत आहां.

**वीर०**—येथें कसा आलों ? लढाईचें काय झालें ?

**राम०**—( खालीं मान घालून स्तब्ध राहतो. )

**वीर०**—रामसिंहा, बोल, बोल पण नको मी समजलों सारें. या वीरमणीच्या तोंडाला शेवटीं काळोखी आली. या पोरट्यानें या हजारों रणें जिंकलेल्या वीरमणीला —आतां मी वीरमणी तरी कसचा ? षंढमणीच मी—आपल्या शौर्यानें नव्हे—. शौर्यानें जिंकण्याची त्याची काय छाती होती ?—पण आतां हा ताठा कशाला ? —त्यानें कसेंही कां होईना ? मला हतवीर्य केलें खरें हे सूर्यनारायणा, हेंच तुझें शेवटचें दर्शन. पण तुला तरी आतां हें तोंड कसें दाखवूं तूं आपले द्वादश नेत्र उघडून या तुझ्या कुळाला कलंक लावणाऱ्या थेरड्याला जाळून भस्म कां करीत नाहींस ? करशील तर तें यावेळीं मला प्रिय आहे. रामसिंहा, आण, आण ती माझी तलवार इकडे.

**राम०**—( डोळ्यांत पाणी आणून ) सरकार, काय हें ? आपण असा धीर सोडल्यावर आमचें काय व्हावें ?

**वीर०**—अरे, आतां नको मला सरकार ह्मणूं ! तो शब्द मला आतां थट्टेचा

त्यांना द्रव्यद्वारा साहाय्य करावें व या मार्गानें आमच्या बलाचा अंदाज काढण्याची खटपट करावी, ही खरोखर त्यांच्या मेंढेपणास लाज आणणारी गोष्ट आहे ! "

" पण सरकार, त्यांच्या या कृतीनें आज आपला केवढा फायदा झाला आहे ! " **दशरथराय** समोरच पडलेल्या मोहोरांच्या थैल्यांकडे पाहून ह्मणतात.

" होय, तुह्मी ह्मणतां तेंही खरेंच. " राणी ह्मणते. " पण या गोष्टी असोत तूर्त. सरदार **कुमुदबंधु**, तें पत्र वाचा अगोदर. त्यांत काय लिहिलें आहे पाहूं या."

" महाराज, पत्रावर मिति ज्येष्ठ शुद्ध पंचमी आहे. " **कुमुदबंधू**नें पत्र उघडून ह्मटलें.

" आणि आज कोण,—आज वद्य द्वितीया, नाहीं का?" राणी ह्मणते. " बरें, पत्रांत पुढें काय मजकूर आहे तो वाचा. "

"अवधान असावें महाराज." **कुमुदबंधु** राणीस उद्देशून ह्मणतो व पत्र वाचूं लागतो.

" सेवेशीं प्रधान **शीतशील** याचे कृतानेक प्रणाम. याउपरि इकडील वर्तमान. **पंचगांग** देशच्या राज्यकर्त्रीनें **वैदिक**धर्मास उत्तेजन देऊन **बौद्ध**धर्माचा ऱ्हास करण्याविषयीं अनेक प्रयत्न चालविले आहत आणि तिनें आपल्या वराची पसंती करितांना मोठमोठ्या बलाढ्य **बौद्ध**धर्मी राजांच्या व सरदारांच्या मागण्या झुगारून देऊन एका सामान्य **वैदिक**धर्मी इनामदाराची पसंती केली. येवढ्यावरूनच तिच्या मनाचा ओढा **बौद्ध**धर्माच्या अपकर्षाकडे कितीं आहे हें सहज दिसून येतें. आपले **बौद्ध**धर्मी बलाढ्य सरकार, महाराज **गूढसिंह** यांस राणीच्या विवाहाचें हें वर्तमान ऐकून व तिचा **बौद्ध**धर्माविषयींचा हा तिरस्कार पाहून फारच असंतोष वाटला; परंतु पुढें **पंचगांग** देशांतील कांहीं सन्मार्गवर्ती, **बौद्ध**धर्माभिमानी, मान्यस्थ सरदारलोकांना राणीची ही कृति न आवडून त्यांनीं स्वतःच्या सुखाकडे व जीविताकडे न पहातां मोठ्या धारिष्टानें आपल्या बाहुबलानें सद्धर्माचें रक्षण करण्याचा निश्चय केला आहे असें वर्तमान महाराजांस कळल्यामुळें त्यांस फारच आनंद झाला. **बौद्ध**धर्माच्या ऱ्हासाचीं चिन्हें सर्वत्र दिसत असतां आमच्या हद्दीस हद्द लागून असणाऱ्या राज्यांतील **बौद्ध**धर्माभिमानी सद्गृहस्थांच्या हिताविषयीं आमच्या महाराजांसारख्या धर्मनिष्ठ राजास उदासीन कसें राहवेल ? त्यांतून **महामंडलेश्वर जयद्रथराय** तसेच **महासेनराय, शक्तिधरराय** वगैरे **पंचगांग** देशीय सन्मान्य **सामंतप्रभूं**कडून विनंतिपत्र आल्यानंतर त्यांच्या मागणीस आमच्या दयाळू महाराजांच्या हातून नकारा कसा देववेल ? करितां महाराजांच्या आज्ञेवरून उपरि निर्दिष्ट सद्धर्माभिमानी गृहस्थांच्या प्रयत्नांस अंशतः तरी साहाय्य व्हावें ह्मणून फार गुप्तपणें दहा हजार मोहोरांचा ऐवज आपल्यामार्फत पाठवीत आहों. महाराजांच्या आज्ञेवरून या कामीं राजश्री **श्वेतपादराय** यांची नेमणूक केली आहे. हें काम फारच सत्वर व्हावयास पाहिजे असल्यामुळें व **श्वेतपादराया**चा प्रवास फारच गुप्तपणें

होणें इष्ट असल्यामुळें त्यांच्याबरोबर मोठा-सा रक्षकगण न देतां फक्त दोन लढवय्ये जवान दिले आहेत. **श्वेतपादराय कुवलयपुरींत** तुमच्याकडे येऊन पोंचतांच त्यांच्याबरोबर रवाना होत असलेलें द्रव्य **जयद्रथराया**च्या छावणींत जितक्या त्वरेनें पावतें होईल तितकें चांगलें. करितां **श्वेतपाद कुवलयपुरांत** जाऊन पोंचतात तों **जयद्रथराया**कडील कोणी हस्तक तुमच्या घरीं तयार रहावा. आपणास कोणत्याही प्रकारें पुढील तजविजीस अडचण पडूं नये ह्मणून **श्वेतपादराय** यास बरोबर ज्येष्ठ वद्य द्वितीयेस सुमारें दहा घटका रात्रीं **कुवलयपुरीस** जाऊन पोंचावें अशी आज्ञा करण्यांत आली आहे; आणि हें पत्र तुह्मांस जरूर पोंचावें ह्मणून मुद्दाम सांडणीस्वाराबरोबर फार त्वरेनें पुढें रवाना करण्यांत येत आहे. सर्व गोष्टींची योग्य ती व्यवस्था आपण नेहमींप्रमाणें धूर्ततेनें करीतच आहां. तूर्त अधिकोत्तर कांहीं नाहीं. लेखनसीमा."

हें सर्व पत्र वाचून संपेपर्यंत राणी अगदीं स्तब्ध बसली होती. पण मधून मधून जो तिच्या मुद्रेंत फरक पडत होता तेवढ्यावरून **गूहसिंहा**च्या या घातकी वर्तनाबद्दल तिला काय वाटलें असावें याची कल्पना सहज करितां येण्यासारखी होती. राणीच्या समोर बसलेल्या सरदारमंडळीच्या मुखांतून कांहींना कांहीं तरी तिरस्कारदर्शक उद्गार निघालेच. पण स्वतः राणीसाहेब स्वस्थ बसल्यामुळें जास्त बोलण्याचें कोणास धैर्य झालें नाहीं. राजेसाहेबांचाही स्वाभाविक हलकटपणा व वाकूचापल्य क्षणभर जिरून गेलें. कारण **पंचगांग**देशच्या राणीबद्दल आणि स्वतः आपल्याबद्दल **गूहसिंहा**चा द्वेष किती आहे व तो सूड उगविण्याविषयीं काय काय करील याची कल्पना मनांत येऊन स्वारी बरीच घाबरून गेली होती. **कुमुद्बंधु** पत्र वाचीत असतां **कमला** सचिंत व साशंक मुद्रेनें राणीकडे पहात बसली होती. **नलिनी** वारंवार **कुमुद्बंधू**च्या मुखाकडे आशेनें व आनंदानें पहात होती. **विनयादित्य**मामा पत्राकडे कान ठेऊन विचारांत गुंतून गेले होते. **अनुराधा** व **विशाखा** यांची मात्र धांदल उडाली होती.

पत्र वाचून आटपल्यानंतर सर्व मंडळी एक क्षणमात्र अगदीं मुक्यासारखी बसली. नंतर राणीनें सुरुवात केली: "आमचे शेजारी **गूहसिंह** यांचें आमच्या ठिकाणीं किती प्रेम आहे हें या पत्रावरून आतां अगदीं स्पष्ट झालें! आमच्याशीं उघडपणें युद्ध सुरू करण्यास यांना अद्याप हवें तसें कारण सांपडत नाहीं ह्मणून त्यांनीं आंतून आमचें घर पोखरण्यचे प्रयत्न चालविले आहेत. वाः! याचें नांव राजधर्म आणि याचेंच नांव पौरुष."

"महाराज, अलिकडे राजनीति या शब्दाचाच अर्थ बदलला आहे!" सरदार **विश्वासराय** विनोदानें ह्मणतो. "अंधारांत बसून कुटिल कारस्थानें रचणें यालाच अलीकडचे कांहीं सुज्ञ ह्मणविणारे राज्यकर्ते धर्म असें समजतात."

"पण काहो, हें पत्र कोणाला लिहिलें आहे?" राजेसाहेब मध्येंच विचारतात.

" यांत कोणाचें नांव लिहिलें नाहीं, " **कुमुदबंधु** उत्तर करतो, " पण पत्र वाचल्याबरोबर हें कोणास लिहिलें असावें याचें अनुमान करण्यास मला फारशी अडचण पडली नाहीं. तथापि खात्रीवांचून कोणतीही गोष्ट करणें अप्रशस्त असें वाटून मीं पुढें शोध चालविला. या शोधावरून व **श्वेतपादा**कडून जी हकिकत कळली तिजवरून माझें अनुमान अगदीं बरोबर होतें असें खात्रीपूर्वक ठरलें. "

" मलाही एक संशय आला आहे व तो खरा असेल तर दरबारी वकिली या पवित्र व विश्वसनीय हुद्यास कौटिल्यानें व विश्वासघातानें कालिमा आणण्यास तयार होणारे गृहस्थही कोठें कोठें आहेत असें ठरेल!" राणी **कुमुदबंधू**कडे पहात ह्मणाली.

"तुमचीं सर्वांचीं अनुमानें चाललीं आहेत खरीं, पण आह्मांला शेवटीं हें पत्र कोणास लिहिलें आहे हें कळणार कीं नाहीं ? " राजेसाहेब थोडेसे राणीवर रुसल्यासारखें करून ह्मणतात. " आह्मांला तर हीं तुमचीं कोडीं फुटत नाहींत, आणि तुह्मी तर स्पष्ट बोलत नाहीं, पण ती रेशमी थैली मीं केव्हां तरी पाहिली आहे असें मला वाटतें. त्यावरचें तें जरीचें फूल माझ्या चांगलें लक्षांत राहिलें आहे. मला वाटतें काल रात्रीं खेळतांना मीं ही कोणाजवळ तरी पाहिली. "

इकडे **विशाखा** हळूच **अनुराधे**च्या कानांत ह्मणते, " मीं तुला मघाशींच सांगितलें नव्हतें ? ती थैली माझ्या पक्की ओळखीची आहे. "

"हां, अगदीं बरोबर आठवलें आतां." राजेसाहेब कांहीं वेळ डोकें खाजवून ह्मणाले. " काल रात्रीं **कालयवन**चा वकील तो **बसवप्रभू**, त्याच्याजवळ ती मीं पाहिली. त्याची आमची एक पैज ठरली ती कागदावर टिपल्यानंतर तो कागद जपून ठेवण्यासाठीं त्यानें ही काढिली होती. कशाबद्दल बरें पैज होती ? हां, आठवलें ! आमचा घोडा **जयमंगळ** आणि त्यांचा **हिरा** यांची शर्यत पुढच्या शुक्रवारीं लावावयाची आणि आमच्या **जयमंगळानें** शर्यत जिंकली तर आह्मांला **बसवप्रभूनें** वीस मोहोरा द्यावयाच्या व त्यांच्या **हिऱ्यानें** जिंकली तर मीं आपली माणकाची आंगठी त्यांना द्यावयाची असें ठरलें होतें. "

" होय, महाराज ह्मणतात तशा प्रकारचें एक टांचण एका कागदावर केलेलें या थैलींत आहे खरें. " **कुमुदबंधु** ह्मणाला, " हें पहा तें "—' रा. प्र. **जयमंगळा**वर माणकाची अंगठी आणि **हिऱ्यावर** ब. प्र. वीस मोहोरा. ' "

"**रा. प्र.** ह्मणजे राजेसाहेब **प्रद्युम्नराय** आणि **ब. प्र.** ह्मणजे **बसवप्रभु**. " **दशरथराय** ह्मणतात. " ह्यावरून आतां स्पष्ट ठरलें कीं, ही थैली **बसवप्रभू**चीच आहे, आणि हें पत्रही **शीतशीलानें** यांनाच लिहिलेलें असलें पाहिजे. तेव्हां **बसवप्रभु** हे **गूहसिंहा**च्या तर्फेनें या दरबारीं नुसते वकील ह्मणूनच राहिलेले नाहींत, तर **गूहसिंह** आमच्या सरकारच्या विरुद्ध जीं कृष्णकारस्थानें रचित आहे त्यांत हे गृहस्थ

सामील आहेतच असेंही यावरून निर्विवाद सिद्ध झालें."

"होय, भलबत." **विजयसिंह** ह्मणतो. "**बसवप्रभु** हे सरकारच्या शत्रूचे मदतगार आहेत, बंडखोरलोकांस त्यांचें पूर्ण साहाय्य आहे, त्यांस द्रव्य वगैरे आणून पुरविण्याचें सर्व काम तेच करितात, व **गूहसिंह** आणि आमच्या देशांतील राजद्रोही सरदार यांच्या दरम्यानची मध्यस्थी यांजकडेच सोंपविली आहे, असें यावरून उघड दिसतें. तेव्हां यांचें दरबारवकिलीचें सन्मान्य नातें आतां संपलेंच; आणि नुकतेच येथून सुदैवानें सुटून गेलेल्या **श्वेतपादा**च्या हे बरोबरीस येऊन पोंचले व राजद्रोहाबद्दलच्या शिक्षेसही पात्र झाले."

हें भाषण ऐकून **विशाखे**चा चेहेरा एकदम पांढरा फिकट झाला. आपल्या प्रियकरावर हें भयंकर संकट ओढवलेलें पाहून तिला फारच धास्ती पडली. आपल्या चेहेऱ्यांत झालेला फरक कोणास दिसूं नये ह्मणून तिनें तोंडास पदर लाविला आणि तोंड थोडेसें बाजूसही वळविलें. हें पाहून **अनुराधे**नें तिला आपले मनोविकार क्षणभर आंवरून धरण्याविषयीं हळूच सूचना केली.

"तुह्माला मी सांगतों," राजेसाहेब ह्मणतात. "तो **कालनीती** देखील तितकाच विश्वासघातकी व नीच आहे. या दोघांचीही भरबाजारांतून धिंड काढून दोघांनाही एकदम सुळावर चढविलें पाहिजे!"

हे शब्द ऐकल्याबरोबर **अनुराधे**ची अवस्था **विशाखे**प्रमाणेंच झाली व आपली ही स्थिती कोणास न दिसूं देण्याविषयीं यावेळीं **विशाखे**नें तिच्या कानांत सूचना केली.

"या दोघांही दुष्टांना ताबडतोब सुळावर चढविलेंच पाहिजे!" राजेसाहेब फिरून अधिक रागानें ह्मणतात. "पण या चोरांनीं आजपर्यंत मजजवळून खेळांत जेवढें ह्मणून द्रव्य उपटलें आहे तेवढें सर्व यांच्यापासून परत हिसकून घेतलें पाहिजे. कारण ज्यांची वकिली बेइमानपणाची ते खेळांतही दरवडेखोरांसारखेच वागले असतील यांत काय संशय? बस्स, त्यांना एकदम शिक्षा झालीच पाहिजे!"

"कांहीं तरी निमित्त करून बाहेर जा, आणि कोणाकडून तरी या गोष्टी त्यांना लवकर कळतील असें कर." **अनुराधा** **विशाखे**च्या कानांत पुटपुटली.

"भलतेंच कांहीं तरी! अगदीं चुप्प बैस!" **विशाखा** तितक्याच हळू शब्दांनीं व सचिंत मुद्रेनें उत्तर करिते. "तो पाहिलास का, **कुमुदबंधु** आपल्याकडे कसा वरचेवर पहात आहे. त्याच्याकडे पाहिलें कीं मला कांपरेंच भरतें. मला वाटतें प्रत्येकाच्या अंतःकरणांत काय काय गुप्त गोष्टी सांठलेल्या आहेत ह्या त्याला सर्व दिसतात!"

इतक्यांत राणी बोलूं लागली व तिच्या भाषणानें ह्या दोघी अल्लड तरुणींची भीति कांहींशी कमी झाली व त्यांचीं मनें थोडी तरी स्वस्थ झालीं.

"महाराज," राणी राजेसाहेबांकडे वळून ह्मणते. "असें उतावीळ होऊन उपयोगीं नाहीं. **गूहसिंहास** प्रस्तुत प्रसंगीं

अधिक चिडविण्यानें काय परिणाम होईल याचा आपण विचार केला आहे काय? आपल्या मातुःश्री अद्याप गूहसिंहाच्या ताब्यांत आहेत हें आपल्या स्मरणांत आहेना? तसेंच थोडेंसें उघड कारण मिळतांच ह्या वेळीं तो आपल्याशीं युद्ध करण्यास तयार होईल ही गोष्ट आपल्यास कळून आली आहेना? सांगा तर, आपल्या मातुःश्रीची सुटका व्हावी असें आपल्यास वाटत नाहीं का? आपण आणखी कांहीं दिवस तरी सर्व भरतखंडास असें दाखवायला नको का, कीं गूहसिंहानें आपल्याशीं युद्ध सुरू करण्यासारखें आपल्या हातून कोणतेंही कारण घडलेलें नाहीं? आपल्याला असें का वाटतें, कीं गूहसिंहाचे अपराध मला दिसत नाहींत? त्याचा प्रत्येक अपराध मी मनांत टिपून ठेवितें आहे; पण आज सहनशीलता धरलीच पाहिजे! आपल्या घरांतील स्थिति अशी भयंकर असतां गूहसिंहासारख्या बलाढ्य राजाशीं आपण होऊन तंटा उपस्थित करणें ह्मणजे शुद्ध वेडेपणा आहे! आपल्या राज्यांत बंडखोरांनीं माजविलेली पुंडाई मोडण्याला जी सामुग्री पाहिजे तेवढी देखील आज आपल्याजवळ नाहीं ह्मणून आपण एक दोन घटकांपूर्वी केवढ्या फिकिरींत पडलों होतों? आणि ह्याच वेळीं गूहसिंहाशीं तंटा सुरू करावयाचा ह्मणजे काय व्यवस्था करावयाची? घरांतून एक शत्रु आणि बाहेरून एक अशा दोघांच्या कचाटींत आपण प्रस्तुत स्थितींत सांपडलों असतां आपल्या या सिंहासनाचा चुराडा व्हायला किती अवकाश लागेल?"

"होय, होय, ह्मणतेस तें अगदीं बरोबर!" आपला कष्टसंपादित मुगुट गमावण्याची धास्ती मनांत उत्पन्न होतांच राजेसाहेब शुद्धीवर येऊन ह्मणाले. पण इतक्यांत स्वारीच्या मनांत विचार आला कीं, ह्या योगानें आपला अप्पलपोटेपणा व भित्रेपणा दिसून येईल, ह्मणून फिरून ह्मणतात, "मुख्यत्वेंकरून मला आमच्या आईसाहेबांच्या स्थितीबद्दल फार वाईट वाटतें. ह्या गूहसिंहाशीं बाह्यतः स्नेह राखण्यासाठीं या दोघा चोरांचे अपराध पोटांत घालणें भाग आहे; पण खरेंच, कुमुद्वती, श्वेतपादासंबंधानें व त्यानें आणलेल्या या द्रव्यासंबंधानें झालेली हकीकत गूहसिंहाला कळणारच. मग युद्ध सुरू करण्याला त्याला येवढेंच कारण नाहीं का होणार?"

"नाहीं," राणी ह्मणते, "नाहीं. गूहसिंहासारखा महा वस्ताद राजा ही गोष्ट कधींही आपण होऊन बाहेर पाडावयाचा नाहीं. ही गोष्ट बाहेर काढणें ह्मणजे सर्व भरतखंडस्थ राजांच्या समोर आपण होऊन आपला नामर्दपणा व कुटिलपणा दाखविणें आहे; ह्मणून होईल तितकें करून या कृत्यावर पांघरूण घालण्याचीच खटपट करणें त्याला भाग आहे. कां, मामासाहेब, मी ह्मणतें हीच गोष्ट खरीना?

"होय सरकार;" मामा म्हणतात. "आपण म्हणतां तें अगदीं बरोबर. आपली अशा रीतीनें नाचक्की करून घेण्यापेक्षां गूहसिंह श्वेतपादास झुगारून देईल आणि त्याच्याच गळ्यांत हें किटाळ अडकावून देईल! पण तेंच आपल्या दरबारीं प्रसिद्ध-

पणें आपल्या परवानगीनें येऊन राहिलेल्या वकिलास जर आपण शिक्षा केली तर या गोष्टीबद्दल आपल्यापासून जाब मागणें त्याला भाग आहे, आणि इतर राजांच्या नजरेलाही तें रास्त दिसणार आहे."

राणीच्या सर्व मसलतगार मंडळींचीं मतें अशींच पडलीं. "अगदीं प्रत्यक्षपणें आपला कांहीं अपमान होईपर्यंत किंवा **गूहसिंहा**कडूनच युद्धाची उठावणी होईपर्यंत आपण अगदीं स्वस्थ बसावें." असें सर्वांचें मत पडलें.

नंतर राणी **कुमुदबंधू**कडे वळून ह्मणते, "पण आमचे मित्र व हितचिंतक हे **महेश्वरकर कुमुदबंधु** कांहींच बोलत नाहींत, हें कसें."

"सरकार," **कुमुदबंधु** उत्तर करितो. "मामासाहेब आदिकरून खऱ्या राजकार्यज्ञ मसलतगार मंडळींनीं महाराजांस जी सल्ला दिली त्याहून अधिक मी काय सांगणार! पण महाराजांनीं प्रश्न केला, तर उत्तर दिलेंच पाहिजे. महाराज, **गूहसिंहा**बद्दल मला जी काय थोडीबहुत माहिती आहे त्यावरून माझी अशी खात्री आहे कीं, सरकारांनीं जर ही **श्वेतपादानें** आणलेल्या द्रव्यासंबंधाची गोष्ट बाहेर पाडली नाहीं तर त्यापासून **गूहसिंहा**स फारच आनंद होईल आणि होईल तितकें करून त्यावर पांघरूण घालण्याची तो व्यवस्था करील. तसेंच महाराजांनीं व इतर सरदार मंडळींनीं ह्मटल्याप्रमाणें कोणत्याही स्थितींत होईल तितकें करून प्रथम सामाचा उपयोग करणें व प्रस्तुत प्रसंगीं तर **गूहसिंहा**चे अपराधही पोटांत घालून त्याच्याशीं आहे तो मित्रभाव राखणें चांगलें. आतां माझ्या हातांत जे कागदपत्र आलेले आहेत तेवढे मात्र मजजवळच ठेवण्याची महाराजांनीं मला परवानगी द्यावी. कोणत्याही रीतीनें त्यांचा मजकडून दुरुपयोग होणार नाहीं हें महाराजांस ठाऊक आहेच."

"खुशाल ते तुमच्याजवळ पाहिजेल तितक्या दिवस राहूंद्यात;" राणी ह्मणते. "त्यांच्या संबंधानें आह्मी तुह्माला एक शब्दानेंही कधीं विचारणार नाहीं. जे हां तुह्मींच होऊन त्यांविषयीं कांहीं अधिक हकीकत आह्माला सांगाल तेव्हां मात्र ती आह्मी उत्सुकतेनें ऐकूं; पण तोंपर्यंत आह्मी तुह्माला एक प्रश्न देखील विचारणार नाहीं."

"सरकार, आणखी एक गोष्ट चरणीं निवेदन करावयाची आहे." **विनयादित्य**मामा ह्मणाले.

"बोला, बोला, मामासाहेब आपलें काय ह्मणणें आहे तें." राणी ह्मणते.

"मला इतकेंच सुचवावयाचें आहे," मामासाहेब ह्मणतात, "कीं **श्वेतपाद** येथून जाऊन **बसवप्रभूं**ना भेटला असेल आणि आपण अंगावर घेतलेलें कार्य शेवटीं कसें फसलें व तो कैद होऊन सरकारच्या समोर आल्यावर काय काय हकीकत घडली हें सर्व त्यानें त्या दोघां वकिलांस कळविलें असेल यांत मुळींच संदेह नाहीं. ही हकीकत कळल्यानंतर **बसवप्रभु** व **कालनीती** यांस आपल्या स्वतःच्या जीविताची धास्ती पडल्यावांचून रहावयाची नाहीं. आपण होऊन आपल्या हातानें हें संकट ओढवून

आणिलें आहे असें त्यांच्या तेव्हांच लक्षांत येईल. तसेंच सरकारास त्यांच्या या कृतीमुळें त्यांचा फारच राग येऊन त्यांना कडक शिक्षा करण्याचा हुकूम सरकार देतील असें त्यांना वाटणें साहजिक आहे. ह्मणून ते बहुधा यावेळीं **कुवलयपूर** सोडून गुप्तपणें आपल्या देशास पळून जाण्याच्या बेतांत असतील. ते **पंचगां** देश सोडून गेले ह्मणजे स्वाभाविकपणेंच या सर्व गोष्टी बाहेर पडल्या पाहिजेत आणि मग **गूहसिंहा**सही असें दाखविणें भाग पडेल कीं आपलें वर्तन मुळींच चुकीचें नाहीं आणि **पंचगांग**च्या दरबारीं आपल्या वकिलांचा—ह्मणजे अप्रत्यक्षपणें आपलाच,—अपमान झाला आहे. आपण **श्वेतपादा**स बंडखोरांकडे पाठविलें नाहीं; **शीतशीला**च्या सहीचें पत्र अगदीं बनाऊ आहे, **जयद्रथा**दि बंडखोरांस कोणत्याही प्रकारें मदत करण्याचें आपल्या कधीं स्वप्नींही आलें नाहीं, असें सर्व जगास सांगून आपल्या अपमानाचें क्षालन करण्याच्या निमित्तानें **पंचगांग** देशाशीं संग्रामास तो उभा राहील. हे सर्व प्रसंग चुकविण्याचा एकच मार्ग मला दिसतो आहे. तो हाच कीं, **बसवप्रभु** आणि **कालनीती** यांजकडे आतांच्या आतां कोणाची तरी रवानगी करावी; आणि त्यांस कळवावें कीं, 'बंडखोरांस साहाय्य करण्याकरितां **गूहसिंहा**नें विश्वासघातकीपणा करून द्रव्याची मदत पाठविली व त्याच कामीं तुम्हींही आपलें दरबारवकिलीचें पवित्र नांव घालविण्यासारखें वाईट वर्तन केलें; तथापि ईश्वरकृपेनें तुमचे हे कुटिल बेत सफल झाले नाहींत; आणि येवढ्याचमुळें तुमचा व **गूहसिंहा**चा हा घोर अपराध विसरून जाऊन एकवार तुम्हांला क्षमा करण्याची व **गूहसिंहा**शीं पूर्वीपासून असलेला मित्रभाव कायम राखण्याची राणीसाहेबांची अद्यापि इच्छा आहे. यापुढें मात्र असें विश्वासघाताचें वर्तन न होईल अशी राणीसाहेबांस उमेद आहे.' अशा अर्थाचा निरोप त्या वकिलांकडे पाठविला ह्मणजे त्यांचीं मनें स्वस्थ होतील आणि ते येथून निघून जाण्याचा विचार रहित करतील."

"फारच चांगली सूचना केली मामासाहेब!" राणी ह्मणाली, "आणि आह्मांला असें वाटतें कीं, हें काम आमचे **महेश्वरकर** सरदार **कुमुदबंधु** यांजकडेस सोंपवावें. कारण त्यांचे हातून हें काम प्रस्तुत स्थितींत जितक्या चांगल्या रीतीनें शेवटास जाईल तितकें दुसऱ्या कोणाच्याही हातून जाणार नाहीं."

"महाराजांचा हुकूम होत आहे तर मी हें काम फार खुषीनें पतकरितों." **कुमुदबंधु** उत्तर करितो, "बाकी माझी अशी पक्की खात्री आहे कीं, राणीसाहेबांचा हा झालेला ठराव **बसवप्रभु** व **कालनीती** यांस इतर मार्गांनीं फारच त्वरित कळण्याचा संभव आहे." असें ह्मणतांना **कुमुदबंधूनें** आपली दृष्टि **विशाखा** व **अनुराधा** यांच्या चेहऱ्यावरून एकवार नेली. इतर कोणाच्याही लक्षांत ही गोष्ट येण्यासारखी नव्हती; परंतु त्या दृष्टीचा अर्थ त्या दोघींस कळला, व त्यांच्या छातींत एकदम धडकीच बसली.

आपल्या बोलण्याचा राणीस व इतर मंडळीस चमत्कार वाटला असें दिसल्यावरून **कुमुदबंधु** ह्मणतो; " माझ्या ह्मणण्याचा महाराजांनीं भलताच अर्थ करूं नये. लोकांत जी ह्मण आहे कीं, ' भिंतीला देखील कान असतात ' तिच्यांत बरेंच तथ्य आहे असें समजून चाललेलें बरें; आणि विशेषेंकरून **कालनीती** व **बसवप्रभु** यांसारखे धूर्त, कपटी व नीतिनिपुण गृहस्थ येथली अगदीं गुप्त बातमीही काढल्याशिवाय रहावयाचेच नाहींत. "

हें भाषण ऐकून **विशाखा** व **अनुराधा** यांच्या थोडासा जिवांत जीव आला. त्या एकमेकींना हळूच विचारितात, " त्यानें आपल्याकडे अशा विलक्षण दृष्टीनें पाहिलें याचा अर्थ काय ? त्याला आमचा संशय आला असावा काय ? व आमच्यावर अशा गुप्तपणें कांहीं आरोप करण्याचा त्याचा हेतु असावा काय ? "

ह्या दोघी मैत्रिणींचे हे विचार चालले असतां **कुमुदबंधु** राणीस आदरानें प्रणाम करून दिवाणखान्याच्या बाहेर पडला. तो आपल्या अंगावरील रक्तानें मळलेले कपडे बदलण्याकरितां किंवा **मोहन**ला बरोबर घेण्याकरितांही थांबला नाहीं. तसाच वाड्याबाहेर पडून त्यानें सरळ **बसवप्रभू**च्या वाड्याची वाट धरिली.

राजवाड्यापासून हा वाडा फारसा दूर नव्हता. सुमारें अर्ध्या घटकेच्या आंत **कुमुदबंधु** त्या वाड्याच्या दरवाज्याशीं जाऊन पोंचला. यावेळीं रात्र बरीच झाली असल्यामुळें वाड्याचा दरवाजा लावलेला होता; पण दिंडी मात्र उघडी असून दिंडीशीं पहारेकरी उभा होता.

**कुमुदबंधु** दिंडीशीं गेला आणि पहारेकऱ्यास म्हणतो, " सरदार **बसवप्रभु** यांना आंत जाऊन कळीव कीं, त्यांची मला फार जरूरीच्या कामाकरितां आतांच्या आतां भेट व्हावयास पाहिजे आहे. "

" हुकूम सरकार, " पहारेकऱ्याची दृष्टि **कुमुदबंधू**च्या पोषाखावरून व चेहऱ्यावरून एकवार फिरतांच तो लीनतेनें ह्मणाला, " पण कोणाची स्वारी आली आहे ह्मणून सांगूं ? "

पहारेकऱ्याची ही हुषारी पाहून **कुमुदबंधू**ला थोडासा चमत्कार वाटला. त्यानें लागलीच विचार केला कीं, आपलें नांव लपवून ठेवण्याचें यावेळीं कांहीं एक कारण नाहीं, ह्मणून त्यानें चट्दिशीं सांगितलें, " **महेश्वरकर कुमुदबंधु** आले आहेत ह्मणून सांग. "

पहारेकऱ्यानें यापूर्वी **कुमुदबंधू**च्या शौर्याची वगैरे ख्याति ऐकिली होती, यामुळें लागलीच तो जवळचाच जिना चढून वरच्या दिवाणखान्याकडे लगबगीनें चालता झाला. थोड्याच वेळांत तो पहारेकरी परत आला व **कुमुदबंधूस** मोठ्या अदबीनें ह्मणाला, " चला महाराज, यजमान वरती जागेच आहेत आणि आपल्याला वरती घेऊन येण्याविषयीं मला हुकूम झाला आहे. "

" हां, समजलों यांचा काय बेत आहे तो. " **कुमुदबंधु** त्या पहारेकऱ्याच्या पाठीमागून चालतां चालतां आपल्याशींच ह्मणतो, " त्यांच्या मनांतून ही गोष्ट केवळ ऐटीवरच

उडवून न्यावयाची आहे. ते आतां दाखवितील कीं जणूं काय ते त्या गांवचेच नव्हेत. श्वेतपाद् कोण हें देखील आपल्याला ठाऊक नाहीं असें ते दाखवितील आतां. राणीसाहेबांकडून कोणी तरी मनुष्य यावेळीं येईलच असें त्यांनीं अनुमान केलेलें असावें, व ह्मणून ते माझी भेट घेण्यास इतक्या लवकर तयार झाले. ठीक आहे !"

पहारेकरी कुमुद्बंधूस जिन्यावरून समोर दिवाणखान्यांत घेऊन गेला. बसवप्रभु व कालनीती बुद्धिबळांच्या खेळांत गुंतून गेलेले दिसत होते. कुमुद्बंधु आंत येतांच दोघेही डावावरून उठले व त्याचा आदर करण्याकरितां चार पावलें पुढें आले.

हा सर्व थाट पाहून कुमुद्बंधु मनांत ह्मणतो, " देखावा तर खूब भपक्याचा सजविला आहे ! ह्या धूर्त कोल्ह्यांनीं आणिलेल्या सोंगांची बतावणीही झोंकानें चालविली आहे! पण शेवटीं ह्या सगळ्याचा उपयोग फारसा होणार नाहीं हें या मूर्खांना ठाऊक नाहीं अद्याप ! "

" या सरदारसाहेब, बसा, असे बसा. " कालनीती आदराचें वाजवीपेक्षांही फाजील प्रदर्शन करून म्हणतात, " आज स्वारी इतक्या रात्रींचशी इकडे वळली ? आपल्याला खेळण्याचा नाद आहे का ? "

" माझें काम फारच थोडें आहे. " कुमुद्बंधु त्या ओढून आणिलेल्या अत्यादराकडे दुर्लक्ष करून ह्मणतो, " आपल्या या मौजेच्या व्यवसायांत मी फारसा अडथळा करीत नाहीं. विशेष प्रस्तावना न करितां मला काय बोलावयाचें आहे तें मी एकदमच बोलून टाकतों. आपल्यास मुख्यत्वेंकरून मला चार गोष्टी सांगावयाच्या—"

" तर मग आपण इतक्या रात्रीं कांहीं कामाकारितां आलां आहांत ?" बसवप्रभु आश्चर्याची मुद्रा करून ह्मणतो.

" इतक्या रात्रीं आणि काम ! " कालनीती तोंड व डोळे पसरून व भिंवया वर चढवून ह्मणतो, " मला वाटतें आतां मध्यरात्र व्हावयाला आली; आह्मी हा येवढा डाव आटपून निजायलाच उठणार होतों. '

" मला वाटतें, सरदारसाहेब," कुमुद्बंधु ह्मणतो, " आजचा आपला डाव फसला ! नाहीं बरें ? "

"प्रत्येक डावांत एकाचा अपजय व दुसऱ्याचा जय व्हावयाचाच ! " बसवप्रभु कुमुद्बंधूच्या बोलण्याचा झोंक ओळखिला नाहीं असें दाखवून बुद्धिबळाच्या पटाकडे पहात ह्मणतात, " आपण ह्मणतां तें अगदीं खरें. आज या आमच्या कालनीतींनीं दोन तीन डावांत आमची बरीच त्रेधा उडविली. पण या डावांत त्यांना प्यादीशिवाय सोडीत नाहीं आतां ! "

बसवप्रभूचा हा निःकाळजीपणा, हा साधेपणा, ही शांतवृत्ति आणि ही प्रगल्भता, या सर्वांचें हुबेहुब आणिलेलें सोंग पाहून कुमुद्बंधूला मौज वाटली आणि थोडेंसें हंसूं आलें. तो बसवप्रभूला उद्देशून ह्मणतो, " सरदारसाहेब, मी ज्या खेळासंबंधानें बोललों तो हा तुमचा चाललेला खेळ नव्हे, दोन देशांच्या राज्यकर्त्यांमध्यें चालू असलेल्या खेळासंबंधानें मी बोललों. काल-

यवनच्या राजेसाहेबांनीं डाव तर खूब शिताफीचा टाकला होता, पण पंचगांगच्या तरुण राज्ञीनें शेवटीं त्यांचा पेंच त्यांच्याच गळ्यांत घातला! नाहीं बरें? तुह्माला ही सर्व हकीगत कळलीच आहे."

"कायहो कालनीती," बसवप्रभु विलक्षण आश्चर्य वाटल्यासारखें दाखवून ह्मणतात, "हे सरदारसाहेब काय ह्मणतात तें तुह्मांला कळलें का? मला तर यांच्या बोलण्याचा अर्थ मुळींच कळत नाहीं."

"माझीही स्थिति आपल्याप्रमाणेंच झाली आहे!" कालनीती मोठ्यानें हंसत उत्तर करितात, "दोघां राजकर्त्यांचा खेळ? थट्टा तर मोठी गमतीची दिसते! पण या थट्टेचा रोख काय असावा हें माझ्या तर डोक्यांत येत नाहीं!"

"सरदारसाहेब," कुमुदबंधु शांतपणें ह्मणतो, "श्वेतपाद ह्मणून कोणी गृहस्थ आपल्या दोघांपैकीं कोणाच्या ओळखीचे आहेत का? नाहींत असेंच आपण बहुधा साफ ह्मणाल!"

"श्वेतपाद" बसवप्रभु कपाळास आंठ्या घालून व विचार केल्यासारखें दाखवून ह्मणतात, "श्वेतपाद या नांवाचा गृहस्थ आपल्याला तर कोणी ठाऊक नाहीं. काहो कालनीती, या नांवचा कोणी गृहस्थ तुह्मांला आहे का ठाऊक?"

"श्वेतपाद या नांवचा एक लहानसा डोंगर आमच्या देशांतल्या एका प्रांतांत आहेसें मला वाटतें!" कालनीती ह्मणतात. "पण सरदारसाहेब—"

"बरें कालयवनदेशाहून आलेल्या दहा हजार मोहोरांच्या थैल्यांसंबंधानें तरी आपल्यास कांहीं माहिती आहे का?" कुमुदबंधु विचारितो, "येवढी मोठी रक्कम भलत्याच्याच खजिन्यांत जाऊन पडली हें ऐकून आपल्याला भारी दुःख झालें असेल नाहीं? 'कोठच्या मुहूर्तावर या॰ पांढऱ्या पायाच्या गृहस्थाची रवानगी झाली कोण जाणे!' असेंच आपल्या दोघांच्याही तोंडांतून एकदम उद्गार निघाले असतील, नाहीं?"

बसवप्रभु व कालनीती हे कांहीं एक उत्तर न करितां एकमेकांकडे आश्चर्यचकित मुद्रेनें पाहूं लागले. कुमुदबंधूला पित्तक्षोभ होऊन त्याचें डोकें भ्रमण करूं लागलें असावें व म्हणून तो हें कांहीं तरी भलभलतें बरळतो आहे अशी कल्पना झाल्याचें त्या दोघां बहुरुप्यांनीं आपल्या मुद्रेवरून कुमुदबंधूस दाखविलें.

"बरें, सरदार बसवप्रभु, आपली एखादी रेशमी थैली हरवली आहे का?" कुमुदबंधु विचारितो.

"नाहीं; बहुतकरून नसावी." बसवप्रभु चहूंदिशीं उत्तर करतो. नाहींच. ही पहा माझी थैली मजजवळच आहे." असें ह्मणून कमरेशीं असलेली एक रेशमी थैली काढून त्यानें कुमुदबंधूस दाखविली.

"ती नव्हे, मी म्हणतों ती ही." कुमुदबंधु आपल्याजवळची सांपडलेली थैली पुढें करून ह्मणतो.

"ही कांहीं आपली नव्हे." बसवप्रभु बिलकुल न घाबरतां उत्तर करतो.

"पण राजेसाहेबांनीं अगदीं निश्चयपूर्वक

सांगितलें कीं, ही त्यांनीं काल रात्रीं तुमच्याजवळ पाहिली." कुमुदबंधु म्हणतो.

"राजेसाहेब विसरले असतील. त्यांनीं ती दुसऱ्या कोणाच्या तरी हातीं पाहिली असेल." बसवप्रभु म्हणतो. "शिवाय काल रात्रीं तर ते अगदीं तर्र होऊन गेलेले होते! आणि पुष्कळ वेळां आपल्याला ठाऊक नसलेली गोष्टही ते बेधडक खरी ह्मणून सांगतात. त्यांचा शब्द नेहमीं खराच असतो असें घेऊन चालण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं."

"बरें, ह्या कागदावर ही एका पैजेची नोंद करून ठेविली आहे, ही पहा बरें. 'राजे प्रद्युम्नराय यांची जयमंगळावर माणकाची आंगठी, आणि तुमच्या हिऱ्यावर वीस मोहोरा.' हें आपलेंच अक्षर का" कुमुदबंधु तो कागद पुढें करून विचारतो.

"भलतेंच! हें आपलें अक्षर खचित नव्हे. शिवाय कालच्या रात्रीं अशा प्रकारची पैज मीं मुळींच लाविली नव्हती." बसवप्रभु बिनधास्त खोटें उत्तर करितात. "फार कशाला, आमचे हे कालनीती कालच्या रात्रीं एकसारखे मजजवळच होते ते देखील सांगतील—"

"हो, मी पाहिजे तेथें अगदीं शपथेवर सांगायला तयार आहें कीं, अशा प्रकारची पैज काल रात्रीं खचित ठरलेली नाहीं." कालनीतीनें आपल्या मित्राच्या शब्दास जोर आणण्यासाठीं ताबडतोब उत्तर केलें व प्रसंगीं खोटी शपथ वाहण्याच्या कामीं आपल्या जोडीदारास आपण खचित हार जाणार नाहीं, असेंही पण त्यांतल्या त्यांत त्यानें दाखविलें!

दोघांचींही हीं भाषणें ऐकून कुमुदबंधूची वृत्ति बरीच बदलली, तो म्हणतो, "तर मग मला आतां असेंही मानायला कांहीं हरकत नाहीं कीं त्या थैलींत मला सांपडलेल्या ह्या पत्रांविषयींही आपल्यास कांहींच माहिती नाहीं?" असें म्हणून त्यानें थैलींतील एक दोन पत्रें काढून त्यांच्यापुढें केलीं.

बसवप्रभूनें सोंगाची बतावणी बरोबर करण्याकरितां ह्मणून त्या पत्रावरून नुसती एकवार नजर फिरविली व ती कुमुदबंधूच्या हातांत परत देऊन तो म्हणतो, "भलतेंच सरदारसाहेब, आह्मी असल्या प्रकारची आंकड्यांची भाषा कधींच वापरीत नाहीं."

"पण आपले शीतशील प्रधान तरी खचित ती वापरतात!" कुमुदबंधु बराच ठासून म्हणाला.

"वापरीत असतील." बसवप्रभु थोड्या ऐटीनें उत्तर करितो, "ही गोष्ट कदाचित् मजपेक्षां आपल्याला जास्त ठाऊक असेल! पण मला तरी—"

"बरें सरदारसाहेब," कुमुदबंधु मध्येंच ह्मणतो, "हें पत्र शीतशीलाकडून तुमच्याकडे रवाना झाल्याबद्दल श्वेतपादानें मजजवळ कबूल केलें आहे, व ती गोष्ट तुह्मांलाही कळलीच आहे. हें देखील तुह्मी नाकबूल करण्यास तयार आहांतना?"

"पुनः आणखी श्वेतपाद, श्वेतपाद!" बसवप्रभु ह्मणतो. "अहो तुमचा हा श्वेतपाद आहे तरी कोण? श्वेतपाद या नांवाचा गृहस्थ माझ्या तर ओळखीचा नाहीं खचित!

कोणी तरी एकदा लुच्चा तुह्मांला भेटला असावा आणि त्यानें तुह्मांला अगदीं फसविलें; किंवा हे थोडे धामधुमीचे दिवस आहेत अशी संधी पाहून कोणी तरी कारस्थानी व खटपटी लोकांनीं हीं बनाऊ पत्रें तयार करून त्यांत भलभलत्या मंडळींचीं नांवें घुसडून कांहीं तरी नवीन भानगड उपस्थित करण्याचे प्रयत्न चालविले असावेत. पण यांत आमचा काय संबंध आहे ?"

"सरदारसाहेब," **कुमुदबंधु** कांहींसा अधिकारयुक्त स्वरानें ह्मणतो, "बस करा आतां ही थट्टा ! हा विषय महत्वाचा आहे. नुसत्या थट्टेचा नव्हे."

"आमचेंही आपल्यास तेंच सांगणें आहे." **बसवप्रभूनें** आपल्या मुद्रेंत थोडासा अभिमान व ऐट आणून ह्मटलें. "सरदारसाहेब, आपलें हें भाषण येवढा वेळपर्यंत आह्मीं कसें तरी सहन केलें—"

"आणि तसेंच आणखी थोडा वेळ सहन करा, ह्मणजे झालें." **कुमुदबंधु** त्यांना पुरतें बोलूं न देतांच ह्मणतो, "मला कांहीं गोष्टी आपल्याला कळवायच्या आहेत तेवढ्या ऐकून घ्या व त्याला काय तीं उत्तरें द्या ह्मणजे झालें. एकंदर चार गोष्टी आपल्याला सांगावयाच्या आहेत. त्यांतली पहिली ही. **कालयवनदेशचे** तुमचे राजे **गूहसिंह** यांनीं आमच्या देशांतील राजद्रोही लोकांस मदत करण्याच्या कामीं जो विश्वासघातकीपणा केला त्याबद्दल **पंचगांगच्या** राणीसाहेबांस जरी राग आला आहे; तथापि आजपर्यंतचें दोन देशांमधील मित्रत्वाचें नातें ध्यानांत आणून व थोड्या कारणाकरितां शांतेचा भंग न व्हावा, ह्मणून तुमच्या **गूहसिंहास** या अपराधाबद्दल त्या क्षमा करीत आहेत आणि तुह्मी दोघे **कालयवनदेशचे** वकील, तुह्मींही या कामीं आपल्या कर्तव्याचा अतिक्रम करून आपल्या पवित्र अधिकारास कलंक लाविला आहे; तथापि एकवार तुम्हांलाही क्षमा करण्याचें **पंचगांगच्या** राणीसाहेबांनीं ठरविलें आहे."

"तुमच्या राणीसाहेबांनीं आमच्यावर ही मोठीच दया केली म्हणावयाची," **बसवप्रभु** उपहासपर मुद्रेनें ह्मणतो, "जे अपराध आमच्याकडून कधींच घडले नाहींत त्याबद्दल राणीसाहेब क्षमा करण्यास तयार झाल्या हें त्यांचें फारच मोठें औदार्य ! सरदारसाहेब आपण जी दुसरी गोष्ट सांगणार आहांत तीही अशीच कांहींतरी मौजेची असेल ?"

"मौजेची आहे किंवा कशी आहे ती पहा आतां !" **कुमुदबंधु** शांतपणें पण थोडें डांसून उत्तर करितो, "दुसरी गोष्ट ही:— ह्या रेशमी थैलींत असे कांहीं कागद आहेत कीं ते प्रसिद्ध केले असतां तुमचे यजमान **गूहसिंह**, त्यांचे प्रधान **शीतशील**, व त्यांच्या पाठीमागून तुम्ही दोघेही वकील, या सर्वांच्या तोंडाला काळोखी लागेल व **भरतखंडांतील** सर्व दरबारांत तुमची सगळ्यांची छी थू उडेल, असें आहे; तथापि मी तुमची ही थैली तुह्मांस परत देतों; पण त्यामोबदला राजे **प्रद्युम्नराय** यांच्या मातुश्रींस तुमच्या राजेसाहेबांनीं एकदम अटकावांतून सोडून व योग्य इतमाम बरोबर देऊन त्यांच्या घरीं पोंचतें केलें पाहिजे."

"वाः, ही गोष्ट तर फारच मजेदार !" **बसवप्रभु** हांसत हांसत म्हणतो.

" कदाचित्, सरदार **कुमुद्वंधूंची** तिसरी गोष्ट याहूनही अधिक भपकेदार असेल !" **कालनीती** थट्टास्पद गंभीरपणा मुद्रेंत आणून व खोटया आदरानें मान लववून **कुमुद्वंधू**कडे पहात ह्मणतो.

"काय आहे ती सांगतोंच मी आतां आपल्याला !" **कुमुद्वंधु** आपल्या चेहऱ्यांत बिलकुल फरक न होऊं देतां ह्मणतो. "सरदार **बसवप्रभु, श्वेतपाद** येथें येऊन पोंचण्याचे वेळेस **जयद्रथराया**कडील कोणी तरी विश्वसनीय हस्तक **श्वेतपादा**बरोबर येणारें द्रव्य बंडखोरांच्या छावणींत घेऊन जाण्याकरितां हजर राहील अशी तजवीज ठेवावी, ह्मणून **शीतशीलानें** तुम्हांस पत्रांत लिहिलेलें आहे. माझी पक्की खात्री आहे कीं, तो **जयद्रथरायां**कडून आलेला गृहस्थ आद्याप तुमच्या घरांतच आहे; तर माझी व त्याची भेट झाली पाहिजे. त्याच्या केंसासही मी धक्का लावणार नाहीं येवढें तुह्मांस वचन देऊन ठेवतों."

" **कुमुद्वंधु**," **बसवप्रभु** थोडासा रागावल्यासारखा दाखवून म्हणतो, "आमच्या सहनशीलतेची तुह्मी परीक्षाच पहात आहांत ! आपली मजल चढत चढत फारच चढली ! आमचा प्रत्यक्षपणें अपमान करण्यास तुह्मी आतां तयार झालांत. तथापि आणखी एकवार मी तुम्हाला शांतपणानें सांगतों कीं, **जयद्रथराया**कडचा कोणीही हस्तक आमच्या घरीं आलेला नाहीं."

" तर मग काय, मीं सांगितलेल्या अटींस तुम्ही नाकबूल आहांत ?" **कुमुद्वंधु** अधिकारयुक्त स्वरानें विचारतो, " बोला, राजे **प्रद्युम्नराय** यांच्या मातुःश्रीची मुक्तता करण्यास व यावेळीं तुमच्या घरांत असलेल्या बंडखोरांकडील हस्तकाची आणि माझी भेट करून देण्यास तुम्ही कबूल नाहींना ?"

" बुद्धाची शपथ !" **बसवप्रभु** फारच चिडल्यासारखें दाखवून म्हणतो, " **कुमुद्वंधु**, आतां मात्र तुमचें हें भाषण सहन करणें अशक्य आहे ! गोष्टी विकोपास नेणें ठीक नव्हे !"

" जरा दम धरा," **कुमुद्वंधु** संतापूनच म्हणतो, " आणखी एक गोष्ट तुम्हांला सांगायची राहिली आहे तेवढी मी सांगे तोंपर्यंत आपला राग थोडासा आंवरून धरा. सरदार **बसवप्रभु**, व सरदार **कालनीती**, **पंचगांग**च्या राणीसाहेबांजवळ असणाऱ्या, आपल्या सलगीच्या दोन माणसांवर विश्वासघाताचा व राजद्रोहाचा आरोपस्थापन होऊन त्यांस प्रसिद्धपणें योग्य शिक्षा होण्याचा प्रसंग येऊं नये अशी तुमची इच्छा असेल तर तुम्ही पाहिजे ते उपाय करून आणि आपला अधिकार व वजन खर्च करून अशी तजवीज करा कीं, आतांपासून आठ प्रहरांच्या आंत त्या दोन्ही माणसांनीं कांहीं तरी निमित्तानें राणीसाहेबांची रजा घेऊन राजवाड्यांतून कायमचें निघून जावें."

**बसवप्रभु** आणि **कालनीती** हे येवढा वेळपर्यंत जरी मोठ्या शांतपणें आणि विकारशून्य मनानें **कुमुद्वंधूशीं** बोलत होते तथापि **कुमुद्वंधूच्या** तोंडांतून ही गोष्ट

बाहेर पडतांच त्यांच्या मनाला एकदम धक्का बसला आणि त्यांच्या विचारांचा बराच घोंटाळा उडून ते बावरल्यासारखे एकमेकांकडे पाहूं लागले.

थोड्या वेळानें ते पूर्ववृत्तीवर आले, आणि **बसवप्रभु** बराच शांत होऊन **कुमुदबंधूस** विचारतो, " पण कांहो सरदारसाहेब, तुम्ही ह्मणतां, तुमच्या राणीसाहेबांच्या सन्निधानीं असणारीं हीं माणसें असून आमचें वजन त्यांच्यावर चालेल ! अशीं हीं माणसें तरी कोण?"

" कोण ! मीच सांगूं का तुह्मांला ? ठीक आहे ! " **कुमुदबंधु** कपाळास आंठ्या घालून तिरस्कारयुक्त स्वरानें उत्तर करितो, " ज्या माणसांना त्यांच्या निर्मल राजनिष्ठेपासून तुह्मीं च्युत केलेंत, ज्यांच्या शुद्ध मनाला कृतघ्नतेचा धडा शिकवून प्रत्यक्ष त्यांच्या पूज्य राज्ञीनें व प्रिय मैत्रिणीनें त्यांच्यावर केलेल्या सहस्रावधि उपकारांची फेड केवळ नीचपणानें आणि विश्वासघातकीपणानें तुह्मीं करायला लावली, ज्यांना आपल्या प्रेमपाशांत गुंतवून तुह्मीं कुटिलपणानें ज्यांच्याकडून गुप्त हेरांचेंही काम करविलेंत, आणि या सर्व पापमार्गांचें अवलंबन करावयास लावून ज्यांच्या हातून तुह्मीं राजद्रोहासारखें व मित्रद्रोहासारखें घोर पातक घडविलेंत त्याच तुह्मा दोघांच्या दोघी प्रियकरणी, **विशाखा व अनुराधा** ! "

**कुमुदबंधूचें** हें जोरदार भाषण ऐकून या दोघांच्याही उरांत एकदम धडकी भरली. ते अतिशय भयभीत होऊन एकमेकांकडे व **कुमुदबंधूकडे** कांहीं वेळ पाहत राहिले. थोड्या वेळानें दोघांच्याही मनांत एकदम एकच विचार येऊन ते दोघेही एकदमच ओरडले, " पुरावा ! याबद्दल तुमच्याजवळ काय पुरावा आहे ? "

" काय, तुह्मांला पुरावा पाहिजे ? आहे; आणि तो येथेंच आहे ! **पंचगांग** देशाच्या राज्ञीविरुद्ध आपण रचलेल्या शेंकडों कारस्थानांचा व तुमच्या विश्वासघातकी वर्तनाचा पुरावा ज्या ठिकाणीं आहे त्याच ठिकाणीं याही गोष्टीचा पुरावा आहे. " असें ह्मणून **कुमुदबंधूनें** डाव्या हातांत असलेली थैली थोडी पुढें केली आणि फिरून ह्मणाला, " दोन महिन्यांपूर्वी राणीसाहेबांची स्वारी **गिरिद्वारीं** असतां तेथून त्यांचा निघण्याचा बेत बदलला व दहा घटका दिवसास न निघतां त्या पहाटेस दोन घटका रात्रीं निघणार ह्मणून **जयद्रथरायाला** कोणीं कळविलें ? राणीसाहेबांचे बेत कोणीं फोडिले ? ज्या दोन चंचल स्वभावाच्या मूर्ख पोरींचीं नांवें मीं घेतलीं, त्यांनींच ! त्यांच्याकडून जी माहिती मिळेल ती घेण्याकरितां आणि बंडखोर सरद्वारांकडे ती पोंचविण्याकरितां गोसाव्याचें सोंग घेऊन **गिरिद्वारच्या** वाड्यांतील राणीसाहेबांच्या शयनमंदिराच्या खिडकीखालीं चोरासारखा छपून उभा होता तो कोण ? सरदार **बसवप्रभु**, ती आपलीच स्वारी ! **कूर्मदुर्गास जयद्रथरायाकडे** जासुदाबरोबर आंकड्यांच्या भाषेत लिहिलेली चिठ्ठी पाठविली ती कोणीं ? तीही आपणच, सरदार **बसवप्रभु** ! असो; आपल्याला फिरून एकवार मी सांगतों. आपणा दोघां-

पाशीं अंतःकरण ह्मणून कांहीं पदार्थ असेल, आपल्या ठिकाणीं कांहीं दयेचा अंश तरी शिल्लक असेल, आणि आपल्या अंगीं थोडासा तरी मर्दपणा असेल व त्या गरीब पोरींवर आपलें थोडें तरी प्रेम असेल, तर त्यांना या भयंकर प्रसंगांतून वांचवा ! "

**बसवप्रभु** आणि **कालनीती** या दोघांच्याही मनांत कांहीं दुष्ट विचार येऊन त्यांनीं एकमेकांकडे व जवळच असलेल्या आपल्या तलवारींकडे पाहिलें. त्यांच्या नुसत्या दृष्टीवरून त्यांचा हेतु **कुमुदबंधू**स कळला. त्याबरोबर त्यानें डाव्या हातांतील थैली झटदिशीं चिलखताच्या आंत कमरेशीं खोंचली. तो उठून उभा राहिला आणि तलवारीला हात घालून ह्मणाला, " शेवटपर्यंत विश्वासघाताशिवाय तुह्मांला दुसरें हत्यारच नाहींना ! ठीक आहे. आपल्या दोघांपैकीं एकानें तरी माझ्या अंगास स्पर्श करण्याकरितां पुढें मात्र सरावें कीं या ठिकाणीं रक्ताचे पाट वाहिल्याशिवाय रहावयाचे नाहींत हें ध्यानांत ठेवा ! "

**कुमुदबंधू**च्या आंगचा पराक्रम या दोघांही वकिलांस पूर्वीपासून ठाऊक होता, आणि शिवाय त्याबद्दलचे वर्णन त्यांनीं नुकतेंच **श्वेतपादा**च्या तोंडून ऐकिलें होतें. यामुळें दोघेही हतवीर्य व निरुपाय होऊन त्याच्या तोंडाकडे पाहूं लागले आणि शेवटीं **बसवप्रभु** अत्यंत नम्रपणें म्हणाला, " सरदारसाहेब, आपल्या सर्व अटी आम्हांस कबूल आहेत. आम्ही सर्व प्रकारें जिंकलों गेलों आहोंत. आतां आपली पहिली अट—"

" माझी पहिली अट आतां हीच, " **कुमुदबंधु** त्याला पुरतें न बोलूं देतांच ह्मणतो, " कीं तुमच्या या भाषणांत खरेपणा किती आहे हें मला कळलें पाहिजे. म्हणून प्रथम **गुहसिंहा**कडून येणारें द्रव्य येथून बंडखोरांच्या छावणींत नेण्याकरितां **जयद्रथराया**कडून आलेल्या गृहस्थाची व माझी गांठ पडली पाहिजे. "

" असे या तर सरदारसाहेब माझ्या मागून. " असें ह्मणून **बसवप्रभूनें** दिवाणखान्यास लागून असलेल्या एका खोलीचें दार उघडलें आणि **कुमुदबंधू**सह आणखी दोन खोल्या ओलांडून अगदीं मागच्या एका खोलींशीं तो गेला, आणि खोलीचें दार उघडून म्हणाला, " चला आंत सरदारसाहेब. "

**कुमुदबंधूनें** दाराच्या उंबऱ्यांत पाय टाकला. खोलींत बिछाईत घातलेली असून दिवे वगैरे लावले होते व सर्व तऱ्हेनें खोली सुशोभित केली होती. बिछायतीवर सुमारें वीस बावीस वर्षांचा एक तरुण गृहस्थ बसलेला होता. तो कोणाची तरी वाट पहात असावा असें दिसलें. दार उघडतांच तो एकदम उठून उभा राहिला. त्याचा पोषाख ज्या बिछायतीवर तो बसला होता त्या बिछायतीस व त्याच्या एकंदर स्थितीस शोभण्यासारखा नव्हता. अंगावरील कपड्यांवरून एकाद्या सरदाराजवळील तो सेवक असावा असें दिसत होतें. त्याचे डोळे, त्याचा चेहरा, एकंदर शरीराची आकृती आणि त्याच्या अंगावरील कपडे याच्याकडे नजर जातांच **कुमुदबंधु** एकदम बावरल्यासारखा झाला. तरुण सेवकाचें सोंग घेऊन ज्या **नलिनीनें** **कुमुदबंधूची**

बाहेर पडतांच त्यांच्या मनाला एकदम धक्का बसला आणि त्यांच्या विचारांचा बराच घोंटाळा उडून ते बावरल्यासारखे एकमेकां-कडे पाहूं लागले.

थोड्या वेळानें ते पूर्ववृत्तीवर आले, आणि **बसवप्रभु** बराच शांत होऊन **कुमुदबंधूस** विचारतो, " पण कांहों सरदारसाहेब, तुम्ही ह्मणतां, तुमच्या राणीसाहेबांच्या सन्निधानीं असणारीं हीं माणसें असून आमचें वजन त्यांच्यावर चालेल ! अशीं हीं माणसें तरी कोण?"

" कोण ! मीच सांगूं का तुह्मांला ? ठीक आहे ! " **कुमुदबंधु** कपाळास आंठ्या घालून तिरस्कारयुक्त स्वरानें उत्तर करितो, " ज्या माणसांना त्यांच्या निर्मल राजनिष्ठेपासून तुह्मीं च्युत केलेंत, ज्यांच्या शुद्ध मनाला कृतघ्नतेचा धडा शिकवून प्रत्यक्ष त्यांच्या पूज्य राज्ञीनें व प्रिय मैत्रिणीनें त्यांच्यावर केलेल्या सहस्रावधि उपकारांची फेड केवळ नीचपणानें आणि विश्वासघातकीपणानें तुह्मीं करायला लावली, ज्यांना आपल्या प्रेमपाशांत गुंतवून तुह्मीं कुटिलपणानें ज्यांच्याकडून गुप्त हेरांचेंही काम करविलेंत, आणि या सर्व पापमार्गांचें अवलंबन करावयास लावून ज्यांच्या हातून तुह्मीं राजद्रोहासारखें व मित्रद्रोहासारखें घोर पातक घडविलेंत त्याच तुह्मा दोघांच्या दोघी प्रियकरणी, **विशाखा** व **अनुराधा** ! "

**कुमुदबंधूचें** हें जोरदार भाषण ऐकून या दोघांच्याही उरांत एकदम धडकी भरली. ते अतिशय भयभीत होऊन एकमेकाकडे व **कुमुदबंधूकडे** कांहीं वेळ पाहत राहिले. थोड्या वेळानें दोघांच्याही मनांत एकदम एकच विचार येऊन ते दोघेही एकदमच ओरडले, " पुरावा ! याबद्दल तुमच्याजवळ काय पुरावा आहे ? "

" काय, तुह्मांला पुरावा पाहिजे ? आहे; आणि तो येथेंच आहे ! **पंचगांग** देशाच्या राज्ञीविरुद्ध आपण रचलेल्या शेंकडों कारस्थानांचा व तुमच्या विश्वासघातकी वर्तनाचा पुरावा ज्या ठिकाणीं आहे त्याच ठिकाणीं याही गोष्टीचा पुरावा आहे. " असें ह्मणून **कुमुदबंधूनें** डाव्या हातांत असलेली थैली थोडी पुढें केली आणि फिरून ह्मणाला, " दोन महिन्यांपूर्वीं राणीसाहेबांची स्वारी **गिरिद्वारीं** असतां तेथून त्यांचा निघण्याचा बेत बदलला व दहा घटका दिवसास न निघतां त्या पहाटेस दोन घटका रात्रीं निघणार ह्मणून **जयद्रथराया**ला कोणीं कळविलें ? राणीसाहेबांचे बेत कोणीं फोडिले ? ज्या दोन चंचल स्वभावाच्या मूर्ख पोरींचीं नांवें मीं घेतलीं, त्यांनींच ! त्यांच्याकडून जी माहिती मिळेल ती घेण्याकरितां आणि बंडखोर सरदारांकडे ती पोंचविण्याकरितां गोसाव्याचें सोंग घेऊन **गिरिद्वार**च्या वाड्यांतील राणीसाहेबांच्या शयनमंदिराच्या खिडकीखालीं चोरासारखा छपून उभा होता तो कोण ? सरदार **बसवप्रभु**, ती आपलीच स्वारी ! **कूर्मदुर्गास** **जयद्रथराया**कडे जासुदाबरोबर आंकड्यांच्या भाषेंत लिहिलेली चिट्ठी पाठविली ती कोणीं ? तीही आपणच, सरदार **बसवप्रभु** ! असो; आपल्याला फिरून एकवार मी सांगतों. आपणा दोघां-

पाशीं अंतःकरण ह्मणून कांहीं पदार्थ असेल, आपल्या ठिकाणीं कांहीं दयेचा अंश तरी शिल्लक असेल, आणि आपल्या अंगीं थोडासा तरी मर्दपणा असेल व त्या गरीब पोरींवर आपलें थोडें तरी प्रेम असेल, तर त्यांना या भयंकर प्रसंगांतून वांचवा ! "

**वसवप्रभु** आणि **कालनीती** या दोघांच्याही मनांत कांहीं दुष्ट विचार येऊन त्यांनीं एकमेकांकडे व जवळच असलेल्या आपल्या तलवारींकडे पाहिलें. त्यांच्या नुसत्या दृष्टीवरून त्यांचा हेतु **कुमुदबंधूस** कळला. त्याबरोबर त्यानें डाव्या हातांतील थैली झटदिशीं चिलखताच्या आंत कमरेशीं खोंचली. तो उठून उभा राहिला आणि तलवारीला हात घालून ह्मणाला, " शेवटपर्यंत विश्वासघाताशिवाय तुह्मांला दुसरें हत्यारच नाहींना ! ठीक आहे. आपल्या दोघांपैकीं एकानें तरी माझ्या अंगास स्पर्श करण्याकरितां पुढें मात्र सरावें कीं या ठिकाणीं रक्ताचे पाट वाहिल्याशिवाय रहावयाचे नाहींत हें ध्यानांत ठेवा ! "

**कुमुदबंधूच्या** अंगचा पराक्रम या दोघांही वकिलांस पूर्वींपासून ठाऊक होता, आणि शिवाय त्याबद्दलचे वर्णन त्यांनीं नुकतेंच **श्वेतपादाच्या** तोंडून ऐकिलें होतें. यामुळें दोघेही हतवीर्य व निरुपाय होऊन त्याच्या तोंडाकडे पाहूं लागले आणि शेवटीं **वसवप्रभु** अत्यंत नम्रपणें म्हणाला, " सरदारसाहेब, आपल्या सर्व अटी आम्हांस कबूल आहेत. आम्ही सर्व प्रकारें जिंकलों गेलों आहोंत. आतां आपली पहिली अट—"

" माझी पहिली अट आतां हीच, " **कुमुदबंधु** त्याला पुरतें न बोलूं देतांच ह्मणतो, " कीं तुमच्या या भाषणांत खरेपणा किती आहे हें मला कळलें पाहिजे. म्हणून प्रथम **गुहसिंहाकडून** येणारें द्रव्य येथून बंडखोरांच्या छावणींत नेण्याकरितां **जयद्रथरायाकडून** आलेल्या गृहस्थाची व माझी गांठ पडली पाहिजे. "

" असे या तर सरदारसाहेब माझ्या मागून. " असें ह्मणून **वसवप्रभूनें** दिवाणखान्यास लागून असलेल्या एका खोलीचें दार उघडलें आणि **कुमुदबंधूसह** आणखी दोन खोल्या ओलांडून अगदीं मागच्या एका खोलीशीं तो गेला, आणि खोलीचें दार उघडून म्हणाला, "चला आंत सरदारसाहेब."

**कुमुदबंधूनें** दाराच्या उंबऱ्यांत पाय टाकला. खोलींत बिछाईत घातलेली असून दिवे वगैरे लावले होते व सर्व तऱ्हेनें खोली सुशोभित केली होती. बिछायतीवर सुमारें वीस बावीस वर्षांचा एक तरुण गृहस्थ बसलेला होता. तो कोणाची तरी वाट पहात असावा असें दिसलें. दार उघडतांच तो एकदम उठून उभा राहिला. त्याचा पोषाख ज्या बिछायतीवर तो बसला होता त्या बिछायतीस व त्याच्या एकंदर स्थितीस शोभण्यासारखा नव्हता. अंगावरील कपड्यांवरून एकाद्या सरदाराजवळील तो सेवक असावा असें दिसत होतें. त्याचे डोळे, त्याचा चेहरा, एकंदर शरीराची आकृती आणि त्याच्या अंगावरील कपडे याच्याकडे नजर जातांच **कुमुदबंधु** एकदम बावरल्यासारखा झाला. तरुण सेवकाचें सोंग घेऊन ज्या **नलिनीनें** **कुमुदबंधूची**

**कूर्मदुर्गां**तून दोन महिन्यांपूर्वी सुटका केली होती त्याच **नलिनी**ची ही प्रत्यक्ष प्रतिकृति आपल्यापुढें आणून ठेविली आहे कीं काय, असा त्याला एकदम भास झाला !

" **नलिनीच** ही ! " येवढेच अस्पष्ट उद्गार त्या स्थितींत बेसावधपणें चहूंदिशीं त्याच्या तोंडांतून निघाले आणि मनांत भलतीच कुशंका येऊन त्याच्या हृदयाला असा कांहीं पीळ पडला, कीं त्याला वाटलें आतां आपले प्राण जातात खचित !

## भाग १४ वा.

( नूतन मित्र. )

' **जयद्रथराया**चा विश्वसनीय हस्तक ' ह्मणून जो सेवक वेषधारी तरुण सरदार आपल्यापुढें उभा आहे तो कदाचित् पुरुष नसून पुरुषाचा वेष घेतलेली ती **नलिनी**च असेल अशी दुष्ट कल्पना नुसत्या आकारसादृश्यावरून **कुमुदबंधू**च्या मनांत पहिल्या झटक्याबरोबर आली खरी; पण ती एक निमिषार्धपर्यंतही टिकली नाहीं. ती कल्पना पहिल्या विचाराबरोबर नाहींशी झाली, इतकेंच नव्हे तर असल्या निष्कलंक आचरणाच्या व शुद्ध अंतःकरणाच्या आपल्या प्रियेविषयीं असली कुशंका आपण मनांत येऊं दिली आणि अगदीं अत्यल्प कालपर्यंत तरी तिचा तेथें वास होऊं दिला हा आपण फारच भयंकर अपराध केला असें त्याला वाटलें,आणि तो स्वतःवर फारच रागावला. पण कसेंही झालें तरी स्वतःवरचा राग फार वेळ टिकत नाहीं हा सर्वसाधारण नियम आहे; आणि या नियमानुसार त्यानें स्वतःस लवकरच क्षमा केली. तथापि आकृतीनें, चेहेऱ्यानें व पोषाखानें पुरुषवेषधारी **नलिनी**ची केवळ प्रतिकृतीच असा भासणारा हा तरुण गृहस्थ आपल्यापुढें उभा असलेला पाहून त्याला जो अचंबा वाटला होता, तो मात्र लवकर नाहींसा झाला नाहीं. **कुमुदबंधु** आणि **बसवप्रभु** खोलींत शिरतांच **बसवप्रभु** किंचित् पुढें सरले आणि त्या सेवकवेषधारी तरुण गृहस्थास उद्देशून ह्मणाले, " **बालार्कराय** हे सरदार तुमची भेट घ्यावी ह्मणून आले आहेत. त्यांचें तुमच्याकडे काय काम आहे तें तुम्हाला तेच सांगतील. मात्र कोणत्याही प्रकारें तुमच्या केंसासही आपण धक्का लावणार नाहीं असें यांनीं मजजवळ वचन दिलें आहे. " इतकें बोलून **बसवप्रभु** खोलीबाहेर गेले आणि त्यांनीं खोलीचें दार लावून घेतलें.

' **बालार्कराय** ' हें नांव कानीं पडतांच **कुमुदबंधू**चें आश्चर्य नाहींसें झालें व हा **नलिनी**चा भाऊ असावा ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली. कारण यापूर्वी एकवार हें नांव त्यानें **विनयादित्य**मामांच्या तोंडून ऐकलें होतें. खरें पाहतां **बालार्कराय** हा **नलिनी**चा भाऊ असावा एवढी गोष्ट कळण्यास फार अवकाश नको होता, किंवा तें सांगण्यास **बसवप्रभू**चीही जरूरी नव्हती. पण **कुमुदबंधू**चें मन पहिल्या झटक्याबरोबर विलक्षण कल्पनेनें गोंधळून गेल्यामुळें त्याच्या लक्षांत ही गोष्ट लवकर आली नाहीं. असो.

सेवकाच्या वेषानें **कुमुदबंधू**समोर उभा

# केसरींतील निवडक निबंध

## भाग दुसरा.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत, अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

### विषयानुक्रमणिका.

ज्ञान.
अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
जूट.
मनुष्यांचें सामाजिक कर्तव्य.
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्णावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?
बालविवाहापेक्षां सतीच बरी !
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?
चैन.
स्त्रीदास्यविमोचन.
तंबाखू.
चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें ?
आह्मा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचे म० चऱ्हाट.
एक वृद्ध पोलिटिकल अत्याबाई.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे
व्यायाम.
परभाषेंतील शब्दांची योजना.
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची अवश्यकता.
उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बायबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला.
प्रसिद्धीकरण.
ब्रह्मदेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गमतीचे प्रश्न.
पाऊस.
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार.
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० कैरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?
,, उत्तरार्ध.
ज्याच्या त्याच्या ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज.
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति.

**म्यानेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें.**

# विक्रीस तयार.

रा० रा० गोविंद बल्लाळ देवल, 'दुर्गा,' 'संगीत मृच्छकटिक' 'झुंजारराव' इत्यादि नाटकांचे कर्ते यांनीं केलेलें

# संगीत शापसंभ्रम नाटक.

हें बाणकादंबरीच्या आधारें रचिलें असून अत्यंत रसभरित आहे व यास

**श्रीमंत होळकरसरकारांनीं ८०० रुपयांचें बक्षीस दिलें आहे.**

किंमत रु० १, ट. ख. १ आणा, व्हा. पे. सुद्धां १ रु. २ आ.

☞ पुस्तकें पुणें येथें नवीन किताबखान्यांत व मुंबईस रा० पोतदार यांजकडे कांदेवाडी व रामवाडी येथें विकत मिळतील.

---

## विक्रीस तयार

### सरदार परशुराम भाऊ पटवर्धन यांचे पराक्रम.

अथवा

(पेशवाईतील धामधुमीचा देखावा.)

रचणार—धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे. हा ग्रंथ दक्षिणाप्राईज कमिटीनें पसंत करून त्याबद्दल बक्षिस दिलें आहे.

पटवर्धन हे ब्राह्मणसरदार असून प्रसिद्ध वृद्ध पुरुष निझामअली ह्यांनं ज्याप्रमाणें पेशवाईची अव्वल अखेर झाडून सारी पाहिली, त्याप्रमाणेंच परशुरामभाऊ पटवर्धन यांचे हयातींत पेशव्यांचे गादीवर चारपांच पेशवे होऊन गेले. तितक्या अवधींत पेशव्यांच्या दरबारांत राजकारस्थानाची जी विलक्षण दंगल उडाली होती व नानाफडणीस व महादजी शिंदे यांच्या मसलतीचा जो बहारीचा सामना चालला होता, त्याविषयींचें चित्तवेधक वर्णन या ग्रंथांत विस्तारानें देण्याचा यत्न केला असून हरिपंत फडके, त्रिंबकराव मामा, इंग्लिश, निझाम, हैदर इत्यादिकांविषयीं विस्तृत माहिती योग्य स्थलीं दिली आहे.

मिळमिळीत व बखरी भाषेला नाकें मुरडून इतिहासवाचनाचा जे कंटाळा करीत असतील, किंवा कादंबऱ्यांतील काल्पनिक वीरवर्णनानेंच जे आपली तहान भागवून घेत असतील व ब्राह्मण ह्मणजे मूळचे नेभळे अशी ज्यांची भ्रामक समजूत असेल, अशा लोकांस पुढील चरित्र अत्यंत उपयुक्त व मनोरंजक वाटेल अशी उमेद आहे; कारण ऐतिहासिक कादंबरीच्या धर्तीवर रचलेल्या ह्या पुढील ग्रंथाच्या जोरदार व हृदयद्रावक भाषेखेरीज प्रत्येक ऐतिहासिक स्थलाची व प्रसंगाची सत्यता सिद्ध करण्याकरितां ग्रंथकर्त्यानें टीपेंत जागोजाग आधार दिले आहेत.

किंमत १२ आणे, ट० हं० २ आणे.

---

### चार्लस ब्राडला, एम्. पी.

यांचें चरित्र 'विलायतचा प्रवास' या पुस्तकाच्या विद्वान् कर्त्यांनीं लिहिलें. पूर्णस्वातंत्र्यभक्त, दुर्बलांचा कैवारी, सत्पक्षाचा अभिमानी, धीरोदात्त पुरुषांत अग्रणी, या दुर्दैवी आर्यभूचा परम उपकारी मित्र अशा या अलौकिक पुरुषाचें बोधपर चरित्र वाचल्यापासून मनावर सुसंस्कार झाल्याशिवाय राहणार नाहीं. किं० ४ आणे: टपालहांशील ६ पै.

म्यानेजर आर्यभूषण छापखाना, पुणें.

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक ८.

# नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c*

अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| वीरमणी आणि शृंगारसुंदरी... ... ... ... | ८१ ,, शेवटपर्यंत मुखपृष्ठ सह. |
| कुवलयपूर्वी राणी कुमुद्वती... ... ... ... ... ... | २१७ ,, २३२ |


पुणें आर्यभूषण छापखान्यांत
हरि नारायण गोखले यांनीं छापिलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व नकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.
[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३ मागाहून ४॥. शिवाय ट.हं. ६ आणे.
आगष्ट १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें

# विक्रीस तयार.

## मुंबई हेमंतव्याख्यानमाला.

अनेक विद्वान, बहुश्रुत, अनुभवी गृहस्थांनीं निरनिराळ्या विषयांवर दिलेलीं, माहितीनें भरलेलीं, उन्नत विचारांनीं व कल्पनांनीं परिप्लुत, मनोरंजनाचें व मनोविकासाचें उत्कृष्ट साधन अशीं

सन १८८९ ते १८९३ या ५ सालांतील.

## एकोणतीस व्याख्यानें.

एकदम घेणारांस किं.रु० ३, पो. ।॥-

ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म किंवा वेद व वैदिक धर्म.—प्रो० भागवतकृत ०४ ०॥

आमचे कलाकौशल्यांत सुधारणा करण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत—मि० के० बा० पेठेकृत ०२॥ ०॥

धर्मौदार्य.—वे० शा० रा० बाळ यज्ञेश्वरशास्त्री गुरजरकृत.................. ०१। ०॥

स्थावरजंगमात्मक सृष्टीविषयीं माहिती. का० बा० काणे एल. एम. अॅन्ड एस. कृत ०२ ०॥

प्रयागांतील राष्ट्रीयसभेची हकीकत. डा. स० बा० काणे. एल. एम. अॅन्ड एस. कृत ...................... ०१। ०।

मोगल व मोगलीधर्म. प्रो० रा० रा० भागवतकृत. ... ... . . ...०१॥ ०॥

दारू पिणें रा. सा. बा० आ० गुप्तेकृत ०१ ०॥

आमची धर्मादाय पद्धती ज. द्वा. कोल्हटकरकृत .. ... ... ...०१॥ ०॥

युरोपच्या इतिहासापासून आपल्या लोकांनीं काय शिकावें.—रा०सा० बा० आ० मोडककृत ... .. . ... ०१॥ ०॥

जलधिजवर्णन.— डा० कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, स... मेजर टाणेंकृत ०३ ०॥

अँटिकार्न लॉ लीग . ......... ०१ ०॥

रानें कों यांचा हिंदुस्थानांत खप वा-गा. भांडारकरकृत .. . ......०१ ०॥

पार्स व पार्सीधर्म प्रो. भागवतकृत ... ०२। ०॥

षड्दर्शनसारनिरुक्ति—( षड्दर्शन व नास्तिकमतप्रदर्शन )—महामहोपा. भीमाचार्य झळकीकरकृत............ ०२॥ ०॥

आमची प्राचीन स्थिति, प्राचीन कायदे व त्यांचें बंधन रा. रा. म. बा. भट बी. ए. एल्. एल्. बी. कृत ०२ ०॥

शरीरसामर्थ्य—डा० मो. गो. देशमुखकृत ०१॥ ०॥

मध्यप्रदेशाची संक्षिप्त माहिती—का. त्रि. खरेकृत ....................... ०२ ०॥

हिंदुसमाजसुधारणा—रा० रा० रामचंद्र गोविंद तळवलकरकृत ......... ०३। ०॥

इतिहासाची पुनरावृत्ति—रा. रा. रा. ग. मुंडले बि. ए. एल्. एल्. बी. कृत ०१॥। ०॥

आमची देशीभाषा विद्यापीठीं शोभण्यासारखी आहे कीं नाहीं? प्रो० रा. रा. भागवतकृत........... ०२ ०॥

ब्रिटिश राज्यव्यवस्थेची वाढ व तिचें सांप्रतचें स्वरूप. प्रो० द्वा. ग. पाध्ये एम्. ए. कृत —.................. ०२ ०॥.

कै० वा० बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांचें चरित्र. रा० रा० बा. ना. देवकृत.............................. ०२॥ ०॥

इंद्रियविज्ञानविचार. डा० कान्होबा रणछोडदास कीर्तिकरकृत......... ०१॥ ०॥

रोगबीजविध्वंस. डा० कृष्णराव विश्वनाथ धुरंधरकृत ................ ०१ ०॥

शिवछत्रपतींच्या चरित्रांतील कित्येक मुद्दे प्रो० भागवतकृत ............ ०१॥ ०॥

समाज, शंकराचार्य, व सुधारक रा. पेठेकृत.............................०२॥ ०॥

आकाशसौंदर्य. आ. स. दुर्वा, एम्. ए. कृत.... ............ ............०१॥ ०॥

पाश्चात्यांच्या समागमाचे परिणाम पु०प० खरे बि. ए. एलएल्. बी. कृत ०२॥ ०॥

कराचे सामान्य नियम वि. कृ. भाटवडेकरकृत . ..... ........ .....०१॥ ०॥

**आर्यभूषण प्रेस, पुणें.**

वाटतो. वीरमणी आणि सुदैव यांची येथें पक्की ताटातूट झाली. हा पहा येथेंच मी माझ्या नशिबाला रामराम ठोकतों.—शेवटीं या थराला यावेंना ? हा वृक्ष जुना झाल्याबरोबर त्याचा आश्रय धरून रहाणाऱ्या माकडांनीं त्याला सोडलें काय ? ज्या लोकांना मी माझ्या हातावरच्या फोडाप्रमाणें पाळलें तेच आतां जयेंद्रपालाचे कुत्रे बनून त्याच्यापुढें लांगूलचालन करीत आहेत, त्याचे पाय चाटताहेत आणि त्याच्या भोंवतीं बागडताहेत. त्यांचीं तीं मिठ्ठा भाषणें ते आतां त्याच्या कानांत ओतीत आहेत. हा वीरमणी त्यांना एक थट्टेचा विषय होऊन बसला असेल. 'भली थेरड्याची खोड मोडली' म्हणून ते आतां मोठ्यानें खिदळत असतील. अरेरेरे, नाहीं सहन होत हें आतां मला. खरोखरीं मी सर्वस्वीं फशीं पडलों. हा मूर्खा वीरमणी ! भोग आपल्या निर्लज्ज स्त्रीलंपटपणाचीं फळें. अरे ही खोटया दिलाची सटवी, ही जारिणी; हिला तूं कशी ओळखली नाहींस ? तिच्या नुसतें नेत्राचें पातें लवतांच आपलें सारें वीर्य घालवायला तूं कसा तयार झालास ? घोर रण ह्मणजे तुला कोण आनंद पण तसा आनंद देखील तूं तिच्याकरितां टाकलास. तिचें हृदय ह्मणजे आपलें सर्वस्व, आपला मुकुट मानीत होतास पण तोच मुकुट पूर्वी कितीकांच्या डोक्यावर बसला होता याचा विचार नाहीं केलास. तिनें आपल्या मोहपाशांत तुझ्यासारख्या मूर्खाला गुंतवावें आणि शेवटीं काळाच्या दाढेंत द्यावें हेंच रास्त !—

मोहना येते.

अग, कां आलीस तूं ! माझी झाली ही शोभा पुरी नाहीं झाली वाटतें. यावेळीं भीमाचा त्वेष माझ्या अंगांत पाहिजे होता, ह्मणजे अगोदर या डाकिनीला आकाशांत गरगर फिरवून खालीं आपटून तिच्या शरिराचे तुकडे तुकडे केले असते. आणि मग गदा घेऊन साऱ्या हरामखोर स्त्रीजातीचा विध्वंस केला असता. आणि शेवटीं या मूर्खाच्या डोक्यांत ती घालून यापुढें तरी यानें आपलें हसें जगांत करून घेऊं नये असा बंदोबस्त केला असता.

**मोहना**—महाराज, आपला हा कोप व्यर्थ आहे.

**वीर०**—अग व्यर्थ कसा ? पण तूं तिचीच दासी. तिनें आपल्या कौटिल्यानें या वीरमणीच्या तलवारीची तीक्ष्ण धार काढून टाकून शेवटीं जयेंद्रपालाशीं दिलमिलाफ करून माझा सर्वस्वीं घात केला.

**मोहना**—शिव शिव, महाराज. नका या असल्या कुंभाडानें आपली जीभ विटाळूं. आतां तरी निदान तसें ह्मणणें अन्यायाचें आहे.

**वीर०**—अग, अन्यायाचें कसें ? काय करूं ? ती माझ्या तावडींतून सुटली, नाहीं तर तिचा प्राण घेतला असता आणि सूड उगवून तृप्त झालों असतों.

**मोहना**—तर मग महाराज, आपण तृप्त व्हा

या जगांत प्राण्याला यमाचें कर्ज एकदांच फेडतां येतें. तें तर त्या फेडून चुकल्या. आपण त्यांच्यावर जी पहांटेस आग पाखडली ती त्यांना सहन झाली नाहीं. त्यांची सारखी तळमळ तळमळ चालली होती. शेवटीं आपलें नांव कंठांत अर्धेमुर्धेंच धरून त्यांनीं प्राण सोडला.

**वीर०**—काय ? शृंगारसुंदरी या वीरमणीला सोडून गेली ?

**मोहना**—होय, महाराज.

**वीर०**—बरें तर, जा तूं. रागलोभाचा मागच खुंटला. मी येतो तिकडे इतक्यांत.

[ **मोहना** जाते.

रामसिंहा, . काढ आतां हें चिलखत. वीरमणीच्या चरित्रांतील शेवटचा भाग आला आतां. यावेळीं भीमाचें कवच जरी माझ्या अंगांत घातलें तरी यमाचा तीक्ष्ण भाला हें हृदयकपाट फोडल्यावांचून राहणार नाहीं. हृदया, आतां कसची वाट पाहतोस ? कर एकदाचा जोर आणि स्वतःच फोड तुझें कपाट. अरे, हीं हाडें ह्मणजे केवळ काड्यामोड्याची पेटी: त्यांचा चुरा करावयालारे काय तुला वेळ ?—प्रियेचें एकदां शेवटचें दर्शन घ्यावें. पण नको. त्या निर्जीव मातीला पाहून आतां काय करावयाचें आहे ? लोभ, मोह, राग, प्रेम, सर्व कांहीं संपलें. प्रिये, थांब, घाई करूं नको. हा पहा आलों तुझ्या मागोमाग. त्या शांतिसुखाच्या स्वर्गांत तरी आपले आत्मे निरंतर सहवाससुख घेतील. आपला तो जोडा पाहून देवांना देखील विस्मय किंबहुना हेवा वाटेल. इंद्रइंद्राणींचें तेज आपल्यापुढें फिक्कें पडेल. रामसिंहा !

**राम०**—जी, काय आज्ञा आहे ?

**वीर०**—शृंगारसुंदरीच्या मागें मीं जगावें हें चांगलें कारे ? देव याबद्दल मला हरामखोर व ढोंगी ह्मणत असतील. माझी प्रिया माझ्यावर रागावून गेली. तिच्या मागोमाग जाऊन तिची मला क्षमा मागितली पाहिजे. शृंगारसुंदरी नाहीं त्यामुळें हें जग मला शून्य अंधकारमय भासूं लागलें आहे. यांत धडपड करीत कोण राहतो आतां ? केवढें तिचें धैर्य ! तिनें आपल्या स्वतःला कसें जिंकावें हें खासें शिकविलें. तिनें जयेंद्रपालास फार नामी तऱ्हेनें ठकविलें ! मीं एवढालीं शौर्याचीं व छातीचीं कामें केलीं पण तिनें या एका कृत्यानें मला लाजविलें. रामसिंहा, तुला मीं लहानपणीं शत्रूच्या व मृत्यूच्या जबड्यांतून सोडवून आणून पोटच्या लेंकरांप्रमाणें वागविलें. तेव्हां ते उपकार स्मरून यावेळीं माझ्या उपयोगीं पड.

**राम०**—आपली कोणती नौकरी करावयाची?

**वीर०**—नौकरी कांहीं फारशी जड नाहीं. या तलवारीनें हें शीर या धडापासून वेगळें कर. पहा, एवढें केलेंस तर माझ्या उपकाराची फेड होईल इतकेंच नाहीं तर तुझे उलट माझ्यावर उपकार होतील.

**राम०**—महाराज, काय बोलतां हें ! आपला वध या हातानें करून पितृघाताचें पातक माझ्या शिरावर घेऊं काय ?

त्यापेक्षां महाराज आपणच आपल्या हातानें माझा प्राण अगोदर घ्यावा आणि मग आपल्याला वाटेल तशी आपली व्यवस्था करावी.

**वीर**०—रामसिंहा, तूं दूरवर विचार नाहीं केलास? अरे, मी जीवंत राहून त्या जयेंद्रपालाच्या तावडींत सांपडावें, त्यानें मला कैद करून नानाप्रकारें माझा छळ करावा, विजयगिरींत मला नेऊन आपल्या विजयप्रवेशाचे वेळीं तोऱ्यानें मला साऱ्या मिरवणुकीच्या अघाडीस उघडाबोडका करून हातापायांत बिड्या ठोकून भोंवतालीं नागव्या समशेरीचा पाहरा ठेवून रस्त्यांतून हिंडवावें हें तुला बरें वाटतें ना?

**राम**०—( कानावर हात ठेवून ) शिव, शिव! देवानें असा प्रसंग आणूं नये. असला प्रकार पाहण्याला मी जीवंत राहणार नाहीं.

**वीर**०—हा पहा तूं किती आपलपोट्या आहेस तो! अरे, तो प्रसंग तुझ्यानें पाहवणार नाहीं ह्मणून तूं जीव देणार, आणि मला तो प्रत्यक्ष भोगावयाला तूं जीवंत ठेवणार ना? समजलों. या जगांत इमान अगर प्रेम तत्वतः कधीं नसावयाचें. जोंपर्यंत हीं दाखवण्यांत फायदा आहे तोंपर्यंतच त्यांचा प्रवाह जोरानें वाहवयाचा; पण फायदा संपला कीं त्यांचाही झरा आटलाच.—पण जाऊं द्या. या वीरमणीला खरें खोटें इमान आणि प्रेम यांच्याशीं आतां काय करावयाचें आहे! रामसिंहा! जा तूं. आतां येथें उभा राहूं नको.

**राम**०—( आपल्याशीं ) आतां हे आपला जीव खास देणार. मग मला तरी जगून काय करावयाचें! युक्तीनें यांची तलवार तेवढी घ्यावी आणि—( उघड ) महाराज, आपण मजवर रागावलांसें दिसतां. तेव्हां आपल्या आग्रहासाठीं—

**वीर**०—( उत्सुकतेनें ) करतोस माझें काम?

**राम**०—होय. प्राण घेतों.

**वीर**०—घे तर ही तलवार.

**राम**०—( तलवार घेऊन ) पण महाराज, आपलें तें भव्य व वंदनीय मुख तिकडे करा. तें समोर असतां माझ्या हातून हें कृत्य व्हावयाचें नाहीं.

**वीर**०—हें पहा तोंड फिरविलें. ( तसें करतो. )

**राम**०—ही पहा तलवार उपसली.

**वीर**०—हुं, कर तर वार. एक घाव आणि दोन तुकडे.

**राम**०—पण महाराज, त्यापूर्वीं मी आपल्याला शेवटचा प्रणाम करतों. हरहर, साऱ्या जगाला पूज्य अशा या पायांच्या दर्शनाला मी अंतरणारना! देवा, काय हा दुःखाचा प्रसंग! या सूर्याच्या प्रकाशांतून मी निघून अंधकारांत पडणार. अथवा या सूर्याला ग्रहण लागलेलें पहाण्यापेक्षां हेंच बरें.

**वीर**०—हं, आटप बाबा.

**राम**०—हा पहा वार केला. ( मानेवर तलवार मारून घेतो व खालीं पडतो. ) परमेश्वरा, महाराजांना सुखी रा—ख!

**वीर**०—( मागें वळून पाहून ) रामसिंहा!

धन्य तुझी ! माझ्यापेक्षां तूं किती तरी पटीनें धीराचा व निश्चयाचा. मीच कसा असा भेंकड झालों कोण जाणे ! माझी प्रिया व तूं या दोघांनीं मला नामी धडा घालून दिला. पुढचें सारें अरिष्ट माझ्यावर कोसळणार हें मला दिसत असून व त्यांतून मुक्त होण्याचा मार्गही स्पष्ट डोळ्यापुढें असून मी एखाद्या मठाप्रमाणें बसून त्या रस्त्यानें मला कोणी नेईल का ह्मणून वाट पाहतों आहे. हजारों प्राण्यांना मीं आजपर्यंत परलोकाला पोंचविलें असेल; पण आज या एका प्राणाला या दुनियेंतून नाहींसा करणें माझ्या जिवावर आलें आहे.—अरे पण मी किती वेडा ! दुनियेंतून नाहींसें करणें ह्मणजे कांहीं विशेष गोष्ट नाहीं. ही माती, हें विनाशी शरीर, हा आत्म्याचा तुरुंग—याचा विध्वंस करून आत्म्याला मुक्ति द्यावयाची. आत्मा तर अमर आहे त्याचा नाश कधींच होणें नाहीं. फार झालें तर त्याचें स्थलांतर होईल. झाला निश्चय. ही तलवार या पोराचें पवित्र रक्त प्यायली आहे. हिनेंच आपला शेवट करून घ्यावा. प्रिये, शृंगारसुंदरी, आलों तुझ्या भेटीला. थोडा उशीर लागला याबद्दल तूं माफी करशीलच. वास्तविकपणें हा झालेला वियोग पुढच्या भेटीच्या वेळीं अधिक रंग आणील. हे देवी, या वीरमणीचा आणि तुझा कायमचा वियोग होणार. तर मग दे पाहूं एकदां शेवटचें दृढालिंगन.( तलवार मारून घेतो.) उं: ! या हाताचें कसब गेलें. बरोबरच आहे; माझी शक्ति अगोदरच वरतीं निघून गेली आहे. अययय ! ही स्थिति नाहीं सोसवत. कोण आहेरे बाहेर ? अरे या, लवकर या.

दोन **शिपाई** येतात.

अरे, माझ्यापासून तुह्मीं समशेर चालवावयाला शिकलांत. तर मग तें कसब आतां दाखवून हें माझें अपुरें राहिलेलें काम पुरें करा पाहूं.

**शिपाई**—अरेरेरे, गेला, गेला आमचा सेनापति, शिपायांचा सरदार, वीरांचा नायक, एक विलक्षण तेजाचा हिरा गेला. महाराज, हें आपण काय करून घेतलें ?

**मोहना** घाईघाईनें येते.

'मोहनाबाई, हें पहा काय संकट ओढवलें तें. आमचा वाली गेला.

**मोहना**—अगबाई, काय हा अनर्थ ! आमच्या बाईसाहेब आतां कांहीं प्राण ठेवीत नाहींत. त्यांच्या निरोपानें हें दुष्ट कृत्य केलें. तरी त्यांना वाटलेंच कीं कांहीं भलतें होईल ह्मणून. महाराज, काय आपण हें केलेंत ? बाईसाहेब खुशाल आहेत व आपल्याला भेटण्याची त्यांना इच्छा आहे. मघांचा निरोप आपला राग जावा ह्मणून त्यांनीं पाठविला होता, हें सांगण्याला व आपली क्षमा मागून आपल्याला त्यांच्याकडे नेण्यासाठीं त्यांनीं मला पुनः आपल्याकडे पाठविलें होतें. तों हा विपरीत प्रकार पाहण्याचें माझ्या नशिबीं यावें ना ? आतां त्यांना काय सांगूं ?

**वीर०**—अरेरेरे, केवढी चूक ! ओय्! माझी शक्ति जात चालली. मला लवकर तिच्याकडे न्या.

**मोहना**—अरे, त्यांना उचलून सिंदुरादेवीच्या देवळांत घेऊन या. मी पुढें जाऊन बाईसाहेबांना ही दुःखाची हकीकत कळविते. देवा, त्या हें ऐकतांच काय आकांत करतील कोण जाणे !

[ जातात.

---

**प्रवेश ७ वा.**–शहराच्या दरवाज्याबाहेर.

**जयेंद्रपाल, यादवराव, बलदेव, प्रतापसिंह, सिंधुनगरचे कोतवाल** वगैरे.

**यादवराव**—महाराज, आज आपले श्रम संपले. ह्या घ्याव्या सिंधुनगरच्या किल्ल्या. हे सिंधुनगरचे कोतवाल या शहरच्या प्रजेच्या वतीनें आपल्याला आंत बोलावीत आहेत.

**कोतवाल**—सरकार, यांनीं सांगितलें तें अक्षरशः खरें आहे. वीरमणींचा पत्ता नाहीं, शृंगारसुंदरीराणीसाहेब, दुःखीकष्टी होऊन सिंदुरादेवीच्या देवळांत राहिल्या आहेत. त्या ह्मणतात, “ माझे वीरमणीमहाराज नाहींत, तर मला हें राज्य घेऊन काय करावयाचें आहे. ” तेव्हां सरकार, आमचे आपणच स्वामी. आमचा प्रतिपाळ पोटच्या लेंकराप्रमाणें करावा.

**जयेंद्र०**-कोतवाल, या किल्ल्या तुमच्याजवळच ठेवा. तुमचा अधिकार पूर्वींचाच कायम आहे. शहराचा बंदोबस्त नीट ठेवा. लोकांना आश्वासन द्या. या जयेंद्रपालाच्या अंमलाखालीं आपापले कामधंदे स्वस्थ व शांत रीतीनें करणाराला कांहीं भय नाहीं हें जाहीर करा. विजयगिरीच्या गादीच्या नांवानें हा प्रांत आली खालसा करतों.

**यादव०**—सरकार, आतां गादीच्या नांवानें असें मोघम कां ? आपल्याच नांवानें कां कराना ?

**प्रताप०**—होय, आमचेंही तेंच ह्मणणें.

**जयेंद्र०**-त्याची इतक्यांत घाई नको. विजयगिरीला परत जाऊं. तेथें लोकांना आपण काय काय केलें हें सांगूं. आणि मग जर आपणा सर्वांची इच्छा दिसली तर-पण ती गोष्ट दूर आहे. तूर्त येथला बंदोबस्त पाहिला पाहिजे. यादवराव, तुह्मीं प्रतापसिंहाना घेऊन सर्व खजिना, कचेऱ्या, दप्तरें आपल्या ताब्यांत घ्या. जरूर कामें करण्यास ज्या ज्या अधिकारावर जे जे लोक असतील त्यांना हुकूम द्या. उद्यां बडा दरबार भरवून कायमची व्यवस्था करूं. कोतवाल, चला तुह्मी माझ्याबरोबर; सर्व वेशीवर जाऊन तेथें समक्ष बंदोबस्त करून मग शृंगारसुंदरीराणीसाहेब जेथें आहेत तेथें जाऊं. व्यवस्थेला बेतापुरते शिपाई बरोबर असूं द्या. बलदेव, तूंही चल बरोबर.

[ जातात.

---

**प्रवेश ८ वा.**–सिंदुरादेवीचें देऊळ.

**शृंगारसुंदरी** देवीपुढें डोकें ठेवून पडली आहे.

**शृंगार०**—( उठून ) अजून मोहना कां येत नाहीं ? खचित कांहीं तरी घात आहे मला आज एकसारखीं दुश्चिन्हेंच मेल

होताहेत. या नशिबीं काय आहे कोण जाणे! सिंदुरामाते, तुझा आश्रय मीं केला आहे. तूंच माझें रक्षण कर. वीरमणींची आणि माझी एकदां गांठ पडूं दे आणि मग यम या देहाचें काय पाहिजे तें करो.

मोहना येते.

कायग, काय झालें? येताहेत का ते? का टाकली त्यांनीं या शृंगारसुंदरीला? बोल, बोल लवकर. तुझें तोंड असें कष्टी कां? तुझ्या डोळ्यांतून पाणी कां वाहतें आहे? सांग काय तें. त्यांच्या जिवाला कांहीं अपाय नाहींना झाला?

**मोहना**—बाईसाहेब, माझ्या या फुटक्या नशिबीं—

**शृंगार०**—काय? माझा प्राण मला सोडून गेला? हारे देवा! (देवीपुढें कपाळ टेंकते.)

**मोहना**—बाईसाहेब, सावध व्हा. आतां शोक करून काय उपयोग? ते इतक्यांत येथें येतील. अजून जीवंत आहेत.

**शृंगार०**—जीवंत आहेत. तर मग मी त्यांच्या प्राणांना जाऊं देणार नाहीं. रडून ओरडून इतका आकांत मांडीन कीं यमाच्या दूतांनीं भिऊन पळून जावें. त्या यमालाही पण प्रेमाचा आवेश कसा असतो तो पाहूं दे.

**मोहना**—बाईसाहेब, ते पहा शिपाई त्यांना आणताहेत.

**शृंगार०**—(निरखून पाहून) नाहींग नाहीं. उगीच मीं आतां बोलले. ते जगावयाआशा दिसत नाहीं. अग, फुटलें माझें कपाळ! या शृंगारसुंदरीचें सौख्याचें गलबत फुटून बुडालें.-नको, नको माझें समाधान करूं. कसें समाधान व्हावें? अग, माझ्यावर केवढा घाला पडला हा? त्याला योग्य असा शोक न करणें ह्मणजे त्यांचा अपमान करणें, त्यांची किंमत हलकी करणें नव्हे का. अग पण हे आले पहा. या, या, महाराज. मला आपल्याला कडकडून भेटूं द्या. ज्या मांडीवर आपण नेहेमीं सुखानें विश्रांति घेत होतां तेथेंच आतां अखेरची विश्रांति घ्या. (शिपाई वीरमणीला घेऊन येतात.) अरे, सोडा त्यांना. तुमचे ते कठोर हात त्यांना खुपत असतील. आतां त्यांची शेवटची सेवा मी करणार. दुसऱ्या कोणाला करूं देणार नाहीं. हां, येथें असें डोकें ठेवा. आपल्याबरोबर येण्यासाठीं हें हृदय कसें धडपडतें आहे तें आपल्याला ऐकूं येईल. माझ्या ओठांत जर अमृत असतें तर किती बरें झालें असतें! ह्मणजे मी आपला जीव चांगला येईतों अस्सें अस्सें चुंबन घेत राहिलें असतें.

**वीर०**—प्रिये, मी तर मरणार खचित. मृत्यूनें मला तुझें चुंबन घेण्यापुरती सवड दिली याबद्दल मी त्याचा ऋणी आहें. अहाहा, या तुझ्या ओठांत अमृत नाहीं असें कोण ह्मणेल? त्यांचा स्पर्श होतांच माझा अंतरात्मा कसा गार झाला. प्रिये, मघाशीं तूं मला टाकून गेलीस असें जेव्हां ऐकलें—

**शृंगार०**—नका त्याची आठवण करूं.

कितीदुष्ट, घातकी मी. मीं तो तसा खोटा निरोप पाठवून आपला व माझा घात करून घेतला. मीं आपला मोठा अपराध केला. महाराज, प्राण टाकण्यापूर्वी त्याबद्दल मला क्षमा केली असें ह्मणा. नाहीं तर नकाच क्षमा करूं, ह्मणजे स्वर्गांत आपली गांठ पडल्यावर तेथें पुनः प्रेमकलह करण्याला हा आपला आयताच विषय होईल.

**वीर॰**—अग त्याबद्दल तुला वाईट वाटूं देऊं नको. झालें तें सारें ठीक झालें आहे. परमेश्वरानें तुझे डोळे माझ्या मागोमाग मिटले तर उत्तमच. नाहीं तर जयेंद्रपाल तुला विजयगिरीला घेऊन जाईल. त्याची सत्ता कबूल कर, पण अपमान करून घेऊं नकोस. त्याच्या पदरीं यादवराव नांवाचा सरदार आहे तो भोळा आणि सज्जन आहे. त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणावर विश्वास टाकूं नकोस.—

**शृंगार॰**—महाराज, मला कशाला कोण हवें आहे. जयेंद्रपालाच्या ताब्यांत गेल्यावर मानहानि झाल्याशिवाय कशी राहील ? छे: छे: छे: बाई, नको त्याची कल्पना देखील करावयाला ! मला विजयगिरींत नेऊन तो मेला पोरटा साऱ्या लोकांत माझी धिंडका काढील. सारे लोक—महार, मांग, धेड सुद्धां माझ्या अंगाशीं अंग घांसतील, माझ्या तोंडाशीं आपलीं तीं घाणेरडीं तोंडें आणून हंसतील, बेमुर्वतीनें माझ्याकडे पाहतील, टवाळ पोरें माझ्याकडे बोटें दाखवून "शिंदळ" "शिंदळ" ह्मणून ओरडतील, सभ्य लोक माझ्याकडे पाहून तोंडें फिरवितील, सभ्य स्त्रिया मला खिडक्यांतून पाहतांच माना खालीं घालतील.—देवा नकोरे ही अप्रतिष्ठा. मी आपलाच कित्ता गिरविणार आणि आपल्या मागोमाग वरतीं येतात.

**वीर॰**—अग तूं केव्हांही ये. या हृदयांत तुझी जागा कायम आहे. आणि हें पहा, माझ्यामागें माझ्याबद्दल शोक करूं नका. माझ्या मृत्यूंत वाईट वाटण्यासारखें कांहीं नाहीं. मी शत्रूला शरण गेलों नाहीं, किंवा अपमानानें मरत नाहीं. शूर वीरमणीनेंच शूर वीरमणीला जिंकलें आहे. शूराच्या हातचें मरण ह्मणजे सर्वांत श्रेष्ठ मान. मांझे प्राण चालले. शक्ती क्षीण झाल्या. माझ्यानें आतां बोलवत नाहीं. शृंगारसुंदरी, धर मला सांवरून. आईईई.

**शृंगार॰**—प्राणनाथ, आपण मला अनाथ करून चाललांना ? आजपर्यंत माझा वियोग एक क्षण देखील सहन होत नसे, आणि आतांच कसे अगदीं निष्ठुर बनलां ? अगबाई, चालले. मोहने, काय करूंग ? अग अडव यांच्या प्राणाला.( वीरमणी प्राण सोडतो. ) या भुवनत्रयाचें सार गेलें. हें सारें जग आतां शुष्क अरण्य बनलें. या जगांत सारें क्षुद्र तेवढेंच आतां काय तें बाकी राहिलें आहे. नांव घेण्यासारखें असें हें एक रत्न होतें तें हरवलें. हा शौर्याचा तेज:पुंज मालवला ! आतां जिकडे तिकडे काळोख. सूर्यनारायणा, आतां

कशाला तुझा तो एक नेत्र तरी उघडा ठेवतोस? त्याच्या उजेडानें काय ती जगांतील घाणच पाहावयाचीना?—प्राणप्रिया, एकदां तरी या दीन अनाथ प्रियेकडे आपले ते पाणीदार डोळे उघडून बघा. नाहींग नाहीं मोहने. आतां कसचें बघतात. गेलाग बाई प्राण. ( वीरमणीच्या प्रेतावर अंग टाकते. )

**मोहना**—राणीसाहेब!

**शृंगार०**—अग मी आतां कसची राणी! आतां राणीची ऐट संपली. मी आतां एक नुसती स्त्री आपल्या पतीकरितां शोक करणारी. अग त्या यमानें आपला हेवा साधलाग. त्याच्या डोळ्यांत आमचें हें सुखी जोडपें खुपत होतें. स्वर्गी न मिळणारें असें आमचें सुख आणि ऐश्वर्य पाहवलें नाहीं ह्मणून त्यानें त्या सुखाचें आणि ऐश्वर्याचें मूळच काढून नेलें. बरें आहे. त्याची मर्जी. त्याला पण खूप समजून असूं दे कीं मी माझ्या प्राणाला फार वेळ एकटा ठेवणार नाहीं. सावित्रीप्रमाणें यांना परत आणण्याचें सामर्थ्य जरी माझ्या अंगांत नसलें तरी त्यांच्या मागोमाग जाऊन त्यांना गाठण्याचें तर माझ्या हातीं आहे. आतां रडून आरडूनही उपयोगी नाहीं, किंवा अगदीं दगडाप्रमाणें मठ्ठ होणेंही रास्त नाहीं. माझ्या आयुष्यांतील शोभा गेली. आतां आयुष्य कंठणें नीरस आहे. छेः, आपल्या हातून तें व्हावयाचें नाहीं. मनाचा धडा करून यमाचें बोलावणें येण्याची वाट पाहत राहण्यापेक्षां मृत्यूच्या त्या भयंकर व अंधारमय गुहेंत आपण होऊनच शिरावें हें बरें.—पण मोहने, दाराशीं गडबड कसली आहे. पहा. [ **मोहना** जाते.

आणखी मेलें एखादें संकट येतें आहे कीं काय कोण जाणे! येऊं द्यात मेलीं किती येताहेत तीं. दुसरीं किती जरी आलीं तरी तीं एक यापुढें तुच्छ आहेत. मीं आपला आतां निश्चय केला आहे.

**मोहना** येते.

कायग, काय आहे?

**मोहना**—बाईसाहेब, घात झाला. आपण शत्रूच्या हातांत सांपडलों. जयेंद्रपाल, कोतवाल आणि शिपाई घेऊन आला आहे.

**शृंगार०**—कोण जयेंद्रपाल का? ( विचार करून ) ठीक आहे. येऊं दे त्याला. तूं इकडे ये पाहूं. माझा तो शेला आण आणि त्या अंगठ्या घेऊन ये. समजलीसना?

**मोहना**—होय बाईसाहेब, तसेंच आतां.

[ जाते व शेला आणि अंगठ्या घेऊन येते. **शृंगारसुंदरी** एक अंगठी आपल्या बोटांत घालते व **मोहने**च्या बोटांत दुसरी घालते.

**शृंगार०**—मोहने, आतां नाहीं मी कोणाला भीत.

**जयेंद्रपाल**, **कोतवाल** वगैरे येतात.

**जयेंद्र०**—कोठें आहेत राणीसाहेब?

**मोहना**—( हातानें दाखविते. )

**जयेंद्र०**—काय आहे हें? अरेरे, काका-

साहेब, आपली ही अशी स्थिति पाहण्याचें माझ्या नशिबीं यावेंना? खरोखर, दैवाचा प्रभाव कांहीं विलक्षण आहे. कोतवालसाहेब, काय सांगूं तुह्मांला? दैवानें अशा विपरीत स्थितींत यांना माझ्या दृष्टीस पाडलें त्यापेक्षां हे डोळे नाहींसे केले असते तरी पतकरतें. अहो, या याच हातांवर कींहो त्यांनीं मला लहानपणीं खेळवलें. त्यांचें माझें वैर आलें होतें खरें पण तें केवळ राजकारणापुरतें. त्यांना मीं असें पहावें अशी इच्छा कधींही माझ्या मनांत आली नाहीं. या लढाईंत माझें मन मुळींच नव्हतें. सर्व मंडळाच्या इच्छेप्रमाणें मी त्यांच्याशीं लढलों. मी केवळ माझ्या अधिकाराचा दास. परिस्थितीच्या योगानें मनुष्याला आपल्या इच्छेविरुद्ध गोष्टी कराव्या लागतात त्या या अशा. वीरमणी किंवा मी या दोघांपैकीं एकालाच या जगांत जागा. ती मी मोठ्या आनंदानें वीरमणींना दिली असती. पण लोकांच्या इच्छेबाहेर मला जातां येईना. लहानपणापासून ज्यांनीं मला लडिवाळपणानें वागविलें, जे माझ्या लाडक्या बहिणीचे पति, राज्यव्यवहारांत माझे स्पर्धी व जोडीदार, लढाईंत माझे गुरु, केवळ माझा उजवा हात, ज्यांच्या वीरश्रीनें सदा थरारणाऱ्या अंतःकरणाच्या प्रोत्साहनानें माझें अंतःकरण नेहमीं अधिक स्फुरण पावे,—अशा तऱ्हेनें जे मला सर्वथा पूज्य त्यांच्या मरणाबद्दल या डोळ्यांत पाणी येणें स्वाभाविक आहे. आग लागो या ऐहिक वैभवाला! याच्यामुळें जीं अंतःकरणें एक असावयाचीं त्यांच्यांत फूट होऊन हे असे शोचनीय परिणाम होतात. सर्व शरिराच्या स्वास्थ्याकरितां जसा एखादा नासलेला भाग तोडावा लागतो त्याप्रमाणेंच या राजकारणाकरितां आपल्या अत्यंत जिवलग आप्तावरही शस्त्र धरावें लागतें. नको, नको हें राजकारण. मला याचा वीट आला आहे.

**कोत०**—सरकार, आपण असें ह्मणून कसें चालेल? अरे, पण ह्या पहा आमच्या राणीसाहेब कशा निचेष्ट पडल्या आहेत त्या.

**जयेंद्र०**—कोण? याच का शृंगारसुंदरी राणीसाहेब? बाई, तुमची अशी स्थिति पाहून मला फार दया येते. पण शोक करून काय उपयोग? मन जरा आवरलें पाहिजे.

**शृंगार०**—महाराज, आतां कसचें मन आवरता? या दुर्भाग्येचा संसार आटपला. हिला आतां जगांतलें कांहीं नको आहे. महाराज, आपण आतां ह्मटलें तें सारें खरें. या शृंगारसुंदरीचे हे केवळ देव होते. त्यांचें अंतःकरण किती थोर! त्यांचा पराक्रम केवढा! त्यांच्या औदार्यझऱ्याला कधींच खळ पडला नाहीं. त्यांच्या हुंकाराबरोबर सारें जग थरथर कांपत असे. कोणत्याही व्यापारांत ते गुंतले असोत त्यांत ते शोभतच असत. असलें रत्न मला

सांपडलें असून तें मीं हरवलें. कसें हें दुःख विसरूं ?

जयेंद्र०-बाई, तुह्मीं ह्मणतां तें खरें. तुमच्यावर ही आकाशची कुऱ्हाडच कोसळली ! पण हा जयेंद्रपाल तुमची स्थिति मनांत आणून तिला योग्य असा मान द्यावयाला आणि तुमच्या दुःखाचा तुम्हांला विसर पडावा ह्मणून पाहिजे तें करण्याला तयार आहे.

शृंगार०-मला आतां कांहीं नको आहे. मी यांची छत्री बांधून तेथें रात्रंदिवस अश्रूंचा अभिषेक करीत आयुष्याचे राहिलेले दिवस कंठणार. माझीं मुलें आहेत त्यांना त्यांचें राज्य द्या ह्मणजे झालें.

जयेंद्र०-तुह्मी यावेळीं दुःखानें मूढ झालां आहां. ह्मणून आपण काय मागतों आहों याचें तुह्मांला भान नाहीं. येथें राहून निरंतर दुःख करीत राहणें शहाणपणाचें लक्षण नाहीं. विजयगिरींत चला, तेथें तुम्हांला कांहीं कमी पडूं देणार नाहीं. तुमचीं मुलें लहान आहेत. तीं तेथें तुमच्या जवळ राहून विद्याभ्यास करितील. वयांत आल्यावर राज्याधिकाराचें पाहतां येईल. मी आजपर्यंत जरी शत्रुत्वानें वागलों तरी तो दोष माझ्या अधिकाराचा. माझ्या मनाचा नव्हे. माझ्या साहाय्याचा अव्हेर करूं नका. नीट विचार करा.

शृंगार०-मी आपल्याबाहेर नाहीं. आतां सर्वस्वीं आपलीच सत्ता आहे. सांगाल तसें वागलेंच पाहिजे.

जयेंद्र०-अशा निराश होऊं नका. आतां आपल्या वाड्यांत चलतांना ? ही जागा तुमच्या लायख नाहीं. मी येथली सर्व व्यवस्था वीरमणींना जो योग्य मान त्या मानानुरूप करवितों.

शृंगार०-महाराज, मला आणखी थोडा वेळ येथेंच राहूं द्या. एकदां डोळे भरून पाहून घेते. पुनः हें मुख मला पाहावयाला मिळावयाचें नाहीं.

जयेंद्र०-ठीक आहे. मी जातों. कोतवालसाहेब, येथला बंदोबस्त नीट ठेवा.

[ जातो.

शृंगार०-कोतवालसाहेब, अंमळ बाहेर जातां का ? ( **वीरमणी**कडे बोट दाखवून ) कां तें आपल्या लक्षांत येईलच.

कोत०-राणीसाहेब मी आपल्या हुकुमाबाहेर जाईन असें आपल्याला वाटलें तरी कसें ?

[ जातो.

शृंगार०-मोहने, ऐकलींसना तीं मानभावाचीं बोलणीं. मला उगीच आपली परीक्षा पहावयाची होती ह्मणून राज्याची गोष्ट काढली. पण उत्तर किती कपटाचें आणि उडवाउडवीचें दिलें. बोलणें किती गोड, कोणी ह्मणेल याचें अंतःकरण अगदीं कोवळें लोण्यासारखें मऊ. मीं पण ह्मणावें तुला पक्का ओळखतें.

मोहना-खरेंच बाईसाहेब, आतां लवकर आटपावें हें बरें. पुढें कांहीं धडगत दिसत नाहीं. विजयगिरीला नेऊन हे आपले धिंडवडे काढणार, नकोग बाई तें.

**शृंगार०**—अग, यांच्या पश्चात् मी ही अशी अनाथ झाली आहें खरी. तरी पण जयेंद्रपालाच्या जयाला थोडासा तरी कमीपणा आणण्याची ताकद या अबलेंत आहे, समजलीस. अग माझ्या जिवाची मी मालकीण आहें. तो आहे नशिबाचा बंदा. अग, आतां आपल्याला एकच गोष्ट करावयाची आहे. ती केली कीं तिच्याबरोबर झाले सर्व व्यापार बंद, दैवाचे आकस्मिक घाले घालण्याची गति कुंठली, मग त्यानंतर लहानाचें मोठें व मोठ्याचें लहान हें स्थित्यंतर संपलें, आणि गाढ निद्रा लागून या जगांतल्या घाणेरड्या मातीमोल अन्नाचीही गरज सरली. ही गाढ निद्रा म्हणजे राजांना आणि भिकारड्यांना सारख्याच ममतेनें वागविणारी दाईच आहे बरें एक.

**मोहना**—बाईसाहेब, अशी कोणती बरें ती गोष्ट ?

**शृंगार०**—अग, सांगतें नाहीं तर दाखवितें तुला ती. अग मोहने, चल ये. जरा हात लाव. या लोडाला टेंकून मी बसतें. माझ्या प्रियाला येथेंच बसवून त्यांना मला गाढालिंगन देऊं दे. हं असें संभाळून. अग या कुडींत प्राण नसला म्हणून काय झालें. या नासक्या कुसक्या वस्तूंनीं भरलेल्या जगांत माझी ज्यावर सत्ता आहे अशी हीच काय ती अमोल वस्तु राहिली आहे. प्राणनाथ, माझी खात्री आहे आपला आत्मा येथेंच माझी आतुरतेनें वाट पाहत असेल. हा पहा मीं तुम्हांला बाहुपाश घातला. हें मीं तुमचें अखेरचें चुंबन घेतलें. अहाहा ! पाहिलीस का ग ही मौज ! प्राणनाथाचा चेहरा संतोषानें कसा खुलला आहे तो. यापुढें या जगांतलीं सारीं सुखें मला तुच्छ वाटतात. त्या जयेंद्रपालाला ह्मणावें तूं कितीही कपटी असलास, कितीही शक्तिमान् असलास, तरी शेवटीं आह्मीं दोघांनीं तुझ्या हातावर तुऱ्या दिल्याच. ते पहा वीरमणी कसे हासताहेत ते. अग, माझ्या या चतुराईबद्दल ते मला शाबासकी देताहेत. जयेंद्रपालाला सर्व गोष्टी अनुकूल असल्या ह्मणून काय झालें ! त्याचें सारें वैभव नशिबाच्या आधीन. तें तर बोलूनचालून पहिल्या प्रतीचें फसवें आणि घातकी ! केव्हां गोता देईल याचा नेम नाहीं. त्याचे दांत पाडण्याची ताकद ज्याच्या अंगांत असेल तोच धन्य खरा. मोहने, मघांशीं तूं विचारलें होतेंसना ती कोणती गोष्ट ह्मणून. ही पहा ती. (हातांतील अंगठी तोंडांत घालून चावते व तींतील विष गिळून टाकते.) अग, हें पहा मीं अमृत प्यायलें. या मृत्यूचें लोकांना इतकें भय कां वाटतें कोण जाणे ! मी तर त्याला आपला मित्र समजतें. आलें, प्राणनाथ आलें. मोहने, इकडे ये, मला भेट. मी चाललें आतां. (**मोहना** आलिंगन देते. **शृंगारसुंदरी वीरमणी**च्या तोंडावर तोंड ठेवून) प्रा—ण—ना—थ ! (तिची मान पडते.)

**मोहना**—शाबास बाईसाहेब, तुम्हीं पूर्वी

कशा असा, पण तुमचें मरण पतिव्रतेचें खरें. जगांत पतिव्रता ह्मणवून घेणाऱ्या बायकांत असें करण्याची छाती एखादीचीच होते. या जगांतला एक अमोल जोडा गेला. जगाचें नाक गेलें. बाईसाहेब, ही मी आलेंच आपल्या सेवेला. मदीरा तेथें अगोदर गेलीच आहे. रामसिंह आपलीच वाट पाहात असेल. मग मीं एकटीनें मागें राहवें ? तें कां ? (अंगठी चावून गिळते.) बाईसाहेब, हें पहा आपल्या पायांपाशीं डोकें ठेवलें. आलांत का बोवा ? चला, माझी तयारी आहे. कोतवाल, अहो कोतवाल, आंत या लवकर. हा पहा काय घात झाला तो.

कोतवाल घाईनें आंत येतो.

**कोत०**—हरहर ! काय हा प्रसंग ! मी बाईसाहेबांवर भरंवसा टाकून बाहेर गेलों आणि त्यांनीं मला असें फसविलेंना ?— पण त्यांत काय त्यांनीं वाईट केलें. हें असें व्हावें हेंच रास्त. मोहनाबाई !

**मोहना**—आतां नका मला त्रास देऊं. त्या पहा बाईसाहेब मला हांक मारीत आहेत. रागावतील लवकर गेलें नाहीं तर. आलेंहो आलें. रा–णी–सा–हे–ब ! (प्राण सोडते.)

**कोत०**—अरे, हीही मेली. सरकारांना हें ताबडतोब कळविलें पाहिजे.

[ पडदा पडतो. ]

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें

# वीरमणी आणि शृंगारसुंदरी.

महाकवी शेक्सपियरकृत अंटनी अँड क्लिओपाट्रा
या नाटकाच्या आधारें


## वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए.,

फर्ग्यूसन कालेजांतील इंग्रजी भाषाविषयाचे अध्यापक,


यांनीं रचिलें

तें


पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत

हरी नारायण गोखले यांनीं छापून प्रसिद्ध केलें.



(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.)



सन १८९३.

# नाटकांतील पात्रें.

वीरमणी ... ... ... ... विजयगिरींतील सरदार व सेनाध्यक्ष.
जयेंद्रपाल ... ... ... विजयगिरीची गादी मिळवूं इच्छिणारा मुख्य प्रधान.
दौलतसिंग, अधीरसिंग ... ... ... वीरमणीच्या हाताखालचे सरदार.
यादवराव... ... ... ... विजयगिरींतील एक सरदार प्रधानमंडळापैकीं.
प्रतापसिंह... ... ... ... " " "
बलदेव ... ... ... ... जयेंद्रपालाच्या पदरचा एक गृहस्थ.
संग्रामसिंह ... ... ... वीरमणीचा चुलत भाऊ.
सामुद्रिकबोवा ... ... ... शृंगारसुंदरीच्या पदरचा.
गुलाब ... ... ... ... शृंगारसुंदरीचा हुजऱ्या.
रामसिंह ... ... ... ... वीरमणीचा नोकर.
शृंगारसुंदरी ... ... ... सिंधुनगरची राणी.
अहल्या ... ... ... ... वीरमणीची बायको व जयेंद्रपालाची बहीण.
मोहना, मदीरा ... ... ... शृंगारसुंदरीच्या दासी.
सरदार, भालदार, चोपदार, सिंधनगरचे कोतवाल, कारकून, हुजरे, जासूद, शिपाई वगैरे.

असलेला हा तरुण सरदार **बालार्क-राय** वयानें सुमारें वीस वर्षांचा होता. **नलिनी**पेक्षां उंचीनें हा थोडासा अधिक होता. तथापि ओंठावर अद्याप नुस्ती लवही आलेली नसल्यामुळें याच्या चेहेऱ्यांत आणि **नलिनी**च्या चेहेऱ्यांत फारच साम्य दिसत असे; पण सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें असतां या बहिणभावंडांच्या सारख्या मुद्रेंत अगदींच फरक दिसण्यासारखा नव्हता असें नाहीं. **नलिनी**च्या मुखावर साधारणतः नेहमीं असणारा सौम्यपणा आणि मार्दव याच्या ठिकाणीं मुळींच दिसत नव्हतीं. याच्या मुद्रेवरून हा बराच उतावीळ, तापट आणि कांहींसा निष्ठुर व अभिमानी असावा असें उघड दिसत होतें. हा शरीरानें सडपातळ होता खरा; पण सर्व अवयव योग्य विकास पावले असल्यामुळें वळणदार व गोंडस दिसत होते. **नलिनी**च्या एकंदर अवयवांत स्त्रीजातीस साजणारा नाजुकपणा होता आणि **बालार्करायाच्या** अवयवांच्या चलनवलनावरून चपलता, बल आणि प्रसंगीं अतिश्रम सहन करण्याचीही हिम्मत इत्यादि गुणांचें सहज आविष्करण होत होतें. **नलिनी**प्रमाणेंच याचेही डोळे पाणीदार होते; पण याची दृष्टि फार तीक्ष्ण व खोल दिसत होती. याचा कपोलप्रदेश बराच पांडुवर्ण होता; पण भिन्नाभिन्न मनोविकारानुसार निरनिराळ्या वर्णांच्या छाया त्या ठिकाणीं वरचेवर येत. एकंदरींत याच्या चेहेऱ्याकडे व शरीराच्या चलनवलनाकडे पहात कांहीं वेळ उभें राहिलें तर आपल्या भक्ष्यावर उडी घालण्यास सज्ज झालेल्या चित्त्याची कल्पना पाहणाऱ्याच्या मनांत आल्यावांचून रहावयाची नाहीं!

**बसवप्रभूं**नें बाहेर जाऊन खोलीचें दार लावून घेतलें तरी **कुमुदबंधु** दाराजवळच उभा होता. तिकडे **बालार्करायही** जागच्या जागींच स्तब्ध राहिला होता. पहिल्याच्या चेहेऱ्यावरील विस्मयाची छाया अद्यापि पुरतीशी गेली नव्हती; दुसऱ्याच्या चेहेऱ्यावर जिज्ञासा व कौतुक हे विकार स्वाभाविकपणें दिसावे; पण त्यांचा नुस्ता भासही होत नसून त्यांच्या जागीं अभिमान आणि तिरस्कार यांचेंच ठाणें बसलेलें दिसत होतें.

अशा स्थितींत कांहीं निमिषें गेल्यावर **कुमुदबंधु** थोडासा पुढें सरला आणि सभ्याचारास अनुसरून कांहीं तरी भाषण सुरू करावें या हेतूनें ह्मणाला, "सरदार **बसवप्रभूं**नीं माझें नांवगांव आपल्यास कळविलें नाहीं यावरून मला वाटतें आपण मला यापूर्वी पाहिलेलें असावें आणि आपण मला ओळखतां ही गोष्ट त्यांना ठाऊक असावी?"

"**सरदारसाहेब**, माफ करा. मीं नाहीं अद्यापि आपल्याला ओळखलें." **बालार्कराय** सभ्यपणेंच, पण बऱ्याच निःस्नेहतेनें उत्तर करतो. "कदाचित् यापूर्वी मीं आपल्यास पाहिलें असेल अशी **बसवप्रभूं**ची कल्पना झाली असावी; पण माझ्या तरी स्मरणांत ही गोष्ट नाहीं. **बसवप्रभूं**चें यावेळचें भाषण व वर्तनही मला कांहींसें विलक्षण भासलें. आपलें मजकडे कांहीं काम आहे, पण आपण माझ्या केंसासही धक्का न लावण्याविषयीं त्यांस वचन दिलें आहे असें ते बोलले; पण या भाषणाचा अर्थ किंवा हेतु

मला मुळींच कळला नाहीं. अशा प्रकारचें वचन आपल्यापासून घेण्याची त्यांना काय आवश्यकता वाटली असेल ती त्यांस ठाऊक! पण माझी तलवार माझ्या कंबरेशीं असे-पर्यंत मला तरी अशा वचनाची कांहींएक जरुरी नव्हती!"

"तें असो तूर्त," **कुमुद्वंधु** अगदीं सौम्यपणें ह्मणतो, "पण आपण **जयद्रथराय शिलाहार** यांचे पुतण्येच काय? आपल्या चेहेऱ्यावरून आणि **बसवप्रभूं**नीं मघाशीं आपणास ज्या नांवानें हांक मारली त्या नां-वावरून आपण त्याच घराण्यांतले असाल असें मला वाटतें."

"आपलें मजकडे काय काम आहे तें अद्यापि मला कळावयाचेंच आहे; पण तें कांहीं असलें तरी माझें नांव आपल्यास क-ळविण्यास कांहीं हरकत आहे असें नाहीं." तरुण **बालार्कराय** उत्तर करतो, "होय; आपली कल्पना बरोबर आहे. **महामंडले-श्वर जयद्रथराय शिलाहार** यांचा मी एकप्रकारें पुतण्याच होतों. तथापि माझें ज-नन **शिलाहार** घराण्यांतलें नव्हे. माझें पा-लनपोषण मात्र त्या घराण्यांत झालेलें आ-हे. **विक्रमराय** सेनापति हें नांव आपण बहुधा ऐकिलेलें असेल? त्यांचा व **महामं-डलेश्वर जयद्रथराय** यांचा आप्तपणा हो-ता. त्या **विक्रमराय** सेनापतींचा मी मुल-गा. आमचें घराणें फार जुनाट असून खा-नदानीचें असें या देशांत मानलें जातें. माझें नांव **बालार्कराय** हें आपल्यास कळलेंच आहे. असो; मीं आपल्यास माझें नांव व कुल सांगितलें; आतां आपणही उलट आ-पलें नांव व कुल मला कळवा अशी विनंति करण्याचा मला हक्क आला आहे, नाहीं?"

"अलबत! आणि मीही तीं आपल्यास फार खुषीनें सांगण्यास तयार आहें. माझें नांव आपण यापूर्वी एखादवेळ तरी ऐकलें असेल." **कुमुद्वंधूनें** उत्तर केलें, "मला '**कुमुद्वंधु महेश्वरकर**' असें ह्मणतात."

'**महेश्वरकर कुमुद्वंधु**' एवढे शब्द कानीं पडतांच **बालार्करायाची** मुद्रा एक-दम पालटली. त्याचा चेहेरा संतप्त झाला, डोळे लाल होऊन त्यांतून ठिणग्या पडतात कीं काय, असें भासूं लागलें, ओंठ फुरफुरूं लागले, आणि एकंदर शरीरास कंप सुटला. **कुमुद्वंधूनें पंचगांग** देशांत पाऊल टा-कलें त्या दिवशीं **कृष्णग्रामा**जवळच्या अर-ण्यांत जो प्रसंग घडून आला त्याची आठ-वण होण्याची त्याला ही दुसरी खेप! त्या अरण्यांत तो **नलिनी**च्या पाठीमागून जात असतां ती एकदम नग्न कट्यार पुढें करून याच्या अंगावर धांवली त्यावेळीं तिची मुद्रा संतापानें व त्वेषानें जितकी उग्र व भयंकर दिसत होती त्यापेक्षां शतपटीनें अधिक उग्र व अधिक भयंकर मुद्रा धारण करून ती यावेळीं आली आहे कीं काय असें त्याला वाटलें. फक्त पोषाख पुरुषाचा एवढ्यावरून हा तिचा भाऊ असें निश्चयानें ह्मणतां ये-ण्यासारखें होतें. एखाद्या भयंकर सर्पाला एकाद्यानें एकवार चिडविलें असलें आणि त्या मनुष्याची गांठ पडून फिरून त्या मनु-ष्याचा शब्द त्या सर्पाच्या कानीं पडला अ-सतां तो जसा एकदम फणा करून त्वेषानें त्याच्या अंगावर धांवून जाण्यास तयार

होतो, त्याप्रमाणें यावेळीं या तरुण सरदाराची स्थिति झाली. त्याची ही एकदम पालटलेली स्थिति पाहून कोणाच्याही मनांत अशी कल्पना आली असती कीं, '**कुमुद्बंधु महेश्वरकर**' हे शब्द नसून तीक्ष्ण **कोप**वल्लीच्या रसाचे थेंब असावे आणि ते एकाएकीं या तरुण सरदाराच्या कानांत पडल्याबरोबर त्याच्या अंतःकरणापर्यंत भिनून तें अकस्मात् भडकून गेलें असावें आणि त्याच्या मुद्रेंत जो फरक झाला तो त्या भडक्याच्या ज्वाला मुखावर येऊन धडकल्या असाव्या !

तो तरुण वीर अतित्वेषानें एकदम ओरडला, "काय ! **महेश्वरकर** सरदार **कुमुद्बंधु** हें आपलेंच नांव ! काढा तर एकदम आपलें शस्त्र आणि करा आपलें रक्षण !" असें ह्मणत त्यानें आपली तलवार झटकन् म्यानाबाहेर ओढली.

या अकस्मात् संतापलेल्या तरुण सरदाराच्या धर्षणात्मक शब्दांस **कुमुद्बंधूनें** तोंडानें उत्तर न देतां कृतीनें दिलें. त्यानें एकदम पुढें उडी टाकली आणि त्याच्या तलवारीच्या धारेस आपला सत्राण असलेला हात आडवा देऊन उजव्या हातानें मुठीस हिसका दिला व झपाट्याबरोबर त्याच्या हातांतील तलवार हिसकून घेऊन तो दोन पावलें मागें सरून उभा राहिला. एवढ्या कृत्यास डोळ्याचें पातें लवण्याइतकाच अवकाश लागला असेल.

हें कृत्य आटपतांच **कुमुद्बंधु बालाकराया**च्या तोंडाकडे शांतपणें पहात ह्मणतो, "अहो तरुण सरदार, अकस्मात् उद्भवलेल्या कोपाच्या भरांत एकदम द्वंद्वास तयार झालांत ही थोडी चूक झाली. माझ्या अंगावर चिलखत आहे व आपल्या अंगावर नाहीं ही गोष्ट रागाच्या अवसरांत तुमच्या मुळींच लक्षांत आली नाहीं; पण आपल्यासारखा योद्धा अशा विषम स्थितींत असतां त्याच्याशीं सामना करणें मला योग्य वाटलें नाहीं, ह्मणून अशा चमत्कारिक रीतीनें आपला प्रतिकार करणें मला भाग पडलें. मला याबद्दल आपण क्षमा करा. ही घ्या आतां आपली तलवार परत. मीं केव्हांही, कोणत्याही प्रकारें आपला अपमान केला आहे, किंवा आपलें शत्रुत्व संपादन करण्यासारखें कोणतेंही कृत्य माझ्या हातून घडलें आहे, असें मला तर स्मरत नाहीं. माझें नुस्तें नांव ऐकल्याबरोबर तुम्हाला इतका अनावर कोप येण्यासारखी कोणती गोष्ट मजकडून घडली आहे हें प्रथम मला सांगा, आणि तशी कांहीं गोष्ट घडली असेल तर परस्पर भाषणानें तिचा खुलासा होऊन आपल्यामधील तंटा मिटतो का पाहूं या. इतक्याही उप्पर शस्त्रप्रसंगच होणें अवश्य आहे असें आपल्यास वाटेल तर उद्यां किंवा त्यानंतर वाटेल तेव्हां आपण जेथें सांगाल तेथें मी आपल्याशीं सामना करण्यासाठीं उभा राहीन, असें वचन देतों."

ज्या गृहस्थास आपण पहिल्या शब्दाबरोबर द्वंद्वास उभें राहण्याविषयीं इतक्या ऐटीनें आव्हान केलें, त्याच्यापुढें एका क्षणाच्या आंत आपण निःशस्त्र, निर्बल व निरुपाय होऊन उभे आहोंत हें पाहून **बालाक**-

रायाचें मन एकदम गोंधळून गेलें आणि तो कांहीं वेळपर्यंत तसाच अगदीं स्तब्ध उभा राहिला. थोडया वेळानें त्याच्या मुद्रेंतील तीव्र कोपाग्नीचीं व असह्य संक्षोभाचीं चिन्हें नाहींशीं होऊन त्यांच्या जागीं आश्चर्य व विस्मय आणि मानखंडना व लज्जा या विकारांचीं लक्षणें दिसूं लागलीं; पण जेवढे ह्मणून अभिमानी, तीव्रकोपी आणि साहसी वीर आहेत त्यांच्या अंगीं सामान्य जनांहून वेगळे असे कांहीं उदात्त गुणही असतात. सागराच्या कांठीं असणाऱ्या मृदु, निर्मल व विस्तीर्ण वालुकाप्रदेशाप्रमाणें यांचीं अंतःकरणें असतात. कोणत्याही विकारलहरीच्या लघुप्रहाराचा ठसा त्यांजवर स्पष्टपणें उठण्यास किंवा तो धुऊन नाहींसा होण्यासही अगदींच अल्प काळ पुरे होतो! **महेश्वरकर कुमुद्बंधु** एवढें नांव कानीं पडतांच **बालार्करायाचें** मन एकदम क्षुब्ध होण्यासही अवकाश लागला नाहीं आणि **कुमुद्बंधूचें** सरळ व उदार वर्तन दृष्टीस पडतांच त्याच्याविषयींचा सर्व द्वेष नाहींसा होण्यास आणि त्याच्या ठिकाणीं पूज्यभावाची प्रेरणा होण्यासही फारसा अवकाश लागला नाहीं. आपण हीनबल ठरलों असतां व निःशस्त्र झालों असतां **कुमुद्बंधूनें** बिलकुल गर्वाचें किंवा अपमानकारक भाषण केलें नाहीं आणि तो सन्मानानें व विश्वासानें आपली तलवार आपणास परत देण्यास तयार झाला हें त्याचें उदार वर्तन पाहून **बालार्करायाच्या** मनांत **कुमुद्बंधू**विषयीं लागलीच आदरबुद्धि उत्पन्न झाली.

"सरदारसाहेब" तो आदरानें ह्मणतो, "आपण मजपासून जिंकलेली तलवार मला विश्वासानें परत देत अहांत तर ती मी परम संतोषानें व आदरानें परत घेतों. आपलें नुसतें नांव ऐकतांच मला इतका संताप आला याचें कारण आपण विचारतां तर मी तें स्पष्टपणें सांगतों. माझी तलवार म्यानाबाहेर इतक्या त्वरेनें निघाली ती माझी प्रियभगिनी **नलिनी** इच्या नांवाला लागणारा कलंक धुऊन टाकण्याकरतां."

"आणि त्या दिव्य तरुणीच्या निष्कलंक नांवाला मीही पण तुमच्याप्रमाणेंच, किंबहुना तुमच्याहूनही अधिक, पूज्य मानतों. तिचें नांव आहे तसेंच निष्कलंक राखण्याकरितां या देहांत वाहणाऱ्या शुद्ध रक्ताचा प्रत्येक थेंब खर्चीं घालण्याचा प्रसंग आला तरी हा गृहस्थ मागें सरणार नाहीं. त्या निर्मलाचरणी कुमारिकेचा अपमान करण्यास किंवा तिच्याबद्दल एक अपशब्द उच्चारण्यास प्रवृत्त होणारा क्षुद्रबुद्धि कीटक कोणी असेल तर फक्त मला त्याचें नांव मात्र सांगा, कीं तो दशमखी **रावण** असो किंवा अभेद्यदेही **जरासंध** असो, त्याला यमपुरीची वाट दाखविल्याशिवाय हा वीर राहतो का पहा!" असें बोलतांना **कुमुद्बंधूचा** जात्याच निश्चयी दिसणारा चेहरा, दृढ अनुराग, अकृत्रिम निष्ठा आणि प्रासंगिक संताप, यांनीं इतका उद्दीप्त झाला होता कीं, त्यानें उच्चारलेला प्रत्येक शब्द खरा करून दाखविल्याशिवाय खचित रहावयाचा नाहीं, असें कोणालाही वाटलें असतें.

"तर मग सरदारसाहेब," **कुमुद्बंधू**च्या वरील उत्साहयुक्त व जोरदार भाव-

णानें बराच गोंधळून जाऊन **बालार्कराय** ह्मणतो, "दोन महिन्यांपूर्वी आजारानें मी बिछान्यास खिळून पडलों असतां आपण **कूर्मदुर्गांत** पाहुणे ह्मणून येऊन जें वर्तन केलेंत त्याचा यावेळच्या भाषणाशीं मेळ कसा घालावयाचा ?"

"मी सांगतों तुह्मांला कसा घालावयाचा तो." **कुमुद्बंधु** उत्तर करतो, "मी **कूर्मदुर्गांत** पाहुणा ह्मणून आलों नव्हतों. तुह्मांला तसें कोणीं सांगितलें असेल तर तें अगदीं खोटें आहे. मी बेशुद्ध होऊन पडलों असतां मला निःशस्त्र करून **जयद्रथरायानें** नीचपणानें व विश्वासघातानें कैद करून **कूर्मदुर्गांत** आणून ठेविलें. तेव्हां अशा स्थितींत ज्या मार्गानें माझी तेथून सुटका होईल त्या मार्गाचें मीं अवलंबन केलें, तर यांत मजकडे दोष कसा येतो ?"

"तुम्ही ह्मणतां ही गोष्ट खरी आहे असें मी धरून चालतों." **बालार्कराय** थोडासा चिडून ह्मणतो, "पण तुह्मी जातीचे शिपाई असून व स्वतः उच्च कुलांतले असून एका अल्प समजुतीच्या कुमारिकेच्या निष्कपटी मनाला हवी तशी भुरळ पाडून तिच्या नांवास कलंक लावण्यासारख्या वाईट गोष्टी तुम्हीं तिजकडून करविल्या हें योग्यच का ? आपण रातोरात तेथून निसटून जाण्यासाठीं माझ्या तरुण बहिणीला क्षुद्र सेवकाचा वेष घ्यावयास लाविलात, **काकासाहेबांची** मुद्रिका तिजकडून चोरविलीत, पहारेकरी, नावाडी आणि अश्वपालक, यांच्याशीं तिला कपट करावयास लाविलेंत, ह्या सर्व गोष्टी अगदीं दोषास्पद नव्हेत ना ?"

"**बालार्कराय**, तुह्मांला सर्व खरी हकिकत अद्याप कळलेली नाहीं." **कुमुद्बंधु** म्हणतो, "मजवर किंवा तुमच्या सुशील बहिणीवर कोणतेही आरोप करण्याच्या अगोदर मी दोन शब्द बोलतों ते शांतपणानें ऐकून घ्या. मी कांहीं तरी भलभलत्या गोष्टी सांगून तुमच्या बहिणीस फसविली व भुरळ पाडली असें मुळींच नाहीं. तुमच्या बहिणीची प्रथमपासून राणीसाहेबांच्या ठिकाणीं अतिनिष्ठा होती व त्यांच्या रक्षणासाठीं ती प्रथमपासून प्रयत्न करीत असे. ज्या दिवशीं मी कैदी होऊन **कूर्मदुर्गांत** येऊन पडलों, त्याच दिवशीं तुमच्या बहिणीस कांहीं जरुरीचें पत्र राणीसाहेबांकडे पाठवावयाचें होतें. साहजिकपणें मी राणीपक्षाकडील एक गृहस्थ तिच्या दृष्टीस पडलों ह्मणून तिनें होऊन माझी **कूर्मदुर्गांतून** सुटका केली आणि तें पत्र त्वरेनें नेऊन राणीसाहेबांकडे पोंचतें करावयास सांगितलें. ती प्रस्तुतकाळीं राणीसाहेबांच्या सखीचतुष्टयापैकीं एक होऊन राहिली आहे आणि राणीसाहेबांची अतिविश्वसनीय मैत्रिण बनली आहे एवढें तुह्माला सांगितलें, म्हणजे मी म्हणतों या गोष्टीची सत्यता तुह्मांला सहज दिसून येईल. तुम्हाला असें वाटतें काय, कीं आपल्या प्रिय मैत्रिणीच्या संरक्षणासाठीं जरी तिनें आपल्या चुलत्याचे बेत मोडण्याचे प्रयत्न केले; तथापि त्या चुलत्याचें घर सोडून दुसऱ्याजवळ आश्रय मागावयास जाण्याचा तिला प्रसंग आला त्यावेळीं

तिला पराकाष्ठेचें दुःख झालें नसेल? ज्यांनीं तिला अतिलाडानें वागविलें अशा आप्तांपासून, आणि ज्यांनीं तिला लहानाचें थोर केलें व ज्यांवर तिचें अति प्रेम अशा तिच्या मातुःश्रीपासून व बंधूपासून तिला दूर होण्याचा प्रसंग आला असतां व कदाचित् त्यांच्या सहवासास यापुढें जन्मभर मुकावें लागणार हा विचार मनांत आला असतां तिच्या अंतःकरणास पीळ पडल्याशिवाय राहिला असेल काय? खचितखचित राहिला नसेल! **बालार्कराय** मी तुह्मांला खात्रीनें सांगतों कीं, आपल्या निकट आप्तांविषयींचें प्रेम आणि आपल्या राज्ञीबद्दल व सखीबद्दलची निष्ठा या प्रस्तुत स्थितींत परस्परविरोधी झालेल्या दोन विचारांनीं त्या शुद्ध अंतःकरणाची फारच त्रेधा उडवून टाकिली असेल व त्याला अवर्णनीय दुःख दिलें असेल! परंतु तूर्त **पंचगांग** देशाला कालच विपरीत आला आहे! ज्या धर्मबंधनांनीं व राजनियंत्रणानें लोकांत शांतता रहावी, व दया, प्रीति, इत्यादि उदात्त मनोविकारांचें जनन व्हावें त्या धर्मसंबंधांत लोकांचीं भिन्न भिन्न मतें झाल्यामुळें त्या धर्माच्या नांवानें लोकांत युद्धें माजावीं आणि आप्ताआप्तांत, मित्रामित्रांत, बहिणभावांत आणि पितापुत्रांत भिन्नभाव होऊन द्वेष वाढावे असा प्रसंग आला आहे!"

"होय, सरदारसाहेब, होय! आपण म्हणतां ही गोष्ट अगदीं खरी आहे!" **बालार्कराय** उद्वेगदर्शक मुद्रेनें म्हणतो, "**पंचगांग** देशाला तूर्त विपरीत काल आला ही गोष्ट अगदीं खरी. माझ्या मनांत हे दुःखदायक विचार पुनः पुनः येतात, पण त्यांचा उपयोग काय?"

"**बालार्कराय,**" **कुमुदबंधु** आपलें बोलणें पुढें चालवून म्हणतो, "जर या विपरीत कालांत भिन्न भिन्न धर्ममतांमुळें किंवा भिन्न भिन्न पक्षांच्या ठिकाणीं अंतःकरणाची निष्ठा जडल्यामुळें कुटुंबबंधनें व प्रेमबंधनें तुटून समाज विकलावस्थेस यावयाचा असा ईश्वरीसंकेतच असला तर निदान तुमच्यासारख्या विचारी गृहस्थांनीं विरुद्धपक्षाला साह्य करणाऱ्या आपल्या आप्तइष्टांचे हेतु सरळ असावेत असें मानणें आणि त्यांच्या शुद्ध वर्तनाबद्दल भलभलत्या कुशंका मनांत येऊं न देणें हें अवश्य नाहीं काय? प्रत्यक्ष तुमचे चुलते **जयद्रथराय** हे **कुमुद्वती**-राणीसाहेबांचे आप्त, त्यांच्या वडलांचे अतिप्रिय मित्र, आणि **पंचगांग** देशाच्या गादीचे अति वाखाणलेले प्रतिनिधि, असे असून आज तेच आपल्या मित्राच्या अपत्यावर आणि आपल्या देशाच्या गादीविरुद्ध शस्त्र उचलण्याला तयार झालेना? जर असें आहे, तर तुम्हीं एक पक्ष स्वीकारला व तुमच्या भगिनीनें आपल्या पसंतीप्रमाणें भिन्नपक्ष स्वीकारला, ह्मणून तुह्मी तिच्यावर व्यर्थ भलते दोषारोप करणें मुळींच योग्य नव्हे. तुमच्या सदसद्विवेक बुद्धीस योग्य वाटेल तसें वर्तन ठेवण्याचें तुम्हांला मात्र स्वातंत्र्य असावें, आणि तुमच्याप्रमाणेंच सुशिक्षित व प्रगल्भ बुद्धीच्या इतर व्यक्तींस आपला हक्क चालविण्याचा अधिकार नसावा हा कोठला न्याय? शिवाय **बालार्कराय**, आपण रागावणार नाहीं तर आणखी

एक गोष्ट मी आपल्यास सांगतों. मी तर तुमच्या देशाचा रहिवासी देखील नाहीं, किंवा येथें फार दिवस राहून तुमच्या राणीसाहेबांपासून किंवा इतर कोणापासून कांहीं वैभव संपादन करावें ह्मणूनही मी या देशांत आलेलों नाहीं; पण मी तुह्मांला खचित सांगतों कीं, तुमच्या **कुमुद्वती**राणीसाहेबांसारखें **पंचगांग** देशाच्या गादीला शोभा आणणारें अमुल्य रत्न सुदैवानें प्राप्त झालें असतां त्या रत्नाचा अव्हेर करणाऱ्या आणि सदा असंतुष्ट असणाऱ्या महत्वाकांक्षी लोकांचा मला मनापासून तिट्कारा येतो! तुमच्या राणीसाहेबांचें शुद्धाचरण, त्यांची प्रजाहिताविषयींची उत्कट इच्छा, त्यांचें उदार अंतःकरण, त्यांची धर्मनिष्ठा, इत्यादि त्यांच्या ठिकाणीं असणारे सद्गुण दृष्टीस पडतांच या राज्याधिकारी दिव्य स्त्रीरत्नाची कांहीं तरी सेवा आपल्या हातून घडावी असें माझ्यासारख्या परकीय शिपायासही वाटलें; मग जी राणीसाहेबांची जिवाची मैत्रीण, जिनें आपल्या बाल्यावस्थेचे दिवस त्यांच्या संगतींत घालविले, जिचें सर्व शिक्षण त्यांच्याबरोबरच झालें, अशा तुमच्या भगिनीची त्या राज्ञीच्या ठिकाणीं प्रीति व निष्ठा असावी यांत मला तरी कांहीं विपरीत भासत नाहीं! उलट **पंचगांग** देशांतील बलाढ्य, सन्मान्य व विख्यात कुलांतील पराक्रमी लोकांनीं अशा स्वामिनीवर शस्त्र उचलण्यांत आपला पराक्रम दाखवावा आणि दुरभिमानानें अंध होऊन **गूहसिंहा**सारख्या महाकुटिल राजाचें अशा कामीं साह्य घेण्यास प्रवृत्त व्हावें व आपापसांत यादवी माजवून सर्व राष्ट्रास निर्बलत्व आणण्याचे प्रयत्न करावे याच गोष्टीचें मला आश्चर्य वाटतें! पण यांत आश्चर्य तरी कशाचें! **बालार्कराय**, आपल्यासारखे बुद्धिमान्, विचारी, पराक्रमी व कुलीन गृहस्थही जर केवळ गतानुगतिक होत आहेत, आणि आपलें सर्व बाहुबल एका अबलेविरुद्ध खर्ची घालण्याची आणि त्यायोगें आपल्या हातांतील विक्रमशाली शस्त्रास अक्षय्य कलंक लावण्याची जर तुह्मांस प्रेरणा होत आहे, तर हे **पंचगांग** देशाच्या दुर्दैवाचे खेळ आहेत, किंवा या काळाचाच हा विचित्र महिमा आहे असें ह्मटलें पाहिजे!"

**कुमुदबंधू**चें भाषण याप्रमाणें चाललें असतां तरुण **बालार्करायाचें** स्वभावतः कोमल व उदार असलेलें मन परस्परविरोधी अशा मनोविकारांनीं अगदीं घोंटाळून गेलें असावें असें त्याच्या एकंदर स्थितीवरून दिसत होतें. त्याच्या कपोलप्रदेशावर निरनिराळ्या वर्णांच्या छाया येत जात होत्या, दृष्टी अत्यंत चंचल होऊन एकवार **कुमुदबंधू**च्या मुखाकडे व एकवार जमिनीकडे वळत होती, ओंठ पुनः पुनः हालत होते, उरप्रदेश वरखालीं होत होता, आणि सर्व अवयवांत किंचित् कंप उत्पन्न झाला होता. शेवटीं **कुमुदबंधू**चें भाषण संपतांच त्या निष्कपटी व खुल्या अंतःकरणाच्या तरुण सरदारानें एकवार मोठ्यानें उश्वास सोडला व पुढें सरून आणि अत्यंत उत्साहपूर्वक **कुमुदबंधू**चा हात आपल्या हातांत घेऊन तो खिन्न स्वरानें ह्मणतो, "सरदारसाहेब, आपण बोलला हें सर्व

खरें असें आतां मला वाटतें. तुह्मी प्रत्यक्ष परमेश्वराचे दूत आहांत! आणि व्यर्थ अभिमानानें व अविचारानें अंध झालेल्या लोकांचे डोळे उघडण्याकरतां अवतरलां अहांत असें आतां मला वाटतें आपला प्रत्येक शब्द माझ्या अंतःकरणांत भाल्याप्रमाणें टोंचीत गेला; पण त्यामुळें त्यावरील कुकल्पना व कुनिश्चयरूपी पटलांचा मात्र पूर्णपणें नाश झाला. खरोखर, माझ्या दुष्ट विचारांबद्दल आणि कुशील वर्तनाबद्दल मला आतां पश्चात्ताप वाटत आहे!"

**कुमुदबंधु** आणखी कांहीं तरी बोलणार असें वाटून **बालार्कराय** फिरून ह्मणतो:-"सरदारसाहेब, मजवर कृपा करा! आतां आपण कांहीं बोलूं नका! तुम्ही कांहीं बोलाल तर मी अगदीं वेडा होऊन जाईन! पण मी अगोदरपासूनच वेडा बनलेलों नाहीं काय? तसें नसतें तर माझ्या कुलाला व शिलाला कलंक लावणारा हा राजद्रोहाचा अपराध माझ्या हातून कसा घडला असता!"

"**बालार्कराय,**" **कुमुदबंधु** ह्मणतो, "तुह्मांला मी आपले मित्र असें लेखतों. तर मग तुमच्याशीं मित्राच्या नात्यानें कांहींही बोलण्यास हरकत नाहीं. माझ्या बोलण्यानें तुह्मांला दुःख व्हावें असा माझा मुळींच हेतु नाहीं. मी तुह्माला ह्या वेळपर्यंत जें काय बोललों तें कोणीही सरळ बुद्धीचा निस्पृही परस्थ गृहस्थ केव्हांही बोलेल. माझ्या बोलण्यानें जरी तुह्मांला दुःख झालें याबद्दल मला वाईट वाटतें, तथापि माझ्या शब्दांचा असा हितावह परिणाम झाला व त्याचें चीज झालें हें पाहून मला आनंदही वाटतो. तुमच्या प्राचीन व विख्यात कुलाचें जें मुख्य राजनिष्ठेचें व्रत त्याचा तुमच्या हातून भंग होण्याचा समय आला होता; पण तुम्ही वेळींच जागे होऊन त्याबद्दल तुम्हांला पश्चात्ताप झाला आहे हेंही फारच चांगलें झालें. तुमच्या अंतःकरणांत यावेळीं काय काय विचार घोळत असतील याचा आतां मला बराच अंदाज लागला आहे. खरेंच सांगा, तुम्ही यावेळीं तुमच्या भगिनीच्या वर्तनाबद्दल मनांतून तिचें अभिनंदन करीत आहांत कीं नाहीं? महत्वाकांक्षेमुळें सन्मार्गाचा त्याग करून दोषाविवरांत उडी घालणाऱ्या आपल्या आप्तांस न अनुसरतां तिनें तरी आपल्या कुलाचें सुव्रत चालविण्याचा निग्रह केला या तिच्या शहाणपणाबद्दल यावेळीं तुह्मी तिला मनांतून शाबासकी देत अहांत कीं नाहीं? ज्या सर्वगुणसंपन्न राज्ञीची कांहीं तरी अल्पाधिक सेवा आपल्या हातून घडावी ह्मणून **पंचगांग** देशांतील प्रत्येक स्त्रीपुरुषानें मी मी करावें हें योग्य, त्या राणीचा पक्ष जिनें एकदम उचलला त्या तुमच्या भगिनीबद्दल तुह्मांला अभिमान वाटतो आहे कीं नाहीं, सांगा? आणि केवळ निंद्य अशी आत्महितैकरति, व सदैव अतृप्त राहणारी महत्वाकांक्षा यांनीं अंध झालेल्या, धर्मरक्षणाच्या खोट्या मिषानें राजद्रोहासारखा अधर्म करण्यास प्रवृत्त झालेल्या, आणि **पंचगांग**-सारख्या स्वतंत्र राष्ट्राचा नाश करण्याकरतां परकीय राजाचें साहाय्य घेणाऱ्या, अविचारी, क्षुद्रबुद्धी, धर्महीन स्वदेशशत्रूंच्या

मधुर भाषणांनीं मोहून जाऊन त्यांच्या पक्षास आपलें नांव जोडून आपल्या निर्मल कुलास डाग लावण्याच्या बेतांत तुह्मी होतां, हा विचार मनांत येऊन तुमच्या अंतःकरणास पराकाष्ठेच्या वेदना होताहेत किंवा नाहीं, सांगा ? "

" पुरे, पुरे, सरदारसाहेब, या वज्रप्रहारांनीं माझें हृदय आतां फाटून गेलें ! पश्चात्तापानें जळत असलेल्या अंतःकरणावर आतां आणखी विद्युत्पात झाले तर त्याची अगदीं राखरांगोळी होऊन जाईल ! " इतकें बोलून **बालार्कराय** एकदम खालीं बसला, आणि त्यानें आपलें तोंड हातांनीं झांकून घेतलें व त्याच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या.

सकुमार माधवीलतेचे मृदु अंकुर व कोमल पत्रें सामान्य वायुलहरींनेंही कांपूं लागणें, किंवा सामान्य उष्णतापानें कोमेजूं लागणें हें साहजिक आहे; पण दृढमूल अशा आम्रवृक्षास सबंध हालवून सोडण्यास किंवा त्याच्या घनपर्णास करपवून टाकण्यास, तसाच महावात व तसेच चंडकिरण पाहिजेत ! त्याचप्रमाणें प्रकृतिकोमल स्त्रियांच्या मृदु चित्तास संत्रस्त करण्यास आणि त्यांना दुःखाकुल करण्यास अल्प कारणही पुरे व्हावें हें स्वाभाविक आहे; पण स्थिरचित्त अशा धीर पुरुषाच्या कठोर अंतःकरणास क्षुब्ध करून त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा काढण्यास तसाच तीव्र मनस्ताप झाला पाहिजे ! आणि ज्यावेळीं अशा असह्य तापानें भाजल्यामुळें कोणीही पुरुष आपलें नैसर्गिक स्थैर्य सोडून स्त्रीजातीचें निर्बलत्व अंगिकारतो आणि नेत्रांतून अश्रू काढतो, त्या प्रसंगाचा देखावा सन्निध असणाऱ्या दुसऱ्या पुरुषास फारच हृदयद्रावक व असह्य होतो.

**बालार्करायाच्या** नेत्रांतून अश्रुधारा चाललेल्या पाहून **कुमुदबंधूच्या** अंतःकरणास उमाळा आला आणि आपल्या भाषणाचा परिणाम येथपर्यंत झाला हें पाहून त्याला आश्चर्यही वाटलें व दुःखही झालें. पण अशा वेळीं सांत्वन करण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे दुःखिताचा ताप दुणावणें होय, असें वाटून तो कांहीं वेळ स्तब्ध राहिला. थोड्याच वेळांत त्या क्षुब्ध चित्तोदधीच्या लाटा कांहींशा शांत झाल्या. त्याबरोबर **बालार्कराय** उठून उभा राहिला आणि कपोलांवरील अवशिष्ट अश्रुबिंदु झटकून टाकून कांहीं न बोलतां खोलींतून इकडे तिकडे त्यानें दहा पांच फेऱ्या केल्या. नंतर **कुमुदबंधु** जवळ येऊन त्याचा हात त्यानें आपल्या हातांत धरला आणि करूणायुक्त स्वरानें तो ह्मणाला, " सरदारसाहेब, आपणाला माझा तिरस्कार आला असेल ! खचित माझी ही स्थिति पाहून आपल्याला माझ्याजवळ उभें रहाण्याचा देखील वीट आलाच पाहिजे ! नाहीं बरें ? "

" नाहीं, नाहीं." **कुमुदबंधु** उत्तर करतो, " उलट यायोगानें मला तुमची करुणा आली आणि ज्या नीचांनीं तुमच्या या असल्या निर्मल व निष्कपटी मनाला मोह पाडून कुमार्गाकडे वळविण्याचा प्रयत्न केला त्यांच्याबद्दल मात्र माझ्या मनांत अधिक तिरस्कार व अधिक राग आला

आहे. **बालार्कराय,** ह्या वेळेपासून मी तुमचा जिवलग मित्र झालों आहें असें समजा. मी तुमच्या विश्वासाला पात्र आहें किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं मला पाहिजे ती जिवावरची कामगिरी तुमच्यासाठीं करावयास सांगा आणि मी तिळमात्र मागें घेतों का पहा!"

"सरदारसाहेब," **बालार्कराय** खिन्नमुद्रेनें ह्मणतो, "तुह्मी माझे खरे मित्र व खरे हितैषी अहांत याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. तुह्मीं माझी कानउघाडणी करण्यासाठीं तुह्मांला योग्य वाटलें तें स्पष्टपणें बोललांत हे खरोखर तुमचे मजवर फारच मोठे उपकार झाले. आतां तुमच्या भाषणानें मला इतकें दुःख कां झालें याचें तुह्मांला आश्चर्य वाटलें असेल. ज्याअर्थी एखाद्या अबलेप्रमाणें रडतांना मला तुम्हीं पाहिलें आणि ज्याअर्थी मीं तुह्मांला आपले मित्र असें एकवार मानलें, त्याअर्थी या माझ्या अनावर दुःखाचें कारणही तुह्मांला समजावें हें अवश्य आहे. ऐका तर मग: मीं तुह्मांला प्रथमच सांगितलें कीं, **विक्रमराय** सेनापति हे माझे वडील. मी अगदीं लहान असतांनाच ते वारले. पुढें थोडक्याच दिवसांनीं पतिवियोगानें शोकाकुल झालेली माझी मातुःश्रीही परलोकवासी झाली. मातुःश्रीच्या मरणाच्या वेळीं मी सुमारें तीन वर्षाचा होतों. मातुःश्रीच्या मरणानंतर माझें अगदीं नजीकचें आप्तमनुष्य काय ती माझी मावशी, ह्मणजे **नलिनी**ची आई. तिनें मला आपल्या घरीं आणून ठेविलें आणि प्रत्यक्ष आपल्या मुलाप्रमाणें माझें लालनपालन केलें. यामुळें माझी खरी मातुःश्री तीच झाली. आमच्या सर्व उत्पन्नाची वगैरे व्यवस्था **जयद्रथराय**च पहात आले आणि मी एक त्यांच्याच कुटुंबांतला मुलगा होऊन राहिलों. **नलिनी**च्या आणि माझ्या बाल्याचे दिवस एकेच ठिकाणीं गेले असल्यामुळें आमचें एकमेकांवर सख्ख्या बंधुभगिनीप्रमाणें प्रेम बसलें. **कुमुद्वती**राणीसाहेबांचे वडील गादीवर असतां सर्व राज्यकारभार **जयद्रथरायां**च्याच हातीं असल्यामुळें त्यांचें राहणें नेहमीं **कुवलयपुरां**तच असे, आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या कुटुंबातील सर्व माणसेंही येथेंच असत. **नलिनी** आणि **कुमुद्वती**राणीसाहेब ह्या दोघीही वयानें सारख्याच असल्यामुळें आणि फारच जवळचा आप्तपणाचा संबंध असल्यामुळें, **नलिनी**चे आणि तिच्याबरोबर माझेही बहुतेक लहानपणचे दिवस राजवाड्यांतच गेले. **कुमुद्वती**राणीसाहेबांचें शिक्षण **मामा**साहेब **पांड**चे यांच्या नजरेखालीं झालें व साहजिकच आमचेही मुख्य गुरु तेच झाले. मुलें लहान असतां त्यांस आपली उच्चनीच स्थिति न कळणें हें स्वाभाविक आहे; निदान आह्मांला तरी **कुमुद्वती** ही राजकन्या आणि आम्ही तिच्याहून कमी योग्यतेचीं मुलें असा फरक करावयास शिकविलेलें नव्हतें. मी, **नलिनी** आणि राणीसाहेब अशीं तिघेंही अगदीं सर्वकाळ जेवतांना, खेळतांना, घोड्यावर बसतांना किंवा दुसरें कोणतेंही काम करतांना अगदीं एकत्र असल्यामुळें आम्ही सर्व बरो-

वरीनें वागत होतों आणि त्यायोगानें आमचें परस्परांवर अत्यंत प्रेम असे. मी राजवाड्यांत असतां थोरल्या राणीसाहेब ह्मणजे **कुमुद्वती**ची आई मला नेहमीं थट्टेनें ‘ जांवई जांवई ’ ह्मणत असत, आणि जरी त्यावेळीं मला त्यांच्या थट्टेचा अर्थ मुळींच कळत नव्हता; तथापि तेवढ्यामुळें ती दुष्ट कल्पना माझ्या डोक्यांत शिरून राहण्यास कारण झालें. मी चवदा वर्षांचा झालों तेव्हां मला **काका**साहेबांनीं राजवाड्यांतून दूर केलें आणि माझ्या शिक्षणाची निराळी व्यवस्था केली. व **कुवलयपुरां**तील दुसऱ्या कांहीं सरदारांच्या मुलांबरोबर माझें अध्ययन सुरू झालें. तथापि राजवाड्यांत माझें वारंवार जाणें येणें असेंच. अशा रीतीनें दोन तीन वर्षें गेल्यानंतर **कुमुद्वती**विषयींच्या माझ्या प्रीतीस कांहीं निराळी दिशा मिळाली. यावेळीं माझ्या आणि तिच्या स्थितीमधलें अंतर मला कळूं लागलें होतें, आणि त्या वेळेपासून जर या गोष्टीचा विचार मी करूं लागलों असतों तर पुढें माझें डोकें बिघडून जाऊन मला वेडा होण्याची पाळी आली नसती ! माझ्या मनांत उत्पन्न झालेले विचार मी कधींही कोणापाशीं बोललों नाहीं, किंवा अन्य रीतीनें त्यांचें कोणास दिग्दर्शनही होऊं दिलें नाहीं. माझे हेतु खचित सफल होणार या कल्पनेनेंच मी सदा संतुष्ट असे. माझ्या मनाच्या स्थितीचें **कुमुद्वती**स स्वप्नही नव्हतें. पुढें **कुमुद्वती**चे वडील महाराज **शांतिसागर** निवर्तले, आणि नंतर दोन वर्षांनीं तिची मातुःश्रीही परलोकवासी झाली. **कुमुद्वती**चा **काका**साहेबांवरील विश्वास हळू हळू अगदीं उडला; पण त्यामुळें मजवरील तिचें प्रेम कमी झालें नव्हतें. ती मजशीं पूर्वीप्रमाणेंच अगदीं निष्कपट प्रेमभावानें वागत असे. तिच्या या स्वाभाविक सरळ वर्तनाचा अर्थ मी मूर्खपणानें भलता करीत होतों. माझ्या अंतःकरणांत तिजविषयीं जे विचार दृढ होऊन राहिले होते तशाच प्रकारचे विचार तिच्याही मनांत उत्पन्न झाले असावेत अशी शुष्क कल्पना माझ्या डोक्यांत शिरून राहिली होती. पुढें **काका**साहेबांनीं दरबार सोडलें व ते **कूर्मदुर्गा**स येऊन राहिले. यामुळें मी आणि **नलिनी** **कुमुद्वती**च्या सहवासास मुकलों. **कुमुद्वती**नें आपला विवाह करून घेण्याचा विचार मनांत आणला आहे असें मला प्रथम कळलें तेव्हां मला आनंदही वाटला व चिंतेनेंही माझ्या अंतःकरणांत त्याच वेळीं प्रथम प्रवेश केला. निरनिराळ्या राजपुत्रांच्या मागण्या फुकट गेल्या असें मला थोडेच दिवसांनीं कळलें. तेव्हां **कुमुद्वती** मला खचित विसरली नाहीं असें माझ्या मूर्ख मनाला वाटलें. इतकें झालें तरी मीं माझ्या मनांतील गुप्त गोष्ट कोणाला——ह्मणजे प्रत्यक्ष **नलिनी**ला देखील,——एका शब्दानेंही कळविली नाहीं, किंवा माझ्या मनांतील हेतु **कुमुद्वती**ला कळविण्याची तजवीज केली नाहीं. पोरकट अभिमानाच्या भरांत मला असें वाटत होतें कीं **कुमुद्वती** आपण होऊनच हा प्रश्न मजकडे कोणाकडून तरी काढवील, आणि तोंपर्यंत आपण अगदीं स्वस्थ रहावयाचें. कदाचित्

हे माझे त्या वेळचे विचार ऐकून तुम्हांला माझ्या मूर्खपणाचें व अभिमानीपणाचें हसं येईल. असो; थोडेच दिवसांनीं अशी बातमी माझ्या कानीं आली कीं, **प्रद्युम्नराय मौर्यां**शीं विवाह करण्याचा राणीचा विचार ठरला. ही बातमी ऐकली खरी, पण तीं मला मुळींच खरी वाटली नाहीं. मात्र एवढा विचार त्यावेळीं माझ्या मनांत आला कीं: **कूर्मदुर्गा**हून उठून एकदम **कुवलयपुरास** जावें आणि **कुमुद्वती**ला प्रत्यक्ष भेटून आपलें अंतःकरण एकवार तिजपाशीं उघडें करावें, किंवा **मामा**साहेबांना सर्व गोष्टी एकवार श्रुत करून **कुमुद्वती**पाशीं त्यांजकडून बोलणें काढवावें; पण फिरून अभिमानानें माझे पाय मागें ओढले! पुढें जेव्हां **प्रद्युम्नरायां**शीं **कुमुद्वती**चा विवाह पक्का ठरला असें मला कळलें तेव्हां माझी स्थिति काय झाली असेल याचा विचार आपणच करा! आपण **कूर्मदुर्गां**त आलांत त्यावेळीं मी आजारी पडलों होतों त्याचें कारण मनाला बसलेला हा धक्काच. सरदारसाहेब, खऱ्या दुःखाचा मला पहिला प्रसंग हाच! आणि तें दुःखही असलें भयंकर! असो; राणीचा **प्रद्युम्नरायां**शीं विवाह निःसंशय ठरला ही बातमी ज्या दिवशीं मीं ऐकली त्या दिवशीं माझ्या मनावर कांहीं विलक्षण परिणाम होऊन माझें मस्तक फिरलें आणि ज्या ठिकाणीं मीं लहानपणापासून निःसीम प्रेम केलें, जिच्या शब्दाबरोबर मी आपला प्राण देण्यासही तयार झालों असतों, जिच्या चरणीं मी आपलें तन मन अकृत्रिम भक्तीनें अर्पण करण्यास इतका उत्सुक होतों, त्या राणीचा, त्या माझ्या व माझ्या भगिनीच्या जिवलग मैत्रिणीचा मी एकाएकीं द्वेष करूं लागलों. तिनें मला अपार सौख्याची आशा दाखवून शेवटीं दुःखांत लोटलें, आणि माझी मुद्दाम होऊन मानखंडना केली, असे नानाप्रकारचे खोटे खोटे तरंग मनांत येऊन मी अगदीं वेडावून गेलों आणि तिचा सूड घेण्याचा निश्चय केला. मात्र या स्थितींतही माझ्या मनांतील विचार मीं कोणास कळूं दिले नाहींत. माझ्या या भ्रमलेल्या चित्तास अधिक मोह पाडण्याचें आणि इतर रीतींनीं माझें मन राणीविषयीं कलुषित करण्याचें श्रेय आमच्या **काका**साहेबांनीं आणि त्यांस साहाय्यभूत असलेल्या इतर सरदारांनीं घेतलें! तथापि त्यांच्यावर मी कोणत्याही प्रकारें दोष ठेवीत नाहीं. माझा मीच मूर्ख व अविचारी बनलों नसतों, तर त्यांच्या हातून काय झालें असतें! यापुढील सर्व हकिकत तुम्हांला ठाऊकच आहे. आज परमेश्वरानें तुम्हांला येथें पाठवून तुमची माझी भेट करविली हें फार फार चांगलें झालें. कारण मनानें आज कित्येक दिवसपर्यंत जरी मी पक्का राजद्रोही व मित्रद्रोही बनलों होतों, तथापि राजद्रोहाची प्रत्यक्ष कृति माझ्या हातून घडण्याचा आजचाच पहिला प्रसंग होता. देवानें तुमच्या मार्फतीनें मला आजच शुद्धीवर आणलें म्हणून ठीक झालें; नाहीं तर एकवार हातून हें घोरपातक घडल्यावर मनाची काय अवस्था झाली असती हें कोण सांगणार! तुमच्या भाषणामुळेंच आज माझा मूर्खपणा

मला दिसला आणि मला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे. खरोखर सरदारसाहेब, मी तुमचा जन्माचा ऋणि आहे! तुमचे शब्द माझ्या अंतःकरणाला इतके कां टोंचले आणि एकाद्या बायकोप्रमाणें माझ्या नेत्रांवाटे अश्रु कां आले याचें कारण कळलें आतां तुह्मांला? माझ्या अंधपणाबद्दल, अविचाराबद्दल, किंवा महत्वाकांक्षेबद्दल आतां मला तुह्मी वाटेल तें ह्मणा. मात्र एक विनंति तुह्मांला करतों तेवढी मान्य करा. मीं आतां जी हकिगत सांगितली ही कोणालाही,—प्रत्यक्ष **नलिनी**लाही,—मीं सांगितलेली नाहीं. तर कृपा करून हें तुमच्या मित्राचें गुह्य अगदीं आपल्या अंतःकरणाच्या एका कोंपऱ्यांत लपवून ठेवा! यांतील एक अक्षरही कधीं बाहेर पडूं देऊं नका. प्रत्यक्ष माझ्याजवळ देखील याचा फिरून उच्चार करूं नका!"

"नाहीं, खचित नाहीं." **कुमुदबंधु** उत्तर करतो. "जोंपर्यंत ही गोष्ट गुप्त रहावी अशी तुमची इच्छा असेल तोंपर्यंत प्रत्यक्ष तुमच्या भगिनीजवळ, किंवा तुमच्याजवळ, यांपैकीं एक अक्षर माझ्या तोंडून निघणार नाहीं. बरें, तुह्मांला दुसरी एक गोष्ट विचारतों: तुमची व माझी या ठिकाणीं गांठ पडली, तुमच्यासारखा अमूल्य स्नेही मीं आज संपादन केला, आणि यापुढें राणीसाहेबांविरुद्ध बंड करणाऱ्या राजद्रोही लोकांस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें कोणत्याही प्रकारचें साहाय्य करावयाचें नाहीं असा तुह्मीं निश्चय केला आहे, इत्यादि गोष्टी तुमच्या बहिणीस कळविण्याची तरी मला परवानगी आहेना? ह्या गोष्टी ऐकून तिला पराकाष्ठेचा आनंद होईल."

"हो, बेलाशक कळवा;" **बालार्कराया**च्या चेहेऱ्यावरील खिन्नतेची छाया बरीच कमी होऊन तो ह्मणतो, "एवढेंच नव्हे, तर तिला आणखी माझा असा निरोप कळवा कीं, 'यापुढें माझ्या वर्तनाबद्दल तूं बिलकुल शंका बाळगूं नको!' पण हें असो आतां; सरदार, मीं आपल्याला एक गोष्ट विचारतों तेवढी सांगा. आपण जे या ठिकाणीं आलांत ते कोणत्या हेतूनें, आणि येथें कोणाची गांठ पडेल असें तुह्मांला वाटलें होतें?"

**कुमुद**०:—"तुह्मांला हें कळलेंच असेल कीं, **कालयवन**देशाहून **श्वेतपाद** नांवचा जो गृहस्थ रात्रीं येथें आला तो कशाकरतां आला होता हें सर्व बाहेर पडलें, आणि त्याजवर सोंपविलेली कामगिरीही फसली. त्यानें आणलेलें द्रव्य सर्व राणीसाहेबांच्या खजिन्यांत जाऊन पोंचलें,——"

**बालार्क**०:—(मध्येंच) "होय, तुमच्या विलक्षण पराक्रमामुळें तें द्रव्य राणीसाहेबांच्या हातीं लागल्याचें मला कळलें. राजवाड्यांतून तुमच्या कृपेमुळें मुक्त होतांच **श्वेतपादराय** अत्यंत भयचकित व भग्नमनोरथ झालेला असा येथें आला. त्यानें झालेली सर्व हकिकत येथें सांगितली. **श्वेतपादराया**सारख्या गृहस्थाच्या हातीं दिलेल्या कामाचा शेवट असा होईल, असें कोणासही वाटलें नव्हतें. त्याची हकिकत ऐकून **बसवप्रभु** व **कालनीती** हे देखील अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले."

**कुमुद**०:—"पण पुढें कसें वागावयाचें व काय सोंग आणावयाचें याचाही त्यांनीं ताबडतोब निश्चय करून ठेवला असावा? पुढें प्रसंग पडल्यास, यापैकीं आपल्यास कांहीं एक गोष्ट ठाऊक नाहीं, **श्वेतपादा**शीं आपला काडीमात्र संबंध नाहीं, हें सर्व कोणातरी लुच्चाचें काम आहे असें सांगून हें प्रकरण अंगाबाहेर टाकावयाचें असा त्यांनीं लागलीच बेत करून ठेवला असावा? नाहीं बरें?"

**बालार्क**०:—"होय."

**कुमुद**०:—"आणि तुह्मीही पण असें ठरविलें असेल कीं, आणखी वेळपर्यंत येथें रहावें आणि राणीसाहेबांचे यापुढें काय काय बेत होतात याची इत्थंभूत हकिकत काढून घेऊन नंतर परत **जयद्रथराया**च्या छावणींत जावें. होय का नाहीं?"

**बालार्क**०:—"होय, आपला अंदाज अगदीं बरोबर आहे."

**कुमुद**०:—"माझी पक्की खात्रीच होती कीं असें होईल, आणि ह्मणूनच **जयद्रथरायां**कडून आलेल्या गृहस्थाची आणि माझी भेट झालीच पाहिजे अशी **बसवप्रभू**पाशीं मीं आग्रहानें मागणी केली; पण **जयद्रथरायां**कडून आलेले गृहस्थ तुम्हीं असाल व तुमची माझी येथें अशा तऱ्हेनें गांठ पडेल ही कल्पना मात्र माझ्या मुळींच मनांत आली नाहीं."

**बालार्क**०:—"सरदारसाहेब, मला वाटतें कीं, **बसवप्रभु** आणि **कालनीती** हे पूर्णपणें तुमच्या हातांत सांपडले असावे. तसें नसतें तर त्यांनीं **काका**साहेबांकडून आलेल्या हस्तकाची व तुमची भेट कांहीं झालें असतें तरी होऊं दिली नसती. 'आपल्या घरीं बंडखोरांकडील कोणीही माणूस नाहीं, आपला **जयद्रथराया**शीं कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं' असें सांगून त्यांनीं बाहेरच्या बाहेर तुम्हांला कसें वाटेस लाविलें नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें."

**कुमुद**०:—"त्यांचीं काय काय कृष्ण कृत्यें मला कळलीं आहेत व त्यांच्या शेंड्या माझ्या हातांत कशा सांपडल्या आहेत हें जोंपर्यंत त्यांना कळलें नव्हतें, तोंपर्यंत त्यांनीं तुह्मी ह्मणतां अशा प्रकारची पुष्कळ उडवाउडव केली; पण शेवटीं मीं त्यांना थोडीशी माहिती देतांच ते निरुपाय व दीन झाले. ते इतके कीं, मला वाटलें तर मस्तकें नमवून माझे पायावर लोटांगणें घालावयासही मीं त्यांना लावलें असतें! अशी स्थिति आली ह्मणूनच मींही या गोष्टीबद्दल आग्रह धरला आणि तेंही माझ्या अटीस कबूल झाले."

**बालार्क**०:—"पण **काका**साहेबांकडून आलेल्या हस्तकाची व तुमची भेट झालीच पाहिजे असा आग्रह धरण्यांत तुमचा काय हेतु होता, आणि येथें तुम्हांला कोण भेटेलसें वाटलें होतें तें तुम्हीं मला अद्यापि सांगितलें नाहीं."

**कुमुद**०:—"सांगतों ऐका. **जयद्रथराय** जेथें असतील तेथें ताबडतोब जाऊन त्यांची भेट घ्यावयाची असा मीं संकल्प केला होता—"

**बालार्क**०:—(त्याला पुरतें न बोलूं देतां

मध्येंच, आश्चर्यानें ) " काय **काका**साहेबांची भेट घ्यावयाचा तुमचा बेत होता ? "

**कुमुद्**०:-( शांतपणें ) " होय. **जयद्रथरायां**चीच. माझें असें अनुमान आहे कीं, ह्या गांठीपासून पुष्कळ प्रकारें फायदा होण्यासारखा आहे. हें पहा, **बालार्कराय**, ह्या बंडाचा लवकरच मोड होणार, राणीसाहेबांच्या पक्षास खचित जय मिळणार, हें आतां पक्कें ठरल्यासारखें नाहीं काय ? तेव्हां शेवटीं **जयद्रथराया**सारख्या विख्यात व शूर सरदारास शूलारोपणाची किंवा निदान कारागृहवासाची शिक्षा व्हावी हें बरें नव्हे. तसेंच कांहीं कालपर्यंत तरी लढाया चालून विनाकारण रक्तपात व प्राणहानी व्हावी हेंही ठीक नव्हे. ह्मणून या दोन्ही गोष्टींचा प्रतिकार कांहीं प्रयत्नांनीं करतां आला तर पहावा हा हेतु मनांत धरून मीं हा बेत केला आहे. "

**बालार्क**०:-(उत्साहपूर्वक) " सरदारसाहेब, तुमच्या औदार्यशीलतेची कमाल आहे आतां ! पण **काका**साहेबांचा स्वभाव तुह्मांला माहीत नाहीं. तुमचा त्यांचा संबंध कशा प्रकारचा आहे हें तुह्मीं विसरलां अहांत कीं काय ? ही गोष्ट लक्षांत आणा कीं तुह्मीं त्यांना दोन वेळ प्रत्यक्ष द्वंद्वांत पराभूत केलें आहे; तुह्मीं त्यांच्या सर्व बेतांचा मोड केला आहे व त्यांना जवळ जवळ हताश करून सोडलें आहे. तुम्ही **कूर्मदुर्गां**तून त्यांच्या हातून अवेळीं निसटून गेलां, राणीच्या संरक्षणाकरितां सैन्य जमा करून आणलेंत; ऐनप्रसंगीं साहाय्य करून तिला त्यांच्या हातून सोडविलेंत; **महासेन** व **शक्तिधर** यांना आयत्यावेळीं अजब युक्ति करून फसविलेंत; या सर्व गोष्टींबद्दल **काका**साहेबांस मोठा संतोष वाटला असेल व ते तुमच्यावर मोठें प्रेम करीत असतील असें तुम्हांला वाटतें काय ? सरदारसाहेब, तुम्हीं मजहून अधिक विचारी अहांत, अधिक अनुभविक अहांत हें सर्व खरें; पण **काका**साहेबांची भेट घेण्याकरितां जाण्याचा तुह्मीं केलेला निश्चय शुद्ध वेडेपणाचा आहे, असें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. "

**कुमुद्**०:-" पण तुमच्या **काका**साहेबांनीं एका प्रसंगीं कृतज्ञतेची खूण ह्मणून आपली मुद्रिका मला दिलेली आहे आणि ती अद्यापि माझेजवळ आहे, ही गोष्ट तुह्मांला ठाऊक नाहीं वाटतें ? ती मुद्रिका दृष्टीस पडतांच जर आपण होऊन दिलेल्या वचनाचा त्यांनीं आदर केला नाहीं तर त्यांच्या शिपाईगिरीस अक्षय्य कलंक लागेल आणि सर्व **भरतखंडां**त त्यांची अपकीर्ति पसरेल याची त्यांना भीति नसेल काय ? "

**बालार्क**०:-" सरदारसाहेब, तुम्हीं ह्मणतां तें खरें; पण **काका**साहेबांनीं जेव्हां आपली मुद्रिका तुह्मांला दिली त्यावेळीं तुमचें तोंड शिरस्त्राणानें झांकलेलें होतें हें खरेंना ? तर मग तुम्ही कोण हें न कळतां तुम्हांला दिलेलें वचन ते पाळतीलच असें कशावरून गृहित धरतां ? शिवाय तुह्मांला त्यांनीं जी मुद्रिका दिली त्या मुद्रिकेचा उपयोगही तुह्मीं फार चांगल्या रीतीनें एकवार केला आहे ! मुद्रिका हातांत येऊन

**कुमुद०**:—" पण पुढें कसें वागावयाचें व काय सोंग आणावयाचें याचाही त्यांनीं ताबडतोब निश्चय करून ठेवला असावा? पुढें प्रसंग पडल्यास, यांपैकीं आपल्यास कांहीं एक गोष्ट ठाऊक नाहीं, **श्वेतपादा**शीं आपला काडीमात्र संबंध नाहीं, हें सर्व कोणातरी लुच्चाचें काम आहे असें सांगून हें प्रकरण अंगाबाहेर टाकावयाचें असा त्यांनीं लागलीच बेत करून ठेवला असावा? नाहीं बरें?"

**बालार्क०**:—" होय."

**कुमुद०**:—" आणि तुह्मीही पण असें ठरविलें असेल कीं, आणखी वेळपर्यंत येथें रहावें आणि राणीसाहेबांचे यापुढें काय काय बेत होतात याची इत्थंभूत हकिकत काढून घेऊन नंतर परत **जयद्रथराया**च्या छावणींत जावें. होय का नाहीं?"

**बालार्क०**:—" होय, आपला अंदाज अगदीं बरोबर आहे."

**कुमुद०**:—" माझी पक्की खात्रीच होती कीं असें होईल, आणि ह्मणूनच **जयद्रथरायां**कडून आलेल्या गृहस्थाची आणि माझी भेट झालीच पाहिजे अशी **बसवप्रभू**पाशीं मीं आग्रहानें मागणी केली; पण **जयद्रथरायां**कडून आलेले गृहस्थ तुम्हीं असाल व तुमची माझी येथें अशा तऱ्हेनें गांठ पडेल ही कल्पना मात्र माझ्या मुळींच मनांत आली नाहीं."

**बालार्क०**:—"सरदारसाहेब, मला वाटतें कीं, **बसवप्रभु** आणि **कालनीती** हे पूर्णपणें तुमच्या हातांत सांपडले असावे. तसें नसतें तर त्यांनीं **काका**साहेबांकडून आलेल्या हस्तकाची व तुमची भेट कांहीं झालें असतें तरी होऊं दिली नसती. 'आपल्या घरीं बंडखोरांकडील कोणीही माणूस नाहीं, आपला **जयद्रथराया**शीं कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं' असें सांगून त्यांनीं बाहेरच्या बाहेर तुम्हांला कसें वाटेस लाविलें नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें."

**कुमुद०**:—" त्यांचीं काय काय कृष्ण कृत्यें मला कळलीं आहेत व त्यांच्या शेंड्या माझ्या हातांत कशा सांपडल्या आहेत हें जोंपर्यंत त्यांना कळलें नव्हतें, तोंपर्यंत त्यांनीं तुह्मी ह्मणतां अशा प्रकारची पुष्कळ उडवाउडव केली; पण शेवटीं मीं त्यांना थोडीशी माहिती देतांच ते निरुपाय व दीन झाले. ते इतके कीं, मला वाटतें तर मस्तकें नमवून माझे पायावर लोटांगणें घालावयासही मीं त्यांना लावलें असतें! अशी स्थिति आली ह्मणूनच मींही या गोष्टीबद्दल आग्रह धरला आणि तेही माझ्या अटीस कबूल झाले."

**बालार्क०**:—"पण **काका**साहेबांकडून आलेल्या हस्तकाची व तुमची भेट झालीच पाहिजे असा आग्रह धरण्यांत तुमचा काय हेतु होता, आणि येथें तुम्हांला कोण भेटेलसें वाटलें होतें तें तुम्हीं मला अद्यापि सांगितलें नाहीं."

**कुमुद०**:—"सांगतों ऐका. **जयद्रथराय** जेथें असतील तेथें ताबडतोब जाऊन त्यांची भेट घ्यावयाची असा मीं संकल्प केला होता—"

**बालार्क०**:—(त्याला पुरतें न बोलूं देतां

मध्येंच, आश्चर्यानें ) " काय **काका**साहेबांची भेट घ्यावयाचा तुमचा बेत होता ? "

**कुमुद**०:–( शांतपणें ) " होय. **जयद्रथरायां**चीच. माझें असें अनुमान आहे कीं, ह्या गांठीपासून पुष्कळ प्रकारें फायदा होण्यासारखा आहे. हें पहा, **बालार्कराय**, ह्या बंडाचा लवकरच मोड होणार, राणीसाहेबांच्या पक्षास खचित जय मिळणार, हें आतां पक्कें ठरल्यासारखें नाहीं काय ? तेव्हां शेवटीं **जयद्रथराया**सारख्या विख्यात व शूर सरदारास शूलारोपणाची किंवा निदान कारागृहवासाची शिक्षा व्हावी हें बरें नव्हे. तसेंच कांहीं कालपर्यंत तरी लढाया चालून विनाकारण रक्तपात व प्राणहानी व्हावी हेंही ठीक नव्हे. ह्मणून या दोन्ही गोष्टींचा प्रतिकार कांहीं प्रयत्नांनीं करतां आला तर पहावा हा हेतु मनांत धरून मीं हा बेत केला आहे. "

**बालार्क**०:–(उत्साहपूर्वक) " सरदारसाहेब, तुमच्या औदार्यशीलतेची कमाल आहे आतां ! पण **काका**साहेबांचा स्वभाव तुह्मांला माहीत नाहीं. तुमचा त्यांचा संबंध कशा प्रकारचा आहे हें तुह्मीं विसरलां अहांत कीं काय ? ही गोष्ट लक्षांत आणा कीं तुह्मीं त्यांना दोन वेळ प्रत्यक्ष द्वंद्वांत पराभूत केलें आहे; तुह्मीं त्यांच्या सर्व बेतांचा मोड केला आहे व त्यांना जवळ जवळ हताश करून सोडलें आहे. तुम्ही **कूर्मदुर्गां**तून त्यांच्या हातून अवेळीं निसटून गेलां, राणीच्या संरक्षणाकरितां सैन्य जमा करून आणलेंत; ऐनप्रसंगीं साहाय्य करून तिला त्यांच्या हातून सोडविलेंत; **महासेन** व **शक्तिधर** यांना आयत्यावेळीं अजब युक्ति करून फसविलेंत; या सर्व गोष्टींबद्दल **काका**साहेबांस मोठा संतोष वाटला असेल व ते तुमच्यावर मोठें प्रेम करीत असतील असें तुम्हांला वाटतें काय ? सरदारसाहेब, तुम्ही मजहून अधिक विचारी अहांत, अधिक अनुभविक अहांत हें सर्व खरें; पण **काका**साहेबांची भेट घेण्याकरितां जाण्याचा तुह्मीं केलेला निश्चय शुद्ध वेडेपणाचा आहे, असें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. "

**कुमुद**०:–" पण तुमच्या **काका**साहेबांनीं एका प्रसंगीं कृतज्ञतेची खूण ह्मणून आपली मुद्रिका मला दिलेली आहे आणि ती अद्यापि माझेजवळ आहे, ही गोष्ट तुह्मांला ठाऊक नाहीं वाटतें ? ती मुद्रिका दृष्टीस पडतांच जर आपण होऊन दिलेल्या वचनाचा त्यांनीं आदर केला नाहीं तर त्यांच्या शिपाईगिरीस अक्षय्य कलंक लागेल आणि सर्व **भरतखंडां**त त्यांची अपकीर्ति पसरेल याची त्यांना भीति नसेल काय ? "

**बालार्क**०:–" सरदारसाहेब, तुम्हीं ह्मणतां तें खरें; पण **काका**साहेबांनीं जेव्हां आपली मुद्रिका तुह्मांला दिली त्यावेळीं तुमचें तोंड शिरस्त्राणानें झांकलेलें होतें हें खरेंना ? तर मग तुम्ही कोण हें न कळतां तुम्हांला दिलेलें वचन ते पाळतीलच असें कशावरून गृहित धरतां ? शिवाय तुह्मांला त्यांनीं जी मुद्रिका दिली त्या मुद्रिकेचा उपयोगही तुह्मीं फार चांगल्या रीतीनें एकवार केला आहे ! मुद्रिका हातांत येऊन

**कुमुद**०:—" पण पुढें कसें वागावयाचें व काय सोंग आणावयाचें याचाही त्यांनीं ताबडतोब निश्चय करून ठेवला असावा? पुढें प्रसंग पडल्यास, यापैकीं आपल्यास कांहीं एक गोष्ट ठाऊक नाहीं, श्वेतपादाशीं आपला काडीमात्र संबंध नाहीं, हें सर्व कोणातरी लुच्चाचें काम आहे असें सांगून हें प्रकरण अंगाबाहेर टाकावयाचें असा त्यांनीं लागलीच बेत करून ठेवला असावा? नाहीं बरें?"

**बालार्क**०:—" होय."

**कुमुद**०:—" आणि तुह्मीही पण असें ठरविलें असेल कीं, आणखी वेळपर्यंत येथें रहावें आणि राणीसाहेबांचे यापुढें काय काय बेत होतात याचीं इत्थंभून हकिकत काढून घेऊन नंतर परत **जयद्रथराया**च्या छावणींत जावें. होय का नाहीं?"

**बालार्क**०:—" होय, आपला अंदाज अगदीं बरोबर आहे."

**कुमुद**०:—" माझी पक्की खात्रीच होती कीं असें होईल, आणि ह्मणुनच **जयद्रथरायां**कडून आलेल्या गृहस्थाची आणि माझी भेट झालीच पाहिजे अशी **बसवप्रभू**पाशीं मीं आग्रहानें मागणी केली; पण **जयद्रथरायां**कडून आलेले गृहस्थ तुम्ही असाल व तुमची माझी येथें अशा तऱ्हेनें गांठ पडेल ही कल्पना मात्र माझ्या मुळींच मनांत आली नाहीं."

**बालार्क**०:—"सरदारसाहेब, मला वाटतें कीं, **बसवप्रभु** आणि **कालनीती** हे पूर्णपणें तुमच्या हातांत सांपडले असावे. तसें नसतें तर त्यांनीं **काका**साहेबांकडून आलेल्या हस्तकाची व तुमची भेट कांहीं झालें असतें तरी होऊ दिली नसती.' आपल्या घरीं बंडखोरांकडील कोणीही माणूस नाहीं, आपला **जयद्रथरायां**शीं कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं' असें सांगून त्यांनीं बाहेरच्या बाहेर तुम्हांला कसें वाटेस लाविलें नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें."

**कुमुद**०:—" त्यांचीं काय काय कृष्ण कृत्यें मला कळलीं आहेत व त्यांच्या शेंड्या माझ्या हातांत कशा सांपडल्या आहेत हें जोंपर्यंत त्यांना कळलें नव्हतें, तोंपर्यंत त्यांनीं तुह्मी ह्मणतां अशा प्रकारची पुष्कळ उडवाउडव केली; पण शेवटीं मीं त्यांना थोडीशी माहिती देतांच ते निरुपाय व दीन झाले. ते इतके कीं, मला वाटतें तर मस्तकें नमवून माझे पायावर लोटांगणें घालावयासही मीं त्यांना लावलें असतें! अशी स्थिति आली ह्मणूनच मींही या गोष्टीबद्दल आग्रह धरला आणि तेही माझ्या अटीस कबूल झाले."

**बालार्क**०:—"पण **काका**साहेबांकडून आलेल्या हस्तकाची व तुमची भेट झालीच पाहिजे असा आग्रह धरण्यांत तुमचा काय हेतु होता, आणि येथें तुम्हांला कोण॰ भेटेलसें वाटलें होतें तें तुम्हीं मला अद्यापि सांगितलें नाहीं."

**कुमुद**०:—"सांगतों ऐका. **जयद्रथराय** जेथें असतील तेथें ताबडतोब जाऊन त्यांची भेट घ्यावयाची असा मीं संकल्प केला होता—"

**बालार्क**०:—(त्याला पुरतें न बोलूं देतां

मध्येंच, आश्चर्यानें ) "काय **काका**साहेबांची भेट घ्यावयाचा तुमचा बेत होता ?"

**कुमुद्**०:-( शांतपणें ) "होय. **जयद्रथरायां**चीच. माझें असें अनुमान आहे कीं, ह्या गांठीपासून पुष्कळ प्रकारें फायदा होण्यासारखा आहे. हें पहा, **बालार्कराय**, ह्या बंडाचा लवकरच मोड होणार, राणीसाहेबांच्या पक्षास खचित जय मिळणार, हें आतां पक्कें ठरल्यासारखें नाहीं काय ? तेव्हां शेवटीं **जयद्रथराया**सारख्या विख्यात व शूर सरदारास शूलारोपणाची किंवा निदान कारागृहवासाची शिक्षा व्हावी हें बरें नव्हे. तसेंच कांहीं कालपर्यंत तरी लढाया चालून विनाकारण रक्तपात व प्राणहानी व्हावी हेंही ठीक नव्हे. ह्मणून या दोन्ही गोष्टींचा प्रतिकार कांहीं प्रयत्नांनीं करतां आला तर पहावा हा हेतु मनांत धरून मीं हा बेत केला आहे."

**बालार्क**०:-(उत्साहपूर्वक) "सरदारसाहेब, तुमच्या औदार्यशीलतेची कमाल आहे आतां ! पण **काका**साहेबांचा स्वभाव तुह्मांला माहीत नाहीं. तुमचा त्यांचा संबंध कशा प्रकारचा आहे हें तुह्मीं विसरलां अहांत कीं काय ? ही गोष्ट लक्षांत आणा कीं तुह्मीं त्यांना दोन वेळ प्रत्यक्ष द्वंद्वांत पराभूत केलें आहे; तुह्मीं त्यांच्या सर्व बेतांचा मोड केला आहे व त्यांना जवळ जवळ हताश करून सोडलें आहे. तुम्ही **कूर्मदुर्गां**तून त्यांच्या हातून अवेळीं निसटून गेलां, राणीच्या संरक्षणाकरितां सैन्य जमा करून आणलेंत; ऐनप्रसंगीं साहाय्य करून तिला त्यांच्या हातून सोडविलेंत; **महासेन** व **शक्तिधर** यांना आयत्यावेळीं अजब युक्ति करून फसविलेंत; या सर्व गोष्टींबद्दल **काका**साहेबांस मोठा संतोष वाटला असेल व ते तुमच्यावर मोठें प्रेम करीत असतील असें तुम्हांला वाटतें काय ? सरदारसाहेब, तुम्हीं मजहून अधिक विचारी अहांत, अधिक अनुभविक अहांत हें सर्व खरें; पण **काका**साहेबांची भेट घेण्याकरितां जाण्याचा तुह्मीं केलेला निश्चय शुद्ध वेडेपणाचा आहे, असें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं."

**कुमुद्**०:-"पण तुमच्या **काका**साहेबांनीं एका प्रसंगीं कृतज्ञतेची खूण ह्मणून आपली मुद्रिका मला दिलेली आहे आणि ती अद्यापि माझेजवळ आहे, ही गोष्ट तुह्मांला ठाऊक नाहीं वाटतें ? ती मुद्रिका दृष्टीस पडतांच जर आपण होऊन दिलेल्या वचनाचा त्यांनीं आदर केला नाहीं तर त्यांच्या शिपाईगिरीस अक्षय्य कलंक लागेल आणि सर्व **भरतखंडां**त त्यांची अपकीर्ति पसरेल याची त्यांना भीति नसेल काय ?"

**बालार्क**०:-"सरदारसाहेब, तुम्हीं ह्मणतां तें खरें; पण **काका**साहेबांनीं जेव्हां आपली मुद्रिका तुह्मांला दिली त्यावेळीं तुमचें तोंड शिरस्त्राणानें झांकलेलें होतें हें खरेंना ? तर मग तुम्ही कोण हें न कळतां तुम्हांला दिलेलें वचन ते पाळतीलच असें कशावरून गृहित धरतां ? शिवाय तुह्मांला त्यांनीं जी मुद्रिका दिली त्या मुद्रिकेचा उपयोगही तुह्मीं फार चांगल्या रीतीनें एकवार केला आहे ! मुद्रिका हातांत येऊन

पुऱ्या दोन घटका झाल्या नाहींत तोंच त्या मुद्रिकेचा उपयोग त्यांचे बेत सबंध मोडून काढण्याच्या कामीं तुह्मीं केला हें जेव्हां त्यांस कळलें तेव्हां त्यांस आपली मानखंडना झालीसें वाटलें नसेल काय, आणि त्यांना अतिसंताप आला नसेल काय ? "

**कुमुद**०:—" तें कसेंही असो. युद्धांत शत्रूंनीं परस्परांचे बेत मोडण्यासाठीं अशा प्रकारची युक्ती केली म्हणून तो अधर्म ठरेल, असें मला तरी वाटत नाहीं. मीं मुद्रिकेचा कांहीं उपयोग केला असता, तथापि त्यामुळें **जयद्रथरायांचें** वचन पुरें झालें असें होत नाहीं. जोंपर्यंत ती मुद्रिका माझे हातांत आहे तोंपर्यंत कोणत्याही प्रसंगीं **जयद्रथरायांना** आपलें वचन राखलेंच पाहिजे. शिवाय दुसरीही एक गोष्ट आहे. यावेळीं त्यांची भेट घेण्यास जाण्याचा जो माझा विचार आहे तो त्यांच्याच फायद्याचा असून अगदीं त्रयस्थपणाचा व सरळ आहे. एकंदरींत तुह्मांला मी एकच गोष्ट सांगतों, माझा विचार या कामीं ठरलेला आहे. तुमची व माझी गांठ पडण्याच्या अगोदरपासून मीं आपल्या मनाचा निश्चय करून ठेविला आहे."

**बालार्क**०:—"बरें, तर मग या कामीं मजपासून तुह्मांस कांहीं साहाय्य व्हावें अशी तुमची इच्छा आहे कीं काय ? "

**कुमुद**०:—" होय; अगदीं बरोबर. आजच आह्मांला अशी बातमी लागली आहे कीं, बंडखोरांची छावणी **विषवल्ली** येथें आहे व त्यांची सर्व फौज प्रथम तेथें जमा व्हावयाची असें ठरलें आहे; पण **जयद्रथराय** तेथेंच आहेत कीं काय हें अद्याप कळलें नाहीं. माझें अनुमान असें आहे कीं, **जयद्रथरायांचा** मुक्काम दुसऱ्या कोणत्या तरी ठिकाणीं असावा. **गूहसिंहाकडून** येणारें द्रव्य अमक्या जागीं आपले हातीं अमक्या जागीं आणून पावतें करावें असें त्यांनीं तुह्मांला सांगितलें असलें पाहिजे. जेथें फौजेची छावणी आहे त्याच्या आसपास कोठें तरी ही जागा असली पाहिजे. तेव्हां तुह्मांपासून मला जें साहाय्य पाहिजे तें एवढेंच कीं, **जयद्रथरायांचा** मुक्काम उद्यां कोठें आहे तेवढें मला कळवा. "

**बालार्क**०:—"सरदारसाहेब, मी आपल्याला स्पष्टपणें एक गोष्ट सांगून ठेवतों. मी जातीचा शिपाई आहें. तेव्हां जरी राणीसाहेबांवर हत्यार उचलणार नाहीं, किंवा त्यांच्या शत्रुपक्षास कोणत्याही प्रकारें साहाय्य करणार नाहीं असा मीं निश्चय केला आहे, तरी ज्यांनीं मजवर ह्या वेळपर्यंत पूर्ण विश्वास टाकला होता त्या सरदारमंडळीचा किंवा **काका**साहेबांचा विश्वासघात करण्याचें काम मी कधींही करणार नाहीं. "

**कुमुद**०:—" आणि असलें बेहिमतीचें नीच काम करा असें मीही पण तुह्मांला कधीं सांगणार नाहीं. मीही जातीचा शिपाई आहें, तेव्हां ही गोष्ट तुह्मी मला सांगावयास नको होती ! **बालार्कराय** तुह्मी थोडा विचार करा. जर चार दोन हजार सैन्य बरोबर घेऊन **जयद्रथरायांवर** अवचित छापा घालण्याच्या हेतूनें मी जाणार असतों तर त्यांचा मुक्काम कोठें आहे हें मला सांगणें किंवा त्यांचे मुक्कामाचे

# केसरींतील निवडक निबंध.

## भाग पहिला व दुसरा.

केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

### पहिले भागांत आलेले निबंधांची अनुक्रमणिका.


उपोद्घात—वाचन.
आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण?
हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे.
आह्मी आमच्या दारिद्र्यांतून कशानें सुटूं?
गुरुगोविंद.
वृत्तकाची अवश्यकता.
व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं.
आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा
हिंदुस्थानावर रशिया स्वारी करणार काय?
इंग्लंडाशिवाय आह्मांस गति नाहीं.
दागिन्यांचा सोस.
एकत्र राहणें चांगलें का?
अनुकरण.
अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार.
भोजनगृह.
युरोपियन आणि नेटिव यांचें अन्योन्य संघट्टन.
मराठमोळा.
मराठमोळ्याची पुरवणी.
सासुरवास.
दारुबाजी.
इंग्रजी विद्या व आमची सामाजिक स्थिति.
हिंदुस्थानदेश बुडाला, हो, टार बुडाला.
स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द.
माधवबागेंतील सभेवरील आक्षेप.
आतां कसें?
सास्वांस नोटीस.
वर्तमानपत्रें.
शेक्सपिअर, भवभूति, कालिदास.
नाटकें करावीं कीं करूं नये?
कवि, काव्य, काव्यरति.
बडोद्याचे सयाजीराव महाराज यांस दोन उपदेशपर शब्द.
आपलें वैद्यक.
रसायनक्रिया.
मुद्रणस्वातंत्र्य.
कै० विष्णु कृष्ण चिपळोणकर.
मन आणि मेंदू.
सूट्यवलोकन.


### दुसरे भागांत आलेले निबंधांची अनुक्रमणिका.


ज्ञान.
अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
जूट.
मनुष्यांचें सामाजिक कर्तव्य
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्णावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल?
बालविवाहापेक्षां सतीच बरी!
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय?
चैन.
स्त्रीदास्यविमोचन.
तंबाखू.
चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें
आह्मा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचे म० चऱ्हाट.
एक वृद्ध पोलिटिकल अत्याबाई.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे
व्यायाम.
परभाषेंतील शब्दांची योजना.
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची अवश्यकता.

उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बायबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला.
प्रसिद्धीकरण.
ब्रह्मदेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गमतीचे प्रश्न.
पाऊस.
मि० ब्राइट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?
,, उत्तरार्ध.
ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज.
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति.

**म्यानेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें.**

## विक्रीस तयार.

## सरदार परशुराम भाऊ पटवर्धन यांचे पराक्रम.

अथवा

**( पेशवाईंतील धामधुमीचा देखावा. )**

रचणार—धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे. हा ग्रंथ दक्षिणाप्राईज कमिटीनें पसंत करून त्याबद्दल बक्षिस दिलें आहे.

पटवर्धन हे ब्राह्मणसरदार असून प्रसिद्ध वृद्ध पुरुष निझामअली ह्यानें ज्याप्रमाणें पेशवाईची अव्वल अखेर डोळ्यांनीं सारी पाहिली, त्याप्रमाणेंच परशुरामभाऊ पटवर्धन यांचे हयातींत पेशव्यांचे गादीवर चारपांच पेशवे होऊन गेले. तितक्या अवधींत पेशव्यांच्या दरबारांत राजकारस्थानाची जी विलक्षण दंगल उडाली होती व नानाफडणीस व महादजी शिंदे यांच्या मसलतीच्या जो बहारीचा सामना चालला होता, त्याविषयींचें चित्तवेधक वर्णन या ग्रंथांत विस्तारानें देण्याचा यत्न केला असून हरिपंत फडके, त्रिंबकराव मामा, इंग्लिश, निझाम, हैदर इत्यादिकांविषयीं विस्तृत माहिती योग्य स्थलीं दिली आहे.

मिळमिळीत व बखरी भाषेला नाकें मुरडून इतिहासवाचनाचा जे कंटाळा करीत असतील, किंवा कादंबऱ्यांतील काल्पनिक वीरवर्णनानेंच जे आपली तहान भागवून घेत असतील व ब्राह्मण म्हणजे मूळचे नेभळे अशी ज्यांची भ्रामक समजूत असेल, अशा लोकांस पुढील चरित्र अत्यंत उपयुक्त व मनोरंजक होईल असी उमेद आहे. कारण ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या धर्तीवर रचलेल्या ह्या पुढील ग्रंथाच्या आधारें व न्यायशाबक भावेलिरीज प्रत्यक्ष ऐतिहासिक स्थलांची व प्रसंगाची सत्यता सिद्ध करण्याकरितां ग्रंथकर्त्यानें टीपेंत जागोजाग आधार दिले आहेत.

किंमत १२ आणे, ट० हं० २ आणे.

## त्राटिका नाटक.

महाकवि शेक्सपिअरकृत टेमिंग आफ दी श्र्यू नाटकाच्या आधारें प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए., यांनीं लिहिलें.

**या नाटकांत हास्यरस पूर्ण भरला आहे.**

किंमत ०६ आणे ट० हं० ०१ आणा.

## लटपटच्या पद्या

## प्रहसन

**प्रो. वा० बा० केळकर, बी. ए., कृत**

किं० ०४, ट० ख० ०१.

## चार्लस ब्राडला, एम्. पी.

यांचें चरित्र 'विलायतच्या प्रवास' या पुस्तकाच्या विद्वान् कर्त्यांनीं लिहिलें. पूर्णस्वातंत्र्यभक्त, दुर्बलांचा कैवारी, सत्पक्षाचा अभिमानी, धीरोदात्त पुरुषांत अग्रणी, या दुर्दैवी आर्यभूचा परम उपकारी मित्र अशा या अलौकिक पुरुषाचें बोधपर चरित्र वाचल्यापासून मनावर सुसंस्कार झाल्याशिवाय राहणार नाहीं. किं० ४ आणे, टपालहांशील ६ पै.

**आर्यभूषण छापखाना, पुणें.**

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक ९.

# नाटयकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.*

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठें.


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| पानिपतचा दुर्दैवी मोहरा. ... ... ... ... ... ... | १ पासून १६ |
| कुवलयपूरची राणी कुमुद्वती.... ... ... ... ... ... | २३३ ,, २४८ |


पुणें आर्यभूषण छापखान्यांत

हरि नारायण गोखले यांनीं छापिलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क
मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.

[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ३॥. शिवाय ट.हं. ६ आणे.

सप्टेंबर १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें.

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें

# वीरमणी आणि शृंगारसुंदरी.

महाकवी शेक्सपियरकृत अंटनी अँड क्लिओपाट्रा
या नाटकाच्या आधारें

## वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए.,

**फर्ग्यूसन कालेजांतील इंग्रजी भाषाविषयाचे अध्यापक,**

यांनीं रचिलेलें नाटक.

**किंमत ०६ आणे ट. हं. ०१ आणा.**

---

# डिमास्थेनीस यांचें चरित्र.

हें लहानसें चरित्र प्रो० चिंतामण गंगाधर भानू बी. ए. "रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र" व "नीतिमीमांसा" या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें आहे. डिमास्थेनीस हा अथेन्स शहरच्या आणि ग्रीस देशाच्या इतिहासांत वर्णनीय पुरुष होऊन गेला. याच्या अंगीं मुख्य गुण वक्तृत्व. मुत्सद्दीपणांतही तो कमी होता असें नाहीं. यानें आपल्या हातून आपल्या देशाचें वैभव वाढविण्याविषयीं निशान राखण्याविषयीं काय काय केलें, देशाभिमान त्याच्या अंगीं कसा जाज्वल रीतीनें वास करीत होता, स्वातंत्र्य राखण्याविषयीं त्याचें मन कसें स्फुरत होतें इत्यादि गोष्टी आमच्या महाराष्ट्र वाचकांनीं या चरित्रापासून घेण्यासारख्या आहेत. पुस्तक बारीक पण रुंद व जाड्या अक्षरांनीं छापलें आहे. किंमत ४॥ आणे. ट० हं० अर्धा आणा.

---

# रिचर्ड कॉब्डेन यांचें चरित्र.

**चिंतामण गंगाधर भानू बी. ए. प्रोफेसर,** फर्ग्यूसन कालेज, पुणें,

यांनीं लिहिलें.

रिचर्ड काब्डेन, ब्राइट साहेबांचा साथीदार, यांनीं इंग्लंडच्या इतिहासांत लोककार्यदक्षतेविषयीं व परहिततत्परतेविषयीं अमर कीर्ति मिळविली आहे. इंग्लंडच्या व्यापाराची वाढ अनेक प्रतिबंधक कायद्यांनीं खुंटविली होती, ती यांनीं जिवापाड मेहनत घेऊन लोकांचे व राज्यकर्त्यांचे भ्रम दूर करून मोकळी केली. राष्ट्रीय हिताची कळकळ बाळगणारांनीं स्वकार्यसिद्धीसाठीं देशसेवेला कसें तनमनधन अर्पण केलें पाहिजे, अश्रांत देह झिजविला पाहिजे, ममत्व टाकलें पाहिजे हें या चरित्रवाचनापासून चांगलें कळेल. किंमत १० आणे. ट० हं० एक आणा.

**पुणें, आर्यभूषण छापखाना.**

# पानिपतचा दुर्दैवी मोहरा.

अथवा

# पानिपतचें तुमुल रणकंदन.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थलः**—आंबे पडदुराच्या मैदानांतील तंबू.

**भाऊसाहेब** हातांत पत्र घेऊन विचार करीत आहेत.

**भाऊसाहेबः**—( आपल्याशीं ) मल्हाररावाला आतां येवढं कां कळूं नये? वास्तविक पाहतां त्याच्या वयाला कांहीं थोडथोडकीं नाहींत तरी ४०।५० वर्षें तर सहज होऊन गेलीं. केसांचा काळेपणा जाऊन त्यांवर रुपेरी चमक येऊं लागली. तरी देखील त्यास एवढं कळूं नये कीं आपसांतील कलहानं शत्रू जोरावतो. आपल्यांत फूट आहे एवढं शत्रूस कळलं कीं पुरे, त्याचवेळीं अगदीं निखालस समजावं कीं शत्रूचा जोर दुप्पट वाढला. या फुटींत घाव घालून आपल्या शत्रूचे दोन तुकडे करायला मग तो कध्धीं कमी करणार नाहीं. हें त्या लांकुडफोड्याला सुद्धां कळतं. तो देखील लांकडं फोडित असतांना लांकडांत कुठं लहानसान भेग अथवा फट आहे कीं नाहीं तें अगोदर पाहतो. आणि एखादी फट दिसतांच आपल्या कुऱ्हाडीचा असा कांहीं एक घाव देतो कीं त्या घावासरशीच त्या लांकडाचे दोन तुकडे करून तो ते दोन्हीकडे दोन फेंकून देतो. त्याला देखील जर एवढी अक्कल आहे तर ती या मल्हाररावाला, जो आज कित्येक वर्षं "रावबां" च्या व "आप्पा" च्या बरोबरीनं मोंगलाशीं मोठ्या हमरीतुमरीनं झुंजला, हिंदुस्थानांतही ज्यानं आपली समशेर चांगलीच चमकावलीन; वसई भांडवीत असतांना आप्पांच्या बरोबर राहून अटोकाट मर्दुमकी करून ज्यानं फिरंग्यांस चांगलाच हात दाखविलान; निजामाच्या कपटप्रयुक्तीवर रावबा व आप्पा कोणच्या प्रकारच्या शकली लढवून त्याच्या मसलती फेंटाळीत होते हेंही ज्याच्या नजरेखालून शेंकडों वेळां गेलेलं—त्या या मल्हाररावासारख्या चांगल्या अनुभविक व पोक्त सुभेदाराला एवढं कळूं नये हें खरोखर अगदीं-अगदीं-चमत्कारिक !

एक सेवक येतो.

**सेवकः**—रावसाब, भाईर राव (बळवंतराव

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें

# वीरमणी आणि शृंगारसुंदरी.

महाकवी शेक्सपियरकृत अंटनी अँड क्लिओपाट्रा
या नाटकाच्या आधारें

## वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए.,

**फर्ग्यूसन कालेजांतील इंग्रजी भाषाविषयाचे अध्यापक,**

यांनीं रचिलेलें नाटक.

**किंमत ८६ आणे ट. हं. ८१ आणा.**

---

# डिमास्थेनीस यांचें चरित्र.

हें लहानसें चरित्र प्रो॰ चिंतामण गंगाधर भानू बी. ए. "रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र" व "नीतिमीमांसा" या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें आहे. डिमास्थेनीस हा अथेन्स शहरच्या आणि ग्रीस देशाच्या इतिहासांत वर्णनीय पुरुष होऊन गेला. याच्या अंगीं मुख्य गुण वक्तृत्व. मुत्सद्दीपणांतही तो कमी होता असें नाहीं. यानें आपल्या हातून आपल्या देशाचें वैभव वाढविण्याविषयीं निदान राखण्याविषयीं काय काय केलें, देशाभिमान त्याच्या अंगीं कसा जाज्वल रीतीनें वास करीत होता, स्वातंत्र्य राखण्याविषयीं त्याचें मन कसें स्फुरत होतें इत्यादि गोष्टी आमच्या महाराष्ट्र वाचकांनीं या चरित्रापासून घेण्यासारख्या आहेत. पुस्तक बारीक पण रुंद व जाड्या अक्षरांनीं छापलें आहे. किंमत ४॥ आणे. ट॰ हं॰ अर्धा आणा.

---

# रिचर्ड कॉब्डेन यांचें चरित्र.

**चिंतामण गंगाधर भानू बी. ए. प्रोफेसर,** फर्ग्यूसन कालेज, पुणें,

यांनीं लिहिलें.

रिचर्ड काब्डेन, ब्राइट साहेबांचा साथीदार, यांनीं इंग्लंडच्या इतिहासांत लोककार्यदक्षतेविषयीं व परहिततत्परतेविषयीं अमर कीर्ति मिळविली आहे. इंग्लंडच्या व्यापाराची वाढ अनेक प्रतिबंधक कायद्यांनीं खुंटविली होती, ती यांनीं जिवापाड मेहनत घेऊन लोकांचे व राज्यकर्त्यांचे भ्रम दूर करून मोकळी केली. राष्ट्रीय हिताची कळकळ बाळगणारांनीं स्वकार्यसिद्धीसाठीं देशसेवेला कसें तनमनधन अर्पण केलें पाहिजे, अश्रांत देह झिजविला पाहिजे, ममत्व टाकलें पाहिजे हें या चरित्रवाचनापासून चांगलें कळेल. किंमत १० आणे. ट॰ हं॰ एक आणा.

**पुणें, आर्यभूषण छापखाना.**

# पानिपतचा दुर्दैवी मोहरा.

अथवा

# पानिपतचें तुमुल रणकंदन.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थलः**—आंबे पडदुराच्या मैदानांतील तंबू.

**भाऊसाहेब** हातांत पत्र घेऊन विचार करीत आहेत.

**भाऊसाहेबः**—( आपल्याशीं ) मल्हाररावाला आतां येवढं कां कळूं नये? वास्तविक पाहतां त्याच्या वयाला कांहीं थोडथोडकीं नाहींत तरी ४०।५० वर्षं तर सहज होऊन गेलीं. केसांचा काळेपणा जाऊन त्यांवर रुपेरी चमक येऊं लागली. तरी देखील त्यास एवढं कळूं नये कीं आपसांतील कलहानं शत्रू जोरावतो. आपल्यांत फूट आहे एवढं शत्रूस कळलं कीं पुरे, त्याचवेळीं अगदीं निखालस समजावं कीं शत्रूचा जोर दुप्पट वाढला. या फुटींत घाव घालून आपल्या शत्रूचे दोन तुकडे करायला मग तो कध्धीं कमी करणार नाहीं. हें त्या लांकुडफोड्याला सुद्धां कळतं. तो देखील लांकडं फोडित असतांना लांकडांत कुठं लहानसान भेग अथवा फट आहे कीं नाहीं तें अगोदर पाहतो. आणि एखादी फट दिसतांच आपल्या कुऱ्हाडीचा असा कांहीं एक घाव देतो कीं त्या घावासरशीच त्या लांकडाचे दोन तुकडे करून तो ते दोन्हीकडे दोन फेंकून देतो. त्याला देखील जर एवढी अक्कल आहे तर ती या मल्हाररावाला, जो आज कित्येक वर्षं "रावबां" च्या व "आप्पा" च्या बरोबरीनं मोंगलाशीं मोठ्या हमरीतुमरीनं झुंजला, हिंदुस्थानांतही ज्यानं आपली समशेर चांगलीच चमकावलीन; वसई भांडवीत असतांना आप्पांच्या बरोबर राहून अटोकाट मर्दुमकी करून ज्यानं फिरंग्यांस चांगलाच हात दाखविलान; निजामाच्या कपटप्रयुक्तीवर रावबा व आप्पा कोणच्या प्रकारच्या शकली लढवून त्याच्या मसलती फेंटाळीत होते हेंही ज्याच्या नजरेखालून शेंकडों वेळां गेलेलं—त्या या मल्हाररावासारख्या चांगल्या अनुभविक व पोक्त सुभेदाराला एवढं कळूं नये हें खरोखर अगदीं-अगदीं-चमत्कारिक !

एक सेवक येतो.

**सेवकः**—रावसाब, भाईर **राव** (बळवंतराव

मेहेंदळे), गोइंदराव दादा, अन् अनीबी कोन् कोन् लई वाटकूळ येऊन उभे न्हाइल्याती.

भाऊ०:–(न ऐकतां आपल्याशींच) पण पुढें जर असं दुर्दैवच ओढावयाचं होतं तर त्याला तो तरी काय करील? होणार जाणार बलवत्तर! पण मल्हारराव जर कुचर न करितां खाजगी द्वेष घटकाभर बाजूला ठेवता तर अशी हलाखी उडतीना, हें खचीत!

सेवकः–सरकार, अव सरकार, भाईर राव, गोइंदराव अनीबी कोन् कोन् आल्याती.—

भाऊ०:–अं:? काय ह्मटलंस? राव आणि गोविंदराव आले ह्मणून? जा, जा तर लौकर; ये घेऊन त्यांना इकडे झट्दिशीं.

बळवंतराव मेहेंदळे; गोपाळराव पटवर्धन व गोविंदराव खाजगीवाले येतात.

बळ०:–कां आज कांहीं कमजास्ती?

भाऊ०:–कमजास्ती? (विचार केल्यासारखें करून) हं: 'कम' आणि 'जास्ती' अन् 'जास्ती' आणि 'कम'! हें असं जगामध्यें आहे ह्मणूनच ठीक आहे. नाहीं तर मनुष्य अगदीं बेफिकीर रहाता. बेफिकीर रहाता येवढेंच नव्हे, तर तो मग कोणाची पर्वाही न बाळगता!

बळ०:–(साश्चर्य) काय? असं अगदीं निराश व्हायला काय झालं तरी काय? मीं जेव्हां मघाशीं तंबूंत पाय टाकला आणि आपल्या चेहऱ्याकडे पाहिलं तेव्हांच माझ्या लक्षांत आलं कीं आज कांहीं तरी कमीजास्ती आहे खचित. व ह्मणूनच मीं आपल्याला हा प्रश्न आपला भीतभीतच केला.

गोविंद०:–मीहि पण तेव्हांच ताडलं. आणि ह्मणणारहि पण होतों; पण ह्मटलं—

भाऊ०:–काय? तर, मनांत उठलेल्या वादळाचीं चिन्हं चेहऱ्यावरून व्यक्त होतात. अथवा हे (डोळ्याकडे बोट करून) हेर आंतील सर्व बित्तं बातमी सहज फोडून टाकतात तर मग!

बळ०:–उघडच आहे. मनोविकारांत जसजशा थोड्याबहुत मानानें चलबिचल व्हावयास लागते तसतशी तितक्याच थोड्या अथवा बहुत मानानें त्या चलबिचलीचीं चिन्हं चेहऱ्यावर व्यक्त होणं हें अगदीं स्वाभाविक आहे! बरं पण तें असो. आपली तब्यत इतकी अस्वस्थ होण्यासारखं आज काय, घडलें तरी काय? आणि मघाशीं "'जास्ती' आणि 'कम' आणि 'कम' आणि 'जास्ती' असं जगामध्यें आहे ह्मणूनच बरं आहे." असं जे आपण ह्मणालांत त्याचा अर्थ काय?

भाऊ०:–त्याचा अर्थ? (पत्र दाखवून) त्याचा सर्व अर्थ, अगदीं अगदीं खुलासेवार, यांत लिहिला आहे. (पत्र त्यांचे अंगावर टाकून) घ्या, घ्या हें! आणि वाचा ह्मणजे सर्व समजेल.

बळ०:–(पत्र घेऊन निरखून पाहतात.)

गोविंद०:–(पत्राकडे पाहून) कां कोणाचं पत्र? कांपऱ्या कांपऱ्या हातानीं काढलेलीं अक्षरं तर कांहीं तरी अशुभ झालं असल्याचं सुचवितात.

**बळ०:**—अहो, हें पाटीलबोवांच्या कारकुनाचें अक्षर, व हा त्यांचा शिक्का ! शिक्का सुद्धां किती गिजबिट उठला आहे हा ! इथून तिथून सर्व काळंच काळं ! !

**भाऊ०:**—( एकदम आवेशानें ) राव ! खरं बोललांत. सर्व काळं तर खरंच. गेला, अहो गेला ! ( गलित होऊन ) आज आपला एक हात गेला ! खचित पडला ! गळून पडला ! तो नाहीं हो आतां पुनः लावायला यावयाचा ! ( दुःखाचा सुस्कारा टाकतो. )

**गोपाळ०:**—( आपल्याशीं ) काय ? पडला कोण ? आणि गेला कोण ?

**बळ०:**—( हातांतील पत्र गळून खालीं पडतें ) खरंच अज्जीबात घात ! गेले हो, पाटीलबोवा गेले. गेले सोडून आपल्याला ! असा हिरा आतां मिळणं नाहीं. काय त्याची चमक तरी काय पण होती ? झाला ! तो आतां शेवटचाच दृष्टीआड झाला.

**गोपाळ०** **गोविंद०** ( पत्राचा कांहीं भाग मनांतल्या मनांतच वाचून एकदम मोठ्यानें ) काय, त्या लांड्या कुतुबशहानं, पाटीलबोआ रणांत पडले असतां त्यांस लत्ताप्रहार करून त्यांची गर्दन छाटून टाकावीना !

**बळ०:**—( आश्चर्य व आवेशयुक्त ) काय ! काय ह्मणतां ! कुतुबशहानं पाटीलबोवांस लत्ताप्रहार केला ? काय ? वाचा बरं तरी तें पत्र एकदां शेवटपर्यंत. ऐकूं द्या तर खरी मला एकदां सर्व हकीगत कसकशी घडून आली ती. (रागानें कांपतात.)

**गोविंद०:**—( पत्र वाचतात. )

॥ श्रीमोरया ॥

श्रीमंत महाराज राजश्री नानासाहेब पंडित पंतप्रधान स्वामींचे सेवेशीं— विनंति सेवक रामजी अनंत नि० जनकोजीराव शिंदे याचा कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना—मागील पत्रावरून सर्व मजकूर कळून येईलच. नजीबखान रोहिला व सुजाउद्दौला यांनीं पाटीलबोवांस क्रोड रुपयांच्या आशेस लावल्याबद्दलचीं पत्रें मागें गेलीं आहेतच. त्या क्रोड रुपयांचा उलगडा आतां चांगला झालाच ! पाटीलबोवांस क्रोड रुपयांच्या नादीं लावून त्यांना व जनकोजीराव बाबासाहेबांना एकदमच गारद करण्याचा त्यांचा मनसुबा होता. दिल्लीहून “ अलमशहा ” याची फितुरीचीं पत्रें सुजाउद्दौला यांस गेलीं होतीं त्यांचीं उत्तरें वजीर गाजुद्दीखान यास सांपडलीं. तीं त्यानें स्वतः मसलतीस येऊन पाटीलबोवांस समक्ष दाखवितां त्यांची क्रोड रुपयांची आशा सुटली. इतक्यांत दुराणीपुढें कच खाऊन लाहोराहून साबाजी शिंदे आले. व त्यांनीं दुराणीकडील जोर फार ह्मणून सांगतांच पाटिलबोवा, नजीबखान व सुजाउद्दौला यांस अबदुलअल्ली मिळाला नाहीं तोंच गांठून कडनिकडीनें त्यांस नेस्तनाबूद करावें अशा इराद्यानें इतर सरदारमंडळीसह पुढें झटकले. तों

पंजाबांतून " त्रिंबक बापूजी " चे पथकाची वाताहात करून त्यांतील मोठमोठ्या सरदारमंडळीसहि नागवे, उघडे व घायाळ करून दुराणीनें धुडकावून लावून दिले होते. त्यांची ती दुर्दशा पाहतांच पाटील फार खवळले. इतक्यांत दुराणीनें " सोमाजी बाबा भोंसले " यांचेंहि शीर छेदून नेल्याची बातमी आली. तेव्हां मात्र पाटीलबोवा आपल्या जिवाविषयीं अगदीं बेफिकीर झाले. व मुलामाणसांची शेवटची भेट घेतात तशी घेऊन–

**गोपाळ०:**–काय " शेवटची भेट ? " ( चकित झालों असें दाखवितो. )

**बळ०:**–काय हीच शेवटची भेट ह्मणतां ! अं !

**भाऊ०:**–होय, होय ! हीच, हीच शेवटची भेट ! ( डोळ्यास पदर लावतात. )

**गोविंद०:**–( पुढें पत्र वाचतो. ) तशी घेऊन आह्मांबरोबर ५ हजार फौज व जाट याजकडील वकील रूपराम कट्यारी यांस बरोबर देऊन चमेली पार व्हावें ह्मणून सांगितलें. बाबासाहेबांस आमच्याबरोबर जाण्यास सांगितलें; परंतु त्यांनीं " तुह्मांस सोडून मी जीव गेल्यानेंही जायचा नाहीं " असें पाटीलबोवांस मोठ्या आग्रहानें व निश्चयानें सांगतांच त्यांनींही मग त्यास जाण्याविषयीं फारसा आग्रह केला नाहीं. मातोश्री भागीरथीबाई पाटीलबोवांचें कुटुंब–यांनीं उद्यां संक्रांत व कर झाल्यावर वाणें व तीळ वांटून लगेच जाऊं ह्मणून सांगितलें; परंतु पाटलांनीं ' सध्यां आमच्यावरच संक्रांत बसली आहे. झटपट निघोन जाणें ' ह्मणोन सांगतांच आह्मी मुकाट्यानें निघून फरकाबादेवरून असे पुढें आणखी १२ कोस जाऊन डेरे दिले. इकडे त्याच दिवशीं झुंजास तोंड लागलें. त्यांत बयाजी शिंदे गर्द होऊन त्यांचा अर्धा मुर्दा पाण्यांत आणि अर्धा मुर्दा वाळूंत अशी त्यांची गत झाली. तीच गत इतर खाशांची. दुराणीनें मुर्देहि पळविले तरी–" आज कांहीं आह्मीं युद्ध करीत नाहीं. मल्हारराव होळकर नजीक आले आहेत. ते जयनगरचा शह सोडून एकदोन दिवसांत इथें येऊन पोंचतील; तोंपर्यंत काव्यानेंच दुरून राहूं " असें ह्मणून मल्हाररावाची मार्गप्रतीक्षा करीत पाटील अगदीं गाडून उभे राहिले. तों इकडून जनकोजी शिंदे निशाणापाशीं झोंबत होते, त्यांस उजवे दंडास गोळी लागून मूर्च्छा येऊन ते घोड्याखालीं पडल्याची बातमी पाटीलबोवा यांस कळली. " बाबासाहेबांस जा ह्मणतां गेला नाहीं. मजकरितां हिय्या करून राहिला, आणि त्याची ही गत ! तर आतां मला तरी जगून काय करावयाचें आहे ? सुभेदारही वेळेवर आले नाहींत. आज येतों उद्यां येतों असें सांगून शेवटीं आह्मांस तोंडघशीं दिलें. जाटास आह्मीं आसरा दिल्याचा द्वेष उगवून घेतला ! आतां त्यांची वाट पाहून उपयोग नाहीं."

**बळ०:**—(दुःखावेगानें) सुभेदारांनीं, अशा प्रसंगाला मागच्या कुरापती काढून न येणें ह्मणजे आपण होऊनच आपल्या धन्याच्या, अर्थात् आपल्या नाशास, प्रवृत्त होण्यासारखेंच नव्हे काय? सुभेदार, ही मात्र तुह्मीं मोठी मोठी चूक केलीत!

**भाऊ०:**—(दुःख व आवेशयुक्त) चूक! नुसती चूकच काय, त्याहीपेक्षां कांहीं जास्तीच. असो. होणार भवितव्य, तसतशी बुद्धी सुचते. पण या आपसांतील कलहानंच तर यानीं आपल्यावर व अर्थात् आमच्यावर हें दुर्दैव ओढवून आणलं! आणि दुसरं काय?

**गोविंद०:**—(पुढें पत्र वाचतो) असें ह्मणून त्यांनीं आपले पुढें कुतुबशहा व दुराणी १० हजार सैन्यासह उभे होते त्याजवर अठरा असामीनिशीं घोडे घातले. क्षणभर तलवारीची टिपरघाई केली. त्यांत ११ खासे ठार झाले. जात्या खाशांनीं धांव केला. तेथून माघारें गोळीच्या माऱ्यांत निघाले तों यशवंतराव जगदळे थोराळेकर यांस गोळी लागली. ते ठार झाले. त्यांचे भाऊ पिराजी जगदळे हे जवळ होतेच. त्यांनीं यशवंतरावाच्या मुडद्यासाठीं फार प्रयत्न चालविला. पाटीलबोवा आपल्या लालमणीचें तोंड किंचित् माघारें फिरवून "ओढा, ओढा तो मुडदा" असें ह्मणून जों आरडतात तों काळदूतासारखी एक गोळी अचूक येऊन त्यांच्या उजवे बरगडींत—

**बळ०:**—उजव्या बरगडींत गोळी लागली; आणि हा वीरतारा तिथेंच तुटून पडला अं! हा तारा आतां कोठून चमकणार? त्याची सारी चमक, अन् त्याचें सर्व तेज हीं तो तुटून पडतांच त्याचीं त्याजबरोबरच गेलीं अं!

**गोविंद०:**—(हताश व सद्गदित होऊन पत्र टाकून) बस्स झालं. आपल्या हातून नाहीं बोवा वाचवत आतां मोठ्यानं!

**बळ०:**—अहो गोपाळपंत, घ्या घ्या तुह्मी तरी वाचा! नशीबीं आलंय खरं मग तें न वाचून कांहीं चुकतंय थोडंच. त्या दुष्ट कुतुबशहानं काय काय कसं कसं केलन तें तर एकदां ऐकूं द्या मला!

**गोपाळ०:**—(स्फुंदत डोळ्यास पदर लाऊन सद्गदित कंठानें वाचतात) आतां माझ्या हातून लिहवत नाहीं, लिहितांना माझा ऊर अगदीं भरून येत आहे. कंठही दाटला व हे डोळे आंसवांनीं इतके कांहीं जड होऊन गेले आहेत, कीं आतां मला लिहायलाही कांहीं दिसेनासें झालें आहे व हातही जास्तच कांपूं लागला आहे. तर पुरेंच आतां—

**गोपाळ०:**—आणि आमचीहि पण हीच स्थिति होत आहे. (त्याचें हातांतून पत्र गळून पडतें.)

**गोविंद०:**—(पत्र उचलून घेऊन) याच्या पुढचा मजकूर दुसरे दिवशीं लिहिलेला दिसतो.

**सर्व:**—(सुस्कारे टाकतात.)

**बळ०:**—वाचा, वाचाहो पुढची हकीगत, कळूं तर द्या एकदां सगळी!

**गोविंद०:**—(पत्र वाचतो) आपल्यास सर्व

हकीगत जर मी न कळवीन तर सर्व दोष मजवरच येणार आहे, त्यांत माईसाहेबांचें तर अगदीं निक्षून सांगणें आहे कीं श्रीमंतांस सर्व खुलाशाचीं पत्रें ताबडतोब जावींत ह्मणून. ह्मणून आजहि जरी लिहावयास लागतांना कालच्या सारखीच स्थिति होते आहे तरी तें लिहिल्याशिवाय बिलकुल गत्यंतर ह्मणून नाहीं.—पाटीलबोवांस गोळी लागून ते घायाळ होऊन पडले. त्यांचे जवळ राजाराम चोपदार, व राघोराम पागे ह्मणून पागनीस होते, ते आपल्या अन्नास जागले. पाटीलबोवांचे प्राण गेले नव्हते, ह्मणून त्यांसहि थोडासा दम आला. "अबदुलअली हरामी त्याच्या हातीं आपण सांपडलों तर तो आमचें व पाटील यांचें शिर एकदांच कापून नेईल. त्यापेक्षां आपण होऊनच शत्रूच्या हस्तगत झाल्यास उत्तम." असा विचार करून राघोबा पाटीलबोवांजवळ राहिले, व राजाराम चोपदारास कुतुबशहाकडे जाऊन पोंचण्यास सांगितलें. तों कुतुबशहाची अंबारी त्यास वाटेंतच भेटली. राजाराम चोपदारानें लऊन मुजरा केला. रात्रंदिवस जाणें येणें असल्यामुळें सहजच ओळख होती. कुतुबशहानें "राजाराम तुम् कहां" ह्मणून विचारतां त्यानें "साहेब, पटेल घायाळ पडा है. यहां बचावे" ह्मणोन सांगतांच कुतुबशहा "पटेल कहां है? दिखलाव" असें ह्मणून पाटीलबोवा जेथें घायाळ होऊन पडले होते तेथें आला, व पाटीलबोवांस उद्देशून, मिशांना पीळ देत व दाढीवरून हात निसटता घेत ह्मणाला "पटेल, हमारे साथ तुम और लढेंगे?" पाटील, जरी गोळी लागून अगदीं घायाळ होऊन पडले होते, तरी पुरे सावध होते. त्यांजसारख्या वीरसिंहाला हें उपहासपर भाषण कोठचें रुचणार? जरी अवसान नव्हतें तरी या वीरसिंहानें गर्जना केलीच. पाटील ह्मणाले, "इनशा हाख्नाह्म बचेंगे तो और बी लढेंगे". हें मानी उत्तर ऐकून कुतुबशहाहि त्वेषास चढला. त्यास वाटलें होतें कीं हा लीन होऊन जिवदान मागेल; परंतु त्यांत त्याचा अगदीं विरस झाला. व "आच्छा लढो" असें बोलून त्यांस त्या दुष्टानें जोरासरशी लाथेनें ढकलून दिलें. राजारामानें व पाग्यानें कुतुबशहाचें हें नीच अधमपणाचें कृत्य पाहतांच त्वेषास चढून आपापल्या तलवारीस हात घातला. तों शहाच्या लोकांनीं त्यांस एकदम कैद केलें. इकडे एका झट्क्यासरशीं कमरेचा सुरा काढून त्या काळकिंकरानें पाटीलबोवांस पालथें घालून त्यांजवर आपला सुरा चालविला. असो; झालें—नाहीं, आतां लिहवत नाहीं. पण याबद्दल सूड-सूड-हा घेतलाच पाहिजे. व ह्मणूनच तर लिहिण्यास—

**बळ०**:—( दांत ओंठ खाऊन ) सूड! सूड हा घेतलाच पाहिजे!

**गोविंद०**:—( डोळ्यास पाणी आणून वाचीत) व ह्मणूनच तर लिहिण्यास हात वहात आहे,

राघोबा व चोपदार यांस कैद केलें असतांहि यांनीं त्यास १ क्रोड रुपये देऊं केले. परंतु कुतुबशहानें—त्या खाटकानें तें न ऐकतां आपल्या भाल्यास तें शीर टोंचून तो शहाजणें वाजवीत नजीबखानाकडे गेला. नजीब्यानें तें शीर हातरुमालांत घालून नेलं. व तें अबदुलअल्ली दुराणी याचे पायावर ठेवून त्यानें तें त्यांस मोठ्या डौलानें अर्पण केलें. व अशा रीतीनें त्याचा "वाघमान" केला !

**बळ०**:—त्या शिखानष्टाच्या आणि पायावर ठेवून आं ! अरे !! अरे !!! त्या दुष्टानें ज्या पायावर तें ठेविलें त्या पायाचें आणि ज्या हातानें तें ठेवलें त्या हाताचे जेव्हां तुकडे तुकडे करीन—

**भाऊ०**:—पण ऐकाल तर पुढें—

**बळ०**:—अहो नाहींहो. त्या "वाघमाने" वरून जेव्हां ह्या सिंहाचा हा पंजा फिरेल तेव्हांच—

**गोविंद०**:—(वाचतो) इकडे पाटलाच्या खालच्या लालमणी घोडीस घेऊन सरदार तानाजी खराडे घाबऱ्या घाबऱ्या निशाणाकडे गेले व त्यांनीं निशाणाजवळील लढणाऱ्या सरदारांस पाटील यांच्या शिरच्छेदाची भयंकर वार्ता सांगून निशाण काढायास लाविलें. निशाण काढतांच सर्वत्र धांवाधांव व पळापळ सुरू झाली. बाबासाहेबांस गोळी लागली असल्यामुळें त्यांस घोड्यावर बसावयाचेंही बिलकुल अवसान राहिलें नव्हतें. या पळापळींत कोणी कोणास विचारीनासें झालें. बाप लेंकास विचारीना, लेक बापास विचारीना; परंतु अशांतही येसूजी भोइटे व जानराव वांबाळे यांनीं कडनिकड करून बाबासाहेबांस घोड्यावर बसवून, दोहीं बाजूस धरून मोठ्या शिकस्तीनें तडक पळ काढला. बाबासाहेब घायाळ झाल्यामुळें पाणी पाणी करून ओरडत; परंतु तें द्यावयास कोणासही दम निघेना. कारण पाठीवर गिलचे एकसहां डोकीं कापीतच चालले होते. बडेखां महात यानें दुराणींत जव्हेरीलाल हत्तीस घालून मर्दुमकीची शर्थ केली. लाहोरचे सुभे लक्ष्मीनारायण यानें तट घालून क्षणभर चांगलीच मारामार केली. इकडे दिल्लीचा किल्ला टाकून वजीर गाजुद्दीखानानेंही तडक पळ काढला व ५।७ कोसांवर येऊन त्यानें बाबासाहेबांची फौज गांठली. मागें ७।८ हजार शिरें गिलचांनीं कापून नेलीं ! राजाराम चोपदारानें मोठ्या शिताफीनें आपली सुटका करून घेऊन मग तो सुजाउद्दौल्याचा दिवाण "उमरावगीर गोसावी" याजकडे केला. व त्याजकडून सुजाउद्दौल्याच्या मार्फत अबदालीकडे मोठी रदबदली करून ३ लक्ष रुपयांची निशा करून पाटीलबोवांचें शिर एकदां महाप्रयासानें मिळविलें. सुजाउद्दौल्याचा बाप मनसूरअल्ली यास गंगापार करून त्याच्या दाढीची शरम राणोजी शिंदे थोरले पाटील यांनीं राखिली होती ती कामास आली.

गोसावी हिंदू म्हणूनच फार कामास आला. त्यानें आपणाकडील मराठे होते त्यांस आणून साहित्य उत्तम प्रकारें करून चंदन, बेल, व तुळशीकाष्टें आणून यमुनातीरीं यथाविधि दहन केलें. दानधर्मही बहुत करून खैरातही वांटली. शत्रूकडील असूनहि उपयोगीं पडला.

इकडे जनकोजी शिंद्यांना घोड्यावर बसण्याचें अवसान पुरेनासें झाल्यामुळें वाटेवरील एका खेड्यांतील खाटलें घेऊन खाशियानीं उड्या टाकून बाबासाहेबांस २४ कोसांवर जेथें बुणगें, बाया व आम्हीं उतरलों होतों तेथें ते घेऊन आले. वाटेंत "काका कोठें आहेत?" म्हणून बाबासाहेब प्रश्न करीत. परंतु बरोबरीच्या मंडळीनें ते पुढें गेले असें सांगून त्यांस चाळवीत चाळवीत येथवर आणलें. त्या वेळचा आकांत काय लिहावा! मग येथून निघून आम्हीं मुक्काम करीत करीत आणखी ५०।६० कोसांची मजल मारून कोटपुतळीस येऊन दाखल झालों; तों सुभेदार मल्हारराव होळकर व गोदूबाईसाहेब हे येऊन भेटले. त्यांनीं सांत्वन करून जरा धीरही पण दिला. सुभेदारसाहेब बाबासाहेबांस, बायांस घेऊन माळव्यांत जाण्याविषयीं पुष्कळ आग्रह करीत आहेत. परंतु बाबासाहेबांचा एकच जबाब कीं, "जेथें काका मृत्यू पावले त्या स्थळींच आपणहि देह टाकावा असा माझा नियम आहे. मला आतां जगण्याची बिलकुल इच्छा नाहीं." या त्यांचे आग्रहामुळें सध्यां सर्वत्रांच्या विचारें असें ठरत आहे कीं मी बायांस घेऊन माळव्यांत जाण्याकरितां उद्या निघावें. व त्यांचा बेत असा झाला आहे कीं दुराणीभोंवतीं सडेच राहून गनीमी काव्यानेंच गिलचास जेरीस आणावें. हेंच सुभेदार जर मागील सर्व विसरून वेळींच येऊन मिळते तर असा नाहक प्रसंग ओढवताना! असो; जादा काय लिहावें. पाटीलबोवांच्या मागें आम्हांस आधार काय ते श्रीमंतांचे पाय. बाबासाहेब आतां आपले आहेत, असें समजून काय तें करणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. ता० छ. ३ जमादिलाखर.

(सर्व निःश्वास टाकून चित्रासारखे स्तब्ध बसतात.)

भाऊ०:—कां राव? कां आतां उगीच कां बसलां? 'कम' आणि 'जास्ती' आणि 'जास्ती' आणि 'कम' याचा अर्थ आपल्यास कळलाना आतां पुरा?

बळ०:—हो हो, पुरा, पुरा कळला. कळला का म्हणून आणखी काय विचारतां?

भाऊ०:—अहो सुख आणि दुःख, जय आणि अपजय, सुदैव व दुर्दैव, उन्ह आणि सांवली या दुकलींपुढें मनुष्यमात्रांच्या अकला कशा अगदीं गुंग होऊन जातात! हेंच पहा, निजामास मोठ्या अटोकाटीनें उदगिरच्या लढाईंत जेर

करून आह्मांस हव्या तशा तहांत आणला त्या तहनाम्याची शाईही अजून पुरती वाळली नसेल. रणांत पडलेल्या कित्येक शवांस देखील अजून अग्नी देण्याचा राहिला असेल. संग्रामभूमीस ज्या उत्तम शत्रूरक्तांनीं स्नान घातलं तें अजून पुरतं गोठलंहि नसेल. रणवाद्यांचे सर्वत्र घुमत असणारे गजर अजून बंदहि झाले नसतील. 'हरहर महादेव' ह्मणून मोठ्या वीरश्रीनं दिलेल्या आरोळ्या अद्याप कर्णरंध्रांत घुमत आहेत. असं असूनही जिवाला स्वस्थता नाहीं. झोंप देखील धड येत नाहीं. लागलाच जर कुठें अंमळ डोळा तर झोंपेंतच निजाम हातीं सांपडला आहे. आपण त्याला तलवारीनं मारीत आहों. इतक्यांत त्याजकडील कोणी एक सरदार येऊन माझीहि गर्दन छाटीत आहे. अशीं नाहीं नाहीं तीं भयंकर "वीरस्वप्नं" पडतात. विजयानंदाचा अनुभव देखील अजून नीटसा घेण्यास सांपडला नाहीं. तोंच ही दत्ताजी शिंद्यांच्या भयंकर शिरच्छेदाची दुष्ट वार्ता ऐकण्याचा प्रसंग येतो. याला काय ह्मणावं? अहो सुख—

**गोपाळ०:**—पण भाऊसाहेब, मला एक शंका येते! आपण आतां जें स्वप्न सांगितलंत त्याचा आणि या बातमीचा तर कांहीं संबंध नसेलना?

**गोविंद०:**—छे हो. त्याचा आणि याचा काय अर्थाअर्थी संबंध आहे? कांहीं एक नाहीं.

**बळ०:**—एः, त्याच्याशीं स्वप्नाचा काय संबंध असणार?

**गोपाळ०:**—असं मात्र ह्मणूं नका. स्वप्नाचा आणि याचा काय संबंध? असं ह्मणणं मात्र अगदीं चुकीचं आहे.

**बळ०:**—अहो, जें मनीं असे तें स्वप्नीं दिसे, आणि दुसरं काय? भाऊंस उठतां, बसतां, निजतां, सर्व निजामाशीं लढाईच जर दिसते तर त्यांना तशीं स्वप्नं पडणं अगदीं साहजिक आहे.

**गोपाळ०:**—बरं, पण मी एक विचारतों कीं, हें स्वप्न पहाटेस पडलं होतं का?

**भाऊ०:**—हो हो अगदीं पहाटेस, सुमार घटकाभर रात्र असेल्ल नसेल! तो मुसंडा अजून–अजून माझ्या डोळ्यापुढें जशाचा तस्सा दिसत आहे. ते त्याचे मोठ्या आवेशानें फाडलेले डोळे, आणि ती त्याची क्रुद्ध मुद्रा पाहूनच माझी अगोदर बोबडी वळली. तलवारीस हात घालण्यास प्रयत्न करूं लागलों तों हातहि पुढें करवेना किंवा पाऊलहि पुढें टाकवेना. जेव्हां त्यानं मानेवर सुरी ठेवली तेव्हां मीं अतिशय भिऊन एकदम किंकाळी फोडली, आणि माझा मीच एकदम जागा झालों. पण मी जागा आहे कीं स्वप्नांत आहे हें माझं मलाच कळेना! मी आपल्या कपाळावर व गालावर एक दोन चारदां चिमटेही घेऊन बघितले. तेव्हां माझी खात्री झाली कीं, हें सगळं स्वप्न आहे. माझा उठण्याचा बेत होता, परंतु इतक्यांत पुनः आणखी माझा डोळा

लागला. व पुनः त्याच मुसलमान सरदारानं आपली तलवार चालवून माझं शिर छाटून टाकलं, तरी पण मी हें सर्व बघतच होतों. मला स्वतःला मारला असतां मी जिवंत कसा! व माझी छाटलेली गर्दन मी स्वतःच कशी पहात होतों ? हें अजूनपर्यंतहि मला एक मोठं गूढच होऊन पडलं आहे ! पण काय हो गोपाळराव! तुह्मी मघां जे ह्मणालांत कीं तुह्मांला तें स्वम बहुधा पहाटेस पडलं असावं ह्मणून, हें तुह्मीं कशावरून ताडलंत ?

**गोपाळ०**:—कशावरून ? कशावरून ह्मणजे; अहो पहांटेच्या स्वप्नाचा बहुतकरून कांहीं तरी दाखला येतोच येतो. तो आल्याशिवाय कध्धीं रहात नाहीं.

**भाऊ०**:—ह्मणजे. तर मग आतां आमचं मरणच आलं असं समजायचं कीं काय ?

**गोपाळ०**:—अहो दाखला ह्मणजे कांहीं आपल्यावरच पाळी आली असली पाहिजे असं कांहीं नाहीं. आपल्यावरचं "पाटीलबोवा" वर गेलं. एकूण ठोकताळा तर आला कीं नाहीं, आणि हें स्वम तुह्मांला हें पत्र येण्याच्या पूर्वींच पडलं असावं. मग तें एक दोन दिवसच अगोदर पडलं असो अथवा आठ दहा दिवस अगोदर पडलं असो.

**भाऊ०**:—हो, हेंहि पण कसं अगदीं नक्की जुळतं. ही स्वप्नाची गोष्ट ह्मणजे (विचार केल्यासारखें करून) काल नाहीं, (ओंठाकडे बोट नेऊन) परवां परवाच्या पहांटची; आणि हें पत्र तुह्मी येण्याच्या पूर्वीं एक घंटाभरच काय तें अगोदर नानासाहेबांनीं मजकडे वाचण्यास म्हणून पाठवून दिलं होतं. पत्र वाचून मी नुकताच कुठं विचार करीत पडलों होतों, तों तुह्मी आल्याची वर्दी पोंचली.

**गोपाळ०**:—कांहींहि असो; जोशीबोवांना या स्वमाचं फळ विचारून त्यांच्या सांगण्याप्रमाणं कांहीं शांतिबिंत करणं जरूर असल्यास ती केली पाहिजे.

**भाऊ०**:—तें असो. गिलच्यांनीं तर हिंदुस्थानांत फार काहुर उसळून दिलं आहे. दिवसेंदिवस त्यांचा जोर जास्त जास्तच होत आहे. दिल्लीपतीस तख्तावरून काढून दुराणीनं तें आपणच होऊन बळकावण्याचा घाट आणलासा दिसतो. तर याची काय तजवीज. शिंद्यांच्या दिवाणाकडून तर हें अशा तऱ्हेचं पत्र ! यापुढें आणखी काय काय झालं आहे तें तरी कोणास ठाऊक ? माझ्या मनांत तर वरचेवर हेंच येतं कीं याच घटकेस निघून मजल दरमजल करीत कडेनिकडीनं जाऊन "दत्ताजी शिंद्यां" चा सूड उगवावा व कुतुबशहाला कंठस्नान घालून त्याच्या ताज्या आणि उनुन्हीत रक्तांत हा दस्तरुमाल बुडवून, त्याच रुमालानें जनकोजीचे डोळे पुसावे.

**बळ०**:—माझ्याहि मनांत अशाच तऱ्हेचे विचार येतात. संग्रामांत जशी सैनिकांची एकामागून एक रांग लागून रहाते तशी माझ्या मनांत विचारपरंपरेची एकसारखी रांग लागून राहिली आहे. काय, सांगावं तरी काय ? मनांत काय येतं

आणि काय येत नाहीं हें सांगणं देखिल मुष्कील आहे.

**गोविंद०:**—माझाहि निश्चय हाच आहे. एकदां जाऊन गिलच्यास दाखवावाच हात.

**भाऊ०:**—कांहींहि असो. माझा तर झालाच कृत—

**गोपाळ०:**—थांबा जरा थांबा! कृतनिश्चय करा. पण कशाचा? हिंदुस्थानांत आपण होऊन जाण्याचा नव्हे. तर इथंच राहून आपण आमचा पाठिंबा करावा. दुराणी ह्मणजे काय बिशाद आहे. आपल्या पायांच्या प्रतापानं त्याला एका घटकेंत चिरडून टाकूं.

**बळ०:**-माझंहि ह्मणणं असंच आहे. व्यर्थ मोहरा इरेस घालण्यांत काय मतलब? आह्मी जाऊन दुराणीचे ताबूत चांगले थंडे करून येतों. दुराणी ह्मणजे कोण जिन्नस! दादासाहेबांस मात्र आमच्याबरोबर द्यावें ह्मणजे झालं. कारण त्यांना तिकडील सर्व माहिती आहे, व त्यांचा मोंगलांस चांगलाच दराराहि पण आहे.

**भाऊ०:**—नाहीं. पण मला असं वाटतं कीं आपणच जावं.

**बळ०:**-मी, समशेर बहाद्दर, रघुनाथराव तिघे असलों ह्मणजे बस्स. हिंदुस्थानांत शिंदे व होळकर आहेतच. आपण येण्याचा मात्र आग्रह धरूं नये. येथेंच राहून आमचा पाठपुरावा आपण केला ह्मणजे झालं. नानासाहेबांच्या हातून तो नीटसा होणें नाहीं. शिवाय येथें एकास दोघे असल्यास निजामासही कांहीं उचल खावयास धीर होणार नाहीं. अथवा दुसरेहि कोणी पुंड प्रबल होणार नाहींत.

**गोविंद०:**—माझंहि ह्मणणं रावांच्याच प्रमाणं आहे.

**गोपाळ०:**—मलाहि असंच वाटतं कीं, आपण "रावां" नीं सांगितल्याप्रमाणंच मनसबा कायम करून तसं करण्याचाच निश्चय करावा.

**भाऊ०:**—याबद्दल एकदम मनसबा कायम करण्यांत अर्थ नाहीं. पुष्कळ गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. एखादा निश्चय करण्यापूर्वीच विचार केलेला बरा!

**गोविंद०:**—तेंहि कांहीं अंशीं खरंच.

**बळ०:**—तें कांहींहि असो; माझा तर निश्चय झालाच. कीं हिंदुस्थानांत जावयास कोणीही निघो. मी आपला जाणारच. (तलवार काढून ठेवून) हें पहा आतांच मी प्रस्थान ठेवलें ह्मणून समजा.

एक सेवक येतो.

**सेवकः**—रामा ह्मणतो कीं स्नानाची वेळ झाली.

**भाऊ०:**—हो, हो, होऊं दे ह्मणावं.

**गोपाळ०:**—स्नान करा. पण त्या जोशीबोवांस त्या स्वप्नाबद्दल फल विचारून कांहीं शांतबिंत करावयास पाहिजे कीं काय तें विचारून ते सांगतील तसं करण्याची कांहीं तजवीज ठेवा.

**भाऊ०:**—कोण आहेरे?

**सेवकः**—जी, काय हुकूम आहे?

लागला. व पुनः त्याच मुसलमान सरदारानं आपली तलवार चालवून माझं शिर छाटून टाकलं, तरी पण मी हें सर्व बघतच होतों. मला स्वतःला मारला असतां मी जिवंत कसा! व माझी छाटलेली गर्दन मी स्वतःच कशी पहात होतों? हें अजूनपर्यंतहि मला एक मोठं गूढच होऊन पडलं आहे! पण काय हो गोपाळराव! तुह्मी मघां जे ह्मणालांत कीं तुह्मांला तें स्वप्न बहुधा पहाटेस पडलं असावं ह्मणून, हें तुह्मीं कशावरून ताडलंत?

**गोपाळ०:**—कशावरून? कशावरून ह्मणजे; अहो पहांटेच्या स्वप्नाचा बहुतकरून कांहीं तरी दाखला येतोच येतो. तो आल्याशिवाय कध्धीं रहात नाहीं.

**भाऊ०:**—ह्मणजे. तर मग आतां आमचं मरणच आलं असं समजायचं कीं काय?

**गोपाळ०:**—अहो दाखला ह्मणजे कांहीं आपल्यावरच पाळी आली असली पाहिजे असं कांहीं नाहीं. आपल्यावरचं "पाटीलबोवा" वर गेलं. एकूण ठोकताळा तर आला कीं नाहीं, आणि हें स्वप्न तुह्मांला हें पत्र येण्याच्या पूर्वींच पडलं असावं. मग तें एक दोन दिवसच अगोदर पडलं असो अथवा आठ दहा दिवस अगोदर पडलं असो.

**भाऊ०:**—हो, हेंहि पण कसं अगदीं नक्की जुळतं. ही स्वप्नाची गोष्ट ह्मणजे (विचार केल्यासारखें करून) काल नाहीं, (ओंठाकडे बोट नेऊन) परवां परवाच्या पहांटची; आणि हें पत्र तुह्मी येण्याच्या पूर्वीं एक घंटाभरच काय तें अगोदर नानासाहेबांनीं मजकडे वाचण्यास ह्मणून पाठवून दिलं होतं. पत्र वाचून मी नुकताच कुठं विचार करीत पडलों होतों, तों तुह्मी आल्याची वर्दी पोंचली.

**गोपाळ०:**—कांहींहि असो; जोशीबोवांना या स्वप्नाचं फळ विचारून त्यांच्या सांगण्याप्रमाणं कांहीं शांतिबिंत करणं जरूर असल्यास ती केली पाहिजे.

**भाऊ०:**—तें असो. गिलच्यांनीं तर हिंदुस्थानांत फार काहुर उसळून दिलं आहे. दिवसेंदिवस त्यांचा जोर जास्त जास्तच होत आहे. दिल्लीपतीस तख्तावरून काढून दुराणीनं तें आपणच होऊन बळकावण्याचा घाट आणलासा दिसतो. तर याची काय तजवीज. शिंद्यांच्या दिवाणाकडून तर हें अशा तऱ्हेचं पत्र! यापुढं आणखी काय काय झालं आहे तें तरी कोणास ठाऊक? माझ्या मनांत तर वरचेवर हेंच येतं कीं याच घटकेस निघून मजल दरमजल करीत कडेनिकडीनं जाऊन "दत्ताजी शिंद्यां" चा सूड उगवावा व कुतुबशहाला कंठस्नान घालून त्याच्या ताज्या आणि उन्हेंत रक्तांत हा दस्तरुमाल बुडवून, त्याच रुमालानें जनकोजीचे डोळे पुसावे.

**बळ०:**—माझ्याहि मनांत अशाच तऱ्हेचे विचार येतात. संग्रामांत जशी सैनिकांची एकामागून एक रांग लागून रहाते तशी माझ्या मनांत विचारपरंपरेची एकसारखी रांग लागून राहिली आहे. काय, सांगावं तरी काय? मनांत काय येतं

आणि काय येत नाहीं हें सांगणं देखिल मुष्कील आहे.

**गोविंद०:**—माझाहि निश्चय हाच आहे. एकदां जाऊन गिलच्यास दाखवावाच हात.

**भाऊ०:**—कांहींहि असो. माझा तर झालाच कृत—

**गोपाळ०:**—थांबा जरा थांबा! कृतनिश्चय करा. पण कशाचा? हिंदुस्थानांत आपण होऊन जाण्याचा नव्हे. तर इथंच राहून आपण आमचा पाठिंबा करावा. दुराणी ह्मणजे काय बिशाद आहे. आपल्या पायांच्या प्रतापानं त्याला एका घटकेंत चिरडून टाकूं.

**बळ०:**—माझंहि ह्मणणं असंच आहे. व्यर्थ मोहरा इरेस घालण्यांत काय मतलब? आह्मी जाऊन दुराणीचे ताबूत चांगले थंडे करून येतों. दुराणी ह्मणजे कोण जिन्नस! दादासाहिबांस मात्र आमच्याबेरावर द्यावें ह्मणजे झालं. कारण त्यांना तिकडील सर्व माहिती आहे, व त्यांचा मोंगलांस चांगलाच दराराहि पण आहे.

**भाऊ०:**—नाहीं. पण मला असं वाटतं कीं आपणच जावं.

**बळ०:**—मी, समशेर बहाद्दर, रघुनाथराव तिघे असलों ह्मणजे बस्स. हिंदुस्थानांत शिंदे व होळकर आहेतच. आपण येण्याचा मात्र आग्रह धरूं नये. येथेंच राहून आमचा पाठपुरावा आपण केला ह्मणजे झालं. नानासाहेबांच्या हातून तो नीटसा होणें नाहीं. शिवाय येथें एकास दोघे असल्यास निजामासही कांहीं उचल खावयास धीर होणार नाहीं. अथवा दुसरेहि कोणी पुंड प्रबल होणार नाहींत.

**गोविंद०:**—माझंहि ह्मणणं रावांच्याच प्रमाणं आहे.

**गोपाळ०:**—मलाहि असंच वाटतं कीं, आपण "रावां" नीं सांगितल्याप्रमाणंच मनसबा कायम करून तसं करण्याचाच निश्चय करावा.

**भाऊ०:**—याबद्दल एकदम मनसबा कायम करण्यांत अर्थ नाहीं. पुष्कळ गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. एखादा निश्चय करण्यापूर्वीच विचार केलेला बरा!

**गोविंद०:**—तेंहि कांहीं अंशीं खरंच.

**बळ०:**—तें कांहींहि असो; माझा तर निश्चय झालाच. कीं हिंदुस्थानांत जावयास कोणीही निघो. मी आपला जाणारच. (तलवार काढून ठेवून) हें पहा आतांच मी प्रस्थान ठेवलें ह्मणून समजा.

(एक सेवक येतो.)

**सेवकः**—रामा ह्मणतो कीं स्नानाची वेळ झाली.

**भाऊ०:**—हो, हो, होऊं दे ह्मणावं.

**गोपाळ०:**—स्नान करा. पण त्या जोशीबोवांस त्या स्वप्नाबद्दल फल विचारून कांहीं शांतबिंत करावयास पाहिजे कीं काय तें विचारून ते सांगतील तसं करण्याची कांहीं तजवीज ठेवा.

**भाऊ०:**—कोण आहेरे?

**सेवकः**—जी, काय हुकूम आहे?

भाऊ०:—बाहेर कोण असेल त्याला ह्मणावं जरा जोशीबोवांना मी बोलावलंय् म्हणून सांग.

बळ०:—बरं तर आह्मीहि घेतों आतां रजा. बराच उशीरहि झाला आहे आणि मंडळीहि वाट पहात असतील. तर येतों आतां.

[ एकमेकांस नमस्कार करून सर्व जातात. ]

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

स्थलः—आंबेपडदूर नानासाहेबांचा साहेबी तंबू.

**नानासाहेब, भाऊसाहेब, रघुनाथराव दादा, व बळवंतराव मेहेंदळे.**

भाऊ०:—आणि एवढ्याचकरितां मी ह्मणतो कीं, दादासाहेबांस पाठिवलं ह्मणजे झालं.

नाना०:—पण मला असं वाटतं कीं, आपल्या तिघांपैकीं कोणी गेल्यानं व्यर्थ आब मात्र तुटेल. शिंदेहोळकरांच्या मदतीला इकडून बळवंतराव मेहेंदळ्याबरोबर झाडून तमाम फौजा देऊन त्यांसच पाठवून देऊं ह्मणजे झालं!

भाऊ०:—परवा सुभेदारांचं पत्र आलं तें त्या तऱ्हेचं. आज शिंद्यांचं आलं तें ह्या तऱ्हेचं! यावरून स्पष्ट होतं, कीं दुराणीचा शह फार फार भारी आहे. नुसती फौज पाठवून निभावेल असा रंग दिसत नाहीं. खाशांपैकींच कोणीतरी गेलं पाहिजे. मग दैवीं असेल तें होईल. नशिबीं मरण जर असेल तर तें ह्मणजे इथं राहून चुकेल असाहि कांहीं अर्थ नाहीं. त्यांत शिंदेहोळकरांचा आपापसांत लढा! त्यांजवरच केवळ सोंपवावं असा भाग नाहीं.

नाना०:—कां रघुनाथ तुझं काय ह्मणणं आहे?

रघुनाथ०:—माझं ह्मणणं? माझं ह्मणणें आपल्या आज्ञेच्याबाहेर एक काडीभर देखील नाहीं. आपली आज्ञा झाली कीं, हा याच पावलीं निघालों ह्मणून समजा. आज-आज डेरे उठवितो. मात्र मागच्या स्वारींत झालेल्या कर्जाची रक्कम एक, साठ लाख; दुसरं, सध्याच्या मोहिमेकरितां रुपये एक कोट; व ऐंशीहजार फौजेस भर नालबंदी; याची तजवीज काय ती अगोदर झाली पाहिजे. ह्मणजे मग दुराणी आणि आह्मी पाहून घेऊं.

नाना०:—तें सर्व असूंदे आधीं एका बाजूला, पण आपल्या तिघांपैकीं कोणी जाणें इष्ट आहे कीं नाहीं? याबद्दल तुला कसं काय वाटतं?

रघु०:—शिंदेहोळकरांच्या पत्रांवरून दुराणीचा शह पाहतां आपल्यापैकीं कोणी गेल्यास कांहीं वाईट नाहीं. आणि माझं हें म्हणणं एवढं मान्य झालं कीं, मग एक क्षणभर देखील मी इथं ठरत नाहीं. आणि त्या दुराणीचा चांगला इराणी गद्धाच करून सोडून "दत्ताजी" चा शिरच्छेद करणाऱ्या त्या कुतुबशहाचा चांगला कंबक्तशहाच करून सोडतों.

नाना०:—तें सर्व खरं; पण तूं ह्मणतोस तसं तुझं ह्मणणं मान्य करितां येणं

हेंहि जरा दुर्घटच दिसतं. आणि तशांत तूंच ह्मणजे गेलं पाहिजेस असाहि कांहीं भाग नाहीं.

भाऊ०:-कां बळवंतराव? पाहिलींना? ही यांची मुलुखगिरी! एकदां गेले तों ऐशीं लाख कर्ज केलं; दुसऱ्यानदां गेले तों ६० लक्ष केलं. आणि आतां निघायचं तर एक कोट रुपये, मागचं कर्ज फेडण्यास ६० लाख रुपये आणि वर ऐंशी हजार फौजेस भर नालबंदी. ही मोहीम आणि ही मुलुखगिरी! जसं कांहीं अगदीं लग्नाच्या वरातीलाच निघायचं आहे. घर खाऊन दार तोंडीं लावायचं म्हणतात तें हें. मोहिमेस अथवा मुलुखगिरीस जायचं ते कां काशी-रामेश्वराच्या यात्रेला जातांना जशी थैली बांधून जावं लागतं तसं कां जायचं आहे? वा: ( थोटानें ) ही मात्र खाशी, नामी मुलुखगिरी! जातांना मुबलक खजिना घेऊन जावा आणि येतांना हात हालवीत येऊन, उलट वर आणखी कर्ज करून घेऊन यावं!

बळ०:-अहो, आयत्या पिठावर रेघा कोणीहि ओढील. स्वतःच्या पराक्रमावर व मनगटाच्या जोरावर जो फत्ते-मोहीम करून येईल तो खरा बाणेदार. घरांतून खजिना नेऊन मोहीमी करूं म्हणणाऱ्यांची शिलेदारी उघडच दिसतें!

रघु०:-( रागानें ) बस्स बस्स, जास्त बोलण्याचं बिलकुल कारण नाहीं. माझ्या अटी जर मान्य होत असतील तर सांगा, नाहीं तर हा मी चालता होतों. माझ्या अटी कबूल केल्याशिवाय मला मोहिमेवर जाणं साफ पुरवत नाहीं. कागदाचे घोडे नाचवून अथवा आंकडे मोडून त्यांच्या फौजा बनवून, जर मोहीम करितां येती तर बायकांना लग्नंहि न करितां पिंपळाला नुसत्या प्रदक्षिणा घालून पोरं होतीं!

नाना०:-जाणंच तर सांप्रत आह्मी जाऊं; ( भाऊंस ) अथवा तुम्हीं जावं. दादासाहेबांस सांगायचं तर प्रथमतः जेव्हां त्यांचं कर्ज वारून जाऊं, तेव्हांच त्यांस मुलुखगिरी सांगूं एरवीं सांगणार नाहीं. ( रघुनाथाशीं कुजबुजतात ) आणि त्यांत आज तुला दुराणीवर पाठविणं ह्मणजे तुझ्याबद्दल आजच सर्व आशा सोडून देण्यासारखं होय!

भाऊ०:-आह्मीं जवळ असतांना आपण स्वतः मुलुखगिरीस जावं ह्मणजे मात्र मग फार नामी! आमच्या तोंडावर मग सगळे थुंकतील, याची तरी आह्मांस थोडी शरम पाहिजे! आपल्याहि मनांत दादासाहेबांनीं जावं, असंहि पण दिसत नाहीं. व खजिना घेतल्याशिवाय निघण्याचा त्यांचाहि हिय्या नाहीं; मग उगीच रडत राऊत घोड्यावर बसविण्यांत काय अर्थ?

राघोबा०:-होय. आह्मी "रडत राऊत"! पाहूं तर आतां कोण "हंसत राऊत" मोहिमेवर जाऊन फत्ते करून येतात ते. ( नानास उद्देशून ) बोला बोला, झट्दिशीं. आहेत माझ्या अटी मान्य? असल्या तर तसं सांगा आणि या घटकेस आणा

थैल्या बांधून; कीं हा मी आत्तां निघालोंच. नसल्या तर तसं सांगा. इथं राहून " आयत्या पिठावर रेघा ओढणारे " " रडके राऊत, " हे अथवा आणखी असलेच शब्द एकून घेणें आपल्यास नाहीं पुरवत ?

**भाऊ०:**—नाहीं. साफ नाहीं करिताहेत आह्मांस आपल्या अटी मान्य. वाटल्यास मागं राहून मदत करूं.

**रघु०:**—रोख ! रोख असल्यास बोला ! कर्ज काढण्याचे पेंच जर आंकडे मोडून कळते तर मग इतकं कशाला होतं ?

**भाऊ०:**—असं ह्मणण्यापेक्षां मग जात नाहीं ह्मणूनच कां सांगाना ? " रडके राऊत " आणखी " आयत्या पिठावर रेघा ओढणारे " ह्मटलं ह्मणजे मात्र अगदीं मिरची झोंबल्यासारखी झोंबते !

**रघु०:**—हे, हे शब्द एकदां सहन केले, आत्तां हे दुसऱ्यानं सहन केले. आतां तिसऱ्यानं मात्र ते ऐकण्याची आपली बिलकुल इच्छा नाहीं. ( जाऊं लागतो ) पण नाना ! तुमच्या तोंडून एकदां येऊं द्या पाहूं, नाहींतना माझ्या अटी मान्य ?

**भाऊ०:**—नाहींत. साफ नाहींत. निलाजऱ्यासारखा शंभरदां काय विचारतोस ?

**रघु०:**—बस्स तुह्मांला मध्यें तोंड घालण्याचें काय कारण ? माझा जाब नानास होता ? नाहींत तर नाहींत. हा चाललों. ( रागानें पावलें हापटीत जावयास लागतो. )

**नाना०:**—रघुनाथ, अरे रघुनाथ ! असा रागावून कां चाललास ? कांहीं विचार कर.

[ त्यास आणण्याकरितां जातात परंतु **रघुनाथराव** सोडवून घेऊन जातात. ]

**भाऊ०:**—जाऊं द्या हो गेला तर, काय त्याची इतकी प्रतिष्ठा.

**भाऊ०:**—( **नाना** आल्यावर त्यांस ) नाना, त्याला जे इतकें परत आणायला म्हणून गेलांत तें काय म्हणून ? त्यानं " तुह्मांस तोंड घालण्यास काय कारण ? " म्हणून विचारून आमची खूप शोभा ठेवली नाहीं ? ते आपण त्याला परत आणायला गेलांत ? बरोबर आहे ! आपणास ते सरवे; आणि आम्ही चुलत. ह्मणूनच कीं नाहीं हें असं ?

**नाना०:**—भाऊ ! माझ्याविषयीं आणि तुमच्या मनांत असं यावं हें माझंच दुर्दैव. तो रुसून चालला म्हणून त्यास माघारं आणावं म्हणून गेलों, तों तुमच्या मनानं असं घेतलं ! याला काय म्हणावं ? आज तप दीडतपपर्यंत मी आपल्या सल्ल्यामसलतीनं चालून, आपला एक शब्दहि खालीं पडूं दिला नाहीं, आपल्या आज्ञेप्रमाणें चाललों असं असतां माझ्यासंबंधानं आपल्या मनांत आज किंतु यावा याला आपल्या दुर्दैवाशिवाय दुसरं काय म्हणावयाचं ?

**भाऊ०:**—तें कांहींहि असो. ( आवेशानें ) हा मात्र माझा ठाम—अगदीं ठाम—निश्चय झाला. मीं स्वतः जातीनं हिंदुस्थानांत जाणार. ठरलं, ठरलंच अगदीं. यांत म्हणून आतां बिलकुल अंतर होणार नाहीं. द्यावी तर मला आतां आज्ञा ! म्हणजे " हंसत राऊत " कां " रडत

राऊत " ते तरी एकदां चांगलं प्रत्यास येऊं दे.

बळ०:—मीं तर शिंद्यांचे पत्रांतील मजकूर ऐकतांच प्रतिज्ञा केली आहे कीं, हिंदुस्थानांत कोणीहि जावो. आपणास त्याजबरोबर जायचंच !

भाऊ०:—हं, होऊं द्या एकदां आज्ञा. आतां इथं रहाण्यांत शोभा नाहीं!

नाना०:—भाऊ ! आपण असं काय—चित्तांत तरी काय आणलं आहे ?

भाऊ०:—चित्तांत आणि वित्तांत असं कांहीं एक आणलं नाहीं. हिंदुस्थानची मोहीम या खेपेस जातीनं करायची ! झाली फत्ते तर तोंड दाखवूं. नाहीं तर हें अपेशी तोंड दाखविणार म्हणून नाहीं !

नाना०:—भाऊ ! नकाहो नका; नका असा हेका धरूं. फौज पाठवा. बरोबर पाहिजे तर "रावां" स जाऊं द्या. खाशांपैकींच कोणी जावयास पाहिजे असल्यास समशेरबहाद्दरहि जाईल. पण आपण स्वतः जाण्याचा असा आग्रह धरूं नका.

भाऊ०:—एकदां कृतनिश्चय झाला तो झाला ! मनुष्याला जर कांहीं किंमत असेल तर ती त्याच्या शब्दांत-शब्दांत आहे. तोंडांतून एकवार गेलेला शब्द का माघारी घेतला म्हणजे मग त्याच्या शब्दास मान आणि वजन तें काय राहिलं ?

नाना०:—भाऊ, नकाहो नका असे निष्ठुर होऊं. पाहिजे तर माझं अंतःकरण कापून काढून पहा, कीं तुमच्याविषयीं तें किती स्वच्छ आहे तें ? शपथ, शपथ आहे तुम्ह—

भाऊ०:—( नानांच्या तोंडास हात देऊन ) शपथ ! शपथ घालाल तर खबरदार ! तुम्हांलाच माझ्या गळ्याची शपथ आहे, तुम्ही माझ्या निश्चयाच्या आड आलां तर ! माझ्या कृतनिश्चयाच्या आड नाना, तुम्ही बिलकुल येऊं नये. ( नानांस मोठ्या कळवळ्यानं आलिंगून ) नाना ! तुम्हांस असं वाटतं का, कीं तुमचं अंतःकरण मी ओळखत नाहीं म्हणून ? माझ्यावर तुमचं किती प्रेम आहे हें मी पक्कं जाणून आहे ! माझं म्हणणं म्हणून इतकंच कीं, आपण माझ्या कृतनिश्चयाच्या आड येऊं नये. फत्ते झाली कीं पुढच्या पाडव्याला मी आपला इथं ठेवलेला आहेच म्हणून समजा. त्याबद्दल आपण बिलकुल काळजी करूं नये. आपल्यासंबंधानें माझ्या मनांत कांहीं एक किंतु नाहीं. तो असता तर यापूर्वी कधींच मी कोल्हापुरीं निघून गेलों असतों.

नाना०:—असं असेल तर मग चलावं; खुशाल चलावं. मात्र खुशाल निभावून यावें म्हणजे झालं ! खरं पुसाल तर तुह्मीं न जावं—नाहीं पण तें तसं नकोच आतां; मीच येतों आपल्याबरोबर. मला तरी इथं राहून काय करायचं आहे ? जिथं तुह्मी तिथं मी.

भाऊ०:—वाः ! ह्मणजे मात्र फार नामी ! लोक काय ह्मणतील आणि आधीं

इथलं काम कोणीं पहावं ? मागून आल्यांस पाठपुरावा कोणीं करावा ? श्रीमंत छत्रपतिमहाराज तरी काय ह्मणतील ? याचा कांहीं विचार ? आजपर्यंत जशी आपण माझी सल्लामसलत ऐकत आलांत तशीच यापुढेंहि ऐकावी.

**नाना०:**—त्याला मी अगदीं कबूल आहे.

**भाऊ०:**—तर मीं सांगितल्याप्रमाणं आपण मागें राहून उत्तम रीतीनं पाठिंबा करावा. मी रोज सांड पाठवीन. त्यांत येणाऱ्या पत्रांत लिहिल्याप्रमाणं आपण तजविजी ठेवाव्यात, ह्मणजे झालं.

**नाना०:**—असं असेल तर मग मात्र आपलं म्हणणं मला मान्य करणं भाग आहे.

**बळ०:**—मला देखील हीच व्यवस्था पसंत दिसते. दुराणी ह्मणजे काय ? कांहीं आकाश फोडून आला नाहीं. आपल्या पायांच्या पुण्यप्रतापानं त्याचा एका ४ दिवसांत धुव्वा उसळून देवूं. “ दत्ताजी शिंदे ” गेले होय. पण गोमीला पुष्कळ पाय असतात. त्यांपैकीं एक पाय मोडला तर तिचें कितीसें उणें पडणार ? दादासाहेबांनीं अटकेसच झेंडे लावले. पण ते श्रीमंतांच्या पायांच्या पुण्याईनें आह्मी रुमशामच्या पाच्छाईत नेऊन भर दिवसां नाचवूं. आतां भाऊसाहेबांसंबंधानं ह्मणाल तर ह्या आपल्या सेवकाच्या देहांत जोंपर्यंत ह्मणून प्राण आहेत तोंपर्यंत तरी त्यांच्या जिवास काय, पण एका केसास देखील बिलकुल-बिलकुल धक्का लागूं देणार नाहीं. तलवार व हिंमत आपली. यश देणार एक परमेश्वर, कीं दुसरे आपले पाय !

**नाना०:**—आपल्यासारख्या वीरपुत्रांचा इतका कट्टा निश्चय असल्यावर खरोखर मला भिण्याचं ह्मणून बिलकुल कारण नाहीं.

**भाऊ०:**—ठीक आहे तर. मीं सांगितल्याप्रमाणं करावं. नीट जपून असावं. राज्यकारभार आजपर्यंत चालत आलेल्या शिस्तीवरच चालू ठेवावा. चारचौघांचा विचार घेऊनच काय करणं तें करीत जावं. तें असो; पण आतां शिमगी पौर्णिमा अनायासं अगदीं नजीक येऊन ठेपली आहे. तर सर्व लहानथोर सरदारांस रंग खेळावयास म्हणून येण्याविषयीं पत्रं पाठवून येथें आणवितों. व ते जमले म्हणजे त्यांस हिंदुस्थानांतील सर्व हकीकत सांगून जाण्याचा मुहूर्त निश्चित करूं. लिहवूं तर पत्रं ?

**नाना०:**—हो. काय हरकत आहे ?

**भाऊ०:**—आजच दुपारीं पत्रं लिहवून मोर्तब करण्याकरितां आपलेकडे पाठवून देतों तर.

सेवक येतो.

**सेवक:**—( भाऊसाहेबांस उद्देशून ) इब्राहिमखान गाडदी तंबूपाशीं आपली वाट पहात उभे आहेत.

**भाऊ०:**—बरं तर. नाना मी जातों आतां. गाडदी म्हणजे एक माणूस पण माणूस आहे ! तो होता म्हणून तर उदगीरची

जागीं मला नेऊन पोंचविणें हें विश्वासघातकीपणाचें झालें असतें; पण मी फक्त एका नोकरास बरोबर घेऊन त्यांची भेट घेण्यास जाणार व हीं गोष्ट दुसऱ्या कोणासही कळवावयाची नाहीं असा माझा निश्चय आहे. पाहिजे तर प्रत्यक्ष शपथ–"

**बालार्क**०:–( त्याला पुढें बोलूं न देतां ) " पुरे पुरे; सरदारसाहेब, तुमच्यासारख्या गृहस्थाचा एक शब्द दुसऱ्या सहस्रावधि लोकांच्या शपथाआणापेक्षां अधिक मोलाचा आहे. ज्या ठिकाणीं उद्यां माझी व **काका**साहेबांची गांठ पडावयाची ठरली आहे त्या ठिकाणीं मी स्वतःच तुह्मांस घेऊन जातों. माझा बेत पहांटेस फार लवकर निघण्याचा होता; तसेंच मला फार गुप्तपणें प्रवास केला पाहिजे हें माझ्या या पोषाखावरून तुमच्या लक्षांत आलें असेल. पण आतां––"

**कुमुद**०:–" पण कांहीं नाहीं. जी वेळ तुह्मीं पूर्वी नेमली असेल ती मला कबूल आहे. शिवाय तुह्मांला गुप्तपणानें **कुवलयपुरा**बाहेर पडतां यावें ह्मणून मी येथून तुमच्याबरोबर निघणार नाहीं ह्मणजे झालें. सांगा तर तुह्मी येथून केव्हां निघणार आणि तुह्मांला मीं कोणत्या ठिकाणीं येऊन मिळावयाचें ? "

**बालार्क**०:–( थोडासा विचार करून ) " **ताम्रोपल** टेंकडीच्या खिंडीजवळ तुमची आमची गांठ पडावी. मीं आडवाटेनें जाईन व तुह्मी मोठ्या रस्त्यानें चला. सूर्योदयाला तुमची माझी गांठ पडावी. मी तेथें तुमची वाट पहात राहीन. "

**कुमुद**०:–" ठीक आहे, मी तेथें अगदीं वेळेस येऊन पोंचतों. पण आणखी एक गोष्ट राहिली. तुह्मांला त्या **कालयवन**करकोल्ह्यांनीं तुमच्या आमच्या या झालेल्या भाषणाबद्दल प्रश्न केला तर तुह्मी काय उत्तर देणार ? "

**बालार्क**०:–" मला उत्तर देण्याची पंचाईतच आहे. मीही शेवटीं तुह्मांला याबद्दल प्रश्न करणार होतों. यापैकीं एकही गोष्ट तुमचे परवानगीशिवाय कोणापाशीं बोलावयाची नाहीं अशी मजकडून शपथ घेऊन ठेवा ह्मणजे झालें."

**कुमुद**०:–" बरोबर आहे. तुह्मी यावेळीं पूर्णपणें माझे कबजांत आहांत, तर मग तुमच्या आमच्या झालेल्या या भाषणापैकीं एक अक्षरही माझे आज्ञेवांचून कोणास कळविणार नाहीं, अशी वहा तुमच्या तलवारीची शपथ."

**बालार्करायानें** आपल्या तलवारीवर हात ठेऊन सांगितल्याप्रमाणें शपथ वाहिली.

नंतर **कुमुदबंधु** ह्मणतो :–" ठीक आहे तर. सूर्योदयास **ताम्रोपल** टेंकडीच्या खिंडीजवळ तुमची आमची भेट. मी येथून दोन घटका रात्र असतांना निघेन. **कालिकापूर**च्या मोठ्या रस्त्यानें मी जाणार. माझ्याबरोबर माझा एक नोकर मात्र असावयाचा. ठरलेंना ? "

**बालार्करायानें** ' ठरलें ' ह्मणून उत्तर केलें आणि भेटीच्या आरंभीं शत्रुत्वाच्या नात्यानें एकमेकांसमोर उभे राहिलेले हे दोघे तरुण शिपाई शेंवटीं पक्के मित्र बनून एकमेकांस प्रणाम करते झाले.

वाचकहो, येथून आपल्याला आपल्या कथेचा पुढील सरळ मार्ग सोडून वांकड्या वाटेनें थोडें मागें वळलें पाहिजे. कारण, तसें न केलें तर पुढें घडून येणारा कांहीं विलक्षण प्रकार बरोबर रीतीनें तुह्मांला कळण्यास अडचण पडेल. चला तर **कुमुदबंधूस** क्षणभर येथेंच उभा करून परत **बसवप्रभु** आणि **कालनीती** यांच्या दिवाणखान्यांत जाऊन ते काय करताहेत तें पाहूं.

मागें सांगितलेंच आहे कीं, **कुमुदबंधू**शी आणि **बालार्करायाची** भेट करून देतांच **बसवप्रभु** परत फिरले. ते परत दिवाणखान्यात येतांच थोड्या वेळापूर्वी घडलेल्या प्रसंगाबद्दल ते व त्यांचे सहकारी **कालनीती** या दोघांमध्यें भाषण सुरू झालें. तें भाषण येथें सबंध देत बसण्याचें कारण नाहीं. फक्त त्याचा अखेरचा भाग मुद्याचा आहे तेवढा येथें सांगितला ह्मणजे आमच्या गोष्टीचा संबंध बरोबर जुळेल.

"खरोखर त्या दोघी पोरींना हें फारच दुःखदायक व असह्य होईल." **बसवप्रभु** ह्मणतात. "शिवाय राणीच्या अगदीं रात्रंदिवस जवळ असणारे असे आपले दोघे उत्तम हेर आतां नाहींसे होणार."

"पण आतां त्याला उपाय काय करावयाचा?" **कालनीती** प्रश्न करतो. "मघां प्रसंग होता तेव्हां तुह्मांला मीं डोळ्यानें खूण केली. तुह्मी नुस्ती मान हलवून जर रुकार देत होतां तर लागलीच मी तलवारीस हात घालून——"

"आणि मीं तरी तुमच्याकडे मध्येंच एकदां नजर फेंकली त्याचा अर्थ काय होता?" **बसवप्रभु** मध्येंच ह्मणतात; "जर आपण दोघेही तलवारी हातांत घेऊन त्याच्यावर उठलों असतों, तर खचित त्याला चित करीत होतों. मग ती थैलीही आमचे हातीं लागत होती आणि सर्वच काम होत होतें. एकवार तीं पत्रें आमचे हातीं येऊन आह्मीं तीं जाळून टाकीत होतों ह्मणजे मग 'काय तुजजवळ पुरावा आहे तो काढ' असें खुशाल त्याला उद्यां विचारतां आलें असतें. शिवाय असा प्रत्यक्ष पुरावा जवळ नसतांना त्यानें कसाही आरोप त्या दोघी पोरींवर केला असता, तथापि त्याच्यावर राणीनें कधींही भरंवसा ठेविला नसता."

"हें बोलणें सर्व ठीक आहे," **कालनीती** थोडासा रागावून म्हणतो, "पण त्याचा उपयोग काय? ती थैली तर तूर्त त्याच्या कंबरेशीं सुरक्षित आहे आणि आपणही त्याच्या पूर्णपणें हातांत सांपडलों आहों! हें पहा **बसवप्रभु**, आमची हालचाल पाहतांच ज्यानें झट्दिशीं आपल्या तलवारीस हात घातला व तुम्हांला 'उठा छाती असेल तर' ह्मणून ह्मटलें, त्याच्यावर हात उचलण्याचें तुह्मांला त्या प्रसंगीं धैर्य झालें नाहीं असें स्पष्टपणें कबूल करांना आतां!"

"**कालनीती**," **बसवप्रभु** चिडून ह्मणतो, "त्याची ती तयारी पाहून कचर खाणारे व भीतीनें गर्भगलित होणारे शूर गृहस्थ आपणच महाराज!"

त्याला पुढें बोलूं न देतां **कालनीती** ह्मणतो, "हें पहा, आतां आपापसांत

रागावण्यांत अर्थ काय? खरी गोष्ट हीच कीं, आपलीं दोघांचींही मनें थोडीं-शीं कचरलीं. श्वेतपादानें त्याच्या शक्तीचें आणि पराक्रमाचें जें नुकतेंच वर्णन केलें होतें त्यामुळें आपल्याला बरीच धास्ती पडली होती आणि असल्या गृहस्थाशीं सहसा हातघाईस येणें सोईचें नव्हे असें आपणा दोघांसही वाटलें. खरें कीं नाहीं? कारण हातघाईचा प्रसंग आणावयाचा असेल तर अद्यापि वेळ गेली आहे असें नाहीं. तो आतां बालार्करायाच्या खोलींतून परत येईल त्यावेळीं पाहिजे तर फिरून संधि आहेच." ·

"नको, नको," बसवप्रभु म्हणतो, "कारण त्यायोगानें एकंदरींत केवढा दंगा माजेल आणि त्यामुळें आपल्यावर आणि आपल्या धन्यावर कसा बेअब्रूचा प्रसंग येऊन गुजरेल याचा कांहीं नेम नाहीं. पोक्त विचाराअंतीं तसें करणें ठीक नाहीं. शिवाय हा विचार मनांत आणा कीं, त्याच्यावर आपण हत्यार उचललें तर ता मरेपर्यंत लढणार; आणि तो मेला किंवा सुटून गेला तरी आहेत या अडचणीशिवाय नवीन आणखी हा एक घोंटाळा उत्पन्न व्हावयाचा! छीः, तो विचारच नको. पण कांहो कालनीती, त्याचें त्या बालार्करायाबरोबर इतका वेळपर्यंत भाषण तरी काय चाललें असेल? याचा कांहीं तरी अंदाज निघालाच पाहिजे."

असें म्हणून बसवप्रभु आपल्या मित्राच्या अनुमोदनाचीही वाट न पाहतां चट्दिशीं बैठकीवरून उठले आणि पावलें वाजूं न देतां बालार्करायाच्या खोलीशीं गेले. यावेळीं बालार्करायाचें व कुमुद्बंधूचें भाषण अगदीं आटपतच आलें होतें. तरी दोन चार पळेंपर्यंत गूहसिंहाच्या या सन्मान्य वकिलांनीं व लोकांत सभ्य म्हणून गणना होत असलेल्या गृहस्थांनीं खोलीच्या दारास कान लावला आणि आंत चाललेल्या भाषणाचीं शेवटचीं दोन तीन वाक्यें ऐकून ठेवलीं? स्वारी लागलीच घाईघाईनें परत दिवाणखान्यांत येऊन म्हणते, "हां, कालनीती, आतां कांहीं बोलूं नका. त्यांचें भाषण आटपलें; तो लांडगा आतां परत येईल."

थोड्याच अवकाशानें कुमुद्बंधु दिवाणखान्यांत परत आला, आणि त्या दोघां वकिलांस उद्देशून म्हणतो, "माझ्या मागण्या काय काय आहेत त्या आपणा उभयतांस स्पष्टपणें कळलेल्याच आहेत. ह्या ताबडतोब पूर्ण झाल्या पाहिजेत. पहिली अनुराधा आणि विशाखा यांनीं आतांपासून आठ प्रहरांचे आंत मुकाट्यानें राजवाड्यांतून निघून चालतें झालें पाहिजे. दुसरी गोष्ट, राजे प्रद्युम्नराय यांच्या मातुःश्रीची कालयवनहून जरूर इकडे रवानगी झाली पाहिजे. या दोन्ही गोष्टी होतांच तुमची थैली आंतील कागदपत्रांसह तुम्हांस परत मिळेल."

इतके शब्द बोलून कुमुद्बंधूनें शिष्टाचाराकरितां म्हणून कसा तरी नाखुषीनें त्या दोघां वकिलांस प्रमाण केला आणि त्यांच्याशीं एक अक्षरही अधिक न बोलतां किंवा त्यांच्या उत्तराची वाट न पाहतां तो

तडक जिना उतरून त्यांच्या वाड्याच्या बाहेर चालता झाला.

तो खालीं जाऊन दरवाज्याच्या बाहेर पडला असें पाहून **बसवप्रभु कालनीती**-जवळ आले आणि त्याचा हात आपल्या हातांत घेऊन अत्यंत आनंदानें ह्मणाले, "शेवटीं तो दुष्ट लांडगा आपल्या तडाख्यांत सांपडला !"

"तुमच्या या गूढ भाषणाचा अर्थ मला मुळींच कळला नाहीं." **कालनीती** आश्चर्यानें ह्मणतो.

"माझ्या बोलण्याचा अर्थ इतकाच" **बसवप्रभु** म्हणतो, "कीं त्या **महेश्वर**च्या लांडग्याचें आयुष्य आतां भरलें ! उद्यां सूर्योदयाच्या आंत तो निजधामास जाणार ! **अनुराधा** आणि **विशाखा** यांना आतां राजवाडा सोडण्याचें कारण नाहीं ! सर्व भागलें !"

"अजून देखील तुह्मी काय ह्मणतां तें माझ्या ध्यानांत येत नाहीं !" **कालनीती** गोंधळांत पडून ह्मणतो.

"मी जेव्हां आतां **बालार्करायाच्या** खोलीशीं गेलों" **बसवप्रभु** ह्मणतो, "तेव्हां त्या **महेश्वरकरा**च्या तोंडचे हे शब्द मीं ऐकले. सूर्योदयास **ताम्रोपल** टेंकडीच्या खिंडीजवळ तुमची आमची भेट. मी येथून दोन घटका रात्रीस निघेन. माझ्याबरोबर फक्त माझा एक नौकर मात्र असावयाचा. ठरलें ! यावरून समजा आतां काय तो माझ्या बोलण्याचा अर्थ."

"वाः, तर मग फारच उत्कृष्ट झालें !" **कालनीती**ही आनंदित होऊन ह्मणतात, "हा औषधावांचून खोकला गेला ! पण तो महाधूर्त गृहस्थ कसा फसला ? ह्या पोरानें **बालार्करायानें** त्याला जाळ्यांत धरण्याची ही पसंत युक्ति काढली ! होयना ? असेंच असलें पाहिजे !"

"तें काय आहे तें पाहूंच आतां" **बसवप्रभु** म्हणतात.

इतकें भाषण होऊन ते दोघेही वकील मोठ्या उत्सुकतेनें **बालार्करायाच्या** खोलीकडे गेले. ते दार उघडून आंत जातात तों तो तरुण सरदार सचिंत मुद्रा करून कपाळास आंठ्या घालून कांहीं विचार करीत बसला आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें.

**बसवप्रभु** पुढें होऊन विचारतात, "कां **बालार्कराय**, इतके खिन्न कां ? आणि इतका गूढ विचार कसला चालला आहे ? तुमच्या मनाला चिंता लावण्यासारखें त्या सरदाराशीं तुमचें भाषण तरी काय झालें?"

"आपल्या प्रश्नाचा जबाब मला देतां येत नाहीं." **बालार्कराय** तशीच मुद्रा ठेऊन ह्मणतो, "त्या सरदाराच्या आणि माझ्या दरम्यान जें भाषण झालें त्यापैकीं एक शब्दही कोणापाशीं बोलावयाचा नाहीं अशी त्यानें मजकडून शपथ घेतली आहे. मी पूर्णपणें त्याच्या हातांत सांपडलों होतों. त्याला वाटतें तर त्यानें मला राजद्रोही ह्मणून आतांच्या आतां कैद करवून राणीच्या स्वाधीन केलें असतें. ह्मणून त्याच्या सर्व अटी मला कबूल कराव्या लागल्या व त्यासंबंधानें एक शब्दही कोणाला कळविणार नाहीं अशी शपथ वहावी लागली. तर मग सांगा आतां तुमच्या प्रश्नाला मी

काय जबाब देऊं ? मला ओंठ दाबून धरणें भाग नाहीं का ? बरें हें असो आतां. थोडया वेळापूर्वी ठरल्याप्रमाणें मी पहांटेस लवकरच येथून निघणार. रात्रही आतां बरीच झाली नाहीं ? थोडीशी आतां विश्रांती घेतलीच पाहिजे."

"अगदीं बरोबर," **बसवप्रभु** सच्छीलपणाचा भाव घालून ह्मणतात, "शब्द गुंतल्यावर त्याप्रमाणें वागणें भागच आहे. असो; आह्मी तुह्माला आतां त्रास देत नाहीं. थोडीशी तरी तुह्मांला झोंप मिळालीच पाहिजे. येतों तर आह्मी आतां."

असें ह्मणून दोघेही खोलीबाहेर पडले. दिवाणखान्यांत परत येतांच **कालनीती बसवप्रभू**स विचारतो, "अहो, तुह्मी ह्मणत होतांत काय आणि हें काय ? याच्या या अशा भाषणाचा अर्थ काय ?"

"बहुधा त्या **महेश्वरकर** सरदाराचा विचार बंडवाल्यांबरोबर कांहीं तरी सामाचें बोलणें लावावें असा असेल." "**बसवप्रभु** ह्मणतात, "आणि त्यासंबंधानेंच कांहीं तरी भाषण या दोघांत झालें असेल. राणीचा कल तूर्तच्या प्रसंगीं सर्व प्रकारें साम करण्याकडे आहे हें उघड नाहीं का दिसत ? पण हा पोरगा पहा कसा खुळा ! बेटा असल्या कामांत शपथा जुमानीत बसला आहे ! असो; तें कसेंही असलें तरी आपल्याला त्या घातक मनुष्याची कोणत्याही प्रकारानें तावडतोब व्यवस्था लावणें भाग आहे. उठा तर, त्या तजविजीस आतांच लागणें भाग आहे. मात्र यांतलें एक अक्षर त्या **बालार्करायास**ही कळवून उपयोगाचें नाहीं !"

या दोघा वकिलांनीं 'त्या घातक मनुष्याची कोणत्याही प्रकारें तावडतोब व्यवस्था लावण्याकरतां' काय तोड काढली, काय तजवीज केली आणि तें सर्व जुळवून आणण्याकरतां काय उपाय केले हें सांगण्याची ही जागा नव्हे. प्रसंगोपात तें सर्व आपोआपच पुढें येईल.

## भाग १५ वा.

### उग्रसिंहाची गुहा.

ठरल्याप्रमाणें पहांटेस दोन घटका रात्रींच **कुमुदबंधूनें** अंगांत चिलखत चढविलें व घोडयावर स्वार होऊन वाडयाबाहेर पडला. त्याचा विश्वासूक सेवक **मोहन**ही प्रवासाची सर्व तयारी करून यजमानापाठीमागून स्वार झाला. त्याला रात्रीं **श्वेतपादा**शीं झालेल्या प्रसंगांत जखम झाल्याचें आह्मीं सांगितलें आहे; पण राणीसाहेबांस त्यानें ह्मटल्याप्रमाणें झालेली जखम अगदीं क्षुद्र होती व तिच्यामुळें आजच्या प्रवासांत त्याला कोणत्याही प्रकारें अडचण येण्याचा किंवा त्रास होण्याचा संभव नव्हता, ह्मणून **कुमुदबंधूनें** त्याला बरोबर घेण्याचें नाकारिलें नाहीं.

**कुमुदबंधु** आणि **मोहन** शहरच्या दक्षिण दरवाजानें बाहेर पडले, आणि **कालिकापुरास** जाणाऱ्या मार्गास लागले. हा मार्ग जरी नेहमीं बराच वाहतीचा असे, तथापि आतां वर्षाकाल सुरू झाल्यामुळें व

व्यापाराची मंदी असल्यामुळें रस्त्यानें फारसे प्रवासी वगैरे यांस भेटले नाहींत. शहरापासून सुमारें अर्धकोशावर शहरचा किल्लेदार **अमरसिंह** याची एक उद्यानभूमि होती, ती बाजूस सोडून हे दोघेही प्रवासी कांहींसे पुढें गेले. **कुमुदबंधु** नेहमींप्रमाणें पुढें चालला होता, आणि सुमारें शंभर कदमांच्या अंतरानें मागें त्याचा नौकर **मोहन** होता. घोडे अगदीं सावकाश चालले होते. कारण रस्ता बराच खडकाळ होता, व प्रवासाच्या आरंभापासूनच घोड्यास दवडवून व्यर्थ शिणविण्याची इतकी आवश्यकताही नव्हती. या ठिकाणीं रस्त्याला बरींच वळणें असून चढउतारही पुष्कळ होते, आणि दोहों बाजूंस झाडीही दाट होती. रात्रीं घडून आलेल्या गोष्टीसंबंधानें आणि आज सायंकाळपर्यंत काय काय प्रसंग येणार यासंबंधानें **कुमुदबंधू**च्या मनांत विचार चालले होते. **जयद्रथराया**ची व आपली गांठ पडल्याबरोबर त्याला काय वाटेल, आपण त्याच्याशीं भाषण कशा प्रकारें सुरू करावयाचें, आपले हेतु सफल होतील किंवा नाहीं, त्यानें कांहीं कपट करण्याचा हेतु मनामध्यें आणल्यास काय करावयाचें अशा अनेक गोष्टी त्याच्या मनांत घोळत होत्या इतक्यांत आजूबाजूंच्या जाळ्यांतून एकदम आठ सशस्त्र लोक बाहेर पडले पैकीं चौघांनीं येऊन **कुमुदबंधू**स वेढिलें आणि चौघे मागें असलेल्या **मोहन**च्या अंगावर गेले.

**कुमुदबंधू**ची तलवार एकदम म्याना-बाहेर निघून विजेप्रमाणें हवेंत फिरूं लागली. घोड्याला आडविण्यासाठीं जो इसम पुढें आला होता त्याच्याचवर पहिला वार झाला. तडाक्यासरशीं बिचाऱ्याच्या डोक्याचीं दोन शकलें होऊन त्यानें भूमिमातेपाशीं अक्षय्य आश्रय मागितला ! डोळ्याचें पातें देखील लवलें नसेल इतक्यांत घोड्याचें तोंड फिरलें आणि दुसरा इसम जमिनीस मिळाला ! पण येवढ्या अवकाशांत तिसरा इसम आपला भाला सरसावून पुढें आलाच आणि चवथा पाठीकडे जाऊन त्यानें आपलें हत्यार **कुमुदबंधू**च्या पाठींत खुपसण्याकरितां वर केलें. समोर असलेल्या इसमास वार करण्यासाठीं **कुमुदबंधूनें** घोड्याला पुढील गुडघे जमिनीवर टेंकावयास लाविलें; पण यामुळें मागें असलेल्या इसमास जास्तच सोय झाली. तो आपली तलवार **कुमुदबंधू**च्या मानेंत चिलखताचा जोड साधून खुपशितच होता; पण परमेश्वर त्राता ! अकस्मात साह्य मिळालें ! एखाद्या स्वप्ननिर्मित मूर्तीप्रमाणें एका सुंदरीनें एकदम पुढें उडी घातली ! **कुमुदबंधू**च्या मागें असलेल्या इसमाच्या तलवारीचा स्पर्श **कुमुदबंधू**च्या मानेस होण्यापूर्वींच त्या सुंदरीची तीक्ष्ण कट्यार त्या घातक्याच्या बरगडींत शिरली, आणि त्याबरोबर तो जमिनीवर पडला !

जमिनीवर पडतांना त्यानें जी किंकाळी मारली त्यासरशीं **कुमुदबंधू**ची दृष्टी मागें वळली आणि आपण केवढ्या भयंकर प्रसंगांतून बचावलों हें त्याला दिसलें. पण अशा वेळीं अशा प्रकारें प्रत्यक्ष स्वर्गांतून उडी टाकून केंवा भूमींतून बाहेर निघून ज्या सुकुमार

योद्ध्यानें आपल्यास साहाय्य केलें त्याचें मुख दृष्टीस पडतांच **कुमुद्बंधूस** विलक्षण आश्चर्य वाटलें, अत्यानंद झाला, त्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रु आले, आणि त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले ! वाचकहो, **कुमुद्बंधूला** अशा बिकट प्रसंगीं अचानक येऊन सहाय करणारी ही स्त्री **कुमुद्बंधूची** प्रिया **नलिनीच** होती !

आमच्या वीराच्या अंगीं असलेला असाधारण पराक्रम शतगुणित होण्यास याहून अधिक उत्तेजनपर दुसरें कोणतें कारण घडावयास पाहिजे ? त्यानें एकदम फिरून आपल्या घोड्याचें तोंड वळविलें; पण पूर्वी समोरच्या बाजूस भाला सरसावून चाल करून येण्यास उद्युक्त झालेला इसम **कुमुद्बंधूच्या** बाहुबलाची परीक्षा आपल्या शरीरावर करून पाहण्यास येवढा वेळपर्यंत तेथें उभा राहिला नाहीं. **कुमुद्बंधूची** दृष्टी मागें वळली तेव्हांच त्या चोरट्यानें हातांतील हत्यारें जेथल्या तेथें टाकिलीं आणि आपल्या पायांच्या चपलतेवर सर्व भरंवसा ठेवून तो रानांत शिरला आणि एका क्षणांत दृष्टीआड झाला.

"बहाद्दर शिपाया, सुंदर योद्ध्या, प्रिये **नलिनी !** तुझ्या अलौकिक पराक्रमामुळेंच यावेळीं वांचलों ! शेवटीं माझे प्राण अशा रीतीनें देखील जिंकून घेतलेसना !" इतकेच शब्द घोडा फिरवीत असतां **कुमुद्बंधूच्या** तोंडांतून निघाले, आणि एकवार त्यानें प्रेमप्रवाही दृष्टीनें तिजकडे अवलोकन केलें, आणि ज्या ठिकाणीं त्याचा तरुण सेवक एकटाच बाकीच्या चोरट्यांशीं झगडत होता तिकडे त्यानें आपला घोडा फेंकला.

**कुमुद्बंधु** व **मोहन** यांच्यावर ज्या निरनिराळ्या ठिकाणीं चोरट्यांनीं प्रथम हल्ला केला त्या दोन ठिकाणांच्या दरम्यान रस्त्याला बरेंच मोठें वांकण असल्यामुळें एके ठिकाणीं काय चाललें होतें हें दुसऱ्या ठिकाणाहून दिसण्यासारखें नव्हतें; पण **कुमुद्बंधु** परत फिरला तो एका क्षणांत **मोहनजवळ** जाऊन पोंचला. तो ऐन वेळींच आला. ज्या चौघा चोरट्यांनीं **मोहनवर** हल्ला केला होता, त्यांपैकीं एकास त्या बच्चानें ठार करून पाडलें होतें. पण बाकीच्या तिघांनीं त्यास तिन्हीं बाजूंनीं एकदम वेढून टाकिलें. घोड्यावरून या वेळीं टिकाव लागणार नाहीं, असें वाटून त्या तरुण शिपायानें खालीं उडी टाकिली होती आणि आपली तलवार आपल्यासभोंवार एकसारखी फिरवीत तो कसें तरी आपलें संरक्षण करीत होता. अशा रीतीनें आपल्या हातून फार वेळ दम धरवणार नाहीं, असाही विचार लागलीच मनांत येऊन तो संधि साधून दुसऱ्या एका इसमाच्या अंगावर तुटून गेला. तो इसम झट्दिशीं मागें सरला आणि बाकीच्या दोघांनीं याला पाठीमागून गांठलें. दोघांपैकीं एक ओरडला "पोरा, हत्यार ठेव, नाहीं तर मेलास !" **मोहन** समोरच्या दूर झालेल्या इसमास सोडून चित्त्यासारखा उलटला आणि इतक्यांत **कुमुद्बंधुही** या रणभूमीवर जाऊन पोंचला. सपाट्याबरोबर **कुमुद्बंधूनें** दोघांपैकीं एकास ठार केलें. बाकी राहि-

लेले दोघे हत्यारें टाकून पळत सुटले; पण लागलीच एकास कुमुदबंधूनें व दुसऱ्यास मोहननें पकडलें.

"माझ्या हुकुमाशिवाय एक पाऊल हालाल, तर त्याचक्षणीं मेला असें समजा." कुमुदबंधु त्या कैद केलेल्या चोरट्यांस ओरडून ह्मणाला, "मोहन, तूं आपल्या काच्यानें या दोघांचेही हात पाठीमागें बांध, आणि चल त्यांना घेऊन पुढें."

इतकें बोलून त्या चोरट्यांचीं सर्व हत्यारें गोळा करून त्यानें मोडून जवळच्या जाळींत फेंकून दिलीं. कारण कदाचित् हे सुटले तरी त्यांस हत्यार घेऊन फिरून अंगावर येतां येऊं नये. मोहनला यजमानाचा हुकूम झाल्याप्रमाणें त्यानें दोघांही चोरट्यांचे हात बांधिले, आणि त्यांस पुढें घालून तो पाठीमागून चालला. थोडक्याच वेळांत ज्या ठिकाणीं कुमुदबंधूचा संग्राम झाला त्या ठिकाणीं ते येऊन पोंचले. इतक्यांत रस्त्याच्या मध्यभागीं जखमी होऊन पडलेल्या एका इसमाजवळ एक तरुण स्त्री वांकून त्याच्या जखमेंतून वाहणारें रक्त आपल्या शेल्यानें पुसून काढीत आहे, आणि ती तरुण स्त्री नलिनी आहे असें मोहनच्या दृष्टीस पडलें. त्याबरोबर तो अत्यंत आश्चर्यचकित झाला.

नलिनीनें आपल्या प्रियकराचा प्राण वांचविण्याकरितां ज्या मांगाच्या बरखडींत आपली कट्यार खुपसली होती तोच हा इसम! त्या शूर अबलेची कट्यार त्या चोरट्याच्या उजव्या बरखडींत खांद्याच्या अगदीं खालचे बाजूस घुसली होती. इतके वेळांत तिनें ती बाहेर ओढून काढली होती, आणि ज्या शस्त्राला मनुष्यप्राण्याचें रक्त एकवार शिवलें त्या विटाळलेल्या शस्त्रास फिरून आपण स्पर्श करणें हें अत्यंत अनुचित असें वाटून तिनें ती कट्यार तिरस्कारानें दूर फेंकून दिली होती. नंतर आपल्या अंगावरील शेला काढून त्यानें ती जो नीच नराधम तिच्या प्रियकराचे प्राण घेण्यास एका क्षणापूर्वी उद्युक्त झाला होता, त्याच्या अंगावर आपण स्वतः केलेल्या जखमेंतून वाहणारें रक्त पुसून काढण्यांत गुंतली होती! स्त्रीस्वभावाच्या चांचल्याविषयीं आणि त्यांच्या क्षणैक टिकणाऱ्या विलक्षण वृत्तीविषयीं व कृतीविषयीं त्यांजवर व्यर्थ दोषारोप करणाऱ्या क्षुद्रबुद्धि पुरुषांनो, नलिनीच्या या एका क्षणांत दोन वेळ बदलणाऱ्या परस्परविरोधी वृत्तीविषयीं क्षणमात्र मनन करा, ह्मणजे तुह्मांला स्त्रीयांच्या या विषम वृत्तीही केव्हां केव्हां किती आल्हादकारक व तोषप्रद होतात हें स्पष्ट दिसेल. प्रथमतः नलिनीस वाटलें कीं, आजपर्यंत आपल्या पदराच्याआड आपण हें लहानसें चकचकीत हत्यार लपवून ठेवीत आलों, हें फारच चांगलें केलें. कारण त्या बिनमोल हत्यारानें आपल्या प्रियकराचे अमूल्य प्राण वांचविले. लागलीच त्या शस्त्राला रक्ताचा डाग पडलेला दिसतांच तिच्या अंगावर कांटा आला आणि तिनें तें तिरस्कारानें दूर टाकून दिलें! प्रथम जेव्हां त्या शस्त्राचा तिनें उपयोग केला त्यावेळीं तिच्या अंगीं असाधारण शौर्य आणि निष्ठुरता उत्पन्न होऊन

तिच्या अंगचें स्त्रीत्व क्षणमात्र नाहींसें झालें होतें. पण तो प्रसंग संपतांच ते अस्वाभाविक गुणही नाहींसे झाले, आणि फिरून तिचा जातिस्वभाव जागृत होतांच तें क्रूर शस्त्र तिला अपवित्रसें वाटलें आणि तें दृष्टीआड करण्याकरितां तिनें दूर फेंकून दिलें होतें. आपले प्रियकराचे प्राण रक्षण करण्याचे प्रसंगीं इतर कोणाचाही व कसाही प्राणघात करण्यास तिनें मागेंपुढें पाहिलें नसतें; पण एकवार हातून शस्त्राघात होतांच व रुधिरप्रवाह दृष्टीस पडतांच तिच्या डोळ्यापुढें अंधेरी आलीच पाहिजे आणि क्षणमात्र तिला प्रस्तुत स्थितीची विस्मृतिही झालीच पाहिजे ! पण सर्वांत विशेष महत्वाची, विशेष चमत्काराची आणि विशेष कौतुकाची गोष्ट हीच कीं, ज्या नीच अधमाच्या जखमेंतून वाहणारें रक्त ती यावेळीं पुसून काढीत होती, आणि ज्याचे प्राण वांचावे ह्मणून ती मनांतून परमेश्वराचा एकसारखा धांवा करीत होती, तो नीच अधम आपल्या प्रियकराचा वैरी असून एका क्षणापूर्वींच त्याचे प्राण घेण्यास उद्युक्त झाला होता. हें ती यावेळीं कसें विसरली असेल ! तिच्या अंगीं परमेश्वरानें शक्ति दिलेली असती आणि सबंध एक सैन्य जरी एका क्षणापूर्वी तिच्यासमोर येऊन उभें राहिलें असतें, तथापि तिनें त्या वेळीं आपल्या प्रियकराच्या रक्षणाकरितां तेवढ्या सगळ्यांचें निर्दलन केलें असतें, पण तो प्रसंग निघून जातांच एका मनुष्याचा प्राण,—आणि तोही एका क्रूर अधमाचाच,—घेतल्याचें महत्पातक शिरीं घेण्याचें तिला इतकें कठिण पडलें !

**नलिनी** त्या मारेकऱ्याच्या जखमेंतून वाहणारें रक्त आपल्या शेल्यानें पुशीत आहे, याचें कारण काय असावें आणि या वेळीं तिच्या अंतःकरणांत काय काय विचार उत्पन्न झाले असावेत हें तिच्या कष्टी चेहऱ्याकडे एकवार पाहतांच **कुमुद्वंधूस** कळलें; आणि त्यामुळें त्याला ती पहिल्यापेक्षांही अधिक प्रिय वाटूं लागली. तो लागलीच पुढें सरला, आणि ह्मणाला, "प्रिये, हें काम मजकडे सोंपीव, आणि या क्रूर देखाव्यापासून तूं क्षणभर बाजूस उभी रहा." असें ह्मणून त्यानें तिजकडे अत्यंत प्रेमार्द्र दृष्टीनें पाहिलें व त्याबरोबर त्याच्या मनांतील विचारही तिला कळले.

**कुमुद्वंधूनें** त्या इसमाची जखम नीट तपासून पाहिली व ती असाध्य नाहीं किंवा फारशी भयंकरही नाहीं असें त्यानें तत्क्षणींच **नलिनीस** सांगितलें. ज्या काळांतील गोष्ट आह्मी सांगत आहों त्या काळांत प्रवास करणें हें धोक्याचें असल्यामुळें कोणाही योद्ध्यास बाहेर पडावयाचें झालें कीं, केव्हां काय प्रसंग येईल याचा नेम नसे; व यामुळें प्रत्येकास जखमेस लावण्याचें मलम आणि जखम बांधणेची इतर सामुग्री बरोबर बाळगणें भाग असे. **कुमुद्वंधू**सारख्या धाडसी मनुष्यास तर या जिनसा बरोबर बाळगणें फारच अवश्य होतें. आणि तो जरी संग्रामाच्या प्रसंगीं स्वतःच्या जिवाबद्दल किंवा शरीराबद्दल पूर्णपणें निष्काळजी असे, तथापि संग्रामानंतर वेळ पडल्यास आपल्या किंवा इतरांच्या जीवितरक्षणास उपयोगीं पडणाऱ्या या वस्तुही

जवळ न बाळगण्याइतका तो अविचारी नव्हता. कुमुदबंधूनें लागलीच मोहनकडून या जिनसा मागून घेतल्या आणि त्या मारेकऱ्याची जखम त्यानें बांधिली. असो. कुमुदबंधूवर ज्या चौघा मारेकऱ्यांनीं हल्ला केला होता, त्यांपैकीं दोघांस कुमुदबंधूनें ठार केलें होतें, तिसऱ्यास नलिनीच्या कट्यारीची जखम होऊन तो पडला होता व चौथ्यानें वेळींच पळ काढून आपला जीव बचाविला होता.

"मोहन," कुमुदबंधु ह्मणाला, "आतां काय व्यवस्था करावयाची समजलास काय? तूं आपले दोघे कैदी घेऊन थोडासा पलीकडे जा, आणि त्यांनीं आमच्यावर जो हल्ला केला, तो कोणत्या हेतूनें किंवा कोणाच्या सांगण्यावरून, हें त्यांस नीट विचारून घे. माझी पक्की खातरी आहे कीं, हे केवळ चोरटे नाहींत. इकडे हा जखमी झालेला इसमही चांगला शुद्धीवर आला आहे त्याला यासंबंधानें मी प्रश्न करितों; नंतर त्यांनीं सांगितलेली हकीगत आपण ताडून पाहूं, आणि सगळ्यांची हकीगत जुळली तर आपण यांजवर दया करूं व यांस सोडून देऊं. तसें न झालें, व यांनीं कांहीं तरी खोटीनाटी हकीगत सांगून आह्मांस फसविण्याचा प्रयत्न केलेला दिसला तर यांना नेऊन न्यायाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करूं."

धन्याच्या हुकुमाप्रमाणें मोहननें आपल्या दोघा कैद्यांस कांहीं अंतरावर नेलें. कुमुदबंधूनें लागलीच त्या जखमी झालेल्या इसमास पडलेल्या जाग्यावरून उठविलें आणि रस्त्याला लागून असणाऱ्या एका झाडाशीं नेऊन टेंकून बसविलें, व त्याला तो ह्मणाला, "मी माझ्या नोकरास काय सांगितलें, तें तूं ऐकलेंच आहेस. तूं खरें बोललास व सर्व हकीगत सांगितलीस तर तुला क्षमा होईल. खोटें बोललास व उडवाउडवी केलीस तर व्यर्थ प्राणाला मुकशील. हे तर, मीं विचारतों या प्रश्नाचे सरळ जबाब."

"सरकार, कालीमातेच्यान् मी संमदी हकीगत सांगतों. इचारा आपल्याला काय व्हव ते." तो जखमी झालेला मारेकरी ह्मणाला.

"सांग तर तुझें नांव काय, आणि तूं व तुझे साथीदार नेहमीं काय धंदा करितां?" आमच्या सरदारानें प्रश्न केला.

"म्हाराज, माज नांव हंत्या, माजा धंदा काय त्यो आपल्याला दिसतुच हाय सरकार! माजा ह्यो सळ मी कुनालाबी भाड्यान द्येतो! माज्या सातीदारांचाबी धंदा ह्योच."

"तर मग तुह्मी सगळेजण मारेकऱ्यांचा धंदा करणारे आहांत! पैसे घेऊन लोकांचे गळे कापण्याचा उद्योग तुह्मी नेहमीं करतां! होय ना? बरें, सांग तर, आज आह्मांवर हल्ला करण्याला तुह्मांला कोणीं सांगितलें होतें." कुमुदबंधु विचारितो.

मारेकरी—"सरकार, तेवढं मातुर मला ह्मायीत न्हाई."

कुमुद०:—(त्या मारेकऱ्यास दरडावून) "संभाळ, लुच्चा, माझ्याबरोबर अशी उडवाउडवी करून परिणाम लागणार नाहीं. जरी त्या कट्यारीच्या तडाक्यांतून तुझे प्राण बचा-

वले आहेत, तथापि ह्या सुळाचें तीक्ष्ण टोंक आपलें काम करण्यास चुकणार नाहीं."

मारे०:–"ह्माराज, त्ये हाय मला ठाव. पन सरकार, मी सांगतुय त्ये संमद आयकुन तर घ्या. ह्माराज, काल मद्रात्रीपुड मी अन माज ह्ये सोबती योका तिट्यावर दारु प्याया ग्येलो व्हतो. थत थोड्या येळान दोगंजन गिरस्त आल. त्यांच्या आंगामंदी पायगूळ कपन्या व्हत्या. त्वांड बी अगदीं बुरकाढूनश्यानी ग्येतलल व्हत."

कुमुद्०:–"अगोदर सांग, तो तिट्टा कोणता तें."

मारे०:–"सुकिरवारांत गवताच्या बाजाराजवळ योक मोठा तिट्टा हाय. सरकार, पैशापायीं व्हत्र ते छातीच काम पतकरनार. व्हव तितक लोक थत मिळत्यात."

कुमुद्०:–"होय, मींही असें ऐकलें आहे. बरें पुढें बोल. ते दोघे मनुष्य तेथें आले, आणि मग काय झालें?"

मारे०:–"पुड काय सरकार, त्येनीं आमास्नी अक्शी लई ह्मंजी लई ह्मोरा दिल्या; अन् असबी सांगितलं कीं काम जाल्यावर आनकीबी दोन थैल्या देऊं; जालं आमी आट इसमानीं मिळून त्येंच काम पतकारलँ."

कुमुद्०:–"त्यांनीं तुह्मांला काय काय सांगितलें होतें?"

मारे०:–"दुसर काय सरकार? त्येनीं सांगितलं आपल्यास्नी जीवानिशीं माराव. अक्शी दया माया करूं नत्र. आपल्या थाकराला मातूर जुळलं तर सोडूनशान् चव. त्या बड्या गिरस्तांना त्या गरीब मनुक्शाचं परान घेऊनशान् काय करायच. आपल्यावानी त्यांच त्येच्याशी थोडकच वैर असणार!"

कुमुद्०:–"काय, ते बडे गृहस्थ होते ह्मणतोस?"

मारे०:–"व्हय सरकार, बड ह्मंजी अक्शी आपल्यावानी सरदार व्होतन्. त्येनीं एवढ्याशा कामापाई लई पैसा दिला. त्येंचीं तोंड झाकल्येली व्हती पन् त्येंची ती बोलन्याची अन् उब र्‍हान्याची ढब संमदी अक्शी बड्या मानसावानी व्हती. सरकार, त्येनीं आपलीं तोंड अशी बुरकाढून टाकली व्हती कीं मी कायबी क्येल तरी त्येंचा चेरा मला दिसला न्हाई. ह्माराज, त्ये र्‍हानार मातुर ह्या देसच नसावत. त्येंची बोली कशीशीच व्हती. जरा आपल्यावानी व्हती ह्मनाना! सरकार राग मातुर करूं नका." (शेवटचे शब्द मारेकऱ्यानें जरा भीतभीतच उच्चारले.)

कुमुद्०:–"बरें, त्यांची उंची वगैरे तरी तुला दिसली असेलना!"

मारे०:–व्हय सरकार. दोगबी बरच उंच व्हत. उब र्‍हातांना त्ये अक्शी ताटून बी र्‍हात सरकार."

कुमुद्०:–"बरें, तूं आतां ह्मणालास कीं सगळें काम केल्यावर आणखी पुष्कळ मोहरा तुह्माला द्यायचें कबूल केलें आहे. होय ना? सांग तर तुह्मांला त्यांनीं काय काय काम सांगितलें आहे तें, सर्व सांग."

मारे०:–"व्हय सरकार. संमद सांगतु. त्येनीं सांगितल कीं आपल्यास्नी ठार मारायच अन् आपल्या अंगावर जेवढ

ह्मनून काय सापडल तेवड संमद लुबाडायच. काय कागद पतुर, अन् योक रेसमाची थैली आपल्या कंबरला लावल्याली चिलकताच्या आंत असेल ती न्येऊन त्येंसी द्याय़ाची. त्येंन बी काय सोननान मिळल तर ते आह्मीच घ्ययाच. अन् शिवाय दोन थैल्या त्येनी देयाच्या त्या न्याऱ्याच."

कुमुदबंधूनें आणखी बरेच प्रश्न त्याला विचारले, पण याहून अधिक कोणत्याही प्रकारची माहिती त्यापासून निष्पन्न झाली नाहीं. नंतर त्यानें मोहनला आपल्याजवळ बोलाविलें. त्यानें जी माहिती त्या दुसऱ्या दोघा मारेकऱ्यांकडून काढून घेतली होती ती सर्व बहुतेक अक्षरशः या माहितीशीं जुळली.

"अरे, क्रूर मांगानो तुमच्या नीच धंद्याची कल्पना मनांत येतांच तुम्हांला येथेच्या येथेंच ठार करून टाकावें हें योग्य! पण तुह्मांला मीं वचन दिलें आहे आणि माझी तलवार व्यर्थ तुमच्या अशुद्ध रक्तांत मळविण्याचीही मला इच्छा नाहीं. ठरल्याप्रमाणें मी तुह्मांस जीवदान देतों. हा असा राक्षसी धंदा तुह्मी सोडा ह्मणून तुम्हांला उपदेश करणें व्यर्थ आहे, हें मी पक्कें जाणून आहे. पण जर तुह्मी पुढें हाच धंदा चालवाल तर आज सुटलांत तरी कधींना कधीं तरी सुळावर चढण्याचा प्रसंग तुह्माला येईलच. असो; तुह्मी ह्या तुमच्या साथीदारांच्या प्रेतांची आणि ह्या जखमी इसमाची हवी तशी व्यवस्था करा. मोहन, त्या दोघांस कर मोकळे, आणि तूं दोन्ही घोडे हातांत धरून त्या पुढल्या वळणापर्यंत चल, मी तुला आतां येऊन गांठतों." कुमुदबंधु ह्मणाला.

मोहननें हुकुमाप्रमाणें घोडे पुढें चालविले. कुमुदबंधु आणि नलिनी त्या रक्तानें भिजलेल्या जाग्यापासून व त्या मारेकऱ्यांच्या संबंधापासून दूर होण्याकरितां सुमारें पन्नास कदम अंतरावर गेलीं, आणि ह्या अवचित भेटीच्या संबंधानें वगैरे दोघांनींही एकमेकांस जरूर तेवढी माहिती थोडक्यांत सांगितली. कारण कुमुदबंधूस सूर्योदयास ताम्रोपल टेंकडीच्या खिंडींत जाऊन पोंचणें अवश्य होतें आणि नलिनीसही त्वरेनेंच परत जाणें भाग होतें.

आपण येथें अशा अकस्मात रीतीनें कशा आलों हें कुमुदबंधूस कळावें ह्मणून नलिनी ह्मणते:—"काल रात्रीं मध्यरात्रीचे सुमारास राणीसाहेबांच्या दिवाणखान्यांतून बाहेर पडलांत आणि त्या वकिलांकडे राणीसाहेबांचा निरोप कळविण्याकरितां निघून गेलांत. नंतर लागलींच तितक्या रात्रीं राणीसाहेबांनीं शहरचा किल्लेदार अमरसिंह याला बोलावणें पाठविलें. राणीसाहेबांनीं एकवार एकदा निश्चय ठरविला ह्मणजे त्याप्रमाणें सर्व व्यवस्था होईपर्यंत त्यांना चैनच पडावयाचें नाहीं! असो. किल्लेदार शहरांत नव्हता. त्याचे घरीं त्याचे कोणी नातेवाईक पाहुणे आलेले असल्यामुळें त्यांसह तो आपल्या बागेंतील वाड्यांत काल सायंकाळींच आला होता आणि तेथें रात्रीचा मेजवानीचा बेत होता. त्याचा बाग येथून अगदीं जवळ आहे. ही पलीकडचीं दोन खाचरें ओलांडलीं ह्मणजे जो एक लहानसा उंचवटा दिसतो त्याच्या

पलीकडे त्याला लागून त्याची बाग आहे. इकडे लागलीच स्वार रवाना झाला; पण फिरून सरकारचें मन पालटलें. त्यांचा स्वभाव किती विनोदी व उत्सवप्रिय आहे हें आहेच ठाऊक आपल्यास! लागलीच स्वारीनीं बेत केला कीं, आपण स्वतःच इकडे येऊन किल्लेदारास भेट द्यावयाची! असें करण्यांत राणीसाहेबांचे हेतु काय असतील हें आपण जाणतच अहां. आपल्या घरीं राणीसाहेब स्वतः चालून आल्या आणि आपल्यास अशा रीतीनें फारच मोठेपणा दिला याचा त्याला आनंद व गौरव वाटावा आणि आपण अशाप्रसंगीं मेजवान्या देण्यांत गुंतलों आहों आणि आनंदांत आहों हें योग्य नव्हे, अशी कल्पना क्षणभर त्याच्या मनांत यावी, आणि एवढे मोठे व इतके पाहुणे एकदम अशा ठिकाणीं अनाहुत आले त्यांची व्यवस्था करण्यासंबंधानें स्वतः **अमरसिंहाची** आणि त्याच्या घरांतील इतर मंडळींची त्रेधा व गडबड उडून जावी, आणि अशा रीतीनें कांहीं वेळपर्यंत सर्वांसच करमणूक व्हावी फार तर काय, तितक्या रात्रीं येथवर केवळ चालत यावयाचें असा बेत राणीसाहेबांनीं ठरविला! राजेसाहेबांचीही मर्जी आज बरीच सुप्रसन्न असल्यामुळें त्यांनींही राणीसाहेबांच्या बोलण्यास अनुमोदन दिलें व बरोबर येण्याचें कबूल केलें. मग लागलीच राणीसाहेब, राजेसाहेब, सन्निध असलेली कांहीं कांहीं सरदारमंडळी, आह्मी चवघीजणी, आणि **वीरवृत्त, धनुप्रिय** वगैरे चार पांच अगदीं विश्वासांतले नौकर, इतकी मंडळी तावडतोब वाड्यांत निघालों—"

" काय! इतक्या रात्रीं सर्वजण चालत निघालांत?" **कुमुद्बंधु** आश्चर्यानें प्रश्न करतो.

" होय, सर्वजणें चालत निघालों. राणीसाहेबांचा लहरीपणा असाच कांहीं चमत्कारिक आहे." **नलिनीनें** हंसत हंसत उत्तर केलें. " शिवाय शहरापासून हा **अमरसिंहाचा** बागही फार लांब आहे असें नाहीं. रात्र बरीच झाली असल्यामुळें लोकांनाही ही गोष्ट कळण्याचा फारसा संभव नाहीं; आणि कोणी आह्मांस ओळखूं नये ह्मणून आह्मीं आपलीं तोंडें शेल्यांनीं झांकून घेतलीं होतीं."

" आतांच त्या मारेकऱ्यानें सांगितलेल्या त्या दोघां नराधमांनीं आपलीं तोंडें झांकून घेतलीं होतीं तशींचना?" **कुमुद्बंधु** विनोदानें ह्मणाला. " बरें पुढें? रात्र फार मौजेची होती, गार व सौम्य अशी वाऱ्याची झुळूक वहात होती, आणि राजवाड्याजवळच्या उपवनांतील पुष्पांचा मधुर परिमल सर्वत्र पसरला होता, इतकें मला अनुभवानें माहित आहे. पण पुढें काय काय झालें सांग."

" पुढें, आह्मी थोड्याच वेळांत **अमरसिंहाच्या** बागाशीं येऊन पोंचलों." **नलिनी** म्हणते, " प्रत्यक्ष राणीसाहेब आपल्याबरोबर कांहीं परिवार घेऊन इतक्या रात्रीं इतक्या दूर, केवळ पायीं, आपल्यास भेटण्याकरितां आल्या आहेत अशी वर्दी **अमरसिंहास** कळतांच त्याची, त्याच्या घरां-

तील इतर मंडळीची आणि त्याच्याकडे आलेल्या पाहुण्यांची देखील केवढी धांदल उडाली असेल, त्यांना केवढें आश्चर्य वाटलें असेल, या सगळ्याचें मी वर्णन करण्यापेक्षां त्याची आपणच कल्पना करा. तसेंच मेजवानीस आलेल्या पाहुण्यामंडळीनांही आपण भेट देणार आणि निदान थोडा फलाहार तरी केल्यावांचून आपण येथून जाणार नाहीं असें जेव्हां राणीसाहेबांनीं **अमरसिंहा**स हंसत हंसत सांगितलें, तेव्हां त्याला केवढा अभिमान वाटला असेल, आणि किती आनंद झाला असेल, याचीही आपणच कल्पना करा. आपण इतक्या रात्रीं अशा रीतीनें कां आलों यांतील हेतु राणीसाहेबांनीं प्रथमतः **अमरसिंहा**स सांगितला. 'ताबडतोब **कुवलयपूर**च्या कोटाची दागडुजी वगैरे करण्याची सुरुवात करून **पंचगांग** देशाचें निशाण वेशीबाहेरील पटांगणांत एकदम रोंवावें, आणि सर्व सरदारांस व दरकदारांस आपल्या नांवचीं आज्ञापत्रें रात्रींच्या रात्रीं सांडणीस्वाराबरोबर रवाना करावीं. तात्पर्य, बंडखोरांची खोड मोडण्याकरितां जरूर असणारें सैन्य जमा करण्यासंबंधानें वगैरे सर्व तजविजी अत्यंत जरूरीनें कराव्या.' असें राणीसाहेबांनीं **अमरसिंहा**स सांगितलें. त्या किल्लेदारानेंही 'आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था सूर्योदयाचे पूर्वी करतों,' असें उत्तर उत्सुकतेनें व आनंदानें दिलें. आपल्याला ही गोष्ट ठाऊक असेलच कीं, लढाईकरतां सैन्य जमा करणें आणि **कुवलयपूर**च्या गादीचें निशाण सुमुहूर्तानें बाहेर काढणें हे अधिकार **कुवलयपूर** शहरच्या किल्लेदाराकडे फार दिवसांपासून आहेत, आणि यामुळें त्याच्या घराण्यास मानही मोठा आहे. असो. मुख्य काम आटोपल्यानंतर राणीसाहेबांनीं **अमरसिंहा**च्या पाहुणेमंडळीच्या भेटी घेतल्या, व सर्वांनीं कांहीं अल्प फलाहार केले. **अमरसिंहा**च्या कुटुंबांतील स्त्रिया आणि आह्मी सर्वजणी एका दिवाणखान्यांत होतों, व पुरुषमंडळी दुसऱ्या दिवाणखान्यांत होती. ही संधी साधून राजेसाहेबांनीं आपल्या प्रियवस्तूवर फिरून हात मारला! कांहीं वेळानें ते अगदीं बेहोष होऊन गेले, व यामुळें रात्रीं त्यांस तेथेंच मुक्काम करणें भाग पडलें. राजेसाहेबांची परक्याच्या घरांत झालेली ही स्थिति पाहून राणीसाहेबांस अत्यंत दुःख झालें; पण तें सर्व दाबून टाकून आपणही आज येथेंच रहावयाचें असा त्यांनीं बेत केला. मग सर्वांसच तेथें राहणें आलें. पुढें पहाटेस राजेसाहेबांस थोडें बरें वाटल्यानंतर परत राजवाड्यांत लौकर गेलें पाहिजे असें राणीसाहेबांस वाटून त्यांनीं मला आज्ञा केली कीं, '**वीरवृत्ता**स वाड्याकडे जरूरीनें पाठवून त्वरेनें घोडे आणविण्यास सांग?' त्याप्रमाणें मीं **वीरवृत्ता**स वाड्याकडे पाठविला आणि क्षणभर प्रातःकालच्या मंदवायूचा उपभोग घेत **अमरसिंहा**च्या बागेंत फिरत होतें. हिंडतां हिंडतां बागेच्या अगदीं एका टोंकास आलें. तेथून पलीकडेच **कालिकापूर**च्या या रस्त्यास येऊन मिळणारी एक साधारण वाट आहे. बागेच्या या भागांत एका बऱ्याचशा उंचवट्यावर एक लतामंडप तयार केलेला होता त्यांत जाऊन मी

बसलें. पलीकडच्या वाटेनें कोण येत आहेत हें तेथून अगदीं स्पष्टपणें दिसतें. मी बसून एक क्षणही पुरता झाला नसेल तों कांहीं हत्यारबंद लोक त्या वाटेनें आपण आतां आहोंत या बाजूस येत असतां मीं पाहिले. मला प्रथम वाटलें कीं, राणीसाहेब **अमरसिंहा**च्या बागेंत आल्या आहेत, आणि त्या सूर्योदयाच्या पूर्वी वाड्यांत परत जाणार ही बातमी बंडखोरांकडील लोकांस कळली असावी, आणि राणीसाहेबांवर छापा घालण्यासाठीं या रस्त्यावर त्यांणीं लोक आणून ठेवले असावेत; पण विचारांतीं तेंही खरें वाटेना. कारण, मला दिसलेले लोक फार नव्हते, शिवाय ते याच बाजूस येत होते. तथापि मनांतील शंकाही जाईना, ह्मणून ते कोठें छपून बसतात व काय बेत करतात, तें पाहण्यासाठीं मी तशीच तेथून उठलें आणि जवळच्या एका फाटकांतून बाहेर पडून त्यांच्या सुगाव्यानें हळूं हळूं लपत छपत इकडे आलें. ते कोठें बसतात व काय बोलतात हें कळावें अशी माझी इच्छा होती; पण काय ! ते ज्या जाळींत लपले होते त्या जाळीच्या जवळ जवळ मी येतें तों घोड्यांच्या टापा ऐकूं येऊं लागल्या; दोन स्वार हळूं हळूं पुढें येत असलेले दिसले; लागलीच पुढें असलेल्या स्वाराच्या अंगावर त्यांच्यापैकीं चार असामी मांग धावून गेलेले मीं पाहिले ! आपल्याकडे दृष्टी वळतांच आपल्याला मीं ओळखलें ! प्रियकरा, त्यासरशीं मीं त्या जाळीआडून एकदम पुढें उडी घातली ! पुढें मजकडून काय झालें तें मला कांहींएक आठवत नाहीं ! "

" पुढें काय ? माझे हे प्राण आणि शरीर त्या नीच मांगांच्या हातून सोडवून तूं सर्वप्रकारें आपलेंसें करून टाकलेस ! दुसरें काय ? " **कुमुदबंधु** कौतुकानें व आनंदानें हंसत ह्मणाला. " पण खरोखर माझे प्राण इतर कोणींही वांचविण्यापेक्षां ते तूंच वांचविलेस हें फार चांगलें झालें. माझें रक्षण करण्यासाठीं परमेश्वरानें तुलाच अशावेळीं येथें पाठविलें, येवढ्यावरून आपलें दोघांचें प्रेम परमेश्वरासही मान्य झालें आहे असें नाहीं का ठरत ! मी तर हा आपल्या भावी सुखाचा अत्यंत मंगलसूचक शुभ शकुनच आहे असें मानितों. "

" मला देखील तसेंच वाटतें. " **नलिनी** आनंदयुक्त मुद्रेनें ह्मणते, " पण खरेंच, ज्या मांगांनीं ह्या मारेकऱ्यांना आपल्यावर हल्ला करावयास सांगितलें त्यांना योग्य शासन करण्याबद्दल कांहीं विचार नाहींका करायचा ? ते दुष्ट जिवंत राहिले तर फिरून केव्हां काय प्रसंग आणतील याचा काय नेम? ते कोण असावे हें ओळखायला आपल्याला कांहीं अवकाश लागला नसेल. त्या मारेकऱ्यानें त्या रेशमी थैलीबद्दल जें सांगितलें तेवढ्यावरून ते दुष्ट कोण असावेत हें मीं देखील ताडलें. "

" हें पहा लाडके, " **कुमुदबंधु नलिनी**च्या स्कंधावर हात टाकून म्हणतो, " प्रत्यक्ष राणीसाहेबांच्या गादीवर हे मांगहृदयी नीच **कालयवन**कर वकील उठले असतां राणीसाहेबांनीं आपल्या प्रस्तुत स्थितीकडे लक्ष पुरवून त्यांस कांहीं एक शासन केलें नाहीं, तर माझ्या जर ते प्राणावरही

उठले, तथापि यासंबंधानें तूर्त एक अक्षरही तोंडावाटें बाहेर न काढतां स्वस्थ बसणें हेंच माझें कर्तव्य आहे असें मी समजतों. कारण पंचगांगची राणी आणि राजा नूहसिंह यांच्या दरम्यान आज केवळ मजमुळें तंटा उत्पन्न व्हावा आणि त्यांत मला एकट्यास न्याय मिळण्याकरितां उभयपक्षांडील कितीतरी लोकांचे प्राण रणभूमीवर बळी पडावे, हें बरें का? सांग तूंच."

"आपण ह्मणतां तें अगदीं खरें!" नलिनीच्या मनाची खात्री होऊन ती ह्मणते, "आणि शिवाय दुसरें असें आहेच कीं, जेवढे ह्मणून दुष्ट कृत्यें करणारे आहेत त्यांना आपल्या कर्मांचीं फळें आज नाहीं उद्यां तरी भोगावीं लागणारच! परमेश्वर त्यांना शासन केल्यावांचून रहावयाचाच नाहीं. पण मी विचारितें, अशा रीतीनें अधमपणा आणि कपट करून ते दोघे वकील आपले प्राण घेण्यास उद्युक्त झाले, याचें कारण काय असावें बरें? आपला त्यांनीं इतका द्वेष करण्यासारखी एकादी गोष्ट आपल्या हातून घडली असेल असें मला तरी वाटत नाहीं."

"ते माझे प्राण घेण्यास अशा रीतीनें उद्युक्त झाले, याचें मला मुळींच गूढ वाटत नाहीं." कुमुदबंधु उत्तर करितो. "कांहीं एका भयंकर गोष्टीचा मला शोध लागलेला आहे. ती मी कालच सायंकाळीं तुला कळविणार होतों, पण आपण दोघेंही घाईंत असल्यामुळें तसें करण्यास सवड झाली नाहीं. असो,—"

"पण अगोदर मला सांगा, ती अशी आपल्यालाही भयंकर वाटणारी गोष्ट कोणती?" नलिनी आश्चर्यानें विचारते.

"मीं तुला इतकें सांगितलेंच होतें," कुमुदबंधु ह्मणतो, "कीं, माझे हातीं बसवप्रभूची जी रेशमी थैली राणीसाहेबांच्या सुदैवानें आली आहे त्यांत पुष्कळ कागदपत्रें आहेत, आणि तीं बहुतेक सर्व आंकड्याच्याच भाषेंत लिहिलेलीं आहेत. भाषेची मोड सर्व पत्रांत एकच प्रकारची आहे. ती भाषा कालयवनच्या दरबारांतली असून बसवप्रभूनें येथें आणली आहे. ती भाषा प्रथम फोडतांना मला किती त्रास पडला तें तुला ठाऊकच आहे. असो. त्या थैलींतील पत्रांत एक तुझ्या काकासाहेबांनीं बसवप्रभूस लिहिलेलें पत्र सांपडलें. राणीसाहेब गिरिद्वाराहून शैलावलीस आल्या, त्या दिवसाच्या प्रसंगानंतर कांहीं दिवसांनीं हें पत्र लिहिलेलें होतें. त्या पत्रांत कांहीं अशा गोष्टी आहेत कीं, त्या वाचून मला जरी विशेष आश्चर्य वाटलें नाहीं, तथापि त्या तूं ऐकल्यास ह्मणजे तुला अत्यंत दुःख होईल, व तूं अगदीं आश्चर्यचकित होऊन जाशील. राणीच्या मैत्रिणींपैकीं दोघीजणींचें प्रेम त्या कालयवनकर दोघां वकीलांशीं जुळलेलें आहे हें मला कित्येक दिवसांपासून ठाऊक आहे. आणि याबद्दल मला जरी कांहीं शंका असती तरी कालरात्रीं तिचें पूर्णपणें निरसन झालें. रात्रीं राणीसाहेबांचे दिवाणखान्यांत त्या दोघा वकिलांच्या विश्वासघातकी वर्तनासंबंधानें भाषण चाललें असतां त्या दोघींच्या दृष्टी भीतीनें आणि

प्रसिद्ध इंग्रज तत्ववेत्ते "जॉन स्टुअर्ट मिल्ल" यांच्या
"लिबर्टी" नामक ग्रंथाचें भाषांतर

# स्वातंत्र्य.

(ग्रंथकाराचें चरित्र, ग्रंथांतील सार, विषयविवेचनांतील मुख्य मुद्यांची
अनुक्रमणिका, आणि स्पष्टीकरणार्थ विविध
माहितीच्या टीपा यांसह)

## नारायण लक्ष्मण फडके, बी. ए.,

यांनीं केलेलें

हल्लीं चळवळीचा काळ आला आहे. सुधारणेविषयींची इच्छा लोकांच्या अंतःकरणांत विशेष जारीनें आपला अंमल बसवूं लागली आहे. जुन्यांना वाटतें कीं, जुनीं बंधनें, जुन्या चालीरीती नष्ट होत चालल्या आहेत त्यांचें पुनरुज्जीवन करून नवीन विचार व आचार यांच्या दिशेनें धांवत जाणाऱ्या लोकमताच्या प्रवाहास बांध (बहिष्कारादि सामुर्गीचा उपयोग करून) घालून अडवावें. नवीनांस वाटतें कीं, जुने आचार व विचार गचाळ व घातकी आहेत, त्यांचा बींमोड केला पाहिजे व बहुजनसमाजाचें त्या आचारविचारांस पाठबळ असल्यामुळें ते मोडण्यास कठीण, तेव्हां त्यांच्यावर चालवावयाचें शस्त्र तेंही प्रखर पाहिजे असें जाणून ते सरकारचें साहाय्य घेऊं पाहात आहेत. अशा स्थितींत व्यक्तिस्वातंत्र्याचा मधल्यामध्यें कसा चुराडा उडतो; समाजहितास व्यक्तिस्वातंत्र्याची किती जरूर आहे; राजकीय बाबतींत राजा आणि प्रजा यांचे अधिकार कसे असावेत इत्यादि महत्वाच्या प्रश्नांस विशेष महत्व आलें आहे. तेव्हां स्वातंत्र्य या विषयावर सुप्रसिद्ध इंग्रज तत्ववेत्ते जॉन स्टुअर्ट मिल्ल यांनीं लिहिलेल्या पुस्तकाचें महाराष्ट्र भाषांतर यावेळीं प्रसिद्ध केलें असतां फार उपयोग होईल, असें जाणून आम्हीं तें छापून तयार केलें आहे.

ग्रंथ एका महातत्वाच्या विवेचनाचा असल्यामुळें यांत तत्वमूलक विचार ठिकठिकाणीं भरले आहेत व त्यामुळें मूळ ग्रंथ अवघड झाला आहे. तथापि भाषांतरकारांनीं तो सुबोध करण्यासाठीं अतिश्रमानें स्पष्टीकरणार्थ विविध माहितीच्या टीपा जोडल्या आहेत. त्यांत न समजणाऱ्या अगर अपरिचित अशा प्रत्येक स्थलावर खुलासा केला आहे. शिवाय ग्रंथकर्त्याची विचारसरणी समजण्याकरितां प्रस्तावनेंत ग्रंथाचे मुद्यांच्या अनुक्रमानेंच सार दिलें आहे. सारांश, अशा गहन विषयाच्या सुबोधीकरणासाठीं ग्रंथकर्त्यानीं घेववली तितकी मेहनत घेतली आहे. पुस्तकाचीं पानें एकंदर २७४ पैकीं बारक्या पण नव्या व सुवाच्य टाइपांचीं २१२. शिवाय मूळ ग्रंथकाराचें (मिल्ल साहेबांचें) चरित्र (बारक्या टाइपाचीं पानें ३६) दिलें आहे. किंमत १८८; ट० ख० ८२.

म्यानेजर आर्यभूषण छापखाना, पुणें.

भाग १ ला. कि. रु० १ ट. ०२

# केसरींतील निवडक निबंध.

भाग २ रा. कि. रु० १ ट. ०२,

## पहिले व दुसरे भागांत आलेले निबंधांची अनुक्रमणिका.


उपोद्घात—वाचन.
आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण ?
हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे.
आम्ही आमच्या दारिद्र्यांतून कशानें सुटूं ?
गुरुगांविद.
वत्तकाची अवश्यकता.
व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं.
आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा
हिंदुस्थानावर रशिया स्वारी करणार काय ?
इंग्लंडाशिवाय आम्हांस गति नाहीं.
वाणिन्यांचा सोस.
एकत्र राहणें चांगलें का ?
अनुकरण.
अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार.
भोजनगृह.
युरोपियन आणि नेटिव यांचें अन्योन्य संघट्टन.
मराठमोळा.
मराठमोळ्याची पुरवणी.
सासुरवास.
दारुबाजी.
इंग्रजी विद्या व आमची सामाजिक स्थिति.
हिंदुस्थानदेश बुडाला, हो, ठार बुडाला.
स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द.
माधवबागेंतील सभेवरील आक्षेप.
सार्वांस नोटीस.
वर्तमानपत्रें.
शेक्सपिअर, भवभूति, कालिदास.
नाटकें करावीं कीं करूं नये ?
कवि, काव्य, काव्यरति.
बडोद्याचे सयाजीराव महाराज यांस दोन उपदेशपर शब्द.
आपलें वैद्यक.
रसायनक्रिया.
मुद्रणस्वातंत्र्य.
कै० विष्णु कृष्ण चिपळोणकर.
मन आणि मेंदू.
सृष्ट्यवलोकन.
ज्ञान
अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
समाईकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
मनुष्यांचें सामाजिक कर्तव्य
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्वावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?
बालविवाहापेक्षां सतीच बरी !
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?
स्त्रीदास्यविमोचन.
चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें ?
आम्हा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचे म० वऱ्हाट.
एक वृद्ध पोलिटिकल अस्थाबाई.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे.
व्यायाम.
परभाषेंतील शब्दांची योजना.
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची अवश्यकता.
उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बायबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला.
प्रसिद्धीकरण.
ब्रह्मदेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गमनीचे प्रश्न.
पाऊस.
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार.
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?
„ उत्तरार्ध.
ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज.
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति.


**म्यानेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें.**

फत्ते झाली ! काय; काय पण इमानी माणूस ?

नाना०:-हें तर खरंच.

बळ०:-जायचं तर मग आतां उशीर कां?

भाऊ०:-( न ऐकतां ) राव तुह्माला ही मजा ठाऊक आहे का ? निजाम किती किती तरी मात्रागमनी ? खान आपल्यास अनुकूल होत नाहीं असं पाहून त्यानं आमच्या मनांत त्याच्या संबंधानं संशय येऊन आमचा त्याचा बिघाड व्हावा ह्मणून, "तुमच्या अटी आह्मास मान्य आहेत. आपल्या निखालसतेकरितां या पत्रालगत आपल्या नांवें शिक्कामोर्तब करून सनदा पाठवीत आहें. तर उद्यांचा भडका आह्मीं येऊन सरमिसळ होतांच एकदम गनीमावर सुरू करावा." अशा अर्थाचीं पत्रें लिहून त्यांत खरोखरी सनदा घालून तीं पत्रं आमच्या हातीं पडावीं अशा तऱ्हेची युक्ती लढवून आपल्या अटोकाट कोल्हेगिरीची कडनिकड करून पाहिलीन. पण खान सच्चा मनुष्य ! निजामाकडून जसजशी फितुरीचीं पत्रं येत गेलीं तसतशी तीं तो मला बेफिकीर दाखवीत गेला. मुझफरखानास सोडून आपण त्यासच ठेविलं हें तो पक्कं जाणून आहे. अशी जर एक ४ माणसं जवळ असलीं तर एक हिंदुस्थानच काय, पण सर्व जग देखील जिंकतां येईल.

बळ०:-शाबास, खान शाबास !

नाना०:-याबद्दल खानाला गौरवून त्याची योग्य सरफराई केली पाहिजे.

भाऊ०:-( बळवंतरावास ) राव, चला जाऊं या आतां. खान तिकडं वाट पहात असेल. ( नानांस ) येऊं तर आतां ? बसा बसा ! तुह्मी नको उठायला.

[ जातात.

नाना०:-शेवटीं भाऊनीं जाण्याचा तर निश्चय केलाच ! माझ्याविषयीं जरी आतां त्यांची अगदीं निखालसता झाली आहे—तरी पण सख्खेपणाचा आणि चुलतपणाचा त्यांच्या मनांत किंतु यावा हें देखील कांहीं इष्ट नाहीं. तर तो काढून टाकण्याला अशी कांहीं तोड काढली पाहिजे कीं ज्याचं नांव तें.बहुतकरून तो सफा झाला आहेच. परंतु न जाणों, कांहीं अवशेष राहिला असल्यास हाच पुढें एखादे वेळेस निरर्थक दुःखास कारण व्हावयाचा ! खरोखर एकमेकांस एकमेकांच्या मनांत खरोखरी काय चाललं आहे हें समजण्याचा परमेश्वरानं जर कांहीं मार्ग करून ठेवला असता तर या जगांत केवळ निरर्थक मिथ्या ग्रहानं जीं एकमेकासंबंधानं एकमेकांचीं मनं कांहीं क्षुल्लक कारणावरून अशुद्ध व कलुषित होऊन, जे एकदां अगदीं जिवलग मित्र, अथवा अत्यंत मायाळू असे सख्खे भाऊ होते ते एकमेकांचे जन्माचे हाडवैरी व कट्टे दुष्मन् बनण्याचा जो केव्हां केव्हां प्रसंग येतो तो तरी न येता. एक विस्तवाची ठिणगी. जर तिजकडे कानाडोळा केला तर

ती खचित सर्व जगास देखील जाळूं शकेल. त्याचप्रमाणें हा मनें संशयित करणारा किंतु जर असाच राहूं दिला, तर तो खचित एकचशा काय पण हजारोंच्याहजारों कुटुंबांचा मारे फन्ना उडवून देईल. (विचार केल्यासारखं करून) तर आतां हीच त्याला तोड. विश्वासरावाला त्यांजबरोबर पाठवून देण्याचं केलं म्हणजे एक तर दोघांचीं अंतःकरणं सफा होतील, आणि दुसरं, त्यास इकडची कांहीं आस्था राहील. शिवाय विश्वासरावावर त्यांचं आणि तसंच पार्वतीचंहि पण फार-फार प्रेम आहे. लहान येवढासा होता तेव्हांपासून त्यास देखील त्या दोघांचाच फार लळा आहे. तेव्हां त्याजसमागमें पायगुंता म्हणून विश्वासराव यासच पाठवावं. हीच तोड फार उत्तम. विश्वासरावाला न्या असं यावर भाऊस मी होऊन सांगण्यापेक्षां तें घरांतूनच जर सांगिवलं तर तें फारच नामी होईल. तर आतां तिजकडूनच हें काम करवावं म्हणजे ठीक. [जातात.

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळः**—आंबेपडदुरांतील एक जागा.

तीन **गृहस्थ** येतात

१ **लाः**—पण हें कसं हो? हा दमाजी त्या ताराऊसाहेबांच्या प्रकरणापासून पेशव्यांस, त्यांनीं आपल्यास नजरकैदेंत ठेवलं एवढ्याचवरून, इतके दिवस डाव्या हातानं मुजरा करीत होता, आणि काल श्रीमंतांचा निरोप घेतेवेळीं त्यानं उजव्या हातानं कसा रामराम केला?

२ **राः**—काय दमाजीनं श्रीमंतांस उजव्या हातानं मुजरा केला म्हणतां? छिः, हा तुम्हांस निव्वळ भास झाला असावा! काय? तुम्हीं अगदीं नीट नीट पाहिलं म्हणतां?

१ **लाः**—अहो नीट म्हणजे आणखी विचारतां काय. मीच नाहीं, आणखी शेंकडों जणांनीं हें पाहून तेही असेच माझ्यासारखे आश्चर्यांत व बुचकळ्यांत पडले आहेत.

२ **राः**—मला असं वाटतं कीं, दमाजीकडूनच हें सहज चुकीनं झालं असेल.

१ **लाः**—त्याच्यासारख्या मानी पुरुषाकडून आणि अशी चूक? मग झालं! मग कळली आपली सारी—

२ **राः**—अहो, तो तरी मनुष्यच आहेना? मनुष्याच्या हातून त्याच्या मनांत नसतांहि एकादी गोष्ट चुकून होणं अगदीं साहजिक आहे.

३ **राः**—वाः! खासं खासं चाललं आहे. चालूंद्या. या निरर्थक वादांत काय अर्थ? आंतली खुबी दोघांनाहि ठाऊक नाहीं, आणि वाद मात्र खूप चालला आहे! मघांपासून आपलं तुमचं दोघांचंहि ऐकून घेतों आहें. म्हटलं पाहूं काय काय तर्क अन् कोटया निघतात त्या?

२ **राः**—त्यांत कांहीं खुबी आहे म्हणतां? तर मग तो त्याजकडून कांहीं चुकून झाला नाहीं?

३ **राः**—अहो, आपले भाऊसाहेब म्हणजे किती धोरणी, किती मसलती अन्

कितो राज्यधुरंधर पुरुष आहेत याची तुह्मांला कांहीं कल्पना तरी आहे का?

१ लाः तरी माझ्या मनांत आलं एकदां, कीं,–भाऊसाहेबांबरोबर हिंदुस्थानच्या मोहिमेस जी सरदारमंडळी जावयाची आहे त्यांजबरोबर गायकवाडही कसे चालले? त्यांच्या उजव्या हाताच्या मुजऱ्याचा, व भाऊसाहेबांबरोबर हिंदुस्थानच्या मोहिमेस त्यांच्या जाण्याचा, अर्थाअर्थीं कांहीं तरी संबंध हा असलाच पाहिजे!

२ राः–अर्थाअर्थीं तो आणखी काय? अगदीं निकट संबंध आहे. भाऊसाहेबांनीं दमाजीला किती तरी पण प्रकारानं गौरवून त्यास मागचा सर्व वैरभाव विसरावयास लावलं. थोरांचं सगळंच थोर ह्मणतात तें कांहीं खोटं नव्हे. नाहीं तर या दमाजीनं ताराऊसाहेबांच्या सल्ल्यानं पेशव्यांच्या पेशवाईवरच समूळ घाव घालण्याचा एकदां विडा उचलला होता. आणि त्याच दमाजीचा भाऊसाहेबांनीं मोठा गौरव करून त्यास कट्ट्या शत्रूचा पक्का मित्र करावा ही काय त्यांची सामान्य हातोटी! श्रीमत् छत्रपतिमहाराज शाहू यांजपासूनच त्यांनीं ती उचलली! यांत बिलकुल शंका नाहीं.

१ लाः–पण दमाजी एवढ्या गौरवावरच हुरळून जाणारा मनुष्य नव्हे. बुडाशीं कांहीं जड–तत्वमसी असल्याशिवाय तो कोणाला असा हार जाणारा नाहीं!

२ राः–अहो! गौरवानं कोण मनुष्य खुलत नाहीं. जरा चढवून दिलं, "काय अण्णासाहेब आपल्यासारखा मनुष्य नाहीं. रहावं तर आपल्यासारख्यांच्याच आश्रयानं रहावं" अशा तऱ्हेच्या शब्दांनीं जरा त्याला खुलवून दिला ह्मणजे कोणचा अण्णासाहेब खुलत नाहीं?

१ लाः–अहो, पण मनुष्यामनुष्यांतहि फरक असतो. (२ ऱ्यास) तुमच्यासारखी मंडळी ह्मटली ह्मणजे एका शब्दानं हुरळून जायची. तशांतला मात्र दमाजी नाहीं, हा दमाजी दामाजीशिवाय बिलकुल वळणारा नव्हे हें तुह्मीं पक्कं लक्षांत ठेवा.

३ राः–तुह्मीं म्हणतां हें अगदीं अक्षरशः खरं आहे. दमाजीच्या संबंधानं कांहीं "कोल्हा आपला काकडीला राजी" असा प्रकार नाहीं व्हायचा. त्यानं भाऊसाहेबांकडून जेव्हां वचन घेतलन् कीं "हिंदुस्थानांतून परत आल्यावर तुमची सगळी गुजराथ तुमचे स्वाधीन करूं" म्हणून तेव्हांच तर त्यानं उजव्या हातानं मुजरा करायचं कबूल करून भाऊसाहेबांबरोबर मोहिमेस जाण्याचा निश्चय केलान्. एकंदरींत भाऊसाहेब अतिशय राज्यधोरणी पुरुष खरे! इब्राहिमखान सदरेस हजर होता. तर त्याचीहि भाऊसाहेबांनीं त्याच्या नेकजाद इमानीपणाबद्दल अतिशय तारीफ करून त्याची श्रीमंतांकडून बहुत सरफराजी करविली. तसेंच आपले यशवंतराव पोंवार, हरी दामोदर, भापंकर, शिंदे वगैरे मंड-

ळींस ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें गौरवून त्यांसहि सरफराज केलं. तसंच इतर लहानथोर सरदारांस खुद्द श्रीमंतांस भेटवून त्यांजकडून त्यांस जहागिरीची व सरंजामाची आशा लाऊन प्रोत्साहन देवविलं. हें कांहीं सामान्य राज्य-कौशल्य नव्हे ! लोकांचीं मनं आपल्याकडे ओढून घेण्याचा हा अत्यंत अमोलिक गुण फारच थोड्यांच्या अंगीं असतो ! व तो साधतोहि पण फारच थोड्यांस ! बरं पण, मला जाऊं दे आतां ? तुमचं काय ठीकच आहे. मारा चंमन. आहांत, राजे आहांत तुह्मीं झालं ! ( जावयास लागतो. )

२ राः—जालहो ( ओढून धोतर धरतो ) इतकी कसली लगीनवाई आली आहे अगदीं ?

३ राः—अहो तुम्हांला काय ? भाऊसाहेब आज—आज रात्रींच निवावयाचे आहेत.

१ लाः—बरं मग ? त्यांच्या जाण्याचा आणि तुमचा काय संबंध ?

३ राः—काय संबंध ! वाः मग मात्र खाशी ! अहो ते आमचे आश्रयदाते गोविंदराव नाहींत का ! तेहि आज रात्रींच भाऊसाहेबांबरोबर जावयास निघायचे आहेत.

२ राः-अहो, पण त्या जाण्याला कांहीं मुहूर्तबिहूर्त ? आज ह्मटलं ह्मणजे अगोदरः——

३ राः—मुहूर्तबिहूर्त ह्मणतां ? ते तर भाऊसाहेब पाहून—पाहून थकले. जवळचा मुहूर्त म्हणून कांहीं केल्या मिळेना. मग शेवटीं शिवालिखिताच्या मुहूर्तानं, आजच रात्रीचा दुसरा प्रहर उलटून गेला ह्मणजे निघावं असं ठरविलं आहे.

१ लाः—मग मात्र अगदीं बरोबर. आतां सर्व जुळलं. मग सोडा बोवा त्यांना. जाऊंदे, त्यांस कां उगीच हरकत करितां ?

२ राः—बरं ( सोडून ) जा बोवा तर, आतां नाहीं आमची कांहीं हरकत.

[ ३ रा जातो. ]

१ लाः—चला आपणहि एकदां रावसाहेबांची भेट घेऊन येऊं. तेही आजच आणि त्याच मुहूर्तावर निघणार आहेत.

२ राः—ठीक आहे. मलाही त्यांस केव्हां तरी भेटलं पाहिजेच होतं. चला. चलाच तर.

[ जातात.

---

## प्रवेश ४ था.

### स्थळः—आंबेपडदूर.

**भाऊसाहेब व गोपिकाबाई.**

भाऊ०ः—छेः वहिनी, तूं वेडी तर नाहींस ना ? काय, तूं मनांत तरी काय आणलं आहेस हें ?

गोपिका०ः-मामंजींच्या मागं आह्मांस सर्वस्वी आधार काय तो आपला होता, आणि तो जर आतां नाहींसा झाला तर मग आह्मी आणखी दुसरा कोणाचा आधार पहावा ! नकाहो नका. तुह्मी आपला जाण्याचा हा निश्चय सोडा, सोडाच.

भाऊ०ः—अग, ममतेमुळं तुह्मांला असं वांटतं; पण त्या रघुनाथाला आह्मीं कुठं पाहिजे आहोंत ?

**गोपिका०**:–अहो तो जरा हेकेखोर आहे. त्याच्या बोलण्याकडे का आपल्याला लक्ष द्यायचं आहे ? त्याला आणि त्या आनंदीला असं वाटतं कीं " आपलं म्हणणंच काय तें इकडून ऐकावं. " पण इकडून तसं होत नाहीं, ह्मणून तर तीं दोघंहि आंतल्या आंत सदोदित जळफळतात झालं. आह्मीं जे आनंदानं दिवस काढीत आहों ते सारे आपल्या जिवावर. आणि आपणच जर आह्मांला सोडून जाऊं लागतात, तर आह्मीं दिवस तरी कोणच्या आशेवर व कोणावर भार टाकून कंठावेत ? पाहिजे तर रघुनाथ भाओजींचं म्हणणं मान्य करून त्यांसच पाठवावं. आपण मात्र जाण्याचं रहित करावं.

**भाऊ०**:–आतां राघोबास त्याचं ह्मणणं मान्य करून पाठवावं अथवा न पाठवावं यासंबंधानं तुम्ही बायकांनीं कांहीं नको आम्हांला शिकवायला ! माझा तर जो जाण्याचा कृतनिश्चय झाला तो झालाच ! त्यांत एक रेंसभरही आतां तफावत होणें नाहीं. जें काय व्हावयाचं असेल तें दुराणीशीं झुंजतां झुंजतां होईल !

**गोपिका०**:–हे शब्द ( कंठ दाटून ) कसे कानांतून काळजापर्यंत एकसारखे चर्रचर्र चिरीत जातात ! आपण शाबूत तर दुनिया शाबूत.

**भाऊ०**:–एकदां सांगितलंना कीं झाला निश्चय तो झाला. एक मारायचं, किंवा मरायचं ! आह्मांला आमच्या जिवाची आतां बिलकुल फिकीर नाहीं !

**गोपिका०**:–आपल्याविणं आह्मांस तरी हे जीव ठेवून काय करायचं आहे ? असेल, जायचंच असेल, तर आमचं तरी एकदां काय देहसार्थक करायचं तें करावं आणि मग खुश्शाल जावं. वाटेल तिकडं जावं ! मग कांहीं आह्मीं तुमच्या जाण्याच्या बिलकुल ह्मणून आड येणार नाहीं !

**भाऊ०**:–( सुस्कारा टाकून ) झालं, आतां मात्र अखेर अखेर–अगदीं अखेर झाली. वहिनी, नका नका असे दुःखाचे,–काळजास घरें पाडणारे शब्द बोलून, नका, व्यर्थ भोंसकूं नका हें काळीज ! वहिनी, तुह्मीं आणि नानासाहेब शाबूद असल्यास आमच्यासारखे शतशः कारभारी मिळतील ! परंतु तुम्हीं आपल्या दोघासंबंधानं असे कठोर शब्द उच्चारून नका या हतभाग्याच्या काळजास घरें पाडूं. नानांच्या व तुमच्या आयुष्यांत मला जें काय आयुष्य आहे त्यांतीलच थोडीशी भर पडूंदे. पण हे असले अंतःकरण विदारण करणारे शब्द नको–नको मला ऐकायला ! ( कानांत बोटें घालून ) शिव शिव !

**गोपिका०**:–मग काय ? राह्यचं ! कीं आमची एकदां काय ती वाट लावून जायचं ? होऊं दे या दोहोंतून काय तें एक.

**भाऊ०**:–( दुःखानें ) नको नको आतां इथं उभं राहणं सुद्धां नको ! (जाऊं लागतात.)

**गोपिका०**:–(अंगावरील शालजोडी आडवी टा-

कून) नाहीं. माझ्या प्रश्नांचीं उत्तरं दिल्याशिवाय मी जाऊं देणार नाहीं.

**भाऊ०**:–( विचार करून रागानें ) वहिनी, माझ्या कृतनिश्चयाच्या आड तुह्मींच काय, पण प्रत्यक्ष ब्रह्मदेव देखील जरी आला तरी त्याला देखील मी यत्किंचित्हि जुमानणार नाहीं ! त्यांत तुम्हीं बायका, तुम्हीं घरांतील आपलं कामधाम करून असावं. तुम्हांला असल्या राजकीय गोष्टींत पडण्याचं बिलकुल कारण नाहीं ? हंः गिलच्यासारख्या जबरदस्त शत्रूवर जायचं ! सर्व सरदारांनीं तमाम फौजांसह मोहिमेचे डेरेहि दिले. आणि आतां मी जर घरीं बसलों, तर मला काय म्हणतील ? याची कांहीं कल्पना तरी आहे का तुह्माला ! तुमच्या मनांत माझी आणि त्याजबरोबरच **रावांची** आणि **आप्पांची** अपकीर्ति का करून सोडायची आहे ? तसं असेल तर भरा, मला बांगडया तरी भरा ! ( ज्यास्त रागानें ) एकदां सांगितलंना कीं तुमच्यासारख्या बायकांनीं घरांतील आपलीं कामंधामं पाहून असावं. त्यांस असल्या गोष्टींत पडण्याचं बिलकुल कारण नाहीं ह्मणून ! [ शालजोडीवरून जातात.

**गोपिका०**:–(सचित होऊन दुःखानें आपल्याशीं) झालं. सर्व व्यर्थ झालं ! काय आतां आमच्या नशिबीं असेल तें होईल ! बायकांचं कोण, ऐकून तरी कोण घेणार ? भावोजी तर जाणारच, त्यांची रहाण्याची आतां आशा ह्मणून बिलकुल उरली नाहीं. काय माझं होतं नव्हतं तेवढं केलं. हातापायां पडलें तरी देखील त्यांस द्रव म्हणून कसा तो आला नाहीं. नशीब आमचं. मला असं वाटलं नव्हतं कीं, ते माझा असा अव्हेर करितील. नको, नको ! आतां इथं क्षणभर देखील उभं राहणं नको ! ब्रम्हदेवानं जें जें कांहीं जेव्हां जेव्हां व्हायचं ह्मणून ठरवून ठेवलं असतं त्याच्या उलट आह्मीं आपले प्राणहि टाकले तरी काय होणार ? काय आतां कोणच्या तोंडानं तिकडे जाऊं ? आणि काय सांगूं तरी काय ? [ जाते.

---

## प्रवेश ५ वा.–स्थळ तेंच !

**नाना, भाऊ, व महादाजीपंत पुरंदरे.**

**भाऊ०**:–नाना, आतां व्यर्थ शोक करूं नका ? मीं सांगितलं तें मात्र सर्व पूर्णपणें नीट लक्षांत ठेवून हे महादाजीपंत सांगतील त्याप्रमाणं वागा. यापेक्षां जास्त, मी आपल्याला कांहीं सांगावं असं नाहीं.

**महादाजी**:–भाऊ. तें सर्व खरं; परंतु नाहीं, तुमचा वियोग आह्मांस तर घटकाभरहि सहन होणार नाहीं. दादासाहेबांस पाठवून देण्याचं तें न देतां तुह्मींच जातां हें कांहीं तुह्मीं चांगलं नाहीं करीत. आपल्याशिवाय येथल्या कारभाराचा आटोप कोणालाहि होणार नाहीं.

**भाऊ०**:–तुमच्यासारखी मंडळी इथं असतां मला इकडील काळजी करण्याची बिलकुल गरज नाहीं. पेशवाई जी आह्मांस प्राप्त झाली त्याचं सर्व यश

आपणाकडे, आणि आतांहि पण तिज-बद्दल सर्व काळजी वाहणं व यशापयशाचा अभिमान बाळगणं तेंहि आपल्याकडेच? मग त्याबद्दल मला कशाला विशेष काळजी करायला हवी?

**महा०:**—इतक्या मानास मी योग्य नाहीं. आपल्या पायांच्या पुण्याइनं काय जेवढी थोडीबहुत सेवाचाकरी करितां आली, तेवढी केली. तेवढ्याबद्दल कांहीं इतका नसता गौरव नको करायला.

**भाऊ०:**—नसता गौरव! आपल्यास जर तो नसता वाटत असेल तर तो खुशाल वाटो. माझ्या अंतःकरणांत जें खरं खरं ह्मणून कांहीं वाटलं तें मला आज बोलल्याशिवाय राहवेना!

**नाना०:**—भाऊ ह्मणतात हें तर खरंच! किती किती तरी तुमचे आमच्यावर उपकार. पेशवाईचं मूळ रोंप लावणार आपण; त्याचं आजपर्यंत संगोपन व जोपासनाहि करणार आपण!

**भाऊ०:**—व या पुढेंहि त्याचा वृक्ष करून त्याचा विस्तार करणारेहि आपणच!

**महा०:**-असो. आपण असं ह्मणतां त्यास माझा उपाय नाहीं. परंतु इतक्या मानास कांहीं खरोखर मी पात्र नाहीं, हें खचित! (पडद्यांत)

**सेवकः**—अरे उगीच गडबड करूं नका. इकडे श्रीमंत आणि भाऊसाहेब बोलताहेत. (बाहेर येऊन) सरकार, बाहेर स्वाशांकरितां "हस्ती" घोडी तयार आहे.

**भाऊ०:**—बरं तर मी येतों आतां. (महादेवरावांस) मामा, नानासाहेबांस आतां सर्वस्वीं तुमचा आधार आहे. (कंठ दाटून) संभाळा, याला तुम्हींच सांभाळा! मीं सांगावं अशांतला भाग नाहीं. परंतु सांगितल्याशिवाय राहवत नाहीं.

**नाना०:**—(भाऊंस घट्ट धरून) जाणारचना तर आम्हाला सोडून? जावं. जावं. (सद्गदित कंठानें) यावं. यशस्वी होऊन लवकर—लवकर मात्र यावं. (अश्रू येतात) असा योग परमेश्वर आतां केव्हां आणील तेव्हां खरं!

**महा०:**—भाऊसाहेब, या संभाळून या! सर्व युक्तिप्रयुक्तीनं चालू या. गांठ गिलच्यांशीं आहे. आपला पिढीजाद गनीमी कावा होतां होईल तों सोडूं नका. मात्र एखाद वेळ उगीच भलतंच साहस करून आपला जीव मात्र धोक्यांतबिक्यांत घालून बसूं नका. मीं सांगावं असं नाहीं. दादासाहेबांस पाठवितां तरी बरं होतं. आपणच जायचं मनांत आणलं! असो; परमेश्वराची इच्छा! नेमानेम असेल तें होईल! (सद्गदित कंठानें सुस्कारे टाकून) बरं, या तर आतां! राखा, वडिलांचं नांव राखा म्हणजे झालं!

**भाऊ०:**-(स्फुंदन) तुह्मां सर्वांस सोडून जाण्याचं माझ्या सुद्धां फार—फार जिवावर येतं; परंतु दत्ताजी शिंद्यांच्या शिरच्छेदाचं वृत्त ऐकल्यापासून असं कांहीं झालं आहे कीं (त्वेषानें) त्या कुतुबशहाचे एकदां केव्हां तुकडे करीन आणि त्या अंतरिक्षांतील गिधाडांस—त्या हांपापलेल्या गिधाडांस—एकदां केव्हां मनमुराद

मेजवानी देईन ! असो; पण त्याचं काय आतां. ( सर्वांस भेटून झाल्यावर ) पण माधव आणि विश्वास कुठं आहेत ? ( विचार करून ) अथवा या वेळेस ते कुठचे जागे असायला ? निजले असतील, तेंच बरं आहे ?

**माधवः**—( एकदम येऊन गळ्यांत मिठी मारून, पुनः बाजूस उभा राहून ) भाऊ, वाः नामी ! खाशी युक्ती ही आम्हांस निजल्या जागींच सोडून जायची !

**भाऊ०ः**—( त्याच्या तोंडावरून हात फिरवून ) बाळा माधवा, अरे तूं तर माझ्या जिवाचा प्राण आहेस !

**माधवः**—तर मग त्या प्राणालाच यथास्थित आपल्याच हातानं चांगलं थोपटून निजवून आपण जाण्याचा विचार केला होतातना ?

**भाऊ०ः**—अरे वेड्या, तसं नव्हे ! तुझं वय काय ? आणि अशासमयीं का तुला अशा स्वारीच्या हालाकष्टांत न्यायचं ? त्याच जन्मास आला आहेस ! पुढंमागं ( तलवार काढून ) हीच तलवार तुझ्या हातांत यायची आहे ! समजलास !

**माधवः**—नाहीं, मी तुम्हांला सोडून इथं खचित राहायचा नाहीं. ( तलवार काढून ) मला नको तुमची तर्वार ! माझी मला आहे ही माझ्या अगदीं बेताची ! याच तलवारीनं तो कोण तुकुबशहा कां बितुकशहा आहे कीं नाहीं त्याचे तुकडे तुकडे करीन !

**भाऊ०ः**—( सद्गदित कंठानें ) काय, हा एवढासा मूल तो काय ? आणि काय ही याची वीरश्री !

**महा०ः**—( नेत्रांस पाणी आणून ) थोरांचं सगळंच थोर ! तो तरी कोणासारखा होईल ! खचित हा बाजीरावच पुनः जन्मास आला ह्मणायचा ! ( माधवास हातानें ओढून ) अरे, तो गिलच्या भारी जबरदस्त आहे. त्याच्या—

**माधवः**—मग असेना का.

**भाऊ०ः**—आणि बाळा, तूं अजून अगदीं लहान आहेस.

**माधवः**—बरं मग, मी लहान असलों म्हणून काय झालं ? अभिमन्यू नव्हता का लहान ? काय, त्यानं कसा पराक्रम केलान् ! द्रोण, जयद्रथ—

**नाना०ः**—गुलामाला सगळ्या पुराणांतल्या गोष्टीहि पण आणखी कशा त्या सगळ्या एकान् एक अगदीं ठाऊक आहेत.

**माधवः**—ते द्रोण अन् तो जयद्रथ असे रथी अन् महारथी जरी ते होते तरी त्यांच्याशीं तो शेवटपर्यंत नाहीं का लढला ?

**महा०ः**—बरं मग ? वेडा नाहीं तर ! चल ये इकडं ! असं करूं नये वेड्यासारखं. कोणी गांवाला जायला निघालं तर त्याला अशी उगीच हरकत करूं नये ?

**माधवः**—पण, मी कुठं त्यांना हरकत करतों आहे ? मी तर त्यांना उलट म्हणतों कीं चला चला लौकर म्हणून.

**सेवकः**—महाराज बाहेर "हस्ती" केव्हांची उभी आहे.

**माधवः**—कोण आहेरे, अरे गणू, ए गणोबा,

एँ विठ्या, अरे कोणीच का इथं नाहीं. माझी "निळी" घोडी आणा आणा कोणी तरी लवकर! मीहि जातों भाऊं-बरोबर त्या गिलच्यांचीं का फिलचाचीं हाडं खिळखिळीं करायला.

**भाऊ०:**–(माधवास जवळ घेऊन) हें पहा बाळा सध्यां किनई तूं कांहीं येऊं नकोस. आम्हीं हिंदुस्थानांतून परत आलों, आणि पुनः दाक्षिणेंत मोहिम करणं झालं म्हणजे मी तुला खचित–खचित घेऊन जाईन! पण सध्यां? इकडं मात्र नको. कारण माझ्या वयाला इतकीं वर्षं झालीं तरी मीसुद्धां अजून तिकडे कधीं गेलों नाहीं. हा पहिलाच प्रसंग, तर तूं व्यर्थ आग्रह धरूं नकोस.

**माधवः**–तें कांहीं मी ऐकायचा नाहीं–अरे ए माझी घोडी आणा कोणी तरी–

**भाऊ०:**–(हनुवटीस हात लावून) कां, तुला माझं ऐकायचं का नाहीं? तुला सांगितलंना कीं आह्मी एकदां हिंदुस्थानांत जाऊन आल्यावर पुढच्या मोहिमेस तुला नेऊं ह्मणून! सांगितलेलं ऐकावं. मुलांनीं उगीच भलत्याच गोष्टीविषयीं फार आग्रह धरून बसूं नये.

**नाना०:**–(डोळे वटारून) माधवा, काय हें! उगीच काय व्यर्थ आग्रह करावा?

**माधवः**–पण भाऊ, मला न्यालना खचित पुढच्या मोहिमेंत तरी!

**भाऊ०:**–हो. हो, खचित खचित नेईन माझ्या लाडक्याला. (चुंबन घेऊन तोंडावरून हात फिरवितात) बाळा येतों बरं आतां. नीट जपून रहा. उगीच त्या बज्याबाबरोबर भांडतबिंडत जाऊं नकोस! समजलं.

**माधवः**–बरं तर! (रडतो व शेल्याचा पदर डोळ्यास लावून बाजूस उभा राहतो.)

**भाऊ०:**–अरे पण विश्वास कुठें आहे.

**माधवः**–तो आणि आई केव्हांची काकूबरोबर कांहीं खलबत करीत बसलीं आहेत.

**भाऊ०:**–बरं तर, मी आतां वहिनीस व त्यास भेटून जातों. (सेवकास) कुठेशी उभी केली आहेसरे हत्ती? चल हो पुढें. हा आलोंच वहिनीस भेटून.

[जातात.

---

# अंक २ रा.

---

## प्रवेश १ ला.

**स्थळः**–अंबेपडदुराहून ३ कोसावरील भाऊंचे डेरे.

(लक्ष्मीबाई एकटीच बसली आहे).

**लक्ष्मीबाईः**–(आपल्याशीं) तरी ह्मटलं सासूबाईंचं आणि इकडचं काय खलबत तरी काय चालत असतं? तिकडून जर मामंजींच्या बरोबर जाणं होणार तर मला तरी इथं राहून काय करायचं आहे? जिथं प्राण तिथं कुडी. जिथं देव तिथं देऊळ. आणि त्यांतून इकडचा स्वभाव पडला जरा साहसी. नाहीं तर सासूबाईंच्याजवळहि मी मोठ्या सुखानं दिवस काढले असते! सासू-

बाईच्याजवळ रहायला माझं काय जातं ? त्या मला माझ्या आईहूनहि जास्त करितात. खरोखर अशी सासू मिळणं हें तरी नशिबींच हवं लागतं ? घटकोघटकीं "मुली मुली" ह्मणून माझे किती तरी पण लाड करणं होत असतं ? माझं आणि हिकडचं लग्न झाल्यापासून "आमच्या घरांत प्रत्यक्ष लक्ष्मीच आली," असं त्यांच्या तोंडून दिवसांतून कितीकदां तरी निघत असेल, याची तर मुळीं गणतीच नाहीं. अशी सासू मिळणं ह्मणजे खरोखरच जन्मोजन्मींची पुण्याई हवी लागते ह्मणतात तेंहि कांहीं खोटं नव्हे ! तें असो; पण आतां तिकडून येणं झालं ह्मणजे मी तर आपला निश्चय तिकडं कळविणार. काय होईल तें होवो. हं हं ! असंच, अगदीं असंच केलं पाहिजे. त्याशिवाय तिकडून "होय" हीं अक्षरं कुठलीं यायला ? अगोदर मी रुसल्यासारखंच करीन. क्षणभर मौन धरून तिकडून मला कितीही जरी बोलिवणं झालं तरी मी बोलायची ह्मणून नाहीं ! अन् मी अशी स्फुंदून स्फुंदून रडूं लागलें ह्मणजे मग आपण होऊनच माझी समजाविशी करणं होईल. दुःखाचं कारण विचारलं तर तें मी पहिल्यांदा सांगायचीच नाहीं. पण मग मला तिकडून जरा आग्रह झाला ह्मणजे त्या दुःखाचं कारण नाहीसं करण्याचं मी तिकडून अगोदर वचन घेइन आणि एकदां असं वचनांत गुंतिवलं ह्मणजे मग मी आपला हेतु बेधडक सांगेन. इतकंही करून माझं नच ऐकणं झालं तर मग माझ्यासारखी दुर्दैवी मीच !

(विश्वासराव येतो.)

**विश्वास०**:—काय दुर्दैवी व्हावयाला काय झालं? आजचं चिन्ह कांहीं नीट दिसत नाहीं. माझ्या जाण्याबद्दल तर कांहीं हिला कळलं नसेलना ! (तिच्या जवळ जाऊन तिच्या खांद्यावर हात टाकून) काय आज असं कां ? नेहेमींच्या त्या आनंदी चेहेऱ्यांत आणि आजच्या या दुर्मुखलेल्या चेहेऱ्यांत किती किती तरी हें अंतर? हा मुखचंद्र इतका जरी दुर्मुखलेला दिसतो तरी तो आपल्या सौंदर्यप्रभेनं त्या चंद्रास—त्या आकाशांतील चंद्रास—अगदीं फिक्का पाडतो यांत बिलकुल शंका नाहीं !

**लक्ष्मी०**:—होय असेल. चंद्रहि असेल अथवा सूर्यहि असेल ! कांहीं का असेना ? (हताश झालीसें दाखवून आपल्याशीं) आतां हा सर्व आकाशभर आपला प्रकाश पाडणारा चंद्रच का घ्याना. ह्याचं जर तेज काढून घेतलं तर याची प्रभा ती काय पडणार ?

**विश्वास०**:—ह्मणजे ? याचा अर्थ काय ?

**लक्ष्मी०**:—याचा अर्थ !

**विश्वास०**:—हो हो याचा अर्थ ?

**लक्ष्मी०**:—सगळं ठाऊक असतांना देखील जर मुद्दाम वेड पांघरून मला विचारायचं झालं तर मग तिथं काय करावं बाई माणसानं ?

**विश्वास०**:—( मोठ्यानें ) तर मग हिला माझ्या जाण्यासंबंधानं कळलं हेंच खचित !

लक्ष्मी०:-कळलं म्हणजे? इकडून मला न कळवायचा बेत होता कीं काय तर मग? तसं असतं तर मघाशीं मीं कानांत बोटं तरी घातलीं असतीं!

विश्वास०:—व: तुला न कळवायला काय झालं? तेवढ्याकरितां तर मुद्दाम मी हा आलों.

लक्ष्मी०:—(रागाऊन टोंचून व झिडकारून दूर होऊन) मग हें त्या गजीकडून देखील नसतं का सांगून पाठवितां आलं. एवढ्याचकरितां कांहीं इकडून मुद्दाम नको होतं येणं व्हायला!

विश्वास०:—(हनुवटीस हात लावून) बरं पण इतकं अगदीं उदास व्हायला काय झालं तें तर सांगशील अगोदर?

लक्ष्मी०:—उदास? ह्मणजे? दुसऱ्यांनीं उदास व्हावं असं अगोदर आपण करूं लागायचं आणि दुसरं उदास झालं, ह्मणजे मग ह्मणायचं "कां, असं उदास व्हायला काय झालं?" हा न्याय मात्र खासा! असो, दुसऱ्याला बोल लावून काय उपयोग? तो आपल्या नशिबालाच लावला पाहिजे. एरवीं मला येऊन कांहीं फार का दिवस झाले? आज मंगळवार, उद्यां बुधवार, न् परवां गुरुवार. गुरुवार आणि गुरुवार आठ न् उद्यां येइल तो दुसरा गुरुवार. त्या दिवशीं कुठें मेले १५ दिवस होतील! तों आपलं पुन: इकडून निघणं होतंच आहे! इतक्यांत नसतें आलें तरी बरंच होतं. परंतु रंगपंचमीचंच जेव्हां अगदीं कडेनिकडीचंच बोलावणं आलं तेव्हां माझा नाइलाज झाला! आई इतक्यांत नकोच म्हणत होती; परंतु बाबांच्या आग्रहास्तव व माझाहि जाण्याचाच झोंक दिसला ह्मणून तिलाहि त्यावेळीं उगीच बसावं लागलं.

विश्वास०:—मग तुझ्या मनांतून आत्तां माहेरीं का जायचं आहे?

लक्ष्मी०:—वा! ही मात्र खाशी युक्ति! मला वाटलंच होतं कीं असं कांहीं विचारणं होईल ह्मणून! पण हें पहा—मी आत्तां ह्मणून कुण्णाचं कांहीं एक ऐकायची नाहीं? सासूबाईचं आणि इकडचं झालेलं सगळं खलबत मला समजलं आहे, व तें ज्या वेळेस मला समजलं त्याच वेळेस मीं, मग कांहींहि होवो, इकडून जिकडं जाणं होईल तिकडं बरोबर जाण्याचा निश्चय केला आहे.

विश्वास०:—काय? तर तुला माझा सर्व बेत समजला आहे तर! तर मग मजबरोबर मोहिमेस येण्याचा तूं निश्चय केला आहेस म्हणतेस?

लक्ष्मी०:—निश्चय? निश्चय म्हणजे तो अगदीं कायमचा—कायमचा निश्चय.

विश्वास०:-काय तूं वेडी तर नाहींस? भलत्याच गोष्टीविषयीं कांहीं एक विचार न करतां एकदम निश्चय करणं ह्मणजे तो शुद्ध,—गाळीव वेडेपणा!

लक्ष्मी०:-हो असेना का तो आपला माझा वेडेपणा? या वेडेपणाला एक औषध आहे. आणि त्या औषधाचा इतका कांहीं गुण आहे कीं:—

**विश्वास०:**—तें सगळं कळलं मला! पण तुझा हा स्वारींत येण्याचा विचार अगदीं पोरकट दिसतो!

**लक्ष्मी०:**—असेल पोरकट असेल. मी तरी कुठं तो तसा नाहीं असं म्हणतें? परंतु मामंजींबरोबर सासूबाई ज्या जावयाला निघाल्या आहेत तें त्यांचं करणं सुद्धां इकडं पोरकटच का वाटतं?

**विश्वास०:**—अग काकूची गोष्ट आणि तुझी गोष्ट सारखीच का? तिच्या वयाला कांहीं नाहीं तरी २७।२८ वर्षं झालीं आहेत; आणि तुला अजून कुठं १५ वं सरून सोळावं लागतं आहे—नाहीं. तिच्या आणि तुझ्या वयांत दुपटीचं अंतर!

**लक्ष्मी०:**—तें कांहींहि असो. मी आपली येणार हें खचित. मागं औरंगाबादेवर त्या निजामावर जाणं झालं त्या वेळेस मला "मी येणार" असं ह्मणता तरी येत होतं का? परत येणं झाल्यावर तो बापूजी खंडेराव नव्हता कां सांगत? कीं आपल्या जिवाची बिलकुल फिकीर न करितां शत्रूशीं इकडून लढायचं ह्मणून?

**विश्वास०:**—तर मग तुझ्या मनांत काय तसं लढूं नये? मग पेशव्यांच्या कुळांत येऊन बांगड्या का घालून बसायचं आहे? राऊ, आप्पा जर अशा बांगड्या घालून बसते तर आज आह्मांस पेशवेच नको होतं व्हायला! नानांनीं लहान असतांना अलीबागेस कसं साहस केलं होतं हें तूं परवां महादाजापंत मामांच्या तोंडून ऐकलंसना?

**लक्ष्मी०:**—होय; पण मी कुठं नाहीं ह्मणतें.

**विश्वास०:**—तर मग तुझा येण्याचा इतका आग्रह कां? वास्तविक पहातां न्यायला कांहीं हरकत नाहीं. परंतु सध्यांची मोहिम गिलच्यावर असून ती बऱ्याच लांबच्या पल्ल्याची आहे, व तिला दिवसगतहि बरीच लागेल. करितां बायकामुलांस न न्यावं हेंच बरं.

**लक्ष्मी०:**—ही मोहिम ज्याअर्थी लांबच्या पल्ल्याची आहे त्याअर्थीं जाऊन परत येण्याला दिवसगतहि बरीच लागेल, व म्हणूनच मी ह्मणतें कीं मी आपली येणार ह्मणून. इकडून यायची रोजची वेळ टळली म्हणजे माझं काय होतं सांगूं? एक होतं आणि एक नाहीं! तर मग मला सोडून जर पुष्कळ महिने राहणं होईल तर मग मी कसं, रहावं तरी कसं? नाहीं ग बाई माझ्या हातून इकडं सोडून राहणं व्हायचं! नको नको. ती कल्पनाहि नको. एकदां का लढाई सुरू झाली म्हणून पत्रं येऊं लागलीं व आज अमका पडला, उद्यां तमका पडला अशा गोष्टी वरचेवर कानीं येऊं लागल्या म्हणजे दिवस काय आणि रात्र काय काळजीनं सर्वकाळ पोटांत एकसारखा गोळा फिरूं लागतो व कांहींएक सुचेनासं होऊन तळमळ व चिंता यांनीं मन कसं अगदीं घेरून जातं. झोंप येईल म्हणून अंथरुणावर पडावं पण ती कुठली यायला!

नाहीं नाहीं ते विचार मनांत येतात. नाहीं नाहीं तें डोळ्यांपुढं दिसायास लागतं. व इतकंहि करून जर एखाद्वेळ डोळा लागलाच तर भयंकर स्वप्न पडून एकदम जागं व्हावं तो आपला अंगास दरदरून घाम सुटलेला! नकोग बाई, ती एकटं असण्याची कल्पनाहि नको. याचा अनुभव उदगिरच्या वेळीं मला अगदीं पुरा येऊन चुकला आहे. मीं तरी निश्चय केला आहे कीं इकडं सोडून मी एकटी म्हणून राह्यचीच नाहीं! जवळ असून काय माझं होणं असेल तें होऊंदे!

**विश्वास०:**—तुला सोडून जावं असं मला वाटतं, असं का तूं समजतेस? असं जर तूं समजत असशील तर खुशाल समज. आईची जर तुला पाठविण्याची कांहीं हरकत नसेल तर माझी कांहीं तुला नेण्याला ना नाहीं.

**लक्ष्मी०:**—येवढंच ना! मी हें धाकट्या सासूबाईकडूनच त्यांस सांगवीन म्हणजे मग तर झालं कीं नाहीं! मग कांहीं तिकडून नकार येईल असं नाहीं मला वाटत. आलाच, आणि जर कदाचित् त्यांनीं होऊनच मला विचारलं तर मी कांहीं एक न बोलतां त्यांना आपला हेतू कळवीन. मग तर खचित त्या माझ्या जाण्याच्या आड येणार नाहींत. इकडून २।४ दिवस जर कुठं बाहेर शिकारीला जाणं झालं तर माझी काय अवस्था होते हें त्यांना अगदीं पूर्णपणें ठाऊक आहे. त्या माझ्या जाण्याच्या आड खचित—खचित येणार नाहींत. आणि त्यांत इकडूनहि कांहीं हरकत दिसली नाहीं ह्मणजे तर त्या कांहीं जाऊं नको असं बिलकुल ह्मणणार नाहींत.

**विश्वास०:**—असं असेल तर माझ्याकडून बिलकुल हरकत नाहीं. चल, खुशाल चल.

**लक्ष्मी०:**—इतकं असल्यावर मला आणखी काय पाहिजे? बरोबर राहून मग मला मरण जरी आलं तरी पत्करलं! परंतु इथं राहून तें सदोदित काळजी करणं नको! हें मोंगल लोक मोठे कपटी आहेत. ते कोणच्या वेळीं काय करतील आणि काय नाहीं याचा कांहीं तरी नेम आहे का? थोडक्यांत चुकलं! नाहीं तर आज आह्मांस हे दिवस तरी पहायला मिळते का? तो आदितवार मला पक्का—पक्का आठवतो. कालच्या आदितवारीं बरोबर पावणे दोन महिने झाले! त्या दिवशींचा मामंजीचा आपला एक अपमृत्युच टळला ह्मणायचा. जर का त्या दिवशीं त्या मुझफरखानाची ती कट्यार बरगडींत बिनचूक लागती तर आज काय आकांत होऊन राहता! हे दिवस मग कुठचे पहायास मिळते?

**विश्वास०:**—तेव्हांपासूनच तर काकूनं होतां होईतों भाऊंना सोडून राहायचं नाहीं असा अगदीं कृतनिश्चय केला आहे!

**लक्ष्मी०:**—आणि म्हणूनच तर मी म्हणतें कीं त्या मी येतें म्हटल्यास नको येऊं

असं म्हणणार नाहींत म्हणून. शिवाय काशीयात्रेला जाण्याकरितां आणखीहि पुष्कळ मंडळी निघणार आहेत म्हणून ऐकतें. माझा तर बरोबर येण्याचा अगदीं खचित निश्चय झाला! उद्यां नाहीं परवाच्या दिवशीं पार्वती सासूबाई इथून, तिकडं जिथं डेरे दिले आहेत तिथं जाण्यास निघणार आहेत. तितक्यांत मीहि त्यांजकडून सासूबाईंस विचारवून त्यांची परवानगी घेतें.

**विश्वास०:**—बरं पण आतां काकाहि इकडंच कदाचित् येतील. त्यांची निघण्याची वेळहि बहुतेक झालीच असेल. थांब (ऐकलेंसें करून) हे इकडेच सगळे येत आहेत वाटतं. तिकडं आई आणि काकू बसल्या आहेत तिकडं जा तूं. व इकडं मीहि भाऊनां नमस्कार करण्यास पुढें जातों. [जातात.

---

## प्रवेश २ रा.

**स्थळः**—आंबेपडदुराहून ३ कोसावरील भाऊंचे डेरे.

( **भाऊसाहेब, विश्वासराव, गोपिकाबाई, लक्ष्मी, व पार्वतीबाई.** )

**भाऊ०:**—(झोंपेंतून जागे होऊन) हें काय? मी काय स्वप्नांत आहे किंवा जागृतींत आहे? हें माझं मलाच कांहीं कळेनासं झालं आहे. काय वहिनी ह्या तुह्मींच का इथं उभ्या आहांत? बा विश्वासा हा तूंच का? का ही स्वप्नांतील वहिनी आणि हा स्वप्नांतील विश्वास! स्वप्न ह्मणावं तर मी चांगला जागा आहे! जागा आहे ह्मणावं तर हीं दोघं इथं कशीं? याचा मला बिलकुल उमज पडत नाहीं!

**पार्वतीबाईः**—ह्मणजे, जागं असायचं का स्वप्नांत असायचं याचा देखील का भ्रम पडला? माझं गुरुवारीं यायचं नव्हतं का ठरलं?

**भाऊ०:**—पण तूं तरी माझ्या स्वप्नांतच येऊन हें बोलत आहेस असं तरी कशावरून नसेल? वास्तविक पहातां, माझी स्मरणशक्ति जर शाबूत असेल तर आज गुरुवार खचित; व त्याप्रमाणें तूं यायची व आलीस हेंहि खचित. पण ही मंडळी जर पुण्याकडे जाण्यास मागं फिरणार होती तर ती इकडे कशी आली? या संशयामुळं मला चकल्यासारखं होऊन क्षणभर मला भ्रम पडल्यासारखा झाला आहे! (गोपिकाबाईस) पण वहिनी मला सांगा तुह्मीं इथं कशा आलां त्या? काय बाळ विश्वास तूं इथं कसा?

**विश्वास०:**—कसा आणि कायतें काय सांगू? आपण मला सोडून आलांत ते मला कसं रुचेल? माधवाला गुळचटशी थाप देऊन त्याला जसं तिथंच रहायला लावलंत तसंच मलाही रहायला लावलं असतं म्हणजे मग मी काय करणार होतों? व ह्मणूनच त्या वेळेस मीं येण्याचा बिलकुल आग्रह धरला नाहीं.

**भाऊ०:**—हं, तरी ह्मटलं मी येतांना

विश्वास मला भेटला देखील नाहीं, हें कसं ? हं आतां जुळलं ! सारं जुळलं ! आतां माझ्या सर्व अगदीं पूर्ण लक्षांत आलं. आतां मात्र मी अगदीं खरोखरी जागा आहे हें खचित ! गेला माझा भ्रम, अगदीं अज्जीबात नाहींसा झाला ! मी आतां चांगला शुद्धीवर आहे. ( गोपिकाबाईस ) वहिनी, तुह्मीं मला रहा रहा ह्मणत असतांना मी तुमचं न ऐकतां निघून आलों ह्मणून तुम्हास वाईट वाटलं असेल हें मी जाणून आहें. पण तसं करण्याशिवाय मला गत्यंतरच नव्हतं. मी अगदीं निघतांना जेव्हां तुम्हांस नमस्कार करायला आलों तेव्हां तुह्मीं मला आशीर्वादहि दिला नाहींत. तेव्हांच मी समजलों कीं मजवर आपला फार राग झाला आहे म्हणून. व मीहि त्याच वेळेस मनांत गांठ घातली कीं हा राग मोहिम फत्ते करून आल्यावर सगळा काढून टाकूं म्हणून.

**गोपिका०**:–भावोजी तुमचंहि खरंच आणि माझंहि खरंच. आतां काय त्याचं ? तुह्मीं रहात नाहीं हें तर आतां अगदीं पक्कं ठरलं. मग त्याबद्दल वायफळ बोलून काय उपयोग ? आपण रहावं म्हणून मीं माझं होतं नव्हतं तेवढं करून पाह्यलं. परंतु तुम्हीं शेवटपर्यंत माझं म्हणणं कसं तें मुळीं दिखील ऐकलं नाहीं. तें एक असो. पण सध्यां जी मी आलें आहे ती तुम्हांला एक विनंति करण्याकरितां आलें आहे. ऐकेन असं अभिवचन दिलं तर सांगतें. नाहीं तर आलें आहे याच पावलीं मी आपली परत जातें !

**भाऊ०**:–विनंती ! वहिनी तुमची विनंती असायची कीं आज्ञा असायची ? हें काय असं भलतंच.

**गोपिका०**:–तसं नव्हे. मी विनंती इतक्याचकरितां ह्मणतें कीं ती जर यदाकदाचित् आपल्यास मान्य न झाली तर त्याबद्दल मला मग इतकं वाईट तरी वाटणार नाहीं. आज्ञा ह्मणून करावी आणि मागच्यासारखीच ती आपण न ऐकावी मग त्यांत काय माझी शोभा उरणार ?

**भाऊ०**:–वहिनी, असं ह्मणून तुह्मी भाऊच्या मनाला मात्र उगीच दुखवितां. तुह्मांला असं का वाटतं कीं हें अगदीं चिरेबंदी दगडांनीं घट्ट बांधून काढलं आहे ह्मणून ! जगांत अपकीर्ति आणि बदलौकिक यांना फार भ्यावं लागतं. क्षणभर तुह्मी असं समजा कीं, तुमच्या आज्ञेबरहुकूम मी इकडे निघून न येतां तिथंच राहतों, तर काय, लौकिकांत काय झालं असतं ? मी मोहिमेवर जाणार ह्मणून सर्व तमाम सरदार डेरे देऊन बाहेर निघालेले, आणि तोच मी जर शेंपूट घालून घरांत बसलों असतों तर मला ते काय ह्मणते ? आणि आपलेच दादासाहेब अगोदर काय ह्मणते? याचा कांहीं विचार.

**गोपिका०**:–आपण ह्मणतां तेंहि खरंच. पण आतां त्याचं काय ? मी कांहीं आपल्याला रहा ह्मणून ह्मणायला नाहीं आलें,

**भाऊ०**:—मला रहा ह्मणण्याशिवाय दुसरी तुह्माला जी काय ह्मणून आज्ञा करायची असेल ती तुम्ही खुशाल करा. ती मी खचित मोडणार नाहीं!

**गोपिका०**:—पहा अं! नाहींतर मग मागून ह्मणाल कीं मी कांहीं अगदीं वचनांत गुंतलों नव्हतों!

**भाऊ०**:—पण तुह्मी जी आज्ञा कराल ती तरी विचारानंच करालना? त्यांत जर माझा कोणच्याहि रीतीनें मानभंग होण्याजोगा असेल अथवा ती जर आमच्या प्रस्तुतच्या मोहिमेच्या आड येत असेल तर मात्र मी ती बिलकुल ऐकणार नाहीं. एवढं मात्र मी आपल्याला सोडवून ठेवतों!

**गोपिका०**:—तुमचा मानभंग होण्यासारखी व तुमच्या मोहिमेच्या आड येण्यासारखी अशी विनंती मी तुम्हांला कशाला करूं? (विश्वासरावास भाऊंच्या हातीं देऊन) याला, या माझ्या विश्वासाला आपण कसंहि करून आपल्याबरोबर घेऊन जावं. ही माझी ठेव आहे असं समजावं. आणि आपण खुद्द—जातीनं ही माझी मला परत आणून दिली पाहिजे! एवढंच माझं मागणं आहे.

**विश्वास०**:—आई, भाऊंचा मी कोणीच नव्हे कां ग? मजवर त्यांची कांहीं मालकीच नाहीं कीं काय?

**गोपिका०**:—बाळा तसं नव्हेरे!

**भाऊ०**:—हं समजलों. सारं समजलों! वहिनी, हें तुमचं दोघांचं मजवर किती तरी प्रेम!

**विश्वास०**:—ह्मणजे? माझं तुमच्यावर नाहीं वाटतं तर प्रेम. भाऊ, असं का तुह्माला वाटतं!

**भाऊ०**:—बाळा विश्वासा! तुला तें नाहींरे कळायचं! साधं प्रेम, आणि गुप्त प्रेम, यामध्यें किनई फार—फार, जमीनअस्मानाचं अंतर आहे. दोन्हीहि प्रेमं निष्कपट व साधीं असूं शकतील; परंतु दुसरं जें आहे तें अगदीं अलोट व अंतःकरणास पीळ पाडणारं आहे.

**विश्वास०**:—तर मग माझं प्रेम अलोट आणि अंतःकरणास पीळ पाडणारं नाहीं असंच कीं नाहीं आपलं म्हणणं?

**भाऊ०**:—तसं नव्हे रे? अरे, गुप्त प्रेम म्हणून जें म्हणतात तें कांहीं एक प्रकारचं विलक्षण असून ती कांहीं एक अमोलिक आणि अजब चीज आहे, चीज! जसं गुप्त रीतीनं दिलेलं दान मिळणाराला आनंदातिशय करणारं असतं तद्वतच हें गुप्त प्रेम अंतःकरणास द्रव आणणारं असतं. बाहेरून प्रेम आहे असं दिसायचं सुद्धां नाहीं आणि आंतून मात्र प्रेमातिशयाशिवाय दुसरं कांहीं कांहीं सांपडायचं नाहीं. (गोपिकाबाईस) हें पहा वहिनी! याला नेण्याबद्दल माझी बिलकुल हरकत आहे असं नाहीं; परंतु कोणतीहि गोष्ट करण्यापूर्वी तिचा योग्य विचार केला पाहिजे; व त्या संबंधानं आणखी पुष्कळ गोष्टी लक्षांत घेण्याजोग्या असतात, त्याहि विचारांत घेतल्या पाहिजेत.

काळजीनें कशा चंचल झाल्या होत्या व त्यांच्या मुद्रेंत कसकसे फरक पडत होते, तें मी बारिक रीतीनें पहात होतों."

"काय? आपण ह्मणतां तरी काय? आपण बोलतां याचा अर्थ मी काय समजावयाचा?" **कुमुदबंधू**च्या भाषणानें **नलिनी** विस्मित होऊन प्रश्न करिते.

"दुसरा कांहीं एक समजावयाचा नाहीं;" **कुमुदबंधु** उत्तर करितो, "अर्थ एवढाच समजावयाचा कीं, राणीच्या दोघी मैत्रिणी **विशाखा** आणि **अनुराधा** या पक्क्या विश्वासघातकी आणि राजद्रोही बनल्या आहेत! **बसवप्रभु** आणि **कालनीती** या दोन कपटपटु नराधमांनीं त्यांच्या अंतःकरणास भूल पाडून त्यांस अगदीं बिघडवून टाकिलें आहे! प्रिये, **नलिनी,** तूं अशा विस्मय व भयचकित मुद्रेनें मजकडे पहात रहावेंस हें स्वाभाविकच आहे. पण मीं जें सांगितलें यांतील एक अक्षरही खोटें नाहीं. मी त्या थैलींतील कागदपत्र येथें बरोबर आणलेले नाहींत. ते वाड्यांत माझ्या खोलींत आहेत. पण तुझ्या **काका**साहेबांनीं **प्रतापदुर्गा**हून **बसवप्रभू**स लिहिलेल्या पत्रांतील मुद्याचा तेवढा सर्व मजकूर मला अगदीं अक्षरशः पाठ झाला आहे. त्यांनीं पत्रांत असें लिहिलें आहेः—

"मी येथें येऊन राहिलों आहें, आणि पुढें काय काय प्रकार घडून येतात, व राणीचे काय काय नवीन बेत होतात, यांची वाट पहात आहें. तुमचें पत्र आलें त्यानें फारच आनंद झाला. तुमच्या पत्रांत महत्वाच्या गोष्टी असावयाच्या त्या सर्व असून, शिवाय अगदीं बारिकसारिकही मौजेच्या हकीकती नेहमीं लिहिलेल्या असतात, यामुळें तुमचीं पत्रें वाचतांना मला मोठी करमणूक होते. आपण गोसाव्याचें सोंग घेऊन सर्वांना फसवून **गिरिद्वार**च्या वाड्याच्या बागेंत निर्भयपणें प्रवेश केलात हें वाचून मी पोट धरधरून हंसलों. खरेंच, ती भगवी कफनी, ती डोळ्यापर्यंत ओढलेली टोपी आणि सबंध तोंड झांकून टाकणाऱ्या त्या पिंगट रंगाच्या खोट्या दाढ्यमिशा या सर्वांनीं तुह्मांला फारच शोभा आणली असेल! त्यावेळीं **विशाखे**नें आपला चेहरा पाहिला असता तर ती खचित फार संतुष्ट झाली असती! पण असो. यापेक्षांही महत्वाची गोष्ट ह्मणजे राणीजवळील त्या दोन अल्लड पोरींचीं मनें लुब्ध करून त्यांना अगदीं आपल्याशा करून टाकण्यांत आपण आणि सरदार **कालनीती** अशा उभयतांनीं जें कौशल्य दाखविलें तें नुसत्या राजकार्यज्ञास किंवा मजसारख्या शिपायास कधींही साधणें नाहीं. आपल्या या युक्तीनें आतां राणीच्या दिवाणखान्यांत चालणारीं अत्यंत गुप्त खलबतेंही आपणांस ताबडतोब कळण्याचा मार्ग किती तरी सुगम झाला आहे? बरें, इतक्यावरही आपण न थांबतां त्या दोघीस आपली आंकड्यांची भाषाही इतक्यांत शिकवून टाकलीत, तेव्हां आपल्याला आतां काय शाबासकी द्यावयाची! राणीची स्वारी **गिरिद्वारा**हून निघण्याचे आदले रात्रीं त्यांचा बेत फिरतांच त्या **विशाखे**नें लागलीच एक लहानशी चिठ्ठी लिहिली. आणि सर्वांचे डोळे चुकवून

आपल्या हातीं खिडकींतून टाकली, व आपण ती ताबडतोब मजकडे **कूर्मदुर्गास** रवाना केली, यामुळें आपल्याकडून होण्यासारखें सर्व काम आपण केलें होतें. पण दुर्दैवामुळें त्या द्विवर्शींचा इतका व्यवस्थेनें रचलेला व्यूह शेवटीं मोडला. असो. वगैरे वगैरे."

"अरेरे देवा, या जगांत इतका विश्वासघातकीपणा आणि इतकें कपट भरलें आहे ना!" **नलिनीचें** अंतःकरण सखेदाश्चर्यानें भरून गेल्यामुळें ती मोठ्यानें उसासा टाकून ह्मणाली.

"असें असावें हें फार वाईट खरें!" **कुमुदबंधु** ह्मणतो, "पण कदाचित् त्या पोरींना तूं जितकी अपराधी ठरवीत असशील तितका मी ठरवीत नाहीं कारण **गिरिद्वाराहून विशाखेनें** जी चिठ्ठी लिहिली ती केवळ अविचारामुळें व मूर्खपणामुळेंच लिहिली असली पाहिजे." '**निघण्याची वेळ बदलली. वेत फिरला. स्वारी पहाटेस दोन घटका रात्रीं निघणार. बरोबर जास्त स्वारशिबंदी नाहीं!**' हे शब्द चिठ्ठीवर लिहितांना आणि ती चिठ्ठी **वसवप्रभूच्या** हातांत टाकतांना त्या मूर्ख **विशाखेच्या** मनांत पुढचे विचार खचित आले नसतील. ही चिठ्ठी लिहिल्यानें आपण आपल्या राज्ञीस केवढ्या महत् संकटांत ढकलीत आहों आणि केवढ्या अनर्थाचा पाया रचित आहों, हें तिला खचित दिसलें नसेल. मला तरी निदान असें वाटतें कीं, त्या दोघी पोरींना अक्कलच कमी आहे, नहून त्यांचीं अंतःकरणें घातक व क्रूर बनलीं आहेत असें नाहीं आणि ह्मणूनच त्यांचीं कृत्यें उघडकीस येऊं नयेत, व त्यामुळें त्यांची बेअब्रू होऊं नये अशी मीं सर्व तजवीज केली आहे. कालरात्रीं **वसवप्रभू** आणि **कालनीती** यांना मीं असें निक्षून सांगितलें आहे कीं, त्यांनीं आपलें सर्व वजन खर्च करून त्या दोघी पोरींस ताबडतोब राजवाडा सोडावयास लावावा. प्रिये, मजवर त्या दोघां नीचांनीं मारेकरी कां घातले याचें कारण आतां तुझ्या ध्यानांत आलें असेल!"

"खरेंच, आपण सांगितलेली ही हकीकत ऐकून मला तितकाच चमत्कार आणि तितकेंच दुःख वाटतें!" **नलिनी** खिन्नवदन करून **कुमुदबंधूकडे** पहात ह्मणाली.

"पण लाडके, तुला मी दुसरी एक बातमी सांगणार आहें, ती तूं ऐकलीस, ह्मणजे तुला अतिशय आनंद वाटेल." **कुमुदबंधु** प्रेमानें तिच्या अंगावर हात टाकून ह्मणतो. "तुझा भाऊ **बालार्कराय** याची आणि माझी कालरात्रीं गांठ पडली होती. त्यानें बंडखोरांचा पक्ष सोडला. तूं राज्ञीपक्षास मिळालीस, याबद्दलचा तुजवरचा राग त्याच्या मनांतून समूळ नाहींसा झाला आहे. त्यानें तुला असा निरोप सांगायला सांगितला आहे कीं, तूं आतां त्याच्याबद्दल बिलकुल फिकीर करूं नको. तुला वाईट वाटण्यासारखें कोणतेंही कृत्य त्याच्या हातून यापुढें खचित घडणार नाहीं. सांग आतां, ही बातमी ऐकून तुझी सर्व खिन्नता पळाली कीं नाहीं?"

"ही खरेंच अत्यानंदाची गोष्ट!" **नलिनीची** मुद्रा संतोषानें उज्ज्वलित होऊन

ती ह्मणते. "पण मला अगोदर सांगा, त्याची आणि आपली गांठ कोठें पडली? तो आपल्याला कसा—"

"त्याची माझी गांठ कोठें, कशी व कशाकरितां पडली असेना." कुमुदबंधु तिला पुरतें न बोलूं देतां ह्मणतो, "आज मी जो इतक्या पहांटेस निघालों आहें, तो त्याचीच भेट घेण्याकरितां. त्याचें व माझें आतां उत्तम सख्य झालें आहे. आणि मी आतां ज्या नवीन कामगिरीवर निघालों आहें, तींत मला यश आल्यास बहुधा—"

"फिरून आणखी आपली नवीन कामगिरी आहेचना?" नलिनी किंचित् हास्यवदन करून आपल्या प्रियकराच्या मुखाकडे आनंदानें व अभिमानानें पहात ह्मणते; "पण मी आपल्याला आतां कांहींएक अधिक विचारीत नाहीं. खरेंच, देवा, वेळ किती तरी झाला. वाड्यांत परत निघण्याची राणीसाहेबांची अगदीं सर्व तयारी झाली असेल; आणि मी कोठें गेलें ह्मणून त्या माझा जिकडे तिकडे शोध करीत असतील!"

"आणि या आरंभींच झालेल्या मक्षिकापातानें माझ्या कमींत कमी तीन घटका तरी गेल्या!" कुमुदबंधु ह्मणतो; "बालार्कराय एकसारखा माझी तिकडे वाट पहात असेल. पण प्रिये, कसेंही झालें तरी अशा विलक्षण रीतीनें या वेळीं गांठ पडली ही का कमी आनंदाची गोष्ट आहे!"

इतकें भाषण आटपल्यावर त्या दोघांनीं परस्परांस प्रेमालिंगन दिलें, आणि नलिनी जवळच्याच पायवाटेनें अमरसिंहाच्या बागेकडे गेली, आणि ती बागेजवळ पोहोंचली असें पाहून कुमुदबंधु परत फिरला आणि ज्या ठिकाणीं मोहन घोडे घेऊन उभा होता तेथें झपाट्यानें येऊन पोहोंचला.

आमचा सरदार आणि मोहन हे आपआपल्या घोड्यावर लागलीच स्वार झाले, आणि घोडे एकसारखे भरधांव टाकीत निघाले. तथापि ताम्रोपल टेंकडीस जाऊन पोंचण्यास त्यांना ठरल्या वेळेपेक्षां सुमारें दोन घटका तरी उशीर झाला. कुमुदबंधूची खात्री होती कीं, आपल्याला जरी थोडा उशीर झाला तरी बालार्कराय आपली तेथें वाट पहात राहील, आणि त्याचें अनुमान चुकीचेंही नव्हतें. कारण तो आणि मोहन खिंडींत येऊन पोंचतांच पलीकडच्या सखलाच्या बाजूस एका लहानशा ओढ्याच्या कांठीं उगवलेली कोंवळी हरळी खुडीत असलेले तीन घोडे त्यांच्या दृष्टीस पडले. पलीकडेच त्या ओढ्याच्या झुळझुळ वाहणाऱ्या प्रवाहाच्या कांठीं बालार्कराय एक गाशा टाकून विश्रांती घेत पडला आहे, आणि त्याच्यापासून कांहीं अंतरावर त्याचे दोघे अनुचर बसले आहेत, असेंही त्यांना दिसलें. लागलीच कुमुदबंधु आणि मोहन यांनीं आपले घोडे त्या बाजूस वळविले. हे दोघे जवळ येतांच बालार्कराय थोडा उठून पुढें आला आणि या दोघां सरदारांनीं परस्परांस प्रणाम केले.

घोड्याला थोडी विश्रांती देण्याकरितां कुमुदबंधु घोड्यावरून खालीं उतरला, आणि घोड्याचा लगाम मोहनच्या हातीं देतां देतां त्याला ह्मणाला, "मोहन, मघाशीं

शीं घडून आलेल्या प्रसंगाबद्दल त्या नोकर-लोकांशीं कांहीं कुजबुजण्यांत अर्थ नाहीं. समजलास ना ? "

त्या हुषार सेवकाला आपल्या धन्याचा हेतु कळायला उशीर का लागणार ? त्यानें हुकुमाप्रमाणें वागतों असें दाखविण्याकरितां आदरानें मान लवविली. नंतर **कुमुदबंधु** आणि **बालार्कराय** दोघेच फिरून परत ओढ्याच्या कांठाशीं गेले. जातां जातां **बालार्कराय** ह्मणतो, " सरदारसाहेब, आपण निघण्याचे पूर्वी किंवा निघाल्यानंतर रस्त्यांत कांहीं तरी एखादा चमत्कारिक प्रसंग आपल्यावर गुदरला असावा असें मला वाटलें. कारण इतर कोणी गृहस्थ असता तर त्याला पहांटेच्या साखरझोंपेनें फसवून त्याच्या दोन घटका खाल्ल्या असतील अशी कल्पना मीं केली असती. पण आपल्या ठिकाणीं हें मुळींच संभवत नाहीं. "

हें भाषण ऐकून **कुमुदबंधूनें** एक क्षणमात्र **बालार्करायाच्या** तोंडाकडे न्यहाळून व रोखून पाहिलें. पण त्या तरुण सरदाराच्या मुद्रेंत कपट गोंधळ किंवा लज्जा यांपैकीं एकाही लक्षणाचा प्रादुर्भाव झालेला दिसला नाहीं. त्याची दृष्टि अगदीं नेहमींसारखी निश्चल व सरळपणाची दिसली. **कुमुदबंधूच्या** मनांत एक निमिषमात्रपर्यंत जर कोणत्या एकाद्या गोष्टीसंबंधानें **बालार्करायाचा** संशय आला असेल तर तो तत्क्षणींच नाहींसा झाला.

" **बालार्कराय,** " **कुमुदबंधु** ह्मणतो, " आपण जें मजसंबंधानें बोललां, तें केवळच खोटें आहे असें नाहीं. कोणतीही कामगिरी एक वेळ अंगिकारिल्यावर किंवा कोणाशींही एकवार शब्द गुंतविल्यानंतर ज्या वेळीं मी उठून घोड्यावर स्वार होणें अवश्य असेल, त्यावेळीं बिछान्याच्या सुखकर सहवासाला भुलून जाऊन घटकाभर आळसानें लोळत पडण्याची मला कधींच संवय नाहीं, हें अगदीं खरें आहे. पण सरदारसाहेब, मला जो ठरल्या वेळेपेक्षां येण्यास उशीर लागला तोही विनाकारण नाहीं. हेंच आमचें मोठें सुदैव कीं, मी आणि माझा हा तरुण शूर नोकर इतक्या उशिरानें तरी येथें सजीव येऊन आपल्याला भेटलों. वाटेंत आह्मांवर हल्ला करण्यासाठीं दबा धरून बसलेल्या मारेकऱ्यांच्या टोळीच्या हातून आह्मी प्राणानिशीं बचावलों, तें केवळ त्या बद्रीकेशाच्याच कृपेनें ! "

" आं ! " **बालार्कराय** आश्चर्यचकित होऊन ह्मणाला, " आणि हा प्रसंग तरी कोठेंसा आला ? "

" शहरापासून फार लांबीवर नाहीं. नदीच्या अलीकडे किल्लेदाराचा बागमळा आहे त्याच्या अगदीं नजीक. " **कुमुदबंधु** उत्तर करितो.

**बालार्क०**:—आली माझ्या लक्षांत ती जागा. बरें पण ज्यांनीं आपल्यावर हल्ला केला, ते मारेकरी होते कीं चोरटे होते ?

**कुमुद०**:—आपला प्रश्न माझ्या ध्यानांत आला. ते चोरटे नव्हते. द्रव्यार्जनाकरितां कोणाच्याही सांगण्यावरून पाहिजे त्यांचे गळे कापण्याचा क्रूर धंदा करणारे ते मारेकरीच होते.

**बालार्क०**:—तर मग सरदारसाहेब,

दुसऱ्या कोणा बेहिमती अधमांच्या सांगण्यावरून त्या मारेकऱ्यांनीं तुमच्यावर हल्ला केला असावा ह्मणतां ?

**कुमुद**०:–अगदीं बरोबर आणि हे बेहिमती अधम कोण असावे, याची तुह्मांला कल्पना तरी आहे कां ? **गूहसिंहा**चे अतिविश्वसनीय दरबारी वकील सरदार **बसवप्रभू** आणि **कालनीती** हेच ते गृहस्थ !

हें ऐकतांच तरुण **बालार्करायाचें** तोंड संतापानें व तिरस्कारानें लाल होऊन गेलें. तो मोठ्यानें ह्मणाला, "देवाचीच शपथ त्या भित्र्या व नीच हरामखोरांनीं एका निरपराधी गृहस्थाच्या मस्तकावर विश्वासघाताचा आरोप आणण्याची ही अजब युक्ती काढली ! सरदारसाहेब, तुह्मांला असें खचित वाटेल कीं, तुह्मीं आह्मीं मिळून आज प्रवास करावयाचें ठरलें आहे, तसेंच तुह्मीं अमुक रस्त्यानें प्रवास करणार, आणि अमुक वेळेला बरोबर निघणार ही सर्व बातमी मींच त्यांना दिली असावी. खरोखर तुमच्या मनांत ही कल्पना आली कीं नाहीं ? पण त्या सर्वसाक्षी जगन्नियंत्याचीच साक्ष, मीं यापैकीं एका गोष्टीबद्दल देखील, नुसतें चुकून सुद्धां कोणाजवळ एक अक्षरही काढिलें नाहीं !"

**कुमुद**०:–(निष्कपटपणें) **बालार्कराय**, तुमच्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे. तुह्मीं मजशीं अविश्वासानें वागलां अशी कल्पना माझ्या मनांत बिलकुल आली नाहीं. मला असें वाटलें कीं, कदाचित् जरी तुमच्या तोंडून यासंबंधानें चुकून एकादा शब्द निघाला असला, तथापि माझ्या प्राणावर अशा रीतीनें संकट आणणाऱ्या त्या नेभळ्या **कालयवन**करांच्या बेतास सहाय्य करण्याकरितां तरी खचित तुह्मीं त्यांजपाशीं तो बोललां नसाल. पण कालरात्रीं आपण बोलत होतों त्यावेळीं दोघांनींही एक फारच मोठी चूक केली. आपण इतका वेळपर्यंत बोलत बसलेले पाहून त्या नीच कोल्ह्यांचीं मनें स्वस्थ राहणार नाहींत हें आपल्याला कळायला पाहिजे होतें. हे असले अधम दुसऱ्यांचीं गुह्यें शोधून काढण्याच्या कामीं किती तत्पर असतात हें तुह्मांला ठाऊक नसेल ! अहो, दाराच्या फटी आणि भिंतींतील गवाक्ष यांचा व ह्या असल्या हरामखोरांच्या कानांचा नेहमीं अत्यंत स्नेह !

**बालार्क**०:–किती हलकट आणि पाजी हे लोक ! देवाची शपथ, सरदारसाहेब, या चोरांना योग्य शासन झालेलें पाहिल्यावांचून आपल्याला चैन नाहीं पडणार. अहो, हे शिष्टपणाचें कातडें पांघरून किती क्रूरपणाचीं व दुष्टपणाचीं कामें करण्यास तयार होतील, याचा कांहींच नेम नाहीं. यांचें हें कृत्य एकदम उघडकीस आणलेंच पाहिजे; आणि या अधमांना अगदीं हलकट अपराध्याप्रमाणें न्यायासनापुढें ओढून आणणें हेंच योग्य !

**कुमुद**०:–**बालार्कराय**, थोडा धीर धरा. हा तुमचा संताप थोडासा आवरा ! कित्येक प्रसंग असे असतात कीं, त्यावेळीं केवळ मनाविरुद्ध व अपात्रीं देखील सहनशीलतेचीच आराधना करणें भाग असते. आपण ह्मणतां अशा प्रकारचे विचार माझ्या

मनांत येऊन गेलेले आहेत आणि प्रस्तुत स्थितींत यासंबंधानें काय करावयाचें हें मीं आधींच ठरवून ठेविलें आहे. या प्रसंगाबद्दल कोणाला नुस्ती हकीकत देखील कळून उपयोगाची नाहीं. मी माझ्या नोकरास आतांच जातां जातां असा हुकूम केला आहे कीं, तुमच्या नोकरांससुद्धां या प्रसंगाची बातमी कळवूं नये. आपल्याशीं देखील या विषयाबद्दल मी केव्हां बोलूं लागलों हें आपल्या लक्षांत आलें नाहीं. तुमचे नोकर आपल्यापासून बरेच अंतरावर राहिले असें पाहून नंतर मी यासंबंधानें तुह्मांपाशीं बोलूं लागलों. तुह्मीं आतां शांतपणानें असा विचार करा कीं, या दोघां वकिलांस न्यायासनासमोर ओढण्यास प्रवृत्त झालों तर, त्याचा परिणाम काय होईल? **गूहसिंह** लागलीच आपल्या दरबारची अब्रू राखण्यासाठीं ह्मणून **पंचगांग** देशाशीं लढाई सुरू करील. तूर्तचा प्रसंग त्याला असें करण्यास सोईचाही आहे. त्याला फक्त बरवर योग्य दिसण्यासारखें कारण सांपडलें ह्मणजे पुरे आहे, आणि हें कारण बाह्यतः दिसण्यांत कांहीं कमी नाहीं. बरें. **पंचगांग** देशाची स्थिति आज काय आहे, हें तुह्मी पहातच आहां. तर मग तुम्हींच सांगा, अशा प्रसंगीं या दोघां क्षुद्र कीटकांना चिरडण्याकरितां आणि त्यांचा अधमपणा जगास दाखविण्याकरितां **कालयवन** देश आणि **पंचगांग** देश यांजमध्यें युद्ध सुरू करण्यास मी कारण व्हावें हें योग्य कां?

**बालार्क**०:—बस्स, पुरे आहे, सरदारसाहेब. आपण जो विचार ठरविला आहे तोच आपल्यासारख्या शांत, दूरदृष्टी आणि उदारप्रकृती गृहस्थास योग्य आहे. जर त्या क्षुद्र किड्यांच्या या कृष्णकृत्यावर पांघरूण घालण्याचा आपला स्वतःचा विचार आहे, तर मी देखील ही गोष्ट बाहेर पडूं देणार नाहीं. पण खरोखर सरदारसाहेब, तुम्हीं केलेल्या उपकारांचें मजला वारंवार स्मरण होतें. पहा, या असल्या घातकी सर्पांशीं यापुढें कधींही संबंध करण्याचा मला प्रसंग येणार नाहीं, हें केवळ तुमच्याच कृपेचें फळ! ज्या पक्षाचा पुढाकार किंवा निदान सहायकारीपणा तरी, अशा शिष्टांकडे आहे, त्या पक्षाशीं कोणत्याही प्रकारचा थोडासा संबंध असणें हें देखील खऱ्या शिपायाच्या झगझगीत तलवारीस कलंक लावणारें आहे! मीं यापुढें अशा प्रकारचा वर्तनक्रम ठेवण्याचें ठरविलें आहे कीं, त्यायोगानें असल्या अस्सल बेहिमती हरामखोरांशीं कोणत्याही प्रकारें व्यवहार करण्याचा मला प्रसंग पडणार नाहीं.

**कुमुद**०:—बरें, **बालार्कराय,** यापुढें आपला वर्तनक्रम बदलणार तो कशा प्रकारें? अथवा याहून स्पष्टपणें प्रश्न विचारावयाचा ह्मणजे हाच कीं, आपण जो पक्ष एकवार स्वीकारिला आहे आणि ज्या घातकी जाळ्यांत आपले हातपाय गुंतवून घेतले आहेत त्यापासून मुक्त होण्याला आपण काय युक्ति काढिली आहे? ज्या उद्देशानें आज **जयद्रथराया**ची भेट घेण्यास मी जात आहें तो उद्देश

सिद्धीस गेल्यास आपल्याला कोणत्याही प्रकारची पंचाईत पडणार नाहीं, हें खरें. पण समजा, माझ्या ह्या मध्यस्थीचा कांहीं-एक उपयोग झाला नाहीं, किंवा **गूहसिंहा**कडून आलेलें द्रव्य राणीच्या हातीं लागलें हें कळल्यानंतरही तुमच्या **काका**साहेबांनीं आपला हट्ट सोडला नाहीं. तर——

**बालार्क**०:–( **कुमुद्बंधू**स पुरतें बोलूं न देतांच ) सरदारसाहेब, बंडखोरांचा पक्ष सोडला असें मीं एकवार तुम्हांला वचन दिलें आहे. आतां यांत 'तर' वगैरे कांहीं आडवें येणार नाहीं. मीं जो शब्द गुंतविला तो कसाही खरा करीन. येवढेंच नव्हे तर, बंडखोरांचा पक्ष सोडला म्हणून मजवर विश्वासघाताचा किंवा आणीबाणीच्या प्रसंगीं कोणत्याही प्रकारें निमकहरामपणा केल्याचा आरोप मजवर येऊं नये, अशा रीतीनेंच मी या जाळ्यांतून सुटेन. हें सर्व साधण्यास मीं काय मसलत काढिली आहे ती आपल्याला थोडक्याच वेळांत कळेल. पण आणखी एकवार,——शेवटच्या खेपेस म्हणून,——मी आपल्याला विचारितों कीं, कांहीं झालें तरी **काका**साहेबांची भेट घ्यावयाचीच, हाच आपला कायमचा निश्चय झालाना?

**कुमुद**०:–होय, हा माझा निश्चय कायम आहे; आणि तो कशानेंही बदलणार नाहीं.

**बालार्क**०:–सरदारसाहेब, आमचे **काका**साहेब शिपाई आहेत, कुलशीलवान् आहेत, त्यांच्या शब्दावर बेलाशक विश्वास टाकण्याला कांहीं हरकत नाहीं, असें तुह्मांला वाटत आहे; तसेंच त्यांनीं कृतज्ञतेची खूण ह्मणून तुह्मांला आपल्या हातांतली मुद्रिका दिली आहे; तिजवर तुमचा भरंवसा आहे; आणि या सगळ्या गोष्टींवर अवलंबून तुम्ही निर्भयपणें प्रत्यक्ष सिंहाच्या गुहेंत शिरण्याची छाती करीत आहां! आपण स्वतः होऊन सद्बुद्धीनें आपल्या अंगावर घेतलेली कामगिरी बजावून सुखरूप परत येऊं, आणि **काका**साहेबांचें मन वळवून त्यांनीं राणीसाहेबांवर उचललेलें हत्यार त्यांस खालीं ठेवावयास लाऊं; अशी तुह्मांस भरपूर आशा आहेसें दिसतें, व अशा उदारबुद्धीनें मनुष्यस्वभावाबद्दल तुम्हीं केलेलें अनुमान खोटें न ठरो, आणि तुमची निराशा न होवो अशी माझीही परमेश्वरापाशीं अंतःकरणपूर्वक प्रार्थना आहे. पण **कुमुद्बंधु**राज, तुह्मांला **काका**साहेबांचा स्वभाव जितका माहीत आहे त्याहून तो मला अधिक माहीत आहे, यामुळें मला थोडेंसें भय वाटतें; ह्मणून पुष्कळ विचार करून तुमच्या संरक्षणाची मीं एक युक्ति काढली आहे. तुम्हीं ज्या मुद्रिकेला प्रत्यक्ष आपला रक्षामणी मानीत आहां, व ज्या वचनावर अवलंबून हें जिवावरचें धाडस करण्यास तयार झाला आहां, त्यापेक्षां माझी ही युक्ति सहस्रपटीनें अधिक जोरदार आहे. जर तुम्ही सुदैवानें आपलें कार्य साधून सुरक्षित परत आलांत तर ते याच युक्तीमुळें याल!

**कुमुद**०:–**बालार्क**राय, माझ्या संरक्षणाबद्दल तुह्मी इतकी चिंता वाहतां आणि मजबद्दल इतका मित्रभाव मनांत वागवितां हे आपले मजवर उपकार आहेत.

**बालार्क**०:–सरदारसाहेब, हीं शिष्टाचाराचीं भाषणें आतां आपल्या दरम्यान न निघालेलींच बरीं. आपण पूर्वी एकवार सांगितलें आहे कीं, आपण परस्परांचे मित्र झालों ह्मणून. मग आपल्या संरक्षणाबद्दल मीं कांहीं केलें,–प्रत्यक्ष आपले प्राणही गहाण ठेविले,–तथापि तें केवळ शुद्ध मित्रभावामुळेंच आहे; आणि तसें करणें हें माझें कर्तव्य आहे. यांत उपकार कशाचे?

**कुमुद**०:–बरें, आपण ह्मणतां ती युक्ती कोणती?

**बालार्क**०:–ती युक्ती कोणती, हेंही मी आपल्याला लौकरच कळवीन. पण तूर्त मी ह्मणतों, आपल्या घोड्यास येवढा वेळ मिळालेली विश्रांति पुरे आहे असें जर आपल्यास वाटत असेल, तर आतां उठून पुढील मार्गास लागावें हें बरें. नाहीं का?

**कुमुदबंधूनें बालार्करायाच्या** म्हणण्यास अनुमोदन दिलें. नंतर सर्व मंडळी आपआपल्या घोड्यांवर स्वार झाली. **कुमुदबंधु** आणि **बालार्कराय** हे दोघे पुढें निघाले, आणि **बालार्करायाचे** दोघे अनुचर आणि **मोहन** हे बरेंच अंतर मध्यें टाकून मागाहून चालले. **बालार्करायाचे** अनुचर त्याच्याबरोबर मुद्दाम दिलेले होते. **गूहसिंहाकडून** येणारा खजिना आणण्याच्या कामीं त्यांचा उपयोग व्हावा हा त्यांस पाठविण्याचा मुख्य हेतु होता. पण त्यांना कशाकरितां पाठविलें होतें हें त्यांस ठाऊक नसल्यामुळें आपण ज्या कामाकरितां आलों तें न साधून आपल्यास कोरडेंच परत जावें लागत आहे, या गोष्टीची त्या दोघांस कल्पनाही नव्हती. असो. कांहीं वेळपर्यंत स्वस्थपणें मार्गक्रमण चाललें होतें. सर्वजण आपापल्या विचारांत मग्न होते. **ताम्रोपल** टेंकडी गेली, दोनतीन किल्ले बाजूस दिसत होते ते मागें राहिले, **क्षीरदा** नांवाची नदीही ओलांडली, आणि **कालिकापूरचा** मार्ग सोडून ही प्रवासी मंडळी उजव्या बाजूस वळणाऱ्या एका वाटेनें बरीच दूर गेली. दोन प्रहरच्या आंत **कुवलयपुराहून** सुमारें वीस कोसांचें अंतर या प्रवाशांनीं ओलांडलें.

दोनप्रहरच्या सुमारास ते एका निबिड अरण्याशीं येऊन ठेपले. येथून नुसती पायवाट होती, व ती देखील इतकी वेडीवांकडी आणि अडचणीची होती कीं, घोड्यांस येथून अगदींच सावकाश चालविणें भाग होतें. आषाढमासाचें ऊन्ह, दोनप्रहरची वेळ, आणि सकाळपासूनच्या प्रवासानें झालेले श्रम हे मनांत आणतां कोणालाही असें वाटेल कीं, जनावरांस आणि स्वारांस हें अरण्य ह्मणजे **इंद्रानें** आपल्या सुखाकरितां पृथ्वीवर निर्माण केलेलें हें **नंदनवनच** असेल. वाटेला वांकणें फार होतीं, झाडी दाट असल्यामुळें छाया भरपूर होती, दोनप्रहरची वेळ असून किंचित्शी वाऱ्याची झुळुक येत होती, नुकतेच कांहीं पाऊस पडले असल्यामुळें वाटेंतील लहानसहान ओढ्यांतही बरें वाईट थोडेंबहुत पाणी होतेंच, आणि जिकडे तिकडे थोडीशी तरी हिरवळ उगवलेली असल्यामुळें आजूबाजूचा प्रदेशही नेत्रांस उदास आणि रखरखीत दिसत नव्हता. मार्गक्रमण जरी हळू हळू चाललें होतें तथापि

त्यामुळें आमच्या प्रवाशांस कंटाळा येण्याचा संभव नव्हता. ते परस्परांशीं कांहींएक न बोलतां त्या अपूर्व वनश्रीचें आणि आजूबाजूच्या सुंदर सृष्टिरचनेचें निरीक्षण करीत चालले होते. अरण्यांतून बाहेर पडतांच डाव्या बाजूस एक बरीचशी उंच टेंकडी दिसत होती. ती दृष्टीस पडतांच येवढा वेळ अंगिकारलेलें मुक्याचें व्रत सोडून **बालार्कराय** ह्मणतो, "सरदारसाहेब, ही डाव्या बाजूस दिसते आहे ही **तारकेश्वरा**ची टेंकडी. हिच्या पायथ्याशीं एक शिवालय आहे आणि त्याच्या सन्निधच '**उग्रसिंहाची गुहा**' ह्मणून एक फार पूज्यस्थान आहे."

"या स्थानासंबंधानें एकादी पौराणिक दंतकथा असेल बहुधा." **कुमुद्बंधु** प्रश्न करतो.

"होय आहे." **बालार्कराय** उत्तर करतो, "पण ती तूर्त राहूं द्या. ही गुहा एकवार पहाण्यासारखी आहे. ज्या महंतानें ही तयार केली तो फार विलक्षण वृत्तीचा मनुष्य असावा असें या गुहेच्या रचनेवरून तुम्हांला वाटेल. मी तुम्हांला तिचें थोडक्यांत वर्णन देतों तेवढ्यावरून ती कशी असावी त्याची कल्पना तुम्हांला होते का पहा. त्या टेंकडीच्या पायथ्याशीं एक भला मोठा खडक आहे. त्याच्या एका बाजूस एकाद्या विवराप्रमाणें एक भोंक पाडलेलें आहे. यांतून एका वेळीं फक्त एकाच मनुष्यास आंत शिरतां येतें. तोंडांतून आंत शिरतांच सुमारें सात आठ पायऱ्या उतराव्या लागतात. या पायऱ्या उतरून खालीं गेलें ह्मणजे तीनचार मनुष्यांस बसतां येईल इतक्या बेताचा एक कट्टा उत्तम खोदून व घोटून तयार केलेला आहे. या कट्ट्याच्या अगदीं मागच्याच बाजूस एक लहानसा सुंदर हौद आहे. हा सुमारें चौरसचौरस एक हातभर असून खोलही तितकाच आहे. मागच्या खडकांतून वहात आलेला एक झरा या हौदांत वहात असतो. सर्व ऋतूंत, सर्वकाळ, हा झरा सारखाच वहात असतो. यामुळें हा छोटा हौद नेहमीं निर्मळ, गार आणि स्वादिष्ट अशा पाण्यानें भरलेला असतो. मौज अशी कीं, इतकें पाणी यांत एकसारखें येत असून हौद तोंडातोंड भरल्यानंतर पाण्याचा एक थेंबही बाहेर वहात नाहीं! बरें यांतून कितीही पाणी काढलें तरी फिरून एका क्षणाचे आंत हा जशाचा तसाच फिरून भरलेला असतो——"

"तुह्मी सांगतां यावरून गुहेचा आंतील भाग रमणीय असेल खरा!" **कुमुद्बंधु** मध्येंच ह्मणतो; "पण तुमच्या वर्णनावरून असेंही दिसतें कीं, ही गुहा अगदीं अंधकारमय असावी?"

"नाहीं. मी आपल्यास एक सांगावयाचें विसरलों." **बालार्कराय** उत्तर करितो, "मीं जो कट्टा सांगितला याच्या वरच्या बाजूस खडक बराच खोदलेला आहे. तो इतका कीं साधारणतः मनुष्यास आंत सरळ उभें राहतां यावें. याच खडकांत दोन गवाक्ष राखिलेले आहेत, यामुळें आंत प्रकाश बराच येतो व मनुष्य आंत बसलें तर त्याला केवळच गुदमरल्यासारखें वाटत नाहीं. हल्लीं

*या गुहेंत कोणीही रहात नाहीं, पण या प्रांतांती-ल लोकांची या गुहेसंबंधानें एक विलक्षण* समजूत आहे. या अरण्याच्या आसपास आलें असतां या गुहेचें दर्शन घेतल्याशिवाय व या गुहेंतील झऱ्याच्या पवित्र पाण्याचा एक घोंट तरी घेतल्याशिवाय तसाच सरळ वाटेनें जो पुढें जाईल त्याच्यावर कांहींना कांहीं तरी अरिष्ट कोसळल्यावांचून रहावयाचें नाहीं. शिवाय या झऱ्याचें पाणीही इतकें उत्तम आहे कीं, ज्यानें एकवार त्याची चव घेतली आहे त्याला तें फिरून प्याल्यावांचून रहावणारच नाहीं ! "

" ठीक आहे. " **कुमुदबंधु** उत्तर करतो, " तर मग आपण क्षणभर येथेंच घोडे उभे करूं या. निदान तुमच्या नोकरांना तरी येथवर आल्यावर तसेंच पुढें जाणें आवडणार नाहीं. शिवाय आतांपर्यंतच्या श्रमानें त्यांना तहानही लागलीच असेल. "

" होय, तसें केलेंच पाहिजे. " **बालार्कराय** उत्तर करतो. " आणि मला देखील गुहेंत गेल्यावांचून सोय नाहीं. "

**बालार्करायाच्या** या भाषणांत कांहीं तरी गूढार्थ आहे, असें आमच्या सरदारास वाटलें आणि तो त्याच्या तोंडाकडे पाहूं लागला.

लागलीच **बालार्कराय** विचारतो, " माझा हेतु तुमच्या लक्षांत आला नाहीं वाटतें ? "

" नाहीं. " **कुमुदबंधूनें** उत्तर केलें.

" सर्व सांगतों आतां मी आपल्याला. " असें ह्मणून **बालार्करायानें** *उग्रसिंहाच्या गुहेसंबंधानें जी युक्ति काढली होती ती सर्व कुमुदबंधूस समजा*वून सांगितली. त्याची ती युक्ति व त्यावर रचिलेले बेत ऐकून **कुमुदबंधूस** फारच आश्चर्य व कौतुक वाटलें. ही युक्ति काय होती हें पुढील गोष्टीवरून वाचकांच्या सहजच ध्यानांत येईल.

**बालार्कराय** व **कुमुदबंधु** यांचें थोडेंसें भाषण होतांच दोघांनीं आपले घोडे त्या **तारकेश्वर** टेंकडीकडे वळविले. थोडक्याच वेळांत ते इष्टस्थानीं येऊन पोंचले. टेंकडीच्या पायथ्याशीं एक मोठा खडक पुढें आलेला दिसत होता, तिकडे बोट दाखवून **बालार्कराय** ह्मणतो, " त्या खडकाच्या वरच्या अंगास मीं सांगितलेल्या गुहेचें तोंड आहे. "

कांहीं वेळानें **मोहन** आणि **बालार्करायाचे** दोघे अनुचरही धन्यांच्या पाठीमागून त्या खडकाजवळ येऊन पोंचले. लागलीच **बालार्कराय** घोड्यावरून खालीं उडी टाकून आपल्या अनुचरांस ह्मणतो, " कायरे, गड्यांनो, या गुहेंतील पवित्र झऱ्याचें पाणी घोंटभर तरी प्यायल्यावांचून तसेंच पुढें जाणें तुह्मांला खचित आवडणार नाहीं ? आणि मला देखील येथपर्यंत आल्यावर तसेंच परत जाणें पसंत नाहीं. आपला विचार कसा काय, सरदारसाहेब ? "

" मला कांहीं बिलकुल तहान लागलेली नाहीं. " **कुमुदबंधु** उत्तर करतो; " शिवाय मी परदेशीय गृहस्थ असल्यामुळें असल्या कित्येक बाबतींत तुमच्याहून माझ्या समजुती अगदीं भिन्न आहेत. खरोखर तुह्माला

सांगूं का? एका विशेष ठिकाणच्या झऱ्याचें पाणी पिण्यावर आपलें शुभ किंवा अशुभ कधींही अवलंबून राहील ह्या गोष्टीवर माझा तरी विश्वास नाहीं! पण तुमच्या समजुतीच्या आड मी कशाला येऊं! **मोहन**, तूं देखील यांच्या मागून गुहेंत जाऊन दर्शन घेऊन ये पाहिजे तर. तोंपर्यंत घोडे संभाळण्याचें काम मी करतों."

"ठीक आहे. आपली मर्जी! चलारे गड्यांनो, माझ्या मागून या." असें ह्मणून **बालार्कराय** त्या खडकाच्या बाजूनें वर गेला आणि त्या गुहेच्या तोंडांतून आंत उतरला. आंत उतरल्यावर त्यानें आपल्या नौकरांस फिरून हांक मारली. ते दोघेही एकामागून एक असे आंत उतरले. त्याबरोबर **कुमुदबंधूनें मोहन**ला जवळ बोलाविलें आणि पुढें काय करावयाचें याबद्दल ठरलेला सर्व बेत त्याला थोडक्या शब्दांत उघड करून सांगितला. **कुमुदबंधूचें** भाषण **मोहन** लक्षपूर्वकऐकत होता, पण त्याची मुद्रा अत्यंत आश्चर्यचकित होऊन गेली होती. धन्याचें भाषण आटपतांच, आपल्याकडे कोणती कामगिरी आहे ती आपल्यास समजली आणि ती बरोबर बजावण्यास आपण सिद्ध आहों, असें **मोहननें** आपल्या चेहऱ्यावरून आणि दृष्टीवरून **कुमुदबंधूस** दाखविलें.

**कुमुदबंधु** चटदिशीं घोड्यावरून उतरला आणि गुहेच्या तोंडाशीं जाऊन उभा राहिला. नंतर **बालार्करायास** मोठ्यानें हांक मारून तो ह्मणतो "सरदार **बालार्कराय**, आपल्याशीं मला दोन शब्द बोलावयाचे आहेत तेवढे ऐका! प्रस्तुत प्रसंग थोडा विलक्षण आहे यामुळें आपल्याशीं व आपल्या दोघां अनुचरांशीं मला कांहींशा चमत्कारिक रीतीनें वागणें भाग आलें आहे. थोडक्यांत सांगायची गोष्ट एवढीच कीं, तुह्मी तिघेही कांहीं वेळपर्यंत **कैदी** अहांत."

"काय, **कैदी**!" गुहेंतून **बालार्कराय** एकदम ओरडला. त्याच्याबरोबर त्याच्या अनुचरांच्या तोंडांतूनही अशाच प्रकारचे आश्चर्य व त्वेषयुक्त उद्गार एकदम बाहेर पडले.

"होय, **कैदी**!" **कुमुदबंधु** उत्तर करतो, "मला वाटतें या शब्दाचा अर्थ अगदीं उघड आहे! तुह्मांला तो स्पष्टपणें कळलाना? ऐका तर मग आतां. कांहीं वेळ मला येथून थोडें दूर जाणें भाग आहे. तोंपर्यंत माझा विश्वासू नौकर **मोहन** या गुहेच्या तोंडाशीं नागव्या तलवारीनिशीं पहारा करीत उभा राहील; आणि मी परत येण्यापूर्वीं, तुह्मां तिघांपैकीं जो कोणी गुहेच्या पायऱ्या चढून वर येईल व आपलें डोकें या गुहेच्या तोंडाबाहेर काढण्याची छाती करील त्याच्या डोक्याचीं दोन शकलें ताबडतोब होतील हें पक्कें ध्यानांत ठेवा."

"ही हरामखोरी आहे! हा घातकीपणा आहे! याचा आह्मी सूड घेऊं!" वगैरे उद्गार **बालार्करायाच्या** दोघां शूर नौकरांच्या तोंडावाटे एकदम निघाले.

"माझ्या मित्रांनो, थोडा दम धरा! थोडे शांत व्हा!" **बालार्कराय** आपल्या नौकरांस उद्देशून ह्मणतो. "आपण ह्या सरदाराच्या हातांत सांपडलों आहों खरे. त्याचें

## भाग १६ वा.

( जुनी ओळख )

**उग्रसिंहा**च्या गुहेपासून **कुमुदबंधु** निघाला तो **गोलदुर्गा**च्या वाटेनें चालला. वाटेनें एकटाच चालू लागतांच डोक्यांत विचार सुरू झाले. गेल्या आठ प्रहरांत आपल्यावर दोनतीन वेळां जिवावरचे प्रसंग येऊन गुजरले, पण आपण त्यांतून सुरक्षितपणें पार पडलों; **बालार्करायासा**रखा खऱ्या दिलाचा एक स्नेही संपादन केला व त्याला राज्ञीपक्षाकडे वळविलें; तसेंच त्याच्याच मदतीनें व युक्तीनें **जयद्रथराया**च्या हातून खाबीनें सुटून येण्याचें एक साधन मिळविलें. ह्या इतक्या गोष्टी एवढ्याशा अवकाशांत घडून आल्या त्याअर्थी आपण अंगिकारलेलें कार्य परमेश्वरास मान्य आहे व म्हणूनच दैवही आपल्यास इतकें अनुकूळ झालें आहे. असें मनांत येऊन त्यानें परमेश्वराचे अंतःकरणपूर्वक आभार मानले, आणि आपल्यास पुढेंही त्यानें असेंच यश द्यावें ह्मणून त्याची मनोभावें प्रार्थना केली.

लागलीच विचार **नलिनी**कडे वळले. जी जी नूतन गोष्ट घडून येई तिच्या तिच्या योगानें दिवसेंदिवस **नलिनी** त्याला अधिकाधिक प्रिय होत चालली होती; व यामुळें त्याच्या मनांत कितीही परस्परभिन्न विचार येवोत, शेवटीं **नलिनी**ची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिल्याशिवाय त्या विचारांचें पर्यवसान होणेंच नाहीं! आशाप्रकाशानें त्याचें अंतःकरण प्रमुदित झालें असो, किंवा संकटांधकारानें क्षणभर गोंधळलें असो, तें **नलिनी**स क्षणभर देखील विसंबत नव्हतें! या वेळीं **कुमुदबंधू**च्या मनांत जे विचार घोळत होते त्यांच्या योगें त्याचें अंतःकरण अभिमानानें व उत्साहानें भरून गेलें होतें. आपण जें जें ह्मणून धाडसाचें व शौर्याचें काम करीत आहों, तें प्रत्येक एका अत्यंत लावण्यपूर्ण व सद्गुणी राज्यकर्त्रीच्या सेवेंत रुजू होत आहे, आणि एका निष्कपट व प्रेमळ तरुणीच्या मुखावर स्मितहास्याची व आनंदाची छाया आणण्यास खचित कारणीभूत होईल, अशी त्याच्या मनाची खात्री होती. एकंदरींत **पंचगांग** देशांत पाऊल ठेवल्यापासून या तरुण सरदारावर दोघी स्त्रियांनीं मंत्रप्रयोग करून त्याचें सरळ अंतःकरण पूर्णपणें आपल्या आधीन करून टाकलें होतें! एकीनें त्याच्या निष्कपट निष्ठेचा व भक्तीचा मक्ता आपल्याकडे घतला होता, आणि दुसरीनें त्याचा सर्व निर्मळ प्रेमप्रवाह आपल्याकडे वळविला होता!

**उग्रसिंहा**च्या गुहेपासून **गोलदुर्ग** सुमारें दोन अडीच कोश होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. दरम्यानचा प्रांत डोंगराळ व जंगली होता. **उग्रसिंहा**ची गुहा सोडल्यापासून सुमारें घटका दीड घटकेच्या अवकाशांत **कुमुदबंधू**नें आतल्या वाटेचा तीन—चतुर्थांश भाग क्रमिला होता तो एका बऱ्याचशा दाट जंगलांतून बाहेर पडला व तेथून जवळच एक मोठा कोट व त्याचे बुरुज दिसूं लागले. **बालार्करायानें**

सांगितलेला **गोलदुर्ग** तो हाच अशी लागलीच त्याची खात्री झाली. त्या किल्ल्याकडे पहात असतां त्याच्या मनांत पुढील कल्पना येऊं लागल्याः—

"आपण **गोलदुर्गां**त जाऊन **जयद्रथराया**च्या भेटीकरतां आलों आहों असा त्यास निरोप पाठविल्यांच त्याला काय वाटेल? तो भेट घेण्याचें कबूल करील किंवा नाहीं? भेट झाली तर तिचा परिणाम आपल्या इच्छेस अनुरूप होईल किंवा नाहीं?"

ह्या गोष्टीच्या कल्पना करण्यांत आमचे सरदार चूर होऊन गेले होते; व दृष्टि मात्र **गोलदुर्गा**च्या वाटेकडे होती. इतक्यांत समोरच्या एका झाडांच्या राईंतून दोन स्वार बाहेर पडतांना त्याच्या दृष्टीस पडले. ते **गोलदुर्गा**कडूनच आलेले असावे असें **कुमुदबंधूनें** अनुमान केलें. त्यांचे घोडे सावकाश चालले होते. त्यांच्या शरीरांवरील मौल्यवान् चिलखतांकडे व घोड्यांच्या अंगावरील झोंकदार सरंजामाकडे पाहतांच हे कोणी तरी सरदार असावे असें सहज कळण्यासारखें होतें. **कुमुदबंधूनें** त्यांस पाहिलें त्याच वेळीं **कुमुदबंधूस**ही त्यांनीं पाहिलें व चट्दिशीं त्यांनीं आपआपलीं शिरस्त्राणें मस्तकांवर चढवून आपलीं तोंडें झांकिलीं. यामुळें हे कोण असावे हें ओळखण्यास **कुमुदबंधूस** संधिच मिळाली नाहीं. मात्र त्यांच्यापैकीं एक अंगानें सडसडीत व दुसरा बराच सुदृढ असावा असें त्यास दिसलें. **कुमुदबंधूचें** शिरस्त्राण खालीं काढलेलें होतें. त्यानें विचार केला कीं, हे गृहस्थ **गोलदुर्गा**कडूनच आलेले आहेत व आपण तर तेथें जातांच कोण, काय, हें सर्वांस स्पष्टपणें कळविणार, मग यांच्यापुढें तरी मुखावरण घालून तोंड लपविण्याची जरुरी काय? असा विचार करून त्यानें आपलें शिरस्त्राण मस्तकावर चढविलें नाहीं. ते दोघे स्वार कांहींसे जवळ येतांच **कुमुदबंधूनें** शिष्टाचारास अनुसरून त्यांस प्रणाम केला; व तो त्यांस कांहीं प्रश्न करणार तों ते दोघेही एकदम ओरडले, "अहो, हा तो **महेश्वरकर** हरामखोर!"

दोघांनींही **कुमुदबंधूस** एकदम ओळखलें, ह्मणून त्याबरोबर दोघांच्याही तोंडून हे विलक्षण उद्गार निघाले. लागलीच दोघांनींही आपापल्या घोड्यांस टांच दिली व ते **कुमुदबंधूच्या** अंगावर चाल करून आले, आणि त्यास उद्देशून ह्मणाले, "अरे चोरा, हरामखोरा, एकदम शरण ये, नाहीं तर मेलास!"

"तुमचे बाप हरामखोर!" **कुमुदबंधु** एकदम अनिवार त्वेषानें संतप्त होऊन ओरडला आणि त्यानें झट्दिशीं आपलें शिरस्त्राण डोक्यावर घातलें. व जिला अपयशाचा कलंक कधींच लागला नाहीं अशी ती त्याच्या कंबरेशीं लटकणारी विक्रमशालिनी तलवार सर्कन् म्यानाबाहेर ओढली.

एका क्षणांत झगडा सुरू झाला. मात्र एवढें येथें सांगितलेंच पाहिजे कीं, त्या दोघा स्वारांनीं जरी एकदम मिळून एकट्या प्रतिपक्ष्यावर हल्ला केला, तथापि त्यास फक्त निःशस्त्र करून कैद करावें असा त्यांचा प्रथम हेतु होता. यामुळें त्या दोन स्वारांपैकीं जो सुदृढ व स्थूल होता त्यानें **कुमुदबंधूच्या** हातां-

तील तलवार आपल्या शस्त्राच्या आघातानें मोडून पाडण्याचा प्रयत्न चालविला. दुसऱ्यानें आमच्या सरदारास घोड्यावरून खालीं आणण्याच्या हेतूनें आपला घोडा त्याच्या घोड्याच्या अगदीं निकट नेला. **कुमुदबंधूनें** आपल्या कौशल्याची, शक्तीची, धैर्याची आणि प्रसंगावधानाची सर्व शिताफी दाखविली ती या वेळीं ! त्यानें अत्यंत त्वरेनें समोर असलेल्या स्वाराच्या शिरस्त्राणावर आपल्या तलवारीनें असा जबरदस्त वार केला कीं, त्यामुळें जरी शिरस्त्राण तुटून डोक्यास जखम झाली नाहीं, तरी नुस्त्या त्या धक्क्यानेंच त्या स्वाराचें घोड्यावरील आसन ढळलें व तो कांहींसा मागें सरला. इतक्यांत बाजूस असलेल्या स्वाराच्या छातींत **कुमुदबंधूनें** लोहत्राणानें आवृत असलेल्या आपल्या डाव्या हातानें अकस्मात् असा मुष्टिप्रहार केला कीं त्याबरोबर तो स्वार एकदम घोड्यावरून खालीं कोसळला आणि मूर्च्छित होऊन पडला. लागलीच विद्युल्लतेच्या त्वरेनें तो पहिल्या स्वाराच्या अंगावर चालून गेला; आणि त्याच्यावर त्यानें आपल्या शस्त्राचा एकसारखा मारा सुरू केला. त्याची तलवार हवेंतून एकसारखी फिरूं लागली. आतां प्रतिपक्ष्याच्या शिरस्त्राणावर, आतां बाहूंवर, आतां मांडीवर असे एकसारखे थडाथड आघात होऊं लागले; पण त्या स्वाराचें चिलखत इतकें बळकट व टिकाऊ होतें कीं त्याला या आघातांनीं कांहींएक भंग झाला नाहीं. मात्र आमच्या योद्ध्याच्या असामान्य चपलतेमुळें त्याच्या प्रतिपक्ष्यास स्वसंरक्षणापलीकडे कांहीं करण्याची सोय उरली नाहीं. होतां होतां या झटापटीचा शेवट झट्कन् झाला. **कुमुदबंधूनें** संधि साधून आपल्या अजस्र हत्याराचा एक टोला प्रतिपक्ष्याच्या शस्त्रावर देतांच त्याचीं दोन शकलें झालीं. लागलीच **कुमुदबंधूनें** प्रतिपक्ष्याच्या शिरस्त्राणावर जोड साधून विलक्षण जोरानें आणखी एकवार आघात केला. त्याबरोबर शिरस्त्राण तुटून तलवारीची नुस्ती धार त्याच्या मस्तकास शिवली. पण त्याबरोबर जो धक्का बसला तेवढ्यानें तो घोड्यावरून धाडकन् खालीं पडला. **कुमुदबंधूनें** तितक्याच जलदीनें घोड्यावरून खालीं उडी टाकिली आणि जाऊन आपल्या प्रतिपक्ष्याच्या छातीवर गुढघा टेंकिला, व लागलीच त्याचें मुखावरण बाजूस केलें. त्यासरशी तो सरदार **शक्तिधरराय** आहे असें त्यास कळलें.

“ बोला, बोला, शरण ह्मणून ! **शक्तिधरराय!** ” **कुमुदबंधूचा** त्वेष आतां कांहींसा शांत होऊन तो ह्मणाला. पण असें ह्मणतांना त्यानें आपल्या तलवारीचें टोंक **शक्तिधररायाच्या** छातीशीं लावून धरलेंच होतें.

“ सरदारसाहेब, शरण आहें. तुम्हीं मला पूर्णपणें जिंकिलें आहे; आतां तुम्हीं सांगाल त्या अटी मला मान्य आहेत. ” सरदार **शक्तिधरराय** केंविलवाण्या स्वरानें ह्मणाला.

**कुमुदबंधूनें** झट्कन् थोड्या अंतरावर पडलेल्या दुसऱ्या गृहस्थाकडे नजर फेंकली व तो पूर्ववत् अगदीं निचेष्ट पडला आहे, असें पाहून व **शक्तिधराच्या** छातीवरील गुडघा

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक ११.

# नाटचकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

# NATYA-KATHARNAVA

A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.*

अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठें. |
| --- | --- |
| पानिपतचा दुर्दैवी मोहरा. ... ... ... ... ... ... | ३३ पासून ४८ |
| कुवलयपूरची राणी कुमुद्वती.... ... ... ... ... ... | २६५ ,, २८० |


पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत छापिलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क
मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.

[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ४॥. शिवाय ट.हं. ६ आणे.

नोव्हेंबर १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें.

# विक्रीस तयार.

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें

## त्राटिका नाटक.

महाकवी शेक्सपिअरकृत "टेमिंग् आफ् दी श्र्यू" नाटकाच्या आधारें

**वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए.,**

इंग्रजी भाषा-विषयाचे अध्यापक, फर्ग्यूसन कॉलेज, पुणें.

यांनीं रचिलें.

किंमत ६ आणे.

---

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें

## वीरमणी आणि शृंगारसुंदरी.

महाकवि शेक्सपियरकृत अंटनी अँड क्लिओपाट्रा

या नाटकाच्या आधारें

**वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए.,**

**फर्ग्यूसन कालेजांतील इंग्रजी भाषाविषयाचे अध्यापक**

यांनीं रचिलेलें नाटक.

किंमत ०६ आणे ट. हं. ०१ आणा.

म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.

---

# विलायतचा प्रवास.

**भाग पहिला व दुसरा.**

एकदम घेणारास किंमत रु० १०१० ; ट० ख० ०३ आणे.

पुणें, आर्यभूषण छापखाना.

**विश्वास०**—हो हो अलबत,अलबत घेतल्या पाहिजेत ! आणि तसं करायला ज्यांत थोडीबहुत म्हणून तरी माणुसकी आहे असा कोणता मनुष्य नको ह्मणणार आहे ? मी तर ह्मणतों कीं अशा गोष्टींचा विचार अगदीं सगळ्यांच्या अगोदर अवश्य झाला पाहिजे.

**गोपिका०**—आणि माझंहि ह्मणणं तरी असंच, अगदीं असंच.

**भाऊ०**—हें पहा, सध्यांची मोहीम म्हटली ह्मणजे कांहीं निजामावर नाहीं, अथवा त्या सावनूरकरांवरहि नाहीं. गांठ आहे पंचाननाशीं ! आणि त्यांतून पल्ला तरी जवळचा असायचा होता; पण तशांतलाहि कांहीं प्रकार नाहीं. निजाम आणि कर्नाटक ह्मणजे आपल्या अगदीं टप्प्यांतले होऊन बसले आहेत ! तशांतला कांहीं हा प्रकार नाहीं. आणि त्यांतून विश्वास म्हणजे कांहीं मोठा आहे अशांतलाहि कांहीं भाग नाहीं. याच्या एवढ्या मुलाला तिथं नेऊन करायचं तरी काय ? उगीच आपल्याच जिवाला घोर लावून घ्यायचा कीं नाहीं ? त्यापेक्षां मला असं वाटतं कीं——

**विश्वास०**—"त्याला तूं जसं आणलं आहेस तसंच परत घेऊन जावंस हें बरं" असंच कीं नाहीं आपलं म्हणणं ? बोला बोला भाऊ आतां कां असे स्तब्ध ?

**भाऊ०**—हो हो असंच,असंच माझं म्हणणं.

**विश्वास०**—मग असं म्हणण्यापेक्षां मी तुला नेत नाहीं असंच कां एकदां साफ सांगून टाकाना ? काय, तर मग ह्मणे पंचाननाशीं गांठ ! वाः काय पण पंचानन ! पंचानन आणि बिंचानन ! जोंपर्यंत त्यानं ही माझी समशेर पाहिली नाहींन तोंपर्यंतच काय त्या त्याच्या सगळ्या गर्जना ! चालू देत; चालू देत ह्मणावं त्या हव्या तेवढ्या. काय या पंचाननाचीच काय एवढी मातबरी ! तो दहा तोंडांचा आणि वीस हातांचा रावण दशानन नव्हता काय ? त्याच्याहि अशाच वल्गना चालत होत्या; पण त्या कोठपर्यंत ? जोंपर्यंत त्या दाशरथी रामाची आणि त्याची गांठ पडली नव्हती तोंपर्यंत ! त्या रामाला त्या दशाननापेक्षां एखादं तोंड अधिक अथवा एखादा हात जास्ती, असं तर कांहीं नव्हतंना ? मग असेना. तो पंचानन असो का शतानन असो ! त्याची इतकी भीति ती कशाला पाहिजे ? भाऊ, तुह्मीच जर मला पंचाननाची भीति सांगूं लागलांत, तर झालें. मग सर्वच आटपलं ह्मणायचं. त्यांतून मी ह्मणजे केवळ श्राद्धं झोडणाऱ्या भटमंडळींच्या कुळांतच जन्मास आलों आहें असंही कांहीं नाहीं. "ही पेशवाईच जी मूळ संपादन केली ती आमच्या आजोबांनीं केवळ आपल्या पराक्रमाच्या, अकलेच्या, व कर्तबगारीच्या जोरावर संपादन केली" असं आजपर्यंत तुम्हीचना मला सांगत आलां ? रावबानीं आणि अप्पानीं तर मोंगलाशीं, निजामाशीं

व फिरंग्याशीं झुंजतां झुंजतां सर्व हिंदुस्थान आपल्या तलवारीच्या खणखणाटानं अगदीं दणदणून सोडलं होतं. असं अप्पांच्या तोंडून तर मी आजपर्यंत ऐकत आलों. नानानीं तर माझ्याहून सुद्धां लहान असतां स्वतः जातीनं तलवार धरून शत्रूवर चालून जावं, आणि तुम्ही खुद्द जातीनं लढून मोंगलांची यथास्थित कणीक तिंबवावी, आणि त्याच वंशांत उत्पन्न होऊन मी म्हणे भागूभाईसारख्या बांगड्या वालून पिंपळाला विरट्या वालीत स्वस्थ बसावं? हंः ( विचार केल्यासारखं करून ) प्रत्यक्ष चुलता, बाप, आजोबा, व पणजोबा हे सर्व मोठमोठे योद्धे, तलवारबहादूर, झुंजारराव, रणदिवे व कडक वीरव्रताचा मोठ्या अभिमानपूर्वक अंगिकार करणारे असावेत आणि त्याच कुळांत जन्मास येऊन त्यांच्या पुतण्यानं, त्यांच्या मुलानं, त्यांच्या नातवानं, व त्यांच्याच पणतवंडानं त्या वीरव्रताचा बेधडक त्याग करून एका हातांत पळीपंचपात्री व दुसऱ्या हातांत दर्भ आणि समिधांची जुडी घेऊन, खांद्यावर एक राजापुरी पंचाची वडी लटकून देऊन सपिंड-शिटेदारी पत्करावी ! असं का तुमचं म्हणणं ? असं असेल तर तसं सांगा तरी एकदां.

भाऊ०—अरे पण पल्ला तरी लांब आहेना ? आणि त्यांतून तूंही—

विश्वास०—हं “ पल्ला तरी लांब आहेना ?” दादासाहेब सिंधूनदीला तर दोन वेळ आपल्या घोड्याला पाणी पाजून आले ! आणि अजूनहि “ लांबचा पल्ला, लांबचा पल्ला ” ह्मणण्यांत काय अर्थ ! आतां मी लहान आहें असं आपण ह्मणत असाल तर १८ वर्षांचा मुलगा ह्मणजे वास्तविक पाहतां कांहीं लहान नव्हे. आणि त्यांतून मी ह्मणजे कोठें एकटाच जातों आहे असंहि कांहीं नाहीं. आतां माझ्यासंबंधानं “ आपल्या जिवाला मात्र व्यर्थ घोर ” असं जें आपण ह्मणालांत त्यास मी होऊन कांहीं आपल्याला घोरांत ह्मणून बिलकुल पडूं देणार नाहीं. हें आपलं खचीत !

भाऊ०—विश्वासा, याबद्दल तर मला पूर्ण विश्वास आहे. आणि खरं पुसशील तर माझ्या जिवाचा विश्वास काय तो तूंच !

गोपिका०—असं जर असेल तर मग त्याला सोडून येथवर कसं येणं झालं ? बाळा विश्वासा ! तुला जर वडिलांचं नांव राखायचं असेल तर तूं भावोजींबरोबर जाऊन एकदां येच आपली तलवार गाजवून ! भावोजी, तुलांला नाहीं का स्मरण, कीं याच्याच खेपेला मला कांहीं महिने झाले असतांना मला असं वाटे कीं, आपण दांडपट्टा शिकावा, हातीं तलवार घेऊन चढत्या घोड्यानिशीं एकदम शत्रूवर चालून जावं; वर छत्रचामरं झळकत आहेत अशा रत्नजडित सिंहासनावर जाऊन बसावं. असे एक

आणि दोन नानाप्रकारचे डोहळे त्या खेपेनं मला होत असत.

भाऊ०—होय. वहिनी मी जरी त्यावेळेस लहानच होतों तरी तें मला पक्कं पक्कं स्मरतं. कोणाला ठाउक (आपल्याशीं) कोणाचं नशीब कोणाला अगोदर दिसलंय थोडंच? याच्याच नशिबीं तीं छत्रचामरं नसतील ह्मणून तरी कशावरून समजायचं?

विश्वास०—तें कांहींहि असो. काका, मी जो इथं आलों आहें तो अगदीं योग्य विचार करून व नानांचीहि पण सल्ला घेऊनच आलों आहें. परत माघारी जाण्याकरितां कांहीं आलों नाहीं, हें मात्र अगदीं खास. आणि आपण इकडं येतांना "मी येतों" ह्मणून देखील जें आपल्याला ह्मटलं नाहीं तेंहि पण एवढ्याचकरितां. तुमच्याबरोबर येऊन माझी ही नकशीदार नवी समशेर (तलवारीस हात घालतो) एकदां कशी काय चालते तें एकदां मला पहावयाचंच आहे. तर मग आई तूं जा आतां. तूं केलंसना मला एकदां भाऊंच्या स्वाधीन! मग कां? आतां कशाला तुला माझी काळजी करायला हवी? जा तूं, जा परत आतां आली आहेस त्याच मेण्यांतून, आमचं जें काय होणं असेल तें होईल. जें काय भाऊंचं होईल तेंच माझं. आणि माझं होईल तेंच भाऊंचं! याशिवाय दुसरा विचार ह्मणून नाहीं.

भाऊ०—(आपल्याशीं) विश्वासा! खरोखरच तूं माझा श्वास आहेस! तूं माझ्या जिवाचा विश्वास आहेस. तुझं नांव सुद्धांहि पण कसं अगदीं तसंच! काय तरी तुझा हा कट्टा निश्चय आणि किती तरी तुझा हा गंभीर बाणेदारपणा! (विचार बदलून) तरी पण याचं जरा अवसान पाहूंच. (मोठ्यानें) पण हें पहा विश्वासा, हा तुझा बाणेदारपणा व हा तुझा कट्टा निश्चय त्या कृतांतस्वरूपी यमदूत मृत्यूपुढें सर्व लटपटेल! आह्मी जे घराच्या बाहेर पडलों ते अगोदर स्वर्गासच जाण्याचं प्रस्थान काढून ठेवून निघालों. आणि हें शरीर जरी सध्यां तुला या धडावर उभं आहे असं दिसत आहे तरी वस्तुतः पाहतां तें आह्मीं अगोदरच आमच्या हातांत घेऊन शत्रूवर चालून जात आहों. त्याबद्दल आह्मी अगदीं बेफिकीर आहों. याचा मात्र कायतो तुझा तूं विचार कर. नाहीं तर मागून मात्र व्यर्थ पस्तावशील!

विश्वास०—भाऊ! तुह्मांला एकदां सांगितलंना कीं मी जो एकदां निघालों आहें तो पुरता विचार करून निघालों आहें ह्मणून. जी तुमची गत तीच माझी गत. असं असतां, "नीट विचार कर. नाहीं तर मागून पस्तावशील" असं म्हणण्यांत काय अर्थ? कृतांतस्वरूपीं यमदूतच नव्हे, पण प्रत्यक्ष कृतांतकालहि जरी आला, तरी त्यालाहि या समशेरीनें-या नंग्या समशेरीनं इथं इथं लोळवून सोडीन!

मग त्या मृत्यूचं तें मला इतकं भय काय सांगतां ? मृत्युच काय पण प्रत्यक्ष मूर्तिमंत "मृत्युंजय" जरी माझ्यापुढें येऊन उभा राहिला तरी त्याच्याहि जबड्यांत ही (कमरेचे कट्यारीस हात घालतो) कट्यार अश्शी अश्शी भोंसकीन ? (कट्यार कनाथींत शिरते.)

इतक्यांत पार्वतीबाई लक्ष्मीस घेऊन किंचित् पुढें येते.

भाऊ०—(त्यांस पाहून चकित होऊन) हं, पण ही कोण हिच्याबरोबर. (लक्ष्मी पुढें होऊन नमस्कार करिते) अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव (बारीक स्वरानें) वहिनी, लक्ष्मीलाहि पण का घेऊन आलांत.

गोपिका०—होय, तिचाहि विश्वासाबरोबरच जाण्याचा निश्चय दिसला. आणि मींहि मग ह्मटलं कीं पार्वती जाते आहे. जाईना कां तिच्याबरोबर. काय झालं गेली ह्मणून ? मी तरी कशाला उगीच दोघांच्या इच्छेविरुद्ध येऊं?

सेवक येतो.

सेवक—रावसाब, आग ! आग !

भाऊ०—(घाबऱ्या घाबऱ्या) अरे कुठें ? असा घाबरुं नकोस. बोल नीट बोल. कुठें, कुठेंशी लागली आहे आग !

सेवक—हुजरातीच्या डाव्या हातच्या कोंपऱ्यास त्या नरसिंगराव बांड्यांचीं पथकं उतरलीं आहेत कीं नाहींत त्या सुमारास लागली असल्याबद्दल एकच आफवा उठून सर्वत्र एकच धांवपळ होऊन गेली आहे.

भाऊ०—क... आहेरे बाहेर ? हैबत्या ! अरे हैबत्या. (हैबत्या येतो.) एखाद्या मशालजीला बोलाव पाहूं, चल ये ह्मणावं झटदिशीं मशाल पेटवून घेऊन. बरं तर वहिनी (नमस्कार करून) मी जातों आतां. आगबिग कितपत लागली आहे तें मला स्वतः जाऊन पाह्मलं पाहिजे. येऊं तर मग मी. तुह्मी मात्र नीट संभाळून जा हां. पुण्यास जायला तुह्मी सर्व उद्यांच निवणारना ? (लक्ष्मीस पाहून) हिला तर मग तुह्मी आमच्याबरोबरच लाऊन देणार ? बरं जशी तुमची मर्जी.

सेवक—सरकार, हा आला मशालजी.

भाऊ०—बरं तर मी येतोंच आतां.

जातात.

गोपिका०—पार्वती, आतां या दोघांचा संभाळ करणं सगळं तुजकडेच आहे. तूं जवळ असलीस ह्मणजे मला कांहीं यांची काळजी नाहीं ह्मणा ! परंतु आपलं हे वेडं मन आहेना ! (लक्ष्मीस) मुली नीट जपून ऐस हां. पार्वती जसं सांगेल तसं ऐकत जा. समजलीस. विश्वासा, तुला सोडून जाणं ह्मणजे कसं अगदीं माझ्या जिवावर आलं आहे; परंतु काय करायचं ? वेळ येईल तशी पाठ दिली पाहिजे. तरी पण भावोजी आहेत व पार्वती आहे ह्मणून तुझ्याबद्दल मला इतकी काळजी वाटत नाहीं. आणि त्यांतून तुला गळ्यांत बांधून घेऊन बसण्याचेहि हे दिवस नव्हेत. तूं आपल्या पराक्रमानं त्या दुराणीचा कीं फिराणीचा पराभव करून विजयी होऊन मला एकदां केव्हां येऊन भेटशील, असं

मला झालं आहे! मामंजींचं नांव जसं सगळ्यांच्या तोंडीं झालं आहे तसं तुझं व्हावं आणि तें मीं या माझ्या कानानीं ऐकावं एवढीच माझी इच्छा आहे. मात्र उगीच एखादं साहस करून आपला जीव मात्र धोक्यांतबिक्यांत घालून घेऊं नको. समजलास. तुजकडे किती पाहिलं तरी बाळा तृप्ती म्हणून होत नाहींरे!

**विश्वास०**—आई, एवढीचना तुझी इच्छा? नानांच्या आणि तुझ्या आशिर्वादानं मी आणि भाऊ गिलच्यांची गठडी वळून लवकरच तुम्हांला परत नमस्कार करायला येऊं. त्याबद्दल तूं अगदीं बेफिकीर ऐस. माझ्याबद्दल तुला काळजी करण्याचं बिलकुल कारण नाहीं! आजपर्यंत तूं लोकांच्याकडून "वीरस्नुषा" "वीरपत्नी" असं आपल्याला ह्मणवून घेतलंस. आतां यापुढें तुजकडे लोकांनीं "वीरमाता" ह्मणून बोटं दाखवावींत असं कांहीं तरी मला केलं पाहिजे! त्याशिवाय सर्व व्यर्थ! लोकांनीं "हा खरोखर वीराचा बच्चा आहे" असं म्हणावं हीच कायती माझी सर्वांत मोठी उमेद आहे. याशिवाय मला दुसरी उमेद नाहीं, इच्छा नाहीं, कीं आशा नाहीं. तरच तुझ्यासारख्या मातेचं दूध प्यायल्याचं सार्थक! नाहीं. नाहीं. मला आतां जास्त बोलवत नाहीं! आई तूं ये आतां. नको, नकोच राहूं इथं. तूं इथं राहिलीस ह्मणजे व्यर्थ मोह मात्र जास्त उत्पन्न होतो. (नमस्कार करून) ये. ये बरं तर. (हुंदके येतात. कंठ दाटतो.)

**गोपिका०**—बाळा विश्वासा, तुझ्या विश्वासावर, तूं दिलेल्या आश्वासनांवर आजपासून दिवस कंठायचे! समजलास? झाली. दिवस मोजण्याला ही आत्तांपासून सुरुवात झाली म्हणायची! पहिला, दुसरा, तिसरा असे एकेक दिवस मोजतां मोजतां हा मोजण्याचा त्रास कधीं संपेल तो संपो. नाहीं, नाहीं, खचीत नाहीं! आतां आजपासून रात्रींची झोंप नाहीं! गेली, गेलीच ती. (विश्वासाच्या तोंडावरून व पाठीवरून हात फिरवून.)

**सेवक**—मेणा तयार आहे.

**गोपिका०**—येतें बरं तर (डोळ्यास पाणी येतें, पदर लावून) पार्वती, नीट जपत असा बरं. (विश्वासास) वरचेवर इकडची बातमी कळवीत जा. व्यर्थ आम्हांला काळजींत मात्र ठेवूं नका. समजलं.

**विश्वास०**—(नमस्कार करून) आई ये बरं. नानांच्याकडूनहि वरचेवर पत्रं लिहवीत जा. ये, संभाळून ये. जास्त काय सांगूं.

(जातात.)

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ—मु० कुवारीनदी टोलपूर व अटेरी घाट यांचे दरम्यान.

भाऊसाहेब, बळवंतराव, विश्वासराव.

**भाऊ०**—पण काय हो, अजूनहि ज्याअर्थी हलकारे येत नाहींत त्याअर्थी याचा अर्थ तरी काय समजायचा?

बळ०–अर्थ ! याचा अर्थ तर अगदीं उघड आहे ! पहिल्या पत्राच्या उत्तरावरूनच सगळा अर्थ स्पष्ट होऊन गेला आहे. आतां अर्थ समजण्याचा तो काय राहिला आहे ? काय ह्मणे "ज्यांनीं आपणास येण्याचा मनसबा दिला ते थोर आहेत" वाः खाशी ! एकंदरींत सुभेदारांनीं "थोरपणाची व्याख्या बरीच केली ह्मणायची !" "थोरपणा आणि लहानपणा" यांची वस्त्रं देण्याचा अधिकार सुभेदारांनीं संपादिला तरी कधीं ? त्यांनीं हा छत्रपतीकडून संपादला अथवा दिल्लीपतीकडून संपादला ! संपादला तरी कोणाकडून ?

विश्वास०–तें कांहीं असो ! तुम्ही त्याचा असा विपरीत अर्थ काय ह्मणून करितां ? काका असं स्पष्ट लिहितातना कीं, दुराणी कांहीं सामान्य नाहीं. तर माळवे प्रांतीं छावणी करावी. व्यर्थ मोहरा इरेस पाडण्याचे नादीं लागूं नये.

बळ०–रावसाहेब ! एकदां तुम्हांला सांगितलंना कीं तुह्मी अजून लहान आहांत ह्मणून. तुम्हांला या तुमच्या काकाचं धोरण आणि पेंचपाच काय माहीत ? मनुष्य काय आणि इतर पदार्थ काय, ते जसे बाहेरून स्वच्छ व चकचकित दिसतात तसेच जर ते आंतून असतील तर मग आणखी काय पाहिजे होतं ? "दुराणी कांहीं सामान्य नाहीं" इतकं सांगून प्रथमतःच त्याचा मोठा बागुलबोवा करून ठेवायचा. आणि सुजाउद्दौला, अहमदखान लंगडा, व रोहिला हे त्याच्या मदतीस आहेत असं सांगून या बागुलबोवाच्या डोक्यावर एक मोठी थोरली खोळ चढवून द्यावयाची, ह्मणजे झालं. बागुलबोवाचा खवीस बनला ! मग तो तुमच्या आमच्या मानगुटीवर बसायला आलाच ह्मणून समजा ! ही तुमच्या काकांची अजब युक्ति, ही सुभेदारसाहेबांची सुभेदारी ! काय ह्मणे "मोहरा इरेस पाडावा असा अर्थ नाहीं." यांतला अर्थ तुह्मांला तर नाहींच कळणार ! परंतु तो भाऊसाहेबांना तरी कळला असेल कीं नाहीं याची मला शंकाच वाटते ! या काकांचे, या सुभेदारांचे दाखवायचे दांत एक व खावयाचे निराळे ! इकडे तर "मोहऱ्या" बद्दल वरून अगदीं अगदीं पुरी काळजी दाखवायची ! आणि आंतून यांच्यापुढें आपलं तेज फिकं पडेल ह्मणून त्यांनीं न यावं ह्मणून प्रयत्न चालू ठेवायचे ! या कसबाला काय ह्मणायचं ? हें कसब शिकायला बरंच अध्ययन लागतं, तें भाऊसाहेबांच्यासारख्या भोळ्या व सरळ स्वभावाच्या मनुष्याला अथवा तुमच्या वयाच्या मंडळीस खचीतच लवकर समजणार सुद्धां नाहीं ! आजपर्यंत सुभेदारसाहेबांनीं इकडे हवी तशी चंमन मारली, हवं तसं सुख अनुभवलं, काय हवें तें केलं, त्यास आह्मी आल्यानं थोडाबहुत खंड हा पडणारच. ज्या आपल्या पायांपुढें इतर मंडलि-

कांनीं नमावं त्या आपल्यास पेशव्यांच्या पायांशीं नमावं लागणार हीच कल्पना सुभेदारांच्या मनांत खात असेल! दुसरं काय? मला तर असं वाटतं कीं, सुभेदारांची ही केवळ दबवणी आहे. काय, भाऊसाहेब, तुम्हाला कसं काय वाटतं? आपला दरारा म्हणजे सामान्य आहे असं का तुम्हांला वाटतं? मग "गिलच्या" च्या नांवालाच इतकं भिऊन काय उपयोगी? मला तर असं वाटतं कीं, ठाव काढीत काढीत एकदां दिल्ली जाऊन गांठावीच. कसं झालं तरी आपणास शिरंज व भिलाश सोडून इथं आल्याला १५।१६ दिवस तरी सहज होत आले. आणि इथं आल्या दिवशींच कोणच्या वाटें यावं म्हणून सुभेदारांस आपण पत्रं लिहिलीं आणि अजूनहि ज्याअर्थीं त्यांजकडून उत्तर येत नाहीं त्याअर्थीं त्यांचा मनसबा काय तो कळलाच ह्मणायचा.

भाऊ०—त्यांच्या इच्छेविरुद्ध आपण वागलों म्हणून त्यांस कदाचित् राग आला असेल. "माळवेप्रांतीं छावणी करून सडी फौज मात्र पुढें रवाना करावी" हें त्यांचं ह्मणणं बाजूस ठेवून ज्याअर्थीं आपण इथवर आलों त्याअर्थीं सुभेदारसाहेब रागावले असतील हेंच खचीत!

विश्वास०—मला सुद्धां असंच वाटतं. कारण काका स्वभावानं अंमळ आहेत तापटच. अंमळ का पुष्कळच म्हटलं तरी सुद्धां चालेल. मागं ते एकदां पुण्यास आले होते कीं नाहीं त्या वेळेस ते भाऊंच्यावर जे कांहीं रागावले ते कांहीं पुसूंच नका! त्यावेळेस मी अगदीं लहान होतों. कशाकरितां रागावले होते तें कांहीं मला त्या वेळीं समजलं नाहीं म्हणा; परंतु मागून सगळं समजलं. कीं वसुलाच्या संबंधाची कीं कर्जाच्या संबंधाची कसलीशी ती भानगड होती. आणि मग जे कांहीं त्यांनीं आमच्या वाड्यापुढें रुपयांच्या थैल्यांचे छकडे आणून उभे केले ते कांहीं पुसूंच नका. छकड्यांची अशी कांहीं एकसारखी रांग लागून राहिली होती कीं मी आणि माधव माडीवरील त्या सज्जाच्या खिडकींतून छकडे किती आहेत ह्मणून मोजून पहात होतों; मध्येंच एखादा चुकावा, आणखी मग आह्मी पुनः आपलं पहिल्यापासून मोजूं लागावं. (विचार बदलून) पण इथून तिथून सारी तापट मंडळी म्हटली म्हणजे अंतःकरणाची फार कोमळ असतात. त्यांना डावपेंच वगैरे कांहींएक माहीत नसून ते आपल्यास जें म्हणून कांहीं रास्त दिसत असेल तेंच करतात. त्यांच्या हातून कोणाच्या अकल्याणाची अशी गोष्ट सहसा घडायची नाहीं. आणि असली तापट मंडळी भडभडीहि असलीच पाहिजे. त्यांच्या मनांत कांहीं राहायचं नाहीं. काय असेल नसेल तें ते तेव्हांच ओकून——

(इतक्यांत हलकारे येतात.)

भाऊ० -थांब; पण हा कोण येत आहे ? ( मोठ्यानें ) कोण आहेरे?

सेवक—जी मी सरकार! बाहेर होळकराकडील पत्रं घेऊन हलकारे आले आहेत त्यांस आंत घेऊन येऊं का ?

भाऊ०-हो हो, येऊं दे त्यांना आंत. ( बाहेर पाहिल्यासारखं करून ) पण हे आणखी समोरून येत आहेत हे कोण ?

बळ०—( निरखून पाहून ) मला वाटतं हे विठ्ठलराव असावेत.

भाऊ०-वाः अगदीं वेळेवरच आले म्हणायचें ! या, या विठ्ठलराव.

हल०—( मुजरा करून पत्रें पुढें ठेवतात. )

भाऊ०-कां तुह्मांला इतका उशीर कां झाला यायला ?

हल०—सुभेदारसाबांच मुक्काम हतून थत अन थतून हत व्हत म्हूनशानी लई गोत खाव लागल्याती. अन् म्हूनशनीच इक्त दीस लागल.

भाऊ०—पण सुभेदार व धाकटे पाटीलबोवा खुशाल आहेतना ! ( पत्र फोडनात. )

हल०-व्हय सरकार.

भाऊ०-( पत्र वाचतात ) ( वरचें सोडून देऊन वाचतात. )

“ विनंती सेवक मल्हारी होळकर कृ-
“ तानेक विज्ञापना. सेवकाचें वर्तमान
“ ता. छ. २५ जिल्हेजपर्यंत जीव
“ बचावून असो विशेष आज्ञापत्र छ.
“ ९ जिल्हेजचें पाठविलें तें छ० २३
“ मिनहूस पावलें. आतां इकडील म-
“ जकूर. आपण ढोलपूरचे घांटें उ-
“ तरावें किंवा अटेरीचे घांटें उतरावें
“ याचा निश्चय करून कळवावें, ह्मणून
“ लिहिलें. त्यास आमचा सल्ला आप-
“ ल्यास मानवत नाहींसा दिसतो. मा-
“ गच्या पत्रीं आपल्यास माळवे प्रांतीं-
“ च छावणी देऊन रहावें म्हणून लि-
“ हिलें होतें. तें आपल्यास मानवलें
“ नाहीं असें दिसतें. नाहीं तर शि-
“ रंजहून टोलपूरनजीक येण्याचें का-
“ रण काय ? पुढें सडी फौज पाठवून
“ द्यावी म्हणून लिहिलें तीहि न पाठि-
“ वली ! आणि मोहरा इरेस घालूं
“ नये ह्मणून ह्मणत असतां तेंहि ऐ-
“ किलें नाहीं ! बरोबर आहे !
“ आह्मी आतां ह्मातारे झालों. आ-
“ मची साठीची बुद्धि नाटी झाली !
“ आजपर्यंत जें जें आह्मीं केलें तें तें सर्व
“ साहेबांच्या अनहिताचेंच केलें एकून!
“ आपल्याभोंवतीं नव्या दमाचे, नव्या
“ वयाचे व नव्या कडाचे, अगदीं तर-
“ णे बांड जसे कांहीं देवाला वाहिलेले
“ पोळच असे मोठमोठे वीर, महावीर,
“ रथी, महारथी, मुत्सद्दी, मसलतगार,
“ मनसबा सांगणारे व सल्ला देणारे, ए-
“ काहून एक वरचढ अशा जोड्या
“ आपल्यास मिळाल्या आहेत त्याच
“ काय त्या आपल्या हिताच्या, तेच
“ आपले हितचिंतक आणि आह्मी मा-
“ त्र सर्वस्वी अहितचिंतक ! ठीक आ
“ हे तर आतां सर्व मिळून स्वहित क-
“ रावें ! बाळाजीपंतनानाबरोबर, रा-
“ ऊबरोबर, आंग्र्याबरोबर, मोहिमेंत
“ जाऊन प्रसंगविशेषीं जी सुचली ती

" सल्लामसलत देऊन आजपर्यंत कशीं
" बशीं ४०।४५ वर्षें काढलीं. त्यांतच
" या माझ्या दाढीचे केंस काळे होते
" ते पांढरे होऊन गेले. दुसरे कशाला
" नाहीं तर नाहीं, पण या माझ्या पि-
" कलेल्या दाढीकडे पाहून तरी कांहीं
" वचका; तिचा तरी कांहीं मान राखा!
" जास्त काय लिहावें. आतांपर्यंत झालें
" तें ठीकच झालें. याउप्पर तरी चमेली-
" चे पार होऊन ग्वाल्हेरीनजीक छा-
" वणी करावी. गिलच्या अंतर्वेदप्रां-
" तीं छावणी करून राहिला आहे.
" आपल्या आणि त्याच्यामध्यें काय
" ती एक यमुनाच राहिली आहे. ह्मणू-
" नच ह्मणत होतों कीं, मोहरा इरेस
" न पाडावा. दोन घरें मागेंच असले-
" ला बरा. हें मीं कळवावें असें नाहीं.
" तर आतां तरी साहेबीं पुढें न येतां
" आमच्या कुमकेस फक्त फौजा मात्र
" पाठवाव्यात. धन्याचे नांवावरच आ-
" ह्मीं दुराणीकडील कार्य उरकून घे-
" तों. खांसा स्वारी आलियानें आब
" जातो. यापेक्षां जास्त लिहितां येत
" नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."
कां बळवंतराव, काय विठ्ठलराव, कसं काय? ऐकलंत एकदां सुभेदारसाहेबांचं पत्र. काय, मग काय विचार? पुढें कसं काय करायचं? तुह्मांला कसं काय वाटतं?

बळ०—मला कसं काय वाटतं ह्मणतां? माझं मत जर ह्मणाल तर मजल दरमजल करून थेट दिल्लीस जाऊन पोंचावं हा सर्वांत उत्तम मार्ग!

भाऊ०—बरं, पण विठ्ठलराव तुमचं मत कसं काय?

विठ्ठल०—माझं जर मत ह्मणाल तर तें बळवंतरावांच्या अगदीं विरुद्ध आहे. कोणतीहि गोष्ट करण्यापूर्वी तिचा नीट पोक्तपणानं विचार केला पाहिजे.

बळ०—ह्मणजे? आह्मीं जो विचार केला तो सारा पोरकटपणानंच केला आहे तर मग?

विठ्ठल०—असं ह्मणण्याचा कांहीं माझा बिलकुल आशय नाहीं. माझा आशय ह्मणून इतकाच कीं, आपल्याबरोबर बायकामुलं आहेत. खाशांचे कबिले, (बळवंतरावाकडे तोंड करून) आपल्या-इथली मंडळी, फडणीस, जनार्दनपंत यांच्या मातोश्री, पायगुडे यांचं कुटुंब, आणखी कितीएक लहान थोर सरदार यांचीं कुटुंबं, समागमे आहेत. आपल्या-बरोबर जाणं निर्भय ह्मणून काशीस जाण्याच्या उद्देशानंहि त्यांत कांहीं मंडळी आली आहेत. असं असून दुराणीसारखा भारी शत्रु अगदीं अंगावर! तर या सगळ्या गोष्टींचा योग्य शांतपणानं विचार करितां मला असं वाटतं कीं "सुभेदार मल्हारराव" यांनीं लिहिल्याप्रमाणें परत चमेलीपार होऊन ग्वालेरीजवळ छावणी करावी, हा प्रशस्त मार्ग.

बळ०—विठ्ठलराव यांनीं सांगितलेला विचार फार पोक्त असून त्यांत त्यांनीं

आपलं दूरदर्शित्वहि बरंच व्यक्त केलं आहे म्हणायचं ! एकीकडे शत्रु प्रबल आहे ह्मणावयाचं व त्याच्याच खालीं दुसरीकडे "आपणास येण्याचें कारण नाहीं; चमेलीपार होऊन ग्वाल्हेरीजवळ छावणी द्या" ह्मणून विनंती-विनंती कसची ? हुकूम करायचा ! कायहो, या दोन गोष्टी एकमेकींच्या अगदीं विरुद्ध नाहींत का ? शत्रु भारी आहे ह्मणून आह्मी यांच्या साह्यास जातों, तर यांनीं आम्हांस येऊं नका ह्मणावं, आणि विठ्ठलरावांच्यासारख्या पोक्त मुत्सद्यांनीं त्यांच्या ह्मणण्यास रुकार द्यावा; यांत यांचा कांहीं तरी अंतस्थ हेतु खचित असला पाहिजे !

**विश्वास०**—मला तर कांहीं यांत कोणाचा कांहीं हेतु असेलसं दिसत नाहीं. आपण सुभेदारांच्या सल्ल्याप्रमाणं वागलों नाहीं याबद्दल त्यांस खूप राग आला असावा, हें अगदीं उघड आहे. व हें त्यांच्या पत्रावरून व्यक्तहि होतंच. तरी देखील त्यावरून त्यांचा निस्पृहपणा कसा अगदीं ठळठळीत दिसून येतो.

**बळ०**—विश्वासराव ! एकदां सांगितलंना तुम्हांला, कीं तुम्हीं अजून लहान आहांत, तुम्हाला यांतल्या खांचाखोंचा लवकर कळावयाच्या नाहींत ह्मणून ! ( पत्र हातीं घेऊन ) अहो, हें पत्रच पहा आतां प्रत्यक्ष, फार लांब नको:—काय ह्मणे ? "आपल्याभोंवतीं नव्या दमाचे, नव्या वयाचे, नव्या कडाचे, अगदीं तरणे बांड, जसे कांहीं खस्सी न करितां देवाला वाहिलेले पोळच, असे वीर, महावीर, रथी, महारथी, मिळाले आहेत." यावरून काय होतं बरं ? सुभेदारसाहेबांस आमचा नवा ताजा दम, आमचा तरुणपणाचा हुरूप हे पाहवत नाहींत, असं नाहीं का स्पष्ट होत. ह्मणे "अगदीं तरणे बांड जसे कांहीं देवाला वाहिलेले पोळच." एकंदरींत तुमच्या त्या भोळ्या सुभेदार शंकरानं आह्मां सर्वांस बैल-नंदी करून सोडलंन एकून ! ( भाऊसाहेबांस ) कां उगीच कां ? विठ्ठलराव बोला आतां ! आतां कां उगीच बसतां ? होय, खरंच; वास्तविक पाहतां आमचा मर्दपणा आणि आमची ज्वानी या थेरड्या मल्हारीबोवांस आतां यावी कशी ? होय, आह्मी देवाला खस्सी न करितां वाहिलेले पोळ ! आणि यांचे × × काय अगदीं खस्सी करून टाकले आहेत वाटतं ? हें काय लिहणं कीं काय ? आणि ह्मणे "माझ्या या पांढऱ्या दाढीकडे पाहून तरी कांहीं माझा मान राखा !" अगोदर आपण दुसऱ्याचा मान राखावा ह्मणजे मग अर्थातच दुसरे आपला राखतात. हें येवढंसुद्धां या बुढ्याला—या पांढऱ्या दाढीच्या बुढ्या सुभेदाराला—अजून कळूं नये ह्मणजे मोठं नवल म्हणायचं ! आणि ह्मणे "आमची साठीची बुध्दी नाठी झाली." हो हो, खरंच यावरून तर असं स्पष्ट दिसतं कीं, सुभेदारांना एक

म्हातारचळ तरी लागला असला पाहिजे; अथवा दुसरं त्यांना इकडे येऊन आजपर्यंत लागेल तसं यथास्थित चरायला सांपडलं असल्यामुळं ते अतिशय उन्मत्त झाले असून आह्मी आल्याचं त्यांस बघवत तरी नसलं पाहिजे. हें कांहीं केवळ तापटपणानं मनास आलं तें त्यांनीं अगदीं निस्पृहतेनं लिहिलं आहे असं कांहीं नाहीं, हें खचित! यांत गर्वोक्ति आहे, कावा आहे, उन्मत्तपणा आहे, सर्व कांहीं आहे! निस्पृहतेचा डौल घालून दुसऱ्यावर वाटेल तसं तोंड सोडणं कधींहि रास्त होणार नाहीं! ज्याचा त्याला कांहीं मान म्हणून आहेच. व तो तसा असणं हेंहि पण अगदीं रास्त आहे. तर या गोष्टीचा कांहींएक विचार न करितां सरसकट सगळ्यांना खस्सी न केलेले बैल ह्मणणं, देवाला वाहिलेले पोळ ह्मणणं ह्मणजे हा कांहीं लहानसान उपमर्द अथवा अपमान खचित नव्हे! "चमेलीपार होऊन ग्वाल्हेरीनजीक छावणी करून रहा" हें त्यांना अन्य सभ्यतऱ्हेनं, आह्मी ऐकूं अशा रीतीनं सांगतां आलं नसतं असं कांहीं नाहीं. असो; झालं तें झालं. माझ्या मतानं तरी सुभेदारांना प्रस्तुतचा सल्ला व त्यास विठ्ठलरावांसारख्या मुत्सद्यांचं अनुमत हीं दोन्हीहि अगदीं चुकीचीं, अविचाराचीं, व अपोक्तबुद्धीचीं दिसतात. आपण येथपर्यंत आलों काय, आणि आतां परत माळव्यांत जाऊन छावणी करित आहों काय? एवढ्यावरूनच हे गिलच्याची खस्त खाऊन माघारे गेले असं होऊन व्यर्थ बदलौकिक मात्र व्हावयाचा! व सुभेदार ह्मणतात त्याप्रमाणं आपला आब रहावयाचा तो न राहून उलट कांहीं असेल नसेल तो नाहींसा मात्र व्हावयाचा. सुभेदारांना ह्मणावं आजपर्यंत तुमची होती नव्हती तेवढी सगळी अक्कल कामास आल्यामुळं आतां बाकी शिल्लक कांहीं उरली नाहीं! थोडीबहुत उरलीच असल्यास तिच्यांत जोम ह्मणून बिलकुल नाहीं राहिला आतां! वसंतऋतूंत मंद मंद वायू सुटूं लागून झाडांना नवीन नवीन पल्लव फुटूं लागले ह्मणजे जीर्ण झालेलीं पिवळींधमक पिकलेलीं पानं–ज्यांना मेंदू नाहीं, अक्कल नाहीं, बुद्धि नाहीं, डोकं नाहीं, कांहीं एक नाहीं–तीं सुद्धां मुकाट्यानं गळून पडून नव्या दमाच्या, नव्या बहाराच्या पल्लवांना जागा देतात. असा जर सृष्टिक्रम आहे तर त्याच्या उलट जाण्यांत काय अर्थ? ह्या पिकलेल्या पानांनीं झाडांतून वाहणाऱ्या हिरव्या रसाचं सेवन करून आपणच पूर्ववत् हिरवेगार होऊन जाण्याचा विचार मांडला तर त्यांना तो कितपत साध्य होईल? तसंच आपल्या अंगांतील ज्वानी नाहींशी झाली, आपल्या शरीरावर एकहि काळा केंस उरला नाहीं ह्मणून दुसऱ्याला व्यर्थ शिव्या देत राहिल्यानें ती आपल्या अंगीं येते कीं काय? वयावर व पांढऱ्या दाढीवरच जर मन-

सबा आणि सल्लामसलत असती तर आमच्या आजोबांच्या वेळचा १७ वर्षांचा एक चांगला उत्तम कारागिर, त्याचं नांव ह्मटलं ह्मणजे—(विचार करून) हँ 'तान्हबा, तान्हबाच!' अज्जून अज्जून जिवंत आहे तो. त्याला जरी मग "सल्लामसलतगार बहाद्दर" असा एखादा किताब देऊन आणलं असतं तरीहि बरंच झालं असतं ह्मणायचं!! असो; जास्त बोलण्यांत काय फायदा? माझा मनसबा ह्मणाल तर दिल्ली जाऊन गांठावी हाच! (ओंठ चावून आपल्याशीं) नाहीं. पण पुर्ती शहानिशा केल्याशिवाय ही बातमी जर मी बाहेर फोडीन तर विचारा ह्मातारा उद्यांचा आजच आपल्या अन्नाला व तसाच आपल्या प्राणालाहि व्यर्थ मुकेल! नाहीं पण ह्या गोष्टीची पक्की बित्तंबातमी कळल्याशिवाय तिच्यासंबंधानं एक सुद्धां वाफ बाहेर जाऊं देणं कांहीं रास्त नव्हे. जरी ती मला इतक्या विश्वसनीय मार्गानं कळली आहे, व जी खोटी ठरण्याचा जरी यत्किंचितहि संभव नाहीं तरी देखील ती बाहेर फोडणं, अथवा सहजगत्या चुकीनं आपल्याकडून फुटूं देणं हेंहि कांहीं रास्त नव्हे! त्यावरून जनकोजी शिंद्याची निःसीम स्वामिभक्ती व त्याचं इमानाला जागणं हीं दोन मात्र चांगलीं व्यक्त होतात ह्मणायचीं. तर स्वारींत त्याची गांठ पडल्यास त्यास एकांतीं गांठून त्याजकडूनच या गोष्टीचा शहानिशा करून घ्यावा ह्मणजे झालं.

भाऊ०—मलाहि असंच वाटतं कीं परत जाऊन आपला आब वालविण्यापेक्षां एकदां दिल्ली गांठली तर बरं! (विठ्ठल शिवदेव आहेत असें पाहून) आणि नानांची आज्ञाहि अशीच आहे.

विठ्ठल०—श्रीमंतांची आज्ञा अशीच असेल व आपलंहि मत जर असंच असेल तर मग आमचा कांहीं उपाय नाहीं. एरवीं इथून पुढं जाण्याला आमचं स्वतःचं ह्मणाल तर कांहीं अनुमोदन नाहीं आणि जाणंहि कांहीं इष्ट दिसत नाहीं. जाणंच तर चलावं.

बळ०—होय, बरोबर आहे. जाण्यास तुमचं अनुमोदन नसण्याचं कारण मी समजलों. सुभेदार, पाटील, अंताजी माणकेश्वर, नारो शंकर, गोविंदपंत बुंदेले व आपण या सर्वांनां जर आमचं येणंच इष्ट नाहीं तर तुमच्याकडून येथून पुढं जाण्याचं अनुमोदन तरी कोठून मिळणार? असो, "जाणंच तर चलावं" ह्मणून आपण सांगितलंच. यावरून तुह्मांला येणं परवडत नाहीं हें स्पष्टच झालं.

विठ्ठल०—अशा तऱ्हेचे शब्द बोलून घेणारा मात्र मी मनुष्य नव्हे! बळवंतराव, एकदां बोललात ते बोललात! पण पुनः जर असे शब्द मला ऐकूं आले तर मात्र बिलकुल क्षमा होणार नाहीं, एवढं मात्र पक्कं समजून ठेवा! काय ह्मणे? श्रीमंतांचं येणं आह्मांस इष्ट नाहीं! शिव! शिव!

काय, काय हें भाषण ? ज्यांच्या कृपेनं आह्मीं आज हे दिवस पाहिले, त्यांच्यावरच उलटून पडण्याइतका हरामजादा हा विठ्ठल शिवदेव नव्हे ! हें मात्र पक्कं समजा ! बळवंतराव! माझ्यासंबंधानं तुह्मांला असं वाटावं असं निदान माझं तरी आचरण नाहीं! तुह्मी अजून हिंदुस्थानांत फिरकला नाहींत, इकडील दुराणीचा पेंच तुह्मांला माहीत नाहीं, यामुळंच तुमच्या मनांत असले कुचके विचार आले. एरवीं ते खचित आले नसते, असं मला तरी वाटतं! कुंभेरीच्या स्वारीचे वेळीं बायकामाणसं बरोबर नेऊन मी खुद्द जातीनिशीं पस्तावलों आहें; व ह्मणूनच तुह्मांला या प्रसंगीं अशी सल्ला दिली ! तुमचे मनांत सुभेदार, अंताजी माणकेश्वर, आणि आह्मी, या सर्वांनीं मिळून मसलत केली आहे ! परंतु हा आपला निव्वळ भ्रम आहे. हा आपला तर्क अगदीं रास्त नसून तो निखालस कुतर्क आहे. तुमचा स्वभाव मी पूर्णपणें जाणून आहें ! परंतु तो अलीकडे इतका शंकेखोर कसा बनला याचं राहून राहून मला मोठं नवल वाटतं. (भाऊंस) आतां तुमचा जाण्याचा जर संकल्पच असेल तर त्याला माझी कांहीं ना नाहीं.

बळ०—हो! हो! तें तुह्मीं मघाशींच "जाणंच तर चलावं" ह्मणून सांगितलंतच ! तर मग तुमचा कांहीं आमच्याबरोबर येण्याचा मानस नाहीं तर !

विठ्ठल०—बळवंतराव ! नकाहो नका ! अशा क्लिष्टकल्पना नका काढूं ! अर्थाचा अनर्थ करून एकाचं मन दुसऱ्याविषयीं बिघडविण्याचं नसतं पाप व्यर्थ पदरीं बांधून घेऊं नका ! खचित, यानं कांहीं कशाची जोड केलीसं नाहीं होणार.

बळ०—तर मग "जाणंच तर चलावं" ह्मणून जें ह्मणालांत त्याचा अर्थ काय ? आपण बरोबर येणार असा का त्याचा अर्थ घ्यायचा ?

भाऊ०—बळवंतराव ! बस्स, आतां आटपतं घ्या. फार लांबत चाललं हें.

विठ्ठल०—येणार ह्मणजे ! मी जरी दिल्लीस जाण्याच्या विरुद्ध असलों तरी विश्वासराव आणि भाऊसाहेब जर जाताहेत तर मलाहि जाणं अवश्यच आहे. जिथं ते तिथं मी. जें त्यांचं व्हायचं असेल तेंच माझं होईल. जिवाला भिऊन जर आजपर्यंत मी दूरदूर अलग राहतों, तर आमच्या हातून मोहिमेंत जाणंच न होतं. जायचंच तर हा पहा मीच सर्वांच्या अगोदर निघतों (उठतो) माझ्याकडून बिलकुल ना नाहीं !

बळ०—हें जर मला पूर्वींच समजतं तर मजकडून आज अशी चूक होतीचना. विठ्ठलराव या या. भेटा पाहूं तर मला एकदां कडकडून ! व्यर्थ निष्कारण गैरसमज होऊन अशा तऱ्हेचे कित्येक प्रसंगीं दुराग्रह होत असतात तें अशा तऱ्हेनं नाहींसं होणं हेंहि एक प्रकारानं इष्टच असं ह्मटलं पाहिजे. असो;—माझ्या तोंडून तुह्मांला इतका वेळ जे कांहीं कमी-

जास्ती शब्द निघून गेले असतील त्या-बद्दल मात्र माफी असावी, इतकीच विनंति आहे.

**विठ्ठल०**—यांत विनंति ती कसची करायची? गैरसमजानं झालेल्या गोष्टीबद्दल कांहीं क्षमा अथवा माफी नको मागायला! ( एकमेकांस भेटतात. )

**भाऊ०**—ठीक आहे तर, चला. आह्मीं आज संध्याकाळीं इथून डेरे हालविणार!

**विठ्ठल०**—ठीक आहे मीहि आतां लवकरच जेवणखाण आटपून त्याच तयारीला लागतों. बरं तर, येतों आतां.

**भाऊ०**—पण कांहो विठ्ठलराव! उतरायचं ढोलपूरच्या घाटानंचना? नेहेमींप्रमाणं तुह्मी सर्वकडे वाटाड्यांची नेमणूक करालच, नाहीं?

**विठ्ठल०**—त्याबद्दल नको आपल्याला काळजी करायला! मी गेल्याबरोबर ती सर्व व्यवस्था अगोदर करतों.

**बळ०**—थांबा विठ्ठलराव, मीही आलोंच. मिळूनच जाऊं ह्मणजे झालं ( भाऊंस ) बरं तर मीहि येतों आतां रजा.

[दोघेही जातात.

**विश्वास०**—रावांनीं अमुक एक गोष्ट करायची असा एकदां निश्चय केला ह्मणजे मग कोणीं कांहींहि जरी विघ्न आणलं तरी माघार म्हणून घेणारे ते पुरुष नव्हत. थेट दिल्ली जाऊन गांठण्याचा त्यांचा निश्चय जो एकदां झाला तो अगदीं ठाम ब्रह्मलिखितच झाला ह्मणायचा!

**भाऊ०**—आणि मनुष्यानं असं निश्चयी असावं हें कांहीं एक प्रकारानं वावगं नव्हे. सुभेदारांनीं तरी अशीं अगदीं टाकून पत्रं लिहायचीं नव्हतीं. त्यांचा स्वभाव अत्यंत तापट व हेकट आहे. व यामुळं आपापल्यांतच पुढं फूट होण्याचीं हीं एकेक दुःश्चिन्हंच होत आहेत म्हणायचीं.

**विश्वास०**—तें असो. पण भाऊ, तुम्ही जें मघाशीं ह्मणालांत कीं ढोलपूरच्या घाटानं जायचं म्हणून, त्यास पुराणीकबोवा काल ह्मणत होते कीं इथून जवळपासच "मुचकुंद तीर्थ" आहे तें आपल्याला याच का रस्त्यानं लागेल? दादासाहेबांच्या बरोबर मागच्या खेपेला जेव्हां ते आले होते तेव्हां त्यांनीं ५।६ दिवस तिथं मुक्काम केला होता ह्मणे! विष्णूनीं मुचकुंदाकडून कालयवनास जाळून जिथें भस्म केलं ती गुहा म्हणे अगदीं पाहण्याजोगी आहे आणि ह्मणे सध्यां तिथं कोणी एक वैरागी राहतो.

**भाऊ०**—आतां वाटाडे आले म्हणजे त्यांना विचारूं म्हणजे सर्व समजेल. कोण आहेरे बाहेर!

**सेवक**—जी सरकार.

**भाऊ०**—शिंगवाल्यास कुचाचीं शिंगं पुकारावयाला ताकीद द्या.

**सेवक**—व्हय सरकार.

**भाऊ०**—बरं पण घोडा भरधांव टाकीत हें कोण येत आहे इकडे.

**स्वार**–(उतरून व मुजरा करून) सरकार, समशेर बहाद्दरानीं आपल्याला आतांच्या

आतां येऊन भेटून जाण्यास सांगितलं आहे ! सरकार आज—

**विश्वास०**—पण इतकं जरूरीनं अगदीं घोडा भरधांव टाकीत काय म्हणून आलास?

**स्वार**—सरकार, साहेब आज शिकारीला गेले होते तों घोडा भरधांव काढला असतां तो वाटेंत एकदम ठेंचाळला, त्याबरोबर साहेब एका बाजूस जाऊन पडले. तेव्हां त्यांचे अंग बरंच ठेंचाळलं आहे, व पायास एक दगड लागल्यामुळं आंतून रक्त एकसारखं जाऊं लागलं आहे. कांहीं केल्या अजून रहात नाहीं.

**भाऊ०**—कोण आहेरे बाहेर ?

**सेवक**—( येऊन ) जी सरकार.

**भाऊ०**—वैद्यबोवांना ह्मणावं समशेरबहाद्दरांच्या पायांला दगड लागून त्यांतून एकसारखं रक्त चाललं आहे, तर काय औषध असेल तें घेऊन चला म्हणावं झट्दिशीं. आणि हैबत्याला म्हणावं माझी वोडी घेऊन ये.

**सेवक**—जी सरकार ( जातो. )

**विश्वास०**—आणि माझीहि पण आणायला सांग.

**भाऊ०**—तुझी कशाला ? आतां उन्हहि बरंच झालं आहे. तर तूं आतां स्नान कर. हा मीं जाऊन आलोंच इतक्यांत; तूं येण्याचं कांहीं कारण नाहीं. बरं मी जातों तर.

[ जातात.

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—ढवळपूरपासून एका कोसावरील पहाड व तेथील गुहा.

**वैरागी** गांजाची चिलीम ओढीत आहे.

**वैरागी**—( आपल्याशीं ) नारायण, सद्गुरुनाथ, नारायण, सद्गुरुनाथ, सद्गुरुनाथ. इसका नाम क्या " बिश्वास " " बिश्वासराय "! वाः, नांव तरी किती गोड हें. जसं रूप तसं नांव! आणि त्याचं भाषण तरी किती अदबीचं व किती गोड! याला पाहून मला माझ्या गोविंदाचं मात्र स्मरण होतं. ही मंडळी जरी इथं न येती तरी बरं झालं असतं. त्यायोगानं ही मागची दुःखद स्मृति होऊन मन तरी शोकाकुल होतंना. तिची ती तशी गत! आईना आणि बाबाना तर त्या दुष्टांनीं "पैसा कुठं आहे तो दाखवा" म्हणून माझ्या देखतच यमसदनाला पाठविलं ! गोविंदाच्या अंगावर कांहीं चीजवस्त होती तेवढ्या आशेनं त्याचे माझ्यादेखतच पैशाएवढे तुकडे करून माझ्यापुढें त्या दुष्टांनीं त्याचा ढीग करून ठेवला! माझीहि अवस्था. ते अशीच करितील म्हणून मी होतं नव्हतं तें सर्व त्यांना देऊन अंगाला राख फासून इथं एकीकडे येऊन बसलों. इथं सहसा कोणी येऊं नये, आयुष्यमान असेल तिथपर्यंत आपलं सद्गुरूचं नांव घेत खुशाल पडावं, असं मनांत आणून इथं आलों. तों दैवयोगानं सद्गुरु रामनारायणांचीहि गांठ पडली.वर्ष दोन वर्षं

होतात न होतात तों तेहि आम्हांला सोडून गेले! असं आमचं खडतर नशीब! नुसती इच्छा चांगली असून उपयोग काय? हाताला कांहीं यश पाहिजे. आमचे हात ह्मणजे हातांत सोनं घेतलं तरी त्याची माती व्हावयाची इतके यशस्वी! या राजबिंड्या विश्वासरावाला पाहतांच मला किती तरी समाधान झालं. त्या लक्ष्मीबाईचा स्वभाव किती गोड व तिचं वर्तन किती मर्यादशील! ते कोण भाऊसाहेब, आणि त्या पार्वतीकाकू! मला वाटलं हे विश्वासरावाचे वडील आणि ह्या मातोश्रीच असाव्यात! पण शेवटीं ते म्हणे त्याचे चुलते! परस्परांच्या वर्तनावरून हे म्हणजे चुलतेपुतणे असं कांहीं कोणाच्या लक्षांतसुद्धां येणार नाहीं! त्यांचा २।३ दिवसच इथं मुक्काम होता, पण हे दोन तीन दिवस किती मजेंत, किती आनंदांत, आणि किती सुखांत गेले! माझ्या हातून राहवेना ह्मणून, शेवटीं गुरुमंत्राचा जप करून मीं त्या विश्वासरावाच्या व त्या लक्ष्मीबाईच्या हातांत शेवटीं गंडे बांधलेच. मी तरी काय करूं? माझ्या हातून राहवेनाच! माझ्या हाताला यश नाहीं हेंच माझ्या मनाला खात होतं; परंतु त्यांचं चांगलं व्हावं ही माझी इच्छा प्रबल झाल्यामुळं मी एक दिवस उपवासी राहून गुरुमंत्राचा जप करून दोरे मंत्रून तर बांधलेच! हें एवढं वर्ष जर निभावलं तर हा खचित भरतवर्षाचा सार्वभौम राजा होईल असं त्याच्या हस्तरेषांवरून तर स्पष्ट दिसत होतं. मात्र यंदाच्या वर्षांतील त्याचा अपमृत्यु मात्र टळला ह्मणजे झालं! सुखी राखो परमेश्वर बिचाऱ्याला! सद्गुरु! सद्गुरुनाथ! राम नरायण, राम नरायण! आपण आतां तीर्थावर जाऊन येवढीं वस्त्रं स्वच्छ धुवून वाळवून पुनः आपल्या ध्यानाला बसावं :— नारायण; नारायण; सद्गुरुनाथ! सद्गुरुनाथ! जातो.

---

## प्रवेश ५ वा.

### स्थल—गंभीरानदीवरील तंबु.

**जनकोजी शिंदे व बळवंतराव मेहेंदळे.**

**बळ०**—(खिजमतगाराचे पोषाख केलेल्या भाऊस व विश्वासरावास व विठ्ठल शिवदेवास) तुम्हीं या कनाथीच्या बाहेर ज्या सुमारास बाबासाहेब बसले आहेत त्या सुमारानं कनाथीस लागूनच उभे रहा. ऐकूंच न आलं तर बेशक मघाशीं सांगितल्याप्रमाणं कनाथीला हलकेंच भोंक पाडा. मात्र हें बाबासाहेबांच्या पाठीमागच्या अंगास झालं पाहिजे. हं, आलेच ते तंबूच्या पडद्याशीं. व्हा त्या बाजूस तसे. मात्र अगदीं सावध आणि बेमालूम हां.

**जनको०**—ओहोः या, या राव! आज किती दिवसांनीं भेट? (कडकडून भेटतात) काय आलांत तरी केव्हां? तुम्हांला न येण्याबद्दल लिहिलं होतंना? आणि मग तुम्ही इथं कसे? मला वाटतं हा मनसबा——

**बळ०**—काय चांगला केला नाहीं हेंच कीं

तसाच राहूं देऊन म्हणाला, " सरदार **शक्तिधरराय** अगोदर शपथ वहा, तुमच्या धर्माचें, तुमच्या पूर्वजांचें, व तुमच्या शस्त्राचें स्मरण करून तुम्ही आधीं शपथ वहा कीं, मी ज्या ज्या अटी सांगेन, त्या त्या तुम्हांस अक्षरशः मान्य आहेत म्हणून ! मी एवढ्याच कबुलीवर या वेळीं तुम्हांस जीवदान देईन."

" मीं प्रथमच तुम्हांला सांगितलें आहे कीं, तुम्ही म्हणाल त्या अटी मला शिरसामान्य आहेत." **शक्तिधरराय** उत्तर करतो, " आतां तुम्हीं सांगितल्याप्रमाणें मी परमेश्वराचें, माझ्या कुलाचें व शस्त्राचें स्मरण करून शपथ घेतों. मग तर झालें ? "

" ठीक आहे आतां." **कुमुद्वंधु** म्हणाला. लागलीच त्यानें **शक्तिधररायाच्या** छातीवरील गुढगा काढला, व आपलें सदाविजयी शस्त्र म्यानांत घातलें. मग **शक्तिधररायाच्या** हातांतून निसटून पडलेली मोडकी तलवार त्यानें उचलली आणि ती एकवार मोडली होती तरी ती गुढग्यावर धरून तिचीं फिरून दोन शकलें केलीं व तीं दोन्हींही जमिनीवर टाकलीं. नंतर पलीकडे निश्चेष्ट पडलेल्या स्वाराच्या बाजूस पडलेली तलवारही काढून घेऊन त्यानें गुढग्यावर धरून मोडली, आणि तिचीं दोन शकलेंही पहिल्या शकलांजवळ टाकलीं.

" सरदारसाहेब, " **शक्तिधर** उठून बसल्यानंतर म्हणतो, " तुमच्या काय त्या अटी तुम्हीं अद्यापि मला सांगितल्या नाहींत ! "

" क्षणभर दम धरा. प्रथम बेशुद्ध होऊन पडलेल्या या तुमच्या मित्राची काय अवस्था झाली आहे ती अगोदर पाहूं द्या."

असें म्हणून **कुमुद्वंधूनें** त्या सरदाराचें शिरस्त्राण काढलें, व त्याबरोबर तो साश्चर्यानें म्हणाला, " अरे, हे तर सरदार **महासेनराय** ! अरेरे ! यांचा तर शेवटच झाल्यासारखा दिसतो. पण त्याचा दोष, परमेश्वरा, मजवर नाहीं. त्यांनीं आपण होऊनच आपल्या हातानें हा प्रसंग आपल्यावर ओढवून आणला ! पण नाहीं ! यांच्या कपाळावरील शिरा अद्यापि उडत आहेत. अद्यापि प्राण आहेत ! जवळ कोठें पाणी असतें तर फार बरें झालें असतें."

**कुमुद्वंधूनें महासेनरायाचें** शिरस्त्राण काढल्यामुळें त्याच्या मस्तकास थोडी वाऱ्याची झुळूक लागली व त्याबरोबर त्याच्या नाड्या वाहूं लागून, त्याचे ओंठही हालूं लागले. घोड्यावरून बेशुद्ध होऊन पडल्यामुळें त्याचें एक कानशील बरेंच खरचटलें होतें; व धक्क्यामुळें रक्तप्रवाह मस्तकाकडे वाहून तोंड तांबडें निळें झालें होतें. असो.

**कुमुद्वंधु** पाण्याकरितां इकडे तिकडे पाहतो आहे असें दिसतांच **शक्तिधर** बसल्या स्थानावरूनच म्हणतो, " त्या पलीकडच्या झाडांत एक लहानसा ओहोळ आहे." इतकें बोलून तो आपलें तुटलेलें शिरस्त्राण बाजूस टाकून हुश्श करून तेथेंच गवतावर पडला.

**कुमुद्वंधूनें महासेनाचें** शिरस्त्राण हातांत घेऊन तो **शक्तिधरानें** दाखविलेल्या दिशेस धांवत गेला; व त्या शिरस्त्राणांत पाणी भरून घेऊन जलदीनें परत

आला. नंतर **महासेना**च्या तोंडावर वगैरे पाणी मारून व त्याचें चिलखत सोडवून कांहीं वेळ त्याला तसाच पडूं दिल्यावर तो हळू हळू शुद्धीवर आला आणि त्यानें डोळे उघडले. प्रथमतः कांहीं वेळ तो तसाच **कुमुदबंधू**च्या मुखाकडे शून्य दृष्टीनें पहात राहिला. पुढें चांगला शुद्धीवर येतांच सर्व स्थिति त्याच्या लक्षांत येऊन त्याचा चेहरा एकदम उतरला.

" सरदारसाहेब, तुमचे मित्र **शक्तिधरराय** यांना मीं पराजित केलें आहे व मी सांगेन त्या अटी कबूल करण्याची त्यांनीं शपथ वाहिली आहे. तुह्मीही त्याचप्रमाणें शपथ वहा, नाहींतर मरणास तयार व्हा!" **कुमुदबंधु** आपली कट्यार बाहेर काढीत ह्मणतो.

**महासेनानें** आपली नजर **शक्तिधररायाकडे** वळविली. त्याचा चेहरा कष्टी आणि हताश झालेला दिसतांच त्याच्या पराजयाची व मानभंगाची सर्व हकीकत आणि **कुमुदबंधू**च्या भाषणाची सत्यता त्याला पूर्णपणें कळली.

तो **कुमुदबंधूस** उद्देशून ह्मणतो, " पण प्राणहानिही बरी अशा कांहीं अटी तुह्मीं सांगितल्या तर ? "

" **महासेनराय** " **कुमुदबंधूनें** उत्तर केलें, " मी स्वतः जातीचा सरदारच आहें, मग आपल्या शिपाइगिरीच्या शीलास व कुलास न शोभण्यासारख्या गोष्टी करण्यास मी तुह्माला कसा बरें सांगेन ? "

" बरें तर, मी जित आहें; तुमच्या कोणत्याही अटी मला कबूल आहेत. मी शपथ घेण्यासही कबूल आहें. " **महासेनराय** ह्मणाला.

" घ्या तर प्रथम शपथ. " **कुमुदबंधु** ह्मणाला.

**महासेनानें** त्याच्या सांगण्याप्रमाणें शपथ वाहिल्यानंतर **कुमुदबंधु** आपली कट्यार परत म्यानांत घालून ह्मणाला, " ठीक आहे; तुह्मांला प्राणदान दिलें आहे. आतां उठून बसा आणि थोडें पाणी घ्या ह्मणजे तुह्मांला बरें वाटेल. तुमची जीभ तहानेनें ओढल्यासारखी दिसत आहे. "

**महासेन** उठून बसला आणि शिरस्त्राण तोंडाला लावून तें गार व स्वच्छ निर्झरोदक मनाची तृप्ति होईपर्यंत प्याला. इकडे **कुमुदबंधूनें** क्षणभर आपल्या मनाशीं विचार केला. आणि त्या दोघा सरदारांच्या मोडक्या तलवारींवर मुद्दाम आपला डावा पाय ठेऊन तो उभा राहिला व त्यांस बोलूं लागलाः——

" सरदारसाहेब, तूर्त प्रसंगीं ज्या अटी मला तुह्मांकडून कबूल करून घेणें आहेत, त्या सर्वांचा मुख्य एका गोष्टीशींच संबंध आहे. ती गोष्ट ही : तुह्मी राजनिष्ठेचा त्याग करून आपल्या स्वामिनीशीं वैर करण्यास उद्युक्त झालांत आणि ज्या गादीच्या औदार्यावर तुमच्या सर्व वैभवाचा पाया रचलेला आहे, त्या गादीवर असलेल्या अधिकारिणीशीं कृतघ्नतेचें आचरण करून निजविरुद्ध बंड करणाऱ्या हरामखोरांस तुह्मी सहाय्य झालां आहांत, तर या घटकेपासून तुमच्या स्वामिनीचे तुह्मी पूर्ववत् एकनिष्ठ सेवक झालांत व याउप्पर निजविरुद्ध कार-

स्थानें करणाऱ्या दुष्टांस तुम्ही कोणत्याही प्रकारें सहाय्य करणार नाहीं अशी प्रथम शपथ वहा."

"शपथपुरःसर आम्ही या घटकेपासून **कुमुद्वती**राणीसाहेबांची एकनिष्ठेनें सेवा करूं व तिच्या शत्रूंस कोणत्याही प्रकारें यापुढें सहाय्य करणार नाहीं." दोघेही सरदार एकदम बोलले. मात्र हे शब्द त्यांच्या तोंडांतून निघत असतां त्यांच्या चेहऱ्यावरील खिन्नता एक लेशही कमी न होतां अधिकच वाढली.

"बरें, सरदार **शक्तिधरराय**, मी विचारतों येवढ्या गोष्टी आतां मला सांगा." **कुमुद्बंधु** म्हणतो, "बंडखोरांस मदत करण्याकरितां तुम्ही किती सैन्य बरोबर आणलें आहे ?"

"फक्त पन्नास लोकच तूर्त मीं बरोबर आणिले आहेत." **शक्तिधरानें** उत्तर केलें.

"तर मग **महामंडलेश्वर** सर्व सैन्यानिशीं **कुवलयपुरी**वर स्वारी करण्यास निघतील त्यावेळीं तुमचें बाकी सर्व सैन्य त्यांस येऊन मिळावें अशी तजवीज करण्याचें तुम्हीं ठरविलें असेल ? " **कुमुद्बंधु** प्रश्न करितो.

"होय तसा विचार ठरला होता खरा." **शक्तिधर** उत्तर करितो.

"बरें, सरदार **महासेन**, तुम्ही इकडे येतांना बरोबर किती लोक आणिले होते ?" **कुमुद्बंधु महासेना**कडे वळून प्रश्न करितो.

"फक्त चाळीस " **महासेन** उत्तर करितो.

तर मग, तुम्हीही **शक्तिधररायाप्र**माणेंच आपलें सर्व सैन्य मागाहून येऊन मुख्य सैन्यास मिळावें अशी व्यवस्था ठरविलेली असेल ? " **कुमुद्बंधु** विचारितो.

"होय. **शक्तिधरराया**प्रमाणेंच माझाही विचार ठरला होता. " **महासेन** उत्तर करितो.

"बरें, **शक्तिधरराय**, तुम्हीं बरोबर आणलेले लोक आतां कोठें आहेत ? " **कुमुद्बंधु** प्रश्न करितो.

"**धूमग्राम** म्हणून येथून तीन कोशांवर माझें एक लहानसें गांव आहे, तेथें ठेविले आहेत; आणि फक्त दोन असामी नौकर मात्र **गोलदुर्गां**त आहेत. " **शक्तिधरानें** उत्तर केलें.

"सरदार **महासेन**, तुमचेबरोबर आलेले लोकांचा तूर्त मुक्काम कोठें आहे ? " **कुमुद्बंधु** विचारितो.

"येथून दोन कोशांवर **दशखंड** म्हणून एक गांव आहे, तेथें मी आपले लोक ठेऊन आलों आहें. " **महासेनानें** उत्तर केलें.

यावर 'हीं आपलीं गांवें कोण कोणत्या बाजूस आहेत ?' म्हणून **कुमुद्बंधूनें** दोघांसही प्रश्न केला, आणि दोघांनींही बोटांनीं आपआपल्या गांवांच्या दिशा दाखविल्या. तेव्हां या दोहोंपैकीं कोणत्याही गांवाची वाट **उग्रसिंहा**च्या गुहेवरून जात नाहीं असें आमच्या सरदारानें ठाम करून घेतलें. आणि या दोही गांवांकडून येणाऱ्या जाणाऱ्या माणसांस **बालार्करायासं**बंधानें बातमी कळण्याचा व त्यांनीं ती **जयद्रथराया**स कळविण्याचा संभव नाहीं अशी-

ही पण त्याची खात्री झाली. नंतर तो द दोघा सरदारांस फिरून उद्देशून बोलूं लागल

"सरदारसाहेब, आतां यापुढें आप कसें वागलें पाहिजे याविषयीं मला सांग यचें तिकडे लक्ष असूं द्या. आपण दोघ नींही आतांच्या आतां घोड्यावर बस आपआपल्या गांवाकडे ताबडतोब चला तेथें जातांच दोघांनींही एक एक जास **गोलदुर्गा**स **जयद्रथराया**कडे रवाना क रावा. तुम्हीं दोघांनींही बंडखोरांचा प सोडला असल्याबद्दल **जयद्रथराया**स स्प पत्रें लिहावीं. तुम्हीं त्यांचा पक्ष कां सोड ला याबद्दल तुम्हांस योग्य दिसतील तीं किं वा प्रसंगास शोभण्यासारखीं असतील त कारणें तुम्ही लिहा. मी त्याविरुद्ध **जयद्र थराया**स कांहीं एक सांगणार नाहीं. मा तुमचीं उभयतांचीं पत्रें आतांपासून चार घ कांच्या आंत **जयद्रथराया**च्या हातीं ये ऊन पडलीं पाहिजेत. नंतर आज सायं काळीं किंवा त्यापूर्वीं तुमच्या सवडीस ये ईल तेव्हां तुम्हीं दोघांनींही आपआपल्या ब रोबर आणलेल्या लोकांसह आपआपल्या किल्ल्यास परत जावें. आणि तेथें गेल्यानंत आपल्या अपराधाबद्दल राणीसाहेबांची क्षमा मागण्याची योग्य ती तजवीज करावी."

"बरें, सरदारसाहेब, आणि राणीसाहेब आम्हांस क्षमा करतील अशाबद्दल तुमचें आम्हांस वचन आहेना?" दोघेही सरदार **कुमुदबंधू**स विचारतात.

"मी कोणत्याच गोष्टीबद्दल तुम्हांस वचन देत नाहीं व स्वतःस बांधून घेत नाहीं.' **कुमुदबंधु** म[illegible]र, हट्टीपणानें व कांहींस अभिमानानें ह्मणतो, "मी कांहीं तुमच्याशीं तहनामे ठरविण्यास किंवा वकिली करण्यास आलों नाहीं. फक्त माझ्या अटी आहेत त्या मी तुम्हांस सांगणार आणि त्या बिनतक्रार मान्य केल्या पाहिजेत. राणीसाहेबांनीं तुमच्या अपराधाची तुम्हांस क्षमा करावी यासाठीं तुम्हांस वाटेल ती योग्य तजवीज तुम्ही करा. तुमचे अपराध अक्षम्य आहेत, आणि राणीसाहेबांकडून क्षमा होणें अशक्य आहे असें तुम्हांस वाटत असेल, तर आपल्या जीवितरक्षणासाठीं पाहिजे तर तुम्ही आपले देश सोडून चला. या सर्व तुमच्या संरक्षणाच्या गोष्टी आहेत; व त्यासंबंधानें मला कांहींएक कर्तव्य नाहीं. त्याबद्दल व्यवस्था तुमची तुम्हीच केली पाहिजे."

इतकें बोलून **कुमुदबंधु** क्षणभर थांबला. त्या दोघा सरदारांनीं हें त्याचें भाषण ऐकतांच त्यांच्या चेहऱ्यावर चिंता, निराशा आणि मानभंग या मनोविकारांची मिश्र छाया दिसूं लागली. आणि ते परस्परांकडे हताश मुद्रेनें पाहूं लागले. थोड्या अवकाशानें **कुमुदबंधु** फिरून बोलतोः—

"सरदारसाहेब, मी तुम्हांस तुमच्या पुढील कर्तव्याची दिशा दाखविली ती उभयतांसही कळलीना? तुम्ही येथून त्वरेनें आपआपल्या गांवीं जाऊन **जयद्रथराया**स ताबडतोब पत्रें रवाना करावयाचीं. तीं चार घटकांचे आंत त्यांचे हातीं पडलींच पाहिजेत. बंडाचा पक्ष तुम्हीं पूर्णपणें सोडला असें पत्रांत स्पष्ट लिहिलेलें पाहिजे. तुमच्या बुद्धींत असा फरक होण्याचीं हवीं तीं कारणें तुम्हीं

लिहिलीं तरी त्यास माझी हरकत नाहीं. तुह्मांस वाटतील तीं कारणें तुह्मी आपल्या कल्पनेंतून बाहेर काढा. तुमचा मीं पराभव केला व त्यामुळें तुह्मांस असें करणें भाग पडलें असेंच तुम्हीं **जयद्रथरायास** कळविलें पाहिजे, असें माझें म्हणणें नाहीं. तुम्ही आपली अब्रू हवी तशी राखून घ्या. मात्र जर चार घटकांचे अवकाशांत तुमचीं पत्रें **जयद्रथरायास** पोंचलीं नाहींत तर मला सर्व मजकूर उघड करुन सांगणें भाग होईल. मग मी सर्व जगतास उघडपणें तुमच्या शूरत्वाची हकीकत सांगेन. तुह्मी दोघांनीं मिळून एक समयींच, मी एकटा असून मजवर हल्ला कसा केला, त्यामुळें आपल्या शिपाइगिरीस कलंक लावून युद्धनियमांचें उल्लंघन कसें केलें, दोघांचाही मीं एकट्यानें पराभव करून तुह्मांस स्त्रियांप्रमाणें किंवा नेभळ्यांप्रमाणें करुणा भाकावयास कशी लाविली, नंतर तुम्हीं कुलशीलाची शपथ कशी वाहिली, इत्यादि सर्व गोष्टी मला सर्वांस कळविणें अवश्य होईल. आणि मी जी हकिकत सांगेन तिच्या तथ्यतेबद्दल सर्वांची खात्री व्हावी ह्मणून तुमच्या या भग्न शस्त्रांच्या मुठी मीं आपल्याबरोबर घेऊन जाणारच आहें. यावर केलेल्या मिन्याच्या आणि जडावाच्या कामावरून व यांवर खोदलेल्या तुमच्या नांवावरून या तुमच्याच आहेत असें कोणासही ओळखतां येईल. आणि तेवढ्यावरून मीं सांगितलेल्या हकिकतीबद्दल कोणाचीही खात्री होईल. हें सर्व ध्यानांत घेऊन कसें वागावयाचें तें वागा. तुमची अब्रू बेअब्रू तुमच्याच हातांत आहे. आणि तुह्मीं होऊन बाहेर पाडण्याचा प्रसंग आणला नाहीं तर हें तुमचें गुह्य इतरांस कळण्याचा संभव नाहीं."

इतकें बोलून **कुमुद्बंधूनें** पायांशीं असलेल्या दोन्हीही तलवारींच्या मुठी आपल्या घोड्याच्या जिनाच्या आंत व्यवस्थेनें बांधून टाकल्या. सरदार **शक्तिधरराय** आणि **महासेनराय** यांस आपल्यावर आलेल्या या प्रसंगाची कल्पना बरोबर आली होती व ते आपआपली जबाबदारी पूर्णपणें ओळखीत होते. आपलीं शस्त्रें या सरदाराच्या ताब्यांत गेलीं आहेत तेव्हां आपण जिंकलों गेलों हें कोणासही खरें वाटणारच; तसेंच आपण दोघांनीं मिळून एकट्या प्रतिपक्षावर हल्ला केला हेंही मोठें शूरत्वाचें व कुलीनाचें काम झालें नाहीं; वगैरे गोष्टी त्यांच्या पूर्णपणें लक्षांत येऊन चुकल्या. ह्मणून **कुमुद्बंधूनें** आपल्यास जीवदान दिल्याबद्दल व आपण जिंकलों गेलों असतां आपणास मानानें वागविल्याबद्दल बाह्यतः तरी त्यांनीं त्याचे फार फार आभार मानिले आणि त्याच्या सांगण्याप्रमाणें अक्षरशः वागण्याचें कबूल केलें व शेवटीं 'आमची सर्व अब्रू, सरदारसाहेब, आपल्या हातांत आहे.' येवढी दोघांनींही लीनतापूर्वक त्यास इशारत दिली.

"सरदारसाहेब," **कुमुद्बंधु** त्या दोघांस ह्मणतो, "आपण आपल्या अब्रूसंबंधानें अगदीं निर्धास्त रहा; येवढेंच नव्हें, तर आतां मी तुह्मांस सांगतों कीं, मला तुमच्या पुढील वर्तनावरून योग्य वाटल्यास तुह्मांस

क्षमा करण्याबद्दल राणीसाहेबांजवळ मी विनंतिही करीन. मी आतां **गोलदुर्गा**कडेच चाललों आहें. तेथें मी **जयद्रथराया**ची भेट घेणार. प्रथमतः या झालेल्या प्रसंगाबद्दल त्याजपाशीं एक अक्षरही काढणार नाहीं. पण जर मीं सांगितल्याप्रमाणें माझ्या समक्ष चार घटकांचे आंत **जयद्रथरायां**चे हातांत तुह्मां दोघांचीही पत्रें येऊन दाखल झालीं नाहींत, तर मग आपले ओंठ मिटून ठेवण्याचें मला बिलकुल कारण नाहीं. मग मी सर्व हकिकत **जयद्रथरायां**स व इतरांस उघडपणें सांगेन. व तसें केल्याबद्दल मग तुह्मास मजला दोषही देतां येणार नाहीं. असो; तर आतां तुह्मी दोघेही आपआपल्या घोड्यावर स्वार होऊन त्वरेनें आपल्या मार्गानें चालूं लागावें, हें बरें."

दोघेही सरदार **कुमुदबंधू**च्या आज्ञेप्रमाणें सज्ज होऊन घोड्यावर स्वार झाले, व निरनिराळ्या वाटांनीं आपआपल्या गांवीं जाण्यास निघाले. ते निघाल्यानंतर **कुमुदबंधु** कांहीं वेळपर्यंत ते कोणकोणत्या वाटांनीं जातात हें पहात उभा राहिला, आणि नंतर आपण जवळच्या ओहोळावर जाऊन तेथील निर्मल जलाचें प्राशन करून परत आला आणि आपल्या घोड्यावर स्वार होऊन समोर दिसणाऱ्या **गोलदुर्गा**च्या वाटेनें हळू हळू चालूं लागला.

**गोलदुर्ग** हा बराच प्रचंड असा एक जंगली किल्ला होता. ह्याला थेट भुइकोट किल्लाही म्हणतां येण्यासारखें नव्हतें, किंवा थेट डोंगरीगडही म्हणतां येण्यासारखें नव्हतें. कारण हा केवळ सपाट मैदानावरही बांधलेला नव्हता, किंवा फारसा उंच डोंगरावरही बांधलेला नव्हता; तर एका साधारणशा टेकडीवर होता, व यामुळें आसपासच्या कांहीं प्रदेशावर याचा मारा चालण्यासारखा होता. सभोंवतीं बरेंच दाट अरण्य होतें. व जवळचा बहुतेक प्रदेश डोंगराळ व जंगलीच होता. आह्मी ज्या वेळचा इतिहास लिहीत आहों त्याच्यापूर्वी सुमारें चारशें वर्षें हा किल्ला बांधलेला होता. **गदाधरराय बहुभुज** ह्मणून एक महाप्रतापी सरदार **पंचगंगे**च्या गादीचा सेनापति होऊन गेला. त्यानें हा किल्ला प्रथम बांधिला. **बहुभुजा**च्या घराण्यांत बरेच मोठमोठे योद्धे होऊन गेले; परंतु अलिकडे दोन तीन पिढ्यांत राजदरबारांतील कोणताही अधिकार या घराण्याकडे मिळाला नव्हता. यामुळें या घराण्यांतील प्रस्तुतचे वृद्ध वारस सरदार **अर्जुनराय** यांचा राजघराण्यावर रोष होता. या वृद्ध सरदारास दोघे तरुण व शूर मुलगे होते. या दोघाही तरुणांचें सर्व शिक्षण **गोलदुर्गा** सभोंवारच्या अरण्यांत झालेलें होतें. यांचे गुरु ह्मणजे रानांतले अस्वल वाघ वगैरे. दरबारांत जाऊन प्रणाम कसा करावा किंवा आपल्या बरोबरीच्या गृहस्थाशीं व आपल्याहून वरिष्ठ असतील त्यांशीं कसें वागावें हेंही त्यांस ठाऊक नव्हतें ह्मटलें तरी चालेल. घोड्यावर बसणें, शिकार करणें, हत्यार चालविणें या गोष्टींत मात्र ते तरबेज होते. यांचा स्वभाव इतका तापट, अधिरा व चिडखोर होता कीं, त्या-

पुढें कोणाचा कांहीं उपाय चालणें अशक्य होतें. तेव्हां **गोलदुर्गा**चे मालक **अर्जुनराय** व त्यांचे दोघे चिरंजीव ह्यांना आपलेसे करून टाकण्यास **महामंडलेश्वर जयद्रथ-राया**सारख्या धोरणी गृहस्थाला का अवघड पडणार! **जयद्रथराया**नें या मंडळीस इतकें मोहून टाकिलें होतें कीं, त्याच्या पक्षाचें संरक्षण करण्याकरितां हे पिता-पुत्र आपले प्राण अर्पण करण्यास क्षणभरही मागें हटले नसते.

**बहुभुजकरां**चें घराणें पहिल्यापासून मोठें अभिमानी होतें. आणि या घराण्यांतील पुरुषांस धर्मवेडाचा तर मक्ताच होता. **अर्जुनराया**चा एक पूर्वज **उग्रसिंग** ह्मणून होऊन गेला. त्यानें सरकारदरबारांत बरेच दिवस मोठ्या सन्मानानें घालविल्यानंतर व पुष्कळ मोठमोठ्या लढायांत जय संपादन करून व आपल्या महत्वाकांक्षेच्या प्रीत्यर्थ हजारों मनुष्यप्राणी बळी पडल्यानंतर आपल्या ऐहिक आयुष्यक्रमाची परिसमाप्ति केली. आणि परमार्थाकडे आपले शेवटचे दिवस लाविले. या गृहस्थानें आपल्या वयाच्या साठाव्या वर्षी **कुवलयपूर** सोडून तो आपल्या किल्ल्यांत स्वस्थपणें कायमचा वास करण्याकरितां आला. तेथें आल्यावर तपोनुष्ठानानें आपला अवशिष्ट काल घालवावयाचा असा निश्चय करून किल्ल्याच्या एका बाजूस त्यानें एक तळघरासारखी अंधारकोठडी तयार करविली व त्यांत राहून तो आपले दिवस ईश्वरभजनांत घालवूं लागला. पुढें कांहीं दिवसांनीं त्याला असें वाटलें कीं, येथें राहिल्यानें आपल्या शांततेचा भंग होतो, व आपण अंगिकारलेल्या तापसी वृत्तींतही अडथळा होण्याचा संभव आहे, ह्मणून **गोलदुर्गा**हून कांहीं अंतरावर त्यानें एक गुहा तयार करविली व तेथें राहून आपले अंतकाळचे दिवस केवळ ईश्वरभजनांत व एकांतवासांत त्यानें घालविले. मागें जी **उग्रसिंहा**ची गुहा ह्मणून वर्णन केली आहे ती हीच. या गुहेंत त्या वृद्ध तपस्व्यानें आपलें आयुष्य इतक्या चमत्कारिक रीतीनें घालविलें होतें कीं, त्याला त्या प्रांतांत या युगांतला विश्वामित्र असें म्हणत असत. व त्याची गुहा आणि **गोलदुर्गां**तील **तपोमंदिर** नांवाची त्याची बसण्याची जागा हीं दोन्हींही मोठीं पुण्यस्थानें मानलीं जात. **उग्रसिंहा**च्या नांवाबद्दल **अर्जुनराय** आणि त्यांचे पुत्र यांस अत्यंत अभिमान वाटणें साहजिकच होतें. असो. **गोलदुर्ग** व त्याचे मालक **अर्जुनराय** यांच्या संबंधाची ही हकिकत झाली. आतां आपण आपल्या मुख्य इतिहासाकडे वळूं.

**कुमुदबंधु गोलदुर्गा**स **जयद्रथरायां**ना भेटण्याकरितां चालला होता त्या दिवशीं त्या किल्ल्यांत एक मोठा दरबार भरावयाचा होता. **बौद्धधर्मानुयायी** सर्व सरदारमंडळी व तत्पक्षीय इतर गृहस्थ हे सर्व आज येथें जमावयाचे होते. नंतर एका वचनपत्रिकेवर जमलेल्या सर्व गृहस्थांनीं शपथा घेऊन सह्या करावयाच्या असें ठरलें होतें. राज्ञीपक्षाविरुद्ध असणाऱ्या सर्व सरदारांची एकत्र जमून सर्व गोष्टींसंबंधानें उघडपणें अटी व करार ठरविण्याची ही प्रथम वेळ होती ह्मणून हा दरबार होईल तितका भव्य, गंभीर व विधि-

पूर्वक व्हावा असें **अर्जुनरायानें महामंडलेश्वर जयद्रथराय** यांस सुचविलें होतें; आणि ह्मणूनच **गोलदुर्ग** किल्ल्यांतील **तपोमंदिर** हें पुण्यस्थान या समारंभाकरितां योजिलें होतें. स्वतः **जयद्रथराया**चा या पुण्यस्थानाबद्दल कितीसा पूज्यभाव असेल त्याची आह्मांस शंकाच आहे; पण आपल्या अनुयायी मंडळींत या स्थानाबद्दल भय बाळगणारे गृहस्थ फार आहेत, तेव्हां या ठिकाणीं घेतलेल्या शपथा कसाही प्रसंग आला तरी मोडण्याचें त्यांस धैर्य होणार नाहीं, असा विचार मनांत आणून **जयद्रथरायानें** या कार्यास या स्थानासारखें दुसरें स्थानच नाहीं असें ठरविलें. आणि ह्मणून आज या **उग्रसिंहा**च्या **तपोमंदिरां**त बंडखोर सरदार मंडळीची पहिली बैठक व्हावयाची होती.

वाचकहो, या ठिकाणीं या **तपोमंदिरा**च्या रचनेसंबंधानें व आज आंत करून ठेवलेल्या व्यवस्थेसंबंधानें दोन शब्द सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. हें मंदिर कोटांतील मुख्य वाड्यापासून बरेंच अंतरावर कोटांतील एका भिंतीशीं लागून होतें. सभोंवार बळकट व रुंद चिरेबंदी भिंती होत्या. वरच्या बाजूसही पुष्कळ जाड असें दगडी आच्छादन होतें. आंत थोडी हवा येण्याकरितां एका भिंतींतून एक व वरील गचींतून एक असे दोन बारीक गवाक्ष राखिले होते. मंदिराच्या आंतील जमीन बाहेरच्या जमिनीपेक्षां फार खोल नव्हती, ह्मणून आंत प्रवेश करण्यास पायऱ्या वगैरे नव्हत्या. दरवाजा मात्र एकच असून फार लहान व भक्कम होता. दरवाजास आंतून भक्कम कडी असून बाहेरून एक मोठा आडणा होता. दरवाजांतून आंत शिरावयाचें ह्मणजे मान वांकाविल्याशिवाय उपायच नाहीं. मंदिराच्या आंत भर दोनप्रहरीं देखील सूर्यप्रकाशाचा एकादा किरणही येणें अशक्य होतें. या मंदिरांत मध्यें एक संगमरवरी दगडाचा लहानसा चौथरा केलेला होता व त्यावर **उग्रसिंहा**च्या पादुका बसविल्या होत्या. मागील भिंतीशीं रेशमी पडदे लावून एक खोलीसारखी जागा केली होती व त्यांत **उग्रसिंह** सरदाराचीं शस्त्रास्त्रें आणि **उग्रसिंह**तपस्वाचीं तपायुधें एका पालखींत घालून पूजेकरितां ठेविलीं होतीं. मंदिरांत नेहमीं नंदादीप तर असेच; पण आज या ठिकाणीं एवढा मोठा समारंभ व्हावयाचा ह्मणून जिकडे तिकडे दिवे लावून सर्व मंदिर प्रकाशमय करून टाकलें होतें. दोन बाजूंच्या भिंतींशीं लागून आसनें मांडिलीं होतीं. मधल्या चौथऱ्यासंनिध **महामंडलेश्वर जयद्रथराया**करितां आसन ठेविलें होतें. मंदिराचें नेहमींचें उग्रस्वरूप न घालविण्याविषयीं आणि त्याला कांहीं विशेष शोभा न आणण्याविषयीं **अर्जुनरायांनीं** सक्त तजविज ठेविली होती.

थोडक्याच वेळांत बहुतेक मंडळी मंदिरांत येऊन बसली. **जयद्रथरायांनीं**ही येऊन आपलें स्थान सुशोभित केलें. एकंदर मंडळी सुमारें पंचवीस तीस होती. मंडळी मंदिरांत येऊन बसली असतां तो दिव्यांचा लाल प्रकाश त्यांच्या गंभीर चेहेऱ्यांवर पडल्यामुळें, त्या मंदिरांतील एकंदर भयाणपणामुळें, आणि तेथें पसरलेल्या विल-

क्षण शांततेमुळें हें स्थान स्मशानभूमीप्रमाणें उदास व भयंकर दिसत होतें, व आंत बसलेली मंडळी वेताळ व त्याचा अनुयायी पिशाचगण असावा असें भासत होतें. एकंदरींत ज्या अमंगळ कार्याकरितां ही मंडळी येथें जमली होती त्याला असाच दुश्चिन्हपूर्ण देखावा येथें दिसत होता.

**जयद्रथराय** येऊन आसनावर बसल्यानंतर सर्व मंडळीकडे एकवार दृष्टी फेंकून ह्मणाले, "शूर सरदार व सभ्यगृहस्थहो, ज्या कार्याकरितां आज आपण येथें जमलों आहों त्या कार्यास आतां एकदम सुरुवात करूं या."

जमलेल्या गृहस्थांपैकीं **पशुपतराय** नांवाचा एक प्रमुख सरदार चहूंकडे नजर फिरवून ह्मणतो "सर्व मंडळी अजून येथें जमलेली नाहींत. सरदार **महासेनराय** आणि **शक्तिधरराय** हे अजून यावयाचे आहेत; ते येण्यापूर्वींच–"

**जयद्रथराय** त्याला पुरतें न बोलूं देतांच "ते आतां परत येतील. आपल्यापैकीं जी मंडळी काल येथें होती त्यांस ही गोष्ट विदित आहे कीं, आमचा तरुण सरदार **बालार्कराय** सेनापति यास कांहीं अत्यंत जरूरीच्या व महत्वाच्या कामगिरीकरितां **कुवलयपुरी**स पाठविलेलें आहे; तो परत येण्याची प्रतिक्षणीं वाट पहात आहों. त्याला कोणत्या कामगिरीकरितां पाठविलें आहे हें आपल्यापैकीं थोड्याच मंडळीस ठाऊक आहे व तें सर्वांस कळणें जरूर आहे. आमचे हितचिंतक **बौद्ध**धर्माचे कट्टे अभिमानी, सत्यपक्षाचे खरे पाठींबे, **कालयवन** देशाचे महाप्रतापी राजे महाराज **गूहसिंह** यांनीं आपण उभारलेल्या या कार्यास मदत करण्याचें अभिवचन पूर्वींच दिलें होतें. त्याला अनुसरून त्यांनीं आपल्या विश्वासू हस्तकाबरोबर दहा हजार मोहोरांची रक्कम आपल्याकडे पोंचण्याकरितां रवाना करून दिली आहे. ती काल रात्रीं **कुवलयपुरीं**त सरदार **वसवप्रभू** यांजकडे यावयाची होती, व ती ताबडतोब येथें आणण्याकरितां काल दोनप्रहरीं सरदार **बालार्कराय** यांस येथून रवाना करण्यांत आलें."

ज्या सरदार मंडळीस ही गोष्ट पूर्वीं कळलेली नव्हती त्यांचे तोंडांतून एकदम आनंदाश्चर्याचे उद्गार निघाले. फिरून **जयद्रथराय** ह्मणतो, "**बालार्कराय** आज दोनप्रहरचे आंतच येथें यावयाचा, पण तो अद्याप आला नाहीं यामुळें सर्वांच्याच मनाला थोडी तरी अस्वस्थता वाटणें स्वाभाविक आहे. आमचे मित्र सरदार **शक्तिधरराय** व सरदार **महासेनराय** यांना तर सकाळच्या दहा घटका दिवस आल्यापासून चैनच नाहींसें झालें आहे, व म्हणून ज्या वाटेनें **बालार्कराय** यावयाचा त्या वाटेकडे ते दोघेही थोड्या वेळापूर्वीं घोड्यांवर बसून गेले आहेत. ते दोघे व **बालार्कराय** असे तिघेही इतक्यांत येऊन दाखल होतील. आपल्या या प्रथम दरबारास मीं आजचा दिवस मुद्दाम निवडिला. महाराज **गूहसिंह** यांस आपल्या पक्षाविषयीं किती अभिमान आहे हें महाराजांकडून येणाऱ्या सुवर्णमुद्रारूपी वास्तविक प्रमाणावरून

आपणा सर्वांस आज प्रत्यक्ष कळावें असा माझा हेतु होता.—"

"तर मग" जमलेल्या मंडळीपैकीं एक मध्येंच ह्मणतो, "**बालार्कराय** तें द्रव्य घेऊन लवकरच येथें येतील? वाटेंत त्यांजवर कांहीं संकट ओढवलें नसेल तर ते वेळेस येऊन पोहोंचल्यावांचून कधींच रहावयाचे नाहींत."

"परमेश्वर करो आणि त्याजवर कोणतेंही संकट न येवो," **जयद्रथराय** त्या सरदाराच्या अभद्र शंकेनें कांहींसा दचकल्यासारखा होऊन ह्मणतो. "या कामांत सर्व व्यवस्था इतक्या गुप्त रीतीनें केलेली आहे कीं, कोणत्याही प्रकारें अरिष्ट येऊन गुजरण्याचा बिलकुल संभव नाहीं. त्यांतून **बालार्कराय** हा धूर्त असून शूरही आहे, तेव्हां कांहीं तसाच प्रसंग गुजरल्यास तो त्यांतून कसाही पार पडल्यावांचून रहावयाचा नाहीं. असो; तर मुख्य सांगावयाची गोष्ट हीच कीं, **शक्तिधरराय** व **महासेनराय** हे परत येत तोंपर्यंत आपलें काम तहकूब ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं. आपण ज्या ज्या गोष्टी या प्रसंगीं येथें करणार आहों, त्या सर्व त्या उभयता सरदारांस विदित आहेत आणि त्यांस त्यांचें पूर्ण अनुमोदनही आहे. आजचें मुख्य काम हेंच आहे कीं, आपल्यापैकीं कांहीं मंडळीच्या इच्छेप्रमाणें ही एक पत्रिका तयार केलेली आहे. या पत्रिकेचा हेतु काय हें आपल्यापैकीं कोणासही सांगितलें पाहिजे असें नाहीं. तेव्हां आपण सर्वांनीं हा लेख वाचून यांतील शब्दांचें कोणत्याही कारणावरून उल्लंघन करणार नाहीं अशा शपथा वहावयाच्या आणि या पत्रिकेवर आपापल्या सह्या करावयाच्या. हा लेख सरदार **शक्तिधरराय** व सरदार **महासेनराय** यांस कबूल आहे व ते परत आले ह्मणजे विधिपूर्वक शपथ घेऊन यावर आपापल्या सह्या करतील."

यानंतर सरदार **अर्जुनराय** सर्व मंडळीकडे मोठ्या गंभीर मुद्रेनें पहात बोलतो, "सरदारहो, आपण ज्या कार्याकरितां येथें एकत्र मिळालों आहों तें जसें क्षुद्र नाहीं त्याचप्रमाणें ज्या जाग्यांत आपण बसलों आहों तेंही साधारणापैकीं नाहीं. एका महान् साधूच्या **तपोमंदिरां**त आपण बसलों आहों. त्या साधूचा देह जरी येथें नाहीं, तथापि त्याचे प्राण येथें साक्षीभूत आहेत हें आपण सर्वांनीं ध्यानांत ठेवावें. तो महापुरुष जरी आपणास अदृश्य आहे तरी आपण येथें काय काय करीत आहों व काय काय बोलत आहों, हें सर्व त्यास कळत आहे. ह्मणून मी आपणास सांगतों कीं, जी शपथ आपणास वहावयाची आहे ती अत्यंत महत्वाची आहे. एकवार शपथ वाहिल्यानंतर ती मोडण्यास कोणी उद्युक्त होईल तर ती त्याच्या नाशास व कुलक्षयास कारण होईल. मी अशा रीतीनें तुह्मां सर्वांस सूचवीत आहें याचें कारण या स्थानाचें महत्व काय आहे हें मला पक्कें ठाऊक आहे. या जागीं बसून जें कार्य तुह्मी कराल त्याचा परिणाम तुमच्या श्रद्धेप्रमाणें व बुद्धीप्रमाणें अत्यंत हितकर किंवा अत्यंत

भयंकर होईल हें नीट लक्षांत ठेऊन नंतर आपल्यास जें योग्य वाटत असेल तें करा."

इतकें भाषण करून सरदार **अर्जुनराय** फिरून सर्वांच्या तोंडाकडे पहात स्वस्थ बसला. त्याच्या शब्दांनीं सर्वांच्या मनावर फारच विलक्षण परिणाम झाल्यासारखा दिसत होता. फार तरकाय, प्रत्यक्ष **जयद्रथराय शिलाहार**—ज्याच्या धर्मसमजुती व ज्याची श्रद्धा सोईप्रमाणें हवी तेव्हां हव्या त्या दिशेनें वळत असे——त्या **जयद्रथराया**च्या मुद्रेंत देखील या भाषणामुळें थोडा फरक झाला. मात्र आपल्या मनावर असल्या गोष्टींचा परिणाम कां व्हावा याबद्दल त्याचें तोच आश्चर्य करूं लागला.

मध्यें थोडासा अवकाश जाऊं देऊन **जयद्रथराय** एवढा वेळ ज्या पत्रिकेसंबंधानें बोलत होता त्या पत्रिकेंतील मजकूर त्यानें सर्व मंडळीस वाचून दाखविला. पत्रिकेंतील मुख्य मुद्दे पुढें लिहिल्याप्रमाणें होतेः——

( १ ) या पत्रिकेवर सह्या करणाऱ्या सर्व गृहस्थांनीं परस्परांशीं बंधुत्वानें वागावयाचें.

( २ ) आपण अंगिकारलेल्या या पक्षाचे हिताकरितां पाहिजे त्या वेळीं आपलें तन, मन, धन, अर्पण करण्यास सिद्ध असावयाचें.

( ३ ) भाऊबंद, आप्तइष्ट, पितापुत्र इत्यादि बंधनें सोडून देऊन फक्त अंगिकारलेल्या कार्यासच प्रमुखत्व द्यावयाचें.

( ४ ) जो जो मनुष्य या पक्षाच्या नाशार्थ किंवा ऱ्हासार्थ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें प्रयत्न करील तो कोणीही असला तथापि त्याला एकदम देहांतशिक्षा करावयाची.

( ५ ) या पक्षास एकवार आपलें नांव जोडल्यानंतर स्वहिताकरतां कोणीही गृहस्थ तो सोडण्यास तयार होईल तर तो शत्रु आहे, असें मानून त्यास शासन होईल.

( ६ ) या पक्षाचें धुरीणत्व **महामंडलेश्वर जयद्रथराय** यांजकडे रहावयाचें व त्यांनीं आपल्या बंधुवर्गाच्या अनुमोदनानें सर्व गोष्टी करावयाच्या.

याप्रमाणें या पत्रिकेंतील मुख्य मुख्य कलमें होतीं. या पत्रिकेवर सही करण्याच्या पूर्वीं जी शपथ घ्यावयाची म्हणून ठरलें होतें तीही फारच भयंकर व अमंगळ होती. एकंदरींत ज्या कार्याकरितां या ठिकाणीं हे राजद्रोही गृहस्थ एकत्र मिळाले होते, तें कार्य भयंकर, ज्या ठिकाणीं त्या कार्याचा विचार चालला होता तें स्थानही भयंकर, मग ज्या बंधनानें ते गृहस्थ आपल्यास बांधून घेण्यास सिद्ध झाले होते तें बंधनही तसेंच भयंकर कां असूं नये ?

शपथेचा विधि सुरू झाला. त्या मंदिरांतील मधल्या चौथऱ्यावर प्रथमतः ती पत्रिका ठेविली. त्या पत्रिकेजवळ **उग्रसिंहा**ची ढालतलवार आणून ठेविली. नंतर प्रत्येक सरदारानें पुढें होऊन ठरलेल्या शब्दांचा विधियुक्त उच्चार करून शपथ वहावयाची व त्या पत्रिकेपुढें आणि **उग्रसिंहा**च्या पूज्य शस्त्रापुढें मस्तक लववून नंतर पत्रिकेवर आपली नाममुद्रा करून परत स्थानावर येऊन बसावयाचें, असा क्रम सुरू झाला. सर्व विधि याप्रमाणें शेवटपर्यंत

आपणा सर्वांस आज प्रत्यक्ष कळावें असा माझा हेतु होता.–"

"तर मग" जमलेल्या मंडळींपैकीं एक मध्येंच ह्मणतो, "**बालार्कराय** तें द्रव्य घेऊन लवकरच येथें येतील? वाटेंत त्यांजवर कांहीं संकट ओढवलें नसेल तर ते वेळेस येऊन पोहोंचल्यावांचून कधींच रहावयाचे नाहींत."

"परमेश्वर करो आणि त्याजवर कोणतेंही संकट न येवो," **जयद्रथराय** त्या सरदाराच्या अभद्र शंकेनें कांहींसा दचकल्यासारखा होऊन ह्मणतो. "या कामांत सर्व व्यवस्था इतक्या गुप्त रीतीनें केलेली आहे कीं, कोणत्याही प्रकारें अरिष्ट येऊन गुजरण्याचा बिलकुल संभव नाहीं. त्यांतून **बालार्कराय** हा धूर्त असून शूरही आहे, तेव्हां कांहीं तसाच प्रसंग गुजरल्यास तो त्यांतून कसाही पार पडल्यावांचून रहावयाचा नाहीं. असो; तर मुख्य सांगावयाची गोष्ट हीच कीं, **शक्तिधरराय** व **महासेनराय** हे परत येत तोंपर्यंत आपलें काम तहकूब ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं. आपण ज्या ज्या गोष्टी या प्रसंगीं येथें करणार आहों, त्या सर्व त्या उभयता सरदारांस विदित आहेत आणि त्यांस त्यांचें पूर्ण अनुमोदनही आहे. आजचें मुख्य काम हेंच आहे कीं, आपल्यापैकीं कांहीं मंडळीच्या इच्छेप्रमाणें ही एक पत्रिका तयार केलेली आहे. या पत्रिकेचा हेतु काय हें आपल्यापैकीं कोणासही सांगितलें पाहिजे असें नाहीं. तेव्हां आपण सर्वांनीं हा लेख वाचून यांतील शब्दांचें कोणत्याही कारणावरून उल्लंघन करणार नाहीं अशा शपथा वहावयाच्या आणि या पत्रिकेवर आपापल्या सह्या करावयाच्या. हा लेख सरदार **शक्तिधरराय** व सरदार **महासेनराय** यांस कबूल आहे व ते परत आले ह्मणजे विधिपूर्वक शपथ घेऊन यावर आपापल्या सह्या करतील."

यानंतर सरदार **अर्जुनराय** सर्व मंडळीकडे मोठ्या गंभीर मुद्रेनें पहात बोलतो, "सरदारहो, आपण ज्या कार्याकरितां येथें एकत्र मिळालों आहों तें जसें क्षुद्र नाहीं त्याचप्रमाणें ज्या जाग्यांत आपण बसलों आहों तेंही साधारणापैकीं नाहीं. एका महान् साधूच्या **तपोमंदिरां**त आपण बसलों आहों. त्या साधूचा देह जरी येथें नाहीं, तथापि त्याचे प्राण येथें साक्षीभूत आहेत हें आपण सर्वांनीं ध्यानांत ठेवावें. तो महापुरुष जरी आपणास अदृश्य आहे तरी आपण येथें काय काय करीत आहों व काय काय बोलत आहों, हें सर्व त्यास कळत आहे. ह्मणून मी आपणास सांगतों कीं, जी शपथ आपणास वहावयाची आहे ती अत्यंत महत्वाची आहे. एकवार शपथ वाहिल्यानंतर ती मोडण्यास कोणी उद्युक्त होईल तर ती त्याच्या नाशास व कुलक्षयास कारण होईल. मी अशा रीतीनें तुह्मां सर्वांस सूचवीत आहें याचें कारण या स्थानाचें महत्व काय आहे हें मला पक्कें ठाऊक आहे. या जागीं बसून जें कार्य तुह्मी कराल त्याचा परिणाम तुमच्या श्रद्धेप्रमाणें व बुद्धीप्रमाणें अत्यंत हितकर किंवा अत्यंत

भयंकर होईल हें नीट लक्षांत ठेऊन नंतर आपल्यास जें योग्य वाटत असेल तें करा."

इतकें भाषण करून सरदार **अर्जुनराय** फिरून सर्वांच्या तोंडाकडे पहात स्वस्थ बसला. त्याच्या शब्दांनीं सर्वांच्या मनावर फारच विलक्षण परिणाम झाल्यासारखा दिसत होता. फार तर काय, प्रत्यक्ष **जयद्रथराय शिलाहार**—ज्याच्या धर्मसमजुती व ज्याची श्रद्धा सोईप्रमाणें हवी तेव्हां हव्या त्या दिशेनें वळत असे—त्या **जयद्रथराया**च्या मुद्रेंत देखील या भाषणामुळें थोडा फरक झाला. मात्र आपल्या मनावर असल्या गोष्टींचा परिणाम कां व्हावा याबद्दल त्याचें तोच आश्चर्य करूं लागला.

मध्यें थोडासा अवकाश जाऊं देऊन **जयद्रथराय** एवढा वेळ ज्या पत्रिकेसंबंधानें बोलत होता त्या पत्रिकेंतील मजकूर त्यानें सर्व मंडळींस वाचून दाखविला. पत्रिकेंतील मुख्य मुद्दे पुढें लिहिल्याप्रमाणें होतेः—

( १ ) या पत्रिकेवर सह्या करणाऱ्या सर्व गृहस्थांनीं परस्परांशीं बंधुत्वानें वागावयाचें.

( २ ) आपण अंगिकारलेल्या या पक्षाचे हिताकरितां पाहिजे त्या वेळीं आपलें तन, मन, धन, अर्पण करण्यास सिद्ध असावयाचें.

( ३ ) भाऊबंद, आप्तइष्ट, पितापुत्र इत्यादि बंधनें सोडून देऊन फक्त अंगिकारलेल्या कार्यासच प्रमुखत्व द्यावयाचें.

( ४ ) जो जो मनुष्य या पक्षाच्या नाशार्थ किंवा ऱ्हासार्थ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें प्रयत्न करील तो कोणीही असला तथापि त्याला एकदम देहांतशिक्षा करावयाची.

( ५ ) या पक्षास एकवार आपलें नांव जोडल्यानंतर स्वहिताकरतां कोणीही गृहस्थ तो सोडण्यास तयार होईल तर तो शत्रु आहे, असें मानून त्यास शासन होईल.

( ६ ) या पक्षाचें धुरीणत्व **महामंडलेश्वर जयद्रथराय** यांजकडे रहावयाचें व त्यांनीं आपल्या बंधुवर्गाच्या अनुमोदनानें सर्व गोष्टी करावयाच्या.

याप्रमाणें या पत्रिकेंतील मुख्य मुख्य कलमें होतीं. या पत्रिकेवर सही करण्याच्या पूर्वी जी शपथ घ्यावयाची म्हणून ठरलें होतें तीही फारच भयंकर व अमंगळ होती. एकंदरींत ज्या कार्याकरितां या ठिकाणीं हे राजद्रोही गृहस्थ एकत्र मिळाले होते, तें कार्य भयंकर, ज्या ठिकाणीं त्या कार्याचा विचार चालला होता तें स्थानही भयंकर, मग ज्या बंधनानें ते गृहस्थ आपल्यास बांधून घेण्यास सिद्ध झाले होते तें बंधनही तसेंच भयंकर कां असूं नये ?

शपथेचा विधि सुरू झाला. त्या मंदिरांतील मधल्या चौथऱ्यावर प्रथमतः ती पत्रिका ठेविली. त्या पत्रिकेजवळ **उग्रसिंहाची** ढालतलवार आणून ठेविली. नंतर प्रत्येक सरदारानें पुढें होऊन ठरलेल्या शब्दांचा विधियुक्त उच्चार करून शपथ वहावयाची व त्या पत्रिकेपुढें आणि **उग्रसिंहाच्या** पूज्य शस्त्रापुढें मस्तक लववून नंतर पत्रिकेवर आपली नाममुद्रा करून परत स्थानावर येऊन बसावयाचें, असा क्रम सुरू झाला. सर्व विधि याप्रमाणें शेवटपर्यंत

झाला. **जयद्रथरायानें** जमलेल्या सर्व गृहस्थांच्या नांवाची एक स्वतंत्र यादी स्वतः तयार केली व तीही त्या मुख्य पत्रिकेजवळ ठेविली. ती पत्रिका व ती यादी त्या मंदिरांतील **उग्रसिंह** तपोनिधीच्या आत्म्याच्या स्वाधीन करून ठेवावयाची असें ठरलें होतें. शपथेचा विधि आटपतो तोंच एक हुजऱ्या द्वाराशीं आला. त्याला दार उघडून आंत घेतांच, तो **जयद्रथरायास** प्रणाम करून ह्मणाला, " महाराज, बाहेर एक सरदार आले आहेत व आतांच्या आतांच सरकारची भेट व्हावी असें ह्मणतात. "

" तो कोण आहे बरें ? त्यानें आपलें नांव गांव सांगितलें नाहीं काय ? " **जयद्रथराय** विचारतो.

" जी सरकार, सांगितलें. देवडीवाल्यानें मला ' **महेश्वरकर कुमुदबंधुराय** ' असें नांव कळवावयास सांगितलें." हुजऱ्या उत्तर करतो.

' **महेश्वरकर कुमुदबंधु** ' एवढीं अक्षरें त्या हुजऱ्याच्या तोंडून बाहेर पडतांच सर्व मंडळींत एकदम हालचाल झाली, व सर्व त्या हुजऱ्याकडे विशेष लक्षपूर्वक पाहूं लागले. **अर्जुनराय बहुभुजांचे** वडील चिरंजीव **मेघनादराय** याच्या उतावीळ स्वभावास मुळींच दम निघेना. तो एकदम आनंदानें व उत्साहानें ओरडला, " वहाव्वा वहाव्वा, हा तर परमेश्वरी नेमानेम दिसतो! आरंभालाच असा बळी ! असला शत्रु आपण होऊन आमच्या दाढेंत येऊन शिरल्यावर मग आणखी काय पाहिजे ! "

" बस्स, त्याला ताबडतोब देहांतशिक्षा देऊन टाकूं या ! अगदीं ताबडतोब ! ह्मणजे या सुमुहूर्तावरच आपल्या इष्टकार्यास आपण आरंभ केल्यासारखें झालें! आणि हें काम या हातांनीं व्हावें अशी माझी इच्छा आहे. " **मेघनादाचा** धाकटा भाऊ आपल्या भावाची पुरवणी करून असतन्या सारीत आवेशानें ह्मणाला.

" मित्रहो, थोडे शांत व्हा!" **जयद्रथराय** त्या दोघां तरुण गृहस्थांकडे गंभीरपणें पहात ह्मणतो, " ही गोष्ट फार महत्वाची आहे यांत शंका नाहीं. पण हा सरदार कां आला आहे व कोणाकडून आला आहे हें प्रथम कळलें पाहिजे. "

" तें कशाला पाहिजे ?" **अर्जुनरायाचे** दोघेही मुलगे एकदमच ओरडून ह्मणाले, " तो कोणाकडूनही आला असो किंवा कशाकरतांही आला असो, तो आमचा शत्रु आहे एवढी गोष्ट खरी आहे ! आणि ह्मणून त्याला देहान्तशासन झालेंच पाहिजे. आपण सर्वांनीं आतांच जी शपथ वाहिली ती आतांच्या आतांच खरी करून दाखविली पाहिजे.

" बरोबर आहे तुह्मी ह्मणतां तें. " **जयद्रथरायाच्या** मुद्रेंत थोडा फरक पडून तो बोलतो, " अरे, तूं जा आणि **महेश्वरकर** सरदारास इकडे घेऊन ये. "

---

## भाग १७ वा.

( तपोमंदिरांतील पिशाच. )

या राजद्रोही बंडखोर सरदारांच्या दरबारांत **कुमुदबंधूस** आणून उभें करण्याच्या अगोदर **गोलदुर्गा**च्या देवडीवर तो येऊन पोंचला त्या वेळच्या कांहीं गोष्टी अगदीं सामान्य असूनही सांगून ठेवणें अवश्य आहे.

आमचा सरदार **गोलदुर्गा**च्या देवडीकडे घोडा दवडवीत येतांना दिसतांच दोन तीन सशस्त्र शिपाई एकदम देवडीच्या पुढें होऊन उभे राहिले. **कुमुदबंधूनें** घोडा थांबविला आणि लागलीच त्या शिपायांस प्रश्न केला, " **महामंडलेश्वर जयद्रथराय** या वेळीं कोठें आहेत? त्यांची ताबडतोब भेट होईल काय ? "

पहारेकरी शिपायांपैकीं एक इसम प्रश्नाचा जबाब द्यावयाचें टाळून **कुमुदबंधूस** उलट प्रश्न करतो, " महाराज आपण कोण ? "

" मला **कुमुदबंधुराय महेश्वरकर** म्हणतात, " सरदारानें उत्तर केलें. " **जयद्रथरायांस** माझें नांव ठाऊक आहे. "

**कुमुदबंधूनें** हें नांव उच्चारतांच त्या शिपायांच्या मनावर जो परिणाम झाला तो त्यांच्या चेहेऱ्यावर तेव्हांच दिसला. आणि त्या नांवानें त्यांना एकदम चकित करून टाकावें यांत नवल तरी काय ? **कुमुद्वती**-राणीची स्वारी **गिरिद्वाराहून कुवलयपरीस** जात असतां वाटेंत तिजवर छापा घालून तिला कैद करण्याचा **जयद्रथराया**चा आटोकाट बेत मोठ्या शिताफीनें कोणीं मोडून काढिला, हें **जयद्रथराया**च्या सैन्यापैकीं कोणास आतां कळावयाचें राहिलें होतें असें नाहीं. तेव्हां हा गृहस्थ अशा रीतीनें प्रत्यक्ष सिंहाच्या गुहेंत एकटाच येण्यास सिद्ध झाला हें पाहून त्या शिपायांस आश्चर्य वाटणें हें अगदीं स्वाभाविक होतें. पण पहिला आश्चर्याचा झटका नाहींसा होतांच त्या शिपायांच्या मुद्रेंत बराच उग्रपणा आला. त्यांच्या चेहेऱ्यांत झालेला फरक **कुमुदबंधूस** दिसून आला, पण त्यानें तोंडांतून एकही अधिक शब्द काढला नाहीं, किंवा आपल्या मुद्रेंत एक काडीइतकाही फरक होऊं दिला नाहीं. तो पूर्णपणें बेफिकीर व निर्भय असल्यासारखा दिसत होता. मात्र तसाच प्रसंग आला असता आणि त्या शिपायांनीं भलतासलता विचार मनांत आणला असता तर आपल्या डाव्या मांडीशीं असलेली तलवार म्यानाबाहेर ओढण्यास त्याला अवकाश लागला असता असें नाहीं.

"महाराज, आपला निरोप **अर्जुनराय** महाराज यांजकडे पोंचून त्यांची परवानगी येईपर्यंत आपण आंतल्या चौकांत यावें. " चौकीवरील पहारेकऱ्यांचा नाईक ह्मणतो.

**कुमुदबंधु** दरवाजांतून आंतल्या पटांगणांत घोडा घेऊन गेला, व तेथें खालीं उतरून ह्मणतो, " अहो नाईक, तुमचे यजमान **अर्जुनराय** यांजकडे माझें काम नाहीं. **महामंडलेश्वर जयद्रथराय** येथें आहेत ही गोष्ट मला न कळविण्याची

खबरदारी तुह्मी घेत अहांत हें मला कळलें; पण ते या घटकेस खचित या कोटाच्या आंत आहेत अशी मला पक्की बातमी नसती तर मी इतक्या तांतडीनें येथें आलोंही नसतों. असो, तुमच्या तऱ्हेनेंच कां होईना, **जयद्रथरायांस** मी आल्याचें लवकर कळून त्यांजकडून कायतो जबाब आला ह्मणजे पुरे आहे. "

त्या नायकास **कुमुदबंधूचें** हें भाषण फारसें गोड लागलें असें नाहीं. पण त्याला कांहीं प्रत्युत्तर न देतां त्यानें एका हुजऱ्यास बोलावलें आणि त्याच्या कानाशीं तो कांहीं पुटपुटला, त्याबरोबर तो हुजऱ्या पलीकडील कमानींतून **तपोमंदिराकडे** धांवत गेला.

लागलीच **कुमुदबंधु** त्या नायकाकडे वळून ह्मणतो, "कांहो, नाईक, बराच प्रवास केल्यामुळें थकून गेलेल्या प्रवाशाचें थोडेंसें तरी आतिथ्य करण्याची तुमच्या या किल्ल्यांत चाल असेल, नाहीं बरें? माझ्या या घोड्यानें मला सकाळपासून वीस कोस तरी आपल्या पाठीवर वाहून आणलें आहे. तेव्हां याला क्षणभर स्वस्थ उभें राहण्यास जागा, प्यायला थोडें पाणी, व पुढें टाकण्यास एक गवताची पेंढी देण्यास तुह्मी नाहीं ह्मणणार नाहीं? कदाचित् तबेल्यापर्यंत येण्यास तुह्मांला हरकत वाटत असेल तर कोणीकडून जावयाचें तेवढें जरी मला सांगितलें तरी पुरे. माझ्या घोड्याची मोतद्दारी करण्यास मला कांहीं शंका वाटावयाची नाहीं. "

इतक्या स्पष्ट रीतीनें व खुल्या दिलानें **कुमुदबंधु** बोलतांच त्या नायकास स्वाभाविकतःच थोडीशी शरम वाटली. तथापि आमच्या सरदाराच्या विनंतीस त्यानें मोठ्या संतोषानें किंवा उत्साहानें मान दिला असें मात्र नाहीं. त्यानें नाखुषीनेंच एका मोतद्दारास हांक मारली आणि **कुमुदबंधूच्या** घोड्यास तबेल्यांत नेण्यास सांगितलें.

" नाईक, तुमची परवानगी असेल तर घोडा तबेल्यांत नेऊन बांधीपर्यंत मी स्वतःच तबेल्यापर्यंत जातों. " **कुमुदबंधु** ह्मणतो.

" सरदारसाहेब, आपला निरोप घेऊन गेलेला हुजऱ्या परत येईपर्यंत आपण येथेंच थांबावें हें बरें. " नायकानें थोड्या अधिकारयुक्त स्वरानें ह्मटलें.

" फार बरें. " **कुमुदबंधु** शांतपणें उत्तर करतो, " माझा जाण्याबद्दल आग्रह आहे असें नाहीं. माझ्या घोड्याला थोडीशी वाईट खोड आहे. कोणी परका मनुष्य त्याच्या तोंडांतील लगाम काढूं लागला किंवा त्याच्या पाठीवरील सामान उतरूं लागला तर तो चावण्यास धांवतो आणि दुलाची करतो. तोच मी असलों ह्मणजे त्याच्याइतकें गरीब जनावर दुसरें नाहीं. एवढ्याकरितां मी जातों ह्मटलें. "

" तसें असेल तर, सरदारसाहेब, आपण चलाच तबेल्यापर्यंत. " नाईक ह्मणाला. लागलीच पलिकडील पहारेकऱ्यांकडे वळून हळूच, पण आमच्या सरदारास ऐकूं जाईल अशा बेतानें तो फिरून ह्मणतो, " या महाराजांनीं स्वतः आमच्या पक्षाचें आजपर्यंत पुष्कळ नुकसान केलें आहे. आणखी यांच्या घोडोबांनीं आमच्या मोतद्दारांना टापा मारून

त्यांचीं डोकीं फोडून यजमानाच्या कृत्यांस भर घातली पाहिजे असें नाहीं ! "

**कुमुद्बंधूनें** घोडा मोतद्दाराच्या हातीं दिला आणि त्याच्याबरोबर तो तबेल्याकडे गेला. तबेला वाड्याच्या एका बाजूस होता. तबेल्याची इमारत मोठीशी चांगली होती असें नाहीं. कोटाच्या एका भिंतीस लागून एक बराच लांबीचा सोपा उतरलेला होता. ठाणांच्या दरम्यान पडद्या किंवा फळ्या वगैरे घालून प्रत्येक घोड्यास निरनिराळी अशी जागा केलेली नव्हती. फक्त दोन ठाणांच्या मध्यें दोन दोन लांकडी सर बांधून टाकले होते. तबेल्याजवळची जागाही स्वच्छ ठेवलेली नव्हती. जवळच घोड्यापुढून झाडून काढलेल्या कचऱ्याच्या राशी पडल्या होत्या. मोतद्दारांनीं जिकडे तिकडे राखरडाही बराच माजविला होता. **कुमुद्बंधु** तबेल्याजवळ जाऊन पहातो तों आंत ओळीनें तीस चाळीस घोडे बांधलेले होते. घोड्यांच्या पुढच्या बाजूस त्यांचीं सामानें टांगून ठेविलीं होतीं, तीं बरींच मौल्यवान् दिसत होतीं. घोडेही सर्व उमदे होते. **कुमुद्बंधु** मनांत ह्मणतो " हां, समजलें, आज येथें सर्व बंडखोर सरदार जमले असावेत; आतां उघडपणें युद्ध सुरू करण्याची वेळ आली आहे, तेव्हां पुढील सर्व बेत व व्यवस्था ठरविण्याकरतां आज हे येथें जमले असतील."

मोतद्दारानें घोडा तबेल्यांत नेला व तबेल्याच्या आरंभाशींच दोन घोड्यांचीं ठाणें रिकामीं होतीं, त्यांपैकीं पहिल्यांत नेऊन उभा केला. घोड्यास उभा करून तो ह्मणतो, " महाराज, घोडा द्वाड आहे ह्मणून मघां आपण बोलला, तर कृपा करून आपण थोडे जवळच उभे रहा आणि मला काय करावयाचें तो हुकूम करा. नाहीं तर माझ्या गरिबाच्या अंगाचा एकादा लचका निघायचा किंवा एकादी टाप मिळून डोकें फुटायचें ! "

" तूं हुशार दिसतोस. कोणत्याही नव्या जनावराजवळ जातांना नेहमीं अशीच काळजी घेतली पाहिजे. बरें तर, तूं जा आणि घोड्याकरितां थोडें पाणी आणि गवत आण, तों त्याची लगाम मीच काढतों. त्याला पायबंद वगैरे लावण्याचें मुळींच कारण नाहीं. मात्र एवढें लक्षांत ठेव कीं, मी जवळ नसतांना त्याच्या जवळपास जाऊं नको. "

**कुमुद्बंधूनें** घोड्याची लगाम काढून समोरच भिंतीवरील एका खुंटीवर ठेविली; व त्याच्या ओरकीस एक काढणी लावून भिंतींतलि कडीस ती गुंतवून टाकिली. घोड्याच्या पाठीवरील सामान मात्र जसेंच्या तसेंच राहूं दिलें. इतक्यांत मोतद्दार पाणी घेऊन आला. घोड्याला पाणी दाखवून झाल्यावर व त्याच्यापुढें गवताच्या पेंढ्या टाकल्यावर **कुमुद्बंधु** तबेल्यांतून परत वळला तों वाटेंतच त्याला आंत निरोप घेऊन गेलेला हुजऱ्या भेटला. हुजऱ्यानें **कुमुद्बंधूस** पाहतांच तो मोठ्या गंभीर मुद्रेनें व आदरानें ह्मणतोः– " महाराज, चलावें मजबरोबर. **महामंडलेश्वर** महाराज **तपोमंदिरांत** आहेत व तिकडेच आपणास घेऊन येण्याची त्यांनीं मला आज्ञा केली आहे. "

" काय **तपोमंदिरांत** ? " **कुमुद्बंधु** आश्चर्यानें प्रश्न करतो.

" या **गोलदुर्गा**च्या आवारांत असा तपोनिष्ट साधु तरी कोण आला आहे आणि **जयद्रथरायां**ची स्वारी तेथें कां? का वाड्यांतील एखाद्या दिवाणखान्यास **तपोमंदिर** हें नांव थट्टेनें दिलेलें आहे ? "

" महाराज, आपण या प्रांतांत यापूर्वी कधींच आला नाहींत ह्मणून असें विचारतां. " हुजऱ्या उत्तर करतो. " फार वर्षांपूर्वी महाराज **उग्रसिंह** ह्मणून **गोलदुर्गा**चे एक मालक होऊन गेले. ते महाप्रतापी होते; कोणत्याही युद्धांत पराभव ह्मणून त्यांना ठाऊकच नाहीं; वृद्धपणीं त्यांनीं सर्वसंगपरित्याग केला आणि सर्व सुखोपभोग तुच्छ मानून ते परमार्थसंपादनास लागले—"

" पुढें ते बहुतकरून या **तपोमंदिर** नांवच्या जाग्यांत असतांना निवर्तले असतील ? " **कुमुदबंधु** त्याला मध्येंच प्रश्न करतो.

" नाहीं महाराज. " हुजऱ्या उत्तर करतो, " **तपोमंदिर** हें स्थान जरी अगदीं एकाद्या तळघराप्रमाणें आहे व वाड्याच्या अगदीं एका अंगास आहे तरी तेथें राहिल्यानें खरा एकांतवास होत नाहीं असें वाटून **उग्रसिंह** महाराजांनीं येथून दोन तीन कोशांवर एक अरण्य आहे तेथें एक गुहा तयार करवून त्या गुहेंत जाऊन ते राहिले व तेथें त्यांचा शेवट झाला. पण अद्यापि केव्हां केव्हां **तपोमंदिरां**त येऊन ते दर्शन देतात असें सांगतात. "

" तर मग शेवटपर्यंत ते या **तपोमंदिरां**त राहिले नाहींत ? " **कुमुदबंधु** फिरून विचारतो

" नाहीं महाराज. येथून सुमारें तीन कोशांवर त्यांची गुहा आहे, त्या गुहेचें नांव देखील **उग्रसिंहगुहा** असें आहे. या प्रांतांत सर्व लोक त्या गुहेस फारच पूज्य मानतात. "

" बरें तर आपल्यास ती गुहा परत जातांना पाहिली पाहिजे. " **कुमुदबंधु** ह्मणतो.

**कुमुदबंधू**चे हे शब्द ऐकून त्या हुजऱ्यास फार वाईट वाटलें. तो **तपोमंदिरां**त गेला असतां तेथें झालेलीं भाषणें त्यानें ऐकिलींच होतीं. तेव्हां **कुमुदबंधु** प्राणानिशीं **गोलदुर्गा**च्या बाहेर पडेल अशी त्याला मुळींच आशा नव्हती. **कुमुदबंधू**शीं एवढा वेळ झालेल्या भाषणावरून तो चांगला गृहस्थ असावा अशी मात्र या हुजऱ्याची पक्की खात्री झाली होती.

तो कष्टी मनानें आपल्याशींच ह्मणतो " अरेरे ! आपलें आयुष्य फक्त कांहीं घटका किंवा कदाचित् कांहीं पळेंच उरलें आहे, हें या बापड्या सरदारास काय ठाऊक ! या किल्ल्याच्या टोंकाबाहेर पडण्याची आतां आपल्यास मुळींच आशा नाहीं हें याच्या स्वप्नींही नसेल ! बाबारे, आतां **उग्रसिंह** महाराजांच्या गुहेचें दर्शन घेण्याची आशा व्यर्थ कशाला धरतोस ? **उग्रसिंह**-महाराजांच्या **तपोमंदिरां**तच तुझा आज बळी पडणार ! "

या हुजऱ्याच्या मनांत हे विचार चालले असतां **कुमुदबंधू**च्या मनांत दुसरे कांहीं विचार चालले होते. पण हुजऱ्या पुढें व **कुमुदबंधु** त्याच्यामागून असे दोघेही थो-

# विक्रीस तयार.

## मुंबई हेमंतव्याख्यानमाला.

अनेक विद्वान, बहुश्रुत, अनुभवी गृहस्थांनीं निरनिराळ्या विषयांवर दिलेलीं, माहितीनें भरलेलीं, उन्नत विचारांनीं व कल्पनांनीं परिप्लुत, मनोरंजनाचें व मनोविकासाचें उत्कृष्ट साधन अशीं

सन १८८९ ते १८९३ या ५ सालांतील

## एकोणतीस व्याख्यानें.

एकदम घेणारांस किं. रु० ३, पो. ।॥-

ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म किंवा वेद व वैदिक धर्म.—प्रो० भागवतकृत ०४ ०॥

आमचे कलाकौशल्यांत सुधारणा करण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत?—मि० के० बा० पेठेकृत ०२॥ ०॥

धर्मौदार्य.—वे० शा० रा० बाळ यज्ञेश्वरशास्त्री गुरजरकृत ............... ०१। ०॥

स्थावरजंगमात्मक सृष्टीविषयीं माहिती. डा० बा० काणे एल. एम. अॅन्ड एस. कृत ०२ ०॥

प्रयागांतील राष्ट्रीयसभेची हकीकत. डा. स० बा० काणे, एल. एम. अॅन्ड एस. कृत ...................... ०१। ०।

मोगल व मोगलीधर्म.—प्रो० रा० रा० भागवतकृत. ... ... ... ...०१॥ ०॥

दारू पिणें.—रा. सा. बा० आ० गुप्तेकृत ०१ ०॥

आमची धर्मादाय पद्धती—ज. द्वा. कोल्हटकरकृत. ... ... ... ...०१॥ ०॥

युरोपच्या इतिहासापासून आपल्या लोकांनीं काय शिकावें.—रा० सा० बा० आ० मोडककृत ............. ०१॥ ०॥

जलधिजवर्णन.—डा० कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, सरजन मेजर, ठाणें कृत ०३ ०॥

अॅटिकार्न लॉ-लीग .............. ०१ ०॥

सोनें रुपें यांचा हिंदुस्थानांत खप—बा० गो. भांडारकरकृत................०१ ०॥

पार्स व पार्सीधर्म प्रो. भागवतकृत ... ०२। ०॥

षड्दर्शनसारनिरुक्ति—(षड्दर्शन व नास्तिकमतप्रदर्शन)—महामहोपा. भीमाचार्य झळकीकरकृत...........०२॥ ०॥

आमची प्राचीन स्थिति, प्राचीन कायदे व त्यांचें बंधन रा. रा. म. बा. भट बी. ए. एल्‌ एल्. बी. कृत ०२ ०॥

शरीरसामर्थ्य—डा० मो. गो. देशमुखकृत ०१॥ ०॥

मध्यप्रदेशाची संक्षिप्त माहिती—का. त्रिं. खरेकृत ..................... ०२ ०॥

हिंदुसमाजसुधारणा—रा० रा० रामचंद्र गोविंद तळवलकरकृत ........०३। ०॥

इतिहासाची पुनरावृत्ति—रा. रा. रा. ग. मुंडले बी. ए. एल्‌ एल्. बी. कृत ०१॥। ०॥

आमची देशीभाषा विद्यापीठीं शोभण्यासारखी आहे कीं नाहीं? प्रो० रा. रा. भागवतकृत...........०२

ब्रिटिश राज्यव्यवस्थेची वाढ व तिचें सांप्रतचें स्वरूप.—प्रो० द्वा. ग. पाध्ये एम्. ए. कृत .................. ०२

कै० वा० बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांचें चरित्र.—रा० रा० बा. ना. देवकृत........................ ०२॥

इंद्रियविज्ञानविचार.—डा० कान्होबा रणछोडदास कीर्तिकरकृत......... ०१॥ ०॥

रोगबीजविध्वंस.—डा० कृष्णराव विश्वनाथ धुरंधरकृत .................. ०१ ०॥

शिवछत्रपतीच्या चरित्रांतील कित्येक मुद्दे.—प्रो० भागवतकृत............ ०१॥ ०॥

समाज, शंकराचार्य, व सुधारक. रा. पेठेकृत........................०२॥ ०॥

आकाशसौंदर्य.—आ. स. दळवी, एम्. ए. कृत..............................०१॥ ०॥

पाश्चात्यांच्या समागमाचे परिणाम. पु० प० खरे बी. ए. एलएल्. बी. कृत ०२॥ ०॥

कराचे सामान्य नियम—वि. कृ. भाटवडेकरकृत........................ ०१॥ ०॥

**आर्यभूषण प्रेस, पुणें.**

# नाट्यकथार्णव.

**वर्गणी थोडी ह्मणजे वर्षास अवघे तीन रुपयेच ( आगाऊ देण्याचे ); आंतील मजकूर वाचनीय, मनोरंजक आणि समजणारास बोधपर; शेक्सपियर वगैरे कविकुलमुकुटमणींच्या सर्वमान्य ग्रंथांतील स्वारस्य महाराष्ट्रभाषा जाणणाऱ्या वाचकांस मिळविण्याचें उत्तम साधन.**

संसाराच्या दगदगीनें, कामकाजाच्या ओझ्यानें, उद्योगधंद्याच्या जिगजिगीनें, जगांतील अनेक अडचणींच्या व दुःखकारक प्रसंगांच्या पीडेनें ज्याचा जीव वैतागून गेला असेल, ज्याला घटकाभर या साऱ्या आधिव्याधि व उपाधि विसरून जाऊन केवळ आनंदसागराच्या तळीं बुडी मारून बसायचें असेल, त्यानें लोकप्रिय **नाट्यकथार्णव** मासिकपुस्तकाच्या वर्गणीदारांत आपलें नांव घालवावें.

हल्लीं मासिकपुस्तकाचे अंक वेळच्या वेळीं निघत असतात. नवीन व्यवस्थेखालीं हें मासिकपुस्तक निघूं लागल्यापासून त्यांत पुढें लिहिलेलीं नाटकें संपूर्ण आलीं.

१. **त्राटिका नाटक**—महाकवि **शेक्सपियर**कृत **टॅमिंग् आफ दी श्र्यू** नाटकाच्या आधारें **प्रो० वासुदेवराव केळकर**, बी. ए. यांनीं रचिलेलें ..............१०० पृष्ठें.

१. **वीरमणी** आणि **शृंगारसुंदरी**—महाकवि **शेक्सपियर**कृत **ॲन्टनी ॲन्ड क्लिओपॅट्रा** नाटकाच्या आधारें **प्रो० वासुदेवराव केळकर**, बी. ए. यांनीं रचिलेलें. ९२ पृष्ठें.

**लटपटच्या पद्या**—( तीन अंकी प्रहसन ) एका इंग्रजी नाटकाच्या आधारें **प्रो० केळकर** यांनीं रचिलेलें ...... ................................ ६० पृष्ठें.

याशिवाय हल्लीं **पानिपतचा दुर्दैवी मोहोरा** हें नवीन ऐतिहासिक व वीररसात्मक दुःखपर्यवसायी सुरू झालें आहे. **कुवलयपूरची राणी कुमुद्वती** या नांवाची कादंबरी थोर व सद्गुणी स्त्रीपुरुषांच्या चरित्रानें भरलेली मनोरम स्थलादिकांच्या वर्णनांनीं सजविलेली, चटकदार प्रसंगांचा केवळ खजिनाच अशी चालू आहे.

हल्लीं असलेल्या व नवीन होणाऱ्या वर्गणीदारांकरितां **एक नवीन व्यवस्था** योजिली आहे. ज्यांच्याकडून **नाट्यकथार्णवा**च्या वर्गणीची मागील सर्व बाकी आणि पुढील सालची आगाऊ वर्गणी येत्या दिजंबरअखेरपर्यंत आली असेल आणि जे सदर मुदतीच्या आंत आगाऊ वर्गणी भरून वर्गणीदार होतील त्यांस हल्लीं छापत असलेलें **एक नवीन नाटकाचें पुस्तक** नजर करण्यांत येईल.

आर्यभूषण प्रेस,
पुणें.

**हरी नारायण गोखले.**
म्यानेजर नाट्यकथार्णव.

---

नारायण लक्ष्मण फडके, बी. ए. कृत

## स्वातंत्र्य.

किं० १८. पोस्टेज ०२

म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें

## संगीत मृच्छकटिक.

किं० ०१२ आणे. ट० ख० ०२.

पुणें, आर्यभूषण छापखाना.

पुस्तक ७. ॥ श्री ॥ अंक १२.

# नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

## NATYA-KATHARNAVA

A MONTHLY MAGAZINE

*Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.*

---

**विषय.** **अनुक्रमणिका.** **पृष्ठें.**

पानिपतचा दुर्दैवी मोहरा. ... ... ... ... ... ... ४९ पासून ६४
कुवलयपूरची राणी कुमुद्वती.... ... ... ... ... ... २८१ ,, २९६

---

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत छापिलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ६ आणे.

[ वर्गणी वर्षास आगाऊ रु० ३. मागाहून ३॥. शिवाय ट.हं. ६ आणे.

डिसेंबर १८९३.

पत्ता—" आर्यभूषण प्रेस " पुणें.

# विक्रीस तयार.

## त्राटिका नाटक.

महाकवि शेक्सपिअरकृत टेमिंग आफ् दी श्र्यू नाटकाच्या आधारें प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए., यांणीं लिहिलें.

**या नाटकांत हास्यरस पूर्ण भरला आहे.**

किंमत ०६ आणे ट० हं० ०१ आणा.

म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.

## लटपटच्या पद्या

### प्रहसन.

प्रो. वा० वा० केळकर, बी. ए., कृत

कि० ०४. ट० ख० ०१.

आर्यभूषण प्रेस, पुणें.

## रिचर्ड कॉब्डेन याचें चरित्र.

चिंतामण गंगाधर भानु बी. ए. प्रोफेसर, फर्ग्यूसन कालेज पुणें, यांनीं लिहिलें.

रिचर्ड काब्डेन, ब्राइट साहेबांचा साथीदार, यां
इंग्लंडच्या इतिहासांत लोककार्यदक्षतेविषयीं व पंर
हिततत्परतेविषयीं अमर कीर्ति मिळविली आ
इंग्लंडच्या व्यापाराची वाढ अनेक प्रतिबंधक का
यांनीं खुंटविली होती, ती यांनीं जिवापाड मेहन
घेऊन लोकांचे व राज्यकर्त्यांचे भ्रम दूर करून मो
कळी केली. राष्ट्रीय हिताची कळकळ बाळगणारां
स्वकार्यसिद्धीसाठीं देशसेवेला कसें तनमनधन अर्प
केलें पाहिजे, अश्रांत देह झिजविला पाहिजे, मम
टाकलें पाहिजे हें या चरित्रवाचनापासून चांग
कळेल. किंमत १० आणे. ट० हं० एक आणा.

म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.

## सद्गुणमंजरी

(एका हतभाग्य स्त्रीचें चरित्र).

बांधणी कापडी पुठ्ठ्याची, सुरेख, मजबूत, वर नांव
सोनेरी अक्षरांचें. गणेश जनार्दन आगाशे, बी. ए.
कृत. रा० ब० विष्णु मोरेश्वर भिडे यांची गतभर्तृका
कन्या आवडाबाई इचें हें चरित्र अनेक कारणांनीं
वाचण्यासारखें झालें आहे. लहानपणींच वैधव्यरूपी
दारुण प्रसंग आल्यामुळें तिचें मन गंभीर झालें होतें.
त्रिविध जनांच्या नानाप्रकारच्या अनुकूल प्रतिकूळ
टीकेला पात्र झाली असतांही जिनें आपल्या मनाची
समता व शांतता बाह्यतः तरी कायम राखून उलटें
आपल्या आप्तस्वकीयांचें शांतवन करावें, शिक्षणा-
च्या योगें जिच्या मनावर कोणत्याही प्रकारचा वि-
परीत परिणाम न होतां उलट जिनें आपल्या प्रगल्भ
व रास्त विचारांनीं पोक्त लोकांसही थक्क करून सो-
डावें-अशा केवळ दुःखाचा भार वाहण्याकरितांच
या जगांत जन्मलेल्या तथापि आपला दुःखभार नि-
मूटपणें वाहून दुसऱ्याची सुटका करणाऱ्या अल्पकाल
या जगांत राहूनही पुष्कळांस चटका लावून टाक-
णाऱ्या एका स्त्रीचा जीवनवृत्तांत सुहृदय वाचकांनीं
अवश्य वाचण्यासारखा आहे.

यांत चरित्रनायिकेनें लिहिलेल्या रोजनिशींतील व
तिनें प्रिय मैत्रिणींस धाडलेल्या पत्रांतील उतारे दिले
आहेत. यायोगें तिचें अंतःकरण किती कोमल, किती
पापभीरु, किती विवेकी, किती शांत व किती न्यायी
होतें हें स्पष्ट दिसेल. किंमत ८ आणे, ट० हं० १ आणा.

आर्यभूषण छापखाना, पुणें.

मध्य प्रदेशांतील प्रसिद्ध दरोडेखोर

## तंट्याभिल्ल

### याचें मनोरम व बोधपर चरित्र

किं. ०२०६, ट. ख. ००६

आर्यभूषण प्रेस, पुणें.

नारायण लक्ष्मण फडके, बी. ए. कृत

## स्वातंत्र्य

कि० १०८. पोस्टेज ०२

म्यानेजर आर्यभूषण प्रेस, पुणें.

## संगीत मृच्छकटिक.

किंमत ०१२. आवृत्ति तिसरी. ट० ख० ०१.

आर्यभूषण छापखाना, पुणें.

नव्हे तुमचं म्हणणं? पण काय सांगू बाबासाहेब, तुम्हांला उजव्या दंडांत–पण पाहूं ती कुठेशी लागली ती गोळी ( जनकोजीच्या उजव्या दंडास दोन्ही हातांनीं धरून वस्त्रं काढून पाहतो व त्या जखमेवर पट्टया बांधलेल्या पाहून ) हाय हाय, कोणा दुष्टाचा हात वाहवला? मी जर त्यावेळीं हजर असतों तर त्या दुष्टाच्या हाताचे पैशा पैशा एवढे तुकडे केल्याशिवाय परतच आलों नसतों.

**जनको०**–असूं दे, आतां काय त्याचं!

**बळ०**–आतां काय त्याचं? नाहीं. या जखमेला मला एक चांगलं मलम ठाऊक आहे! ( त्वेषानें ) तें बनवायचाच काय तो अवकाश. एकदां बनिवलं कीं जखम काय एका रात्रींत भरून येते!

**जनको०**–( आशेला येऊन ) काय इतकं उत्तम मलम आपल्याला ठाऊक आहे म्हणतां?

**बळ०**–हो हो, ठाऊक आहे म्हणजे?

**जनको०**–तर मग आपण आलांत हें एक प्रकारानं बरंच झालं! तुम्हांला येण्याची त्या परमेश्वरानंच बुद्धि दिली म्हणायची! असो; आमचा जर भोग सरला असेल तर तुम्हांलाहि तशी बुद्धि झाली असेल. पण तुम्ही असं म्हणतां तें कोणतं मलम तें सांगा पाहूं. सध्यां वैद्यबोवा जे मला लावीत आहेत तें, आणि हें तुमचं हीं दोन्ही एकच आहेत कीं काय पाहूं?

**बळ०**–छे: आमचं मलम त्या तुमच्या वैद्यबोवांना कोठून ठाऊक असणार?

**जनको०**–पण तें वनस्पतीचं आहे कीं आपलं कांहीं रसायण आहे?

**बळ०**–छेहो, रसायण कोठून घेऊन बसलांत? निव्वळ निव्वळ वनस्पतीचं.

**जनको०**–पण ज्या वनस्पतीचं हें केलं आहे–ती वनस्पति तरी कशी असते?

**बळ०**–"ती वनस्पति कशी असते," म्हणतां? ती वनस्पति अगदीं थेट मनुष्याच्या आकारासारखीच असते. आपल्याला जसे दोन पाय तसे त्याला दोन बुंधे असतात. आपल्या पावलांना जशीं पांच पांच बोटें तशीं त्याच्या बुंध्याशीं पांच पांच मुळ्या फुटलेल्या असतात. जशी आपली कंबर असते तशाच प्रकारचा त्या वृक्षाचा मध्यभाग असतो, व पुढें आपल्या पोटाप्रमाणें तो जाड जाड होत गेलेला असतो. या मध्यभागापासून सुमारें एक हाताच्या उंचीवरून या वृक्षास दोन्ही बाजूला दोन पानं फुटतात. त्यांचे देंठ आपल्या हाताइतकेच साधारण जाड असून लांबीलाहि साधारण इतकेच येतील; मग कांहीं कमी जास्ती.

**जनको०**–पण हीं पानं कशीं असतात बरं?

**बळ०**–हीं पानं कशीं असतात म्हणतां? हे पहा मुसलमानलोकांचे पंजे असतात कीं नाहीं त्याबरहुकूम अगदीं––

**जनको०**–पण इतकं म्हणण्यापेक्षां आपल्या हातासारखींच असतात असं कां म्हणाना?

**बळ०**–हो हो! अगदीं असेच

जनको०—पण या झाडाची उंची किती असते ?

बळ०—उंची ? उंची-इ-इ. पुरुषभर.

जनको०—पण याला कांहीं फुलं फळं ?

बळ०—हो हो, असतात तर. सबंध डाळिंब घेतलं ह्मणजे त्याचा जसा आकार दिसतो तसाच आकार या फळाचाहि असतो. मात्र हें फळ भलं आपल्या डोक्याएवढं मोठं असतं ! आणि याला फुलं म्हटलीं म्हणजे—आपल्या कोरांटीचीं अथवा तुळशीच्या मंजिरीवर असणारीं फुलं जशीं ऑ केलेलीं असतात तशींच—अगदीं तशींच—असतात अगदीं. मात्र कोरांटीच्या फुलासारखा या फुलाला देठ नसतो. फुलाच्या पुढच्या भागाला हें फूल चिकटल्यासारखं असून एक ऑच दिसतो झालं !

जनको०—( आश्चर्यानें ) ह्मणजे ? तर मग तें फळ आमच्या डोक्याप्रमाणंच असून आमच्या तोंडासारखंच त्याचं फूल असतं असंच कीं नाहीं तुमचं ह्मणणं ?

बळ०—हो हो, तुह्मी ह्मणतां असंच अगदीं.

जनको०—बरं पण या फळांत कांहीं दाणेबिणे असतात कीं नाहीं ! आणि जसे आपले दांत दिसतात असेच त्याच्या फळाचे दाणे दिसतात ह्मणतां ?

बळ०—दाणेच काय पण या फळाला डोळे सुद्धां असतात ! कच्चया डाळिंबाच्या दाण्यासारखे ह्या फुलाच्या वरच्याखालच्या पाकळ्यांच्या आंतल्या बाजूनं या दाण्यांच्या दोन रांगा असतात. आणि करांद्याला जसे डोळे असतात कीं नाहीं तसेच ह्यालाहि फुलाच्या तोंडाच्या वरच्या बाजूला दोन डोळे असतात.

जनको०—काय, दोन डोळे असतात ह्मणतां ?

बळ०—हो हो, दोन डोळे असतात.

जनको०—तर मग हें झाड अगदीं मनुष्यासारखंच असतं असं ह्मणाना ?

बळ०—तसं नव्हे. ( विचार केल्यासारखें करून ) पण तसं ह्मणायला तरी काय हरकत आहे ? इतर झाडांतल्या शिरांतून जसा एक प्रकारचा रस वाहत असतो, तसाच यांतूनहि वाहत असतो. त्यांत आणि यांत फरक ह्मणून इतकाच कीं, इतर झाडांतून वाहणारा रस हिरव्या रंगावर असतो व या झाडांतून वाहणारा रस एखादी तांबडी केळ असते कीं नाहीं तांबडी केळ—त्या तऱ्हेच्या तांबूस रंगावर असतो.

जनको०—तर मग तें वनस्पतीचं आहे एकून ! पण या वनस्पतींतल्या कोणच्या भागाचं तें मलम करायचं ?

बळ०—या झाडाच्या कंबरेवरील जो एक जाड भाग असतो म्हणून सांगितलं त्याच्या आंत सुमारं मध्यावर चर्बीसारखा एक भाग असतो, तो भाग काढून चांगला शिजविला म्हणजे त्यापासून एक प्रकारचं तेल काढतां येतं. हें तेल सहज गोठलं जातं. या तेलांत, या झाडाच्या बुंध्याच्या आंत जें उत्तमोत्तम खोड सांपडेल त्याची अगदीं वस्त्रगाळ भुकटी करून त्याला मवाशीं जें फळ आणि फूल सांगितलं तीं दोन्ही

यथास्थित कुटून त्यांचा चांगला रस काढावा. व या रसाची या भुकणीला चांगलीं ४।५ वेळां पुटं द्यावींत, व मग त्या तेलांत तीं पुटं दिलेली भुकटी टाकून एकदां चांगली खलावी. आणि मग ती या जखमेवर द्यावी लावून. ह्मणजे मग पहाल याचा एका रात्रींत कसा गुण येतो तो!

**जनको०**—पण या वनस्पतीचं नांव काय?

**बळ०**—नांव होय? त्याला "कुतुबगिडी" ह्मणतात.

**जनको०**—नांव तर बोवा कानडीसारखं दिसतं. पण ही पैदा कोठून होणार?

**बळ०**—पैदा म्हणाल तर श्रीमंतांचे राजवैद्य बरोबर आहेत, त्यांच्या सांगण्यांत आपण दादासाहेबांच्या बरोबर एकदां दिल्लीकडे गेलों होतों तेव्हां दिल्लीच्या नजीकच आपण असा एक वृक्ष पाहिला होता. तेव्हां तिकडं जाऊनच आपण त्याचा तपास करूं.

**जनको०**—मी हिंदुस्थानांत पुष्कळ फिरलों आहें, पण तुम्ही म्हणतां अशा तऱ्हेचा वृक्ष आपल्या तर नाहीं बुवा कधीं पाहण्यांत आला!—

**बळ०**—हं:, तो वृक्ष तुह्मीं पाहिला आहे हें तर खचित! आतां नाकबूल जाल तर मात्र ती गोष्ट निराळी.

**जनको०**—काय? मीं? मीं तो वृक्ष पाहिला आहे म्हणतां? आणि तो पाहिला असून पाहिल्याचं मी नाकबूल करतों?

**बळ०**—त्या ाचा आणखी एक विशेष आहे तेवढा सांगितला ह्मणजे तो वृक्ष तुमच्या तेव्हांच लक्षांत येईल.

**जनको०**—आणि त्याचं नांव काय "कुतुब गिडी" ह्मणतां? अहो, हें नांव सुद्धां जर मीं ऐकलं नाहीं तर मग तें झाड मी कुठलं पाहीन?

**बळ०**—ह्मणजे जितकीं ह्मणून झाडं आजपर्यंत तुमच्या पहाण्यांत आलीं आहेत तितक्या सर्वांचीं नांवं तुम्हीं अगदीं बिनचूक सांगूं शकाल का?

**जनको०**—सगळ्यांचींच नाहीं ह्मणा सांगतां येणार! पण--

**बळ०**—तसंच मी ह्मणतों हें झाड तुह्मीं खचित पाहिलं आहे. व अर्धमुर्धं त्याचं नांवहि तुह्माला ठावूक आहे!

**जनको०**—बरं पण तो मघाशीं विशेष कसला ह्मणालांत तो सांगा पाहूं.

**बळ०**—अहो मग तर ओळखालच ओळखाल!

**जनको०**—राव! तुह्मी मला असं व्यर्थ बुचकळ्यांत कां उगीच पाडतां? काय ओळख पटण्याजोगी एकादी खूण सांगा पाहूं.

**बळ०**—अहो तें झाड चांगलं मनुष्यासारखं चालतं. त्याचीं मुळं कांहीं जमिनींत गेलेलीं नसतात.

**जनको०**—(आश्चर्यानें) ह्मणजे?

**बळ०**—ह्मणजे काय? अहो, तें झाड बोलतंहि पण! बोलतंच काय? पण तें सारी मनुष्यासारखी कृति करतं. आपल्याला जसे शत्रु आहेत तसे त्यालाहि आहेत. दुर्दैवानं शत्रु आपल्या कचाट्यांत आला असतां त्याच्यावर तें

आपला सुडहि उगवून घेतं ! आणखी काय सांगूं त्याच्या एकेक कृति ! (जनकोजी तटस्थ होतो —व बळवंतराव ख. वळून जातो ) अहो बाबासाहेब ! सोडा सोडा, या जखमेच्या पट्ट्या सोडा ! याला या साध्या मलमपट्ट्यांनीं खचीत गुण यायचा नाहीं. याला त्या कुतुबगिडीच्या आंतील गाभ्याच्या खोडाची भुकटी—कां आतां तरी आलं ना हें झाड तुमच्या लक्षांत—बाबासाहेब बोला? कां तुमचा चेहरा असा कां झाला ?–समजलांत तुह्मी ! खचित समजलांत मी काय म्हणतों तें ?

जनको०—(आश्चर्यानें)इतका वेळ तुम्हीं मला इतक्या संशयांत पाडलंत तर एकून.

बळ०—नाहीं, संशयांत कसलं पाडलं ह्मणतां? तो सारा संशय आणि तो सारा भ्रम काढून टाकण्याकरितां तर मी इथं आलों. (तलवार उपसून ) पाटीलबोवा रणांत पडले असतांना ज्या कुतुबशहानं त्यांच्या उत्तमांगाला लत्ताप्रहार केला व रोज गोहत्या करणाऱ्या आपल्या त्या दुष्ट हातानं त्यांचा शिरच्छेद केला त्या हाताचे व त्या पायाचे जेव्हां शतशः तुकडे करून मी त्या हापापलेल्या अंतरीक्षस्थ गिधाडांना यथेच्छ मेजवानी देईन व त्या अधमाच्या अस्थींची भुकणी करून तिला त्याच्या काळजाच्या रक्ताचीं पुटं देऊन जेव्हां त्याच्या चर्बीपासून काढलेल्या तेलांत ती भुकटी टाकीन आणि तें मलम बनलं ह्मणजे जेव्हां तें या तुझ्या जखमेंत भरीन, तेव्हांच ही समशेर खालीं ठेवीन. अशी प्रतिज्ञा करून तर आह्मीं सुभेदारांच्या पत्राची व सल्ल्याची विशेषशी फिकीर न करितां एकदम येण्याचं केलं.

जनको०–( डोळ्यांस पाणी आणून ) पाटीलबोवासंबंधानं इतकं तुह्मांस अगत्य आहे याबद्दल मला एक प्रकारानं समाधान व एक प्रकारानं भूषणच वाटतं ! याबद्दल मी आपला किती तरी आभारी आहे म्हणून सांगूं ? ( हुंदके येतात )

बळ०—बाबासाहेब; रडूं नका असे ! माझ्यापेक्षांहि आपलं ज्यास्त अगत्य बाळगणारी दुसरी आणखी मंडळी आहेंत समजलां. पाटीलबोवांच्या संबंधाची ती दुष्ट बातमी ऐकतांच श्रीमंतांनीं तर आपला आज उजवा हात नाहींसा झाला असं बोलून दाखविलं ! हें काय पण ( आपण डोळ्यांस पाणी आणून ) असे रडूं नका. भाऊसाहेब तर असा निश्चय करून आले आहेत कीं कुतुबशहाला कंठस्नान घालून त्याच्या कंठनालांतून वाहणाऱ्या दुध-दुध नव्हे-रक्तगंगेंत आपल्या शेल्याचा पदर बुडवून मग तुमचं शांत्वन करावं.

जनको०–( जास्त गहिंवरून, उमाळा येतो तो आंवरून ) श्रीमंतांचा व भाऊसाहेबांचा आमच्यावर इतका लोभ असल्यावर आह्मांला आणखी काय पाहिजे ?

बळ०–पण मला एका गोष्टीबद्दल आपल्याला विचारायचं आहे; आणि तें असं कीं, आप्पा अशा कचाट्यांत सांपडले असतां देखील सुभेदारसाहेब

आपल्याला लौकर येऊन कां मिळाले नाहींत ?

जनको०—आतां काय त्याचं ? त्या गोष्टी आतां सर्व विसरल्या पाहिजेत ! नाहीं-तर त्या व्यर्थ शोकास मात्र कारण होतील ! याचं मूळ फार-फार खोल आहे ! प्रथमतः लहान असतांनाच जर तें उपटून टाकलं असतं तर आज त्या-च्यापासून इतका त्रास होताना ! पण पुढचं कोणाला कळत असतं ? आपली बुद्धि सोडून परक्याच्या बुद्धीनं वागूं लागलं म्हणजे त्याचा शेवट असाच व्हायचा !

बळ०—ह्मणजे याचा अर्थ काय ? " याचं मूळ फार खोल आहे " असं जें तुह्मीं म्हणालांत, याचा काय अर्थ ?

जनको०—हें मूळ म्हणाल तर तो मात्राग-मनी नजीबखान ! हेंच मूळ जर प्रथम-तः उपटून टाकलं असतं तर आज अ-शा तऱ्हेला गोष्ट येतीच ना ! पण काय करावं ? सुभेदारांचा सल्ला निराळा पड-ला ! त्यांत त्यांचा तरी काय अन्याय म्हणा ! पुढें होणार तशी बुद्धि होते म्हणतात त्यांतली गत !

बळ०—तें कसं म्हटलंत ?

जनको०—कसं म्हटलंत म्हणजे ? अहो, नजीबखान म्हटला म्हणजे पक्का मात्रा-गमनी! तो जन्मस्थानीं सुद्धां लघुशंका क-रायला मागंपुढं पाहणारा नव्हे ! गाजु-द्दीखानाजवळ तो वाढला; पण शेवटीं गाजुद्दीखानावरच उलटून पडायला त्या-च्या मनानं कदर म्हणून कशी ती बिलकुल खाली नाहीं ! आणि त्याला हातीं धरून आमचे सुभेदारसाहेब त्या-च्याकडून भागीरथीला पूल बांधून घेणार ! तरी मीं त्याच वेळीं म्हटलं कीं "सुभेदार-साहेब, दादासाहेबांनीं आम्हांला नजीब-खान याच्यावरच मोहीम नेमून दिली आहे. असं असतां त्याला हातीं धरून नाहक स्वामिद्रोही कसं व्हावं ? " त्या वेळेस मला सुभेदारांनीं कसा पण उप-देश केला ! " बाबा तुझा मूलस्वभाव.
" अटकेपासून रामेश्वरापर्यंत एकछत्री
" राज्य झालं, नजीबखान मात्र काय
" तो हिंदुस्थानांत एकटा खळी राहिला
" आहे. त्याचं आपण जर आज फा-
" रिपत्य केलं तर पेशवे अटकेहूनहि
" जासुदाहातून सुद्धां पैसा आणवती-
" ल. मग आम्ही तुम्ही सहज निर्मा-
" ल्यवत् झालों. मग आपल्याला कोण
" कुत्रं विचारणार ? तर एवढा खळी
" राखून जें काय करणं तें करावं ? "
" नाहीं तर खुशाल पेशव्यांचीं
" धोतरं बडवून रहावं. ! " मला हें त्याच वेळीं रुचलं नाहीं. परंतु सुभेदारांच्या कानमंत्रानं जेव्हां काकां-च्याहि मनानं तसंच घेतलं तेव्हां मा-झा निरुपाय झाला ! तरी देखील मी, जानराव वांबळे, आपले नारो शंकर व अंताजी माणकेश्वर या सर्वांनीं मि-ळून त्याला एकदां गारद करण्याचा बेत केला होता. परंतु काकांनीं " आप-ल्या कार्याकरितां प्रसंगीं शत्रूस दे-खील मित्र करणं प्राप्त आहे. यांत

खावंदांचं आह्मी अहित तें काय करतों ?" असं म्हणून जेव्हां आमचा सर्वत्रांचा धिक्कार केला, तेव्हां मात्र मग आमचा कांहीं इलाज चालेना ! त्या वेळीं त्यांना भागीरथीच्या पुलाशिवाय दुसरं कांहीं दिसत नव्हतं. व त्या पुलावर तर नजीबखानानं आपला सगळा डोला उभा केला आहे ! त्याच वेळीं जर कसंही करून आह्मीं त्याला हाणून पाडतों तर आज त्याला आपला हा असा ताबूत खचित उठवून देतां आला नसता ! "पाटीलबोवा गेले" तर श्रीमंत आपला उजवा हात गेला म्हणून कष्टी होतात, भाऊसाहेब त्या दुष्ट शिखानष्टाला कंठस्नान घालून त्याच्या रक्तांत बुडविलेल्या हातरुमालानं माझं सांत्वन करूं पाहतात, व तुमच्यासारखे वीर शत्रूच्या अस्थींच्या मलमानं माझी जखम बरी करूं पाहतात आणि इकडे "नजीबखानास न ठेविल्यास पेशवे आम्हांला धोत्रं बडवायला लावतील" अशा तऱ्हेच्या कुत्सित कल्पना येऊन आमच्या प्रत्यक्ष धन्याच्या शत्रूस आम्ही मित्र म्हणून हातीं धरतों. तेव्हां ही काय कृतज्ञता कीं कृतघ्नता ! खरंच राव, तुमच्या, भाऊसाहेबांच्या, आणि श्रीमंतांच्या इतक्या आदराला आम्ही खचित खचित पात्र नाहीं !

**बळ०**—( चकित होऊन ) तर मग एकून नजीबखानाला खळावर राखण्याची मूळ कल्पना एकंदरींत सुभेदारांची आं ?

**जनको०**—पण त्यांनाहि आतां या गोष्टीचा खचित पस्तावा होत असेल, यांत बिलकुल संशय नाहीं ! नजीबखानानं बुंदेल्यांना देखील असं कांहीं भारून सोडलं आहे कीं तें कांहीं पुसूंच नका. याबद्दल त्यांना देखील मागाहून खचित पश्चात्ताप होईल !

**बळ०**—"पेशवे आपल्याला धोत्रं बडवायला लावतील" असं सुभेदारांना वाटावं आं ? श्रीमंतांची त्यांच्याशीं अशा तऱ्हेची कांहीं वागणूक असेल असं आजपर्यंतचं जें मला त्यांच्याजवळ राहून ठावूक झालं आहे, त्यावरून तरी तसं मानण्याला मला नाहीं बुवा कांहीं आधार सांपडत ! ते तर असं समजतात कीं, शिंदे आणि होळकर हे आपले दोन हात आहेत. असं असून आपल्या दोहोंपैकीं एका हातानं आपल्याच मानेवर जर अशी सुरी ठेवूं पाहिली, तर मात्र यासारखं दुसरं नवल असं जगांत नाहींच ह्मणायचं !

**जनको०**—तुह्मी ह्मणतां हें अगदीं खरं ! श्रीमंतांना आमच्याविषयीं इतकी आस्था असतांना त्यांच्याविषयीं आह्मीं असे कुतर्क काढावेत हें आम्हांला अत्यंत शरमेचं आहे ! आज विश्वासराव व भाऊसाहेब भेटले म्हणजे मी त्यांची क्षमा मागेन, त्यांच्या पायां पडेन, इतकंच नव्हे पण त्यांच्यापुढें मी नाक सुद्धां घाशीन. पेशव्यांचं जर आमच्यावर इतकं प्रेम आहे, तर त्यांच्याकरितां आम्ही धोत्रंच बडवायचीं काय पण वाटेल तें करूं.

**भाऊसाहेब** व **विश्वासराव** शिपायाच्या पोषाखानेंच येतात.

(त्यांस पाहून रागानें) अरे कोण आहेरे बाहेर, हे कोण हे? यांना आमच्या खाजगी गोष्टी चालल्या असतांना इथं कोणीं सोडलं!

**सेवक**—जी सरकार, काय हुकूम?

**जनको०**—अरे हुकूम कसचा, यांना आंत कोणीं सोडलं?

**सेवक**—ते ह्मणाले कीं, आम्हीं गुप्त हेर आहों. आम्हांला आपल्याला आत्तां समक्ष जाऊन भेटलं पाहिजे. खूण दाखवा म्हणून मी ह्मणतों तों हे जलदी करून आंतच घुसले—

**भाऊ०**
**विश्वास०** } —(राम राम करून) सरकार, आपल्याकडे आमचा एक अर्ज आहे.

**जनको०**—अर्ज ऐकण्याची ही वेळ नव्हे. व आमच्या गुह्य गोष्टी चालल्या असतां तुम्ही परवानगीवांचून अगदीं एकदम आंत शिरतां या तुमच्या धिटाईला व बेपर्वाईला काय ह्मणावं! बेवकूब लोक नाहीं तर.

**भाऊ०**—बेवकूब! (हांसून) इतक्यांत तुह्मी आमच्यापुढें अगदीं नाक घांसायला तयार झालां होतां आणि आतां त्याच आह्मांला बेवकूब ठरवितां?

**जनको०**—(गोंधळतो व ओळखून) राव, तुह्मी तरी याबद्दल मला किंचित् सूचना करायची होती! (भाऊंस) भाऊसाहेब! क्षमा करा (पायावर डोकें ठेवून खरोखरीं नाक घांसायास लागतो.) क्षमा करा! क्षमा केली असं म्हटल्याशिवाय मी उठणार नाहीं.

**भाऊ०**—काय? बाबा तुह्मी वेडे तर नव्हेना! अहो, गोष्ट चुकून झाली त्याबद्दल इतकी क्षमा ती कशाला मागायला पाहिजे?

**जनको०**—नाहीं नाहीं. क्षमा केल्याशिवाय मी हे पाय खचित सोडायचा नाहीं.

**भाऊ०**—बरं तर तुमच्या ह्मणण्याप्रमाणंच का होईना. क्षमा क्षमा आहे. उठा. (उठवून उराशीं घट्ट धरून) जिथं अंतःकरण सफा आहे (हात दाखवून) तिथं जाणूनबुजूनहि जरी शिव्यांची लाखोली वाहिली तरी ती पुष्पवृष्टीच समजली पाहिजे. मग इथं तर तुह्मीं आपलं गुह्य बोलत असतां आह्मी भलत्या वेषांत येऊन तुमच्यापुढं उभे राहिलों. आह्मांला ओळखण्याचाहि तुम्हाला मार्ग नव्हता!

**जनको०**—(विश्वासरावांस भेटून) रावसाहेब, मला आपलीहि क्षमा मागितली पाहिजे!

**विश्वास०**-छेः छेः, यांत क्षमा कसली? क्षमा मागण्याजोगं यांत कांहींच नाहीं. नानांच्यावर व भाऊंच्यावर आपण इतकं प्रेम ठेवतां हें पाहून मात्र मला फार आनंद झाला आहे!

**जनको०**—ह्मणजे? तर मग तुम्ही आमचं सर्व बोलणं आडून ऐकलंत कीं काय? (आपल्याशीं) पण हें कांहीं एका प्रकारानं बरं नाहीं झालं. कारण सुभेदारांच्यासंबंधानं यांचं मन बिघडायला मीं कारण व्हावं हें कांहीं खचित इष्ट नव्हे.

**भाऊ०**—काय ? सुभेदारांच्यासंबंधानं काय चाललं आहे आपल्या आपल्याशींच ?

**जनको०**—( उघड ) तें असो. पण अगोदर आपण दोघांनीं हे पोषाख उतरले पाहिजेत.

**भाऊ०**—छेः छेः, याच वेषानं आह्मांला परत गेलं पाहिजे. या प्रसंगीं हेच पोषाख उपयोगी. आह्मांला असं झालं होतं कीं तुम्हांला एकदां भेटूं केव्हां ? ( जखम पाहून ) ही जखम रावांनीं सांगितल्याप्रमाणं भरण्याचा व या दस्तरुमालानं तुमचे डोळे पुसून सांत्वन करण्याचा प्रसंग परमेश्वर लवकरच आणील !

**विश्वास०**—दुराणीला ह्मणून ठेवायचा नाहीं अशी प्रतिज्ञा करून तर आह्मी सर्वजण आलों आहों.

**बळ०**—बरं, पण आतां फार वेळ इथं राहून उपयोग नाहीं ! दुपारानंतर सदरेस सर्वत्रांच्या भेटी रीतीप्रमाणं होतीलच !

**जनको०**—माझ्या मनांत होतं कीं आज आंबोळीचा बेत इथंच करयावा !

**भाऊ०**—छेः छेः, मेजवानीचा बेत प्रतिज्ञा पुरी झाल्यावर.

**जनको०**—असं बोलल्यावर मात्र माझा उपाय नाहीं.

**भाऊ०**—बरं तर, बळवंतराव चला आतां आपण आलों तसे जाऊं—

**सर्व**–( जनकोजीस ) येतो तर ?

[ जातात.

**जनको०**—( आपल्याशीं ) पण झालं हेंहि एक प्रकारानं बरंच झालं म्हणायचं ! आपल्याविषयीं तरी श्रीमंतांच्या मनांत संशय नको. व्यर्थ नाहक संशयामुळं सुद्धां या जगांत केवढाले अनर्थ होतात ! जानकी येवढी थोरली पतिव्रता ! पण ती केवळ रावणाच्या कैदेंत होती एवढ्यावरूनच तिच्या पातिव्रत्याबद्दल एका यःकश्चित् परटाच्या मनांत संशय उत्पन्न व्हावा, व त्या संशयावरून रामानं तिला कष्टमय अरण्यवास दाखवावा ! आणि तोहि थोडाथोडका नव्हे तर एक सबंध तपपर्यंत ! माझ्यासंबंधानं काकांच्या मनांत 'हा आपल्याविरुद्ध जातो' म्हणून जो एकदां संशय आलीं होता तो काढून टाकायला मला किती त्रास पडला ? आणि असले संशय काय खरं असेल तें सांगितल्याशिवाय अज्जीबात असे कधींच नाहींसे व्हायचे नाहींत. एकंदरींत या संशयाच्या गोळीचा बार एकदां ठांसून भरला म्हणजे ही गोळी किती लांब पल्ल्यावरचा मनुष्य घेईल याचा बिलकुल नियम नाहीं ! या गोळीपुढं बंदुकीची गोळीच काय, पण तोफेचा गोळासुद्धां अगदीं रद्द ! छेः, तो कांहींच नाहीं असं म्हटलं तरी चालेल ! आपल्याकडून एक मात्र आज मोठी चूक—चूक कां अपराध—अपराध झाला. सुभेदारांच्यासंबंधानं बोलतांना बोलण्याच्या भरांत "पेशवे आपल्याला धोतरं बडवायला लावतील" ह्मणून जें मीं म्हटलं तें भाऊसाहेबांनीं व विश्वासरावांनीं एकलं तर असेलच !

आणि नसलंहि ऐकलं तरी रावांकडून त्यांना हें कळणारच ! सुभेदार असं ह्मणाले एवढं सांगून सुभेदारांच्यासंबंधानं श्रीमंतांच्या मनांत संशय उत्पन्न करण्याचं मात्र माझ्या हातून चुकून घडलं! तें नको होतं तेवढं व्हायला ! या योगानं आणखी कांहीं नाहीं तरी नाहीं पण दुराणीसंबंधानं तरी आपला एक पक्ष कमी होण्याची फार भीति आहे ! यासंबंधानं आपल्याला फार–फार काळजी घेतली पाहिजे ! पाहूं तरी कसं काय काय होतं ते. [ जातो.

---

## प्रवेश ८ वा.

### स्थल–गंभीरानदीवरील तंबू.

मल्हारराव व भाऊसाहेब.

**मल्हार०**–तुह्मी ह्मणतां तें सार खरं ! पण भाऊसाहेब ! तुह्माला नदीपार होऊन रहावं ह्मणून अगदीं निक्षून लिहिलं असतां–आणि तेंहि एकदां नव्हे दोनदां–तुह्मीं बेलाशक येण्याचं धाडस केलंत हें कांहीं तुह्मीं रास्त नाहीं केलंत. अथवा यांत तुमचा तरी काय अन्याय ? भोंवताली चार मिळालेली सल्लामसलत देणारी मंडळी केवळ पोरकट व बेवकूब आहेत, हें या तुमच्या साऱ्या येण्यावरून अगदीं निखालस होतं. एवढा मोहरा आणून इरेस घातला. याला काढण्याला आतां बिलकुल इलाज नाहीं ! असो, झाली गोष्ट परत येत नाहीं. होईना, तुमच्याच ह्मणण्याप्रमाणं का होईना ! आमचं तरी त्यांत काय जातं?

**भाऊ०**–अहो माझ्या कसचं ? नानासाहेबांनीं थेट दिल्ली जाऊन गांठावी ह्मणजे वचक बसेल, एरवीं बसणार नाहीं, असं सांगितल्यावरून तर आह्मी इथवर आलों. मी नको नको ह्मणत असतां त्यांनीं विश्वासरावाला मजबरोबर लावून दिलं. याला काय ह्मणावं? सध्यां माझी स्थिति म्हणाल तर अगदीं चमत्कारिक होऊन राहिली आहे. एकीकडे आड आणि एकीकडे विहीर ! एकीकडून नानासाहेबांची आज्ञा मोडतां येत नाहीं; व दुसरीकडून आपल्यासारख्यांच्या सल्लयाला पाठमोरं होतां येत नाहीं.

**मल्हार०**–तें सर्व खरं ! पण श्रीमंतांना इकडले पाचपेंच काय माहीत ?

**भाऊ०**–तें खरंच. पण आम्हीं येथवर येऊन पुनः माघारं जाऊन मुक्काम करावा हें प्रसंगविशेषीं आमचा आब व दरारा राखण्याऐवजीं तो घालविण्याला मात्र कारण होईल, यांत मात्र बिलकुल शंका नाहीं ! त्याअर्थी इथवर आल्यासारखं थेट दिल्लीपर्यंत शत्रूस हुलकावण्या देतदेत, एकवार दम करून जावं असं मला तरी वाटतं. मग तुमच्या विचारास कसं काय येत असेल तें येवो !

**मल्हार०**–माझा विचार म्हणाल तर तो मीं आपल्याला एकदां सांगितलाच आहे ! तुमचं म्हणणंहि थोडंबहुत खरं आहे. नाहीं असं नाहीं. तुह्मी सडे असतां, तर हें तुमचं ह्मणणं मीं तेव्हांच ऐकलं असतं.

पण तुमच्याबरोबर मुलामाणसांचं लटांबर पडलंना ? नाहीं तर त्याची मग मीहि इतकी फिकीर करतोंना.

भाऊ०—मुलामाणसांची ती एवढी फिकीर कसली ? जवळपास एखादी मजबूत जागा पाहून देऊं पाहिजे तर त्यांना ठेवून; ह्मणजे आपण मग आपले अगदीं सडेच म्हणायचे !

मल्हार०—हं ! ही कल्पना मात्र ठीक आहे. पण असं मजबूत ठिकाण कोणचं बरं शोधून काढावं ? (विचार केल्यासारखें करून) एक आग्रा अथवा दुसरा भरतपूर दोहोंपैकीं एक किल्ला ! याशिवाय दुसरं ठिकाण ह्मणून नाहीं. त्यांत भरतपूर किल्ल्यांत ठेवण्याचा मनसबा केल्यास मग कांहीं नड नाहीं. जाट अगदीं योग्य बरदास्त ठेवील ! इतकंच नव्हे पण प्रसंगीं आपले प्राणहि वेंचायला तो मागंपुढं पाहणार नाहीं. पण हा किल्ला आग्र्याच्याहि पलीकडे पडला. त्याअर्थी एकवेळ मला असं वाटतं कीं सर्व मुलांमाणसांना आग्र्यासच योग्य बंदोबस्त करून ठेवावं ह्मणजे झालं. किल्लेदारहि आमच्या वळणांतलाच आहे. आपण सांगूं त्याला. तो कांहीं नाहीं ह्मणणारा माणूस नव्हे. त्याला दारूगोळ्याची तजवीज करून दिली ह्मणजे झालं.

भाऊ०—ठीक आहे तर. त्याहा आपण त्या किल्लेदाराला पत्र आणि तसंच एक त्या जाटालाहि जाऊं द्या. कारण न जाणो, आग्र्याचं कदाचित् नच जुळलं तर जाटाच्याच गळ्यांत मुलंमाणसं अडकवूं ह्मणजे झालं.

मल्हार०—ठीक आहे. आपली ही सूचना फार उत्तम आहे. जाटाला आग्र्यासच बोलावलं तर कसं ?

भाऊ०—मग तर फारच उत्तम. त्याच्या व आपल्या सर्वांच्या विचारास जसं येईल त्याप्रमाणं मग तिथंच एकदम काय तें ठरवून टाकूं ह्मणजे झालं.

मल्हार०—तर मग लिहिवतों याप्रमाणं आज पत्रं आणि आजच सूर्यास्ताच्या आंत हलकाऱ्यांना देतों पाठवून. आपण इकडून निघून तिथं जाऊन पोंचतों तों त्याच सुमारास त्यांनींहि तिथं येऊन पोंचावं अशा तऱ्हेनं त्यांना लिहिलं ह्मणजे झालं कीं नाहीं ?

भाऊ०—हो हो, बस्स. यापेक्षां आणखी जास्त काय पाहिजे ? मात्र पत्रांत "आम्हीं आज रात्रीं निघून परवाला आग्र्यास येऊन दाखल होऊं. त्याच सुमाराला आपणहि येऊन दाखल व्हावं. आपला सल्ला जरूर घेणं आहे. तर विलंब करूं नये; व आम्हांला वाट पहात रहावं लागेल असंहि न करणें." इतका उल्लेख केलेला असला म्हणजे बरं. बरं तर मी येतों आतां. कारण आमच्या मंडळीस डेरेराहुट्या वगैरे उठविण्याची सूचना लवकरच मिळाली म्हणजे वेळींच निघायलाहि बरं.

मल्हार०—ठीक आहे (उठूं लागतो.)

भाऊ०—बसावं. आपण बसावं. उगीच का तसदी ?

मल्हार०—नाहीं नाहीं, यांत तसदी कसली? बोलल्याचालल्याचा मात्र बिलकुल राग धरूं नये.

भाऊ०—छे! यांत राग कसला? तसं कांहीं बिलकुल नाहीं. त्याजबद्दल आपण कांहीं मनांत आणूं नये. बर येऊं तर आतां? आपणही भल्या पहाटेला निघण्याचीच तजवीज ठेवावी.

[ जातात.

मल्हार०—(आपल्याशीं) छेः, एकंदरींत ही जीभ मला केव्हां दगा देईल याचा नियम ह्मणून कसा तो बिलकुल नाहीं. भाऊसाहेब म्हटला म्हणजे अत्यंत मानी पुरुष, त्याचा स्वभाव मला पहिल्यापासून अगदीं पुरा ठाऊक आहे. त्याच्याशीं बोलतांना वास्तविक किती जपून बोलायला पाहिजे होतं पण! परंतु माझ्या सल्ल्याला न जुमानतां ते बेधडक आले, हें पाहून माझ्या अंगांत एक प्रकारच्या क्रोधानं जेव्हां संचार केला तेव्हां मी त्याच्या अगदीं आधीन होऊन गेलों, व जें जें म्हणून तोंडास येत गेलं तें तें मी बरळत सुटलों. सल्लामसलतगारांना बेवकूब, पोरकट, अक्कलशून्य असं तर ह्मटलंच; मूर्ख, पाजी, टोणपे ह्मणून तोंडाला येतील तशा शिव्या तर दिल्याच. एक का दोन. त्यांना हजारों दुर्विशेषणं देऊन तुह्मींहि त्यांपैकींच आहां असं अगदीं प्रत्यक्ष जरी नाहीं तरी पण अप्रत्यक्ष रीतीनं तरी दर्शिवलंच. काय? मीं त्यांची बाकी तरी काय ठेवली? व हें सर्व या जिभेनं, या दगलबाज जिभेनं, माझ्याकडून माझ्या इच्छेविरुद्ध करविलं (विचार बदलून) अथवा यांत तिचा तरी काय अन्याय? क्रोधानं जर तिच्यावर आपला अंमल चालविला नसता, तिच्यावर असा बेवकूबपणानं जुलूम केला नसता, तर ती तरी अशी कां बडबडती,. कां आरडती, व अशी सैरावैरा पळत तरी कां सुटती? रागाच्या आवेशांत व्यर्थ संतापून जाऊन आपण कोणाशीं बोलत आहों, कोणाशीं नाहीं याचा कांहीं एक सारासार बिलकुल विचार न करितां बेसुमार तोंड सोडणं ह्मणजे निव्वळ मूर्खपणा आहे. यांत माणुसकीचा गंधहि नाहीं. पण मी तरी काय करूं? माझ्या इच्छेविरुद्ध, मीं बांधलेल्या धोरणाविरुद्ध उगीच विनाकारण कोणी जाऊं लागलं ह्मणजे मग माझा मलाच सुमार रहात नाहींसा होतो. व मी कोणाला काय बोलतों याचंहि मग मला भान नाहींसं होतं. त्यांत इतकं बरं आहे कीं, रागाच्या आवेशांत मी दुसऱ्याला काय बोललों याचं मला पुनः स्मरण रहात नाहीं! नाहीं तर "मी त्याला काय बोललों? केवढा मी मूर्ख? केवढा हा गाढवपणा मीं केला" अशा तऱ्हेचे उद्गार माझ्या तोंडून आपोआप निघून पूर्वस्मृतीनं मला फार दुःख झालं असतं. माझं मन मग मला इतकं कांहीं खातं कीं मीं आजपर्यंत दुसऱ्याला कसकसं दुखविलं याची मला स्मृती होऊन, त्या स्मृतीच्या वेदनेनं मला रात्रं-

दिवस व्यर्थ तडफडत पडावं लागलं असतं. तर या विस्मृतीचे मला फार फार आभारच मानले पाहिजेत.

**सेवक**–सरकार, शिंदे यांजकडून निरोप आला आहे कीं, आपण जसे असाल तसे येऊन जावं.

**मल्हार०**–काय जसे असाल तसे येऊन जावं म्हणून बाबाकडून निरोप आला आहे ? ठीक आहे. तर हा निघालोंच मी. चल तूंहि चल मजबरोबर, हो. हो पुढें.

## अंक ३ रा.

### प्रवेश १ ला.

**स्थल**–दिल्ली येथील राजवाड्यांतील जनानखान्याच्या बाहेरील बाजू.

कुळंबिणीच्या वेशांत असलेला **मोहनराय**, व **गोविंदराव** येतात.

**मोहन०**–( आपल्याशीं ) हा बिबीसाहेबांचा झालेला संवाद एकदां भाऊसाहेबांना जाऊन सांगितला ह्मणजे झालं. एकदां पार पडलों. प्रथमतः हा वेष अगोदर टाकून दिला पाहिजे, ह्मणजे संशयाचं कारण उरणार नाहीं. हें एक आणखी आपल्या पोटांत धास्ती बाळगायला नको हें दुसरं. मग वाटेल तिथं जावं आणि वाटेल तिथं यावं.

**गोविंद०**–(एकदम मागून येऊन आपल्याशीं ) या भाषणावरून ही कांहीं स्त्री नव्हे हें खचित. काय ? मी पुढें होऊन धरूं का या[illegible]या मनगटाला. पण न जाणो आपल्या कानांनीं आपल्याला चकिवलं नसेल कशावरून ? नाहीं. पण हेंहि संभवत नाहीं. कारण हिनं "जाऊन सांगितला ह्मणजे झालं, एकदां पार पडलों." असे शब्द ज्याअर्थी उचारले त्याअर्थी ही खचित स्त्री नसावी. आणखी "हा वेष अगोदर टाकून दिला पाहिजे." असंहि ती कायसंसं ह्मणाली, असं मीं पक्कं ऐकिल्यासारखं मला वाटतं ! याची काय ती शहानिशा केलीच पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाहीं. नाहीं, पण आपण जनानखान्याच्या अगदीं जवळ आहों. धरला, आपण तिचा हात धरला, आणि ती जर ओरडली तर सध्यां आपली फटफजिती व्हायची ! एवढंच नव्हे, पण ती पुरुष नसून जर खरोखरी स्त्री असेल तर मग मला या जगांत तोंड दाखवायलाहि जागा उरणार नाहीं. तर ही मसलत इथं नाहीं उपयोगी. जनानखाना सोडून दोन तीन दालनं टाकून हिला जरा पुढें जाऊं द्यावी, आणि मग गांठावी. ( ऐकल्यासारखें करून ) थांबा, पण ही आपल्याशींच काय पुटपुटत आहे बरं ?

**मोहन०**–( आपल्याशीं ) मोहना ! स्वामिसेवेकरितां तुला बायकांचाच काय पण ढोरं कापणाऱ्या त्या नीच धेडामांगांचा जरी वेष घेणं प्राप्त झालं तरी तो तुला घेतला पाहिजे. प्रसंगविशेषीं कसई होऊन तुला बकऱ्यांची माळची माळ चराचर चिरावी लागेल ! पण

भट्टी मात्र अगदीं आजच्यासारखी उतरली पाहिजे.

**गोविंद**०—हं: आतां कशाला पाहिजे संशय? मोहनरायच हा! पुढं होऊन त्याचा बुरखाच बाजूला केला ह्मणजे झालं. (पुढें होऊन तसें करितो.) (**मोहन** आरडण्याचा आव घालतो.) हं, खबरदार आरडशील तर. मीं तुला पुरं ओळखलं. (मिशांकडे पाहून व हात दाखवून) पण मोहनराय! हें काय? कांहीं पर्वणीबिर्वणी होती वाटतं? अरे, प्रत्यक्ष तुझा बाप अजून जिवंत असतां मिश्रमुंडनासारख्या ह्या आपल्या मिशा भादरून घेऊन तूं आपला एक मिशा-मुंडणच बनला आहेस!

**मोहन**०—(हळू बोलतो) महाराज हळू बोला. आपलं बोलणं कोणी ऐकेल अन् एक करतां भलतंच व्हायचं!

**गोविंद**०—त्याची तुला बिलकुल भीति नको. ह्या वेळेस इकडून एकहि मनुष्य फिरकायचं नाहीं. पण अगोदर बोल झटदिशीं, हा वेष घेऊन इकडे जनानखान्याकडे कोणीकडे गेला होतास?

**मोहन**०—हें सांगण्याचं हें स्थळ नव्हे, ही जागा नव्हे, व हा प्रसंगहि नव्हे. उगीच तुह्मी मला कां अडवतां?

**गोविंद**०—छट् तें कांहीं नाहीं चालायचं. तूं इकडे कां आला होतास, अन् तुला इकडे कोणीं व कशाकरितां पाठिवलं होतं, हें सांगितल्याशिवाय मी तुला एक पाऊलहि पुढं टाकूं देणार नाहीं.

इतक्यांत एक मुसलमानी पोषाख केलेला शिपाई पुढें येतो.

**शिपाई**—(तलवार उपसून व **गोविंदरावांचा** हात धरून) खबरदार त्याला जाण्याला अटकाव कराल तर! ह्या तलवारीनं इथंच दोन तुकडे करीन. समजलांत!

**गोविंद**०—(हात हिसडून घेऊन लांब उभा राहून तलवार उपसून) मूर्खा, कोणाशीं बोलत आहेस? आपली जिभली आधीं नीट संभाळून धर आणि मग काय बोलायचं असेल तें बोल.

**मोहन**०—(शिपायास शीळ घालून) बखतसिंग! हं आटपतं घे. अरे इथं दगाफटका कांहीं एक नाहीं. हे आपल्याकडील आहेत. यांना तूं नाहीं का ओळखत? (गोविंदरावांस) गोविंदराव, प्रसंगविशेषीं कांहीं दगाफटका होईल ह्मणूनच या बखतसिंगाची भाऊसाहेबांनीं योजना केली होती.

**गोविंद**०—"भाऊसाहेबांनीं योजना केली होती!" हं! मग मात्र सर्व जुळलं!

**बखत**०—महाराज, (पायांवर डोकें ठेऊन) या बंद्याला क्षमा असावी. आपणांस इतका वेळ मीं न ओळखल्यामुळं माझ्याकडून हा असा अपराध घडला.

**गोविंद**०—छे:, अपराध कसचा? उलट तूं आपली नौकरी उत्तम रीतीनं बजावलीस, ह्मणून तुझी उलट सर्फराजच केली पाहिजे. हा मी नसून शत्रूकडीलच जर कोणी एखादा असता ह्मणजे आज तुझी मदत किती होती बरं? चल ऊठ.

बखत०—पण क्षमा केल्याशिवाय मी बिल-कुल उठणार नाहीं.

गोविंद०—बरं क्षमा ! ऊठ. ऊठ झटदिशीं. आणि आह्मी दोघे इथं उभे आहों तों तूं ह्या दालनाच्या तोंडीं उभा रहा.

[ बखतसिंग जातो.

झालं, मोहन आतां बोल पाहूं. माझ्यापासून कांहीं चोरून ठेवूं नकोस. भाऊसाहेबांनीं तुला इकडे कशाला पाठिवलं होतं ? बोल बोल, थोडक्यांत सांग.

मोहन०—हें पहा, भाऊसाहेबांनीं बिबीसाहेबांचे बेटे मिरझा जवान बख्त यांना तख्तनशीन केलं त्यासंबंधानं जनानखान्यांतील शहाजादींचा एकंदरींत कसा काय रोंख आहे तें काढून घेण्याच्या उद्देशानं मी शेरअलीसाहेबाकडून दासीच्या वेषानं गुप्त बातमी घेऊन आलें आहें. असा बहाणा करून खुद्द बिबीसाहेबांस जाऊन भेटलों व भाऊसाहेब व विश्वासराव यांना इथल्या इथंच गारत करण्याचा शेरअली व इतर सरदार यांचा विचार आहे, असं सांगून त्यांचा ठाव पाहिला. पण काय ? भाऊसाहेबांनीं अगोदरच सर्वत्र यथास्थित साखर पेरून ठेवली असल्यामुळं या गोष्टीला त्यांनीं आपली निखालस नाखुषी दर्शिवली; एवढंच नव्हे, पण उलट "शेरअली"ला असा निरोप घेऊन जायला मला सांगितलं कीं, "इमानी सेवकाला गारत कर-"ण्याचं बक्षीस देण्यापेक्षां आपण अगो-"दर बादशाहीच बुडवून टाकाल तर बरं !" भाऊसाहेबांनीं भरलेला बार तर इतका फक्कड उडाला ! इकडं मींहि आपल्याकडून घेतलेल्या सोंगाची बतावणी इतक्या उत्तमप्रकारं केली कीं ज्याचं नांव तें ! योजलेला कार्यभागहि अगदीं कांहीं एक न फुटतां हां हां ह्मणतां चोख रीतीनं पार पडला !

गोविंद०—पण काय, एकंदरींत कसा काय रोंख तरी कसा काय आहे ?

मोहन०—रोंख, रोंख काय विचारतां? दिल्लीपतीसंबंधानं शाहूछत्रपतींच्या वंशजांची एकनिष्ठता व भाऊसाहेबांची अदबी व विनय हीं पाहून बिबीसाहेब फार खूष झाल्या आहेत ! विश्वासरावांना तर त्यांनीं आपले बेटे ह्मणविलं. व "वजिरी देणं ती तुमच्या लगत्याचा कोणी दक्षिणी, थोर, शहाणा, व नीतिवंत माणूस पाहून त्यालाच द्या." असा त्यांनीं आपला हेतु दर्शविला आहे. ( बखतसिंग कोणी परकी येत आहे असें पाहून खुणावतो ) बस्स. झालं आतां. जाऊं मी ? कां ? मला उगीच उशीर कां करितां ?

गोविंद०—( त्यास सोडून ) हं हं, तूं जा आतां, खुशाल जा. मींहि पण तुझ्या मागोमाग चाललोंच.

[ मोहन शिपायासह जातो.

एकंदरींत भाऊसाहेबांचं धोरण ह्मटलं ह्मणजे अगदीं अटोकाट. आणखी तें खऱ्या राज्यकार्यधुरंधर पुरुषाला पाहिजेच पाहिजे. इराणी दुराणीस गाजुद्दीखानानं सांगितलेल्या सरदाराशिवाय

आणखी कोणकोण सामील आहेत त्याची बित्तंबातमी काढायला भाऊसाहेबांनीं दिलेली सल्लाच अगदीं योग्य आहे! गाजुद्दीखानानं ती बातमी काढायला आपला एक विश्वासू मनुष्य देतों ह्मणून सांगितलन आहे. त्याच्या मदतीनं कोणा कोणा अमीरउमरावांचा कसकसा रोंख आहे हें बाहेर काढायला नाहीं फारशी पंचाईत पडायची! ( विचार बदलून ) गाजुद्दीखानाला वजिरी देवविण्याविषयीं शिंदे, होळकर, व जाट यांचं एकमत ठरलं आहे. आणि बेगमसाहिबांनीं तर कोणच्या तरी दक्षिणी हुषार व आपल्या खात्रीच्या माणसाला वजिरी सांगावी ह्मणून आपला हेतु दर्शिवला आहे. तेव्हां भाऊसाहेब याला काय तोड काढतात पहावं. एकंदरींत ही गोष्ट फार पेंचाची येऊन पडली आहे, एवढं मात्र खरं! तें असो पण भाऊसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणं आपल्याला अगोदर खासगी दिवाणजींना जाऊन भेटलं पाहिजे. तेवढ्याकरितां तर मी इथं आलों. मला त्या शिपायानं असं इकडून जा ह्मणून सांगितलं नाहीं! [ जातो.

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ—दिल्लींतील भाऊसाहेब उतरलेला एक वाडा.

शिंदे, होळकर, जाट, भाऊसाहेब, विश्वासराव, व मेहेंदळे.

सुरज०—आणि गाजुद्दीखानाला वजिरात द्यावी ह्मणून जें मी ह्मणतों तें एवढ्याचकरितां. कां मल्हारबा! तुमचं ह्मणणंहि असंच कीं नाहीं?

मल्हार०—हो हो, असंच ह्मणजे काय विचारतां ( भाऊसाहेबांस ) भाऊसाहेब, या कामांत तुह्मीं रावांचा सल्ला बिलकुल घेऊं नका. कारण एक तर ते—

बळ०—मग आमचा सल्ला कोणच्या कामांत, घ्यायचा तरी कोणच्या कामांत? हो बरोबरच आहे. बोलूनचालून आह्मी ठाणबंद नंदीबैल! तेव्हां आमची सल्ला कां ह्मणून घ्यावी! उघडच आहे इतके दिवस हिंदुस्थानांत यथेच्छ चरत असणाऱ्या "पोळाच्या" चरण्याच्या आड जर एखादा दक्षिणेंतील "नंदीबैल" आला तर त्याला हें कसं रुचणार? त्याअर्थीं आपण आमचा सल्ला घेऊं नये ह्मणतां हेंहि एक प्रकारानं ठीकच! असले अपमानकारक शब्द बोलून घ्यायला कांहीं मी इथं आलों नाहीं. ( निघावयास लागतो. ) बस्स पुरे. असले शब्द ऐकून इथं बसण्यापेक्षां इथून निघून चालतं झालेलं पुरवलं!

भाऊ०—( रावास बसवून ) राव, एकदम असे चिरडीस जाऊं नका. ते काय म्हणतात तें अगोदर नीट ऐकून तर घ्याल?

मल्हार०—राव, तुमचा अपमान करावा असा कांहीं आमचा बिलकुल इरादा नाहीं; पण तुम्हीं जर शांतपणानं सगळं ऐकून घ्याल तरच्याच ना सगळ्या गोष्टी! पाटीलबोवांना सुजाउद्दौल्यानं जेव्हां

क्रोड रुपयांच्या नादीं लावलंन, तेव्हांच ते त्या नादानं चकले जाऊन आपल्या जिवाला मुकायचे ! पण त्यांच्या नाशाविरुद्ध चाललेल्या खटपटींचा सर्व सुगावा जेव्हां गाजुद्दीखानानं पाटीलबोवांना दिला, व विश्वासघाताचीं पत्रंहि दाखविलीन् तेव्हां पाटीलबोवा कुठं सावध झाले ! ही एकच गोष्ट काय ? पण शेंकडों वेळां गाजुद्दीखान अशा रीतीनं आमच्या उपयोगीं पडला आहे. शिवाय तो केलासवरलेला अन मुरवतीचा माणूस आहे. त्याचीं धोरणं, वळणं, ह्यांचा आपल्याला फार उपयोग होण्याचा संभव आहे.

जनको०—काका म्हणतात असं खरं. गाजुद्दीखान त्या वेळीं आमच्या फार फार कामाला आले, यांत बिलकुल शंका नाहीं.

भाऊ०—तुह्मी सर्वजण ह्मणतां तें सगळं खरं ! परंतु गाजुद्दीखानाला वजिरात दिल्यानं इथं कज्जे होण्याची जास्त भीति आहे. बारीक शोध करतां खुद्द बेगमसाहेबांना गाजुद्दीखान नको आहेसं दिसतं ! अलमशहाच्या भयंकर शिरच्छेदाच्या गोष्टीची त्यांना अतोनात भीति वाटत आहे व त्यांत गाजुद्दीखानाचं पुरं अंग असलंच पाहिजे, असा त्यांचा पक्का समज आहे. तर अशी स्थिति असतां आपण मुद्दाम गाजुद्दीखानाची वजिरातीवर नेमणूक केली तर इथं सर्व बेबनाव होऊन जाऊन, दुराणीला पुष्कळ अमीरउमराव लोक फिसाद होऊन मिळतील. मग आपण बेगमेच्या बेट्यांना तख्तनशीन केल्याचं सार्थक तें काय झालं ? आणि ह्मणूनच माझ्या मनांतून आपल्या इकडील कोणी कर्ता मनुष्य वजिरातीवर नेमावा असं आहे. तर कोणाला नेमावं असं आपल्याला वाटतं ?

बळ०—भाऊसाहेब, काकासाहेबांस ही तुमची सूचना पसंत आहे, असं त्यांच्या तोंड फिरविण्यावरून तरी दिसत नाहीं. मग न जाणों. सुरजमल्लांचं ह्मणणं तर वजिरात देणं तर गाजुद्दीखानालाच द्यावी. आणि आमचे बाबासाहेब काय ? जिकडे काका तिकडे पुतणे ( **बळवंतराव व जनकोजी** एकमेकाकडे पाहून गालांतल्या गालांत हंसतात. ) का, असंच कीं नाहीं बाबासाहेब ?

जनको०—भाऊसाहेबांचं ह्मणणंहि सयुक्तिक दिसतं. पण गाजुद्दीखानाच्या तोलाचा असा दुसरा मनुष्य तरी कोण नेमणार ?

बळ०—हीच का तुह्मांला पंचाईत पडली ? अहो इकडेच ज्यांचे पुष्कळ दिवस गेले आहेत त्यांपैकींच एखाद्याची निवड केली ह्मणजे झालं.

जनको०—हो हो. आपले “ माणकेश्वर ” अथवा “ नाना. ”

भाऊ०—मला असं वाटतं कीं, नानांच्यावर जर वजिरात सोंपविली तर त्यांच्या हातून ती तोलून धरवेल कीं नाहीं ? काय काकासाहेब, यासंबंधानं आपलं कसं काय मत आहे ? (सुरजमल्लाकडे वळून ) आणि तसंच आपलंहि ?

सुरज०—( चरकांतो ) मी ह्मणजे आपल्या सर्वांच्याबाहेर आहे असं नाहीं; पण

ह्याच अवकाशांत **तपोमंदिरा**जवळ येऊन पोंचले. आंत सर्व शांतता होती. सर्व सरदार **कुमुद्वंधु** आंत येण्याची वाट पहात होते. तो कशाकरितां आला आहे, नवीन बातमी काय आहे, राणीकडून तहाचें बोलणें वगैरे कांहीं आहे कीं काय इत्यादि गोष्टी आतां कळतील ह्मणून कांहीं सरदार उत्सुक झाले होते, व त्या मंडळींत असेही कांहीं होते कीं, त्यांस मनुष्यें ह्मणण्यापेक्षां मानवरूपधारी हिंस्रपशु ह्मणणें शोभेल! ह्या दुसऱ्या कोटींतील जे गृहस्थ होते त्यांसही **कुमुद्वंधु** एकवार आंत केव्हां येईल व आपण आपली तलवार त्याच्या रक्तानें सोंवळी करून आपला पुरुषार्थ केव्हां दाखवूं असें झालें होतें!

**कुमुद्वंधूस** घेऊन आलेला हुजऱ्या दाराशीं येतांच दार उघडलें, आणि "सरदार **कुमुद्वंधुराज महेश्वरकर**" एवढे शब्द दाराच्या आंत होऊन त्या हुजऱ्यानें उच्चारिले व तो फिरून दाराबाहेर आला.

**कुमुद्वंधु** दाराच्या आंत शिरला. लागलीच पाठीमागचें दार लागलें, पण बाहेरून आडणा वगैरे कांहीं एक वाजलें नाहीं. **कुमुद्वंधु** पुढें येतांच त्यानें मोठ्या शांत, गंभीर व सादर मुद्रेनें आंत बसलेल्या सर्व गृहस्थांस प्रणाम केला. त्या बंडखोर व राजद्रोही मंडळींतही असे कांहीं लोक होतेच, कीं ज्यांना आमच्या सरदाराचा उमदा चेहरा, गंभीर पण बेफिकीर मुद्रा आणि शिष्टपणाचें वर्तन हीं पाहून त्याजविषयीं एक प्रकारचें प्रेम उत्पन्न झालें. बरें, दुसरे असेही कांहीं होतेच कीं, ज्यांच्या नेहमींच्या क्रूर वर्तनानें त्यांच्या वृत्तीही तशाच बनून प्राणघात व रक्तपात या विचारांशिवाय दुसरे विचार त्यांच्या मनास कधींही शिवावयाचे नाहींत. अशा प्रकारचे जे गृहस्थ तेथें होते ते आपल्या रुधिरदर्शनोत्सुक आणि द्वेषसंतप्त दृष्टि त्याजकडे लावून बुभुक्षित लांडग्याप्रमाणें पुढें सरण्याची वाट पहात होते. **कुमुद्वंधूनें** मंडळीस प्रणाम करतांना सर्वांवरून आपली तीक्ष्ण दृष्टि एकवार फिरविलीच होती, व तेवढ्यावरून कोणाची दृष्टि आपल्यावर कशी आहे हें त्यानें पाहून ठेविलें होतें; पण आपली मुद्रा त्यानें इतकी निश्चल ठेविली होती कीं, कोणत्याही प्रकारें भय किंवा शंका यांचा स्पर्श याच्या मनास झाला असेल असें कोणासही वाटलें नसावें.

"सरदार **कुमुद्वंधुराय** आपण माझी भेट घेण्याकरितां आलां आहांत काय? आपलें मजकडे काय काम आहे?" **महामंडलेश्वर जयद्रथराय** निस्स्नेहतादर्शक स्वरानें विचारतो.

"होय सरदारसाहेब, पण आपल्या एकट्याशीं मला दोन शब्द बोलायला मिळावे अशी माझी इच्छा होती." **कुमुद्वंधु** निर्भिडपणें उत्तर करतो.

"ही गोष्ट कधींही व्हावयाची नाहीं!" **मेघनादराय बहुभुज** मध्येंच तोंड घालून जबाब देतो.

"या ठिकाणीं आतां गुप्त मुळींच चालावयाचीं नाहींत!" **मेघनादरायाचा** धाकटा भाऊ म्हणतो.

" अगदीं बरोबर. " **अर्जुनराय** चिरंजिवांच्या भाषणास मान डोलवून ह्मणतात
"फार बरी गोष्ट." **कुमुद्बंधु** आपल्या मनाची समता बिलकुल बिघडूं न देतां उत्तर करतो. " असें असेल तर मला जें बोलायचें आहे तें उघडपणें व निर्भिडपणें आपणा सर्वांसमक्ष बोलण्यास माझी हरकत आहे असें नाहीं. तर मग, शूर सरदारहो, मला जें काय सांगायचें आहे तें मी थोडक्यांत आपल्यास सांगतों. आपण आपलीं शस्त्रें खालीं ठेवा व आपली स्वामिणी व **पंचगांग** देशाच्या गादीची मालकीण जी राणी **कुमुद्वती** तिला एकदम शरण जा व हा राजद्रोहाचा मार्ग सोडा, यांत आपलें सर्वांचें हित आहे,–"

" खरोखर **उग्रसिंह**महाराजांची शपथ," धाकटा **बहुभुज** मोठ्या आवेशानें ह्मणतो. " ह्या उन्मत्तपणाबद्दल जागच्या जागींच ताबडतोब शिक्षा झाली पाहिजे ! "

" अहो, तरुण सरदार, जरा शांतपणें घ्या. थोडीशी सहिष्णुता धरा ! " **जयद्रथराय** त्या आवेशी तरुण गृहस्थाकडे पहात ह्मणतो,– " हे **महेश्वरकर** सरदार आह्मांस जो उपदेश करीत आहेत तो कोणत्या अधिकारानें व कोणत्या जोरावर हें प्रथम यांस विचारूं या. "

" सरदारसाहेब, अधिकार ह्मणाल तर मजजवळ दुसरा कोणताही नाहीं. फक्त एका सद्गुणी व नीतिमती राज्यकर्त्रीची निरपेक्षबुद्धीनें सेवा करणारा मी एक गृहस्थ आहें हाच माझा अधिकार. आतां जोरासंबंधानें विचाराल तर त्यासंबंधानेंही कांहीं विशेष सांगितलें पाहिजे असें नाहीं. माझी सदयता हाच माझा जोर. तुमच्या पक्षाचा मोड खात्रीनें होणार हें मला पक्कें दिसून आलें. तेव्हां माझ्या हातून होईल तर, कसेंही करून ही यादवी रक्तपातापूर्वीच थांबवावी आणि तुमचें व तुमच्या अनुयायांचें राजदंडापासून होईल तर रक्षण करावें असा विचार मनांत येऊन हें दौत्य मीं स्वेच्छेनें पतकरलें आहे. " **कुमुद्बंधु** ह्मणतो.

" काय आमच्या पक्षाचा मोड ! " **मेघनादराय** आवेशानें ओरडून ह्मणतो. " अहो **महेश्वरकर** ज्योतिषी, आपण आपलें पंचांग गुंडाळून जर एक क्षणभर येथें उभे रहाल तर आमच्या पक्षास दुप्पट जोर आणणारें चकचकीत प्रमाण तुमच्या डोळ्यांस दिसेल. "

" आणि त्याच्याच अभावामुळें तुमच्या हेकेखोर, स्वच्छंदी आणि असद्धर्मी राणीचे लुले झालेले हातपाय पक्के मोडून जाऊन तिला कारागृहांतील शांत एकांतवासाचा लाभ लवकरच होईल असें भविष्य मग मी तुह्मांस सांगेन ! " दुसरा एक सरदार गर्वानें ह्मणतो.

" हां, हां, थोडा विचार करा, गृहस्थांनों " **जयद्रथराय** ह्या बडबड्या सरदारांस ह्मणतो, " आपण बोलण्याच्या भरांत आपलीं गुह्यें देखील बाहेर पाडूं लागलां आहांत. "

" ह्या उन्मत्त गृहस्थाशीं आम्ही आतां कितीही स्पष्टपणें व मोकळ्या मनानें बोललों ह्मणून काय झालें ! " **मेघनादराय** ह्मणतो; " हे गृहस्थ आतां येथून जिवंत का परत

जाणार आहेत ? मग आमचीं गुह्यें गोलदुर्गाच्या कोटाबाहेर हे कसे घेऊन जाणार? आणि ह्मणून त्यांना मी असें सांगतों कीं, अहो राणीपक्षाचे कट्टे अभिमानी, ती पहा त्या चौथऱ्यावर एक पत्रिका दिसते आहे. त्या पत्रिकेनें आम्हां सर्वांस एकत्र बांधून टाकलें आहे——"

"आणि त्या पत्रिकेची आणि जवळ असलेल्या त्या पूज्य शस्त्राची शपथ वाहून आह्मीं असें ठरविलें आहे कीं, आमच्या सर्व शत्रूंस देहांतावांचून दुसरी शिक्षाच द्यावयाची नाहीं." मेघनादाचा धाकटा भाऊ ह्मणतो.

"आणि अहो महेश्वरकर, सरदार मेघनादराय प्रथम काय बोलले तें तुह्मांस नीट कळलें नसेल तर मी स्पष्ट करून सांगतों. आणखी थोड्याच वेळांत याच चौथऱ्यावर चकाकणाऱ्या पिंवळ्या जरद बावनकशी सोन्याच्या मोहोरांच्या राशी येऊन पडलेल्या तुह्मांस दिसतील आणि तुमच्या राणीच्या खजिन्यांत त्यांची फार उणीव आहे, ह्या गोष्टीची तुह्मांस आठवण होऊन तुमचें सगळें ज्योतिष मग जागच्या जागींच विरघळेल !" तिसरे एक गृहस्थ कुमुद्बंधूची थट्टा करणाऱ्या हेतूनें हंसत हंसत ह्मणाले.

"तर मग मीही तुह्मांशीं 'स्पष्टपणेंच बोलतों." कुमुद्बंधु उत्तर करतो." अहो सरदार मंडळी, त्या तुमच्या पत्रिकेस नुस्त्या खरड्याचीही किंमत नाहीं; तुमच्या शपथा एखाद्या मधुपाच्या शपथांहूनही व्यर्थ आहेत; आणि ज्या सुवर्णाच्या जोरावर तुम्ही इतके उड्या मारीत अहां तें सुवर्णही तुमचे हातीं आतां येणें नाहीं, समजलां !"

"ही व्यर्थ बडबड आहे !" "हा गृहस्थ उन्मत्तपणानें हवें तें बरळूं लागला आहे !" "बस, ह्याची जीभ येथेंच थांबविली पाहिजे !" "ह्याला ताबडतोब देहान्तशासन झालें पाहिजे !" वगैरे नानाप्रकारचे उद्गार निरनिराळ्या सरदार मंडळींच्या तोंडांतून एकदम बाहेर पडले.

"राजद्रोही सरदारांनों, क्षणभर शांत व्हा आणि माझें ह्मणणें ऐका." कुमुद्बंधु चिडल्यासारखें दाखवून ह्मणतो. "राजा गूहसिंह याजकडून येणाऱ्या द्रव्यावर आतां आशा ठेवून फसूं नका. तें आतां तुमच्या हातीं येऊन पडण्याची बिलकुल आशा नाहीं. गूहसिंहाशीं चाललेलीं तुमचीं सर्व कारस्थानें बाहेर पडलीं आणि कालयवन देशाहून आलेलें द्रव्य कुमुद्वतीराणीसाहेबांच्या खजिन्यांत सुरक्षितपणें जाऊन पडलें आहे."

"हें खोटें आहे !" "असें कधींही होणार नाहीं !" इत्यादि उद्गार कित्येकांनीं काढले, पण बहुतेकांचीं तोंडें हे कुमुद्बंधूचे शब्द ऐकून काळीं ठिक्कर झालीं.

"काय, माझें बोलणें तुह्मांस खोटें वाटतें ?" कुमुद्बंधु ओरडून ह्मणतो, "तर मग तें मी पुराव्यानें सिद्ध करून दाखवितों. अहो महामंडलेश्वर जयद्रथराय, काल रात्रीं कोणी श्वेतपादराय या नांवाचे कालयवन देशच्या दरबारांतले गृहस्थ गूहसिंहाकडील द्रव्य घेऊन कुवलयपुरीस यावयाचे होते काय? कुवलयपुराहून तें द्रव्य येथें घेऊन येण्याकरितां तुमचे पुतणे सरदार बालार्कराय सेनापती येथून तिकडे रवाना करण्यांत आले होते काय ?

सरदारहो, आतां तरी तुमची शंका नाहींशी झाली काय? **श्वेतपादराय गुहासिंहा**कडील द्रव्य घेऊन येत असतां त्यांस काल रात्रीं पकडलें, आणि त्यांच्याजवळचें सर्व द्रव्य सरकारी खजिन्यांत जमा झालें. शिवाय तुमचे सर्व बेत राणीसाहेबांस कळले. त्यामुळें सर्व राजनिष्ठ सरदारांस आपापल्या सैन्यानिशीं एकदम **कुवलयपुरी**स हजर होण्याबद्दल आज्ञापत्रें रात्र उजाडण्याच्या आंतच सुटलीं व ह्या वेळीं निदान पांच दहा हजार सैन्य तरी **कुवलयपुरी**बाहेर येऊन दाखल झालें असेल!"

"मित्रहो, हे **महेश्वरकर** सांगतात ही गोष्ट खोटी असेल असें आतां माझ्या हातून ह्मणवत नाहीं!" **महामंडलेश्वर जयद्रथराया**चा चेहरा पांढरा फटफटीत होऊन व मुद्रा खिन्न होऊन ते शून्यदृष्टीनें आपल्या बंधुवर्गाकडे पहात ह्मणतात.

**जयद्रथरायां**च्या तोंडून हे शब्द निघतांच त्या सर्व राजद्रोही सरदारांच्या तोंडांतून संतापानें व त्वेषानें नानाप्रकारचे उद्गार निघाले. **मेघनादराय** सर्वांत मोठ्यानें ओरडून ह्मणाला, "हा खचित विश्वासघाताचा प्रकार आहे! यांत निःसंशय कोणीं तरी हरामखोरी केलेली आहे!"

"**बालार्कराय** सेनापती कोठें आहे? तो अजून कां आपलें तोंड दाखवीत नाहीं?" दुसरे एकदोन सरदार **मेघनादराया**ची शंका स्पष्ट करण्याकरितां ह्मणाले.

"सरदारहो," **जयद्रथराय** थोडा रागावून ह्मणतो, "जर तुमच्या मनांत **बालार्करा**[illegible]द्दल संशय आला असेल व त्यानें विश्वासघातकीपणाचें आचरण केलें असावें असें तुह्मांस वाटत असेल तर तें अगदीं खोटें आहे असें समजा! त्याच्या विश्वासूपणाबद्दल मी आपले प्राण गहाण ठेवण्यास तयार आहें. अहो **महेश्वरकर** सरदार, मेहेरबानी करून याबद्दल तुह्मांस काय माहित असेल तें स्पष्ट बोला."

"**जयद्रथराय** मी जो येथें आलों आहें तो आपणांशीं स्पष्टपणें बोलावें ह्मणूनच आलों आहें," **कुमुदबंधु** उत्तर करितो; "तेव्हां या गोष्टीसंबंधानेंही स्पष्टपणें बोलण्यास मला कोणतीही हरकत नाहीं. **गुहासिंहा**कडून आलेलें द्रव्य राणीसाहेबांच्या हातीं लागलें, यांत **बालार्कराया**चा कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं. यासंबंधाची बातमी निराळ्याच मार्गानें प्रथम लागली. नंतर **श्वेतपादरायास** कैद केलें व त्यानें सर्व गोष्टी कबूल केल्या. असो; सरदारगृहस्थहो, राणीसाहेबांच्या कमलचिन्हांकित निशाणाचें रक्षण करण्याकरितां हजारों किंबहुना लक्षावधि लोक **कुवलयपुरी**कडे आज धांव घेत आहेत. आणि थोडक्याच वेळांत तें प्रचंड सैन्य तुह्मांला येऊन वेढील आणि मग वाऱ्याच्या सोंसाट्यापुढें जशी कोंड्याची अवस्था होते त्याप्रमाणें तुमची स्थिति होईल हें लक्षांत ठेवा!"

"तें काय काय होतें हेंच पाहण्याची आह्मांला उत्कंठा आहे." **मेघनादराय बहुभुज** अभिमानानें व तिरस्कारानें ह्मणतो, "आम्हा सर्वांच्या शपथा आणा झाल्या आहेत व ती पवित्र शपथपत्रिका तेथें तुमच्यासमोरच आहे. कांहीं झालें तरी घेत-

लेल्या शपथा आह्मी कधींही मोडणार नाहीं !"

" अगदीं बरोबर ! आम्हीं शपथा घेतल्या आहेत व त्या आम्ही खऱ्या करणारच ! एकवार तोंडानें बाहेर काढलेले शब्द परत गिळणें नामर्दपणाचें काम आहे !" धाकटा **बहुभुज** इतर सरदार मंडळीकडे पहात ह्मणाला.

" शाबास, माझ्या छाव्यानों !" वृद्ध **बहुभुज** आपल्या मुलांकडे अभिमानानें पहात ह्मणतात. " तुम्हीं यावेळीं खऱ्या शिपायांसारखे बोललां ! असल्या क्षुद्र आपत्तींना आपण भिऊन त्यांच्यापुढें आपल्या माना वांकविणें हें आपल्या नांवास व कुलास कधीं तरी शोभेल काय ?"

"नाहीं ! नाहीं !" त्या वेताळ दरबारांतील कित्येक पिशाचें एकदम ओरडलीं. " बस बस, आम्हीं शपथा वाहिल्या आहेत, त्या आम्ही खऱ्या करणार. कसाही प्रसंग येवो, आम्हीं घेतलेल्या शपथांस व त्या पत्रिकेस आम्हीं आपले देह व प्राण वाहिले आहेत !"

" आणि त्या शपथा व ती पत्रिका आम्ही किती पूज्य मानितों हें दाखविण्याकरितां ह्या **महेश्वरकरा**चा देहान्त झाला पाहिजे." **मेघनादराय बहुभुज** ह्मणतो, " आमचें द्रव्य राणीच्या हातीं कसें गेलें याबद्दल इत्थंभूत बातमी ज्याअर्थी या सरदारास कळली त्याअर्थी त्या कामीं त्याचा हात असलाच पाहिजे !."

" कसेंही असो," **मेघनादराया**चा धाकटा भाऊ आवेशानें ह्मणतो, " शत्रुपक्षाकडील लोकांचा सूड घेण्याची आमची शपथ आहे व त्या सूडास या गृहस्थापासून आरंभ झालाच पाहिजे !"

" बस् ! बस् !" दोन तीन असामी दुसरे सरदार एकदम ओरडले." हा **महेश्वरकर** मेलाच पाहिजे. **महामंडलेश्वरराय**, आपण त्याला शिक्षा सांगा ह्मणजे आम्ही त्याला बाहेर ओढतों !"

इतकें बोलून ते दोन तीन सरदार व दोघे **बहुभुज**बंधु आपापल्या आसनांवरून उठले आणि **कुमुद्बंधूं**च्या दंडास हात घालण्याकरितां पुढें सरणार होते; इतक्यांत **कुमुद्बंधु** अधिकारयुक्त स्वरानें एकदम ओरडून म्हणाला. " अहो उच्छृंखळ तरुण सरदारहो, इतके अधीर होऊं नका ! क्षणभर दम धरा ! **जयद्रथराय**, तुम्ही **बालार्करायां**संबंधानें मला नुकताच प्रश्न केला होता. ऐका तर, तुमचा पुतण्या आणि तुमच्या पक्षाचा एक कट्टा अभिमानी सरदार **बालार्कराय** याचे प्राण माझ्या प्राणाबद्दल गहाण ठेवून घेतलेले आहेत !"

एकदम सर्व मंडळींच्या तोंडून दुखाश्चर्यदर्शक उद्गार निघाले आणि सर्वजणांचे चेहरे गोंधळलेले व चकित झालेले दिसूं लागले.

" **जयद्रथराय**, हा कागदाचा कपटा येवढा वाचून पहा !" **कुमुद्बंधु** थोडा पुढें सरून व **बालार्करायानें** लिहून दिलेली चिठ्ठी **जयद्रथराया**पुढें करून ह्मणतो.

"सरदारहो, हें अक्षर खचित आमच्या **बालार्करायाचें**च आहे; आणि यांत लिहिलेल्या मजकुरावरून हे **महेश्वरकर**

सांगतात या सर्व गोष्टी खऱ्या आहेत असें दिसतें!" **जयद्रथराय** खिन्न मुद्रेनें त्या कागदाच्या कपट्याकडे पहात ह्मणाला.

"वाचा, वाचा, कृपा करून तो कागद अगोदर वाचा!" बहुतेक सरदार मंडळी अत्यंत उत्कंठेनें एकदम ओरडली.

"ऐका, वाचतों." **जयद्रथरायानें** उत्तर केलें, व लागलीच ती चिठ्ठी वाचण्यास त्यानें सुरुवात केली. चिठ्ठींतील मजकूर पुढें लिहिल्याप्रमाणें होता:

" श्रीमंत सकलगुणालंकरण......
" तीर्थरूप राजेश्री **काका**साहेब **महामंड-**
" **लेश्वर** यांचे चरणीं मस्तक ठेऊन बालक
" **बालार्कराय सेनापती** याची विज्ञप्तिः—
" आपली आज्ञा घेऊन निघालों तो **कुव-**
" **लयपुरीस** नेमल्या वेळीं सुखरूप
" पोंचलों; परंतु माझें येणें निरर्थक झालें
" यासंबंधाची संपूर्ण हकीकत सरदार **कु-**
" **मुदबंधुराय महेश्वरकर** यांस विदित
" आहे, व ते ती आपल्यास समक्ष मुख-
" जबानीं सांगतील. एकंदरींत प्रत्यक्ष परमे-
" श्वरानेंच राणीचा पक्ष उचलला आहे
" असें हकीकतीवरून आपल्यासही दिसेल.
" मी नेमक्या वेळीं परत आलों नाहीं हें
" पाहून आपण अस्वस्थ झालां असाल; पण
" उपाय काय? सरदार **कुमुदबंधु** आपल्या
" भेटीस जाणार असें ठरल्यावरून त्यांच्या
" जिवास कांहीं अपाय होऊं नये ह्मणून ते
" सुरक्षित परत येत तोंपर्यंत मला बंदि-
" वान करून ठेविलेलें आहे. मी कोण-
" त्या ठिकाणीं आहें हें कळविण्याची मला
" परवानगी नाहीं. जर आज सूर्यास्ता-
" पूर्वी सरदार **कुमुदबंधु गोलदुर्गा**हून
" सुरक्षित परत आले नाहींत तर आपल्या
" लाडक्या **बालार्का**चा अंत झाला असें
" निश्चयानें समजावें. व त्याच्या अकालि-
" क मृत्यूबद्दल मनास दुःख न होऊं देतां
" त्याचें और्ध्वदेहिक मात्र विधिपूर्वक हो-
" ईल असें करावें. वडिलांप्रति श्रुत होय
" हे विज्ञप्ति."

पत्राचें वाचन चाललें असतां व तें संपल्यावर कांहीं वेळपर्यंत सर्व मंडळी अगदीं स्वस्थ बसली होती. आतां पुढें काय बोलावें किंवा काय करावें हें कोणासच सुचेना. त्यांच्या खिन्न दृष्टि मात्र परस्परांकडे व **जयद्रथराया**कडे फिरून फिरून वळत होत्या. जणूं काय या बिकट प्रसंगास भिऊन सुकुमार जिव्हेनें आपल्या स्त्रीत्वानुरूप आपला नित्याधिकार कठोर नेत्रांकडे सोंपविला होता, व ह्मणूनच या सरदार मंडळींतील प्रश्नोत्तरी भाषण फक्त नेत्रांच्या द्वारें चाललें होतें! **कुमुदबंधु** मात्र निर्भयपणें व गंभीर मुद्रेनें सर्वांकडे पहात ताठ उभा राहिला होता.

शेवटीं **महामंडलेश्वर जयद्रथरायानें** मनास थोडें स्थैर्य आणून भाषण सुरूं केलें. ते ह्मणतात, " सरदारहो, बंधूजनहो, याचा निकाल शेवटीं कसा करावयाचा? ही गोष्ट पूर्णपणें तुमच्याच हातांत आहे."

कांहीं वेळपर्यंत कोणीही बोलेना. शेवटीं वृद्ध **बहुभुज** स्थानावरून उठून उभे राहिले आणि चौथऱ्यावर असलेल्या पत्रिकेकडे बोट करून उग्र मुद्रेनें व गंभीर स्वरानें बोलतात, " सरदारहो, इतके विचारांत कां पडलांत? आपणापुढें ती पत्रिका आहे. त्या-

वर आपण सर्वांनीं केलेल्या मुद्रिकांची शाईही अजून पुरती वाळली नसेल! त्या पत्रिकेंतील कलमें तुह्मी अद्याप विसरलां नाहींना? आपल्या सर्व वैऱ्यांस देहांतशासन झालें पाहिजे असें कांहीं कलम त्या पत्रिकेंत आहे का?"

"अलवत, अलवत," **मेघनादराय** उत्साहानें ओरडतो. "आणि **महेश्वरकर** आपल्या सर्वांचा वैरी आहे व तो तावडतोब मेलाच पाहिजे."

"पण मित्रहो," **जयद्रथराय** कांहींसा चिंताक्रांत होऊन ह्मणतो, "केवळ निरपेक्षबुद्धीनें सामाचें बोलणें करण्याकरितां आलेल्या या सरदार दुताच्या सुरक्षितपणावर **बालार्करायाचें** जीवित अवलंबून आहे हेंही आपल्या ध्यानांत आलेंच असेल!"

"मला हें तें कांहीं कळत नाहीं." **अर्जुनराय बहुभुज** हट्टी मुद्रेनें **जयद्रथराया**कडे पहात व चौथऱ्यावरील पत्रिकेकडे हात दाखवून ह्मणतो, "ती पत्रिका तेथें आहे. तींत जीं कलमें आहेत तीं वज्रलिपीप्रमाणें आहेत! त्या कलमांप्रमाणें वागण्याबद्दल आपण सर्वांनीं शपथा वाहिल्या आहेत! शपथ वाहण्यास व त्या पत्रिकेवर सह्या करण्यास आपण सर्व मंडळी तयार झालांत, त्याच वेळीं मीं आपणास बजाविलें आहे कीं, या पूज्यस्थानीं घेतलेली शपथ तशीच पूज्य मानिली पाहिजे! बायकांप्रमाणें आपलीं अंतःकरणें मऊ होऊं द्याल व ज्या ठिकाणीं दया करणें हें अगदीं अयोग्य अशा ठिकाणीं दया करण्याकरितां आपण घेतलेल्या घोर शपथा मोडण्यास सज्ज व्हाल तर ज्या महातेजस्वी तपोनिधीच्या आत्म्यास साक्षी ठेऊन तुह्मीं शपथा वाहिल्या तोच तपस्वी आपल्या अलौकिक शक्तीनें तुम्हां सर्वांचा समूळ नाश करील, व त्याच्या क्रोधाग्नींत तुमची राखरांगोळी होऊन जाईल हें ध्यानांत ठेवा! सरदारहो, तुम्हीं ज्या शपथा वाहिल्या त्या कशाकरितां? तुम्हीं आपल्या सह्यांनीं मुद्रित केलेल्या त्या लेखांत असेंही एक कलम नाहीं काय कीं, आपल्या पक्षाच्या हिताकरितां प्रसंग पडल्यास आपले इष्टमित्र आप्तबांधव इत्यादि सर्व नातीं विसरून फक्त एक पक्षाचें हित साधेल त्या मार्गानें चालावयाचें? हें कलम त्या लेखांत आहे व त्या लेखावर या पवित्र ठिकाणीं आपण सर्वांनीं सह्या केल्या आहेत, आणि महाप्रतापि **उग्रसिंह**महाराजांच्या पूज्य शस्त्रापुढें मस्तकें नमवून आपण शपथा वाहिल्या आहेत. त्याच्याविरुद्ध वागण्यास दोन घटकांच्या आंतच या बसल्या ठिकाणींच तुह्मी तयार झालांत तर त्याचा परिणाम काय होईल बरें? जर आपण या सरदाराचे प्राण घेतले तर आमचा एक प्रिय बंधु जो **बालार्कराय** त्याचे प्राण त्याबरोबर जातील ही गोष्ट अगदीं खरी आहे! **बालार्करायासारखा** एक तरुण वीर आपल्यांतून गमविण्याचा प्रसंग यावा ही गोष्ट फार फार दुःखदायक आहे; पण हा सरदार आपला फार दिवसांचा वैरी आहे, यानें आमच्या पक्षाचें आजपर्यंत अत्यंत नुकसान केलेलें आहे, आणि हा येथून जिवंत सुटल्यास आमचें आणखी किती नुकसान

करील याचा नेम नाहीं. तेव्हां आपणा सर्वांच्या हिताकरितां असला कांटा आपल्या वाटेंतून दूर करणें हें अवश्य नाहीं काय? मग त्याकरितां **बालार्करायासारख्या** आपल्या एका बंधूचे मौल्यवान् प्राणही जरी खर्ची पडले तरी त्याला कचरून कसें चालेल! अशा कामांत एकवार पडल्यानंतर हें जग कोणास केव्हां व कसेंही सोडून जावें लागलें तरी सर्वांनीं त्या गोष्टीस तयार असलेंच पाहिजे!"

"सरदार **अर्जुनराय**," **जयद्रथराय** फारच खिन्न मुद्रेनें व घोगऱ्या स्वरानें ह्मणतो, "सरदार **अर्जुनराय**, कसेंही झालें तरी अशा प्रकारची कोणतीही गोष्ट करितांना बहुमताप्रमाणें चालावयाचें असें त्या पत्रिकेंत कलम आहेना?"

"अलबत आहे." **अर्जुनराय** ह्मणतो, "त्या पत्रिकेंतील सर्व कलमें माझ्या पुरीं लक्षांत आहेत. घ्या तर आपण जमलेल्या सर्व मंडळींचे विचार. माझी या गोष्टीस बिलकुल हरकत नाहीं. मात्र सरदारहो, आपण आपला विचार कायम करण्याच्या अगोदर मी आणखी दोन शब्द बोलतों येवढे लक्ष्यांत घ्या. त्या गृहस्थाला आपण येथें येऊं दिलें, आपण येथें कोण कोण मंडळी जमलों आहों, हें यानें पाहिलें आहे, आपले विचार काय चालले आहेत ते सर्व यानें ऐकले आहेत; तात्पर्य, आपलीं सर्व गुह्यें याला कळलेलीं आहेत. समजा, अशा स्थितींत तुह्मीं याला सोडून दिला तर त्याचा परिणाम काय होईल! आपण आरंभिलेल्या कार्यास परमेश्वरेच्छेनें यश न आलें तर आपणास राज्ञीकोपापासून निसटून जाण्याची जी एक गुप्त वाट तीही आपण आपल्या हातांनीं बंद केल्यासारखी होईल! इतर कोणत्याही रीतीनें तुमच्याविरुद्ध जो पुरावा राणीस जमा करतां येईल त्यापेक्षां या गृहस्थानें शपथेवर सांगितलेले दोन शब्द अधिक काम करतील! आतां सरदारहो, तुम्हांला वाटेल त्याप्रमाणें तुम्ही करा. मला जास्त कांहीं बोलावयाचें नाहीं."

"आपल्यासंबंधाचीं गुह्यें बाहेर पडूं नयेत येवढेंच असेल तर तें सहज करतां येण्यासारखें आहे." **जयद्रथराय** ह्मणतो. "**गोलदुर्गा**च्या आंत पाऊल ठेविल्यापासून जें काय या गृहस्थानीं पाहिलें असेल किंवा ऐकिलें असेल, त्यांपैकीं एक अक्षरही बाहेर फोडणार नाहीं अशी शपथ याजपासून घेऊन नंतर यास येथून सोडलें ह्मणजे झालें."

चिरेबंदी समाधीच्या आंत एखाद्या गुह्याचें रक्षण जितक्या चांगल्या रीतीनें होईल तितकें नुसत्या शपथेनें ओंठ बांधून टाकले ह्मणून होईल असें मला तरी वाटत नाहीं." **अर्जुनराय** आपल्या उग्र व हट्टी मुद्रेनें **जयद्रथराया**कडे पहात ह्मणतो, "पण मी आतां जास्त कशास बोलूं. आपल्यापुढें ती पत्रिका आहे तिला अनुसरून काय करणें तें करा."

"बरें तर." **जयद्रथराय** दुःखाकूल होऊन ह्मणतो, "बहुमतानें अशा गोष्टींचा निकाल झाला पाहिजे, तर सरदारलोकहो, बोला, या गृहस्थास अशा स्थितींत कत्तल करणें तुम्हांस पसंत आहे काय?"

दोन तीन गृहस्थांशिवाय सर्वांची मतें **अर्जुनराय बहुभुज** यांस अनुकूल अशींच पडलीं व या राजद्रोही सरदारांनीं **कुमुदबंधू**ची शेवटची घटका हीच ठरविली !

अकस्मात् एकादें अपरिहार्य महत् संकट येऊन गुदरतें तेव्हांच मनुष्याच्या धैर्याची व प्रसंगावधानाची खरी परीक्षा होते. खरा स्वाभिमान ज्याच्या ठिकाणीं वास करीत असतो तो अशा प्रसंगींही आपलें संरक्षण करून घेण्याकरितां आपली मान वांकविण्यास प्रवृत्त होत नाहीं. तो नेहमीं आपल्या बुद्धीबलाच्या व बाहुबलाच्या जोरावर मुक्त होण्याचे प्रयत्न शेवटपर्यंत करतो व परमेश्वरही अशालाच अंतीं यश देतो.

त्या बंडखोर सरदारांचीं मनें आपला देहांत करावा अशाबद्दल पडलीं हें पाहून **कुमुदबंधू**चे पाय गळून तो जमिनीवर धाडकन् बेशुद्ध होऊन पडला नाहीं, किंवा त्या क्रूर शत्रूपुढें मान लववून त्यांनीं त्याजपाशीं दयाही भाकली नाहीं. **भारती**युद्धांतील एकाद्या निश्चयी योद्ध्याप्रमाणें तो तसाच छाती पुढें करून ताठ उभा राहिला आणि मुद्रेंत किंवा चलनवलनांत भीतीचा किंवा अस्वस्थतेचा लेशही न दाखवितां अभिमानयुक्त स्वरानें तो ओरडून ह्मणतो, "सरदारहो, जरा थांबा, मला फक्त एक शब्द शेवटीं बोलावयाचा आहे."

**कुमुदबंधु** हे शब्द बोलत असतांच दोघे **बहुभुज** बंधू आणि दुसरे एक दोन गृहस्थ आपापल्या आसनावरून उठून **कुमुदबंधूस** आपल्या स्वाधीन करून घेण्याकरितां पुढें सरत होते; पण **अर्जुनरायानें** एकदम उभें राहून अधिकारपूर्वक आपला हात पुढें केला, व त्या मंडळींचें निवारण करण्याकरितां तो ह्मणाला, "इतकी घाई करूं नका. बोलूनद्या त्याला काय बोलावयाचें तें ! तो आतां मृत्यूच्या द्वाराशीं उभा आहे. अशा वेळीं त्याला जें काय बोलावयाचें असेल तें आपण स्वस्थपणें ऐकलेंच पाहिजे."

"सरदारहो," **कुमुदबंधु** ह्मणतो, "या गृहस्थानीं सांगितल्याप्रमाणें मी आतां मृत्यूच्या द्वाराशीं उभा आहें हें अगदीं खरें आहे. अशा स्थितींत असतांना केवळ निरपेक्षबुद्धीनें आणि सरळ अंत:करणानें तुमच्या हिताचे दोन शब्द मी तुह्मांस सांगतों व तुह्मांवर पुढें येणाऱ्या संकटाबद्दल तुह्मांस आतांच जागें करून ठेवतों. मी जे शब्द यावेळीं बोलत आहें ते या जगांत उभा राहून बोलत आहे असें समजूं नका. माझा देह तुह्मांपुढें आहे, परंतु माझा आत्मा मृत मनुष्यें ज्या प्रदेशांत संचार करितात, त्या ठिकाणीं आहे हें ध्यानांत ठेवा. गृहस्थहो, तुह्मां सर्वांना ठाऊक आहेना, कीं कांहीं शतकांपूर्वी एका महान् योद्ध्यानें अहिक वासनांचा व बंधनांचा त्याग करून केवळ ईश्वराराधन व तपोनुष्ठान करण्यांत आपला काल या **तपोमंदिरां**त घालविला व त्यामुळें या स्थानास पूज्यता व पवित्रता आली आहे ! त्या महान् योद्ध्याची व तपोनिधीची समाधीही तुमचेसमोरच आहे ! त्यांचीं शस्त्रें व तपायुधें तीं पलिकडील पडद्यांत आहेत, तीं तुम्हांस दिसतच आहेत ! तुह्मांला हेंही ठाऊक आहे कीं, तो महान् क्षत्रिय तपोनिधि केव्हां केव्हां या **तपोमंदिरां**त कोणाकोणास दर्शन देतो ! तर मग लक्षांत

आणा, सरदारहो, या अशा स्थानीं तुह्मी या राजद्रोहाच्या आणि बंडखोरीच्या क्रूर शपथा वाहिल्या आहेत आणि याच ठिकाणीं त्या पत्रिकेसारिखे अमंगल लेख तुह्मीं तुमच्या नाममुद्रांनीं अंकित केले आहेत ! तुह्मी ह्मणाल, होय मग ? मग काय, गृहस्थहो, जर तुमचीं कृत्यें त्या महात्म्यास मान्य असतील तर या ठिकाणीं होणारे शकुन अनुकूल होतील व जर तीं त्यास नापसंत असतील तर येथील शकुनही प्रतिकूल झाले पाहिजेत ! पण हें काय ? ह्या दिव्याचा प्रकाश असा अधिकाधिक लाल व मंद कां होत चालला ? ह्या कोंडलेल्या जाग्यांत हा थंडगार आणि अंगास झोंबणारा वारा कोठून येऊं लागला ? ते पलीकडचे रेशमी पडदे एकदम असे हालूं कां लागले ? बाद्रिकेशा ! ही त्या पडद्याआडून वीराचें स्वरूप धारण केलेली मूर्ति पुढें सरत आहे, ते महाराज उग्रसिंह तर नव्हेतना ? "

कुमुदबंधु असें बोलत असतां त्याचा स्वर चढत चढत बराच गंभीर झाला. शब्दोच्चार फारच जलद होऊं लागला. मुद्रेवरून तो फारच घाबरल्यासारखा दिसूं लागला व त्याची दृष्टि निश्चल होऊन तो वेड्याप्रमाणें त्या मंदिरांतील मागील भिंतीशीं टांगलेल्या पडद्यांकडे पाहत राहिला. सहजच सर्व मंडळींच्या मनावर त्याच्या गंभीर भाषणाचा व चमत्कारिक वर्तनाचा परिणाम झाला. सर्वजण एकदम घोंटाळून जाऊन त्या पडद्यांकडे पाहूं लागले.

पुढें जें काय झालें तें एका निमिषार्धांत ! डोळ्याचें पातें देखील लवलें नसेल तों कुमुदबंधूनें झटदिशीं एक पाऊल पुढें टाकिलें, त्या चौथऱ्यावर ठेवलेले दोन कागद डाव्या हातांत घेतले, तेथेंच ठेवलेली उग्रसिंहाची अजस्त्र तलवार उजव्या हातांत घेतली व एकाच उडींत तपोमंदिराचा दरवाजा गांठला !

"चोर पळाला." दोघे बहुभुजबंधु एकदम ओरडले व त्यांनींही दरवाजाकडे उड्या घातल्या ! कुमुदबंधूच्या हातांतील शस्त्र अत्यंत वेगानें एकदांच हवेंतून फिरलें त्याबरोबर ते दोघेही धाडसी गृहस्थ जखमी होऊन जमिनीवर पडले ! कुमुदबंधु दरवाजाच्या बाहेर झाला व त्यानें दरवाजा धाडकन् लावला. इतक्यांत चारपांच मंडळी शुद्धीवर येऊन दरवाजा मागें लोटून उघडण्याकरितां दरवाजावर धांऊन जाऊन पडली; पण एवढ्या अवकाशांत बाहेरचा आढणा देखील लागला !

हें सर्व कृत्य कुमुदबंधूनें किती त्वरेनें केलें असेल याची कल्पना करणें देखील अशक्य; मग त्याचें वर्णन कसें होईल ! त्याच्या प्रसंगावधानाचें व बुद्धीबलाचें फल तर त्याला मिळालें. पण तपोमंदिरांतून बाहेर पडणें ह्मणजे गोलदुर्गांतून मुक्त होणें नव्हे हें तो जाणून होता. दरवाजाबाहेर पडतांच त्यानें इकडे तिकडे पाहिलें तों आसपास कोणी माणूस नाहीं असें दिसलें, व यामुळें त्याचें मन कांहींसें स्वस्थ झालें. त्यानें हातांतील शस्त्र तेथेंच एका बाजूस फेंकून दिलें, डाव्या हातांतले कागद चिलखताच्या आंत ठेविले व मुद्रा नेहमींप्रमाणें शांत व कांहींशी आनंदी करून तो आल्या वाटेनें परत तबेल्याकडे चालला. ज्या तरुण झुजऱ्यानें त्याला तपोमंदिररूपी मृत्युदर-

बारांत नेऊन पोंचविलें होतें तोच हुजऱ्या फिरून वाटेंत त्यास भेटला. कुमुद्बंधु सुखरूप परत आलेला पाहून त्याला आश्चर्य वाटलें असावें असें त्याच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें. परंतु त्या आश्चर्याबरोबर आनंद व संतोष यांचीही झांक मिश्र झालेली होती.

त्या हुजऱ्याच्या मनांत काय विचार चालले आहेत तें कुमुद्बंधूनें तेव्हांच ताडलें व तो हंसत हंसत त्याला ह्मणतो, "अरे, मी समजलों, तूं मजकडे असा कां पाहतो आहेस तें! मी आपला साडेतीन हात देह सुखरूप घेऊन जसा गेलों तसाच परत बाहेर सुटलों याचें तुला आश्चर्य वाटत आहे. होय कीं? तुझ्या यजमानाच्या त्या दोघा चिरंजिवांच्या हातून मी सुखरूप परत येईन असें तुला खचित वाटलें नव्हतें! असेंचना? पण मी कशाकरितां आलों होतों व माझ्या येण्यानें या सर्व मंडळींचें केवढें कार्य साधणार होतें, हें प्रथम त्या जमलेल्या गृहस्थांस कळलें नव्हतें! मी आंत जाऊन चार शब्द बोलतांच त्यांचे पहिले बेत संपले, आणि त्यांना फाजित पावल्यासारखें झालें आणि ह्मणून मी गोलदुर्गांतून आलों तसा सुरक्षितपणें परत जाणार. समजलास!"

"महाराज," हुजऱ्या उत्तर करतो, "आपल्याला तपोमंदिरांत घेऊन जातांना मला अतिशय वाईट वाटत होतें. आपण आतां सुखरूप बाहेर आलेले दिसलांत, तेव्हां आनंदही तितकाच झाला! बरें सरकार, आतां घाईचें काम आटपलें. मग थोडें पाणी पिऊन जायचेंना?"

"छि, बाबा," कुमुद्बंधु बोलतो, "तुला वाटतें घाईचें काम आटपलें; पण मी जितक्या त्वरेनें इकडे आलों त्याहून दुप्पट त्वरेनें मला दुसऱ्या ठिकाणीं गेलें पाहिजे. म्हणून तुझ्या विनंतीचा आदर करण्यास मला सवड नाहीं. माफ कर." असें बोलत कुमुद्बंधु व तो हुजऱ्या तबेल्याकडे गेले. आमच्या सरदारानें घोड्याकडे नजर फेंकली व त्याचें सामानसुमान सर्व यथास्थित आहे असें एकवार पाहून त्यानें ठरविलें. जवळ जाऊन जिनाच्या घडीच्या आंत शक्तिधरराय व महासेनराय यांच्या तलवारींच्या मुठी बांधून ठेविलेल्या होत्या त्या जशाच्या तशाच आहेत कीं नाहींत हेंही त्यांनीं पाहून घेतलें, व केलेली युक्ती बरोबर साधली अशी त्याची खात्री झाली. व्यर्थ जिज्ञासेनें कोणी मोतद्दारानें घोड्याच्या सामानास हात लावूं नये ह्मणून कुमुद्बंधूनें त्या गरीब जनावरास नाहीं नाहीं त्या खोंडी मुद्दाम चिकटाऊन दिल्या होत्या, व देवडीवरील पहारेकऱ्यास व मोतद्दारास विनाकारण भय घालून ठेविलें होतें हें वाचकांस ठाऊक आहेच.

असो; घोड्याला लगाम घालून व त्याच्या गळ्याचें दवासन सोडून कुमुद्बंधूनें त्यास तबेल्यांतून बाहेर काढिलें व तो वर स्वार झाला. पुढें आल्या वाटेनें देवडीवरून पहारेकऱ्यांच्या नायकास हंसत हंसत गोलदुर्गाच्या बाहेर पडला. बापडे पहारेकरी व त्यांचे नाईकबोआ मनच्या मनांत आश्चर्य करीत राहिले, कीं असला शत्रु घरीं चालून आला असतां आपल्या यजमानानीं त्याला सुळावर चढवायाचें सोडून परत कसें जाऊं दिलें!

इकडे तपोमंदिरांतील देखावा फारच

अपूर्व झाला होता. **कुमुदबंधूनें** एका अजब युक्तीनें आपल्यास पुरें फसविलें व आपल्या हातावर तुरी देऊन तो निसटून गेला, यामुळें सर्व मंडळीस अत्यंत संताप आला होता व जे ते दांतओंठ खाऊन जागच्या जागीं गुरगुरत होते. फक्त **जयद्रथरायास** मात्र एक प्रकारचा आनंद झाला. कारण **कुमुदबंधु** सुटला, आतां **बालार्करायाचे** प्राण वांचण्याची खचित आशा आहे असें त्यास वाटलें. मंडळी आंतच्या आंत धडपडत होती, पण त्यांचा कांहीं इलाज नाहींसा झाला होता. **तपोमंदिरास** दरवाजा एक, तो इतका भक्कम कीं आंतून उघडणें अशक्य. बाहेरच्या नोकरांस हांका माराव्या तर विशेष जरूरीच्या कामावांचून कोणीही त्या मंदिराच्या जवळपास येऊं नये असा सक्त हुकूम **अर्जुनरायानें** फर्माविला. मंदिरांत हवा येण्यासाठीं ठेविलेलें गवाक्ष देखील फारच बारीक. याप्रमाणें चोहोंकडून निरुपाय. कोणी तरी कांहीं कामानिमित्त तेथें येऊन दरवाजा उघडीपर्यंत आंत स्वस्थ कैद भोगीत राहणें त्या सरदार मंडळीस भाग पडलें.

**अर्जुनरायाच्या** दोघा चिरंजिवांस बऱ्याच जखमा झाल्या होत्या, **मेघनादाच्या** उजव्या बाहूवर वार झाला होता, आणि धाकट्या **बाहुभुजाची** उजव्या पायाची नळी बरीचशी तुटली होती. रक्तप्रवाह पुष्कळ झाल्यामुळें दोघेही निचेष्टित होऊन पडले होते. वृद्ध **अर्जुनराय** व बाकीची सरदार मंडळी त्यांच्या सभोंवार जमून जखमा बांधण्याची व त्यांस शुद्धीवर आणण्याची खटपट करीत होते. शेवटीं ते शुद्धीवर येतांच त्यांस तेथेंच बैठकीवर एका बाजूस स्वस्थ निजविलें. सर्व घोंटाळ्यामुळें मंडळीचा संतापही आतां बहुतेक उतरला होता. मग खऱ्या महत्वाच्या गोष्टींबद्दल विचार चालू झाले. **गूहासिंहाकडून** आलेला खजिना तर राणीच्या हातीं लागला. आतां सैन्याच्या खर्चाची तजवीज कशी करावयाची? राणीचें सैन्य आतां ताबडतोब तयार होईल त्याचा प्रतिकार आतां कसा करावयाचा? आपली शपथपत्रिका आणि कटांतील सर्व गृहस्थांची यादी **कुमुदबंधूच्या** हातीं लागली आहे. त्यांचा उपयोग तो कसा करतो कोण जाणें? इत्यादि गोष्टींबद्दल मंडळींत प्रथमतः आपापसांत विचार चालू झाले. फक्त **अर्जुनराय** मात्र चिंताक्रांत होऊन व खिन्नवदन करून स्वस्थ बसला होता. **उग्रसिंहमहाराजांस** झालेल्या गोष्टी मान्य नाहींत असें जें **कुमुदबंधूनीं** सांगितलें तें अक्षरशः खरें असावें असें त्यास वाटूं लागलें. कारण **कुमुदबंधु** इतक्या मंडळींच्या हातून सुटून गेला, शपथपत्रिका त्याच्या हातीं लागली, महाराजांच्या पुण्यशस्त्रानेंच आपल्या दोघा मुलांस भयंकर जखमा झाल्या, हीं कांहीं सुचिन्हें नव्हेत असें त्याच्या मनांत घेऊं लागलें.

"**शक्तिधरराय** व **महासेनराय** यांचें झालें तरी काय? ते अजून कां परत येत नाहींत!" **कुमुदबंधु तपोमंदिराबाहेर** गेल्यानंतरच्या अवकाशांत **जयद्रथराय** पुनः पुनः पंचवीसदां तरी म्हणाला असेल,

"अशा महत्वाच्या वेळीं असल्या दोघा सरदारांच्या विचाराशिवाय कांहींच ठरवितां येत नाहीं."

"कदाचित्" एक सरदार ह्मणतो, "**बालार्करायाची** गांठ पडण्याकरितां ते पुढें पुढेंच गेले असतील."

"आणि आतां संध्याकाळच्या आंत किंवा निदान रात्रीं तरी **बालार्करायही** बहुधा परत येईल. मग कोण जाणे, आम्ही त्या **महेश्वरकरास** देहांतशासन करावयाचें ठरविलें त्याबद्दल तो त्याचा सूड उगवितो कीं काय." दुसरा एक सरदार **जयद्रथरायाकडे** पाहत बोलला.

"मला नाहीं वाटत कीं, तो **महेश्वरकर** सरदार असला क्रूरपणा करील!" **जयद्रथराय** ह्मणाला.

"बरें, पण आतां **गुहासिंहमहाराजाकडून** येणाऱ्या द्रव्याचें नांव तर संपलेंच. आतां पुढील बेत कसे?" **पशुपतराय** नांवाचा एक सरदार विचारितो.

"आतां दुसरा बेत कांहीं नाहीं." **जयद्रथराय** उत्तर करितो. "आतां उद्यांच्या उद्यां येथून निघून कूच दरकूच एकदम सरळ **कुवलयपुरीवर** जाऊन धडकणें जरूर आहे. आतां जर आह्मीं अत्यंत त्वरा केली नाहीं तर सर्व फसेल. राणीचें सर्व सैन्य गोळा होऊन ती आमचा पाठलाग करण्यास सज्ज होण्यापूर्वींच मुख्य राजधानीवर जाऊन आपण हल्ला केला असतां यश येण्याचा पुष्कळ संभव आहे. आतां **शक्तिधरराय** व **महासेनराय** परत आले, कीं त्यांना आपआपल्या किल्ल्याकडे तावडतोब जाण्यास सांगितलें पाहिजे. त्यांनीं परवां सायंकाळचे आंत आपल्या सर्व स्वारशिबंदीनिशीं आह्मांस येऊन मिळावें, आणि तेरवाचे दिवशीं सायंकाळीं आपण सर्व सैन्यानिशीं **कुवलयपुरीस** जाऊन एकदम वेढा दिला पाहिजे."

"ऐका, कोणी दरवाजाचा आढणा काढीत आहेसें वाटतें. बहुतकरून आमची ही कैद संपली आतां!" दरवाजाच्या जवळच असलेला एक गृहस्थ ह्मणाला.

त्या गृहस्थानें ह्मटलें तें खरेंच होतें. ज्या हुजऱ्यानें **कुमुदबंधूस तपोमंदिरांत** आणून पोंचविलें होतें तोच हुजऱ्या फिरून कांहीं जरूरीच्या कामाकरितां दरवाजाशीं आला. बाहेरून आढणा आहे हें पाहून त्याला थोडें आश्चर्य वाटलें; पण आढणा काढून त्यानें दरवाजा उघडला. आंत येतांच **कुमुदबंधु** तेथून कसा निसटला हें त्याला समजलें व तो अगदीं चकित होऊन गेला.

थोड्याच वेळांत पूर्वस्थितीवर येऊन त्यानें **जयद्रथरायास** लवून प्रणाम केला व ह्मटलें, "महाराज कोणी जासूद फार त्वरेनें आला आहे व त्यानें हा लखोटा आणला आहे." असें ह्मणून त्यानें लखोटा **जयद्रथरायापुढें** ठेविला.

**जयद्रथरायानें** लखोटा फोडिला. पत्रांतील मजकूर वाचून पहात असतां त्याचा चेहरा एकदम काळाठिकर झाला. **जयद्रथरायाची** मुद्रा नेहमीं त्याच्या इतकी स्वाधीन असे, कीं त्याचें मन कितीही चलबिचल झालें असलें, तथापि त्याचा चेहरा नेहमीं शांत व गंभीर व पूर्णपणें निश्चल दि-

अपूर्व झाला होता. **कुमुदबंधूनें** एका अजब युक्तीनें आपल्यास पुर्ते फसविलें व आपल्या हातावर तुरी देऊन तो निसटून गेला, यामुळें सर्व मंडळीस अत्यंत संताप आला होता व जे ते दांतओंठ खाऊन जागच्या जागीं गुरगुरत होते. फक्त **जयद्रथरायास** मात्र एक प्रकारचा आनंद झाला. कारण **कुमुदबंधु** सुटला, आतां **बालार्करायाचे** प्राण वांचण्याची खचित आशा आहे असें त्यास वाटलें. मंडळी आंतच्या आंत धडपडत होती, पण त्यांचा कांहीं इलाज नाहींसा झाला होता. **तपोमंदिरास** दरवाजा एक, तो इतका भक्कम कीं आंतून उघडणें अशक्य. बाहेरच्या नोकरांस हांका माराव्या तर विशेष जरूरीच्या कामावांचून कोणीही त्या मंदिराच्या जवळपास येऊं नये असा सक्त हुकूम **अर्जुनरायानें** फर्माविला. मंदिरांत हवा येण्यासाठीं ठेविलेलें गवाक्ष देखील फारच बारीक. याप्रमाणें चोहोंकडून निरुपाय. कोणी तरी कांहीं कामानिमित्त तेथें येऊन दरवाजा उघडीपर्यंत आंत स्वस्थ कैद भोगीत राहणें त्या सरदार मंडळीस भाग पडलें.

**अर्जुनराया**च्या दोघा चिरंजिवांस बऱ्याच जखमा झाल्या होत्या, **मेघनादा**च्या उजव्या बाहूवर वार झाला होता, आणि धाकट्या **बाहुभुजा**ची उजव्या पायाची नळी बरीचशी तुटली होती. रक्तप्रवाह पुष्कळ झाल्यामुळें दोघेही निचेष्टित होऊन पडले होते. वृद्ध **अर्जुनराय** व बाकीची सरदार मंडळी त्यांच्या सभोंवार जमून जखमा बांधण्याची व त्यांस शुद्धीवर आणण्याची खटपट करीत होते. शेवटीं ते शुद्धीवर येतांच त्यांस तेथेंच बैठकीवर एका बाजूस स्वस्थ निजविलें. सर्व घोंटाळयामुळें मंडळीचा संतापही आतां बहुतेक उतरला होता. मग खऱ्या महत्वाच्या गोष्टींबद्दल विचार चालू झाले. **गूहासिंहा**कडून आलेला खजिना तर राणीच्या हातीं लागला. आतां सैन्याच्या खर्चाची तजवीज कशी करावयाची ? राणीचें सैन्य आतां ताबडतोब तयार होईल त्याचा प्रतिकार आतां कसा करावयाचा ? आपली शपथपत्रिका आणि कटांतील सर्व गृहस्थांची यादी **कुमुदबंधू**च्या हातीं लागली आहे. त्यांचा उपयोग तो कसा करतो कोण जाणें ? इत्यादि गोष्टींबद्दल मंडळींत प्रथमतः आपापसांत विचार चालू झाले. फक्त **अर्जुनराय** मात्र चिंताक्रांत होऊन व खिन्नवदन करून स्वस्थ बसला होता. **उग्रसिंह**महाराजांस झालेल्या गोष्टी मान्य नाहींत असें जें **कुमुदबंधूनीं** सांगितलें तें अक्षरशः खरें असावें असें त्यास वाटूं लागलें. कारण **कुमुदबंधु** इतक्या मंडळींच्या हातून सुटून गेला, शपथपत्रिका त्याच्या हातीं लागली, महाराजांच्या पुत्रशस्त्रानेंच आपल्या दोघा मुलांस भयंकर जखमा झाल्या, हीं कांहीं सुचिन्हें नव्हेत असें त्याच्या मनांत घोळूं लागलें.

"**शक्तिधरराय** व **महासेनराय** यांचें झालें तरी काय ? ते अजून कां परत येत नाहींत !" **कुमुदबंधु तपोमंदिरा**बाहेर गेल्यानंतरच्या अवकाशांत **जयद्रथराय** पुनः पुनः पंचवीसदां तरी ह्मणाला असेल,

"अशा महत्त्वाच्या वेळीं असल्या दोघा सरदारांच्या विचाराशिवाय कांहींच ठरवितां येत नाहीं."

"कदाचित्" एक सरदार ह्मणतो, "बालार्करायाची गांठ पडण्याकरितां ते पुढें पुढेंच गेले असतील."

"आणि आतां संध्याकाळच्या आंत किंवा निदान रात्रीं तरी बालार्करायही बहुधा परत येईल. मग कोण जाणे, आम्ही त्या महेश्वरकरास देहांतशासन करावयाचें ठरविलें त्याबद्दल तो त्याचा सूड उगवितो कीं काय." दुसरा एक सरदार जयद्रथरायाकडे पाहत बोलला.

"मला नाहीं वाटत कीं, तो महेश्वरकर सरदार असला क्रूरपणा करील!" जयद्रथराय ह्मणाला.

"बरें, पण आतां गुहसिंहमहाराजाकडून येणाऱ्या द्रव्याचें नांव तर संपलेंच. आतां पुढील बेत कसे?" पशुपतराय नांवाचा एक सरदार विचारितो.

"आतां दुसरा बेत कांहीं नाहीं." जयद्रथराय उत्तर करितो. "आतां उद्यांच्या उद्यां येथून निघून कूच दरकूच एकदम सरळ कुवलयपुरीवर जाऊन धडकणें जरूर आहे. आतां जर आह्मीं अत्यंत त्वरा केली नाहीं तर सर्व फसेल. राणीचें सर्व सैन्य गोळा होऊन ती आमचा पाठलाग करण्यास सज्ज होण्यापूर्वीच मुख्य राजधानीवर जाऊन आपण हल्ला केला असतां यश येण्याचा पुष्कळ संभव आहे. आतां शक्तिधरराय व महासेनराय परत आले, कीं त्यांना आपआपल्या किल्ल्याकडे तावडतोब जाण्यास सांगितलें पाहिजे. त्यांनीं परवां सायंकाळचे आंत आपल्या सर्व स्वारशिबंदीनिशीं आह्मांस येऊन मिळावें, आणि तेरवाचे दिवशीं सायंकाळीं आपण सर्व सैन्यानिशीं कुवलयपुरीस जाऊन एकदम वेढा दिला पाहिजे."

"ऐका, कोणी दरवाजाचा आढणा काढीत आहेसें वाटतें. बहुतकरून आमची ही कैद संपली आतां!" दरवाजाच्या जवळच असलेला एक गृहस्थ ह्मणाला.

त्या गृहस्थानें ह्मटलें तें खरेंच होतें. ज्या हुजऱ्यानें कुमुदबंधूस तपोमंदिरांत आणून पोंचविलें होतें तोच हुजऱ्या फिरून कांहीं जरूरीच्या कामाकरितां दरवाजाशीं आला. बाहेरून आढणा आहे हें पाहून त्याला थोडें आश्चर्य वाटलें; पण आढणा काढून त्यानें दरवाजा उघडला. आंत येतांच कुमुदबंधु तेथून कसा निसटला हें त्याला समजलें व तो अगदीं चकित होऊन गेला.

थोड्याच वेळांत पूर्वस्थितीवर येऊन त्यानें जयद्रथरायास लवून प्रणाम केला व ह्मटलें, "महाराज कोणी जासूद फार त्वरेनें आला आहे व त्यानें हा लखोटा आणला आहे." असें ह्मणून त्यानें लखोटा जयद्रथरायापुढें ठेविला.

जयद्रथरायानें लखोटा फोडिला. पत्रांतील मजकूर वाचून पहात असतां त्याचा चेहरा एकदम काळाठिकर झाला. जयद्रथरायाची मुद्रा नेहमीं त्याच्या इतकी स्वाधीन असे, कीं त्याचें मन कितीही चलबिचल झालें असलें, तथापि त्याचा चेहरा नेहमीं शांत व गंभीर व पूर्णपणें निश्चल दि-

साजयाचा! असें असतां हें पत्र वाचतांच एकाएकीं त्याच्या मुद्रेंत असा फरक झालेला पाहून बहुतेक मंडळी चकित झाली, आणि बहुतेकांच्या तोंडून उद्गार आले: "काय, बातमी तरी काय आहे? असलें हें पत्र आलें आहे तरी कोणाकडून?"

"सरदार **शक्तिधररायाकडून** हें पत्र आलें आहे." **जयद्रथराय** उत्तर करितो. "सरदारसाहेबांनीं आमचा पक्ष सोडला."

"काय? **शक्तिधररायांनीं** आमचा पक्ष सोडला!" सर्व मंडळी एकाच आवाजानें विचारतात.

"होय, होय. त्यांचें लिहिणें अगदीं स्पष्ट आहे!" **जयद्रथराय** आपला संताप आंतल्या आंत दाबून ह्मणतात, "आणि असें करण्याबद्दल त्यांनीं कारण लिहिलें आहे तेंही फार योग्य आहे! ते ह्मणतात, 'विचाराअंतीं मला असें वाटलें कीं, आमच्यासारख्या सन्मान्य गृहस्थास आणाशपथा वहावयाचा व दस्त लिहून देण्याचा प्रसंग यावा ही लज्जेची गोष्ट आहे! आपल्या नुसत्या शब्दावर विश्वास ठेवण्यास जे गृहस्थ तयार नाहींत त्यांच्याशीं संबंध ठेवणें आपल्यास बिलकुल पसंत नाहीं; ह्मणून या घटकेपासून आपल्या कटापासून मी अलग झालों आहें असें समजावें.'"

इतक्यांत दुसरा एक हुजऱ्या आला. त्याच्याही हातांत एक लखोटा होताच. त्यानें मुजरा करून लखोटा **जयद्रथरायापुढें** ठेविला. **जयद्रथराय** तो फोडून वाचीत असतां सर्व मंडळी जिज्ञासेनें व संशयानें गोंधळून गेली होती आणि पत्रांतील मजकूर ऐकण्यास फारच आतुर झाली होती.

"हें पत्र आपले बंधु सरदार **महासेनराय** यांजकडून आलें आहे." **जयद्रथरायाचा** संताप अनावर होऊं लागून तो ह्मणतो, "हेही शूर सरदार आपल्या पक्षापासून अलग झाले. यांनीं लिहिलेलें कारणही त्यांच्या मित्राच्या पत्रांतील कारणाइतकेंच सयुक्तिक व जोरदार आहे! यांना का नामर्द ह्मणावें का हरामखोर ह्मणावें! ऐनप्रसंगीं असा विश्वासघात!"

सर्व मंडळींच्या तोंडून खेद, आश्चर्य व त्वेष यांचे उद्गार निघाले फक्त **अर्जुनराय** मात्र आपल्या उजव्या हातावर मान ठेऊन सचिंतमुद्रेनें व उदास अंतःकरणानें आपल्याशींच विचार करण्यांत चूर झाले होते.

**शक्तिधर** व **महासेन** यांजकडून आलेल्या पत्रांबद्दल व आज सर्व बाजूंनीं येऊन गुदरेल्या प्रसंगाबद्दल सर्वजण खलबतें करीत तसेच बसले होते. फक्त **बहुभुजांच्या** जखमी झालेल्या दोघा चिरंजिवांस वाड्यांत नेऊन ठेविलें होतें. **अर्जुनराय** देखील **तपोमंदिरांतच** बसले होते; इतक्यांत **बालार्कराय** सेनापती **तपोमंदिराच्या** दरवाजाशीं आला. त्याचा चेहरा अगदीं फिकट झाला होता, कपाळास आंठ्या पडल्या होत्या, व एकंदर मुद्रा कांहींशी सचिंत व बरीच संतप्त दिसत होती.

"सरदारहो, मित्रहो, बांधवजनहो," खेदापूर्वक शब्दानें **बालार्कराय** बोलतो. "हा पहा मी येथें शरिरानें सुखरूप येऊन

तुमच्या पुढें उभा आहें ! मी सुखरूप परत आलों याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानिले पाहिजेत काय ? आपण आपला उदारपणा व आपली बंधुप्रीति फारच चांगल्या प्रकारें दाखविली ! मित्रापेक्षांही केव्हां केव्हां शत्रुच अधिक उदार ठरतात हा नवीन अनुभव मीं आज पाहिला ! सरदारहो, तुह्मी आपल्या क्रूरपणाच्या वृत्तींनीं वेडाऊन गेल्यामुळें एकाच वेळीं दोन पातकें करण्यास तयार झालांना ? जो उदार अंतःकरणाचा शत्रु तुमच्या महात्मतेवर व तुमच्या सुशीलत्वावर विश्वास टाकून केवळ निरपेक्षबुद्धीनें तुह्मांशीं सलोख्याचें दोन शब्द बोलावें ह्मणून आला, त्याचा घात करण्यास व त्याच्याच बरोबर तुमच्या एका बंधूस निष्कारण बळी देण्यास तुह्मीं अनुमोदनें दिलीं. हा तुह्मा सर्वांचा मोठेपणा ना, आणि हीच तुमची बंधुप्रीति ना !"

"बाळा **बालार्कराया**," **जयद्रथराय** खिन्नमुद्रेनें त्याजकडे पहात ह्मणतो, "ह्या गोष्टींत माझा बिलकुल हात नाहीं. मंडळींच्या बहुमतानें हा विचार झाला व मी अगदीं निरुपाय झालों. तुला सुरक्षित परत आलेला पाहून मला किती आनंद झाला आहे हें एक त्या परमेश्वरासच ठाऊक ! **बालार्कराय**, पण अगोदर सांग मला, दुसऱ्या कितीएकाप्रमाणें तुझेही विचार फिरले नाहींतना ? तूं तरी पहिल्यासारखाच आपल्या पक्षाचा कट्टा अभिमानी आहेसना ?"

**बालार्करायानें** एक वेळ मान हालविली, आणि मनाचा निग्रह करून तो स्पष्टपणें ह्मणाला, "**काका**साहेब, मी आतां आपला नाहीं ! मी आपली व या सर्व सरदारमंडळींची रजा घेण्याकरितां आलों आहें !"

"काय ! आणखी एक विश्वासघातकी !" कांहीं सरदार मंडळी संतापानें ह्मणाली.

"मी काय सांगतों तें ऐका अगोदर !" **बालार्कराय** निश्चय व अधिकारयुक्त स्वरानें व रागाचा आवेश आणून ह्मणतो, "सरदारहो, आपला पक्ष सोडण्याचा मला आज हा प्रसंग आला हें तुमच्याच अविचारीपणाचें फळ ! सरदार **कुमुदबंधूस** तुह्मीं शिष्टपणानें वागविलें असतें तर हा प्रसंग मजवर आला नसता. त्या गृहस्थाची कत्तल करण्यास तुह्मी उद्युक्त झालां होतात. तो सुटून गेला हें त्याच्या धाडसीपणाचें व प्रसंगावधानाचें फळ ! पण तुह्मीं त्यास ठार मारण्याचें ज्याअर्थी ठरविलें त्याअर्थी माझे प्राण घेण्याचा त्यास पूर्ण अधिकार आला. अशा प्रसंगीं मी त्याचा कैदी असतां व देहांतशासनास पात्र असतां, तो सांगेल त्या अटी कबूल करणें मला भाग पडलें, त्यानें मला व माझ्या दोघा अनुचरांस जिवंत सोडिलें, तें फक्त एका अटीवर. मी यापुढें कोणत्याही प्रकारें राणीपक्षाच्या विरुद्ध असणाऱ्या मंडळीशीं संबंध ठेऊं नये व त्यांस कशाही प्रकारचें सहाय्य करूं नये, असें वागण्याबद्दल त्यानें मजकडून **उग्रसिंह**महाराजांच्या पादुकांची शपथ वहावयास लाविली. तुमचा मजवर विश्वास नसेल तर हे मजबरोबर असलेले दोघे शिपाई दरवाजाबाहेरच आहेत, त्यांस ही हकीगत खरी आहे कीं नाहीं हें विचारून घ्या ! आतां मला सांगा कीं, **उग्रसिंह**महाराजांच्या पा-

सावयाचा ! असें असतां हें पत्र वाचतांच एकाएकीं त्याच्या मुद्रेंत असा फरक झालेला पाहून बहुतेक मंडळी चकित झाली, आणि बहुतेकांच्या तोंडून उद्गार आलेः " काय, बातमी तरी काय आहे ? असलें हें पत्र आलें आहे तरी कोणाकडून? "

" सरदार **शक्तिधररायाकडून** हें पत्र आलें आहे. " **जयद्रथराय** उत्तर करितो. " सरदारसाहेबांनीं आमचा पक्ष सोडला. "

" काय ? **शक्तिधररायांनीं** आमचा पक्ष सोडला ! " सर्व मंडळी एकाच आवाजानें विचारतात.

" होय, होय. त्यांचें लिहिणें अगदीं स्पष्ट आहे ! " **जयद्रथराय** आपला संताप आंतल्या आंत दाबून ह्मणतात, " आणि असें करण्याबद्दल त्यांनीं कारण लिहिलें आहे तेंही फार योग्य आहे ! ते ह्मणतात, ' विचाराअंतीं मला असें वाटलें कीं, आमच्यासारख्या सन्मान्य गृहस्थास आणाशपथा वहावयाचा व दस्त लिहून देण्याचा प्रसंग यावा ही लज्जेची गोष्ट आहे ! आपल्या नुसत्या शब्दावर विश्वास ठेवण्यास जे गृहस्थ तयार नाहींत त्यांच्याशीं संबंध ठेवणें आपल्यास बिलकुल पसंत नाहीं ; ह्मणून या घटकेपासून आपल्या कटापासून मी अलग झालों आहें असें समजावें.' "

इतक्यांत दुसरा एक हुजऱ्या आला. त्याच्याही हातांत एक लखोटा होताच. त्यानें मुजरा करून लखोटा **जयद्रथरायापुढें** ठेविला. **जयद्रथराय** तो फोडून वाचीत असतां सर्व मंडळी जिज्ञासेनें व संशयानें गोंधळून गेली होती आणि पत्रांतील मजकूर ऐकण्यास फारच आतुर झाली होती.

" हें पत्र आपले बंधु सरदार **महासेनराय** यांजकडून आलें आहे. " **जयद्रथरायाचा** संताप अनावर होऊं लागून तो ह्मणतो, " हेही शूर सरदार आपल्या पक्षापासून अलग झाले. यांनीं लिहिलेलें कारणही त्यांच्या मित्राच्या पत्रांतील कारणाइतकेंच सयुक्तिक व जोरदार आहे ! यांना का नामर्द ह्मणावें का हरामखोर ह्मणावें ! ऐनप्रसंगीं असा विश्वासघात ! "

सर्व मंडळींच्या तोंडून खेद, आश्चर्य व द्वेष यांचे उद्गार निघाले फक्त **अर्जुनराय** मात्र आपल्या उजव्या हातावर मान टेकून सचिंतमुद्रेनें व उदास अंतःकरणानें आपल्याशींच विचार करण्यांत चूर झाले होते.

**शक्तिधर** व **महासेन** यांजकडून आलेल्या पत्रांबद्दल व आज सर्व बाजूंनीं येऊन गुदरेल्या प्रसंगाबद्दल सर्वजण खलबतें करीत तसेच बसले होते. फक्त **बहुभुजांच्या** जखमी झालेल्या दोघा चिरंजिवांस वाड्यांत नेऊन ठेविलें होतें. **अर्जुनराय** देखील **तपोमंदिरांतच** बसले होते; इतक्यांत **बालार्कराय** सेनापती **तपोमंदिराच्या** दरवाजाशीं आला. त्याचा चेहरा अगदीं फिकट झाला होता, कपाळास आंठ्या पडल्या होत्या, व एकंदर मुद्रा कांहींशी सचिंत व बरीच संतप्त दिसत होती.

" सरदारहो, मित्रहो, बांधवजनहो, " निंदापूर्वक शब्दानें **बालार्कराय** बोलतो. " हा पहा मी येथें शरिरानें सुखरूप येऊन

तुमच्या पुढें उभा आहें ! मी सुखरूप परत आलों याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानिले पाहिजेत काय ? आपण आपला उदारपणा व आपली बंधुप्रीति फारच चांगल्या प्रकारें दाखविली ! मित्रापेक्षांही केव्हां केव्हां शत्रुच अधिक उदार ठरतात हा नवीन अनुभव मीं आज पाहिला ! सरदारहो, तुह्मी आपल्या क्रूरपणाच्या वृत्तींनीं वेडाऊन गेल्यामुळें एकाच वेळीं दोन पातकें करण्यास तयार झालांना ? जो उदार अंतःकरणाचा शत्रु तुमच्या महात्मतेवर व तुमच्या सुशीलत्वावर विश्वास टाकून केवळ निरपेक्षबुद्धीनें तुह्मांशीं सलोख्याचें दोन शब्द बोलावें ह्मणून आला, त्याचा घात करण्यास व त्याच्याच बरोबर तुमच्या एका बंधूस निष्कारण बळी देण्यास तुह्मीं अनुमोदनें दिलीं. हा तुह्मा सर्वांचा मोठेपणा ना, आणि हीच तुमची बंधुप्रीति ना !"

"बाळा **बालार्कराया,**" **जयद्रथराय** खिन्नमुद्रेनें त्याजकडे पहात ह्मणतो, "ह्या गोष्टींत माझा बिलकुल हात नाहीं. मंडळींच्या बहुमतानें हा विचार झाला व मी अगदीं निरुपाय झालों. तुला सुरक्षित परत आलेला पाहून मला किती आनंद झाला आहे हें एक त्या परमेश्वरासच ठाऊक ! **बालार्कराय,** पण अगोदर सांग मला, दुसऱ्या कितीएकांप्रमाणें तुझेही विचार फिरले नाहींतना ? तूं तरी पहिल्यासारखाच आपल्या पक्षाचा कट्टा अभिमानी आहेसना ?"

**बालार्करायानें** एक वेळ मान हालविली, आणि मनाचा निग्रह करून तो स्पष्टपणें ह्मणाला, "**काका**साहेब, मी आतां आपला नाहीं ! मी आपली व या सर्व सरदारमंडळींची रजा घेण्याकरितां आलों आहें !"

"काय ! आणखी एक विश्वासघातकी !" कांहीं सरदार मंडळी संतापानें ह्मणाली.

"मी काय सांगतों तें ऐका अगोदर !" **बालार्कराय** निश्चय व अधिकारयुक्त स्वरानें व रागाचा आवेश आणून ह्मणतो, "सरदारहो, आपला पक्ष सोडण्याचा मला आज हा प्रसंग आला हें तुमच्याच अविचारीपणाचें फळ ! सरदार **कुमुदबंधूस** तुह्मीं शिष्टपणानें वागविलें असतें तर हा प्रसंग मजवर आला नसता. त्या गृहस्थाची कत्तल करण्यास तुह्मी उद्युक्त झालां होतात. तो सुटून गेला हें त्याच्या धाडसीपणाचें व प्रसंगावधानाचें फळ ! पण तुह्मीं ज्यास ठार मारण्याचें ज्याअर्थीं ठरविलें त्याअर्थीं माझे प्राण घेण्याचा त्यास पूर्ण अधिकार आला. अशा प्रसंगीं मी त्याचा कैदी असतां व देहांतशासनास पात्र असतां, तो सांगेल त्या अटी कबूल करणें मला भाग पडलें, त्यानें मला व माझ्या दोघा अनुचरांस जिवंत सोडिलें, तें फक्त एका अटीवर. मी यापुढें कोणत्याही प्रकारें राज्ञीपक्षाच्या विरुद्ध असणाऱ्या मंडळीशीं संबंध ठेऊं नये व त्यांस कशाही प्रकारचें सहाय्य करूं नये, असें वागण्याबद्दल त्यानें मजकडून **उग्रसिंह**महाराजांच्या पादुकांची शपथ वहावयास लाविली. तुमचा मजवर विश्वास नसेल तर हे मजबरोबर असलेले दोघे शिपाई दरवाजाबाहेरच आहेत, त्यांस ही हकीगत खरी आहे कीं नाहीं हें विचारून घ्या ! आतां मला सांगा कीं, **उग्रसिंह**महाराजांच्या पा-

दुकांची शपथ **उग्रसिंह**गुहेसारख्या पूज्य-स्थानीं वाहिली असतां ती मला मोडतां येईल काय ? बरें, शपथ वाहिली नसती तर माझे प्राण व या दोघा गरीब शिपायांचे प्राण व्यर्थ बळीं पडले असते. "

" काय **उग्रसिंह**महाराजांची गुहा ! " **अर्जुनराय** अकस्मात् दचकून जागा झाला व घाबऱ्या घाबऱ्या विचारतो, " काय **बालार्कराय**, हे सर्व **उग्रसिंह**महाराजांच्या गुहेंत झालें काय ? "

" होय, त्याच ठिकाणीं प्रथम मला कैदी होऊन राहवें लागलें होतें, व पुढें हा पक्ष सोडण्याची शपथही त्याच ठिकाणीं वहावी लागली ! " **बालार्कराय** उत्तर करितो.

" बस, बस, तर मग मींही तुमचा पक्ष सोडला ! " **अर्जुनराय** एकदम उभा राहिला व ओरडून ह्मणाला, " मला आतांपर्यंत वाटत होतें, कीं आमचीं कृत्यें महाराज **उग्रसिंह** यांस मान्य असतील ह्मणून, पण तें खोटें आहे. त्यांस हा राजद्रोह पसंत नाहीं; मी तरी यांत पडूं नये अशी त्यांची इच्छा दिसते. आजच्या ऐनप्रसंगीं आरंभापासूनच सर्व गोष्टी प्रतिकूल घडत आहेत व त्या सर्वांशीं महाराजांचा संबंध आहे. त्या **महेश्वरकरानें** मघां सांगितलें तें अक्षरशः खरें. बस ! बस ! ठरलें. मीं आतांपर्यंत ज्या शपथा घेतल्या त्या अगदीं पोकळ आहेत ! असल्या आणखी हजार शपथा जरी मीं वाहिल्या असत्या तरी असल्या कामास मी आतां सहाय्य व्हावयाचा नाहीं. **महामंडलेश्वर**-महाराज, आह्मीं तुमचा पक्ष सोडला, आह्मी मध्यस्थासारखे आपल्या किल्ल्यांत स्वस्थ बसून राहणार ! "

हें बोलणें आटोपलें तों **बालार्कराय** दरवाजाच्या बाहेर पडलाच होता. त्याच्याच पाठीमागून वृद्ध **अर्जुनराय**ही तावडतोब त्या खोलीच्या बाहेर पडले व आपल्याशीं कांहीं पुटपुटत सरळ वाड्याकडे चालते झाले. ते निघून जातांच आणखी कांहीं मंडळी भराभर उठून उभी राहिली व " आह्मींही हा पक्ष सोडला, आह्मांसही **अर्जुनराया**-प्रमाणेंच वाटतें !" असें ह्मणून पटापट दरवाजाबाहेर पडले. शेवटीं **जयद्रथराय** व आणखी आठनऊ असामी येवढेच कायते बाकी राहिले. बाकी बार घटकांपूर्वी जमलेले सर्व शाळूसोबती आपआपल्या मार्गांनीं चालते झाले !

## भाग १८ वा.

( **पत्याराधन** आणि **सखीवियोग**. )

वाचकहो, चला फिरून **कुवलयपुरी**कडे जाऊं. आपण **कुमुद्वती**राणीस **अमरसिंहा**च्या बागेंतील वाड्यांत सोडून आलों, तेथेंच प्रथम परत चला. **कुमुदबंधु गोलदुर्गा**कडे येत असतां **अमरसिंहा**च्या बागेजवळच **नलिनी**ची व त्याची किती विलक्षण प्रसंगीं गांठ पडली होती हें तुमच्या ध्यानांत असेलच. तेथून **कुमुदबंधु गोलदुर्गा**च्या वाटेस लागला व **नलिनी** लगबगीनें परत **अमरसिंहा**च्या बागेकडे गेली. ती परत जाते तों राणीसाहेब वेणीफणी आटपून तयार होत्या. **नलिनी** अगदीं वेळींच जाऊन पोंचली.

# केसरींतील निवडक निबंध.

भाग पहिला व दुसरा; प्रत्येकास किं० १ रुपया, ट. ख. ०२ आणे.

पहिले व दुसरे भागांत आलेले निबंधांची अनुक्रमणिका.


उपोद्घात—वाचन.
आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण ?
हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे.
आह्मी आमच्या दारिद्र्यांतून कशानें सुटूं?
गुरुगोविंद.
रक्षकाची आवश्यकता.
व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं.
आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा.
हिंदुस्थानावर रशिया स्वारी करणार काय ?
इंग्लंडाशिवाय आह्मांस गति नाहीं.
दागिन्यांचा सोस.
एकत्र राहणें चांगलें का ?
अनुकरण.
अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार.
भोजनगृह.
युरोपियन आणि नेटिव यांचें अन्योन्य संघट्टन.
मराठमोळा.
मराठमोळ्याची पुरवणी.
सासुरवास.
दारुबाजी.
इंग्रजी विद्या व आमची सामाजिक स्थिति.
हिंदुस्थानदेश बुडाला, हो, फार बुडाला.
स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द.
माधवबागेंतील सभेवरील आक्षेप.
सास्वांस नोटीस.
वर्तमानपत्रें.
शेक्सपिअर, भवभूति, कालिदास.
नाटकें करावीं कीं करूं नये ?
कवि, काव्य, काव्यरति.
बडोद्याचे सयाजीराव महाराज यांस दोन उपदेशपर शब्द.
आपलें वैद्यक.
रसायनक्रिया.
मुद्रणस्वातंत्र्य.
रा० विष्णु कृष्ण चिपळोणकर.
म० आणि मेंदू.
सृष्टयवलोकन.
ज्ञान.
अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन.
बहिष्कार.
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.
समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने.
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि.
मनुष्यांचें सामाजिक कर्तव्य
मुत्सद्दी व योद्धा.
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतिभातीचा संबंध.
मनुष्यजातीची पूर्णावस्था.
स्वदेशाभिमान.
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?
बालविवाहापेक्षां सतीच बरी !
देशोन्नति.
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?
स्त्रीदास्यविमोचन.
चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें ?
आह्मा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें.
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचे म० व्हाट.
एक वृद्ध पोलिटिकल अत्याबाई.
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे.
व्यायाम.
परभाषेंतील शब्दांची योजना.
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता.
उद्योगवृद्धि.
निजामास राज्याभिषेक.
ज्वालामुखी पर्वत.
मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य.
शास्त्र व बायबल.
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न—चित्रकला प्रसिद्धीकरण.
ब्रह्मदेश.
शिल्पशाळा.
कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार.
करासंबंधीं कित्येक गमतीचे प्रश्न.
पाऊस
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार
शास्त्राभ्यास.
स्वातंत्र्य.
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले.
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?
,, उत्तरार्ध.
ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष !
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन.
हिंदुस्थानचें कलाकौशल्य.
आमचीं धर्मकृत्यें व रिवाज.
राज्यतृष्णा.
जनरल गार्डन.
सभास्थापन.
संतति व संपत्ति


म्यानेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें.

# नाट्यकथार्णव.

## कादंबऱ्या, गोष्टी, नाटकें, प्रहसनें इ० चें मासिक पुस्तक.

राजकीय, सामाजिक, लोकशिक्षणसंबंधी, उद्योगधंद्याविषयीं अनेक महत्वाच्या प्रश्नांचा विचार कर करून ज्यांचें डोकें भणभणून गेलें आहे व त्यांतही संसाराच्या जिगजिगीनें ज्यांच्या मनाची शांति नाहींशी झाली आहे अशा गृहस्थांनीं आपल्या मनाची करमणूक होईल अशा रीतीनें कांहीं काळ घालविणें अवश्य आहे. **नाट्यकथार्णव** मासिक पुस्तक हें अशा **करमणुकीचें उत्कृष्ट साधन** आहे.

**वर्गणी थोडी ह्मणजे वर्षास अवघे तीन रुपयेच ( आगाऊ देण्याचे ); आंतील मजकूर वाचनीय, मनोरंजक आणि समजणारास बोधपर; शेक्सपियर वगैरे कविकुलमुकुटमणींच्या सर्वमान्य ग्रंथांतील स्वारस्य महाराष्ट्रभाषा जाणणाऱ्या वाचकांस मिळविण्याचें उत्तम साधन.**

कांहीं काळामागें या पुस्तकाचे अंक नियमितपणें निघत नसत पण हल्लीं नवीन व्यवस्थेखालीं मागील सर्व अडचणी दूर करून गेले **दीड वर्ष अंक वेळच्या वेळीं निघाले** असून पुढेंही असाच नियमितपणा राहील.

हल्लीं असलेल्या व नवीन होणाऱ्या वर्गणीदारांकरितां **एक नवीन व्यवस्था** योजिली आहे. ज्यांच्याकडून **नाट्यकथार्णवा**च्या वर्गणीची मागील सर्व बाकी आणि पुढील सालची आगाऊ वर्गणी येत्या जानेवारीअखेरपर्यंत आली असेल आणि जे सदर मुदतीच्या आंत आगाऊ वर्गणी भरून वर्गणीदार होतील त्यांस **एक नवीन नाटकाचें पुस्तक** नजर करण्यांत येईल.

| | |
|---|---|
| आर्यभूषण छापखाना, पुणें. | हरी नारायण गोखले, म्यानेजर नाट्यकथार्णव. |